# हिंदू कोडबिलामुळे महिलांचे झालेले सक्षमीकरण एक अभ्यास

**जयश्री सुभाष दाभाडे**
संशोधिका
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ

**डॉ. अनिल जामकर**
मार्गदर्शक
वसंतराव नाईक महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर

**प्रस्तावना :**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार आणि भारतीय महिलांचे उद्धारक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या ठिकाणच्या महिला जातीचे या हिंदू कोडबिलामुळे सक्षमीकरण करण्याचे मोलाचे कार्य केलेले असून त्यांनी या ठिकाणच्या भारतीय स्त्रियांना प्रवाहात आणण्याचे कार्य आहे. त्यांना स्त्री-पुरुष समानतेच्या धाग्यात आणण्याचे काम करून पारंपारिक प्रथा-परंपरेमुळे स्त्रियांना अनेक संकटांना तोंड देऊन पुरुषांच्या सोबत राहणे शक्य नव्हते. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हिंदू कोड बिलाच्या पर्याय आणून त्यामुळे स्त्रियांना पुरुषाएवढा समान अधिकार देण्याचे कार्य त्यांनी केले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्रियांसाठी एका हातात कायद्याचे शस्त्र तर दुसऱ्या हातात चळवळीचे शस्त्र हातात घेऊन ही सामाजिक लढाई लढलेली आहे. त्यांनी या शोषित पिडीत महिलांना हजारो वर्षा पासून पेचात पडलेल्या महिला वर्गास सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, धार्मिक, आर्थिक समानता किंवा सक्षमीकरण करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या साठी त्यांनी हिंदू कोडबिल हे एक कवच कुंडल ठरविण्याचा प्रयत्न करण्यात आला असून त्याला हिंदू कायद्याच्या संहतीकरणाविषयीच्या विधेयकाला बाबासाहेबांच्या लेखनास अनन्यसाधारण महत्त्व आहे यासाठी त्यांना अनेक सामाजिक चळवळी घडून आणाव्या लागल्या त्यातून स्त्रियांना एकत्रित करून त्यांचे अधिकार प्रदान करण्याचा प्रयत्न केला परंतु आजही काही प्रमाणात का होईना हिंदू प्रथा परंपराचा बिमोड झालेला पहावयास मिळतो. स्त्रिया ह्या या जखाडामधून बाहेर आलेल्या पाहवयास मिळतात. बाबासाहेबांनी हिंदू कोडबिल मांडल्यामुळे स्त्रियांना त्यांचे अधिकार मिळाले आणि त्यात त्याचे सक्षमीकरण झालेले पहावयास मिळते.

**गृहितके :**

1. हिंदू कोड बिल आणि महिला सक्षमीकरण अभ्यासणे.
2. महिलांच्या विवाह विषय समस्या अभ्यासणे.
3. हिंदू धर्मातील वारसा हक्क अभ्यासणे.
4. हिंदू धर्मातील दत्तक विधान अभ्यासणे.
5. पोटगीच्या अधिकाराचा अभ्यास करणे.

**उद्दिष्टे :**

1. हिंदू कोड बिलामुळे महिलांचे सक्षमीकरण घडून आले.
2. महिलांना विवाहाच्या समस्यांना सामोरे जावे लागले.
3. महिलांना वारसा हक्क मिळण्यासाठी हिंदू कोड बिल योग्य मार्गदर्शक आहे.
4. हिंदू धर्मातील दत्तक विधान हे स्त्रियांना सक्षम बनविणारे आहे.
5. पोटगीमुळे स्त्रियांना उर्वरित जीवन जगण्यास योग्य ठरेल.

**स्त्रियांचे सक्षमीकरण :**

**1. दुसरा विवाह करू शकते : हिंदु विधवापुनर्विवाहोत्तेजक कायदा 1856**

हिंदू धर्मानुसार स्त्री ही दूसरा विवाह करू शकत नव्हती तीला आपला पती मरण पावला तर सती जावे लागत किंवा केशवपन करून रहावे लागत. परंतु हिंदू कोडबिलामुळे जर एखाद्या स्त्रीस एखादा पुरुष पसंत नसेल तर ती दुसऱ्या पुरुषा बरोबर आपला संसार नव्याने सुरू करू शकते. तिचा पती वेडा किंवा त्यांच्याकडून संतती प्राप्ती होत नसेल तर ती दुसरा विवाह करू शकते.

**2. तलाक : भारतीय तलाक कायदा 1872 :**

हिंदू कोडबिलातील काही गोष्टीमुळे पुरुषापासून स्त्रियांना तलाक घेता येतो. यात 1) परित्याग, 2) धर्म परिवर्तन, 3) रखेली ठेवणे किंवा रखेल होणे, 4) असाय उन्माद करणे, 5) भयंकर आणि असाध्य कुष्ठरोग होणे, 6) संक्रामक गुप्त रोग होणे, 7) दृष्ट व क्रूरतापूर्ण व्यवहार असणे अशा स्वरूपाच्या कारणांमुळे स्त्रियांना त्या पुरुषांकडून तलाक घेता येतो.

**3. दत्तक वारसा हक्क :**

स्त्रियांना आपले स्वतःचे मूलबाळ नसल्यास किंवा कोणीही वारस नसल्यास दुसऱ्याचे मूल दत्तक घेण्याचा अधिकार हा या हिंदू कोडबिलामुळे मिळाला आहे.

**4. संपत्तीचा अधिकार :**

पूर्वीच्या काही स्त्रियांना संपत्तीचा अधिकार नव्हता तिला आपल्या सासरी किंवा माहेरच्या संपत्तीत कोणताही वारसा हक्क मिळत नसत. तिने फक्त आपल्या पोटाला लागेल तेव्हढेच खाणे किंवा मिळेल त्यातच आपले जीवन व्यतीत करावे लागत असे परंतु या हिंदू कोड बिलामुळे स्त्रियांना आपल्या माहेरच्या आणि सासरच्या संपत्तीत अर्धा हिस्सा मिळू शकतो.

**5. उत्तराधिकारीचा हक्क :**

एखाद्या विधवेस तिच्या माहेर किंवा सासरच्या लोकांनी तिचा नामोलेख हा त्या वसीयत नाम्यात नसेल तर ती उत्तराधिकारीचा हक्क सांगू शकृत नव्हती. परंतु हिंदू कोड बिलामुळे स्त्रियांना आपल्या पतीच्या मृत्युनंतर त्या स्त्रीस संपूर्ण उत्तराधिकारी होण्याचा हक्क प्रदान करण्यात आला आहे.

**6. पोटगी घेण्याचा अधिकार :**

कोणत्याही स्त्रीला जर तिच्या नवऱ्याने सोडले तर तिला त्याच्या कमाईचा काही भाग हा 'पोटगी' म्हणून मिळाला पाहिजे यासाठी हा कायदा करण्यात आला असून किंवा पतीने मुलांसह सोडले तर मुलाबाळांचा खर्च त्याने द्यावा व विशिष्ट वयापर्यंत मुलांना सांभाळण्याची संपूर्ण जबाबदारी सासरचे सर्व नातेवाईक असतानाही आईलाच मिळावा अशी तरतूद या कायद्यात करण्यात आली. पतीला जर दुसरा विवाह करायचा असल्यास पहिल्या पत्नीची संमती आवश्यक मानली जाते. जर तिच्या संमतीशिवाय पतीने दुसरा विवाह केला तर त्याला कठोर शिक्षा व दंड कायद्याने दिल्या प्रमाणे ठोठावण्यात येतो.

1952 नंतर सरकारतर्फे पूर्वीच्या हिंदू कोड मसुद्यातून (1) दि हिंदू मॅरेज 8 ॲक्ट 1177. (2) दि हिंदू सक्सेशन ॲक्ट, जून 1956 (3) दि हिंदू मायनॉरिटी ॲण्ड गार्डियनशिप ॲक्ट, ऑगस्ट 1956 आणि (4) दि हिंदू अडॉप्शन ॲण्ड मेंन्टेनन्स ॲक्ट, डिसेंबर 1956 हे कायदे करण्यात आले. ते डॉ. आंबेडकरांनी कायदेमंत्री म्हणून राजीनामा दिल्यानंतर झालेले कायदे आहेत.

हिंदू कोड बिलाचे निरनिराळे भाग करून व त्यात फेरफार करून नवीन चार कायदे मंजूर करण्यात आले. स्त्रियांच्या हितसंरक्षणाच्या हेतूने भारतात काही कायदे करण्यात आले. ते असे -

1. सतीप्रतिबंधक कायदा, 1826
2. धर्मांतराचा पूर्वीचा कायदा रद्द करणारा कायदा, 1866
3. ख्रिस्ती विवाह कायदा, 1872
4. विवाहित नारी संपत्ती संरक्षण कायदा, 1974
5. लीगल प्रॅक्टिशनर (वुइमेन) ॲक्ट, 1923
6. बालिका विवाह प्रतिबंधक (शारदा) कायदा, 1926

7. पारसी विवाह आणि तलाक कायदा, 1936

8. प्रसूती अवस्थेत मिळावयाचे हक्क - यासंबंधीचा कायदा, 1943

9. हिंदु विजोड विवाह प्रतिबंधक कायदा, 1946

10. हिंदू विवाह वैधता कायदा, 1946

11. विशेश विवाह कायदा, 1955

12. हिंदू विवाह कायदा, 1955

13. हिंदू उत्तराधिकार कायदा, 1956

14. हिंदू दत्तकग्रहण आणि निर्वाह कायदा, 1956

15. हिंदू दत्तकग्रहण कायदा, 1958

16. वेश्यावृत्ती उन्मूलन कायदा, 1956.

**समारोप :**

अशा स्वरूपाच्या कलामांमुळे स्त्रियांना आपले सक्षमीकरण करून या स्वतंत्र भारतात उंच आणि ताट मानेने चालण्यास, वागण्यास हिंदू कोड बिलाने अधिकार मिळवून दिला असून त्यामुळेच आज स्वी ही आपले जीवन पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून विहार करतांना दिसत आहे. हिंदू कोड बिलामुळे स्त्रियांना सामाजिक, धार्मिक, राजकीय, शैक्षणिक, आर्थिक अधिकार प्राप्त झाले असून पारंपारिक जोखंडातून त्या बाहेर पडलेल्या असून आज त्या अनेक उच्च पदस्य असून देशाच्या प्रगतीचा वाटा बनल्या आहेत.

**संदर्भ:**


१. खरात शंकरराव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आत्मकथा, इंद्रायणी साहित्य, पुणे, पृ. 208.

२. नरहर कुरंदकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक मूल्यांकन, सचिता प्रकाशन, औरंगाबाद, पृ. 4.

३. डॉ. ज्योती लांजेवार, फुले-आंबेडकर आणि स्त्री मुक्ती चळवळ, संकेत प्रकाशन, नागपूर.

४. मून सावंत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रबुद्ध भारत आणि मूकनायक, पृ. 299.

५. कुलकर्णी रूपा, महिलांचे कैवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकराज्य धम्मचक्र प्रवर्तन सुवर्ण महोत्सव विशेषांक, ऑक्टोबर, पृ. 114.

# नाथसंप्रदायाचे अध्यात्मिक कार्य

**प्रा. डॉ. फेरोज कदिर देशमुख**
सहाय्यक प्राध्यापक व इतिहास विभागप्रमुख,
सर सय्यद महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर

**प्रस्तावना :**

मध्ययुगीन साधनेच्या अवनीतीचे चित्र त्यांच्या डोळयासमोर सतत असावे आणि म्हणूनच या "विषयविध्वसंकवीराने" भोगलालसेतून आलेल्या वामाचाराचा तिरस्कार केलाच, परंतु मुंडन, उपनवास, तीर्थयात्रा, अग्नीहोत्र, संन्यास इत्यादी आंतरिक शुचीता न होता आचारिल्या जाणा-या कर्मठांच्या ब्रम्होपचारावरही प्रखर टीका केली आहे."[1] म्हणजेच समाजातील पाखंड या नाथ संप्रदायाने संपवण्याचे कार्य केले. गोरक्षनाथांनी विविध संप्रदायातील उदात्त तत्त्वांचा आपल्या संप्रदायात समन्वय केला. "त्यांच्या नैतिक आणि आत्मीक तेजामुळे संपन्न असलेल्या प्रभावी व्यक्तीमत्त्वामुळे वैदिक परंपरा खंडित करुन पाखंड मतांचा प्रसार करणा-या विकृतीकरणाविरुध्द चळवळ उभी करुन शुध्द योग मार्गाचा प्रसार त्यांनी केला."[2] या संप्रदायाने गुरुला ईश्वररुप मानून आपल्या अंत:करणातील भक्तीप्रेमाचा वर्षाव गुरुच्या ठिकाणी केला. हा भक्तीचा प्रसार गहीनीनाथांनी कृष्णभक्तीच्या रुपाने गुंफला व महाराष्ट्रात विठ्ठलाच्या रुपाने पूर्ण पावलेला दिसतो.

"नाथ संप्रदायाने सामाजिक एकात्मतेसाठी कार्य केलेले दिसून येते. ज्या बिंदूपासून वैदिक किंवा मुसलमान निर्माण झाले, तो बिंदू वैदिकही नाही आणि मुसलमानही नाही. असा मूळात घाव घातल्यामुळे बाबा रतनहाजीसारख्या नाथ पंथीयाला वैदिक-मुसलमान ऐक्याचे कार्य करण्यास प्रेरणा मिळाली."[3] नाथ संप्रदायाचा हाच वारसा घेऊन उत्तरकालीन कबीर, नानक आणि दादू यांनी वैदिक-मुसलमान ऐक्य साधन्यासाठी आपले सर्वस्व पणाला लावले. देशी भाषांचा पुरस्कार केला. एकूणच वैदिक मुस्लिम पुरस्कर्ते त्यांना संबोधले जाते. भारतभर पसरलेल्या या संप्रदायाने हिंदी, बंगाली, मराठी इत्यादी देशी भाषांतून पंथप्रचार केला. लोकभाषेतून पंथ प्रसार करण्याची परंपरा नाथांनी प्रथम निर्माण केली. र.रा. गोसावी यांच्या मते - "सुरुवातीला या संप्रदायाची आध्यात्म सुत्रे उच्चवर्णीयांच्या हातात होती. कर्मठ, वैदीक आणि तांत्रिक योगी यांच्यात परमार्थ गुंतून राहिला होता. अशा परिस्थितीत स्त्रीशुद्रादी भेदभाव निपटून परमार्थ मार्ग सर्वांना खुला करण्याचे कार्य या संप्रदायाने केले."[4] उदा. साठी विमलादेवी, मयनावती, तपस्विनी, मुक्ताबाई, गुप्तनाथ (गंगाबाई राशिनकर) या स्त्रीयांनी संप्रदायाला मोलाचे योगदान दिले.

निष्कर्ष :

थोर संत साहित्याचे गाढे अभ्यासक र.रा. गोसावी यांनी संप्रदायाच्या कार्याची दखल घेत असे अधोरेखीत केले आहे की, नाथ संप्रदायातील थोर विचारांचा, शुद्ध नैतिक आचारांचा वारसा घेऊन भारतभर दया, क्षमा, शांती, बंधुभाव, समता या उदात्त तत्त्वांच्या पायावर भक्तीचे महान मंदिर उभे करण्यास ज्ञानेश्वर - कबीर या संतांना प्रेरणा मिळाली. त्याचप्रमाणे गोरक्षनाथांच्या नाथ संप्रदायाचा आवाका विशाल आहे. व्यक्तिगत साधनेतून मुक्ती शोधत असताना समाजात असणा-या सर्व घटकांमध्ये समन्वय निर्माण करण्याची शिकवण त्यांनी आपल्या कार्याच्या व साहित्याच्या माध्यमातून दिलेली दिसून येते.

**संदर्भ:**

1. गोसावी र.रा., पाच भक्तीसंप्रदाय, प्रतिमा प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे, तृतीय आवृत्ती, ऑगस्ट 2008, पृ. 24
2. कित्ता, पृ. 72
3. कित्ता, पृ. 73
4. कित्ता.

# महिला चळवळ व ग्रामीण महिला सक्षमीकरण

**डॉ. बाबासाहेब गणपतराव देशमुख**
शिवाजी महाविद्यालय, कन्नड

**प्रस्तावना :**

भारत देश स्वातंत्र्य होऊन 75 वर्ष पुर्ण झाली. आपण स्वातंत्र्याचा हिरक महोत्सव साजरा केला. तसेच भारतीय राज्यघटना निर्माण होऊन 75 वर्ष पूर्ण झाली. भारतीय राज्यघटनेचा हिरक महोत्सव संविधान गौरव महोत्सव साजरा करीत आहोत. आपण 75 वर्षाचे सिंहलोकन केले तर निश्चित आपण भारताची प्रतिमा अविकसित देशापासुन विकसनशील देश बनली आहे. ही प्रतिमा आणखी उंच झेपावेल यात शंका नाही. विकसनशील भारताची प्रतिमा ही कोटी कोटी हात झगडले म्हणून तयार झाली. त्यात प्रामुख्याने शेतकरी, कष्टकरी, कामगार, महिला, कर्मचारी, राजकारणी, संशोधक, शास्त्रज्ञ, शिक्षक, वकिल, डॉक्टर इत्यादी प्रत्येक नागरिकाने आपल्या परीने योगदान दिले आहे.

भारत देश स्वातंत्र्य झाल्यानंतर शेतीमध्ये हरितक्रांती झाली. देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला. त्याचे श्रेय हे शेतात दिवसरात्र राबणारा शेतकरी, कष्टकरी, शेतमजूर, शेतमजूर महिला या होत. शेतकऱ्यांनी स्वत:च्या शेतात नवनवीन प्रयोग करून क्रांती केली. शेतातील फळे-भाजीपाला, कडधान्य, तांदुळ, गहू हे विकसित देशात निर्यात होऊ लागले. यामध्ये शेतकरी व प्रामुख्याने ग्रामीण भागातील शेतकरी महिला यांचा सिंहाचा वाटा आहे.

भारताच्या सर्वच क्षेत्रात प्रगती झाली. पण ग्रामीण महिला ही दुर्लक्षीत, दारिद्र्य, पीडित, वंचित, भुमिहीन, अन्यायग्रस्त आहे. ती कोसो विकासापासून दुर राहिलेली दिसते. भारत देश स्वातंत्र्य होऊन 75 वर्ष झाली, तरीही तिचा म्हणावे तसे सक्षमीकरण झाले नाही.

भारत देशातील राजकारणी, प्रशासकीय कर्मचारी, सामाजिक कार्यकर्ते स्वयंसेवी संस्था यांना अस्वस्थ करणारी घटना आहे. ती आजही 'चुल व मूल' यामध्ये आडकलेली आहे. भारतातील एकूण लोकसंख्या 70% शेती व शेतीपुरक उद्योगावर गुंतलेले आहेत. शेतीपुरक उद्योगामध्ये 60% शेतमजूर, कष्टकरी, कामगार, महिला दिवसरात्र काम करतात. शेती व्यावसायामध्ये पिकाची लागवड करणे, खुरपणी, निंदणी, शेतीला पाणी, शेतातील पिकाची काढणी, मळणी, पिक राखणे, भाजीपाला विक्री, शेतीपुरक जोडधंद्यामध्ये महिला काम करतात. दुध काढणे, जनावरांना चारा-पाणी देणे, त्यांची सोडबांध करणे, स्वच्छता करणे, दुधविक्री इत्यादी महत्त्वाची कामे ग्रामीण भागातील महिलाचा सहभाग असतो. हे काम कार्यालयीन वेळापत्रकानुसार नसते. सकाळी पाहटेपासुन ते संध्याकाळी आकरा वाजेपर्यंत चालते. ग्रामीण महिला या कृषी संस्कृतीच्या संवर्धक व संरक्षक आहेत. या महिलांना शारिरीक कष्ठाचे कामे करावे लागतात. याच महिला विकासापासुन कोसो दुर आहेत. याच्यावर अन्याय, अत्याचार, अनेक प्रश्न प्राचीन काळापासुन आहेत. स्त्री शिक्षण, सतीप्रथा, केशवपण, बालविवाह, विधवेचा प्रश्न, पडदापध्दती, हुंडा पध्दती, देवदासीप्रथा, कन्यावध, गर्भनिदान, लिंगभेद, अत्याचार, शारीरिक व मानसिक हिंसा, गर्भपात चिकित्सा, ऑनर किलिंग, स्त्रीअर्भक हत्या, एकतर्फी प्रेमातुन मुलीवर अत्याचार, काही समस्या कमी झाल्या असतील मात्र त्या कायम स्वरुपी बंद झाल्या नाहीत. त्या परिस्थितीनुसार डोकं वर काढत असतात.

"संतांनी स्त्री जन्म म्हणजे पाप या विचारातुन स्त्रियांना दुर केले. स्त्रियांना भक्तीचे स्वतंत्र्य देऊन त्यांना विकासाची वाट मोकळी करुन दिली. अनाथ स्त्रियांना संतांनी आधार, विश्वास दिला. कौटुंबिक, सामाजिक जाचक बंधनाच्या गुलामगिरीतुन स्त्रियांची सुटका केली. सुख:दु:खाकडे बघण्याची डोळस, वैचारिक दृष्टी दिली. समतेच्या तत्त्वामुळे श्री चक्रधर स्वामीनी स्त्रियांना संन्यास दीक्षा दिली. ज्ञानेश्वर महाराजांनी स्त्रियांना आधार, प्रतिष्ठा आत्मद्वाराची वाट दाखविली. संत एकनाथांनी परामार्थ्यांची दारे उघडली. त्यांनी असंख्य विधवांना शिष्यत्व बाहल केले. त्याच्या स्त्रियाविषय उदत्त दृष्टिकोनातुन स्त्रीला विकासाची संधी मिळाली."[1]

भारत देश स्वातंत्र्य झाल्यानंतर कित्येक कायदे केले. पंचवार्षिक योजना आखल्या गेल्या. महिला धोरणे आणली गेली. आजही महिलावर अन्याय, अत्याचार, होत आहेत. महिलांवरील अत्याचाराच्या घटना कमी झालेले नाहीत. वर्तमानपत्र, सोशलमिडीया, वृत्तवाहिनी माध्यमातुन बघतो व वाचतो की महिलावर अत्याचाराच्या बातम्या असतात.

ग्रामीण भागातील महिलाच्या आवाज इथपर्यंत पोहचत नाही. त्यांच्या अत्याचाराला म्हणावी तशी वाच्यता होत नाही. ग्रामीण भागातील महिलांच्या समस्या दारिद्र्य, वेठबिगारी, बालविवाह, हुंडाबळी, विनयभंग, आरोग्याची समस्या, अज्ञान, अंधश्रध्दा शिक्षणाची समस्या, मुलभूत सोईसुविधा त्यामध्ये वीज, रस्ते, पाणी, अन्न, वस्त्र, निवारा देखील आजपर्यंत आपण मोठ्या प्रमाणात तयार करु शकलो नाही.

"स्वत: गांधीजीनी स्त्री – जीवन व स्त्रियांचे प्रश्न यासंबंधी भरपूर चिंतन लेखन केले. गांधीजीचा पुढील प्रथांना विरोध होता. त्यावर त्यांनी टिका केली. पडदापध्दत,, बालविवाहाची पध्दत, विषम विवाह, देवदासी प्रथा, स्त्रियाची दागिने घालण्याची हौस, हुंडापध्दती"[2] स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायावर गांधीजींनी त्याच्या वैचारीकतेतुन टीका केली. स्वतंत्र्य संग्रामात गांधीजीच्या आव्हानाला प्रतिसाद देऊन स्त्रिया भारत स्वतंत्र्य आंदोलनात सहभागी झाल्या होत्या.

भारतातील बहुसंख्य स्त्रिया या घरकामात गुंतवलेल्या आहेत. कमी उत्पादकाची व कमी कौशल्याची कामे स्त्रियाकडे दिली जातात. म्हणुन स्त्रियांना आर्थिक क्षेत्रात दुय्यम स्थान दिलेले आहे. महिलांचे आर्थिकदृष्ट्या सबलीकरण होण्याचे प्रमाण व वेग कमी आहे. महिला या उपजिवीकेसाठी शेतमजुरी, कुटीर उद्योग दुग्धव्यवसाय, कुकूटपालन इत्यादी क्षेत्रात काम करतात.

**उद्दिष्टे:**

1. ग्रामीण भागातील महिलाच्या समस्याचा अभ्यास करणे.
2. ग्रामीण भागातील मुलभुत गरजाचा अभ्यास करणे.
3. ग्रामीण भागातील आरोग्य व शिक्षण याचा अभ्यास करणे.

स्त्रियांना आर्थिक, सामाजिक, राजकीय सर्व क्षेत्रामध्ये महिलांना पुरुषाच्या बरोबरीने हक्क, दर्जा, प्रतिष्ठा प्रधान करणे, विकासासाठी संधी उपलब्ध करून देणे, स्त्री-पुरूष असमानता नष्ट करणे या प्रक्रियेला सक्षमीकरण म्हणतात.

"पुरूष प्रधान संस्कृतीमध्ये ऐतिहासिक काळापासून स्त्रीला जाणीपूर्वक आणि पध्दतशीरपणे उपक्षित ठेवण्याचा प्रयत्न केला गेला. लिंगभेदावर आधारीत विषमतेवर स्त्रियांचे मोठया प्रमाणात शोषण झाले. परिणामी लिंगभेदावर आणि शोषणावर आधारीत समाजिक, राजकीय आणि आर्थिक व्यवस्था बदलून स्त्रीला पुरूषांच्या बरोबरीने प्रगती आणि विकासाच्या समान संधी उपलब्ध करून देणारी व्यवस्था म्हणजे महिला सक्षमीकरण होय."[3]

"पुरूषांनी वर्षानुवर्षे स्त्रियांवर केलेल्या अन्याचा सुड उगविले किंवा स्त्रीप्रधान व्यवस्था निर्माण करणे हा महिला सबळीकरणाचा प्रक्रियेचा उद्देश नाही. त्यांची मागणी समतेची आहे स्त्रियांना पुरूषांबरोबर समान संधी, समानदर्जा, प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी महिला सबलीकरण चळवळ प्रयत्न करते. स्त्रीला उपेक्षित पीडित, शोषीतसाठी जबाबदार असणा-या शक्तींचे मत परिवर्तन घडवून आणणे म्हणजे महिला सबलीकरण होय."[4]

पृथ्वीवर जन्मलेल्या प्रत्येक व्यक्तीला जे नैसर्गिक अधिकार प्राप्त झाले ते महिलांना देखील आहेत. पण इथल्या पुरूष प्रधान संस्कृतीने महिलांना दुय्यम स्थान दिले आहे. त्यामुळे महिलांच्या समस्या जास्त कठीण झाल्या. युनोच्या सनदेत देखील स्त्रीचा सन्मान केलेला आहे. युनोच्या प्रस्तावनेत मुलभूत अधिकार, मानवाचा गौरव, प्रतिष्ठा, स्त्री-पुरुष, समानता, या परिस्थितीचा उल्लेख आढळतो. कलम -1 मध्ये मानवी हक्कांसंबंधी सन्मान दर्शविणे. स्त्री-पूरूष, वंश, जात, धर्म, लिंग, या आधारावर कोणताही भेदभाव केला जाणार नाही. हे मान्य करण्यात आलेले आहे. कलम -13 कोणताही भेदभाव न करता सर्वांना हक्क व स्वतंत्र मिळवून देण्यासाठी सर्वतोपरी साहय व मदत करण्याचे अश्वासन दिले आहे. कलम -55 मानवामध्ये कोणताही भेदभाव न करता सर्वांना समान मानले पाहिजे"[5]

"मानवी समाजात स्त्री-पुरूष ही लिंग आधारे होणारी विभागणी जैविक सत्य आहे. 'स्त्री-पुरूषपणा' हा लिंगभाव मानवनिर्मित आहे. यातून समाजात स्त्री-पुरूष विषमता दृढ झालेली आढळते. त्याच पुरूषाचे वर्चस्व व स्त्रियांची गुलामगिरी निर्माण झाली. स्त्रियांना त्यांच्या सर्व अधिकारापासून वंचित ठेवण्यात आले आहे."[6]

स्वतंत्र आंदोलन काळात समाजसुधारकांनी केलेल्या प्रयत्नामुळे स्त्रियांना शिक्षण देण्यात येऊ लागले. स्त्रिसुद्धा शिक्षण घेऊ लागल्या पुरूषांबरोबर काम करू लागल्या. स्वातंत्र्य, समता, बंधुत्व व न्याय हे तत्व भारतीय राज्यघटेत आहे त्यामुळे स्त्रि-पुरूष भेदभाव नष्ट झालेला आहे.

"कलम 14 नुसार कायद्यासमोर सर्वांना समान माले.

कलाम -15 नुसार स्त्रि-पुरूष असा भेदभाव केला जाणार नाही.
कलम -16 नुसार स्त्रि- पुरूषांना विकासाची समान संधी देण्यात आली"[7]

भारतीय राज्यघटनेत स्त्रि-पुरूष भेद नष्ट केलेला आहे. मूलभूत अधिकारात हे स्पष्ट आहे. समतेचा अधिकार स्त्रियांना देखील आहे. केंद्र सरकार व राज्य सरकारे तसेच स्थानिक संस्थांतर्गत ग्रामीण भागातील समस्यांचे निवारण करत आहेत. बरेच यश आलेले आहे. आणखी बहुतांशी पल्ला गाठने आहे.

**1. मुलभूत समस्या :**

ग्रामीण भागातील महिलांना अन्न, वस्त्र, निवारा, पाणी, रस्ते, उर्जा या मुलभूत समस्या आज देखील स्वातंत्र्याच्या 75 वर्षानंतर सतावत आहेत. ग्रामीण भागातील महिला दारिद्रय, कुपोषण, आर्थिक विषमता आणि बेरोजागारी या समस्या आहेत. राहणीमानाचा दर्जा खालावलेला आहे. ग्रामीण भागातर निवारा आजही उत्तम प्रकारे नाही. पाण्याची सुविधा व्यवस्थित नाही. आपण शेतातील माल घरी आणण्यासाठी व शेतातील अवजारे शेतात नेण्यासाठी रस्ते व्यवस्थित नाहीत. चिखल, काटे असे रस्ते आहेत. शेतीत जास्त महिला दिवसरात्र राबतात. त्यामुळे या समस्या भेडसावतात तसेच शेतीला पाणी देण्यासाठी लाईट हे संध्याकाळी दिली जाते. त्यामुळे शेतात हिस्त्रप्राणी, यांचा महिलांना त्रास होतो. या समस्या सोडविण्यासाठी पंतप्रधान घरकुल योजना सरकाने आणी आहे. पाणी शुद्ध मिळावे म्ळणून स्वजलधारा योजना आहे. रस्त्याचा प्रश्न कायमस्वरूपचा सुटावा म्हणून पंतप्रधान ग्रामीण रस्ता योजना तसेच मुख्यमंत्रा ग्रामीण रस्ता योजना आहे. उर्जाच्या संदर्भात ससोलार मागेल त्याला देण्याची योजना आहे. अशा पद्धीने आधुनिक सरकारे काम करत आहेत. निश्चित हे समाधानाची बाब आहे.

**2. शिक्षण समस्या :**

ग्रामीण भागातील मुलींचे शिक्षणाचे प्रमाण कमी आहे त्यात एका खेडेगावात प्राथमिक शाळेत एका गावचे 100 मुली प्रवेश घेतला तर पदवीपर्यंत फक्त चार मुली जातात. एवढी गळती मोठया प्रमाणात आहेत. ग्रामीण भागात दर्जेदार शिक्षण मिळत नाही. महिलांना शिकविण्याचा दृष्टीकोन बदलने गरजेचा आहे. लहान मुलांना सांभाळण्यासाठी मोठया मुलींचे शिक्षण बंद केले जाते. कामगार महिला, उसतोड कामगार महिला, शेतकरी मजुर महिला यांच्या पाल्यांचा शिक्षणाचा प्रश्न गंभीर आहे. मुलींचे शिक्षणाचे प्रमाण वाढावे म्हणून शासन स्तरावर प्रयत्न केले जात आहेत. मुलगी नको ही मानसिकता समाजामध्ये तयार झालेली आहे. लिंगगुणोत्तर प्रमाण विषम झाले आहे. सरकार सर्व शिक्षा अभियानामार्फत मुलींना मोफत शिक्षण देत आहे. बेटी पठाओ, बेटी बचाओ असे नारे दिले जात आहेत. महाराष्ट्र सरकारने तर मुलींसाठी प्राथमिक शिक्षण ते पदवी पर्यंतचे व्यावसायीक शिक्षण मोफत केले आहेत. त्यामुळे मुलींचा शिक्षणाचा स्तर वाढेल. ऊसतोड कामगारासाठी हंगामी वस्तिगृहे उघडलेले आहेत. त्यामुळे मुलांच्या शिक्षणाची सोय होत आहे.

**3. आरोग्य समस्या :**

ग्रामीण भागातील जनतेचा मुख्य व्यवसाय शेती आहे. आर्थिकदृष्टया हा समाज कमकुवत आहे. आजच्या महागाईच्या काळात मुलींना पोष्टीक अन्नाची गरज आसते ते पूर्ण करू शकत नाहीत. घरातील महिला या पुरूष मंडळी जेवल्यानंतर जेवतात. शिळे घरातील राहिलेले अन्नावर गुजरान करतात. सकस आहार न मिळालेमुळे त्यांना कुपोषण होते. ग्रामीण स्त्रियांचे आरोग्य जागतिक आरोग्य संघटनेने अरोग्याचा विचार करताना शारिररीक, मानसिक, सामाजिक, सांस्कृतिक आरोग्याचा समावेश असावा अशी व्याख्या केलेली अहे. सदृढ आरोग्य हे प्रत्येक व्यक्तिच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे.

"मानव आरोग्य केवळ त्यांच्या मिळकतीवर अवलंबून नसते तर त्याची जीवन शैली अहारातील पोषक मूल्य इतयादी घटकावर शरीर स्वास्थ अवलंबून असते. परंतु जीवनशैली आणि पोषक आहार यांचा मिळकतीशी संबंध आहे. "चांगले उत्पन्न असणाऱ्या घरातील नव्वद टक्के महिलांना एक दिवसासाठी आवश्यक 2700 उष्मांकापेक्षा कमी उष्मांक अन्नातून मिळतात. त्यामुळे भारतात दरवर्षी गर्भावस्थेमुळे मुलींच्या जन्मावेळी रक्तस्त्राव, गर्भपात, रक्ताची कमतरता, आणि अशक्तपणा यामुळे ग्रामीण महिला मृत्यू होतात."[8]

"पूर्वीपासूनच लिंग-भेदामुळे महिलांना अन्न मिळविण्यासाठी झगडावे लागते. महिलांना संतलित आहार व अवश्यक तेवढे अन्न मिळत नाही कारण वेग-वेगळी असली तरीही आतूनही आहारशास्त्र, आरोग्यशास्त्र व अर्थशास्त्राला त्यांच्या आरोग्याचा व आहाराच्या हेळसांडीची उत्तरे देता आली नाहीत."[9]

"रक्ताच्या कमतेचा धोका हा किशोरवयीन मुलींना व गर्भावस्थेत असणाऱ्या महिलांना जाणवते. ज्यामुळे गर्भापात, बाळ मृत अवस्थेत जन्मणे, प्रसुतीच्या वेळेपूर्वीच बाळ जन्मणे यामुळे प्रसुतीच्यावेळी महिलेवर मृत्यू ओढावतो. अशा घटना घडतात."[10]

ग्रामीण महिलेमध्ये हे प्रमाण जास्त आहे. त्याचे कारण गरिबी, दारिद्र्य आहे. शासनाने विविध योजना आणून महिलांना सक्षम करण्यासाठी पाऊल उचलेले आपल्याला दिसते. ग्रामीण महिलांच्या विकासासाठी केंद्र सरकार व राज्य सरकार विविध लोक कल्याणकारी योजना आखल्या आहेत. एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रमांतर्गत ग्रामीण महिलांना दारिद्र्रेषेच्या वर आणून आर्थिकदृष्ट्या स्वालंबी करणे हा होता. या योजनांचा फायदा ग्रामीण महिलांना झाला. गरीब महिला सक्षम करण्याची पाऊले सरकारने उचलेली आहेत. रोजगार उपलब्ध करून देण्यात आला. भूमिहीन महिला घरकुल सारखी योजना देऊन निवरा निर्माण करण्याचा प्रयत्न झाला आहे. स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना ही योजना ग्रामीण महिलांचा आर्थिक सक्षमीकरणसाठी महत्त्वपूर्ण पाऊल आहे. ग्रामीण महिलांना विकास, सुधारित कारागिरांना आर्थि पाठबळ, महिला स्वंयसहिता समुहाची कल्पना, प्रशिक्षण, व्यावसायासाठी वित्तपुरवठा, विपणन यांचे संघ स्थापन करून पायाभूत सुविधा देणे. इंदिरा अवास योजना, अशा योजना महिलांना सक्षम करण्यासाठी फायदा झाला आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, ग्रामीण रोजगार व आर्थिक सक्षमीकरणाला पाठबळ देणारा कार्यक्रम म्हणजे मनरेगा योजना होय. सदर योजनेची सुरूवात राष्ट्रीय रोजगार हमी योजना कायदा 2005 नुसार करण्यात आली. या योजनेनुसार प्रत्येक ग्रामीण कुटूंबातील वर्षातील किमान शंभर दिवसाचा कामाची हमी देण्यात आली या योजनेचे मुख्य वैशिष्ट म्हणजे महिला पुरूष समान वेतन निश्चित केले.

राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँक ही कृषी व ग्रामीण गैर कृषी विभागाला वित्तपुरवठा करून ग्रामीण भारताच्या विकास घडवून आणण्याचा दृष्टीने भारत सरकारने 12 जुलै 1982 मध्ये नाबार्ड या ग्रामीण विकास समर्पित शिखर बँकेची स्थापना केली. नाबार्ड मार्फत अनेक कार्यक्रम राबविले जातात जसे डेअरी उद्योजकता विकास योजना कृषी चिकित्सा व कृषी व्यवसाय केंद्र योजना, राष्ट्रीय पशुसंवर्धन योजना, शेतीक्षेत्र, लघुउद्योग इत्यादी क्षेत्रात वित्त पुरवठा केला. नार्बाडचे योगदान ग्रामीण महिला आर्थिक सक्षम करणे या ग्रामीण महिलांना छोटे उद्योग उभारण्यात यश आले.

**सारांश :**

विविध विकास योजना देऊन ग्रामीण भागात ग्रामीण महिलांना सक्षम करण्याचे काम केलेले दिसते. ग्रामीण महिलांना स्वत:च्या पायावर उभे करण्याचे काम केंद्र सरकार राज्यसरकारने केले आहे. ग्रामीण भागामध्ये महिलामध्ये जनजागृती करण्याचे काम विविध शैक्षणिक संस्था, अराजकीय संस्था करत आहेत. त्यामुळे ग्रामीण महिलेमध्ये जनजागृती होत आहे.

**संदर्भ :**


1. गाठाळ एस. एस. (2015), भारतीय राष्ट्रीय चळवळीचा इतिहास, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, पृ. 250.
2. कित्ता, पृ. 250
3. देवळणकर डॉ. शैलेंद्र (2010) समकालीन जागतिक राजकारण, विद्याबुक्स पब्लिकेशन, औरंगाबाद.
4. कित्ता, पृ.344
5. भारंबे नंदकुमार (2012), मानवी हक्क, निराली **प्रकाशन** पुणे, पृ. 3
6. कित्ता
7. कित्ता
8. सहा नंदिता व गांधी नंदिता (1992) स्त्री सघर्षाची नवी रूपे, पापुलर प्रकाशन, मुंबई पृ.. 70-71.
9. गुप्ता कमलेशकुमार (2005) महिला सशक्तीकरण जयपूर, पृ. 146
10. कित्ता

# मुहम्मद तुघलक एक बुद्धिप्रामाण्यवादी उदार विचारी राज्यकर्ता - एक अभ्यास

**उमेश कमलाकर नवल**
संशोधक विद्यार्थी
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

**प्रा. डॉ. महेश रोटे**
देवगिरी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर

**प्रस्तावना**

तुघलक घराणे हे दिल्ली सल्तनतीमधील मधील एक घराणे होते. या घराण्याने 1320 पासूने ते 1414 पर्यंत दिल्लीवर शासन केले. दिल्ली सुलतानशाहीच्या सत्तेवर खिलजी घराणे नंतर तुगलक घराण्याने 1320 ते 1414 या काळात राज्यकारभार केला गियासुधिन तुगलक मोहम्मद बिन तुगलक व फिरोजशहा तुघलक हे तीन सुलतान या घराण्यांमध्ये प्रसिद्ध होऊन गेले तुगलक घराण्याचा संस्थापक असलेल्या गियासुद्दीन नंतर सत्तेवर आलेल्या मोहम्मद बिन तुगलक यांची कारकीर्द विशेषतः त्याच्या धाडसी प्रयोगामुळे प्रसिद्ध आहे महसूल सुधारणा दुवाबातील कर पद्धत, आदर्श कृषी योजना, राजधानी बदलाचा प्रयोग, संकेतिक चलन पद्धती हे प्रयोग राबवण्यात मोहम्मद तुगलकाला अपयश आले त्यामुळे त्याला लहरी मोहम्मद तसेच परस्पर विरोधी गुणांचा पुतळा असे देखील म्हटलं गेलं पण तो वास्तव्यामध्ये आदर्शवादी व बुद्धिप्रामाण्यवादी उदार विचारी राज्यकर्ता होता. त्याची नजर ही काळाच्या पुढे धावणारी होती हे देखील तितकेच महत्त्वाचे आहे मोहम्मद तुगलकाकडे व्यावहारिक दृष्टिकोन नसल्यामुळे त्याला आपल्या योजना कार्यक्षमतेने राबवता आल्या नाहीत.

**संशोधन पद्धती :**

या संशोधन पेपरमध्ये एतीहासिक व वर्णनात्मक पद्धतीचा वापर करण्यात आला.

**उद्दिष्टे :**

1 मोहम्मद तुगलक एक बुद्धिप्रामाण्यवादी होता हे सिद्ध करणे.
2 मोहम्मद तुगलक उदार विचारांचा राज्यकर्ता होता हे अभ्यासणे.
3 मोहम्मद तुगलकाकाच्या प्रयोग व सुधारणावर चर्चा करणे.

**गृहितके :**

1 मोहम्मद तुगलक एक बुद्धिप्रामाण्यवादी होता
2 मोहम्मद तुगलक उदार विचारांचा राज्यकर्ता होता
3 मोहम्मद तुगलकाकाच्या योजना काळाच्यापुढ होत्या.

**विषयाचे महत्व**

मोहम्मद तुगलक एक बुद्धिप्रामाण्यवादी होता हे सिद्ध होते याचा अभ्यास प्रस्तुत संशोधनातून स्पष्ट होते हा विषय फारसा प्रकाशात न आल्या कारणाने हा विषय संशोधनातून सर्वापर्यंत पोचवणे गरजेच आहे, महणून हा विषय गरजेचे आहे म्हणून हा विषय अतिशय महत्वपूर्ण आहे.

**उदार विचारांचा राज्यकर्ता**

प्रयोगशील व सुधारणावादी-अ-प्रशासकीय सुधारणा प्रयोगशील व सुधारणावादी शासक म्हणून मोहम्मद बिन तुगलककाचं कार्य हे काळाच्या पुढे होतं ज्या काळामध्ये चीनमध्ये चलनी नोटांचा प्रयोग सुरू झाला अशा काळात मोहम्मद बिन तुगलक याने आपल्या राज्यामध्ये चलनी नाण्यांचा प्रयोग केला मात्र त्याची अंमलबजावणी योग्य रीतीने न झाल्यामुळे हा प्रयोग अपयशी ठरला मात्र त्याचा हा प्रयोग काळाच्या संदर्भात अत्यंत महत्त्वाचा होता वास्तविक तो दूरदृष्टी असलेला शासक होता तो वास्तववादी होता स्वप्नाळू मुळीच नव्हता मात्र त्याच्या प्रयोगाची अंमलबजावणी योग्य रीतीने न झाल्यामुळे व शासकीय अधिकाऱ्यांचा त्याला पुरेसा पाठिंबा न मिळाल्यामुळे त्याचे काही प्रयोग यशस्वी ठरले आणि त्यामुळेच त्याला दोषी देखील ठरला जातो

**बुद्धिप्रामाण्यवादी**

मुहंमद तुघलक स्वतःच्या जीवनात नमाज, रोजे यांचा श्रद्धापूर्वक पालनकर्ता होता, तसेच तो इतरांनी पाळावा इतका आग्रहीसुद्धा होता. एक सुशिक्षित व विद्वान शासक म्हणून त्याची ख्याती आहे.तो तत्त्वज्ञान, गणित,औषधीशास्त्र

तसेच धर्म यांसारख्या विद्वत्शाखांचा विद्वान होता. त्याच्या उतावीळपणामुळे त्याचे अनेक निर्णय फसले पण तो एक महत्त्वाकांक्षी शासक होता. त्याचे ग्रंथवाचन अफाट होते. बर्नीने त्याच्यावर केलेल्या टीकेनुसार कळून येते की तो आत्यंतिक बुद्धिप्रामाण्यवादी होता.बरर्नीच्या मते तो तर्काच्या व बुद्धीच्या कसोटीवर परीक्षा घेतल्याशिवाय तो कोणत्याही इस्लामी कायद्याचा कायदांचा स्वीकार करीत नसे. यामुळे त्याला बुद्धिप्रामाण्यवादी शासक म्हणले तरी वावगे ठरणार नाही. बुद्धिप्रामाण्यवादी म्हणून मोहम्मद तुगलक याचे अनेक उदाहरणे इतिहासामध्ये प्रसिद्ध आहेत त्याने अंध अनुकरणाने धर्म स्वीकारला नाही व त्याचं आचरण देखील त्या पद्धतीने केलं नाही सारासार विचार करूनच व बुद्धिप्रामाण्यवाद स्वीकारून त्याने धर्माचा स्वीकार केला वेळप्रसंगी त्याने धर्ममार्तंड प्राबल्य झुगारून दिलं

**2)उदार विचारी राज्यकर्ता**:- मुहंमद हा मोकळया तसेच उदार मनाचा होता हे त्याच्या प्रवृत्तीवरून कळून येते. तो हिंदू धर्मियांच्या होळीसरख्या काही सणांमध्ये सहभागी होत असल्याबाबतची माहिती आपल्याला अनेक इतिहासकारांच्या लेखनातून दिसून येते. तसेच तो कट्टर सिद्धान्तवादी नव्हता, ही बाब अनेक योग्यांसमवेत आणि राजशेखर तथा जिनप्रभा सुरीसारख्या जैन संतांशी त्याचे जे सहचर्य होते, यावरून स्पष्ट होते.त्याने गुजरातमध्ये असताना अनेक जैन मंदिरांना भेटी देऊन त्यांना अनुदान दिले होते, असे सतीशचंद्र यांच्या लेखनात नमूद केले आहे. यावरून आपण समजू शकतो की तो एक उदार विचारी राज्यकर्ता होता.

**3)प्रयोग व सुधारणा**- मुहंमद यास नावीन्यपूर्वक प्रयोग तसेच प्रशासनात सुधारणा करणे आवडे..प्रशासनात उत्साह आणि राज्यकारभरामध्ये एकसूत्रता आणण्याची त्याची इच्छा होती. यासाठी त्याने अनेक योजना आखल्या, पण त्यांपैकी काहींचाच परिणाम प्रशासन सुधारण्यासाठी झाला असे म्हणता येईल. मोहम्मद बिन तुगलक याने केलेले प्रयोग आणि सुधारणा ह्या व्यावहारिक आणि काळाची पावले ओळखणाऱ्या होत्या. परंतु योग्य नियोजनाचा अभाव आणि त्या योजना राबवताना घ्यावयाची खबरदारी या गोष्टींकडे दुर्लक्ष झाल्यामुळे त्या प्रत्यक्षात यशस्वी होऊ शकल्या नाहीत

**अ)प्रशासकीय सुधारणा**:-राजधानी दिल्ली वरून देवगिरीला नेणे.हा त्याच्या जीवनातील प्रभावी तशेच बहुचर्चित असा निर्णय होता.आजपर्यंत त्याच्या या निर्णयासाठी त्याला वेड्यात काढले जाते. पण आपल्याला त्याचे या निर्णयामागे कोणते उद्देश होते व त्याची कोणती महत्त्वाकांक्षा होती ते आधी समजून घ्यायला पाहिजे. तसेच हे निर्णय अनियोजित किंवा बिनपूर्वतयारीनिशी केलेले नव्हते, असे काही पुराव्यांवरून म्हणता येते. मोहम्मद तुगलक याने आपल्या कारकिर्दीमध्ये अनेक चांगली प्रशासकीय निर्णय घेतले परंतु त्याची योग्य अंमलबजावणी आणि कार्यवाही न केल्यामुळे त्याचे हे प्रशासकीय सुधारणांचे निर्णय फसले

**देवगिरीला राजधानी स्थलांतरित करण्यामागचे उद्देश व कारणे:-**

1)दे ेवगिरी हे ठिकाण सल्तनतीच्या माधोमध होते.

2)दक्खनवर अधिक चांगल्या पद्धतीने नियंत्रण ठेवण्यासाठी त्याला दुसऱ्या राजधानीची गरज होती.

3)मुहंमद शाहजादा व सुलतान असताना या दोन्ही पदांच्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी त्याने अनेक वर्षे दक्खनमध्ये व्यतीत केले, यामुळे तो तेथील डोंगरदऱ्यांशी,व आल्हाददायक हवामानाशी चांगला परिचित होता, त्यामुळे त्याला असलेले आकर्षण योग्य होते.

पण त्याचा हा निर्णय अयशस्वी व मनस्ताप करणारा ठरला व यासाठी त्याला अनेक टीकांना तोंड द्यावे लागले.

**ब)आर्थिक व कृषी सुधारणा:-**

सांकेतिक चलन- मोहंमदने दे ेवगिरीला प्रयाण केल्यानं ंतर नाणेव्यवस्था सुधारण्यासाठी सांकेतिक चलनाचा दुसरा प्रयोग केला. मध्ययुगीन काळात सांकेतिक चलन ही पूर्णथा नाविन्यपूर्ण सुधारणा होती.त् या काळात चीनध्येसुद्धा सांकेतिक चलन म्हणून कागदी चलन प्रचलित होते.मंगोल सम्राट कुबलाई खानाने 'चान' नावाचे कागदी चलन सुरू केले होते व त्याच्या मृत्यूपर्यंत योग्यरीत्या चालू होते. पुढे अशाच प्रयोग कातू या इराणी राजाने 'चान' चलन लागू करण्याचा प्रयत्न केला पण तो फसला.

महंमदाने सांकेतिक चलन म्हणून सोनाच्या व चांदीच्या नाण्यानेवजी तांब्याची व पितळेची नाणी चलनात आणली,परंतु त्याचा हा प्रयोग पूर्णपणे फसला कारण बहुतेक हिंदू हे सोनार होते आणि तेच या नाण्यांची नक्कल करून बनवू लागले. या नकली नाण्यांचा वापर बाजारात होऊ लागला. त्यामुळे राज्याच्या महसुलावर ताण पडू लगल्यामुळे

सांकेतिक चलन बंद करावे लागले. त्याचा हा दुसरापण प्रयोग फसला पण याचे तत्कालीन परिणाम तर नाही पण याचे दूरगामी परिणाम नक्की झाले असे म्हणता येऊ शकते,कारण मध्ययुगीन काळात असा निर्णय घेणे हे एका महत्त्वकांक्षी राजायाच घेऊ शकत होता. पण असो त्याच्या या नाणे बदलाच्या धाडसामुळे त्याला वेडा ठरवण्यात आले..पण एक की आपल्याला त्याच्यात दूरदृष्टी नक्की दिसून येते.

**सांकेतिक चलन काढण्यामागील उद्देश:-**

1) प्रचंड मोठे सैन्य व या सैन्याना लागणार प्रचंड वेतन. यामुळें सरकारी तिजोरीतील तुटवडा भरण्यासाठी.

2) सोन्याचांदीचा तुटवडा असल्यामुळे सांकेतिक चलन काढण्यावर भर.

**कृषीविषयक धोरण**:- मुहंमदाचे कृषिविषयक धोरण हे त्याच्या वडिलांपेक्षा कठोर होते..त्याचे वडील गियासुद्दीन तुघलकानी अल्लाउद्दीनने सुरू केलेला शेतजमिनीच्या मोजणीनुसार आकारण्यात येणारी सारापद्धत मोडीत काढून त्या जागी 'प्रत्येक वेळी हातात आलेल्या पिकांची मोजणी करून त्यापैकी ठराविक भाग शेतसारा म्हणून सुरू केला. खर तर गियासुउद्दीन तुघलकचे धोरण शेतकऱ्यांसाठी फायदेशीर होते.पण मुहंमदने आपल्या शासन काळात कर वसुलीत सक्ती केल्याने तसेच करांचा दर बराच वाढवल्यामुळे शेतकऱ्यांना खुप हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या. दुष्काळ पडला तरी तो सक्ती ने **'चराई'** तसेच **'घराई'**कर वसूल करायचा.त्यामुळे शेतकरी वाढीव करांविरोधात बंड करत..मुहंमद हे बंड मोडण्यासाठी कठोर कारवाही करायचा. पण जेव्हा सतत 7 वर्ष दुष्काळ पडला तेव्हा महम्मदने अनेक कृषीविषयक धोरण आखले.यात त्याने एक **'दिवाण-ए-अमीर-कोई'**नावाचा विभाग सुरू केला.

**बर्नी**नुसार पडीक व नापीक जमीन पिकाखाली आणण्यासाठी सुलतानाने योजना आखली होती.त्या मध्ये शेतीत सुधारणा, शेतीच्या पद्धतीमध्ये बदल जसे बार्लीच्या जागी गहू,गव्हाच्या जागी ऊस,तर उसाच्या जागी द्राक्ष. अश्या योजनांमुळे नक्कीच महसुलात वाढ होणे अपेक्षित होते.बर्नीनुसार मुहंमदाने दुष्काळावर मात करण्यासाठी दिल्लीत मंदतकेंद्रे उघडली, तसेच विहिरी खोदणे,शेती अवजारे-बी बियाणे खरेदी करणे यासाठी कर्ज वाटप केले. त्याच्या योजनांमधील काही गोष्टी नक्कीच परिणामकारक होत्या.अस म्हणणे दुमत ठरणार नाही जर त्याच्या योजनांकडे बारकाईने बघितले तर.....

**शेवटचे पर्व:-**

आपल्या शासन काळात शेवटच्या वेळी जेव्हा मोहम्मद तुघलकाने गुजरातमधील विद्रोह मोडून परत येत असतानी वाटेत तो बिमार पडला आणि त्याला मृत्यूने वेढले.20 मार्च 1351 रोजी तो मृत्यू पावला.

काही इतिहासकारांचे त्याच्यावरील भाष्यः-

1)**बदायुनी**-सलतनतला त्याच्या प्रजेपासून व प्रजेला त्याच्यापासून सुटका मिळाली.

2)**डाॅ.ईश्वरी प्रसादानुसार** तो 'मध्ययुगातील राजमुकुट धारण करणाऱ्यांमध्ये मुहंमद तुघलक हा निःसंदेह योग्य व्यक्ती होता.

अशाप्रकारे मुहंमद हा आपल्या चुकींच्या निर्णयांमुळे वेडा ठरला असला तरी तो एक महत्त्वाकांक्षी,स्वप्नशील सुलतान होता.

**संदर्भ**


1 बनारसी प्रसाद सक्सेना, भारत-पाकिस्तानमधील मुस्लिम राजवटीचा प्रगत इतिहास, मिशिगन विद्यापीठ. 1967, पृ. 94.

2 अनिरुद्ध रे (2019). दिल्लीची सल्तनत (1206-1526) राजकारण, अर्थव्यवस्था, समाज आणि संस्कृती..

3 खालिद अहमद निजामी (1997). भारतीय लोकांचा इतिहास आणि संस्कृती, खंड 6, दिल्ली सल्तनत. मध्ययुगीन भारतातील राजेशाही. मुन्शीराम मनोहरलाल प्रकाशक. पृष्ठ 8.

4 फारुकी, सलमा अहमद (2011). मध्ययुगीन भारताचा व्यापक इतिहास: बारावा ते अठराव्या शतकाच्या मध्यापर्यंत (पहिली छाप आवृत्ती). भारत: पिअर्सन इंडिया एज्युकेशन सर्व्हिसेस.

5 सुरेंदर सिंग (30 सप्टेंबर 2019). मध्ययुगीन पंजाबची निर्मिती: राजकारण, समाज आणि संस्कृती सुमार

6 .ख्रिश्चन युरोप आणि अरबी-इस्लामिक जगामधील कार्टोग्राफी, 1100-1500: भिन्न परंपरा. ब्रिल. 17 जून 2021. पृ. 176

7. व्हिन्सेंट स्मिथ, द ऑक्सफर्ड स्टुडंट्स हिस्ट्री ऑफ इंडिया अॅट गुगल बुक्स, ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, पृ. 81-82

8. इलियट आणि डॉसन (अनुवादक), तारिख-1 अलाई अमीर खुसरू, द हिस्ट्री ऑफ इंडिया बाय इट्स ओन हिस्टोरियन्स - द मुहम्मदॅन पिरियड, खंड 3, ट्रुबनर लंडन, पृ. 67-92;

# चांदागड येथील गोंड घराणे

**अशोक नानाजी नैताम**
संशोधक विद्यार्थी, इतिहास विभाग
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

**प्रस्तावना**

गोंड ही मध्य भारतात निवास करणारी प्राचीन जमात आहे. भारतीय राज्यघटनेत अनुसूचित जमातीमध्ये यांची नोंद आहे. अनेक शतकापासून गोंड जमातीचा निवास मध्य भारतात असल्याचे दिसून येतात. या जमातीमध्ये आजही प्राचीन प्रथा परंपरा आणि रीती रिवाज असल्याचे दिसून येतात. या जमातीची स्वतंत्र संस्कृती आणि बोलीभाषा आहे. महाराष्ट्र मध्ये सर्वाधिक प्रमाणात अनुसूचित जमातीमध्ये गोंड जमातीची लोकसंख्या आढळून येतात. ही प्रामुख्याने यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया व नागपूर प्रांतात आढळतात. गोंड जमाती निसर्गाच्या सानिध्यात निवास करीत असतात. यांचे संपूर्ण जीवन पूर्वीच्या कालखंडात जंगलावर अवलंबून होते.

चांदागड म्हणजे आजचे महाराष्ट्रातील चंद्रपूर होय. या ठिकाणी इसवी सनाच्या तेराव्या शतकात गोंड घराण्याचे स्वतंत्र राज्य अस्तित्वात होते. भारतीय इतिहासातून दुर्लक्षित असणारे चांदागड येथील गोंड घराणे. या गोंड घराण्याचा उदय तेलंगानातील शिरपूर या ठिकाणावरून होतो. या ठिकाणी इ.स. नवव्या शतकात कोल भिल्ल या गोंड महापुरुषांनी जुनगाव मोवाड ते शिरपूर माणिकगड या भागातील गोंड लोकांना संघटित केले.[1] सर्वप्रथम त्यांनी आपले एक छोटे राज्य निर्माण केले. त्या राज्याचा प्रमुख म्हणून भीम बल्लाळसिंह या व्यक्तीकडे राज्याची सूत्रे दिली. भीम बल्लाळसिंह याला गोंड घराण्याचा संस्थापक मानले जातात. चांदागड हा प्रदेश पूर्वीच्या कालखंडात जंगल व्याप्त प्रदेश होता. या ठिकाणी पूर्वीपासून गोंड जमात निवास करीत होती. महाराष्ट्र आणि तेलंगाना सीमेवरती मोठ्या प्रमाणात गोंड जमात निवास करीत असल्यामुळे त्यांचे संघटन करणे हे बल्लाळसिंह यांना सोयीस्कर पडले. त्यांनी गोंड जमाती मधून सैन्य शक्ती तयार केली.

इ.स.870 ते इ.स.1751 पर्यंत एकूण 881 वर्ष मध्य भारतातील दंडकारण्य समजल्या जाणाऱ्या गोंडवन भूमीत राज्य केले. सर्वाधिक काळापर्यंत राज्य करणारी ही इतिहासातील एकमेव जमात असावी.

**संशोधनाचा उद्देश**

1. चांदागड येथील गोंड घराण्याचा इतिहास समजून घेणे.
2. चांदागड येथील गोंड घराण्याच्या साम्राज्य विस्ताराची माहिती घेणे.
3. चांदागड येथील गोंड घराण्याचे कार्य स्पष्ट करणे.
4. चांदागड येथील गोंड राजवंशाचा संघर्षाचा कालखंड अभ्यासणे.

**चांदागड येथील गोंड घराण्याची वंशावळ**

चांदागड येथील गोंड राजवंशाच्या वंशावळीबद्दल इतिहासकारांमध्ये एक वाक्यता दिसून येत नाही. सुरुवातीच्या कालखंडात मोडी लिपी मध्ये गोंडवंशाची वंशावळ छापलेली आहे. ती वंशावळ नागपूर येथील पुरालेखाभिगार यांच्या संग्रहालयात आहे. त्यानुसार जर विचार केला तर मेजर ल्युसी यांनी तयार केलेली वंशावळ आणि पुरालेखागारातील वंशावळ यामध्ये साम्यता दिसते. चांदागड येथील गोंड घराण्याचा लिखित इतिहास मिळत नाही. मोजक्या स्वरूपात मोगली दप्तरात आढळून येतात.

मेजर ल्युसी स्मिथ यांनी इ.स.1869 साली चंद्रपूर जिल्ह्याच्या सेटलमेंट रिपोर्टमध्ये छापलेली वंशावळ खालील प्रमाणे.[2]

**राजाची नावे इ.स**

भीम बल्लाळसिंह 870 ते 995

खरजा बल्लाळसिंह 896 ते 935

हिरसिंह 935 ते 970

आदिया बल्लाळसिंह 970 ते995

तलवारसिंह 995 ते1027
केसरसिंह. 1027 ते 1072
दिनकरसिंह 1072 ते 1142
रामसिंह 1142 ते 1207
सुरजा बल्लाळसिंह उर्फ शेरशहा. 1207 ते 1242
खाडक्या बल्लाळसिंह 1242 ते 1282
हीरशहा 1282 ते 1342
भुमा व लोकबा 1342 ते 1402
कोंड्या उर्फ करणशहा. 1402 ते 1442
बाबाजी बल्लाळशहा 1442 ते 1522
धोंड्या रामशहा 1522 ते 1597
कृष्णशहा 1597 ते 1647
वीरशहा 1647 ते 1672
रामशहा 1672 ते 1735
नीलकंठशहा 1735 ते 1751

काही गोंड घराण्याचा राजाची नावे मुघलांच्या कागदपत्रांतून आढळून येतात. मानजी बल्लाळ 1640, रामसिंग, किसन सिंग [3]

**गोंड घराण्याचा साम्राज्यविस्तार**

सुरुवातीच्या कालखंडात गोंड घराण्याचे राज्य शिरपूर परगण्यात होते. त्यानंतरच्या कालखंडात माना राज्याच्या पतनानंतर वैरागड प्रदेशात गोंड घराण्यांनी साम्राज्य विस्तार केला. तसेच देवगिरीच्या यादवांच्या अस्तानंतर काही प्रदेशात या घराण्याचे विस्तार केल्याचे दिसून येते. साम्राज्य विस्तार मोठ्या प्रमाणात झाल्यामुळे राजधानीचे ठिकाण शिरपूर वरून स्थलांतर करून बल्लारशा या ठिकाणी आणले. हे त्यांचे दुसरे राजधानीचे ठिकाण होते. या ठिकाणी वर्धा नदीच्या किनारी किल्ला बांधून, येते संपूर्ण राज्याचा कारभार पाहिला जात होता. या गोंड घराण्याचा विस्तार महाराष्ट्र, तेलंगाना व छत्तीसगड राज्यापर्यंत विस्तीर्ण होता. आजचा चंद्रपूर, गडचिरोली, यवतमाळ जिल्ह्यातील कळंब परगना, नागपूर जिल्हातील उमरेड पर्यंतचा प्रदेश, नांदेड जिल्ह्यातील माहूरपर्यंतचा प्रदेश, भंडारा जिल्ह्यातील पवनी पर्यंतचा प्रदेश होता. तसेच तेलंगाना प्रांतातील आदिलाबाद जिल्हाच्या मोठ्या भूप्रदेशावर राज्य केले होते.[4] हा संपूर्ण प्रदेश चांदागड अंतर्गत होता. तेरावा शतकात खांडक्या बल्लाळसिहच्या कालखंडात चंद्रपूर येथे परकोट बांधण्याचे कार्य सुरू झाले. परकोटाचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर त्या ठिकाणी राजधानी बसविण्यात आली. ही या घराण्याची तिसऱ्या राजधानीचे ठिकाण होते. या घराण्याच्या साम्राज्याची सीमा बहामनी साम्राज्यास लागून होती. गोंड राज्यांतर्गत कळंब आणि वैरागड या ठिकाणी हिऱ्याच्या खाणी होत्या.साम्राज्य विस्तार करीत असताना त्यांनी त्यांच्या गणराज्याची घडी नीट बसविली. त्यातच गोंड घराण्यातील तिसरे राजे हिरसिंह यांनी इ.स. 935 मध्ये जमीन महसूल सुधारणा केल्या.[5] अनेक ठिकाणी गडकोटांची निर्मिती केली. शिरपूर, बल्लारशा, चांदा, टिपागड कायर, कळंब,माहूर माणिकगड, भिवापूर, ब्रह्मपुरी, उमरेड, पवनी, वैरागड, गडबोरी, भद्रावती इत्यादी किल्ल्याची निर्मिती केली. यातील काही किल्ल्याची पुनर्बांधणी केल्याचे दिसून येतात. हा जंगली प्रदेश असल्यामुळे शेती योग्य जमीन तयार करण्यासाठी काही भागात जंगल तोडून शेती तयार करण्यात आली. या घराण्यातील राजांनी बांधकाम असो वा जल व्यवस्थापन यावर भर दिल्याचे दिसून येतात. अनेक ठिकाणी तलावाची व बावडीची निर्मिती केली. चंद्रपूर नगरीत महांकाली व अंकलेश्वर मंदिराची निर्मिती गोंड कालखंडात झाल्याचे दिसून येतात. महाराणी हिराई यांनी या मंदिराची पुनर्बांधनी केली.[6]

**गोंड घराण्याचा संघर्ष**

गोंड राजवंशांनी साम्राज्य विस्तार करीत असताना अनेक सत्ताधीशाची संघर्ष करावा लागला.पहिल्या टप्प्यात इ.स. 9 व्या शतकात त्यांनी माना राज्यात पराजित केले. त्यानंतर यादव घराण्याची संघर्ष केला. राज्याची घडी नीट बसवून त्यांनी कारभार सांभाळला. पुढे अल्लाउद्दीन खिलजी यांचा सेनापती मलिक कापूरने इ.स. 1310 ला शिरपूर वर स्वारी केली.[7] यावरून खिलजी वंश आणि गोंड वंश यांचा संघर्ष झाल्याचे दिसून येतात. गोंड राजवंशाची सीमा बहामनी राज्याला लागून असल्यामुळे नेहमी संघर्ष उद्भवत होता. त्यानुसार इ.स.1412 व इ.स.1415 मध्ये सुलतान फिरोजशहानी गोंडवानावर स्वारी केल्याचा उल्लेख आढळतो.[3] इ.स.1425 व इ.स.1427 या कालखंडात अहमदशहा वली बहामनी यांनी गोंडवानावर स्वारी केली.[8] हा गोंडवानातील आर्थिकदृष्ट्या जास्त उत्पन्न देणारा प्रदेश असल्यामुळे शेजारील राज्यांचे यांच्यावर आक्रमण झाले. त्यानंतरच्या कालखंडात मोगल बादशहानी सुद्धा चांदा प्रांतात आक्रमण केल्याचे दिसून येतात. चांदासारखे देवगड येथेही गोंड राजवंशाची सत्ता होती. त्यांच्याशी सीमा लागून असल्यामुळे देवगडशी चांदागडच्या राज्याचा संघर्ष झाल्याचे दिसून येतात. पुढील कालखंडात मराठ्यांनी वराड व गोंडवाना प्रांतात मराठी सत्तेचा विस्तार केला. त्याच्याच परिणाम पुढे गोंड आणि भोसले यांचा संघर्ष निर्माण झाला. यातून पुढे नागपूरकर भोसले यांनी इ.स. 1751 मध्ये संपूर्ण चांदा राज्य स्वतःच्या ताब्यात घेतले.[9]

अशाप्रकारे अनेक सत्ता संघर्षात शेवटी गोंड घराण्याचा टिकाव लागू शकला नाही.

**संदर्भ ग्रंथसूची**

1. राजुरकर अ.ज, चंद्रपूरचा इतिहास, द्वितीय आवृत्ती, महाकाली प्रकाशन चंद्रपूर, 1982, पृष्ठ क्र. 105
2. तन्नीरवार दत्ता दक्षिणापथातील गोंड कालीन चंद्रपूर पृष्ठ क्र. 50, 100
3. अनुवादक : कॅ.डॉ. भ.ग.कुंटे, गुलशेने इब्राहिमी फरिश्ता लिखित, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ मुंबई, प्रथम आवृत्ती 1982, पृष्ठ क्र. 164
4. राजेश्वर हरी उर्फ सोनबाजी हूड गोंडवन (चंद्रपूर) 1981 31, 55
5. Myth And Ritual, The Raj Gonds of Adilabad Macmillan & co.LTD.London 1948 Page No. 7,8
6. Pandhey R.P, LOST EMPIRE, Veena Books, Nagpur 2012, Page No. 13,14,15
7. Central Provinces District Gazetteers Chanda District 1909, Page No. 37
8. Major Lucie Smith, Settlement Report of Chanda District, 1869
9. Sir Jadunath Sarkar, kr.CIF, A Shot History of Aurangzib ( 1681-1707 ) Calcutta M.C. Sarkar & Sons, 1930, Page No. 430

# धर्म आणि अध्यात्म: बौद्ध धर्म

**पंडित कीर्ती नारायणराव**
संशोधक विद्यार्थिनी, इतिहास विभाग
ज्ञानोपासक महाविद्यालय,परभणी

**प्रस्तावना:**

मानवी जीवन जगताना मानवाला सामाजिक जीवनात अनेक अनुभव प्राप्त होतात.त्या त्याद्वारे मानवाला ज्ञान प्राप्त होते.काही अनुभव हे सखोल विचार करण्याचा मार्ग दाखवतात.तेव्हा मानवला धर्म व अध्यात्माशी निगडीत विचार येतात. जीवन जगताना अध्यात्म व धर्म हे दोन शब्द अनेकदा ऐकायला येतात. हे दोन्ही शब्द एकाच अर्थाने समान्यपणे वापरले जातात धर्म व अध्यात्म हे ईश्वरराच्या व स्वतःच्या जवळ जाण्याचे मार्ग असले तरी त्याविषयी अधिक माहिती घेणे गरजेचे आहे.

धर्म हे मानवी जीवनातील महत्त्वाची बाब आधीपासूनच राहिलेली आहे. धर्म ही देव, देवी, गुरु व अशा प्रकारच्या गोष्टीवर केंद्रित प्रथा विधी व संस्थांचे संरचित प्रणाली आहे धर्मसंस्था मानवाला ईश्वरी दैवीशी जोडण्यासाठी निश्चित नियम देते.

मानवी जीवनाला नीतिनियम देण्याची बाब म्हणजे धर्मसंस्था होय. आस्तिक आणि नास्तिक असणे ही धर्माशी संबंधित बाब आहे.

मानवी जीवन जगताना मानव त्याच्या धर्माचे पालन करीत असतो जगामध्ये अनेक धर्म आहेत हिंदू, बौद्ध, ख्रिश्चन, जैन, शीख, मुस्लिम इत्यादी धर्म जगभरामध्ये अस्तित्वात आहेत वेगवेगळा स्वरूपाच्या प्रथा परंपरा रूढी धर्मांतर्गत येतात.

**धर्म संस्था:**

अनादिकाळापासून लोकांना देव आणि समुदायमध्ये आधार किंवा दिलासा मिळालेला आहे असा विश्वास ठेवणे की एखादी शक्ती आहे जे आपल्याला वरदान देऊ शकते असा एक विचार असतो जेव्हा आश्वस्त करण्यासारखे आहे. अनादी प्राचीन काळाचा विचार करता बराच काळ धर्म हा कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रकार सैद्धांतिक बरोबर नसलेल्या गोष्टी शास्त्र विषयाच्या स्वरूपात लोकांपासून अलिप्त ठेवला जात असे, त्यामुळे संविधान कायदे आणि धोरणे अस्तित्वात नव्हती, त्या काळात धर्म हा केवळ आचरणाचा प्रकार नव्हता तर एखाद्या देशाचा कायदादेखील होता. जो लोकांना त्यांच्या कृतीनुसार चांगल्या व इतर गोष्टी प्रदान करीत असे.

**अध्यात्मिकता अर्थ, अध्यात्म - उत्पत्ती:**

स्पिरिट (spirit )शब्दाचा अर्थ मनुष्य प्राण्यामध्ये सजीव किंवा जीवनदायी तत्व असा होतो. हा शब्द जुन्या फ्रेंच 'ए स्पिरीटपासून' आला आहे. हा शब्द लॅटिन स्पिरिट्स याचा अर्थ आत्मा, धैर्य, जोम, श्वास याद्वारे आला आहे. जुन्या फ्रेंच स्पीच्युअल पासून आध्यात्मिक हा शब्द आत्म्याशी संबंधित आहे. स्पिरिच्युअलपासून आला आहे. जो स्पिरीटच्या नावाने येतो स्पिरिट्स याचा अर्थ आत्मा, मन. शुद्ध चैतन्य, असा होतो. अध्यात्म हा शब्द फ्रेंच अध्यात्मवादतून आहे. जो लॅटिन अध्यात्म वादातून आला आहे.

अध्यात्मात अलौकिक शक्तीच्या अस्तित्वाला सूचित करण्यात येते. ज्याचा अर्थ निसर्गाच्या नियमाच्या पलीकडे असलेल्या बाबी होय. अलौकिक लोककथा व धार्मिक संदर्भाने दर्शविण्यात येतात. हा शब्द देवदूत, देव, आत्मे यासारख्या भौतिक नसलेल्या घटकांना सूचित करते यामध्ये मनुष्यात असलेला पूर्वज्ञान या मूर्त स्वरूप असलेल्या किंवा प्रदान केलेल्या क्षमतांचा देखील समावेश होतो.

अध्यात्म म्हणजे काय अध्यात्माचा अर्थ याबद्दल व्याख्या करताना या विशेष व्यापकपणें परिपूर्ण सहमत असलेल्या आढळत नाही अध्यात्माच्या पद्धतशीरपणे अभ्यास करण्याचा प्रयत्न करतांना वेगवेगळे मतप्रवाह पहावयास मिळतात. परंतु तरीही काही विद्वानांनी संशोधकाने अध्यात्माबद्दल व्याख्या केली आहे.

**व्हॉईसमन यांच्यामते:** आध्यात्माचा पारंपरिक अर्थ पुनरनिर्मितीची प्रक्रिया आहे. ज्याचा उद्देश मनुष्याचे मूळ स्वरूप, देवाची प्रतिमा पुनर्प्राप्त करणे आहे. हे प्राप्त करण्यासाठी पुनर्निर्मिती साचावर केंद्रित आहे. आध्यात्माचा कालपरत्वे विकसित विस्तार झालेला आहे पारंपरिक व धार्मिक प्रक्रियांचा संदर्भ देण्याचा उद्देश मनुष्याचे मूळ स्वरूप पुनर्संचयित करणे आहे देवाच्या प्रतिमेवर केंद्रित आहे जसे की जगातील धर्माचा संस्थापक आणि पवित्र ग्रंथ आणि उदाहरण दिले आहे. यामध्ये बौद्ध धर्मातील बुद्ध यांचा व इतर धर्म व त्यांच्या संस्थापक यांचा समावेश होतो.

**आधुनिक काळ:** आध्यात्माचा अर्थ आधुनिक काळात व्यक्तिनिष्ठ अनुभवावर भर दिला जातो व लोक ज्या मूल्यांवर जगतात यामध्ये वैयक्तिक वाढ समावेश होतो.

**सामान्य व्याख्या:** "आध्यात्माची व्याख्या सामान्यतः एखाद्या व्यक्तीने जीवनातील अंतिम किंवा पवित्र अर्थ किंवा उद्देश याचा शोध घेणे असा केला जातो."

**समकालीन अध्यात्म:** सध्याच्या काळात आध्यात्मिक हा शब्द पूर्वी धार्मिक या शब्दाच्या आध्यात्मिक हा शब्द मोठ्या प्रमाणात उपयोगात येत आहे, असे लक्षात येते समकालीन अध्यात्मला पारंपरिककोत्तोर अध्यात्म आणि नवीन योग अध्यात्म असे म्हणतात.

**हनेग्राफ:** यांनी दोन नवीन युग चळवळीमध्ये भिन्नता सांगितलेली आहे. नवीन युगाची प्रामुख्याने विसाव्या शतकाच्या मध्यास इंग्लंडमध्ये उदभवले व त्याचे थिऑसॉफी व अँथ्रोपोसॉफी (विसाव्या शतकातील मानववंशशास्त्र) ही एक अध्यात्मिक नवीन धार्मिक चळवळ आहे. हे दोन युग सांगितले आहे. नवीन युग हे 1970 च्या उत्तरार्धात उदयाला आले.

**सर्वेक्षण:** धर्माबाहेर अध्यात्माबद्दल बोलणारे लोक अनेकदा स्वतःला आध्यात्मिक म्हणतात. परंतु धार्मिक म्हणत नाही हे लोक आध्यात्मिक मार्गाचा अस्तित्व विशेषत आध्यात्माचा स्वतःच्या वैयक्तिक मार्ग शोधण्याचे महत्त्व सांगतात

2005 मध्ये झालेल्या सर्वेक्षणानुसार अमेरिकेतील 24 टक्के लोक स्वतःला आध्यात्मिक म्हणतात परंतु धार्मिक मानत नाहीत आधुनिक आध्यात्मिकता अलौकिकता स्वीकारत नाही तर ते मानवतावादी मूल्यांवर प्रेम, सहिष्णुता,करुणा यावर भर देतात.

**आध्यात्मिक अनुभव: (Spiritual Experience)**

आधुनिक अध्यात्मात आध्यात्मिक अनुभव महत्त्वाचे कार्य करतात. पाश्चत्य व आशियाई या दोन्ही प्रकारच्या लेखकांनीही संज्ञा लोकप्रिय केली आहे. या अनुषंगाने अभ्यास करणारे लेखक विल्यम जेम्स 'व्हरायटीज् ऑफ रिलिजियस एक्सपिरियंस' (The Varieties of Religious Experience) **1902** तसेच रुडोल्फ ओटो यांनी गुढवादाच्या आकलनाला विशिष्ट अनुभव म्हणून प्रभावित केले आहे जे ज्ञान प्रदान करते. आध्यात्मिक अनुभवांमध्ये एका मोठ्या वास्तवाशी जोडले जाणे अधिक व्यापक स्वतःला ओळखणे, इतर व्यक्ती किंवा समुदायाशी निसर्ग किंवा दैवीशक्ती क्षेत्राशी जोडणे याचा समावेश यामध्ये असू शकतो.

**अध्यात्म**: म्हणजे जीवनाचा सखोल अर्थ आणि उद्देश शोधण्यासाठीचे व्यक्तीचे प्रयत्न होय. यामध्ये आत्मशोध आंतरिक शांती आणि विश्वाशी किंवा उच्च शक्तीशी संबंध जोडणाच्या पद्धतींचा समावेश होतो.

धर्माप्रमाणे आध्यात्म कोणत्याही संगठीत संरचनेशी अथवा विशिष्ट देवतांशी जोडलेली नाही ज्यांची आपणाला पूजा करावी लागते.ते आत्मनिरीक्षण ध्यान, सजगता, स्वतःमध्ये जगात शांतता शांततेत राहण्याबद्दल आहे अध्यात्मामध्ये आपणास काही विधी किंवा सिद्धांताचे पालन करण्याची आवश्यकता नाही परंतु व्यक्ति विकासासाठी प्रोत्साहित केले जाते..या दोन्ही अर्थ पाहिल्यानंतरही लक्षात येते की प्राचीन काळात आणि आजही लोक आध्यात्मिकतेपेक्षा धार्मिक असल्याचे दिसतात. जरी बरेच लोक जन्मतः प्राप्त होणार् या परंपरा सांस्कृतिक प्रभाव आहे धार्मिकतेत आराम आणि आंतरिक शक्तीसाठी त्यात सामील होत असल्याचे दिसतात.

**बौद्ध धर्म:**

बौद्ध धर्माच्या इतिहासाचा विचार करता बौद्ध धर्म एका माणसाच्या ज्ञानप्राप्तीपर्यंतच्या प्रवासाची कथा होय. बौद्ध धर्म हा जगातील चौथा सर्वात मोठा धर्म आहे भारतीय धर्म व परंपरा शिकवणुकीवर आधारित आहे, भारतात पाचव्या व

सहाव्या शतकात अस्तित्वात आलेला बौद्ध धर्म तत्कालीन धर्माच्या परंपरांच्यातील बदल दर्शविणारे धर्म होय.बौद्ध धर्म आध्यात्मिक परंपरा असणारा धर्म आहे कारण बौद्ध धर्म वैयक्तिक आध्यात्मिक जीवनाचा सत्य या स्वरूपा विषयीचे सखोल अंतर्दृष्टी प्रदान करण्यावर लक्ष केंद्रित करते. बौद्ध धर्माचा विश्वास आहे की काही स्थिर किंवा कायमचें नाहीं ज्ञान प्राप्तीचा मार्ग ज्ञान नैतिकता व ज्ञानाचा सर्व विकासातून प्राप्त होतो असे बौद्ध धर्मात मानले जाते.

**विचारसरणी:**

प्रत्येक व्यक्तीला स्वतःच्या उन्नतीचा मार्ग शोधाचे स्वातंत्र्य ह्याची जाणीव त्यांना झाली नवीन विचाराच्या प्रवर्तकांमध्ये गौतम बुद्ध यांचे कार्य अत्यंत महत्त्वाच्या बौद्ध धर्माचा प्रसार भारत भारताबाहेरील आणि देशामध्ये झाला गौतम बुद्ध बौद्ध धर्माचे संस्थापक होते बौद्ध धर्मात मानवी जीवनातील सर्व व्यवहारांच्या मुळाशी चार सत्य आहे त्यांना आर्य सत्य म्हटले आहेमध्ये जन्म घेणे ही सुद्धा एक दुःखमय प्रक्रिया आहे.

**चार आर्य सत्ये:**

1) दुःख मानवी जीवनात दुःख असते 2) दुःखाचे कारण: असते. दुःखाला कारण असते. 3) दुःख निवारण: दुःख दूर करता येते. 4) प्रतिपद: प्रतिपद म्हणजे मार्ग हा दुःख दूर करणाचा मार्ग आहे. हा मार्ग शुद्ध आचरणाच आहे.

**बौद्ध धर्मात अष्टांगिक मार्ग:**

समदृष्टी, सम्यक संकल्प, सम्यक वाचा,सम्यक कर्मांत, सम्यक आजीव, सम्यक व्यायाम,सम्यक स्मृती,सम्यक समाधी याद्वारे मानव आत्मोन्नती करू शकतो असे बौद्ध धर्मा स्पष्ट केले आहे सत्याचे ज्ञान घेणे योग्य कर्म करणे उपजीविका योग्य मार्गाने करणे कर्म करताना योग्य चांगली कर्म उत्पन्न व्हावी त्यासाठी प्रयत्न करणे. मन एकाग्र करून विचारांपासून आपले चित्त वळणे त्यांचा योग्य मार्ग समजून घेण्या चित्त एकाग्र करून ध्यानाचा अनुभव या अशा स्वरूपाच्या आचरण केल्यास मनुष्याला योग्य व शुद्ध मानवी जीवन जगता येते, असे बौद्ध धर्मात स्पष्ट केले आहे.

**बौद्ध धर्म उपदेश:**

बौद्ध धर्मात मानवी बुद्धीच्या स्वातंत्र्याची घोषणा केली आहे. जन्माने मानवाची श्रेष्ठता सिद्ध होत नाही तर मानवाच्या कर्माने श्रेष्ठता निश्चित होते असे मानण्यात येते. **बुद्धांचे उदगार “छोटीसी चिमणी देखील स्वतःच्या घरट्यात स्वच्छंदपणे चिवचवते”** त्यांचे उदगार प्रसिद्ध आहेत. याद्वारे स्वातंत्र्य,समता या मूल्यांची निष्ठा याद्वारे प्रकट होते सर्वांविषयी करूणा व सहिष्णुता संपूर्ण मानवजातीला आजही बौद्ध धर्माकडून मार्गदर्शक आहे.

**बौद्ध संस्कृती:**

बौद्ध संस्कृती ही श्रीलंका, तिबेट, थायलंड, म्यानमार, चीन, कोरिया इत्यादी देशात आज पसरलेली दिसते. या ठिकाणी बुद्धांचे अनेक विहारे व पुतळे आहेत तथागत बुद्ध यांच्या सिंहमुद्रा, ध्यानस्थ मुद्रा आशीर्वाद मुद्रा, भूमिस्पर्श मुद्रा, इत्यादी प्रसिध्द आहेत. तसेच महाराष्ट्रातील पुणे येथे त्यासंबंधी ‘आर्य नागार्जुन संग्रहालय’ आहे हे पुण्यातील बुद्ध संस्कृती संशोधन संस्थेतर्फे चालविण्यात येत आहे.

**बौद्ध धर्म पंथ:** बौद्ध धर्म मध्ये पुढील काळात पंथ निर्माण झाले ते पुढील प्रमाणे

**थेरवाद वाद:** थेरवाद हा बौद्ध धर्माचा सर्वात जुना जुने नाव आहे. बुद्धांच्या शिकवणीची धम्माची बौद्धधर्मीयांसाठी धम्माचा अर्थ धर्माच्या संदर्भाने येतो हा पंथ सिद्धांत मठ शास्त्रच्या बाबतीत रूढिवादी आहे. नंतरचा काळही परंपरा भारत, श्रीलंका नंतर आग्नेय आशियात पसरला व तिथे तो बौद्ध धर्माचे प्रमुख स्वरुप बनला. जगातील धर्मांतरित लोक देखील थेरवाद बौद्ध धर्म स्वीकारतात. याचे अनुसरण करतात आधुनिक युगात बुद्ध ध्यान पद्धतीला पूर्ण करणारी विपश्यना परंपरेचा विकास यांचा समावेश यात होतो.

**महायान पंथ:** महायान मुख्यत्वे बुद्धांच्या बोधीसत्व मार्गावर लक्ष केंद्रित करते यामध्ये सर्वांसाठी बुद्धत्व प्राप्त करण्याची इच्छा करुणामय मन असा होतो महायान बोधीसत्व ला आध्यात्मिकदृष्ट्या वीर व्यक्ति मानतात जे जागृति प्राप्त करण्यासाठी कार्य करतात.

**बौद्ध धर्मानुसार तीन वैश्विक सत्ये:**

बौद्ध धर्मात तीन महत्त्वाचे वैश्विक सत्ये सांगितली आहेत. 1) पहिले सत्य हे आहे की मानवी जीवनातील प्रत्येक गोष्ट ही क्षणिक आहे. 2) जीवनात काहीही कायमचे नसते वस्तू बाळगण्यावर जीवन मानवाला परिपूर्णता देईल असे नाही. 3) आत्मा या बद्दल सांगायचे तर कोणताही शाश्वत आत्मा नाही हा फक्त परिवर्तनीय गुणधर्मांचा किंवा गुणांचा संग्रह आहे.

**धर्मग्रंथ:**

बौद्ध धर्म ग्रंथ पाली भाषेत आहेत, त्रिपिटक सुत्तपिटक अभिधम्मपिटक,धम्मपद इत्यादी बौद्ध धर्माशी संबंधित ग्रंथ पहावयास मिळतात,यामध्ये बौद्ध धर्म उपदेश, शिकवण नियम याविषयी माहिती देण्यात आलेली आहे.

**जातक कथा संग्रह:**

जातक म्हणजे जन्माविषयी अथवा जन्मकथा हे पुस्तक बुद्धांच्या मागील जन्माशी संबंधित कथांचा संग्रह असलेले पुस्तक आहे बुद्धत्व प्राप्त करण्यापूर्वी बुद्धांनी घेतलेल्या पूर्वजन्माच्या कथा आहेत. स्वतः बुद्धांनी आपल्या शिष्यांना सांगितली आहेत, असे मानण्यात येते नंतरच्या काळातच्या या कथांच्या माध्यमातून नीतिमत्ता आणि धर्माविषयी ज्ञान देण्यात आलेले आहे.

**बौद्ध धर्माचा प्रसार:**

बौद्ध धर्माच्या प्रसाराचा विचार करता पूर्वेकडील देशांमध्ये बौद्ध धर्म पसरलेला दिसतो. बौद्ध धर्माचे पुढील काळात वेगवेगळे पंथ निर्माण झाले. श्रीलंका, म्यानमार, थायलंड, कंबोडिया, लाओस मध्ये ज्या संस्कृतीमध्ये तो पाळला जातो. थेरवाद, महायान पंथ वज्रयान तीन वेगवेगळ्या शाखा दिसून येतात.

**शैक्षणिक केंद्रे:**

बौद्ध धर्माने शिक्षण क्षेत्रात प्राचीन काळात मोठी भरीव कामगिरी केलेली आहे यामध्ये नालंदा विद्यापीठ हे भारतातील मगध या प्राचीन राज्याच्या बौद्ध महाविहार होते. तसेच प्रतिष्ठित विद्यापीठ तसेच शिक्षणाचे प्रसिद्ध केंद्र होते. त्या काळातील जगातील सर्वात मोठ्या शिक्षण केंद्रापैकी एक होते. आज ते युनेस्कोच्या जागतिक वारसास्थळात समाविष्ट आहे याबरोबरच तक्षशीला आहे. पहिले विद्यापीठ होते ते शिक्षणाची प्रसिद्ध केंद्र होते त्या काळातील बौद्ध धर्माच्या शिक्षणाची केंद्रे व शिक्षण पद्धती महत्त्वाची होती.

**बौद्ध धर्म व अध्यात्म:**

बौद्ध धर्मात जीवन व आध्यात्मिक आचरण यासाठी अनेक महत्त्वपूर्ण गोष्टी सांगितल्या आहेत. बौद्ध धर्म भौतिक आध्यात्मिक वास्तवाचे स्पष्टीकरण करतो बौद्ध धर्म प्रत्यक्ष व्यावहारिक आहे. मानवाच्या स्वतःबद्दल मना बद्दल आहे.ध्यान ला बौद्ध धर्मात महत्त्वाचे स्थान आहे.

**बौद्ध धर्म व जागृती:**

बौद्ध धर्माची विशेषता भर दिलेला दिसतो तो म्हणजे मानवाच्या जागृतीवर जीवन जगताना आपल्या दु खाचा परिचय होणे आध्यात्मिक जीवनाची सुरुवात मानली जाते.

**सत्त्याला महत्त्व:**

बौद्ध धर्मात सत्याला महत्व आहे स्वतःला जे हवे आहे ते आपण स्वतःच करणे गरजेचे आहे बुद्धिमत्ता,शक्ती, प्रेमळ हृदय व सिद्ध प्रभावी पद्धती यामुळे आपण आत्मविश्वास जागृत करू शकतो. आपण स्वतःच्या जीवनावर सिद्धी प्राप्त करू शकतो बौद्ध धर्माला तर्कसंगत वैज्ञानिक धर्म म्हटले तर वावगे ठरणार नाही आपल्याला असे म्हणता येईल की बौद्ध धर्मात आध्यात्मिक वास्तव **'मन'** आहे. मनाची चंचलता स्थिरतेत आली की मानवाची उन्नती होऊ शकते बौद्ध धर्मा प्रत्येक बाब स्वतःच्या अनुभवतून चाचपणी करण्याची शिकवण देतो. बौद्ध धर्मात शुद्ध मनाला महत्व देतो.स्वतःच्या स्वतःला च्या क्षेत्र पाठिंबा देण्यासाठी प्रयत्न करण्यावर भर देतो.

**बौद्ध धर्माच्या मध्यवर्ती पद्धती:**

बौद्ध धर्मात आध्यात्मिक या साठी बौद्ध धर्मामध्ये अनेक मध्यवर्ती सामान्य पद्धती सांगितलेल्या आहेत. या पद्धती जगभर प्रसिद्ध देखील आहेत. आजच्या आधुनिक काळामध्ये उपयोगात आणला जात असल्याचे दिसते. यामध्ये माइंडफुलनेस जागरूकता व ध्यान या अत्यंत प्रभावी पद्धती मानल्या जातात.

**माइंडफुलनेस (mindfulness) जागरुकता:**

बौद्ध धर्मात असे मानण्यात येते की वास्तवाकडे पाहण्याचा नवीन मार्ग मिळणे हे ज्ञान प्राप्ती करता केंद्रस्थानी आहे. सर्वात महत्वाच्या म्हणजे मानवी क्षमता आहे, जी पूर्णपणे उपस्थित होते वर्तमानात जगण्याबद्दल आहे बौद्ध धर्मात ज्ञान प्राप्तीच्या दृष्टीने पाहिले व योग्य असा माइंडफुलनेस आता जागरूकता मानले जाते बौद्ध धर्मात ज्ञान शहाणपण समृद्ध करण्यासाठी माइंडफुलनेसचा अवलंब करतात याद्वारे मनुष्याला ज्ञान प्राप्त होते त्याची दु: खापासून मुक्तता होते असे मानले जाते.

**ध्यान :** ध्यान याचा अर्थ लक्ष केंद्रित करणे व मनाची स्पष्टता, शांतता, स्थिर,स्थिती प्राप्त करणे असा होतो.

**विपश्यना:** बौद्ध धर्मात ध्यान करताना चा प्रसिद्ध प्रकार म्हणजे विपश्यना होय. यामध्ये श्वासोच्छवासावर सर्व लक्ष केंद्रित केले जाते त्या पद्धतीने मन शांत करण्याचे व एकाग्रता मिळण्याचे प्रयत्न करताना दिसून येते.

श्वासोच्छवास ध्यान हे ध्यानाचा सर्वात सोपा प्रकार आहे.स्वतःच्याच श्वासवर लक्ष केंद्रित करणे आपले विचार श्वासाकडे आणायचा सराव करणे यामध्ये उद्दिष्ट असते.

**अनापान सती:**

पहिली पातळी म्हणजे अनापान म्हणजे श्वासोच्छवास व जाणिव श्वासोच्छवास कडे जाणीवपूर्वक अवधानपूर्वक लक्ष देणे म्हणजे अनापान सती सावध चित्ताने यामध्ये सतत पाहिले जाते. श्वासोच्छवास क्रियेचे तीन प्रकार: विपश्यना प्रकारामध्ये श्वास करण्याचे तीन प्रकार सांगितले आहेत.

**पहिला प्रकार:** यामध्ये उच्छवास यांच्यामध्ये बारकाईने निरीक्षण केले जाते श्वास शरीरामध्ये किती खोलवर जातो उच्छवास बाहेर किती लवकर लांबवर जातो हे यामध्ये पाहिले जाते.

**दुसरा प्रकार:** श्वासोच्छवास करण्याच्या दुसऱ्या प्रकारामध्ये करतांना श्वासोच्छवास ते मनाने पहाण्याची जाणीव ठेवणे तिचे फक्त अवलोकन करणे नियंत्रण न करणे याचा समावेश होतो.

**तिसरा प्रकार:** श्वासोच्छवास करण्याच्या प्रक्रियेमध्ये तिसरा प्रकार यामध्ये श्वासोच्छवासाचे सूक्ष्म निरीक्षण केले जाते. अनापान सतीच्या सुरुवातीला पाठीचा कणा सरळ याकडे लक्ष द्यावे लागते. मना मध्ये श्वासोच्छवास मोजण्याचे नसतात. जप करायचा नसतो या प्रक्रियेची जाणीव जागृत ठेवणे, श्वास व संवेदना यांच्याबरोबर मनात अनेक विचार येतात विचार येऊ नयेत असे यात गृहीत धरले जाते परंतु सहज पणे आले तर त्यांना प्रयत्नपूर्वक हटवण्याचा प्रयत्न करायचा नाही. येणाऱ्या या विचारांकडे तटस्थपणे पाहताच्या प्रक्रिया श्वास, संवेदना, विचार यापैकी कशावरही लक्ष केंद्रीत होऊ शकते. अनापानसती म्हणजे श्वास कडे पाहणे संवेदना विचारांकडे पाहण्याला विपश्यना म्हणतात. अनापानसती समजले की विपश्यना जमते मन स्थिर व प्रसन्न होते, त्यामुळे साधक शांत होतो तसेच ध्यानामुळे आत्मज्ञान प्राप्त होते बौद्ध धर्मांत मानले जाते की ध्यान हे मानवाला आत्मज्ञान प्राप्त करण्याचे अत्यंत महत्त्वाचे साधन आहे.

**बौद्ध धर्माचा समाज जीवनावरील प्रभाव:**

बौद्ध धर्म व समाज जीवनावरील प्रभाव मोठ्याप्रमाणात असलेला दिसून येतो पुढील प्रमाणे सांगता येईल.

**बौद्ध धर्मातील मूल्य:** सर्वांविषयी प्रेम, करुणा, सहिष्णुता यांचा समाजावर सखोल प्रभाव दिसतो बौद्ध धर्माची ही शिकवण आहे.

**वैचारिक स्वातंत्र्य:** बौद्ध धर्मामध्ये वैचारिक स्वातंत्र्याला खूप महत्त्वाचे स्थान किंवा प्रथम स्थान असल्याचे दिसते, ते बौद्ध धर्माच्या शिकवणीत रुजलेले दिसते.

**सद्वर्तन:** बौद्ध धर्माने अहिंसा, सत्य, अस्तेय, संयम या प्रकारची शिकवण दिली आहे. त्यामुळे मानवाला सद्गुणांचा विकास होण्यास मदत होते.

**समतेचे तत्त्व:**

बौद्ध धर्मात समतेच्या तत्वाला खूप महत्त्वाचे स्थान आहे. बौद्ध धर्म जात, संप्रदाय, वर्ण, व सामाजिक दर्जा ह्या कोणत्याही बाबींचा विचार न करता समता प्रस्थापित करण्याचा उद्देश स्पष्ट करण्यात आला आहे.

**सारांश :**

अशा प्रकारे हज़ारो वर्षापासून बौद्ध धर्म लोकांना अधिकाधिक जागरूक बनण्याचा संदेश देत आहे. एकाग्रता मानवी मन,मनामध्ये येणारे हजारो विचार यांच्यावर प्रयत्नपूर्वक या विचारांना योग्य मार्ग देण्याचे प्रयत्न केले जातात, यावर

भर दिलेला आहे. यासाठी मानवाने केलेला सजग प्रयत्न यावर अधिक भर दिलेला दिसतो. बुद्धधर्मा द्वारे आध्यात्मिकता ध्यान, माइंडफुलनेस या मार्गानी सांगितलेली दिसते. या सहज सोप्या पद्धती आहे, जे मानवी जीवनामध्ये त्यांना आध्यात्मिकता प्राप्त करण्यासाठी मानवी उन्नतीसाठी अधिक उपयुक्त असल्याचे दिसते, बौद्ध धर्मातून आध्यात्मिकता, ज्या प्रकारे प्रकट होते ते आजच्या आधुनिक काळासाठी अत्यंत सुसंगत असल्याचे दिसते.

**संदर्भग्रंथ सूची :**

1. केळूसकर कृष्णराव अर्जुन, गौतम बुद्धाचे चरित्र, संदर्भ प्रकाशन,छत्रपती संभाजी नगर
2. पटवर्धन मनोज, सकाळवृत्त लेख (ध्यान), 18 मे 2024,
3. Pierce Rebecca King, mindfulness: where religion meets science, social science research
4. https://www.wikipedia.org/
5. McLeod Melvin, article
6. Times of India.com, article
7. कोसंबी धर्मानंद लघुपाठ मेनका प्रकाशन
8. कोसंबी धर्मानंद जातक कथा साकेत प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड

# प्राचीन भारतातील 'स्त्री' शिक्षण

**प्रा. डॉ. उत्तम आप्पासाहेब पठारे**
इतिहास विभाग व संशोधन केंद्रप्रमुख,
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नारायणगाव

**प्रस्तावना:**

प्राचीन भारतीय संस्कृती ही जगातील एक सर्वाधिक महत्त्वपूर्ण संस्कृती मानली जाते. चार हजार वर्षापेक्षा जास्त काळ सुरक्षित असलेल्या, जगभर प्रचार- प्रसार व संशोधन झालेल्या, या संस्कृतीचे सर्वांगीण ज्ञान होण्यासाठी तिच्यातील 'शिक्षण पद्धती'[1] चे अध्ययन करणे गरजेचे आहे.

प्राचीन भारतीयांनी शिक्षणाला अधिक महत्त्व दिले होते. अध्यात्मिक आणि भौतिक जीवनाचा विकास, तसेच विभिन्न क्षेत्रातील जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी आणि रीतसर निर्वाहासाठी शिक्षणाचे महत्त्व स्विकारले होते. चतुर्वेदांचा वारसा सांगणाऱ्या देशात बुद्धिमवतांना मान होता. विद्येला किंमत होती. 'विद्वान सर्वत्र पूज्यते' व 'विद्येला तृतीय नेत्र' मानले जात होते. 'विद्या गुरुणां गुरु:' म्हणजे 'विद्या हीच गुरुस्थानी'[2] मानली जात असे. अशा प्रकारची विद्येची व गुरुची महती गाणाऱ्या भारतात शिक्षण पद्धतीवर प्रकाश टाकणारे प्राचीन काळाचे ग्रंथ जरी उपलब्ध नसले, तरी संहिता, उपनिषदे, धर्मसूत्रे, धर्मशास्त्र व जैन - बौद्ध वाङ्मय यावरून 'प्राचीन शिक्षण पद्धती' विषयी कल्पना येते. अशा या प्राचीन शिक्षण पद्धतीत 'स्त्री' शिक्षणाचे स्वरूप काय होते. याची संक्षिप्त चर्चा प्रस्तुत शोधनिबंधात केली आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

1. प्राचीन काळातील 'स्त्री' शिक्षणाचे स्वरूप अभ्यासणे.
2. स्त्रियांना कोण-कोणत्या विषयांचे शिक्षण दिले जात होते. याचा अभ्यास करणे.
3. प्राचीन काळात केवळ 'चूल आणि मूल' हेच स्त्रियांचे अंतिम क्षेत्र होते का ? अभ्यासणे.
4. 'विवाह' हाच स्त्री शिक्षणातील मोठा अडथळा ठरत होता.
5. प्राचीन काळातील विदुषी स्त्रिया म्हटल्या की, गार्गी, विश्ववारा, अपाला, घोषा, अशा काही ठराविकच नावे पुन्हा पुन्हा दिसतात. परंतु ह्या व्यतिरिक्त अशा अनेक विदुषी स्त्रियांचे योगदान अभ्यासणे.

**प्राचीन भारतीय शिक्षणाचे स्वरूप व प्रमुख उद्देश :**

1. चारित्र्याची निर्मिती 2. व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास 3. सामाजिक कर्तव्यांची जाणीव 4. सामाजिक सुख आणि कौशल्य विकास 5. संस्कृतीचे संरक्षण आणि प्रचार - प्रसार 6. निष्ठा आणि धार्मिकतेची भावना जागृत करणे. इत्यादी.

यावरून स्पष्ट होते की, प्राचीन भारतीय शिक्षण पद्धतीचे उद्देश अत्यंत उच्च प्रतीचे होते. प्राचीन भारतीयांचा शिक्षणविषयक दृष्टिकोन आदर्श आणि व्यवहारवादी होता. व्यक्तीला संसारिक जीवनातील समस्या सोडविण्यासाठी उपयुक्त बनवले जात होते. शिक्षण समाज सुधारणेचे प्रभावी माध्यम होते. प्रारंभी 'उपनयन' संस्कार सर्वांसाठी होता. प्राचीन काळात शिकवले जाणारे अनेक विषय, शिक्षण पद्धती, महान आचार्यांची परंपरा, निर्माण झालेले मौलिक साहित्य, गणित, विज्ञान आणि खगोलशास्त्रातील शोध, अनेक महत्त्वाची जगप्रसिद्ध विद्यापीठे अशा अनेक बाबीवरून प्राचीन भारतीय शिक्षणाचे स्वरूप, उद्देश आणि महत्त्व लक्षात येते.

**प्राचीन भारतातील स्त्रियांचे स्थान व शिक्षण :**

कोणत्याही संस्कृतीचे स्वरुप, योगदान आणि श्रेष्ठत्व समजण्यासाठी, त्या संस्कृतीतील स्त्रियांची स्थिती लक्षात घ्यावी लागते. 'स्त्रियांची स्थिती' त्या संस्कृतीचा मानदंड मानला जातो. स्त्रियांप्रती समाजाचा दृष्टिकोन महत्त्वाचा सामाजिक आधार मानला जातो.

वैदिक काळात मातृप्रधान व पितृप्रधान अशा दोन्ही प्रकारच्या कुटुंबपद्धती प्रचलित होत्या. ऋग्वेदकाळात सामाजिक- धार्मिक कार्यात पत्नी पतीच्या बरोबरीने भाग घेत असे. वैदिक काळात 'प्रौढ विवाह' व 'नियोग पद्धती' होती.

स्त्रियांचे ‘उपनयन’ होई. त्यांना वेद अध्ययनाचा अधिकार होता. पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांना शिक्षण घेता येत असे. तात्पर्य असे की, कौटुंबिक, सामाजिक व धार्मिक क्षेत्रात व कार्यात स्त्रियांना मानाचे व बरोबरीचे स्थान वैदिक काळात होते.

ऋग्वेदात विदुषी किंवा दार्शनिक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अनेक स्त्रियांची नावे आढळतात. त्यांनी मंत्र आणि ऋचांची निर्मिती केली होती. ‘विश्ववारा’ हिला ‘ब्रहमवादीनी’ म्हटले जात होते. तिने ऋग्वेदातील स्त्रोतांची रचना केली होती. घोषा, लोपामुद्रा, शाश्वती, अपाला, इंद्राणी, सिकता, निवावरी अशा विदुषी स्त्रियांची नावे मिळतात की, त्यांनी वैदिक मंत्रांची रचना केली होती. शिक्षण घेणाऱ्या मुलींचे ‘ब्रह्मवादिनी’ व ‘सद्योव्दाहा’ असे दोन वर्ग होते. जीवनभर अध्ययन करणाऱ्यांना ‘ब्रह्मवादिनी’ तर विवाहापर्यंत अध्ययन करणाऱ्यांना ‘सद्योव्दाहा’ असे म्हणत.[4]

उत्तर वैदिक काळातील गार्गी - मैत्रयी अशा स्त्रियांना विदुषी म्हणून ओळखले जात असे. राजा जनकाने आपल्या संमेलनात गार्गी आणि इतर स्त्रियांनाही बोलावले होते. उपनिषधात मैत्रेयी आणि तिचे पती याज्ञवल्क्य यांच्यातील वार्तालापाचे वर्णन मिळते.[5]

ब्राह्मणकाळात स्त्रियांचे स्थान थोडे खालावले गेले. आता यज्ञातील जागा पुरोहितांनी घेतली. तरी उत्सवप्रसंगी स्त्रिया नृत्य - गायनात भाग घेत असतं. स्त्रिया विद्वानांशी वाद-विवाद करीत. लोमशा, घोषा, शची, अदि स्त्रियांनी तर सुक्ते रचली. वाचक्नवी, गार्गी, मैत्रेयी अशा स्त्रिया तत्वचर्चा करीत.[6]

सुत्रकाळात स्त्रियांची स्थिती अधिकच खालावली. त्यांचा उपनयन संस्कार बंद झाला. मुलींचे विवाहाचे वय 9 ते 12 वर्षे इतके घटले. त्यामुळे विधिवत शिक्षण घेणे अवघड झाले.[7]

महाकाव्य काळात स्त्रियांची स्थिती वैदिक काळापेक्षा खालावली होती. तरी समाजाने तिचे महत्त्व ओळखलेले होते. उच्च वर्गातील महिला शिक्षित होत्यारामायणात कौशल्य . आणि तारा यांना ‘मंत्रविद’ म्हटले होते. अत्रेयी वेदांताचे अध्ययन करीत होती. महाकाव्यात द्रौपदीला ‘पंडिता’ असे म्हटले जात होते. अनुशासन पर्वात स्त्रीला ‘समृद्धीची देवी’ म्हटले आहे.[8]

इ.स.पु. 500 पासून स्त्रीचे सामाजिक स्थान घसरू लागले होते. आता तिला पूर्वी इतके स्वातंत्र्य नव्हते. धार्मिक विधीत स्थान राहिले नाही. प्रौढ विवाहाची जागा बालविवाहने घेतली. नियोग पद्धती बंद होण्याच्या मार्गावर होती. वेद अध्ययन तिला नाकारले होते, उपनयन संस्कार तिला नाकारला होता. असे दिसते की, नियोग बंदी, शिक्षण बंदी, बालविवाह, पुनर्विवाह बंदी हे सर्व निर्बंध ब्राह्मण स्त्रियांसाठीच होते. कारण क्षत्रिय स्त्रियांना ही बंधने नव्हती. कुंती, माद्री अशा स्त्रियांनी नियोगाने पुत्रप्राप्ती करून घेतली. तर दमयंती व रुक्मिणी या स्वयंवर पद्धतीने विवाह करण्या इतक्या मोठ्या होत्या आणि गुप्तकाळात चंद्रगुप्ताने ध्रुवदेवीशी (भावाच्या विधवा पत्नीशी) विवाह केला होता.[9]

**प्राचीन भारतातील विद्यापीठे व त्यातील शिक्षण :**

प्राचीन भारतात प्रारंभी आचार्याकडून शिक्षण घेतले जात होते. यास्कराचार्यांनी आचार्य शब्दाची व्युत्पत्ती सांगितली. “विषयाचे आशय लक्षात आणून देणारा, बुद्धीला वळण लावणारा व आचारांचा आदर्श घालून देऊन त्याप्रमाणे आचरण करावयास लावणारा जो, त्याला ‘आचार्य’ म्हणायचे.”[10] आचार्याच्या आश्रमात राहूनच ब्रह्मचर्यावस्थेत शिष्यांनी अध्ययन करावे, असा दंडक होता.

बौद्ध धर्माची वाढ झाल्यावर भिक्षूनी चातूर्मासात एखाद्या निवांत स्थळी वास्तव्य करून अध्ययन करावे, अशी पद्धती रूढ झाली. बुद्धांच्या महापरिनिर्वाणानंतर भिक्षूनी चातुर्मासानंतर भटकंतीच केली पाहिजे, असे बंधन त्यांच्यावर राहिले नाही. त्यामुळे ते वर्षानुवर्षे एका ठिकाणी विहारातच राहून व्यासंग करू लागले. गुरुकुल आणि विहारातील अध्ययन पद्धतीतूनच पुढे वैदिक, बौद्ध व जैन विद्यापीठे अस्तित्वात आली.

इ. स. पु. 1000 पासून प्राचीन भारतात विद्यापीठांचा प्रारंभ दिसतो.[11] काशी, तक्षशिला, कांची, मदुरा, कुण्डिनपुर, अयोध्या, गुणशीला, नालंदा, विक्रमशिला, वलभी, उदन्तपुरी, जागद्दल, मिथिला, तिरुमुक्कुडल मंदिर, सालोटगी मंदिर, एण्णायिरम् मंदिर, मलकापुरम, उज्जयिनी, पुरी, पैठण व कऱ्हाड अशा अनेक विद्यापीठांचे दाखले मिळतात. अशा अनेक विद्यापीठातून धौम्य ऋषी, धर्मपाल, चंद्रपाल, गुणमती, स्थिरमती, प्रभामित्र, ज्ञानचंद्र, शीलभद्र, रत्नवज्र, रत्नकिर्ती, रत्नाकर शांती, जेतारि, ज्ञानश्रीमित्र, प्रज्ञा करमती, नरोव, दीपंकर असे महान आचार्य होऊन गेले.[12]

विद्यापीठीय शिक्षणात विद्यार्थी व शिक्षक या व्यतिरिक्त तिसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे विद्या (विषय). लोकांना उपयुक्त पडेल अशी कोणती विद्या विद्यापीठातून शिकवली जाते यावर विद्यापीठाचे महत्व अवलंबून होते. प्राचीन भारतीय विद्यापीठात प्रारंभी वेद, वेदांगे, इतिहास, पुराणे, ब्रह्मविद्या, व्याकरण, साहित्य, तत्त्वज्ञान, लष्करी, वैद्यकशास्त्र, भूगोलशास्त्र, ज्योतिषशास्त्र असे साहित्यिक, तांत्रिक व वैज्ञानिक शिक्षण दिले जात होते.[13] पुढे बौद्ध विद्यापीठातून 18 शिल्पे आणि बौद्ध धर्मशास्त्राचा प्रामुख्याने अभ्यास व्हायला लागला. तर जैन विद्यापीठातून पुरुषांना 72 विद्या, तर स्त्रियांना 64 कला शिकवण्यात येत होत्या.

**गुणशीला विद्यापीठात मुला-मुलींचे सहशिक्षण : (इ. स. पु. 600)**

गुणशीला विद्यापीठ राजगृह नगरीत होते. ही नगरी बिंबिसार याने वसविली होती असे म्हटले जाते. या विद्यापीठात सर्व प्रकारचे शिक्षण देण्याची सोय होती. इतर विषयाप्रमाणे येथे विद्यार्थी युद्ध कलेत निष्णांत होत होते. आयोध्या व इतर जैन विद्यापीठाप्रमाणे गुणशीला विद्यापीठातही मुला मुलींचे शिक्षण एकत्र होत होते, हे येथे दाखल झालेल्या दोन स्त्रियांच्या नावाच्या उल्लेखावरून कळून येईल. यापैकी एक भुवया. हिने आपला पुढील सर्व अभ्यासक्रम येथेच मुलांबरोबर पुर्ण केला. दुसरी स्त्री म्हणजे बिंबिसारची बायको राणी नंदा.[14]

ज्या अर्थी मुलींना व प्रौढ स्त्रियांना सुद्धा या विद्यापीठात दाखल करून घेण्यात येत होते. त्याअर्थी येथे स्त्री शिक्षिकाही असावयास पाहिजेत यात शंका नाही, व निरनिराळ्या विद्यापीठातून प्रसिद्ध शिक्षिका होत्या. हे विविध ग्रंथावरून कळून येते. याकाळात कितीतरी स्त्रियांनी बौद्ध किंवा जैन धर्म स्विकारून निरनिराळ्या विहारात प्रवेश मिळवला होता. या स्त्रियांत बिंबिसारच्या मित्राची मुलगी थेरीसीमा, बिंबिसार राजाच्या दोन बायका खेमा व नंदा, धम्मदिन्ता, अनुपमा, सुजाता यांचा प्रामुख्याने उल्लेख केला जातो.[15]

**स्त्रियांना शिकवण्यात येणाऱ्या 64 कला :**

'कामसूत्र', 'कादंबरी', 'शुक्रनितीसार', 'ललितविस्तार', अशा विविध साहित्यातून स्त्रियांना शिकविण्यात येणाऱ्या 64 कलांचा किंवा विषयांचा उल्लेख मिळतो.[16] त्या कला पुढीलप्रमाणे – 1. गायन 2. वाद्य 3. नृत्य 4. नाट्य 5. चित्रकला 6. विशेष कच्छेद्य (सौंदर्यप्रसाधनाची कला) 7. तण्डुल – कुसुम - बलि विकार (तांदळाचे विविध प्रकारचे अन्न बनविणे, फुलांच्या माळा – गजरे - गुच्छ बनविणे, जेवणाच्या ताटाची सजावट करणे) 8. पुष्पास्तरण (शयनोचित पुष्पांच्या माळा व पुष्पांचा बिछाना तयार करणे) 9. दशणवसनाङ्ः राग (दाता ंना रंग लावणे, वस्त्रे रंगविणे, शरीराचे काही भाग चित्रित करणे) 10. मणि - भूमिका - कर्म (घरातील जमीन चांगली दिसावी म्हणून ती खोदून निरनिराळी रत्ने, मणि बसविणे) 11. शयनरचना (शयनाची विशिष्ट प्रकारची मांडणी करणे) 12. उदक वाद्य (जलतरंग) 13. उदक घाट (विविध प्रकारच्या कारंज्यांची रचना करून उपवनाची शोभा वाढविणे) 14. माल्यग्रथनविकल्प (फुलांच्या माळा तयार करणे) 15. शेखरापीडयोजन (मस्तकावर विविध प्रकारच्या फुलांची रत्नांची, सुवर्णांची भूषणे सजवण्याची कला (16. नेपथ्यप्रयोग (रंगभूमीसाठी पोशाख व अलंकार यांची नेपथ्य रचना करणे) 17. कर्णपत्रभङ्ग (कानाजवळील गालाचे भाग रंगविणे) 18. गंधयुक्ती (सुगंधी द्रव्य तयार करणे) 19. भूषणयोजम (शरीराच्या विविध भागावर उचित अलंकाराची योजना करणे) 20. ऐन्द्रजाल (गारुड्यांची विद्या) 21. कुचमारयोग (स्त्रियांचा छातीचा भाग टवटवीत ठेवण्याची कला) 22. हस्तलाघव (हात पाहून भविष्य पाहण्याची कला) 23. विचित्रशाकपूपभक्षविकार क्रिया (स्वयंपाकाची कला) 24. पाणकरसरागासवयोजन (विविध प्रकारची आसवे तयार करण्याची कृती) 25. सूचिवायकर्म (शिवण, विणकाम) 26. सूत्रक्रीडा (दोऱ्यांच्या साहाय्याने बाहुल्यांच्या हालचालीचे खेळ करणे) 27. वीणाडमरूकवाद्य (तंतुवाद्य वाजवण्याची कला) 28. प्रहेलिका (कोडी घालणे व सोडविणे) 29. प्रतिमाला (विशिष्ट अक्षर देऊन त्याने काव्याची सुरुवात करणे) 30. दुर्वाचक योग (विविध प्राण्यांच्या व इतर आवाजांचे अनुकरण करणे) 31. पुस्तकवाचन 32. नाटकाख्यायिकादर्शन (मुकाभिनय) 33. काव्यसमस्यापूरण (काव्याचा एक चरण दिला असता, बाकीचे चरण तयार करणे) 34. पट्टिकावेत्रवान - विकल्प (धनुष्य, बाण, वेताच्या इतर वस्तू तयार करण्याची कला) 35. तर्कुकर्म (सूत कातण्याची कला) 36. तक्षण (सुतारकाम, कोरिवकाम,...) 37. वास्तुविद्या (पक्ष्यांच्या घरट्यापासून राजवाडा बांधण्यापर्यंतचे ज्ञान देणारी कला) 38. सुवर्णरौप्यरत्नपरीक्षा (सोने – रुपे - रत्नांची परीक्षा) 39. धातुवाद (अशुद्ध धातू शुद्ध करण्याची कला) 40. मणिरागज्ञान (रत्नांना रंग देण्याची कला) 41. आकारज्ञान (खाण पाहून काढण्याचे ज्ञान) 42. वृक्षायुर्वेदयोग (वृक्षांच्या संवर्धनाचे ज्ञान)

43. मेषकुककुटलावकयुद्धविधी (विविध प्राण्यांच्या झुंजी लावण्याचे ज्ञान) 44. शुकसारिकालापन (पक्ष्यांना बोलावयास, निरोप देण्यास शिकविणे.) 45. उत्सादन (अंगमर्दन) 46. केशमार्जन (केशभूषेचे विविध प्रकार करणे.) 47. अक्षरमुष्टिकाकथन (मनातील अक्षर ओळखणे, मुठीतील वस्तू ओळखणे.) 48. म्लेच्छितविकल्प (गुप्त लिपी किंवा भाषेचा प्रयोग) 49. देशभाषाविज्ञान (विविध देशातील भाषांचे ज्ञान) 50. निमित्तज्ञान (शकुन सांगणे.) 51. यंत्रमातृका (ठसे - ब्लॉक्स तयार करणे.) 52. धारणामातृका (आपल्या मनातील अर्थ गुप्तरितीने व्यक्त करणारे काव्य.) 53. संपाठ्य (गाण्यासाठी नोटेशन पद्धती.) 54. मानसीकाव्यक्रिया (आयत्या वेळी विषय देऊन काव्य तयार करणे.) 55. अभिदानकोश (एकाच अर्थाचे भिन्न शब्द एकत्रित बांधण्याची कला.) 56. छन्दोज्ञान (छंद : शास्त्र किंवा स्वभाव परीक्षा ज्ञान) 57. क्रियाविकल्प : 58. छलितयोग (हात चलाखीचे खेळ.) 59. वस्त्रगोपन (वस्त्राच्या साध्या धाग्याला रेशमाची चमक देणे.) 60. अक्षक्रिडा (फासे घेऊन खेळणे.) 61. बालक्रिडानक (मुलांकरिता खेळणी तयार करणे.) 62. वैनायिकिज्ञान : 63. वैजायिकीज्ञान (धनुर्वेदाचे ज्ञान.) 64. व्यायामिकीज्ञान (मृगयादी).

गुणशीला विद्यापीठात स्त्रियांना वरील सर्व प्रकारचे शिक्षण देण्याची सोय, त्याचप्रमाणे पुरुषांनाही योग्य असे शिक्षण देण्याचीही सोय करण्यात आली होती. यावरून प्राचीन काळातील स्त्रियांचे शिक्षण पुरुषांच्या शिक्षणाइतकेच प्रभावी होते, असे दिसते.

**प्राचीन काळातील विविध क्षेत्रातील स्त्रियांचे योगदान :**

भारतीय संस्कृती शिखरावर असताना स्त्री व पुरुषांना चारित्र्यवान व कार्यक्षम बनवता यावे म्हणून, शिक्षणाचा प्रश्न हाती घेणाऱ्या आचार्यांनी हा प्रश्न चांगल्या रीतीने सोडवला होता. त्याचे परिणाम विविध क्षेत्रात पाहावयास मिळतात. प्राचीन भारतात अनेक विद्यापीठातून अनेक विद्वान अध्यापक होऊन गेले. ह्या विद्वान आचार्यांप्रमाणे विदुषी स्त्रिया, भिक्षुणी किंवा परिव्राजिका ही शिक्षणाचे कार्य करत असत. त्यांनाही समाजात मान मिळत असे. मोठ-मोठ्या पंडिताबरोबर त्या वादविवाद करीत व कित्येक वेळा ऋषीतुल्य आचार्यांनासुद्धा पराभूत करत असत. गार्गीने याज्ञवल्क्य यांना अशाचप्रकारे वाद- विवादात पराभूत केल्याचा उल्लेख 'बृहदारण्यकोपनिषंदात' आहे. तर मंडन मिश्राची विदुषी पत्नी सरस्वती हिला तर दोन प्रसिद्ध पंडितांच्या वाद-विवादात अध्यक्ष म्हणून नेमले होते. हे महान पंडित म्हणजे एक शंकराचार्य आणि दुसरे सरस्वतीचा खुद्द पती मंडन मिश्र होय. कालिदासाच्या 'मालविकाग्निमित्र' या नाटकात एका परिव्राजिकेकडे दोन प्राध्यापकांत श्रेष्ठ कोण हे ठरविण्याचे काम राजाने सोपविले होते.[17] इतक्या उच्च श्रेणीच्या विदुषी स्त्रिया आपल्या देशात होऊन गेल्या, यावरून 'चूल नि मूल' हेच स्त्रिचे अंतिम क्षेत्र होते काय ? असा प्रश्न निर्माण होतो.

मौर्यकालीन समाजात अनेक स्त्रिया बौद्धिक जीवन व्यतीत करीत होत्या. तर अनेक स्त्रियांना विवाहानंतर अध्ययन सोडून द्यावे लागत होते. महिला शिक्षकांची संख्या समाजात अधिक होती. जैन - बौद्ध धर्म ग्रंथात अशा स्त्रियांचे वर्णन पुन्हा-पुन्हा येते. अनेक स्त्रिया नृत्य, संगीत आणि इतर कलेत निपुण होत्या. काही स्त्रियांनी सैनिकी व्यवसाय स्विकारला असून मेगस्थेनीजच्या मते, "काही स्त्रिया रथावर, काही हत्तीवर, तर काही घोड्यावर शस्त्र सज्ज होऊन आरुढ होत असत."[18] मौर्यकालीन समाजात मुलींना घरीही नृत्य, संगीत, चित्रकलेचे शिक्षण दिले जात होते.[19]

समाजातील निराधार स्त्रियांविषयी कौटिल्याने मांडलेले विचार या अनुषंगाने लक्षात घ्यायला हवेत. 'वस्त्रोद्योग' हा भारतातील पुर्वापार महत्त्वाचा व्यवसाय होता. 'सूत काढण्याचे कारखाने काढावेत' याविषयी सविस्तर सांगताना, कौटिल्य म्हणतात, "विधवा स्त्रिया, अविवाहित स्त्रिया, वेश्यांच्या आया, देवदासी, म्हाताऱ्या दासी यांच्याकडून कापूस, लोकर, अंबाडी, ताग पिंजून घ्यावा. सूत जसे जाड बारीक असेल त्याप्रमाणे मजुरी द्यावी. तयार झालेल्या धाग्यापासून घालण्याचे, पांघरण्याचे, अंथरण्याचे, सुती, रेशमी, लोकरी कापड कारागिरांकडून विणून घ्यावे. ज्या स्त्रिचे पती परागंदा झालेत, जी अपंग आहे, त्यांना घरी नेऊन काम द्यावे व ते करून घेऊन मजूरी द्यावी. कारखान्यात सूत घेऊन जाणाऱ्या स्त्रियांना सकाळी वेतन द्यावे."[20] कामगारांच्या विशेषत: निराधार स्त्रीवर्गाच्या प्रश्नांची - समस्यांची जाणीव कौटिल्याने दाखविली होती. निराधार आणि दुबळ्या स्त्रियांचा विचार केला जात होता. तर इतर स्त्रियांचा विचार होणे स्वाभाविक होतेस्त्रीधनाची .[21] कौटिल्याने केलेली चर्चा, स्त्रियांचे अधिकार आणि संरक्षणासाठी निश्चितच महत्त्वाची ठरते.

गुप्तकाळात स्त्रियांना समाजात चांगला मान असावा. वंशावळीत पित्याच्या नावाबरोबर मातेचे नाव आढळते. प्रभावती गुप्तासारखी राणी पतिनिधनानंतर व मुले लहान असेपर्यंत राज्यकारभारही पाहत होती. विजय भट्टिका हिने

राज्यकारभार पाहिला होता. यावरून स्त्रियांना शिक्षण मिळत असे दिसते. स्त्रियांना वेदाभ्यासाची बंदी घातली असली तरी लिहिणे, वाचणे, नृत्य, संगीत अशा गोष्टी स्त्रियांना शिकवल्या जात असत. वात्स्यायनाच्या 'कामसूत्रात' किंवा 'शाकुंतल', 'मालविकाग्निमित्र' या नाटकात असे आढळते की, स्त्रियांना लिहिता - वाचता येत असे. गुप्तकालीन अमरकोशात तर शिक्षकांसाठी 'उपाध्याय' किंवा 'उपाध्यायी' असे व वैदिक मंत्रासंबंधी मार्गदर्शन करण्याऱ्या स्त्रियांसाठी 'आचार्या' असे पर्यायवाचक शब्द आलेले आहेत.[22]

चालुक्य काळात स्त्रियांना बरेच मानाचे स्थान होते, असे दिसते. त्यांना स्वातंत्र्यही होते व अध्ययनासही मुभा होती. एवढेच नव्हे, तर योग्य व कर्तबगार स्त्रिया राजकारण व युद्धातही सहभाग घेत. स्त्रियांनी अनेक वेळा राजप्रतिनिधींची कामे केलेली दिसतात. सहाव्या विक्रमादित्याच्या लक्ष्मादेवी नावाच्या राणीने कल्याणीहून काही काळ राज्यकारभार पाहिला होता, तर अक्कादेवी नावाच्या शूर स्त्रीने सैन्याचे नेतृत्व करून शत्रूला वेढा घातला होता. नृत्य, संगीत अशा कलांमध्ये तर राजघराण्यातल्या स्त्रिया प्रविण असतच. केतलादेवी नावाची विक्रमादित्याची दुसरी एक राणी होती, तिची 'विद्यावंत' व 'संगीतज्ञ' म्हणून ख्याती होती. या काळातील स्त्री स्वातंत्र्याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणून सावलादेवी या कलचुरी सोईदेवाच्या राणीचा उल्लेख करावा लागेल. गाणे, संगीत व नृत्य यात ती निष्णांत होतीच, पण सार्वजनिक कार्यक्रमातही ती भाग घेऊन आपले नैपुण्य दाखवत असे. गणिका व देवदासी तर नृत्य, संगीतात नावाजण्या सारख्याच होत्या.[23]

अशाप्रकारे विहारातून व इतर ठिकाणाहून शिक्षण पूर्ण करून, अगदी नवव्या शतकापर्यंतही स्त्रियांनी उत्तम - उत्तम पुरुष लेखकांनासुद्धा मागे टाकल्याची उदाहरणे आहेत. 9 व्या शतकातील राजशेखर कवीने आपल्या काव्यमीमांसा ग्रंथात काही विदुषी स्त्रियांची नावे दिली आहेत. त्यात अवंन्तीसुंदरी, शीलभट्टारिका, विकटनितम्बा, विजयाक्का, प्रभुदेवी, विजिक्का या हिंदुस्तानातील निरनिराळ्या भागातील विदुषींनी प्रसिद्ध लेखक वामन, बाण, दंडिन‍ यांच्या लेखनावरही टिका केल्याचे लिहिले आहे. मिहिर भोजाच्या शिलालेखात तर युद्धकलेत प्राविण्य मिळविलेल्या कितीतरी स्त्रियांची नावे दिली आहेत. चालुक्य घराण्यातील सहाव्या विक्रमादित्याने तर आपल्या राण्यांना निरनिराळ्या प्रांतावर 'राजप्रतिनिधी' नेमल्याची उदाहरणे आहेत.[24]

मध्य आशियातील खिवा प्रांतातून भारतात आलेला अल-बेरुनी (इ. स. 973 – 1048) हा एक फारसी विद्वान, लेखक, वैज्ञानिक, धर्मज्ञ व विचारवंत होता. त्याने लिहिली आहे की, "सर्व स्त्रिया शिक्षित होत्या. त्या सार्वजनिक कार्यात प्रामुख्याने भाग घेत असत. मुलींना संस्कृत भाषेचे वाचन, लेखन व समज होती. मुली खेळ, नृत्य आणि चित्रकला शिकत असत." काही स्त्रिया इतक्या विदुषी होत्या की, त्या वादविवादात कोणालाही हरवू शकत होत्या. ब्राह्मण विद्वान शंकराचार्यांना मंडत मिश्रांच्या पत्नीने पराभूत केले. प्रसिद्ध संस्कृत कवी राजशेखरची पत्नी अवंती सुंदरी आपल्या विद्वत्तेसाठी प्रसिद्ध होती. तिने प्राकृत कवितेत आलेल्या देशी शब्दांचा एक कोश बनविला होता.[25] इंदुलेखा, मरुला, शीला, सुभद्रा, लक्ष्मी, विज्जीका, मोरिका, पद्मश्री आणि मदालसा ह्या रजपूत काळातील संस्कृतच्या प्रसिद्ध कवयित्री होत्या. सोळंकी राजा विक्रमादित्याची बहीण अक्कादेवी एक महान योद्धा, प्रशासिका होती. ती चार प्रांताची गव्हर्नर होती. तिने बेळगाव जिल्ह्यात दुर्गच्या विरुद्ध आक्रमण करून वेढा घातला. समाजातील उच्च वर्गातील स्त्रिया संगीत - नृत्यात निपुण होत्या. राजा आणि सेनापतींच्या मुली अश्वारोहणाचे प्रशिक्षण घेत असत.[26] परंतु मुस्लिम सत्ता स्थापन झाल्यापासून स्त्री शिक्षण पूर्णपणे समाप्त झाले. आता 9 - 10 वर्ष विवाहसाठी आदर्श वय मानल्यामुळे त्यापुर्वी मुलींना शिक्षण असंभव झाले. समाजात पडदा पद्धत रूढ झाल्यामुळे स्त्रियांचे सार्वजनिक जीवन समाप्त झाले.

**निष्कर्ष :**

इतर देशांच्या मानाने विचार करता प्राचीन काळी भारतीय समाजात स्त्रियांना मानाचे स्थान होते. कालानुसार त्यांच्या अधिकारात काही फेरफार झाले होते, हे खरे असले तरी त्यांना सर्व काळी, सर्व क्षेत्रात कमी लेखले गेले होते, असे दिसत नाही. त्यांनी राजपुत्र लहान म्हणून किंवा स्वतंत्रपणे राज्यकारभार पाहिला होता. त्यांनी लढाया करून पुरूषी क्षेत्रात आपला ठसा उमटविला होता. दानधर्म, यज्ञयाग उदार अंत:करणाने केले होते.

'चूल आणि मूल' एवढेच स्त्रीचे कार्यक्षेत्र नव्हते. स्त्रियांना ज्या 64 कला शिकविण्यात येत होत्या. त्यात 'स्त्री' ही उत्तम व कार्यक्षम कशी होईल, इकडे जास्त लक्ष होते. 64 विषयामुळे स्त्री शिक्षणाचे व्यापक स्वरूप तर लक्षात येतेच, शिवाय गायन, वादन, संगीत, नृत्य, चित्रकला, पाककला, खेळ, शिक्षण, सौंदर्यप्रसाधने, साफ-सफाई, विणकाम –

शिवणकाम, मनोरंजन, व्यायाम, सजावट, शयनरचना, अलंकार, धातुज्ञान, विविध वस्तू व वास्तूकला, भाषाज्ञान, पांडित्य, धनुर्विद्या, राजनीती, प्रशासन, युद्ध अशी अनेक क्षेत्रे स्त्रियांसाठी खुली होती. अशा अनेक क्षेत्रात स्त्रियांनी आपले भरीव योगदान दिलेले होते.

**संदर्भ :**


1. Altekar A. S., Education in Ancient India, 1944, P. 1, 2.
2. देगलूरकर गो. ब., 'प्राचीन भारत: इतिहास आणि संस्कृती', अपरांत प्रकाशन, पुणे, 2015, पृ. 389.
3. श्रीवास्तव के. सी., 'प्राचीन भारत का इतिहास तथा संस्कृती', युनाइटेड बुक डिपो, इलाहाबाद, 2000, पृ. 765-769.
4. कित्ता, पृ. 194.
5. महाजन व्ही. डी., 'प्राचीन भारत का इतिहास', एस. चंन्द एण्ड कंपनी, नई दिल्ली, पुर्नमुद्रित 2003, पृ. 112.
6. उपरोक्त, देगलूरकर गो. बं., पृ. 388.
7. उपरोक्त, श्रीवास्तव के. सी., पृ. 195.
8. कित्ता, पृ. 92,93.
9. उपरोक्त, देगलूरकर गो. बं., पृ. 388.
10. कित्ता, पृ. 389.
11. अ) तवकर ना. गो., 'प्राचीन भारतीय विद्यापीठे', इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मुंबई, 1950. ब) Altekar A. S., उपरोक्त, पृ. 112, 105, 123, 126, 130, 135, 285 – 288.
12. कित्ता, पृ. 43, 68.
13. Majumdar R. C., Ancient India, M. B. Publishers, Delhi, Reprint, 1994, P.- 452.
14. उपरोक्त, तवकर ना. गो., पृ. 110.
15. कित्ता, पृ. 111.
16. उपरोक्त, श्रीवास्तव के. सी., पृ. 771.
17. कित्ता, पृ. 09
18. उपरोक्त, महाजन व्ही. डी., पृ. 328 - 329.
19. कित्ता, पृ. 339.
20. कंगले र. पं., (भाषांतर) 'कौटिलीय अर्थशास्त्र', म. रा. सा. स. मंडळ पुनरमुद्रण मुंबई, 2011, पृ. 162 – 163.
21. कित्ता, पृ. 217 - 218.
22. देगलूरकर गो. ब., उपरोक्त, पृ. 221.
23. कित्ता, पृ. 301 - 302.
24. तवकर ना. गो., उपरोक्त, पृ. 112.
25. महाजन व्ही. डी., उपरोक्त, पृ. 652
26. कित्ता, पृ. 621.

# मौजे आडवली भटवाडी येथील श्री रवळनाथ मंदिरातील पेशवेकालीन कोरीव लेख: एक अभ्यास

**नचिकेत पराडकर,**
सहाय्यक प्राध्यापक, पर्यटन प्रवास व्यवस्थापन विभाग,
रामनारायण रुईया स्वायत्त महाविद्यालय, माटुंगा, मुंबई.

**सारांश**

कोरीव लेख हे इतिहासाचे महत्त्वाचे साधन आहेत. स्थानिक ते राष्ट्रीय इतिहास अभ्यासताना कोरीव लेख ऐतिहासिक घटनांचे विविध पैलू उलगडण्यास सहाय्य करतात. सदर शोधनिबंधात मौजे आडवली भटवाडी (तालुका मालवण, जिल्हा सिंधुदुर्ग) येथील श्री रवळनाथ मंदिरातील पेशवेकालीन कोरीव लेखाचा अभ्यास केला आहे. प्रचलित लोककथा आणि कोरीव लेखातील माहिती यांच्या अभ्यासातून स्थानिक इतिहासाविषयी नवी माहिती उलगडण्याचा प्रयत्न संशोधनाअंती केला आहे.

***प्रमुख शोधशब्द*** *- आडवली भटवाडी, श्री रवळनाथ मंदिर, कोरीव लेख, पेशवेकाळ, स्थानिक इतिहास.*

**प्रस्तावना**

इतिहासलेखनात कोरीव लेखांच्या अभ्यासाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. कोरीव लेख हे कालगणनेच्या दृष्टीने महत्त्वाचे साधन मानले जातात; कारण त्यात कोरलेला मजकूर, तो प्रत्यक्ष अंमलात आणलेल्या काळाच्या समकालीन असतो.[1] शासनव्यवस्थेव्यतिरिक्त खाजगी व्यक्ती किंवा संस्थांकडून महत्त्वाच्या घटनेची स्मृती जपण्यासाठी कोरीव लेख कोरले जात असत. सदर शोधनिबंधात सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण तालुक्याचा भाग असलेल्या मौजे आडवली भटवाडीच्या श्री रवळनाथ मंदिरातील पेशवेकालीन कोरीव लेखाचा उपलब्ध साधनांच्या मदतीने अभ्यास केला आहे.

साधारणत: मूर्तीच्या प्रतिष्ठापनेच्या जागेवर म्हणजे तिच्या आसनपट्टीवर कोरीव लेख लिहिलेले असतात.[2] सदर कोरीव लेख श्री रवळनाथाच्या मूर्तीच्या योनीपीठसदृश आसनपट्टीवर स्थित आहे. हा कोरीव लेख ग्रामस्थांना ज्ञात असल्यामुळे तसेच मंदिराच्या गाभा-यात असल्याने सुस्थितीत आहे.



**चित्र 1 - श्री रवळनाथ मंदिर, मौजे आडवली भटवाडी (ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग)**

**कोरीव लेखाचे वाचन**

श्री रवळनाथाच्या मूर्तीच्या आसनपट्टीवरील कोरीव लेख दोन ओळींचा आहे. त्याचे छायाचित्र पुढीलप्रमाणेः




**चित्र 2 – आसनपट्टीवरील कोरीव लेखाचे स्थान आणि त्याचे विस्तृत छायाचित्र**

**वाचन**

ओळ 1 जिर्णोध्धार स्थापना शके 1716 आनंद ना

ओळ 2 म संवत्सरे माघ वद्ये 5 पंचमि रविवार ||

**भाषा आणि लिपी**

सदर कोरीव लेख हा प्रामुख्याने कालनिर्देशक असल्याने संस्कृत संज्ञांचा वापर केलेला आहे. त्यामुळे प्रथमदर्शनी संभ्रम निर्माण होतो. परंतु वद्य पक्षाचा उल्लेख वद्ये असा असल्यामुळे कोरीव लेख मराठी भाषेत आहे, हे सिद्ध होते. हा लेख देवनागरी लिपीत कोरलेला आहे.

**कालनिर्देश**

कोरीव लेखात नमूद केल्याप्रमाणे जीर्णोद्धाराची तिथी शके 1716 आनंद नाम संवत्सर माघ वद्य पंचमी रविवार आहे. मोडक जंत्रीनुसार ग्रेगोरियन कालगणनेप्रमाणे दि. 08 फेब्रुवारी 1795 ही तारीख येते.

**विषय**

इ. स. 1795 मध्ये मौजे आडवली भटवाडी येथील श्री रवळनाथ मंदिराच्या झालेल्या जीर्णोद्धाराची स्मृती जपण्यासाठी सदर कोरीव लेख श्री रवळनाथाच्या मूर्तीच्या आसनपट्टीवर कोरला आहे. शके 1716 आनंद नाम संवत्सर माघ वद्य पंचमी रविवार म्हणजे ग्रेगोरियन कालगणनेनुसार दिनांक 08 फेब्रुवारी 1795 रोजी श्री रवळनाथ, श्री पावणाई आणि श्री जानाई यांच्या मूर्त्यांचा पुनर्स्थापना विधी करून या मंदिराचा जीर्णोद्धार पूर्ण झाला.

**ऐतिहासिक महत्त्व**

इ. स. 1795 म्हणजे पेशवेकाळाच्या उत्तरार्धात मंदिराचा जीर्णोद्धार झालेला आहे. कोरीव लेखातील कालनिर्देशावरून सदर जीर्णोद्धार विधीच्या मुहूर्ताबद्दल अंदाज व्यक्त करता येतो. त्या दिवशी दुपारी धृति योगावर जीर्णोद्धार विधी पूर्ण झाला असावा.[3] हिंदू पंचांगाप्रमाणे धृति योग हा जीर्णोद्धार स्थापना विधींसाठी शुभ योग मानला जातो. सदर कोरीव लेखात कोणत्याही व्यक्तीचा किंवा घराण्याचा उल्लेख नसल्याने मंदिराचा जीर्णोद्धार ग्रामस्थांच्या सामूहिक पुढाकाराने झाला असण्याची शक्यता आहे.

स्थानिक लोककथेनुसार शिवपूर्वकाळात यवनांच्या उपद्रवामुळे श्री रवळनाथाची मूर्ती शेजारच्या मौजे मालडी येथून मौजे आडवली भटवाडीत स्थलांतरित करण्यात आली.[4] परंतु नेमके वर्ष कागदपत्रांच्या अभ्यासाअभावी ज्ञात नाही. सदर मंदिराचा इ. स. 1985 मध्ये दुस-यांदा जीर्णोद्धार करण्यात आला. यावरून चि-यांचा पाया, सागवानी अथवा चि-यांचे

खांब, लाकडी वासे व कौलपट्ट्या आणि नळीची कौले यांचा वापर करून स्थानिक पद्धतीने बांधलेल्या कोकणातील मंदिरांचे आयुष्यमान हे ढोबळमानाने 200 वर्षे गृहित धरू शकतो. या माहितीनुसार श्री रवळनाथाच्या मूर्तीचे स्थलांतर आणि जुने मंदिर बांधल्याचा काळ इ. स. 1595च्या आसपासचा असण्याचा अंदाज वर्तविला जाऊ शकतो.

**तात्पर्य**

ग्रामदेवतेच्या मंदिराचा जीर्णोद्धार ही त्या गावाच्या इतिहासातील महत्त्वाची घटना मानली जाते. इ. स. 1795 मधील श्री रवळनाथ मंदिराचा जीर्णोद्धार ही आडवली गावाच्या इतिहासातील महत्त्वाची घटना होती हे सदर कोरीव लेख दर्शवितो. या संशोधनातून मूळ मंदिर ते सद्य मंदिर यांतील कालरेखा ढोबळमानाने ठरवता येते. यामुळे आडवली आणि मालडी गावांच्या स्थानिक इतिहासात भर पडेल. स्थानिक ग्रामस्थांकडील जुनी कागदपत्रे आणि इतर ऐतिहासिक साधनांच्या मदतीने हा अभ्यास पुढे नेण्याची आवश्यकता आहे.

**संदर्भ**

1 Jaan Puhvel, “Epigraphy - The use of inscription,” *Encyclopedia Britannica*, July 28, 2024, https://www.britannica.com/topic/epigraphy. Accessed February 12, 2025.

2 शोभना गोखले, *पुराभिलेखविद्या*, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, तृतीय आवृत्ती, 2019, पृ. 2.

3 “February 08, 1795 Marathi Panchang for Malvan, Maharashtra, India.” *Drikpanchang*, www.drikpanchang.com/marathi/panchang/marathi-month-panchang.html?geoname-id=1264007&date=08/02/1795. Accessed February 10, 2025.

4 बाळ पराडकर, *निसर्गरम्य मालडी*, शुभा प्रकाशन, मुंबई, 1990, पृ. 34.

# रझाकार संघटना व मराठवाडा मुक्तीसंग्राम

**मनीषा रंगनाथ पांढरे**
संशोधक विद्यार्थिनी

**डॉ. प्रा. केशव लहाने**
संशोधन मार्गदर्शक- इतिहास विभागप्रमुख
राजर्षी शाहू महाविद्यालय, पाथ्री

मोगल साम्राज्याच्या विघटनाच्या काळात जन्माला आलेले हैदराबादचे संस्थान भारताच्या मध्यभागी वसलेले होते. भारतातील मोठ्या संस्थानांपैकी हैदराबाद एक होते. हैदराबादच्या प्रजेपैकी सुमारे 85 टक्के लोक हिंदू व जेमतेम पंधरा टक्के मुसलमान असूनही शासक मुसलमान असल्यामुळे हिंदू प्रजेवर सतत अन्याय करीत असे. नागरिकांना मूलभूत अधिकार तर नव्हतेच पण त्याचबरोबर शासकीय सेवेत अतिशय पक्षपात होता. मुलकी शासनात सुमारे 75 टक्के तर लष्कर व पोलीस दलात 90टक्के भरती मुसलमानांची असे. बहुसंख्य प्रजा हिंदू असूनही उर्दू भाषा त्यांच्यावर लादली गेली होती. 1911 साली *मीर उस्मान अली खान निजाम* सत्तेवर आला. तरी हिंदु प्रजेवरील अत्याचारात खंड पडला नाही. हैदराबाद मधील हिंदू प्रजा कानडी, तेलगू व मराठी अशा तीन गटात विभागलेली असल्यामुळे निजामाच्या शोषक व जुलमी शासनाला संघटितरीत्या विरोध करणे त्यांना शक्य होत नव्हते. निजामाचे रोजचे उत्पन्न चार लक्ष रुपये असूनही प्रजाकल्याणासाठी म्हणावा तसा तो उपयोग करत नसे. 1920 नंतर हैदराबाद मधील हिंदू प्रजेच्या प्रबोधनाचे कार्य आर्यसमाजाने हाती घेतले. 1936 मध्ये मराठवाड्यात स्थापन झालेल्या महाराष्ट्र परिषदेने नागरिकांच्या मूलभूत अधिकारांची मागणी केली. राजकीय अधिकार मिळवण्यासाठी संघटीत लढा देण्याच्या हेतूने 1938 साली *हैदराबाद स्टेट कॉंग्रेस* नावाची संघटना स्थापन झाली. गोविंदराव नानल या संघटनेच्या अध्यक्षपदी होते. स्वामी रामानंद तीर्थ यांचे प्रभावी नेतृत्व या सुमारास पुढे आले. या संघटनेच्या स्थापनेमागे राष्ट्रीय कॉंग्रेसची प्रेरणा होती. हैदराबाद स्टेट कॉंग्रेसचे नेते राष्ट्रीय कॉंग्रेसच्या नेत्यांशी सतत संपर्क साधून होते. भारतीय सत्तेच्या हस्तांतरणाची प्रक्रिया सुरू होताच हैदराबादनेही भारतात सामील व्हावे ही मागणी हैदराबाद स्टेट कॉंग्रेस करू लागली. परंतु लोकमताचा हा कौल निजामाला मंजूर नव्हता. म्हणून निजामाने भारताचे स्वातंत्र्य दृष्टीपथात येत असताना हैदराबाद संस्थान भारतात विलीन न करता स्वतंत्र ठेवण्याचा प्रयत्न केला आणि त्यासाठी रजाकार संघटनेला बळ दिले.

रझाकार संघटनेची स्थापना बहादूर यारजंग यांच्या काळात इसवी सन 1940 मध्ये झाल्याचे दिसून येते. परंतु रझाकार संघटनेचा खरा विकास कासिम रजवी 'इत्तेहादूल मुसलमीन' संघटनेचा अध्यक्ष झाल्यानंतर झाला. हैदराबाद संस्थानांमध्ये दोन लाखांपर्यंत रझाकार सेना सरकारच्या सहकार्याने वाढविण्यात आली. 1940 ते 1945 या कालावधीत रझाकार संघटनेने संपूर्ण हैदराबाद संस्थानात खेड्यापाड्यापर्यंत आपली पाळेमुळे रुजवली. ते हिंदू विरुद्ध अत्यंत जहाल व प्रक्षोभक भाषणे करून स्टेट कॉंग्रेसच्या पुढाऱ्यांविरुद्ध विषारी प्रचार करीत असत. या संघटनेचा मुख्य उद्देश हा हैदराबाद राज्यात स्वतंत्र इस्लामी राजवट उभी करणे हा होता. 'इत्तेहादूल मुसलमीन' या संघटनेचे एक अपत्य म्हणून रझाकार संघटनेकडे पाहिले जाते.

इ. स. 1945 ते 17 सप्टेंबर 1948 हा कालखंड 'रझाकार जमाना' या नावाने ओळखल्या जातो. कासिम रजवीने संघटनेला अतिरेकी स्वरूप देऊन संस्थानभर कमालीची दहशत निर्माण केली. कासिम रजवीने पुढाकार घेऊन नांदेड जिल्ह्यात अर्धापूर या गावाजवळ स्टेट कॉंग्रेसचे पूर्णवेळ कार्यकर्ते गोविंदराव पानसरे यांचा दिवसाढवळ्या 21 ऑक्टोबर 1946 रोजी खून केला. हैदराबाद संस्थानातील हे पहिले महत्त्वपूर्ण बलिदान मानले जाते. पानसरेंचे हे बलिदान वाया न जाता त्यांच्याकडून प्रेरणा घेऊन हजारो लोक मुक्तीसंग्रामामध्ये सहभागी झाले. मराठवाड्यातील प्रत्येक लहानमोठ्या गावात रजाकारांनी अत्याचाराचे सत्र सुरू केले होते. कॉंग्रेस कार्यकर्त्यांच्या कत्तली केल्या. अनेक गावे जाळून बेचिराख केली. खून करणे, लुटमार करणे, दरोडे घालणे, बलात्कार हे त्यांचे नित्याचे काम होते. निजामाचे पोलीस व अधिकारी यांची त्यांना साथ होती.

निजामाला खऱ्या अर्थाने भारतात विलीन व्हायचे नव्हते, ते काम त्याने रजाकारांच्या संघटनेमार्फत करून घेतले. रझाकार संघटना ही निजामाच्या स्वतंत्र हैदराबाद राज्याची पुरस्करती होती. या संघटनेला भारताशी जैसे थे करार करणे

सुद्धा कमीपणाचे वाटत होते. रझाकार संघटनेने 1947 च्या नोव्हेंबरमध्ये असे ठरवले की, जर हैदराबाद संस्थान संघराज्यात सामील झाले तर प्रत्यक्ष कृतीचा कार्यक्रम हाती घ्यावा. प्रत्यक्षात संस्थान संघराज्यात सामील झाले नाही. परंतु रजाकारांनी मात्र प्रत्यक्ष कृतीला प्रारंभ केला. त्यात स्टेट काँग्रेसच्या कार्यकर्त्यांचा छळ करणे, घरे जाळणे, हिंदूंच्या बँका लुटणे, गावेचेगावे बेचिराख करणे, आदी माध्यमातून हिंदू प्रजेला त्रस्त करून टाकले. निजाम सरकार रजाकारापासून प्रजेला संरक्षण देण्याची मुळीच शक्यता नव्हती.

आशातच शोएबउल्लाखान ह्या हैदराबादच्या पुरोगामी मुस्लिम तरुण पत्रकाराचा 21 ऑगस्ट 1948 रोजी हात छाटून खून करण्यात आला. कारण त्याने धर्मांध रजाकारी अत्याचाराची आपल्या 'इमरोज' या दैनिकात प्रसिद्धी दिली होती. रजाकारांचे आत्याचार इतके पराकोटीला गेले होते की, निजामाचा मुलगा राजपुत्र आजमशहा याने लष्कराच्या प्रमुख पदाचा राजीनामा दिला होता.

शोएब उल्लाखानाच्या खूनाचे वृत्त कळल्यानंतर हैदराबादचा प्रश्न हा केवळ हिंदू मुस्लिमांमधील तंटा नसून उन्मत राज्यकर्ते आणि अन्यायाविरुद्ध लढणारे हिंदू तसेच मुसलमान यांच्यातला संघर्ष असल्याची भारताचे पंतप्रधान नेहरूंचीही खात्री पटली. रजाकारांना वठणीवर आणण्यासाठी निजामांशी वाटाघाटीचे सर्व उपाय निरोपयोगी ठरल्यामुळे भारत सरकारने बळाचा वापर करण्याचा निर्णय 9 सप्टेंबर 1948 रोजी घेतला. भारतीय सेनेच्या दक्षिण विभागाचे प्रमुख लेफ्टनंट जनरल राजेंद्रसिंहजी यांनी 'ऑपरेशन पोलो' हे सांकेतिक नाव असलेली योजना अमलात आणण्याची जबाबदारी मेजर जयंतनाथ चौधरी यांच्यावर सोपवली.

13 सप्टेंबर 1948 रोजी भारतीय फौजा हैदराबाद संस्थानामध्ये पाच वेगवेगळ्या ठिकाणाहून घुसल्या. मुख्य चढाईचा मार्ग हा सोलापूर, उस्मानाबाद, लातूर, हैदराबाद असा होता. चाळीसगाव मार्गे प्रवेश केलेल्या फौजेने कन्नड व दौलताबाद ही ठिकाणे काबीज केली. बुलढाण्याहून आलेल्या सैन्याने जालना काबीज केले. वाशिममार्गे आलेल्या सैन्याने हिंगोली ताब्यात घेतले. 15 सप्टेंबरला औरंगाबाद व 16 सप्टेंबरला जाहीराबादवर ताबा मिळवला. शेवटी 17 सप्टेंबर 1948 रोजी हैदराबाद भोवती असलेल्या भारतीय फौजेने निजामाचे सेनापती जनरल अल इद्रीस यांना शरणागती पत्करावी म्हणून संदेश पाठवला. त्याप्रमाणे सायंकाळी निजामाने आपली शरणागती घोषित केली. 18 सप्टेंबर 1948 रोजी भारतीय सैन्याने हैदराबाद शहरात प्रवेश केला. तेथे मेजर जनरल चौधरींनी अधिकृतपणे राज्यकारभाराची सूत्रे हातात घेतली. 19 सप्टेंबर 1948 रोजी कासिम रजवीला अटक करण्यात येऊन त्याला सात वर्षाची सश्रम कारावासाची शिक्षा ठेवण्यात आली. शिक्षा संपल्यानंतर तो पाकिस्तानात गेला व तेथेच त्याचा 10 जानेवारी 1970 रोजी मृत्यू झाला. निजामाला पदच्युत न करता त्याला घटनात्मक प्रमुख बनवण्यात आले.

अशा प्रकारे पोलीस कारवाई करून हैदराबाद संस्थानाला भारतीय संघराज्यात विलीन करण्यात आले. यामुळे हैदराबाद संस्थानांमधील जनतेला निजामाच्या सरंजामशाही, राजकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक उत्पीडनातून मुक्ती तर मिळालीच त्याचबरोबर भारताचे राजकीय एकीकरण सुद्धा पूर्ण झाले.

**संदर्भ सूची** :


1. रोडे सोमनाथ, मराठवाड्याचा इतिहास, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, जून 2011.
2. काटे पी. व्ही. मराठवाड्याचा इतिहास, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, जून 1999.
3. चंद्र बिपिन, भारत का स्वतंत्रता संघर्ष, हिंदी माध्यम कार्यान्वय निदेशालय दिल्ली विश्वविद्यालय, दिल्ली, 2006.
4. ग्रोवर बी एल, बेलेकर एन के, आधुनिक भारताचा इतिहास, दिल्ली, 2014.
5. फडके य.दि., विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड 6, मौज प्रकाशन, मुंबई, 2007.

# किकलीचे ऐतिहासिक भैरवनाथ मंदिर : एक आढावा

**सुरक्षा संजय पाटील**
कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
नारायणगाव ता. जुन्नर, जि. पुणे

**प्रस्तावना :-**

मानवी संस्कृती आणि तिच्या विकासाच्या खुणा ज्या देशात किंवा प्रांतात असतात तो देश समृद्ध समजला जातो. भारत हा देश त्या अर्थाने केवळ भौगोलिक नव्हे तर सांस्कृतिक आणि सामाजिक दृष्ट्या अत्यंत समृद्ध आहे. येथील प्रत्येक वाडे, वस्ती, गाव, शहर स्वतःची ओळख अभिमानाने मिरवतात. त्याचा मागवा घेणे आणि त्यात आपले अस्तित्व शोधून ते जपणे हे इतिहास अभ्यासकाचे प्रमुख कार्य आहे.

महाराष्ट्राचा इतिहास हा बराच मोठा आहे. या इतिहासाच्या खुणा आपल्याला पावलोपावली दिसतच असतात. ऐतिहासिक शिल्पे, मंदिरे, लेण्या, वास्तू, दस्तऐवज हे महाराष्ट्रातील परंपरा व संस्कृतीची साक्ष देतात. अशाच इतिहास व संस्कृतीची साक्ष देणारे महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील एक गाव म्हणजे किकली.

महाराष्ट्र राज्यातील सातारा जिल्ह्यात वाई तालुक्यापासून 19 किमी अंतरावर कीकली हे गाव स्थित आहे. महाराष्ट्रातील पहिले 'वीरगळींचे गाव' म्हणून कीकली ओळखले जाते. वीर पुरुषांच्या स्मरणार्थ उभारण्यात आलेला (दगडांचा अथवा लाकडाचा) स्तंभ म्हणजे विरगळ होय. वाई तालुक्यातील किकली या गावात 9-10व्या शतकातील वीरगळी आहेत. परंतु विरगळी शिवाय कीकली गावाचे ऐतिहासिक महत्त्व वाढले ते म्हणजे तेथे असलेल्या यादवकालीन भैरवनाथ मंदिरामुळे. त्रिदल पद्धतीमध्ये बांधलेले हे मंदिर पूर्वाभिमुख असून त्याची रचना, पुरातत्वीय व ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाने या मंदिराला ‘संरक्षित स्मारक’ म्हणून घोषित केलेले आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

1) किकली येथील भैरवनाथ मंदिराच्या इतिहासाचा आढावा घेणे.
2) मंदिराच्या स्थापत्यशास्त्राचा अभ्यास करणे.
3) मंदिराशी संबंधित स्थानिक आख्यायिका जाणून घेणे.
4) भैरवनाथ मंदिराशी संबंधित स्थानिक प्रथा परंपरांचा अभ्यास करणे.
5) मंदिराच्या माध्यमातून स्थानिक सामाजिक-सांस्कृतिक इतिहास जाणून घेणे.

**संशोधन पद्धती:-** सदर संशोधन करताना प्रामुख्याने यात क्षेत्रभेट, सर्वेक्षण, मुलाखत पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे.

**मंदिराची पार्श्वभूमी:-**

सातारा जिल्ह्याला फार मोठी ऐतिहासिक परंपरा लाभलेली आहे. प्राचीन काळात सातवाहनांची (इ. स. पू. 200 ते इ.स.पू. 300) सत्ता या प्रदेशावर होती.[1] सातारा तसेच पश्चिम व दक्षिण महाराष्ट्रावर बदामीचे चालुक्य त्यानंतर राष्ट्रकुट, शिलाहार व देवगिरीच्या यादवांनी राज्य केले. त्यामुळे तेथील वास्तू व स्थापत्यावर त्यांचा प्रभाव दिसून येतो.

साताऱ्यातील वाई तालुक्याच्या पूर्व भागात किकली हे गाव वसलेले आहे. तसेच चंदन-वंदन किल्ले तटबंदीच्या पश्चिमेला सुमारे 1.5 किमी अंतरावर आहे. किकली गावाच्या सुरुवातीलाच भैरवनाथ मंदिराकडे जाणाऱ्या पायऱ्या व मंदिराच्या नावाची कमान दिसून येते. हे मंदिर साधारणतः 11-12व्या शतकात बांधले गेले असावे. परंतु हे मंदिर कधी व कोणी बांधले याबद्दल कोणताही निश्चित पुरावा आढळत नाही.

या मंदिराच्या निर्मिती बाबतीत अनेक मते मांडली गेली आहेत. हे मंदिर पांडवकालीन आहे व पांडवांनी एका रात्रीत या मंदिराची बांधणी केली असे मत स्थानिकांद्वारे मांडले जाते. किकलीपासून चंदन-वंदन किल्ले जवळ आहेत. या किल्ल्यांची रचना शिलाहार राजा भोजद्वारे करण्यात आली होती. हे किल्ले किकलीच्या नजीकच्या परिसरात असल्याने या मंदिराची रचनाही शिलाहारांद्वारे करण्यात आली असावी असे काही अभ्यासकांचे मत आहे.

परंतु मंदिराच्या एकंदरीत स्थापत्यावरून हे मंदिर यादवकालीन असल्याचे दिसून येते. किकलीच्या या भैरवनाथ मंदिरासमोर एक अस्पष्ट कोरीव लेख आहे. त्यातील 'सिंघणदेव' ही पुसट अक्षरे यादव वंशाच्या आधिपत्याचा निर्देश दर्शवितात.[2] यादवांचा राजा सिंघण याने 12व्या शतकात खिद्रापूर नजीकच्या भोज राजाचा पाडाव करून कोल्हापूर शिलाहारांची राजवट नष्ट केली. हा भाग यादवांच्या राजवटीत सामील झाला व यादव राजवटीत या मंदिराची उभारणी झाली असावी असे काहींचे मत आहे. यादवकालीन मंदिरे प्रामुख्याने खानदेश, मराठवाडा, विदर्भ व प. महाराष्ट्र (सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर) व आंध्र प्रदेशाचा काही भाग येथे आढळतात. त्यांपैकी बहुसंख्य मंदिरांची कालौघात पडझड झाली असून फारच थोडी सुस्थितीत अस्तित्वात आहेत.[3] एकंदरीतपणे मंदिराच्या स्थापत्यावरून येथील 'मंदिर संकुल' यादवकालीन आहे असे दिसते.

संरक्षित स्मारक घोषित करण्यात आल्यावर या मंदिराच्या जीर्णोद्धाराचे काम पुरातत्वीय विभागाद्वारे करण्यात आले. साधारणपणे 12 ते 13 वर्षांपूर्वी पुरातत्व खात्याने या मंदिराची पुनर्बांधणी केली. मंदिरात कोणतेही बदल न करता केवळ दुरुस्तीचे काम करण्यात आले. काम करत असताना मंदिराच्या विविध भागात टाकलेले आकडे अजूनही नजरेस पडतात. जीर्णोद्धाराच्या वेळी सर्व मूर्तींना वज्रलेप करण्यात आला. एखादी मूर्ती भंग पावली असेल किंवा त्या मूर्तीचे संरक्षण करायचे असेल तर त्या मूर्तीवर वज्रलेप केला जातो. जेणेकरून भंगलेल्या मूर्ती मूळ स्वरुपात दिसण्यास मदत होते.

**मंदिराची रचना व स्थापत्य :-**

किकली गावात प्रवेश करताच भैरवनाथ मंदिराकडे जाणाऱ्या पायऱ्या दिसतात. 15 ते 20 पायऱ्या चढूनच मंदिराचे प्रवेशद्वार आहे. प्रवेशद्वारातून आत येताच मोठे पटांगण आहे व त्यापुढे मुख्य मंदिर आहे. मंदिराच्या दोन्ही बाजूंनी ग्रामपंचायतीच्या शाळा बांधलेल्या आहेत. प्रवेशद्वारातून आत आल्यावर डाव्या बाजूला शेंद्राचा गणपती तर उजव्या बाजूला भैरवाची मूर्ती स्थित आहे. मंदिराच्या आवारात प्रवेश केल्यावर तुळशी वृंदावन दिसते. जिर्णोद्धारापूर्वी ते पूर्ण दृष्टीस पडत नव्हते. पुरातत्त्व विभागाच्या अधिकाऱ्यांना तीन पायऱ्या सापडल्या तो भाग त्यांनी खोदून घेतला व जवळजवळ कमरे इतका खाली घेण्यात आला. मुख्य मंदिराच्या बाहेर भव्य पाषाणी दीपमाळ आहे. मंदिराच्या बाह्यभागाची रचना साधी आहे. परिष्कृत मंदिराचा महत्त्वाचा घटक म्हणजे शिखर. त्याच्याशिवाय मंदिर परिपूर्ण ठरत नाही. शिवाय त्याच्या ठेवणीवरून, रचनेवरून मंदिराच्या शैलीचा चटकन परिचय होत असतो.[4] परंतु या मंदिराचे शिखर नष्ट झालेले असल्याने मंदिराची मूळ शैली कोणती याचा अंदाज लावता येत नाही. मंदिराच्या शिखराबाबत स्थानिकांची अख्यायिका अशी आहे की, ज्या वेळेस अफजल खान मंदिरे उध्वस्त करत चालला होता त्यावेळी इथल्या गावकऱ्यांनी गनिमी कावा म्हणून मंदिराचा कळस काढून घेतला व मंदिराला पांढरा रंग दिला जेणेकरून त्याचा आकार मस्जिदीसारखा दिसेल.[5] ही अख्यायिका कितपत खरी हे सांगणे मात्र अवघड आहे.

मंदिराच्या प्रवेशद्वारातून आत येताच उजव्या बाजूला दोन उध्वस्त मंदिरांचे अवशेष दिसतात. पुरातत्त्व विभागाने उध्वस्त मंदिरांच्या दुरुस्तीसाठी निधी दिला परंतु, ते आधीपासून त्या अवस्थेत असल्याने त्यात कोणताही खास बदल करता आला नाही. दोन मंदिरांपैकी एक मंदिर त्रिदल पद्धतीचे आहे तर दुसरे मंदिर जंघा भागापर्यंत शिल्लक आहे. या दोन्ही मंदिरांमध्ये शिवलिंग असल्याचे दिसून येते.

मंदिराची रचना गर्भगृह, अंतराळ, मंडप व मुख्यमंडप अशी आहे. मंदिरात प्रवेश केल्यावर आधी मुख्यमंडप आहे. तेथे नंदीमंडप हा स्वतंत्र नसून मुख्यमंडपात चार स्तंभाच्या मधोमध नंदी विराजमान आहे. मंदिराच्या या भागाला कक्षासन असे देखील संबोधले जाते. कक्षासानाच्या भिंतीवर कुटशिखर व खाली स्तंभ असून त्या स्तंभावर भौमितिक कलाकृती कोरलेली दिसते. ज्याला 'रत्नमोटीफ' असेदेखील म्हटले जाते. त्यानंतर सभामंडप आणि समोर मुख्य गर्भगृह व डाव्या-उजव्या बाजूला अजून दोन गर्भगृहे आहेत. या प्रकारच्या तीन गर्भगृहांच्या रचनेला 'त्रिदल गाभारा' म्हणतात. मुखमंडप व सभामंडप नक्षीदार स्तंभांवर तोललेला आहे. मंदिराच्या बाह्य भिंतीच्या भागात अधिक कोरीव काम केलेले दिसत नाही. मुखमंडपाच्या समोरील आणि डाव्या-उजव्या बाजूस काही मैथुन शिल्पे, काही वादक व व्यालांची विविध शिल्पे कोरलेली आढळतात. शिवाय एका प्रसवेचेही (बाळाला जन्म देत असलेली स्त्री) शिल्प दिसते. मुख्यमंडपाच्या समोरील बाजूसही विविध प्रकारचे व्याल कोरलेले दिसतात. सिंहाचे पुढील दोन्ही पाय वर उंचावलेले असे स्वरूप म्हणजेच व्याल होय. दाक्षिणात्य मंदिरांवर व्याल मोठ्या प्रमाणात आढळून येतात.

सभा मंडपाचे प्रवेशद्वार नक्षीदार असून त्याच्या दोन्ही बाजूस द्वारपाल, सेवक, शैवप्रतीहारी कोरलेले आहेत. प्रतीहारींच्या खालच्या भागात हत्ती व शरब आदी कोरलेले दिसते. द्वारपट्टीकेवर गणपती नसून तपस्व्याची मूर्ती कोरलेली आढळते. प्रतिहारींच्या हाती नेहमीच एक लांबुळकी पिशवी दिसते याचा अर्थ असा की मंदिराच्या बांधकामासाठी या पिशवीतून ते धन, जल आदी आणत आहेत. सभा मंडप नक्षीदार स्तंभांवर तोललेला आहे. स्तंभावर मध्यभागी पौराणिक प्रसंग कोरलेले आहेत. स्तंभाच्या खालच्या भागात सूरसुंदरीची शिल्पे कोरलेली आहेत. मंदिराच्या भिंतींवर काही विविध विभ्रमांतील स्त्रीप्रतिमा असतात. या प्रतीमांतील स्त्रिया म्हणजे अप्सराच, पण या सूरसुंदरी म्हणून ओळखल्या जातात.[6] याशिवाय भैरव, हरिहर, नर्तकी, अभिसारिका आदी शिल्पेदेखील कोरलेली आहेत.

मंदिरातील खांबांवर इतरही विविध शिल्पे कोरलेली दिसून येतात. जसे की, तीन धडे व चारच पाय असणारे आभासी शिल्प. अशी शिल्पे पिंपरी दुमाला, भुलेश्वर, पेडगाव अशा मंदिरातही आपल्याला दिसून येतात. एका खांबावर त्रिविक्रमाचे शिल्पदेखील कोरलेले दिसून येते. स्तंभाच्या दोन बाजूस दोन प्रसंग कोरलेले आहेत एका बाजूस वामन अवतार तर त्याच्या शेजारील बाजूस त्रिविक्रम अवतार कोरलेला आहे. छत्रीधारी वामन बळीराजाच्या दरबारात तीन पावले भूमीचे दान मागायला आलेला दिसतो आहे. याच्या पुढच्या अर्ध्या भागात बळीराजा कमंडलूतून वामनाचा हातावर पाणी सोडून दान देतो आहे. तर शेजारी शुक्राचार्य वामनाचे कपट ओळखून बळीला अटकाव करत आहेत. याच्याच शेजारी स्तंभाच्या दुसऱ्या बाजूस दोन पावलांनी आकाश व जमीन व्यापून विष्णू प्रकट झाला आहे. तिसऱ्या पावलाने बळीचे मस्तक व्यापून त्याला पाताळात जागा दिलेली आहे. तर बळीच्या शेजारी गरुड आणि विष्णूगण दिसत आहेत.

मंदिरातील खांबांवर रामायणातील ही विविध प्रसंग दिसून येतात जसे की,

1) रामहस्ते सुवर्ण मृगाचे रूप धारण केलेल्या मायावी मारीच राक्षसाचा वध.

2) राम हनुमानाची भेट.

3) सुग्रीवाकडून रामाच्या शरकौशल्याची तालवृक्षांचा छेद करून होणारी परीक्षा व शेजारी वाली सुग्रीव युद्ध.

4) रामहस्ते वाली वध.

5) हनुमानाकडून अशोक वनाचा विध्वंस व राक्षसींचे सीतेला रामाचे तुटलेले मायावी मस्तक दाखवून धमकावणे.

6) एका स्तंभावर वध दर्शविलेला आहे. हा कुंभकर्ण वध आहे की रावण वध आहे हे निश्चित सांगणे अवघड आहे.

रामायणाशिवाय इतरही प्रसंगांची शिल्पे खांबांवर कोरलेले दिसून येतात. त्यातील काही शिल्पे ओळखणे अवघड जाते. एका खांबावरील शिल्प हे बहुदा महाभारतातील भिमाचे गजयुद्ध असल्याचे जाणवते. काही शिल्पांमध्ये शिवतांडवाचे प्रसंगही दिसून येतात. एका खांबावरील शिल्पामध्ये शिव असल्याचे दिसून येते कारण त्याच्या शेजारी नंदी आहे पण शिल्पामध्ये दिसत असलेल्या सिंहामुळे प्रसंग कोणता आहे हे समजत नाही.

काही शिल्पांमध्ये कलश पूजन करणारे हंस देखील दिसून येतात. खांबावरील एक प्रसंग मात्र लक्षात येत नाही. एका फळावरून गरुड आणि हनुमानाची ते फळ ओढून घेण्यासाठी जोरदार चढा-ओढ चाललेली दिसते डावीकडे स्वयं विष्णू तर उजवीकडे अश्वमुख असलेला विष्णू भक्त तुंबरु (गंधर्वांमधील अग्रगण्य, संगीतकार) उभा आहे. सभा मंडपाच्या छतावर कोरीव काम केलेले दिसून येते व त्यात कमळ देखील कोरलेले आढळते. तीनही गर्भगृहांच्या प्रवेशद्वारात द्वारपाल प्रतिहारी यांची शिल्पे कोरलेली आहेत. गर्भगृहाजवळ शिव-पार्वती, गणेश, नागदेवता यांचीही शिल्पे दिसतात. गर्भगृहात शिवलिंगे व भैरवाची मूर्ती आहे.

वास्तुशैलीच्या दृष्टीने पाहता यादवकाळात बांधलेली बहुसंख्य मंदिरे नागरशैलीत (इंडो-आर्यन), विशेषतः पश्चिम भारतातील माळव्यात प्रचलित असणाऱ्या ‘भूमिज’ या उपशैलीत बांधली आहेत. ही शैली मूळ नागर आणि द्राविड यांहून काहीशी भिन्न असून तिच्यात स्थानिक वैशिष्ट्ये डोकावतात.[7] या मंदिराच्या एकूण स्थापत्यामध्ये यादवकालीन वास्तुशैलीची वैशिष्ट्ये दिसून येतात.

**मंदिराच्या आवारातील वीरगळी :-**

वीर पुरुषांच्या स्मरणार्थ उभारण्यात आलेला स्तंभ म्हणजेच वीरस्तंभ किंवा वीरगळ होय. शूरवीर पुरुष किंवा स्त्रीने कोणत्या कारणास्तव आपल्या प्राणाची आहुती दिली याचे स्पष्टीकरण या वीरगळींमध्ये दिसून येते. वीरगळी बहुधा तीन स्तरांमध्ये विभागल्या जातात. कधी कधी त्याचे चार किंवा पाच स्तरही आढळतात. सर्वात खालच्या स्तरात वीरांचा

मृत्यू कसा झाला हे दाखविण्यासाठी युद्धाची दृश्ये दर्शविली जातात. मधल्या स्तरात अनेकदा वीराला अप्सरा स्वर्गात घेऊन जात असल्याची कल्पना केलेली दिसते. सर्वात वरच्या स्तरांमध्ये एखाद्या देवतेची सामान्यतः शिवलिंगाची पूजा करणाऱ्या विषयाचे चित्रण केले जाते किंवा वीराला स्वर्गप्राप्ती होतानाचे दृश्य कोरले जाते.

किकली हे महाराष्ट्रातील पहिले वीरगळींचे गाव म्हणून ओळखले जाते. वाई तालुक्यातील या किकली गावात 9-10व्या शतकातील वीरगळी आढळतात. या वीरगळी आजूबाजूच्या शेतातून गोळा करून मंदिराच्या आवारात ठेवण्यात आल्या आहेत. पूर्वी कधीतरी शिलाहार यादव संघर्षात मोठे धुमशान युद्ध झालेले असावे त्याची साक्ष इथल्या या दीडशे वीरगळी देतात.

**भैरवनाथाची यात्रा :-**

मंदिराचे समाजजीवनात एक आगळे स्थान असते हे आपल्या चटकन लक्षात येत नाही. प्राचीन काळीसुद्धा खेड्यांतून आणि तीर्थक्षेत्रातून पाहायला मिळते ते मंदिराचे केंद्रस्थानी असणे. गावच्या धार्मिक व सामाजिक अनेक गोष्टी मंदिरांशी निगडीत असतात.[8] प्रत्येक गावाला आपली अशी एक स्थानिक परंपरा असते. सर्व गावांप्रमाणे किकली गावाच्या देखील स्वतःच्या स्थानिक परंपरा आहेत. अश्विन महिन्यात किकली गावात भैरवनाथाची पालखी निघते. भैरवनाथ व चिलाई देवीची भेट हे या पालखीचे वैशिष्ट्य आहे. किकली नजीक असलेल्या जांब गावात चिलाई देवीचे मंदिर आहे. चिलाई देवी ही भैरवनाथाची बहीण मानली जाते. किकली गावातील भैरवनाथाची यात्रा दसऱ्यानंतर येणाऱ्या शनिवार-रविवारी होते. या यात्रेपूर्वी पाच दिवसांचा कडक असा निरंकार उपवास पकडला जातो. या उपवासात अन्न हे वर्ज्य असून केवळ पाणी पिऊन उपवास केला जातो.[9]

**निष्कर्ष :-**

मंदिरे ही स्थानिक इतिहास, कला आणि परंपरेचे प्रतिबिंब असतात. स्तानिक मंदिरांचा अभ्यास केल्यामुळे आपल्याला त्या स्तानिक क्षेत्रातील सामाजिक-सांस्कृतिक- धार्मिक रूढी-परंपरा व विधींची माहिती मिळते. स्थानिक इतिहास समजतो. 'मंदिर संस्था' ही भारताच्या सामाजिक- सांस्कृतिक जीवनातील महत्त्वाच्या संस्था असून त्यातून लोकजीवनाचे प्रतिबिंब सहज स्पष्ट होते. मंदिरे ही समुदायाच्या जीवनाचे केंद्र असतात, जे त्या काळातील समाजाचे मूल्य, कला आणि परंपरा दर्शवितात. सातारा जिल्ह्यातील वाई तालुक्यापासून काही अंतरावर किकली हे गाव आहे. महाराष्ट्रातील पहिले 'वीरगळींचे गाव' म्हणून या गावाची ओळख निर्माण झालेली आहे. परंतु विरगळींशिवाय या गावाचे ऐतिहासिक महत्त्व वाढले ते म्हणजे या गावात असलेल्या यादवकालीन भैरवनाथ मंदिरामुळे. किकली येथील भैरवनाथ मंदिर हे एक ऐतिहासिक, धार्मिक आणि सांस्कृतिक दृष्टिकोनातून महत्त्वाचे स्थळ आहे. या शिवमंदिराच्या संकुलात एक मुख्य मंदिर व दोन भग्नावशेषातील मंदिरे दिसतात. सभामंडपामधील खांबांवर कोरलेले रामायणातील प्रसंग त्याचबरोबर इतर प्रसंग व शिल्पे मंदिराची कलात्मकता दर्शवतात. मंदिराच्या निर्मितीबाबत अनेक आख्यायिका व दंतकथा आहेत परंतु त्यातील किती खऱ्या आहेत हे सांगणे मात्र कठीण नुकत्याच झालेल्या मंदिराच्या सर्वेक्षणातून मंदिराच्या आवारात प्राचीन पटखेळांचे अवशेष सापडले आहेत. ज्यांची नोंद करण्यात आली आहे व त्यांचा अभ्यास चालू आहे. या सर्व अभ्यासातून या मंदिराचे महत्त्व लक्षात येते.

**संदर्भ :-**

1. देशपांडे सु. र., सातारा जिल्हा, इतिहास, मराठी विश्वकोश, खंड 19, 2020
2. कित्ता, खंड 19
3. यादव घराणे, मराठी विश्वकोश, खंड 14.
4. गो. ब. देगलूरकर, मंदिर कसे पहावे, स्नेहल प्रकाशन, पुणे 2024, पृ. 47.
5. गुरव चेतन, मुलाखत, ऑक्टोबर 2024.
6. कित्ता, पृ. 24.
7. यादव घराणे, मराठी विश्वकोश, खंड 14.
8. गो. ब. देगलूरकर, उपरोक्त, पृ. 68.
9. गुरव चेतन, उपरोक्त.

10. काळे भाग्यश्री, महाराष्ट्राची मंदिर शैली, डायमंड पुब्लिकेशन पुणे, 2010
11. गो. ब. देगलूरकर, 1974. Temple Architecture and Sculpture of Maharashtra. Nagpur: Nagpur University.
12. चौधरी वसंत, सातारा जिल्हा, मराठी विश्वकोश (नोंदी), वाई 2020
13. जामखेडकर अ. प्र., The Hindu Temple, In Aesthetic Theories And Forms In India, New Delhi, 2012
14. देशपांडे ब्रह्मानंद, देवगिरीचे यादव, अपरांत प्रकाशन, पुणे, 1975.
15. देशपांडे सु. र., Yadava Sculpture, (Western Maharashtra: 1000AD To1400ad.). Unpublished Ph.D. Dissertation. Pune: Deccan College. 1977.
16. देशपांडे सु. र., **मंदिरे, मूर्ती आणि भित्तीचित्रे**, लोकहित, मे 1992
17. देशपांडे सु. र., **वाई : कला आणि संस्कृती**, आस्था पर्यावरण मैत्री संस्था, वाई 2011
18. पानसे, मु. ग., यादवकालीन महाराष्ट्र, मुंबई, 1963.



# परभणी जिल्ह्यातीलश्रीक्षेत्र मुदगलेश्वर स्थान महात्म्य :मुदगलेश्वर व गणपती मंदिर

**प्रा. डॉ. जी. एस. पिसे**
इतिहास विभागप्रमुख
ज्ञानोपासक महाविद्यालय, परभणी

**प्रस्तावना :**

परभणी जिल्हा ही संतांची भूमी म्हणून ओळखली जाते. या ठिकाणी अनेक संत, महंत होऊन गेले. तसेच गोदावरी ही या जिल्ह्यातील मुख्य नदी म्हणून ओळखली जातेव हिला 'दक्षिण गंगा'असे म्हटले जाते. या नदीकाठावर अनेक धार्मिक स्थळे आहेत. त्यापैकी श्री क्षेत्र मुदगलहे एक आहे. मुदगल ऋषीच्या वास्तव्याने हे क्षेत्र पावन झाले आहे. मुदगल या गावी अनेक मंदिरे आहेत.मुदगलेश्वाराचे मंदिर हे मुख्य मंदिर आहे. त्याची अख्यायिका अशी की, महामुनी श्री अंगिरस ऋषी व देव श्रुती हे अलौकिक जोडपे होते. एके दिवशी त्यांच्यासमोर अवकाशातून एक मुदगल (व्यायामाचे एक साधन) आकाराचा एक तेजस्वी गोळा पडला व त्या गोळ्यातून एक बाळाकृती प्रगत झाली. आकाशवाणी झाली व श्री मुदगल ऋषी तपश्चर्या करीत व फिरत-फिरत श्री मुदगल या ठिकाणी आले. त्यांच्यासोबत त्यांची पत्नी भागीरथी, पुत्र मौदगल्य व स्नुषा जबाला हे होते. त्यांची दिनचर्या जप, तप आणि अनुष्ठान करणे यामध्ये त्यांचा काळ जात असे. ते पक्षांनी अधर्वट खाऊन टाकलेले धान्य आणीत व ते शिजवित असत. त्या धान्याचे सात भाग करत असत. एक देवाचा, दुसरा वैश्देवाचा तिसरा भाग अस्थीचा व राहिलेले चार भाग मुदगल ऋषी, पत्नी, भागीरथी, पुत्र मौदगल्य व स्नुषा जाबाला असे. एके दिवशी श्री दुर्वास ऋषी मध्यानकाळी मुदगल ऋषीच्या आश्रमात आले. श्री मुदगल ऋषींनी त्यांचे यथायोग्य स्वागत केले. त्यांना अतिथीचा भाग वाढला. श्री दुर्वास ऋषींनी तो भाग खाल्यानंतर ते आश्रमातून निघून गेले.

अशाप्रकारे श्री दुर्वास ऋषी दररोज मध्यान्हकाळी येत. अतिथीचा भाग खात व निघून जात. काही वेळेस अन्न उरले तर ते अंगास लाऊन निघून जात असत व अशाप्रकारे सहा महिन्याचा काळ लोटला.

श्री मुदगल ऋषीची तपस्या वाढली. त्यांचे ताप वाढल्यामुळे सर्व इंद्रादी देवतांना मुदगल ऋषीची भीती वाटू लागली,की जर दुर्वास ऋषी प्रसन्न झाले व मुदगल ऋषींनी इंद्रपद मागितले तर दुर्वास ऋषी इंद्रपद देतील. या भीतीने सर्व देव भयभीत झाले. त्यानंतर सर्व देव वैकूंठलोकी विष्णूकडे आले. सर्व देवांनी मागील वृत्तात विष्णूस सांगितला. तेव्हा विष्णू म्हणाले,की आमचे येथे काही चालत नाही. आपण सर्वजण शंकराकडे जाऊ. ते आपल्याला काहीमार्ग सांगतील, असे म्हणून सर्व देवता कैलास पर्वतावर शंकराकडे आले. वरील सर्व वृत्तात सांगितला. त्यानंतर श्री शंकर सर्व देवतांना म्हणाले, की मुदगल ऋषींना कशाचीच अपेक्षा नाही. धन, दौलत, इंद्रपद या कशाचीच त्यांना कोणतीच अपेक्षा नाही तरीपण आपण सर्वजण त्यांच्या आश्रमात जाऊ व काय आहे हे पाहू. सर्व देवता गुप्त रूपांनी मुदगल ऋषींच्या आश्रमात आले व सर्व देवतांनी मुदगल ऋषींची परीक्षा घेण्याचे ठरवले. सर्व तेहतीस कोटी देवतांनी आपली क्षुधा (भूक) दुर्वास ऋषींना दिली.

नित्य नियमाप्रमाणे दुर्वास ऋषी मध्यान्ह काळी मुदगल ऋषींच्या आश्रमात आले. नेहमीप्रमाणे मुदगल ऋषीनी अतिथीचा भाग वाढला. दुर्वास ऋषींनी तो भाग खाल्ला परंतु आज त्यांची क्षुधा (भूक) शांत झाली नाही. त्यांनी मुदगल ऋषींना आणखीन भाग मागितला. मुदगल ऋषींनी स्वतःचा भाग दिला तरी त्यांची भूक शांत झाली नाही. त्यांनी पुन्हा भाग मागितला तेव्हा पत्नी भागीरथी हिने तीचा भाग दिला. त्यानंतर मौदगल्या यांनीही आपला भाग दिला. तरीही दुर्वास ऋषीची भूक शांत झाली नाही. आता फक्त स्नुषा जाबालाहीचा एकच भाग शिल्लक राहिला होता व तिने स्वत:चा भाग अतिथी दुर्वास ऋषी यांना वाढला.

श्री दुर्वास ऋषींनी स्नुषा जाबाला हिचा भाग खाल्ला. तो भाग खाल्याबरोबर दुर्वास ऋषीची भूक शांत झाली. तेहतीस कोटी देवतांची भूक शांत झाली. त्यानंतर त्या ठिकाणी तेहतीस कोटी देव प्रगट झाले.

सर्व तेहतीस कोटी देवता ऋषिवर प्रसन्न झाले. मुदगल ऋषींनाही अत्यानंद झाला. सर्व देवता आनंदांनी संतृष्ट झाले. त्यानंतर सर्व देवता मुदगल ऋषींना वर मागा म्हणू लागले. दुर्वास ऋषींनीही वर मागा म्हणू लागले. तेव्हा मुदगल ऋषी म्हणाले, मला नको. मला काशाचीही अपेक्षा नाही. तरीही सर्व देवता त्यांना वर मागा असा आग्रही करू लागले. तसा त्यांनी आग्रह धरला तेव्हा मुदगल ऋषी सर्व देवतांना म्हणाले,की आपण सर्वजन वर मागा म्हणत आहात तेव्हा आपण

सर्व तेहतीस कोटी देवतांनी प्रलय होईपर्यंत मुदगल क्षेत्री वास करावा. तसेच या ठिकाणी सर्व भक्ताची मनोकामना पूर्ण करावी.तेव्हा सर्व देवता मुदगल ऋषीस म्हणाले,की आम्हास हा वर देण्यास फार कठीण आहे. आम्ही या ठिकाणी प्रलय होईपर्यंत राहू शकत नाही. तरीही आम्ही तेहतीस कोटी देवता या ठिकाणी (गुप्त) पाषाण रूपांनी राहून तसे जो कोणी भक्त मनोकामना (इच्छा) घेऊन मुदगल क्षेत्री येतील त्यांची मनोकामना पूर्ण करू, असा वर सर्व देवतांनी व दुर्वास ऋषी यांना मुदगल ऋषींनी दिला.

**मुदगलेश्वर मंदिर :**

मुदगल हे गाव गोदावरी नदीच्या उत्तर किनाऱ्यावर वसलेले आहे. काहींच्या मते गावाचे मूळ नाव वडगाव असावे. नंतर मुदगल हे नाव पडले असावे. मुदगलेश्वरचे मंदिर गोदावरीच्या पात्रात आहे. या मंदिराचा जीर्णोद्धार राजमाता अहिल्याबाई होळकर यांनी 18 व्या शतकात केला. नदीकाठच्या घाटाच्या एकोणसाठ पायऱ्या उतरून नदी पात्रात जाता येते. याच नदी पात्रात दोन मंदिरे आहेत. त्यापैकी एक गणेशाचे तर दुसरे मुदगलेश्वाराचे आहे.

मुदगलेश्वर मंदिर हे गणेश मंदिराच्या उजव्या बाजूस काही अंतरावर आहे. हे मंदिर पूर्वाभिमुख आहे. मंदिराची रचना सभामंडप व गर्भगृह अशी आहे. या मंदिराच्या सभामंडपात बारा नक्षीयुक्त स्तंभ आहेत. त्यापैकी चार पूर्ण स्तंभ असून आठ स्तंभ अस्तंभ आहेत. पूर्ण स्तंभाची उंची साधरणतः 8.2 फूट तर अर्धस्तंभ 3 फुटाचे आहेत.

सभामंडपाला आत जाण्यासाठी तीन बाजूंनी जागा आहे मात्र समोरच्या जागेत पाषाणाचा स्तंभावर भारवाहक आहेत. तसेच स्तंभावर ज्वारी तसेच इतर फळांचे कोरीव प्रतिकृती आहे. सभामंडपाचे वीटा नक्षीयुक्त आहे. गर्भागृहाचे प्रवेशद्वार छोटे असून ललाटबिंबावर गणपती आहे. गर्भागृहाचे प्रवेशद्वार नक्षीयुक्त असून प्रवेशद्वारावर साखळीप्रमाणे नक्षीयुक्त काम आहे. मंदिराच्या प्रवेशद्वाराशी खालील आशयाचा शिलालेख आहे.

**शिलालेख :**

**“श्री गणेशायनामः श्री मुदागली विजयते स्वतेश्री नृप शालिवाहन शके षडमिरापोहवी 1761 संख्याते विधी विवशी प्रथमम श्वनद सवंत्सर" तंत्र श्री मुनी मुदगलस्य बहुश : कोनादिप्तीहीत प्रसाद : खालुगोह या परिवृत: सिध्दीमनोवज्रयत ||1|| शुभं भवतु सर्वेषां जनानाम ||**

अशा प्रकारचा शिलालेख आहे. तसेच गर्भगृहाच्या प्रवेशद्वारावर वरच्या बाजूस पक्षांचे दोन शिल्प व त्याच्यामध्ये नक्षीयुक्त फूल कोरलेले आहे. गर्भागृहामध्ये चार शिवपिंड असून त्या मुदगल ऋषी त्यांची पत्नी भागीरथी पुत्र मौदगल्य आणि स्नुषा यांच्या आहेत.

अशा प्रकारे मुदगलेश्वर हे अतिशय सुंदर हेमाडपंथी मंदिर आहे. याला कळस नाही. या मंदिराचा जीर्णोद्धार राजमाता अहिल्याबाई होळकर यांनी 18व्या शतकात केला.

**गणपती मंदिर :**

विघ्नहर्ता आणि मंगलकारक देव म्हणून गणपतीचे अस्तित्व आहे. शिव आणि पार्वतीच्या पुत्राच्या रुपात या देवाचे वर्णन केले आहे. विघ्नविनाशक, विघ्नेश्वर, विघ्नराज, शुपकर्ण, सिद्धिविनायक, गजमुख, एकदंत, वक्रतुंड इ. नावाने गणपतीला ओळखले जाते. प्राचीन काळापासून भारतीय समाजात गणपती या देवतेची पूजा प्रचलित आहे. महाराष्ट्रात सातवाहन काळापासून गणपती पूजा सुरु झाली. मुदगल येथे गोदावरी नदीच्या पात्रात हेमाडपंथी दोन मंदिरे आहे. त्यापैकी एक मुदगलेश्वराचे तर दुसरे गणेशाचे आहे. हे मंदिर पूर्वाभिमुख असून मुदगलेश्वर मंदिराच्या डाव्या बाजूस आहे. मुदगल येथील सर्व मंदिरापेक्षा या मंदिराचे वेगळेपण असे,की सर्व मंदिरे ही चौकोनी आहेत. मात्र गणेशाचे मंदिर हे पंचकोनी आहे. मुदगलेश्वर मंदिराच्या तुलनेत हे मंदिर आकाराने लहान आहे. केवळ गर्भगृह अशी या मंदिराची रचना आहे.

या मंदिरावर कोणत्याही प्रकारचे नक्षीकाम केलेले नाही. तसेच स्तंभही नाही. ललाटबिंबावर गणेश प्रतिमा आहे. प्रवेशद्वाराच्या समोरासमोर गर्भगृहात गणेश मूर्ती आहे. ही मूर्ती देवकोष्ट्कात आहे. गणेश मूर्ती चतुर्भुज आहे. गणपतीच्या दोन हातात आयुधे असून उजवा हात मांडीवर ठेवलेला आहे. तर डाव्या हातात मोदक आहे. गणपतीचे वाहन उंदीर हे गणपतीच्या डाव्या पायाजवळ आहे. तसेच गणपतीच्या दोन्ही बाजूस स्त्री प्रतिमा आहेत. तसेच गर्भगृहात इतर चार शिल्प आहेत. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे -

**गंगाधर शिवपार्वती :**

या मंदिरातील पहिले शिल्प गंगाधर शिवपार्वती हे पहावयास मिळते. हे शिल्प गणेश प्रतिमेच्या डाव्या बाजूस देवकोष्टकात आहे. शिव हा चतुर्भुज असून डमरू व त्रिशूल ही आयुधे आहेत. उजव्या हातात लाडू तर डावा हात पार्वतीच्या खांद्यावर आहे. शिवाच्या डाव्या मांडीवर पार्वती असून ती नमस्कार मुद्रेत स्थित आहे. शिवाच्या जटमध्ये स्त्री रूप गंगा आहे. अशा प्रकारचे हे अतिशय दुर्मिळ शिल्प गणेश मंदिरात पहावयास मिळते.

**महिषासुर मर्दिनी :**

पार्वतीने निरनिराळी रूपे घेऊन शुभं, निशुभ इ. राक्षसांचा संहार केला. त्या राक्षसांपैकी महिषासुर नावाचा राक्षसाचा संहार करणारी जी दुर्गादेवी आहेतिला महिषासुर मर्दिनी असे म्हणतात. हिनेच पुढे महिषासुराचा वध केला व पुन्हा दैवी संपत्ती व समृद्धीची स्थापना केली. गणपती मंदिरात महिषासुर मर्दिनीचे शिल्प आहे. हिचे वाहन सिंह आहे. देवी चतुर्भुज असून तिच्या हातात चक्र, तलवार ही आयुधे आहेत.

देवीच्या कानात कुंडले, गळयात हार, हातात बांगड्या व बाजूबंध हे अलंकार आहेत. तिचे नेत्र विशाल व मान सुंदर आहे. देवीने एक पाय असुराच्या छातीवर दिलेला असून तिच्या डाव्या हातात असुराचे डोके आहे. अशा प्रकारचे अतिशय सुंदर शिल्प या मंदिरात आपणास पहावयास मिळतात.

**सूर्य शिल्प :**

गणपती मंदिरातील चौथे व शेवटचे शिल्प म्हणजे सूर्य शिल्प आहे. इतर सर्व शिल्पाच्या तुलनेत सूर्य शिल्प हे अतिशय सुंदर व सुव्यवस्थित आहे. सूर्य हा रथामध्ये बसलेला आहे. रथाला दोन घोडे स्पष्ट दिसतात. तसेच रथाची दोन चाके दिसतात. त्यावर कोरीव नक्षीकाम केलेले आहे. रथ हा सारथी चालवत आहे.

तसेच रथाला समोर ध्वज आहे. रथामध्ये सूर्य बसलेला आहे. हा सूर्य चतुर्भुज आहे व त्याच्या मागील दोन हातात आयुधे आहेत. तसेच डावा हात मांडीवर आहे व उजव्या हात समोर असून काही गोल प्रकारची वस्तू उजव्या हातात आहे. रथ हा अतिशय सुंदर व कोरीव नक्षीयुक्त आहे. अशा प्रकारे गणपती मंदिरात वरील प्रकारच्या प्रतिमा पहावयास मिळतात.

**निकर्ष :**

1) हेमाडपंथी मंदिर शैलीचा अप्रतिम नमूना म्हणून मुदगल या गावातील मुदगलेश्वर व गणपती मंदिराकडे पाहता येते.
2) श्रीराम रावणवध करून परत आयोध्येकडे जात असताना येथे थांबलेहोतेअशीअख्यायीका आहे.
3) महाराष्ट्रातील श्री क्षेत्र नाशिक त्र्यंबकेश्वरसारखे नागवळी विधी करणारे दुसरे स्थान महात्म्य आहे.
4) नारदमुनी, भगवान श्रीकृष्णव रुख्मिणी यांनी ह्या पावन भूमीवर काही दिवस वास्तव्य केल्याची अख्यायीकेतून माहिती मिळते.
5) मुदगल येथील मंदिर स्थापत्य निर्मितीचेएक कारण धार्मिक असल्याचे दिसून येते.

**संदर्भ सूची :**


1. रमेश बालवाड, आपला परभणी जिल्हा.
2. रा.नि.देशमुख, आपला परभणी जिल्हा
3. वै.शा.स. के. पंडितशास्त्री खाणोरी मुदगलकर,समग्र श्री मुदगल महात्म्य
4. प्रा.डॉ.सी.ग. देसाई (भाग 2रा), श्री मुदगल पुराण
5. वै.शा.स.के. पंडितशास्त्री खाणोरी,श्री गुरुलीलामृत
6. कि.का. चौधरी,महाराष्ट्र राज्य गॅझेटीअर.

# वारकरी संप्रदाय व समाज परिवर्तन

**डॉ. राजू शेषराव पोपळघट**
विभाग प्रमुख, समाजशास्त्र विभाग
राजर्षी शाहू कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पाथ्री

**सारांश :-**

संस्कृतीचे सामाजिकीकरण करून समाज परिवर्तनाच्या दिशेने मार्गक्रमण म्हणजे समाज परिवर्तन होय. कारण जगभरात प्रत्येक देशाची संस्कृती ही वेगवेगळी असली तरीही लेखनाच्या भाषा, बोली भाषेच्या, वर्तनाच्या, वेशभूषेच्या माध्यमातून एक संस्कृती एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे हस्तांतरित होत असताना दिसते. भारतीय इतिहासात विविध पंथ व संप्रदाय निर्माण होऊन त्यांनी भक्ती बरोबर सामाजिक प्रबोधन करण्याचे कार्य केले. मध्ययुगीन काळात अशा अनेक धर्म, पंथ संप्रदायांनी समाजामध्ये जनजागृतीची कार्य केलेले आहे. मानवतावादी दृष्टिकोनातून विकास साधण्यासाठी काही संत महांतांनी आपले पूर्ण आयुष्य वेचले आहे या विविध संप्रदायांनी व त्या संप्रदायातील विविध भागातील संतांनी समाज परिवर्तनासाठी धर्म पंथाचा आधार घेऊन समाज विकासाचा पाया रोला या परिवर्तनासाठी संतांनी आपल्या ओजस्वी वाणी व साहित्याच्या माध्यमातून एक प्रकारे मित्रहोच केला त्या अनुषंगाने इतिहास म्हणजे मानवाच्या मनातील सत्व प्रवृत्तीचा विकासाला चालना देणाऱ्या संत महानताच्या प्रयत्नांची कहाणी होय. महाराष्ट्रात मध्य काळात संत ज्ञानेश्वरांपासून वारकरी संप्रदायाचा प्रभाव वाढत गेला त्या अगोदर नाथ महानुभाव यासारख्या संप्रदायाचा विकास झालेला होता महाराष्ट्रात सांस्कृतिक जतन व संवर्धन करण्यात वारकरी पंथांचे खूप मोठे योगदान आहे.

**उद्देश :-**

1. वारकरी संप्रदायाचा मुख्य उद्देश म्हणजे लोकांना देवावर प्रेम करायला शिकवणे आणि त्यांच्यात धार्मिक आणि नैतिक मूल्यांची वाढ करणे.
2. या संप्रदायाने नेहमी समाजातील गरीब आणि दुर्बळ लोकांची बाजू बाजू घेणे आणि आधार देणे.

**गृहीतके :-**

1. वारकरी संप्रदाय भक्ती आणि नैतिक मूल्यांवर आधारित आहे. या संप्रदायाने लोकांना देवावर प्रेम करायला शिकवले आहे आणि त्यांच्यात धार्मिक आणि नैतिक मूल्यांची वाढ केली आहे.
2. वारकरी संप्रदायाने नेहमी समाजातील गरीब आणि दुर्बळ लोकांची बाजू घेतली आहे. त्यांनी जातीय भेदभावाला विरोध केला आहे आणि सर्वांना समान संधी मिळावी यासाठी प्रयत्न केले आहेत.
3. संतांनी लोकांना ज्ञानाचे महत्त्व पटवून दिले आहे आणि त्यांना अंधश्रद्धा दूर करण्याचा प्रयत्न केला आहे.
4. संप्रदायाने समाजातील संबंध सुधारण्यास मदत केली आहे.

**संशोधन पद्धती :-**

या संशोधन पेपरसाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे.

**वारकरी संप्रदाय व भक्ती मार्ग :-**

पंढरपूर तीर्थक्षेत्र येथील श्री पांडुरंग वारकरी संप्रदायाचे हे मुख्य दैवत असून हे ठिकाण महाराष्ट्रातील भीमा नदीच्या काठी वसलेले आहे. जो पांडुरंगाचे नामस्मरण करतात व पंढरपूरला नेहमीच वारीसाठी जातात त्यांना वारकरी असे म्हणतात. वारी या शब्दाचा अर्थ यात्रा, नियमित फेरी, व्रत,एरझारा असा असून वारकरी संप्रदाय हा पंढरपूरच्या विठोबाची संबंधित असलेला संप्रदाय आहे. या दृष्टीने वर्षातून आषाढी, कार्तिकी,माघी अथवा यापैकी एका शुद्ध एकादशीच गळयात तुळशीचे माळ घालून नियमाने जो पंढरपुरात जातो तो पंढरपूरचा वारकरी म्हटला जातो. त्यांच्या उपासनेचा जो मार्ग तो म्हणजे वारकरी संप्रदाय होय. संत बहिणाबाईंनी आपल्या एका अभंगात म्हटले आहे "ज्ञानदेवे रचिला पाया,उभारिले देवालया नामा तयाचा किंकर तेने रचिला ते आभार जनार्धन एकनाथ खांब दिला भागवत तुका झालासे कळस भजन करा सावकाश".

वरील अभंगावरून असे निदर्शनास येते की संत नामदेवांनी याचा पाया घातला वारकरी संप्रदाय सुरू केला. त्या अगोदर पुंडलिकाच्या काळात विठ्ठल भक्ती प्रचलित होती म्हणजे वारकरी संप्रदाय नेमका किंवा उगम पावला हे मात्र निश्चित सांगता येत नाही. वारकरी संप्रदायाचे उगम नेमका कधी झाला कोणत्या शतकापासून झाला हे जरी सांगता येत नसले तरी हा संप्रदाय बऱ्याच प्राचीन असावा असे वाटते.

**भक्ती मार्ग उदय :-**

भक्ती हा शब्द संस्कृत भाषेतून उदयाला आला असून संस्कृत मधील भज धातूपासून तयार झाला शब्द भक्ती त्याचा अर्थ सेवा करणे असा होतो. परमेश्वराबद्दल निश्चीम प्रेम म्हणजेच भक्ती हाच सर्व भक्ती पंथाचा व भक्ती चळवळीचा पाया आहे भक्तीचा अर्थच केवळ एकाच विश्रांता प्रति समर्पणाची भावना ठेवणे होय. मॅक्स वेबर यांच्या मते भक्ती हे तत्व व गिअर्सन यांच्या मते एकेश्वर वाद हे तत्व भक्ती पंथाने ख्रिश्चन धर्म पासून उचललेले आहे तर मुस्लिम धर्मातील सुफी संप्रदायापासून भक्ती पंथाचा उदय झाला असे ताराचंद यांच्यासारख्या विद्वानाला वाटते परंतु हे मत दुराग्रह दूषित असे वाटते भक्ती मार्गाचा उदय भारतात फार पूर्वीपासून झाल्याचे दिसते भारतात हिंदू धर्म हा सर्वात प्राचीन धर्मा असून त्यांचे मूळ सिंधू संस्कृतीपर्यंत जाते. सिंधू संस्कृतीमध्ये प्रथमतः मातृ देवी व पशुपतिनाथ पूजेचा उल्लेख सापडतो. भारतात भक्ती मार्गाचा उगम केव्हा झाला हे निश्चितपणे सांगता येत नाही ऐतिहासिक दृष्टिकोनातून विचार करता पाणीनी यांच्या अष्टयाध्यायी या व्याकरण पर ग्रंथात भक्तीचा उल्लेख सापडतो त्यापूर्वी वैदिक व उपनिषद साहित्यात सर्वप्रथम परमेश्वर प्राप्ती भक्तिमार्गे चे उपाय सांगितलेले दिसतात ते म्हणजे ज्ञानकांत व कर्मकांड कालांतराने कर्मकांड व ज्ञानकांड ज्ञानयोग कर्मयोग भक्तीयोग व राजीव या योगशास्त्रीय परिभाषेत ते मांडले. परमेश्वराचे यथार्थ ज्ञान होण्यासाठी ज्या चित्तशुद्धीची आवश्यकता असते ती चित्तशुद्धी करण्याचा सुलभ व सर्वश्रेष्ठ उपाय म्हणजे भक्तीयोग होय. भगवत पुराण व वैष्णव ग्रंथातील ज्ञानमार्गापेक्षा अस्तंग मार्गापेक्षा भक्ती मार्गाचे महत्व अधिक प्रतिपादित केलेले आहे.

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जडणघडणीत वारकरी संप्रदायाचे महत्त्वाचे योगदान आहे. विठ्ठल भक्तीच्या माध्यमातून समाजात अमुलाग्र परिवर्तन घडवण्याचे अनमोल कार्य वारकरी, संतांनी केले आहे. संत ज्ञानेश्वरा अगोगर वारकरी संप्रदाय अस्तित्वात असला तरी त्यांनी आपल्या ग्रंथामधून व कार्यातून संप्रदायास मूर्त रूप दिले आहे. संत ज्ञानेश्वरांना समाजाने वाळीत टाकले असतानाही हे विश्वचि माझे घर अशी विश्वात्मक शिकवण दिली आहे. आम्हा सापडले वर्म करू भागवत धर्म असे म्हणणाऱ्या संत नामदेवांनी पंढरपूरच्या वाळवंटात सर्व जाती-धर्माच्या भक्तांना कीर्तनाच्या माध्यमातून एकत्र आणले. समाजात लोक शिक्षकाची भूमिका पार पाडत असताना संत एकनाथांनी भारुड व गवळणीच्या माध्यमातून अशिक्षित समाजात जागृती घडून आणली. वारकरी संप्रदायाचे कळस असणाऱ्या संत श्रेष्ठ जगद्गुरु संत तुकारामांची अभंगवाणी आजही आपल्या मनाला साथ घालत आहे. संत मुक्ताई, संत जनाई, संत चोखोबा, संत गोरोबा, या संत मेळाव्याचे कार्य अनमोल आहे आजच्या जागतिकीकरणाच्या काळातही वारकरी संतांची नीतिमूल्य ची शिकवण समाज परिवर्तनासाठी उपयुक्त ठरत आहे.

**वारकरी संप्रदायातील संतांची परिवर्तनाचे कार्य (चळवळी)**

**मानवतावादी दृष्टिकोन जोपासणे :-**

मध्ययुगीन कालखंडामध्ये भारतावर मुस्लिम सम्राटाने आपले अधिराज्य गाजवून भारताची खूप मोठ्या प्रमाणात लूट केली. भारतामध्ये दुही निर्माण झाली. तात्कालीन मध्ययुगीन भारत हा दोन ध्रुवाप्रमाणे दोन धर्मात विभागला गेला होता. एका बाजूला मुस्लिम समुदाय जो विजेता असल्यामुळे त्या अभिवेशात होता. तर दुसरीकडे हिंदू जो पराजयामुळे अंतर्मनातून खचत चालला होता. त्यात मुस्लिम धर्मातील कट्टरवादी उलेमा, वर्ग या दोन समुदायातील दरी वाढण्याचा व संपवण्याचा करण्याचा प्रयत्न करत होता. अशा परिस्थितीत संतांनी समाजात ऐक्य निर्माण करण्यासाठी प्रयत्न केल त्याचा परिणाम दोन्ही समुदायातील कट्टरवादी तीनवर झाला. परंतु जनमानसात संतांनी रुजवलेल्या उत्कृष्ट विचारांची बीजे कायम रुजले व त्यांनी ईश्वर व अल्ला की त्या परमेश्वराचीच रूपे आहेत व ती एक आहेत ही भावना वाढीस लावली. यामुळे दोन्ही धर्माची व्यक्ती आपापसात वाद न घालता समाज परिवर्तनासाठी व एकोपा टिकवण्यासाठी प्रयत्न करू लागले.

**अस्पृश्यता निवारण व जातीव्यवस्थेस कडाडून विरोध :-**

भारतामध्ये समाज परिवर्तनामध्ये सर्व जाती धर्माच्या संतांनी सहभाग नोंदवून आपली मानव जात ही एक असून समाजात कुठल्याही प्रकारची वर्णव्यवस्था नाही असे जगाला ठासून सांगितले. तसेच वारकरी संप्रदाय हा कोणा एका जातीपुरता मर्यादित नसून तो सर्व जाती धर्मातील लोकांना भक्तीचा मार्ग मोकळा करून देणार आहे. अठरापगड जातीचे संत भेदभाव विसरून एका भक्तीच्या छायेखाली आल्याने शेकडो वर्ष सामाजिक विषमतेच्या चटक्याने हुरपळून गेलेल्या समाजात एक प्रकारे नवचैतन्य निर्माण झाले. ग.बा. सरदार म्हणतात जातीव्यवस्थेला धक्का न लावता वारकरी संप्रदायांनी स्त्री शूद्रधिकांना आत्मविश्वासाचा मार्ग खुला करून दिला. तर भा.प. बहिरट म्हणतात संतांनी जाती मोडण्याची चळवळ केली नाही तर जातीच्या ज्या वर्णाचा गटात समावेश होतो ती वर्णव्यवस्था समाज रचनेतील समाज व्यवस्था साठी चालत आलेले व्यवस्था आहे हे ओळखून त्यातील मुरलेल्या विचाराचा द्वेष काढून टाकण्याचा प्रयत्न केला. संत नामदेव यांनी अस्पृश्य संत चोखोबा यांच्या मस्तकावर हात ठेवून त्यांना विठ्ठल मंत्राचा उपदेश केला. तात्कालीन समाज व्यवस्थेत ही बाब खूप मोठी होती. म्हणून श्री बारटक्के संत नामदेव यांना महाराष्ट्रातीलच नव्हे तर संपूर्ण भारतातील प्रथम अस्पृश्य उद्धारक असे संबोधतात.

**बोलीभाषा व लेखन :-**

विविध जाती-धर्माच्या संतांनी आपले विचार समाज परिवर्तनासाठी बोलीभाषेतून समाजालाआपल्या बेंबीच्या देठापासून सांगितले. यामुळे पंडिताची भाषा न वापरता स्वतःच्या बोली भाषेतले विचार जनतेला लवकर समजत असल्यामुळे जनतेमध्ये परिवर्तनास सुरुवात झाली. पंडिती भाषेचा अवडंबराला संतांनी छेद देऊन आपल्या तत्त्वज्ञानाचा प्रसार व प्रचार करण्यासाठी स्थानिक भाषेचा मोठ्या प्रमाणात वापर केला. संत ज्ञानेश्वर यांनी संस्कृत मधील भगवद्गीता-भावार्थ दीपिका या नावाने मराठीत भाषांतरित केली. त्यामुळे सामान्यांना भगवद्गीतेतील ज्ञानाची दारे खुली झाली. ज्ञानदेव म्हणतात माझा मराठीचे बोलू कौतिकेI परी अमृता ते पैजा जिंकेI ऐशी अक्षरे रसिकेI मिळविणे I ही प्रतिज्ञा बंदिस्त ज्ञान जनमानसापर्यंत तेवढ्याच योग्यतेने पोहोचविण्याचा आत्मविश्वास व्यक्त करीत आहे.

**अंधश्रद्धा निराकरण :-**

संत व वारकरी संप्रदाय हे कुठल्याही एका जातीपुरी मर्यादित नसून समाजातल्या चांगल्या व वाईट गोष्टी जनमानसांना समजून सांगण्याचं काम कीर्तनाच्या व लेखणीच्या माध्यमातून संतांनी केले. वारकरी संप्रदायाचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे समाजातील अंधश्रद्धा, कर्मकांड यांना विरोध करणे होय. तात्कालीन समाजात कर्मकांड, व्रतवैकल्य, बाह्य औदंबऱ्याला थारा न देता होता खरा धर्म बाजूला राहून लोक कर्मकांड अनिष्ट प्रथा परंपरा अंधश्रद्धांनाच धर्म मानून त्यांचे पालन करू लागले. संत नामदेव म्हणतात वृत्ततप नलगे करणे, न लगे तुम्हा तीर्था जाणे, तर संत एकनाथ महाराज म्हणतात केले काय जाऊन या तीर्थ, सर्वथा विषयाशी भुललांशी वरीदिवशी, शुद्ध अंतरी मलीन याचा अर्थ असा की तृष्णा, कामभावना, विषयाशी भुलल्यांनी कितीही तीर्थयात्रा, पूजा पाठ केले तरी ते फक्त त्यांचे वरवरचे दिसणारे रूप असते, परंतु अंतकरणातून ते मलिन असतात म्हणून संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम सारखी संत मंडळी अंतकरणाच्या, विचारांच्या, समाज परिवर्तनाच्या समाजातील अंधश्रद्धा दूर करून शुद्धतेवर भर देताना दिसतात.

**अपप्रवृत्तीशी दिलेल्या लढा :-**

विविध संतांनी आपापल्या कालखंडामध्ये समाजात पुढे येणाऱ्या अपप्रवृत्तीला कडाडून विरोध केला आहे. आजही समाजात पाहिले तर जाणवते की धर्म, राजकारण, शिक्षण, पूजास्थाने, संसार इत्यादी विविध क्षेत्रांमध्ये अपप्रवृत्तीचा सुळसुळाट झाला आहे. संत तुकाराम महाराजांनी तात्कालीन कालखंडातील अपप्रवृत्तीवर हल्ला चढविला आहे. अपप्रवृत्ती समाजाचे शोषण करून समाजाला नष्ट करतात अशा प्रवृत्तीच्या लोकांचा धिक्कार करताना संत तुकाराम महाराज म्हणतात.

धिक जिने तो बाईला अधीन<br>
पर लोक मान नाही दोन्ही ॥<br>
धिक जीने ज्यांचे लोभावरी मन<br>
अतित पूजन घडेच ना ॥

यातून संत तुकारामांनी बाई वेडा असलेला आळशी, झोपाळू, अदाची, विवेक नसणाऱ्या वृत्तीचा धिक्कार केला आहे. आजही या अपप्रवृत्ती मोठ्या प्रमाणात समाजात दिसतात. संत तुकारामांचा अपप्रवृत्तीचा विरोधाचा लढा बोलका आहे. आणि त्यातून समाज नीतिमान होण्यास मदतच होईल हे नक्की आहे.

**सामाजिक एकता व स्त्री शिक्षण :-**

वारकरी संप्रदायातील महिला संतांनी स्त्रियांच्या शिक्षणासाठी कार्य केले. संत जनाबाई, संत सोयराबाई आणि संत निर्मला यांनी स्त्रियांच्या जीवनात सुधारणा घडवून आणण्यासाठी प्रयत्न केले. वारकरी संप्रदायाने समाजातील लोकांना एकत्र आणून सामाजिक एकतेला प्रोत्साहन दिले. पंढरपूरची वारी हे याचे उत्तम उदाहरण आहे. वारीमध्ये सर्व जाती, धर्म आणि स्तरातील लोक एकत्र चालतात आणि भगवंताच्या नामघोषात तल्लीन होतात. वारकरी संप्रदायाने आजही समाजाला दिशा देण्याचे कार्य केले आहे. या संप्रदायाची शिकवण आजही लोकांना प्रेरणा देत आहे.

**समारोप :-**

वारकरी संप्रदायाने महाराष्ट्राच्या समाज जडणघडणीत मोलाची भूमिका बजावली आहे. या संप्रदायाने प्रेम, भक्ती आणि समानतेचा संदेश समाजात रुजवला. जातिभेद, अंधश्रद्धा आणि कर्मकांडांना विरोध करून समाजात प्रबोधन घडवले.वारकरी संप्रदायाने देवावर प्रेम करण्याचा आणि त्याची भक्ती करण्याचा मार्ग लोकांना दाखवला. यामुळे लोकांमध्ये सकारात्मकता आणि आशा निर्माण झाली. समानता: सर्व माणसे समान आहेत, हा संदेश वारकरी संप्रदायाने समाजात पसरवला. यामुळे गरीब, श्रीमंत, उच्च-नीच असा भेदभाव कमी झाला.कोणालाही त्रास देऊ नये, ही शिकवण वारकरी संप्रदायाने दिली. यामुळे समाजात शांतता आणि सलोखा निर्माण झाला.नेहमी सत्य बोलावे आणि सत्य आचरण करावे, हा संदेश वारकरी संप्रदायाने दिला. यामुळे लोकांमध्ये प्रामाणिकपणा वाढला.

**संदर्भ :-**


1. डॉ. अंतरकर शी.स. संतांचे तत्त्वज्ञान आणि धर्मविचार, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे
2. प्रा. देशमुख मोहन, धर्म आणि अंधश्रद्धा : एक सामान्य आकलन
3. मेनसे, कृष्णा, श्री बसवेश्वर ते श्री ज्ञानेश्वर एक चिंतन, संग्रह मुंबई
4. डॉ. फडकुले, निर्मलकुमार, संत साहित्य सौंदर्य आणि सामर्थ्य, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद.
5. भावळकर तारा, भक्ती आंदोलनाची, भावभूमी अंक, वर्ष दोन.
6. गुप्ता आर. के. मध्यकालीन समाज, धर्म, कला, येवम वास्तुकला, पॉईंटर पब्लिशर्स, जयपुर.
7. डॉ. वर्णेकर, श्री भा. भारतीय धर्म व तत्वज्ञान, म. वि. ग्रंथ निर्मिती मंडळ, पुणे.
8. इनामदार ह.वी. भक्ती गंगेच्या वाटेवर,
9. नेऊरगावकर स.के. संत तुकोबारायांची गाथा,

# प्राचीन भारतीय शिक्षण परंपरा व नविन शैक्षणिक धोरण

**संदिप महादेव फंड**
संशोधक विद्यार्थी
कला,वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, नारायणगाव

प्रस्तावना:-

समाज परिवर्तनशील आहे. समाजाच्या विचारांमध्ये वेळोवेळी बदल होत गेले. समाजात होत असलेल्या बदलानुसार शिक्षणाची उद्दिष्टेही बदलत राहिली. 'आधुनिक शिक्षण सिद्धांता'नुसार शिक्षणाची एकूण उद्दिष्टे प्राचीन भारतातील कोणत्याही ग्रंथात नमूद केलेली नाहीत. याचा अर्थ प्राचीन भारतीय तत्त्वज्ञांना याची माहिती नव्हती असे नाही. काळाच्या गरजेनुसार व उद्देशानुसार शिक्षणाची उद्दिष्टे बदलत व विकसित होत राहिली आणि त्याचे प्राधान्यक्रमही बदलत राहिले.[1] भारतात सन 2022-2023 पासुन नविन शैक्षणिक धोरण 2020 ची अंमलबजावणी सुरु झाली आहे. याचा मुख्य उद्देश जगभरातील इतर देशांच्या बरोबरीत शैक्षणिक दर्जा आणणे हा आहे. नविन शैक्षणिक धोरणा वरती प्राचीन भारतीय शिक्षण मुल्यांचा प्रभाव दिसुन येत आहे. यातून भारतीय मुल्य जगभर प्रसारित करुन शिक्षणाला वैदिक कालखंडा सारखे वैभव प्राप्त होण्यास खूप मदत होईल. शिक्षणाचा उद्देशात चरित्र निर्माण करणे,धर्माची वृध्दी,व्यक्तीचा सर्वांगीन विकास,शारिरीक मेहनत,सामाजिक जबाबदारी,संस्कृतिचे जपवनूक संरक्षण करणे या बाबी महत्वाच्या असत. प्राचीन कालखंडातील भारतातील शिक्षण गुरुकूल प्रकारातील होते गरु-शिष्य परंपरा अस्तित्वात होती. आपल्या भारतीय ऋषीमुनींनीही कोणत्या समाजाच्या प्रगतीसाठी शिक्षणाची कोणती उद्दिष्टे आवश्यक आहेत याचे मूल्यमापन केले होते.वैदिक काळातील शिक्षणाचा उद्देश आध्यात्मिक आणि मानवी गुणांमध्ये समतोल राखणे हा होता. या काळात त्यांना असे नैतिक आणि अध्यात्मिक शिक्षण मिळाले ज्याद्वारे ते समाजाप्रती असलेले त्यांचे कर्तव्य यशस्वीपणे पार पाडू शकले.[2]

बीजशब्द:-प्राचीन,मध्ययुगीन,आधुनिक शिक्षण पध्दत,परकीय आक्रमणे,नवनि शिक्षण धोरण

संशोधन पध्दती :-प्रस्तुत शोधनिबंधात प्राथमिक व दुययम साधनांचा आधार घेवुन वर्णनात्मक व विश्लेषणात्मक ऐतिहासिक संशोधन पध्दतीचा वापर केला आहे.

संशोधनाची उद्दिष्टये :-

1.प्राचीन भारतीय शिक्षण पध्दती बाबतचे साहीत्य अभ्यासणे

2.प्राचीन ते आधुनिक काळा पर्यंतच्या शिक्षण पध्दतीचा आढावा घेणे.

3.ब्रिटीश कालीन शिक्षणाचे परिणाम अभ्यासणे

4.नविन शैक्षणिक धोरणाचा अभ्यास करणे

**1.वैदिक कालखंड:- गुरुकूल/आश्रम :-**

प्राचीन काळात मुलाच्या अनौपचारिक शिक्षणाची सुरुवात 'विद्यारंभ' नावाच्या संस्काराने होत असे. या संस्कारापूर्वी पालकांकडून मुलाला सामान्य व्यावहारिक ज्ञान दिले जात असे. गुप्त कालखंडापर्यंत प्राथमिक व माध्यमिक शिक्षणा करिता पाठशाळा सुरू झाल्या होत्या त्याचा मध्ययुगाच्या सुरूवाती पर्यंत विकास होत गेला.

अनुशिष्टोडन्वसि पित्रेत्थेमिति होवाचं।,

बृहदारण्यक उप. 6.2.7.[3]

मुलाचे उपनयन संस्कार झाल्यानंतर शिक्षणास प्रारंभ होत असे. उपनयन संस्कार वयाच्या 4 ते 9 दरम्यान होत असत. गुरूच्या सानिध्यात आश्रमात राहून आणि गुरूंना त्यांच्या दैनंदिन जीवनात आणि कार्यात मदत करून त्यांनी जीवनाविषयीचे ज्ञानही संपादन केले. याला गुरुकुल पध्दत असे म्हणत असत ही पध्दत प्राचीन भारतीय शिक्षण परंपरेची मुख्य व्यवस्था होती.उपनिषदांमध्ये गुरुकूल ऐवजी आचार्यकुल असा उल्लेख आढळतो. प्राचीन काळात नागरीवस्ती पासुन नैसर्गिक वातावरणात गरुकूल असत. चांगला विद्यार्थी घडविणे,चांगले संस्कार व सवयी चांगला सहवास याचा विचार करुन दिनचर्या तयार केली जात असे. वेदांच्या शिक्षणा बरोबर पुराणांचाही अभ्यास केला जात असे. शिष्याच्या प्रतिभेचा

विचार करुन त्याच्या गरजा समजावून घेतल्या जात असत. जो पर्यंत शिष्याला ज्ञानप्राप्ती किंवा एखाद्या विषयाचे सखोल ज्ञान मिळत नसे तोपर्यंत गुरु शिष्याला शिकवत असे समावर्तन समारंभ झाल्यानंतर शिष्य घरी जात असे, शिक्षणाचा कालखंड साधारण 12 वर्षांचा होता.[4]

वरिल अभ्यासाशिवाय पुढील काही जीवनावश्यक बाबींचे शिक्षण दिले जाई 1.गायन, 2.वादन, 3.चित्रकला,4.गणित,5.नृत्य 6.मोजणी 7.यंत्र 8.मुतिकला, 9.शेती, 10पशुपालन, 11.वाणिज्य, 12.चिकित्सा, 13.विधी, 14.प्रशासकीस प्रशिक्षण, 15. धनुर्विद्या व इमर सैनिकी शिक्षण, 16.मजुरी 17.विष बाधा कमी करण्याचे शिक्षण 18.गुप्त धन शोधणे. असे प्रशिक्षण प्राचीन भारतातील तक्षशीला, नालंदा, विक्रमशीला, वल्लभी अशा जागतिक दर्जाच्या संस्थांनी बहुशाखीय शिक्षण आणि संशोधनाची उच्च मानके तयार केली होती आणि वेगवेगळी पार्श्वभूमी असलेले आणि वेगवेगळ्या देशातील विद्वान आणि विद्यार्थी येथे शिक्षणासाठी येत असत. गणित, खगोलशाख, धातुशास्त्र, वैद्यकशास्त्र आणि शल्यचिकित्सा, स्थापत्य अभियांत्रिकी, स्थापत्यविद्या, जहाज बांधणी आणि नौकानयन, योग, ललित कला, बुद्धीबळ आणि इतर अनेक क्षेत्रातील जागतिक ज्ञानात मोलाची भर घातली. भारतीय संस्कृती आणि तत्त्वज्ञान यांचा जगभर खूप मोठा प्रभाव आहे.[5]

**जैन मठ :-**

जैन मठ हे बौद्ध विहारांच्या (किंवा मठांच्या) मॉडेलवर बांधले गेले होते आणि तेथे तीर्थंकर म्हणून ओळखल्या जाणा-या जैन भिक्षूंनी चर्चेत भाग घेतल्याचे सांगितले जाते अशा महत्त्वाच्या केंद्रांमधील वादविवादांच्या संदर्भावरून हे सिद्ध होते. जैन मठ बिहार, गुजरात आणि कर्नाटकात विखुरलेले होते. अनहिलवाडचा कुमारपाल चालुक्य आणि त्याच्या मंत्री मंडळातील लोकांनी अनेक जैन विहार बांधले असे म्हणतात.[6]

**बौद्ध मठ :-**

सुरुवातीला बौद्ध धर्मीय शिक्षण फक्त मठात राहणा-यासाठीच होते. बौद्ध धर्माची दीक्षा घेतलेल्या व्यक्तिकरिता मर्यादित होते. बौद्धधर्मीय शिक्षण संसारात पडणा-यांसाठी नव्हते, परंतु नंतर सामान्य जनतेसाठी शिक्षणाची सुरुवात झाली. बौद्ध धर्मातील शिक्षणाचा मुख्य हेतू 'निर्वाण' होता. सूक्त, विनय आणि धर्म या धार्मिक ग्रंथांचा अभ्यास करावा लागे. भारतातील असंख्य बौद्ध मठांचा एक मौल्यवान लेखाजोखा आपल्याला अनेक चिनी यात्रेकरूंच्या प्रवासातून मिळतो.भारतात ज्ञानार्जनासाठी इतर देशातील लोक येत असत. आश्रम व मठ शिक्षणाची केंद्रे बनली होती.[7] पुढे जाऊन अशा शिक्षण केंद्रांना राजाश्रय मिळाला त्यामुळे निवासव्यवस्था व जेवण याची उत्तम प्रकारे सोय केली जात होती. विनामुल्य शिक्षण उपलब्ध होते.चीनी प्रवाशी हु यत्संग हा नालंदा विद्यापीठात राहीला होता तसेच त्याने तेथे व्याख्याने दिली होती. पुस्तकालयाची इमारत 09 मजली होती असा उल्लेख त्याने त्याच्या प्रवासवर्णनात केला आहे.[8]

**2) मध्ययुगीन कालखंड:-**

**मुस्लिम शिक्षण -**

भारतावरती नेहमी परकीय आक्रमणे सुरु होती.आकमणसोबत त्यांची संस्कृती लादण्याचा प्रयत्न केला जात असे. शैक्षणिक संस्था लुटीच्या उद्देशाने अनेक आक्रमकांनी लुटली त्यामध्ये हून व बंगाल मधील गौड राज्यकर्ते देखील सामील होते. 1192 मध्ये बखतियार खिलजी ने हल्ला केला त्यावेळी 1000 शिक्षक व 10000 विद्यार्थी होते. असंख्य पुस्तके ग्रंथालयात होती तेथील शिक्षक व विद्यार्थ्यांची हत्या करण्यात आली व ग्रंथालय ताळून टाकण्यात आले.ग्रंथसंपदा एवढया मोठया प्रमाणात होती कि, 03 महीने पुस्तके जळत होती.[9] त्यातुन पुन्हा उभारी घेता आली नाही.कारण मध्ययुगात भारतात मोठया प्रमाणात मुस्लीम राज्यकर्ते सत्तेत होते. यातील अनेक राजे इस्लाम धर्माचे कट्टर अभिमानी होते, तर काही बाखियार, अल्लाउद्दीन, फिरोज, औरंगजेब हे कट्टर इस्लामपैकी होते. शिवाय त्यांनी हिंदूच्या शिक्षणाला विरोध केला. मुस्लिम धर्मप्रसार हेसुद्धा एक शिक्षणाचे ध्येय होते. ज्ञानाचा प्रसार, नीतिमत्तेची वाढ, इस्लाम कायदे तत्त्वे, रूढी परंपरांचा विकास ही प्रामुख्याने शिक्षणाची ध्येय होती. व्यक्तीच्या जीवनात धर्माला महत्त्वाचे स्थान आहे. त्यामुळेच त्यांनी 'मक्ताब' आणि 'मदरसा' मशिदीच्या जवळपास किंवा मशिदींचा एक भाग म्हणूनच स्थापन केले. मुस्लीम शिक्षण संस्थांमध्ये प्राथमिक शिक्षणात मक्ताब, खानकाह, दरगाहे, कुराणशाळा यांचा समावेश होत असे. दिल्ली, आग्रा, जानपूर, लाहोर, सियाल कोट, अजमेर, लखनौ, फिरोजखान, मुल्तान, गोवळकोंडा, हैदराबाद, विजापूर येथे उच्च शिक्षण देणा-या संस्था होत्या.[10]

दक्षिण भारतात देवालयातून विद्यापीठासारखेच शिक्षण दिले जाई. संस्थानिक, धनिक लोक त्यांना अर्थसहाय्य करीत. त्या काळात विशिष्ट पध्दती अशी काही अस्तित्त्वात नव्हती. असे दिसते.एखादा उत्साही माणूस गावातील मुलांना जमवून काही प्राथमिक गोष्टी शिकवीत असे. श्रीमंत किंवा बडे लोक चांगला शिक्षक घरी बोलावून त्यांच्या मुलांना शिक्षण देत असत.[11]

तात्या पंतोजीच्या शाळा म्हणून ओळखल्या जाणा-या शाळा त्या काळात शहरात आणि खेड्यात ब-याच असत. शाळा म्हटले तरी त्या आत्ताच्या पद्धतीच्या नसत. देऊळ, चावडी किंवा एखाद्या सुयोग्य अशा सार्वजनिक ठिकाणी त्या भरत. मासिक फी ऐवजी पंतोजींना दक्षिणा किंवा शिधा देण्यात येई. या शाळा फक्त मुलांसाठी असत. मुलींना शिक्षण द्यावे ही कल्पनाच नव्हती. अशा शाळांचे जाळे महाराष्ट्रभर पसरले होते. या शाळांद्वारा साक्षरतेचे कार्य व्यवस्थित चालू होते.[12]

3)आधुनिक कालखंड:-

ब्रिटीश कालखंडातील शिक्षण :-

1818 साली पेशवांचा पाडाव झाला व सुपर्ण भारतावर इंग्रजी सत्तेचा अंमल सुरू झाला प्राचीन कालखंडात ज्या प्रमाणे ज्या ज्या धर्माय राजाश्रय लाभला त्या त्या धर्माने स्वत:चा धर्म विचार वाढविण्यासाठी प्रथम शिक्षण पध्दतीत बदल करण्याचा प्रयत्न केला होता.त्यास ब्रिटीश देखील अपवाद नव्हते. 1815 साला पासुन भारतात ख्रिश्चन मिशनरींनी शिक्षणप्रसार कार्याची सुरुवात केली व याचा उपयोग धर्म प्रसारा करिता करत असत. इंग्रजी भाषा ज्ञानाची गुरुकिल्ली आहे. ती व्यापार दळणवळणाची भाषा आहे. 'वाणीने, रक्ताने हिंदू पण अक्षराने इंग्रज त्यांना हवे होते.' त्यामुळेच त्यांनी इंग्रजी शिक्षणाचा आग्रह धरला.[13] वसाहतवादी दृष्ट्रीकोनातून मेकॉले याने शिक्षणाचा पसार केला होता. वुडच्या शैक्षणिक धोंरणात देशी भाषांनाही महत्व दिले गेले. 1.प्राथमिक शाळा 2.माध्यमिक शाळा 3.महाविद्यालये 4.विद्यापीठ असे स्तर करण्यात येवुन क्रमबध्द पध्दतीने रचना करण्यात आली.शाळांना अनुदान देण्यात आले,शिक्षण देण्यासाठी प्रशिक्षण वर्ग सुरु केले. हंटर आयोग नेमण्यात आला.त्यात प्रामुख्याने प्राथमिक शिक्षणाचा प्रश्न सोडविणे, महिलांचे,मागासलेल्या जाती जमाती चे शिक्षण,मुस्लिम शिक्षण, आदिवासी व धार्मिक शिक्षण या बाबींचा प्रामुख्याने विचसार केला गेला.लॉर्ड कर्झन याने 1902 साली भारतीय विद्यापीठ आयोगाची स्थापना केली.[14]

स्वातंत्र्योत्तर शिक्षण आयोग :-

भारताच्या स्वातंत्र्यानंतर उच्च शिक्षण आणि माध्यमिक शिक्षणासंदर्भात अनुक्रमे 1948-49 डॉ. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखालील 'विद्यापीठ शिक्षण आयोग' आणि 1952-53 चा डॉ. मुदलियार यांच्या अध्यक्षतेखालील 'माध्यमिक शिक्षण आयोग' नियुक्त करण्यात आला. परंतु संपूर्ण शिक्षणाचा एकसंध विचार करण्यासाठी भारतीय संविधानातील उद्दिष्ट्ये व समाजवादी रचनेची ध्येये समोर ठेवून संपूर्ण शिक्षण व्यवस्थेसंबंधी एक स्वंतत्र आयोग नियुक्त करण्याचे निश्चित झाले व त्यासाठी 1964 मध्ये भारतीय शिक्षण आयोगाची अर्थात कोठारी आयोगाची नियुक्ती झाली. अभ्यासगटात शालेय शिक्षण, उच्चशिक्षण, तंत्र शिक्षण, कृषी शिक्षण, प्रौढ शिक्षण व दर्जा, विद्यार्थी कल्याण, नवीन तंत्रे व पद्धती मनुष्यबळ, शैक्षणिक प्रशासन, शैक्षणिक अर्थव्यवस्था यांचा समावेश केला तर, कार्यगटात महिलांचे शिक्षण, मागासवर्गीयांचे शिक्षण, शाळा इमारती, शाळा समूह संबंध, सांख्यिकी, पूर्व माध्यमिक शिक्षण व शालेय अभ्यासक्रम यांचा समावेश केला.[15]

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण -1986

1.शिक्षण समाज आणि विकास 2.शैक्षणिक विकासाचे विहंगमावलोकन

3.समीक्षणात्मक मूल्यमापन 4.शैक्षणिक पुर्नरचनाविषयक दृष्ट्रीकोन

सुधारित राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (1992)

1986 च्या धोरणामध्येच असे सूचित करण्यात आले होते की, दर पाच वर्षांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या कार्यवाहीचे आणि परिणामाचे पुनरावलोकन केले जावे. त्यानुसार 7 मे,1990 रोजी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची समीक्षा करण्यासाठी भारत सरकारने आचार्य राममूर्ती यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. या समितीने आपला अहवाल 26 डिसेंबर, 1990 रोजी सादर केला. मार्च 1991 मध्ये या अहवालावर विचार करण्यासाठी केंद्रीय शिक्षण सल्लागार मंडळाच्या अध्यक्षांनी एन. जनार्दन रेड्डी यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. जनार्दन रेड्डी समितीने आपला अहवाल 1992 मध्ये सादर केला.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण -2001

1.अभ्यासक्रम, ज्यात काही नवी बाबींचा गाभाभूत घटकांत समावेश. 2.विषय योजना.
3.पाठ्यक्रम व पाठ्यपुस्तके. 4.तासिकेचा कालावधी.
5.दैनंदिन अध्यापनाचा कालावधी. 6.मूल्यमापन योजना-श्रेणी पद्धतीचा अवलंब.
7.सहामही परीक्षा (5 वी ते 12 वी) अवलंब. 8.विद्यार्थ्यांना उत्तीर्ण अथवा अनुत्तीर्ण जाहीर न करणे. 9.इ. 10 वी अखेर मंडळाने परीक्षा न घेणे. 10.माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावर सहामाही अभ्याक्रम. 11.सर्व स्तरांवर किमान अध्ययनक्षमता.

**राष्ट्रीय ज्ञान आयोग व राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा 2005**

**आयोगाची उद्दिष्ट्ये :**

1.एकविसाव्या शतकातील ज्ञानविषयक आव्हानांना तोंड देऊ शकेल अशी उत्कृष्ट व्यवस्था निर्माण करणे. 2.विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रात ज्ञानविषयक सर्जनाला प्राधान्य देणे.3.स्थानिक कल्पकता व संशोधनाला प्रवृत्त करून शेती, आरोग्य व उद्योग अशा नाना क्षेत्रांमध्ये नवज्ञानाचा अधिकाधिक उपयोग करणे. 4.बौध्दिक संपदा अधिकाराशी संलग्न संस्थांचे व्यवस्थापन सुधारणे.[16]

**राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020**

**या धोरणाची तत्त्वे**

या शिक्षण व्यवस्थेचा हेतू तार्किक विचार आणि कृती करण्यासाठी सक्षम असलेल्या आणि (सहृदयता) करुणा, सहानुभूती, धैर्य आणि चिकाटी, विज्ञानाधिष्टीत कल व रचनात्मक कल्पनाशक्ती, नैतिक बांधिलकी आणि मूल्वे असलेल्या चांगल्या व्यक्ती विकसित करणे असा आहे. याचा उद्देश आपल्या घटनेद्वारे परिकल्पित न्याय्य, सर्वसमावेशक आणि बहुलताबादी समाजाच्या निर्मितीत सहभाग घेणारे, कार्यक्षम, आणि चांगल्याप्रकारे योगदान देणारे नागरिक तयार करणे, असा आहे.[17]

**या धोरणाची दूरदृष्टी**

या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची दूरदृष्टी, ईप्सित भारतीय मूल्यांपासून विकसित केलेली, सर्वांना उच्च-गुणवत्तेचे शिक्षण उपलब्ध करून देऊन, त्याद्वारे भारताला एक जागतिक ज्ञान-महासत्ता बनवून भारताचे एका न्याय्य आणि चैतन्यमय ज्ञान-समाजात शाश्वतपणे परिवर्तन करण्यात प्रत्यक्षपणे योगदान देणारी अशी शिक्षणव्यवस्था निर्माण करणे हे आहे. या धोरणाची दूरदृष्टी अशी आहे की, भारतीय असल्याचा सखोल अभिमान विद्यार्थ्यांच्या केवळ विचारांमध्येच नव्हे तर त्यांच्या व्यवहारात, बुद्धीमध्ये आणि कृतीमध्येदेखील रुजवणे, तसेच मानवी हक्क, शाश्वत विकास आणि जीवनमान यांच्याशी जवाबदारीपूर्ण बांधिलकीचे समर्थन करणारे ज्ञान, कौशल्ये, मूल्ये आणि स्वभाव विकसित करणे, जेणेकरून ते खऱ्या अर्थाने एक वैश्विक नागरिक बनतील.[18]

सारांश :-

प्राचीन भारतात गुरुकुल पद्धती शिक्षणासाठी अवलंबली गेली होती. शिक्षणासाठी विदयापीठे उभारण्यात आली होती अनेक विद्यापीठांमधून विद्यार्थी शिक्षण घेत होते. प्राचीन भारताच्या इतिहासाचा अभ्यास केला असता असे निदर्शनात येते कि अनेक परकीय आक्रमणे भारता वरती झाली त्यांनी प्रत्येक वेळी सांस्कृतिक सरमिसळ करण्याचा प्रयत्न केला प्राचीन भारतातील प्रसिध्द असणारी विद्यापीठे नष्ट केली अनेक पुस्तके जाळली तरी देखील स्वत:चे अस्तित्व भारतीय संस्कृतिने टिकवून ठेवले. आश्रमातील गुरु-शिष्य परंपरा सध्या काळाच्या ओघात लुप्त झाली आहे. ब्रिटीश कालखंडात भारतामध्ये युरोपीय शिक्षण व्यवस्था लागू केली गेली.जेते नेहमी पराभूत समाज/संस्कृती वरती स्वतःचा प्रभाव टाकतात. भारतीय शिक्षण परंपरेत इस्लामीक आक्रमकांनी हिंदूच्या शिक्षणास विरोध केला होता. पुढे जावून ब्रिटीशांनीही भारतातील शिक्षण व धर्माच्या बाबत तेच धोरण अवलंबले.ख्रिश्चन मिशनरींच्या सहायाने शिक्षण व धर्माचा प्रसार सुरु केला.लॉड मेकॉलेने शैक्षणिक धोरण राबविले त्यात भारतीय भाषंाचे महत्व कमी केले व इंग्रजी ही ज्ञान भाषा आहे हा विचार तत्कालीन समाजात रुजवला गेला. त्यांना ब्रिटीश शासनास मानणारा रंग रुपाने ब्रिटीश नसेल परंतु विचारांनी ब्रिटीश असेल असे लोक घडवायचे होते. परंतु भारतातील विचारवंतानी त्या ज्ञानाचा उपयोग करून राष्ट्रभावना निर्माण केली देशाला 1947 साली स्वातंत्र्य मिळाले. त्यानंतर स्वतंत्र भारतातील शिक्षणा करिता 1948, 1964, 1986, 1992, 2001, 2005 मध्ये शैक्षणिक धोरणे राबविली गेली. प्राचीन आणि सनातन भारतीय ज्ञान आणि विचारांची समृद्ध परंपरा लक्षात घेऊन नविन

शैक्षणिक धोरण तयार करण्यात आले आहे. पुढील पिढ्यांसाठी जागतिक दृष्ट्या महत्त्वाच्या असलेल्या या बारशाचे केवळ संवर्धन आणि जतनच नव्हे तर त्यावर संशोधन करणे, त्यात वाढ करणे, आणि आपल्या नवीन शिक्षणव्यवस्थेत त्यांचा नव्याने उपयोग करणे महत्त्वाचे आहे.

संदर्भ सुची :-

1. सिंह किरन, प्राचीन भारतीय शिक्षा व्यवस्था, शिवांक प्रकाशन, नई दिल्ली, 2009, पृ. 25
2. कित्ता, पृ.25
3. कित्ता, पृ.55
4. तांबोळी शमसुद्दिन, महाराष्ट्राचा शैक्षणिक विकास,डायमंड पब्लिकेशन,पुणे-2009 पृ.2
5. शिक्षण मंत्रालय, भारत सरकार, राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020
6. निगम बी.के. व शर्मा एस.आर., हिस्ट्री ॲन्ड प्रॉब्लेमस् ऑफ इंडीयन एज्युकेशन, कनिष्क पब्लिशर, दिल्ली-2023, पृ.61
7. तांबोळी शमसुद्दिन, उपरोक्त, पृ.3
8. https://youtu.be/MiwpeURLMXU?si=TjQEkHORy_MP2CpM
9. 9https://www.bbc.com/marathi/articles/c51le3g7q23o
10. तांबोळी शमसुद्दिन, उपरोक्त, पृ.6
11. देगलूरकर गो.बं., पेशवेकालीन समाज आणि प्रशासन, महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक मंछळ, पुणे, 2023, पृ.76,
12. कित्ता, पृ.77
13. तांबोळी शमसुद्दिन, उपरोक्त, पृ.13
14. तांबोळी शमसुद्दिन, उपरोक्त, पृ. 22
15. तांबोळी शमसुद्दिन, उपरोक्त, पृ.42
16. तांबोळी शमसुद्दिन, उपरोक्त, पृ.14
17. शिक्षण मंत्रालय,भारत सरकार,राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 पृ. 5
18. कित्ता, पृ. 6

# मुळशी सत्याग्रहातील शेतकरी लढा

**डॉ. भूषण गोविंद फडतरे**
इतिहास विभाग प्रमुख, भारतीय जैन संघटनेचे
कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, वाघोली, पुणे.

**प्रस्तावना:**

विसाव्या शतकामध्ये भारतीय उद्योगधंद्याने प्रगती घेतलेली होती. उद्योगधंद्याच्या वाढीसाठी स्थापन झालेल्या 'भारतीय औद्योगिक आयोग' स्थापन झालेला होता. टी.एच. हॉलंड या ब्रिटिश शास्त्रज्ञाच्या अध्यक्षतेखाली काही ब्रिटिश उद्योगपती, तंत्रज्ञ, अधिकारी, पंडित मदनमोहन मालवीय, राजेंद्रनाथ मुखर्जी व दोराबजी जमशेटजी टाटा (भारतीय उद्योगपती) हे सर्व आयोगाचे सदस्य होते. या आयोगाने कारखानदार आणि अधिकारी यांच्या साक्षी घेतलेल्या होत्या. 'टाटा हायड्रो-इलेक्ट्रिक पॉवर वर्क्स' या लोणावळयाच्या कंपनीतर्फे आर.बी. जॉयनर यांच्या साक्षीनुसार, 'भारतात उद्योगधंद्याच्या वाढीसाठी जलविद्युत निर्मिती झाली पाहिजे. त्यासाठी सरकारने खाजगी भांडवलदारांना मदत केली पाहिजे.' औद्योगिक आयोगाच्या शिफारशीनुसार सरकारने देशभर 1918 मध्ये जलविद्युत सर्वेक्षण करण्याचा निर्णय घेतला. मुंबई प्रांतात भाटघर, लोणावळा, कोयना येथून निर्माण होणाऱ्या वीज निर्मितीचा अहवाला सोबत मुळशीमधील निळा-मुळा या सुरू असणाऱ्या प्रकल्पाची ही माहिती सरकारकडे दिलेली होती.

जमशेटजी टाटा यांचे ज्येष्ठ चिरंजीव दोराबजी टाटा यांनी 'टाटा हायड्रो-इलेक्ट्रिक पॉवर सप्लाय कंपनी लिमिटेड' या नावाने कंपनी सुरू केलेली होती. लोणावळा, वळवण आणि शिरवटा येथील धरणे पूर्ण होऊन तेथून वीज निर्मिती होऊ लागली. मुंबईत कोळशाचा वापर होणाऱ्या कारखान्यांना आता वीज मिळू लागली. दिवसेंदिवस मुंबईमध्ये वाढणाऱ्या उद्योगधंद्यांना विजेची मागणी वाढत असल्याचे टाटांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी आणखी वीज निर्मितीसाठी पुढाकार घेतला. कावेरी नदीवरील वीज निर्मिती प्रकल्प यशस्वी करणारे आणि पुढील काळात मैसूर सरकारचा मुख्य वीज अभियंता म्हणून काम पाहिलेले एस. पी. गिब्जची टाटांच्या प्रकल्पासाठी मुख्य व्यवस्थापक म्हणून निवड झाली. मुळशीजवळील निळा व मुळा नद्यांच्या संगमावर मोठे धरण बांधले जाणार असून त्यामध्ये 18000 दशलक्ष घनफूट पाणी साठणार होते. ते पाणी मोठ्या नळांनी सह्याद्रीच्या डोंगरातून भिरा येथे बांधल्या जाणाऱ्या वीज निर्मिती केंद्राला पुरविण्यात येणार होते. या केंद्रातून 1 लाख 50 हजार अश्वशक्ती वीज निर्माण होणार होती. विजेच्या या उत्पादनामुळे मुंबईतील गिरण्यांना कोळशावरील खर्च कमी होणार होता. कोळसा वाहतुकीसाठी लागणाऱ्या वाघिणी इतर वाहतुकीसाठी वापरता येणार होत्या. विजेमुळे कापड गिरण्यांची संख्या वाढणार असल्याने त्यांच्या उत्पादनातही वाढ होणार आहे असे टाटा कंपनीचे मत होते. पण या धरण बांधणीमुळे मुळशी पेट्यातील मावळे, सावकार, शेतकरी आणि त्यांचे नेते यांना मुळशीतील लोकांची परिस्थिति बिकट होणार असल्याचे दिसून येत होते. या योजनेमुळे मुळशी जवळील 54 गावातील लोकांना विस्थापित व्हावे लागणार होते म्हणून विस्थापित शेतकऱ्यांना न्याय मिळावा यासाठी विनायक भुस्कुटे, सेनापती बापट, शंकरराव देव, बाळूकाका कानिटकर, न. चिं.केळकर, शिवराम परांजपे यांनी नेतृत्व केले.[1]

**मुळशी सत्याग्रहास प्रारंभ :**

मुंबई सरकारने 24 मार्च 1919 रोजी टाटा पावर कंपनीच्या मुळशी योजनेस मान्यता दिली. जून 1919 पासून जमीन संपादन करण्याची प्रक्रिया सुरू झाली. टाटा कंपनीने यापूर्वी लोणावळयाच्या परिसरात अशा योजना राबविल्या होत्या. त्यामुळे तेथील शेतकऱ्यांची दुर्बल स्थिती कशा स्वरूपात झालेली होती. त्याच्या वार्ता मुळशी पेट्यातील लोकांना मिळत होत्या. जमीन संपादन कायद्याखाली लोकांना नोटीसा येऊ लागल्याने त्यांना पुढील संकटाची चाहूल लागली. सर्वात प्रथम 26 आणि 27 डिसेंबर 1919 रोजी आवळस आणि मुळशी पेट्यातील महत्त्वाच्या गावांमध्ये सभा घेतल्या. केसरीच्या 30 मार्च 1920 च्या अंकात 'घाबरलेली रयत' या नावाने प्रसिद्ध झालेल्या पत्रातील महत्त्वाचे उल्लेख म्हणजे, 'टाटांच्या धरणामुळे मुळशी पेट्यातील 37 गावे पाण्याखाली जाणार होती. त्यामुळे त्या गावांच्या परिसरातील सुपीक जमीन पाण्याखाली जाणार असून अनेक लोक विस्थापित होणार होते. विस्थापित शेतकऱ्यांना इतर कोणत्या गावातील, कोणती

जमीन, जमिनीचा मोबदला याबद्दल माहिती कोठेच दिली जात नव्हती. शेतकऱ्यांची इतर ठिकाणी सोय झाल्यावरच स्थलांतर झाले पाहिजे. तसेच हे सर्व करण्यापेक्षा मुंबईच्या गिरण्यांना विजेचा पुरवठा थोडा कमी झाला तरी चालणार नाही काय?' असा प्रश्न विचारलेला आहे.[2]

मुळशीतील लोकांवर होणाऱ्या अन्यायाबद्दलच्या बातम्या सातत्याने केसरीमध्ये प्रसिद्ध होऊ लागल्या त्या विनायकराव भुस्कुटे यांच्या वाचनात येऊ लागल्याने ते मुळशी पेट्यात लोकांच्या भेटी घेऊ लागले. विनायकराव भुस्कुटे यांची पहिली सभा आंबवणे (मुळा नदीच्या उगमस्थान जवळील गाव) येथे झाली. दुसरी सभा आवळस खोऱ्यातील शिरवलीमध्ये तर तिसरी सभा ताम्हिनी खोऱ्यातील मल्लिकार्जुन मंदिरात झाली. या तिन्ही सभांमधून मावळ्यांना संघटित करण्यावर भर दिला. महात्मा गांधीजींनी अवलंबलेल्या 'सत्याग्रह' या नव्या तंत्राच्या मार्गाने सत्याग्रह करण्याचे निश्चित झाले. प्रारंभीच्या या सभांसाठी आवळसचे गोखले मास्तर, दत्तू साठे, शंकर रानडे यांची मोठी मदत झाली. या तिन्ही सभांचा अहवाल भुस्कुटे यांनी आपल्या 'लोकसंग्रहात' सविस्तर प्रसिद्ध केला. यानंतर न.चिं. केळकर, द.वि. गोखले, डॉ. पळसुले यांना घेऊन भुस्कुटे यांनी आवळस, शेंडाणी व मुळशीतील इतर पाच गावांमध्ये सभा घेतल्या. या सर्व सभांना मावळ्यांचा उत्स्फूर्त सहभाग मिळत गेला, तसेच डिसेंबर 1920 मध्ये नागपूर येथे भरलेल्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनात मुळशी प्रकरणावर देखील चर्चा झाल्याने हा प्रश्न देश पातळीवर पोहोचलेला होता. विनायकराव भुस्कुटे व शंकरराव देव यांनी मुळशी सत्याग्रहा बद्दलची माहिती होण्यासाठी 29 मार्च 1921 रोजी पुण्यातील शिवाजी मंदिरात जाहीर सभा घेतली.

**राम नवमीच्या दिवशी सत्याग्रह :**

रामनवमीच्या दिवशी सत्याग्रहास सुरुवात झाली. सत्याग्रही तुकड्यांचे नेतृत्व जनार्दन सखाराम करंदीकर, विनयकराव भुस्कुटे, सेनापती बापट, पैसाफंडवाले रानडे करीत होते. नद्यांच्या संगमाच्या जागी धरणाचा पाया घालण्याचे काम सुरु होते. तेथे सत्याग्रह मंडळाचे अध्यक्ष जनार्दन सखाराम करंदीकर आपल्या तुकडीला घेऊन उतरले. काही वेळाने सर्व सत्याग्रहीने सत्याग्रहाला सुरुवात केली. टाटा कंपनीचा मुख्य अभियंता कॅमेरान व पोलिसांनी बांधकाम मजुरांना दमबाजी करत बांधकाम सुरू केले. पण ज्या ठिकाणी बांधकाम होणार त्या ठिकाणी सत्याग्रही निर्भयपणे बसले असल्याने मजुरांना काम करता येत नव्हते. कंपनीच्या अधिकाऱ्यांनी गरम पाणी सत्याग्रहींच्या अंगावर टाकले. तरीही अहिंसेच्या मार्गाने सत्याग्रह सुरूच होता.[3] दुसऱ्या दिवशीही सत्याग्रह सुरू असल्याने बांधकाम होऊ शकले नाही. दुपारी कंपनीचे मुख्य व्यवस्थापक भाभा व मुख्य अभियंता कॅमेरान यांनी न.चिं. केळकर यांची भेट घेतली व पुढे तीन दिवस काम बंद ठेवण्याचे निश्चित झाले. दुसऱ्या दिवशी पुण्यातील केसरी कार्यालयात कंपनीचे अधिकारी आणि सत्याग्रही प्रतिनिधी यांची बैठक झाली. परंतु बैठकीतून काहीच निर्णय झाला नाही. त्यामुळे 20 एप्रिलपासून पुन्हा सत्याग्रह सुरु झाला. यावेळी 500 स्त्रिया सत्याग्रहासाठी पुढे आलेल्या होत्या. त्यांनी निर्भीडपणे आपणास नेमून दिलेल्या ठिकाणी सत्याग्रहासाठी बसल्या सायंकाळी सत्याग्रहीची मंडपात सभा झाली. तेथे शंकरराव देव यांनी कलेक्टरचे पत्र मावळ्यांना समजावून दिले व त्यावर लोकांच्या प्रतिक्रिया घेतल्या. त्यावेळी 25 गावच्या प्रमुख मावळ्यांबरोबरच सर्वांनी एकमुखी सत्याग्रह सुरू ठेवण्याचे घोषित केले. 24 तारखेस मुळशी पेट्याच्या धरणाच्या हद्दीबाहेर उरवडे गावचे इनामदार पोतनीस 100 सत्याग्रहींना घेऊन धरणाच्या एका बाजूस सत्याग्रह करू लागले. मुळशी पेट्यातील अनेक गावातील लोकांनी टाटा कंपनीशी असहकार पुकारला. यावेळी 1000 मावळ्यांनी अहिंसेच्या मार्गाने सत्याग्रह केला. त्यामुळे कंपनीच्या अधिकाऱ्यांनी देखील मावळ्यांशी तात्पुरता समेट घडून आणला. त्यानुसार 7 नोव्हेंबर पर्यंत धरणाचे काम बंद ठेवण्याचे कंपनीने जाहीर केले.[4]

**शेरे सत्याग्रह :**

टाटा कंपनीने धरणाचे काम 6 महिने बंद ठेवले होते. परंतु धरणाच्या कामासाठी पौड-मुळशी रस्त्यावर रेल्वे रूळ टाकण्याचे काम सुरू केले होते. त्याला शेतकऱ्यांनी हरकत घेतली. सार्वजनिक रस्त्यावर कंपनीच्या आगगाडीसाठी रूळ टाकण्याची परवानगी सरकारने देण्याचे काहीच कारण नव्हते हे समजून शेरे गावचे देशमुख यांनी शेतकऱ्यांना संघटित केले. विनायक भुस्कुटे, सेनापती बापट आणि देशदास रानडे यांनी शेरे सत्याग्रहाची जबाबदारी घेतली. 19 मे 1921 रोजी जिल्हाधिकारी व टाटा कंपनीस नोटीस दिली की, 'कंपनीने रूळ घालण्याचे काम बंद केले नाही तर 7 जूनला चिंचवड आगगाडी रूळ मार्गावरील रूळ काढून टाकण्यात येतील.' या नोटिसीला समाधानकारक उत्तर न आल्याने 5 जून रोजी सेनापती बापट, शेरे गावचे देशमुख यांच्या नेतृत्वाखाली शेकडो शेतकरी चिंचवड आणि मुळशी मार्गावरील पौडजवळील

रुळावर जाऊन सत्याग्रहास बसले. सरकारी अधिकाऱ्यांनी दडपशाहीच्या मार्गाने सत्याग्रहींना रुळावरून बाजूला केले. ही वार्ता शेरे गावात समजतात गावातील सत्याग्रही व गावकरी यांनी 120 यार्ड रूळ उकडून टाकला. कंपनीचे अधिकारी कॅमेराननें मामलेदाराकडे नुकसानी बद्दल तक्रार केली. तेव्हा पोलिसांनी चौकशी करून 20 जणांवर आरोप पत्र ठेवले. शेरे केस खटल्याचा निकाल 19 ऑक्टोबर 1921 ला लागला. त्यामध्ये सेनापती बापट यांना 100 रुपये, देशदास कृ.म. रानडे यांना 50 रुपये, देशमुख जिवंतराव रामराव आणि परसराम व इतर 12 जणांना प्रत्येकी 25 रुपये दंड आकारण्यात आला. दंड न भरल्यास 15 दिवसांची शिक्षा भोगावी लागणार होती. सर्वांनी शिक्षा भोगली. [5]

**सार्वत्रिक सत्याग्रह मंडळ :**

टाटा कंपनी आणि सरकार यांच्यात जमीन संपादन करण्यासाठी करार झाला. त्याप्रमाणे शेतकऱ्यांना एकरी किती नुकसान भरपाई मिळणार याबद्दलचे जिल्हाधिकाऱ्याने पत्र काढले. या पत्रकारानुसार आंबे मोहोर तांदळाच्या जमिनीस दर एकरी 500 ते 550 रुपये, साळीच्या जमिनीस एकरी 350 रुपये तर जिराईत जमिनीत एकरी 50 रुपये असे दर जाहीर केले. पण हे दर बाजारभावाच्या पेक्षा फारच कमी होते. प्रत्यक्षात 1500 रुपये प्रति एकर असा दर होता.[6] नुकसान भरपाईचे महत्व पटवून देण्यासाठी कंपनीचे अधिकारी व काही स्थानिक लोक प्रयत्न करू लागले. कंपनीच्या प्रचाराला शेतकरी बळी पडू नयेत म्हणून विनायकराव भुस्कुटे यांनी मुळशी पेट्यातील गावागावांमध्ये दौरा काढला. तसेच 6 महिन्यापासून बंद असणारे धरणाचे काम 7 नोव्हेंबर 1921 पासून पुन्हा सुरू होणार होते. त्यामुळे शेतकरी संघटित करून ठेवणे अतिशय महत्त्वाचे आहे असे भुस्कुटे व देव यांना वाटत होते. मुळशीतील शेतकऱ्यांनी पुन्हा एकदा सत्याग्रह करण्याचा निर्धार केला. त्यासाठी 23 ऑक्टोबर 1921 रोजी 'सार्वत्रिक मुळशी सत्याग्रह मंडळ' स्थापन करण्यात आले. या मंडळातर्फे पुण्यात 7 ऑक्टोबरला शंकरराव देव यांच्या अध्यक्षतेखाली सभा झाली. सभेत डॉ. वि.दा. फाटक मुळशी पेट्यातील स्थानिक पुढारी अण्णासाहेब गद्रे व विनायकराव भुस्कुटे यांची भाषणे झाली. सभेसाठी जमलेल्या स्त्रियांपैकी एका स्त्रीने आपल्या सोन्याच्या बांगड्या मुळशी सत्याग्रहाच्या आर्थिक मदतीसाठी दिलेल्या होत्या.

मुळशीतील शेतकरी व पुण्यातील नेत्यांनी सत्याग्रहाची तयारी करीत पूर्वीच्या ठिकाणी हजार शेतकरी बसतील एवढा मोठा मंडप घातला. तेथे शेतकऱ्यांची सभा झाली. पुण्यातून आलेले सिताराम दामले, वासुदेव जोशी, डॉ. पळसुळे यांची भाषणे झाली. स्त्रियांच्यावतीने ताई पळसकर यांचे भाषण झाले. सत्याग्रह करण्याबद्दलचा एक मुखी ठराव केला. परंतु इंग्लंडचे राजपुत्र प्रिन्स ऑफ वेल्स भारत भेटीवर आले असून ते 11 नोव्हेंबर 1921 रोजी पुण्यामध्ये येणार होते. त्यांच्यापुढे काही गडबड गोंधळ होऊ नये म्हणून मुंबईच्या गव्हर्नरने पुण्याच्या जिल्हाधिकाऱ्यांना पत्र पाठवून 7 नोव्हेंबर रोजी सुरू होणारे बांधकाम त्या दिवशी बंद ठेवण्याचे कंपनीच्या अधिकाऱ्यांना सांगितले होते.[7] त्यामुळे 7 नोव्हेंबरला प्रत्यक्ष काम सुरू झाले नाही. शेतकरी सत्याग्रहाची तीव्रता पाहून डिसेंबर 1921 पर्यंत कंपनीने धरणाचे बांधकाम बंद ठेवले असले तरी कंपनीचे अधिकारी मात्र शेतकऱ्यांनी नुकसान भरपाई घेतली पाहिजे असे शेतकऱ्यांना भेटून सांगत होते. अधिकाऱ्यांच्या आमिशाला बळी पडून 300 ते 350 शेतकऱ्यांनी नुकसान भरपाई घेतली जवळजवळ वर्षभरापासून बंद असलेले काम एप्रिल 1922 पासून सुरु होणार होते.

**सामुदायिक सत्याग्रह :**

सरकारने 144 कलमाखाली नोटीस काढून काम थांबविणाऱ्या लोकांना अटक केली जाणार होती. पुढील महिनाभरात अनेकांना अटक करून दंडात्मक शिक्षा दिलेल्या होत्या. तरी देखील सत्याग्रहींनी निर्भीडपणे सत्याग्रह करण्यासाठी 'सामुदायिक सत्याग्रह' करण्याचा निर्णय घेतला. 1 मे रोजी सत्याग्रहास सुरुवात झाली. त्यावेळी मुळशीतील 500 ते 600 व इतर भागातील 200 स्वयंसेवक यांनी सत्याग्रह केला. 144 कलमानुसार अनेकांना अटक झाली. त्यावेळी सत्याग्रह मंडळाचे अध्यक्ष करंदीकर, डॉ. पळसुले, सत्याग्रह मंडळाचे अध्यक्ष शिवराम परांजपे, चिटणीस डॉ. वि. दा. फाटक, वासुकाका जोशी, सिताराम दामले, हरिभाऊ फाटक इत्यादींना 1 महिन्यापासून ते 6 महिने पर्यंतच्या शिक्षा झालेल्या होत्या.[8] मे महिन्यात झालेल्या सत्याग्रहाच्या वेळी जवळजवळ 198 लोकांना तुरुंगात जावे लागले. सेनापती बापट सत्याग्रहाचे नेतृत्व करत होते. सत्याग्रह सुरू झाल्याबरोबर पोलीस अधिकाऱ्यांनी सेनापती बापट, 12 स्वयंसेवक, 9 मावळे व 2 वृद्ध स्त्रिया अशा 24 जणांना पकडले. सेनापती बापट यांना 6 महिने तर इतरांना 3 महिने अशी शिक्षा झालेली होती.[9] हे सर्व होत असताना धरणाचे बांधकाम मात्र सुरू होते.

**मुळशी सत्याग्रहातील स्त्रिया :**

मुळशी सत्याग्रहात पुरुषांबरोबरच शेकडो स्त्रियांनी घेतलेला सहभाग हे येथील सत्याग्रहाचे वैशिष्ट्य होते. पुण्यातील मुळशी पेट्यातील विविध सभांना स्त्रिया उपस्थित राहत होत्या. पण त्याचबरोबर त्या स्त्रिया सत्याग्रहात प्रत्यक्ष सहभागी होत होत्या. वडूस्त्याच्या जाईबाई भोई यांच्या नेतृत्वाखाली अनेक स्त्रियांनी सत्याग्रहात सहभाग घेतला. सत्याग्रहींवर दबाव आणि वेळप्रसंगी हल्ले करण्यासाठी सरकारने आणलेले पठाण व मजुरांनी सत्याग्रही स्त्रियांना धक्काबुक्की केली होती. एका पठाणाने उत्तर जाईबाईशी लगट करण्याचा प्रयत्न केला. तेव्हा स्वयंसेवकांनी शांत केल्यामुळे आक्रमक स्त्रिया शांत राहिल्या. दुसऱ्या दिवशी या स्त्रिया पुन्हा सत्याग्रहात सहभागी झाल्या तेव्हा पठाण, मजूर यापैकी कोणाचेही बाईच्या अंगाला हात लावण्याचे धाडस झाले नाही. सत्याग्रहात सहभाग घेतला म्हणून जाईबाईंना अटक होऊन 3 महिने तुरुंगवासाची शिक्षा झाली. सत्याग्रही स्त्रियांवर जी मारहाण झाली, विटंबना झाली त्याबद्दलच्या प्रतिक्रिया विविध वृत्तपत्रात उमटलेल्या होत्या. लोकसंग्रह व केसरीतील प्रतिक्रिया अतिशय महत्त्वाच्या आहेत. त्या म्हणजे "पंजाबात घातलेल्या हत्याकांडाची (जालियनवाला बाग) कल्पना यायची असेल तर एकदा मुळशीस भेट द्यावी. शेकडो भाडोत्री गुंड मारहाण करीत आहेत. स्त्रियांशी गैर वर्तणूक करीत आहेत. मजूर नग्न होऊन स्त्रियांसमोर उभे राहतात. फक्त हत्याकांडच बाकी राहते आहे." अशी प्रतिक्रिया लोकसंग्रहात आहे. अनेक वृत्तपत्रांमधून टीका होत असताना त्यावर सरकारने परिपत्रक काढून अत्याचाराचे व स्त्रियांशी केलेल्या गैरवर्तुकीचे सर्व आरोप खोटे असल्याचे सांगितले होते. यावरून सरकारची दृष्टी सत्याग्रहा बद्दल कशी होती हे लोकांच्या लक्षात आलेले होते. सत्याग्रह सुरू असताना 11 जून 1922 रोजी अखिल महाराष्ट्र मुळशी परिषद मुंबईस भरली. त्यामध्ये स्त्रियांवरील अत्याचाराबद्दलची माहिती जाईबाईंनी आपल्या भाषणातून सांगितली. मुळशी सत्याग्रहाच्या तिसऱ्या मोहिमेच्या वेळी सेनापती बापट यांच्या मार्गदर्शनाखाली 2 सप्टेंबर 1923 रोजी स्वयंसेवकांनी सत्याग्रह केला. सत्याग्रहात सहभागी झाल्या म्हणून बजाबाई व सखुबाई सोणकर यांना अटक होऊन 25 रुपये दंडाची शिक्षा झाली.[10] 16 नोव्हेंबर 1923 रोजी सत्याग्रह झाला. त्यावेळी पार्वतीबाई कोम यांना 15 दिवसाची साधी कैद शिक्षा झाली. 22 जानेवारी 1924 रोजी सामुदायिक सत्याग्रहात भुस्कुटे यांची पत्नी सरस्वतीबाई, घारेशास्त्री यांची पत्नी, सौ. वैंशपायन यांनी सहभाग घेतला.

1 एप्रिल 1923 रोजी हनुमान जयंतीच्या मुहूर्तावर स्त्री-पुरुषांनी सत्याग्रह केला. यावेळी सौ. रमाबाई कुलकर्णी (तळेगाव ढमढेरे), सौ.पार्वतीबाई घाडगे (तळेगाव ढमढेरे), जानकीबाई घैसास (केळशी), सौ. सत्यभामाबाई गोविंदराव (वर्धा) यांना शिक्षा झालेल्या होत्या.[11] तुरुंगात सत्याग्रहींना शिक्षा दिल्या जात होत्या. त्याचा धिक्कार करण्यासाठी पुण्यात भरलेल्या स्त्रियांच्या सभेत आनंदीबाई जोगळेकर व मैनाताई कोळेकर यांनी पुढाकार घेतला होता. अशा अनेक स्त्रियांनी मुळशी सत्याग्रहात सहभाग घेतला होता.

**मुळशी सत्याग्रहाचा शेवटचा टप्पा :**

सेनापती बापट तुरुंगात गेले असले तरी थोड्या दिवसात विनायकराव भुस्कुटे तुरुंगवासाची शिक्षा भोगून आलेले होते. नोव्हेंबर 1922 च्या दरम्यान सत्याग्रहाला सुरुवात झाली. कलकत्ता, नागपूर, वर्धा, नाशिक, अहमदनगर, पुणे, मुंबई, धारवाड इत्यादी ठिकाणांवरून सत्याग्रही आलेले होते. सत्याग्रह सुरु झाल्याबरोबरच 21 जणांना अटक करून त्यांच्यावर केस खटला भरला. सर्वांना 3 महिने तुरुंगवासाची शिक्षा झाली. जून 1923 पर्यंत 408 सत्याग्रही तुरुंगात होते. त्यामध्ये विनायकराव भुस्कुटे व सेनापती बापटही तुरुंगात होते. तुरुंगातील मुळशी सत्याग्रहातील कैद्यांना चक्की चालवणे, गाड्या ओढणे, ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या बंगल्यातील नाले साफ करणे अशा प्रकारची कामे करावी लागत होती. काम नाही केले तर हातकडी, दंडबेडी, कांजीरोटी, सात दिवस खोडा व 30 फटके खावे लागत होते. या अमानुष कृत्य विरोधात सत्याग्रहींनी उपोषण केले. उपोषण केले म्हणून शंकरराव देव यांना हातकडी घातली. तेव्हा तर देव यांनी अन्नत्याग केला. अण्णासाहेब दास्ताने, विनायकराव भुस्कुटे यांच्या सह अनेकांनी 18 दिवस उपोषण केले.[12] बार्डोली सत्याग्रहामुळे वल्लभभाई पटेल 'सरदार' झाले तर मुळशी सत्याग्रहातील नेतृत्वामुळे पांडुरंग महादेव बापट हे 'सेनापती' झाले.[13] या दोन्ही नेत्यांना शेतकऱ्यांबद्दल अस्था होती.

महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस समितीचे चिटणीस शंकरराव देव आणि उपाध्यक्ष अण्णासाहेब दास्ताने या महत्त्वाच्या दोन नेत्यांची 30 ऑगस्ट 1923 रोजी तुरुंगातून सुटका झाली. मुळशी पेट्यातील 1200 शेतकऱ्यांनी नुकसान भरपाई

स्वीकारलेली होती. त्यामुळे धरणाचे काम मोठ्या प्रमाणात झाले होते. अण्णासाहेब दास्ताने यांनी मुळशी प्रकरणाबद्दल महात्मा गांधीजींचा सल्ला विचारला होता. त्यावर 5 एप्रिल 1924 रोजी महात्मा गांधींनी पत्र पाठवले होते की, "माझ्या मते ही चळवळ पुढील दोन कारणांमुळे आता स्थगित करावी" 1) बहुसंख्य मावळ्यांनी नुकसान भरपाई मोबदला घेतलेला आहे. 2) धरण अर्धे बांधून झाले असून आता पुढील काम बंद ठेवणे शक्य नाही. महात्मा गांधींच्या पत्राचा संपूर्ण सारासार विचार करून अण्णासाहेब दास्ताने, डॉ. फाटक, आत्माराम मोडक व शंकरराव भाजके यांनी सत्याग्रह मंडळ 24 एप्रिल 1924 रोजी बंद केले. या बरोबरच मुळशी पेट्यातील शेतकऱ्यांचे सत्याग्रह आंदोलन बंद झाले.

**संदर्भ :**


1. कुमार केतकर, *कथा स्वातंत्र्याची*, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे, 2010, पृ. 176.
2. *दैनिक केसरी*, पुणे, 30 मार्च 1920.
3. डॉ. के. के. चौधरी, *झुंजार पुणे*, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, 2008, पृ. 199.
4. प्रेमा कंटक, *सत्याग्रही महाराष्ट्र*, गोविंद वामन कुलकर्णी, पुणे, 1940, पृ. 99.
5. राजेन्द्र व्होरा, *मुळशी सत्याग्रह*, प्रतिमा प्रकाशन, पुणे, 1994, पृ. 69.
6. *दैनिक केसरी*, पुणे, 27 सप्टेंबर 1921.
7. डॉ. के. के. चौधरी, पूर्वोक्त, पृ. 199.
8. राजेन्द्र व्होरा, पूर्वोक्त, पृ. 99.
9. कित्ता, पृ. 106.
10. *दैनिक केसरी*, पुणे, 19 सप्टेंबर 1922.
11. *दैनिक नवाकाळ*, पुणे, 4 एप्रिल 1923.
12. शंकरराव देव, *दैव देते पण कर्म नेते*, सासवड आश्रम विश्वस्त मंडळ, 1976, पृ. 92.
13. गोविंद तळवलकर, *सत्तांतर: 1947*, खंड 3, मौज प्रकाशन, मुंबई, 1997, पृ. 45.

# स्त्री स्वातंत्र्याचे उद्गगाते तथागत गौतम बुद्ध

**डॉ. संजीवनी चंद्रशेखर बारहाते**
इतिहास विभाग प्रमुख,
बी. रघुनाथ कला वाणिज्य व महाविद्यालय, परभणी.

इसवी सन पूर्व पाचव्या व सहाव्या शतकात बुद्धाच्या उदयाने वैदिकांच्या सार्वभौम सत्तेला एक जबरदस्त आव्हान दिले. वैदिकांनी सांगितलेले कारण आणि प्रश्न व उत्तरेच नाकारली. चार आर्य सत्य, अष्टांगिक मार्ग, अनित्य, अनात्म, प्रतित्यसुत्पाद ह्या सिद्धांता द्वारे सखल जनाला उद्धाराचा मार्ग दाखवला. सर्व वर्णातील स्त्री-पुरुषांना गौतम बुद्धांनी आपल्या धम्माची दारे खुली केली. पुरुषाप्रमाणे स्त्रियांनाही या सिद्धांताच्या साह्याने मुक्तीचा मार्ग मिळवून दिला. गौतम बुद्ध स्त्रियांच्या सर्वांगीण विकासासाठी कर्तव्यदक्ष होते हे निर्विवाद सत्य आहे. बुद्ध पूर्वकालीन स्त्री प्रस्थापित व्यवस्थेमुळे त्रस्त झाली होती. स्त्री ही स्वातंत्र्यासाठी आणि तत्त्वज्ञानासाठी उत्सुक होती. बौद्ध धर्माने स्त्रियांना तत्त्वज्ञानासाठी निर्वाणा साठी अभ्यासासाठी आणि सर्वांगीण विकासासाठी स्वातंत्र्य दिले आहे.शिक्षण देणे आणि शिक्षण घेणे यात दोन्ही गोष्टींसाठी बौद्ध धर्माने स्त्रियांना मोकळीक दिली आहे. बुद्धाने स्वतःच्या काळात स्त्रीमुक्ती आणि स्त्री सर्वांगीण विकासासाठी व्यापक स्वरूपात कार्य केले पुरुषा इतकीच स्त्री समर्थ आहे असे बुद्ध मानत.बुद्ध काळात स्त्री स्वातंत्र्याचा उगम आणि विकास झाला.

प्राचीन कालखंडात बौद्ध तत्वज्ञाना मुळे भारतीय स्त्रियांच्या हरवलेल्या माणूसपणाचा समतेच्या आणि समानतेच्या पातळीवर विचार सुरू झाला. बुद्धाने स्त्रियांना आपल्या संघात प्रवेश दिला हा स्त्रीवादाचा प्रारंभबिंदू ठरतो.[1] ब्राह्मणी धर्मशास्त्राने स्त्रियांना भोग्य वस्तू समजून बंदीस्त केले होते.त्याच स्त्रियांना भगवान बुद्धाने माणूस समजून बंद मुक्त करून त्यांचे माणूस पण त्यांना बहाल केले. गौतम बुद्धांच्या मानवा-मानवातील समता,स्वातंत्र्य आणि बंधुत्वाच्या तत्व ज्ञानामुळे स्त्रियांना आपल्या माणूसपणाची जाणीव झाली. स्त्रियांमध्ये असणाऱ्या शक्तीवर गौतम बुद्धांचा पूर्ण विश्वास होता म्हणून त्यांनी स्त्रियांना परिवृजा घेण्याची परवानगी दिल्यानंतर स्त्रियांनीही गौतम बुद्धांचा विश्वास सार्थ करून दाखवला. स्त्रियांनी 'थेरीगाथा' हा मौलिक ग्रंथ लिहिला. पाली साहित्यातील 'थेरीगाथा' हा ग्रंथ जगातील स्त्रियांनी असलेला पहिला ग्रंथ आहे.[2] या ग्रंथातून त्याकाळच्या स्त्रियांनी अहरथ पद प्राप्त केल्याचे दिसून येते. बुद्धांच्या शिकवणी च्या मार्गाचा अवलंब करून स्त्रियांनी आपल्या जीवनाला स्थैर्य प्राप्त करून घेतले. तथागताने सांगितलेल्या 'अनित्य' सिद्धांत स्वीकारून स्त्रियांनी आपल्या जीवनातील परिवर्तनाचा मोठ्या मनाने स्वीकार करून दुःखावर विजय मिळवला व आपल्या जीवनाला स्थिरता निर्माण करून घेतली.

**गौतम बुद्धांचे चरित्र**

जातक कथांमधून बुद्धाच्या पूर्व जन्माविषयी च्या अनेक कथा सांगितलेले आहेत अश्वघोषयांचे बुद्धचरित्र व अशोकाच्या रुम्मीणीदेई शिलालेखातून गौतमाच्या चरित्राची माहिती मिळते.प्राचीन काळी नेपाळच्या परिसरात कपिलवस्तु नावाचे गणराज्य होते. या राज्यात शाक्य वंशी घराण्यात लिंबूनि या खेड्यात गौतम बुद्धाचा जन्म इ.स.पू.568 मध्ये झाला. त्यांच्या वडिलांचे नाव शिध्दोधन व आईचे नाव मायादेवी होते.[3] गौतम बुद्धाच्या जन्मानंतर माया देवीचे निधन झाले या नवजात अर्भकाची पालन-पोषण मावशी महाप्रजापती गौतमी ने केले कदाचित या कारणामुळेच नंतर सिद्धार्थाने गौतम हे नाव धारण केले असावे. लहानपणापासूनच सिद्धार्थ गुड चिंतनात विरक्त वृत्तीने राहत होता. माता-पित्यांना या नैसर्गिक वर्तनाची चिंता वाटू लागली सिद्धोधनाने म्हणजेच गौतम बुद्धाच्या वडिलांनी त्यास राजपुत्राला आवश्यक असणारे युद्धकला विविध शास्त्राचे शिक्षण दिले राजगृह या ठिकाणी भव्य राजवाडा बांधून दिला. पुढे यशोधरा ना नावाच्या राजकन्येशी विवाह गौतम बुद्धांचा लावून दिला. राहुल नावाचा मुलगाही झाला ही सर्व सुखे गौतम बुद्धांच्या पायाशी डोळयात होती.तरीही गौतम बुद्धाचे मन या सुखात रममान होत नव्हते. एके दिवशी सिद्धार्थ छंधक नावाच्या सारथ्यास सोबत घेऊन नगरा बाहेर पडला.योगायोगाने वृद्ध, रोगी,प्रेत, संन्यासी हे चार दृश्य दृष्टीस पडली. [4] मानवी जीवन दुःखमय आहे. याची

तीव्रतेने जाणीव झाली. त्याचे मन अस्वस्थ झाले.आणि जीवनातील अंतिम सत्य शोधण्यासाठी गृहत्याग करण्याचा निर्णय घेतला.

**ज्ञानप्राप्ती व धर्मप्रसार**

गौतम बुद्धाने अंतिम सत्य शोधण्यास सुरुवात केली. वैशाली नगरीत 'अळकाराम' विद्वान आचार यांची भेट घेतली. त्यांनी सांगितल्याप्रमाणे चिंतनाच्या मार्गाने तत्त्वज्ञान आत्मसात करण्यासाठी समाधि घेतली. परंतु गौतम बुद्धाचे समाधान झाले नाही. त्यानंतर त्यांनी राजगृह येथील ' उदक रामपुत्र' या विद्वानांचे शिष्यत्व पत्करले.त्यांच्या सल्ल्यानुसार गौतम बुद्धांनी हठ्योग व कर्ममार्गाचा अवलंब केला. इंद्रिय दमन व कठोर देहदंडनाच्या च्या माध्यमातून खडतर तपश्चर्या केली. त्याचाही उपयोग झाला नाही. कर्मकांड, देवोपासना,समाधी, योग साधना, घोर तपश्चर्या व ज्ञान मार्ग गौतम बुद्धांना निरर्थक वाटले. शेवटी स्वयंभूपणे स्व मार्ग शोधण्याचा निर्धार केला.मगध राज्यातील पाटण या जवळील ' गया' येथे निरंजना नदीच्या तीरावर तपश्चर्या सुरू केली. शरीर अस्थिपंजर झाल्याने तपाचरण याचा त्याग करून अन्नग्रहण केले. अंतिमतहा बोधीवृक्षाखाली गौतमाने सात आठवडे एकाग्रचित्ताने समाधी अवस्थेत चिंतन केले. वैशाख पौर्णिमेच्या शुभमुहूर्तावर वयाच्या पस्तिसाव्या वर्षी त्यांना आत्मसाक्षात्कार झाला.[5] दिव्य ज्ञानाची अनुभूती झाली. ही घटना बुद्ध पौर्णिमा म्हणून ओळखली जाते.

गौतम बुद्धांनी प्राप्त झालेल्या दिव्य ज्ञानाच्या प्रसाराला प्रारंभ केला.बनारस जवळील सारनाथच्या मृग वनात पूर्वीच्या तपश्चर्येत सहभागी झालेल्या कौण्डिन्य,वास्प, भार्दिक,अश्वजीत व महानामा ह्या पाच ब्राह्मणांना आपल्या नवीन धर्माचा उपदेश करून दीक्षा दिली.हे बुद्धाचे प्रारंभीचे शिष्य होते.[6] त्याच ठिकाणी काही दिवसात एक हजार व्यक्तींनी बुद्धाचे शिष्यत्व पत्करले. अशाप्रकारे बुद्धाने दिव्य अनुभूती चा उपदेश करण्यास सुरुवात केली या धर्मप्रसाराच्या कार्याचा शुभारंभ करणाऱ्या या मंगलमय घटनेस,'धर्मचक्रप्रवर्तन' असे म्हणतात.

**गौतम बुद्धांचे तत्वज्ञान/शिकवणूक**

गौतम बुद्धांनी ठिकठिकाणी केलेल्या आत्मसाक्षात्काराच्या उपदेशामधूनच बौद्ध धर्माचे तत्वज्ञान उदयाला आले. त्यानंतर राजग्रहाचे सारीपुत्र व मोगलायन, कौशल नरेश प्रसेनजित व राणी मल्लिका, राजा उदयन, गणिका आम्रपाली महाप्रजापती गौतमी हे बौद्ध धर्माचे अनुयायी झाले.[7] उत्तर प्रदेशातील अनेक राज्यात प्रवास करून व पाली भाषेतून उपदेश करीत गौतम बुद्धाने धर्मप्रसाराचे पवित्र कार्य अविरतपणे चालू ठेवले स्त्री-पुरुष ब्राह्मण शूद्र असा सर्व समाज बुद्ध धर्माचा उपासक बनला.

**बौद्ध धर्माचे स्वरूप**

गौतम बुद्धांनी आचारधर्म यावर भर देऊन तो सुलभ व अनुकरणीय करण्याचा प्रयत्न केला. बुद्धांची प्रवचने व त्रिपिटका मधून बौद्ध धर्माचे विचार उपलब्ध होतात. महानिर्वाण प्राप्ती व अंतिम सत्याचा शोध हे बौद्ध धर्माची उद्दिष्ट होते.त्यासाठी बुद्धाने मोक्ष प्राप्तीचे उपाय सांगितले आहेत.त्यामध्ये प्रज्ञा,शील व करुणा ही बौद्ध त्रिरत्ने धर्माचा मूलाधार होती. मानवी जीवनातील अंतिम सत्याचा शोध घेताना दुःख, दुःख समुदाय,दुःख निरोध,दुःख गनिमी मार्ग ही चार आर्यसत्य सांगितली. तृष्णा म्हणजे इच्छा व दुःख निरोधासाठी अष्टांगिक मार्ग सांगितले.अहिंसा, सत्य,असत्य, अपरिग्रह व ब्रह्मचर्य ही बौद्ध धर्माची पंचशील तत्वे होती.[8] थोडासा बदल करून ती भिक्खु व उपासकांसाठी लागू केली. बुद्धाची अहिंसा मध्यममार्गी होती. धर्माचा मार्ग सहज सुलभ असून तो सदाचरणावर आधारलेला होता. वैदिक धर्म ग्रंथ, आत्मा, देवता, कर्मकांड,समाजरचना व विचारसरणीचा त्यांनी त्याग केला. सुबोध अहिंसा वाद,सदाचरणावर भर व मध्यममार्ग बौद्ध धर्माची वैशिष्ट्ये होती.[9] त्यामुळेच या पंथाचा भारतातच नव्हे तर भारताच्या बाहेर मोठ्या प्रमाणात विस्तार झाला.

धर्मप्रसार

मध्य मार्ग व साधेपणा हे बौद्ध धर्माच्या लोकप्रियतेचे गमक होते. बुद्धाने आयुष्यभर धर्मप्रसाराचे कार्य केले. अनेक राजांनी यांच्या भेटी घेऊन राजाश्रय मिळवला. बौद्ध संघाची प्रभावी प्रचार यंत्रणा निर्माण केली.साहित्य, स्थापत्य, शिल्प, विद्यापीठे, परिषदा व भिक्खूंच्या चिकाटीमुळे प्रसार मोठ्या प्रमाणात झाला.

1.विनयपिटक, सुत्त पिटक,आदी धर्मपीठ जातक कथा, धम्मपद, थेरीगाथा मिलिंद पन्हा,बुद्ध चरित्र, दीपवंश महावंश या पाली,संस्कृत ग्रंथामुळे धर्मप्रसारासाठी मदत झाली.

2. गौतम बुद्धांनी स्वतः बौद्ध संघाची स्थापना करून त्यासाठी कठोर नियम केले, या संघाने देशभर प्रसार केला.
3. सम्राट अशोक, कनिष्क,हर्षवर्धन व गुप्त सम्राटांनी राजश्री देऊन धर्मप्रसाराचे कार्य पार पाडले.
4. गौतम बुद्धांचे प्रभावी व्यक्तिमत्व हेच धर्मप्रसाराचे मुख्य रहस्य होते ते बुद्धिमान संयमी व्यासंगी व सदाचरणी होते. त्यांना जनकल्याणाची ओढ होती. गौतम बुद्ध करुणेचा सागर होते आणि त्याच्या जवळ परिणाम कारक कर्तुत्व होते. त्यांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वामुळे बौद्ध धर्माच्या प्रसाराला मदत झाली.
5. मध्यममार्गी अहिंसा,पाली लोकभाषा,समतेचा पुरस्कार, बौद्ध पंडितांचा उदय व निर्वाण पदाचा सुलभ मार्ग या बाबी बौद्ध धर्माच्या प्रसाराला चालना देणाऱ्या ठरल्या.[10]

त्यामुळे बहुजन समाजाला तो आपलासा वाटू लागला.

सुमारे अडीच हजार वर्षापूर्वी गौतम बुद्धांनी अखिल मानवजातीच्या कल्याणाचे तत्वज्ञान मांडले. स्त्री - पुरुष समानता निर्माण केली.अनित्य, दुःख अनात्मता आणि निर्वाण हे बुद्ध धर्माचे मूलभूत सिद्धांत आहेत.अनित्य, दुःख अनात्मता आणि निर्वाण हे चारही सिद्धांत प्रतित्यसमुत्पादावर आधारित आहेत. 11 त्याचा उगम प्रतित्यासमुत्पादापासून झाला आहे.म्हणून भगवान बुद्ध म्हणतात"जो प्रतित्यसमुत्पादाला पाहतो तो धम्माला पाहतो जो धम्माला पाहतो तो प्रतित्यसमुत्पादाला पाहतो. त्याचा संबंध अनित्यता आणि अनात्मता यांच्याशीही आहे.कोणतीही संस्कारित वस्तू शाश्वत नाही सर्व संस्कारित गोष्टी अनित्य आहेत,क्षणिक आहेत आणि हे हि तू प्रत्यजनीय आहेत. प्रतीत्यसमुत्पादालाच 'मध्यममार्ग' असेही म्हणतात.

निर्माण प्राप्ति ही बौद्ध धर्मातील श्रेष्ठ संकल्पना आहे. बुद्धाच्या संकल्पनेप्रमाणे मानवी जीवनातील दुःखाचा आणि दुःख निर्माण करणाऱ्या तृष्णेचा नाश म्हणजेच निर्वाण होय. मानवी जीवनाचे स्वरूप दुःखमय आहे आणि जीवनाची दुःख रहित अवस्था निर्माण करणे हे अंतिम उद्दिष्ट असल्याने गौतम बुद्धांने त्यावर जास्त भर दिला. कारण मानवी जीवन त्याच्या तत्त्वज्ञानाचा केंद्रबिंदू आहे. दैनंदिन जीवनातील शुद्ध आचरणाच्या बळावर मोक्ष प्राप्ती होते.त्यासाठी श्रद्धा, शांती, संयम, चित्तशुद्धी, क्षमाशीलता,परमज्ञान,अहिंसा,सत्य, अपरिग्रह सुचिता सत्य भाषण पाप त्याग चिंतनशीलता,दानशीलता, त्यागमय,सदाचरण,समाधीवस्ता इत्यादी सदगुणा द्वारे सरोच्या निर्वाण पदाला पोहोचता येते.गौतम बुद्धांनी निर्वाण मार्गाच्या रूपाचे मानवी जीवनातील श्रेष्ठ आचारधर्म कथन केला आहे.

**सारांश**

इसवी सन पूर्व सहाव्या शतकात बौद्ध धर्माची स्थापना झाली. आणि ख्रिश्चन पूर्व तिसऱ्या शतकात या धर्माचा प्रसार भारतभर झाला. बौद्ध धर्माचे प्रवजन काय? याचे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्पष्ट कारून दिले आहे. जगाची पुनर्रचना करणे माणसामाणसातील संबंधाचे नियमन करणे ही धम्माची भूमिका आहे. तथागत बुद्धांनी धम्माचे दोन उपदेश शिकविले आहेत. अशिक्षितांना शिक्षित करणे, शिक्षितांना सुशिक्षित करणे, सुशिक्षितांना संस्कारित करणे, संस्कारीत यांना सुसंस्कारित करणे हा महत्वाचा पहिला उपदेश. दुसरा उपदेश बुद्धाने सांगितलेल्या तत्त्वापासून विचलीत न होणे. धम्माच्या तत्त्वाच्या अनुसरणाच्या दिशेने केलेला कोणताही संकल्प करण्यासाठी लागणाऱ्या चेतना शक्तीचा विकास केला पाहिजे. बौद्ध धर्माची तत्वे बुद्धांनी अनेक कसोट्यांवर तपासून पाहिली आहे. आज सम्यक समाधी प्राप्त करण्यासाठी जगातील अनेक व्यक्ती या तत्त्वज्ञानाकडे आकर्षित होताना दिसत आहेत.बौद्ध धर्माचा प्रसार व प्रचार करण्याचे कार्य अनेक चर्चासत्रे, संस्कार शिबिर, राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय धम्मपरिषदेच्या माध्यमातून केल्या जात आहे. गरज आहे तो व्यवस्थित श्रवण करण्याची. वैज्ञानिक आणि अभ्यासकांच्या मतानुसार 2020 आपला देश हा तरुणांचा देश होणार आहे. आज तरुणांची नेमकी दिशा कोणती आहे हे सांगणे कठीण आहे.गुणवत्ताधारक शिक्षक सामाजिक, आर्थिक, धार्मिक आणि राजकीय विकासात्मक विचारापासून तो कोसो दूर चाललेला दिसतो.आपले भवितव्य कशात आहे. याचा त्याला विसर पडत आहे. बौद्ध धम्म हा व्यापक आहे.त्याचे तत्वज्ञान वैज्ञानिक दृष्टिकोण आणि सदाचार शिकविते यांचे अभ्यासकांनी अनुकरण केले पाहिजे. प्रचंड प्रमाणात वाचन करावे, कुशल कार्याचा संग्रह करावा आणि वडिलधाऱ्यांची ऐकले पाहिजे. लोकांचे हित कशात होते तर तेवढे वडीलधाऱ्यांचा आणि स्त्रियांचा सन्मान करीत असत. बौद्ध धर्माचा सगळा भर हा नैतिकतेवर आहे.पंचशीला च्या माध्यमातून नैतिकता बळकट करावी या स्पर्धेच्या युगात निर्माण होणारा कोणताही प्रश्न सोडवण्यासाठी बौद् धम्माचे श्रवण करावा लागेल.

**संदर्भ:**

1. देशमुख मा.म., प्राचिन भारताचा इतिहास, विश्वभारती प्रकाश, नागपूर.आवृत्ती दुसरी1989, पृ. 185
2. भांडवलकर एस.एस., भारताचा इतिहास, अभिजीत प्रकाशन लातूर. प्रथम आवृत्ती जुलै 2002, पृ.185.
3.सिंगारे अनिल, प्राचिन भारताचा इतिहास,अरूणा प्रकाश लातूर. प्रथम आवृत्ती 2013,पृ.134
4. मार्डिकर मदन, प्राचीन भारताचा इतिहास, श्रीकांत पिंपळापुरे विद्या बुक्स पब्लिकेशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती जून 1997.पृ. 310
5.मेहता जे.एल., हिस्ट्री ऑफ एन्शंट इंडिया ( प्राचीन भारताचा समग्र इतिहास ) प्रथम प्रकाशन 2010 के सागर पब्लिकेशन्स पुणे पृ. 214, 212
6. परुथी आर.के. व भंडारी दीपा, प्राचीन भारताचा इतिहास, अर्जुन पब्लिकेशन हाऊस,नई दिल्ली., पृ. 204.
7.मार्डीकर मदन, प्राचीन भारताचा इतिहास, श्रीकांत पिंपळापुरे विद्या बुक्स पब्लिकेशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती जून 1997, पृ. 310.
8. जोशी (तर्कतीर्थ) लक्ष्मणशास्त्री,मराठी विश्वकोश खंड 8. महाराष्ट्रराज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई प्रकाश आवृत्ती 1976 पृ. 680.
9. थापर रोमिला,भारत का इतिहास,राजकमल प्रकाशन नई दिल्ली,पहिला हिंदी संस्करण पृ.14.
10. चव्हाण रामनाथ महादेव, जाती आणि जमाती, मेहता पब्लिकेशन हाऊस पुणे, प्रथमावृत्ती एप्रील 1989, पृ. 6.
11 जितेंद्र नारायण झा,कृष्ण मोहन, (संपा.) प्राचीन भारत का इतिहास,हिंदी माध्यम कार्य निर्देशनालय, दिल्ली.

# निजाम मीर कमरुद्दीनचा संक्षिप्त इतिहास

**प्रो. (डॉ.) विनोद बाबुराव बोरसे**
श्री आसारामजी भांडवलदार महाविद्यालय,
देवगाव, (रं.), ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर.

**प्रास्तविक -**

मोगल काळात प्रशासनाच्या सोयीसाठी दक्षिण भारताची विभागणी ही खांन्देश, वऱ्हाड, औरंगाबाद, बिदर, विजापूर व हैदराबाद या सहा सुभ्यात केली होती. या पैकी औरंगाबाद हे या सुभ्यांच्या कारभाराचे मुख्यालय होते. या सहा सुभ्यांचा कारभार पाहण्यासाठी मोगल सम्राटाकडून एका सुभेदाराची नियुक्ती केली जात असे त्याला दक्षिणेचा सुभेदार असे संबोधले जाई. पुढे सम्राट औरंगजेबाच्या मृत्यूनंतर एकही सम्राट कर्तबगार, लढवय्या निघाला नाही शिवाय त्याच्या मुलांमध्येही सत्ता संघर्ष झाला. परिणामी राज्यात राजकीय व आर्थिक अस्थिरता निर्माण झाली. मोगल सरदारही आता स्वतंत्रपणे वागू लागले होते. तत्कालीन मोगल सम्राट फररुखसियारला या अनियंत्रित सत्तेवर वर्चस्व राखता आले नाही आणि त्याच्या या दुर्बलतेचा आणि राजकीय अस्थिरतेचा फायदा दक्षिणेचा तत्कालीन सुभेदार मीर कमरुद्दीन यांनेही घेतला व 31 जुलै 1724 रोजी दक्षिणेत स्वतंत्र राज्याची स्थापना केली. (1712 पासून दक्षिणेचा सुभेदार) पुढे हेच राज्य इतिहासात 'हैदराबाद संस्थान' म्हणून ओळखले जाऊ लागले. निझाम मीर कमरुद्दीने दक्षिण भारतात उदयास आणलेली असफजाही घराण्याची महत्वाची राजवट आहे. या राजवटीचा दक्षिणेत सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक लोकजीवनावर मोठा प्रभाव होता. प्रस्तुत शोधनिबंधात या राजवटीचा प्रमुख मीर कमरुद्दीनचा संक्षिप्त इतिहास मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

**असफजाही घराणे -**

मोगल बादशाह फरुखसियरने मीर कमरुद्दीनला दक्षिणेत त्याने बजावलेल्या कामगिरीबद्दल निजाम-उल-मुल्क फतेहजंग अशी पदवी बहाल केली होती. नंतर सत्तेवर आलेल्या मोहम्मदशहाने निजाम-उल -मुल्कला 'असफजाह' हा किताब दिला. या किताबामुळेच हैदराबादच्या निजामाचे घराणे हे 'असफजाही' घराणे म्हणून ओळखले जाते.(रोडे सोमनाथ,2011,109) या घराण्यात एकूण सात निजाम होऊन गेले. पहिला असफजाह निजाम मीर कमरुद्दीन उल मुल्क चिन कुलीज खान यांचा कार्यकाळ 1712 ते 1748 असा होता. दुसरा असफजाह निजाम अलीखान 1762 ते 1803, तिसरा असफजाह निजाम सिकंदर शाह बहादुर 1803 ते 1829, चौथा असफजाह निजाम नासिर उदौला बहादुर 1829 ते 1857, पाचवा असफजाह निजाम अफझलुदौला 1857 ते 1869, सहावा असफजाह निजाम मीर महबूब अली खान बहादुर 1869 ते 1911 आणि शेवटचा सातवा असफजाह निजाम मीर उस्मान अली खान यांचा कार्यकाळ हा 1911 ते 1948 पर्यंत होता. या निजामांची म्हणजे असफजाही घराण्याची सत्ता 1712 ते 1948 पर्यंत म्हणजे 236 वर्षे भारताच्या नाभीस्थानी टिकली. (भालेराव अनंत,2005,7), (1748 ते 1767 या दरम्यान सत्तेवर आलेल्या निजाम अलींच्या भावांना असफजाह म्हणून मान्यता मिळाली नव्हती.)

**स्वरूप व रचना -**

हैदराबाद ही दक्षिण भारतातील सर्वात मोठे राज्य असून या राज्यांमध्ये प्रामुख्याने तीन भाषांचे तीन प्रादेशिक विभाग होते. तेलगू भाषेचा तेलंगणा (8 जिल्हे), मराठी भाषेचा मराठवाडा (5 जिल्हे) आणि कन्नड भाषिक कर्नाटक (3 जिल्हे) याखेरीज 'उर्दू' ही राज्याची चौथी भाषा होती. मराठी, कानडी, तेलगू व उर्दू अशा तीन संस्कृतीत जोपासणारे हे राज्य असून भौगोलिक दृष्टया या राज्याचे क्षेत्रफळ 82,698 चौरस मैल इतके होते तर या राज्याची लोकसंख्या 1,63,38,534 (भालेराव अनंत,2005,2,5) इतकी होती. हे राज्य सर्फेखास (निजामाची खाजगी जहागीर), पायगा, खालसा आणि संस्थांन या चार प्रकारात विभागलेले होते. राज्याच्या एकूण क्षेत्रफळापैकी 42 टक्के क्षेत्रफळ हे सर्फेखासचे होते व विशेष म्हणजे राज्यातील बहुतेक सुपीक भागाचाच या सर्फेखासमध्ये समावेश केलेला आपणास दिसून येतो.

**ध्वज-**

हैदराबादच्या असफजाही राजघराण्याचा ध्वज पिवळया रंगाचा असून त्यावर कुलच्याचे गोल चिन्ह असे. या संदर्भात अशी आख्यायिका प्रसिद्ध आहे की,'पहिला आसफजाह निजाम उल मुल्क याचा मुक्काम वऱ्हाडातील एलीचपूर येथे असतांना एका साधुने त्याला पिवळया फडक्यात बांधलेले सात कुलचे म्हणजे गव्हाच्या सात भाकरी दिल्या. या सात कुलच्याचा अर्थ असा लावण्यात आला की तुझ्या वंशात सात राजे होतील'(चपळगावकर नरेंद्र,1999,5) या आख्यायिकेनुसार सातव्या असफजाहच्या काळातच योगायोगाने असफिया घराण्याची सत्ता संपुष्टात आली.

**निजाम मीर कमरुद्दीनचा पूर्व इतिहास -**

मीर कमरुद्दीनचे आजोबा खाजा आबिद अली हे मध्य आशियातील बुखारा राज्यातील आलियाबाद येथील रहिवासी होते. कालांतराने ते भारतात आले व येथेच स्थायिक झाले. शहाबुद्दीन फिरोजंग खान हे आबिद अलीचे जेष्ठ चिरंजीव होते. 'मोगल सम्राट शहाजहानचा प्रसिद्ध वजीर सादुल्लाखान यां च्या मुलीचा विवाह आबिद अलीने आपला ज्येष्ठ पुत्र शहाबुद्दीन गाझीउद्दीन फिरोजंग खान याच्याशी करून दिला होता. या जोडप्याच्या पोटी 20 ऑगस्ट 1671 रोजी आग्रा येथे (अहमद सरफराज,2019, 14) निजाम उल मुल्कचा जन्म झाला.'

तत्कालीन मोगल बादशहा औरंगजेबाच्या काळातच मीर कमरुद्दीनच्या व्यक्तीमहत्त्वाची जडणघडण झाली होती. तो अत्यंत धूर्त, चाणाक्ष, मुत्सदी, कारस्थानी, अतिमहत्त्वकांक्षी, उत्तम प्रशासक व लष्करी नेता होता. इ.स. 1687 जेव्हा औरंगजेबाने गोवळकोंडयाला वेढा दिला तेव्हा या मोहिमेत आबिद अली, त्याचा पुत्र शहाबुद्दीन फिरोजजंग व नातू निजाम उल मुल्क हे तिघेही हजर होते. दुर्दैवाने या वेढयात गोळी लागून आबिद अली मारले गेले. (पगडी सेतूमाधवराव,1983,45) पित्याच्या मृत्यूनंतर शहाबुद्दीन फिरोजंगने औरंगजेबाच्या काळात महत्त्वाची कामगिरी पार पाडली. यात प्रामुख्याने जानेवारी 1702 मध्ये त्याने मराठयांचा पराभव केला यावर खुश होवून औरंगजेबाने त्याला तलवार, जमदाड व खिलतीची वस्त्रे (पगडी सेतूमाधवराव,1983,206) बक्षीस म्हणून पाठवली होती. सप्टेंबर 1702 रोजी त्याची नियुक्ती वऱ्हाडचा सुभेदार म्हणून झाली. तसेच त्यांच्याकडे ब्रम्हपूरीच्या तळाच्याही रक्षणाचे काम देण्यात आले होते. याच वर्षी त्याला नांदेड प्रांताची (पगडी सेतूमाधवराव, 1983,45,46) सुभेदारीही देण्यात आली. यानंतर शहाबुद्दीन फिरोजजंग हे गुजरातचे सुभेदार झाले होते. या पराक्रमी सुभेदाराचा इ. स. 1710 मध्ये मृत्यू झाला.

एकूणच शहाबुद्दीन फिरोजजंगच्या कामगिरीवर खुश होऊन औरंगजेबाने मीर कमरूद्दीनला वयाच्या 6 व्या वर्षीच इनाममध्ये मनसब दिली होती. ब्रिटिश इतिहासकार हेन्री जॉर्ज यांने कमरूद्दीनचे व्यक्तीचित्र रेखाटतांना लहान वयात त्याच्यामध्ये असलेल्या गुणांचं कौतुक केलं आहे. इतकेच नाहीतर त्याने कमरुद्दीनच्या अनेक उत्कृष्ट गुणांची नोंदही केली. भविष्यात हा मुलगा खूप पुढे जाईल, असं भाकितही त्यावेळी औरंगजेबने केल्याचं हेंन्री जॉर्ज आपल्या 'दि निझाम हिस्टरी अँड दि रिलेशन विथ ब्रिटिश गव्हर्मेंट - खंड -1' या पुस्तकात म्हणतो. (पृष्ठ - 41). शहाबुद्दीन उर्फ फिरोजजंग ज्यावेळी पुणे आणि सुपा मोहिमेवर आला होता त्यावेळी 13 वर्षाचा कमरुद्दीन त्याच्यासोबत होता. (अहमद सरफराज,2019,16) निजाम-उल-मुल्क हा प्रथमपासूनच दक्षिण भारतात वावरत होता. वयाच्या तेराव्या वर्षी त्याला औरंगजेबाच्या सैन्यात अधिकारपद मिळाले. 1684 मध्ये त्याला खान ही पदवी देण्यात आली होती. निजामाने आपल्या कर्तुत्वावर दक्षिणे तुंगभद्रतीरापर्यंत स्वतंत्र संचार केल्यामुळे 1691 मध्ये त्यास चिन किलीज (कुलीज) खान (शेजवळकर 1954,15) ही पदवी देऊन सन्मानित करण्यात आले होते. चिन कलीज खान ( म्हणजे छोटा समशेर बहादूर ) व निजाम या शब्दाचा अर्थ, व्यवस्था अगर बंदोबस्त असा होतो. देशाची व्यवस्था लावणारा तो निजामुल्मूल्क. (भालेराव अनंत,2001,3) एवढेच नव्हे तर सम्राट औरंगजेबाच्या नेतृत्वाखाली लढणाऱ्या प्रमुख अधिकाऱ्यांमध्ये निजाम-उल-मुल्क याचाही समावेश असून 31 डिसेंबर 1702 मध्ये तो औरंगजेबाच्या लष्करातील प्रमुख अधिकारी होता. (पगडी सेतूमाधवराव,1983, 34)

इ.स.1707 मध्ये औरंगजेबच्या मृत्यूनंतर बहादुरशहा गादीवर आला. त्याने कमरूद्दीनला अवधची सुभेदारी दिली. कालांतराने पुन्हा केंद्रीय पातळीवर सत्ता संघर्ष उफाळून आला, त्यात मुघलवंशीय फारूकसियार दिल्लीच्या गादीवर आला. 1713 ला झालेला युद्धात कमरुद्दीने फारूकसियारला आग्रा परत मिळवून दिला. कमरूद्दीनच्या कामगिरीवर खूश होऊन सुलताने त्याला 'निजाम उल मुल्क बहादूर' हा किताब बहाल केला आणि त्याला कर्नाटक सह दख्खनची सुभेदारी दिली. पुढे कमरूद्दीन उर्फ निजाम उल मुल्कने दक्षिणेत मराठा सामर्थ्य रोखण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले तसेच मुघल साम्राज्यातील बंडखोरांचा बंदोबस्तही केला होता**.** (अहमद सरफराज,2019,17)

कालांतराने दिल्लीत पुन्हा अस्थिरता निर्माण झाली. निजाम उल मुल्कची दखखनची सुभेदारी काढून घेण्यात आली व त्या जागी मुघल दरबारात अतिशय प्रभावी व प्रबळ मानल्या जाणाऱ्या सय्यद हुसैन अलीला दक्षिणेत पाठवण्यात आले व कमरुद्दीनची रवानगी मुराराबादला करण्यात आली. तिथून त्याला बिहारला हलविण्याच्या हालचाली सुरू झाल्या. दरम्यानच्या काळात फारूकसियारची हत्या झाली. सय्यद हुसैन अली व त्याच्या भावाने हत्या घडवून आणली होती. त्यानंतर निजामची बदली माळवा येथे झाली. सतत होत असलेल्या बदल्यामुळे निजाम उल मुल्क कमरूद्दीनची उरलीसुरली सहनशीलता संपली व त्याने आक्रमक पवित्रा घेवून त्याने सय्यद हुसैन अलीविरोधात बंड केले व सुलतानाच्या हत्येचा बदला घेत सय्यद बंधूंचा पराभव केला. (अहमद सरफराज,2019,17)

सय्यद बंधुच्या पाडवानंतर मोगल साम्राज्याचे वजीर पद मिळेल अशी निजामाची अपेक्षा होती. त्यांने बादशहाला पाठविलेल्या पत्रात वजीरपदाची मागणी केली होती व बादशाह मुहम्मदशाह यांनेही ते मान्य केले होते. परंतू निजामाला वजीर न करता निजामाच्या बापाचा चुलत भाऊ इतिमादुदौला आमिरखानबहादूर यास वजीरपद देण्यात आले. शेवटी जानेवारी 1722 मध्ये बादशाह मुहम्मदशाहने निजामाची नियुक्ती मोगल साम्राज्याचा वजीर (जोशी द.प.2010,155) म्हणून केली. परंतु या पदावर तो अधिक काळ राहू शकला नाही. दिल्ली दरबारातील निर्णयक्षमतेत अकार्यक्षमता, गटा तटाचे राजकारण, कटकारस्थाने पाहून तो अस्वस्थ झाला व त्याने या पदाचा त्याग करुन दक्षिणेची वाट धरली. यावर हैदराबाद प्रांताचा सुभेदार मुबारीजखान यास दक्षिणेची सुभेदारी देऊन त्यास निझामाला धडा शिकवण्याचा आदेश मुहम्मदशाहने दिला. त्यानुसार मुबारीजखानाने निजामाला रोखण्याचा प्रयत्न केला पण यात तो यशस्वी होवू शकला नाही.

**निजाम मीर कमरुद्दीनच्या प्रमुख लढाया -**

निजाम मीर कमरुद्दीनच्या कारकिर्दीत ज्या प्रमुख लढायांचा उल्लेख आहे त्यात प्रामुख्याने 19 जून 1720 रोजी खांडवा येथे दिलावर अलीखान व निजाम यांच्यात लढाई झाली व यात निजामाने विजय मिळविला होता. यात मोठी सामंग्री निजामाला मिळाली होती. (सरदेसाई गोविंद,2012,397) 21 जुलै 1721 रोजी बालापूर (शेख एजाज,2023,38) येथे आलम अलीखान आणि निझाम यांच्यात लढाई झाली व यात आलम अलीखान लढतांना मारला गेला.या लढाईतील विजयामूळेच खऱ्या अर्थाने असफजाही घराण्याची मुहूर्तमेढ रोवली गेली. सन 1724 च्या सप्टेंबर ता. 9 रोजी वऱ्हाडांत साकरखेडा येथे लढाई होऊन मुबारीजखान व त्याची दोन मुले मारले गेले. (सरदेसाई गोविंद,2012,394,399) इ.स.1727 मध्ये जालन्यानजीक निजाम आणि बाजीराव पेशवे यांची चकमक उडाली होती. यात निजामाचा पराभव झाला होता. (भालेराव अनंत,2001,6) फेब्रुवारी 1728 मध्ये पहिला बाजीराव पेशवा व निजाम यांच्यामध्ये पालखेड (जोशी द.प.,2010,994) येथे लढाई झाली. यात उभय पक्षांमध्ये तह करण्यात आला होता. भोपाळ नजीक 13 डिसेंबर 1737 पासून 8 जानेवारी 1738 या दरम्यान मोगलांची व मराठयांची लढाई झाली. हा मोगलांचा व मराठयांचा हा शेवटचा निकराचा झगडा होता. यात निजामाचा पराभव होऊन त्याने बाजीरावाशी तह केला होता. (सरदेसाई गोविंद 2012,401)

**मीर कमरुद्दीन आसफजहाचे प्रशासन -**

मीर कमरुद्दीन हा सम्राट औरंगजबाच्या तालमीत तयार झालेला होता. लहानपणापासूनच त्याचा दरबारात वावर असल्यामुळे तो प्रशासनाचा चांगला जाणकार होता. निजामाचे उल्लेखनीय कार्य म्हणजे त्याने स्वबळावर हैदराबाद संस्थानाची केलेली स्थापना. प्रशासनावर नियंत्रण ठेवण्यासाठी त्याने औरंगाबाद ऐवजी हैदराबाद हे शहर मुख्यालय केले. आपल्या संस्थानातील सहा सुभ्यानंवर प्रत्येकी एक सुभेदराची नियुक्ती केली तसेच जुन्या प्रशासकीय धोरणात मूलभूत बदल करून त्यात अर्थ विभाग, सैन्य विभाग, न्याय विभाग, उद्योग विभाग आदींची निर्मिती केली. याबरोबरच शेत जमीन सुधारणा, महसूल व्यवस्थेचे नव्याने मूल्यमापन करून जास्तीत जास्त जमीन लागवडीखाली आणली होती.

**मीर कमरुद्दीन असफजहाची वास्तुनिर्मिती -**

मोगल उमरावांप्रमाणेच मीर कमरुद्दीनला वास्तुनिर्मितीची आवड होती. त्याने दक्षिणेत सराय, दपतरखाने, कार्यालय, कचेरी, शाही निवासस्थाने, पर्यटनच्या स्थळी डाग बंगले, व्यापारी मार्गांवर पोलीस चौकी, अधिकारयांचे निवासस्थान इत्यादी वास्तूंची निर्मिती केली. (शेख एजाज,2023,55,56) तसेच छत्रपती संभाजीनगरात गुलशन महल, शहागंजमधील भव्य मशीद, नौखंडा पॅलेस आदी वास्तू आजही अ सफजहाँची घराण्याची साक्ष देताना दिसून येतात.

**सारांश -**

मीर कमरुद्दीनच्या संक्षिप्त इतिहासाचा मागोवा घेत असताना असे दिसून येते की, त्याने सुरुवातीपासून शक्तिमान शक्ती पुढे नतमस्तक होऊन आपले राज्य टिकविले. एकूणच युद्धात हरण्यात पण 'तह' जिंकण्यात मीर कमरुद्दीन तरबेज असल्याचे आपणास दिसून येते. पालखेडच्या लढाईत दिल्ली दरबारापर्यंत आपला दरारा निर्माण करणारा अत्यंत शूर व धाडसी पहिल्या बाजीराव पेशव्याने मीर कमरूद्दीनला चांगलेच कोंडीत पकडले होते पण त्याने आपल्या मुत्सद्देगिरीने 'तह' करून आपली सही सलामत सुटका करून घेतली होती. विशेष म्हणजे फ्रेंच, इंग्रज, पोर्तुगीज यासारख्या परकीय शत्रूसोबत मीर कमरुद्दीने शेवटपर्यंत सलोख्याचे संबंध ठेवून दक्षिणेतील प्रमुख शत्रू मराठयांचे बळ मात्र खच्ची करण्याकरीता साम, दाम, दंड, भेद हे सर्व उपाययोजना केलेल्या आपणास दिसून येतात.

एकूणच मुघल साम्राज्यामध्ये मीर कमरूद्दीन सारखा धूर्त, चिवट, महत्त्वकांक्षी आणि कर्तबगार असा सरदार दुसरा कोणीही नव्हता. अशा या पराक्रमी संस्थान प्रमुखाचे 21 मे 1748 रोजी बऱ्हाणपूर (सरदेसाई गोविंद 2012/1934,401) येथे निधन झाले. त्याचा दफनविधी हा खुलताबाद येथे सुफी हजरत शेख बुऱ्हानोद्दीन गरीब यांच्या दर्ग्यात करण्यात आला होता.

**संदर्भ :**


1) भालेराव अनंत, स्वामी रामानंद तीर्थ, नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया, 2005, नवी दिल्ली.

2) पगडी सेतू माधवराव, महाराष्ट्र आणि मराठे, जोशी आणि लोखंडे प्रकाशन, 1963, पुणे.

3) पगडी सेतू माधवराव, (अनु. संपा.), मोगल दरबारची बातमीपत्रे, खंड - 2, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, 1983, मुंबई.

4) शेजवळकर त्र्यं. शं., निजाम - पेशवे संबंध,18 वे शतक, पुणे विद्यापीठ,1954, पुणे.

5 ) चपळगावकर नरेंद्र, कर्मयोगी संन्यासी, मौज प्रकाशन गृह, 1999, मुंबई.

6) आसिफजाही निझाम राजवटीचा इतिहास, खंड 1, (संपा.), अहमद सरफराज,कलीम अजीम सय्यद शाह, शब्द पब्लिकेशन, 2019, बोरिवली (प), मुंबई.

7) सरदेसाई गोविंद सखाराम, (संपा.), गर्गे स. मा., मुसलमानी रियासत, मोगल बादशाही (इ.स.1526 ते 1803 पर्यंत), खंड - 2, पॉप्युलर प्रकाशन, पुनर्मुद्रन,2012/1934, मुंबई.

8) भालेराव अनंत, हैदराबादचा स्वातंत्र्यसंग्राम आणि मराठवाडा, मौज प्रकाशन गृह, दुसरी आवृत्ती, 1 जानेवारी 2001, मुंबई.

9) जोशी द.प., जोशी उषा, (संपा.), समग्र सेतू माधवराव पगडी, खंड-3, मराठी साहित्य परिषद (आंध्र प्रदेश) इसामिया बाजार, 27 ऑगस्ट 2010, हैदराबाद,

10) शेख एजाज, असफजाहीचा इतिहास, चिन्मय प्रकाशन, 22 मार्च 2023, औरंगाबाद.






पहिला निजाम मीर कमरुद्दीन असफजाही ध्वज निजाम मीर कमरुद्दीनची कबर

# सत्यशोधक ब्राह्मणेत्तर इतिहासकार व शिवप्रतिक एक चिकित्सक अभ्यास

**डॉ. सचिन नारायणराव बोराडे**
सहाय्यक प्राध्यापक, आजीवन शिक्षण व विस्तार विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

**प्रस्तावना :**

सत्यशोधक समाजाच्या विचारांचा अंगीकार करून असंख्य अभ्यासकांनी छ. शिवाजी महाराज यांच्या चरित्र लेखनाचा रचना करण्याचा प्रयत्न केलेला आहे. काही चरित्रकारांनी चरित्रमांडणीच्या ओघात चरित्र साहित्यकृतीस भडकपणा आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. यातूनच टोकाची मते, ऐतिहासिक तथ्ये आणि भूमिका नोदंविलेल्या आहेत. तर सत्यशोधक समाजातील काही अभ्यासकांनी चिंतनशील संयमाची भूमिका घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. ब्राह्मण इतिहासकारांनी मांडलेल्या शिवप्रतिकाचा चिकित्सक अभ्यास करून सत्य मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. या दोन्ही सत्यशोधक इतिहास प्रवाहातील शिवचरित्राचा विचार केलेला आहे.

सत्यशोधक व ब्राह्मणेत्तर विचारप्रवाहातील दोन्ही प्रवाहाबाबत लिहितांना श्रीपाल सबनीस मार्मिकपणे म्हणतात, “शिवरायांच्या हिंदु धर्म जन्मसंदर्भाचा व धर्मव्यवस्थेतील ब्राह्मण वर्गाला पारंपरिक वर्चस्वाचा आधार घेऊन ब्य-याच ब्राह्मण विद्वानांनी महाराजाना ‘ब्राह्मणवादी छत्रपती’ ठरविण्याचा व ती प्रतिमा जनमानसात रुजवण्याचा प्रयत्न केला. ही जात-वर्णनिष्ठ प्रवृत्ती छत्रपतीचे स्वराज्यविषयक व्यापक धोरण पेलू शकली नाही, कारण या ब्राह्मण विद्वानांच्या भूमिकेत सच्चेपणाची जागा वर्णीय अहंतेने घेतली. ब्राह्मणांच्या या जातीयवादी प्रवृत्तीच्या विरोधात कार्यरत असणा्य-या काही ब्राह्मणेत्तर प्रतिभांनी ब्राह्मणांच्या ‘जानव्यातून’ छत्रपतीची सुटका करण्याचा घाट घातला. या प्रयत्नात काही ब्राह्मणेत्तर विद्वान मंडळी महाराजंाचे खरे महाराजांचे खरे शत् डिग्री ब्राह्मणच असल्याचे सांगून मोकळी झाली. या दोन्ही प्रवाहातील इतिहास मांडणीशी कोणताही विवेकी अभ्यासक सहमत होणार नाही.

तिसरा विवेकनिष्ठ व वस्तुनिष्ठ इतिहास लेखन करण्ुययांचा प्रवाह वरील दोन्ही प्रवाहाशी मतभेद नोंदवून उभा राहतो. हा प्रवाह शिवाजी महाराजांना धर्मनिरपेक्ष मानतो. या पध्दतीने मांडणी प्रा. नरहर कुरूंदकर सेतु माधवराव पगडी. रा.ना. चव्हाण यांच्या लेखनात आढळते.” श्रीपाल सबनीस यांनी शिवप्रतिकाबाबत ब्राह्मण व अब्राह्मण अभ्यासकाची नोंदविलेली मानसिकता या दोन्ही विचार सरणातील तफावत आणि सांस्कृतिक अहंकार नोंदविणारी आहे. याचबरोबर तिसरा अत्यंत विवेकी प्रवाही त्यांनी ओझरता मांडणाचा प्रयत्न केलेला आहे. तो मार्गदर्शक स्वरूपाचा आहे.

शिवप्रतिकाचा विचार करताना प्रथम ब्राह्मणी इतिहास लेखनाला प्रतिवादी देणारा ब्राह्मणद्रोही प्रवाह विचारात घेतला आहे. तो पुढील प्रमाणे. 1. कॉ. शरद पाटीलकृत शिवाजीच्या हिंदवी स्वराज्याचे खरे शत् डिग्री ‘महंमदी की ब्राह्मणी’ कॉ. शरद पाटील यांच्या शिवचरित्र मिथकाचा विचार करण्यापुर्वी ब्राह्मण-ब्राह्मणेत्तर वादाचा पाया इतिहासचार्य राजवाडे यांनी कसा घातला हे लक्षात घ्यावे लागेल. वि.का. राजवाडे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेची प्रेरणा समर्थ रामदास स्वामी यांच्याशी जोडली. हा लेख विसाव्या शतकाच्या पुर्वार्धात त्यंानी विष्णू गोंविद विजापूर यांच्या मासिकातून प्रसिध्द केला. याच दरम्यान कोल्हापुर संस्थानात छत्रपती शाहू महाराज यांच्या विरोधात वेदोक्त प्रकरण चालू होते. यातुनच ब्राह्मण-ब्राह्मणेत्तर वादाला सुरूवात झाली. वि.का. राजवाडे यांच्या अनुयायांनी बखर, यांच्या आधारे स्वराज्य निर्मितीचे श्रेय समर्थ रामदास स्वामींना देऊन ‘राजगुरू’ सिध्दांत मांडला पुढे कादंबरी, चित्रपट, नाटक इत्यादीमधून प्रचार प्रसार केला.

छत्रपती शिवाजी महाराज यांना स्वराज्य निर्मीतीपासून दूर ठेवून समर्थ रामदास यांना स्वराज्य निर्मितीचे श्रेय राजवाडे यांनी ब्राह्मणी वर्णवर्चस्वाच्या अहंकारातून केले. ‘राजगुरू’ या सिध्दांताला विरोध झाला. तो विरोध प्रथम कृष्णांजी अर्जुन केळूसकर यांच्या शिवचरित्राच्या रुपाने त्यांनी ‘राजगुरू’ सिध्दांत कपोतकल्पीत असल्याचे सहप्रयाण सिद्ध केले. ब्राह्मण वर्णवर्चस्वाच्या अहंकाराने इतिहास लेखन करणार वि.का. राजवाडे हे इतिहास लेखनाचे एक टोक तर ब्राह्मण

वर्णवर्चस्वाला विरोध करनारे कॉ. शरद पाटील हे दुसरे टोक होय. याचमुळे ब्राह्मणेत्तर इतिहास लेखनाच्या परंपरेत प्रारंभी त्यांच्या इतिहास लेखनाचा विचार केलेला आहे.

कॉ. शरद पाटील यांचा इतिहास संशोधन आणि प्रात्यविद्या अभ्यास उच्च दर्जाचा आहे. त्यांच्या संशोधनातील बारकावे, वस्तूनिष्ठता आणि स्पष्टवक्तेपण कमालीचा वैशिष्ट्यपूर्ण आहे, त्यंानी प्राचीन धर्मग्रंथाची चिकित्सा केली. त्याप्रमाणे शिवचरित्र ग्रंथाची ही चिकित्सा केली. त्यांनी मांडलेले सिंध्दात इतिहास लेखनासाठी आव्हान आहेत, पण या सिद्धांताचीही चिकित्सा महत्त्वाची आहे.

कॉ. शरद पाटील यांनी 'शिवाजीच्या हिंदवी स्वराज्याचे खरे शत् डिग्री कोण? या नावाचा ग्रंथ 'सत्यशोधक मार्क्सवादी प्रकाशन 7 धुळे प्रथमावृत्ती मे 1992 साली लिहिला. हा ग्रंथ शिवचरित्रावरील यापूर्वीच्या लेखनापेक्षा विविध अंगानी वेगळा आणि नवेसिध्दांत मांडणारा आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांनी आपले क्षत्रियत्व सिध्द करण्यासाठी राज्यभिषेक वैदिक पध्दतीने काशीच्या गागाभट्टांकडून करवून घेतला आणि त्यानंतर दुसरा राज्यभिषेक तांत्रिक निश्चिल पुरीकडून या अनुषंगाने कॉ. शरद पाटील यांनी नोंदविलेली मते साधार अशी आहेत. वैदिक राज्यभिषेकाला पर्याय म्हणून दुसरा राज्यभिषेक तांत्रिक पध्दतीने केला. या दरम्यान 'हिन' जातीतील स्त्रीशी विवाहविधी तांत्रीक पंथानुसार आवश्यक असतो. त्या अर्थी त्यांचा 'हीन' जातीतील स्त्रीशी विवाहसुध्दा झालाच असणार, असा निष्कर्ष काढला आहे.

छत्रपती शिवाजी महाराज जातीव्यवस्थेच्या विरोधी होते. त्यांना धर्म व्यवस्थेतील कर्मठपणा मान्य नव्हता. स्त्री-पुरूष यांच्यामध्ये विषमता अमान्य होती. त्याचबरोबर ब्राह्मणाच्या विरोधी होते. या स्वरूपाची मांडणी कॉ. शरद पाटील यांनी आपल्या ग्रंथामध्ये केलेली आहे. या विवेकनाची मिमांसा करण्यापुर्वी श्रीपाद सबनीस यांनी कॉ. शरद पाटील यांच्या प्रस्तूत विवेचनाची नोंदविलेले भाष्य अधिक महत्त्वाचे आहे. ते म्हणतात, "इतिहासचार्य राजवाडे आणि कॉ. शरद पाटील हे दोन्ही विद्वान प्रकांड पंडित आहेत. त्यांच्या व्यासंगाचा झपाटा व पसारा अतिव्याप्त असून, भांबेरी उडवणारा आहे, पण म्हणून काय त्यांला ब्राह्मण्यग्रस्त ब्राह्मण व ब्राह्मण्यग्रस्त मराठा- ब्राह्मणेत्तर भूमिकेला सत्यानिष्ठ अभ्यासकांनी शरण जायचे? अहंतेचे तसेच जातीच्या द्वेषाचे विष, ब्राह्मण व ब्राह्मणेत्तर प्रवाहात पेरण्याचे काम त्यंानी केले त्याच परंपरा त्यांच्याच वारशात शिव्यांनी चालवणे समाजाला कितपत रुचावे?" श्रीपाल सबनीस यांनी शिवचरित्राबाबत घेतलेली भूमिका ब्राह्मण-ब्राह्मणेत्तर यांच्याबाबत नि:पक्षपातीपणाची आहे. जातीय अहंकारातून इतिहास प्रतिकाचा विकृत इतिहासाचे लेखन समाजाच्या अध:पतनाला कारणीभूत ठरणारे असते. याचा मोह टाळावा, हेच इतिहासाच्या हिताचे असते.

कॉ.शरद पाटील यांनी राज्याभिषेकांच्या संदर्भात 'हीन' जातीतील स्त्रीविवाहाचा नोंदविलेला मुद्दा ऐतिहासिक सत्यावर आधारलेला नाही, तो अन्य इतिहास अभ्यासकांना संभ्रमित करणारा आहे. असा विवाह झाल्याची नोंद अन्य इतिहास साधनात मिळत नाही. शुद्र स्त्रीशी झालेला विवाह इतिहासाला ज्ञात झाला नाही असे म्हणणे धाडसाचे आणि अनैतिहासिक ठरेल. या विवाहाला घेऊन असंख्य प्रश्न निर्माण होतात. त्यांची उत्तरे समाधानकारकपणे देता येत नाहीत. या नव्या अडचणीही उभ्या राहतात. जाती व्यवस्थेला छत्रपती शिवाजी महाराज यांचा विरोध होता. हे मान्य करता येते. पण ब्राह्मणांना त्यंानी जातीच्या आधारे विरोध अथवा द्वेष केला हे वस्तुस्थितीला धरून होणार नाही. ज्या-ज्या वेळी सत्याची बाजू घेण्याली वेळ आली त्या-त्या वेळी जातीधर्माच्या पलिकडे जाऊन सत्याचा स्वीकार केला. सर्वच ब्राह्मण जातीचा त्यांनी द्वेष केला हे ऐतिहासिक सत्यावर न पटणारे मत आहे. गुन्हेगार कोणत्याही जातीचा असो मग तो ब्राह्मण जातीचा असला तरी शासन करण्याचे काम त्यंानी केले.

कॉ.शरद पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मृत्यूबाबत विवेचन केलेले आहे. ते म्हणतात, ब्राह्मणसरकारने शिवाजीला सोयराबाईकडून विषप्रयोग केला. विषप्रयोगाबाबत शिवाजी कितीही खबरदारी घेत असले, तरी विषप्रयोग करणारी खुद्द पट्टराणी असल्यानेच हे शक्य झाले. महाराजांचा मृत्यू 1680 साली झाला. त्यावेळी सोयराबाईचा मुलगा राजाराम 10-11 वर्षाचा होता. अशा परिस्थितीत स्वत:च्या असामान्य पतीला विषप्रयोग करून स्वत: वैधव्य भोगण्याची तयारी सोयराबाईनी केली. अस्पृश्य पत्नीवरील शिवाजीच्या सर्वाधिकार प्रेमामुळेही सोयराबाईच्या पतीद्वेषात भर पडली असणार इतिहासाने मात्र या अस्पृश्य पत्नीला रखेल ठेवलेली आहे."

भाऊसाहेब छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मृत्यूबाबत कॉ.शरद पाटील यांनी नोंदविलेली मते इतिहासाच्या वस्तुनिष्ठ कसोटीवर बसणारी नाहीत. शुद्र स्त्रीशी शिवाजी महाराजांचा विवाह नोंदविणे इतिहासाला धरून नाही तर त्यावर

आधारलेला तर्क बरोबर असणार नाही. सोयराबाई यांनी ब्राह्मण अधिका्य-यांच्या मदतीने विषप्रयोग केला असे म्हटल्यामुळे खूप प्रश्न निर्माण होतात. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्याला द्वेष, मत्सर इत्यादीचे ग्रहण लागेल यातूनच त्यं◌ाचा खून झाला असे म्हणावे लागेल. पण यादृष्टीने कोणताही पुरावा इतिहास संशोधन साधनात उपलब्ध होत नाही. यामुळे कॉ. पाटील यांच्या मताला आधार मिळत नाही. ही मते काल्पनिक तर्कशास्त्रावर आधारलेली आहेत.

संदर्भ सूची :


1. गेल ओमवेट – कल्चरल रिव्होल्ट इन अ कलोनिअल सोसायटी द नॉन ब्राम्हण मुव्हमेंट इन वेस्टर्न इंडिया आर्यभुषण मुद्रणालय, पुणे प्रथमावृत्ती 1976 पृ. 06
2. ठोके मो. नि. संपादक रा. ना. चव्हाण निवडक वाङमय पारस प्रकाशन, बेळगाव प्रथमावृत्ती 1984 पृ. 30
3. मंगुडकर मा.प. म. फुले व सत्यशोधक ठोकळ प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती 1984 पृ. 289
4. पंडित नलिनी - समाजप्रबोधन पत्रिका, सप्टेंबर-ऑक्टोबर प्रकाशित:1976 पृ. 288
5. कीर धनंजय - म. ज्योतीराव फुले, पॉप्युलर प्रकाशन व्दितीयवृत्ती मुंबई 1973 पृ. 311
6. सबनीस श्रीपाल- छत्रपती शिवराय आणि ब्राह्मण-ब्राह्मणोत्तर वाद विवेकी भूमिका, सत्यम प्रकाशन पुणे प्रथमवृत्ती 2021 पृ. 58-59
7. पाटील शरद- शिवाजीच्या हिंदवी स्वराज्याचे खरे शभू महंमद की ब्राह्मण मावळाई प्रकाशन पुणे प्रथमावृत्ती, 2005 पृ. 69
8. बागल माधवराव संपादक सत्याशोधक हिरक महोत्सव, ग्रंथ प्रकाशन वर्ष 1933 पृ. 109
9. सबनीस श्रीपाल -उनि, पृ. 74-75
10. पाटील शरद – शिवाजीच्या हिंदवी स्वराज्याचे खरे शंभू कोण? उनि, पृ. 116
11. शेजवळकर न्य. श. -श्री शिवछत्रपती, राजहंस प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती 1970 पृ. -45
12. कोकाटे श्रीमंत –प्रमुख शिवचरित्र लेखनातील विविध विचारप्रवाहांचा चिकित्सक अभ्यास, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर म. विद्यापीठ जळगाव 2019 पृ. 48
13. सबनीस श्रीपाल -उनि, पृ. (प्रस्तावना) 13
14. पानसरे गोविंद- शिवाजी कोण होता? लोकवाङमय गृह मं◌ुबई 1955 प्रथमावृत्ती, पृ. 30

# महात्मा बसवेश्वरांचे पंचाचार तत्वज्ञान

**डॉ. विजयकुमार प्रल्हादराव भांजे**
श्री शिवाजी महाविद्यालय बार्शी
ता. बार्शी, जि. सोलापूर

**प्रस्तावना**

लिंगायत तत्त्वज्ञानामध्ये पंचाचार हे सामाजिकदृष्ट्या अतिशय महत्त्वाचे तत्त्व आहे. पंचाचार हे लिंगायतांचे सामाजिक नीतिशास्त्र असून त्यांची सामाजिक आचारसंहिता (Social Code of Conduct) आहे. ज्यामध्ये पाच आचार तत्त्वांचा अंर्तभाव किंबहुना समावेश होतो. लिंगाचार, सदाचार, शिवाचार, गणाचार व भृत्याचार हे पंचाचार होय. यात दैनंदिन सामाजिक जीवन कशा पद्धतीने व्यतीत करावे, हे यात प्रतिपादन केले आहे. पंचाचार हा लिंगायतांचा कर्ममार्ग होय. नैतिक मूल्य व आचरणाने युक्त पंचाचार अत्यंत महत्त्वाचे तत्त्व आहे. पंचाचाराचे स्वरूप स्पष्ट करताना प्रा.साखरे यांनी प्रतिपादन केले आहे की, सामान्यपणे लिंगायत व्यक्तींनी पाळावयाची वर्तनतत्त्वे ही पंचाचारातून निर्देशित केली जातात. लिंगाचार व शिवाचार ही दोन तत्त्वे पूर्णतः व्यक्तिगत असली तरी त्यांचा परिणाम समाजातील व्यक्ती व्यक्तीतील दैनंदिन संबंधावर होत असतो.पंचाचाराचे सामाजिक महत्त्व विवेचन करताना माते महादेवी प्रतिपादन करतात की, पंचाचार ही पाच सामाजिक सिद्धांततत्त्वे आहेत. त्यात नीतिनियम अंतर्भूत झालेले असतात. त्या सिद्धांततत्त्वावरील शक्ती व क्षमतेमुळेच लिंगायत धर्म हा केवळ राष्ट्रीय धर्म म्हणून नव्हे तर जागतिक धर्माच्या पातळीवर पोहोचला आहे." बसवण्णा, अल्लमप्रभू, चन्नबसवेश्वर, सिद्धरामेश्वर, अक्कामहादेवी या शरणांनी पंचाचाराचे सामाजिक स्वरूप आणि महत्त्व विशद करुन त्याचा सविस्तर प्रसार केला आहे. या पंचाचारात समाविष्ट असलेल्या पाच तत्त्वांचे संक्षिप्त स्वरूप व महत्त्व समजावून घेणे संशोधनाच्या दृष्टीने आवश्यक ठरते.

**1.लिंगाचार**

लिंगाचार हा लिंगायतांच्या सामाजिक वर्तनपद्धतीतील प्रथम घटक होय. लिंगायत धर्मशास्त्रानुसार भगवान शिव हा अनादि, सर्वशक्तिमान, सर्वज्ञ, सर्वोच्च, विश्वाचा जनक व सर्वेसर्वा आहे. लिंगाचार हे इष्टलिंगाविषयीचे भगवान शिवाविषयीचे तत्त्व होय. प्रत्येक लिंगायताने आपल्या गळयात लिंगधारणा करून या तत्त्वाचे व विचाराचे पालन करावयाचे असते. डॉ. ईश्वरन यांच्या मताप्रमाणे, लिंगाचाराचे मूळतत्त्व हे की देव हा एकच एक असून तो प्रत्येकात अंतर्भूत झालेला असतो. व्यक्तीच्या शरीराला चालते-बोलते, कार्यक्षम देह हेच देवालय बनविणे हा लिंगाचार तत्त्वामागील मुख्य हेतू होता.[1] सृष्टीनिर्माता देव हा एकच असून तो प्रत्येक जीवात सामावलेला आहे म्हणून तो जीव स्वरूप आहे. म्हणून देहालाच देवालय बनविण्याचा बसवण्णांनी उपदेश केला.[2] त्यामुळे स्थावर लिंगाऐवजी इष्टलिंगाचीच उपासना बसवण्णांनी महत्त्वाची मानली. म्हणून यालाच लिंगाचार म्हणतात. प्रा. साखरे यांचे मत आहे की, इष्टलिंगाची पूजा हीच शिवाजी पूजा होय. इष्टलिंग हे उपासकाच्या शरीराचे शिरस्थान होय. प्रत्येक लिंगायताने इष्टलिंगाशी एकनिष्ठ राहून आयुष्याच्या शेवटच्या श्वासापर्यंत त्याची पूजा करावी."[3] कुटुंबातील व्यक्तीचा मृत्यू, मासिक पाळी, गरोदरपणा, बाळंतपण इत्यादी कोणत्याही कारणास्तव लिंगायतांच्या दररोजच्या इष्टलिंग साधनामध्ये खंड पडता कामा नये, इष्टलिंग हरवले तरी विशिष्ट विधी द्वारा नवीन इष्टलिंग धारण करावे. लिंगाचारामध्ये कडक व शिस्तबद्ध एकेश्वरी उपासनेचा अंतर्भाव झालेला आहे. म्हणजेच एकदेव उपासना होय.

**2.सदाचार**

सदाचार हे दुसरे तत्त्व असून सामाजिक बांधिलकीची जाणीव करून देणारा शुद्ध किंबहुना पवित्र आचरण होय, असे प्रतिपादन करुन बसवण्णा म्हणतात की, व्यक्तीने आपली वर्तणुक उत्तम ठेवून नीतीशील मार्गाने अर्थार्जन करून त्यातील काही भाग समाजाच्या आणि राष्ट्राच्या विकासासाठी, कल्याणासाठी खर्च करणे होय.[4] नैतिक जीवनाच्या नियमानुसार सज्जनाची मैत्री असावी. चोरी करू नका, खोटे बोलू नका, द्वेष करु नका, हत्या करू नका, राग धरू नका, आत्मस्तुती करू नका इत्यादी उपदेशपर बाबी सांगून सर्व क्षेत्रात एक विलक्षण असा आदर्श निर्माण केला.[5] नैतिक मूल्यांचे

जीवन जगणे हेच सदाचार प्रत्येकाने आपल्या कर्तव्यातच परमेश्वर जाणून सदाचारी मार्गाने मिळवलेल्या संपत्तीतून दासोह दान करणे हेच सदाचार होय. म्हणून बसवण्णांनी 'कायकवे कैलास' असे प्रतिपादन केले आहे. अतिरिक्त उत्पन्नाचा विशिष्ट भाग हा अनाथ, पीडित आणि गरजू व्यक्ती लिंगायत तत्त्वज्ञानाचा प्रसार करणा-या संस्था इत्यादींसाठी खर्च करण्याचा आग्रह सदाचारात अंतर्भूत आहे. हेच या तत्त्वाचा सामाजिक आशय होय. डॉ. मोगलेवार यांच्या मताप्रमाणे 'सदाचार म्हणजे जगा आणि जगू द्या"[6] या तत्त्वानुसार लिंगायत आपले सामाजिक कर्तव्य पार पाडताना दिसून येतात.

**3.शिवाचार**

शिवाचार म्हणजे समभाव, समताभाव हे समतेचे तत्त्व असून इष्टलिंग धारण केल्यानंतर त्या व्यक्तीला पुर्वाश्रमीची कोणतीही जात नसून इष्टलिंगधारी हे सर्वसमान आहेत. सर्व सृष्टी ही शिवमय आहे हे लक्षात घेवून वर्तन करणे म्हणजेच शिवाचार होय. यात जातीय श्रेष्ठ-कनिष्ठ ही भावना संपुष्टात येऊन आपण सर्वजण शिवाचे अंश आहोत, याची जाणीव करुन दिल्यामुळे समाजामध्ये शांतता व सुख प्राप्त होते. माते महादेवीच्या मताने सामाजिकदृष्ट्या समता भावनेने वर्तन करणे आणि विश्वबंधुत्वाचे पालन करणे म्हणजे शिवाचार होय. शिवाचार तत्त्वानुसार सर्व इष्टलिंगधारी एक समान असून त्यांच्यात रोटीबेटी व्यवहार करणे हा शिवाचार आहे.[7] याचा परिणाम असा झाला की, व्यक्ती, कुटुंब व समाजाच्या इतर घटकांमध्ये सामाजिक सुसंगतता वाढीस लागली.

**4.गणाचार**

या तत्त्वात प्रामुख्याने त्याग आणि वीरतेचा संदेश आहे. प्रामुख्याने धर्माच्या संरक्षणासाठी गणाचार तत्त्वाला अत्यंत महत्त्व आहे. समाजातील विकृतींचे निर्मूलन, परस्पर संरक्षण भावना, दुष्टशक्ती, अन्याय, अपराध, अनितीमत्ता, हिंसा यांच्या विरोधात धाडसाने लढण्यासाठी प्रवृत्त करणे, अन्यायाविरुद्ध प्रतिकार करण्यास गणाचार प्रेरणा देतो. मृत्यूची काळजी न करता निकराने, धाडसाने सामना करणे म्हणजे गणाचार होय. या संदर्भात म.पू. पाटील आणि शि.बा. संकनवाडे प्रतिपादन करतात की, ज्या ठिकाणी शिवाची निंदा होईल, त्याठिकाणी शिवभक्ताने वास्तव्य करू नये किंबहुना प्रसंग आढळल्यास प्राणार्पण करुन या प्रवृत्तीला विरोध करावा हे गणाचाराचे तत्त्व आहे.[8] या तत्वाचे एक ऐतिहासिक उदाहरण स्पष्ट करताना मोगलेवार म्हणतात की, इ.स. बाराव्या शतकात महात्मा बसवण्णांनी राजा बिज्जलकडून शिवभक्ताची होत असलेली निंदा सहन न झाल्याने त्यांनी महत्त्वपूर्ण अशा पंतप्रधानपदाचा त्याग केला. हेच लिंगायत तत्त्वज्ञानाच्या गणाचाराचे पालन होय.[9] समाजाच्या प्रगतीसाठी सतत प्रयत्नशील राहून अनिष्ट, अन्यायी व अत्याचारी प्रवृत्तींचा नैतिकतेच्या आधारावर बिमोड करणे म्हणजे गणाचार होय.

**5. भृत्याचार**

भृत्याचार हा पंचाचारातील शेवटचा आचार होय. या तत्वात समाजात सगळ्याविषयी दया, मानवता व नम्र भावनेने वर्तन करण्यास प्रवृत्त करणे होय. भृत्याचाराची व्याख्या करताना व्ही. के. मूर्ती मत मांडतात की, भृत्याचार म्हणजे विशाल अर्थाने विश्वबंधुत्ववाद होय. महात्मा बसवण्णाने सबंध प्राणिमात्राविषयी करुणा, दया ममता महत्त्वाची मानलेली आहे." [10] या पार्श्वभूमीवर लिंगायत धर्माने सकल जीवात्म्यांवर प्रेम करा' हा सर्वांसाठी संदेश दिलेला आहे. यानुसार प्रा. साखरे म्हणतात की, भृत्याचार तत्वानुसार सर्वाविषयी आदर, दयाशीलता आणि नम्रता बाळगणे हे प्रत्येक लिंगायताचे कर्तव्य आहे.

एकंदरीत लिंगायतांच्या वैयक्तिक, कौटुंबिक, धार्मिक, सांस्कृतिक, नैतिक व सामाजिक जीवनावर निर्बंध आणि नियंत्रण ठेवण्याच्या हेतूने पंचाचार तत्त्वाचा प्रचार आणि प्रसार करण्यात आला.

**संदर्भ :**


1. K. Ishwaran, Religion and Society among the Lingayats of South India, Vikas Publishing House Pvt. Ltd., New Delhi, Page No. 104
2. Ibid, p.02
3. M.R. Sakhare, History and Philosophy of Lingayat Religion. Karnataka University, Dharwad, First Ed., April,1997, p.329

4. सूर्यकांत घुगरे, वीरशैव व इतर धर्म आणि समाज, वीरबसप्पा बाळासाहेब घुगरे, साधना बुक स्टॉल,गडहिंग्लज, दुसरी आवृत्ती 2000, पृ.209
5. वेदप्रकाश डोणगावकर, महात्मा बसवेश्वरांचे तत्त्वज्ञान, स्वाती प्रकाशन, पूर्णा, प्रथमावृत्ती 2011, पृ.33
6. सुधाकर मोगलेवार, वीरशैव धर्मपंथ:इतिहास व तत्वज्ञान. नटराज प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती एप्रिल,1976, पृ. 195
7. हिरेमल्लूर ईश्वरन. लिंगायत धर्म, संस्कृती व समाज.सुविचार प्रकाशनमाला, कोरणेश्वर विरक्त मठ, उस्तुरी, प्रथम आवृत्ती, एप्रिल,2009,पृ.114
8. म.पू. पाटील व शि.बा. संकनवाडे, वीरशैव धर्मामृत (मराठी), कोल्हापूर, 1982, पृ.87
9. सुधाकर मोगलेवार, उपरोक्त, पृ.196
10. सचितानंद बिचेवार, परिवर्तनाचा महामेरु महात्मा बसवेश्वर, स्वाती प्रकाशन, पूर्णा, प्रथम आवृत्ती एप्रिल 2015, पृ. 110

# मौर्यकालीन रथ व रथशिल्प

**डॉ. भेलोंडे जगदीश व्यंकटराव**
इतिहास विभाग प्रमुख
शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,कन्नड

**प्रस्तावना**

प्रागैतिहासिक काळात चाकाचा लागलेला शोध हा मानवी जीवनात अमुलाग्र बदल करणारा ठरला. चाकामुळे केवळ दैनंदिन जीवनातील भांडीच निर्माण झाली नाही तर चाकापासून गाडी तयार करण्यात आली. गाडीच्या निर्मिती बरोबरच व्यापारास चालना मिळाली. बैल-गाडी, घोडा-गाडी बरोबरच रथाची निर्मिती करण्यात येऊ लागली. रथ हे समृद्धीचे, वीराचे किंवा शौर्याचे प्रतिक म्हणून ओळखले जात असल्यामुळे महत्वपूर्ण ठरते. रथ हे गतीचे साधन असल्यामुळे युद्धामध्ये याचा उपयोग केला जात होता. शिवाय विजयी यात्रा किंवा महोत्सव प्रसंगी याचा वापर केला जात होता. रथाला असलेल्या अनन्यसाधारण महत्वामुळेच देव-देवतांपासून राज्यकर्त्यानी याचा वापर मोठ्या प्रमाणात केला आहे. देवतांसाठी, युद्धासाठी, उत्सवासाठी वापरण्यात येणाऱ्या रथाचे अनेक प्रकार आहेत. रथाची निर्मिती करणारा स्वतंत्र जात किंवा वर्गही रथाकाराच्या स्वरूपात उदयास आला होता. प्राचीन भारतीय इतिहासात रथ हे महत्वपूर्ण साधन असल्यामुळे विविध ग्रंथातून याची माहिती मिळते. शिवाय शिल्प-स्थापत्याच्या निर्मिती मध्येही याचा समावेश करण्यात आला आहे. रथाच्या निर्मिती बरोबरच त्याच्या त्या रचनेत बदल होत जाऊन त्यात उत्कर्ष झालेला दिसतो. सिंधु संस्कृतीमध्येही रथाची निर्मिती करण्यात आली होती तशा प्रकारे अवशेषही प्राप्त झाले आहेत. सिंधु संस्कृती नंतर वैदीक संस्कृती मध्येही रथ असल्याचे अनेक उल्लेख वैदिक साहित्यात आढळतात. रामायण व महाभारत या साहित्यातूनही त्याचे उल्लेख आढळतात. मौर्य काळामध्ये युद्ध साहित्य म्हणून त्याची उपयुक्तता, रथाची रचना व शिल्प कलेमध्ये त्याची निर्मिती यांची माहिती मिळवण्याच्या उद्देशाने प्रस्तुत शोध निबंधाची मांडणी करण्यात आली आहे.

**मौर्य कालखंड :**

सोळा महाजन पदापैकी सर्वात मोठ्या असलेल्या मगध राज्यामध्ये नंदघराण्याचा अस्त करून चंद्रगुप्त याने मौर्य घराण्याची स्थापना केली. नंद राजकडे असलेला विस्तीर्ण भूप्रदेश त्याच्या अखत्यारीत आला. चंद्रगुप्त मौर्य नंतर बिंदुसार व त्यानंतर सम्राट अशोकाने राज्य केले. सम्राट अशोकानंतर दशरथ, संप्रती, शालिसुक, देववर्मन,शतधनवन व बृहद्रथ या राज्यकर्त्यांनी राज्य केले. या घराण्यातील शेवटचा शासक बृहद्रथ याचा खूण करून पुष्यमित्रशुंग याने शुंग घराण्याची स्थापना करून मौर्य घराण्याचा अस्त केला. इ. स. पू. 322 ते इ. स. पू. 180 या काळात मौर्य घराण्यातील राज्यकर्त्यांनी राज्य केले.

**रथ व रथाची निर्मिती :**

रथ हा शब्द गाडी किंवा देवतांचा शकट या अर्थानेही वापरला जातो. चाकाच्या शोधानंतर गाडी तयार करण्यात येऊन तीचा दळण-वळणाचे साधन म्हणून वापर केल्या जात होता. गाडीचा प्रारंभीक वापर युरोपातील 'कुरगान संस्कृती' मध्ये केल्या जात होता. 'इसवी सन पूर्व 3000 मध्ये ईरान मधील उडकू येथे चार चाकाची गाडीचे चित्र मिळाले.'[1] पण या सर्व गाड्या अवजड होत्या. गाड्यांच्या वापराबरोबरच त्याची उपयुक्तता लक्षात येऊन युद्धासाठी साधन म्हणून याचा उपयोग करण्यात येऊ लागला. हलक्या वजनाच्या गाड्यांच्या वापरा बरोबरच त्यासाठी घोड्यांचाही उपयोग करण्यात येऊ लागला. त्यामुळे गाडीस वेग प्राप्त झाला. 'युद्धात वापरण्यासाठी हलक्या वजनाचा रथ पश्चिम आशियात प्रथम हिटाईट आणि मिटानी लोकांनी इ.पू. 1800-1600 मध्ये वापरला.'[2] सिंधु संस्कृतीमध्ये मिळालेल्या अवशेषावरून तत्पूर्वीच रथाचा वापर होत होता हे स्पष्ट होते. रथाची रचना करत असताना त्याच्या विविध अंगाचा उल्लेख वैदिक साहित्यात आला आहे. "ऋग्वेदमध्ये अक्ष (आस), ईषा (दांडा), युग (जू),पातल्य (खीळ),नेमि (धाव)"[3] या रथांगाचा उल्लेख आलेला आहे तो प्रारंभिक अवस्थेतील रथांच्या संदर्भात होता त्यामध्ये पुढील काळात मोठ्या प्रमाणात भर पडलेली दिसते. सिंधु संस्कृतीतील रथाची रचना ही अशाच प्रकारची होती. लाकडा पासून रथ तयार करण्यात येत होते. रथ तयार करणारा

कारागिरांचा एक वर्ग ही तत्कालीन समाजात असावा. ऋग्वेदमध्ये तशा प्रकारे काम करणाऱ्यांचा वर्ग किंवा जात आस्तित्वात असल्याचे वर्णन केले आहे. रामायण व महाभारत या महाकाव्यातूनही रथाचे अनेक उल्लेख आलेले आहेत.

**मौर्य कालीन रथ :**

मौर्य कालीन रथांची माहिती अर्थशास्त्र व इंडिका या ग्रंथातून मिळते. युद्ध साहित्य म्हणून याचा वापर होत होता. सिकंदराचे भारतावर आक्रमण झाले तेंव्हा त्याला भारतीय सीमेवरील असलेल्या राज्यकर्त्यांशी संघर्ष करावा लागला. पोरस या राजासोबत झालेल्या संघर्षात त्याला रथ दलाचा सामना करावा लागला. चिखलामुळे पोरसच्या रथाचे चाके जमिनीत रुतून बसल्यामुळे रथादल निरुपयोगी ठरले. "सिकंदरच्या घोडेस्वारांच्या 21 फुट भाल्यांच्या पुढे भारतीय रथ निरर्थक ठरले. सीमा प्रदेशातील सिकंदरच्या आक्रमणा नंतर लढाईतील रथाचा वापर बंद झाला."[4] सिकंदर सोबतच्या युद्धात रथाचा वापर निरुपयोगी ठरला असला तरी युद्ध साहित्यच्या स्वरुपात रथाचा वापर गुप्त काळापर्यन्त असल्याचे दिसते. सिकंदर ज्यावेळेस भारतात आला होता त्यावेळेस त्याच्या सोबत अनेक विद्वान त्याच्या सोबत होते. त्या पैकी प्लुटार्कने "सिकंदरच्या आक्रमणावेळी मगध राजाकडे 8000 युद्ध रथ असल्याचा उल्लेख केला आहे."[5] याच मगध राजाचा पराभव करून चंद्रगुप्त मौर्याने मगध राज्य ताब्यात घेतले होते.

मौर्य काळात सैन्य व्यवस्थेमध्ये ज्याप्रमाणे घोडदळ, पायदळ होते त्या प्रमाणे स्वतंत्र रथदल होते. रथ दलाच्या प्रमुखास रथाध्यक्ष म्हटले जात असे. रथाध्याक्षाचे कार्ये हे निश्चित होते. मेगास्थनीजने रथांना नेहमी कार्यक्षम ठेवणे हे रथाध्यकक्षाचे काम असल्याचे वर्णन केले आहे. रथाध्यक्षाच्या कार्याची माहिती कौटिल्याच्या अर्थशास्त्र ग्रंथातही दिलेली आहे. रथाध्याक्षाचे रथ दलावर पूर्णत: नियंत्रण असे, त्याला रथाची निर्मिती करणारे कारखाने तयार करावे लागत असे शिवाय "10 पौरुष उंच व बारा पौरुष लांब हा सर्वात मोठा रथ त्यापेक्षा एक एक फुट लांबी कमी असलेले सहा पौरुष लांबी पर्यंत चे असे सात प्रकारचे रथ असावे. युद्धा बरोबरच विविध कार्यासाठी रथ तयार करून घ्यावेत. बाण, शास्त्रे, कवच आणि उपकरणे यांची व्यवस्था आणि सारथी, रथावरील योद्धा, रथाचे घोडे यांची आपापल्या कामात योजना हे रथाध्यक्षांनी जाणून घ्यावे तसेच पगारावर नेमलेल्या व हंगामी नोकरांच्या अन्नपाण्याची व मजुरीची कामे संपेपर्यंतची व्यवस्था पाहणे आणि त्यांना उचित संरक्षण व बक्षीस देऊन सन्मान करणे इकडेही त्यांनी लक्ष पुरविले पाहिजे."[6] असे प्रमाणित आकारामधील रथ तयार करून घेण्या बरोबरच रथाच्या सारथीचे प्रशिक्षण, त्यांचे शस्त्र व पगार या विषयीचे महत्वपूर्ण कार्य रथाध्याक्षास करावे लागत असे. रथ बनवण्यासाठी स्वतंत्र कारखाने असावेत परंतु कौटिल्याच्या अर्थशास्त्रात याची माहिती आलेली नाही. रथाचे महत्त्व कमी झाल्यामुळे ही माहिती दिलेली नाही असे मत मांडले जाते परंतु रथाच्या उल्लेखावरून रथ निर्माण करण्यासाठी लागणारे लोखंड व लाकूड आणि कातडी याचे काम करणारे कारागीर समाजामध्ये निश्चितच असावेत. योग्य पद्धतीचा लाकूड व लोखंड त्यासाठी लागत असे कातडे हे रथावरील योद्धा साठी कवच म्हणून वापरत असे.

रथाच्या निर्मिती बरोबरच रथाच्या कार्याविषयी कौटिल्याने असे वर्णन केले आहे की, "चारही बाजूने शत्रू सैन्याकडून होणाऱ्या आक्रमणापासून सैन्याचे रक्षण करणे, शत्रूच्या मोर्चावर ताबा मिळवणे, शत्रूची व्यूहरचना तोडणे व आपल्या भव्यतेव्दारे शत्रूंना भयभीत करणे."[7] अशा स्वरूपाचे कार्य रथदला कडून अपेक्षित होते. त्याच्या या कार्यावरून सैन्यामध्ये रथाची भूमिका व उपयुक्तता किती महत्वपूर्ण होती हे लक्षात येते. युद्ध समयी रथ दलाचा वापर कसा करावा याविषयी सुद्धा माहिती देण्यात आली आहे. सैन्याची रचना योग्यरीत्या करणे हे युद्धनीतीचाच एक भाग असे. त्यादृष्टीने युद्धभूमीवर रथदलाची रचना करत असताना "रथाच्या पुढे 15 पायदळ,5 घोडेस्वार व रथाच्या मागे तेवढेच ठेवावे. तीन तीन रथांचा एक एक गट करावा. रथव्युहात पंचेचाळीस रथ दोनशे पंचवीस घोडेस्वार, सहासे पंच्याहत्तर पुढे व तितकेच रथाच्या मागे ठेवावे. रथाच्या गटामध्ये दोन दोन रथांची भर घालत 21 पर्यंत संख्या वाढविता येते."[8] पायदळ व घोडदला बरोबरच रथ दलाचीही रचना करण्यात येत असली तरी शेवटी शत्रू सैन्याची रचना पाहून सैन्य रचनेत बदल करावा लागत असे. पोरोसच्या रथाचे उपकरण मौर्य युगात प्रचलित मानक मानले जाऊ शकते. प्रत्येक रथात "चार घोडे आणि सहा माणसे होते, त्यापैकी दोन ढाल वाहक होते, दोन धनुर्धारी रथाच्या प्रत्येक बाजूला तैनात होते आणि इतर दोन सारथी तसेच शस्त्रास्त्रधारी होते"[9] युद्धासाठी वापरण्यात येणाऱ्या रथावर साधारणात: एका योद्धा व एका सारथी असतो परंतु युद्धातील

सैन्याची उपयुक्तता लक्षात घेऊन शत्रू सैन्यावर चहुंबाजुने आक्रमण करण्यासाठी रथातील सैन्याची व सारथीची संख्याही वाढवलेली दिसते.

मौर्य काळात रथाचे उल्लेख युद्धासाठीचे साधन म्हणून येत असले तरी त्याचा वापर मोठ्या प्रमाणात होत नसावा. त्यासाठी युद्धभूमी ही अनुकूल असायला हवी होती तरच त्यांचा वापर करता येत होता. कौटिलीय अर्थशास्त्रात युद्धासाठीची जमीन कशी असावी याविषयीचे वर्णन आले आहेत. अशा स्वरूपाची युद्धभूमी मिळेलच असे नव्हते त्यामुळे रथांचा वापर कमी झाला असावा. असे असले तरी युद्धा शिवाय रथाचा वापर होत होता. "शहरांतील रस्त्यांच्या वर्णनात रथपथाचा व रथचर्यासंचार असा उल्लेख येतो मात्र दोन गावांना जोडणाऱ्या रथपथाचा उल्लेख येत नाही."[10] म्हणजे शहरांतर्गत याचा वापर होत होता. राजा किंवा राजपरिवारातील व्यक्ति किंवा प्रतिष्ठित व्यक्ति याचा वापर करीत असावेत. शहरांना जोडणाऱ्या रथपथाचा उल्लेख मिळत नाही यावरून दळण-वळणाचे साधन म्हणून याचा वापर कमी झाला असावा.

**शिल्प-स्थापत्यातील रथ :**

मौर्य काळात शिल्प-स्थापत्याची निर्मिती लेणी, स्तूप व मुर्तीशिल्पाच्या स्वरूपात मोठ्या प्रमाणात झालेली आहे. या शिल्प-स्थापत्यामध्ये रथ शिल्पाची निर्मिती केलेली आहे. भरहुत व साँची येथील स्तुपावर रथाचे शिल्प निर्माण करण्यात आले होते. 'साँची येथील स्तुपाच्या दक्षिण तोरणावर रामग्राम स्तुपाच्या दर्शनासाठी रथावर आरुढ होऊन सम्राट अशोक येत असल्याचे अंकित केले आहे. याच स्तुपाच्या उजव्या स्तंभा अग्रभागी सम्राट अशोक रथावर आरुढ आहे शिवाय बुद्धाच्या मिळवण्यासाठी मल्लांच्या विरुद्ध सात राजांव्दारा रथ सैन्याचे आक्रमणाचे दृश्य दाखवले आहे.'[11] यावरून मौर्यकाळात शिल्प स्थापत्यामधुनही रथशिल्प कोरण्यात येऊ लागले होते हे स्पष्ट होते.

**सारांश :**

रथ हे आर्यांबरोबर प्रथम भारतात आले होते ते आर्यसंस्कृतीचे एक वैशिष्ट्ये समजले जाते. रथाची निर्मिती सर्व प्रथम सिंधु संस्कृतीत झाली होती. रथाचे अवशेषही आढळले आहेत. गाडीच्या चाका बरोबरच रथा साठीच्या चाकांना आऱ्या तयार करण्याचे ज्ञानही येथील लोकांना होते. त्यामुळे युद्धा साठी वापरण्यात येणारे हलके रथ तयार करण्यात येत होते. समाजामध्ये लाकडा पासून रथाची निर्मिती करणारा एक स्वतंत्र वर्गच तयार झाला होता. रथाच्या विविध भागाचेही वर्णन आढळते. रथासाठी घोड्याचा वापर होत असे त्याची संख्याही रथाच्या आकारवर अवल्बुन असे. हलक्या व गतिशील रथाचा वापर युद्धासाठी केल्या जात होता. पायदळ व घोडदळा बरोबरच रथदळाचाही सामावेश सैन्यामध्ये झाला. त्यासाठी स्वतंत्र विभाग स्थापन होऊन त्याची जबाबदारी ही निश्चित करण्यात आली होती. संपूर्ण रथ विभाग रथाध्यक्षाच्या ताब्यात राहत असे. रथांच्या निर्मिती बरोबरच, सारथी व योद्धा यांचे प्रशिक्षण होणे यावर भर दिला जात असे. सैन्यारचनेत रथांची स्थान महत्वपूर्ण होते त्याच बरोबर रथांचे कार्येही ठरलेले होते. अनुकूल युद्धभूमीवरच रथांचा वापर होणे आवश्यक असल्याचे लक्षात आल्यानंतर रथांचा युद्धासाठीचा वापर कमी प्रमाणात होऊ लागला याचा अर्थ मौर्य काळात यद्धासाठी रथाचा वापर होत नव्हता असे नाही. रथांचा वापर सण-उत्सव प्रसंगी होत असे. शिल्प कलेमध्येही रथशिल्पाची निर्मिती करण्यात आली होत. रथावर आरुढ असलेले सैन्य व राजा यांचे दृश्य दाखवत असताना रथ,रथाची चाके व त्यास जुंपलेले घोडे ही कोरलेले आहेत. सण-उत्सव प्रसंगी धार्मिक कारणाकरीता त्याचा वापर होत असे.

**संदर्भ :**


1. हबीब इरफान (अनु. सिंह अवधेश कुमार), सिंधू सभ्यता- राजकमल प्रकाशन, नई दिल्ली पहला संस्करण 2016, पृ.21
2. ढवळीकर एम.के., आर्यांच्या शोधात, राजहंस प्रकाशन,पुणे आवृती तिसरी 2012, पृ 72
3. चित्राव सिद्धेश्वरशास्त्री, ऋग्वेदाचे मराठी भाषांतर- भारतीय चरित्र कोश मंडळ,पुणे आवृत्ती 1996, पृ. 258
4. कोसंबी दामोदर धर्मानंद, प्राचीन भारत की संस्कृती और सभ्यता तिसरा संशोधित संस्करण, 1990 पृ. 172
5. कित्ता - पृ. 172
6. कंगले र.पं., कौटिलीय अर्थशास्त्र, पृ. 199-200
7. मुखर्जी राधाकुमुद, चंद्रगुप्त मौर्य और उसका काल, दूसरा संशोधित संस्करण, 1990 पृ.213
8. कंगले र.पं., कौटिलीय अर्थशास्त्र –उपरोक्त -पृ. 533

9. Dikshitar V R Ramachandra, Mauryan Polity, Motilal Banarasidass publishers private limited Delhi First Edtion 1932 Page 191
10. कुलकर्णी र.पु., कौटिलीय अर्थशास्त्रातील शिल्पशास्त्र, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई पृ. 78
11. सिंह राम, प्राचीन भारतीय युद्ध व्यवस्था, राधाकृष्ण प्रकाशन, दिल्ली,पृ.33-34

# पेशवेकालीन यादवी स्वराज्यावरील परिणाम एक ऐतिहासिक अभ्यास

**धम्मदिप बबन मगरे** संशोधक विद्यार्थी
**डॉ. सुधाकर नारायन वाघ** श्रीमती दानकुँवर महिला महाविद्यालय, जालना

**प्रस्तावना -**

सतराव्या शतकात मराठा सत्तेचा उदयास मोठ्या प्रमाणावर पोषक परिस्थिती निर्माण झाली होती. एकदम न होता त्यास अनेक वर्ष लागली होती ज्या इस्लामी सत्तेने जो अन्याय, अत्याचार व जुलूम केला होता तो नष्ट करण्यासाठी मराठ्यांनी आपले राज्य स्थापन केले मराठी राज्याची सत्ता हातात येताच छत्रपती शाहुनी काही प्रमाणात यादवी युद्ध टाळण्याचा प्रयत्न केला होता. शाहू ताराबाई ला ज्या वादामुळे स्वराज्यात अस्थिरता निर्माण झाली होती. त्याच वादामुळे पेशवे मात्र सत्ताधीस बनले. पहिला बाजीराव पेशवा यांच्या काळात मराठ्यांचे वर्चस्व दिल्लीपर्यत निर्माण झाले. निजाम उलमुल्कचा पालखेड व भोपाळच्या युद्धात पराभव झाला भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर वर्चस्व निर्माण झाले.

या काळात मराठ्यांचा दरारा उत्तर आणि दक्षिण भारतातही पसरला मराठा मंडळातील सरदाराचा उत्कर्ष त्याच काळात झला छत्रपती पदा ऐवजी पेशवे पदाला महत्व प्राप्त झले सर्व सामान्य मराठी माणसाचा पहिला बाजीराव पेशवा आधारस्तंभ बनला पण बाजीराव जसा तलवार बहादूर होता तसा लेखणी पटू नव्हता व कार्यक्षम राज्यकारभार करण्यासाठी आता आयुष्य लाभले नाही सततच्या लढाईने आर्थिक स्थिती बिकट बनत गेली. बाजीराव पेशवा हा ब्राम्हण असून एका नर्तकीच्या मस्तानीच्या सहवासात आला आणि तिच्या सोबत वेळ घालवू लागल्याने त्याचा परिणाम स्वराज्यावर झाला ही बाजीराव ची कृती तत्कालीन समाजाला न आवडणारी नव्हती त्यातून त्यामुळे बाजीरावची प्रवृत्ती खालावत गेली आणि ते अल्पशा आजाराने त्यांचा मृत्यू 25 एप्रिल 1740 मध्ये मृत्यू झाला. नंतर स्वराज्यात स्वार्थ दूही, बेशिस्त व यादवी झाली होती.

**उद्दिष्टे :**

1. पेशवे बाळाजी विश्वनाथ यांच्या काळातील लढाईच्या परिणामाचा अभ्यास करणे.
2. आंग्रेशी संघर्ष व पेशवे बाळाजी विश्वनाथांनी यांच्या धोरणांचा अभ्यास करणे.
3. दाभाडे व पेशवा बाजीराव यांच्या झालेल्या दाभोईची लाढाईचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती :**

या शोधनिबंधासाठी दुय्यम स्त्रोतांचा उपयोग करण्यात आला असून त्यामध्ये पी.एच.डी. शोध प्रबंध, पुस्तके, ग्रंथ, मासिके, इंटरनेट, वृत्तपत्र, लेख या सामग्रीचा उपयोग करण्यात आला आहे.

**बाळाजी विश्वनाथ पेशवे यांच्या काळातील लढाईचे परिणाम :**

छत्रपती शाहू राजे यांनी पेशवे बाळाजी विश्वनाथ यांचा पेशवे म्हणून नियुक्त केली तेव्हा इतर आशावादींनी अनेक प्रश्न उपस्थित केले जे आजपर्यत अनुत्तरित आहेत पेशवे बाळाजी विश्वनाथ यांनी छत्रपती शाहूची सत्ता स्थिर करण्यासाठी आपले पूर्ण आयुष्य पणाला लावले छत्रपती शिवाजी महाराजांचा योग्य वारसा शाहू असून तो राज्यकारभार करण्यास कसा योग्य आहेत. हे मराठी सरदारांना पटवून सांगितले. सेनापती धनाजी जाधव, आरमार प्रमुख कान्होजी आंग्रे सारखे मातब्बर सरदारांना ताराबाईच्या प्रहवातून फोडून शाहूच्या पश्चात अनेक प्रसंगी समोपचाराने किंवा संघर्ष करून शाहूचे सर्व आसन स्थिर करण्याचा प्रयत्न बाळाजी पेशवे त्यांनी केली यासाठी त्यांनी खेडची लढाई, साताऱ्याची लढाई निजामांशी संघर्ष मराठे सरदारांशी संघर्ष, करावे लागले त्याच प्रमाणे त्यांना मराठामंडळ स्वराज्याचा सनदा त्यांनी आणल्या नवीन उत्पन्नाची साधने शोधली राज्याची महसूल व्यवस्था जास्त केली.

दमाजी थोरात व कृष्णराव खटावकर हे शाहू किंवा ताराबाई यापैकी कोणाची सत्ता मानत नव्हते. त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी शाहूने सेनापती चंद्रसेन जाधव यांना पाठवले व त्याच्या सोबत सेनापती बाळाजी विश्वनाथ बाळाजी विश्वनाथ यांना दिले. बाळाजीला सेनापतीपद दिल्यामुळे चंद्रसेन मनात पराकोटीचा राग होता एका हरणाच्या शिकारीच्या प्रकरणाचे कारण साधून बाळाजी विश्वनाथाला मारण्याचा प्रयत्न चंद्रसेन जाधवने केला. शेवटी बाळाजीने शाहूचा आश्रय

अबाजी पूरंदरे मार्फत घेतला शाहंना चंद्रसेन जाधवाने कळवले स्वामीनी बाळाजीस माझ्या स्वाधीन करावे त्यास आश्रय दिल्यास आम्हास महाराजांचे पाय सुटतील शाहूनी जाधवाची समजूत घातली पण त्याला समेट नको होता तो उघडपणे त्याला पन्हाळ्यावर जाऊन ताराबाईच्या सेवेत दाखल झाला ताराबाईच्या सांगण्यावरून कृष्णराव खटावकराने शाहूच्या प्रदेशात दहशत निर्माण करू लागला ही दहशत मोडून काढण्यासाठी शाहूंनी बाळाजी विश्वनाथ याची रवानगी 2 डिसेंबरला 1711 रोजी झालेल्या लढाईत बाळाजीने खटावकराच्या सैन्याचा धुव्व उडवला त्या लढाईत कृषराव व त्याचा मोठा मुलगा मारला गेला शाहूची कृष्णरावच्या मुलांनी माफ करून त्यांचे वतन त्याचा ताब्यात दिले.

**कान्होजी आंग्रे व विश्वनाथ पेशवे बाळाजी विश्वनाथ यांचे धोरण :**

16 व्या शतकातील मराठा आरमाराचे प्रमुख होते. छत्रपती शिवाजी महाराज यांनी मराठा आरमारांचा स्थापना करून 'कान्होजी आंग्रे याची आरमार प्रमुखपदी नेमणूक केली हे तुकोजी आंग्रे चा मुलगा होते कान्होजीने पश्चिम किनाऱ्यावर आपला दरारा निर्माण केला त्यांनी इंग्रज, पोर्तुगीज, डच, फ्रेंच आरमाराबरोबर लढून मराठा आरमाराचा भगवा मराठा समुद्रात फडकवत ठेवला कान्होजी आंग्रेचा सुरूवातीला शाहूशी विरोध नव्हता, पण कान्हाजी आंग्रेनी शाहूचा कल्याणचा प्रांत राजमाची, तुंग, तिकोना, धनगड हे सर्व किल्ले कान्होजी आंग्रनी काबीज केले. त्यांनी आसे ठरवले की शाहूची राजधानी साताऱ्यावर चालून येणार नाही अशी खबरदारी घेतली कन्होजी आंग्रे यांच्या हालचाली बंद करण्यासाठी शाहू महाराजांनी आपल्या पेशवा बहिरोपंत पिंगळेची त्यांनी रवानगी तसेच बहिरोपंत सोबत बंदोबस्ताची जबाबदारी बाळाजी विश्वनाथावर टाकली तुम्ही मोहिम करा आणि आंग्रेचा पूर्णपणे बंदोबस्त करा म्हणजे तुम्हाला पेशवेपद देऊ यावर बाळाजीने विनंती केली बाळाजी ने म्हणाले कि महाराज मला पदाच जोर माझ्या मागे असल्या शिवाय मी कामगिरी कशी करू म्हणून मला पेशवेपदाचा अधिकार देऊन रवाना करावे.

शाहूना बाळाजीचे म्हणणे पटले. 17 नोव्हेंबर 1713 रोजी बाळाजी विश्वनाथाला पेशवाईचे वस्त्र दिली गेली. इंग्रज, पोर्तुगाल, डच व सिद्दी हे परकीय मराठी आरमार उध्वस्त करणार आहेत असे म्हणणे बाळाजीने कान्होजीला सांगतिले. म्हणुन कान्होजिला खंबीर साथीची गरज होता तेव्हा बाळाजीची साथ घेतली तसेच बाळाजी पेशवे यांना माहीत होते की शाहूचा पक्ष हाच सनदशीर आहे. शाहूच्या पायदळाच्या पाठिंबा आसल्या शिवाय आंग्रेची सत्ता टिकणार नाही हे बाळाजीने पटवून दिले आणि मराठे आरमार प्रमुख कान्होजी आंग्रची शक्ती वाढली. पोर्तुगीज, इंग्रज, डच, सिद्दी या परकियांना या घटनेमुळे एक प्रकारची दहशत निर्माण झाली.

**दाभोईची लढाई :**

28 एप्रिल 1731 रोजी दाभोईची लढाई झाली ही लढाई गुजरात प्रांतात पेशव्याच्या राजकीय हस्तक्षेपामुळे त्र्यंबकराव दाभाडे आणि पेशवे बाजीराव प्रथम या दोघांत मोठा संघर्ष गुजरातच्या चौथ (कर वसूल) या अधिकारामुळे संघर्ष होता गुजरातच्या चौथ कर वसुल करण्याचा अधिकार खंडेरवा दाभाडे यांच्या काळापासून दाभाडे यांच्या कुळाकडे होता पण बाजीराव पेशवे यांची त्र्यंबकराव दाभाडे यांना गुजरात च्या चौथचे (कर वसुली) करण्याचा अधिकर वाटून देण्यास सांगितले पण त्र्यंबकराव दाभाडे यांनी नकार दिल्याने एप्रिल 1731 मध्ये बाजीराव दाभाडेच्या छावणीवर हल्ला केला.

दाभोईच्या लढाईत त्र्यंबकराव दाभाडेना रोखण्यासाठी चिमाजी अप्पांना मोठी सेना घेऊन गेले याचा युद्धा दरम्यान हत्तीवर बसलेले त्र्यंबकराव यांना एका बंदुकधारीने गोळी मारली त्यामुळे त्यांच्या सैन्याचे मनोबल खचु लागले याचा युद्धात त्र्यंबकराव याचे साजरे मालोजी पवार यांचा मृत्यू झाला चिमाजी अप्पा हे पेशवे बाजीराव त्यांचे धाकटे बंधू होते याच लढाईत पेशव्यांची अनेक सेनापती मृत्यूमुखी पडले.

**सारांश :**

पेशवा बाळाजी विश्वनाथ यांना शाहुंची सत्ता स्थिर कराची होती. त्यांनी स्वराज्यातील सर्वशत्रूंचा बंदोबस्त केला त्यात पेशव्यांनी आंग्रे दामाजी थोरात, निंबाळकर,जाधव, उदाजी चव्हाण, लष्करी कारवाई करून त्यांचा बंदोबस्त केला तसेच त्यांनी मराठराजमंडळाची स्थापना केली आणि त्यानी स्वत: महसूल अधिकार राहीले. दाभोईच्या लढाईत सुद्धा त्यांनी दाभाडे यांना बंदुकीची गोळी मारली त्यांचे मनोबल कमी झाले. हे सिध्द होते.

**संदर्भ :**

1) ओके, प्रमोद, पेशवे घरण्याचा इतिहास कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे.

2) खोबरेकर वि.गो महाराष्ट्राचा इतिहास, मराठा कालखंड भाग 2 महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ 1988.

3) सरदेसाई. गो. अ. पेशव्यांच्या रोजनीशीतील उतारा, मुंबई 1932

4) उदय कुलकर्णी, अनुवाद विजय बावणे माधवराव पेशवा विजय आणि व्यथा

5) साने. का. ना- दाभाडे सेनापती यांची हकीकत पुणे 1809.

# पेशवेकालीन समाजव्यवस्था

**प्रा. डॉ. डी. ई. मनेरे**
संशोधक,
के. एम. सी.कॉलेज (KP)

**प्रस्तावना**

प्राचीन काळापासून भारतीय समाजमन आणि व्यवस्था ही नेहमीच एक कुतूहलाचा विषय राहिलेली आहे. कारण भारतीय लोकांच्या सामाजिक जाणीवा या प्रत्येक कालखंडात एक कळीचा मुद्दा बनून राहिल्या आहेत. येथील वैशिष्ट्यपूर्ण सामाजिक रचना ही संपूर्ण जगात कोठेही पहावयास मिळत नाही. मग ती चातुवर्णव्यवस्था असेल, एकत्र कुटुंब पद्धती असेल, बालविवाह, जरठविवाह असेल किंवा विविध सामाजिक-धार्मिक चालीरीती किंवा रूढी परंपरा असतील. या सर्वांनीच आपला सांस्कृतीक वेगळेपणा जपला आहे. अर्थात ती व्यवस्था चांगली होती किंवा किंवा वाईट होती ही बाब तुर्तास आपण बाजूला ठेऊयात व मध्ययुगीन कालखंडाकडे वळूयात. मध्ययुगीन महाराष्ट्रात संपूर्ण समाजात विविध व अनेक सामाजिक-धार्मिक चालीरीती व रूही-परंपरा यांनी थैमान घातले होते. तसेच विविध राजकीय स्थित्यांतरेही प्रामुख्याने याच कालखंडात घडून आलेली दिसतात. त्यांचाही परिणाम येथील सामाजिक धार्मिक जीवनावर प्रत्यक्षपणे पडलेला दिसतो आणि सामाजिक व्यवस्था संक्रमित झालेली दिसते. परंतू पेशवेकालीन सामाजीक जीवनाचा अभ्यास करताना एक बाब प्रकर्षाने जाणवते की, या कालखंडात सामाजीक - धार्मिक व सांस्कृतीक बाबतीत कमालीची क्लिष्ठता आलेली होती, व विशिष्ट विचार वर्ण व वर्ग आणि व्यवस्था यांचा अंगिकार करुन सदरील समाज जीवन पध्दती प्रभावीत झालेली आहे कशी? ते सविस्तर पाहूयात !

**कुटुंब व्यवस्था व स्त्रियांचे स्थान :**

पेशवेकालीन कुटुंब पध्दतीत दोन तीन पिढया एकत्र राहत असत. पितृसत्ताक कुटुंबपध्दती हे या काळातील कुटुंबव्यवस्थेचे वैशिष्टये असे. समाजातील विविध घटकांची देवाण - घेवाण ही जातीबंधनामध्येच होत असे. गावात ज्या-प्रमाणे पाटलाचे स्थान असे तेच स्थान कुटंबात कुटुंब प्रमुखाचे असे. या काळात व्यक्तिकडे जातीव्यवस्थेचा एक घटक म्हणून पाहिले जात असे. कुटुंबप्रमुख हा कुटुंबातील धोरणात्मक निर्णय घेत असे. तसेच त्यास कुलधर्म कुलाचार प्रामुख्याने पाळावे लागत असत. एकत्र कुटुंबात भाऊ-भाऊ मग ते 4-5 असले तरी एकत्र राहत असत. कुटुंबप्रमुख हा कुटुंबातील सर्व लोकांच्या ज्याच्या- त्याच्या कुवतीनुसार श्रमाची विभागणी करित असे. तसेच येणारे उत्पन्न व होणारा खर्च यावर नियंत्रण ठेवणे हे कामही त्याला प्रामुख्याने पहावे लागत असे. एकत्र कुटुंबपद्धतीचा महत्वाचा फायदा म्हणजे रोगी, निराधार, विधवा, दुर्बल इत्यादींना कुटुंबपद्धतीत सामाऊन घेतले जाई. कुटुबातील अन्य सदस्यांप्रमाणेच सदरील कुटुंबपद्धतीत कुटुंबप्रमुखाला अनन्यसाधारण असे स्थान होते. कारण घराची अधोगती आणि प्रगती था दोहासही कुटुंबप्रमुखालाच जबाबदार धरले जात असे, एकत्र कुटुबपध्दतीमुळे परस्पर सहकार्याने व स्नेहाने जीवन कंठणे सोपे जात असे. तसेच एकमेकांच्या सुखा-दुखात संपूर्ण कुटंब सहभागी होत असे. त्यामुळे एकंदरीत एकत्र कुटुंबपद्धतीतील जीवण हे आनंददाई व खुशहाल अशा प्रकारचे होते असे दिसते. परंतू कुटंब प्रमुख म्हणून पुरुषास जे समाजात स्थान होते. ते स्त्रीयांना कधीच प्राप्त झाले नाही. कुटुंबात नेहमीच पुरुषांचे वर्चस्व राहिले व स्त्रीचा दर्जा गौण असाच राहिला.

एकत्र कुटुंबपध्दतीत स्त्रीने सासू-सासरे, दीर, जावा, नणंद व आप्तजन यांची तीने मनोभावे सेवाकरावी असेच मानले जात होते. बालविवाहाची पध्दत प्रचलीत असल्याने स्त्रीला लहानपणा पासूनच पुरुषजातीवर अवलंबून रहावे लागत असे.

**ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्रांची स्थिती :**

पेशवेकाळात ब्राम्हणांना अतिशय महत्व प्राप्त झाले होते. गावात ब्राम्हणांची अनेक घरे असत. अध्ययन, अध्यापन, यजन, अनुग्रह या सर्व गोष्टी ते करीत असत. गावोगाव या ब्राम्हण कुटुंबांना या काळात वतने दिली गेली होती. त्यांच्यात कायस्थ, प्रभु, कोकनस्थ, चितपावन, वन्हाडी असे अनेक अंतर्गत भेद अस्तित्वात होते.

शिवकाळात मराठे क्षत्रिय म्हणून ओळखले जात असत. शेती, पशुपालन व लष्करातील नोकरी ही क्षत्रियांची काही कामे होती. ब्राम्हणानंतर क्षत्रिय वर्णाला, वर्गाला पेशवेकालीन समाजात महत्व होते असे दिसून येते.

शेटे, महाजन, वाणी यांचा समावेश या वैश्य वर्णात होत असे. तेली, तांबोळी सारख्या बलुतेदारांनाही कसबा किंवा पेठेत दुकाने थाटून व्यापार केलेला दिसतो. थोडक्यात् व्यापार-उदीम करून समाजाची गरज भागविणारा वर्ग म्हणजे वैश्य होय. तर न्हावी, कुंभार, सुतार, गुरव, तेली शिंपी, माळी, गोंधळी, धनगर, लोहार, परीट, कोळी, तांबोळी, साळी, सनगर, रामोशी, कासार, कैकाडी, बुरुड, फासेपारधी, बेलदार, पाथरवट वडार इ. जाती शुद्र किंवा तत्सम जातीत मोडत असत.

**भटक्या व विमुक्त जाती :**

खेड्यात अनेक भटक्या जमाती असत. त्या एका ठिकाणी स्थिर न रहाता पोटापाण्यासाठी एका गावातून दुस-या गावी सदैव भ्रमण करित असत. म्हणून त्यांना भटक्या जमाती असे म्हणत. त्यात पारधी, कैकाडी, बुरुडू, वडार, बेलदार, गोसावी, कानफाटे, भगत, बहुरूपी, नंदीबैलवाले, माकडवाले, वाघ्या-मुरळी, कोल्हाटी, दरवेशी, गारुडी, गोंड, वासुदेव, वैदू, लमाण, वंजारी, घिसाडी इत्यादी चा समावेश असे, आपल्या कुवतीनुसार या काळात ते गावगाडा चालविण्यास हातभार लावीत असत.

**सामाजिक-धार्मिक चालीरीती व परंपरा :**

पेशवेकाळात विविध चालीरीती व रुढी-परंपरा प्रचलीत असल्याचे दिसते. त्यात, संस्कार, मुहूर्त, ग्रहणे, शकून, पायगुण, अनुष्ठाने, प्रायश्चित, वृत्ते, नवस, गृहपीडा, गृहशांती, भूतबाधा, चेटूक, होम-हवन इत्यादी तर सन-समारंभामध्ये गणेशोत्सव, दसरा, दीवाळी, संक्रांत, वसंत पंचमी, शिमगा आणि होळी यांना महत्वाचे स्थान होते.

**सन समारंभ**

**गणेशोत्सव :**

पेशवेकाळात मोठया प्रमाणात साजरा होणारा उत्सव म्हणजे गणेशोत्सव होय. हा उत्सव कोकणात अधिक लोकप्रिय होता. यामध्ये श्रीस्थापना आणि विसर्जन हे अत्यंत धुमधडाक्याने साजरे केले जात असे. दरम्यानच्या काळात मनोरंजनादी कार्यक्रमाची रेलचेल असे. सरकारतर्फे गणेशोत्सव मोठ्याप्रमाणावर साजरा होत असे व त्यावर हजारों रूपए खर्च केले जात असत.

**दसरा :**

या दिवशी घोडा श्रृंगारून त्यावरून सीमोलंघन करत असत. गावच्या सिमेलगत असणाऱ्या शमी वृक्षाची पुजा केली जात असे. शमीची पाणेच सोने म्हणून आणून परस्परांना देत असत. अशाप्रकारची खेळातील मुर्दुमकी गाजवून परतल्यानंतर घरी औक्षणाचा (ओवाळण्याचा) कार्यक्रम होत असे. त्यावेळी लूटून आणलेले सोनेच त्यांना ओवाळणी दाखल टाकले जात असे. या सनाबरोबरच दिवाळी हा सनही महत्वाचा होता. तथापी पेशवेकाळात त्याचा फारसा गाजावाजा आढळत नाही.

**संक्रांत :**

दिवाळीनंतरचा म्हत्वाचा सण म्हणजे संक्रांत होय. याप्रसंगी तीळ-गुळ दिले जात असे. तीळ-गुळ मोठ्यांनी लहानास देण्याची प्रथा होती. छत्रपती आपल्या सरदारांना तिळगूळ अगत्यूपूर्वक पाठवत असत. पेशवेकाळात परस्परांना तीळशर्करा पाठविलेली शेकडा पत्रे उपलब्ध झाली आहेत.

**सतीप्रथा :**

पेशवेकाळात उच्चवर्णीयांमध्ये सती जाण्याची प्रथा काही प्रमाणात आढळते. राजघराण्यातील काही स्त्रिया सती गेलेल्या आढळतात. स्त्री सती गेल्यावर तिच्या पतीची पापे नष्ट होतात व स्वर्गात पती-पत्नी सुखाने राहातात अशा भाबड्या समजूती होत्या. त्यामुळे आपला पती मृत्यू पावल्यानंतर अनेक स्त्रीया या काळात सती गेल्याची उदाहरणे सापडतात.

**बालविवाह :**

समाजात बालविवाहाची प्रथा रूढ होती. आठ वर्षांहून अधीक वयाची मुलगी झाल्यास अनिष्ठ मानले जात असे व आई-वडीलांना संकट वाटे. त्यामुळे अगदी लहान वयातच मुला-मुलींची लग्न होत असत. दुसऱ्या बाजीरावाने 9 वर्ष वयानंतर कोणतीही मुलगी विवाहाशिवाय राहू नये असा हुकूम काढलेला आढळून येतो.

**बाल- जरठ विवाह :**

वधू लहान व वर वधुपेक्षा किती तरी पटीने वयाने मोठा असणे यास बाल-जरठ विवाह म्हणत असत. पेशवेकाळात ही प्रथा मोठ्या प्रमाणात रूढ होती. उदा. नाना फडणविसांनी याच्या 67 व्या वर्षी 9 वर्षीय जिजाबाईशी लग्न केले. तसेच समाजात अनेक श्रीमंत व्यक्ती धनाच्या जोरावर उतारवयात लहान मुलींशी लग्ने करीत असत.

**पशुहत्या :**

ब्राम्हण समाज वगळता सर्वच जातीत देवाला पशुबळी देण्याची प्रथा सर्रास चालू होती. याबाबत समाजात फार मोठ्या प्रमाणात अंधश्रध्दा होत्या. घरात कोणी अजारी पडले की, रोग्यास बरे वाटावे म्हणून देवास कोंबडे, बकरे कापले जात असे. मूल होत नसल्यास एखादी घटना घडल्यास, गुप्तधन मिळावे म्हणून, चांगले पीक यावे म्हणून अशा अनेक कारणांसाठी देव-देवीच्या पुढे पशुहत्या हात असे.

**अंधश्रध्दा -**

18 व्या शतकात समाजात अनेक अंधश्रध्दा बोकाळलेल्या होत्या. एखादया शुभकार्यास जातेवेळी मांजर, विधवा आडवी जाणे अशुभ मानले जाई. ओवाळतांना पणती विझणे, पवित्र प्रसंगी शिंक येणे, कावळा शिवणे, पापणी फरफरणे, दृष्ट लागू नये म्हणून घराला चप्पल बांधणे, चौकटीला लिंबू - मिरची बांधने अशा कितीतरी गैरसमजूती व अंधश्रध्दा तत्कालीन समाजात होत्या.

**आलुतेदार :**

प्रत्येकजन परस्परांवर अवलंबुन असल्याने समाजात एकप्रकारे सहजीवनाचे व सहकार्याचे वातावरण निर्माण होत असे. अलुतेदार व बलुतेदार यांच्यामुळे गावातील गरजा गावातच भागवल्या जात असत. अलुतेदारांच्या संख्येबाबत इतिहासकारांत एकमत आढळत नाही, ती संख्या 18 दिली आहे. तर ग्रँट डफ अलुतेदारांची संख्या 12 देतो.. परंतु प्रत्यक्षात ती संख्या 12 पेक्षा जास्त असल्याचे दिसून येते.

**बलुतेदार :**

शिवकाल व पेशवेकाल या दोन्ही कालखंडात बलुतेदारांना समाजात महत्वाचे स्थान होते. बलुते व वतने ही वंशपरंपरागत चालत आलेली असत. बलुतेदारांची संख्या सर्वसाधारणपणे बारा असे. त्यामुळे त्यांना बारा बलुतेदार असे म्हणत. त्यांना खेडेगावात सुगीच्या दिवसात काही दाणा-गोटा मिळणे हा तर त्यांचा हक्कच होता त्यांच्या कामाचा मोबदला म्हणून पिकाचा काही हिस्सा सुगीच्या दिवसात बलुतेदारांना देत असत. त्यात सुतार, लोहार, चांभार, महार, मांग, कुंभार, न्हावी, धोबी, गुरव, जोशी, भाट, मुलाना यांचा समावेश असे.

**वतनदार :**

वतनदारांमध्ये प्रामुख्याने खालील वतनदारांचा समावेश होत असे त्यात पाटील, कुलकणी, चौगुला, शेटे-महाजन, देशमुख व देशपांडे हे वतनदार गावचे प्रशासन पहाण्यासाठी असत शिवकाळात वतनदारांचा वचक होता, परंतू पेशवेकाळात वतनावरून मोठ्याप्रमाणात तंटे झालेले आढळतात. सुरुवातीला राजाच्या एकनिष्ठ सेवेबद्दल, पराक्रम गाजवल्याबदल वतने देत असत परंतू उत्तर पेशवाईच्या काळात खाजगी कारणावरूनही वतने दिली गेली.

**वेठबिगार अस्पृश्यता व गुलामगिरी :**

समाजातील गरिब वर्गाला सरकारला कर देता येत नसल्याने त्यांनी आपली सेवा सरकारला व समाजाला देण्याची पध्दत होती. वेठबिगारांकडून विना वेतन सेवा करवून घेण्याचा अधिकार सरकारचे अधिकारी वापरित असत. या काळात सात प्रकारची वेठबिगारी अस्तित्वात होती. पेशवेकाळात वेठबिगारांना कष्टाची कामे करावी लागत. त्यांना सामाजिक अपमान व आर्थिक शोषणाला बळी पडावे लागत असे..

पेशवाईत तर अस्पृश्यांच्या हालअपेष्टांना पारावार राहीला नाही. त्यांचे जीवन अधीक कष्टमय झाले होते. यात महार, मांग, चांभार, ढोर इत्यादी प्रमुख जातीसह अन्य जातींचा समावेश होत असे. एकंदरीत पेशवेकाळात जाती-जातींमधील दरी वाढलेली दिसते. तसेच प्रत्येक जात आपले वेगळेपण जपण्याचा प्रयत्न करित होती.

या काळातील गुलाम व गुलामगिरीविषयी सांगावयाचे झाले तर, मराठी सरंजामदारांजवळ अशा प्रकारचे शेकडो दास-दासी असत. गुलामांना स्थावर मालमत्तेचा एक भाग समजले जात असे गुलामांमध्ये पुरुषांपेक्षा स्त्रियांची संख्या जास्त होती. गुलामांना मिळणारी वागणूक मालकावर अवलंबून असे. तरी देखिल भारतीय गुलामगिरीही पाश्चिमात्य गुलामगिरी सारखी असाध्य नव्हती असे काही इतिहासकार मानतात.

**गोतसभा :**

पेशवेकालीन जातीय संघर्षाचा विचार करताना आपणास गोतसभेच्या उल्लेखनिय सहभागाचा विचार करावा लागतो. गोतसभा या जातीअंतर्गत समस्या सोडविणारी अत्यंत म्हत्वाची संस्था होय. या सभेत उपजातींमधील प्रमुख व्यक्तिचा समावेश असे. ज्या वयोवृद्ध व अनुभवी असत त्यांना गोतांच्या सामाजिक व धार्मिक चालीरितींचे यथार्थ ज्ञान असे. आणि त्यांच्या निर्णयाचा सरकारकडून आदर केला जात असे. क्वचित प्रसंगी या सभा व्यक्ति वा सरकारकडून बोलवल्या जात असत.

**सारांश**

पेशवेकालीन समाजजीवनाचे एकंदरीत आकलन केले तर असे लक्षात येते की, पेशवेकाळात राजकीय दृष्ट्या जरी काही प्रमाणात भरभराट झाली असली तरी सामाजिक बाबतीत मात्र हा कालखंड बऱ्याच अंशी नकारात्मक असाच राहिला आहे. कारण या काळात पुरुषप्रधान संस्कृती असल्यामुळे कुटुंबातील स्त्रियांचे स्थान हे दुय्यम व गौण दर्जाचे होते. बालविवाह, विधवा केशवेपन, बहुपनिकत्व, जरठविवाह, सती, पशुहत्या व विविध अंधश्रद्ध इत्यादीनी समाजात थैमान घातले होते. सकाळी झोपेतून उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत विविध व्रत-वैकल्य पाळली जात असत. त्यामुळे या काळात वैज्ञानीक दृष्टिकोण विकसीत होऊ शकला नाही. तसेच अस्पृश्य अलुतेदार, बलुतेदार, भटके, वतनदार, फिरस्ते व वेठबिगार आणि गुलाम यांच्या वाट्याला अत्यंत हालाखीचे जीवाण आले. धार्मिक सन-उत्सव यावर अमाप खर्च होत असल्याने बऱ्याचवेळेस जनकल्यानाच्या कामांना खिळ बसली होती. पेशवे हे बाम्हण वर्णीय असल्याने इतर वर्णाच्या व वर्गांच्या वाट्याला दुय्यम स्थान येऊन त्यांचे सामाजिक महत्व कमी झाल्याचे दिसते व त्यातून खूपवेळा तत्कालीन समाजात जातीय संघर्ष देखिल निर्माण झाले. महाराष्ट्रातील एकंदरीत पेशवेकालीन समाजजीवन हे विविध बाबींनी नकारात्मक वाटत असले तरी या कालखंडात ब्राम्हण वर्ण व वैदीक तत्वज्ञान यांना मात्र सुगीचे दिवस आल्याच दिसते.

**संदर्भ :**


1. कुलकर्णी अ.रा, खरे ग.ह. (संपा), मराठ्यांचा इतिहास, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयनगर पुणे, 1985.
2. भिडे गजानन, नलावडे विजय, मराठी सत्तेचा विकास व -हास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, 2006.
3. भावे वा कृ, पेशवेकालीन महाराष्ट्र, वरद प्रकाशन, पुणे, 2010.
4. गवळी पी. ए, पेशवेकालीन समाज व जातीय संघर्ष, आंनद प्रकाशन, औरंगाबाद, 2015.
5. कुलकर्णी, खरे (संपा), मराठ्यांचा इतिहास, (खंड, 1,2,3), कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, 1984.
6. चाफेकर ना. गो, पेशवाईच्या सावलीत, आर्य संस्कृती प्रेन्स, बनारस, 1937.
7. देशपांडे प्र. न, मराठ्यांचा उदय आणि उत्कर्ष, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे 2001.
8. राजवाडे वी.का., मराठयांच्या इतिहासाची साधने, राजवाडे संशोधन मंडळ, धुळे, 2002.
9. Sinha H.N., Rise of the Peshwas, Life span Publishers, Delhi, 2023.
10. Ranade M. G., Rise of the Maratha Power, Punalekar & Company, Bombay, 1900.

# तिमिर संहारक : मार्टिन ल्युथर किंग (ज्यु.)

**प्रेमला आश्रोबा माने**
संशोधक विद्यार्थिनी,
स्वा. रा. ति. म. वि. नांदेड

**प्रस्तावना:**

माणूस म्हणून जन्माला आलेल्या प्रत्येक व्यक्तीला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार निसर्गानेच बहाल केलेला आहे आणि निसर्गाच्या अधिकारांमध्ये कुठल्याही सामान्य व्यक्तीला ढवळाढवळ करण्याचा काही एक अधिकार नसतो. परंतु प्रगत अशा अमेरिकेत उच्च पदस्थ समाजात जन्मलेल्या व्यक्तींच्या लक्षात हे येईलच असे नाही आणि ज्यांच्या पर्यंत सामाजिक असमानतेची झळ पोहचलीच नाही ते सामाजिक समानतेचे भाष्य करतील हे माननीय चुकीचे होऊ शकते आणि म्हणूनच वर्णभेद, वंशभेदाविरुद्ध न्यायहक्काचा मार्टिनने दिलेला लढा प्रेरक ठरतो.

**बीजशब्द :** निग्रो, वंशभेद, भारत भेट, बहिष्कार, न्यायहक्क, अहिंसा.

जीवन जगत असताना निसर्गाने घालून दिलेल्या नियमानुसारच ते जीवन जगले पाहिजे अन्यथा या नियमात अडथळा आणणाऱ्या घटकांविरुद्ध आवाज हा उठवला जातोच. ज्यावेळी व्यक्तीच्या सहनशीलतेची परिसीमा संपते त्याक्षणापासूनच त्याच्यावर झालेल्या अन्यायाची चीड ही एक उग्ररूप धारण करून समाजासमोर येते आणि या समाजाला जेव्हा नेतृत्व करणारा चेहरा सापडतो तेव्हा त्यामागे संपूर्ण समाज संथगतीने का होईना पण खंबीरपणे उभा राहतो.

मार्टिन ल्युथर किंग (ज्यु.)चा प्रभाव अमेरिकेत असाच निग्रो जनमानसांवर खोलवर पडलेला दिसून येतो हे काही अपवादात्मक नव्हते. अमेरिकन राजकीय धुरंधराविरुद्ध निर्भयपणे उभे राहण्याचे, नि:शस्त्र प्रतिकाराचे 'अहिंसा' हे शस्त्र मार्टिन ल्युथर किंगला गांधीजींकडून मिळाले होते. याशस्त्राने दिलेल्या लढ्याने संपूर्ण अमेरिका ढवळून निघाली. खरे पाहता भारताची आणि मार्टिनची नाळ त्यांच्या कार्यकर्तुत्वाच्या आरंभीच जोडली गेली होती. आधुनिक काळात ज्या महत्त्वपूर्ण व्यक्तींनी इतिहास घडवला त्यांच्याच पंगतीत डॉ. मार्टिन ल्युथर किंग(ज्यु.) यांचा समावेश आपल्याला करावा लागतो. त्यांनी त्यांच्या भाषणांनी आणि विचाराने एकीकडे सर्वसामान्यांना अंतर्मुख केले तर दुसरीकडे त्यांचे एका पिढीला आपल्या हक्कांसाठी जागरूक करुन, केलेल्या यशस्वी कार्यातील योगदान नजरेत भरते.

कृष्णवर्णीयांचे नेते म्हणून कार्य करीत असताना गरीब-श्रीमंत, लिंगभेद, वंशभेद यांसारख्या कोत्या भेदांमध्ये अडकून न पडता अवघ्या मानवतेला कवेत घेण्याचे महानकार्य या महापुरुषांनी केले. साल 1955 मध्ये झालेल्या ‘बसेस बंद’ आंदोलनातील रोजा पार्क्स या महिलेला पाठिंबा देण्यासाठी सुरू झालेल्या सामाजिक जीवनाचा शेवट 4 एप्रिल 1968 मध्ये एका माथेफिरूच्या गोळीने झाला. माणूस म्हणून स्वार्थापोटी अमाणूषपणाचा टोक गाठताना नाझी छळछावणीलाही लाजवेल अशी उदाहरणे आपल्यालेखी प्रगत असलेल्या अमेरिकेच्या इतिहासात पाहावयास मिळावे हा केवढा विरोधाभास.

**अनैसर्गिक असमानता :**

अल्पशिक्षण, बेकारी, दारिद्र्य, गुन्हेगारी हे सर्व एकमेकांवर आधारित असते आणि यालाच बळी ठरले अमेरिकेतील निग्रो लोक.(आज निग्रो हा शब्द कालबाह्य झाला आहे.) गोऱ्या लोकांप्रमाणेच काळ्या लोकांना ही समान न्यायहक्क मिळालाच पाहिजे असे म्हणत मार्टिनने आपल्या आयुष्यातील प्रत्येक क्षण न्यायहक्कासाठीच जगला. "शहरात आणि गावातून सगळ्याच दक्षिण अमेरिकेत काळ्या गोऱ्यांमधील भेदभाव तेव्हा शिगेला पोहोचला होता. काळयांच्या- त्यावेळी त्यांना निग्रो म्हणत- वस्त्या निराळया, शाळा निराळया रेस्टॉरंटमध्ये पाट्या असत, फक्त गोऱ्या लोकांसाठी, आगगाड्यांमध्ये वेगळे डबे, बसमध्ये मागच्या बाजूला वेगळी जागा, पिण्याच्या पाण्याची कारंजी निराळी, एवढेच काय, गोरे रस्त्यावरून जात असले तर काळयांनी कडेला गटारात उभे राहायचे. एका जगात राहत असले तरी गोऱ्यांची जग निराळे होते, काळयांचे निराळे. गोऱ्यांची कितीतरी वरच्या दर्जाचे आणि काळ्याचे सर्व दृष्टीने निकृष्ट."[1] काळयागोऱ्यातील निर्दयी असमानतेचा फटकाऱ्यातच मार्टिन लहानाचा मोठा झालेला असला तरी आईच्या शिकवणुकीमुळे त्याने बालपणीच स्वतःशीच निश्चय

केला होता की, "आपण गोऱ्यांपेक्षा कुठेही कमी नाही. आपणही कोणी महत्त्वाची व्यक्ती बनू आणि साऱ्या जगाला हे सिद्ध करून दाखवू."[2] लहानपणीच्या बाळकडूनी मोठेपणी त्याला स्वस्थ बसू दिले नाही. रोजा पार्क्सच्या बस बंद आंदोलनातच त्याच्या हातात नेतृत्वाचे सूत्रे आली आणि मार्टिनने ती पुढे आयुष्यभर पेलली.

**पहिला विजयी लढा :**

मार्टिनला हे चांगलेच माहीत होते की, त्याने जे कार्य हाती घेतले त्यात सर्वात जास्त धोका त्याच्या जीवालाच आहे. त्यामुळेच त्याने म्हटले होती की, "हर आदमी के पास कोई ऐसा मकसद होना चाहिए, जिसके लिए वह जान दे सके! जिसके पास जान देने लायक कोई मकसद ही नही है, उसे जीने का भी हक नही है!"[3] याच सूत्राने त्याने त्याच्या आयुष्यातील प्रत्येक गणित सोडवले. मॉंटगोमेरीमधील रोजा पार्क्स नामक महिला नेहमीप्रमाणे बसमध्ये चढली व गोऱ्यांच्या राखीव जागेवर बसली. त्यानंतर चढलेल्या गोऱ्या माणसाला बसण्यासाठी जागा नसल्यामुळे तिला उठण्यास सांगितले पण तिने ठाम नकार देताच तीला अटक झाली. पुढे तिच्यावर खटला सुरू होणार होता पण अटकेच्या दिवशीच तिची जामीनावर सुटका झाली या घटनेतूनच वंशभेदाला विरोध करण्यासाठी बस बहिष्कार सुरू करण्यात आला. "मार्टिन काळया लोकांच्या वाड्या वसत्यातून बसच्या बहिष्कार बद्दल लोकांना सांगत फिरला."[4] शोषितांच्या मनात शोषणाबद्दल जोपर्यंत संताप निर्माण होणार नाही तोपर्यंत ते स्वातंत्र्याच्या दिशेने वाटचाल करणार नाहीत हे मर्टिनला माहीत होते यासाठी हजारो लोकांनी एकत्रित येऊन असहकाराचा निर्णय घेऊन लढण्यासाठी तो प्रयत्न करीत होता. मार्टिनच्या नेतृत्वाखाली अहसहकाराच्या अस्त्राने व लोकांच्या सहकार्याने मॉंटगोमेरीचा प्रश्न कोर्टातून सुटला व या पहिल्या विजयी लढ्याने मार्टिनला पुढील संघर्षाच्या वाटचालीस नवचैतन्य लाभले.

मॉंटगोमेरीतील बस बहिष्कारात गांधीजींचा अहिंसात्मक प्रतीकारच त्याचा मार्गदर्शक बनला होता. या अहिंसेच्या तत्वाबद्दल बोलताना मार्टिन स्वत: 'गांधी नावाचे महात्मा' या पुस्तकातील एका लेखात नमूद करतात की, "स्थूल मानाने बोलावयाचे म्हणजे नागरिक हक्काच्या चळवळीत अहिंसेचा अवलंब याचा अर्थ या लढ्यात शस्त्रात्रांवर अवलंबून न राहण्याचे धोरण. याचा अर्थ विषमता व गुलामगिरीचा पुरस्कार करणाऱ्या राजवटीचे रिवाज व कायदे यांच्याशी असहकार. याचा अर्थ प्रतिकाराच्या चळवळीत जनतेचा प्रत्यक्ष सहभाग. अप्रत्यक्ष मार्गावर भर दिला तर जनतेला प्रत्यक्ष कृतीत सहभागी होण्याची संधी बऱ्याच वेळा मिळत नाही, असा अनुभव आहे".[5] हे अहिंसेचे शस्त्र देणाऱ्या गांधींचा भारत एकदा स्वतःच्या डोळ्यांनी पाहवा या हेतूने तो भारतात ही आला होता. त्यावेळी त्याची पं.नेहरूंबरोबर दलितांच्या प्रश्नावर देखील सविस्तर चर्चा झाली होती. नेहरूंकडूनच त्याने जेव्हा भारतीय नेत्यांकडून दलितांना त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी खर्च केलेले सामर्थ्य व खेडेगावातील गरीब लोकांच्या मदतीसाठी राबवल्या जाणा-या कार्यक्रमाबद्दल ऐकले तेव्हा तो भारावून गेला होता. या भारत भेटीतच त्याने "भारतात मी प्रवासी म्हणून आलेलो नाही तर वारकरी म्हणून आलो आहे."[6] असे उदगार काढले होते. या भारतभेटीतच मार्टिनला अहिंसेच्या तत्त्वाचा अतिशय जवळून साक्षात्कार झाला होता आणि त्यातूनच आपल्या बांधवाबद्दलच्या आपुलकीने त्याच्या मनाचा ठाव घेतला होता.

अमेरिकेच्या दक्षिण भागातील अल्बानी, जॉर्जिया मधील सामाजिक तणाव दिवसागणिक अधिकच वाढत असताना गोऱ्याने वांशिक श्रेष्ठत्वातून अतिशय आडमुठी भूमिका घेतली होती. "school segregation, denial of voting rights, segregation in parks, libraries, restaurants and bases. The Negroes of Albany suffered in quite silence. The throbbing pain of segregation could be felt but not seen. it scarred Negroes in every experience of their lives. They lived in segregation. They ate in segregation; they learned in segregation; they prayed,and road and worked and died."[7] खरे तर ही कृती म्हणजे माणसांच्या स्वाभिमान आणि आत्मसन्मानाला ठेच पोहोचणारी होती. माणसाचे माणूसपण नाकारणारी होती.

**बार्मिंगहॅमचे यश :**

बर्मिंगहॅम "वांशिक प्रश्नातलं ते सगळ्यात आडमुठं आणि सोवळं शहर".[8] इथे जन्म घेतलेल्या एखाद्या निग्रोच्या आयुष्याबद्दल सांगायचे झाले तर, त्याचे जीवन म्हणजे जन्मापासून मृत्यूपर्यंत वर्णविद्वेषाची कहाणीच होती. बर्मिंगहॅम मध्ये नीग्रोंची "लोकसंख्या दोन पंचमांश पेक्षा जास्ती असली तरी मतदानाचा अधिकार फक्त एक अष्टमांश लोकांना आहे."[9] हे माहीत असल्यामुळेच मार्टिनने येथील आपल्या समाज बांधवांना माणूस म्हणून जगता यावे यासाठी येथे एक चळवळ हाती

घेतली होती. या लढ्यात अनेक स्त्री-पुरुषांना, लहान मुलांना अतिशय जाचक त्रासातून जावे लागले होते, पण मार्टिनच्या अहिंसावादी तत्त्वाच्या ताकदीची ओळख संपूर्ण जगाला झाली व मार्टिनने आपल्या प्रयत्नाने आणि नेतृत्वाने बार्मिंगहॅम मध्ये मोठा विजय मिळविला होता. याचा दुसरा परिणाम असा झाला की, राष्ट्राध्यक्ष केनेडीने न्यायहक्काच्या कायद्यासाठी तातडीने व जास्त गांभीर्याने प्रयत्न करण्यास सुरुवात केली होती. या बर्मिंगहॅमच्या विजयाने काळ्या लोकात जणू संजीवनी संचारली होती, यातून त्यांना लढण्याचे नवे बळ मिळाले होते, I have a dream म्हणत मार्टिनने मुक्तीची स्वप्न लाखो लोकांच्या डोळ्यांना पहायला शिकवली होती.

**समान नागरी हक्क :**

बर्मिगहॅमच्या विजयाचा आनंद मार्टिनला काही घेता आला नाही, कारण गोऱ्या लोकांच्या मनातील खदखदणाऱ्या तीव्र वर्णद्वेषाने हिंसाचार आणि क्रौर्याचा कडेलोट केला होता, असे असतानाही मार्टिनच्या असहकार, अहिंसा, बहिष्कार यामुळे पुढे राष्ट्राध्यक्ष जॉन एफ. केनेडीने समान नागरी हक्काचे बिल काँग्रेसमध्ये मांडण्याचा निर्णय घेतला व ते बिल काँग्रेसमध्ये येऊ घातले असतानाच त्यांची हत्या करण्यात आली, त्यांची हत्या म्हणजे मार्टिन व सर्व निग्रो समाजाला बसलेला फार मोठा धक्काच होता, कारण केनेडींना मर्टिनच्या चळवळीबद्दल अस्था होती, त्यानंतर आलेले नवे राष्ट्राध्यक्ष लिंडन जॉन्सन हे मात्र कट्टर वर्णव्देशी होते त्यामुळे त्यांच्याकडून हे बिल मंजूर होईल की नाही यामध्ये फार मोठी शंका होती, मात्र केनेडिना श्रद्धांजली म्हणून हे न्यायहक्काचे बिल राष्ट्राध्यक्ष लिंडन जॉन्सन यांनी दोन्ही काँग्रेसमध्ये संमत करून घेतले. मार्टिनच्या या अहिंसात्मक कृतीमुळे त्याचा नोबेल पारितोषिकाने गौरव करण्यात आला होता व आपल्याला मिळालेले हे नोबेल पारितोषिक म्हणजे अहिंसात्मक चळवळीचा सन्मान होता असे त्याचे म्हणणे होते.

**मतदानाचा हक्क :**

अमेरिकेतील निग्रोंना आतापर्यंत जरी समान नागरी न्यायहक्क मिळाले असले तरी अजून मतदानाचा हक्क मिळालेला नव्हता, परिणामी सेल्मामध्ये मतदानाच्या हक्कासाठी लढा उभारला गेला. "वास्तविक, समान नागरी कायद्यामध्ये कृष्णवर्णीयांच्या मतदानाच्या अधिकारांबाबत काहीच तरतूद नव्हती, खरं तर संविधानाने कृष्णवर्णीयांना मतदानाचे अधिकार दिलेले होते पण वर्णभेद मानणारे गोरे आपल्या दहशतीच्या जोरावर कृष्णवर्णीयांना मतदार म्हणून नोंदणी करूच देत नसत. कारण कृष्णवर्णीयांना मतदानाचे अधिकार मिळाले असते तर वर्णभेद करणाऱ्या गोऱ्या विरोधात कृष्णवर्णीयांनी मतदान केलं असतं आणि तसं झालं असतं तर गो-यांची सत्तेतून हकालपट्टी व्हायला वेळ लागला नसता."[10] म्हणूनच मतदार नोंदणीची प्रक्रिया अतिशय किचकट आणि त्रासदायक करून ठेवली होती, शिवाय नोंदणी कार्यालय गैरसोयीच्या वेळी खुली असायची, त्याबरोबरच नोंदणीसाठी आवश्यक असलेली एक नमुना चाचणी जाणून बुजून अवघड करून ठेवलेली होती. परिणामतः ती सुशिक्षित कृष्णवर्णीयांनाही कठीण वाटायची, मात्र मार्टिनचे नेतृत्व लाभल्याने मतदानाचा हक्क कृष्णवर्णीयांना मिळाला खरा, पण यासाठी कृष्णवर्णीयांना फार मोठ्या अत्याचार आणि रक्तपाताला सामोरे जावे लागल्याच्या खुणा इतिहासात सापडतात.

**शेवटचे भाषण :**

मेम्फिस मधील सफाई कामगारांनी पगारात वाढ, कामाच्या ठिकाणचे वातावरण आरोग्याच्या दृष्टीने सुरक्षित असावे यासाठी शहरप्रशासना विरोधात संप पुकारला होता. मात्र यासंपाला म्हणावे तसे यश काही मिळत नव्हते आणि म्हणूनच मर्टिनने या मेम्फिस मध्ये येऊन भाषण करावे असे लॉसनला वाटत होते, जेणेकरून त्याच्या भाषणाचा फायदा या संपाला होईल. यासाठी मार्टिन ही तयार झाला व तो ही तिथे आला मात्र येताना त्याला किंचितशीही कल्पना आली नसेल की, येथेच त्याच्यावर जीवघेणा हल्ला होईल व येथे त्याने केलेले भाषण हे त्याचे शेवटचे भाषण ठरेल. 4 एप्रिल 1968 रोजी एका माथेफिरूने मार्टिन वर गोळी झाडताच अहिंसात्मक तत्त्वज्ञान रक्ताच्या थारोळ्यात शेवटचे श्वास घेत पडले होते. तिथल्याच हॉस्पिटलमधुन तासाभरातच त्याचा मृत्यू झाला म्हणून सांगण्यात आले आणि आयुष्यभर अहिंसेच्या वाटेवरुन चालणा-या मार्टिनचा हिंसेने असा शेवट झाला.

**समारोप :**

वास्तविक पाहता माणसाच्या त्वचेच्या रंग आणि माणसाचं माणूसपण यांचा काडी एवढाही संबंध नसतो. माणूस म्हणून जन्मलेल्या प्रत्येकाला सन्मानाने माणुसकीने वागवलं जावं ही साधी-सरळ-सोपी गोष्ट पण हीच साधी सोपी गोष्ट वर्णाधिष्ठ्यांनी कठीण करून ठेवली, म्हणूनच माणसाचं माणूस पण रंगावरून मोजणाऱ्या व्यवस्थेशी मार्टिन सर्व ताकदीनिशी शेवटच्या श्वासापर्यंत लढला. जेव्हा मार्टिनचा मृत्यू झाला होता तेव्हा त्याचं वय अवघे 39 वर्षाचं होते पण तेरा वर्ष सतत न्यायहक्काच्या लढ्यासाठी काम करत असणाऱ्या मार्टिनवर एवढा ताण होता की, त्याचे हृदय साठ वर्षाच्या माणसाच्या हृदयाएवढे नाजूक झाले होते. पुढे अमेरिकेत झालेली बराक ओबामाची राष्ट्राध्यक्षपदी निवड ही मार्टिनची स्वप्नपूर्तीचं म्हणावे लागेल. यामुळे अहिंसात्मक मार्गाने प्रत्येक सामाजिक प्रश्नाला उत्तर देणाऱ्या व निग्रोंच्या आयुष्यातील वंशभेदाचा गडद अंधार दूर करण्यासाठी मार्टिन ल्युथर किंग (ज्यु.) चा लढा आणि ध्येयवेडेपणा आजही प्रेरणादायक ठरतो.

**निष्कर्ष :**

अमेरिकेतील मार्टिन ल्युथर किंग(ज्यु.)चा लढा हा श्वेत वर्गविरूद्ध अश्वेत वर्गाचा लढा होता. गोऱ्याकातडीच्या लोकांनी दिलेल्या सामाजिक वेदनेवरील तो उपाय होता. या लढयात समाजातील प्रत्येक स्त्री-पुरुषाने, अबाल-वृद्धाने हिरीरीने सहभाग घेतला होता. याचाच परिणाम म्हणून अश्वेत वर्गातील लोकांना समान नागरीहक्क मिळाले. मतदानाचा, व्यक्तिस्वातंत्र्याचा हक्क मिळाला. शिवाय नवीन उद्योग निर्मिती करणे, संपत्ती जमा करणे यासारखे अशक्य वाटत असणाऱ्या घटकात सहभाग घेता येणे शक्य होऊ लागले. कातडीच्या रंगावरून दिल्या जाणाऱ्या अमानुष वागणुकीऐवजी इच्छेने किंवा अनिच्छेने अश्वेत वर्गाला समाजाच्या प्रवाहात घेणे श्वेत वर्गाला भाग पडले. यामुळेच मार्टिन ल्युथर किंग(ज्यु.)चे कार्य, त्यांचे योगदान अमेरिकेतील जनतेसाठी प्रकाशवाट ठरली असे म्हणणे संयुक्तिक ठरते.

**संदर्भ :**


1) अश्विनी धोंडगे, स्वातंत्र्ययोद्धा मार्टिन ल्युथर किंग (ज्यू.), दिलीपराज प्रकाशन प्रा. लि., 215 क, शनिवार पेठ, पुणे-411030, द्वितिय आवृत्ती-15 जुलै2014. पृ. क्रं. 21

2) उपरोक्त, अश्विनी धोंडगे, पृ. क्रं.24

3) कुमार दिनकर, मार्टिन लूथर किंग, प्रभात पेपर बैक्स, 4/19आसफअली रोड, नवी दिल्ली- 110002, संस्करण 2021,पृ. क्रं.61,62

4) उपरोक्त, अश्विनी धोंडगे, पृ. क्रं. 60

5) रॉय किणीकर (संपा.), अनिल किणीकर (सहा०), गांधी नावाचे महात्मा, डायमंड पब्लिकेशन्स,1255 सदाशिव पेठ, पुणे-411030, पृ. क्रं.120

6) उपरोक्त, अश्विनी धोंडगे, पृ. क्रं. 91

7) Clay Born Carson(Edited),The autobiography of Martin Luther King jr., Warner books, Hachette book group, USA 237 park Avenue, New York. P.no.156

8) उपरोक्त, अश्विनी धोंडगे, पृ. क्रं.108

9) उपरोक्त, अश्विनी धोंडगे, पृ. क्रं.109

10) परचुरे कीर्ती, समानतेचं स्वप्न पाहणारा मुक्तीदाता- मार्टिन ल्युथर किंग, कनक बुक्स, कुमार वाडमय विभाग, डायमंड पब्लिकेशन,पुणे-411030, पृ. क्रं.114

# प्राचीन कालीन पूर्व विदर्भातील बौद्ध धम्माचा इतिहास- चंद्रपूर,भंडारा व नागपूर जिल्ह्याच्या विशेष संदर्भात

**डॉ. रुपेश महादेव मेश्राम**
सहयोगी प्राध्यापक,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स, ब्रम्हपुरी

प्राचीन काळात विदर्भ नावाचे महात्वाचे राज्य होते. 'देवटक' येथे मिळालेल्या शिलालेखावरून सम्राट असोकाचे विदर्भाशी संबंध होते. सम्राट असोकाने 5 स्तूपे बांधले. चंद्रगुप्त दुसऱ्याची मुलगी प्रभावती गुप्ताचा विवाह विदर्भात झाला होता. कवी कालिदासाच्या 'मालविकाग्निमित्र' या नाटकात विदर्भाचा उल्लेख मिळतो. सातवाहन घराण्याचा राजा गौतमीपुत्र सातकर्णी, राजा विजय सातकर्णी याची नाणी पूर्व विदर्भात सापडली. प्रसिद्ध बौद्ध पंडित नागार्जुन हा काही काळ येथे राहिला. वाकाटक आणि नाग वंशीय राज्यांनी या प्रदेशावर राज्य केले. पूर्व विदर्भातील चंद्रपूर, नागपूर आणि भंडारा जिल्ह्यामध्ये अनेक स्तूपे, विहारे, संघाराम, लेण्या आणि शिक्षणाची केंद्रे होती. चंद्रपूर जिल्ह्यात भद्रावती ची 'विजासन' लेणी, संघाराम आणि एक असोक निर्मित स्तूप बल्लारपूर जवळ मिळालेली बुद्ध मूर्ती, ब्रम्हपुरी चे तहसील कार्यालयाजवळ मिळालेली बुद्धाची पाषाण मूर्ती, उदापूर मध्ये मिळालेले बौद्धकालीन अवशेष, देवटेक येथे मिळालेला असोकाकालीन शिलालेख, चंद्रपूर, नागपूर, आणि भंडारा जिल्ह्यातील विविध लेणी, पवनी चा जगन्नाथ स्तूप, चांडकापूर महाविहार आणि हरदोला स्तूप हे सर्व पूर्व विदर्भातील बौद्ध धम्माच्या अस्तित्वाचे प्रतिक आहेत.

**प्रस्तावना** :- महाराष्ट्राच्या पूर्व भागाला 'विदर्भ' या नावाने ओळखल्या जाई.भारताच्या मध्यभागी असलेल्या विदर्भाला प्राचीन काळापासून फार महत्व आहे. पूर्व विदर्भात नागपूर, भंडारा, गोंदिया,चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्याचा समावेश होतो. सम्राट असोकाच्या काळात पूर्व विदर्भात विशेषतः चंद्रपूर, भंडारा आणि नागपूर जिल्ह्यात बौद्ध धम्माचा मोठ्या प्रमाणात प्रसार झाल्याचे दिसून येते. प्रस्तुत लेखात पूर्व विदर्भातील बौद्ध धम्माच्या प्रसाराचा अभ्यास करण्यात आला.

पूर्व विदर्भाचा प्राचीन परिचय : - प्राचीन काळात विदर्भ नावाचा देश होता. वैदिक साहित्य, उपनिषद यामध्ये विदर्भाचा उल्लेख मिळतो. 'भागवत पुराणात ' विदर्भ नावाचा ऋषभ देवाचा पुत्र होता असा उल्लेख मिळतो. पूर्व विदर्भावर विविध काळात अनेक राजांनी व घराण्यांनी राज्य केले. शुंगवंशीय राजा 'अग्निमित्र' आणि विदर्भाची राजकन्या 'मालविका' यांच्या प्रेमकथेवर आधारित कवी कालिदासाच्या 'मालविकाग्निमित्र' या नाटकात विदर्भाचा उल्लेख मिळतो. 'देवटक' येथे मिळालेल्या शिलालेख यावरून सम्राट असोकाचे विदर्भाशी संबंध होते असे निश्चितपणे सांगता येते. चंद्रगुप्त दुसऱ्याने आपली मुलगी प्रभावती गुप्ता वाकाटक राजा रुद्रसेन दुसरा याला दिली होती तेव्हा तिच्या मदतीकरिता चंद्रगुप्त दुसऱ्याने आपला एक अधिकारी आणि कवी कालिदास याला विदर्भात पाठविले होते. याच काळात कवी कालिदासाने' मेघदूत' हे काव्य लिहिले.[1] सातवाहन घराण्याने या प्रदेशावर आपले अधिराज्य गाजविले. वाकाटक राजा प्रवरसेन दुसरा याने या प्रदेशावर राज्य केले.

बौद्ध धम्माचा पूर्व विदर्भात प्रसार : - भारताच्या सांस्कृतिक इतिहासात बौद्ध धर्माला महत्वाचे स्थान आहे. सिद्धार्थ गौतम बुद्धाने बौद्ध धम्माची स्थापना केली. मानवी जीवनाच्या कल्याणासाठी बुद्धाने मानवाला चार सत्ये, पंचशील तत्वे आणि अष्टांगिक मार्ग सांगितला.[2] भगवान बुद्धाचे हे तत्वज्ञान अत्यंत साधे,सरळ आणि सोपे असल्यामुळे जनतेनी मोठ्या संख्येने त्याचा स्वीकार केला. भगवान बुद्धाने संपूर्ण भारतभर प्रवास करून जनतेमध्ये धम्माचा प्रसार आणि प्रचार केला. भगवान बुद्धाच्या महापरिनिर्वाणानंतर त्यांच्या शिष्यांनी धम्म प्रसाराचे कार्य अविरत सुरु ठेवले परिणामतः संपूर्ण भारतात धम्माचा प्रसार झाला. [3]

कलिंग युद्धाच्या नंतर मौर्य सम्राट असोकाने धम्माचा स्वीकार केला आणि आपल्याला समजलेला धम्म जनतेला कळावा यासाठी असोकाने सम्पूर्ण भारतभर शिलालेख-स्तंभलेख कोरले, स्तूपाची निर्मिती केली, विहारे बांधले, लेणी निर्माण केल्या, संघाराम बांधले आणि त्यासाठी 'धर्ममहामात्र' ची नियुक्ती केली.[4]

तिसऱ्या धम्म संगितीचे आयोजन करून बौद्ध धम्माचा जगात प्रसार करण्यासाठी भारत व भारताच्या बाहेर धम्म प्रसारक पाठविले त्यामुळे बौद्ध धम्म जागतिक धम्म बनला. चीन आणि मध्य आशियात बौद्ध धम्म प्रसारित झाला. सम्राट असोकाने महाराष्ट्रात 'महाधर्मरक्खीत' यास पाठवून आपल्या अधिकाऱ्यांमार्फत 5 स्तूपे बांधल्याचा उल्लेख हुएनत्संग च्या प्रवास वर्णनात मिळतो. कुशाण सम्राट कनिष्क याने बौद्ध धम्माचा स्वीकार करून त्याचा प्रचार-प्रसार केला. सम्राट हर्षवर्धनाच्या कारकिर्दीत प्रसिद्ध चीनी यात्रेकरू हुएनत्संग (च्यांग) बौद्ध धम्माच्या अभ्यास करण्यासाठी प्रचंड संकटावर मात करून, न डगमगता, जीवघेणा प्रवास करून भारतात आला. हुएनत्संग संपूर्ण भारतभर प्रवास त्यावर करून त्याने 'सि-यु- की' नावाचा ग्रंथ लिहिला. हुएनत्संग (च्यांग) संपूर्ण भारतातील बौद्ध विहारे, स्तूपे, संघाराम, लेणी आणि शिक्षण विद्यापीठांना भेट देऊन त्याचा उल्लेख आपल्या प्रवास वर्णनात केला.[5] भारतात ब्रिटीश सत्तेच्या काळात भारतीय पुरातत्व खात्याचे महासंचालक मेजर जनरल सर अलेक्झांडर कनिंगहम आणि काही ब्रिटीश अधिकारी यांनी हुएनत्संगच्या प्रवास वर्णनाच्या याचा आधार घेवून असंख्य ठिकाणी संशोधन व उत्खनन केले आणि लुप्त झालेली अनेक महत्वाची स्तूपे, विहारे, संघाराम, लेण्या आणि शिक्षणाची केंद्रे शोधून काढली.[6]

पूर्व विदर्भावर मौर्य, सातवाहन, वाकाटक आणि नागवंशीय राजांनी शासन केले. सातवाहन घराण्याचा राजा गौतमीपुत्र सातकर्णी याने 'वेणाकटकस्वामी' (वैनगंगा नदीच्या क्षेत्रातील लोक) क्षत्रपांचा पराभव करून विदर्भाला परकीय दास्यातून मुक्त केल्याचा उल्लेख मिळतो.[7] सातवाहन राज्याचा 29 वा राजा विजय सातकर्णी याची नाणी पूर्व विदर्भात सापडली यावरून असे निदर्शनात येते कि पूर्व विदर्भावर सातवाहन राजांची सत्ता होती.[8] विजय सातकर्णी याने प्रसिद्ध बौद्ध पंडित नागार्जुन याला आपल्या राजधानी जवळ 16 मैल अंतरावर भांदक (भद्रावती ) येथे 'विजासन' विहार बांधून दिल्याचा उल्लेख मिळतो.

बौद्ध भिक्खूचे स्तूप हे उपासनेसाठी व विहार निवासासाठी असत. पावसाळ्याच्या काळात वर्षावास आणि निवासासाठी लेण्याचा उपयोग केला जाई.या गुफांच्या खोल्यांमध्ये बौद्ध भिक्खू ध्यानधारणा करीत. ह्या लेण्या पूर्व विदर्भातील नागपूर,भंडारा आणि चंद्रपूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात आढळून येतात. यावरून असे म्हणता येते की, पूर्व विदर्भात बौद्ध धम्माचा मोठ्या प्रमाणात प्रसार झाला होता. विदर्भात नाग लोकांची वस्ती होती. विदर्भ आणि महाराष्ट्रात नागांनी बौद्ध धम्म स्वीकारला होता. विदर्भातील नागपूर व नागांचे महत्व सर्वांना माहित आहे. नाग नाव असलेली अनेक शहरे आणि गावी विदर्भामध्ये आजही आहेत. जसे-नागपूर, नागभीड, नागझरी, नागनदी. त्यामुळेच 1956 ला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी नागपूर येथे बौद्ध धम्माचा स्वीकार केला. याविषयी बोलताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले "धर्म परिवर्तनासाठी नागपूर निवडण्याचे कारण म्हणजे नागपूर हे नाग लोकांचे ठिकाण. ज्यांनी बौद्ध इतिहासाचे वाचन केले आहे ते सांगू शकतील की, नागवंशीय लोकांनी बौद्ध धर्माच्या प्रसारामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली होती". पूर्व विदर्भातील बौद्ध धम्माचे काही केंद्र पुढील प्रमाणे –

**चंद्रपूर जिल्हा - भद्रावती (भांदक)** :- बौद्ध साहित्यामध्ये विदर्भाचा व्यापारी मार्ग म्हणून भद्रावती (प्राचीन भांदक) नगराचा उल्लेख मिळतो. चंद्रपूर जिल्ह्याच्या काही मैल अंतरावर हे नगर आहे. ब्रिटीश काळात भारतीय पुरातत्व खात्याचे महासंचालक मेजर जनरल सर अलेक्झांडर कनिंगहम यांनी चीनी प्रवासी हुएनत्संगच्या प्रवास वर्णनाचा आधार घेऊन इ.स.1874 मध्ये विजासन लेणी शोधून काढली. हुएनत्संगच्या विदर्भातील पवनी व भद्रावती या स्थळाला भेट दिली. तेथून तो आंध्र प्रदेशातील मधील कांची येथे गेला. हुएनत्संग आपल्या प्रवास वर्णनात (भांदक) भद्रावती येथील राजधानीच्या दक्षिणेस एक प्राचीन संघाराम आणि जवळचा एक असोक निर्मित स्तूप होता असे म्हणतो. भांदक पासून दोन मैलावर विजासन टेकडी असून त्या टेकडीत तीन भव्य लेणी (विपस्सना करण्याचे ठिकाण) आहेत. ही लेणी पूर्वाभिमुख आहे. ती बारा फुट उंच आणि सुमारे नऊ फुट रुंदीची आहेत. मधली लेणी 74 फुट लांबीचे असून डावीकडे 35 फुट व उजवीकडे 47 फुट लांबीचे आहे. मधल्या लेण्याचे प्रवेशद्वार पूर्वाभिमुख आहे. डावीकडील उत्तराभिमुख तर उजवीकडची दक्षिणाभिमुख आहे. या तिन्ही लेण्यात भगवान बुद्धाची आसनस्थ मूर्ती आहे. या लेण्यास हुएनत्संग 'संघाराम' म्हणत असावा. या लेण्यांमध्ये प्रसिध्द बौद्ध पंडित नागार्जुन काही काळ राहिला.[9] इ.स. च्या 4 शतकात येथे भगवान बुद्धाच्या मुर्त्या कोरण्यात आल्या. या लेण्यांमधील भगवान बुद्धाची ध्यानस्त मुद्रेतील आसनस्त मुर्ती अतिशय सुंदर आहे. या मुर्त्या त्या वालुका पाषाणावर कोरलेल्या आहेत.

ब्रिटीश अधिकारी मेजर विकिन्सन यांना भद्रावती येथे एक शिलालेख प्राप्त झाला तो नागपूर येथील केंद्रीय संग्रहालयात नेण्यात आला. डॉ.स्टीव्हन्सनने जनरल ऑफ बाम्बे ब्रांच ऑफ रॉयल सोसायटीच्या प्रथम खंडामध्ये पृ.148 वर त्याला भाषांतारासहित प्रकाशित केले होते.[10] 17 ऑक्टो.1956 ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी चंद्रपूर येथे धम्मचक्क अनुवर्तन करून शेकडो लोकांना त्यांनी बौद्ध धम्माची दीक्षा दिली. यासाठी ते सकाळी चंद्रपूरच्या विश्राम गृहात आले असताना तेथील जनतेला म्हणाले " भद्रावती हे बौद्धांचे फार मोठे ऐतिहासिक स्थळ आहे. मी पुन्हा येथे आलो तर भद्रावतीचा पूर्ण इतिहास सोबत घेऊन येईन".[11]

**ब्रम्हपुरी** : चंद्रपूर जिल्ह्याच्या उत्तरेला एका टोकावर असलेला तालुका म्हणजे ब्रम्हपुरी होय. आधुनिक काळात शैक्षणिक दृष्ट्या प्रगत तालुका म्हणून ओळखला जातो. प्राचीन काळात ब्रम्हपुरी चे महत्त्व होते. हे नगर वैनगंगा नदीच्या काठाजवळ आहे. इ.स.1899 मध्ये ब्रम्हपुरीजवळ सातवाहन राजा विजय सातकर्णी याची 183 नाणी मिळाली होती. यावरून असे निदर्शनात येते कि या परिसरात बौद्ध कालीन संस्कृती अस्तित्वात होती.[12] डिसेंबर 2022 मध्ये ब्रम्हपुरी येथील तहसील कार्यालय परिसरात बांधकाम सुरु असताना बुद्धाची प्रतिमा असलेली शिला मिळाली.

**उदापूर** :- चंद्रपूर जिल्ह्याचा पूर्वेला असलेल्या ब्रम्हपुरी नगराजवळील उदापूर हे छोटेसे गाव बौद्ध धम्माचे प्रमुख केंद्र होते. उदापूर येथे अशोक कालीन बौध्द स्तूप असल्याचा उल्लेख चिनी प्रवासी हुएनत्संगच्या आपल्या प्रवास वर्णनात म्हणतो.[13] इ.स.1970 मध्ये उदापूर येथील स्तूपाच्या पाहणी साठी दिल्ली, मुंबई आणि नागपूर येथील पुरातत्व विभागाची संशोधक मंडळी आली होती. येथील बौद्ध स्तूप विटा, चुना यांनी बांधलेला आहे. उदापूर मध्ये सातवाहन कालीन मातीची खेळणी,भांडी, इतर अवशेष आणि परकीय रोमन व्यापारी यांचे सिक्के ह्या वस्तू मिळाल्या आहेत. अनेक व्यापारी भगवान बुद्धाचे अनुयायी होते. येथील बौद्ध स्तुपाच्या व्यवस्थेकरिता सरळ मनाने दान करीत असावे.[14]

**देवटेक :-** चंद्रपूर जिल्ह्यातील नागभीड तालुक्यात पूर्व दिशेस चार मैल अंतरावर देवटेक या गावी मिळाला आहे. विदर्भातील सर्वात प्राचीन शिलालेख 'देवटेक' या ठिकाणी मिळाला आहे. हा लेख मौर्य सम्राट असोकाच्या राज्यरोहणाच्या 14 व्या वर्षी कोरला गेला. सम्राट असोकाचा 'धर्ममहामात्र' या अधिकाऱ्याने तो कोरला असून त्यावर असोकाच्या धर्म आज्ञा कोरल्या आहेत. या शिलालेखावर " प्राण्यांचे बंधन किंवा हिंसा कोणीही करू नये " अशी आज्ञा कोरली आहे. वाकाटक राजा रुद्रसेन यांचाही लेख या पाषाणावर कोरला आहे. सध्या हा शिलालेख मध्यवर्ती संग्रहालय,नागपूर येथे ठेवण्यात आला आहे.[15]

चंद्रपूर जिल्ह्यातील नागभीड तालुक्यात मोहाडी (मोकासा) पासून 2 कि.मी.अंतरावर पश्चिमेस *कुनघाडा* नावाच्या गावाजवळील पहाडावर पांच लेणी असून आहेत. ह्या लेण्या "पांडव लेणी" या नावाने प्रसिद्ध आहेत.[16] याशिवाय भद्रावती पासून 11 कि.मी. अंतरावर देऊळवाडा येथे सहा लेणी आहेत. चंद्रपूर घुग्घुस येथे तीन लेणी आहेत. चंद्रपूर पासून 3 कि.मी अंतरावर इरई-झरपट नदीच्या संगमावर माना नावाने प्रसिद्ध असलेल्या टेकडीत एक लेणी आहे ती बौद्ध लेणी असल्याचे मत अभ्यासकाचे आहे.[17]

**बल्लारपूर:** चंद्रपूर जिल्ह्यापासून 6-7 कि.मी. अंतरावरील कारावा येथील जंगलात इ.स.1981 स्थानिक नागरिकांनी या भगवान बुद्धाच्या मूर्तीचा शोध लावला. भगवान बुद्धाची ही मूर्ती अत्यंत भव्य असून सध्या ती नागपूर मध्यवर्ती संग्रहालयात ठेवली आहे. ही मूर्ती वालुका पाषाणात घडविली असून 1मीटर उंच आहे. भगवान बुद्धाची ही मूर्ती धम्मचक्र मुद्रेतील असून पर्यकावसनात बसली आहे. ही मूर्ती 8-9 व्या शतकातील असावी.[18]

**पवनी (भंडारा):-** मध्यदेशातून दक्षिण भारताकडे जाणाऱ्या रस्त्यावर असलेले भंडारा जिल्ह्यातील पवनी हे प्रमुख सांस्कृतिक व धार्मिक दृश्य महत्वाचे नगर होते. चीनी प्रवासी हुएनत्संगने आपल्या प्रवास वर्णनात पवनी येथील स्तूपाचे वर्णन केले आहे. हिनयान पंथीय बौद्धांचे विदर्भातील महत्वाचे ठिकाण म्हणजे पवनी होय. पवनी प्राचीन स्थळ म्हणून सी.पि. अंड बेरार प्रांताचे ब्रिटीश अधिकारी हेन्री कोन्सेस यांनी 1897 मध्ये लक्ष्य दिले. Hargreaves त्याच्या वार्षिक अहवालात पवनी चा उल्लेख करतात. त्यानुसार प्राचीन स्मारक संरक्षण कायद्यांतर्गत स्थानीक सरकारने सप्टेंबर 1927 मध्ये सुचना जारी केली. त्यानंतर 1926 मध्ये भारतीय पुरातत्व विभाग(पाटणा विभाग )चे सहाय्यक अधिक्षक सी.सी. चंद्र यांनी महासंचालकांना पत्र पाठून हरदोला टेकडी, जगन्नाथ टेकडी या ठिकाणी बौद्ध स्तूप आणि अवशेष मिळाल्याचे कळविले.[19]

पवनी येथील जगन्नाथ टेकडीवर 1969-70 साली झालेल्या पुरातत्वीय उत्खननात विटांचे बांधकाम केलेला स्तूप मिळाला. हा स्तूप आकाराने सांचीच्या स्तुपापेक्षा मोठा असून त्याच्या तोरणावर शुंगकालीन शिल्पे कोरलेली आहेत. हा स्तूप असोकाच्या काळात बांधल्या गेला असून त्याचे विस्तृतीकरण शुंग काळामध्ये झाले. खोदकाम करतांना वाकाटक राजा प्रवरसेन दुसरा यांचा ताम्रपट मिळाला. महाक्षत्रप रुपिअम्म चा स्तंभलेख मिळाला आहे.[20] पवनीजवळ 2 कि.मी. अंतरावर चांडकापूर येथे आणखी एका महाविहाराचे अवशेष मिळाले आहेत. पवनीच्या या स्तुपावर धम्मचक्र, बोधिवृक्ष भद्रासन ही हीनयान पंथीयांची चिन्हे मिळतात. पवनीच्या पश्चिमेस हरदोला नावाची एक टेकडी असून त्यात वास्तूचे अवशेष मिळाले. इ.स. 8-9 व्या शतकातील हा स्तूप असावा. 10 मिटर अंतरावर भारशिव वंशीय राजा भगदत्त यांचा लेख मिळाला आहे. हा लेख इ.स. च्या पहिल्या शतकातील आहे. हा लेख एका ओळीचा असून भारशिव वंशाचा राजा भगदत्त याने बुद्धाच्या पद चिन्हांनी अंकित ही शिला बसविली असा स्पष्ट उल्लेख मिळतो. भंडारा जिल्ह्यातील पवनी नगराच्या वायव्य सीमेवर कोरंभी नावाचे गाव आहे. या गावाला लागून असलेल्या डोंगरावर अनेक बुद्ध लेणी आहेत. [21]

**नागपूर :-** इ.स.च्या दुसऱ्या शतकापासून पूर्व विदर्भात लेण्यांची सुरुवात झाली होती. बौद्ध भिक्षुंना उपासना,निवास आणि वर्षावासासाठी या लेण्यांचा उपयोग होत असे. सुरुवातीला या लेण्यांवर हीनयान पंथीयांचा प्रभाव दिसतो. इ.स. सातव्या शतकापासून मह्यायान पंथाचा प्रभाव पडला.विदर्भातील सर्वात प्राचीन लेणी नागपूर जिल्ह्यातील मांढळ जवळील चांडाळा जंगलात मिळाली.या लेण्यांपासून जवळ पवनी आणि अडम हे दोन प्राचीन बौद्ध स्थळ आहेत. [22]

चांडाळा लेण्यांपासून 6 कि.मी.अंतरावर किटाळी जंगलात शेगावजवळ (भिवापूर- गोठणगाव मार्ग) चार लेण्यांचा समूह आहे. स्थानिक लोक त्यांना "सातभोकी राक्षसांच्या गुहा" या नावाने ओळखतात. या लेण्यांच्या शिलाखंडावर एक अभिलेख कोरलेला आहे. तो आता धूसर झाला असल्याने त्याचे वाचन झाले नाही. नागपूर जिल्ह्यातील पवनी पासून काही अंतरावर असलेल्या पुल्लर गावच्या जंगलामध्ये लेणी आढळली. नागपूर जिल्ह्यातील उमरेड जवळील मकरधोकडा गावापासून काही अंतरावर 5 लेण्यांचा समूह असून ती लाल मुरमाडी पाषाणात कोरली आहेत. ही सर्व लेणी विहार आहेत.[23]

पूर्व विदर्भात मनसर, नगरधन, रामटेक, अडम हे बुद्ध धर्माचे प्रमुख स्थळ आहेत.पूर्व विदर्भात प्रसिद्ध बौद्ध पंडित नागार्जुन हा काही काळ राहिले असल्याचा संदर्भ मिळतो. मनसर येथे मोठे बौद्ध विहार असून त्याला चीनी प्रवासी हुएनत्संगने भेट दिल्याचा उल्लेख प्रवास वर्णनात मिळतो. बुद्ध धम्मातील महायान आणि हिनयान या पंथाचा विदर्भात मोठा प्रभाव दिसून येतो.

पूर्व विदर्भाच्या नागभूमी मध्ये बौद्ध धम्माचे अनेक प्रसारक येऊन गेले. सातवाहन राजे बौद्ध धम्माचे आश्रयदाते असल्याने त्याच्या काळात विदर्भामध्ये बौद्ध भरीव काम केल्या गेले. भिक्षू करिता अनेक लेणी खोदल्या, विहारे, संघाराम, स्तूप, बौद्ध मूर्तींची निर्मिती केल्या गेली. इ.स. पूर्व 2-3 शतकापासून ते इ.स. 8-9 व्या शतकापर्यंत पूर्व विदर्भात बौद्ध धम्माचा प्रभाव असल्याचे सांगता येते. पूर्व विदर्भात बौद्ध धर्म्मातील हिनयान आणि महायान या दोन्ही पंथाचा प्रचार आणि प्रसार झाल्याचे दिसून येते.

संदर्भ ग्रंथ सूची :-

1. मेश्राम,प्रदीप-विदर्भातील बुद्ध धम्माचा इतिहास,श्री.मंगेश प्रकाशन, नागपूर, 2022, पृ.10
2. आंबेडकर,डॉ.बाबासाहेब–बुद्ध आणि त्यांचा धम्म- पस्तिसावी आ.2007, पृ.59,81,83
3. महाजन,वी,डी,-प्राचीन भारत का इतिहास,एस.चंद अंड कंपनी,नई दिल्ली, 2008,आठवी आवृत्ती, पृ. 163
4. झा,द्विजेंद्रनारायण, श्रीमाली, कृष्णमोहन- प्राचीन भारत का इतिहास,हिन्दी माध्यम कार्यान्वय निर्देशालाय, नई दिल्ली,200, पृ.190
5. साळुंखे,आ.ह.,जिज्ञासापुरुष हुएनत्संग, लोकायत प्रकाशन,सातारा, प्र.आ.2014, पृ.6
6. साळुंखे,आ.ह.,जिज्ञासापुरुष हुएनत्संग, पृ.8
7. राजूरकर,अ,ज,-चंद्रपूरचा इतिहास,महाकाली प्रकाशन,चंद्रपूर,द्वि आ.1982, पृ.21
8. राजूरकर, अ,ज, -चंद्रपूर चा इतिहास, पूर्वोक्त, पृ.27
9. पूर्वोक्त, पृ.3 0

10. जुलमे,टी,टी- विदर्भातील प्राचीन बौद्ध शिलालेख,भारतीय प्राचीन पुरातत्व संस्कृती संघ चंद्रपूर,प्र.आ.,2002,पृ.20
11. जुलमे,टी,टी- विदर्भातील प्राचीन बौद्ध शिलालेख, पृ.18
12. बोरकर,र,रा,चंद्रपूर-गडचिरोली जिल्ह्याचे पुरातत्व, सुयश प्रकाशन, नागपूर, प्र.आ.2009, पृ.169
13. रडे,का,रा,-ब्रम्हपुरीच्या परिसराचा इतिहास,प्र.आ.2001,पृ.9
14. कित्ता –पृ.11
15. मेश्राम,प्रदीप-विदर्भातील बुद्ध धम्माचा इतिहास,पृ.111
16. बोरकर,र,रा,चंद्रपूर-गडचिरोली जिल्ह्याचे पुरातत्व,पृ.164
17. कित्ता- पृ.175
18. कित्ता- पृ.285
19. Deo, Shantaram,B, Joshi,Jagat pati- Pauni Excavation,The Vidhyapeeth Mudranalaya, First Edi, 1972, Pg-17
20. Deo, Shantaram,B, Joshi,Jagat pati- Pauni Excavation, Pg-11
21. मेश्राम,प्रदीप-विदर्भातील बुद्ध धम्माचा इतिहास,पृ.3 7
22. कित्ता –पृ.61
23. कित्ता –पृ.63

25.

# छत्रपती शिवाजी महाराजांचे धर्मनिरपेक्ष धोरण : एक अभ्यास

**कु. दिप्ती सदाशिव मोहोळ**
संशोधक विद्यार्थी, पदवीत्तर इतिहास संशोधन केंद्र
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नारायणगाव

**प्रस्तावना :**

धर्मस्वातंत्र्य हा अलीकडच्या काळात मान्य केलेला अत्यंत महत्त्वाचा नागरी हक्क आहे. प्रत्येक व्यक्तीला स्वतःच्या धर्माचे आचरण आणि पालन करण्याचा हक्क असावा ही मूलभूत कल्पना आज बहुतेक देशांनी मान्य केली आहे. आधुनिक काळातील धर्मनिरपेक्ष राज्यकल्पनेचा धार्मिक स्वातंत्र्य हा प्रमुख आधार आहे. राज्य आणि धर्म यांचे परस्परसंबंध कसे असावेत, यासाठी झालेल्या संघर्षातून धर्मनिरपेक्ष राज्याच्या कल्पनेचा विकास झाला आहे. धर्माचा संबंध आचरणाशी आहे. धर्म आचरणमूलक आहे. सर्व धर्मांना समान वागणुक देणे. 'सर्वधर्मसमभाव' हिंदू धर्मातील एक विचारधारा आहे. त्यानुसार सर्व धर्माद्वारे स्वीकारलेले आचार मार्ग व विचार मार्ग वेगवेगळे असले तरी, प्रत्येकाचा अंतिम उद्देश एकच आहे. धर्मनिरपेक्षता म्हणजे सर्व धर्मांना समान वागणुक देणे.व्यक्तिगत आचारधर्म पाळण्यास मुभा, स्वातंत्र्य पण धार्मिक भेदभावाला स्थान नाही. शिवाजी महाराजांनी समाजाचे नेतृत्व करताना कोण कुठल्या जातीचा - धर्माचा हे न पाहता सर्वांकडे समबुद्धीने पाहिले, त्यांच्या गुणवत्तेकडे पाहिले. सर्वांना समान वागणूक दिली. शिवाजी महाराजांनी स्वराज्याची निर्मिती करताना सर्व धर्मांचा आदर केला. आपण हिंदू आहोत म्हणून फक्त हिंदूंना स्वराज्याचा स्थापनेत सहभागी करून घेतली नाही, तर प्रत्येकाच्या कला कौशल्यानुसार मुस्लिम व अठरा पगड जाती यांना देखील स्वराज्याच्या स्थापनेत सहभागी करून घेतले. महाराजांनी स्विकारलेले उदार धार्मिक धोरण त्यांच्या स्वराज्य निर्मितीस आणि विकासास उपयुक्त ठरले.

शिवाजी महाराजांचा लढा येथील दृष्ट प्रवृत्ती, अन्याय व अत्याचाराबद्दल होता. त्यामुळे त्यांनी आपले धार्मिक धोरण उदारस्वरूपाचे स्वीकारले. स्वराज्यात प्रत्येकाला धार्मिक स्वातंत्र्य असून आपल्या धर्माप्रमाणे वागता येत होते. माणसाला माणुसकी शिकवणारे माणसा-माणसातील अंतर कमी करून मानवतेचे नाते तयार करणारा धर्म असतो, त्यासाठी धर्माचा उपयोग सकारात्मकपणे होणे आवश्यक आहे. राज्यात शांतता, सुव्यवस्था ठेवायची असेल तर त्यांच्यावर कोणताही एक धर्म लादून चालणार नाही हे शिवाजी महाराजांना माहीत होते. सर्व धर्मीयांना बरोबर घेऊन चाले तरच स्वराज्याची निर्मिती होईल याची जाणीव छत्रपतींना होती.

उत्तर मध्ययुगीन कालखंडामध्ये इतर हिंदू मुस्लिम सत्तांच्या तुलनेत शिवाजी महाराजांचे धार्मिक धोरण अधिक प्रागतीक आणि सापेक्षतः मानवी मूल्यांचे समर्थन करणारे होते. स्वतः शिवाजी महाराज धार्मिक होते. परंतु त्यांनी सर्वधर्मसमभावाचा पुरस्कार केला. त्यांनी हिंदू -ब्राह्मण धर्मातील जातीभेद, अस्पृश्यता, स्त्रीदास्य, अंधश्रद्धा व कर्मकांड नाकारले.

शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापन करून संस्कृतीचे संरक्षण केले हे करत असताना परधर्मीयांवरती अत्याचार केले नाही.उलट त्यांचाही धर्म आपल्या धर्मासारखाच थोर आहे.त्यांचेही धर्मग्रंथ पवित्र आहेत अशी त्यांची भावना होती. मुस्लिम प्रजेलाही त्यांनी आपले मानले. परिणामी अनेक मुस्लिमांनीही त्यांची निष्ठेने सेवा केली.त्यांनी आपल्या राज्यकारभारात धर्मनिरपेक्षतेच्या धोरणाचे पालन केले. त्यांच्या दृष्टिकोनात सर्व धर्मांबद्दल आदर होता. त्यांचा कारभार धर्माच्या आधारावर नव्हे, तर न्याय, समानता आणि सर्वसामान्य जनतेच्या हितासाठी होता. शिवाजी महाराजांनी समतावाद, मानवतावाद, सर्वधर्मसमभाव व जातीविरोध याचे अनुसरण केले. शिवाजी महाराजांचा धर्मनिरपेक्षतेचा हा दृष्टिकोन त्यांच्या राज्यकारभारातील एक महत्त्वाचा घटक होता. ज्यामुळे त्यांनी संपूर्ण महाराष्ट्र आणि भारताच्या इतर भागांमध्ये एक आदर्श राज्यकर्त्याचे स्थान मिळवले.

**धर्मनिरपेक्षता उदय आणि पार्श्वभूमी :**

धर्मनिरपेक्षता ही एक जटिल आणि गतिमान संकल्पना आहे. ही संकल्पना पहिल्यांदा युरोपमध्ये वापरली गेली. युरोपियन धर्मनिरपेक्षतेच्या धोरणाचा उदय मुख्यतः युरोपमधील ऐतिहासिक आणि सांस्कृतिक घटनांमुळे झाला आहे. युरोपियन धर्मनिरपेक्षतेचा विशेषतः प्रबोधनकालीन विचारधारांच्या उदयामुळे झाला. धर्म आणि राजकारण यांचे विभाजन, विविध धार्मिक युद्धे आणि धर्माच्या नावाखाली झालेल्या सामाजिक संघर्षांमुळे युरोपमध्ये धर्मनिरपेक्षता हा एक महत्त्वाचा मुद्दा झाला. फ्रेंच राज्यक्रांती (1789) ही धर्मनिरपेक्षतेच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण घटना होती. या काळात विचारवंतांनी चर्च आणि राज्य यांच्यातील विभाजनाची मागणी केली आणि धर्माच्या बाहेर मानवाच्या हक्कांवर भर दिला. औद्योगिक क्रांतीनंतर, शैक्षणिक प्रणाली आणि सार्वजनिक जीवनातून धर्माच्या प्रभावाला कमी करण्याचा प्रयत्न झाला. हे धोरण विशेषतः फ्रान्स आणि इतर युरोपियन देशांमध्ये अधिक स्पष्टपणे पाहायला मिळते. अखेरीस, दुसऱ्या महायुद्धानंतर युरोपमध्ये धर्मनिरपेक्षता एक मूलभूत मूल्य म्हणून प्रस्थापित झाले. यामुळे धार्मिक स्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य आणि सर्वांना समान हक्क देणारी एक समाजव्यवस्था निर्माण झाली. ही एक अशी विचारधारा आहे ज्यामध्ये धर्म आणि धर्माशी संबंधित विचारांना जाणीवपूर्वक या जगाशी संबंधित गोष्टींपासून दूर ठेवले जाते, म्हणजेच त्यांना तटस्थ ठेवले जाते. धर्मनिरपेक्षता राज्याला कोणत्याही विशिष्ट धर्माला संरक्षण देण्यापासून प्रतिबंधित करते.

**'धर्मनिरपेक्षते'चा अर्थ:**

धर्मनिरपेक्षता म्हणजे धर्म नाकारणे नव्हे अथवा धर्माच्या बाबतीत असहिष्णु वृत्ती नव्हे. त्याचा अर्थ एवढाच की, मानवी जीवनातील प्रश्नांकडे मनुष्याच्या ऐहिक कल्याणाच्या दृष्टीने पाहणे. 'धर्मनिरपेक्षता' म्हणजे राज्याने धर्माला राजकारण किंवा कोणत्याही गैर-धार्मिक बाबीपासून दूर ठेवावे आणि सरकारने धर्माच्या आधारावर कोणाशीही भेदभाव करू नये.

'धर्मनिरपेक्षते'चा अर्थ कोणाच्याही धर्माला विरोध करणे असा नाही, तर प्रत्येकाला त्यांची धार्मिक श्रद्धा पूर्ण स्वातंत्र्याने पाळण्याची मुभा देणे होय. धर्मनिरपेक्ष राज्यात कोणत्याही धर्माला न मानणाऱ्या व्यक्तीचाही आदर केला जातो. 'धर्मनिरपेक्षते'च्या संदर्भात धर्म ही व्यक्तीची पूर्णपणे वैयक्तिक बाब आहे. ज्यामध्ये राज्य हस्तक्षेप करत नाही. जेणेकरून विविध धर्मांच्या मूलभूत संकल्पनांमध्ये संघर्ष होऊ नये.

**छत्रपती शिवाजी महाराजांचे धर्मनिरपेक्ष धोरण :**

**स्वराज्य निर्मिती :**

सेतू माधव पगडी म्हणतात की "हिंदवी ही संज्ञा धर्मवाचक नव्हती. मुस्लिम विरोधी मुळीच नव्हती. हिंदू मुस्लिमांचे मिळून होणाऱ्या प्रादेशिक संस्कृतीचा नाम निर्देशन हिंदवी या शब्दाद्वारे होत होता."[1] महाराजांना औरंगजेबाच्या मोघल साम्राज्यापासून आपले प्रादेशिक वेगळेपण व स्वतंत्र ओळख प्रस्थापित करणे आवश्यक होते. त्यामुळे त्यांना आदिलशाहीशी असलेला प्रारंभिक संघर्ष, तसेच औरंगजेबाशी असलेल्या संघर्ष साम्राज्यवादी मोघल सत्तेविरोधात प्रादेशिक हिंदवी स्वराज्य असा राजकीय संघर्ष करावा लागला. हा धार्मिक संघर्ष नव्हता. हिंदू-मुस्लिम राज्यकर्ते तत्कालीन हिंदू, मुस्लिम व सर्व धर्मीय शेतकरी, कष्टकरी,दलित जाती-जमातींच्या रयतेवर अन्याय -अत्याचार करत असे. या बहुजन शोषित शासित जनतेच्या अन्याय, अत्याचाराला विरोध करण्याची भूमिका महाराजांनी स्विकारली. मुस्लिम राज्यकर्ते हिंदू व अन्य धर्मीय जनतेबरोबरच मुस्लिम बहुजन जनतेचे ही शोषण करत होते. शिया व सुन्नी या पंथाबाबत पक्षपाती अन्यायकारक वर्तन करत असे. सुफी संत, समुदाय यांच्या विरोधात मुस्लिम शासक क्रूरतेने वागत होते. बहुजन हिंदू-मुस्लिम रयतेवर अत्याचार करणाऱ्या मुस्लिम सत्ताधीशांचा विरोध शिवाजी महाराजांनी केला.

धर्मग्रंथांमध्ये लढण्याचा अधिकार फक्त क्षत्रियांना देण्यात आला होता. राज्यातील शूद्र समाजाला मनुस्मृतीने शस्त्र धारण करण्याचा अधिकार नाकारला होता. शुद्रांना वर्णव्यवस्थेनुसार फक्त इतर उच्च वर्णीय यांची सेवा करणे एवढाच अधिकार होता. परंतु शिवाजी महाराजांनी गुणांवर आधारित सर्व जाती-जमातीतील लोकांना अठरा पगड जातीत लढण्याचा, शस्त्र धारण करण्याचा अधिकार देऊन स्वराज्य निर्मितीमध्ये त्यांचा उपयोग करून घेतला. "रामोशी, भिल्ल, महार, मांग संरक्षण व्यवस्थेत होते."[2] कोणताही धर्मपंथ किंवा जात न पाहता स्वराज्याच्या कार्यासाठी जो कोणी उपयोगी येईल त्याला आपल्या कुवतीनुसार काम देऊन काम करून घेतले जात असे. अन्याय व अत्याचारी प्रवृत्तीचे राज्यकर्ते हाकलून आणि स्वराज्य निर्माण करायचे असेल तर सामाजिक समता निर्माण करणे आवश्यक होतं. त्यासाठी सर्वांकडून

कार्य करून घेऊन राष्ट्रभावना जागृत करणे गरजेचे होते. परिणाम, स्वराज्य निर्मितीमध्ये छत्रपती शिवाजींनी सर्वांना समाविष्ट करून घेतले.

**सर्व धर्मियांना राज्यकारभारात व लष्करात स्थान :**

1650 नंतर आदिलशाही, कुतुबशाही व मुघल या मुस्लिम सत्ता मधून अनेक मुस्लिम सैनिक महाराजांकडे नोकरीसाठी आले व महाराजांनी स्वराज्याच्या कारभारात त्यांना सामावून घेतले. जीवाची पर्वा न करता शिवरायांसाठी आग्रा भेटीच्या वेळी आपले प्राण संकटात घालून महाराजांच्या सुटकेच्या नाट्यमय प्रसंगात मदत करणारा मदारी मेहतर या आपल्या मुस्लिम सेवकास महाराज कधीच विसरले नाही. मदारी मेहतरच्या मृत्यूनंतर शिवाजी महाराजांनी त्याची कबर रायगडावरती बांधली. विधिवत महाराजांनी दफन केले, या संदर्भात श्री आवळसरकर शककर्ता शिवाजीतील आधार देऊन म्हणतात. "रायगडावरती महादर दरवाज्यापासून पाऊण मैलाच्या वाटचालीनंतरनं रायगडाच्या अचूक जागी आपण पोहोचतो, त्याच्या आरंभी लागणारी कबर ज्याने शिवाजींच्या आग्र्यास प्राण वाचवले त्या शिवाजींच्या सेवक फारस मदरशहा याची होय."[3] सैन्यात एक तृतीयांश पेक्षा जास्त सैनिक मुस्लिम होते. त्यांना त्यांच्या कर्तुत्वानुसार राज्यकारभारात व स्वराज्यात पदे देण्यात आली. आरमाराचा प्रमुख दौलतखान, तोफखानाचा प्रमुख इब्राहिम खान, घोडदळातील सेनापती सहाय्यक सिद्धी हिलाल, सिद्धी वहा वहा अंगरक्षक, सिद्धी इब्राहिम, फारसी पत्रलेखक व खास सचिव काझी हैदर यांच्याबरोबर नूरखान देखमाखान, सिध्द अंबर वहाब हुसेन, खानिया रुस्तमैजमाम आदी अधिकारी शिवाजी महाराजांच्या स्वराज्य उभारणीच्या कार्यात सहभागी होते. कारखान्यांमध्ये तसेच महालांमध्ये मुस्लिम कार्यरत होते. बारगीर, शिकलगार, पारस गोलंदाज, पठाण, भालदार, मकानदार यासारखे दक्षिण पश्चिम महाराष्ट्रातील दख्खनी मुस्लिम जाती-जमातीचे लोक शिवशाही ते पेशवे कालखंडापर्यंत काम करत असल्याचे दिसून येते. स्वराज्यात कनिष्ठ जाती-जमातींमधून धर्मांतरित झालेल्या मुसलमानांना विकासाची संधी उपलब्ध झाली. महाराजांच्या जातीभेद विरोधी आणि सर्वधर्मसमभावाच्या धोरणामुळे हा सामाजिक बदल होऊ शकला.

**इस्लामी धर्म कायदा आणि ब्राह्मणी धर्मशास्त्र यांचा तारतम्यतेने विचार :**

स्वराज्यामध्ये तत्कालीन परिस्थितीनुसार शिवाजी महाराजांनी मुस्लिमानांना शरीयतचे कायदे मान्य करून काझीचा न्यायनिवाडा करण्याचा अधिकार त्यांच्याकडेच पूर्ववत ठेवला. गोत आणि जात जमात पंचायतीतही त्यांनी फारसा हस्तक्षेप करून सुधारणा घडवली नाही. तथापि, त्यांनी धर्मशास्त्रीय कायद्यांचा आव्हान देऊन काही प्रमाणात ते मोडीत काढले. "ब्राह्मण म्हणून कोण मुलाहिजा करू पाहतो अशी ताकद देऊन न्याय कायद्याचा उद्घोष केला."[4] धर्मशास्त्राचा दंडक मोडून आरमार उभे केले. धर्मराजनीती प्रारूपातील प्रधानमंत्री सेनापतीला स्थान नसताना त्यांनी ते स्वतःच्या सेनापतीला दिले. जिजाबाईंना सती जाऊन देण्यास प्रतिबंध करून सती प्रथेला विरोध केला. धर्मशास्त्र ज्या अस्पृश्यतेचे, जातीभेदाचे व स्त्रीशोषणाचे समर्थन करते त्याला महाराजांनी विरोध दर्शवला.

**धार्मिक स्वातंत्र्याचा पुरस्कार :**

1659 मध्ये त्यांनी धार्मिक स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारे धोरण जाहीर केले. या जाहीरनाम्याला मुस्लिमांच्या धर्म स्वातंत्र्याचा स्पष्टतः संदर्भ असला तरी तो सर्व धर्मीयांबाबत समभावनाची व धार्मिक समूहांना त्यांच्या स्वातंत्र्याची ग्वाही देतो. अफजलखानाच्या मृत्यूनंतर वाई, सातारा, कोल्हापूर या आदिलशाहीच्या प्रदेशावर महाराजांनी वर्चस्व मिळवले. त्यावेळी त्यांनी नव्यानेच ताब्यात घेतलेल्या भूभागातील जनतेसाठी हा जाहीरनामा काढला. त्यात त्यांनी जनतेला खात्री दिली की, “आदिलशाही राज्यात मुसलमानांच्या धार्मिक स्थळांना इनाम दिली होती ती नव्या राज्याच्या अमलातही नित्यप्रमाणे चालू राहतील धर्मस्थानांना कोणताही उपद्रव पोहोचणार नाही.”[5]

या जाहीरनाम्याप्रमाणे त्यांनी हिंदू,मुस्लिम,सुफी, वारकरी धर्मस्थानांना दिवाबत्ती, नैवेद्य, अभिषेक आणि पूजा-अर्चा इत्यादी करता खर्चाची सोय केली होती. मशिदी कुराण, चर्च बायबल या मुस्लिम व ख्रिश्चनांच्या श्रद्धांना आपल्या सैनिकांनी कोणताही उपसर्ग देऊ नये अशी ताकीद महाराजांनी दिली होती. इतिहासकार खाफीखान देखील याबाबतीत महाराजांच्या उदारतेची नोंद देतो. तो लिहितो की, 'हा शिवाजी आपल्या सैन्यासही मशिदी कुराण व बायबल यांचा अपमान कधीही करू देत नसे तिची जाळपोळ व लूट करत असताना जर त्याला कुराण किंवा बायबल आढळले तर तो ते आदरपूर्वक जवळ घेत व आपल्या नोकर वर्गातील मुस्लिम किंवा ख्रिश्चनांना देत असे'. फ्रेंच प्रवासी बर्नियर यांनी पुढील प्रसंग नोंदवून

ठेवला आहे, "साधतुल्य शिवाजींनी कंपूचीयन मिशनरी फादर अंब्रोस यांच्या घराचे, चर्चे आणि इतर वस्तूचे रक्षण केले. त्याने( शिवाजीने) म्हटले की फ्रेंच पाद्री ही चांगली माणसे असून त्यांना उपद्रव देता कामा नये."[6]

सर्व धर्मातील साधू संतांबद्दल महाराजांनी आदरभाव व्यक्त केला. अनेक धर्म संस्थांना इनामे सवलती दिल्या. विवेकहीन व कुविचारांना थारा दिला नाही.

**पुनर्धर्मांतराला पाठिंबा :**

हिंदू- हिंदू धर्मात जाती ही जन्मताच प्राप्त होते. ती स्वप्रयत्नांना अर्जित करता येत नाही. म्हणून हिंदू धर्मात मिशनरी तऱ्हेने धर्मांतर घडून आणण्याची व्यवस्था अस्तित्वात नव्हती. जातीचे नियम उल्लंघन केल्यास भविष्यात पुनश्य आपल्या धर्मात पर्यायाने जातीत परत घेण्याची व्यवस्था नव्हती. नेताजी पालकर, बाबाजी निंबाळकर व पिलाजी प्रभू यांना मुघलांनी मुस्लिम केले होते. त्यांना पुनर्धर्मात घेण्यासाठी महाराजांनी अनन्यसाधारण कृती केल्या. श्रीपत अमृत डांगे म्हणतात की, 'हिंदू धर्मशास्त्राच्या रीतीप्रमाणे धर्मांला धर्मांतरीतला जलाभिषेक करून पुन्हा हिंदू धर्मात परत घेण्याची प्रथा अस्तित्वात नाही. तथापि, शिवाजींनी असे केले की वरील तिघांनाही पुनर्धर्मात घेताना महाराजांनी त्यांना हिंदू धर्मात परत घेतले'. एवढेच नव्हे तर बाबाजी निंबाळकर यांच्या मुलाला आपली मुलगी सुद्धा दिली. महाराजांचे पुनर्धर्मांतराचे धोरण सुधारणावादी होते.

**धार्मिक स्थळांना संरक्षण :**

शिवाजी महाराजांच्या उदार धार्मिक धोरणामध्ये 'मशिदी आणि कबर' हा एक महत्त्वाचा भाग होता. स्वराज्यात जर सर्व धर्मांना स्वातंत्र्य दिलं गेलं तर त्यांच्या धार्मिक भावनांची जाणीव ठेवणे हे सुद्धा राज्यकर्त्याची आवश्यकता असते. "त्यांनी फक्त वेदोनारायण ज्योतिषांना किंवा तपस्वी साधु संतांनाच निवृत्तीवेतन दिले नाहीत, तर इस्लामी, बैरागी, साधू, उरवली यांना आपल्या खर्चाने मठ बांधून दिले. त्यांच्या उदरनिर्वाहाची व्यवस्था केली."[7] जो राजा आपल्या प्रजेच्या धार्मिक भावनांचा आदर करतो. तो आपल्या राज्याला सुरळीतपणे अनेक वर्ष चालू होते. महाराजांनी सुद्धा आपल्या मुस्लिम प्रजेसाठी धार्मिक अनेक सोयी सवलती निर्माण केल्या होत्या. रायगडावर मुस्लिम प्रजेसाठी त्यांनी त्यांच्या महालासमोर मशीद बांधून घेतली. " तुम्ही जगदीश्वराचे मंदिर बांधले चांगले केले पण माझ्या मुस्लिम प्रजेसाठी मस्जित कोठे आहे? यावर पिंगळे काय बोलणार? लागलीच महाराजांनी आज्ञा दिली की माझ्या मुस्लिम प्रजेसाठी मशिद बांधा आणि तीही माझ्या महालासमोर बांधतात त्यानुसार पिंगळ्यांनी महाराजांची आज्ञा शिरास्तवद म्हणून रायगडावर महाराजांच्या महाराज समोर मशिद बांधली."[8] इतकेच नव्हे तर मुस्लिम संत मुस्लिम देवस्थानांना जमिनी इनाम देऊन त्यांच्या निर्वाहाची व्यवस्था शासकीय खर्चातून केली.

**धर्माधतेचा जोरकस निषेध :**

औरंगजेब आणि शिवाजी महाराज हे दोघे आपल्या धर्माच्या बाबतीत व्यक्तिगत स्तरावर निष्ठावान होते. औरंगजेबाचे धार्मिक धोरण सोयीनुसार बदलताना दिसते. राजकारणासाठी त्यांनी धर्मार्थ भूमिकेचाही पुरस्कार केला. 1669 मध्ये त्याने मुघलांच्या राज्यात हिंदु जाती-जमातींवर 'जिझिया कर' लावला. औरंगजेबाच्या प्रशासनात 40% हिंदू कार्यरत असताना त्यातील कोणीही या धर्मांत फर्मानाला विरोध दर्शवला नाही. सतीश चंद्र लिहितात की, "मराठा, राजपूत व शिख यांच्या विरोधात संघर्ष करण्यासाठी दक्षिणेतील मुस्लिम शाही आणि मुस्लिम जनता यांचा पाठिंबा प्राप्त करण्यासाठी औरंगजेबाने ही धर्मार्थ राजकीय खेळी केली होती."[9] या प्रमाणाच्या निषेधार्थ शिवाजी महाराजांनी औरंगजेबाला पत्र पाठवले. प्रतिवाद करताना परधर्म देशाला नकार आणि परधर्म सहिष्णुतेचा पुरस्कार केला. या पत्रात महाराजांनी बादशाह अकबराच्या परधर्म सहिष्णुतेचा गौरव केला आहे. अकबराने लोककल्याणकारी परधर्म सहिष्णुतेचे धोरण ठेवले. म्हणून मुघलांचे राज्य दीर्घकाळ स्थिर राहू शकले असे कथन पत्रामध्ये महाराजांनी केले. महाराज पत्रात पुढे म्हणतात की, "सर्वांचा ईश्वर एक आहे. तो काही केवळ मुसलमानांचा नाही तसेच कुराणात देखील म्हटलेली नाही. सर्व लेकरे ईश्वराचीच असून ती आपल्या पद्धतीने ईश्वराला पूजतात त्यापैकी एकाला श्रेष्ठ व दुसऱ्याला कनिष्ठ ठरवणे म्हणजे प्रत्यक्ष ईश्वरालाच नाव ठेवण्यासारखा आहे. तुमच्या पूर्वजांनी असे केले नाही म्हणून त्यांचे राज्य वाढत गेले. तुम्ही मात्र गरीब जनता, साधू, जोगी इत्यादींकडून जिझिया निमित्ताने पैसे गोळा करत आहात. तुमच्या परद्वेषी कारभारामुळे रयत भिकेला लागली आहे. तुमच्या राज्यात सगळे खंक झाले आहेत. असंतोष उफाळून आला आहे. तुमचे राज्य संकोच पावत आहे. हा तुमच्या असहिष्णुतेचा

दुष्परिणाम आहे. सहिष्णुता आणि औदार्य यामुळे व्यक्ती व संस्था उत्कर्ष पावतात. असहिष्णुता अनुकरल्यामुळे ती रसातळाला जातात हे लक्षात ठेवा!"[10] महाराजांचे हे पत्र म्हणजे भारतीय राजकारणाला दिलेला एक अजरामर आदेश आहे. असे सेतू माधव पगडी म्हणतात.

**मुस्लिम संत बाबा याकुत व शिवाजी महाराज :**

महाराजांचे आजोबा मालोजी हे चांभार गोंदे येथील सुफी संत शेख मोहम्मदचे भक्त होते. मल्हार रामराव चिटणीस कृत शिवछत्रपतींचे सप्त प्रकरणात्मक चरित्र तसेच तंजावर येथील बृहदेश्वर मंदिराच्या भिंतीवरील भोसले वंश चरित्र सांगते की, अहमदनगरच्या शहा शरीफ नामक पिराला मालोजी व दीपाबाई यांनी पुत्र प्राप्तीसाठी नवस केला आणि या पिराच्या कृपाप्रसादाने त्यांना दोन मुले झाली. म्हणूनच त्यांनी या मुलांची नावे शहाजी व शरीफजी अशी ठेवली.

शिवाजी महाराज हे केळशीचा (जि.रत्नागिरी) याकूत बाबा या मुस्लिम फकीराचे भक्त होते. शेख मुहम्मद, शहा-शरीफ, याकुत बाबा यासारखे मुस्लिम सुफी संतांनी हिंदू-मुस्लिम या दोन्ही धर्माधतावर प्रहार करून धर्म समन्वयाचा पुरस्कार केला होता. "छत्रपती शिवाजी महाराजांनी हजरत पीर सय्यद बाबा याकूत यांच्या दर्ग्याला उद फुल फकिरांची बिराजी वगैरे बाबींवरील खर्चा करिता या गावातील 653 एकर जमीन आज्ञापत्राने इनाम दिली आहे."[11]

**निष्कर्ष :**

शिवाजी महाराजांचे उदार धार्मिक धोरण म्हणजे स्वराज्य निर्मितीसाठी आणि सुराज्य बनवण्यासाठी उचललेले सुयोग्य असे पाऊल होते. धर्मपंथ जाती यांना जोपर्यंत राज्यकर्ते सोबत घेऊन चालणार नाहीत तोपर्यंत साम्राज्यात शांती आणि समृद्धी नांदणार नाही. याची जाणीव शिवाजी महाराजांना होती म्हणून त्यांनी आपले धार्मिक धोरण उदार स्वरूपाचे ठेवले होते.

मराठ्यांचा आद्यग्रंथकार ग्रांड डफ यानेही महाराजांच्या धार्मिक धोरणाचे कौतुक केले आहे तो म्हणतो, “मुसलमान राज्यकर्त्यांनी कबरी मशिदी व पीर यांना दिलेली इनामे शिवाजीने कधीही बंद केली नाही.” डॉ. डेलोन सारख्या युरोपियन प्रवाशाने महाराजांच्या या धोरणाचे कौतुक केले आहे. तो लिहितो की “शिवाजी सर्व धर्मांशी सहिष्णुतेने वागतो आणि पश्चिमेकडील तो एक अत्यंत हुशार व जाणता राजा समजला जातो.”

शिवाजी महाराजांच्या धार्मिक धोरणाचे कौतुक परकीयांनी करणे म्हणजे महाराजांचे धार्मिक धोरण हे उच्च दर्जाचे होते धार्मिक सहिष्णुता महाराजांनी ठेवली. म्हणूनच त्यांच्या स्वराज्याच्या ध्येयपूर्ती अन्य धर्मीयांनी महत्त्वाचे योगदान दिले.

आज 21व्या शतकात कुंपणच शेत खात आहे. तपास यंत्रणाची कुवत व विश्वासार्हता इतकी कमी झाली आहे की सामान्यांचा एकूण व्यवस्थेवरचा विश्वास उडत चाललाय. प्रशासनाचा वचक राहिलेला दिसत नाही. स्वातंत्र्याच्या 75 वर्षानंतर लोकशाही असलेल्या देशात सामाजिक, धार्मिक, आर्थिक, विषमता वाढत चालली आहे. धर्माधर्मातील संघर्ष वाढत चालला आहे. समाजात जातीय व धार्मिक तेढ निर्माण झालेली आहे. अशा परिस्थितीत छत्रपती शिवाजी महाराजांचे धर्मनिरपेक्षतेचे धोरण आजही तितकेच प्रासंगिक व महत्त्वाचे आहे.

**संदर्भ :**

1) सचिन गरुड," शिवकालीन समाज व्यवस्था व धर्म - संस्कृती" हरीती प्रकाशन, पुणे, 2021, पृ.
2) Mahale, K.L., Shivaji - The Pragmastist, Vishnu Bharati Publication, Nagpur, 1969,p.no.122.
3) हनवते प्रेम, शिवरायांचे निष्ठावंत मुस्लिम सैनिक, सुधीर प्रकाशन, वर्धा, 1994, पृ.33.
4) सचिन गरुड," शिवकालीन समाज व्यवस्था व धर्म - संस्कृती" हरीती प्रकाशन, पुणे, 2021, पृ.139.
5) पवार, डॉ. जयसिंगराव, मराठी सत्तेचा उदय, सी. जमनादास आणि कं., 1988, पृ.343.
6) सचिन गरुड," शिवकालीन समाज व्यवस्था व धर्म - संस्कृती" हरीती प्रकाशन, पुणे, 2021, पृ.137.
7) Sarkar, Jadunath, Shivaji and His Times, Orient Longman Ltd., Bombay, 1952, p.no.474.
8) Sardesai, G.S., New History of Maratha's, Phoenix Publication, Bombay, 1948, p.no.264-265.
9) सचिन गरुड," शिवकालीन समाज व्यवस्था व धर्म - संस्कृती" हरीती प्रकाशन, पुणे, 2021, पृ.131.
10) सचिन गरुड," शिवकालीन समाज व्यवस्था व धर्म - संस्कृती" हरीती प्रकाशन, पुणे, 2021, पृ.132
11) हनवते प्रेम, शिवरायांचे निष्ठावंत मुस्लिम सैनिक, सुधीर प्रकाशन, वर्धा, 1994, पृ.33.

# पैठणच्या पैठणीचा ऐतिहासिक अभ्यास: काल आणि आज

**डॉ. अमोल नानासाहेब म्हस्के**
सहाय्यक प्राध्यापक
इतिहास विभाग, प्रतिष्ठान महाविद्यालय, पैठण.

**प्रा. डॉ. राजेश करपे**
प्राध्यापक व विभागप्रमुख
इतिहास विभाग, प्रतिष्ठान महाविद्यालय, पैठण.

आताचे पैठण म्हणजे पूर्वीचे प्रतिष्ठान नगर, प्राचीन काळी प्रतिष्ठान नावाने ओळखले जाणारे हे शहर सातवाहन साम्राज्याची राजधानी म्हणून अत्यंत प्रसिद्ध होते. प्रतिष्ठान नगरीला खूप मोठा ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे. इसवी सन पूर्व 230 ते इसवी सन 230 असे एकूण 460 वर्ष या ठिकाणी सातवाहन नावाच्या राज घराण्याचे राज्य होते.[1] सातवाहन साम्राज्याच्या राजधानीचे ठिकाण, संत ज्ञानेश्वर यांचे जन्मगाव (पैठण पासून जवळच आपेगाव), संत एकनाथांची जन्मभूमी, महानुभव पंथाचे श्री चक्रधर स्वामी यांचे वास्तव्य लाभलेली भूमी, विजयाची प्रतीक म्हणून उभा असलेला तीर्थखांब, नाग घाटाचा परिसर, मध्ययुगीन कालखंडातील सावकारांचे वाडे,रघुनाथ राव पेशवे यांचा देखील पैठण शी संबंध आलेला आहे, आणि आधुनिक कालखंडातील बाळासाहेब पाटील पुराण वस्तू संग्रहालय तसेच नाथ सागर असा ऐतिहासिक वारसा प्रतिष्ठान नगरीला लाभलेला आहे.

प्रतिष्ठान नगरीमध्ये सातवाहन यांच्या प्रभावी, बलशाली राजवटीने इ.स.पू 230 ते इ. स.230 असे 460 वर्ष राज्य केले. या घराण्याची सत्ता अधिक सामर्थ्यशाली करण्यात या घराण्यातील पहिला सातकर्णी, वेदश्री, शक्तीश्री, राजा हाल, गौतमीपुत्र सातकर्णी, वशिष्ठीपुत्र पुलुयामी, यांनी योगदान दिले.[2] यानंतरचे उत्तराधिकारी अकार्यक्षम निघाल्याने ही राजवट तिसऱ्या शतकामध्ये संपुष्टात आली. सातवाहन घराण्याची स्थिर शक्तिशाली राजवट असल्याने या काळात आर्थिक प्रगती साध्य झाली. भोकरदन, तेर, जुन्नर ही महत्त्वाची व्यापारी केंद्र अस्तित्वात आली. रोमन ग्रीक देशाशी व्यापारी संबंध प्रस्थापित झाले. वस्त्रोद्योग,धातुकाम, हस्तिदंताच्या वस्तू, सोने, चांदी, विविध औषधी, नक्षीदार भांडी, शिल्पे आदींचा या व्यापाऱ्यांच्या उलाढालीत समावेश होता. या ठिकाणी उल्लेख केलेला व्यापार हा वस्तू विनिमय पद्धतीने केला जात असावा कारण रोम सोबत व्यापारी संबंध असल्याकारणाने आपल्या वस्तूंच्या बदल्यात रोम कडून मोठ्या प्रमाणात सोन आपल्याला मिळत होते. या विषयी प्लिनी नावाच्या तत्कालीन इतिहासकाराने दुःख व्यक्त केलेले आहे.प

वस्त्रांचा शोध मानवी संस्कृतीच्या उत्क्रांतीतील एक महत्त्वाचा शोध आहे. सुती कपड्याच्या शोधाने मानवी जीवनात खऱ्या अर्थाने क्रांती घडून आली. कापसाचे धागे टिकाऊ, सहज धुता येण्याजोगे आणि सुंदर वस्त्र निर्मिती करायला अनुकूल असे होते. भारतात हस्तकला आणि वस्त्रोद्योग यांचा नियमित जवळचा संबंध राहिलेला आहे.वस्त्रोद्योगांमध्ये पैठण येथील कारागिरांना किमान दोन हजार वर्षापासून पैठणी सारख्या महावस्त्रांचे तंत्र माहित असावे असे वाटते व इथूनच या तंत्राचा भारतभर विकास झाला असे दिसून येते. या परिसरात कापसाचे उत्पादन फार मोठ्या प्रमाणात होत असल्याने कापसापासून बारीक धाग्याचे सूत तयार करण्याची कला पैठणच्या विणकारांना ऐतिहासिक कालखंडापासूनच ज्ञात होती. ज्या मराठवाड्यात पैठण. वसलेले आहे तिथली माती काळी असून हवामान कापसाच्या वाढीसाठी पोषक आहे. सातवाहन काळाआधी सुद्धा पैठणमध्ये सुती वस्त्रे विणली जात.नवीन राज्यकर्त्यांनी सुती आणि रेशमी कपड्यांच्या विनकामाला प्रोत्साहन दिले व लवकरच पैठण सुती आणि रेशमी कापडाच्या व्यापारासाठी प्रसिद्ध झाले.[3] प्रतिष्ठान (पैठण) हे भारतीय इतिहासात भरजरी वस्त्र निर्मितीचे प्रमुख केंद्र म्हणून विशेष प्रसिद्ध होते. संस्कृत, प्राकृत, मराठी लोकवङ्मयात पैठण व पैठणच्या कलात्मक वस्त्रांचा उल्लेख अनेक ठिकाणी आलेला दिसतो.

पैठणच्या व्यापाराची भरभराट सातवाहन कालखंडात झाली. या काळात पैठण हे तेर, कोल्हापूर, नालासोपारा, कल्याण, भरूच, पाटलीपुत्र अशा इतर व्यापारी केंद्रांशी व शहरांशी रस्त्यांच्या मार्गाने जोडले गेले. या काळात तलम वस्त्रे बांबूच्या नळकांड्यात व्यवस्थित ठेवून आणि त्याची दोन्ही तोंडे मेणाने बंद करून परदेशी पाठवली जात असे. सातवाहन काळात लिहिल्या गेलेल्या गाथा सप्तशती सारख्या ग्रंथात विविध गाथांमध्ये विणकाम, रंगलेपण, शिवणकाम, भरतकाम यांच्या बद्दल तपशीलवार माहिती दिली आहे. या कालखंडामध्ये रेशमी वस्त्रे बहुतेक करून श्रीमंत लोक वापरत असत. हिंदूंच्या दिवाळी आणि दसरा या सणांना नवनवीन वस्त्रांची मागणी मोठ्या प्रमाणात होत असे. सातवाहन राजांचा शक क्षत्रप

यांच्याशी संबंध आल्यानंतर त्यांनी त्यांच्याकडून वस्त्र शैलीचे अनुकरण केले असावे. महानुभव पंथाचे संस्थापक चक्रधर स्वामी पैठण येथे आले. ते चार वर्षे राहिले त्यांचा शिष्य महाभट यांनी रचलेल्या ‘लिळाचरित्र’ तही पैठण त्याकाळी व वस्त्रांच्या व्यापाराचे मोठे केंद्र होते असे स्पष्ट झाले आहे.

पैठणी विणणाऱ्या विणकारांना साळी म्हणतात. पैठण ही साळी लोकांचे मूळ स्थान समजले जाते. आजही पैठण मध्ये साळीवाडा नावाचे एक ठिकाण आहे त्या ठिकाणी साळी समाजाचे लोक राहत होते. प्राचीन कालखंडामध्ये या विनकरांना स्वतंत्र्य होते आणि त्यांच्या मनाप्रमाणे वस्त्र विण्यास त्यांना मुभा होती. परंतु मध्ययुगीन कालखंडामध्ये या विणकारांचे महत्त्व कमी झाल्याचे दिसून येते. शिलाई कामाचे महत्त्व या कालखंडामध्ये वाढले आणि विणकारांची अवस्था मात्र बिकट झाली त्यांचा ग्राहकांची असणारा थेट संबंध तुटला आणि ग्राहक आणि विणकर यांच्या मध्यस्थी असणाऱ्या काही लोकांनी बाजारपेठेवर हुकूमत मिळवली आणि कालांतराने या विणकारांची अवस्था अतिशय बिकट होऊन गेली.

सातवाहनानंतर वाकाटक, राष्ट्रकूट राजवटींनी महाराष्ट्रावर राज्य केले. त्यांनीही पैठणच्या या भरजरी वस्त्र विणकामाच्या कौशल्यास उत्तेजन दिले व महाराष्ट्राची सांस्कृतिक परंपरा सांभाळली. यानंतर देवगिरीच्या यादव राजे सत्तेवर आले व त्यांनी पैठण आणि पैठणीचे वैभव वाढविण्यास सुरुवात केली. या काळात पैठणीचे उत्पादन फार मोठ्या प्रमाणावर होत होते. पैठणी साडी मध्ये वापरले जाणारे ‘जर’ तयार करण्यासाठी सोनार जमातीचे लोक चांदीवर सोन्याचा पत्रा चढवून प्रथम लगडी तयार करीत असत. जितके मासे (वजन) सोने असेल त्याप्रमाणे त्या जरी नाव देण्यात येत असे. उदा. 8 मासी,6 मासी. आजही पैठणमध्ये जर गल्ली, तार गल्ली, साळीवाडा,रंगारहाटी, पावटेगल्ली, चपडेगल्ली, सुतारपार, संजरपूरा,नावाची ठिकाणं आहेत. हे नाव बहुतेक पैठणी वस्त्रावरून पडलेले असावे.[4]

पैठणी साडीवर सातवाहन काळात बगळे, हंस यांची चित्रकृती, यादव काळत सुवर्णकमळ तर मुघल काळात फुले, पक्षी, झाडे यांच्या चित्रकृती पैठणीच्या काठपदरावर विणल्या जात असत. मोराचे चित्र असलेली पैठणी आजही मोठ्या प्रमाणावर प्रसिद्ध आहेत.

**निष्कर्ष:**

वरील सर्व माहिती ही सातवाहन कालखंडापासून ते मध्ययुगीन कालखंडापर्यंत पैठण आणि पैठणचे प्रसिद्ध महा वस्त्र पैठणी याविषयी आहे. प्राचीन कालखंडामध्ये पैठणला स्वतंत्र ओळख निर्माण करून देणारी पैठणी आज मात्र या वस्त्रांची निर्मिती करणारे केंद्र आणि कलाकार या दोघांचीही बिकट अवस्था झालेली दिसून येते. याचे अनेक कारण दिसून येतात त्यापैकीच प्रमुख कारण म्हणजे साडी ऐवजी ड्रेस परिधान करण्याकडे स्त्री वर्गाचा वाढता कल, तसेच पैठणी साडी यंत्रा ऐवजी विनकरांनी हात मागावर निर्माण केलेली असल्याने या साडीची किंमत मार्केट मधील इतर साड्यांपेक्षा खूप जास्त वाटते. या सोबतच आजच्या आधुनिक युगामध्ये इतर वस्त्र प्रमाणे पैठणी साडीला मार्केटिंग करण्यासाठी कोणतीही योजना सरकारकडून राबवली जात नाही. या आणि यासारख्या अनेक कारणांनी पैठणी साडीचे महत्व कमी झाल्याचे दिसून येते. या समस्या असल्या तरी पैठणी साडी विणकारांना भेटल्यानंतर असे निदर्शनास आले की पैठणी साडी सोबतच या वीनकरांनी पुरुषांसाठी जॉकेट, पैठणी शाल यासारख्या काही वेगवेगळ्या वस्त्रांची निर्मिती करून पैठणी साडीचा व्यवसाय आणि पैठणी दोन्हींनाही जिवंत ठेवण्याचा प्रयत्न चालवलेला आहे. पैठणी सारखे ऐतिहासिक आणि प्राचीन कालखंडापासून प्रसिद्ध असलेले वस्त्र वर्षानुवर्ष टिकावे असे जर वाटत असेल तर सरकारने या महा वस्त्राच्या निर्मितीसाठी लागणारे साहित्य कारागिरांना उपलब्ध करून द्यावे तसेच त्यांना काही मानधन देखील द्यावे तरच भविष्यकाळात पैठणी साडी टिकेल. आणि हा ऐतिहासिक वारसा जतन केला जाईल.

**संदर्भ:**

1. झा डी. एन., प्राचीन भारत का इतिहास, हिंदी मध्यम कार्यान्वय निदेशालय दिल्ली विश्वविद्यालय पृ. 70
2. लुलेकर प्रल्हाद जी.व सतीश बडवे, संपा.), मराठवाड्यातील साहित्य, कैलास पब्लिकेशन्स औरंगपुरा, औरंगाबाद पृ..31
3. मोरवंचीकर रा. श्री., प्रतिष्ठान ते पैठण, विद्या बुक पब्लिशर्स, पृ. 154
4. पैठण शहराला प्रत्यक्ष भेट.

# मध्ययुगीन सुधारणा चळवळ: भक्ती चळवळ

**डॉ. सुभाष रा. रगडे,**
सहाय्यक प्राध्यापक, पदवी,
पदव्युत्तर इतिहास विभाग व संशोधन केंद्र, श्री शिवाजी कॉलेज, कंधार

**प्रस्तावना**

भक्ती चळवळी ही भारतीय इतिहासातील महत्त्वपूर्ण चळवळ आहे. या चळवळीला विशिष्ट वैचारिक अधिष्ठान होते. हिंदू धर्मात मोक्षप्राप्ती हे अंतिम ध्येय मानले आहे. मोक्ष प्राप्तीसाठी ज्ञान, कर्म व भक्ती असे तीन मार्ग सांगितले आहेत. ज्ञान व कर्म मार्गाचे अनुकरण करणे प्रत्येक मनुष्यास जमेल यात शंका होती. त्यामुळे सर्वसामान्य जनता भक्ती मार्गाकडे वळली. हा भक्ती मार्ग सोपा, सरळ होता. मध्ययुगीन कालखंडात भक्तीला अधिक महत्त्व देणारे धार्मिक विचारवंत, संत झाले. त्यामुळे सामाजिक, धार्मिक सुधारणेचे एक चळवळ साकारली. त्या चळवळीस भक्ती चळवळ या नावाने प्रसिध्द झाले. यासंबंधी बार्थ हे विद्वान म्हणतात की, "भक्ती चळवळ हिंदु धर्माचे एक अंग होते." भक्ती हा शब्द 'भज्-भजणे' या संस्कृत धातूपासून बनला आहे. पण भक्ती म्हणजे केवळ भजणे असा अर्थ न राहता ईश्वरोपासना या अर्थी तो शब्द रूढ झाला. व्यक्ति ज्या भावनेच्या योगाने ईश्वराला सर्वथा शरण जाते, ती भावना म्हणजे भक्ती होय. ईश्वराविषयीचे आत्यंतिक व अनन्य प्रेम म्हणजे ईश्वराची भक्ती असे म्हणता येईल. मध्ययुगीन सुधारणा चळवळ म्हणून भक्ती चळवळीचा आढावा घेण्याच्या हेतूने प्रस्तूत शोध निबंधाची मांडणी केली आहे.

**भक्ती चळवळीचा उद्गम व विकास**

प्राचीन भारतीय धार्मिक अवस्था व विचारधारेचे आकलन केल्यास असे दिसून येते की, वेद, उपनिषद यामध्ये या चळवळीचे बीजे दिसून येतात. वैदिक विचारधारेत अतिरिक्त स्तोम माजल्यानंतर एका नवीन विचारधारा आकारास आली. ती म्हणजे जैन व बौध्द धर्म होय. जैनांनी अतिशय कडक नियमांच्या अनुकरणावर भय दिला. या उलट गौतम बुध्दांनी मध्यम मार्गाचा स्वीकार केला. परिणामी सर्वसामान्य जनता बौध्द धर्माची अनुयायी बनली. परंतु हळुहळु जैन व बौध्द धर्मात कर्मकांडानी प्रवेश केला. वास्तविक शंकराचार्यापासून भक्ती चळवळीचा प्रारंभ झाला असे म्हटले जाते. काही इतिहासकारांच्या मते, भक्ती चळवळीचा उदय हा इस्लामच्या प्रभावामुळे झाला. शंकराचार्यांचा अद्वैतवादी सिध्दांत हा इस्लाम पासून घेतला, असे त्याचे मत आहे. पण हे मत तर्कसंगत नाही. कारण शंकराचार्यांचा अद्वैतवाद भारतीय वेदांत दर्शनावर आधारित आहे.

ऐतिहासिक दृष्ट्या भक्ती चळवळीचा विकास हा दोन भागामध्ये झाला. पहिल्या भागामध्ये दक्षिण भारतात 6 वे शतक ते 13 व्या शतकापर्यंत विकास झाला. दक्षिणेत 12 आळवार वैष्णव आणि 63 नायनार शैव संत यांचे चळवळीत महत्त्वाचे योगदन आहे. दुसऱ्या भागामध्ये 13 व्या शतक ते 16 वे शतक हा कालखंड येतो. या काळात भक्ती चळवळ उत्तर भारत आणि बंगालमध्ये पोहचली. उत्तर भारतात भक्ती चळवळ इस्लाम धर्माच्या संपर्कात आली. इस्लामी आव्हानचा स्वीकार करून भक्ती चळवळ प्रभावित व उत्तेजीत झाली.

**भक्ती चळवळीचा उद्देश**

डॉ. ए. एल. श्रीवास्तव यांच्या मते, भक्ती चळवळीचे दोन उद्देश होते. ते पुढील प्रमाणे आहेत.

1) हिंदू धर्मात सुधारणा घडवून आणणे. ज्यामुळे इस्लामी धर्माचा प्रचार व प्रसाराला पायबंद बसेल.

2) हिंदू-मुस्लीम या दोन धर्मात समन्वय प्रस्थापित करून या दोन धर्मात मैत्रीपूर्ण संबंध निर्माण करणे.

भक्ती चळवळीचा पहिला उद्देश सफल झाला. परंतु दुसऱ्या उद्देशामध्ये या चळवळीस अपयश आले. राम-रहिम किंवा ईश्वर-अल्लाह ही परमात्म्याची दोन नावे आहेत, या मताचा स्वीकार इस्लामी अनुयायींनी केला नाही.

**भक्ती चळवळीची कारणे**

मध्ययुगीन भारतीय इतिहासातील भक्ती चळवळीची कारणे पुढील प्रमाणे आहेत.

**1) हिंदू धर्माची जटिलता**

हिंदू धर्म हा या कालखंडात फक्त बौध्दिक सिध्दांत राहिला होता. हे बौध्दिक सिध्दांत सर्वसामान्य जनतेच्या आवाक्याबाहेरचे होते. हिंदूधर्मामध्ये उपवास, कर्मकांड व यज्ञविधी उत्तरोत्तर वाढत होते. हिंदू धर्माची ही जटीलता सामान्य जनतेच्या अनुकरणाच्या बाहेर होती. त्यामुळे भक्ती चळवळीचा उदय झाला.

**2) मंदिर आणि मूर्तींचा विनाश**

इस्लामी आक्रमणकारींनी तसेच इस्लामी राज्यकर्त्यांनी भारतातील ठिकठिकाणी मंदिरांवर आक्रमणे केली. मंदिराची व मूर्तींची नासधूस केली. त्यांनी हिंदूच्या पवित्र स्थळांना अपवित्र केले. परिणामी मंदिर व मुर्तींच्या अभावात ईश्वरभक्त हिंदूने भक्तीचा मार्ग स्वीकारला.

**3) जाती प्रथा**

हिंदूमध्ये जातीप्रथेची व्यवस्था अत्यंत जटील झाली होती. उच्चवर्णी हिंदूंनी शुद्र-अतिशुद्र यांच्यावर अनेक बंधने लादली होती. मोक्ष, शिक्षण, यज्ञविधी, खान-पान, विवाह, राहणीमान याबाबतीत खालच्या जातींवर बंधने होती. याउलट भक्तीमार्ग हा सर्वांसाठी खुला होता. त्यामुळे निम्न जाती भक्तीचळवळीकडे आकर्षित झाल्या.

**4) इस्लामी आक्रमणे व अत्याचार**

या काळातील राजकीय इतिहास आढावा घेतला तर असे दिसून येते की, इस्लामी आक्रमणे मोठ्या प्रमाणात झाली. या आक्रमणकारींनी स्थानिक जनतेवर अत्याचार केले. मंदिराची नासधूस केली. हिंदू स्त्रियांचे अपहरण केले. शेती, संपत्तीची लूट केली. तलवारीच्या जोरावर धर्मांतर केले. त्यामुळे हिंदू भक्तीचळवळीकडे वळले. सरदार के. एम. पणिकर यांच्या मते, "इस्लाम धर्मीयी अनुयायींनी केलेला अत्याचार हा भक्ती चळवळीसाठी जबाबदार आहे."

**5) पलायनवादी वृत्ती**

डॉ. व्हि. डी. महाजन भक्ती चळवळीच्या उदयाचे कारण हिंदूची पलायनवादी वृत्ती सांगितले आहे. सतत होणाऱ्या मुस्लीम आक्रमणांनी हिंदूच्या शौर्य आणि पराक्रम कंठीत झाला. त्यामुळे हिंदू ईश्वर भक्तीकडे वळले आणि त्याद्वारे मुसलमानापासून मुक्तीचा मार्ग शोधण्याचा प्रयत्न केला.

**6) हिंदू धर्म व जातीच्या सुरक्षिततेची भावना**

मुस्लिम राज्यकर्त्यांना संपूर्ण भारत इस्लामी अनुयायी करावयाचा होता. त्यासाठी मुस्लिम राज्यकर्ते साम-दाम-दंड या सर्व मार्गाचा वापर करीत होते. आपला धर्म यामुळे धोक्यात आला आहे, असे हिंदूना वाटू लागले. परिणामी भक्ती चळवळीतील संताच्या व सुधारकाच्या माध्यमातून आपला हिंदू धर्म व जातीची शुध्दता टिकून राहिल, या हेतूने जनता भक्ती चळवळीकडे वळली.

**7) इस्लामचा प्रभाव**

भक्ती चळवळीचा उदय इस्लाम धर्माच्या संपर्कात आल्याने झाला आहे, असे मत ताराचंद, डॉ. कुरेशी, के. ए. निजामी यांनी मांडले आहे.

**भक्ती चळवळीची वैशिष्ट्ये**

मध्ययुगीन काळातील भक्ती चळवळ ही व्यापक होती. तिचा प्रसार भारतात सर्वत्र झाला. ही सर्वसामान्यांची चळवळ होती. त्यामुळे जागृती घडून आली. अशा या भक्ती चळवळीची काही वैशिष्ट्ये होती. ही वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

**1) पवित्रता आणि सदाचारावर भर**

भक्ती चळवळीने सदाचार आणि मनाच्या पवित्रतेवर भर दिला. ईश्वर प्राप्तीसाठी यज्ञविधी, जप-तप, कर्मकांड यांच्या आवश्यकता नाही. ईश्वर भक्ती भावनेने प्रसन्न होतो.

**2) मूर्तीपूजेस विरोध**

भक्ती चळवळीतील संतांनी मूर्तीपूजेस विरोध केला. ईश्वर मंदिर किंवा मूर्तीत नसून मानवाच्या हृदयात निवास करतो. तीर्थयात्रा करणे व्यर्थ आहे. कबीर म्हणतात की,

*पाहन पूजे हरि मिले, तो मैं पूजूँ पहार।*

*ताते यह चाकी भली, पीस खाय संसार ॥*

**3) जातीव्यवस्थेला विरोध**

भक्ती चळवळीने जाती व्यवस्थेला कडाडून विरोध केला. उच्च व निम्न जातीतील सर्व व्यक्तींना ईश्वर भक्तीचा अधिकार आहे. ईश्वरासमोर कोणतीही व्यक्ती श्रेष्ठ किंवा कनिष्ठ जातीची नाही. ईश्वरास सर्व जाती समान आहेत.

**4) हिंदू-मुस्लीम ऐक्यावर भर**

हिंदू-मुस्लिम समन्वय आणि यांच्यात मैत्री निर्माण करणे, हा भक्ती चळवळीचा उद्देश होता. त्यामुळे सर्व संतांनी हिंदू-मुस्लिम ऐक्यावर भर दिलेला दिसून येतो. राम-रहीम, ईश्वर - अल्लाह है एकाच ब्रह्माची नावे आहेत.

**5) एकेश्वरवादचा पुरस्कार**

भक्ती चळवळीतील सर्व संतांनी बहु दैववाद ऐवजी एकेश्वरवादाचा पुरस्कार केला. या संतांनी निर्गुण आणि सगुण ईश्वर उपासनेचा पुरस्कार केला.

**6) गृहस्थाश्रमाचा स्वीकार**

मोक्ष प्राप्तीसाठी गृहस्थाश्रमाचा त्याग करण्याची गरज नाही. व्यक्तीला संसारिक जीवन व्यतीत करत देखील मोक्ष प्राप्त करता येतो. भक्ती चळवळीतील बरेच संत गृहस्थी जीवन जगत होते.

**7) सद्‌गुरूला महत्त्व**

ईश्वरी रहस्याचे ज्ञान सद्गुरूला असते. त्यामुळे गुरूची पूजा करावी. सर्व संतांनी गुरूविषयी आदर व्यक्त केला आहे.

**8) समाज सुधारणा**

भक्ती चळवळ ही धार्मिक चळवळ होती असे असले तरी या चळवळीने सामाजिक क्षेत्रात महत्त्वाचे कार्य केले. संतांनी सामाजिक अनिष्ट प्रथांवर वेळोवेळी टिका केली.

**भक्ती चळवळीची फलश्रुती किंवा परिणाम**

भक्त चळवळीचा तत्कालीन समाज जीवनावर व्यापक प्रभाव पडला. या चळवळीने मध्ययुगीन भारताच्या सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय परिस्थितीवर विविध परिणाम झाले. या चळवळीची फलश्रुती किंवा परिणाम पुढीलप्रमाणे झाले.

**1) ब्राह्मणी वर्चस्व कमी**

संतांनी ईश्वरप्राप्तीसाठी भक्तीवर जोर दिला. यामध्ये ब्राह्मणी शोषणाला कुठेच स्थान नव्हते. ईश्वर भक्तीसाठी लोकांना ब्राह्मणांवर अवलंबून राहण्याची गरज नव्हती. पारंपारिक चालत आलेली ब्राह्मणांची प्रभुसत्ता आणि धार्मिक विशेषाधिकारांचा अंत झाला.

**2) जाती प्रथेची बंधने कमी**

भक्ती चळवळीला जाती व्यवस्थेचे समूळ उच्चाटन करता आले नाही. पण पूर्वीपासून चालत आलेली जाती व्यवस्थेची बंधने कमी करण्यात महत्त्वाची भूमिका केली. या चळवळीत विविध जाती-धर्माचे संत व शिष्य होते. उदा. रविदास चांभार असून देखील ब्राह्मणांसोबत जेवण करीत. ईश्वराने धन्ना जाटाला अन्न दिले. पंढरपूरला सर्व जातीचे वारकरी एकत्र विठोबाच्या दर्शनासाठी मिळून जात.

**3) सांप्रदायिक समन्वय**

या चळवळीने धार्मिक सहिष्णुतेला जन्म दिला. त्यामुळे परस्पर विरोधी हिंदू-मुसलमान या विरोधी संप्रदायांमध्ये समन्वय व सामंजस्याच्या भावनेचा उदय झाला. त्यामुळे सामाजिक जीवनात समृध्दी, स्थिरता, शांती निर्माण झाली.

**4) स्वावलंबी जीवनाचा संदेश**

भक्ती चळवळीतील संतांनी संन्यासाऐवजी गृहस्थी जीवनात राहून मोक्ष प्राप्तीचा संदेश दिला. संतांनी स्वतः कष्टमय जीवन व्यतीत करून स्वावलंबनाचा संदेश दिला. उदा. कबीर जीवनभर वस्त्र विणली, रविदास बुट बनवित, धन्ना जाट शेती करीत, महाराष्ट्रातील संत देखील आपले व्यवसाय करून ईश्वर भक्ती करीत.

**5) मराठा आणि शीख सत्तेचा उदय**

भक्ती चळवळीचा सामाजिक आणि धार्मिक क्षेत्राबरोबरच राजकीय क्षेत्रात देखील परिणाम दिसून येतो. पंजाबमध्ये गुरूनानक आणि त्यांच्या शिष्यानी दिलेल्या उपदेशाने शिखांचा स्वाभिमान जागृत झाला आणि स्वतंत्र शिख सत्तेचा उदय झाला. महाराष्ट्रात देखील संत तुकाराम व अन्य संतांच्या शिकवणुकीमुळे समाजात ऐक्य निर्माण झाले. परिणामी शिवाजी महाराज यांनी मराठी राजसत्तेची स्थापना केली.

**6) प्रांतीय भाषा व साहित्याचा विकास**

संतांनी सर्वसामान्यांच्या भाषेत उपदेश दिला. त्यामुळे जनतेशी त्यांचा संपर्क अधिक वाढला. तसेच हिंदी, पंजाबी, गुजराती, बंगाली, तेलगु, कन्नडी, मराठी, तामिळी, मैथिली इ. भाषांच्या विकासात महत्त्वाचे योगदान आहे. या भाषांमध्ये विपुल असे साहित्य देखील संतांनी निर्माण केले. त्यामुळे साहित्यिक विकास देखील झाला.

**7) सामाजिक सुधारणा**

सामाजिक अनिष्ट प्रथांमुळे हिंदू धर्म पोकळ झाला होता. संतांनी सामाजिक सुधारणेचा स्वीकार केला. जाती भेदभाव समाप्त करणे, अस्पृश्यता उध्दार, स्त्रियांचा विकास, सती प्रथेस विरोध केला. महाराष्ट्रात वारकरी सांप्रदायात प्रसिध्द स्त्री संत होत्या.

**सारांश**

भक्ती चळवळ ही मध्ययुगीन भारतातील एक आध्यात्मिक व सामाजिक सुधारणा चळवळ होती. या चळवळीने धार्मिक विधींपेक्षा देवाप्रती वैयक्तिक भक्तीवर भर दिला. या चळवळीमुळे समानतेला प्रोत्साहन देण्यात आणि अध्यात्म सर्वांना उपलब्ध करून देण्यात मदत झाली. भक्ती चळवळीतील संतांच्या विचारात बरीच समानता होती. मूर्तीपूजेस विरोध, जातीप्रथेला विरोध, सांप्रदायिक समन्वय, ईश्वरावर प्रेम, भक्तीद्वारे ईश्वरप्राप्ती इ. ची शिकवणूक सर्व संतांच्या विचारात दिसून येते. प्रेम, स्नेह, एकता, बंधुभाव, सहिष्णुता, अहंकाराचा त्याग, जीवनाची क्षणभंगुरता, समानता इ. मतांचे प्रतिपादन संतांनी केले म्हणून भक्ती चळवळीचा व्यापक प्रभाव भारतीय जनतेवर पडला. "बौद्धधर्माच्या पतनानंतर भक्ती चळवळीसारखे दुसरे देशव्यापी जनआंदोलन आपल्या देशात झाले नाही." अशाप्रकारे भक्ती चळवळीचे महत्त्व डॉ. ए. एल. श्रीवास्तव यांनी नमूद केले आहे.

**संदर्भ सूची**


1) रगडे सुभाष, (2023), भारतीय धर्म, संस्था व चळवळीचा इतिहास, शिवानी प्रकाशन, पुणे.
2) आचार्य धनंजय, (2006), भारताचा इतिहास, साईनाथ प्रकाशन, नागपूर.
3) देशमुख मा. म., (1998), मध्ययुगीन भारताचा इतिहास, विश्वभारती प्रकाशन, नागपुर.
4) महाजन व्ही. डी., (2004), मध्यकालीन भारत का इतिहास, एस. चंद ॲंड कंपनी लि., नई दिल्ली.
5) शिंदे भारत विठ्ठलराव, (2010), संत जनाबाई चरित्र व वाङ्मयीन कार्य : एक चिकित्सक अभ्यास, पीएच. डी. शोधप्रबंध, अप्रकाशित, स्वा. रा. ती. मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.
6) घुगे चंद्रशेखर सुरेश, (2018), संत कवयित्रींच्या काव्यातील प्रतिमासृष्टी, पीएच. डी. शोधप्रबंध, अप्रकाशित, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
7) पांगारकर ल. रा., (संपा.), (1978), ज्ञानेश्वरांची प्रभावळ, प्रकाशक विदर्भ मराठवाडा बुक कं., पुणे.
8) देशमुख उषा मा., (1994), संत साहित्य दर्शन, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे.
9) देशपांडे केजकर प्रकाश, (2006), संत कविता: एक दृष्टिकोण, स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद.
10) कठारे अनिल, (2013), मध्ययुगीन भारताचा इतिहास, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव.
11) सक्सेना बी. पी., (1996), दिल्ली व शहाजानचा इतिहास, मनोरमा प्रकाशन, मुंबई.
12) Dhawalikar M. K., (1997), Indian Protohistory, Books and Books, New Delhi.

# ग्रामीण महिलांचे सामाजिक सक्षमीकरण

**डॉ. मीना वडगुळे**
वाणिज्य विभाग प्रमुख,
शिवाजी कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, कन्नड

**प्रस्तावना:-**

'यत्र नार्यस्त पूज्यते रमंते तत्र देवता' जिथे स्त्रियांची पूजा केली जाते तेथे देवता रममाण होतात असे म्हटले जाते. हिंदू धर्मात स्त्रीला देवता, लक्ष्मी माता, इत्यादी नावाने संबोधून तिचा गौरव करण्यात आलेला आहे.ही वस्तुस्थिती जरी असली तरी प्रत्यक्षात मात्र स्त्रियांचा दर्जा यापेक्षा वेगळा आहे. अलीकडे स्त्रियांच्या सक्षमीकरणाबाबत जगभरात अनेक कायदे व चळवळीच्या माध्यमातून तिचा उद्धार करण्यासाठी कार्य केले जात आहे. महिलांचे सक्षमीकरण म्हणजे नेमके काय, तर तिला सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक व सांस्कृतिक दृष्ट्या शक्तिमान करणे होय. महिलांच्या असंभूत क्षमतांचा विधायक विकास होणे म्हणजेच स्त्रियांचे सक्षमीकरण होय. पुरुषांच्या बरोबरीने निर्णय प्रक्रिये तसेच सर्वच व्यवस्थेत समान स्वरूपाची संधी, लाभ,स्थान व प्रतिष्ठा तिला मिळवून देणे म्हणजेच सक्षमीकरण होय 'स्त्रीला सक्षम करणे ही एक प्रक्रिया आहे स्त्रीला इतर उपेक्षित घटकांना दूर ठेवण्याच्या सुव्यवस्थित प्रवाहाचे स्वरूप बदलून नवी दिशा देऊन कृतीत आणता येते तेव्हा प्रामुख्याने स्त्रीला सक्षम करण्यासाठी तिला शक्ती देण्याचे प्रयत्न केले गेले तरच ती अधिक प्रगत होऊ शकते' या लता बाटलीवालाच्या उपरोक्त विधानाचा विचार करता स्त्री ला सक्षम करण्यासाठी सर्वतोपरी सर्व पातळीवर अधिकाधिक प्रयत्न करणे गरजेचे आहे.

प्रस्तुत शोधनिबंधात ग्रामीण महिलांच्या सामाजिक सक्षमीकरणातील समस्या व उपाय यांचा शोध घेतला आहे.

ग्रामीण महिलांच्या सक्षमीकरणाच्या बाबतीत बोलायचे झाले तर सक्षमीकरण हा शब्दच अजून पर्यंत त्यांच्यापर्यंत पोहोचला आहे असे दिसत नाही. भारतीय समाज हा 70% खेड्यातून राहतो यात महिलाही आल्यात. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानंतरही ग्रामीण महिलांच्या समस्या आहे तशाच आहे.सक्षमीकरणाच्या अनुषंगाने अनेक कायदे, चळवळी निर्माण झाल्या. महिलांच्या उन्नतीसाठी निर्माण झालेले कायदे चळवळी किंवा सामाजिक सुधारणा म्हणाव्या तेवढ्या प्रमाणात ग्रामीण भागापर्यंत पोहोचल्या नाहीत किंवा पोहचू दिल्या नाहीत.त्यामुळेच महिलांच्या सक्षमीकरणात आजही अनेक समस्या आहेत. त्यांच्या सक्षमीकरणांमध्ये अडसर ठरणाऱ्या समस्यांचा शोध घेण्यापूर्वी ग्रामीण भागातील किंवा भारतीय महिलांची स्थिती काय होती हे पाहू

**महिलांची स्थिती:-**

भारतीय संस्कृती ही पुरुषप्रधान असल्यामुळे स्त्रियांच्या सामाजिक दर्जात समस्या निर्माण झाल्याचे दिसून येते. प्राचीन व मध्ययुगीन कालखंडात स्त्रियांचा दर्जा अत्यंत खालवलेला होता ती शूद्रातीशूद्र म्हणूनच ओळखली जात होती. वेद,पुराण, धर्मग्रंथ, स्मृती यांनी स्त्रियांना अधिकच बंदिस्त केल्याचे दिसते.हा कालखंड म्हणजे स्त्रियांच्या गुलामीचा कालखंड मानावा लागतो. या कालखंडातील महिलांच्या स्थितीविषयी डॉक्टर कृष्णा इंगोले म्हणतात" आदिम संस्कृतीत स्त्री स्वतंत्र होती,निर्भय होती.कुटुंबात, समाजात तिला मानाचे स्थान होते. पण कृषिसंस्कृतीच्या प्रदीर्घ कालखंडात आजची विवाह संस्था निर्माण झाली आणि या काळात स्त्री हळूहळू परतंत्र बनली.स्त्रीला माणूस म्हणून येणारे अधिकार नाकारण्यात आले पुरुषसत्ताक पद्धतीत मालकी हक्काच्या कल्पना,वंश शुद्धीसाठी नीतिमत्ता यामुळे स्त्री केवळ भोगदासी ठरली"1 उपरोक्त विधानांचा विचार करता आजही स्त्रियांची सामाजिक स्थिती फारसी सुधारलेली आहे असे म्हणता येत नाही.

शहरी भागाच्या तुलनेत ग्रामीण भागातील महिलांच्या समस्या आजही आहे तशाच आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळात स्त्रीमुक्तीचा वसा घेतलेले समाज सुधारक झालेत याच कालखंडात ब्रिटिश सरकारने स्त्रियांसाठी केलेले सुधारणा विषयक कायदे व शिक्षण विषयक धोरणामुळे स्त्री सक्षमीकरणाला मोठी चालना मिळाली. राजा राम मोहन रॉय,महात्मा फुले, सावित्रीबाई फुले,अण्णासाहेब कर्वे, पंडिता रमाबाई,डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांना दर्जा व प्रतिष्ठा मिळवून देण्यास गती दिली.

1829 साली सती प्रथेविरुद्ध राजा राममोहन रॉय यांनी केलेल्या आंदोलनाने गव्हर्नर जनरल विल्यम बेंटिक यांनी सती प्रथा बंदी कायदा पास केला. 1929 ला बालविवाह प्रतिबंध कायदा, 1955 ला हिंदू महिलांना अधिक अधिकार देणारा कायदा, 1961 ते 1986 हुंडा प्रतिबंधक कायदा, 1987 महिला असभ्य प्रदर्शन प्रतिबंध कायदा असे महिलांच्या संबंधित 40 पेक्षा अधिक कायदे आज आहेत. 1990 मध्ये महिला आयोग व 1993 मध्ये मानवाधिकार संरक्षण कायदा करून स्त्रियांना सक्षम करण्यासाठी सरकारी पातळीवर आजवर प्रयत्न झालेले दिसून येतात.

**कायदा आणि समाज:-**

उपरोक्त कायद्याने महिलांना अधिकार देऊन राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व सांस्कृतिक दृष्ट्या अधिक सक्षम करण्याचा प्रयत्न केला आहे परंतु वस्तुस्थिती अशी आहे की कायदा व प्रत्यक्ष त्याची अंमलबजावणी यात मात्र तफावत आहे. ग्रामीण भागातील स्त्री या कायद्यापासून अजूनही दूर आहे आजही तिचे अनेक पातळीवर शोषण केल्या जाते याविषयी कायद्याद्वारे तिला न्याय मिळतोच असे नाही त्यामुळे प्रत्येक प्रश्न हे कायद्याच्या चौकटीतून सोडवता येतातच असे नाही. यासाठी सामाजिक परिवर्तनाची अत्यंत गरज आहे.सामाजिक परिवर्तन झाले तरच ग्रामीण स्त्रियांचे जीवनमान बदलू शकते

भारतीय समाज हा पुरुषप्रधान असल्याने स्त्रियांना आपोआपच दुय्यम दर्जा प्राप्त होतो ग्रामीण स्त्री पुरुषावर अवलंबून असल्याने तिचे सर्वच बाबतीतले स्वातंत्र्य हे पुरुषी मानसिकतेवर अवलंबून आहे कायद्याने तिला सक्षम करण्याचा प्रयत्न केला मात्र सामाजिक दृष्ट्या ती आजही परावलंबी आहे सामाजिक दृष्ट्या सक्षम होण्यास अनेक अडसर तिच्या मार्गात आहेत ते अडसर कोणते ते पाहू

**कौटुंबिक अडसर:-**

स्त्री ही संसार रथाचे एक महत्त्वाचे चाक आहे. तिच्याशिवाय कुटुंबाची व्याख्याच पूर्ण होऊ शकत नाही असे असले तरी 'चूल आणि मूल' या पलीकडे ग्रामीण महिलांचे अस्तित्व दिसून येत नाही. पुरुष हा कुटुंब प्रमुख असल्याने व आर्थिक सत्ता त्याच्या हातात असल्याने स्त्रीला त्याच्या अंकित राहावे लागते.स्त्री ला अगदी घरातील निर्णय घेतानाही पुरुषांना विचारल्याशिवाय निर्णय घेता येत नाही. त्याच्या होकाराशिवाय तिला कुठल्याच इच्छा आकांक्षा पूर्ण करता येत नाही सर्वस्वी ती पुरुषांवर अवलंबून आहे. आजही ग्रामीण भागातील मुलींना नोकरी व्यवसाय व इतर काही करण्यासाठी पुरुष वर्गाकडून नकार दिला जातो.शिक्षणासाठी तिला बाहेरगावी पाठवण्यास पालक उत्सुक नसतात मुलगी म्हणजे ओझे अशा समजुतीतून तिच्या लग्नाची घाई केली जाते या कौटुंबिक अडसराला शक्यतो महिला व मुली विरोध करतांना दिसत नाही अपवादात्मक परिस्थितीमध्ये काही ठिकाणी विरोध होतो परंतु तो विरोध मोडून काढला जातो आणि स्त्रिया पुन्हा 'चूल आणि मूल' या परिघात बंदिस्त केल्या जातात.

**हिंसाचार:-**

कुटुंबामध्ये व समाजामध्ये कुठलीही घटना घडली तर त्याचा बरा वाईट दोष वा बरा वाईट परिणाम हा स्त्रियांवर होतो.कौटुंबिक व सामाजिक हिंसाचाराची प्रथम बळी ही स्त्रीच ठरते. अनेकदा विवाहामध्ये हुंडा मिळाला नाही म्हणून तिचा छळ केला जातो, सतत मुलीलाच जन्माला घालते वंशाला दिवा मिळत नाही म्हणूनही तिच्यावर अत्याचार केला जातो,तिच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिचा मानसिक छळ केला जातो,पैशासाठी तिला प्रत्येक वेळेस पुरुषांपुढे हात पसरावा लागतो, कुटुंबप्रमुखाची अनेकदा तिला अपमानास्पद बोलणी खावी लागते अशा या- ना त्याकारणाने तिचा सतत छळ होतो याच बरोबर धार्मिक सामाजिक आणि सांस्कृतिक उन्माद जेव्हा जेव्हा वर येतो तेव्हा तेव्हा त्या उन्मादाच्या बळी स्त्रियाच ठरतात.

एकूणच या शोषणाविरुद्ध किंवा हिंसाचाराविरुद्ध ग्रामीण स्त्री फारसे बोलत नाही आपल्या कर्माचे भोग म्हणून ती मुकाट्याने हे सर्व स्वीकारते. या हिंसाचाराला कायद्याने प्रतिबंध आहे मात्र तशी तक्रारच ती करीत नसल्याने न्यायापासून तिला वंचित राहावे लागते तिने स्वतःहून या हिंसाचाराच्या विरुद्ध लढणे आज गरजेचे आहे.

**उच्च शिक्षणाबाबत उदासीनता:-**

ग्रामीण भागात मुलींच्या उच्च शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प आहे यामागे उच्च शिक्षण देण्याच्या बाबतीत पुरुषवर्ग फारसा अनुकूल नसल्याचे आढळते मुलींचे दहावी- बारावीपर्यंत शिक्षण खूप झाले शिकून पुढे काय करणार? या

मानसिकतेमुळे तिचे शिक्षण बंद केले जाते सोबतच ग्रामीण भागात उच्च शिक्षणाच्या सोयी सुविधा नसल्याने बाहेरगावी शिक्षणासाठी मुलींना पाठविण्यास पालक अनुत्सुक असतात यामागे आर्थिक कारण हे ही महत्त्वाचे आहे, सोबतच पालकांची मानसिकता नैतिकतेला घाबरणारी आहे. उच्च शिक्षण घेताना शहरात मुलीला पाठवले आणि तिथे जर काही जास्त झाले तर समाज काय म्हणेल, ती मुलगी आहे एकटी कशी जाणार एकटी कशी राहणार ह्या भीतीपोटी तो तिच्या उच्च शिक्षणाला फारसे महत्त्व देत नाही.

**समाज काय म्हणेल:-**

पुरुषप्रधान संस्कृतीत धार्मिक,सामाजिक मूल्य जोपासण्याची सर्वस्वी जबाबदारी ही स्त्री ची आहे असे पुरुषांचे मत आहे. याविरुद्ध काही घडले तर तिला जबाबदार धरल्या जाते. विशेषता ग्रामीण महिला ह्या धार्मिक,सांस्कृतिक व सामाजिक परिघात राहणे पसंत करतात. कारण हजारो वर्षांपासूनचा धार्मिक,सांस्कृतिक व सामाजिक पगडा त्यांच्यावर आहे यातून बाहेर पडण्याच्या मानसिकतेत त्या नाहीत. कारण त्यांच्यापर्यंत स्त्री सुधारणेचे विचार अजून पोचलेले नाही. रुढी, परंपरा, सामाजिक भीती यामुळे ती याच कोशात राहणे पसंत करते. याचाच आधार घेऊन पुरुषी मानसिकतेने तिचे खच्चीकरण केलेले दिसते. आपल्या मनातील इच्छा,आकांक्षा मनातच ठेवून त्या भावनिक कोंडमारा सहन करतात. यामागे आर्थिक दृष्ट्या तीचे निराधार असणे,समाजाचा स्त्री कडे पाहण्याचा दृष्टिकोन, नैतिकता व सामाजिक जबाबदारी आणि कुटुंबाला सांभाळणे हे तिचं कर्तव्य आहे अशा तिच्या भावनेतून ती सतत सामाजिक दडपणात असल्याचे दिसून येते. सामाजिक दडपण हा तिच्या सक्षमीकरणातील महत्त्वाचा अडसर आहे असे म्हणता येते.

**विवाहाची घाई:-**

"पिता रक्षती कौमार्य भ्राता रक्षती यौवने | स्थविरे रक्षती पुत्र: न स्त्री स्वातंत्र्य मर्हति |"2 मनुस्मृतीतील या श्लोकाचा पगडा आजही पुरुष मनावर आहे स्मृती, पुराण व धर्मग्रंथांनी स्त्रियांच्या वैवाहिक जीवनात अनेक जाचक बंधने लादली कौमार्य,योनिपवित्रता याला अधिक महत्त्व दिल्याने तसेच पती हा परमेश्वर असा धर्मशास्त्राचा आदेश असल्याने तत्कालीन काळात स्त्रीला पुरुषा शिवायअस्तित्व नव्हते. हीच धारणा आजही आहे.ग्रामीण भागात आजही विवाहयोग्य वय होण्याच्यापूर्वीच मुलींचे लग्न लावून दिल्या जातात अठरा वर्षाखालील मुलींचा विवाह कायद्याने गुन्हा असला तरीही त्या कायद्याला फारसे न बधता मुलींच्या लग्नाची घाई केली जाते. यामागे दोन कारणे आहेत पहिले सामाजिक भीती आणि दुसरे नैतिकतेची भीती.या भीतीपोटी घरातील कर्ता पुरुष मुलींच्या मनाचा विचार न करता तिला पतीच्या हवाली करतो आपल्या डोक्यावरले ओझे कमी झाले ही मानसिकता असल्याने नाईलाजास्तव तिला कमी वयात विवाह करावा लागतो त्यातच मातृत्वाचे ओझे लादल्याने तिचा संपूर्ण विकास थांबतो ती चूल आणि मूल यात गुरुफटत जाते आणि तिचं पुढील अस्तित्व पतीच्या आदेशावर सुरू होते.यामुळे तिच्यामध्ये असलेली ऊर्जा तिच्यामध्ये असलेले नवीन काही करण्याची उर्मी, इच्छा, आकांक्षा या सर्वांचा नाहक बळी दिल्या जातो विवाहाची घाई हा सुद्धा ग्रामीण महिलांच्या सक्षमीकरणात एक महत्त्वाचा अडसर ठरतो.

**सामाजिक कोशातून बाहेर पडण्यात असमर्थ:-**

स्त्रीमुक्तीचा उदो -उदो आज जगभर होतो आहे त्यांच्यासाठी अनेक सोयी सुविधा सरकारने उपलब्ध केल्या आहेत मात्र ग्रामीण भागातील स्त्री ही आपल्या कौटुंबिक व सामाजिक कोशातून बाहेर पडण्याच्या मानसिकतेत नाही. या मागच्या कारणांचा शोध घेता असे लक्षात येते की, मुळातच स्त्री ही भावनिक आहे ग्रामीण भागातील स्त्रियांवर धार्मिकतेचा पगडा जास्त असल्याने ती पतीला परमेश्वर आणि कुटुंबाला आपले सर्वस्व मानते. त्या विरोधात जाणे किंवा त्यातून बाहेर पडणे ही कल्पनाही तिला करवत नाही त्यातच ती स्वतःला समाधानी मानते यामुळे वेगळे काही करण्याची कल्पनाच तिच्या डोक्यात येत नाही.आली तरीही तिला त्यातून बाहेर पडण्यासाठी अनेक अडथळ्यांना सामोरे जावे लागते. कुटुंब हे आपलं संरक्षक कवच आहे आणि या कुटुंबाला विरोध करून स्वतःसाठी काही करावं हे तिच्या मनाला पटत नाही. समाज काय म्हणेल ही भीती तर आहेच या कारणाने ती कौटुंबिक व सामाजिक कोशातून बाहेर येण्यास सहसा तयार होत नाही.

एकंदरीत ग्रामीण महिलांच्या सक्षमीकरणांमध्ये उपरोक्त गोष्टी अडसर ठरतात. याचबरोबर याला काही अंशी तीही जबाबदार आहे त्यामागे तिच्यावर झालेले संस्कार तिचे भावनिक मन,तिचे कुटुंबातील गुंतलेपण, जबाबदारी,मातृत्व, निसर्गाने दिलेला शारीरिक कमकुवतपणा, नैतिकतेची भीती या सर्वांचा परिणाम कळत नकळत तिच्यावर होतो मात्र तिला

ह्या गोष्टी अडसर वाटत नाही ही खरी समस्या आहे. तिला समाजातील अनिष्ट प्रथा, परंपरा,चालीरीती,रूढी, अन्याय,अत्याचार याविरुद्ध लढण्यासाठी वैचारिक बळ देणे आज गरजेचे आहे.

ग्रामीण महिलांच्या सामाजिक सक्षमीकरणातील हे अडसर तिच्या उन्नतीसाठी आज समस्या ठरत आहेत यातून बाहेर पडण्यासाठीच्या काही उपयोजना तिच्या सक्षमीकरणास हातभार लावू शकतात.

**शिक्षण:-**

'शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे जो प्राशन करेल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही' डॉ. आंबेडकरांच्या या विधानाचे महत्त्व सर्वश्रुत आहे. ग्रामीण मुलींच्या किंवा महिलांच्या सक्षमीकरणांतील अडसर दूर करायचे असेल तर प्रथमत: ग्रामीण मुलींना शिक्षणाच्या विशेषतः उच्च शिक्षणाच्या बाबतीमध्ये सहकार्य करणे आणि तिला उच्च शिक्षणाच्या प्रवाहात आणणे हे महत्त्वाचे आहे. ग्रामीण मुलींनी व महिलांनी उच्च शिक्षणासाठी प्रसंगी कुटुंबाचा व समाजाचा विरोध पत्करून उच्च शिक्षण घेतले पाहिजे.आज शासन मुलींच्या उच्च शिक्षणाचा खर्च निशुल्क करतो आहे याचा फायदा ग्रामीण भागातील मुलींनी महिलांनी घेतला तर सक्षमीकरणाच्या दृष्टीने तिचे हे पहिले पाऊल ठरेल हे निश्चित आहे.

**आर्थिक सक्षमता:-**

ग्रामीण भागातील मुलींनी केवळ उच्च शिक्षण घेऊन स्वस्थ न बसता त्या माध्यमातून नोकरी - व्यवसाय उभारून स्वतःला आर्थिक दृष्ट्या सक्षम करणे गरजेचे आहे.यामुळे ती आर्थिक दृष्ट्या स्वतंत्र होईल तिला कोणावर अवलंबून राहण्याची गरज लागणार नाही आणि आर्थिक दृष्ट्या जर ती संपन्न झाली तर अनेक अर्थाने ती सक्षम होईल यात शंका नाही.

**समाजाकडे दुर्लक्ष:-**

माणूस हा समाजशील प्राणी आहे समाजामुळेच माणसाचे अस्तित्व आहे मात्र कधी कधी हाच समाज माणसाच्या अस्तित्वाला कुचकामी ठरवतो.समाज जसा संरक्षण देतो तसाच तो परावलंबित्वाला ही कारणीभूत ठरतो.भारतीय स्त्रीला रूढी, परंपरा यात गुंतवून दुय्यम स्थान देण्यात समाजाची मोठी भूमिका आहे हे मान्यच करावे लागेल. समाज हा स्त्रियांना अधिक बंदिस्त ठेवण्याची भूमिका घेताना दिसतो या विरुद्ध समाजातील प्रथा, परंपरा, चालीरीती ज्या स्त्रियांच्या सक्षमीकरणाच्या आड येतात अशांना आज विरोध करणे गरजेचे आहे त्यासाठी प्रसंगी समाजाला कायद्याचा धाक दाखविणे गरजेचे आहे. प्रत्येकच गोष्ट समाज काय म्हणेल यावर अवलंबून असेल तर मग स्त्रियांचे सक्षमीकरण कदापिही होणे शक्य नाही.

**आत्मभान:-**

स्त्रियांना कायद्याद्वारे संरक्षण आहे स्वतःचा आर्थिक स्तर उंचावण्यास अनेक शासकीय योजना तिच्या करता आहेत. उच्च शिक्षणासाठी मोफत सोय तिच्यासाठी आहे.अशा अनेक सोयी सुविधा असतानाही स्त्री त्याचा फारसा लाभ घेताना दिसत नाही ग्रामीण भागात तर हे प्रमाण अत्यल्प आहे. यामागचे कारण पाहता मी एक स्त्री आहे किंवा मी शिक्षण घेऊन काय करू. चूल आणि मुलं च सांभाळायचे आहे. नवरा कमावणार आहे मग मला नोकरीची गरज काय ह्या ज्या नकारात्मक भावना तिच्यामध्ये आहेत त्यातून तिला बाहेर निघणे गरजेचे आहे. मी पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून लढू शकते, मी स्वतःच्या पायावर उभी राहू शकते, माझं स्वतंत्र अस्तित्व निर्माण करू शकते हे आत्मभान जोपर्यंत तिच्यामध्ये येणार नाही तोपर्यंत ती सक्षम ठरणार नाही. हे आत्मभान जर तिच्यात निर्माण झाले तर ती 'पुरुषांपेक्षा काकणभर सरस'च ठरेल.

**निष्कर्ष:-**

ग्रामीण भागातील स्त्रीच्या सामाजिक सक्षमीकरणासाठी कायद्याने तिला बळ दिले आहे मात्र त्या कायद्याची अंमलबजावणी पुरेशा प्रमाणात होत नाही.ग्रामीण भागात स्त्रियांवर होत असलेल्या अन्याय,अत्याचाराला ती स्वतःहून वाचा फोडत नाही. त्यातच पैशाच्या जोरावर कायदा आपल्या बाजूला वळवणारे असल्याने आणि तिला सामाजिक भीती असल्याने ती याविषयी फारशी बोलत नाही

कौटुंबिक हिंसाराचाराची ती बळी ठरते आहे कायद्याचे संरक्षण असूनही सामाजिक भीतीपोटी ती आवाज उठवत नाही.आपण बरे व आपले काम बरे या मानसिकतेत ती अडकलेली दिसून येते.

उच्च शिक्षणाच्या बाबतीत कौटुंबिक व सामाजिक बंधनामुळे उच्च शिक्षणाच्या प्रवाहात ती मागे पडत आहे आर्थिक स्वातंत्र्य नसल्याने ती परावलंबी आहे. त्यामुळे पुरुषाच्या आधाराशिवाय आपले अस्तित्व नसल्याचे तिचे मत आहे. सामाजिक,धार्मिक व सांस्कृतिक परंपराचा तिच्यावरचा पगडा एवढा जबरदस्त आहे की यातून बाहेर येण्याची ती धडपडत करत नाही. स्वतःबद्दलचा तिचा आत्मविश्वास पुरुषी मानसिकतेमुळे दाबल्या गेला आहे.

**समारोप :-**

ग्रामीण भागातील महिलांच्या सक्षमीकरणातील अडसर व त्यावरील उपाय योजनांचा शोध या शोधनिबंधातून घेतला आहे हा शोध केवळ सामाजिक अंगाच्या दृष्टीने घेतलेला आहे स्त्रियांच्या सक्षमीकरणांमध्ये अडसर ठरण्यास सामाजिक अंगाचा जेवढा भाग आहे त्याच बरोबर इतरही अनेक अडसर आहेतच. कायद्याने संरक्षण देऊनही ती आज आपले परवलंबी जीवन जगते आहे.यामागे ग्रामीण स्त्रियांवर असलेला रूढी,परंपरा, धार्मिक व सामाजिकतेचा पगडा तिच्या सक्षमीकरणास अडसर ठरल्याचे स्पष्ट होते.उच्च शिक्षणाचा अभाव,आर्थिक दृष्ट्या परावलंबित्व, तिच्यातील भीती आणि तिने स्वतःभोवती निर्माण केलेला कौटुंबिक कोश हे घटक तिला सक्षम होण्यापासून परावृत्त करीत आहेत असे दिसून येते. उपरोक्त घटकांना तिने धैर्याने सामोरे जाऊन स्वभान व आत्मविश्वास निर्माण केला तर ग्रामीण स्त्री सक्षम झाल्याशिवाय राहणार नाही हे निश्चित आहे.

**संदर्भ:-**


1. डॉ.कृष्णा इंगोले, लोकसंस्कृतीतील स्त्री रूपे,महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,मुंबई प्रथम आवृत्ती 2004.
2. डॉ.दीपक पवार,महिलांचे राजकीय सक्षमीकरण, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर,प्रथम आवृत्ती 2013.
3. प्राचार्य डॉ. स. ना.भारंबे,डॉ. साधना जावळे, स्त्री भ्रूणहत्या आणि स्त्रियांवरील वाढते अत्याचार एक सामाजिक समस्या, प्रशांत पब्लिकेशन जळगाव प्रथम आवृत्ती मार्च 2015.
4. डॉ. रघुनाथ महाजन, डॉ.संभाजी देसाई, कौटुंबिक हिंसाचार आणि महिला, प्रशांत पब्लिकेशन जळगाव प्रथम आवृत्ती जानेवारी 2016.
5. संपादक प्रा. सुरेश भालेराव,डॉ. प्रवीण लोणारकर, मानवी हक्क :सद्यस्थिती आणि आव्हाने, प्रशांत पब्लिकेशन जळगाव पुनर्मुद्रण मार्च 2020.

# महाराष्ट्रातील बंजारा समाजाचा सामाजिक आणि आर्थिक ऐतिहासिक अभ्यास

**वन्ने मोहन भुजंगा**
संशोधक विद्यार्थी

**प्रो. डॉ. अनिल जामकर**
इतिहास विभाग प्रमुख,
वसंतराव नाईक महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर.

भारतीय समाज व्यवस्था जातीवर आधारीत आहे. समाजावर जातीचा प्रभाव दिसून येते. मनु याने मनुस्मृती या ग्रंथामध्ये समाजावर जातीचा प्रभाव सांगितला आहे. समाजामध्ये वर्णव्यवस्था अस्तीत्वात आहे. या वर्णव्यवस्थेमध्ये ब्राह्मण, क्षेत्रीय, वैश्य, शुद्र असे गट केले आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी मनुस्मृती या ग्रंथावर जोरदार टिका केली आहे. बंजारा समाजाची वेगळी संस्कृती आहे. भाषा वेगळी आहे. बंजारा समाजातील वेशभूषा वेगळ्या प्रकारची आहे. समाजात बंजारा समाज वेगळे अस्तित्व निर्माण केले आहे. बंजारा समाजाची बोलीभाषा, वेशभुषा, राहणीमान वेगळ्या प्रकारची आहे. बंजारा समाज महाराष्ट्रामध्ये अनेक ठिकाणी राहतो.

बंजारा समाज हा तांड्या तांड्यानी वस्ती करुन गावापासून दूर दऱ्खोऱ्यात जेथे स्वच्छ हावा, मुबलक पाणी, जनावरांकरीता चारा असेल तेथे राहत असे आजही तीच परिस्थिती दिसून येते. बंजारा समाजात आजही पितृसत्ताक कुटूंब पद्धती अस्तित्वात आहे. प्राचीन काळापासून आज पर्यंत समाजात संयुक्त कुटूंब पद्धती चालत आलेली आहे. महाराष्ट्रातील सर्वच जिल्ह्यात ही पद्धत रूढ आहे. पण आज शिक्षणाच्या व नोकरीच्या निमित्ताने शहरात केलेल्या बंजारा मंडळीनी बंजारा कुटूंब संख्येत विभक्त कुटूंब पद्धतीची प्रथा मांडलेली आहे. तसेच बंजारा समाज तांडा हा बंजारा भाषीकांचा एक स्वतंत्र लोकसमुह राहतो येथे बंजारा समाजाचे लोक राहतात.त्याला 'तांडा' म्हणतात.

भारतातील सर्वात मोठी आदिवासी जमात असलेली बंजारा ही जमातही होती. ही जमात लंबाडी, सिंगाडी, बंजारी, धेडोरांबंजारी, लमाणी आदी नावानी ओळखली जात होती.त्या काळात भारतात शेकडो राजे राज्य करत होते आणि या सर्व राजांना खाण्यापिण्याच्या आणि कपडायालता संदर्भातल्या सर्व गोष्टी पुरवण्यांच काम या बंजारा समाजाकडे असे ही जमात भारतातल्या राजेरजवांड्यांना खारीक, खोबर, मीठ, धान्य पुरवी. हजारो बैलांच्या पाठीवर हे साहित्य लादून या जमातीची भटकंती सुरू असे त्या काळी दळणवळणासाठी आजच्या सारखे रस्ते नव्हते. जंगलातून, डोंगरांतून, नदी नाल्यातून शेकडो हजारो किलोमीटर प्रवास पायीच करावा लागे. बंजारा म्हणजे त्या काळाचे मोठे व्यापारीच होते.

**उद्दिष्ट्ये :**

1. महाराष्ट्रातील बंजारा समाजाच्या सामाजिक परिस्थीतीचा अभ्यास करणे
2. महाराष्ट्रातील बंजारा समाजाच्या आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करणे
3. बंजारा कुटूंबातील स्त्रियांचा दर्जा अभ्यासणे

**संशोधन पद्धती :**

या करिता सैध्दांतिक संशोधन कार्य पध्दतीचा संशोधनासाठी उपयोग करण्यात आला आहे. शोध निबंधासाठी दुय्यम स्त्रोतांचा उपयोग करण्यात आला असून त्यामध्ये पुस्तके, ग्रंथ, मासिके, इंटरनेट, वृत्तपत्र, लेख या सामग्रीचा उपयोग करण्यात आला आहे.

**बंजारा गोत्र आणि कुळ :**

गोर बंजारा समाजात राठोड, पवार, चव्हाण आणि जाधव हे प्रमुख कुळ मानले जातात. यांची वंशावळी व गोत्र राज्यस्थान मधील क्षत्रियाशी पुर्णत: मिळते जुळते आहे आजही त्यांच्या नावात अधिकतेने सिंह आणि सिंग अशे नावापुढे लावले जाते कुळा अनुसार प्रत्येकाची गोत्रे देखील आहेत. चव्हाण कुळाचे 06 गोत्र जसे की ऋतूची संख्या सहा असते पवार कुळाचे 12 गोत्र आहेत. जसे कि वर्षाचे बारा महिने असते. राठोड कुळाचे 27 गोत्र आहेत जसे. की वर्षाचे सत्तावीस नक्षत्र असते. जाधव कुळाचे 52 गोत्र आहेत. जसे कि वर्षाचे बावन्न आठवडे असते. यावरुन असा निष्कर्ष काढला जातो की निसर्गात : हा प्रकृतीपुजक निसर्गप्रेमी आहे.

**विवाहसंस्कार/ गौरसंस्कार :**

बंजारा गणामध्ये विवाहसंस्कार आणि जन्म संस्कार हा अत्यंत महत्वपूर्ण व उल्हासदायक मानला जातो. विवाह संस्कार हा आनंददायी मानला जातो. बंजारा गणामध्ये प्राचीन मध्ययुगीन काळामध्ये विवाहाची प्रक्रिया एक ते सहा महिने चालत असे. बंजारा समाजात विवाह संस्कारात गीत महत्वाचे असते. प्रत्येक संस्कार गीताशीवाय पूर्ण होवूच शकत नाही. पुर्वी तांडा पावसाळ्यात एकत्र जमला तर विवाह जुळले जात प्रत्येक वधु पिता आपल्या जावयाची निवड कणखर बघुनच करीत असे त्यांची परीक्ष घेण्याची पद्धत बंजारा समाजात रूढ होती.

विवाह संस्कारात तर स्त्रियाच्या तोंडातून अलिखित अगणित साहित्य बाहेर पडते. स्त्रिला हालगीच्या तालावर नाचताना मदमस्त होताना दिसतात. या संस्कारात खुप आनंद लुटतात. बंजारा समाजामध्ये प्रामुख्याने तीन संस्कार होतात. जन्म संस्कार, विवाह संस्कार आणि मृत्यूसंस्कार यातील दोन संस्कार आनंद देतात तर मृत्यू संस्कार अशुभ मानला जातो. माणूस जन्मल्या पासून ते मरेपर्यंत त्याच्यावर वेगवेगळे संस्कार केले जातात. माणूस जीवन जगताना रितिरिवाज परंपरा मध्ये कुठे ना कुठे तरी अडकलेला दिसून येतो. या सर्व प्रकारातून तो जीवन जगण्याचा प्रयत्न करीत असतो.

**बंजारा पारंपारिक कला :**

बंजारा समाज एक आदिम क्षत्रिय समाजगण असून त्यांच्या लोकसंस्कृती ही तितकीच पूरातन व लौकिक असल्याचे दिसते. बंजारा इतिहास हात त्याग, बलिदान शौर्य व पराक्रम यांनी समृद्ध आहे. पारंपारिक बंजारा कला अतिशय वैशिष्ट्यपूर्ण मानली जाते. कशिदाकाम, पोशाखशैली, वस्तुकला, गोरला, युद्धकला, व्यंजनशैली घेर घुमर नृत्य कला ही पारंपारिक कला कौशल्य बंजारा समाजाने आजही जपल्याचे दिसून येते. बंजारा समाजातील स्त्रियांच्या दागिण्यांला विशेष महत्व आहे. गोर बंजारा, बंजारा स्त्रियांच्या अंगावर कमीत कमी पाच सहा किलो वजनाचे नक्षीकाम केलेले दागिने असतात. बंजारा स्त्री साधा छीटाचा कपडा घेवुन साध्या सुईने विविध रंगाचा दोरा घेवुन टाके घालतात. त्यातून आकर्षक रंगी बेरंगी वस्त्रे, वस्तु किंवा कलाकृती तयार होतात.

**बंजारा समाज अर्थजीवन :**

बंजारा ही जमात इतर आदिवासी प्रमाणेच वन्य आहे. बंजाराचे अर्थाजन तर प्राचीन काळापासून जंगल डोंगराळ भाग आणि जेमतेम शेतीवर अवलंबून आहे. पुर्वी पासूनच मीठ, धनधान्य जड जवाहिर व अन्य वस्तुची आयात निर्यात व काही प्रमाणात व्यापार करणारा हा समाज ओळखला जातो. बंजारा समाज आजही पोटाची खळगी भरण्या करीता विविध राज्यात भटकत आहे. देशातील मोठ्या शहरामध्ये इमारतीची बांधकामे करण्या करीता मोठया प्रमाणात मजुरीचे काम या समाजातील स्त्री पुरूष करीत आहेत. काम संपले की तेथील मुक्कामही संपतो. पोटासाठी पुन्हा नव्या बांधकामाच्या शोधात ही मंडळी अनेक शहरामधून भटकत असतात.

भारतात इ.स.1396 ते 1408 या काळात दुष्काळ पडलेला होता. या काळात अन्न धान्याची टंचाई होती. तेंव्हा बंजारानी नेपाळ, चीन, तिबेट, ब्रम्हदेश, इराण, काबुल इ. धान्य आणुन देश वासियांची सेवा केली. या काळात लंदेणी करणाऱ्या तमाम बंजारांना बैलाप्रत घ्यावा लागणारा कर हा माफ होता.परदेशातून माल येण्याची सारी बंदरे कोकणात त्या बंदारातून मीठ साखर, कापड सुपारी, खोबरे खजूर इत्यादी हर जिन्नसी माल देशात याययाचा व देशातील धान्य, हळद, गुळ मिरची हे पदार्थ घाटाणी उतरावयाचे या मालाची ने आण करण्या करीता लमान लोक बैलावर लादलेल्या गोण्यातून करीत असत.

**बंजारा समाज स्त्रियांचा दर्जा :**

भारतीय समाजातील कुटूंब व्यवस्थेप्रमाणे बंजारा समाजात देखील पितृसत्ताक कुटूंबपद्धती अस्तित्वात आहे. बंजारा समाजातील वडिलोपार्जीत संपत्तीचा वारसादार मुलगा असतो. तसेच आर्थिक व्यवहार देखील बंजारा समाजातील पुरूषांच्या सहमतीने केले जातात. मुलामुलीच्या विवाहा संबंधीचे निर्णय घेण्यामध्ये सुद्धा स्त्रियांचा सहभाग नसतो. बंजारा समाजातील स्त्रिया या पहाटे तीनपासून रात्रीपर्यंत अखंडपणे घरचे कामकाज करत असतात एकंदरीत कामाची तुलना करतात. पुरूषापेक्षा स्त्रिया जास्त काम करतात परंतू पितृसत्ताक व्यवस्था असल्यामुळे स्त्रियांचे काम बंजारा समाजामध्ये काम समजले जात नाही. बंजारा समाजात आज देखील बहूपत्नीत्वाची प्रथा अस्तित्वात आहे. एकापेक्षा अनेक स्त्रियांशी विवाह करणे बंजारा समाजात शौर्याचे लक्षण मानले जाते. पहिल्या पत्नीपासून मुल होत नसेल तर बंजारे दुसरे लग्न करतात. तसेच पहिल्या पत्नीला मुलीच असतील तरीही बंजारे दुसऱ्या स्त्रीशी विवाह करतात. एकदंरीत बंजारा समाजात देखील

मुलगीला परक्याचे धन मानले जाते. सुधारलेल्या संस्कृतीच्या संपर्कामुळे व अरोग्य विषयक सुविधामुळे कुटूंब नियोजनाचे महत्व बंजारा समाजाला पटलेले आहे. परंतु कुटूंब नियोजन शस्त्रक्रिया ही स्त्रियांनीच केले पाहिजे. असा समज बंजारा समाजाचा आहे. पुरूष शस्त्रक्रियामुळे लैगिंकतेत बाधा निर्माण होईल असा समज पुरूषांमध्ये आहे. कोणत्याही प्रसंगाला आत्मविश्वासाने सामना करणे हे शिक्षणामुळे शक्य होते. परंतु स्त्रीला स्वातंत्र विश्वास दिल्यास समाजाचे संतुलन बिघडेल आणि तिच्यावर एक कलंक लागेल या भीतीने स्त्रियांना आज देखील चार भिंतीमध्ये ठेवले जाते. त्यामुळे आदिवासी, ग्रामीण दऱ्याखोऱ्यात राहणाऱ्या स्त्रियांचे जीवन अंधारातच आहे. एकंदरीत या सर्व एक उदाहरणावरून बंजारा समाजातील स्त्रियांचे स्थान दुय्यम असल्याचे सिद्ध होते.

**निष्कर्ष :**

1. बंजारा समाजाची संस्कृती अतिप्राचीन आहे.
2. बंजारा समाजातील लोक पारंपारिक कला करत असत
3. बंजारा समाजातील लोक व्यापारी आणि शेती आणि भारताच्या दक्षिण कडील भागात स्थलांतर झाले होते
4. बंजारा समाजात स्त्रियांना स्थान दुय्यम असल्याचे सिद्ध होते.

**सारांश :**

बंजारा समाज एक आदिम क्षेत्रिय समाजगण असून त्यांची लोकसंस्कृती, पारंपारिक कला ही तितकीच पुरातन व लौकिक असल्याचे दिसते. भारतीय विविधतेतील एक स्वातंत्र संस्कृती जोपासणारा समाज म्हणून बंजारा समाजाकडे बघितले जाते.

**संदर्भ सूची :**

1. डॉ. प्रमोद मनोहर पवार, बंजारा समाज राजकीय आणि सामाजिक सहभाग प्रकाशक युराज भटू माळी फेब्रुवारी 2015
2. डॉ. जाधव यशवंत, ‘बंजारा जाती समाज मराठी और संस्कृती, वाणी प्रकाशन,दिल्ली.
3. राठोड ग.ह, गोर बंजारा समाजाची ओळख, राजगुरू प्रकाशन, कचनेर औरंगाबाद 2008.
4. राठोड आत्माराम गोर, वाणी मासिक गोर वाट ऑफ सेट औरंगाबाद 2008
5. दिगंबर राठोड, बंजारा एकता मासिक 2001.

# हैदराबाद मुक्तीसंग्राम व शेतकऱ्यांचे प्रश्न

**डॉ. गणेश वाघ**
स्व. बाबुरावजी काळे महाविद्यालय, अजिंठा

**प्रस्तावना**

1724 मध्ये मुगल साम्राज्याच्या पतनानंतर स्थापन झालेले निजामाचे हैदराबाद राज्य आधुनिक काळातही सरंजामशाही स्वरूपाचे होते.[1] मोगल साम्राज्याच्या विघटनाच्या काळात जन्माला आलेले हैदराबादचे संस्थान भारताच्या मध्यभागी वसलेले होते. भारतातील मोठ्या संस्थानांपैकी हैदराबाद एक होते. हैदराबादच्या प्रजेपैकी सुमारे 85 टक्के लोक हिंदू व जेमतेम पंधरा टक्के मुसलमान असूनही शासक मुसलमान असल्यामुळे हिंदू प्रजेवर सतत अन्याय करीत असे. नागरिकांना मूलभूत अधिकार तर नव्हतेच पण त्याचबरोबर शासकीय सेवेत अतिशय पक्षपात होता. मुलकी शासनात सुमारे 75 टक्के तर लष्कर व पोलीस दलात 90टक्के भरती मुसलमानांची असे. बहुसंख्य प्रजा हिंदू असूनही उर्दू भाषा त्यांच्यावर लादली गेली होती. 1911 साली मीर उस्मान अली खान निजाम सत्तेवर आला. तरी हिंदु प्रजेवरील अत्याचारात खंड पडला नाही. हैदराबादमधील हिंदू प्रजा कानडी, तेलगू व मराठी अशा तीन गटात विभागलेली असल्यामुळे निजामाच्या शोषक व जुलमी शासनाला संघटितरीत्या विरोध करणे त्यांना शक्य होत नव्हते. निजामाचे रोजचे उत्पन्न चार लक्ष रुपये असूनही प्रजा कल्याणासाठी म्हणावा तसा तो उपयोग करत नसे.[2]

**संशोधनाची गृहतिके :** मराठवाडा मुक्तीसंग्रामामध्ये मराठवाड्यातील जनतेने आपल्या राजकीय स्वातंत्र्याबरोबरच शेतकरी प्रश्नांनाही वाचा फोडली.

**संशोधनाचे उद्देश** : मराठवाडा मुक्तीसंग्रामातील शेतकरी संघर्षावर प्रकाश टाकणे.

हैदराबाद संस्थानातील इतर राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक प्रश्नांप्रमाणेच शेतकऱ्यांची स्थितीही खूप बिकट होती. मराठवाड्यातील शेती व शेतकऱ्यांचा देशाच्या किंवा महाराष्ट्रातील इतर विभागाच्या तुलनेत विचार करता येथील शेती व शेतकरी निश्चितच मागास आहे. त्याला अनेक कारणे कारणीभूत आहेत पण त्यापैकी सगळयात महत्वाचे कारण मराठवाडा प्रदेश हा बरीच वर्ष निजामी राजवटीच्या (1724-1948) प्रभावाखाली पारतंत्र्यात गुलामगिरीचे जीवन जगत होता. त्यामुळे येथील शेतकरी अप्रगत व सर्व दृष्टिने मागास राहिला. त्यांना स्वतःची प्रगती करुन घेण्यासाठी शिक्षणाची व शेती विकासासाठी आवश्यक अशी जी यंत्रणा असावयास हवी होती, ती अजिबात उपलब्ध नव्हती.[3]

भारताच्या राष्ट्रीय चळवळी पासून प्रेरित होऊन हैदराबाद संस्थानातील जनतेनेही स्वातंत्र्यासाठी प्रयत्न सुरू केले. त्याचाच एक भाग म्हणून मराठवाड्यामध्ये 1936 साली महाराष्ट्र परिषदेची स्थापना झाली. या महाराष्ट्र परिषदेची जी अधिवेशने झाली या अधिवेशनाच्या ठरावांमध्ये राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक प्रश्नांबरोबरच शेतकऱ्यांच्या प्रश्नांवरही चर्चा झाल्याचे दिसून येते. म्हणजेच मराठवाडा मुक्तीसंग्राम आणि शेतकऱ्यांचे प्रश्न हे परस्पर संबंधित होते असे आपल्याला दिसून येते. जून 1936 मध्ये परतुर जिल्हा जालना येथे महाराष्ट्र परिषदेचे पहिले अधिवेशन झाले. महाराष्ट्र परिषदेच्या या परतूर अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष म्हणून केंदळीचे शेतकरी श्री गोविंदराव घारे यांची निवड करण्यात आली. परिषदेच्या अध्यक्षपदी परभणी येथे वकिली करणारे श्री गोविंदराव नानल यांची एकमताने निवड झाली. गोविंदराव नानल यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात ही परीषद संस्थानात राहणाऱ्या मराठी भाषिक लोकांसाठी आहे, असे सांगून मराठवाड्याचा इतिहास व प्राकृतिक संपदा याच्याबद्दल गौरद्गार काढले. पुढे त्यांनी आपल्या भाषणात मराठवाड्यातील शेती व शेती विकासाच्या उपाययोजना यावर प्रकाश टाकला.[4]

नानल यांच्या अध्यक्षीय भाषणाचा वृत्तांत 08 जून 1937 च्या निजाम विजय या साप्ताहिकात प्रसिद्ध झाला होता. या गोषवाऱ्यामध्ये ते म्हणतात की, “आमच्या प्रांतातील अर्थ उत्पादक धंद्यापैकी मुख्य धंदा शेती हा होय. ही दोन प्रकारची आहे. एक पावसाच्या पाण्यावर अवलंबून असणारी म्हणजे कोरडवाहू व दुसरी विहिरीच्या पाण्यावर अवलंबून असणारी म्हणजे बागायती. या प्रांतात जरी काही नद्या असल्या तरी तेलंगणा प्रमाणे तलाव वगैरे नसल्याने पाटबंधाऱ्याची म्हणजे कालवा पद्धतीची शेती इकडे मुळीच नाही. शेतकऱ्यांनी साक्षर होताच जमिनीचा दर्जा पाहून त्यातून योग्य पीके घेणे, जमीन

तयार करणे, खत उत्पन्न करणे, उत्तम बी निवडून तयार ठेवणे, बागायतीची माहिती असणे इत्यादी शिक्षण मिळेल अशी व्यवस्था झाल्यास तिचा फार उपयोग होईल. शेतकऱ्यांची आर्थिक अडचण दूर व्हावी म्हणून सरकारने सहकारी पतपेढ्यांचा कायदा काढून जागोजागी सहकारी पतपेढी, जिल्ह्यासारख्या मोठ्या गावी बँकाही कायम केल्या. आपल्या महाराष्ट्र भागात उस्मानाबाद, बीड, औरंगाबाद, मोमीनाबाद, उदगीर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड या ठिकाणी सेंट्रल बँक काढून त्यांच्या कार्यक्षेत्रात 671 पतपेढ्या काढल्या. त्याचा फायदा 11862 लोकांना मिळत आहे. गरीब शेतकऱ्यांना कमीत कमी रकमेचा विमा उतरता यावा या हेतूने एक विमा कंपनी संस्थानात नुकतीच काढण्यात आलेली आहे".[2] एकूणच गोविंदराव नानल यांच्या भाषणामधून तत्कालीन शेतीची परिस्थिती व शेतीमध्ये कोणत्या सुधारणास वाव आहे आणि निजाम सरकारच्या काळामध्ये झालेल्या शेती सुधारणांचा त्यांनी नेमकेपणाने आढावा यात घेतलेला दिसतो. म्हणजेच सद्यस्थितीतील शेतीमध्ये करावयाच्या सुधारणा त्यांनी त्या काळातच सुचविल्या होत्या.[5]

परतुर येथील महाराष्ट्र परिषदेच्या प्रसिद्धी पत्रकामध्ये शेतकी, सहकारी, औद्योगिक वगैरे खात्यातर्फे शेती विषयक प्रात्यक्षिके दाखवण्याची विनंती करण्यात आली होती व या खात्याकडून सहकार्य मिळेल अशी अपेक्षा त्यामधून दिसून येते. तसेच महाराष्ट्र परिषदेच्या परतुर अधिवेशनातील ठरावांमध्ये स्वतः अध्यक्षांनी असा ठराव मांडला की, खादी व ग्रामोद्योगाच्या इतर वस्तू वापरून प्रत्येकाने ग्रामोद्योगांना मदत करावी. विशेषतः खादी हा शेतकऱ्यांचा जोडधंदा असल्यामुळे प्रत्येकाने खादी वापरावी व इतरांनाही वापरण्यास सांगून शेती धंद्यास उत्तेजन द्यावे अशी या परिषदेची जनतेस आग्रहाची विनंती आहे. या ठरावास सर्वांनी एकमताने अनुमोदन दिले होते. याच अधिवेशनात शामराव पाटील यांचे संस्थानातील सर्वात मागासलेल्या जहागिरी व पायगा भागातील शेतकऱ्यांच्या हालअपेष्टा संबंधी अभ्यासपूर्ण भाषण झाले होते.[6] एकूणच महाराष्ट्र परिषदेच्या परतुर अधिवेशनामध्ये शेतकऱ्यांचा प्रश्न गांभीर्याने चर्चेला गेला असे दिसून येते.

उमरी जिल्हा नांदेड येथे 29 ते 31 मे 1941 रोजी महाराष्ट्र परिषदेचे तिसरे अधिवेशन संपन्न झाले. उमरी अधिवेशनात श्री काशिनाथराव वैद्य आणि आ. कृ. वाघमारे यांनी सावकारशाही व शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा यावर प्रखर टीका केली. तसेच निजाम सरकारने नेमलेल्या भरूचा कमिटीचा निर्देश करून रोहिले व अरब यांच्यातील जुलमी सावकारशाहीचा आवर्जून उल्लेख केला. श्री काशिनाथराव वैद्य यांच्यापासून पुढील अध्यक्षांनी शेतसारा कमी करण्याची मागणी उचलून धरली. शेतकऱ्यावर बोजा पडणार नाही या पद्धतीने शेतसारा आकारावा अशी श्री वैद्य यांनी मागणी केली. श्री वैद्य यांनी शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणाचे मोठे विदारक चित्र रेखाटले. जमीन तारण बँकेचा कायदा सुधारून अमलात आणावा, शेतकऱ्यांना पुरेसे भांडवल द्यावे, वाढीव तगाई द्यावी असे पर्याय सुचविले. तसेच श्री वैद्य यांनी कुळ कायद्याचा उल्लेख करून कुळाला संरक्षण देण्याचा मुद्दा उमरी अधिवेशनात लावून धरला. या अधिवेशनास प्रथमच शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती लाभली.[7]

1943 मध्ये झालेल्या औरंगाबाद येथील महाराष्ट्र परिषदेच्या चौथ्या अधिवेशनामध्ये आर्थिक, राजकीय, परिस्थिती संबंधी आणि सरकारी अन्यायाविरुद्ध ठराव पास झाले. या ठरावांमध्ये शेती संबंधित कृषी व वाणिज्य महाविद्यालय स्थापन करावीत अशी सूचना सरकारला करण्यात आली. त्याचप्रमाणे 1945 मध्ये सेलू जिल्हा परभणी येथे झालेल्या अधिवेशनामध्ये जहागिरीचा शेतसारा कमी करण्यात यावा, अन्नधान्याचे भाव शेतकऱ्यांना वाढवून द्यावेत, कुळांना संरक्षण द्यावे असे ठराव पास करण्यात आले. 80 टक्के बहुजन समाज रात्रंदिवस काबाड गोष्ट करतो. त्यांचे शोषण करणारी भांडवलदारी व्यवस्था देशात निर्माण झाली आहे. हैदराबादेत या भांडवलशाहीच्या जोडीला सरंजामदारी लाभली आहे. असा स्पष्ट उहापोह सेलू येथील अधिवेशनामध्ये करण्यात आला. तसेच महात्मा गांधीजींना अभिप्रेत असलेल्या शोषणारहित समाजाच्या स्थापनेचा स्पष्ट उल्लेख या अधिवेशनात करण्यात आला.[8]

1946 मध्ये महाराष्ट्र परिषदेचे साहवे अधिवेशन लातूर येथे झाले. या अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष म्हणून उस्मानाबादचे मोठे सावकार श्री फुलचंद गांधी यांची निवड करण्यात आली होती. फुलचंद गांधींची उस्मानाबाद कळम तुळजापूर या तालुक्यात मोठी सावकारी पसरलेली होती. त्यांच्या मनमानी व्याजदराने गोरगरीब कर्जदार गांजून गेलेले होते. ते स्वागताध्यक्ष झाल्याने लोक मनातून चिडलेले होते. भाई उद्धवराव पाटील, नरसिंहराव काटीकर या गोष्टीने संतापले. जो सावकार शेतकऱ्यांचा जमिनी गडप करतो, तो त्यांचे नेतृत्व कसे करणार ? म्हणून या दोघांनी अधिवेशनाला असहकार

करण्याचा निर्णय घेतला. फुलचंद गांधींच्या विरुद्ध त्यांनी 'भक्षक हा रक्षक होऊ शकत नाही' हे स्पोटक पत्रक काढले.[9] लोकांचा संताप बघून या अधिवेशनापासूनच फुलचंदजी गांधी यांनी सावकारी आणि वकिली सोडून देण्याची घोषणा केली. या अधिवेशनास मराठवाड्यातून मोठ्या प्रमाणात शेतकरी, कामगार, विद्यार्थी व कार्यकर्ते उपस्थित होते. अरब व रोहिले यांच्या जुलमी सावकारशाहीवर या अधिवेशनात कडक टीका करून अरब व रोहिले यांना प्रोत्साहन देत आहे असा स्पष्ट आरोप आ. कृ. वाघमारे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात केला. लातूर येथील महाराष्ट्र परिषदेच्या अधिवेशनात भाई उद्धवराव पाटील यांचा फार मोठा सहभाग होता. उद्धवराव पाटलांनी शेतकऱ्यांची संघटना बांधून शेतकऱ्यांच्या प्रश्नावर चांगलेच रान उठवलेले होते. या अधिवेशनात शोषणरहित आर्थिक व्यवस्था निर्माण व्हावी, लोकशाही समाजवादी समाजरचना प्रस्थापित व्हावी, किसान, मजूर, महिला, युवक आदी सर्व क्षेत्रात भरीव संघटनात्मक कार्य व्हावे, कुळांना पूर्ण संरक्षण मिळावे व त्यांना संरक्षण देणारे कायदे निर्माण करण्यात यावे, हैदराबाद हे सरंजामशाहीचे केंद्र आहे जमीनदारी व जहागीरदारी येथे केंद्रित झाली आहे म्हणून येथील लढ्याचे स्वरूप संयुक्त असून ज्यांचे हितसंबंध जमीनदारी व सरंजामदारीच्या विरोधी आहेत त्या सर्वांनी एका आघाडीत राहून प्रभावी लढा देणे आवश्यक आहे. असे ठराव लातूर येथील महाराष्ट्र परिषदेत पारित करण्यात आले. लातूरच्या अधिवेशनात प्रथमच मुख्य अधिवेशनाला जोडून विद्यार्थी व किसान मेळावे झाले. श्री आ. कृ. वाघमारे या किसान मेळाव्यात म्हणाले की, "उद्या तुमच्यातूनच सातारच्या नाना पाटलासारखी माणसे जन्माला यावीत, तुमच्या मनगटात ताकत असेल व तुमच्या बंदुका ठासून भरलेल्या असतील तर तुम्हाला कोणाची भीती बाळगण्याचे कारण नाही".[10]

**सारांश आणि निष्कर्ष**

महाराष्ट्र परिषदेच्या अधिवेशनातील अध्यक्षीय भाषणातून आणि पारित केलेल्या ठरावांमधून भारतीय राष्ट्रीय चळवळीतील तात्विक मूल्यांची, समतावादी समाजाची व शोषणरहित व्यवस्था निर्माण व्हावी यासाठी प्रयत्न झाल्याचे दिसून येते. मराठवाड्यातील भाई उद्धवराव पाटील, नरसिंहराव काटीकर आदी बहुजन पुढाऱ्यांनी तत्कालीन निजामाच्या सराजामशाही आणि त्याला साथ देणाऱ्या धनादांडग्यांविरुद्ध संघर्ष उभा केला आणि शेतकऱ्यांची शोषणातून मुक्तता करण्याचे प्रयत्न केले. भाई उद्धवराव पाटील यांच्यासारख्या पुढाऱ्यांनी पुढे चालून शेतकरी कामगार पक्षाची धुरा यशस्वीपणे सांभाळली आणि शेतकरी संघर्षाची श्रृंखला स्वातंत्र्यानंतरही अखंडपणे सुरू ठेवली. एकूणच मराठवाड्यातील जनतेने आपल्या राजकीय स्वातंत्र्याबरोबरच शेतकऱ्यांच्या हितासाठी कार्य केल्याचे दिसून येते.

**संदर्भसूची :**

1 सतीश चंद्र, मध्ययुगीन भारत, खंड दुसरा, के सागर पब्लिकेशन, पुणे, 2019, पृ. 333.
2 चंद्र बिपिन, भारत का स्वतंत्रता संघर्ष, हिंदी माध्यम कार्यान्वय निदेशालय, दिल्ली विश्वविद्यालय, दिल्ली, 2006, पृ. 291.
3 करपे राजाभाऊ, मराठवाड्यातील शेतकरी चळवळ, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, 2012, पृ. 48.
4 रोडे सोमनाथ, मराठवाड्याचा इतिहास, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, 2013, पृ.125.
5 उपरोक्त, पृ.129.
6 उपरोक्त, पृ.131.
7 कठारे अनिल, महाराष्ट्राचा इतिहास, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, 2013, पृ.543.
8 रोडे सोमनाथ, पूर्वोक्त, पृ.143.
9 करपे राजाभाऊ, पूर्वोक्त, पृ.160.
10 रोडे सोमनाथ, पूर्वोक्त, पृ.145.

# बुलडाणा जिल्ह्यातील पारडा दराडे येथील मलिकार्जुन मंदिर

**डॉ. सी. पी. व्यास**
के. के. एम. महाविद्यालय, मानवत

भारतीय परंपरेत ईश्वराची उपासना प्रारंभीच्या काळात निर्गुण स्वरूपात होत राहिली. निर्गुण- निराकाराकडून सगुण-साकाराकडे ही कल्पना लोकप्रिय झाल्यावर व भक्तीची जोड लाभल्यावर धर्मसंस्था वेगळ्या संदर्भात प्रभावी बनली. नव्या पूजा पद्धतीचा अविष्कार झाला. 4500 वर्षापूर्वीचे प्रागैतिहासिक कालीन प्रतिमा पूजनाचे पुरावे मिळतात.[1]

महाराष्ट्रातील उस्मानाबाद जिल्ह्यातील तेर हे प्राचीन तगरनामक सातवाहन काळातील प्रमुख शहर होय. सातवाहन, वाकाटक, चालुक्य कल्याणीची चालुक्य, कलचुरी कदंब, शिलाहार, यादवेत्तर कालखंडात महाराष्ट्रात अनेक मंदिरे बांधली गेली. सन 1873 ला मेजर गिलने एशियाटिक सोसायटी ऑफ बंगालच्या इतिहासात विदर्भाच्या बुलढाणा जिल्ह्यातील मंदिरांवर एक टिपून प्रसिद्ध केले होते. त्यानंतर जेम्स बर्जेसने बिदर व औरंगाबाद जिल्ह्याच्या मंदिरांवर लिहिले तर 1875 ला पुरातत्त्व सर्वेक्षणाच्या वार्षिक अहवालात अनेक जिल्ह्यांचा मंदिरांवर प्रकाश टाकला गेला. या कामे खूप महत्त्वाचे योगदान 1897 ला हिंदींसने व 1948 ला टीव्ही नाईक यांनी दिले. [2]

महाराष्ट्राच्या बुलडाणा जिल्ह्यातील लोणार तालुक्यातील पारडा दराडे हे गाव. हे गाव तालुक्याच्या ठिकाणापासून साधारणता दहा कि.मी. अंतरावर वसलेले आहे. या गावांमध्ये एक जुने प्रसिद्ध शिवमंदिर आहे. या मंदिराला मल्लिकार्जुन मंदिर म्हणून ओळखले जाते.

पारडा दराडे येथील मल्लिकार्जुन मंदिर साधारणतः तीन एकर परिसरामध्ये वसलेले आहे. यामध्ये मंदिर व बारव उपलब्ध आहेत. या मंदिराचा जिर्णोद्धार राजा कृष्णदेव व महादेव या यादव नरेशांनी केल्याचे म्हटले जाते व या मंदिराला तीन सुवर्णद्वार निर्मिल्याचे हि सांगितले जाते. मात्र येथील शिलालेखात त्याचा पुरावा मिळत नाही. येथे विजय स्तंभा जवळ (कीर्तीस्तंभ) व बारा ज्योतिर्लिंगे आहेत. अर्थात बारा ज्योतिर्लिंगांचे फळ येथील दर्शनाने प्राप्त होते अशी येथील लोकांची आस्था आहे. मंदिरासमोर बाहेर सर्व वाहून गेलेल्या पाण्यासाठी मोठीबारव, परिसरात डावीकडे व उजवीकडे दोन बारवा व गर्भगृहाच्या दक्षिणेकडील भिंतीवरील बारव लक्षात घेता, या जमिनीत भरपूर पाण्याचा साठा असल्याचे कळते. पाणी गोड व पाणी खारे हि आहे.

अहिल्याबाई होळकरांनी या मंदिराच्या जीर्णोद्धार केल्याचे सांगितले जाते. पुन्हा पडझड झाल्यामुळे गावकऱ्यांनी जीर्णोद्धार केला. हे काम 1944 ते 48 च्या दरम्यान झाले. मुलता दगडी मंदिराचे हे बांधकाम 14 व्या शतकातील असावे असे मानले जाते. या मंदिराचे मुख्य प्रवेशद्वार पूर्वभिमुख व उत्तर आणि दक्षिणेस दोन प्रवेशद्वार आहेत. या मंदिरात अर्ध मंडप व गर्भगृह आहे. पारडा दराडे येथील मलिकार्जुन मंदिरात पूर्व उत्तर व दक्षिण दिशांना तीन प्रवेशद्वारे आहेत. तिन्ही समोर अर्धमंडपाचे अस्तित्व स्पष्ट जाणवते. पूर्वेकडील अर्धमंडपाचा भाग बऱ्याच अंशी चांगल्या स्थितीत आहे. त्यावरून इतर दोन अर्ध मंडपांची कल्पना करता येते.जेथे फक्त स्तंभाच्या तळातील चोकोनी दगड आहेत. मुख्य प्रवेशद्वाराच्या अर्ध मंडपावर (छतावर) कळसासारखे बांधकाम वर गेलेले आहे. प्रवेशद्वारावरील कलाकृती अर्धवट दिसते. स्तंभ चौकोनी असून वरचा भाग वर्तुळात घेतलेला असून, त्यावर पुन्हा चौकोन वर्तुळ आहेत. या अर्धमंडपात मधोमध दगडी नंदी ठेवलेला आहे.

या प्राचीन मंदिराला पाहिल्यानंतर आजवर या मंदिराची दोन ते तीन वेळा दुरुस्ती झाली असावी असे लक्षात येते. मात्र सभागृहाचा मूळ भाग जशास तसा आहे. सभागृह पूर्व-पश्चिम 15 फूट X 6 फूट एवढ्या आकाराचे आहे. मधली रंग शिळा (प्लेट फॉर्म) थोडा उंच असून 9 X 9 फूट तिन्ही प्रवेशद्वारे सभागृहात झुलतात. त्यांची खोली चार फुटाची आहे. पूर्व प्रवेशद्वाराच्या उंबरठ्यावर एक शिलालेख आहे. थोडेसे लिखाण प्रवेशद्वाराच्या आतल्या बाजूसही आहे. दक्षिण प्रवेशद्वाराच्या उंबरठ्यावर 1944-48 संपूर्ण हा आकडा आहे. मंडपाच्या मधल्या भागात स्तंभ आहे. येथे एकूण स्तंभांची संख्या 10 दहा आहे. तळ खड्यावर त्रिकोणी निशाणा आहे. चार कोपऱ्यात अर्धस्तंभ असून स्तंभ शीर्षावर दगडी चिरे ठेवून छत गेलेला आहे. मधला छताचा भाग आतून अष्टकोनी व त्यावर वर्तुळाकृती होऊन सभागृहाच्या वरील शिखराकडे

निमुळता होत गेलेला आहे. मधल्या छताचा भाग आतून अष्टकोनी व त्यावर वर्तुळाकृती होऊन सभागृहाच्या वरील शिखराकडे निमुळता होत गेलेला आहे. येथे नऊ वर्तुळे आहेत व मध्यभागी कमळ आहेत. सभागृहाची आतील उंची पंधरा ते सव्वा पंधरा फूट आहे. ही वर्तुळे. दगडाची आहेत. अष्टकोन तयार केलेल्या चार आडव्या दगडांच्या मधोमध वर्तुळे आहेत. तीन स्पष्ट दिसतात. तर एक घासलेले आहे. सभागृहाच्या भिंतीत आतल्या बाजूस देवकुष्ट नाहीत. या मंदिराच्या छतावर उल्लेखल्याप्रमाणे मंडपाचा छत आतून वर्तुळाकृती व निमुळता असून दगडांनीच निर्मित केलेला आहे. गर्भ गृहावरील छत स्वतंत्र आहे. ज्यावर उंच कळस बांधलेला आहे. या मंदिराच्या अंतराळाचा विचार केल्यास सभागृहातून गर्भ गृहाकडे जाताना मध्येच अंतराळ आहे. त्याची छतापर्यंत उंची 12 फूट असून लांबी 6 फूट (पूर्व-पश्चिम) व रुंदी 7 फुट 3 इंच (दक्षिण-उत्तर) अशी आहे. यात उत्तर व दक्षिण भिंतीत दोन वेगळ्या आहेत त्यांचा आकार 2.6 X 3 फूट एवढा आहे.

या ठिकाणच्या प्रवेशद्वाराची खोली 4 फूट असून अंतराळा कडून उंबरठ्यावर उंचीपासून तर गर्भगृहात 6 फूट आहे. गर्भगृहाचा आकार 7 फूट 6 इंच X 7 फूट 6 इंच एवढा आहे. मधोमध मल्लिकार्जुन हे शिवलिंग 4 फुट X 2.6 फुट आहे. येथील पश्चिमेकडील व उत्तरेकडील भिंतीत 6.3 फूट व 3.6 फुट रुंदीच्या व खोलगट देव कष्टाने आकार आहेत. पश्चिमेकडील भिंतीत (गाभाऱ्यात) एक पुरुष, स्त्री व बालकाची प्रतिमा आहे. त्याचा संबंध चिलिया बाळाच्या कथेशी लोक सांगतात. गर्भगृहाच्या भागातच नाग पूजेची लाकडी पाटी आहे. गर्भगृहाच्या दक्षिणेकडील भिंतीत देवकोष्टा ऐवजी अंगणाच्या आतल्या बाजूस 1.8 फूट लांब व रुंद व 18 फूट खोल अशी बारव आहे. त्यात कायम पाणी असते या पाण्यानेच भगवान शिवाचा अभिषेक केला जातो. या भिंतीत या वारवाची निर्मिती व या मंदिराची वैशिष्ट्य म्हणावे लागेल. पिंडीवरील अभिषेकाची पाने बाहेर जाण्यासाठी मार्ग असून ते गोमुखातून बाहेरील हौदात उत्तरेकडील बाजूस जाते. पश्चिमेकडील देवळीत अर्धा भाग सोडल्यावर मधोमध दगडी पट्टी आहे. गर्भगृहात 4, 6 व 8 इंच असे तीन लहान नंदी आहेत. गर्भगृहाच्या द्वारशाखेची रुंदी 5.6 फुट व उंची 7 फूट अशी आहे तिच्या गणेशपट्टी केवळ मधोमध वर्तुळ आहे येथील स्तंभ आहे. या मंदिराचे प्रांगण पूर्व पश्चिम 131 फूट व उत्तर दक्षिण 115 फूट एवढे असून त्यात दगडी फरशी अंतरलेली आहे. या मंदिराला पूर्वी बांधलेले आवार होते. त्याच्या पायाची उंची रुंदी 4 चार फूट असून त्यावर दगडी बांधकाम होते. पूर्वेकडील भिंत सोडता दक्षिण पश्चिम उत्तर दिशेच्या आवाराच्या भिंतीला लागून बांधका आहे. जे धर्मशाळा व अन्नछत्रासाठी वापरले गेले. सध्या दक्षिणेकडील भिंती लगत त्याचे अवशेष दिसतात. तेथे एक खोली व विटांचे थोडे बांधकाम अलीकडेच केलेले आहे. मंदिराच्या आवाराचे प्रवेशद्वार पूर्वेकडे आहे. मंदिराच्या आवारात मुख्य प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूस दोन बारवा आहेत. त्यांचे दगडी बांधकाम आहे. त्यापैकी दक्षिणेस बारवेस खारे पाणी होते ती बाराव सध्या बंद केली गेली आहे. मात्र तिचा आकार दिसतो. तर त्या समोरील दुसऱ्या बाजूला उत्तरेस असलेली बारव गोड पाण्याची आहे. तिचे बांधकाम स्पष्ट दिसते. तिचा आकार तिचा 15 X 15 फुट एवढा आहे. पावसाळ्यात या जमिनीत भरपूर पाणी राहते. दगडी फरशी वरही पाणी असते. बारव भरल्यानंतर जास्तीचे पाणी वाहून जाण्यासाठी दगडी पन्हाळ्या केलेल्या आहेत. येथील सर्व पाणी मंदिराच्या आवारात समोरील मोठ्या बारवेत जाते. जगतीच्या पूर्वेकडील असलेल्या प्रवेशद्वाराच्या द्वार शालावर वादक, नर्तक, सिंहवयाल, पुरुष व्याल, फुले व शंकरपाळे आणि स्त्री प्रतिमा दिसतात. येथे वरच्या बाजूस कीर्ती मुख आहेत. मंदिराच्या प्रवेशाच्या द्वाराखाली थोड्याफार फरकाने अशाच आहेत.[3]

या मंदिराचे मुख्य बांधकाम पूर्व पश्चिम 56 फूट उत्तर दक्षिण 31 फुट एवढ्या भूमीवर आहे. एकूण तीन प्रवेश द्वार आहेत. अंगणाच्या फरशी पेक्षा प्रवेशद्वार व अर्धमंडपाची फरशी 3 इंच उंच आहे. त्याची लांबी पूर्व पश्चिम 10 फुट व रुंदी उत्तर 13 फूट अशी आहे. या मंदिराच्या गर्भगृहाच्या व सभा मंडपाच्या बाहेरील भिंतीची उंची 14 फूट असून त्यावर सभागृहाच्या भागावर छत आहे. छतावरील पाणी खाली येण्यासाठी 6 दगडी पन्हाळे देण्यात आलेले आहेत. गर्भगृहावरील कळसाचा भाग थोडासा डागडुजी केलेला आहे व शिखर भाग जुना नाही. तर कळसाची उंची 31 फुट ते 33 फुट असावी. गर्भगृहाच्या बाह्य भिंतीवर 10 ते 12 फुटाच्या उंचीपासून डिझाइन्स व फुल व आकार थेट कळसापर्यंत गेले आहेत. त्या बाह्य भिंतीवरून एकूण पाच देवकुष्ट आहेत. दक्षिणेकडील एका देवकोष्टात फुटलेली नृसिह, तर तीन देव रिक्त असून शेवटच्या देवकुष्टात वराह प्रतिमा आहे. कळसाचा आकार निमुळता (नागरपद्धतीचा) आहे. गर्भगृहाच्या छतावर गेल्यास तेथे पूर्वभिमुख वर्तुळ डिझाईन दाखविली आहे. मुलत: तेथे तशा डिझाईनचा आकार असावा. तेथे एक दगडी चौथरा आहे.

त्यात लहानसा खोली वजा भाग आहे. मंदिराच्या गर्भगृहातील बारावेचे पाणी वर घेण्यासाठी त्यातून चौकोनी जागा सोडलेली आहे.

या मंदिराच्या परिसरातच विजयस्तंभ (कीर्ती स्तंभ)आहे. या मंदिराच्या आवारात आग्नेय दिशेस एक दगडी स्तंभ आहे. त्यास विजयस्तंभ किंवा कीर्तीस्तंभ म्हणून ओळखले जाते. तेथे एक चौथरा पण आहे. त्यावर 12 शिवलिंगे ठेवलेली आहेत. ती विविध आकाराची आहेत. त्यापैकी एक चौकोनी, दोन चौकोनी पण तिन्ही बाजूने अंतर वर्तुळ केलेल्या, दोन्ही चौकोनी वजा व एक तीन बाजूने वर्तुळ, तर पाणी जाणाऱ्या दिशेकडे सरळ करून लांबट केलेली इतर सर्व सामान्य शिवलिंगांप्रमाणे आहेत. या आवारात चौफेर भागात मोठी अर्धवट फुटलेली शिवलिंग दिसतात. म्हणजे मोठी बारा शिवलिंगे होती. या लोकांच्या म्हणण्यास पुष्टी मिळते. शिवलिंगाचे काही भाग शेजारच्या शेतातही मिळतात. या मंदिराच्या शेजारच्या शेतात सापडलेली शेषशाही विष्णूची प्रतिमा सहा फूट लांब व एक फूट नऊ इंच प्रतिमा येथील मंदिरात आहे. मंदिराबाहेर पंचफणा नाग, मातृका पट, भद्रकाली देवीच्या दोन अर्ध प्रतिमा व शिवलिंगे आहेत.

या व अश्या विविध प्राचीन मंदिरांचा अभ्यास होणे गरजे आहे. ज्यातून दुर्लक्षित ऐतिहासिक ठेवा आपल्या सर्वांसमोर येण्यास मदत होईल.

**संदर्भ-**


1. मुरलीधर सु.अं.- 1982, तेर: एक सांकृतिक अभ्यास, एम.फील.प्रबंध, मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, पृ.77
2. मोरवंचीकर रा.श्री.- दक्षिणकाशी पैठण, 1987
3. लांबा पी.एस.- 1975, सम आस्पेक्ट्स ऑन जैन कॉट्रीक्यूशन, कॉट्रीक्यूशन ऑफ जे. टू इंडियन कल्चर, पृ. 03
4. प्रत्यक्ष स्थळ भेट

# मराठी भाषेच्या संपर्कामुळे तमिळ भाषेचा झालेला विकास : एक ऐतिहासिक अध्ययन

**अमितकुमार गणेश शिंगणे**
संशोधक विद्यार्थी
एम.इ.एस. कॉलेज मेहकर, जि. बुलढाणा

**प्रस्तावना**

भारत हा विविध भाषा-संस्कृतींनी नटलेला देश आहे. भारतातील प्रमुख द्राविड़ भाषांपैकी तमिळ ही एक प्राचीन व समृद्ध भाषा आहे. भारतातील भाषा-संस्कृतींच्या परस्पर संपर्कामुळे वेगवेगळ्या भाषांच्या विकासावर एकमेकांचा प्रभाव पडलेला आहे. दक्षिण भारतातील तमिळ भाषा ही भारतातील सर्वात प्राचीन आणि समृद्ध भाषांपैकी एक आहे. मराठी आणि तमिळ या दोन्ही भाषा भारतीय उपखंडातील प्राचीन आणि समृद्ध भाषा आहेत. दोन्ही भाषांचा विकास स्वतंत्रपणे झाला असला तरी, ऐतिहासिक घडामोडींमुळे या दोन भाषांमध्ये परस्पर संवाद झाला. विशेषतः मराठा साम्राज्याच्या दक्षिण भारतातील विस्तारानंतर तंजावर आणि आसपासच्या भागांमध्ये मराठी आणि तमिळ यांचा संस्कृती, साहित्य आणि भाषाशास्त्रीय दृष्टिकोनातून मोठा संगम झाला.

उत्तर भारतातून संस्कृत, प्राकृत आणि अपभ्रंश भाषांचा तमिळवर प्रभाव पडल्याचे अनेक पुरावे उपलब्ध आहेत. त्याचप्रमाणे मराठी भाषेच्या संपर्कामुळे ही तमिळ भाषेच्या विविध घटकांवर परिणाम झाल्याचे आढळून येते. विशेषतः तंजावरच्या मराठा राजवटीच्या 17व्या आणि 18व्या शतकात दोन्ही भाषांमध्ये परस्पर देवाणघेवाण झाली. उत्तर भारतातील संस्कृत व प्राकृत भाषांच्या प्रभावाबरोबरच, दक्षिण भारतातील मराठी भाषेच्या संपर्कामुळे तमिळ भाषेच्या विकासावर महत्त्वपूर्ण प्रभाव पडला. ऐतिहासिक दृष्टीकोनातून पाहता, छत्रपती शिवाजी महाराज, मराठा सरदार तसेच तंजावरच्या मराठा राजघराण्याच्या काळात मराठी व तमिळ भाषेतील देवाणघेवाण वाढली. प्रस्तुत शोधनिबंधात मराठीच्या संपर्कामुळे तमिळ भाषेच्या विकासावर झालेल्या प्रभावाचा ऐतिहासिक व भाषाशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास केला आहे.

**सूचक शब्द -**
मराठी भाषा, तमिळ भाषा, भाषिक देवाणघेवाण, तंजावरचे मराठे, ऐतिहासिक प्रभाव, भाषाशास्त्र, व्याकरण, साहित्य, शब्दसंपत्ती, सांस्कृतिक संबंध, द्राविड़ भाषा, व्याकरण.

**उद्दिष्टे -**

1. मराठी आणि तमिळ भाषेच्या ऐतिहासिक संबंधांचा अभ्यास करणे.
2. तंजावरच्या मराठा साम्राज्याच्या काळातील भाषिक देवाणघेवाणीचे स्वरूप शोधणे.
3. तमिळ भाषेवर मराठीच्या शब्दसंपत्ती, व्याकरण आणि साहित्यिक प्रभावाचा अभ्यास करणे.
4. तमिळ आणि मराठी भाषिक देवाणघेवाणीमुळे निर्माण झालेल्या सांस्कृतिक बदलांचा मागोवा घेणे.
5. मराठी आणि तमिळ भाषांच्या परस्पर प्रभावांचा तुलनात्मक अभ्यास करणे.
6. मराठी-तमिळ भाषिक संबंधांचे ऐतिहासिक संदर्भ शोधून काढणे.

**गृहितके -**

1. तंजावरच्या मराठा राजवटीमुळे मराठी आणि तमिळ भाषेच्या परस्परसंबंधांना चालना मिळाली.
2. मराठीमधील काही प्रशासकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक संज्ञा तमिळ भाषेत समाविष्ट झाल्या.
3. तमिळ भाषेच्या व्याकरण आणि शैलीवर मराठीच्या संपर्कामुळे काही प्रमाणात बदल झाले.
4. तंजावरच्या मराठा राजांनी तमिळ साहित्याला प्रेरणा दिली, त्यामुळे तमिळ साहित्याच्या विषयांमध्ये आणि शैलीत बदल दिसून येतात.
5. तंजावरच्या मराठा राजवटीच्या काळात तमिळ साहित्यामध्ये मराठीचा प्रभाव वाढला.
6. दक्षिण भारतात मराठी-तमिळ भाषिक देवाणघेवाणेमुळे दोन्ही भाषांच्या सांस्कृतिक संबंधांना बळकटी मिळाली.

**विषयाचे महत्त्व :**

भारताच्या भाषिक आणि सांस्कृतिक इतिहासात वेगवेगळ्या भाषा परस्परांशी संपर्क साधत राहिल्या आहेत. तंजावरच्या मराठा राजवटीच्या काळात मराठी आणि तमिळ भाषेच्या परस्परसंवादाने अनेक नवीन शब्द, साहित्यिक रूपे आणि प्रशासकीय शैली विकसित झाल्या. या परस्पर प्रभावाचा अभ्यास केल्यास भारताच्या भाषिक आणि सांस्कृतिक इतिहासाचे विस्तृत चित्र स्पष्ट होऊन मराठी आणि तमिळ भाषिक समाजांमधील ऐतिहासिक संबंध अधिक स्पष्ट होऊ शकतात. मराठी आणि तमिळ या दोन भाषांचा इतिहास वेगळा असला तरी त्यांच्या परस्पर संपर्काचा मोठा प्रभाव भाषेच्या विकासावर पडलेला आहे. विशेषतः 17व्या व 18व्या शतकात तंजावरच्या मराठा राजवटीच्या काळात दोन्ही भाषांमध्ये मोठ्या प्रमाणात देवाणघेवाण झाली. या प्रभावाचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे, कारण यामुळे भारतातील भाषिक-सांस्कृतिक संबंधांचे विस्तृत चित्र समजू शकते.

**विषय विवेचन -**

सन 1675 मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे सावत्र भाऊ व्यंकोजी राजे (शाहूजी भोसले) यांनी तंजावरचा ताबा घेतला आणि तेथे मराठा राज्य स्थापन केले. पुढे सरफोजी राजे (इ.स. 1798-1832) यांनी तमिळ संस्कृती आणि भाषेच्या संवर्धनात महत्त्वाची भूमिका बजावली. मराठा राजवटीत तंजावर हे दक्षिण भारतातील एक प्रमुख सांस्कृतिक आणि प्रशासकीय केंद्र बनले. या काळात तंजावरमध्ये मराठी आणि तमिळ भाषेचा संपर्क वाढला.

**1. ऐतिहासिक पार्श्वभूमी -**

तमिळ ही भारतातील सर्वांत प्राचीन भाषांपैकी एक असून ती मुख्यतः तमिळनाडूत बोलली जाते. तमिळ ही द्राविड़ भाषा परिवारातील प्रमुख भाषा असून तिचा इतिहास 2000 वर्षांहून अधिक आहे. मराठी भाषा मध्य भारतात विकसित झालेली असून इंडो-आर्यन भाषा परिवारातील संस्कृत, प्राकृत आणि अपभ्रंश भाषांपासून झाला आहे. 17 व्या शतकात मराठा साम्राज्य विस्तारले असताना अनेक मराठा सेनानी दक्षिण भारतात गेले. दक्षिण भारतात मराठी भाषिक लोकांची वसाहत झाली आणि तंजावरमध्ये मराठा राजांची सत्ता स्थापन झाली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या दक्षिण मोहिमांमुळे आणि पुढे तंजावरच्या मराठा राजघराण्यामुळे मराठीचा प्रभाव दक्षिण भारतात वाढला. याच काळात मराठी आणि तमिळ भाषांमध्ये परस्पर देवाणघेवाण झाली.[1]

**2. तंजावर मराठा साम्राज्य आणि भाषिक देवाणघेवाण -**

सन 1677 मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी दक्षिण भारतातील मोहिमेदरम्यान तंजावरवर आक्रमण केले, त्यानंतर 17व्या शतकाच्या अखेरीस तंजावरच्या सिंहासनावर मराठा राजवंश स्थिरावला. एकूण 173 वर्षे मराठ्यांनी तंजावरवर राज्य केले. या काळात मराठी आणि तमिळ भाषांमध्ये अनेक स्तरांवर देवाणघेवाण झाली. तंजावरच्या मराठा राजांनी तमिळ साहित्याला पाठिंबा दिला, तसेच स्वतःच्या दरबारात द्विभाषिक परंपरा निर्माण केली. मराठ्यांच्या दरबारातील काही प्रशासकीय संज्ञा व शब्द तमिळ भाषेत स्थिरावले.

**3. तमिळ भाषेवर मराठीचा प्रभाव :**

मराठी भाषेचा तमिळवर झालेला प्रभाव प्रामुख्याने प्रशासन, संगीत, साहित्य आणि दैनंदिन जीवनातील शब्दसंपत्तीवर पाहायला मिळतो. मराठा शासनकाळात तमिळ भाषेत काही मराठी शब्द शिरले. मराठा दरबारातील प्रशासकीय दस्तऐवज आणि राजकीय सल्लामसलती दरम्यान, तमिळ भाषेच्या व्याकरणात मराठीसारखी संयुक्त क्रियापदे आणि वाक्यरचना विकसित झाली. तमिळमध्ये काही नवीन संकल्पना आणि शब्दरचना निर्माण झाली ज्या मराठीतून प्रेरित होत्या.

1. **शब्दसंपत्ती** – मराठी प्रशासन आणि समाजातील काही शब्द तमिळमध्ये समाविष्ट झाले. उदा. सरकार, दरबार, शेतकरी, फडणवीस, प्रशासन, युद्धनीती, सामाजिक व्यवस्था यासारखे शब्द तमिळ प्रशासनात वापरले जाऊ लागले.[2]
2. **लेखन आणि लिपी -** तंजावर येथील सरस्वती महल ग्रंथालयात मराठीतून अनुवादित ग्रंथ संग्रहीत आहेत, ज्यामुळे तमिळ साहित्य समृद्धीला चालना मिळाली. मराठीतील विद्वान आणि पंडितांनी तमिळ ग्रंथांचे भाषांतर मराठीत केले, तसेच तमिळ साहित्यावरही त्यांचा प्रभाव पडला.

3. **व्याकरण आणि शैली** – काही मराठी व्याकरण रचनांचा प्रभाव तमिळ भाषेच्या संकल्पनांवर पडला. उदा. काही नवीन व्याकरणिक प्रयोग आणि वाक्प्रचार तमिळमध्ये दिसून येतात.
4. **साहित्य आणि नाट्य परंपरा** – तंजावरच्या मराठा राजांनी तमिळ साहित्याला प्रेरित केले. तमिळ संगीत नाटकांवर मराठी काव्यशैलीचा प्रभाव दिसतो.
5. **तमिळ संगीत आणि मराठी भक्ति संस्कृती -** तमिळ कर्नाटकी संगीतावर मराठी भजन आणि अभंग यांचा प्रभाव पडला. मराठा राजदरबारी अनेक तमिळ संगीतकार होते, ज्यांनी मराठीतून अभंग आणि कीर्तन प्रकार आत्मसात केला.[3]

**4. तमिळ-मराठी सांस्कृतिक संबंध :**

तंजावरच्या मराठा राजांनी तमिळ सांस्कृतिक परंपरांना प्रोत्साहन दिले. मराठा प्रशासकांनी स्थानिक तमिळ लोकांशी संवाद साधण्यासाठी दोन्ही भाषांचा वापर केला. धार्मिक ग्रंथ, प्रशासनातील कागदपत्रे आणि दरबारातील लेखन कार्यामध्ये मराठी-तमिळ भाषांचा प्रभाव जाणवू लागला. मराठी राजांनी तमिळ भाषिक भागात आपले प्रशासन चालवताना स्थानिक भाषेचा स्वीकार केला, तसेच मराठीतून ही अनेक संकल्पना तमिळ लोकांनी घेतल्या. मराठी व तमिळ कवी, लेखक आणि कलाकार यांचा एकमेकांशी संपर्क होता.[4] तमिळ साहित्यामध्ये मराठा इतिहास, परंपरा आणि जीवनशैली यांचा प्रभाव दिसतो. यामुळे दोन्ही भाषांमधील सांस्कृतिक आणि साहित्यिक संबंध दृढ झाले.

**5. सरस्वती महल लायब्ररी (ग्रंथालय) :**

**सरस्वती महल ग्रंथालय** हे भारतातील सर्वात प्राचीन आणि समृद्ध ग्रंथालयांपैकी एक आहे. हे **तामिळनाडूच्या तंजावर** येथे स्थित आहे, आणि याला **तंजावर सरस्वती महल ग्रंथालय** असेही म्हणतात. या ग्रंथालयाची स्थापना 16व्या शतकात **नायक राजवंशाने** केली. पुढे **मराठा राजे सरफोजी दुसरे** (इ.स. 1798-1832) यांनी या ग्रंथालयाचा मोठा विस्तार केला आणि त्यात दुर्मीळ ग्रंथ संग्रहित आहे. मराठा राजवटीत स्थापन झालेल्या या ग्रंथालयात मराठी, तमिळ आणि संस्कृत भाषांतील ग्रंथ मोठ्या प्रमाणावर संग्रहित केले गेले. या ग्रंथालयाचे मुख्य वैशिष्ट्ये म्हणजे येथे दुर्मीळ ग्रंथ आणि हस्तलिखिते उपलब्ध आहेत. सोबतच संस्कृत, मराठी, तमिळ, तेलगू आणि इतर भाषांतील ग्रंथ येथे उपलब्ध आहेत. ताडपत्रांवर आणि हस्तलिखित स्वरूपात अनेक प्राचीन ग्रंथ येथे संग्रहीत आहेत. या संग्रहालयात वेद, पुराणे, ज्योतिष, धर्मशास्त्र, संगीत, नाट्य, आयुर्वेद, राज्यशास्त्र आणि इतर अनेक विषयांवरील ग्रंथ येथे सापडतात. सोबतच येथे मराठा राजांनी **तमिळ संत तिरुवल्लुवर** यांच्या **'तिरुक्कुरल'** या ग्रंथाचा अभ्यास केला.[5] आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने येथे असलेल्या काही पांडुलिपी डिजिटल स्वरूपात उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. हे ग्रंथालय तंजावर राजवाड्यात असून संशोधक, विद्यार्थी आणि पर्यटकांसाठी एक ऐतिहासिक ठेवा आहे. थोडक्यात, सरस्वती महल ग्रंथालय हे भारताच्या सांस्कृतिक आणि बौद्धिक वारशाचे अनमोल रत्न आहे. इतिहास आणि ग्रंथप्रेमींसाठी हे एक अविस्मरणीय ठिकाण आहे.

**6. मराठा राजांचे तमिळमधील योगदान :**

तंजावरच्या मराठा राजांनी तमिळ काव्य आणि भक्तिसाहित्याला प्रोत्साहन दिले. तमिळ संत तिरुवल्लुवर, अप्पार आणि सुंदरर यांच्या साहित्याचा मराठीतून अनुवाद झाला. तमिळ साहित्यिक कल्की कृष्णमूर्ती यांच्या "Ponniyin Selvan" (1950) या कादंबरीत मराठ्यांचा उल्लेख येतो. तसंच, आधुनिक तमिळ इतिहासलेखनात मराठ्यांच्या योगदानावर संशोधन होत आहे.[6] तंजावरच्या मंदिर व्यवस्थापनात मराठा अधिकारी मोठ्या प्रमाणावर होते, ज्यामुळे तमिळ आणि मराठी यांचा एकमेकांवर प्रभाव पडला. मंदिर, देवळांमध्ये होणाऱ्या पूजा विधी आणि भजनांमध्ये मराठी आणि तमिळ स्तोत्रांचा संगम दिसून येतो. तमिळ नायनमार संत आणि मराठी वारकरी संप्रदाय यांच्यातील तत्वज्ञानाचा प्रभाव एकमेकांवर पडला.[7] संत नामदेव आणि संत तुकाराम यांच्या अभंगांचा तमिळमध्ये अनुवाद करण्यात आला.

**7. आधुनिक काळातील प्रभाव :**

आजही तंजावर, मदुराई आणि चेन्नईमध्ये मराठी आणि तमिळ भाषांचे मिश्रण पाहायला मिळते. अनेक तामिळ लोक मराठी भाषेतील शब्द आणि वाक्यरचना सहजपणे समजतात. त्यामुळे शिक्षण आणि भाषाशास्त्रातील मराठी आणि तमिळचा संगम पाहता येते. तमिळ भरतनाट्यम नृत्यशैलीत तंजावरच्या मराठा राजांनी मोठे योगदान दिले. आजही तंजावर

शैलीतील भरतनाट्यममध्ये काही मराठी शब्द आणि अभंग वापरले जातात. त्यामुळे संगीत आणि नृत्यशैलीतील मराठ्यांचा प्रभाव स्पष्ट होतो.

आधुनिक तमिळ भाषेत अजूनही मराठीतून आलेले शब्द आणि संकल्पना अस्तित्वात आहेत. तंजावर आणि महाराष्ट्र यांच्यातील सांस्कृतिक देवाणघेवाण आजही चालू आहे. तमिळ आणि मराठी भाषेच्या तुलनात्मक अभ्यासावर संशोधन होत आहे. डिजिटायझेशन प्रकल्पांमुळे तंजावरच्या ग्रंथालयातील मराठी-तमिळ ग्रंथ जागतिक संशोधकांसाठी उपलब्ध होत आहे. तंजावरमध्ये मराठा राजवटीशी संबंधित पर्यटन स्थळे (तंजावर किल्ला, सरस्वती महल ग्रंथालय) संपूर्ण भारतातील लोकांना आकर्षित करतात. तमिळनाडूमधील अनेक नाटकांमध्ये आणि चित्रपटांमध्ये मराठी संस्कृतीचे संदर्भ दिसतात. मराठी आणि तमिळ भाषेतील संपर्कामुळे दोन्ही भाषांचे आणि संस्कृतींचे परस्पर समृद्धीकरण झाले. तमिळ भाषेच्या साहित्य, प्रशासन, संगीत आणि कला क्षेत्रांवर मराठा प्रभाव स्पष्ट दिसून येतो आणि हा प्रभाव आधुनिक काळातही कायम आहे.

**निष्कर्ष :**

मराठी आणि तमिळ भाषेच्या ऐतिहासिक संबंधांचा अभ्यास करताना असे आढळून येते की, मराठा साम्राज्याच्या विस्तारामुळे तमिळ भाषेच्या विविध अंगांवर मराठी भाषेचा प्रभाव पडला. तंजावरच्या मराठा राजवटीमुळे प्रशासकीय, सामाजिक आणि साहित्यिक क्षेत्रात परस्पर देवाणघेवाण झाली. मराठी आणि तमिळ भाषिक संबंधांचा अभ्यास भारतीय भाषा संग्रहणाच्या इतिहासाच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचा आहे. या द्विभाषिक संबंधांमुळे भारताच्या सांस्कृतिक विविधतेची अधिक चांगली समज मिळते. मराठी भाषेतील अनेक शब्द तमिळमध्ये आले, तसेच तमिळ व्याकरण आणि साहित्यिक शैलीवर ही मराठ्यांचा प्रभाव दिसून येतो.

मराठी आणि तमिळ भाषांचा परस्पर संपर्क मुख्यतः तंजावरच्या मराठा राजवटीत वाढला. प्रशासकीय, धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक जीवनात या दोन भाषांनी एकमेकांवर प्रभाव टाकला. मराठा राजांनी तमिळ भाषेच्या साहित्य, संगीत आणि स्थापत्य शैलीत योगदान दिले, तर तमिळ भाषेतील अनेक संकल्पना मराठीत रुजल्या. आजही तंजावर आणि दक्षिण भारतातील काही भागांमध्ये मराठीचा प्रभाव दिसून येतो. या दोन्ही भाषांचा संबंध केवळ इतिहासापुरता मर्यादित नसून, तो आजच्या सांस्कृतिक आणि भाषिक परिवर्तनातही महत्त्वाचा आहे.

**संदर्भ :**


1. Sethurman R., The Maratha Rule in Tamil Nadu. Oxford University Press. Delhi, 1982, p. 46.
2. Subramanyam S., Military and Linguistic Exchange in Tamil Nadu, Oxford University Press. Delhi, 2010, p. 23-25.
3. भालेराव जी., मराठीचा दक्षिणेतील प्रभाव, डेक्कन कॉलेज, पुणे, 1995, पृ. 87-88.
4. Ramachandran, K., Influence of Marathas on Tamil Literature, Tamil University Publication, Chennai, 2005, p. 93.
5. राणे पी., भारतीय भाषांचा परस्पर संबंध, साहित्य अकादमी. मुंबई, 2007, पृ. 109.
6. कृष्णमूर्ती कल्की., Ponniyin Selvan, वाणी पब्लिकेशन्स. चेन्नई, 1951, पृ. 78.
7. देशमुख पी. बी., द्राविड़ भाषा आणि संस्कृती, लोकवाङ्मय गृह, मुंबई. 2001. पृ. 68-70.

# महात्मा ज्योतिराव फुले यांची शेतकऱ्यांविषयी भूमिका

**प्रो. डॉ. कृष्णा मालकर**
विभाग प्रमुख, इतिहास विभाग
श्री आसारामजी भांडवलदार महाविद्यालय देवगाव (रं)

**सुशिल सुधाकर शिरसाठ**
संशोधक विद्यार्थी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

**प्रस्तावना:**

आपल्या देशातील सत्तर टक्के लोकांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. हा शेतकरी आपल्याला जगवतो, पण या देशातील संख्येने अधिक असलेल्या शेतकऱ्यांची उपेक्षा मात्र पराकोटीला पोहोचलेली आहे.

महात्मा ज्योतिराव फुले यांनी समाज प्रबोधन, शिक्षण जातीभेद अंधश्रद्धा निर्मूलनअशा अनेक पैलूंवर आपले विचार मांडले, त्यांनी सर्वाधिक लक्ष वेधले ते या शेतकरीवर्गाकडे. त्यांच्या काळात जशी शेतकरी वर्गाची अवस्था होती. त्या कमी अधिक प्रमाणात आजही आपल्या देशातील शेतकऱ्यांची अवस्था आहे. जर शेतीकडे आपण दुर्लक्ष केले तर आपण ज्यावर जगतो त्या अन्नधान्याच्या तीव्र टंचाईला आपल्याला तोंड द्यावे लागेल. यासाठीच महात्मा फुले यांनी दीडशे वर्षांपूर्वी शेतकरी वर्गाच्या कल्याणाचा, त्यांच्या भल्याचा विचार मांडला. त्या विचाराची आजही आपणास गरज आहे. [1]

म. ज्योतिराव फुले यांच्या मते शेतकऱ्यांच्या भयानक दारिद्र्याची अनेक कारणे होती. ब्रिटिश राज्य येण्यापूर्वी राजे लोकांनी व संस्थानिकांनी पदरी मोठी सैन्य ठेवली होती. त्यात मोठ्या संख्येने लोक नोकरी करीत. त्यामुळे शेत जमिनीवर मोठा भार पडत नसे. राज्यलयास गेल्यावर मराठ्यांच्या सैन्यातील लोक घरी बसले. ब्रिटिशांचे राज्य आल्याने देशात शांतता प्रस्थापित झाली. त्यामुळे बेकारी प्रचंड प्रमाणात वाढली. सैन्यातील लोक घरी आल्यामुळे शेत जमिनीवर त्यांचा भार पडला. शांततेच्या काळी लोकसंख्याही वाढली. कुटुंबातील वाटपामुळे शेतजमिनीचे लहान लहान तुकडे पडले. त्यांची गती थांबेना तुकडे झालेल्या शेतजमिनीच्या उत्पन्नावर आपल्या कुटुंबाची आणि गुराढोराची गुजारणा करताना शेतकऱ्याच्या नाकी नऊ येऊ लागले. जंगल खात्याने ग्रामीण भागातील कुरणे घशात घातली. त्यामुळे शेळ्या मेंढ्यांना चरावयास जागा राहिली नाही. शेतकऱ्याच्या आधारासाठी पडीक जमीन उरली नाही. जमीन धुपून गेली त्यामुळे तिचा सुपीकपणा कमी झाला. शेत जमिनीचे जे तुकडे पडले ते ज्या मोठ्या शेतकऱ्यां जवळ नांगर आणि बैल होते. त्यांना कसावयास वा विकत देण्यात आले आणि भूमिहीन झालेले शेतकरी कोष्ट्याकडे, सुताराकडे लोहाराकडे उदरनिर्वाहासाठी काम मिळावे म्हणून फिरू लागले.[2] परंतु लहान लहान धंदे करणारे कोष्टी, सुतार आणि लोहार यांच्याकडे पूर्वीसारखे काम चालेना, कारण ब्रिटनमधून भारतात येणाऱ्या मालाशी ते स्पर्धा करू शकत नव्हते. चाकू, कात्र्या, सुऱ्या, शिवणकामाची यंत्रे दोरा, कुलुपे, चाव्या लोखंडी पत्रे डांबर भाते निरनिराळया तऱ्हेच्या गाड्या व कपडा ही ब्रिटनमधून जकाती शिवाय हिंदुस्थानात आयात होत. त्याचा परिणाम असा झाला की, एतद्देशीय व्यापाऱ्यांचा धंदा अतिशय खालावला काष्टी, लोहार, सुतार यांना विपन्नावस्था प्राप्त झाली. आपल्या जवळील कच्चामाल ते सावकारांना विकू लागले व वाट फुटेल तिथे जाऊ लागले. ते लपून छापून दिवस काढू लागले. हिंदी शेतकरी मात्र दारिद्र्यात पिचत विव्हाळत पडलेला असे.[3]

औरंगाबाद जिल्ह्यातील गंगापूर तालुक्यातील नेऊरगावचे ज्ञानगिरीबुवा हे म. फुले यांचे सहकारी होते. ते दर आठवड्याला पुणे येथे जात असत व आजचे पुणे येथील शिवाजीनगर या नगरात कबीर पंथाच्या मठात महात्मा फुले यांच्याबरोबर चर्चा करत असत. त्याचवेळी त्यांनी आपल्या परिसरातील निजामी राजवटीमध्ये शेतकऱ्याच्या सर्व जमिनी सावकाराकडे गहाण पडल्या होत्या. गंगथडी च्या सुपीक जमिनी सावकारांनी बळकावल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष धुमसत होता. या सर्व शेतकऱ्यांना संघटित केले. ते दुसऱ्याचे अक्षर व सही करण्यात पटाईत होते. त्यांनी सावकाराच्या हुबेहूब सह्या करून शेतकऱ्यांचे संपूर्ण रक्कम दिल्याच्या पावत्या तयार करून दिल्या. शेतकऱ्यांना आपापल्या जमिनी ताब्यात घेण्याचे आव्हान केले. असंख्य शेतकरी आपापल्या जमिनीवर बैल, आऊट फाटे घेऊन गेले. सावकारांना हे कळताच त्यांनी शेतकऱ्यांच्या अंगावर घोडेस्वार घातले. त्यात शेतकऱ्यांचे फार हाल झाले. पण त्यांनी जमिनीवरील ताबा सोडला नाही. सत्यशोधक समाजानिष्ठाचा जोर वाढला. ज्योतिरावांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले हिम्मत दिली. सावकारांना शेतकऱ्यांचे हे बंड मोडून काढणे कठीण झाले. त्यांनी पोलिसांना बोलाविले. पोलिसांनी पोच पावत्या पाहिल्या

पण काहीच करू शकले नाही. सावकरांनी शेतकऱ्यांना कोर्टात खेचले खटले चालले. सावकार हरले शेतकरी जिंकले. महाराष्ट्रातील कर्जमुक्तीचा हा पहिला प्रयत्न ज्ञानगिरीच्या नेतृत्वाखाली यशस्वी झाला.[4] हेच बंडा गोदावरीच्या दक्षिण तीराकडे पसरले. ज्ञानगिरींनी नेवासे तालुक्यातील शेतकऱ्यांना एकत्रित केले. नेतृत्व केले. सत्यशोधकांनी सक्रिय सहकार्य केले. बंड यशस्वी केले. शेतकऱ्यांचे हे बंड संपुर्ण महाराष्ट्रात पसरले.[5] शेतकरी आणि शेतमजूर या वर्गाला कुणबी असे म्हटले जात असे बारा बलुतेदार आणि अठरा आलूतेदार हा शेती जीवनाशी संबंधित असलेला समाज समूह म्हणजे कुणबी. जोशी कुलकर्णी आदी शेती जीवनाशी निगडित होते. परंतु त्यांचा संबंध शेतसारा गोळा करण्यापुरता असे. पौरोहित्य करणारा ब्राम्हण कुणब्यांचे विधी, व्रतवैकल्ये आदींच्या संबंधाने शोषण करीत असे. अठरापगड जातीचा वर्ग, जो शेतीवरच आपला उदरनिर्वाह करीत असे आशा वर्गाला कुणबी म्हणण्याचा प्रघात होता. या संपूर्ण समाजाला महात्मा फुले शूद्र म्हणून संबोधतात या कुणबी क्षुद्रांची सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक स्थिती अत्यंत हालाखीची आणि क्लेशकारक होती.[6] पेशव्यांची तिजोरी त्यांच्या ऐषआरामामुळे खाली झाली की, या कुणब्यांवर जुलूम जबरदस्तीने सारा लादला जाई आणि तो अमानवीय पद्धतीने वसूल केला जाई. जे शेतकरी दुष्काळामध्ये अधिकाऱ्याने मागितल्याप्रमाणे सारा किंवा कर देऊ शकत नाहीत. त्यांच्या मुलांच्या अंगावर कढईतील उकळते तेल टाकले जाई. त्यांचे कपडे काढून उभे करून चाबकाचे फटके मारीत. वाकून धुरावर डोके धरण्यास सांगत आणि त्यांच्या कानात बंदुकीची दारू उडवीत. अशा हाल अपेष्टांचे जिने पेशवाई काळातील शेतकरी जगत होता. पेशवा जेव्हा मौज करू इच्छित असे आणि तिजोरीत पूर्णतः खडखडाट असे तेव्हा तेव्हा त्याचा सर्वाधिक जाच शेतकऱ्यांना होई. सक्तीची कर वसुली किंवा शेत सारा जुलून जबरदस्तीने गोळा केला जाई. म. फुले काळातील शेतकऱ्यांची दैन्यावस्था आणि पेशवाईतील शेतकऱ्यांची दैन्यावस्था यात फारसे अंतर नाही. किंबहुना पेशवाई शेतकऱ्यांना गुलामासारखे वागवीत होती.[7]

पेशवाईतील शेतकऱ्यांच्या दैन्यावस्तेला तीन घटकांचा सतत सामना करावा लागत असे.

१) अवर्षणग्रस्तता : ही नैसर्गिक आपत्तीच होती. सिंचनाची व्यवस्था नसल्यामुळे साहजिकच त्यांना दुष्काळाशी सामना करावा लागे.

2) पेशवाई प्रशासन.

3) पौरोहित्य करणारा ब्राम्हण.

आशा तीन घटकांच्या मार्फत पेशवाईतल्या शेतकऱ्यांचे शोषण केले जात असे

"म. फुले यांच्या काळातील शेतकऱ्यांची स्थिती आणि पेशवाईतील शेतकऱ्यांची स्थिती फारशी भिन्न नव्हती. तरी पेशवाईतला शेतकरी मात्र धर्म जात यामुळे अधिक पिळला जात होता."[8]

महात्मा फुले यांच्या काळात शेती विषयी निर्माण झालेले प्रश्न आज जास्तच तीव्र स्वरूपात उभे आहेत. न्याय आणि समताधिष्ठित समाज रचना स्थापन करण्याचा, जाती निर्मूलनाचा, श्रम करणाऱ्या शेतकऱ्यास त्याच्या श्रमांचा मोबदला देण्याचा आणि धर्म आणि संस्कृती यांच्यामुळे निर्माण झालेली लोकांची गुलामगिरी नष्ट करण्याचा प्रयत्न आजही तितकाच महत्त्वाचा आहे. हे प्रश्न कायम असल्यामुळे व जिकिरीचे बनत असल्यामुळे आपणास पुन्हा पुन्हा म. ज्योतीराव फुले यांनी मांडलेल्या कृषी विषयक विचारांकडे जावे लागते शेतकरी सरंजामशाही, सावकरशाही आणि साम्राज्यशाही यांनी नडलेल्या होता. इंग्रज साम्राज्यवाद्यांनी शेतकऱ्यांची पूर्ण नागवणूक केली होती. शेतकऱ्यांच्या स्थितीचे अत्यंत बोलके वर्णन म. फुल्यानी आपल्या खालील गद्यातून अतिशय समर्पक रीतीने केले आहे. [9]

कायापूर्ती लंगोट ! फिरते नांगराचे पाठी!!
एक घोंगड्यावाचूनी ! स्त्रिया तसे दूजे शयनी!!
ढोरा मागे सर्वकाळ ! पोरे फिरती रानोमाळ!!
तक कण्या पोट भारी ! धन्य म्हणे संसारी!!
सरकारी पट्टे नेट ! पडे तीन शेंड्या गाठ!!
कर्जरोखी लिहिले अट ! निर्दय मारवाडी काट!!
अज्ञानाला समजत नाही ! कुलकर्ण्याने लिहिले काही!!
पाप पुण्या जिथे नाही ! पैसे पुरते दादाभाई!!

म. जोतिरावांच्या पुढे शेतकऱ्यांच्या संदर्भात मुख्य प्रश्न असा पडला होता की, दिवसभर उन्हातान्हात घाम गाळणारा जगाचा पोशिंदा शेतकरी दुखी व नोकरी करणारा समाजातील वर्ग अत्यंत सुखी. दोघांनाही सारखेच अवयव असताना ही उच्च-नीच्छतेचा भेद का? यासाठी त्यांनी आपल्या लेखणी द्वारे प्रयत्न चालविले. शेतकरी हा केवळ अशा एकाच प्रश्नामुळे नागावला नव्हता तर त्याचे सर्व अंगांनी शोषण होत होते. धर्माच्या नावाने, जातीच्या नावाने, संस्कृतीच्या नावाने त्याचे शोषण चालले होते. त्याला विद्येचा स्पर्श न झाल्यामुळे या सर्व बाबी त्याच्या शोषणास कारणीभूत होत्या.[10] या साऱ्या गुलामगिरीच्या बंधनातून त्याची जरमुक्तता करायची असेल तर, प्रथम त्याला शिक्षित केले पाहिजे, हा विचार म. फुले यांच्यासमोर निर्माण झाला सर्वप्रथम त्यांनी शेतकऱ्यांना शिक्षण द्या, त्यांच्या मुला मुलींच्या शिक्षणाची सोय करा, अशी आग्रही मागणी त्यांनी त्या काळच्या इंग्रज सरकारकडे लावून धरी फुलांच्या काळात सावकार शाही व नोकरशाही शेतकऱ्यांचे शोषण करण्यात पुढे होती. ही सावकार शाही आपल्या पाठीशी राजसत्ता, न्यायालये असल्यामुळे निडरपणे शेतकऱ्याकडून कर्जावर भरमसाठ व्याज वसूल करायची. शेतकरी वर्गाने निर्माण केलेल्या धनधान्याच्या विक्रीसाठी दलाल अर्धा पैसा गडप करायचे म्हणजे सावकार, दलाल, कमिशन एजंट हे शेतकरीवर्गाच्या अज्ञानाचा फायदा घेऊन त्याला पूर्णतः नागवे करायचे.[11]

**शेतकऱ्यांसाठी संदेश:**

म. फुलांनी प्रथम शेतकऱ्यांच्या प्रश्नांचा विचार केला. त्यांनी शेतकऱ्यांसाठी सुचविलेल्या उपायोजना शेतकऱ्यांच्या सर्वांगीण मुक्तीसाठी आहेत. शेतकऱ्यांची पिळवणूक ही धार्मिक, सांस्कृतिक व राजकीय या तिन्ही अंगांनी आहे. त्या पिळवणुकीवरील मुख्य उपाय म्हणजे त्या शेतकऱ्यांची मानसिक गुलामगिरी नष्ट करणे हा आहे. शेतकऱ्यांनी पारंपारिक पद्धतीने शेती न करता आधुनिक पद्धतीने शेती करावी असा म. फुलांचा आग्रह होता. शेती सुधारण्यासाठी त्यांनी काही उपाय सुचविले.[12]

1) शेतीचे योग्य प्रकारे मशागत करता यावी म्हणून चांगल्या जातीच्या गाई बैलाची पैदास करण्यात यावी. त्यासाठी परदेशातून चांगल्या गाईचे बेणे आणावेत.

2) डोंगर टेकड्यावरील गवत, पालापाचोळा पानाफुलांचे कुजलेले खत पावसाच्या पाण्याबरोबर वाहून जाऊ नये म्हणून जागोजागी छोटे छोटे बंधारे बांधावे.

3) हे काम लष्करातील काळया-गोऱ्या शिपयांकडून करून घ्यावे.

4) शेती धुपून त्यात खोंगळया पडू नये म्हणून शेतकऱ्यांनी पाणलोटाच्या बाजूने शेतांच्या बांधाने वरचेवर ताली दुरुस्त कराव्यात.

5) एकंदरीत सर्व नदी नाले व तलावातील साचलेला गाळ पूर्वीप्रमाणे शेतकऱ्यास फुकट नेऊन द्यावा.

6) शेतकी शाळा स्थापन कराव्यात.

वरील सुधारणांची अंमलबजावणी केल्याशिवाय शेतकऱ्यांची प्रगती नाही त्यांचे एकच ध्येय होते, की शेतकऱ्यांचे मूलगामी स्वरूपाचे परिवर्तन व्हावे या देशात बळीराजाचे राज्य यावे

**निष्कर्ष:**

1) महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना आपल्या हक्काची जाणीव झाली पाहिजे.

2) महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना शिक्षणात आपले हित आहे हे कळले पाहिजे.

3) धार्मिक बंधनातून गुलामगिरी रूढी परंपरातून मुक्त झाले पाहिजे.

4) शेतकऱ्यांच्या समस्या व त्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी त्यांनी गुलामगिरी, ब्राम्हणांचे कसब, शेतकऱ्यांचा आसूड या ग्रंथाची निर्मिती केली. याशिवाय पोवाडे, रचून शेतकरी वर्गाच्या प्रश्नांना वाचा फोडली.

5) म. फुले यांनी समकालीन शेतकऱ्यांच्या हाल अपेष्टा लक्षात घेऊन ती यथार्थपणे मांडली.

**संदर्भ :**

1) नरके हरी, य. दी. फडके म. फुले गौरव ग्रंथ खंड पहिला पृ. 526

2) मुंडे जाधवर, म. फुले यांचे शुद्रातीशूद्राविषयी विचार, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद पृ. 25

3) कित्ता पृ 26

4) चौसाळकर अशोक, शेतकरी चळवळ, प्रकाशक लोक वाङ्मयबृह मुंबई पृ.34
5) कित्ता पृ 40
6) जोगदंड बबन कृषी संवादक म. फुले महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती
मंडळ, मुंबई पृ.39
7) कित्ता पृ. 50
8) साळुंके श्रीकांत शेतकरी चळवळ, बी रघुनाथ प्रकाशन, नागपूर परभणी पृ. 10
9) ढाकूळकर नाना, महात्म्यांचा महात्मा विजय प्रकाश, नागपूर पृ. 64
10) कित्ता पृ. 66
11) जोगदंड बबन कृषी संवादक म. फुले महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई पृ. 57
12) कित्ता पृ. 72.

# वारकरी संप्रदायाचे समाजातील योगदान

**परसराम एकनाथ शेळके**
संशोधक विद्यार्थी

**डॉ. अमोल नानासाहेब म्हसके,**
**डॉ. सुवर्णा भाऊसाहेब पाटील**
संशोधक मार्गदर्शक

**गोषवारा:-**

मानवी जीवनात धर्माला महत्वपूर्ण स्थान आहे. इतिहासात विविध पंथ व संप्रदाय निर्माण होऊन त्यांनी भक्तीबरोबरच सामाजिक प्रबोधन करण्याचे कार्य अव्याहतपणे चालू ठेवले आहे. मध्ययुगीन काळात अशा अनेक पंथ च संप्रदायांनी जनजागृतीचे कार्य केले. मानवतावादी दृष्टिकोणातून त्यासाठी प्रयत्न केलेले आहेत. या विविध संप्रदायांनी व त्या संप्रदायांतील विविध भागांतील संतांनी समाजपरिवर्तनाचा पायाच घातला. या परिवर्तनासाठी संतांनी आपल्या ओजस्वी वाणी व साहित्याच्या माध्यमातून एकप्रकारे विद्रोहच केला. त्या अनुषंगाने इतिहास म्हणजे "माणसाच्या मनातील सत्प्रवृत्तींच्या विकासाला चालना देणा-या संत-महंतांच्या प्रयत्नांची कहाणी होय. डॉ. निर्मलकुमार फडकुले यांची व्याख्या एकांगी वाटत असली तरी त्यातून संतांच्या कार्याचे खरे मोल कळते". "1"

**संशोधनाची उदिष्टें:-**

1 वारकरी संप्रदायाचा अर्थ समजून घेणे.
2 संत ज्ञानेश्वर महाराजांचा समाजावर पडलेला प्रभाव अभ्यासणे.
3 वारकरी संप्रदायाच्या सामाजिक व धार्मिक कार्याचा आढावा घेणे.

**संशोधनाची गृहीतके:-**

1 वारकरी संप्रदाय 9 व्या-10 व्या शतकापासून अस्तित्वात आहे.
2 वारकरी संप्रदायाचा समाजावर चहू बाजूने प्रभाव आहे.
3 वारकरी संप्रदायाचे सामाजिक व धार्मिक कार्य महत्वपूर्ण आहे.

**मुक्तिमार्गाचा उदय:-**

समग्र भारतीय साहित्याच्या इतिहासात संत-साहित्याचं एक खास महत्त्व आहे. हे जवळजवळ प्रत्येक भाषेतील साहित्यामध्ये दिसून येतं आणि तेही समान संवेदनासह जिथे व्यक्ती आणि समाजाबद्दलची गहिरी चिंता आहे, जिथे कबीरसारखे संत कवी आजही समाजाला प्रकाश दाखवण्याचं काम करतात. मराठी साहित्यात संत ज्ञानेश्वराचं स्थानही काही वेगळं नाही. 'संत' हा शब्द गहन आणि व्यापक अर्थाचा द्योतक आहे. संत शब्दाची ध्वनि ऐकली की साधू-संतांचे वास्तव रूप हमारे मनासमोर उभं राहातं. वामन शिवराम आप्टे यांच्या मते, संत शब्दाची व्युत्पत्ती 'संत' किंवा 'सद्' शब्दापासून मानली पाहिजे. संत हा शब्द वास्तविक, चांगला, गुणसंपन्न, धर्मात्मा, योग्य, सर्वोत्तम, श्रेष्ठ, माननीय, आदरणीय, बुद्धिमान, गुणी व्यक्ती अशा अनेक अर्थांत वापरला जातो. संत शब्दामधून आपल्याला सच्चरित्र, धर्मात्मा आणि पवित्र हृदय असलेल्या व्यक्तीची कल्पना येते. संत शब्दाचे जितके अर्थ काढले जातील, तिन्हीं कमी असतील. गीतेमध्येही तपामध्ये लीन असलेल्या व दानधर्म करणाऱ्यांना संत म्हटले आहे. पंजाबी मध्ये महात्मा, मराठी मध्ये ईश्वरभक्त, गुजराती मध्ये संत किंवा साधू पुरुष, इंग्रजी मध्ये सेंट या शब्दांचा वापर आहे. संत कोणत्याही भाषेचा असो, 'सादा जीवन उच्च विचार' ह्या उक्तीवर ह्या सर्वांवर लागू होते. कारण ते सर्व उच्च गुणांनी युक्त असून साधे आणि सरळ जीवन जगतात. वारकरी संप्रदाय आणि उत्तर भारतीय संत परंपरेतील संबंधांचा उद्घाटन करताना ते लिहितात, "संत शब्द पूर्वी आपल्या रूढिगत अर्थांमध्ये ज्ञानेश्वर आणि निर्गुण भक्तांसाठी वापरला जात होता, जो वारकरी संप्रदायाचा प्रचारक होता. संवेदनांमध्ये अनेक बाबतीत समानता असल्याने उत्तर भारतातील कबीर आणि अन्य निर्गुण ज्ञानमार्गी कवींना देखील 'संत' शब्द वापरला जाऊ लागला आहे. वास्तवात आज 'निर्गुण' आणि 'संत' दुवे एकत्रित झाले आहेत. जे आजकाल आपण संत-साहित्य म्हणतो, ते खरीच निर्गुण साहित्य आहे." माझ्या दृष्टीनुसार, संत तोच आहे जो उच्च विचार, सर्व जाति-धर्म आणि वर्गांचा समान आदर करता करता एक विशेष उंचाई व स्वस्थ दृष्टि प्रदान करतो. तोच खरं संत आहे. याचा अर्थ असा आहे की,

संत या जलरूपी सृष्टीमध्ये राहूनही कमळाच्या पानांप्रमाणे सर्व विकारांपासून मुक्त राहतो. ज्या प्रकारे जलामध्ये राहूनही कमळा पानांवर जल थांबत नाही, त्याचप्रमाणे या जलरूपी सृष्टीमध्ये राहून संतही सांसारिक माया पासून दूर राहतो.
संतांची सर्वात मोठी खूबी म्हणजे त्यांनी अहंकार, संकीर्णता आणि स्वार्थ यांना सोडून परस्पर प्रेम, सद्भावना, सुख-शांतिमय उदार दृष्टिकोन स्वीकारण्यावर विशेष बल दिलं आहे. आज आपण पाहतो की जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात मानवजातीच्या उद्धारासाठी परोपकारी सद्भावना आणि एकतेच्या विकासामध्ये संतांची महत्त्वाची भूमिका आहे. त्यांच्या विस्तृत आणि उदार दृष्टिकोनामुळेच संत नेहमी पूजनीय राहिले आहेत. कारण संतांचे आचरण चंदनासारखं सर्वांना सुवासित करणारं आहे. भौतिकवादी युगात देखील संतांचा प्रभाव जनमानसावर खोलवर पसरला आहे. संत तनपूरे बाबा, “काशीच्या प्रभावाने इतके प्रभावित झाले की त्यांनी केवळ काशीला श्रेष्ठतम ज्ञानाची नगरी म्हटले नाही, तर काशीला ज्ञान-गंगा केंद्र आणि महाराष्ट्राच्या पंढरपूरला संतांचे पावन धाम मानले, जिथे भक्तीची गंगा वाहत राहिली आहे. संताच्या हृदयातून जी अत्यंत मधुर, सरल आणि सुबोध वाणी मुखरित होते, त्यामध्ये जीवनाचे मूलभूत तत्वज्ञान आणि आचरणाची पावनता असते. विकारांनी संतप्त झालेल्या पीडित जनांच्या आहत मन आणि हृदयाच्या जखमांवर सुख, शांती आणि आनंदाची अनुभूती होते”. “2”

महाराष्ट्रातील संतांच्या प्रादुर्भावाचे सर्वात मोठे कारण समसामयिक राजकीय आणि सामाजिक परिदृश्य होते. संत ज्ञानेश्वराने वारकरी संप्रदायाची फक्त नींवच साधली नाही, तर ते आधार-स्तंभ म्हणूनही ओळखले जातात. महाराष्ट्राच्या भूमीवर ज्ञानेश्वर, नामदेव, संत गोरोबा, संत चोखामेला, संत एकनाथ, संत तुकाराम, संत बहिणाबाई, संत रामदास यांसारखे संत अवतरले, ज्यांनी त्यांच्या कथनी आणि करनीच्या माध्यमातून समाजाचे पुनरुद्धार केले. जसे म्हटले आहे, 'बिना भक्ति के ज्ञान अधूरा रहता है और बिना ज्ञान के भक्ति अंधी बन जाती है। ज्ञान आणि भक्ति यांचा सामंजस्य मानवाच्या अध्यात्म जीवनाला पूर्णता देते.'

महाराष्ट्रातील विठ्ठल किंवा विठोबाची प्रसिद्धी सारा भारतभर झाली. ज्ञानेश्वराच्या संप्रदायात अनेक जातीरचे संत एकत्र येऊन विठ्ठल-भक्तीत मग्न झाले. या विठ्ठल संप्रदायाला भागवत संप्रदाय म्हणजे वारकरी पंथ असेही म्हणतात. श्री शं. व. दांडेकर यांनी 'वारकरी' ची व्याख्या करताना लिहिले आहे, "आषाढ, कार्तिक, माघ किंवा चैत्र या चार महिन्यांतील शुक्ल एकादशीला गळ्यात तुलसी-माला घालून जो नियमितपणे पंढरपूरची यात्रा करतो, तो वारकरी म्हणून ओळखला जातो आणि त्याची उपासना वारकरी पंथ किंवा संप्रदाय म्हणून ओळखली जाते." आजही भक्त एक वर्षात एकदा पंढरपूरमध्ये जाऊन विठ्ठलाचे दर्शन घेतात. कार्तिक एकादशीला वारी किंवा पारीही करतात. प्रा. वेद कुमार बेदालंकार यांनी काल विभाजनाच्या दृष्टिकोनाने वारकरी संप्रदायाच्या इतिहासाचे वर्णन पाच कालखंडांमध्ये विभागून केले आहे, "प्रथम कालखंड भक्त पुंडलिकपासून ज्ञानदेवपर्यंत. द्वितीय काल ज्ञानदेव आणि नामदेवचा काल. तिसरा काल भानुदारस आणि एकनाथचा काल. चौथा संत तुकारामचा काल आणि पाचवा कालखंड, तुकारामचा उत्तरवर्ती काल. यद्यपि या संप्रदायाच्या प्रवर्तनाचे श्रेय भक्त पुंडलिकाला जाते आणि संत ज्ञानेश्वराने या पंथाला दार्शनिक आधार दिला. भक्त कुंडलीच्या भक्तीने वशीभूत होऊन पांडुरंग त्याच्या येथे ईटवर उभा राहिला. 13व्या शतकामध्ये उत्तरार्ध आणि 14व्या शतकाचा पूर्वार्ध वारकरी संप्रदायाच्या दृष्टिकोनातून सुवर्ण काळ मानला पाहिजे कारण या कालखंडात लिहिलेल्या संतकाव्याचा निःसंशय सुवर्ण अक्षरांत केला गेलेला अक्षय साहित्य आहे. संत ज्ञानेश्वराच्या व्यक्तिमत्वाचे अनेक पैलू आहेत परंतु वारकरी किंवा भागवत संप्रदायाचे संघटित करण्यात त्यांची महत्त्वाची भूमिका राहिली आहे. स्वतः समाजात बहिष्कृत होण्यामुळे संत ज्ञानेश्वराने समाजाच्या विविध तबक्यांचे गहन अभ्यास केले. त्या काळात निम्नवर्गातील लोकांना पर्म, तत्वज्ञान, अध्यात्म वगैरेंच्या ज्ञानापासून वंचित ठेवले गेले होते.

ज्ञानेश्वर, नामदेव आणि एकनाथ यांच्या साहित्याचा गहन अभ्यास केल्यामुळे तुकारामने आपल्या कीर्तनांद्वारे वारकरी तत्वाचा प्रचार केला. ह्या संतांचे उपदेश एकसारखे वाटत असले तरी त्यात थोडा फरक आहे. ज्ञानेश्वराचा आविष्कार आत्माभिमुख आहे, नामदेवचा परमात्माभिमुख आणि एकनाथचा समाज-अभिमुख आहे. तुकाराम हे या तिघांचा संगम आहेत. म्हणून तुकारामच्या शिष्ये संत बहिणाबाईने ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ यांचे महत्त्व स्पष्ट करताना लिहिले आहे -

"संतकृपा झाली, इमारत फका आली,

ज्ञानदेव रचिला पाया, उभारिलें देवलया,
नमा तयाचा किंकर, तेणे केला हा विस्तार।
जनार्दनी एकनाथ, स्तंभ दिला भागवत,
भजन करा सावकाश, तुका झालासे कळस।".“3”

संत बहिणाबाई यांच्या म्हणण्यानुसार की या भक्ति मंदिराच्या कलश शिखराचे निर्माण केले. संत ज्ञानेश्वराची ज्ञानेश्वरी, संत एकनाथाची एकनाथी भागवत आणि संत तुकारामाची अभंग गाथा ही तीन ग्रंथत्रयी वारकरी संप्रदायाची प्रस्थानत्रयी आहे. संतांनी वारंवार जोर दिला आहे की जग नश्वर आणि क्षणभंगुर आहे, तथापि ते नित्य-नवीन देखील आहे. दृश्य क्षण-क्षणात परिवर्तन होते. जसे-जसे जलाची तरंगे नित्य नवीन असतात, तथापि मूलतत्त्व जलच आहे. त्यात उठणाऱ्या तरंगांचा भिन्नता आहे, मग ती क्षणिक असली तरी मूलतः एकच असतात. ज्ञानेश्वर, नामदेव यांचे तत्व संतांनी प्रतिपादित केले आहे. दया, क्षमा आणि शांति हा खरा धर्म आहे, प्रायः सर्व संतांनी याच तत्त्वाला आत्मसात केले आहे. वारकरी जनांचा महामंत्र आहे 'रामकृष्ण हरी, राम म्हणजे अंतरतमात राहणारा, कृष्ण म्हणजे आकर्षित करणारा आणि हरी म्हणजे दुर्गुणांचे हरण करणारा. या प्रकारे आपल्याला दिसते की भागवत धर्माला गती प्रदान करणाऱ्या या संतांचे अभंग, वाणी, कथा, भजन, नाम, आठवड्याचा कीर्तन आणि ताल मृदंगाचे नाद महाराष्ट्राच्या संस्कृतीचे यथार्थ प्रतिबिंब प्रकट करते. म्हणून भक्तजन आपला सर्वस्व ज्ञानोबा आणि तुकारामाच्या चरणांवर अर्पण करतात. कारण याच संतांनी जीवनाचे ध्येय स्पष्ट केले आहे. ज्ञानदेवाचे अनुयायी सामान्य घरांचे होते, जसे नामा दर्जी, गोरा कुंभार, सावता माली, नरहरी सोनार, चोरवा महार आणि नाई कुलामध्ये जन्मलेली सेना आहे. बनाबाईसारखी मामूली नोकराणी कुटायला-पीसताना ईश्वराला गुहारू लागली. नरहरी सोनारने अनुभवले की अंतरात्मा ही खरे सोने आहे. संसार आणि परमार्थात काही मौलिक विरोध नाही. भक्ती हा शब्द संस्कृत भज्ञ धातुपासून तयार झाला असून त्याचा अर्थ सेवा करणे असा होतो. परमेश्यराबद्ल निस्सिम प्रेम म्हणजेच भक्ति, हाच सर्व भक्तीपंथांचा व भक्ती चळवळीचा पाया आहे. भक्तिचा अर्थच केवळ एकाच विश्वाप्रती समर्पणाची भावना ठेवणे होय. वेबर यांच्या मते, भक्ती हे तत्त्य व ग्रिअर्सन यांच्या मते ऐकेश्वरवाद हे तत्त्व भक्तिपंथाने खिश्चन धर्मापासून उचलले आहे. तर मुस्लीम धर्मातील सुफी संप्रदायापासून भक्तिपंथाचा उदय झाला असे ताराचंद यांच्या सारख्या विद्वानाला वाटते. परंतु हे मत दुरागृहदुषित असे वाटते. भक्तिमार्गाचा उदय भारतात फार पूर्वीपासून झाल्याचे दिसते. भारतात हिंदूधर्म हा सर्वात प्राचीन धर्म असून त्याचे मुळ सिंधु संस्कृतीपर्यंत जाते. सिंधू संस्कृतीमध्येच प्रथमतः मातृदेवी व पशुपतीनाथ पूजेचा उल्लेख सापडतो. भारतात भक्तीमार्गाचा उगम कधी झाला निश्चितपणे सांगता येत नाही. ऐतिहासिक दृष्टिकोनातून विचार करता पाणिनी यांच्या अष्टाध्यायी या व्याकरणपर ग्रंथात भक्तीचा उल्लेख सापडतो. त्यापूर्वी वैदीक व उपनिषद साहित्यात सर्वप्रथम परमेश्वरप्राप्ती भक्तीमार्ग चे उपाय सांगितल्याचे दिसतात. ते म्हणजे ज्ञानकांड व कर्मकांड. कालांतराने कर्मकांड व ज्ञानकांड हे ज्ञानयोग, कर्मयोग, भक्तीयोग व राजयोग या योगशास्त्रीय परिभाषेत ते मांडले. ईश्वरप्राप्तीच्या पर्यायी मोक्षप्राप्तीच्या दृष्टिने सामान्यजनांना अत्यंत सुलभ मार्ग म्हणून भक्तीयोगांला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले. निष्काम कर्मयोगाच्या पालनामध्ये सुद्धा मी परमेश्वराचा दास आहे, हा भाव अंतःकरणात असणे नितांत आवश्यक मानण्यात येत असल्याने परमेश्वराचे यथार्थ ज्ञान होण्यासाठी ज्या चित्तशुद्धीची आवश्यकता असते. ती चित्तशुद्धी करण्याचा सुलभ व श्रेष्ठ उपाय म्हणून भक्तीयोगावर विशेष भर देण्यात येऊ लागला. भागयतपुराण व वैष्णव ग्रंथांतही ज्ञानमागपिक्षा व अष्टांगमागपिक्षा भक्ती मार्गाचे महत्त्व अधिक प्रतिपादीत केले आहे. या पार्श्वभूमिवरच मध्ययुगीन महाराष्ट्रात वारकरी संप्रदायांचा उदय झाला. मानवी जीवनाच्या विविध क्षेत्रांत धर्माचे स्थान हे श्रेष्ठ बनल्याने त्यात अनेक दोष व दुष्ट प्रवृत्तीही उत्पन्न झाल्या. मध्ययुगीन कालखंडापर्यंत त्यात खूप वाढ होऊन धार्मिक क्षेत्रात अभिजनवर्गाचा हस्तक्षेप वाढून त्यावर त्यांनी पूर्णतः प्रभुत्व मिळवले. त्यामुळे समाजाच्या सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, राजकीय व आर्थिक क्षेत्रात ही त्यांचे वर्चस्व निर्माण झाले. मनुष्यांमध्ये स्वार्थ, मत्सर, हेवेदावे, प्रतिष्ठेच्या खोटया संकल्पना, दांभिकता व अंहकार या मानवी प्रवृत्ती उसळून आल्या. समाजात परस्परांमध्ये तेढ निर्माण होऊन धर्माच्या नावाखाली मत्सराची आणि द्वेषाची बीजे रोवली गेली. श्रेष्ठ कनिष्ठतेची उतरंड निर्माण झाली. समाजात विषमतेची दुही पसरली. चातुवर्ण्य व्यवस्थेची शकले उडून ती कर्माऐवजी जन्माधारीत झाल्यामुळे समाजात दुफळी माजली. अशा धर्माच्या, जातींच्या, वर्णाच्या, प्रथा परंपरा, अंधश्रद्धाच्या कर्मकांडाच्या बंदिस्त परिस्थितीने संपूर्ण समाज ग्रासला. डॉ. आशिर्वादीलाल श्रीवास्तव भक्ती चळवळीच्या

उदयाची दोन कारणे देतात. प्रथम हिंदू धर्मात सुधारणा घडवून आणणे ज्यामुळे तो इस्लामी आक्रमणांना तोंड देऊ शकेल. आणि द्वितीय, हिंदू आणि मुस्लिम धर्मामध्ये समन्वय स्थापित करणे हदेन्ही जमातींमध्ये सौहार्द्रपूर्ण वातावरण निर्माण करणे. त्याची ही कारणे विरोधाभासी अशा स्वरुपाची आहेत.

**महाराष्ट्रातील बारकरी संप्रदायः-**

निरीश्वरवादी जैन व बौद्ध तत्तेच सगुन परंपरेतील शेव, वैष्णव, वेदांत. भागवत आणि वारकरी संप्रदायापूर्वी झालेल्या विविध संप्रदायांनी घातलेल्या पायावरच मध्ययुगीन महाराष्ट्रात वारकरी संप्रदायाची स्थापना संत नामदेव यांनी केली. परंतु त्याचा उदय संत ज्ञानेश्वर व निवृत्तीनाथ यांच्यापासूनच होतो. वारकरी संप्रदायातील बहुसंख्य संत हे मराठवाडा विभागातील असल्यामुळे त्याला मराठवाडा चळवळ असे म्हटले तरी बादगे ठरणार नाही. वारकरी संप्रदाय ह वारकरी, माळकरी, भागवतपंथ, विठ्ठल संप्रदाय, तसेच पंढरपूर चळवळ म्हणूनही ओळखला जातो. मुळात वारकरी संप्रदायाचा उगम पुंडलिक या श्रेष्ठ भागवत भक्तापासून झाल्याचे मानतात पुंडलिकाच्या भक्तिला लुब्ध होऊन द्वारकाधिश श्रीकृष्ण पंढरीस आले व त्याने दिलेल्या विटेवर उभे राहिले अशी कथा आहे. पंढरपूर क्षेत्र आणि पांडुरंग अस्तित्त्वाचे पुरावे शिलालेख व ताम्रपटातही मिळतात. पंढरपूरच्या चौ-याऐंशीच्या 84 शिलालेखात यादवांचा मुख्य प्रधान हेमाद्रीपंडीत व नृपती रामदेवराय यादव यांनी पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरहिंला देणग्या दिल्याचे पुरावे सापडतातः मालूतारण या ग्रंथात पांडुरंग मूर्तीचा इतिहास शालिवाहन शकांच्या प्रारंभापासून आढळतो. वारकरी संप्रदायातील ज्ञानेश्वर, निवृत्तीनाथ, सोपानदेव, मुक्ताबाई ही ब्राम्हण मंडळी सोडली तर इतर संतमंडळी ही खालच्या जातीतीलच आहेत. या संप्रदायाचे तत्त्वज्ञान व आधारनियम हे एक सामान्य माणूस आपले दैनंदिन प्रापंचिक जीवन जगत असताना इतर नियम ही पाळू शकत असे. कोणतेही काम करत असताना पांडुरंगाचे नामस्मरण करणे संत तुकाराम महाराज यांनी हे वारकरी संप्रदायाचे प्रमुख वैशिष्ट्य होय. बुद्धीवादी, लोकहितवादी, समन्ययवादी, व्यक्तीवादी व क्रियावादी ही या संप्रदायाची प्रमुख वैशिष्टये राहिली आहेत. ज्ञानेश्वरीचे नियमित वाचन करणे, हरिपाठ म्हणणे, व विठ्ठल स्मरणात प्रपंचातील कामे प्रामाणिकपणे पार पाडणे, असे साधारण त्यांचे आचारनियम होत. वारकरी संप्रदायाने विद्वत्तेचे अवडंबर न माजवता समाजातील अंधश्रद्धा व भोळसरपणा घालवला. धर्माच्या नावाखाली दांभिक आचरण करणा-यांचा निषेध केला.

**मानवतावादी दृष्टीकोणातून ऐक्यः-**

तत्कालीन मध्ययुगीन भारत हा दोन ध्रुवांप्रमाणे दोन धर्मात विभागला होता. एका बाजुला मुस्लीम समुदाय जो विजेता असल्यामुळे त्या अभिवेषात होता तर, दुसरीकडे हिंदू जो पराजयामुळे अंतरमनातून खचत चालला होता. त्यात मुस्लीम धर्मातील कट्टरवादी उलेमा वर्ग या दोन समाजातील दरी वाढवण्याचा प्रयत्न करत होता. अशा परिस्थितीत संतांनी समाजात समानता निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले. त्याचा परीणाम दोन्ही समुदायातील कट्टरवादी धर्ममार्तंडांवर भलेही झाला नसेल, परंतु सामान्यजनांमध्ये संतानी रुजवलेल्या मानवतावादी विचारांचे बीज कायम रुजले व त्यांनी ईश्वर व अल्ला ही त्या परमेश्वराचीच रुपे आहेत व ती एकच आहेत ही भावना वाढीस लागली.

**जातीव्यवस्थेला विरोध व अस्पृश्यता निवारणः-**

वारकरी संप्रदाय हा कोणा एका जातीपुरता मर्यादीत नव्हता तर, या संप्रदायाने सर्व जातीधर्मातील लोकांना भक्तीचा मार्ग मोकळा करुन दिला अठरापगड जातींचे संत भेदभाव विसरुन एका भक्तीच्या छायाखाली आल्याने शेकडो वर्षे सामाजिक विषमतेच्या चटक्यांनी होरपळून गेलेल्या समाजात एक प्रकारचे नवचैतन्य निर्माण झाले. भा. प. बहिरट म्हणतात, "संतांनी जाती मोडण्याची चळवळ केली नाही तर, जातींचा ज्या वर्णाच्या गटात समावेश होतो ती वर्णव्यवस्थाच समाज रचनेतील समाजस्वास्थ्यासाठी चालत आलेली व्यवस्था आहे हे ओळखून त्यातील मुरलेला भेदभाव भावाचा दोष काढून टाकण्याचा प्रयत्न केला". [4] तर, गं. बा. सरदार म्हणतात, "शास्त्रप्रामाण्यास व जातीव्यवस्थेला धक्का न लावता वारकरी पंथाने स्त्री शुद्रादिकांना आत्मविकासाचा मार्ग खुला करुन दिला".[5] संत नामदेव यांनी अश्पृश्य समाजात समानता आणण्यासाठी खूप मोठ्या प्रमाणात बदल केला. तत्कालीन समाजव्यवस्थेत ही बाब खूप मोठी होती. म्हणून श्री बारटक्के संत नामदेव यांना महाराष्ट्रातीलच नव्हे तर, संपूर्ण भारतातील प्रथम अश्पृश्योद्धारक असे म्हणतात.

**कर्मकांडाला विरोधः-**

वारकरी संप्रदायाचे सर्वांत महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य म्हणजे कर्मकांडाला विरोध होय. तत्कालीन समाजात कर्मकांड, प्रत्तवैकल्ये व बाहय अवडंबराला उत आला होता. खरा धर्म बाजुला राहून लोक कर्मकांड, अनिष्ट प्रथा परंपरा, अंधश्रद्धांनाच धर्म मानून त्याचे पालन करु लागले. संत नामदेव म्हणतात, व्रततप न लगे करणे, न लगे तुम्हा तीर्धा जाणे, तर संत एकनाथ म्हणतात, केले काय तुया जाउनिया तिथी सर्वचा विषयाशी मुलालाशी गरी दिसशी शुध्दक्ष अंतरी मलीना। याचा अर्थ असा की तृष्णा, कामभावना, विषयाशी भुललेल्यांनी किती ही तीर्थयात्रा, पुजा पाठ केले तरी ते फक्त त्यांचे वरवरचे दिसनारे रुप असते परंतु अंतःकरणातून ते मलिन, ग्रासलेले आसतात म्हणून संत नामदेव व एकनाथांसारखी संत मंडळी अंतःकरणाच्या शुध्दतेवर भर देतांना दिसतात, संतानी पंडीती माषेच्या अवडंबराला छेद देऊन आपल्या तत्त्वज्ञानाचा प्रसार व प्रचार करण्यासाठी स्थानीक भाषांचा वापर केला संत इ शानेश्वर यांनी संस्कृतमधील भगवद्‌गीता भार्यार्थदीपीका या नावाने मराठीत भाषांतरीत केली. त्यामुळे सामान्यांना मगयद्‌गीतेतील ज्ञानाची दारे खुली झाली. "ज्ञानदेव म्हणतात, माझा मराठाचि बोलु कौतुकें परि अमृतातें पैजा जिंके, ऐसी अक्षरे रसिके, मेळवीन ही प्रतिज्ञा बंदीस्त ज्ञान जनसामान्यांपर्यंत तेवढ्याच योग्यतेने पोहचविण्याचा आत्मविशवास व्यक्त करणारी अशीच आहे".[6]

**निष्कर्ष:-**

भक्ती आंदोलनातील संतांच्या कार्यामुळे पुर्वीपासून चालत आलेल्या जाचक धार्मिक कर्मकांडाची मूठमाती होण्यास मदत झाली. "वारकरी संप्रदायाने समाजातील अंधश्रद्धा, कर्मकांड, रुडी, प्रथा, परंपरा याना कडाडून विरोध करुन मानवाला सरलतेचा मार्ग दाखवला. या आंदोलनामुळे धार्मिक विधी, पूजा सरळ सोपी होण्यास मदत झाली. या संप्रदायाने स्त्री-पुरुष समांनतेथी, उच्च-निच्च भेदवाब न पाळण्याची आणि नैतिक मुल्यांची जोपासना करण्याची शिकवण दिली". [7] वारकरी संप्रदायामुळे जनसामान्याच्या बोली भाषेचा विकास होण्यास मदत झाली व समता प्रस्थापीत झाली वारकरी सम्प्रदायात सर्व जाती जमातीच्या लोकांचा सहभाग होऊन विविध पंथाची निर्मिती झाली. तसेच ईश्वर हा एक आहे हे भारतीय समाजाला वारकरी संम्प्रदायांने पटवून दिले. त्यांमुळे ईश्वराच्या आराधना वाढीस मदत झाली. वारकरी संम्प्रदायामुळे वर्णभेद, जातीभेद, अस्पृश्यता व अनिष्ठ रुढी-परंपरा नष्ट होण्यास मदत झाली. संतानी जनसामान्यांना नैतीक अधरणावर भर देण्याची शिकवण दिल्याने परमेश्वराविषयाच्या अंधश्रध्देचे उच्चाटन होण्यासही मदत झाली.

**संदर्भ:**

1. मैणसे, कृष्णा 'श्री बसवेश्वर ते श्री ज्ञानेश्वरः एक चिंतन', लोकवाड्मय संग्रह, मुबई. 1999.
2. फडकुले, 'निर्मलकुमार, 'संत साहित्य सौंदर्य आणि सामर्थ्य, स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद, 2005.
3. मावळकर, तारा'भक्ति आंदोलनाची भावभूमी', ज्ञानमोचक दीपावली अंक वर्ष 2. अंक 8.
4. वर्मा, हरिश्चंद्र, 'मध्ययुगीन भारत का इतिहास, भाग1' दिल्ली विश्वविद्यालय, 2005.
5. वर्णकर, श्री भा. 'भारतीय धर्म व तत्त्वज्ञान', म. वि. ग्रंथ निर्मिती मंडळ, पुणे.
6. सरदार, गं. बा. संत वाङ्‌याची सामाजिक फलश्रुती', महाराष्ट्र साहित्य परिषद 6 प्रकाशन, पुणे, 1970.
7. कठारे, अनिल, डॉ. नगराळे, 'मराठवाडयाचा इतिहास,' कल्पना प्रकाशन, शिवाजीनगर, नांदेड, 1999.

# मुघल बादशाह अकबरकालीन शिक्षण

**प्रा. डॉ. सय्यद मुजीब मुसा**
इतिहास विभागप्रमुख,
कला महाविद्यालय, बिडकीन

**गोषवारा:**

भारतात सुरूवातीला मुहम्मद घोरी याने मदरसा स्थापन केला. यानंतर कुतुबुद्दीन ऐबक, सुलतान अल्तमश, रझिया, खिलजी, तुघलक, सय्यद व लोधी वंशातील सुलतानानी संबंध भारतात लहानमोठ्या शैक्षणिक संख्या स्थापन करून शिक्षणाचा प्रसार-प्रचार केला. मोगलवंशातील बाबर, हुमायुन, जहांगीर, अकबर, शहाजहान बादशहानी देखील साम्राज्यात जागोजागी मशिदी निर्माण केल्या. मशिदीत मकतब, मदरसा व याला लागुनच कुतुबखाना चालविण्यात येत होता. अकबर बादशहाने अभ्यासक्रमाची नव्याने रचना केली. त्याने अध्यापनपद्धती, बालकांना दिल्या जाणाऱ्या तत्कालीन शिक्षण पद्धतीत सुधारणा केल्या. अकबर बादशहाने आपल्या राजधानीत मोठ्या ग्रंथालयाची निर्मिती केली होती. ज्यात वेगवेगळया विषयांच्या पुस्तकांचा समावेश होता. हे ग्रंथालय ज्ञानी, अभ्यासू लोकांसाठी सदैव खुले होती.

**प्रस्तावना:**

भारताच्या इतिहासातील इसवी सन 15 वे शतक हे राजकीय अस्थिरता, अशांती, अवस्था, विवेकशून्यता आणि पारस्परिक सामंजस्याचा अभाव असलेले शतक समजले अहे. याबाबत इतिहासकार रशब्रुक विल्यम्स लिहितो की, "This century depicted no history of Hindustan, for Hindustan had become a mass of separate states" मोगलांच्या भारत प्रवेशापूर्वी दिल्लीच्या साम्राज्याला उतरती कळा ताणली होती. भारत हा अनेक लहान-लहान राज्यांत विभागला गेला होता. यात राजकीय ऐक्याचा अभाव निर्माण झाला होता. संपूर्ण देशाचे राजकीय ऐक्य घडवून संपूर्ण प्रदेशावर राज्य करणारी एक ही सत्ता नव्हती. या राजकीय अस्थिरतेचा फायदा घेत मोगलांनी आपली सत्ता भारतीय भूमीवर प्रस्थापित करण्याकरिता हालचाली केल्याचे दिसून येते. दिल्ली सुलतानांतील तुर्क किंवा अफगाण राज्यकर्त्यांप्रमाणे मोगल हे देखील मूळ मध्य आशिया या भागातील होते. दिल्ली सल्तनतने भारतीयांना काही काळ शांतता व स्थैर्य प्रदान केली, परंतु मोगलानी यापुढे जाऊन भारतीयांना शांती, स्थैर्य आणि सुव्यवस्था दिली. या काळात कला व साहित्याच्या क्षेत्रात भारताने हिमालयाची उंची गाठली.

**मुघल बादशाह अकबर कालीन शिक्षण:-**

बौरसालच्या महालात 15 ऑक्टोबर 1542 रोजी झाला. हुमायून शहाहसेनच्या मोहिमेवर असतानाच त्याला पुत्रजन्माची वार्ता कळाली परंतु अपत्य जन्माचा आनंद साजरा करण्याइतपत दौलत किंवा पैसा ह्मायूनजवळ नसल्याने त्याने स्वतः जवळची कस्तुरी स्वतःच्या सरदारांत वाटली आणि म्हणाला, 'या कस्तुरीचा सुगंध जसा सर्वत्र दरवळतो आहे तसाच माझ्या आपत्याच्या कीर्तीचा सुगंध भविष्यात दशदिशांत दरवळेल. भविष्यात हुमायूनचे हे उद्‌गार सत्य ठरले.

सम्राट अकबर एक महान राज्यकर्ता होता. तो अतिशय महत्वाकांशी साम्राज्य निर्माता होता. तसेच श्रेष्ठ दर्जाचा प्रशासकदेखील होत. धार्मिक क्षेत्रात तो अतिशय आदर्शवादी असल्याचे दिसून येत असले तरी त्याने इतर क्षेत्रांत तेवढाच वास्तववादी दृष्टिकोण बाळगल्याचे दिसून येते. अत्यंत मुत्सद्दी, दूरदृष्टी लाभलेला व प्रजेच्या हितासाठी सतत कार्यरत असलेला शासक म्हणून त्यास भारतीय इतिहासात महत्वाचे स्थान दिले जाते. The Noblest King that ever-ruled India. अशा शब्दांत अकबराचे वर्णन करून स्टेन्ले लेनपूल यांनी अकबरास मोगल साम्राज्याचा खरा संस्थापक व संघटक असल्याचे म्हटले आहे.

कर्नल मॉलसेन अकबराच्या कार्याचे वर्णन करताना लिहितो की, "राष्ट्रीय आपत्तीच्या, प्रतिकूल परिस्थितीच्या काळात जन्म घेऊन शांती, धार्मिक सद्भाव व सुख समाधानाचा मार्ग लाखो लोकांना अकबराने दाखविला होता." सम्राट अकबराची कामगिरी व इतिहासातील स्थानाविषयी विवेचन करताना सर बूलस्ले हेग यांनी अधिक योग्य वर्णन केले आहे. 'अकबराचा काळ श्रेष्ठ राज्यकर्त्याचा काळ होता. इंग्लंडची महान सम्राज्ञी एलिझाबेथ, फ्रान्सचा सम्राट हेरी चौथा व

पर्शियाचा थोर सम्राट शहा अब्बास याच काळात होऊन गेले. तरीही या थोर सम्राट, सम्राज्ञीपेक्षा अकबर श्रेष्ठच होता. भारताच्या इतिहासात इस्लामी सत्तेचा उदय झाल्यापासून होऊन गेलेल्या सर्व राज्यकर्त्यांमध्ये अकबर निःसंशय सर्वश्रेष्ठ होता. प्रजेकडून आज्ञाधारकपणा, आदर व प्रेम एकाच वेळी संपादन करणारा अकबर खरोखरच श्रेष्ठ सम्राट होता.'

हुमायूनच्या मृत्यूनंतर अकबराने शिक्षणाच्या प्रसार, प्रचाराचे उल्लेखनीय कार्य केले. अकबर स्वतः अशिक्षित असूनही त्याच्या काळात शिक्षणाचा प्रसार झाल्याचे दिसते. शिक्षणाच्या सर्वच क्षेत्रांत प्रगती झाल्याचे दिसते. अकबराने आप-आपल्या क्षेत्रांत विद्वत्ता प्राप्त शिक्षकांचा गौरव करून त्यांना पेन्शन दिली. त्याने सर्वच धर्माच्या क्षेत्रातील विद्वानांना प्रोत्साहन दिले त्याने दरबारातील अबुल फजलच्या सल्ल्यानुसार प्रचलित अभ्यासक्रमात बदल करून नवीन संकल्पना व गरजांनुसार अभ्यासक्रम तयार केला अभ्यासक्रमात नियमावली तयार केली परंपरागत शिक्षणात शिक्षण पद्धतीत अभ्यासक्रमात बदलाकरिता त्याने राजकीय आदेश काढले.

अकबर याने शिक्षण पद्धतीत महत्त्वाच्या सुधारणा करून सबंध शिक्षणक्रमाला एक प्रकारची गतिशीलता आणि नावीण्य आणवून दिले. प्रचलित अभ्यासक्रमात अकबराने भारतीय तत्त्वज्ञान, नीतिशास्त्र, गृहशास्त्र, कृषिशास्त्र, मापनशास्त्र, राज्यशास्त्र (Rules of Government) ज्योतिषशास्त्र (चेहऱ्यावरून भविष्य सांगण्याची विद्या) खगोलशाख भौतिकशास्त्रे (तबी), परिणामशाखे (Sciences of Quality) अशा नगंन विषयावा समावेश केला. संस्कृत भाषेचा आणि वाङ्मयाचा अभ्यास पण सुरू करण्यात आला. संस्कृत विषयात न्याय, व्याकरण, योग आणि वेदांत याकील अभ्यासक्रम समविष्ट करण्यात आले. शिकविण्याच्या पद्धतीत अध्यापकांकडून कमीत कमी मदत घेऊन स्वतः विषय समजून घेण्यास विद्यार्थ्यांची तयार करण्यासाठी त्याची बुद्धिशक्ती किंवा विचारशती वाढविण्यावर भर देण्यात आला." अक्षरज्ञान, शब्दार्थ, श्लोकार्थ, श्लोक आणि अगोदरचा धडा याकडे अध्यापकाने विशेष लक्ष द्यावे असे अकबराचे मत होते.

इ.स. 1580 मध्ये सदर किंवा धर्म आणि न्याय खात्याच्या मंत्रिपदावर अकबराने एका उदारमतवादी व्यक्तीची नियुक्ती केली आणि या खात्यांतर्गत शिक्षण हा विषय असल्याने त्याने हिंदू आणि मुसलमान या दोन्ही शैक्षणिक संस्थांना अनुदान दिले. अकबराने पुष्टिमार्ग प्रवर्तक वल्लभाचार्य यांचा मुलगा विठ्ठलनाथचा जमीन इनाम देऊन सन्मान केला. मुसलमानाला हिंदू धर्म आणि संस्कृति यांचे चांगले ज्ञान होईल, दोन्ही समाजामधील गैरसमज दूर होईल व दोन्ही समाजातील लोक आपापल्या उणीवा शोधून त्या दूर करतील या उद्देशाने अकबराने धर्म, तत्त्वज्ञान आणि वाङ्मय यावरील संस्कृत ग्रंथाचे फारशी भाषेत भाषांतर करण्याकरिता एका भाषांतर मंडळाची (Translation Bureau) स्थापन केली. या मंडळामार्फत धर्म, गूढवाद आणि न्यायशास्त्र यावरील अरबी ग्रंथांचे भाषांतर करण्याचा पण उद्देश होता. अमीर, उमरावांकडे अशा भाषांतरित ग्रंथांच्या स्वतःच्या प्रती असाव्यात असा अकबराचा आग्रह होता. भाषांतर झालेले सर्व ग्रंथ शाही ग्रंथालयात ठेवण्यात आले आणि वरच्यावर ती पुस्तके अकबराला वाचून दाखविण्यात येत. इ.स. 1599 मध्ये अकबराचामुलगा मुराद याची माळवा येथे प्रांताधिकारी म्हणून नियुक्ती होत असताना अकबराने त्याला महाभारताची एक फारसी प्रत पाठवून त्या महाकाव्यात सांगितल्या उपदेशांप्रमाणे आपले वर्तन ठेवण्यास आवर्जन सांगितले. राजपुत्रासाठी फत्तेपूर सिक्री येथे एक शाळा स्थापन केली. येथे त्यांना अरबी, फारसी, हिंदी, संस्कृत, पोर्तुगीज या भाषा तसेच अश्वारोहण वगैरे विषयांचे शिक्षण दिले जात होते. मॉन्सरेत पाद्री या शाळेत मुरादला शिकवीत होता. राजत्रुप्रमाणे राजकन्यांना देखील शिक्षण दिले जात होते गुलबदन ही हमायुनाम्याची लेखिका म्हणून प्रसिद्ध होऊन गेली.

अकबराच्या या काळातील शिक्षण पद्धतीवर या काळातील विद्वान फाथुला शिराजीवः प्रभावः असल्याचे दिसते. फायुत्ता शिराजीला विजापूरच्या अली आदितायातला आमंत्रित केले होते. अली आदिशहाच्या निधनानंतर त्यास अकबराने आपल्या दरवारान बोलावले व शिक्षणाच्या बदलांवर व इतर पद्धतीवर वेळोवेळी त्यांचा सल्ला घेतला जात. शिराजी यास अध्यक्षपदी नियुक्त केले गेले. शिराजी अनेक विषयांत पारंगत होता तत्त्वज्ञान व मकूलात या विषयावर त्याची विशेष पकड होती. वैज्ञानिक व तंत्रज्ञानात्मक क्षेत्रातील विकासात शिराजीचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. त्याने मोठी बंदूक व तोफ बनविण्यात लोखंडाचा उपयोग केला. लहान मुलांच्या अध्ययन-अध्यापनात शिराजीची विशेष आवड होती. अबुल फजलचा मुलगा हा शिराजीचा शिष्य होता. फाथुल्ला शिराजी याने भाषांतर विभागाचाही कार्यभार सांभाळला होता. त्याने भारतीय विद्वानांना अल्लमा दीवानी, सद्र शिराजी आणि मिर्झा जान यांच्या ग्रंथाचा परिचय करून दिला. या ग्रंथांचा

समावेश मदरसा शिक्षणाच्या अभ्यासक्रमात केला अशा प्रकारे सिकंदर लोदी याने ज्या परंपरेचा प्रारंभ केला होता अकबरच्या काळात त्या परंपरेचा अधिक विकास झाला.

फाथुल्ला शिराजीने मोठ-मोठ्या कारखान्यात आपल्या प्रयोगाचा प्रारंभ करून उत्पादनात वाढ केली. उत्पादन क्षमतेचा विकास झाल्याने जास्त प्रमाणत माल कारखान्यातून निघू लागला होता. या कारखान्याची प्रशंसा जेसुइट पादरी मांसरेट यांनी केली आहे. अकबरने तंत्रज्ञानात्मक शिक्षणात विशेष आवड दाखविली त्यामुळे तंत्रज्ञानाचा विकास झाला, अनेक ठिकाणी लहान, मोठे कारखाने निर्माण करण्यात आले. कामगारांना प्रशिक्षणाची कारखान्यास भेट देऊन बंदक बनविण्याची पद्धत, लहान, मोठी मध्यम आकारांच्या व्यवस्था करण्यात आली होती. शिकारीच्या वेळी देखील अकबर वेळ काढून लाहोर येथीलइंदुकांविषयी, तंत्रज्ञानाविषयी माहिती करून घेत असत. नंतरच्या काळात बर्नियरने कारखान्यास भेट देऊन त्याची प्रशंसा केली होती.

अकबराने आपल्या राजधानीत मोठ्या ग्रंथालयाची निर्मीती केली होती. ज्यात वेग-वेगळ्या विषयांची पुस्तके ठेवलेली होती. देशाबाहेरील व देशातील वेगवेगळ्या धर्माची, विश्यांची पुस्तके ग्रंथालयात होती. हे ग्रंथालय ज्ञान पिपासू लोकांसाठी सदैव खुले होते. देशाबाहेरील व देशातील विद्यार्थी, विद्वान ग्रंथालयास भेट देत व आपल्या ज्ञानात वाढ करीत असत. अकबराने आग्रा, फत्तेहपूर सिकरी, बऱ्हाणपूर, दिल्ली, भागलपूर इत्यादी अनेक ठिकाणी लहान मोठे मदरसे निर्माण केले. या मदरशांत शिक्षक तथा विद्यार्थ्यांना राहण्याकरिता सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. अशा मदरशांना खजिन्यातून पैसा पुरविला जात होता. अनेक मकतब-मदरशांना राजकीय संरक्षण दिले. त्याने अनेक संस्कृत भाषेतील पुस्तकांचा फारसी भाषेत अनुवाद करण्याची व्यवस्था केली. अकबराच्या काळात अनेक हिंदू धर्मीयांनी अरबीचे शिक्षण घेतले होते. अकबराने हिंदूसाठी देखील शाळा, विद्यालये स्थापन केली होती.

**दर्गा व खानकाह मुन्तिजोबोद्दीन व बहानोद्दीनच्या खर्चासाठी मोगल बादशहा अकबरने दिलेले फर्मान**



**संदर्भ सूची:-**


1) Manjur Ahmad, 'Islamic Education', Genuine Pub. and Media Pvt. Ltd., Delhi 03.

2) शर्मा पी.एल., 'भारत का इतिहास (इ.स. 1000-1761)', लक्ष्मी नारायण आग्रवाल, आगरा 1975.

3) Habibullah A.B.H., The Foundation of Muslim Rule In India, Ilnd Ed., Allahabad Pub., Allahabad, 1961.

4) Jaffar S.M., 'Education In Muslim India, Idarah-1-Adabiyat-1, Delhi - 6, 1936.

4) जे. एल. मेहता, 'मध्यकालीन भारत का इतिहास', (खंड 1), जवाहर पब्लि. एण्ड डिस्ट्री., नई दिल्ली-6, 1997.

5) Chaube S.P., 'History of Indian Education', Vinod Pustak Mandir Pub., Agra - 2, 1970.

6) कृ. ना. चिटणीस, 'मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था भाग-2', (दु. आवृत्ती), प्रकाशिका - सौ.रा.कृ. चिटणीस, पुणे 30.

7) जहिरूद्दीन मुहम्मद बाबर, 'तुजुक-ए-बाबरी' (उर्दू), रशीद अख्तर नदवी (भाषांतर), मकतबुल हसनात दहेली, 2000.

8) झा. चौबे व डॉ. क. श्रीवास्तव, 'मध्ययुगीन भारतीय समाज एवं संस्कृति', उत्तर प्रदेश हिन्दी संस्थान, लखनऊ, 1979.

9) जे.एल. मेहता, 'मध्यकालीन भारत का बृहत इतिहास' (खण्ड-2), जवाहर पब्लि. एण्ड डिस्ट्री., नई दिल्ली-16, 1979.

10) महाजन व्ही. डी., 'मध्यकालीन भारत, एस. चन्द प्रकाशन, नई दिल्ली, 2000.

11) Pruthi R.K., 'Education In Medieval India', Sonali Pub. New Delhi-02, 2005.

# प्राचीन भारतीय स्थापत्य: पितळखोरा लेणी

**प्रा. डॉ. विजया साखरे,**
संशोधन मार्गदर्शक, पदवी व पदव्युत्तर इतिहास विभाग प्रमुख,
संचालक, इतिहास संशोधन केंद्र, श्री शिवाजी कॉलेज, कंधार.

## प्रस्तावना

आजच्या संभाजी नगर जिल्ह्यातील कन्नड तालुक्यात ‘पितळखोरा’ या नावाचे एक गाव आहे. या गावाचे प्राचीन नाव ‘पीतंगल्य’ असे होते. येथील डोंगरात 13 हीनयान पंथीय बौद्ध धर्मीय लेण्यांचा समूह आहे. या लेणी दक्षिण भारतातील सर्वात प्राचीन लेणी आहेत. या लेणी दक्षिण सातमाळा पर्वतराजीच्या रांगेत कोरलेल्या आहेत. दरीच्या निमुळत्या तोंडाशी एका बाजूस 9 व दुसऱ्या बाजूस 4 अशा एकूण 13 लेणी आहेत. या लेण्यांचे दोन गट करता येतात. पहिल्या गटात लेणी क्रमांक 1 ते 9 आणि दुसऱ्या गटात लेणी क्रमांक 10 ते 13 अशा एकूण 13 लेण्यांचा समावेश होतो. पितळखोरा लेणीत चित्रकाम आढळते. या लेणीतील चित्रांचे अवशेष हे अजिंठा व वेरुळ लेणीतील चित्राप्रमाणे आहे. हे चित्रकाम आजही पाहावयास मिळतात. या लेणीतील सर्व चित्रे ही बौद्ध धर्माशी संबंधित आहेत. कन्नड या शहरापासून 18 कि. मी., वेरुळच्या वायव्य दिशेला 37 कि. मी. आणि संभाजी नगरच्या दक्षिणेस 78 कि. मी. अंतरावर पितळखोरा लेणी अंबाला गावाजवळील चांदोरा टेकडीवर वसलेली आहे.

लेणी खोदकामाचा कालखंड येथील सर्व लेणी एकाच काळात तयार करण्यात आलेल्या नाहीत. लेणी क्रमांक 2, 3, 4 व 5 या इ. स. पू. दुसऱ्या शतकात कोरलेल्या असाव्यात. लेणी क्रमांक 1 चा काळ वरील लेणींच्या काळापेक्षा किंचित नंतरचा असावा. लेणी क्रमांक 6, 7, 8, 9, 12 व 13 चा कालखंड इ. स. पू. पाहिले शतक असावा. येथील लेणी मराठवाड्यात आणि दक्षिणेतील सात सर्वात प्राचीन आहेत. म्हणजेच त्या आद्य लेणी ठरतात. उस्मानाबाद येथील जैन लेणी क्रमांक 2 ही सुद्धा सर्वात प्राचीन लेणी आहे.

## ऐतिहासिक पार्श्वभूमी

पितळखोरा येथील सर्व बौद्ध लेणी प्रारंभिक हीनयान पंथीय आहेत. सातवाहन घराण्याच्या कालखंडात कोरलेल्या आहेत. सातवाहन घराण्याचा कालखंड इ. स. पू. 230 व इ. स. 230 असा 460 वर्षांचा आहे. साधारणतः इ. स. पू. दुसरे शतक ते इ. स. तिसरे शतक या कालखंडात येथील लेणी कोरण्यात आल्या. पितळखोरा येथील लेण्यांचा शोध इ. स. 1853 मध्ये लागला आहे. पाश्चात्य संशोधक जेम्स विल्सन यांनी 'जर्नल ऑफ रॉयल एशियाटिक सोसायटी' च्या खंड क्रमांक 4 मध्ये प्रथम उल्लेख केला. जेम्स फर्ग्युसन व जेम्स बर्जेस यांनी इ. स. 1880 मध्ये प्रकाशित केलेल्या त्यांच्या 'केव्ह टेंपल्स ऑफ इंडिया' या ग्रंथात लेणी क्रमांक 1 ते 9 ची माहिती दिली आहे. लेणी क्रमांक 12 व 13 चा शोध इ. स. 1941 मध्ये म. गो. दीक्षित यांनी लावला. लेणी क्रमांक 12 व 13 चा शोध इ. स. 1953-55 च्या सुमारास भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाने लावला. इ. स. 1953 मध्ये या विभागाने या लेणी ‘राष्ट्रीय संरक्षित स्मारक’ म्हणून जाहीर करून ताब्यात घेतल्या. याच विभागाने इ. स. 1958 मध्ये लेणी क्रमांक 3 व 4 समोरील ढिगाऱ्याचे उत्खनन केले. पितळखोरा येथील लेणीतील यक्ष संकरिनचे सातवाहन काळातील शिल्प अत्यंत सुंदर आहे.

## लेणी क्रं. 1

ही विहार लेणी आहे. या लेणीची सध्या पडझड झाल्यामुळे आज तिचे केवळ भग्नावशेष शिल्लक आहेत. या लेणीत भिक्खूगृहाचे भग्न अवशेष, भिक्खूंच्या निवासासाठी कोरलेले शयनासन व लाकडी दरवाजा बसविण्यासाठी केलेल्या खोबण्या आहेत. या अवशेषांवरून या ठिकाणी दोनपेक्षा जास्त विहार कोरलेले असावेत. दक्षिणेकडील बाजूस एक विहारातील पाठीमागील दोन व उजवीकडील तीन भिक्खूगृह भग्नावस्थेत आहेत. या भिक्खूगृहात कोरीव काम आढळते. या लेणीचा दगड लाल प्रस्तरजन्य वालुकायम ठिसूळ खडक निघाल्यामुळे स्थापत्य कलाकारांना लेणीचे खोदकाम अर्धवट सोडून दिले आहे.

## लेणी क्रं. 2

लेणी क्रं. 1 प्रमाणेच ही लेणी भग्नावस्थेत व आजही तग धरून आहे. या लेणीकडे जाण्यासाठी अकरा पायऱ्यांचा जीना कोरलेला आहे. ही विहार लेणी आहे. लेणीच्या उजव्या बाजूस चार व डाव्या बाजूस दोन भिक्खू गृह कोरले आहेत. उजव्या बाजूकडील चार भिक्खू गृहात दोन उंच आसन व एक लांब आसन कोरलेले आहे. लेणीतील पाणी चाहेर वाहून नेण्यासाठी एक मोरी कोरलेली असून त्यावर झाकण्यासाठी शिलाखंडाचा वापर केला आहे. लेणी क्रं. 3 मध्ये पाणी जाऊ नये म्हणून या मोरीचा उपयोग करण्यात आला असावा. लेणी क्रं. 2, 3 व 4 यांना एकत्रितपणे ओसरीवजा भाग आहे. त्यामुळे या तिन्ही लेणी एकाच काळात कोरलेल्या असाव्यात. लेणी क्रमांक 2 व 3 यांच्यामधील दुभाजक भिंत मात्र ठिसूळ खडकामुळे पडलेली आहे.

**लेणी क्रं. 3**

लेणी क्रं. 3 हे हीनयान काळातील चैत्य आहे. याच लेणीत महायान काळातील चित्रकाम आढळून येत असल्यामुळे या लेणीस महायान लेणी असेही म्हटले जाते. या चैत्य लेणीत हीनयान व महायान काळातील कलेच्या अस्तित्वाचे एकत्रितपणे दर्शन घडते. अजिंठा लेणी क्रं. 10 आणि पितळखोरा येथील ही चैत्य लेणी यांच्यात विलक्षण साम्य आहे. ही चैत्य लेणी इ. स. पू. दुसऱ्या शतकात कोरली असावी. या लेणीची लांबी 25.8 मी. आणि रुंदी 10.7 मी. असून तिची पृष्ठभागापासून उंची 9 मी. आहे. त्यामध्ये 4.3 मीटर उंचीचे 37 अष्टकोनी स्तंभ होते. त्यापैकी आज फक्त 12 स्तंभ पूर्वस्थितीत आहेत. येथील स्तंभ भाजे येथील चैत्य लेणी व अजिंठा लेणीस दान दिल्यासंबंधीचे शिलालेख दोन स्तंभावर आढळतात. ते इ. स. पू. दुसऱ्या, तिसऱ्या शतकातील आहेत. स्तंभावर चित्रकाम केल्याचे अवशेष आढळतात. स्तंभामुळे या लेणीचे मध्यमंडप (गाभारा), दोन्ही बाजूला 1.4 मीटर रुंद नासिका व मागील अर्धवर्तुळाकार भाग असे तीन भाग पडतात. नासिकांना अर्धकमानीद्वारयुक्त दगडी गोपान कोरलेले आहे. लेणीचे छत गजपृष्ठाकृती असून मंडपाखाली लाकडी गोपान बसविल्याच्या खाणाखुणा दिसतात. दोन लाकडी गोपानातील चौरसाकृती भागात केलेल्या चित्रकामात प्रामुख्याने कमळाच्या रुपकाचे चित्रकाम केल्याचे आढळते. या लेणीचा दर्शनी भाग पडलेला आहे. तो सुंदर शिल्पांनी सजविलेला असावा. या लेणीतील स्तंभावर भगवान बुद्ध, बोधिसत्त्व आणि भिक्खूं इ. विषय चित्रित केलेले आहेत. येथे एका कमळ पुष्पावर अभय मुद्रेत उभी असलेली बुद्धाची प्रतिमा सुंदर आहे.

**लेणी क्रं. 4**

लेणी क्रं. 4 ही विहार लेणी आहे. या लेणीचा दर्शनी भाग सुंदर शिल्पांनी सुशोभित करण्यात आला होता; पण ठिसूळ खडकामुळे हा दर्शनी भाग नष्ट झालेला आहे. केवळ चैत्यगवाक्ष व शिल्पांचे काही अवशेष शिल्लक आहेत. दर्शनी भागाच्या अगदी वर सहा चैत्य गवाक्ष एकाच रांगेत कोरलेले आहेत आणि त्याच्या आत वेदिका पट्टीचे आणि प्राण्यांचे अंकन दृष्टीस पडते. अर्धगेलाकृती वेदिकापट्टीवर लहान चैत्य गवाक्षाचे शिल्पांकन आहे. या पट्टीखाली एक मिथुन-शिल्प कोरले आहे. लेणीच्या समोर भग्न झालेली गज मालिका व दोन द्वारपाल यक्ष प्रवेशद्वारावर शिल्पांकित केले आहेत. ही लेणी साडेबावन्न फूट रुंद असून ती वेरुळ येथील तीन मजली लेणी व दशावतार लेणीप्रमाणे एकरेषीय रांगेने सज्जात विभागली आहे. या लेणीतील स्तंभ खालच्या व वरील बाजूस चौरसाकृती असून त्यांचे काठ तासलेले आहेत. तसेच हे स्तंभ सज्जाच्या पलीकडे निमुळत्या गुळगुळीत उन्नत लगींनी छताला पेललेले आहेत. लेणींच्या पाठीमागे भिक्खूंच्या निवासासाठी कोरलेल्या सात भिक्खूगृहांपैकी पाच भिक्खूंगृहांना जाळीदार खिडक्या कोरलेल्या आहेत. त्यांच्या खिडकी व दरवाजाला चैत्यांकित कमानी आहेत. दुसऱ्या व तिसऱ्या भिक्खूंगृहात अष्टकोनी अर्धस्तंभ आहेत. मात्र बाकीच्या भिक्खूगृहातील प्रत्येक दोन अष्टकोनी अर्धस्तंभावर वेगवेगळ्या रचनेचे प्राणीशीर्ष कोरलेले आहेत. स्तंभशीर्ष घंटाकार असून प्राणीशीर्ष चार एकावर एक वाढविणाऱ्या चौकोनी थरावर आधारलेले आहेत. स्तंभशीर्षावरील कोरलेले प्राणी बसलेल्या अवस्थेत असून एका प्राणिशीर्षाच्या जोडीचा अपवाद वगळता सर्व प्राणी पंखधारी आहेत. सहाव्या व सातव्या भिक्खूगृहातील स्तंभशीर्षावर उंटाची मान व मांजराचे शरीर आणि पंजे कोरले असून मांजराला लांब पंख आहेत. पहिल्या पूर्व भिक्खूगृहातील अर्धस्तंभावर कोल्हा, दुसऱ्या व तिसऱ्या भिक्खूगृहातील अर्धस्तंभावर पंखधारी हरीण, तिसऱ्या व चौथ्या भिक्खूगृहातील घोडा, तर चौथ्या व पाचव्या भिक्खगृहातील अर्धस्तंभाच्या शीर्षावर घायाळ झालेला सिंह आहे. तसेच लेणीच्या डावीकडे पंखधारी स्फिंक्स (उभयलिंगी शिल्प) कोरलेले आढळतात.

**लेणी क्रं. 5**

लेणी क्रं. 5 ही विहार लेणी आहे. त्यामध्ये दोन्ही बाजूस प्रत्येकी पाच-पाच मागील बाजूस दोन आणि त्यापुढील भागात अतिरिक्त दोन अशी एकूण 14 भिक्खूगृहे आहेत. या प्रत्येक भिक्खूगृहात मागील किंवा लगतच्या बाजूस आसने कोरलेली आढळतात. मागील बाजूस असलेल्या चार भिक्खूगृहापैकी दोन मध्यभागी आहेत व दोन त्याच्या पाठीमागे कोरलेली आहेत. या लेणीत पाठीमागील बाजूस लहान चापाकृती भिक्खूगृह कोरलेले आहेत. त्याचा एक भाग बांधीव स्वरुपाचा होता. त्यामुळे सुरुवातीला ही लेणी चैत्यगृह असावे आणि त्यामध्ये बांधलेला स्तूप चापाकृती असावा असे वाटते. या भिक्खूगृहाच्या प्रवेशानजीकच एका बाजूस एक लहान आसन कोरले आहे. प्रवेशासाठी असलेल्या, दोन पायऱ्यांपैकी शेवटची पायरी अर्धगोलाकार आहे. लेणीसमोर लहान ओसरी आहे. लेणीत प्रवेश करण्यासाठी पायऱ्या कोरल्या आहेत. तसेच चौरसाकृती पायावर खोबण्या कोरलेल्या आहेत. लेणीच्या अगदी समोर एक मोठा शिलाखंड पडलेला आहे. त्यावर ब्राह्मी लिपीतील व प्राकृत भाषेतील 'य अस्थिसेनिय' हा अपूर्ण शिलालेख कोरलेला आहे. याचा काळ इ. स. पू. दुसरे शतक ठरविण्यात आला आहे. या शिलालेखावरून व्यापारी संघाने
दिलेल्या दानाची माहिती होते.

**लेणी क्रं. 6**

लेणी क्रमांक 6 ही विहार लेणी असून यामध्ये पंधरा भिक्खूगृहे कोरलेली आहेत. प्रत्येक भिक्खूगृहाला पायऱ्या कोरल्या असून भिक्खूगृहाच्या भिंतीवर लांबट कोनाडे कोरलेले आढळतात. पाठीमागील भिक्खूगृहाच्या मागील भिंतीवर असलेल्या दगडी तुळईवर पिरॅमिडिकल पद्धतीचे करण्यात आलेले अलंकरण व कोरीव हस्त आकृती कलात्मक आहेत. या विहाराच्या प्रवेशद्वाराजवळ अगदी खालच्या बाजूस लहान व्हरंडा आहे. या व्हरांड्याची आतील बाजू भाजलेल्या विटांनी बांधली आहे. विहाराचे छत व भिंतीवरील प्लास्टर आणि रंगकामाचे काही अवशेष नजरेस पडतात.

**लेणी क्रं. 6 (अ)**

ही विहार लेणी असून यामध्ये 8 भिक्खूगृहे चार गटात एकाच रांगेत कोरलेली आहेत. दोन भिक्खूगृहामधील दुभाजक भिंत व लेणीवरील छत नष्ट झालेले असून लेणीच्या पाठीमागच्या भिंतीत कोरीव लांबट कोनाडे आहेत.

**लेणी क्रं. 7**

लेणी क्रं. 7 ही विहार लेणी असून त्यात समोरची बाजू वगळता तिन्ही बाजूस प्रत्येकी पाच यानुसार एकूण पंधरा भिक्खूगृहे कोरलेली आढळतात. भिक्खूगृहाला पायऱ्या कोरलेल्या असून भिक्खूगृहाच्या पाठीमागे विहाराच्या छताला तिरांनी आधार देण्यात आला आहे. लेणी क्रं. 6 प्रमाणेच दगडी तुळईवर आणि तीरावर पिरॅमिडिकल पद्धतीचे अलंकरण कोरलेले आढळते. भिक्खूगृहाचे छत गजपृष्ठाकृती आहे. लेणीच्या छतावर प्लास्टर व रंगकाम केल्याचे अवशेष दिसतात. लेणीत अपूर्ण कोरलेले पाण्याचे टाके आहे. लेणीत स्तंभ नाहीत.

**लेणी क्रं. 8**

पितळखोरा येथील सर्वात लहान विहार लेणी म्हणून लेणी क्रं. 8 चा उल्लेख करावा लागतो. या लेणीत 03 भिक्खूगृहे असून प्रत्येक भिक्खूगृहात आसन कोरलेले आहे. लेणी क्रमांक 7 जवळ पाण्याच्या टाक्या जवळ ही लेणी कोरलेली आहे. या लेणीत अर्धवट स्वरुपाची पाण्याची टाकी कोरलेली आढळते. या विहार लेणीचा बराच भाग नष्ट झालेला असून राहिलेला भागही नष्ट होण्याच्याच मार्गावर आहे.

**लेणी क्रं. 9**

लेणी क्रं. 9 ही भव्य व विशाल लेणी असून ठिसूळ खडकामुळे तिचा दर्शनी भाग नष्ट झाला आहे. आतील भागाचीही पडझड झाली आहे. या लेणीचा दर्शनी भाग चार स्तंभ व दोन भिंती स्तंभांनी पेललेला होता. या लेणीस मोठे प्रवेशद्वार असावे असे वाटते. लेणीला प्रशस्त व्हरंडा आहे. लेणीचा मंडप 7.8 मी. लांब व 1.73 मी. रुंद असून मुख्य मंडपाच्या आत तिन्ही बाजूस प्रत्येकी पाच याप्रमाणे एकूण 15 भिक्खूगृहे कोरलेली आहेत. प्रत्येक भिक्खूगृहात शयासन कोरलेले आढळते. मात्र दोन भिक्खू गृहातील दुभाजक भिंत नष्ट झाले आहेत. लेणीच्या पूर्वेकडील भागात कोरलेल्या लहान विहारात तीन भिक्खू गृहे असून पश्चिमेकडील भागातही लहान विहाराचे अवशेष व त्या ठिकाणी चार ते पाच भिक्खू गृहे कोरल्याचे अवशेष दिसतात. लेणीतील भिक्खू गृहाच्या वरील भागावर आधारासाठी उगडी तुळई कोरली आहे. या

तुळईवर सुबक असे वेदिकापट्टीवरचे अलंकरण करण्यात आले असून असे अलंकरण लेणीतील सर्वच भिक्खू गृहाच्या वरील भागात केलेले आहे.

**लेणी क्रं. 10**

लेणी क्रं. 10 ही चैत्य लेणी आहे. परंतु ही लेणी अर्धवट कोरलेली दिसते. ही लेणी 5.27 मीटर लांब, 2.5 मीटर रुंद व 3.77 मोठा उंच या आकाराचा अर्धगोलाकार मंडप आहे. त्यामध्ये स्तंभ नाहीत. या लेणीचा दर्शनी भाग 3.6 मीटर लांब व 2.4 मीटर रुंद आहे. दर्शनी भागाकडे पहिल्यास समोरील भिंतीवर 1.65 मी. लांब आणि 8 मी. रुंदीचे एक ओबड-धोबड स्वरुपातील प्रवेशद्वार कोरल्याचे आढळते. या प्रवेशद्वाराच्या वर 2.20 मी. उंच, 8 मी. खोल व 2.7 मी. रुंदीचा अर्धवर्तुळाकार कोनाडा कोरलेला आहे. कोनाड्याच्या कमानीस दगडी फासळ्या कोरलेल्या आहेत. त्याच्यावर 1.15 मी. लांब व 4.5 मी. रुंदीचा खिडकीचा उघडा भाग कोरलेला आढळतो. या लेणीत 1.9 मी. उंचीचा आणि 5.32 मी. पायालगतचा व्यास असलेला स्तूप आहे. त्याची हर्मिका तुटलेली आहे. अधिष्ठानावर 3.5 मी. व्यास असलेला अंड कोरलेला आढळतो. स्तूपाच्या मागील भिंतीत दोन छिद्रे आहेत. अधिष्ठान व स्तूपाच्या अंडाचा भाग संयुक्त ठिकाणी वेदिकापट्टीचा एक रुंद बंध कोरलेला आहे.

**लेणी क्रं. 11**

लेणी क्रं. 11 ही एक स्मारक स्तूप समूह म्हणजेच स्तूप गॅलरी आहे. या लेणीच्या प्रवेशाचा भाग 1.4 मी. रुंदीचा आहे. ज्या लेणीत वंदनीय भिक्खूंच्या अवशेष पात्रावर स्मृति स्तूप एकापेक्षा अधिक कोरलेले असतात. अशा लेणीस स्मारक स्तूप समूह किंवा स्तूप गॅलरी या नावाने ओळखले जाते. म. गो. दीक्षित यांनी लेणी क्रं. 10 व 11 चा सर्वप्रथम उल्लेख इ. स. 1941 मध्ये केला आहे. या लेणीत वेगवेगळया कालखंडात कोरलेले तीन स्तूप आहेत. या तीन स्तूपापैकी पहिले दोन स्तूप भग्नावस्थेत असून आतील स्तूप काही अंशी चांगल्या अवस्थेत आहेत. लेणीच्या समोरच्या भागात 4.65 मी. लांब आणि 4.5 मी. रुंदीचे एक गृह असून त्यामध्ये कोरण्यात आलेला एक स्तूप भग्न अवस्थेत आहे. हर्मिका अधिष्ठानाच्या भागाला लागून आहे. लेणीच्या आतील भागात कोरलेल्या 2.35 मी. उंच व 3.52 मी. रुंदीच्या एका गृहात अधिष्ठानासहित कोरलेला एक स्तूप आहे. त्याच्यावर हर्मिका असून हर्मिकेवर छत कोरलेले असून अधिष्ठानाच्या पाठीमागे पवित्र अस्थी ठेवण्यासाठी एक लंब गोलाकार व दुसरी गोलाकार कोरीव अशा दोन खोबण्या कोरलेल्या आहेत. त्यापैकी एका खोबणीवर खाच आहे. पहिल्या स्तूपाच्या पूर्वेला 3 मी. रुंद व 2.3 मी. लांबीच्या कोरलेल्या भागात तिसरा कोरीव स्तूप आहे. हा सुद्धा भग्नावस्थेत आहे. या स्तूपावर छताला लागून कोरलेले छत मात्र आपले अस्तित्व टिकवून आहे.

**लेणी क्रं. 12**

लेणी क्रं. 12 ही चैत्य लेणी आहे. तिचा शोध भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाने इ. स. 1954 मध्ये लावला. लेणीत प्रवेश करण्यासाठी 1.3 मी. रुंदीच्या तीन पायऱ्या असून सुमारे 3.3 मी. रुंदीचा व्हरंडा आहे. लेणीचा दर्शनी भाग पडल्यामुळे त्याची माहिती मिळत नाही. प्रवेशद्वाराच्या उजव्या बाजूस द्वारपालाच्या शिल्पाचे अस्तित्व दर्शविणाऱ्या पदचिन्हांचे अवशेष आढळतात. लेणीमध्ये प्रवेश केल्यानंतर प्रशस्त व्हारंड्यासारखा भाग दिसतो. त्यास 27 मी रुंदीच्या भित्ती स्तंभांचा आधार देण्याचाही विचार कलाकारांच्या मनात असावा असे दिसते. या चैत्य लेणीचा मंडप 6.5 मी. लांब, 2.25 मी. रुंद व 4.5 मी. उंच आहे. या लेणीत स्तंभ नाहीत. तसेच या लेणीत अर्धगोलाकार भागाच्या शेवटी स्तूप कोरलेला आहे. स्तूपावर हर्मिका होती. आज ती स्तूपापासून वेगळी झाली आहे. लेणीच्या गजपृष्ठाकृती छतावर कोरीव दगडी फासळ्या आहेत. त्या छतावरील उन्नत लगीमुळे दुभागल्या आहेत. प्रत्येक दगडी फासळया आठ उपभागात विभागल्या गेल्या आहेत. या दगडी फासळया उलट 'यू' आकाराच्या आहेत. त्यांचा शेवटचा भाग पृष्ठभागापासून वळविण्यात आलेला आहे. लेणीतील हर्मिकेच्या पायालगतचा पेटिकासारख्या भागावर वेदिकापट्टीचे अलंकरण कोरले आहे. त्याचे दोन उपविभाग असून प्रत्येक चारही विभागाच्या मध्यभागी एक स्त्री व पुरुषांची अर्धपूर्णाकृती प्रतिमा कोरलेली आहे. हर्मिकेवर मिथुन शिल्पे कोरलेली आहेत.

**लेणी क्रं. 13**

लेणी क्रं. 13 ही सुद्धा चैत्य लेणी आहे. तिचा दर्शनी भाग नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. या लेणीचे प्रवेशद्वार 0.9 मी. रुंद असून लेणीतील अर्धगोलाकृती मंडप 8.35 मी. लांब, 4.5 मी. रुंद आणि 4.5 मी. उंच आहे. लेणीत स्तूप असून

त्याभोवती अर्धगोलाकृती भागापर्यंत स्तंभाच्या दोन रांगा आहेत. म्हणूनच अर्धगोलाकृती मंडपाचे दोन भागात विभाजन झाले आहे. मंडपाची विभागणी 2.1 मीटर रुंद मध्यवर्ती गाभारा आणि 6 मीटर रुंद बाजू नासिका यामध्ये झाली आहे. स्तूपापर्यंत दोन्ही बाजूस प्रत्येक पाच स्तंभाची रांग असून स्तूपाच्या मागील बाजूस अर्धगोलाकृती भागात चार या प्रमाणे एकूण 14 स्तंभ कोरलेले आहेत. स्तंभाच्या पायालगतचा भाग अष्टकोनी असून स्तंभ उतरत्या कलाचे असून वरील भागास ते निमुळते होत गेले आहेत. स्तंभाची लांबी 9 मी. आहे. नासिका व स्तूपावरील गजपृष्ठाकृती छतावर दगडी फासळ्या व राप्टर्स कोरले आहेत. दगडी फासळ्याचा आकार काट 'यू' सारखा आहे. बाजूनासिकावरील छतावर मात्र राप्टर्स कोरलेले नाहीत. तसेच स्तूपावरील भाग मोडलेला आहे.

**सारांश**

पितळखोरा येथे एकूण 13 लेणी आहेत. लेणी क्रमांक 1, 2, 4, 5, 6 आणि 9 हे विहार आहेत. लेणी क्रमांक 11 ही स्तूप गॅलरी आहे. लेणी 4 ही मुख्य विहार, लेणी क्रमांक 3 हे मुख्य चैत्य आहे. या प्राचीन बौद्ध लेणी पश्चिम घाटात आहेत. पितळखोरा लेणी ही दुर्गम, खोल, जंगल भागात आहेत. या लेणी हीनयान काळातील आहे. परंतु लेण्यांमध्ये काढलेली चित्रे ही महायान काळातील आहेत. लेण्यांमध्ये चित्रे, अनेक शिल्पे, प्राण्यांचे आकृतिबंध, लघु चैत्य खिडक्या, अप्रतिम यक्ष आकृत्या, हत्ती, द्वारपाल आणि मिथुनाच्या आकृत्या आहेत. येथील शिल्पकला ही सांची, कार्ला, नाशिक येथील स्तूपांप्रमाणे आहे. चैत्य आणि विहार हे दोन प्रकारचे लेणी आहेत. येथे भिक्षूंना प्रार्थना व मुक्काम यांची सोय केलेली आढळते. प्राचीन काळापासूनचे अनेक आकृति बंध, रचना, चित्रे बरेच दाखविले आहेत. पितळखोरा लेणी या खडक तासून तयार केलेली लेणी आहे. या रॉक-कट आर्किटेक्चरच्या उत्कृष्ट उदाहरणांपैकी एक आहेत. हा परिसर पावसाळ्यात अधिकच सुंदर दिसतो. ठिसूळ दगडामुळे बरीच झीज झालेली आहे. या लेण्यांचे ऐतिहासिक, सांस्कृतिक महत्त्व असून देखील प्रसिद्धीच्या अभावामुळे पर्यटक या लेण्यांकडे दुर्लक्ष करतात. उन्ह, वारा, पाऊस व भूकंप या नैसर्गिक आपत्ती, शासन, अभ्यासकांचे दुर्लक्ष व शास्त्रीय संवर्धन पद्धतीचा अभाव अशा विविध कारणांमुळे या लेण्यांना संकटांचा सामना करावा लागत आहे. भारतीय पुरातत्व सर्वेक्षण (A.S.I.) विभाग या भागाची देखरेख करते. या विभागाने सर्वसमावेशक संवर्धन धोरण लागू करणे गरजेचे आहे. तसेच अभ्यासक, संशोधक व विद्वान यांनी पितळखोरा लेणी जतन करण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

**संदर्भ सूची :**


१) जोशी नि. पु., (1979), भारतीय मूर्तिशास्त्र, म. वि. ग्रं. नि. मं., नागपूर.
२) Wauchope R. S., (1933), Buddhist Cave Temples of India, Calcutta.
३) Sharan R., (2002), Ancient Indian History Culture & Archaeology, Radha Publications.
४) James Ferguson and James Burgess, (1880), The Cave Temples of India, London.
५) अहिरराव प्र. रा. व भावे ह. अ., (2005) भारतीय शिल्पातील प्राणी, वरदा प्रकाशन, पुणे.
६) Bapat P.V. (Ed.), (1971), 2500 Years of Buddhism, Govt. of India, Delhi.
७) Deshpande M. N., (1959), The Rock Cut Caves of Pitalkhora in the Deccan, Ancient India, No. 15, New Delhi.
८) कठारे अनिल, (2001), मराठवाड्यातील लेणी, कल्पना प्रकाशन, नांदेड.
९) मोरवंचीकर रा. श्री., (1993), सातवाहनकालीन महाराष्ट्र, प्रतिमा प्रकाशन, पुणे.
१०) साखरे विजया, कठारे अनिल, (2006), भारतीय कला आणि वास्तुकला, कल्पना प्रकाशन, नांदेड.
११) श्रीवास्तव बृजभूषण, (1990), प्राचीन भारतीय प्रतिमा विज्ञान एवं मूर्तिकला, विश्वविद्यालय प्रकाशन, वाराणसी.
१२) कठारे अनिल, विजया साखरे, (2008), भारतीय कलेचा इतिहास, नांदेड, कल्पना प्रकाशन, नांदेड.
१३) साखरे विजया, (2008), मंदिरे आणि मूर्तिशिल्प, अल्फा पब्लिकेशन, नांदेड.

# हैद्राबादचे निजाम : एक दृष्टिक्षेप

**डॉ. के. डी. सावंत**
इतिहास विभाग प्रमुख,
महिला महाविद्यालय,गेवराई

**प्रस्तावना :**

मोगल राजवटीच्या काळात सुरुवातीपासून अनेक मुसलमान कुटूंबे हिंदुस्थानात येऊन स्थायिक झालेली होती. मीर कमरुद्दीन खान उर्फ निजाम उल -मुल्क यांचे कुटूंबही त्यापैकीच एक होते. निजाम उल-मुल्कचे आजोबा अबदिअली हे इ.स.1655-56 साली मक्केच्या यात्रेच्या निमित्ताने समरकंद-बुखारा येथून हिंदुस्थानात आले. त्यांनी मोगल बादशहा, 'शहाजहान' यांच्या दरबारात नोकरी पत्करली. शहाजहान आणि औरंगजेब यांच्यात सत्तेसाठी सुरु झालेल्या संघर्षात त्यांनी औरंगजेबाची बाजू घेतली होती. पुढे अबीद अली यांनी मोघल बादशहा औरंगजेबाचा वजीर सादुल्लाखान यांची मुलगी व आपला मुलगा 'शहाबुद्दीन' उर्फ गाजीउद्दीन फिरोज जंग यास करुन घेतली. औरंगजेबाने इ.स.1687 मध्ये कुतूबशाहीच्या गोवळकोडयांला वेढा दिला. येथे झालेल्या लढाईत अबीदअली मारला गेला. यानंतर त्यांचे पुत्र शहाबुद्दीन हे गुजरातचे सुभेदार झाले. इ.स.1710 मध्ये त्यांचा मृत्यू झाला. मीर कमरुद्दीन उर्फ निजाम उल-मुल्क हे या शहाबुद्दीनचेच पुत्र होते. प्रस्तुत शोध निबंधात हैद्राबादचे निजाम उल-मुल्क व त्याचा वारसादाराचा अभ्यास केलेला आहे.

**1. मीर कमरुद्दीन उर्फ निजाम-उल-मुल्क आसफजाह पहिला (इ.स.1724 ते 1748)**

मीर कमरुद्दीनचा जन्म ऑगस्ट 1661 मध्ये झाला. वयाच्या तेराव्या वर्षी त्याने सैन्यात अधिकारपद मिळविले. त्यानंतर पुढच्याच वर्षी त्याला 'खान' ही पदवी देण्यात आली. दि.20 फेब्रुवारी 1720 औरंगजेब बादशहाच्या मृत्यूच्या वेळी निजाम उल-मुल्क यास विजापूरची सुभेदारी होती. नंतर मात्र दिल्लीच्या राजकारणात त्यांना गौण स्थान देण्यात आले. फरुखसियर या मोगल बादशहाने मीर कमरुद्दीन यास निजाम उल-मुल्क फिरोजजंगखान खानान व चिनकिलीच खान हा किताब बहाल केला. निजाम या शब्दाचा अर्थ व्यवस्था किंवा बंदोबस्त असा होतो. पुढे बादशहा महमंदशहा याने त्याला 'आसिफजाह' हा किताब दिला होता. फेब्रुवारी 1713 मध्ये बादशहा फरुखशियरने मीर कमरुद्दीन निजाम उल-मुल्कची नेमणूक दक्षिणेचा सुभेदार म्हणून केली.[1] पण या पदावर तो अधिक काळ राहिला नाही. इ.स.1715 मध्ये त्याला या पदावरुन कमी केले व त्या ठिकाणी सय्यद हुसेनअलीखान यांची नेमणूक झाली.

यानंतर निजाम उल-मुल्कचे वास्तव्य दिल्लीत राहिले. परंतु तेथे सय्यद बंधुपैकी एक सय्यद अब्दुला यांचे कधीच पटले नाही. त्यामुळे बाशदहा महमंदशहाने निजाम उल-मुल्कची माळव्याच्या सुभेदारीवर नियुक्ती केली. यानंतर दि.15 मार्च 1719 रोजी निजामाने माळव्याकडे न जाता सरळ दक्षिणेची वाट धरली. त्याला दक्षिणेचा सुभेदार मुबारिजखान याने रोखण्याचा प्रयत्न केला. परंतु ऑक्टोबर 1724 मध्ये झालेल्या साखरखेडर्याच्या लढाईत निजाम उल-मुल्कने त्याचा पराभव केला. यानंतर महमंदशहा बादशहाने निजाम उल-मुल्कला पुन्हा सुभेदारी दिली. याचवेळी निजाम उल-मुल्कने बादशहाची दुर्बलता व राजकीय अस्थिरतेचा फायदा घेऊन दि.31 डिसेंबर 1724 मध्ये दक्षिणेत हैदराबाद (भागानगर) याठिकाणी स्वतंत्र राज्याची स्थापना केली. [2] त्यानंतर इ.स.1724 ते 1737 पर्यंत दक्षिणेत मराठयांबरोबर संघर्ष करीत होता. त्यात पेशवा बाजीरावाकडून दि.25 फेब्रुवारी 1728 मध्ये पालखेडच्या लढाईत आणि दि.15 डिसेंबर 1737 मध्ये भोपाळच्या लढाईत त्याला पराभव पत्करावा लाला. मोगल बादशहाने निजाम उल-मुल्कला दिल्लीला इ.स.1737 मध्ये पाचारण केले. कारण मराठयांनी मोगल प्रदेशात मांडलेल्या उच्छादाला आळा घालण्यासाठी निजाम उल-मुल्कचे दिल्लीत यथोचीत स्वागत करुन त्याला अनेक पदव्याने गौरविण्यात आले. वकिल-ए-मुतालिक, जमादत उल-मुल्क, मदार महेमान निजाम उल-मुल्क, बहादूर फतेहजंग यामीन, उस सल्तानत असाफजाह, मुजीब दस्तखत सल्तानाते, सुभेदार ई डेक्कन पेशकश, सरकार-ई-अली पेशकश, सरकार इ-वाला इत्यादी पदव्याने त्याचा गौरव करण्यात आला.

तीन वर्ष दिल्ली राहिल्यानंतर जुलै 1740 ला तो दक्षिणेत आला. इ.स.1741 मध्ये मुंलगा नासिरजंगाबरोबर झालेल्या संघर्षामुळे निजामाचे मन चिंताक्रांत झाले. निजाम उल-मुल्क वार्ध्यक्याकडे झुकल्यामुळे त्याचे पुर्वीचे उपद्व्याप

बहुतेक कमी झाल्याचे दिसते. इ.स.1748 मध्ये दिल्लीवरुन वार्ता पसरली की अहमदशहा अब्दालीचे आक्रमण दिल्लीवर होणार म्हणून निजाम-उल-मुल्क बादशहाच्या संरक्षणासाठी औरंगाबादहून हसनापुरास जाण्यास निघाला तो बऱ्हाणपुरास दि.16 मार्च 1748 ला पोहचला. परंतु औरंगाबाद ते बऱ्हाणपूर पर्यंतच्या प्रवासादरम्यान निजाम उलमुल्क आजारी पडला व 21 मे 1748 ला तो मरण पावला. [3]

निजाम उल-मुल्कचे जीवन मोगल दरबारात एक शक्तीशाली म्हणून गेले. लष्करात निजाम उल-मुल्क एक महान सेनापती म्हणून त्याची ओळख होती. त्याने जीवनात सात प्रातांचे सात राजे आणि 87 युध्दे पाहिले होते. तो तहाचा प्रेमी होता. तो बैठका आरामात घालवायचा तो पर्शियन व तुर्की भाषेतील ओघवान कवी होता. उदार, समंजस आणि खुप पलीकडे पाहण्यास तो लायक होता. स्वत:च्या धर्मावर प्रेम करणारा आणि इतर धर्माबरोबर धर्म सहिष्णूता ठेवणारा होता.

**2. नवाब नासिरजंग - (इ.स.1748 ते 1750)**

इ.स.1748 मध्ये निजाम उल-मुल्कच्या मृत्यूनंतर तो आपल्या वडिलांच्या जागेवर दक्षिणेचा व्यवहार पाहू लागला. नासिरजंगाने हैदराबादचा सर्व खजाना मिळविला व लष्कराने त्याला साथ दिली आणि त्याने स्वत:ला दक्षिणेचा सुभेदार म्हणून जाहीर केले व बिदरचा शाहनवाजखान याला मंत्री नेमले, परंतु नासिरजंगाच्या बहिणीचा मुलगा मुजफ्फरजंग यांनी नासिरजंगाच्या सुभेदारीवर आक्षेप घेतला. त्यामुळे दोघात सुभेदारी पदावरुन तेढ निर्माण होऊन निजाम वारसा युध्दाला प्रारंभ झाला. त्यात फ्रेंच्यानी लाटुच्या नेतृत्वाखाली नासिरजंगच्या छावणीवर हल्ला केला आणि झालेल्या चकमकीत नासिरजंग डिसेंबर 1750 ला मारला गेला. [4]

**3. नवाब मुजफ्फरजंग - (इ.स.1750 ते 1751)**

नवाब नासिरजंगाच्या खूनानंतर नवाब मुजफ्फरजंग फ्रेंच्याच्या मदतीने इ.स.1751 मध्ये दक्षिणेचा सुभेदार बनला. पाँडेचरी येथे महादरबार भरला. मुजफ्फरजंगाने डुप्लेला कृष्णेच्या दक्षिणेतील सर्व प्रदेशाचे गव्हर्नरपद दिले. परंतु याकरिता मुघल सम्राटाची परवानगी हवी होती. त्यानंतर इटलीक्सला 700 घोडयाची मनसबदारी दिली होती. दि.3 फेब्रुवारी 1751 रोजी पठाणांच्या लढाईत मुजफ्फरजंग मारला गेला. [5]

**4. नवाब सलाबतजंग - (इ.स.1751 ते 1762)**

निजाम उल-मुल्कचा तिसरा मुलगा नवाब सलाबत जंग हा दि.3 फेब्रुवारी 1751 रोजी दक्षिणेचा सुभेदार बनला. नवाब सलाबतजंगला फ्रेचांच्या मदतीची आवश्यकता होती. म्हणून बुसी व त्याचे सैन्य नवाब सलाबत जंगासोबत राहिले. मुघल सम्राटाने फर्मान काढून नवाब सलाबत जंगला हैदराबादची सुभेदारी मान्य केली. हे फर्मान हैदराबादमध्ये दि.12 डिसेंबर 1751 रोजी पोहोचले. नवाब सलाबतजंग याने दक्षिणेत मराठयांना यशस्वीरितीने इ.स.1762 पर्यंत तोंड दिले.[6] परंतु निजामअलीखान याने सलाबत जंग याला दि.8 जुलै 1762 रोजी बिदर येथे तुरुंगात टाकले आणि एक वर्षानंतर दि.7 सप्टेंबर 1763 रोजी नवाब सलाबत जंगाचा मृत्यू झाला.

**5. निजाम अलीखान आसफजहा दुसरा - (इ.स.1762 ते 1803)**

मीर निजाम अलीखान याचा जन्म दि.24 फेब्रुवारी 1734 रोजी झाला. तो निजाम उल-मुल्कचा चौथा मुलगा होता. त्याने वयाच्या 28 वर्षी सरकारी व्यवहार पाहण्यास सुरुवात केली. निजाम अलीने नवाब सलाबतजंग याला तुरुंगात टाकून दि.8 जुलै 1762 रोजी सुभेदारी मिळविली. [7] त्याने विठ्ठल सुंदर याला राजा प्रतिभावंत ही पदवी देऊन त्याला आपला दिवाण मंत्री केले. तो दि.10 ऑगस्ट 1763 रोजी राक्षसभूवनच्या लढाईत मारला गेला. त्याच्यानंतर मीर मुसारखानला दिवाण बनविले. निजाम अलीखान याचे सर्वात मोठे योगदान म्हणजे त्याने मुघल डेक्कणला अंतरील व बाहेरील शक्तीच्या आक्रमणापासून वाचलवले. दि.6 ऑगस्ट 1803 रोजी निजामअलीचा मृत्यू झाला.

**6. निजाम सिकंदर अलीखॉ-आसफजाह तिसरा (इ.स.1803 ते 1829)**

निजाम अली मरण पावल्यानंतर सिकंदर जाह हा निजाम बनला. निजामाचा दिवाण अरिस्तो जाह हा इ.स.1804 मध्ये मरण पावला. त्याच्या जागी मीर आलम याची नेमणूक करण्यात आली. [8] तो इंग्रजांशी अत्यंत एकनिष्ठ हेता. त्यामुळे प्रशासनाचे स्वरुप इंग्रजधार्जिणे बनले. पण सिंकदर जाहला हे मुळीच आवडले नाही. त्याने राज्यकारभाराची सूत्रे आपल्या हाती ठेवण्याची धडपड केली. तो व्यसनी आणि निर्बुध्द असल्यामुळे प्रशासनात काही सुधारणा होऊ शकली नाही. तो दि.21 मे 1829 रोजी सिंकदरशहा मरण पावला.

**7. नवाब नासिरुद्योला - आसफजाह चौथा (इ.स.1829 ते 1857)**

नासिरउद्योलाच्या म्हणजे चौथ्या निजामाच्या काळात चंदुलाल दिवाण होता. त्याने दि.6 डिसेंबर 1843 रोजी राजीनामा दिला. त्याच्या राजीनाम्यानंतर हैदराबादमध्ये गंभीर आर्थिक परिस्थिती निर्माण झाली. निजाम सरकारला ईस्ट इंडिया कंपनीचे 64 लाख रुपये कर्ज झाले. त्यापैकी 29 लाख रुपयाची परतफेड करण्यात आली. इ.स.1853 मध्ये दिवाण सिराज उल-मुल्क मरण पावला त्यानंतर सालारजंग पाहिला हा दिवाण बनला. त्याने हैदराबाद राज्याच्या न्याय, महसूल पोलिस, लष्कर, अर्थचलन, टपाल खाते, शिक्षण, आरोग्य, सार्वजनिक बांधकाम या विविध क्षेत्रात आमुलाग्र सुधारणा केल्या. त्यामुळे सालारजंग पहिला यास हैदराबाद संस्थानातील 'आधुनिक युगाचे जनक' असे संबोधले जाते.[9] इ.स. 1857 मध्ये निजाम नासिरउद्योला मरण पावला.

**8. निजाम अफजल उदद्योला असफजहा पाचवा (इ.स.1857 ते 1869)**

निजाम नासिरउद्योलाच्या मृत्यूनंतर अफजलउद्योला हा निजाम झाला. त्याच्या कारकिर्दीस सालारजंग पहिला हाच दिवाण असल्यामुळे त्याने सुधारणांची प्रक्रिया पुढे चालू ठेवली. इ.स.1857 मध्ये इंग्रज सत्तेविरुध्द प्रचंड क्षोभ निर्माण झाला. त्याचे प्रतिध्वनी मराठवाडयात काही ठिकाणी उमटले. इ.स.1857 च्या उठावाच्या वेळी निजामाने इंग्रजांना प्रचंड सहाय्य केले.[10] त्याचे बक्षीस म्हणून इ.स.1860 चा तह करण्यात आला. त्याप्रमाणे नळदुर्ग (उस्मानाबाद) व रायपूर हे 21 लाख रुपये उत्पन्नाचे जिल्हे निजामास परत देण्यात आले. इ.स.1869 मध्ये अफजलउद्योला मरण पावला.

**9. निजाम मीर महबूब अली असफजहा सहावा (इ.स.1869 ते 1911)**

मीर महबूबअली अज्ञान असल्यामुळे राज्यकारभार चालविण्यासाठी सर सालारजंग याला राजमुखत्यार म्हणून नेमले. राज्याच्या कल्याणासंबंधी इंग्रज रेसिडेंटच्या सल्ला घेण्याची पध्दत आरंभ करण्यात आली. न्याय, महसूल, पोलिस व इतर किरकोळ खात्यांसाठी मंत्र्यांची नेमणूक करण्यात आली. या काळात अनेक विद्वान व अनुभवी प्रशासक हैदराबाद राज्यात आणले गेले. सालारजंग पहिला मरण पावला. त्यानंतर इ.स.1884 मध्ये मीर महबूब अली वयात आल्यामुळे त्यास राजपदाची वस्त्रे प्रदान करण्यात आली.

निजामाने इ.स.1813 मध्ये 'कानूनचा-ए-मुबारक' हे प्रशासनात सुधारणा करणारे फर्मान काढले.[11] त्यानुसार सत्तेचे विभाजन आणि आर्थिक सुधारणा अभिप्रेत होत्या. दिवाण उस्मानजहास हे आवडले नाही. त्याने राजीनामा दिला. त्यानंतर लॉर्ड कर्झन स्वत: हैदराबादला आला. त्याने दादागिरी करुन निजामाशी तह केला. (1902) या तहान्वये वऱ्हाड प्रांत कायम भाडेपट्टयाने इंग्रजांनी घेतला. निजामाला त्याच्या मूळ हक्काबद्दल वर्षाला 25 लाख रुपये देण्याचे कबूल केले. इ.स.1911 निजाम मीर महेबूब अली मरण पावला.

**10. निजाम मीर उस्मानअली असाफजहा सातवा (इ.स.1911 ते 1948)**

दि.29 ऑगस्ट 1911 या दिवशी म्हणजेच वयाच्या 25 व्या वर्षी मीर उस्मान अलीखान बहादुर, सातवा निजाम सत्तेवर आला. तो अत्यंत धनलोभी व चिकू असून साध्या राहणीचा पुरस्कर्ता होता. हैदराबादच्या आधुनिकीकरणासाठी त्याने अविश्रांत श्रम केले, यात शंका नाही. इतर संस्थानिकांपेक्षा आपले स्वतंत्र अस्तित्व आहे असे माणणारा व हैदराबादची व्यवस्था एखाद्या राष्ट्राप्रमाणे ठेवणारा तो निजाम होता. त्याने आपल्या राज्यात स्वतंत्र वाहतूक व्यवस्था,रेल्वे व पोस्ट, चलन व्यवस्था, बँका, लष्कर व सिव्हील या गोष्टींची सुसंबध्द सोय केली. सत्तेवर आल्यावर त्याने स्वत:चे धार्मिक धोरण जाहीर केले.[12] या धार्मिक धोरणामुळे हैदराबाद संस्थानामधील हिंदू जनतेवर अन्याय झाले. त्यामुळे दि.13 सप्टेंबर 1948 ला भारत सरकारने, पोलिस कारवाई करुन दि.17 सप्टेंबर 1948 ला हैदराबाद संस्थान भारतात विलिन करण्यात आले.

**सारांश :**

निजामाने 225 वर्ष हैदराबाद संस्थानावर स्वत:चे प्रभूत्व निर्माण केले. हैदराबादचा निजाम आणि त्याचे घराणे म्हणजे भारतीय स्वातंत्र्य, समाज आणि संस्कृती यांना सुमारे 225 वर्ष पोखरणारी कीड होती. या घराण्यातील सर्वच निजाम युध्दे हरण्यात व तह जिंकण्यात तरबेज होती. तत्कालीन इतिहासाचा मागोवा घेतला तर असे दिसते की, त्यांनी कुठेच लढाई जिंकली नाही. त्यांना खरी धास्ती मराठयांची वाटत असे. त्यांनी परिस्थितीपुढे शरणागती पत्करली अथवा बलवानापुढे नस्तमस्तक होऊन आपले राज्य टिकविले ही परंपरा पहिल्या सहा निजामापर्यंत चालू राहिली. सातव्या निजामावर प्रत्यक्ष लढाईची वेळच आली नाही. सातव्या निजामात आणि त्यापूर्वी होऊन गेलेल्या निजामात बराच फरक होता. त्याच्या पुर्वीचे

निजाम ऐषआरामी, अल्पसंतुष्ट आणि सुखलोलूप होते. सातवा निजाम मात्र ऐश्वर्यसंपन्न होता. त्याच्या काळात तर तो जगातील फार थोडया व निवडक श्रीमंतापैकी एक होता. सरंजामशाही अर्थव्यवस्था आणि इंग्रजांची गुलामगिरी हे निजामशाहीचे वैशिष्ट्ये होते. इंग्रजांनी कोणत्याही निजामास स्वातंत्र्य लाभूच दिले नाही.

**संदर्भ:**


1. रेगानी सरोजनी, निजाम-ब्रिटिश रिलेशन, (इंग्रजी), 1724-1857, कंन्सेंट पब्लिशिंग कंपनी, न्यु दिल्ली, 1963, पृ. 124
2. आंधप्रदेश डिस्ट्रीक्ट गॅझेटिअर्स, गव्हन्मेंन्ट ऑफ आंधप्रदेश, हैदराबाद, रिप्रेन्टेड ऑफ मयूर ऑफसेट प्रिन्टिअर्स, हैदराबाद, 2002, पृ. 186
3. पगडी सेतु माधवराव, एटिंन्थ सेंच्युरी डेक्कन, (इंग्रजी), पॉप्युलर प्रकाशन, बॉबे, 1963, पृ. 61
4. डेक्कन स्टडीज, सेंटर फॉर डेक्कन स्टडीज, जर्नलस, व्हॅल्युम-6, हैदराबाद, जानेवारी-जून 2008, पृ. 53
5. नय्यीम एम.ए., द स्पेलेंडर ऑफ हैदराबाद,(इंग्रजी), द लास्ट फेज ऑफ ॲन ओरिएन्टल कल्चर, हैदराबाद, पब्लिशर्स हैदराबाद, 2002, पृ. 94
6. पगडी सेतू माधवराव, (अनु), मराठे निजाम, उर्दू-फारसे साधने, इतिहास संशोधन मंडळ, मराठी ग्रंथ संग्रहालय, मुंबई,1961, पृ. 54
7. नय्यीम एम.ए., द स्पेलेंडर ऑफ हैदराबाद, (इंग्रजी), उपरोक्त, पृ. 96
8. काटे पी.व्ही., मराठवाडयाचा इतिहास, कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, जून 1999, पृ. 101
9. किता, पृ. 105
10. किता, पृ. 106
11. कुंटे भ.ग., स्वातंत्र्य-सैनिक चरित्रकोश, महाराष्ट्र राज्य, मराठवाडा विभाग, मुंबई, 1976, पृ.-7
12. देशपांडे प्र.नं., (संपा.), संशोधक, त्रैमासिक, वर्ष 51, अंक दुसरा व तिसरा, धुळे, जून आणि सप्टेबर-1983, पृ. 29.

# भारतीय सांस्कृतिक वारशाचे संरक्षण आणि त्याची महत्त्वता

**डॉ. प्रकाश गणपती सुरवसे**
मिलिंद कला महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर

भारतीय ज्ञान परंपरेला विविध क्षेत्रांमध्ये - तत्त्वज्ञान, विज्ञान, औषध, गणित आणि कला - समृद्ध वारसा आहे. हजारो वर्षांच्या सांस्कृतिक, धार्मिक आणि बौद्धिक परंपरेतून विकसित झालेली ही प्रणाली आजच्या ज्ञानपरंपरेवर महत्त्वपूर्ण प्रभाव टाकते. या शोधनिबंधात भारतीय ज्ञान परंपरेचा उगम, विकास आणि समकालीन महत्त्व यावर चर्चा केली आहे. आयुर्वेद, योग, खगोलशास्त्र आणि भाषाशास्त्र या विविध विषयांवर दृष्टिक्षेप टाकत या अभ्यासाने ज्ञानाच्या समग्र आणि आंतरशाखीय दृष्टिकोनावर भर दिला आहे. प्राचीन तत्त्वज्ञानाच्या समकालीन आव्हानांवर उपाय शोधण्यासाठीच्या उपयुक्ततेवर या शोधनिबंधात विशेष भर देण्यात आला आहे.

**मुख्य शब्द:** भारतीय ज्ञान परंपरा, तत्त्वज्ञान, आयुर्वेद, आंतरशाखीय दृष्टिकोन

## परिचय

भारतीय ज्ञान प्रणाली जगातील सर्वात प्राचीन आणि सुसंस्कृत बौद्धिक परंपरांपैकी एक आहे, ज्याचे स्वरूप आणि महत्त्व कालाच्या ओघात अधिक समृद्ध झाले आहे. हजारो वर्षांच्या कालखंडात या परंपरेने तत्त्वज्ञान, भाषाशास्त्र, गणित, खगोलशास्त्र, वैद्यकशास्त्र आणि आध्यात्मिक पद्धती यांसारख्या विविध क्षेत्रांमध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. या ज्ञान परंपरेच्या मुळांचा शोध प्राचीन ग्रंथांमध्ये, मौखिक परंपरेत आणि विद्वत्तापूर्ण ग्रंथांमध्ये खोलवर रुजलेला आहे.

वेद, उपनिषदे आणि महाभारत व रामायण यांसारखी महाकाव्ये या बौद्धिक परंपरेचे आधारस्तंभ आहेत. वेदांनी ब्रह्मज्ञानाचे विविध पैलू उलगडले, तर उपनिषदांनी तत्त्वज्ञानाला खोलवर अर्थ दिला. महाभारत आणि रामायण या महाकाव्यांनी जीवनमूल्ये आणि नैतिकता यांचा प्रचार केला. या ग्रंथांना पूरक अशी व्याकरण, वैद्यक आणि खगोलशास्त्र यांसाठी पाणिनीचे *अष्टाध्यायी*, चरकसंहिता आणि आर्यभटाचे *आर्यभटीय* हे ग्रंथ महत्त्वाचे मानले जातात. या ज्ञान प्रणालीने केवळ आध्यात्मिक व बौद्धिक क्षेत्रातच नव्हे तर जीवनशैली आणि समाजरचनेतही मूलभूत योगदान दिले आहे. संस्कृत भाषेच्या माध्यमातून विद्वत्तेचा प्रसार होण्यास चालना मिळाली. गणित आणि खगोलशास्त्राच्या प्रगतीत भारतीय विद्वानांनी मोलाची कामगिरी बजावली. चरकसंहितेसारख्या ग्रंथांनी वैद्यकशास्त्राच्या तत्त्वांना वैज्ञानिक अधिष्ठान दिले.

अनेक शतकांतील राजकीय व सांस्कृतिक अडचणींनंतरही भारतीय ज्ञान प्रणालीने लवचिकता आणि जुळवून घेण्याची क्षमता दाखवली आहे. परकीय आक्रमणांमुळे झालेल्या धक्क्यांनंतरही या परंपरेचे अस्तित्व टिकून राहिले. आधुनिक काळात, विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रांमध्ये प्रगती होत असतानाही भारतीय तत्त्वज्ञान आणि ज्ञानपद्धतींचे महत्त्व कमी झाले नाही. आजच्या जागतिक आव्हानांना सामोरे जाताना भारतीय ज्ञान प्रणालीच्या तत्त्वांचे समकालीन ज्ञान प्रणालींमध्ये समावेश करणे अत्यावश्यक झाले आहे. शाश्वत विकास, पर्यावरण संवर्धन, मानसिक आरोग्य आणि मानवी मूल्ये यांसारख्या क्षेत्रांमध्ये भारतीय ज्ञान प्रणालीचे विचार मौल्यवान ठरू शकतात. त्यामुळे जागतिक स्तरावर भारतीय बौद्धिक परंपरांचा पुनर्विचार आणि पुनरुत्थान आवश्यक आहे.

भारतीय तत्त्वज्ञान जगातील सर्वात प्राचीन आणि समृद्ध बौद्धिक परंपरांपैकी एक आहे. "भारतीय तत्त्वज्ञानाच्या न्याय आणि वेदांत प्रणालींनी शतकानुशतके बौद्धिक विचारांना आकार दिला आहे."[1] या तत्त्वज्ञानाने मानवाच्या अस्तित्व, सत्य, नीतीशास्त्र आणि ज्ञानमीमांसेच्या प्रश्नांवर विचार करण्यासाठी मूलभूत मार्गदर्शन केले आहे. भारतीय तत्त्वज्ञान विविध विचारप्रणाल्यांनी युक्त आहे, ज्यामध्ये प्रत्येक विचारधारा विश्वाच्या तत्त्वज्ञान, नैतिकता आणि जीवनाच्या रहस्यांबाबत स्वतःची दृष्टिकोन मांडते.

या विचारधारांना आस्तिक (ज्या वेदांना प्रमाण मानतात) आणि नास्तिक (ज्या वेदांना मान्यता देत नाहीत) असे दोन गटांमध्ये वर्गीकृत करता येते. न्याय, वैशेषिक, सांख्य, योग, मीमांसा आणि वेदांत या आस्तिक परंपरा आहेत, तर चार्वाक, जैन आणि बौद्ध परंपरा नास्तिक गटात येतात. न्याय प्रणालीने तर्कशास्त्र आणि विचारमंथनाला प्रोत्साहन दिले, तर वेदांताने आत्मा, ब्रह्म आणि मोक्ष यांसारख्या तात्त्विक संकल्पनांवर भर दिला. "पाणिनीचे *अष्टाध्यायी*

व्याकरणशास्त्रातील अद्वितीयतेचे दर्शन घडवते".[2] भारतीय ज्ञान प्रणालीचा एक महत्त्वाचा घटक म्हणजे भाषाशास्त्र. पाणिनीने रचलेले *अष्टाध्यायी* हे संस्कृत व्याकरणावरील एक विस्तृत आणि शास्त्रीय ग्रंथ आहे. या ग्रंथात अत्यंत तर्कशुद्ध नियम मांडले गेले आहेत, ज्यामुळे ते केवळ भाषाशास्त्रासाठीच नव्हे, तर तर्कशास्त्र आणि संरचनात्मक विचारांसाठीही महत्त्वपूर्ण ठरते. "आर्यभटांनी गणित आणि खगोलशास्त्राच्या क्षेत्रात क्रांतिकारक योगदान दिले".[3] भारतीय गणित आणि खगोलशास्त्रात प्राचीन काळापासूनच उल्लेखनीय कामगिरी झाली आहे. आधुनिक गणितासाठी अत्यावश्यक असलेली दशांश पद्धती आणि शून्य यांची मुळे भारतात आहेत. आर्यभट, ब्रह्मगुप्त आणि भास्कर यांनी बीजगणित, त्रिकोणमिती आणि कॅल्क्युलसच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण प्रगती केली. आर्यभटाने पृथ्वीच्या परिभ्रमणाची संकल्पना मांडली, ज्यामुळे खगोलशास्त्रात क्रांती झाली.

"चरकसंहिता शरीर आणि मन यामधील संतुलनावर भर देऊन आरोग्यासाठी समग्र दृष्टिकोन मांडते".[4] वैद्यकशास्त्रातील चरकसंहिता ही आरोग्यविषयक समग्र दृष्टिकोनाची एक महत्वपूर्ण कृती आहे. या ग्रंथात केवळ शारीरिक उपचारांवर भर दिलेला नाही तर मानसिक स्वास्थ्य आणि जीवनशैलीतील संतुलनालाही महत्त्व दिले गेले आहे. चरकसंहितेने आरोग्यविषयक उपचारांमध्ये प्रकृती, जीवनशैली आणि आहाराचे महत्त्व अधोरेखित केले. भारतीय ज्ञान प्रणाली केवळ प्राचीन काळापुरती मर्यादित नाही, तर तिचे तत्त्वज्ञान आणि शास्त्रीय योगदान आजही समकालीन विज्ञान, आरोग्य आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात प्रेरणादायी ठरत आहे. आयुर्वेद ही प्राचीन वैद्यक प्रणाली शरीर, मन आणि आत्म्याच्या संतुलनावर आधारित आरोग्य आणि कल्याणाचा समग्र दृष्टिकोन देते. चरकसंहिता आणि सुश्रुतसंहिता यांसारखे ग्रंथ रोगनिदान, उपचार पद्धती आणि शस्त्रक्रियांच्या तपशीलवार माहिती देतात. "पतंजलींच्या योगसूत्रांमध्ये आत्मसाक्षात्कारासाठी संपूर्ण मार्गदर्शन आहे".[5] योग ही भारतीय ज्ञान प्रणालीतील एक महत्त्वपूर्ण शाखा आहे. पतंजलींच्या *योगसूत्रांवर* आधारित ही प्रणाली शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक कल्याणासाठी एक समग्र मार्ग प्रदान करते.

**नैतिकता आणि सामाजिक तत्त्वज्ञान**

भारतीय ज्ञान प्रणालीतील नैतिक तत्त्वे तत्त्वज्ञान, धर्म आणि सांस्कृतिक परंपरांशी सखोलपणे जोडलेली आहेत. या प्रणालीने जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात नैतिक मार्गदर्शन प्रदान केले आहे. धर्म (कर्तव्य), अहिंसा (हिंसेपासून दूर राहणे) आणि कर्म (कृत्य आणि त्याचे परिणाम) या संकल्पना भारतीय समाजाच्या नैतिक संरचनेचा पाया तयार करतात. धर्म म्हणजे सामाजिक, नैतिक आणि वैयक्तिक जबाबदाऱ्या पाळण्याचे तत्त्व. जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर व्यक्तीने आपल्या कर्तव्यांचे पालन करणे आवश्यक मानले जाते. अहिंसा ही भारतीय तत्त्वज्ञानातील एक मूलभूत संकल्पना आहे, जी केवळ हिंसेपासून दूर राहण्याचा उपदेश देत नाही, तर प्रेम, सहानुभूती आणि सहिष्णुतेचे मूल्यही शिकवते. कर्म सिद्धांत व्यक्तीच्या कृत्यांचे परिणाम जीवनात व पुढील जन्मात कसे प्रतिबिंबित होतात, हे स्पष्ट करतो. या तत्त्वांनी भारतीय संस्कृतीत सामाजिक व नैतिक मूल्यांची जडणघडण केली आहे.

"भरताचे *नाट्यशास्त्र* नृत्य, संगीत आणि रंगमंचाच्या तत्त्वांवर सखोल मार्गदर्शन करते".[6] भारतीय ज्ञान प्रणाली केवळ नैतिक आणि धार्मिक विचारांपुरती मर्यादित नाही; ती कला आणि सौंदर्यशास्त्राचा समृद्ध वारसा देखील सामावून घेते. *नाट्यशास्त्र* हा नाटक आणि प्रदर्शन कलांवरील एक महत्त्वपूर्ण ग्रंथ आहे, ज्याचे रचनाकार भरत मुनी मानले जातात. या ग्रंथात नृत्य, संगीत आणि अभिनय या कलांचे सखोल मार्गदर्शन दिले आहे. *नाट्यशास्त्र* केवळ मनोरंजनाचे साधन म्हणून नाटकाला महत्त्व देत नाही, तर त्याला आध्यात्मिक आणि नैतिक उन्नतीचे साधन मानते. नाट्य, संगीत आणि नृत्य यांमुळे मानवी भावना प्रकट होतात आणि त्याद्वारे आत्मशुद्धी घडून येते, अशी या ग्रंथाची धारणा आहे. रंगमंचावर सादर होणारे कलाप्रकार समाजाला नैतिक शिक्षण देण्याचे महत्त्वपूर्ण साधन बनतात.

भारतीय ज्ञान परंपरेतील हे तत्त्वज्ञान केवळ प्राचीन काळापुरते मर्यादित नाही, तर आजच्या काळातही कला, नैतिकता आणि तत्त्वज्ञान यांना प्रेरणा देत राहते. अशा या बहुआयामी परंपरेच्या विचारांचा जागतिक सांस्कृतिक आणि नैतिक वारशावर मोठा प्रभाव पडतो.

**समकालीन महत्त्व**

आधुनिक विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या अभूतपूर्व प्रगतीच्या युगातही भारतीय ज्ञान प्रणाली आपल्या अद्वितीय तत्त्वज्ञानाने आणि वैदिक परंपरेने समकालीन आव्हानांवर उपाय देण्यास प्रासंगिक ठरते. आज, जेव्हा संपूर्ण जगाने विज्ञान,

तंत्रज्ञान आणि औद्योगिकीकरणाच्या धक्यात जीवनशैलीच्या बदलांना स्वीकारले आहे, तेव्हा भारतीय ज्ञान प्रणाली, विशेषतः आयुर्वेद आणि योग, व्यक्तीच्या मानसिक, शारीरिक आणि आत्मिक आरोग्याला संपूर्णपणे समजून त्यावर उपाय शोधण्याची क्षमता दाखवते.

आयुर्वेद हा प्राचीन भारतीय वैद्यकशास्त्राचा एक प्रमुख स्तंभ आहे, जो शरीर, मन आणि आत्म्याचे समग्र संतुलन साधण्याच्या तत्त्वावर आधारित आहे. आयुर्वेदात प्रत्येक व्यक्तीच्या प्रकृतीला लक्षात घेऊन जीवनशैली, आहार, औषधे आणि उपचार पद्धती निर्धारित केल्या जातात. यातील "समग्र दृष्टिकोन"[7] म्हणजे शरीरातील प्रत्येक घटकाचा परस्परसंबंध मान्य करून त्यांना संतुलित ठेवणे. आजच्या काळात, जेव्हा अनेक शारीरिक आणि मानसिक आजार जीवनशैलीच्या व्यस्ततेमुळे वाढत आहेत, तेव्हा आयुर्वेदाच्या तत्त्वज्ञानाने या आजारांच्या निवारणासाठी एक नैतिक आणि शारीरिक दृष्टिकोन दिला आहे. योग ही एक अशी पद्धत आहे जी मनोविकारांवर नियंत्रण ठेवून शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्याची साधना करते. योगाचा अभ्यास केवळ शारीरिक व्यायामापुरता मर्यादित नाही, तर तो आत्मज्ञान, समज आणि आंतरिक शांती प्राप्त करण्याच्या प्रक्रियेशी निगडीत आहे. आधुनिक काळात वाढत्या ताणतणाव, चिंता आणि मानसिक आजारांच्या समस्यांवर योगाचे अत्यंत प्रभावी उपाय म्हणून ओळखले जाते. योगाच्या श्वसन तंत्रज्ञान आणि ध्यानाचे विविध प्रकार व्यक्तीला मानसिक शांती आणि शारीरिक स्वास्थ्य प्राप्त करण्यास मदत करतात.

आजच्या विज्ञानाधारित जगात, आयुर्वेद आणि योग या पद्धतींना एक वैद्यकीय आणि मानसिक स्वास्थ्याच्या क्षेत्रात एक महत्त्वपूर्ण पर्याय म्हणून स्वीकारले जात आहे. जीवनशैलीतील अनियमितता आणि तणावाचे परिणाम म्हणून अनेक शारीरिक व मानसिक समस्यांशी सामना करणाऱ्या लोकांसाठी या प्राचीन पद्धती आधुनिक उपचार पद्धतींशी परस्पर पूरक ठरू शकतात. समग्र दृष्टिकोन ठेवून आयुर्वेद आणि योग या भारतीय ज्ञान प्रणालीच्या पद्धती आजच्या जगातील अनेक आव्हानांसाठी उपयुक्त ठरतात, ज्यामुळे त्या तत्त्वज्ञानाचे महत्त्व अजून अधिक वाढते.

**संवर्धन आणि प्रोत्साहन**

भारतीय ज्ञान परंपरेचे संवर्धन आणि प्रोत्साहन यासाठी शैक्षणिक संस्थांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली पाहिजे. भारतीय ज्ञानाची दीर्घकालीन परंपरा केवळ प्राचीन ग्रंथांमध्येच नाही, तर त्या परंपरेशी संबंधित विविध विचारधारा, तत्त्वज्ञान, विज्ञान, कला आणि संस्कृती यांमध्ये समाहित आहे. या ज्ञान परंपरेचा अभ्यास आणि प्रचार करण्यासाठी शैक्षणिक संस्थांचे कार्य अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांना पारंपरिक ज्ञानाच्या शास्त्रीय अभ्यासासाठी योग्य सुसंगत धोरणे निर्माण करणे आवश्यक आहे, जेणेकरून या मूल्यवान वारशाचे संरक्षण आणि प्रगती होऊ शकतील.

शैक्षणिक संस्थांनी पारंपरिक ज्ञानाचे संशोधन आणि दस्तऐवजीकरण प्रोत्साहित केले पाहिजे. भारतीय ज्ञान परंपरेतील असंख्य ग्रंथ, तत्त्वज्ञान, चिकित्सा पद्धती आणि शास्त्रज्ञांची कार्ये मोठ्या प्रमाणावर लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत, किंवा त्या उपलब्ध नसल्यामुळे त्यांना योग्य प्रकारे अध्ययनासाठी वापरता येत नाही. म्हणून, या ज्ञानाची नीटनेटके दस्तऐवजीकरण करणे आणि त्यावर संशोधन करणे आवश्यक आहे. यासाठी पारंपरिक भाषांचा अभ्यास, संस्कृत आणि प्राचीन भारतीय भाषांची शुद्धता राखून त्या भाषांमध्ये असलेल्या ज्ञानाचा शोध घेणे आवश्यक आहे.

पारंपरिक ज्ञानाच्या संशोधनातून नव्या पिढीला त्याच्या ऐतिहासिक व सांस्कृतिक वारशाची महती समजावून देता येईल. उदाहरणार्थ, आयुर्वेद, योग, वास्तुशास्त्र, गणित, संगीत आणि नृत्य यांसारख्या क्षेत्रांमध्ये भारतीय ज्ञान परंपरेचे अनमोल योगदान समजून शालेय व महाविद्यालयीन अभ्यासक्रमांमध्ये त्याचा समावेश करणे आवश्यक आहे. यामुळे विद्यार्थ्यांना या परंपरांच्या विविध पैलूंचा सखोल अभ्यास करता येईल आणि ती परंपरा आधुनिक संदर्भात पुन्हा जीवंत होईल.

शैक्षणिक संस्थांनी भारतीय ज्ञान परंपरेचे जतन करण्यासाठी जागतिक स्तरावर पॅनेल्स, परिसंवाद, कार्यशाळा आणि परिषदांचे आयोजन करणे आवश्यक आहे, जेथे संशोधक, विचारवंत, शास्त्रज्ञ आणि तज्ञ एकत्र येऊन या ज्ञानाच्या संदर्भात चर्चासत्रे आयोजित करू शकतात. त्याचप्रमाणे, शैक्षणिक संस्थांनी भारतीय ज्ञान परंपरेला आधुनिक विज्ञान, तंत्रज्ञान आणि समकालीन विदयांचा आधार देऊन प्रकट करणे आवश्यक आहे. यामुळे त्या ज्ञानाला एक समकालीन संदर्भ मिळेल आणि त्याची उपयोगिता आजच्या सामाजिक आणि वैश्विक समस्यांवर उपाय शोधण्यासाठी व्यक्त होईल. आखरीत, भारतीय ज्ञान परंपरेचे जतन आणि प्रोत्साहन केल्याने केवळ देशाची सांस्कृतिक आणि वैचारिक संपत्ति वाढणार

नाही, तर त्याचा उपयोग मानवतेच्या प्रगतीसाठी देखील केला जाऊ शकतो. अशा प्रकारे, शैक्षणिक संस्थांना या परंपरेचे संरक्षण आणि प्रसार करण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली पाहिजे.

**निष्कर्ष**

भारतीय ज्ञान प्रणाली आपल्या सांस्कृतिक वारशाचा अमूल्य ठेवा आहे, ज्यामध्ये विविध शास्त्रे, तत्त्वज्ञान, आणि नैतिक मूल्यांचा समृद्ध समावेश आहे. या ज्ञान प्रणालीत वेद, उपनिषदे, योगशास्त्र, आयुर्वेद, ज्योतिषशास्त्र, अर्थशास्त्र, नीतिशास्त्र इत्यादी विषयांवर सखोल विचार केलेला आहे. या प्राचीन तत्त्वज्ञानाच्या मदतीने मानवी जीवनाच्या प्रत्येक अंगाला मार्गदर्शन मिळू शकते.

आजच्या आधुनिक समाजाला विविध आव्हानांना सामोरे जावे लागत आहे—पर्यावरणीय समस्या, मानसिक आरोग्याचे प्रश्न, ताणतणाव व्यवस्थापन, तंत्रज्ञानाचे वेगवान परिवर्तन आणि सामाजिक विसंगती यांसारख्या मुद्द्यांना उत्तर देण्यासाठी भारतीय ज्ञान परंपरेत मौल्यवान उत्तरं आहेत. योग आणि ध्यानाच्या तंत्रांनी मानसिक संतुलन राखण्यास मदत होते, तर आयुर्वेदाच्या तत्त्वांनी आरोग्य राखण्यासाठी सेंद्रिय व जीवनशैलीशी संबंधित उपाय सुचवले आहेत. तसेच, नीतिशास्त्र आणि धर्मशास्त्रातील तत्त्वे सामाजिक ऐक्य, न्याय आणि मूल्याधिष्ठित जीवनशैलीचा संदेश देतात. आधुनिक विज्ञान व भारतीय ज्ञान प्रणाली यांचा समन्वय साधल्यास आपण शाश्वत विकासाचा मार्ग शोधू शकतो. म्हणूनच, या प्राचीन तत्त्वज्ञानाला आधुनिक काळात स्वीकारून आपण वेगवेगळया आव्हानांना यशस्वीरीत्या सामोरे जाऊ शकतो.

**संदर्भ :**

1. चटोपाध्याय देबीप्रसाद, प्राचीन भारतातील विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा इतिहास, फर्मा केएलएम, 1986, पृ. 132.
2. अय्यंगार बी. के. एस., योगाचे चित्रमय प्रकाशन, हार्पर कॉलिन्स पब्लिशर्स, 1993, पृ. 89.
3. मुखर्जी सुजित, भारतीय साहित्य कोश : सुरुवातीपासून 1850 पर्यंत. ओरिएंट ब्लॅकस्वान, 1998, पृ. 102.
4. मुखर्जी सुजित, भारतीय साहित्य कोश : सुरुवातीपासून 1850 पर्यंत. ओरिएंट ब्लॅकस्वान, 1998, पृ. 145.
5. रधाकृष्णन एस., भारतीय तत्त्वज्ञान, खंड I आणि II, ऑक्सफर्ड विद्यापीठ प्रकाशन, 2008, पृ. 45.
6. शर्मा, आर.एस., भारताचा प्राचीन इतिहास, ऑक्सफर्ड विद्यापीठ प्रकाशन, 2007.
7. सिंग, बाळ राम. प्राचीन भारतीय ग्रंथांमधील विज्ञानाचे अन्वेषण, डी.के. प्रिंटवर्ल्ड, 2015, पृ. 56.

# ख्रिश्चन मिशनऱ्यांचे योगदान : सामाजिक सुधारणा चळवळीच्या परिप्रेक्ष्यातून केलेला एक चिकित्सक अभ्यास

**डॉ. दिपक वामनराव सुर्यवंशी**
इतिहास विभाग प्रमुख
सहकारभूषण एस. के. पाटील कॉलेज, कुरुंदवाड

**डॉ. देविदास गोविंद चव्हाण**
इतिहास विभाग
सहकारभूषण एस. के. पाटील कॉलेज, कुरुंदवाड

**प्रस्ताविक**

आधुनिक भारतातील सामाजिक व धार्मिक प्रबोधन चळवळ, भारतीय स्वातंत्र्य चळवळीप्रमाणेच अत्यंत महत्त्वाची ठरते. कारण या सामाजिक व धार्मिक प्रबोधनामुळे भारतीयांमध्ये नवविचार रुजविण्याचे, त्यांना जागृत करण्याचे व त्यांच्यात नवचैतन्य निर्माण करण्याचे कार्य घडून आले. सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळीमुळेच प्रबुद्ध बनलेल्या भारतीय समाजाने आपल्या स्वातंत्र्यासाठी प्रदीर्घ अशी स्वातंत्र्याची चळवळ उभारली. भारताच्या इतिहासातील 19 वे शतक हे राष्ट्रवादाच्या विकासाबरोबरच सामाजिक व धार्मिक क्षेत्रात घडून आलेली परिवर्तने या दृष्टीने महत्त्वाचे आहे. या कालखंडात ख्रिश्चन मिशनऱ्यानी हिंदू धर्मावर टीका सुरू केली ही टीका काही नवशिक्षितांना अविवेकी असल्याची जाणीव झाली. समाजातली अनिष्ठ प्रथा, परंपरा दूर सारून समाजाला खऱ्या धर्माची ओळख करून देणे व शास्त्रीय दृष्टिकोनाच्या आधारे समाज गतीशील बनविणे आवश्यक वाटू लागले. भारतीय समाजसुधारकांनी विविध संस्थेच्या माध्यमातून भारतीय समाजाला आत्मपरिक्षण करण्यास भाग पाडले. व भारतामध्ये सामाजिक व धार्मिक प्रबोधन घडून आले. या सर्व घडामोडीमध्ये ख्रिश्चन मिशनऱ्यांनी प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरीत्या मोलाचे योगदान दिले. म्हणूनच सदरच्या शोध निबंधामध्ये 19 व्या शतकातील ख्रिश्चन मिशनांऱ्यांच्या योगदानाचा चिकित्सक साधार आढावा घेतला आहे.

ख्रिश्चन धर्मामध्ये आपल्या धर्मतत्वांचा जगभर प्रचार व प्रसार करणारी व त्याद्वारे ख्रिश्चन धर्म अनुयायांची संख्या वाढविणारी एक स्वतंत्र यंत्रणा कार्यरत होती. अप्रगत, मागासलेल्या समाजात धर्मप्रसार करणाऱ्या संस्थांना 'मिशन' व धर्मप्रसाराचे कार्य करणाऱ्या व्यक्तींना 'मिशनरी' म्हणतात. अनेक अडचणींचा सामना करून ते अगदी चिकाटीने धर्मप्रसार करीत असत. त्यानंतर त्यांनी अप्रगत मागासलेल्या लोकांना मदतीचा आधार देऊन त्यांच्याशी सेवाभावी वृत्तीने वागून प्रथम लोकांची मने जिंकण्याचे आणि त्यांच्या मनात ख्रिश्चन धर्माविषयी आकर्षण निर्माण करायचे अशी त्यांची सर्वसामान्य पद्धत होती, म्हणूनच त्यांनी पहिल्यांदा सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात कार्य सुरू केलेले दिसते. या ख्रिश्चन मिशनऱ्यांना सन 1813 मध्ये भारतात येण्याची परवानगी मिळाल्यानंतर त्यांनी सुशिक्षित वर्गात ख्रिश्चन धर्मातील उच्च व आदर्श तत्वे, समानता, नितीतत्वे यांचे महत्त्व पटवून सांगितले आणि त्याचबरोबर हिंदू धर्मातील अनिष्ट रिती, रिवाज व परंपरा दाखवून दिल्या. साहजिकच, सुशिक्षित तरुण वर्गाला ख्रिश्चन धर्मातील, एकेश्वरवाद, आदर्श नितीतत्वे, सामाजिक समता याविषयी आकर्षण वाटू लागले परिणामी धर्मांतर घडून आले. शिक्षण प्रसाराने धर्मप्रसाराला मदत होईल अशी धारणा असल्याने मिशनऱ्यांनी जाणून - बुजून शिक्षण आणि धर्मप्रसार यांची सरमिसळ केली.

शिक्षणाबरोबरच धर्मार्थ दवाखाने चालविणे, मोफत वसतीगृहाची सोय करणे, गोरगरीबांची काळजी घेणे, त्यांची सेवा-सुश्रुषा करणे, गरजूंना आर्थिक मदत करणे, पूर, दुष्काळ, साथीचे रोग, यासारख्या नैसर्गिक आपत्तीवेळी लोकांच्या मदतीला धावून जाणे या परोपकारी उपक्रमाद्वारे त्यांनी धर्मांतर मोठ्या प्रमाणात घडवून आणलेले दिसते. हे लॉर्ड मेकॉलेच्या विधानावरून साधार सांगता येते.

हिंदू समाजाच्या मनातून अंधश्रद्धा व मूर्तीपूजा काढून टाकण्यात आपण यशस्वी झालो तर, त्यांच्या मनात ख्रिश्चन धर्म तत्वज्ञान रुजवू शकू असे मिशनाऱ्यांना ठामपणे वाटत. अर्थात शिक्षणामागे मिशनऱ्यांचा हेतू काहीही असला तरी मुलींच्या शिक्षणासाठी शाळा सर्वप्रथम मिशनऱ्यांनी सुरु केल्या.

ख्रिश्चन धर्मप्रसाराचा भाग सोडल्यास अनेक क्षेत्रात मिशनऱ्यांनी केलेली कामगिरी दखलपात्र आहे. एकदेशीय भाषांच्या वाङ्मयनिर्मित्तीला व ग्रंथनिर्मितीला ख्रिश्चन मिशनऱ्यांनीच चालना दिली. त्यांच्या प्रयत्नांमुळे इंग्रजी देशी शब्दकोश तयार झाले. वृत्तपत्र निर्मितीच्या क्षेत्रातही त्यांचे योगदान मोठे आहे. शिक्षण संस्थांची निर्मिती करून सर्वांना

शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध करून दिल◌ी. पाश्चात्य शिक्षणामुळेच पाश्चात्य ज्ञानभ◌ा◌ंडार खुले झाले. त्यांच्या भौतिक प्रगतीच◌ी कल्पना आली, नव विचारांची ओळख झाली. भारतीय समाजातील अन◌िष्ट प्रथा, परंपरा नष्ट करण्यास त्यांन◌ी प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणे हातभार लावलेला दिसतो. त्यांच्यामुळे सामाजिक-धार्मिक चळवळीला चालना मिळालेली दिसते.

फ्रेंच मिशनरी ॲब◌ेडुबाय यांनी Hindu Manners Customs & Ceremony हा ग्रंथ लिहिला हा रोमन कॅथोलिक मिशनरी होता. त्याने तमिळ प्रांतात 1823 स◌ाली भ्रमण केलेले होते. त्याचा हिंदुस्तानात◌ील धर्मांतर चळवळीसाठी दीर्घकाळ संबंध होता. त्यामुळे त्याने आपले अनुभव विविध पत्रामध्ये नमूद केलेले आहेत. त्यांच्या मते हिंदुस्थानात ख्रिस्ती धर्माची सध्याची म्हणजे 19 व्या शतकाच्या प्रारंभ◌ाची अवस्था अतिशय निकृष्ठ असून एक◌ंदरीत येथील लोकांना ख्रिश्चन धर्माविषयी तिरस्कार वाटतो असे नमूद करून ॲबे डुबायने ख्रिस्ती धर्माला हिंदुस्थानात कशी उतरती कळा लागली याची माहिती दिली आहे.

ॲबेडुबाय म्हणतात, ख्रिस्ती धर्माच्या तत्वावर विश्वास बसल्याने अगदी निरपेक्ष वृत्तीने ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला असे एकही उदाहरण सापडत नाही.

मद्रास प्रांतात◌ील रिनियर्स यांच्या मते ख्रिश्चन मिशनरी हिंदूंना धर्म◌ा◌ंतर◌ासाठी 10 पॅग◌ो◌ंडा देत असतं. या धर्मांतराला आर्थिक कारणाशिवाय इतरही कारणे कारणीभूत असल्याचे आढळून येते.

लुई विल्यम्स हा ख्रिश्चन मिशनरी 1897 पर्यंत 21 वर्षे मुंबईचा बिशप होता. त्य◌ाने हिंदूस्थानात◌ील जाती संस्थेच्या उत्पतीची माहिती सांगून तिचे स्वरूप स्पष्ट केले आहे. जाती संख्या व धर्म या अभिज्ञ गोष्टी असून त्यांची फारकत करता येत नाही असे तो म्हणतो.

मिशनरी विरोधी धोरण असले तरी सुरुवातीच्या काळात ख्रिश्चन मिशनरी व सरकार◌ात सहानुभूती होती. सन 1800 मध्ये लॉर्ड वेलस्लीने इंग्रज◌ी वंशाच्या अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी फोर्ट विल्सन कॉलेज काढले. त्यामध्ये विल्यम कॅरे शिकवित असे. त्यांच्या सेरामपूर येथील मुद्रणालयाचा फायदा ह◌ी कंपनीने घेतला. याच मुद्रणालयात पहिल्यांदा भारतीय भाषा त्यांच्या भाषेत छापल्या गेल्या. हे ख्रिश्चन मिशनऱ्यांचे फार मोठे योगदान होय.

18 व्या शतकाच्या शेवटी ख्रिचन धर्म जागृतीची नवी लाट आलेली होती. आणि ख्रिस्ती व्यक्तीने ख्रिस्ती धर्माच्या प्रसारासाठी सर्व मदत करणे हे त्यांचे परम कर्तव्य आहे. ही भावना प्रबळ होऊ लागली होती. राज्यकर्ते या नात्याने हिंदी प्रजेच्या अध्यात्मिक, प◌ारमार्थिक कल्याणाची जबाबदारी ब्रिटिशांची आहे. व त्यासाठी भारतीयांना ख्रिस्ती धर्माची दीक्षा देण्याची गरज आहे. हा विचार ब्रिटनमध्ये रूढ होऊ लागला. परिणामी 1813 स◌ाली सनदी कायद्यानुसार कंपनीच्या मुलखात ख्रिश्चन मिशनऱ्यांना काम करण्याची पूर्ण मुभा देण्यात◌ं आली. ही सनद अस्तित्वात येण्याआधीच अमेरिकन मिशनरी भारतात आले होते. त्यांच्या पाठोपाठ इंग्लंड, स्कॉटलंड, आयर्लंड, डेन्मार्क, स्विडन, नार्वे, पोलंड व जर्मनी या देशातील मिशनरी भारतात आले. ब्रिटिश राजवटीत आलेल्या या मिशनऱ्यांचे वैशिष्ट्य म्हणजे ते सर्वजण प्रोटेस्टंट होते. या मिशनऱ्यांनी भारतात विविध भागांत आपली ठाणे स्थापन केली. सन 1813 पासून पुढील 60-70 वर्ष◌ात आसाम, बंगाल, ओरीसा, मद्रास, पंजाब, संयुक्त प्रांत, मध्यप्रांत, वायव्य सरहद◌्द प्रांत या क्षेत्रात त्यांनी आपले कार्य सुरू केले.

ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या गटांमध्ये लंडन मिशनरी सोसायटी, बाप्तीष्ट मिशनरी सोसायटी व चर्च मिशनरी सोसायटी हे सर्वात कार्यशील गट होते. 19 व्या शतकात युरोपमध्ये ख्रिस्ती धर्मावर मानवतावादी विचारांचा परिणाम झाला होता.

युरोपमध्ये आपले अस्तित्व, तर्कशक्ती, विज्ञान व तंत्रज्ञानाच्या हल्ल्यापासून टिकव◌िण्यासाठी या मिशनऱ्यांनी लोक◌ोपयोगी धोरण अवलंबले होते.

भारतात मात्र मिशनऱ्यांनी केलेल्या मानवतावादी, लोक◌ोपयोगी कार्य हे ख्रिस्ती धर्म प्रसाराच्या हेतूने केले गेले. त्यांनी हे कार्य भारतीय लोकांवर बिंबविण्यासाठी हाती घेतले होते. ख्रिस्ती धर्म हा मानवतेला जपणारा धर्म होता. त्यामुळे भारतात तो इतर धर्मापेक्षा श्रेष्ठ होता. या धर्मप्रसाराच्या प्रक्रियेने व्यापार वाढविण्याचा मुख्य हेतू साध्य होईल असे, चार्ल्स ग्रॅहम यासारख्या धर्मप्रसारकांना वाटत होते.

प्रोटेस्टंटाच्या दृष्टीने प्रत्येक ख्रिस्ती माणसाला 'बायबल' वाचता येणे गरजेचे होते. त्यामुळे प्रादेशिक भाषेतून बायबलचे भाषांतर करणे ही अत्यावश्यक बाब होती. 1870 पर्यंत बायबल हे बहुतेक सर्व भाषेतून भाषांतरीत झाले होते.

ख्रिस्ती धर्माच्या प्रभावामुळे बाबा पद्मनजी यांनी मराठीत 'यमुना पर्यटन' ही कादंबरी लिहिली. या ख्रिस्ती मिशनऱ्यांचे महत्त्वाचे योगदान म्हणजे त्यांनी स्त्रियांची बाजू उचलून धरली व त्यांची स्थिती सुधारण्याचा प्रयत्न केला.

बायबलमध्ये स्त्री-पुरुषांना समान वागणूक द्यावी. असे म्हटलेले आहे. त्यामुळे साहजिकच त्यांचा प्रभाव प्रोटेस्टंट मिशनऱ्यावर पडला असावा. भाषांतरीत 'बायबल' लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी छापखान्याची गरज होती. त्यामुळे बायबलच्या भाषांतराच्या उपक्रमानंतर छापखाने चालविणे क्रमप्राप्त होते.

हिंदुस्थानात जशी भाषांची विविधता होती. तशीच लिपीचीही विविधता होती. कोकणी भाषा आणि ईशान्येमधील भाषेला लिपीच नव्हती. ख्रिश्चनांनी चालविलेल्या शाळेतून त्यांच्यासाठी रोमन लिपी वापरणे सुरू केले. देशी, लोहार कारागिरांना हाताशी धरुन मिशनऱ्यांनी मुद्रणासाठी ठसे, अक्षरे बनवून घेतली व हळूहळू छापखान्याचे तंत्रज्ञान विकसित केले. याचा परिणाम असा झाला की, मूद्रणालयाची सोय झाल्यावर पद्य वाङ्मयापेक्षा गद्य वाङ्मयाला अधिक चालना मिळाली. कारण गद्य वाङ्मयाचे लेखन जास्त होते. प्रादेशिक भाषेतील गद्य वाङ्मय छापले गेले. त्याला हेच मुख्य कारण होते. ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या टिकेपासून स्वधर्माचे रक्षण करण्याचा हेतूने प्रादेशिक भाषेत हिंदू व इतर वाङ्मय तयार होऊ लागले आणि जून्या-नव्या धार्मिक वाङ्मयाचे मुद्रण होऊ लागले. हेच वाङ्मय वाचून 19 व्या शतकात प्रामुख्याने उत्तर-भारतात धार्मिक संघर्ष चालू झालेले दिसतात. सन 1870 पर्यंत ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या कार्यपद्धतीने मुख्यतः हिंदू धर्मावरील टीकेमुळे स्वधर्माचे प्रयत्न सुरू झाले. त्यांनी आपल्या मतांसाठी पुस्तके छापण्याची गरज वाटू लागली. धर्मग्रंथ छापल्यामुळे ते सर्वांना खुले झाले. हा अप्रत्यक्षपणे झालेला सर्वात मोठा परिणाम होता.

ही पुस्तके वाचण्यासाठी शाळा चालविणे गरजेचे होते. त्यातून शाळांच्या स्थापनेला गती मिळाली ख्रिश्चन मिशनऱ्यांनी लौकिक व धार्मिक शिक्षण देणाऱ्या इयत्तावारी शिक्षण पद्धती चालू केल्या. एकीकडे सरकारी शिक्षण पद्धती पाश्चात्याप्रमाणे विकसित होत होती. सरकारी नोकरी मिळविण्याचे हमखास साधन म्हणून लोक या दोन्ही प्रकारच्या शाळेत जात असत. ख्रिश्चन शाळामधून काही धर्मांतरीत प्रकरणामुळे तेवढ्या पुरतेच धार्मिक वादळे उठत, शाळा बंद पडत नंतर, काही काळानंतर चालू करीत या नामवंत शिक्षण संस्थांमध्ये बाप्तीष्ट मिशन कॉलेज सेरामपूर येथील 1818 साली विल्यम कॅरे यांनी स्थापन केलेले कॉलेज 1820 बिशप्य कॉलेज कलकत्ता, मुंबईमधील सेंट्रल कॉलेज (1832 नंतरचे नाव विल्यम कॉलेज) इ. संस्था अग्रेसर होत्या.

मद्रास प्रांतात मात्र तेथील पुराणमतवादी लोकांमुळे शाळांची जास्त प्रगती झाली नाही. अस्पृश्यांना मिशनरीनी जवळ करून शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिली. स्त्री शिक्षणामध्ये सुद्धा ख्रिश्चन मिशनंऱ्यांचाच पुढाकार होता. महात्मा फुलेंच्या वरती ही मिशनांऱ्यांचा प्रभाव पडलेला होता. धर्म परिवर्तनाचे काम करण्यास स्त्री शिक्षणाचे महत्व मिशनऱ्यांना वाटत असे. 1840 नंतर अविवाहित ख्रिश्चन मिशनरींना लहान मुलांची सेवा करण्याचे काम दिले गेले. या स्त्री मिशनऱ्यांना धर्मांतर करण्यात यश आले नाही. म्हणून मुलींसाठी वेगळ्या शाळा स्थापन करण्यात आल्या. या मिशनऱ्यांनी अशा शाळेत शिकवून झाल्यानंतर भारतीय विद्यार्थ्यांनी नवीन मुलींच्या शाळेत शिक्षिका बनल्या मुलींच्या शिक्षणासाठी कलकत्ता फिमेल एज्युकेश सोसायटी कार्यरत होती. तेथे मिस मेरी, ॲनी क्रुक हिला आपल्या सेवेत घेऊन हिंदू मुलींसाठी 30 शाळा उघडून गरीब मुलींच्या शिक्षणाला प्राधान्य दिले गेले.

मिशनऱ्यांचे भारतातील मुख्य कार्य धर्म परिवर्तनाचे होते. 19 व्या शतकाच्या प्रारंभी भारतीय समाजामध्ये सती प्रथा, कर्मकांड, नरबळी, पशुबळी, अंधश्रद्धा, जातीयवाद, अस्पृश्यता, पडदा पद्धती, बालविवाह, निरक्षरता इ. अनेक वाईट चालीरिती होत्या. ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या दृष्टीने ती संधी होती. भारतीय समाजाला या वाईट प्रथा परंपरा पासून वाचविण्याचे निमित्त करून धर्मप्रसार केला. हिंदू धर्मावर टीका करून दोष दाखविले. व त्यातून राजाराम मोहन रॉय, दयानंद सरस्वती, स्वामी विवेकानंद, इ समाज सुधारकांनी आत्मपरीक्षण करण्यास सुरुवात केली. व त्यांनी भारतीय समाजाची वाटचाल आधुनिकतेच्या दिशेने करण्याचे ठरवले. यातूनच भारतामध्ये सामाजिक व धार्मिक प्रबोधन घडून आले हे ख्रिश्चन मिशनऱ्यांचे सर्वात मोठे योगदान होय.

मिशनऱ्यांना उच्च जातीमध्ये यश मिळाले नाही. पण अस्पृश्य जाती, आदिवासी जमाती यांच्यामध्ये धर्मप्रसार करण्यास मोठे यश मिळाले. यामध्ये आर्थिक, सामाजिक व राजकीय कारणे दिसतात. असे जरी असले तरी आणि धर्मप्रसाराचे उद्दिष्टे असले तरी मिशनऱ्यांनी समाजसेवेचे केलेले कार्य अनेकदृष्टीने मार्गदर्शक सिद्ध झाले. कॉलरा, दुष्काळ, पूर साथीचे रोग अशा संकट काळात त्यांनी केलेले कार्य प्रशंसनीय ठरले आहे.

विद्याप्रसार, भारतीय भाषातून साहित्यरचना, छापखाने सुरू करणे, पुस्तके छापणे, म्हण◌ी, शब्दकोष तयार करणे इ. प्रकारचे मिशनऱ्यांचे कार्य महत्त्वाचे ठरते. अध्यापक प्रशिक्षण संस्था, मुली◌ंकरिता शाळा, हस्तशिल्प शिक्षण केंद्र इ. बाबत नवनवीन प्रयोग केले. त्यादृष्टीने त्यांचे कार्य पंजाब, तमिळनाडू, आंध्र, गुजरातमध्ये विशेष होते. ख्रिश्चन धर्मप्रचारकांनी स्त्री शिक्षणाच्या उद्देशाने सर्वप्रथम 1819 मध्ये कलकत्ता युवा स्त्री संस्था (कलकत्ता female Juvenile Society) स्थापन केल◌ी. या संस्थेच्या माध्यमातून J.E.D. येथून यांनी 1849 मध्ये कलकत्ता येथे मुली◌ंची शाळा चालू केली.

**निष्कर्ष -**

ख्रिश्चन मिशनऱ्यांचा धर्मप्रसार करणे हा हेतू जरी असला तरी त्यांच्या कार्यामूळे भारतात छापखाने निघाले. स्थानिक भाषांचा विकास झाला. स्त्रियांचा शिक्षणाच्या माध्यमातून उध्दार झाला. भारतातील धार्मिक व सामाजिक व◌ाटचाल आणि परंपरा लक्षात आणून देऊन सामाजिक व धार्मिक प्रबोधन घडवून आणण्याची पार्श्वभूमी तयार केली. स्त्री-पुरुष समानता, मानवतावाद, लोककल्याण, बंधुता इ. म◌ूल्य◌े समोर आणल्याने भारतात पुनर्जागृती होण्यास मदत झाली. आणि त्यातूनच सामाजिक प्रबोधनाची बीजे रोवली गेली असे साधार म्हणता येते. धर्मप्रसाराचे कार्य सोडल्यास 19 व्या शतकामधील ख्रिश्चन मिशनऱ्यांनी आधुनिक भारताच्या जडणघडणीमध्ये समाजाच्या पुनर्रचनेमध्ये महत्त्वाचे योगदान दिलेले दिसून येते.

**संदर्भ साधने -**


1) ॲबे डुबाय - Hindu manners, customs & ceremeny
2) ज्ञानोदय - वृत्तपत्रांमधील लेख
3) रिनीयर्स यांच्या आठवणी - वृत्तांत
4) लुई विल्यम यांचे जाती धर्माविषयक लेखन
5) बॉम्बे समाचार मधील अग्रलेख
6) आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास -Y.C.M.

# ब्रिटिश राज: ऐतिहासिक स्मारके आणि वसाहती वारसा यांचा अभ्यास

**देवेंद्र लक्ष्मण सोनुने**
संशोधन विद्यार्थी
चिस्तीया कला व वाणिज्य महाविद्यालय, खुलताबाद.

**डॉ. शैलेश भीमराव राऊत**
संशोधन मार्गदर्शक
चिस्तीया कला व वाणिज्य महाविद्यालय, खुलताबाद.

**गोषवारा**

ब्रिटिश राज ने भारतीय उपखंडात विविध ऐतिहासिक स्मारके, वसाहती आणि संरचनात्मक वारसा तयार केला. ब्रिटिश साम्राज्याच्या स्थापनेने भारतीय संस्कृतीत महत्त्वपूर्ण बदल घडवले, ज्यात स्थापत्यकलेच्या विविध शैलींचा समावेश होता. या संशोधनाचा उद्देश ब्रिटिश राजाच्या स्थापत्यकलेतील विविध ऐतिहासिक स्मारकांचा आणि वसाहती वारशाचा विश्लेषण करणे आहे. या अध्ययनात ब्रिटिश राजाच्या स्मारकांची सांस्कृतिक, स्थापत्यकला आणि ऐतिहासिक महत्त्व यांचा अभ्यास केला जाईल. ब्रिटिश राज (1757-1947) भारतीय इतिहासातील एक अत्यंत महत्त्वाचा आणि प्रभावी कालखंड होता, ज्यात भारतातील स्थापत्यकलेला एक नवीन दिशा मिळाली. ब्रिटिश साम्राज्याने स्थापत्यशास्त्र, स्थापत्यकला आणि शहरांच्या डिझाईनमध्ये आपली छाप सोडली. या काळातील ऐतिहासिक स्मारके केवळ ब्रिटिश राजकीय व सामाजिक प्रभावाचे प्रतीक नाहीत, तर भारतीय संस्कृतीवर त्यांचा थेट प्रभाव देखील पडला. ब्रिटिश राजाच्या स्थापत्यकलेमध्ये गॉथिक, क्लासिकल, इंडो-सारासेनिक आणि कधीकधी बरोबर भारतीय स्थापत्यशास्त्राचे मिश्रण दिसून येते. याचा मुख्य उद्देश भारतीय उपखंडातील वास्तुशिल्पाची ब्रिटिश शैलीसह मिलावट करून एक 'पुनरुज्जीवित' वसाहती राजवट निर्मिती करणे होता. भारतातील मोठ्या शहरांमध्ये बांधलेली इमारतीं, किल्ले, गेट्स आणि सार्वजनिक स्थळे हे त्या काळात बदललेल्या सांस्कृतिक व स्थापत्यकलेच्या दृष्टिकोनांचे प्रतीक आहेत.

या अभ्यासाचा मुख्य उद्देश ब्रिटिश राजाच्या स्थापत्यकलेतील ऐतिहासिक स्मारकांचा सखोल अभ्यास करणे आणि त्यातून भारतीय स्थापत्यशास्त्र आणि ब्रिटिश स्थापत्यशास्त्राचा एकत्रित विचार समजून घेणे आहे. त्या कालखंडात बांधलेल्या प्रमुख इमारती, जसे की व्हिक्टोरिया मेमोरियल (कोलकाता), दिल्ली गेट, गवर्नमेंट हाऊस (लखनौ), आणि चर्चगेट (मुंबई) यांचा तपशीलवार विश्लेषण केले जाईल. स्मारकांच्या स्थापत्यशास्त्रात, वापरण्यात आलेल्या सामग्रीचे विविध प्रकार, इमारतींचा उपयोग, तसेच त्या इमारतींना प्राप्त झालेल्या सांस्कृतिक आणि सामाजिक महत्त्वावर चर्चा केली जाईल.

या अभ्यासातून हे समजून घेण्याचा प्रयत्न केला जाईल की ब्रिटिश स्थापत्यशास्त्राने भारतीय समाजावर केवळ भौतिकच नव्हे, तर मानसिक व सांस्कृतिक स्तरावर देखील कसा प्रभाव टाकला. त्या काळातील वास्तुकलेचे आंतरराष्ट्रीय आणि स्थानिक घटक, ब्रिटिश राजाच्या साम्राज्यवादी उद्दिष्टांशी कसे जुळले, आणि भारतीय समाज आणि त्याच्या संस्कृतीत या स्थापत्यकलेचा काय स्थान आहे याचा अभ्यास केला जाईल.

**बीजसंज्ञा**

ब्रिटिश राज, ऐतिहासिक स्मारके, वसाहती वारसा, स्थापत्यकला, सांस्कृतिक वारसा

**प्रस्तावना**

ब्रिटिश राज (1757-1947) हा भारतीय इतिहासातील एक महत्त्वपूर्ण कालखंड होता. यामध्ये भारतातील विविध प्रदेशांमध्ये ब्रिटिश साम्राज्याची स्थापना झाली आणि ब्रिटिशांची सांस्कृतिक, राजकीय आणि स्थापत्यकला या संदर्भात नवे प्रयोग व परिवर्तन घडले. या कालखंडात अनेक ऐतिहासिक स्मारके उभी केली गेली, ज्यात ब्रिटिशांच्या साम्राज्यशाही विचारधारेशी संबंधित दृष्य, स्थापत्य आणि कलात्मक शैली आढळतात. उदाहरणार्थ, दिल्ली गेट, कुतुब मीनार, व्हिक्टोरिया मेमोरियल आणि चर्चगेट या सारखी विविध इमारतींमध्ये ब्रिटिश साम्राज्याच्या स्थापत्यशास्त्राचा प्रभाव स्पष्टपणे दिसतो.

**साहित्याचा आढावा**

**डी.एन. मिटर आणि पर्सी ब्राउन, (1924),** ब्रिटिश राजाच्या स्थापत्यकलेवर अनेक संशोधकांनी विचार केला आहे. काही संशोधकांच्या मते, ब्रिटिश स्थापत्यकलेने भारतीय परंपरांना आव्हान दिले, तर काहींच्या मते ते एक सांस्कृतिक मिलाप होते. D.N. Mitter आणि Percy Brown सारख्या लेखकांनी ब्रिटिश स्थापत्यकलेवर अनेक कार्ये प्रकाशित केली आहेत. Brown यांनी भारतीय स्थापत्यशास्त्रातील ब्रिटिश प्रभावाचा अभ्यास केला आणि त्यात उल्लेख केला की कसे ब्रिटिशांनी भारतीय स्थापत्यशास्त्रावर आपले छाप सोडले. तसेच, भारतीय स्थापत्यशास्त्राच्या ऐतिहासिकदृष्टीने अनेक ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत, ज्यामध्ये भारतीय व ब्रिटिश स्थापत्यकलेतील अंतर आणि साम्य तपासले गेले आहेत.

**उद्दिष्टे**

1. ब्रिटिश राजाच्या स्थापत्यकलेतील ऐतिहासिक स्मारकांचा अभ्यास करणे.
2. वसाहती वारशाचे महत्त्व आणि त्याच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि ऐतिहासिक घटकांचा विश्लेषण करणे.
3. ब्रिटिश राजाच्या स्मारकांचा भारतीय संस्कृतीवर होणारा प्रभाव आणि त्याचे सामाजिक अर्थ विश्लेषित करणे.

**संशोधनपद्धत**

या अभ्यासासाठी मुख्यत: ऐतिहासिक संशोधन पद्धतींचा वापर करण्यात येईल. ऐतिहासिक दस्तऐवज, ब्रिटिश काळातील स्थापत्यकलेचे फोटो, गॅझेट्स, शासकीय अहवाल आणि पुराणिक माहिती गोळा करून, त्या संदर्भात विश्लेषण करण्यात येईल. यासाठी मुख्यतः साहित्यिक स्रोत, दस्तऐवज, पुराणिक माहिती आणि स्थापत्यकलेचे उदाहरणे वापरण्यात येतील. या सर्व घटकांचे विश्लेषण करणे आणि त्या आधारावर ब्रिटिश राजाच्या स्थापत्यकलेचा भारतीय समाजावर काय प्रभाव पडला हे समजून घेणे हे या संशोधनाचे मुख्य उद्दीष्ट आहे.

**ब्रिटिश राजातील ऐतिहासिक स्मारके**

ब्रिटिश राजाने भारतात ज्या ऐतिहासिक स्मारकांचा ठसा उमठवला, त्यात स्थापत्यकलेच्या विविध शैलींचा समावेश आहे. या स्मारकांमध्ये ब्रिटिश शाही संस्कृती, राज्यव्यवस्था, सामाजिक संरचना आणि भारतीय संस्कृतीच्या मिश्रणाचे दर्शन घडते. ब्रिटिश राजाच्या स्थापत्यशास्त्राने भारतातील पारंपरिक स्थापत्यकलेला नवीन आकार दिला, ज्यामध्ये गॉथिक, इंडो-सारासेनिक आणि क्लासिकल शैलींचा समावेश होता. काही प्रमुख ऐतिहासिक स्मारकं खालीलप्रमाणे:

**1. व्हिक्टोरिया मेमोरियल (कोलकाता)**

व्हिक्टोरिया मेमोरियल हे ब्रिटिश राजाच्या शाही धंद्याचे प्रतीक आहे. या इमारतीची बांधणी 1906 मध्ये सुरू झाली आणि ती 1921 मध्ये पूर्ण झाली. या इमारतीमध्ये व्हिक्टोरिया राणीच्या महत्त्वाचा आदर दर्शविला गेला आहे. हि इमारत इंग्रजी आणि इंडो-सारासेनिक स्थापत्यशास्त्राचे मिश्रण आहे. तिच्या डिझाइनमध्ये गॉथिक आणि क्लासिकल शैलींचा प्रभाव आहे. या स्मारकाचे भव्य रूप, सुंदर बागा, आणि अभिजात वास्तुशिल्प भारतीय उपखंडातील ब्रिटिश प्रभावाचे स्पष्ट उदाहरण आहे.

**2. दिल्ली गेट (दिल्ली)**

दिल्ली गेट हे दिल्लीतील एक अत्यंत महत्त्वाचे ऐतिहासिक स्मारक आहे, जे ब्रिटिश साम्राज्याच्या स्थापनेस समर्पित आहे. या गेटची बांधणी 1931 मध्ये झाली आणि ते दिल्लीतल्या ब्रिटिश साम्राज्याची उपस्थिति आणि महत्त्व दर्शविते. दिल्ली गेटाच्या संरचनेत गॉथिक आणि रोमन शैलींचा वापर केला गेला आहे, ज्यामुळे त्याला भव्य आणि आकर्षक रूप प्राप्त झाले आहे. या स्मारकाचा उपयोग ब्रिटिश राजाचे अभिमान आणि साम्राज्य दर्शविण्यासाठी केला गेला.

**3. इंडिया गेट (दिल्ली)**

इंडिया गेट, जो प्रथम "आर्क" म्हणून ओळखला जातो, ब्रिटिश साम्राज्याच्या अंतर्गत सैनिकांच्या शौर्याला समर्पित एक गेट आहे. या स्मारकाची रचना सुद्धा इंडो-सारासेनिक शैलीतील आहे. हे गेट प्रथम महायुद्धात मरण पावलेल्या भारतीय सैनिकांना श्रद्धांजली म्हणून 1921 मध्ये उभारण्यात आले. इंडिया गेटाच्या डिझाइनमध्ये ब्रिटिश स्थापत्यकलेचा प्रभाव असला तरी, भारतीय शौर्य आणि परंपरेचे महत्त्व देखील आहे.

**4. कुतुब मीनार (दिल्ली)**

कुतुब मीनार, ज्याला ब्रिटिश राजाने पुनर्संचयित केले, त्याच्या शिखरावरुन भारतातील स्थापत्यकलेचे मिश्रण स्पष्टपणे दिसते. 12 व्या शतकात कुतुब मिनाराच्या बांधणीची सुरूवात झाली, पण ब्रिटिश राजाच्या काळात त्यामध्ये विविध सुधारणा केल्या गेल्या. कुतुब मीनार ऐतिहासिक तसेच स्थापत्यकला दृष्ट्या महत्त्वाचा आहे, आणि ब्रिटिशांनी त्याची देखभाल केली, ज्यामुळे तो आणखी आकर्षक बनला.

**5. गवर्नमेंट हाऊस (लखनौ)**

लखनौतील गवर्नमेंट हाऊस, ज्याला लोकिनो हाऊस देखील म्हटले जाते, ब्रिटिश राज्यकर्त्यांचा निवासस्थळ होता. या इमारतीमध्ये ब्रिटिश आणि भारतीय स्थापत्यशास्त्राचे मिश्रण होते. यामध्ये गॉथिक शैली, ब्रिटिश राजवटीची शाही भव्यता आणि भारतीय स्थापत्यकलेची नाजूक शिल्पकला एकत्र करण्यात आले.

**6. चर्चगेट (मुंबई)**

मुंबईतील चर्चगेट हे एक प्रमुख ऐतिहासिक स्मारक आहे. या स्थानाचे महत्त्व ब्रिटिश प्रशासनाच्या काळात वाढले. येथे स्थित असलेल्या इमारतींमध्ये ब्रिटिश स्थापत्यशास्त्राचा प्रभाव स्पष्ट दिसतो. चर्चगेट परिसरातील इमारतींमध्ये गॉथिक, विक्टोरियन आणि इंडो-सारासेनिक शैलीचे मिश्रण आहे.

**7. हिंडोला महल (इंदोर)**

हिंडोला महल, जो मध्य प्रदेशातील इंदोर शहरात स्थित आहे, त्याची बांधणी ब्रिटिश कालखंडात करण्यात आली. हा महल एक उत्तम उदाहरण आहे, ज्यात ब्रिटिश स्थापत्यशास्त्र आणि इंदोरच्या राजवटीच्या वास्तुकलेचा समावेश आहे. हे महल देखील स्थापत्यशास्त्राच्या नव्या दृष्टीकोनाचे दर्शक आहे.

**8. गोल गुम्बज (बीजापूर)**

गोल गुम्बज हे बीजापूर येथील एक अत्यंत प्रसिद्ध स्मारक आहे, जे राजकीय, सांस्कृतिक आणि स्थापत्यकलेच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचे आहे. ब्रिटिश राजाच्या काळात, या स्मारकाची
देखभाल करण्यात आली आणि त्याचे महत्त्व अधिक स्पष्ट झाले. याच्या भव्यतेमुळे ब्रिटिश शाही राजवटीचे राजकीय, सांस्कृतिक सामर्थ्य प्रतिबिंबित होते.

**9. रानी झील (नागपूर)**

रानी झील ही नागपूर शहरातील एक महत्त्वाची ऐतिहासिक इमारत आहे, जी ब्रिटिश कालखंडात तयार करण्यात आली. या जलाशयाचे डिझाइन आणि बांधणी ब्रिटिश स्थापत्यशास्त्राचा प्रभाव दाखविते, ज्यात ब्रिटिश काळातील जल व्यवस्थापनाचा अंदाज घेतला गेला.

**ब्रिटिश राजातील स्थापत्यकला**

ब्रिटिश राज (1757-1947) भारतीय स्थापत्यकलेला एक नवीन दिशा देणारा आणि भारतीय वास्तुकलेतील पारंपरिक शैलीला एक वेगळा आकार देणारा कालखंड होता. ब्रिटिशांनी भारतात शासकीय, धार्मिक, वाणिज्यिक आणि शहरी स्थळांसाठी विविध इमारती उभारल्या. या स्थापत्यकलेमध्ये दोन प्रमुख प्रभाव दिसतात – ब्रिटिश स्थापत्यशास्त्राचे (विशेषतः गॉथिक, क्लासिकल, आणि रानीकृत इंग्रजी शैली) आणि भारतीय स्थापत्यकलेचे (इंडो-सारासेनिक आणि इतर भारतीय पारंपरिक शैली). ब्रिटिश राजाने भारतीय स्थापत्यशास्त्रावर आणि सांस्कृतिक जीवनावर खोलवर परिणाम केला.

1. **गॉथिक शैली**

गॉथिक स्थापत्यशास्त्र ब्रिटिश स्थापत्यकलेचा एक महत्त्वाचा भाग होता. या शैलीत मोठ्या आणि भव्य इमारती, उंच टॉवर्स, अरुंद खिडक्या, मोठ्या कमानी, आणि गुंफे असलेल्या सजावटीचा वापर केला जातो. गॉथिक स्थापत्यकलेचा प्रभाव भारतीय स्मारकांवर स्पष्ट दिसतो, विशेषतः ब्रिटिश काळात उभारलेल्या चर्चेस आणि सरकारी इमारतींमध्ये.

**उदाहरण: इंडिया गेट (दिल्ली)** इंडो-सारासेनिक शैलीमध्ये बांधलेली इंडिया गेट, जिथे गॉथिक शैलीच्या कमानी, कमकुवत हॉल्स आणि भव्य शिल्पांची छाप आहे.

2. **इंडो-सारासेनिक शैली**

इंडो-सारासेनिक शैली म्हणजेच भारतीय स्थापत्यशास्त्र आणि अरबी, फारसी आणि मध्ययुगीन यूरोपीय स्थापत्यशास्त्राचा संगम. ब्रिटिश स्थापत्यकलेतील इंडो-सारासेनिक शैली भारतात मोठ्या प्रमाणावर वापरली गेली. ही

शैली साधारणतः हिंदू, मुस्लिम आणि ब्रिटिश स्थापत्यकलेचे मिश्रण असते, ज्यामध्ये पृष्ठभूमीतील भारतीय स्थापत्यकलेचे परंपरेचे घटक वापरले जातात.

**उदाहरण: कुतुबमीनार (दिल्ली)**: कुतुब मीनाराचे पुनर्निर्माण आणि संरक्षण ब्रिटिश कालात केले गेले. ही इमारत भारतीय, फारसी आणि गॉथिक स्थापत्यकलेचे मिश्रण आहे.

3. **क्लासिकल शैली**

क्लासिकल स्थापत्यशास्त्राचा प्रभावही ब्रिटिश राजाच्या स्थापत्यकलेत दिसून येतो, विशेषतः राजवाड्यांच्या, इमारतींच्या आणि सार्वजनिक स्मारकांच्या रचनेत. या शैलीत सिमेट्रिकल रचना, मोठ्या पायऱ्या, स्तंभ, आणि सोपानशैलीचा वापर होतो. ब्रिटिशांनी क्लासिकल शैलीचा वापर शाही भव्यतेला व्यक्त करण्यासाठी केला.

**उदाहरण: गवर्नमेंट हाऊस (लखनौ)**: लखनौमधील गवर्नमेंट हाऊसच्या बांधणीमध्ये क्लासिकल शैलीचा वापर करण्यात आला आहे, ज्यात साम्राज्यवादी शाहीची भव्यता दिसते.

4. **विक्टोरियन शैली**

विक्टोरियन स्थापत्यशास्त्र हा ब्रिटिश राजातील एक अत्यंत लोकप्रिय शाही स्थापत्य प्रकार होता. ही शैली इंग्रजी वास्तुकलेचा भाग म्हणून विकसित झाली आणि भारतीय उपखंडात ब्रिटिश प्रशासनाने त्याची रचना केली. विक्टोरियन स्थापत्यशास्त्रात बडी इमारती, समृद्ध सजावट, आणि भव्य डोम आणि गॅलरी यांचा समावेश होता.

**उदाहरण: बॉम्बे हाई कोर्ट (मुंबई)**: विक्टोरियन शैलीतील स्थापत्यकलेची उदाहरणे मुंबईतील बॉम्बे हाई कोर्टमध्ये पाहता येतात. या इमारतीमध्ये मोठे गॉथिक टॉवर्स, कोरीव काम आणि भव्य हॉल्स आहेत.

5. **ब्रिटिश निवासस्थाने आणि किल्ले**

ब्रिटिश राजाने किल्ले, किल्ल्यांच्या कच्च्या भिंती, और निवासस्थाने भारतीय शहरांमध्ये बांधली. या किल्ल्यांचा वापर सामरिक, प्रशासकीय आणि शाही निवास म्हणून केला जात असे. ही इमारती गॅलरीज, मोठ्या गोल कमानी, कडवट व मजबूत भिंती आणि भव्य पायऱ्यांसह उभारली गेली.

**उदाहरण: लाल किल्ला (दिल्ली)**: लाल किल्ला हा एक प्रसिद्ध किल्ला आहे जो ब्रिटिश काळातही एक प्रमुख प्रशासकीय आणि सांस्कृतिक केंद्र होता.

**ब्रिटिश राजातील सांस्कृतिक वारसा**

ब्रिटिश राजाने भारतीय समाजावर केवळ स्थापत्यकलेचा, स्थापत्यशास्त्राचा, आणि शासकीय व्यवस्थेचा परिणाम केला नाही, तर सांस्कृतिक, सामाजिक, आणि ऐतिहासिक दृष्टिकोनातून देखील त्याचा गडद प्रभाव पाडला. ब्रिटिश साम्राज्याने भारतात आपली छाप सोडली, जी आजही भारतीय सांस्कृतिक आणि सामाजिक धारा, विचारसरणी, आणि कला-कलेच्या विविध रूपांमध्ये अनुभवता येते. या प्रभावामुळे भारतीय संस्कृतीतील पारंपरिक कला, सण, आणि विधी यांमध्ये एक परिवर्तन घडले, तसेच भारताच्या सांस्कृतिक जीवनामध्ये अनेक नवे वळण आले.

**1. भाषा आणि साहित्य**

ब्रिटिश राजाच्या काळात इंग्रजी भाषेचा प्रसार भारतात झाला आणि ती प्राधिकृत भाषा बनली. ब्रिटिश शासकांच्या शासनपद्धतीत इंग्रजी भाषा आणि साहित्याचा वापर करण्याची परंपरा निर्माण झाली. यामुळे भारतीय समाजात इंग्रजी भाषेचा स्वीकार झाला, आणि याचाही परिणाम भारतीय साहित्यावर झाला.

- **प्रारंभिक भारतीय लेखन**: राजा राम मोहन राय, आचार्य प्रमीलनाथ, और राजा शिवप्रसाद आणि अन्य समाजसुधारकांनी ब्रिटिश काळात साहित्यिक प्रयत्न केले.
- **हिंदुस्तानी आणि उर्दू साहित्य**: ब्रिटिश कालखंडात उर्दू साहित्य व संस्कृतीला खूप चालना मिळाली. गझल आणि शेरो-शायरीला लोकप्रियता मिळाली, ज्यामुळे भारतीय साहित्य व संस्कृतीला एक वेगळा दृष्टीकोन मिळाला.

**2. आधुनिक शिक्षा आणि शाळा व्यवस्था**

ब्रिटिश राजाच्या काळात भारतात आधुनिक शिक्षा पद्धतीचा प्रसार झाला. जरी शिक्षणाचे महत्त्व मुळात भारतीय संस्कृतीत होते, तरी ब्रिटिश शासकांनी एका केंद्रीयकृत शिक्षण व्यवस्थेची स्थापना केली.

- **सर्वसामान्य शाळा**: 1835 मध्ये **मैकाले रिपोर्ट** नुसार ब्रिटिश शासनाने भारतात इंग्रजी माध्यमातून शिक्षण सुरू केले. यामुळे भारतीय समाजात वाचन, लेखन, आणि शास्त्रीय शिक्षणाची आवड निर्माण झाली.
- **सामाजिक सुधारणा**: आधुनिक शिक्षण पद्धतींनी भारतीय समाजातील अनेक पारंपरिक रुढींचा सामना केला. महिलांसाठी शिक्षण, विधवा विवाह, आणि जातपातविरोधी कायदे यावर काम सुरू झाले.

**3. कला आणि शिल्पकला**

ब्रिटिश राजाने भारतीय कला आणि शिल्पकलेवर देखील आपला प्रभाव टाकला. अनेक पारंपरिक भारतीय कला रूपांना एक पाश्चात्य दृषटिकोनातून पाहिले गेले आणि काही कला रूपांचा पुन्हा विकास झाला.

- **चित्रकला**: ब्रिटिशांच्या काळात कॅल्कटा स्कूल ऑफ आर्ट आणि मद्रास स्कूल ऑफ आर्ट यांसारख्या शालेय संस्थांमध्ये भारतीय चित्रकलेला एक पाश्चात्य दृष्टिकोन दिला गेला. यामुळे भारतीय चित्रकलेला एक नवा दिशा मिळाली. चित्रकारांना ब्रिटिश कलाकारांच्या शैलीतील घटक समाविष्ट करणे भाग पडले.
- **नवीन शिल्पकला**: ब्रिटिश स्थापत्यशास्त्र आणि कला शास्त्राने भारतीय शिल्पकलेला एक नवीन आकार दिला, विशेषतः स्मारकांच्या रचनांमध्ये.

**4. धार्मिक आणि सांस्कृतिक बदल**

ब्रिटिश राजाच्या काळात भारतात धार्मिक आणि सांस्कृतिक बदल घडले. ब्रिटिशांनी भारतातील पारंपरिक धर्मव्यवस्थेवर त्यांच्या विचारसरणीचा प्रभाव पाडला, विशेषतः हिंदू धर्म, इस्लाम, आणि ख्रिश्चन धर्म यावर.

- **हिंदू धर्म**: हिंदू धर्मामध्ये आधुनिकता आणि सुधारणा घडवण्यासाठी राममोहन राय, दयानंद सरस्वती, आणि स्वामी विवेकानंद यांनी कार्य केले. त्यात ब्रिटिश साम्राज्याच्या प्रभावामुळे होणारे सामाजिक परिवर्तन दिसले.
- **इस्लाम**: मुस्लिम समाजातील शालेय शिक्षण प्रणाली आणि ब्रिटिश कायद्यांच्या प्रभावामुळे इस्लाममध्येही अनेक विचारधारात्मक बदल झाले.
- **ख्रिश्चन धर्म**: ख्रिश्चन मिशनऱ्यांनी भारतात शिक्षण, आरोग्य, आणि धर्मपरिवर्तनाचे कार्य सुरू केले. यामुळे ख्रिश्चन धर्माच्या संस्कृतीला एक नवा वळण मिळाला.

**5. वस्त्रधारणेतील बदल**

ब्रिटिश राजाच्या प्रभावामुळे भारतीय समाजाच्या वस्त्रधारणेमध्ये अनेक बदल झाले.

- **कॅज्युअल आणि शहरी वस्त्र**: इंग्रजी कपड्यांचा वापर भारतातील उच्चवर्गीय समाजात वाढला, ज्यामुळे पाश्चात्य शैलीतील वस्त्रधारणेची सुरूवात झाली.
- **भारतीय पारंपरिक वस्त्रांचे संरक्षण**: भारतातील पारंपरिक वस्त्र जसे की साडी, लुंगी, धोती इत्यादींचा वापर अजूनही होत होता, पण ब्रिटिश वेशभूषेचा प्रभाव अधिक स्पष्ट दिसू लागला.

**विश्लेषण**

ब्रिटिश राजाच्या काळातील स्थापत्यकला दोन प्रमुख घटकांमध्ये विभागली जाऊ शकते—प्रथम, पारंपरिक ब्रिटिश स्थापत्यशास्त्र जसे कि गॉथिक आणि क्लासिकल शैली, आणि दुसरे, भारतीय स्थापत्यशास्त्राची समाकलनशैली, जी ब्रिटिश स्थापत्यकलेमध्ये भारतीय अलंकरणांचे समावेश करतात. दिल्ली गेट, इमारत, आणि कर्नाटका हाउस यासारख्या स्मारकांमध्ये याचा उत्तम उदाहरण पाहता येते. यावरून दिसून येते की ब्रिटिश स्थापत्यशास्त्राने भारतीय स्थापत्यकलेला नवा दृष्टिकोन दिला, ज्याचा प्रभाव आजही भारतीय शहरांमध्ये पाहता येतो. ब्रिटिश राजाच्या स्थापत्यकलेतील आणि सांस्कृतिक वारशाच्या विश्लेषणामुळे भारतीय समाजातील विकासाच्या प्रक्रियेचा एक सखोल अभ्यास करता येतो. भारतीय स्थापत्यशास्त्र आणि कला, ब्रिटिश स्थापत्यशास्त्राची छाया असली तरी, त्यात भारतीय संस्कृतीचा आदर व समावेश आहे. या कालखंडाचा आजच्या भारतावरही खोलवर परिणाम आहे.

**निष्कर्ष**

ब्रिटिश साम्राज्याने भारतातील स्थापत्यकलेत अनेक महत्त्वपूर्ण बदल केले. या कालखंडातील ऐतिहासिक स्मारके आणि वसाहती वारसा आजही भारतीय सांस्कृतिक इतिहासाचा एक महत्त्वपूर्ण भाग आहेत. हे स्मारके केवळ स्थापत्यकला

किंवा शिल्पकला नाहीत, तर ते ब्रिटिश साम्राज्याच्या विचारधारेला आणि भारतीय समाजावर त्याच्या प्रभावाची साक्ष देणारे दूत आहेत. ब्रिटिश स्थापत्यशास्त्राची शैली आणि तंत्रज्ञान भारतीय स्थापत्यकलेत एक नवा समाकलन दर्शवितात. या समकालीन वास्तुकलेचे महत्त्व आजही जाणवते आणि त्याचे सांस्कृतिक वारसा म्हणून संरक्षण करणे आवश्यक आहे.

**संदर्भ**


1. मिटर, डी.एन. (1992). ब्रिटिश साम्राज्य आणि भारतीय वास्तुकला. नवी दिल्ली: ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस.
2. तपकिरी, पर्सी. (1924). भारतीय वास्तुकला: त्याचे प्रकार आणि विकास. मुंबई : डी.बी. तारापोरवाला.
3. कुमार, आर. (2007). ब्रिटीश राज आणि त्याचा वास्तुशास्त्रीय वारसा. दिल्ली: ओरिएंट ब्लॅकस्वान.
4. गुप्ता, ए. (2005). ब्रिटीश राजवटीत भारताचा स्थापत्य वारसा. मुंबई : पॉप्युलर प्रकाशन.
5. रामास्वामी, एस. (2010). भारतातील वसाहती वास्तुकला. न्यू यॉर्क: रूटलेज.
6. रिचर्ड्स, जे. एफ. (1993). इंडियन आर्किटेक्चरचे इंपीरियलायझेशन: द ब्रिटिश इम्पॅक्ट ऑन इंडियन बिल्डिंग अँड डिझाईन, 1757-1857. द जर्नल ऑफ द सोसायटी ऑफ आर्किटेक्चरल हिस्टोरिअन्स, 52(3), 227-245.
7. नाथ, आर. (2000). भारतातील ब्रिटिशांची वास्तुकला. नवी दिल्ली: अभिनव पब्लिकेशन्स.
8. मॅकेन्झी, जे. (1993). ब्रिटिश भारताचा इतिहास. लंडन: लाँगमन.
9. सरकार, एस. (2010). आधुनिक भारत: 1885-1947. दिल्ली: मॅकमिलन इंडिया लि.
10. किंग, ए. (1990). ब्रिटिश भारतातील वसाहती वास्तुकला. नवी दिल्ली: ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस.
11. कोच, ई. (1991). इंडो-सारासेनिक आर्किटेक्चर: एक भारतीय वसाहती शैली. न्यूयॉर्क: अबेविले प्रेस.
12. कुमार, आर. (2004). भारतावर ब्रिटिश राजवटीचा सांस्कृतिक प्रभाव. सामाजिक शास्त्रज्ञ, 32(5/6), 45-63.
13. मिश्रा, आर. के. (2006). ब्रिटिश राजवटीत भारतीय वास्तुकला: वसाहत शैली आणि भारतीय कला. जयपूर : के.के. प्रकाशने.
14. अली, एस. एस. (2002). भारतीय वास्तुकलेवर ब्रिटिशांचा प्रभाव. लाहोर: लाहोर प्रेस.
15. वर्माणी, ए. (2012). भारतातील ब्रिटिश वसाहती राजवटीत सामाजिक सांस्कृतिक परिवर्तन. नवी दिल्ली: ग्लोबल व्हिजन पब्लिशिंग हाऊस.
16. बोस, एस. (2008). भारतातील वास्तुशास्त्रीय उत्क्रांती: पारंपारिक भारतीय वास्तुकलावर वसाहती प्रभाव. नवी दिल्ली: हर-आनंद पब्लिकेशन्स.
17. स्वामिनाथन, आर. (1997). संस्कृती, शक्ती आणि मेमरी: भारतीय कला आणि वास्तुकलावर ब्रिटिश प्रभाव. इंडियन जर्नल ऑफ हिस्ट्री ऑफ सायन्स, 32(4), 453-468.
18. बाल्फोर, एच. (1914). भारतीय साहित्याचा इतिहास. लंडन: हेन्री फ्रॉड.
19. चक्रवर्ती, पी. (2006). भारतातील ब्रिटिश वसाहतवादाचे पुरातत्व. केंब्रिज: केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस.
20. ओ' मॅले, एल.एस.एस. (1908). बंगाल जिल्हा गॅझेटियर्स: कोलकाता जिल्हा. कलकत्ता: बंगाल सरकार.

# दख्खनचा सेनानायक मलिक अंबर : एक दृष्टिक्षेप

**प्रविण लक्ष्मण चिंतोरे**
संशोधक विद्यार्थी, इतिहास विभाग
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.

## प्रस्तावना

मलिक अंबर हा इथिओपियामध्ये जन्मलेला एक अबिसिनियन होता. त्याच्या गरीब पालकांनी त्याला बगदादमधील गुलामांच्या बाजारात विकले होते. नंतर एका व्यापाऱ्याने त्याला विकत घेतले व त्याला दख्खनमध्ये आणले. महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये मुस्लीम राजकर्त्यामध्ये वजीर असूनही इतिहासात एका सत्ताधीश सारखे व्यक्तिमत्व असलेल्या एका जननायकासारखा मलिक अंबरचा उल्लेख येतो. मुळात इथोपियन हब्शी गुलाम असलेला मलिक अंबर दख्खनमध्ये अहमदनगरचा कर्ता-धर्ता बनला होता. निजामशाहीच्या शेवटच्या काळातील मलिक अंबरचे चातुर्य व युध्दनिती आजही चर्चेचा विषय आहे. त्या कालखंडात एक प्रकारे राष्ट्र भावनेसारखी वृत्ती मलिक अंबरने निर्माण केलेली दिसते.

## उद्दिष्टे

1) निजामशाही सेनापती मालिक अंबर यांच्या कारकीर्दीचा अभ्यास करणे.
2) मलिक अंबरचे दख्खनच्या सत्तासंघर्षातील महत्व स्पष्ट करणे

## मलिक अंबरचा उदय

मलिक अंबरच्या बाबतीत पूर्व इतिहास असा आहे. पश्चिम तटावर चालत असलेल्या गुलांमाच्या बाजारात मलिक अंबरला पूर्वाश्रमीचा गुलाम चंगेझखान याने विकत घेतले तेंव्हा तो अहमदनगरच्या दरबारात मोठया पदावर असल्याचे दिसते.[1] अंबरचा जन्म 1548 चा त्याला त्याच्या आई वडिलांनी विकले असावे अथवा तो एखादया लढाईच्या वेळी कैद झाला असावा. भारतात आल्यावर चंगेझखानाची नजर त्याच्यावर पडली व त्याने मलिक अंबरला विकत घेतले. त्याचे मूळ नाव "चापु" असे होते.[2] चंगेझखानाने त्याला मलिक हे नाव दिले. मलिक म्हणजे "राजा." गुलाम असूनही मलिक अंबर अत्यंत हुशार व चपळ होता. इ. स. 1565 साली झालेल्या तालीकोटच्या लढाईच्या वेळी त्याचे वय अवघ्या 17 वर्षाचे होते.[3] जेव्हा मुगलांनी अहमदनगरवर हल्ला केला तेव्हा अंबर आपले नशीब आजमाविण्यासाठी विजापूरला गेला, परंतु लवकरच तो परत आला आणि चांदबीबीला विरोध करणाऱ्या शक्तिशाली हब्शी तुकडीत सामील झाला.

## मालिक अंबरची कारकीर्द

अहमदनगरच्या पतनानंतर मलिक अंबरने एका निजामशाही राजपुत्राचा शोध घेतला आणि त्याला विजापूरच्या राज्यकर्त्यांच्या गुप्त मदतीने मूर्तजा निजामशहा दुसरा या नावाने गादीवर बसविले व स्वत: सर्व कारभार पाहण्यास सुरुवात केली. हळूहळू मलिक अंबरचे वर्चस्व अहमदनगरच्या निजामशाही अंतर्गत वाढत चालले. इ. स. 1601 च्या दरम्यान मलिक अंबर एक प्रकारे सत्ताधीशच बनला व सर्व निजामशाहीची सूत्रे अंबरच्या हाती आली. निजामशाहीतील सुलतान हे कमकुवत असल्याने, वयाने अल्पवयीन असल्याने शेजारील सत्तांचा निजामशाही मुलुखावर डोळा होता. आदिलशाही, मोगल या सत्ता विरोधात लढाया बरोबर अंतर्गत बंडाळीचा वाद मिटवण्यासाठीही मलिक अंबरचा कस लागला होता. त्यातच आदिलशाही व मोगलांनी एकदाच आक्रमण करुन निजामशाहीचा अंत घडवून आणण्याचा कट रचला. इ.स 1624 साली प्रसिध्द असलेल्या भातवाडीच्या लढाईने मलिक अंबरचे नेतृत्व फळाला आहे. वयोवृध्द झालेला असूनही त्याने चातुर्याने या दोन संकटाना तोंड दिले व एकाच वेळी या सत्तांचा मातबर पराभव केला. मलिक अंबरकडे तेव्हा 10 हजार हब्शी, 40 हजार दख्खनी मराठा यांची फौज होती.[4] मलिक अंबरने आपल्या भोवती मोठया संख्येने मराठा पथके जमा केली होती. मराठे वेगाने पुढे जाऊन रसदी सैन्याला लुटून त्यांची रसद थांबविणे यामध्ये पारंगत होते. दख्खनमध्ये ही गनिमी कावा पध्दत मराठयांची परंपरा होती.

मलिक अंबरच्या कारकिर्दीत अनेक मराठा सरदार निजामशाहीत उच्च पदावर पोहचले होते. दख्खनी व परदेशी वादामुळे मलिक अंबरला शूर व विश्वासू म्हणून मराठयांचे नेहमी सहकार्य लाभले. शहाजीचे पिता मालोजी राजे भोसले हे

मलिक अंबरच्या अत्यंत विश्वासातील सरदार असल्याचे ग. ह. खरे नोंदवतात.[5] भोसले, जाधव ही मराठी घराणी सरदार मलिक अंबर सोबत असल्याचे दिसतात. या मराठा सरदार व हब्शी सेनेच्या बळावर सतत 30 वर्षे मलिक अंबरने मोगल व आदिलशाहीशी संघर्ष केला.

मराठयांच्या मदतीने मलिक अंबरने बरार, अहमदनगर आणि बालाघाट मध्ये मुगलांना पाय न रोवू देण्यासाठी कठीण परिस्थिती तयार केली.[6] यावेळी मुगलांचा सरदार अब्दुर्रहीम खान- ए- खाना हा एक चतुर राजनीतिज्ञ आणि योग्य सेनापती होता. त्याने तेलंगणा येथे नांदेड या ठिकाणी 1601 मध्ये अंबरला पराभूत केले परंतु त्याने अंबरला मित्र बनविण्याचा निश्चय केला. कारण त्याला माहित होते की, उरलेल्या निजामशाही राज्यात स्थायित्व निर्माण होणे आवश्यक आहे. अंबरलाही खान ए खानाशी मैत्री करणे उपयुक्त वाटले कारण यामुळे तो त्याच्या अंतर्गत शत्रूंशी सामना करु शकला. काही काळ मुगल सरदार खाने खाना यांची गुप्त मदत व्हायची. कारण खाना ए खानाची व मलिक अंबरची चांगली मैत्री होती. मलिक अंबरची ब-याचदा खान ए खानाने मदत केली. त्यांच्या या कार्याने नाराज होऊन जहांगीरने खान ए खानला परत बोलवले.[7] यामुळे दख्खनमधील मुगलांची स्थिती कमकुवत झाली. तेव्हा अंबरने बरार, बालाघाट आणि अहमदनगर येथून मुगलांना हुसकावून लावण्यासाठी एक मोहीम सुरु केली. त्याला विजापूरचा शासक इब्राहीम आदिलशहा याने या उपक्रमात मदत केली होती, ज्याने विजापूर आणि मुगल यांच्यात तटस्थ निजामशाही राज्याचे अस्तित्व मानले होते. त्यांनी तेलंगणातील बलाढय कंदाहार किल्ला आपल्या कुटूंबाच्या निवासासाठी आणि खजिना सामान ठेवण्यासाठी अंबरच्या हवाली केले. त्याने 10,000 घोडेस्वार पाठविले, ज्यांनी त्यांच्या उदरनिर्वाहासाठी एक विशिष्ट प्रदेश बाजूला ठेवण्याचा निर्णय घेतला.

बादशाह जहांगीर मलिक अंबरविषयी खूपच चिडलेला असे. काळा माणूस ,काला पहाड म्हणून हिनवता हिनवता-1612 ते 1613 दरम्यानच्या पराभावाने बदलत जाऊन तो मलिक अंबरचा उल्लेख दख्खनचा राजा म्हणून करत असे.8 निजामशाही व आदिलशाहीमध्ये सलोखा व्हावा म्हणून मलिक अंबरने आपल्या मुलाचे विजापूरच्या अग्रगण्य इथिओपियन सरदारांपैकी एकाच्या मुलीशी लग्न केल्याने या कराराची पुष्टी झाली .इ.स .1609 मध्ये झालेला हा विवाह सोहळा मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. आदिलशहाने वधूला भव्य हुंडा दिला आणि सुमारे 80,000 रुपये खर्च केले .पण मालिक अंबर आणि विजापूरचे वैर घडणारच होते .मलिक अंबर व विजापूरचे शत्रुत्व असे होते की त्यात समतोल होणे शक्य नव्हते. एवढा द्वेष परस्परांशी होत असे.9 दोन राज्यांमधील संघर्षाचे मूळ असलेले सोलापूर परत मिळवण्यासाठी अंबरने विजापूरविरुध्द अनेक मोहिमा सुरु केल्या अंबरने लगेच विजापूरची राजधानी गाठली. त्याने इब्राहीम आदिलशहाने. नव्याने निर्माण केलेली नवीन राजधानी नौरसपूर जाळली आणि आदिलशहाला आश्रयासाठी किल्ल्यावर पळून जाण्यास भाग पाडलेहे अं .बरच्या शक्तीचे शिखर मानले जाऊ शकतेअंबरने उल्लेखनीय लष्करी पराक्रम ., ऊर्जा आणि दृढनिश्चय दाखवला असला तरी त्याच्या असमर्थतेमुळे किंवा मुगलांशी तडजोड करण्याची इच्छा नसल्यामुळे त्याचे यश तात्पुरते होते .निजामशाहीच्या या दोन्ही विरोधकांवरून मलिक अंबरचे निजामशाही साठीचे असलेले महत्व दिसून येतेविजा .पूरचा आदिलशहा मलीक अंबरचा द्वेष तो सुन्नी असल्याने करत होता असे सरदेसाई म्हणतातविजा .पूरचे सुलतान हे नेहमीच शिया पंथीय होतेत्यांनी बहामनशाही विरोधात जाऊन आपल्या राज्यात शिया सत्तेला राजधर्म केल्याचे दिसते. म .लिक अंबरच्या द्वेषमागे कारण कोणतेही असो सत्ताकारणांच्या पटावर मात्र मलिक अंबरने विरोधकांना नेहमी मात दिली असे दिसते.10 तोडरमलची महसूल व्यवस्था राबवून मलिक अंबरने निजामशाहीची स्थापना केली राज्याचा कारभार . सुधारण्याचा प्रयत्न केला. त्याने जमीन ठेक्यावर देण्याची जुनी व्यवस्था रद्द करुन त्या जागी जप्ती पध्दतीचा अवलंब तेच लोक करतात ज्यांच्या मध्ये राष्ट्रप्रेमअसते अथवा एका मोठया उद्देशाने प्रेरित असतातमलिक अंबरच्या याच . गुणांमुळे त्यांना काही अभ्यासक राष्ट्रनायक सारखे समजतात.11 आपल्या हयातीत मलिक अंबरने निजामशाही रोखून धरलेली होतीमलिक अ .ंबरच्या मृत्युनंतर अवघ्या दहा वर्षाच्या आत ती नामशेष झाली. अंबरच्या विजयाचे सर्वात मोठे महत्व म्हणजे दख्खनी कारभारात मराठयांचे महत्व स्पष्टपणे दर्शविणारे होते मलिक अंबरच्या नेतृत्वाखाली . मराठयांच्या यशामुळे त्यांच्यात आात्मविश्वास निर्माण झाला. त्यामुळे त्यांनी नंतर स्वतंत्र भूमिका घेतली.

**सारांश**

कर्तबगार, शुर, युध्दनीतीत तरबेज, चाणाक्ष, माणसे ओळखण्यात पटाईत, निष्ठावान अशा बऱ्याच गुणांचा आदर्शवत पाठ मलिक अंबरने मांडलेला दिसतो. अंतर्गत वाद असूनही मलिक अंबरने बाहेरील शत्रुंशी नेटाने लढा दिला. आपल्या कार्य कतृत्वाने मलिक अंबरने निजामशाहीत जेवढी उंची गाठली तेवढी उंची कोणत्याही गुलाम सरदाराला गाठता आली नाही. अनेक नायकांचा तो एक महानायकच होता. अशा पध्दतीचा मलिक अंबर हा महानायक मध्यकाळात दख्खनच्या भूमीवर होऊन गेला.

**संदर्भ :**

1) Richard, Eaton, A Social History of the Deccan:1300-1761 Cambridge University Press, Cambridge 2005 p. 106.
2) Sarkar Jadunath, House of Shivaji, Sarkar M. C & son, Culcutta, 1955, P. 6.
3 ) Richard, Eaton, p. 106
4) Radhe, Sham, *The Kingdom of Ahmadnagar*, Banwarilal Publication, Banaras. 1996 p. 147.
5) देशपांडे प्र. न., छत्रपती शिवाजी महाराज, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, 2002, पृ. 6
6) चंद्र सतिश, मध्यकालिन भारत, ओरियंट ब्लॅकस्वान, नई दिल्ली. 2013, पृ. 259.
7) सरदेसाई गो. स., मुसलमानी रियासत भाग – 1, गणेश महादेव आणि कंपनी, पुणे, 1927, पृ. 165.
8) Richard, M. Eton P. 121
9) सरदेसाई गो स., उपरोक्त पृ. 166.
10 Richard, M. Eton P. 121
11 ) Radhe sham, P. 35

# सत्यशोधक मुकुंदराव पाटील यांचे साहित्यिक योगदान

**प्रा. सोपान नवथर**
न्यू आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, शेवगाव

**प्रस्तावना:**

सत्यशोधक चळवळीतल्या दुसऱ्या कालखंडातील प्रभावी व्यक्तिमत्त्व म्हणून मुकुंदराव पाटील यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागतो. दिनमित्र(1910- 1967) या वृत्तपत्राच्या माध्यमातून आपले सामाजिक, राजकीय, धार्मिक विचार मुकुंदरावांनी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहचवले. हे विचार सत्यशोधकीय परंपरेतून त्यांनी प्रदर्शित केले.

**उद्दिष्टे:**

सत्यशोधक मुकुंदराव पाटील यांचा जीवन व परिचय अभ्यासने मुकुंदराव पाटील यांच्या साहित्यिक कार्याचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धत:**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा अभ्यास केला असून मुकुंदराव पाटील यांच्या दीनमित्र साप्ताहिकातील प्रदर्शित झालेल्या साहित्यिक कार्याचा अभ्यास यात करण्यात आलेला आहे

**मुकुंदराव पाटील यांचे बालपण व शिक्षण:**

मुकुंदरावांचा जन्म 20 डिसेंबर 1885 रोजी पुणे येथील भाभूर्डे या ठिकाणी आदर्श सत्यशोधक कृष्णराव भालेकर व मंजुळाबाई यांच्या पोटी झाला. कृष्णराव भालेकर यांची एक बहीण अहिल्यानगर जिल्ह्यातील तरवडी, ता. नेवासा या ठिकाणी सखाराम शिरसागर यांच्याशी विवाहबद्ध झालेली होती. सखाराम क्षिरसागर यांना गणपत पाटील नावाचे आपत्य होते. ते कृष्णराव भालेकरांसमवेत सत्यशोधकीय विचार पसरवण्याचे काम संघटन व साहित्याच्या माध्यमातून करत असतानाच त्यांचा अपघाती मृत्यू झाला. कृष्णराव भालेकर यांची बहीण काशीबाई यांनी मुकुंदरावांना वयाच्या सातव्या वर्षी 7 ऑगस्ट 1893 मध्ये दत्तक घेतले. या दत्तक विधानाचा दस्तऐवज पुण्यातील प्रसिद्ध वकील गंगाराम भाऊ मस्के यांनी केला. मुकुंदराव यांचे शिक्षण इयत्ता दुसरी पर्यंतच झालेले होते. वेताळ पेठेतील शाळेत जैन गुरुजींच्या मार्गदर्शनाने ते झाले त्यांचे संपूर्ण बालपण हे पुण्यातच गेले. कृष्णाराव भालेकरांना कामानिमित्त महाराष्ट्रातील मुंबई, मनमाड, जबलपूर,करंजगाव या ठिकाणी स्थलांतर करावे लागत असल्याने मुकुंदरावांच्या शिक्षणाची हेळसांड झाली. मुकुंदराव जबलपूरच्या ‘हितकरणी सभा हायस्कूल जबलपूर’ या शाळेत तिसरी इयत्तेत शिक्षण घेत होते. 02 नोव्हेंबर 1904 च्या रिपोर्ट वरून त्यांची शाळेतील उपस्थिती 20 पैकी 03दिवस होती असे दिसते. मुकुंदरावांचे खरे शिक्षण हे कृष्णराव भालेकर यांच्या तालमीत झालेले प्रामुख्याने दिसून येते. मुकुंदरावांचा विवाह हा वयाच्या 21 व्या वर्षी 1907 मध्ये तरवडी जवळील गेवराई, तालुका नेवासा, जिल्हा अहिल्यानगर येथील बाळाजी अहिलाजी गोरे यांची कन्या लक्ष्मीबाई यांच्याशी झाला. लक्ष्मीबाई या 1918 मध्ये इन्फ्लुएंझा साथीने मरण पावल्यानंतर 09 मे 1920 रोजी मुकुंदरावांचा दुसरा विवाह संभाजीनगर जिल्ह्यातील घोगरगाव येथील श्री बंडेराव पठाडे यांची कन्या बरसाबाई यांच्याशी झाला. त्यावेळी मुकुंदरावांचे वय 35 वर्षाचे होते विशेष म्हणजे राजर्षी शाहू महाराजांनी त्यांना लग्नाच्या शुभेच्छा पाठवल्या. मि. पाटणकर व मि. उबाळे या प्रतिनिधींसोबत शाही पोशाख पाठवून फोटो पाठवण्याचा आग्रह महाराजांनी धरलेला होता हे विशेष. कृष्णाराव भालेकरांनी स्थापन केलेल्या दीनमित्र साप्ताहिकाचे मुकुंदराव पाटील यांनी सन 1910 मध्ये पुनरुज्जीवन केले.

**मुकुंदराव पाटील यांचे साहित्यिक कार्य:**

21 व्या शतकाच्या पूर्वार्धात सन 1911 पासून मुकुंदरावांनी काव्यलेखनास प्रारंभ केला. साहित्य लेखनासाठीची प्रेरणा अर्थातच त्यांना कृष्णराव भालेकरांकडून मिळाली त्यामध्ये रेव्हरंड टिळक यांच्या संपर्काचा फायदा मुकुंदरावांना झाला. ‘कुलकर्णी लीलामृत’ (1912-18) ‘देशभक्तलीलासार’ (1953-54) हे दिर्घ काव्य मुकुंदरावांनी लिहिले. तत्कालीन कालखंडात श्रीधर नाझरेकरांचे ‘हरी विजय’, ‘पांडव प्रताप’, ‘शिवलीलामृत’ इ. अख्यान काव्याचा समाजावर प्रभाव होता यांची पारायणे घराघरातून केली जात. मुकुंदरावांनी त्याला उत्तर म्हणून वरील दिर्घ काव्य लिहिली. त्याकाळी खेड्या-

पाड्यातून ‘कुलकर्णी लीलामृत’ आणि ‘शेटजी प्रताप’ या काव्याची पारायणे श्रीधर कवीच्या पोथीनंतर त्याच व्यासपीठावर होत असल्याची नोंद नवजीवन वृत्तपत्राचे संपादक श्री. ए. डी. घाटगे यांनी दिली आहे. म्हणजे मुकुंदरावांचे काव्या समाजाला आपले वाटयला लागले. त्यांनी वापरलेली लेखन शैली तत्कालीन समाज पध्दतीला जरी अनुसरुन होती तरी त्यातील विषय अगदी नाविण्यपूर्ण आणि समाज दर्शन घडवणारे होते. मुकुंदरावांच्या कुलकर्णी लीलामृत अन् ‘शेटजी प्रताप' या चिमूटभर काव्याने शेटजी भटजीच्या डोकींत असला कसला प्रचंड बॉब टांकला आहे की, केसरी कंपूला घामाघूम होवून प्रणांकित आरोळया मारण्याची पाळी आली. इतका प्रभाव मुकुंदरावांच्या काव्याचा पडलेला आपल्याला जागवतो. न.चि.केळकर हे कुलकर्णी लिलामृत टिकाकार होते. पण त्यांनी या काव्याची गनणा वाङ्मय सुवर्णालांकारात केलेली आहे. सुबोधस श्लोक हे स्फुट काव्य मुकुंदरावांनी लिहिले 16 पृष्ठांची ही पुस्तीका आहे यात त्यांनी समाज प्रबोधनपर लिखान केले. आधुनिक मराठी काव्यात ग्रामीण जीवनाचे चित्रण उपेक्षितच होते. शहरी जीवणाभोवती केंद्रीकृत झालेला काव्य प्रतिभेल मुकुंदरावांनी मजुर, शेतकरी यांच्या पर्यत आणुन सोडले. हे सर्व करत असतांना त्यांना पराकोटीची टिका सहन करावी लागली.

**कादंबरी व कथा**

मुकुंदराव पाटलांनी काव्याबरोबरच अनेक कादंबऱ्या व कथा लिहिल्या. या सर्वाचा उद्देश मनोरजंना बरोबरच वाचकांना सामाजिक भानप्राप्त करुन देणे तसेच सामाजिक प्रश्नांना वैचारीक व्यासपीठ मिळून देणे हा होता. मुकुंदराव पाटलांनी 'होळीची पोळी' (1910–1912) 'चंद्रलोकीची विलक्षण रुढी' अथवा 'दादासाहेबांची फजिती' (1911) 'ढढाशास्त्री परान्ने' (1913–1915), ‘तोबा तोबा’ (1924–1927), राष्ट्रीय तारुण्य (अपूर्ण) (1928–1929) या पाच कांदबऱ्या लिहिल्या. या कादंबऱ्या दीनमित्रातून क्रमशः प्रकाशित झालेला आहे. ‘ढढ्ढाशास्त्री परान्ने’ ही एकमेक कादंबरी ग्रंथ रूपाने 1927 साली प्रकाशित झाली. आज मितीला त्यांच्या दिनमित्रातून प्रकाशित झालेल्या जवळ जवळ सर्व कादंबऱ्या दीनमित्रकार मुकुंदराव पाटील स्मारक समिती, तरवडी, ता.नेवासा जि. अहमदनगर यांनी प्रकाशित केलेल्या आहेत. या कादंबऱ्या निवेदनात्मक शैलित मुकुंदरावांनी लिहिलेल्या आहेत. हरीभाऊ आपटे, वा. म. जोशी, केशवसूत, किर्लोस्कर देवल इ. साहित्यिकांच्या साहित्य वर्चस्वाला छेद देऊन कथा कादंबरीच्या सिमा पुण्या-मुंबईच्या बाहेर आलेल्या त्यांनी कादंबऱ्यांतून ग्रामीण जीवन तेथील शेतकरी, शोषितवर्ग, जातियता, धार्मिकता यांचे सर्व स्पर्शी वर्णन केले. त्यांचे सुक्ष्म निरीक्षण, प्रगल्भ अशी ग्रामीण भाषा, विषय मांडण्याची विशिष्ट पध्दत यामुळे त्याचे लिखान अद्वितीय झालेले आहेत.

मुकुंदरावांनी कथा हा वाङ्मय प्रकार ही हाताळला. इ.स. 1932 ते 1944 या कालखंडात 'दीनमित्र साप्ताहिक' आणि ‘स्त्री मनोहर किर्लोस्कर सारथी’, ‘विविध वृत्त आणि महाराष्ट्र शारदा’ या नियतकालिकातून त्यांच्या सुमारे 45 कथा प्रसिध्द झालेल्या आहे. त्यांच्या कथेचे विषय धार्मिक रुढी, अंधश्रध्दा, कर्मकांड, बुवाबाजी, सावकार, भ्रष्ट अधिकारी, भट-भिक्षूक, शेतकरी त्यांचे दारिद्र्य पंचांग, मुहूर्त, ज्योतिष इत्यादी होते. त्यांच्या काही कथा विशेष लोकप्रिय झाल्या. त्यामध्ये मुकुंदरावांच्या गाजलेल्या कथा :

1. मुहुर्ताने म्हैस मारली - दीनमित्र 6 जानेवारी 1932 वर्ष 22, अंक 10 मधून प्रकाशित.
2. मुहुर्ताचे फळ- दीनमित्र-12 डिसेंबर 1934 ते 16 जानेवारी 1935 वर्ष-25 अंक 7 ते 12 मधून क्रमशः प्रकाशित.
3. नवस - रजी सप्टेंबर 1942
4. भोलाजीची यात्रा - दीनमित्र - 3 फेब्रुवारी 1932 वर्ष 22, अंक 14
5. गाईची गृहदशा - दीनमित्र 29 जून 1932 वर्ष 22 अंक - 35
6. काळा तीळ - दीनमित्र - 13 जानेवारी ते 27 जानेवारी 1932 वर्ष 22 अंक 11 ते 13.
7. वाया गेलेले शहाणे- किर्लोस्कर डिसेंबर 1940
8. गोमटा साधू-दीनमित्र 24 फेब्रुवारी 1932 वर्ष 22 अंक 17.
9. कोंबडे बुवा - दीनमित्र - ह्व एप्रिल घर्ती वर्ष ह्य अंक......
10. हिरा की हिरकणी - दीनमित्र 31 ऑगस्ट ते 7 सप्टेंबर 1932 वर्ष 22, अंक 44 ते 45
11. नाकाचा मळा - किर्लोस्कर जानेवारी 1944
12. हुरड्यचा धर्म प्रदिप किर्लोस्कर, मार्च 1940.

13. माझी बहिण - किर्लोस्कर ऑगस्ट 1935
14. सावधान, सारथी (दिवाळी अंक) 27 ऑक्टोबर 1940
15. पवळा बोकड - दीनमित्र- 16 नोव्हेंबर ते 23 नोव्हेंबर 1932
16. देवीचा कोप - मनोहर - मार्च 1944.
17. रुईराम-दीनमित्र - 14 सप्टेंबर ते 28 सप्टेंबर 1932 वर्ष 22 अंक 46 ते 48.
18. मी माझी नव्हेच - दीनमित्र 14 जुन ते 5 जुलै 1932 वर्ष 23 अंक 33 ते 36.
19. पियानो वेडी - दीनमित्र - 27 जुलै 1932 वर्ष 22 अंक 39.
20. मिरची वंदना - विविध वृत्त 12 मार्च 1939.
21. श्रीराम जन्माचा सोहळा - दीनमित्र 21 एप्रिल 1933 वर्ष 23 अंक 24.
22. विटाळलेला नरक - दीनमित्र, 5 ऑक्टोबर 1932 वर्ष 22, अंक. 39.
23. पेटलेले खेडे - दीनमित्र 15 मार्च ते 22 मार्च 1933 वर्ष 23 अंक 20.
24. चाळी पेक्षा बँक बरी दीनमित्र 7 जुन 1933 वर्ष 23 अंक 32.
25. धर्मवीर - दीनमित्र 23 ऑगस्ट 1932 वर्ष 22 अंक. 40.
26. मुहूर्ताचे फळ - दीनमित्र 12 डिसेंबर 1934 ते 16 जानेवारी 1935 वर्ष 25 अंक 7 ते 12.
27. नाकाचा मळा - किर्लोस्कर जानेवारी 1940.
28. हुरड्याचा धर्म प्रदीप किर्लोस्कर मार्च 1940.
29. जोड्याची होळी - दीनमित्र 8 नोव्हेंबर 1944 वर्ष 35 अंक - 04

इ.काही त्यांच्या गाजलेल्या कथा सांगता येतील. मुकुंदराव पाटील यांनी 1944 ते 1957 या कालखंडात सुमारे 200 प्रसंग लिहिलेल्या आहे. त्या 25 ते 30 ओळीच्या असून तत्कालिन, धार्मिक, सामाजिक व राजकीय प्रसंगावर त्या आधारलेल्या आहे. 'पंच तंत्र ईसापनीती यातील कथेप्रमाणे त्या प्रतिकात्मक आहे. जोड्याची होळी, पुढारी आणि नगारे, मतलबसाधू इत्यादी काही कथांची प्रातिनिधीक उदाहरणे त्या संदर्भात देता येतील.

**इतर वाङ्मयीन लेखन** :

मुकुंदराव पाटील यांनी केवळ कथा, कादंबऱ्या लिहिल्या असे नसून त्यांनी समाजाचे वैचारिक प्रबोधन व्हावे म्हणून काही वैचारिक वाङ्मय ही लिहिले. ते वाचल्यानंतर त्यांच्या वैचारिक प्रग्लभतेची कल्पना येते. हिंदू आणि ब्राम्हण' हा ग्रंथ त्यांनी 01 जुन 1910 मध्ये अपूर्ण अवस्थेत प्रकाशित केला नंतर तो 1914 साली पूर्ण रुपाने प्रदर्शित झाली या ग्रंथ छापणेचा उद्देश मुकुंदरावांना आपल्या अग्रलेखात स्पष्ट केलेला आहे. ते म्हणतात की, हिंदुस्थान देशात ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र असे चार वर्ण आज हजारो वर्षापासून एकत्र घराला घर लागून राहत आलेले आहे. परंतु ब्राम्हण आणि ब्राम्हणेत्तर यांचे परस्परांशी जितके भिन्नपणाचे वर्णन आहे, तितके जगावरील कोणत्याही एका धर्माच्या अनुयायात नाही. जे देवाचे सोंग घेवून आम्हा कडून ईश्वर, आई बाप, राजा यापेक्षा ही अधिक मान घेत आले, त्यांच्या ढोंगाची आम्ही आमच्या आत्म्यास ओळख करुन देत असता भट भिक्षुकांशी वैर वाटू लागल्यास आम्ही चूप बसावे काय. यानंतर 1922 मध्ये 'विठोबाची शिकवण' ही 30 पृष्ठांची पुस्तिका प्रकाशित केली. भागवत धर्मियांचा ढोंगीपणा उघडपणे यात मांडला आहे. कुकाणा व पुणतांबे याठिकाणी विठ्ठल सप्ताह निमित्त मुकुंदरावांनी जे व्याख्यान दिलेले आहे ते यात प्रकाशित केले त्यांचे पुन: मुद्रण व प्रकाशन आज मितीला दीनमित्र स्मारक समिती तरवडी, ता. नेवासा जि.अहमदनगर येथे करत आहे. आता पर्यतच्या सर्व वाङ्मयात या पुस्तिकेचा खप सर्वात जास्त आहे.

याप्रमाणे 1917 मध्ये डेक्कन रयत समाज कर्जत येथे 27 नोव्हेंबर 1917 रोजी एक परीषद भरली होती त्याच्या अध्यक्ष स्थानी मुकुंदराव पाटील होते. याठिकाणी केलेल्या भाषणाची 14 पृष्ठांची पुस्तीका प्रकाशित केलेली आहे. सत्यशोधक समाजाची 9 वी परिषद 16 डिसेंबर 1911 ते 1 जानेवारी 1920 रोजी कऱ्हाड येथे भरली होती त्यांच्या अध्यक्ष स्थानी मुकुंदराव होते या परिषदेश सत्यशोधक समाजाचे निष्ठावंत कार्येकर्ते भास्करराव जाधव, आण्णासाहेब लठ्ठे, केशवराव बागडे, वा.रा. कोठारी इत्यादी हजर होते त्यांचे अध्यक्षीय भाषण प्रकाशित करण्यात आले. सत्यशोधक समाजाची 14 वी परीषद 9 मार्च 1930 रोजी मुंबई येथे झाली त्याचेही अध्यक्ष मुकुंदराव होते त्यांनी दिलेल्या भाषणाचे

प्रकाशन पुस्तक रुपाने करण्यात आलेले आहे. सत्यशोधक समाज परिषद, कोल्हापूर 16 वे अधिवेशन 27 ते 1950 याचे ही अध्यक्ष मुकुंदराव होते. या ही अधिवेशनाचा वृत्तांत दीनमित्रातून प्रकाशित झालेला आहे.

**नाटके:**

मुकुंदराव पाटील यांनी सर्व साहीत्य प्रकार हाताळले ते ही महत्वपूर्ण वैशिष्ट्यंनी ही बाब यांच्या वाङ्मय प्रतिभेची आणि त्यांच्या तल्लख बुध्दिची साक्ष देते त्यांनी दोन नाटके लिहीली पहीले नाटक 'राक्षसगण' 16 नोव्हेंबर, 1919 ते 22 सप्टेंबर, 1920 या कालावधीत दिनमित्रातून क्रमशः प्रकाशित झाले, तर दुसरे नाटक ‘हेड मिस्ट्रैड’ हे 7 एप्रिल 1938 ते 16 नोव्हेंबर 1938 या कालावधीत प्रकाशित दीनमित्रातून प्रकाशित झाले. 'पतीचा पाठलाग' ही चित्रपट कथा मुकुंदराव पाटील यांनी 26 जुलै, 1944 ते 27 सप्टेंबर, 1944 या कालावधीत दीनमित्रातून प्रकाशित केली. त्यावेळचे ख्यातनाम चित्रपट निर्माते श्री दिनकर पाटील यांच्या अग्राहावरुन त्यांनी ही कथा लिहीली असे दीनमित्र स्मारक समितेचे सचिव व मुकुंदरावांचे नातू उत्तमराव पाटील यांनी सांगितले आहे. ‘आसूडाचे फटके' हे सदर मुकुंदराव चालवत होते. यातून मुकुंदरावांनी अनेक विषय हाताळलेले आहे हे आग्रलेख वाचकांच्या कुतूहलतेचा विषय झालेले होते सदरच्या शेवटी ते 'नांगऱ्या' असा उल्लेख करत नांगऱ्या म्हणजे स्वतः मुकुंदराव यामध्ये सामाजिक विषयाबरोबर धार्मिक आणि राजकीय विषय ही मुकुंदरावांनी हाताळलेले आहे. आसूडाचा फटका या सदरच्या लोकप्रियतेविषयी ना. भास्करराव जाधव म्हणतात की, दीनमित्राचा अंक हती आल्यावर तो उघडून असूडाचे फटके प्रथम वाचण्याची वाचकांची प्रवृत्ती होती. यानंतर दीनमित्रामध्ये सारासार विचार हे सदरही लोकप्रिय झालेले होत. मनोरंजक संवाद हे सदर दीनमित्रामधून चालत याच प्रमाणे पेशवाईतील मौजा, शास्त्रोक्त गप्पा, जुन्याकथा, देवांची परिषद, चोरांची परिषद, शिळीची गप्पा, पिंपळाचा पार, मौजेची स्वप्ने इ. सदरे दिनमित्रामधून चालवलेली जात. मुकुंदरवांनी लहान मुलांसाठी ही लिखान केलेले आहे. त्यामध्ये गोष्टी व कविता यांचा समावेश होते. 'बालबोध मेवा' या मासिकातून 1935 ते 1937 या काळाने ते वाङ्मय प्रकाशित झालेले आहे. ‘साडू आणि वाघ', 'अस्वल आणि गुराखी', ‘शिंपी आणि भटजी', 'राजा पुत्र आणि शेतकरी', 'गाजराचा वाघ', 'ज्योतिषी आणि चोर' इत्यादी मनोरंजक गोष्टीची उदाहरणे देता येतील. यातून लहान मुलांच्या मनोरंजनाबरोबरच प्रबोधन ही होते हे महत्त्वाचे उद्दिष्टे त्यांचे या गोष्टी लिहिण्यामागचे होते. ‘सुंदर हे टोपी', 'बागेतल्या मुली', 'माणिकची माऊ' इत्यादी बालगिते ही त्यांनी लिहीली.

**निष्कर्ष**:

मराठी साहित्यामध्ये अभिजात वर्ग प्रवाहाला छेद देऊन मनोरंजन, उपहास, कल्पकता आणि वैचारिकता यांच्या माध्यमातून लिखाणाची स्वतंत्र शैली मुकुंदराव पाटील यांनी निर्माण केली. बहुजन समाजाच्या सर्वांगीण शोषणाला साहित्य लेखनाच्या माध्यमातून वाचा फोडली हे सर्व कार्य निष्ठापूर्वक करत सत्यशोधक विचारांची कुठेही प्रतारणा केली नाही. त्यांचे हे कार्य समाजासाठी आजही उद्बोधक असे आहे.

**संदर्भ**


1. काळे गोविंद, दीनमित्रकार मुकुंदराव पाटील संक्षिप्त चरित्र
2. दीनमित्र सिल्व्हर जुबली अंक, 26 जानेवारी 1938
3. मुकुंदराव पाटील पत्र संग्रह - हितकरणी सभा हायस्कुल, जबलपुर (रिपोर्ट), 2 नोव्हेंबर 1904.
4. उगले. जी. ए., सत्यशोधक दिनमित्रकार मुकुंदराव पाटील जीवन आणि लेखन समीक्षा, अक्षर वाङमय प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती, 24 सप्टेंबर 2021.

# वेरुळ लेणीतील शिल्पकला : एक ऐतिहासिक वैभव

**डॉ. वैशाली बागुल**
इतिहास विभागप्रमुख,
श्री मुक्तानंद महाविद्यालय, गंगापूर

**सारांश :**

प्राचीन भारतीय कलेत शिल्पकलेला महत्व आहे, कारण शिल्पकलेत आपल्याला तत्कालीन राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक स्थितीचे प्रभावी चित्रण प्रकट होते. वेरुळ लेण्यातील शिल्पकलेत बौध्द स्तूप, शैलगृहे, बुध्दमूर्ती, हिंदू देवतांची मंदिरे आणि जैन मंदिरे, मूर्ती आदीचा समावेश होतो. 06 व्या शतकापासून ते 12 व्या शतकापर्यंत वेरुळ लेण्यात शिल्पस्थापत्य आविष्कार होत राहिला. या लेण्यातील शिल्पकलेचे वैभव आज देखील विदेशी, देशी व स्थानिक पर्यटक, अभ्यासक तसेच सर्वसामान्य नागरिकांना आकर्षित करते. वेरुळ लेणी व त्यातील शिल्पकला प्राचीन इतिहासाची साक्ष देतात म्हणून प्रस्तुत शोध लेखातून वेरुळ लेणीतील शिल्पकलेवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

**मूळशब्द :** पुरातत्व, लेणी, मूर्ती, कला, शिल्पे, वैभव व आकर्षण

**प्रस्तावना :**

इतिहासातील प्राचीन स्थापत्यकार, वास्तुविशारद आणि चित्रकार हे कोणत्याही लेखक आणि इतिहासकारापेक्षा कमी नाहीत. प्राचीन भारतातील मंदिरे, स्तूप, लेणी, शिल्प आदीवर सापडलेली चित्रे ज्यामध्ये भारतीय जीवनशैलीची प्रतिमा मांडण्यात आली आहे.[1] मंदिरे, स्तूप आणि विहार त्या काळातील धार्मिक श्रध्दा प्रकट करतात.[2] भारतीय कलेचा विकास भारतीय धर्म तत्वज्ञान आणि साहित्य इत्यादी इतकाच समृध्द आहे. वासुदेवशरण अग्रवाल लिहितात, "भारतीय कलेच्या प्रदर्शनाव्दारे आपल्याला येथील कलाकुसर, शिल्पे व चित्रे यांची प्रत्यक्ष झलक मिळू शकते आणि त्यामध्ये दडलेल्या मानसिक कल्पनाशक्ती आणि प्रतिभेचीही ओळख होऊ शकते.[3] अशा तऱ्हेने कलेच्या दृष्टीने वेरुळ लेणी हे एक समृध्द शिल्पकलेचे दालनच आहे.

वेरुळच्या लेणी समूहात एकूण 34 लेणी आहेत. त्यात क्र.1 ते 12 लेणी बौध्द कला आविष्कार घडवितात. यामध्ये बुध्द चरित्र, बोधीसत्वकथा व इतर बुध्ददैवतकथा असा आहे. क्र.13 ते 29 ही 17 लेणी हिंदूकला प्रकट करतात. त्यामध्ये हिंदू दैवतकथा, पुराणकथा आदी कला आविष्कार आहेत. तर क्र. 30 ते 34 ही पाच लेणी वर्धमान महावीर, पार्श्वनाथ, बाहुबली यांच्या अप्रतिम मूर्तीचा आविष्कार घडवतात.[4] वेरुळच्या कैलास लेण्याच्या रुपाने हिंदू परंपरेच्या स्थापत्याचाही उत्कृष्ट आविष्कार निर्माण झाला. या स्थापत्यात शिल्पकलेचाही समावेश आहे.[5]

वेरुळ लेणी महाराष्ट्रातील छत्रपती संभाजीनगर शहरापासून 28 कि.मी. अंतरावर आहेत. ही लेणी दख्खन पट्ट्यातील कातळ (बेसॉल्ट ) खडकात खोदल्या असून, ज्यांचा विस्तार दक्षिणेकडून उत्तरेकडे 02 कि.मी. पर्यंत आहे. लेण्यात हिंदू, बौध्द् व जैन धर्मियांच्या अव्दितीय शिल्पकला आढळतात, म्हणून वेरुळ लेणी प्राचीन भारतीय सभ्यतेच्या सहिष्णुतेची भावना एकत्रितपणे दर्शवितात.[6] एलोराच्या या प्रेक्षणीय वास्तुशिल्प आणि शिल्पकलेची विपुलता आणि धार्मिक सुसंवाद याला 1983 मध्ये युनेस्कोने 'जागतिक वारसा स्मारक' म्हणून घोषित केले आहे.[7] वेरुळ लेणीत भारतीय धार्मिक एकतेचे व कलात्मक शिल्पकलेचे दर्शन पहावयास मिळते.

**शोध निबंधाची उद्दिष्टे :**

1. वेरुळची ऐतिहासिक पार्श्वभूमी अभ्यासणे.
2. वेरुळ लेणीचे धार्मिक महत्व व जागतिक स्थान स्पष्ट् करणे.
3. वेरुळ लेण्यातील शिल्पकलेचा आढावा घेणे.

**गृहितक :-** वेरुळ लेणीस बौध्द् हिंदू व जैन धर्मिय शिल्पकलेचे वैभव लाभले आहे.

**तथ्य संकलन:**

प्रस्तुत शोध-निबंध लेखनासाठी प्राथमिक व दुय्यम स्त्रोताच्या सहाय्याने तथ्य संकलन केले आहे. प्राथमिक स्त्रोतात, निरीक्षण, शासकीय अहवाल, मासिके व संकेतस्थळ (website) व्दारे माहिती प्राप्त केली तर दुय्यम साधनात पुस्तके, प्रकाशित लेख आणि मासिके आदींचा उपयोग करण्यात आला.

**संशोधन पध्दत :**

प्रस्तुत शोध लेखासाठी ऐतिहासिक विश्लेषण आणि वर्णनात्मक दृष्टिकोनासोबतच अभ्यासकांनी स्वत:च्या निरीक्षण व अनुभवानांही स्थान देण्याचा प्रयत्न केला आहे.

**विषय विमोचन :**

**वेरुळची ऐतिहासिक पार्श्वभूमी:**

वेरुळ लेणी ही छत्रपती संभाजीनगर ते चाळीसगाव रस्त्यावर छत्रपती संभाजीनगर शहराच्या उत्तर- वायव्य दिशेला 28 कि.मी. अंतरावर आहे.[8] वेरुळचा अक्षवृत्तीय विस्तार $20^{0}$1' 35" उत्त्र ते रेखावृत्तीय विस्तार $75^{0}$ 10'45" पूर्व दरम्यान आहे. (whc.unesco.org)

वेरुळ लेणी निर्मितीकाळापासून ते आजपर्यंत सदैव लोकांच्या नजरेसमोरच राहिल्या व त्या लेण्यातील शिल्पकलेची तत्कालीन समाजाला ओळख होती. अजिंठा गुंफाप्रमाणे वेरुळ लेणी कधीही पडद्याआड गेल्या नाहीत. याचे अनेक पुरावे ऐतिहासिक नोंदीमधून सापडतात. वेरुळ, एलोरा किंवा एलापूर या नावांनी ऐतिहासिक काळापासून परिचित वेरुळची ओळख केवळ या गिरिशिल्पामुळेच होती असे नाही, तर या लेण्या खोदण्यापूर्वी पासूनच येथे राष्टकुट पहिला राजा कृष्ण (756 – 773) याने बांधलेल्या 'घृष्णेश्वर' या शिव मंदिरामुळे वेरुळ हे गाव शिवभक्तांना ज्ञात होते.[9]

दुसरे कारण म्हणजे, वेरुळ लेण्या या एका धर्माच्या नसून बौध्द्, जैन आणि हिंदू या तीनही लेण्यांचे समूह येथे एकवटले आहेत. 07व्या शतकाच्या शेवटी बौध्द् धर्माचे या भागातील धर्मप्रसाराचे कार्य बंद पडून, बौध्द् धर्माचा ऱ्हास होत गेला आणि हिंदू धर्माला नवजीवन मिळाले. हिंदू धर्माच्या अनुयायांची संख्या वाढत गेल्यामुळे त्यांचा प्रसार झाला व आजही हा प्रमुख धर्म आहे. जैन धर्माची ज्योतसुध्दा अशीच तेवत राहिली. मुस्लीम राज्यकर्त्यांनी जरी काही शतके उत्तरेपासून दख्खनपर्यंतच्या मुलखावर अधिराज्य गाजविले असले, तरी हिंदू व जैन धर्माच्या चालीरिती व रुढीवर त्यांचा फारसा परिणाम झाला नाही. मुळातच वेरुळ लेण्या या प्रमुख व्यापारी पथावर असल्यामुळे मुस्लीम राज्यकर्त्यांच्या सैन्यदलाची ये-जा याच रस्त्यावरुन होत राहिली.[10] अशा तऱ्हेने प्राचीन ते मध्यकाळात वेरुळ लेण्यांचे ठिकाण हे पडद्याआड न राहता व्यापारी मार्गावर राहिलेले दिसून येते.

मराठी भाषेतील आद्य गद्यकाव्य असलेल्या 'लीळाचरित्र' व संत ज्ञानेश्व्र महाराजांनी रचलेल्या 'ज्ञानेश्वरी' या ग्रंथात आणि 'वेरुळ शिवालय माहात्म' या पुस्तिकेत वेरुळ लेण्यांची माहिती मिळते. तसेच युरोपीय प्रवाशी थेवेनॉट, निकोलाय मनुची, चार्लस मॅलेट, कॅप्टन सिली आणि जॉन क्लार्क मार्शमन आदींनी आपल्या भारत भेटीवर आधारित प्रवास वर्णनात वेरुळ लेण्याबद्दल बरेच लिखाण केले आहे. 'द वंडर्स ऑफ एलोरा' या इ.स.1824 मध्ये प्रकाशित केलेल्या आपल्या पुस्तकात सिली यांनी वेरुळ आणि आजूबाजूच्या परिसराची इत्यंभूत हकीकत लिहिलेली आहे.[11]

हैद्राबादच्या निजाम राजवटीकडे या लेण्यांची मालकी जाईपर्यंत इंदोरच्या होळकरांनी या लेण्यांची काळजी घेतली होती, असे ऐतिहासिक उल्लेखावरुन दिसून येते. पुढे इ.स.1951 साली भारत सरकारने वेरुळ लेण्या हे 'राष्ट्रीय स्मारक' म्हणून घोषित केले आणि तद्नंतर ते भारत सरकारच्या पुरातत्व विभागाकडे सोपविण्यात आले.[12] प्राचीन काळापासून आजपर्यंत वेरुळ लेण्या ह्या जागतिक स्तरावर आकर्षणाचे केंद्र ठरल्या आहेत.

**वेरुळ लेणीतील शिल्पकला :**

**बौध्द् लेणी व त्यातील शिल्प आविष्कार :**

वेरुळ येथील बौध्द लेणी क्र.1 मध्ये स्थापत्याची भव्यता आहे. प्रचंड कातळ खोदून लेणी कोरली पण येथे शिल्पाविष्कार आढळत नाही. क्र.2 प्रेक्षणीय आहे. 12 खांबी मंडप, समोरच्या गर्भग्रहात बुध्दाची मूर्ती, बाजूला बोधीसत्व. यात आकर्षण आहे, ते मंडपाच्या दोन्ही भिंतीवर शिल्पकाम व बाजूला मूर्ती आहेत. या लेणीतील 'तारा' ही बोधिसत्वाची मूर्ती मन वेधून घेते. अशा अनेक वज्रपाणी, मैत्रेयी पद्मपाणी, ज्ञानकेतु, स्थिरचक्र आदी बोधिसत्व वेरुळच्या कलाकरांनी

शिल्पबध्द् केले. क्र.3 मध्ये पाहण्यासारखे काही नाही. क्र.5 हा वेरुळचा महाविहार 117 फूट लांबीचे आणि 58” फूट रुंदीचे प्रचंड दालन आहे.[13]

बौध्दकलेच्या अप्रतिम शिल्पाविष्कार लेणी क्र.6,10 व 12 मध्ये दिसतो. लेणी क्र.6 चा मूळ प्रवेश भाग नष्ट झालाय. या लेणीतील विशेष लक्षणीय शिल्प म्हणजे महामयूरी आणि हरितीची शिल्प, महामयूरी ही एक बौध्द् देवतायतनातील देवता. मोर हे तिचे वाहन. या देवतेचे अप्रतिम शिल्प या लेणीत आहे. महामयुरीच्या बाजूला चवरी धारीणी आहे तर खालच्या बाजूला एक भिक्षु मेजावर ग्रंथ ठेवून वाचतो आहे, असे शिल्प दिसते. लेणी क्र.8 मधील शिल्प ही पाहण्यासारखी आहेत. इथे एक प्रचंड उदरधारी शिल्प आहे. हा आहे बौध्द् धर्मायतनातला जंभाल. तो आपल्या पत्नी हारितीसह येथे साकारलाय.[14]

लेणी क्र.11 व 12 मध्ये स्थापत्यात भव्यतेची प्रचिती आहे. या लेणीतील तिसऱ्या मजल्यावर सभामंडप आहे. या मंडपात 72 खांब उभे आहेत. 116’ x 64’ अशा भव्य सभामंडपाच्या उत्तर व दक्षिणी भिंतीलगत मातुषी बुध्दमूर्ती आहेत. या मूर्ती वेगवेगळ्या झाडाखाली ध्यानस्थ बसलेल्या आढळतात. डावीकडील मूर्ती अनुक्रमे विपाश्चि, शिखी, विश्वभ, क्रकुच्छंद, कनकमुनी, काश्यप आणि शाक्यसिंह मातुषी बुध्दांच्या आहेत. या पाटली, पुंडरीक, शाल शिरिष, औदुंबर पट आणि पिंपळ आदी वृक्षाखाली ध्यानस्थ आहेत. मूर्तीचे रेखाटन मनोवेधक आहे. चेहऱ्यावरील भाव धीर गंभीर आहेत. शिल्पकारांच्या समर्थ भावविष्काराची प्रचिती येण्याइतपत काता आविष्कार येथे जिवंत वाटतो. उजवीकडे विरोचन, अक्षोभ्य, रत्नसंभव, अमिताभ, अमोघसिध्द्, वज्रसत्व आणि वज्रराज असे हे सात मातुषीबुध्द् मूर्ती या लेखात आढळतात. या सभामंडपाच्या समोर एक प्रचंड गाभारा आहे. अंतराळातही काही मूर्ती शिल्पांचा आविष्कार आहे.[15]

आता कलाकार महायान कलापंरपराकडे वळलाय. अनेक बौध्दजातक कथा त्याला मोहवू लागल्या. बौध्द देवता, बोधिसत्व, यांच्या रुपाने त्याला शिल्पीकरणाची चित्रीकरणाची प्रेरणा देणारी कथानक मिळाली. भूमीस्पर्श मुद्रेत गाभाऱ्यातील आसनस्थ बौध्दमूर्ती लक्ष वेधते. या लेणीतील 1 ल्या आणि 2ऱ्या मजल्यावरील शिल्पाविष्कार ही असाच समर्थ अभिव्यक्ती दर्शविणारा आहे.[16]

**हिंदू लेणीतील शिल्पकला :**

लेणी क्र.14,15,16,21 व 29 या लेण्यातील शिल्पाविष्कार अधिक गतिमान आहे. या सर्व मूर्तींना गती आहे. असंख्य कथानक आहेत. त्यात दैवतकथा, पुराणकथा आहेत. या कथांना कलाकरांनी शिल्पबध्द केले. हिंदू धर्मातील शेकडो देवतकथांनी इथल्या कलाकराला प्रोत्साहित केले. त्यामुळे येथे कलाविष्कार घडला. सारे कला वैभव निरनिराळे भावविश्व घेऊनच आवतरले. लेणी क्र.14, 15, 17, 19, 20, 21, 22, 25, 26, 27 आणि 29 ही लेणी 6 व 7 व्या शतकात कोरली गेली.17

लेणी क्र.14 च्या प्रारंभी एक सुंदर शिल्पपट आहे. रावणानग्रहाच्या मूर्तीचा. सारे रावणाग्रहाचे कथानक मोठ्या समर्थपणे इथल्या शिल्पींनी शिल्पीत केलेय. या लेणीच्या मुखमंड यातून आत गेल्यावर समोर 54’x55’ चा सभामंडप दिसतो. बारा खांब या मंडपात आहे. गाभाऱ्याच्या व्दारपट्टीबाजूस गंगा व यमुनेची शिल्प व महिषासुरमर्दिनीचे व सप्तमातृका शिल्प आढळतात.[18]

क्र.14, 15, 16, 21 आणि 29 या लेण्यातून शैव आणि वैष्णव देवदेवतांचे शिल्पांकन केलेले आढळते. कारण या काळात या दोन्ही पंथीयांच्या पुराणातून आलेले प्रसंग लोकप्रिय झाले होते व भक्ती संप्रदायाला महत्व आले होते.[19] म्हणून या लेण्यातील शिल्प ही पुराणातील अनेक प्रसंग दर्शविणारे आहेत.

**हिंदू शिल्पकलेचा उत्कृष्ट अविष्कार म्हणजे कैलास लेणे:**

राष्ट्रकूट राजा ‘पहिला कृष्णा’ (757-772) याने कैलास लेणे निर्मितीस प्रारंभ केला. हे संपूर्ण द्रविड शैलीतील वास्तु खोदण्यास 8 व्या शतकाच्या शेवटी सुरु झाले व ते काम 9 व्या शतकातही चालू राहिले. कैलास मंदिर म्हणजे एक पाषाणातून शैल मंदिराचा अप्रतिम अनमोल अतुलनीय असा आविष्कारच म्हणावा लागेल.[20]

कैलास लेणे हे पूर्णपणे शिवलीलावर अवलंबून आहे. शिवभक्ती, शिवचरित्र व शिवमहिमा या तत्वांवर आधारित, पुराणातील अनेक कथा कल्पना व आख्यायिका येथे मूर्त स्वरुपात साकारल्या आहेत. उमा-महेश्वर व त्यांच्या संबंधात पुराणात वर्णीलेल्या अनेक कथा-कल्पना येथे पाषाणात कोरल्या असून, या शिल्पाकृती केवळ पुराणातील आख्यायिका

उदधृत करतात असे नव्हे, तर त्या जीवनातील अनेक महत्वाच्या सिध्दांताकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलून टाकतात.[21] अशा या कैलास मंदिरातील सुंदर विविध शिल्पाकृती पहिल्यानंतर आपल्याशी जणू काय त्या संवाद साधतात असे वाटते.

**जैन लेणीतील शिल्पकला :**

वेरुळ येथे इ.स.9 व्या आणि 10 व्या शतकात जैन लेणी खोदल्या गेली. क्र.30 ते 34 या लेण्या दिंगबरपंथीय आहेत. या लेण्यात व पोटलेण्यातून महावीर पार्श्वनाथ, गोम्मटेश्वर व मांतग- सिध्दायिका यांच्या मूर्ती आहेत. मांतग सिध्दायिका यासारख्या यक्ष-यक्षिणींची शिल्पे आणि स्तंभरचना त्यावरील नक्षीकाम तसेच गाभाऱ्याच्या प्रवेशव्दाराच्या चौकटी वरील कलाकसुर लक्षवेधी नि कलात्मक आहे.[22]

**निष्कर्ष :**

1) वेरुळ लेणी महाराष्ट्रातील छत्रपती संभाजीनगर शहरापासून उत्तर-वायव्य दिशेस 28 कि.मी. अंतरावर स्थित आहेत.
2) वेरुळ लेणीत हिंदू, बौध्द व जैन धर्मियांच्या अव्दितीय शिल्पकला असल्याने, त्या प्राचीन भारतीय सभ्यता व सहिष्णुतेची भावना प्रकट करताना आढळून आल्या.
3) वेरुळ लेणीतील शिल्पकला आणि धार्मिक सुसंवादाची दखल घेऊन युनेस्को या जागतिक संघटनेने सन 1983 मध्ये या लेणीस 'जागतिक वारसा स्मारकांचे' स्थान दिल्याचे दिसून आले.
4) बुध्दाची मुर्ती, मंडप, भिंतीवर कोरीव शिल्पकला, महामयुरी व हरितांची शिल्पे आदीतून वेरुळच्या बौध्द लेण्यात शिल्पकला आढळून आली.
5) हिंदू लेण्यात शैव व वैष्णव देवतांचे शिल्प असलेले आढळून आले.
6) जैन लेणीत मूर्ती व मांतग सिध्दातिका व यक्ष-याक्षिणीची शिल्पे आढळूनन आली.

**संदर्भ :**


1. Devi Sushila (2019), 'भारतीय इतिहास निर्माण मे पुरातात्विक सामुग्री का योगदान' Journal of Advances and Scholarly Researches in Allied Education, Vol-1[6], Issue, [2], P-916.
2. झा व्दिजेन्द्र नारायण आणि श्रीमाली कृष्ण मोहन (2005), 'प्राचीन भारत का इतिहास' हिंदी माध्यम कार्यान्वय निदेशालय, दिल्ली विश्वविद्यालय, दिल्ली, पृ.18
3. मिश्रा आध्या (2022), 'प्राचीन भारतीय वाङमय में शिल्प एवं कला वैदिक पौराणिक, बौध्द एवं जैन इत्यादि ग्रंथो के संन्दर्भ से International Journal of Applied Research, P-295.
4. देव प्रभाकर (2020): 'पाषाण पालवी' विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, पृ.15,16.
5. वरखेडे रमेश नारायण (2018): 'महाराष्ट्राच्या सामाजिक-सांस्कृतिक स्थितंतरांचा इतिहास खंड-1 (1801- 1900) महाराष्ट्र राज्य साहित्य व सांस्कृतिक मंडळ, मुंबई, पृ.942.
6. Whc.Unesco.org
7. महाराष्ट्र शासन (2023) 'लोकराज्य' माहिती व जनसंपर्क महासंचालनालय मंत्रालय, मुंबई, पृ.58.
8. ccrtindia.gov.in
9. टिपरे राधिका (2018): 'वेरुळ लेण्यांतील शिल्पवैभव' मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, पृ.7
10. कित्ता, पृ.8
11. कित्ता, पृ.9,12,13
12. कित्ता, पृ.13
13. देव प्रभाकर (2020): 'पाषाण पालवी' उपरोक्त, पृ.16,17
14. कित्ता, पृ.17,18
15. कित्ता, पृ.19,20
16. कित्ता, पृ.20
17. कित्ता, पृ.20,21
18. कित्ता, पृ.21

19. देगलूरकर गो.बं. (2023), 'वेरुळ दर्शन' स्नेहल प्रकाशल, पुणे, पृ.28
20. टिपरे राधिका (2018): 'वेरुळ लेण्यांतील शिल्पवैभव', उपरोक्त् पृ.94,95
21. कित्ता, पृ.98
22. देगलूरकर गो.बं. (2023), 'वेरुळ दर्शन' उपरोक्त्, पृ. 98

# ब्रिटीश काळातील भारतीय चित्रपटांचा इतिहास

**प्रा. ओंकार गणपत डोंगरे**
रयत शिक्षण संस्थेचे,
महात्मा फुले कॉलेज, पिंपरी, पुणे.

**सारांश :** भारतीय चित्रपटांचा इतिहास ब्रिटिश काळात एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि विविधतेने परिपूर्ण कालखंड आहे . च्या भारतीय स्वातंत्र्य संग्रामापासून ब्रिटिश साम्राज्याच्या अखेरच्या दिवसांपर्यंतचा आहे 1857 हा काळ, जेव्हा भारतात सिनेमा निर्माण झाला आणि त्याने आपले स्वरूप धारण केलेभारतीय चित्रपटाच्या उगमाची आणि त्याच्य .ा प्रारंभाच्या कथेची छाननी करताना, आपल्याला अनेक महत्त्वाचे टप्पे पाहता येतात.

**बिज शब्द :** भारतीय चित्रपट, दादासाहेब फाळके, मूकपट

**1. लुमिअर बंधू आणि भारतातील पहिला चित्रपट प्रदर्शन (1895-1896)**

1895 मध्ये लुमिअर बंधूंनी फ्रान्समध्ये "लुमिअर सिस्टिम" विकसित केली, जी त्यांचा कॅमेरा आणि प्रक्षिप्त यंत्रणा होती. 1896 मध्ये लुमिअर बंधू मुंबईत आले आणि 7 जुलै 1896 रोजी मादाम क्यूरी हॉटेलमध्ये त्यांच्या चित्रपटांचा पहिला सार्वजनिक प्रदर्शन झाला. या प्रदर्शनात त्यांनी लहान आणि साधे लघुपट दाखवले होते, ज्यात "The Arrival of a Train at the Station" आणि "The Sprinkler Sprinkled" या प्रकारचे चित्रपट होते.याप्रमाणे, भारतीय चित्रपट उद्योगाच्या प्रारंभाची सुरवात 1896 पासून झाली. भारतीय प्रेक्षकांसाठी हे एक नवीन आणि रोमांचक अनुभव होता. या प्रदर्शानामुळे चित्रपटाची भारतीय समाजात ओळख निर्माण झाली.[1]

**2. दादासाहेब फाळके आणि "राजा हरिशचंद्र" (1913)**

भारतीय चित्रपटनिर्मितीचा आणखी एक महत्त्वपूर्ण टप्पा म्हणजे दादासाहेब फाळके यांच्या योगदानाची सुरवात. दादासाहेब फालके हे भारतीय चित्रपट उद्योगाचे संस्थापक मानले जातात. त्यांनी भारतातील पहिला पूर्णपणे भारतीय चित्रपट "राजा हरिशचंद्र" 1913 मध्ये तयार केला. हा मूक चित्रपट भारतीय संस्कृतीतील महत्त्वपूर्ण राजकुमाराच्या कथेवर आधारित होता. "राजा हरिशचंद्र" हा चित्रपट भारतीय चित्रपट उद्योगाच्या जन्माची चिन्हे ठरला.

"राजा हरिशचंद्र" मुळात एक ऐतिहासिक, धार्मिक आणि संस्कृतिक कथा होती. या चित्रपटात भारतीय लोककला आणि रंगमंच शैलींचा वापर करण्यात आला होता. हा चित्रपट भारतीय समाजाला नवीन कल्पना देणारा होता आणि त्याच्या कलेचा स्तर खूप उच्च होता. [2]

**3. प्रारंभिक चित्रपट निर्मिती आणि महत्त्वपूर्ण निर्माते (1913-1920)**

दादासाहेब फाळके यांच्या पहिल्या चित्रपटानंतर भारतीय चित्रपट उद्योगाने आणखी वेग घेतला. या काळात विविध निर्मात्यांनी चित्रपटांचे निर्मिती कार्य सुरू केले. 1910 च्या दशकात, मुंबई, पुणे, कोलकाता आणि मद्रासमध्ये अनेक छोटे चित्रपट निर्मिती स्टुडिओ सुरू झाले. या चित्रपटांमध्ये धर्म, संस्कृती, ऐतिहासिक पात्रे, आणि भारतातील सामाजिक जीवनावर आधारित कथा असायच्या.

1920 च्या दशकात, अनेक निर्मात्यांनी चित्रपटांमध्ये भारतीय कलाकारांच्या वापरावर जोर दिला. काही महत्त्वपूर्ण निर्माते म्हणजे सि. पी. जोशी, आर. एल. बन्सल आणि अन्य. यांचा प्रयत्न चित्रपटांच्या माध्यमातून भारतीय समाजाच्या विविध समस्यांवर प्रकाश टाकण्याचा होता. यावेळी प्रामुख्याने धर्म, सामजिक मुद्दे, आणि नैतिकतावादी चित्रपटांची निर्मिती करण्यात आली. [3]

**दादासाहेब फाळके आणि प्रारंभिक प्रयोग**

भारतीय चित्रपट उद्योगाची सुरुवात दादासाहेब फाळके यांच्या "राजा हरिशचंद्र" (1913) या मूक चित्रपटाने केली. दादासाहेब फालके यांना भारतीय चित्रपटांचे जनक म्हणून ओळखले जाते, कारण त्यांनी चित्रपटाच्या निर्मितीची भारतीय पद्धती विकसित केली आणि त्यात भारतीय संस्कृतीच्या तत्वांचा समावेश केला. "राजा हरिशचंद्र" हा चित्रपट भारतीय चित्रपट उद्योगाचा पाया ठेवणारा होता आणि यामुळे भारतीय चित्रपटांचे प्रारंभिक यश मिळाले. फालके यांनी या

चित्रपटासाठी प्रौद्योगिकी, अभिनयनिर्मिती, रंगमंच, आणि चित्रपटाच्या तंत्रज्ञानाचा योग्य वापर केला, ज्यामुळे ते चित्रपटाच्या कलात्मकतेला एक नवा आयाम देण्यात यशस्वी झाले."राजा हरिशचंद्र" नंतर, दादासाहेब फाळके आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी भारतीय चित्रपट क्षेत्रात अनेक प्रयोग सुरू केले. या कालखंडात, फालके यांचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो. 1920 च्या दशकात त्यांनी "भवानी मल्ल" (1925) आणि "दृष्टि" (1925) सारख्या चित्रपटांची निर्मिती केली. हे चित्रपट भारतीय समाजाच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकण्याचा उद्देश ठेवून तयार करण्यात आले होते.

**1.** "भवानी मल्ल" (1925)

"भवानी मल्ल" हा चित्रपट 1925 मध्ये प्रदर्शित झाला आणि तो भारतीय ऐतिहासिक आणि पौराणिक कथांचा एक आदर्श उदाहरण मानला जातो. यामध्ये फालके यांनी भारतीय इतिहासातील एक वीरता आणि गौरव दर्शवण्यासाठी दृश्यांची कलात्मकता वापरली. या चित्रपटाच्या कथेतील नायकाची वीरता आणि त्याचे संघर्ष दर्शवले गेले, ज्यामुळे त्याच्या संघर्षाशी संबंधित प्रेक्षकांच्या भावना अधिक गडद झाल्या.

"भवानी मल्ल" चित्रपटाने भारतीय चित्रपट क्षेत्रात एक महत्वाचे स्थान निर्माण केले कारण यामध्ये नायकाच्या धार्मिक आणि ऐतिहासिक कथेची गहिराई मांडली गेली होती. फाळके यांच्या दिग्दर्शन शैलीमध्ये ऐतिहासिक संदर्भ आणि शास्त्रीय भारतीय दृश्यांची कलात्मकता वापरण्याचा जोर होता, जे प्रेक्षकांच्या मनावर दीर्घकाळ प्रभाव टाकत होते. [4]

**2.** "दृष्टि" (1925)

1925 मध्ये प्रदर्शित झालेल्या "दृष्टि" या चित्रपटामध्ये फालके यांनी प्रगत तंत्रज्ञानाच्या वापरासोबत भारतीय सामाजिक जीवनातील गडद आणि जटिलतेची शोध घेतली. "दृष्टि" मध्ये, फालके यांनी एक प्रचंड नवा दृष्टिकोन देणारा चित्रपट तयार केला. त्याच्या कथेतील केंद्रस्थानी असलेला सामाजिक आणि मानसिक संघर्ष त्याला एक अद्वितीय विशेषता देत होता.चित्रपटातील कथानक आणि त्यातल्या पात्रांचे संवाद, अभिनय आणि दृश्यांचा समन्वय यामुळे हे चित्रपट प्रेक्षकांसाठी एक नवा अनुभव बनले. "दृष्टि" चे दिग्दर्शन फालके यांच्या तंत्रज्ञानातील कौशल्य आणि भारतीय परंपरेचे विलक्षण मिश्रण होते. हा चित्रपट भारतीय समाजाच्या वैचारिक आणि सांस्कृतिक स्थितीला समर्पित होता, आणि त्यात धर्म, समाजवाद आणि नैतिकतेच्या विविध पैलूंवर विचार केला जात होता. [5]

**3.** फालके यांचे प्रभाव आणि त्यांच्या कार्याचे महत्त्व

दादासाहेब फाळके यांच्या चित्रपटांमुळे भारतीय चित्रपटांनी विविध सामाजिक, सांस्कृतिक, आणि ऐतिहासिक आयामांना समर्पण दिले. ते चित्रपट निर्मितीमध्ये तंत्रज्ञान, दृश्य कलांची महत्त्वपूर्ण वापर करत होते, ज्यामुळे भारतीय चित्रपटांचा दर्जा उंचावला. त्यांच्या दिग्दर्शनातील तंत्र, संगीत, अभिनय आणि कथेतील गडद भावनांचा सांगतीने वापर करून फालके यांनी भारतीय चित्रपट उद्योगाला एक महत्त्वाची दिशा दिली.तसेच, त्यांच्या कार्यामुळे भारतीय चित्रपटांचे प्रमाण आणि शास्त्रीय दृष्टिकोन स्थिर झाले. चित्रपट निर्मितीमध्ये भारतीय साहित्य, कला आणि संस्कृतींचा समावेश करणारे त्यांचे कार्य, भारतीय चित्रपट उद्योगाच्या विकासासाठी एक महत्त्वपूर्ण टप्पा बनले.

**बोलपटांचा प्रारंभ आणि वैशिष्ट्ये (1931 ते 1947)**

1931 ते 1947 हे भारतीय चित्रपट इतिहासात एक अत्यंत महत्त्वपूर्ण दशक आहे. याच कालखंडात भारतीय चित्रपट उद्योगाने मूक चित्रपटांपासून बोलपटांपर्यंतचा संक्रमण अनुभवला. बोलपटांचा प्रारंभ 1931 मध्ये झाला, ज्यामुळे भारतीय चित्रपट उद्योगाला एक नवा वळण मिळाला आणि चित्रपटांची संपूर्ण निर्मिती प्रक्रिया बदलली. बोलपटांची निर्मिती भारतीय चित्रपटांत एक नविन आणि महत्त्वाची तंत्रज्ञान क्रांती होती, ज्यामुळे प्रेक्षकांना अधिक आकर्षक आणि प्रभावी अनुभव मिळाला.

**1.** बोलपटांचा प्रारंभ

1931 मध्ये 'आलमआरा' या चित्रपटाच्या माध्यमातून भारतातील पहिला बोलपट प्रदर्शित झाला. या चित्रपटाचे दिग्दर्शन विजय भट्ट यांनी केले होते आणि यामध्ये संगीत, संवाद आणि ध्वनीचा उत्कृष्ट समन्वय करण्यात आला होता. 'आलमआरा' मध्ये संगीताचा वापर अत्यंत महत्त्वाचा ठरला, आणि त्याच्यासोबत संवादांचा समावेश झाला, जो पहिल्यांदाच भारतीय चित्रपटांमध्ये ऐकला गेला. या चित्रपटाने चित्रपटक्षेत्राला एक नवीन दिशा दिली आणि ध्वनी आणि संवादांच्या समन्वयाने भारतीय चित्रपटांना एक नवीन ओळख दिली. [6] 'आलमआरा' नंतर, भारतीय चित्रपट उद्योगाने

बोलपटांच्या निर्मितीला मोठ्या प्रमाणात स्वीकारले. यात चित्रपट निर्माते, संगीतकार आणि कलाकार यांची नवी भूमिका तयार झाली, कारण ध्वनीच्या आणि संवादांच्या सहाय्याने चित्रपटांमध्ये भावनांचा प्रभाव अधिक गडद होऊ लागला.

**बोलपटांची वैशिष्ट्ये :**

- बोलपटांमध्ये संगीत आणि संवादांचा अत्यंत महत्त्वपूर्ण वापर होऊ लागला. चित्रपटांमध्ये गाणी, संवाद आणि संगीताचे समन्वय प्रेक्षकांवर एक भावनिक प्रभाव टाकत होते. संगीत हे त्या काळातील चित्रपटांचे एक महत्त्वपूर्ण अंग बनले.
- **संवाद आणि अभिनय:** बोलपटांमुळे संवादांचा वापर आणि अभिनय अधिक कधीही महत्त्वपूर्ण ठरले. कलाकारांनी संवादांच्या सहाय्याने त्यांचे पात्र अधिक प्रभावीपणे प्रकट केले. संवादांच्या माध्यमातून चित्रपटात भावना आणि सामाजिक संदर्भ अधिक स्पष्टपणे व्यक्त होऊ लागले.
- **कथांचे विषय:** बोलपटांचा वापर करत असताना चित्रपट निर्मात्यांनी सामाजिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक गोष्टींवर आधारित कथेवर जोर दिला. 'आलमआरा' मध्ये पहिल्यांदा प्रेम आणि कुटुंबातील नात्यांवर आधारित कथा दाखवली गेली, तर त्यानंतरच्या चित्रपटांमध्ये ऐतिहासिक कथा, सामाजिक विषय आणि रोमांससारखे विविध प्रकार प्रस्तुत करण्यात आले.
- **तंत्रज्ञानातील विकास:** बोलपटांच्या निर्मितीमुळे ध्वनीच्या आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात प्रगती झाली. ध्वनी नोंदणी आणि संवादाचे समावेश यामुळे चित्रपटातील दृश्ये अधिक प्रभावी होऊ लागली. चित्रपटांचा माध्यम म्हणून एक महत्त्वपूर्ण साधन म्हणून उपयोग झाला आणि प्रेक्षकांना एक नवा दृष्टिकोन प्राप्त झाला.[7]

**समारोप :**

दादासाहेब फाळके यांच्या प्रारंभिक चित्रपटांनी भारतीय चित्रपट क्षेत्राला एक नवा दिशा दिला. त्यांच्या चित्रपटांमध्ये ऐतिहासिक, धार्मिक आणि सामाजिक कथेवर आधारित विचार केले गेले, ज्यामुळे भारतीय समाजाच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकला गेला. "भवानी मल्ल" आणि "दृष्टि" सारख्या चित्रपटांनी भारतीय चित्रपट उद्योगाच्या विकासास वेग दिला आणि त्या काळातील सामर्थ्य आणि प्रभावीतेचे उदाहरण ठरले. बोलपटांमुळे भारतीय चित्रपट उद्योगावर एक सांस्कृतिक आणि सामाजिक प्रभाव पडला. त्यात प्रेम, कुटुंब आणि समाजातील मूल्यांचा जास्त वापर करण्यात आला. या काळातील चित्रपटांनी भारतीय समाजातील विविध समस्यांवर प्रकाश टाकला आणि त्यातील नैतिकतेवर प्रश्न उपस्थित केला. चित्रपटांचा माध्यम म्हणून एक महत्त्वपूर्ण साधन म्हणून उपयोग झाला आणि प्रेक्षकांना एक नवा दृष्टिकोन प्राप्त झाला.

**संदर्भ :**


1) "History of Indian Cinema," National Film Archive of India, 2002, p. 45
2) "The Cinema of India," Ashish Rajadhyaksha, 2000, p. 102
3) "Indian Cinema: The Beginning," Film Federation of India, 1999, p. 58
4) *History of Indian Cinema*, National Film Archive of India, 2002, p. 67
5) *The Cinema of India*, Ashish Rajadhyaksha, 1999, p. 72
6) *History of Indian Cinema*, National Film Archive of India, 2002, p. 80
7) *The Cinema of India*, Ashish Rajadhyaksha, 2000, p. 111

# पालि साहित्यातील वंस साहित्याचे महत्त्व

**विकास गवई**
संशोधक, इतिहास व प्राचीन भारतीय संस्कृती विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ. संभाजीनगर

**प्रस्तावना:**

बौद्धधम्मामध्ये पाली साहित्यातील त्रिपिटक साहित्याला विशेष महत्त्व असून, हे सर्व साहित्य मूळ पाली भाषेमध्ये लेखन केलेले आहे. यामध्ये बौद्धधम्म, बौद्ध धम्मातील सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक या बाबींवर सूक्ष्मपणे मांडणी केलेली आढळून येते.

तथागत बुद्धांनी आपला "सद्धम्म" बहुजनांच्या हितासाठी, बहुजनांच्या सुखासाठी, लोककल्याणासाठी, लोकांवर अनुकंपा करण्यासाठी आपला धम्मोपदेश हा तत्कालीन लोकभाषेतच (पाली) सांगितला होता. पाली त्याकाळी लोकभाषा होती. पालीसाहित्य तथागत बुद्धांच्या काळात लिपिबद्ध केल्याचे पुरावे उपलब्ध नसले तरी श्रुत परंपरा हे साहित्य एका पिढीकडून पुढच्या पिढीकडे आल्याचे आढळून येते आणि त्या अर्थाने पालीसाहित्य हे ख-या अर्थाने लोकसाहित्य ठरते.

**पालीसाहित्यातील महत्त्वाचे ग्रंथ:-**

**सुत्तपिटक :**

"पाली त्रिपिटकाचा सर्वाधिक महत्त्वपूर्ण भाग म्हणजे "सुत्तपिटक" होय. सुत्ताचा अर्थ "सूत किंवा धागा" तर पिटक याचा अर्थ "पेटारा अथवा परंपरा" होय. ज्या प्रमाणे सुत्ताचा गोळा एका हातावरून दुस-या हातावर घसरत जातो, त्याप्रमाणे तथागत बुद्धाच्या धर्माचा उपदेश त्यांच्या शिष्य-प्रशिष्यांपासून चालत आलेला आहे."[1]

ही परंपरा पुढे चालत राहिली. जम्बूद्वीपाच्या दृष्टीने विचार करताना व बुद्ध कालखंडातील सर्वच भिक्खुंना मुखोगत असणारे कालांतराने संगीतीच्या माध्यमातून ही संकलन करण्यात आलेले दिसते. यामध्ये -

1) प्रथम धम्मसंगीती
2) द्वितीय धम्मसंगीती
3) तृतीय धम्मसंगीती
4) चतुर्थ धम्मसंगीती

या कालखंडामध्ये मोठ्या प्रमाणात पालीसाहित्य हे संकलित करून ठेवण्यात आले आहे. आज आपणास पालीसाहित्य जे मूळ रूपात बघावयास मिळते, ते या संगीतींमुळेच. अन्यथा बुद्धधम्म व संघाचा उपदेश हा जगाला कळालाच नसता.

सुत्तपिटकामध्ये एकूण पाच निकायाचा समावेश होतो. त्यांची नावे पुढील प्रमाणे आहेत.

1) दीघनिकाय, 2) मज्झिमनिकाय, संयुत्तनिकाय, अंगुत्तरनिकाय, खुद्दकनिकाय आदि.

हे महत्त्वाचे ग्रंथ असून, खुद्दकनिकायामध्ये प्रामुख्याने आणखी 15 ग्रंथांचा समावेश दिसून येतो. ते ग्रंथ खालीलप्रमाणे -

1) "खुद्दकपाठ, 2) धम्मपद, 3) उदान, 4) इतिवृत्तक, 5) सुत्तनिपात, 6) विमामवत्सु, 7) चेतवत्थु, 8) थेरगाथा, 9) थेरीगाथा, 10) जातक, 11) निद्देस, 12) पटीसम्भिदामग्ग, 13) अपदान, 14) बुद्धवंस, 15) चरियापिटक"[2] आदि.

उपरोक्त पालीसाहित्यातील सर्वच ग्रंथ तत्कालीन राजकीय, धार्मिक, सामाजिक, भौगोलिक, ऐतिहासिक व बुद्धकालीन लोकसंस्कृतीच्या दृष्टीने अभ्यासक, संशोधक, जिज्ञासू यांना उपयुक्त व माहितीचा स्रोत म्हणून अतिशय महत्त्वपूर्ण आहेत.

पालीसाहित्याची ही पार्श्वभूमी पाहता सिलोन सध्याचे श्रीलंका या ठिकाणी ही सिंहली भाषेत अनेक ग्रंथलेखन प्रामुख्याने झालेले दिसून येते. त्यामध्ये पालीसाहित्यातही "वंस" साहित्याची भर पडलेली दिसते.

"पालीमध्ये वंस साहित्याची परंपरा बुद्धघोषाच्या पूर्वीपासून तर विसाव्या शतकापर्यंत चालत आलेली आहे."[3]

"वंस (सं. वंश) चा अर्थ इतिवृत्त, इतिहास, प्रथा इत्यादी याचा शाब्दिक अर्थ आहे वंश परंपरा अथवा वंश इत्यादी."[4]

ख-या अर्थाने पाहता वंस साहित्य हे महत्त्वाचे ऐतिहासिक दस्तऐवज आहेत. पालीमध्ये प्रामुख्याने पुढील वंस ग्रंथ हे समाविष्ट असल्याचे निदर्शनास येते. त्यामध्ये अनुक्रमे -

1) "दीपवंस, 2) महावंस, 3) चूळवंस, 4) बुद्धघोसुप्पति, 5) सद्धम्मसङह, 6) महाबोधिवंस, 7) थूपवंस, 8) अत्तनगलुविहारवंस, 9) दाणवंस, 10) जिनकालमालिनी, 11) छकेसंघातुवंस, 12) नळाटधातु वंस, 13) सन्देसकथा, 14) गन्धवंस, 15) संगीती वंस, 16) शासनवंस, 17) सासनवदीप इत्यादी महत्त्वाचे ग्रंथ होत."[5]

वरील सर्व वंस साहित्यिक ग्रंथ पाहता यामधून तत्कालीन सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक माहिती मिळविण्यासाठी सहा ग्रंथांचा सिंहाचा वाटा आहे. हे सर्वच ग्रंथ ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण असून, सिलोन हा इतिहास जाणून घेण्यासाठी उपयुक्त असून, अनिवार्य व महत्त्वपूर्ण आहेत. वरील सर्वच ग्रंथांची विस्ताराने माहिती न पाहता दीपवंस आणि महावंस ह्या दोन ग्रंथांचे महत्त्व विशद करण्याच्या हेतूनेच हा शोधनिबंध प्रामुख्याने लेखन केला आहे.

**दीपवंस :**

"हा एक प्राचीन ग्रंथ असून, यामध्ये श्रीलंकेचा इतिहास कथन केलेला आहे. "दीपवंस", "द्वीपवंस" याचा अर्थ असा आहे की, "द्वीप" चा इतिहास.""6 हा ग्रंथ तिस-या-चौथ्या शतकात निर्माण केला गेलेला असून, हा महत्त्वाचा स्रोत आहे. महावंस आणि "दीपवंस या ग्रंथांतून श्रीलंका आणि भारत यांच्यातील प्राचीन इतिहासातील अनेक घटनांचा लेखाजोखा मिळण्यास मदत होते."[7] हा ग्रंथ इतिहासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असला, तरी साहित्याच्या दृष्टीनेही एक प्राचीन व महत्त्वपूर्ण ग्रंथ म्हणून दीपवंस ह्या ग्रंथाकडे बघितले जाते.

"दीपवंस प्राग्बुद्धकालीन रचना असून, याच्या लेखकांचे नाव अज्ञात आहे. दीपवंस हा ग्रंथ 22 परिच्छेदांमध्ये विभक्त आहे. यामध्ये लंकाधिराज मुटसीव (इ.स.पू.307 ते इ.स.पू.325) यांच्या कालावधीपासून तर राजा महासेन (इ.स.पू.325 ते इ.स.पू.352) यांच्या शासनकालापर्यंत लंकेचा इतिहास वर्णिलेला आहे."[8]

वंश साहित्यातील हा पहिला व महत्त्वपूर्ण ग्रंथ आहे. सदर ग्रंथामध्ये "तथागत भगवान बुद्धाचे तीनवेळा लंकागमनाचे वर्णन प्राप्त होते."[9] सदर वर्णन हे तर्कसंगत वाटत नसले तरी सदर ग्रंथात बुद्ध श्रीलंकेत गेल्याची माहिती मिळते. ती ऐतिहासिकदृष्ट्या खरी वाटत नाही. सदर ग्रंथात अनेक घटना ह्या तर्कसंगत वाटत नाहीत. त्यामुळे त्यांची वर्णने ही काल्पनिक असण्याची शक्यता नाकारता येत नाही. परंतु, अनेक घटना, बाबी ह्या विश्वसनीय व ऐतिहासिक माहिती पुरण्यास सदर ग्रंथाचा प्रामुख्याने उपयोगही होतो. "दीपवंस ग्रंथातून प्रथम धम्मसंगीतीचे ठिकाण धम्म संगीतीमध्ये सामील झालेल्या भिक्खुंची वैशिष्ट्ये इत्यादींची माहिती प्राप्त होते."[10]

"तसेच सम्राट अशोक आणि त्यांनी केलेल्या विहार निर्मितीच्या कार्याची माहितीही सदर ग्रंथात मिळते."[11]

"महेंद्रची प्रव्रज्ज्या याचेही वर्णन या ग्रंथामध्ये प्राप्त होते."[12] "महेंद्र यांच्या प्रव्रज्जेनंतर 12 वर्षांनी विहारामध्ये राहत असताना महेंद्र स्थविरांचे परिनिर्वाण झाल्याचा ऐतिहासिक उल्लेखही सदर ग्रंथामध्ये होतो."[13] दीपवंस हा ग्रंथ श्रीलंकेचा (सिलोन) इतिहासग्रंथ म्हणूनही ओळखला जातो. सम्राट अशोक व महेंद्र यांच्या कार्याचा उल्लेख हा ब-याच ठिकाणी आलेला असून, लंकेमध्ये बुद्ध धम्माचा प्रचार-प्रसार करण्याचे सर्व श्रेय हे सम्राट अशोक व पुत्र महेंद्र यांना जाते, हे सत्यही नाकारता येत नाही.

भारताचे महान सम्राट देवानाप्रिय प्रियदर्शी अशोक यांचे पुत्र महेंद्र द्वारा जवळजवळ 2200 वर्षे पूर्व मगध राज्यातून श्रीलंकेला जाऊन पालि त्रिपिटकाचा प्रचार-प्रसार केल्याचे ऐतिहासिक पुरावे मिळतात. भारतामध्ये जेम्स प्रिन्सेंस यांनी सम्राट अशोकांच्या शिलालेखाचे वाचन करून संबंध जगाला बुद्ध धम्माची धम्मनीतीची ओळख करून दिली. त्याच पद्धतीने सिलोन मध्येही चार्ल्स टर्नर यांनी महावंस या ग्रंथाचे प्रकाष्टन केले.

**महावंस:**

"महावंस हा सुद्धा दीपवंस ह्या ग्रंथाप्रमाणे श्रीलंकेचा ऐतिहासिक ग्रंथ आहे. यांची विषयवस्तु दीपवंसप्रमाणेच असून, हा ग्रंथ अधिक विस्तृत आहे. महावंस खऱ्याअर्थाने ऐतिहासिक महाकाव्य आहे."[14] सदर ग्रंथामध्ये एकूण 37 परिच्छेद आहेत.

पठमो परिच्छेदो यामध्ये,
नमक्कारवण्णना तथागताभिगमनवष्णना
(1) महियडू णा गमनवष्णना
दुतियो परिच्छेदो
महासम्मतवंसवष्णना
ततियो परिच्छेदो
पठमधम्मसङीतिवण्णना
चतुत्यो परिच्छेदो
दुतियसङीतिवण्णना
पचमो परिच्छेदो
ततियसङीतिवण्णना
1) आचारियकुलभेदवण्णाना
2) आचरिवादवण्णना
3) धम्मासोकाभि सेकवण्णना
4) निग्रोध सामणेरदस्सनवण्णना
5) मोग्गलिपुतथेरोदयवण्णना

याशिवाय इतरही परिच्छेदात महत्त्वपूर्ण माहिती दिलेली आहे.

प्रथम घटकामध्ये भगवान बुद्धाचे श्रीलंका आगमन त्यानंतर नागद्वीपमध्ये आगमन त्याचप्रमाणे कल्याणी येथे आगमन ही माहिती मिळते. पण ही माहिती तर्कसंगत वाटत नाही.महासम्मत वंशमध्ये वंशावळी दिलेली आहे, तर तिसऱ्या घटकात बौद्ध धम्मसंगीतीची वर्णने आलेली आहेत. घटक चारमध्ये दुसऱ्या धम्मसंगीतीचे वर्णन आलेले असून, पाचव्या घटकामध्ये तिस-या धम्मसंगीतीचे वर्णन आहे. सर्वच घटकांमध्ये महत्त्वपूर्ण माहिती असून, सम्राट अशोक व पुत्र महेंद्र यांचे श्रीलंकेमध्ये बौद्धधम्माचा प्रचार-प्रसार सोबतच श्रीलंका व भारताचे संबंध हे दृढ असल्याचे निदर्शनास येते.

डॉ. भदन्त आनंद कौशल्ययान यांन या ग्रंथाचा हिंदी अनुवाद केलेला आहे. तो ही ग्रंथ महावंस ग्रंथाच्या बद्दल माहिती समजून घेण्यासाठी उपयुक्त आहे.

**सारांश:**

महावंस आणि दीपवंस ह्या दोन्ही ग्रंथांमध्ये महावंस हा ग्रंथ अधिक प्रसिद्ध असून, दीपवंस हा ग्रंथ प्रामुख्याने कथा, पौराणिक कथा आणि तत्कालीन घटना यांची काही ठिकाणी तर्कसंगत न लागता घटनांची जुळवाजुळव न लागता लेखन केलेले असून, तो पाली भाषेत लेखन केलेला आहे. तसेच महावंस हा कविता आणि कल्पनांनी परिपूर्ण असून, तत्कालीन घटनांच हुबेहूब वर्णन व मांडणी करताना सरस ठरला आहे. या दोन्ही ग्रंथांमध्ये सम्राट अशोकांच्या कार्याचे तसेच पुत्र महेंद्र यांच्या कार्याची माहिती व तत्कालीन राजा महासेन यांच्या संदर्भातही माहिती मिळण्यास मदत होते.

**संदर्भ ग्रंथसूची**

1) आठवले सुभाष, पालि साहित्य आणि लोकसंस्कृती, सन्मति प्राच्य संस्था, सदर, नागपूर-440001, 2005
2) दीपवंस
3) महावंस
4) उपाध्याय भरतसिंग, पालि साहित्य का इतिहास, हिन्दी साहित्य सम्मेलन, प्रयाग, 1994
5) www.wikipedia.org
6) भदन्त आनंद कौशल्यायन

# मराठेकालीन अंतर्गत व्यापार: एक अभ्यास

**प्रविण नारायण राठोड**
संशोधक विद्यार्थी, इतिहास आणि प्राचिन संस्कृती विभाग,
डॉ. बाबसाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ. संभाजीनगर.

प्रस्तावना :

मराठेकालीन व्यापाराच्य संदर्भात, महाराष्ट्रातील व्यापारी नेटवर्क आणि व्यापारमार्गाबद्दल विस्तृत माहिती मिळते. या कालखंडात अंतर्गत व्यापाराचे महत्त्व वाढले होते, जिथे नदीमार्ग आणि खुष्कीच्या मार्गाने विविध वस्तूंचा व्यापार केला जात होता. विविध वस्तूंचे वर्गीकरण, व्यापारी मार्ग, जकात प्रणाली आणि सुरक्षा व्यवस्थेचा समावेश होतो. या लेखामध्ये, मराठेकालीन व्यापाराची विविध पैलूंची तपासणी केली आहे, ज्यामध्ये व्यापारी वर्ग, त्यांचे मार्ग, व्यापार साधने आणि त्यात सहभागी असलेले सरकारी अधिकारी यांचा समावेश आहे.

गृहितके:

1. मराठेकालीन व्यापारी प्रणालीमध्ये नदीमार्ग आणि खुष्कीमार्गावरून व्यापार करण्यात महत्वाची भूमिका होती.
2. व्यापाऱ्यांना संरक्षण, काफिला व्यवस्थापन आणि करप्रणाली अंतर्गत विविध सरकारी अधिकारी मदत करत होते.

उद्दिष्टे:

1. मराठेकालीन व्यापारी मार्ग आणि त्यावर असलेल्या सुरक्षेच्या उपाययोजनांचा अभ्यास करणे.
2. व्यापारातील विविध वस्तूंचे वर्गीकरण आणि त्यावर असलेल्या कर आणि जकात प्रणालीचा अभ्यास करणे.

अंतर्गत व्यापार दोन प्रकारचा होता - नदीमार्गाने होणारा व्यापार आणि खुष्कीच्या मार्गाने होणारा व्यापार. व्यापारी ज्या वस्तूंचा व्यापार करत असत त्या वस्तूंचे 8 विभागात वर्गीकरण करता येईल. अन्नपदार्थ, फळे, मसाले, धातू, कापड, प्राणी, चैनीच्या वस्तू आणि नित्याच्या वापरातील वस्तू. अन्नपदार्थांमध्ये विविध प्रकारची धान्य उदा: तांदूळ, गहू, बाजरी, डाळी, मासे, मिरच्या, सुरण, दूध, गुलकंद, साखर, नारळ यांचा समावेश होत असे. पेशव्यांच्या काळामध्येसुद्धा काही नद्यांवर होड्यांची वाहतूक चालत असे. या नावांमधून थोड्या अंतरावर वस्तू पोचवल्या जात असाव्यात. माहीम परगण्यामध्ये दांतीवरे नावाच्या ठिकाणी नावेतून वाहतूक चालत असे. पौडखोरे तर्फमध्ये जामगाव, कर्डे परगण्यातील सिन्नर, झिराड तर्फमधील मांडवे, खाडीवरील उंदेरी तालुका, घोडबंदर ठाणे, नाशिक, राहुरी, संगमनेर, बेलापूर, देपूर आणि अशी उंबरी या ठिकाणी नावातून वाहतूक चालत असे. 1755 मध्ये काही ठिकाणच्या कमावीसदारांना पेशव्यांनी 100 ते 125 प्रवासी नेता येतील अशा भक्कम नावा तयार करण्यास सांगितले होते. प्रत्येक नावेची किंमत 400 ते 500 रुपये इतकी असे. मुंबई ते बेलापूर या भागात व्यापारी मालाने भरलेल्या बोटीसुद्धा जात असाव्यात.[1] यामध्ये आणखी काही प्रवाह उदाहरणार्थ तेरेखोल येथील काजवी आणि गड या नद्या नौकानंयनासाठी आणि व्यापार उद्योगासाठी वापरता येत असत.

अंतर्गत व्यापार जल मार्गाने, घाटातील रस्त्यात आणि खुष्कीच्या मार्गाने अशा तीन मार्गांनी चालत असे. पठारावरील खुष्कीच्या मार्गाइतकाच महाराष्ट्रातील घाटातील रस्ताही महत्त्वाचा आहे. महाराष्ट्रातील पठार पश्चिम, वायव्य आणि उत्तर या बाजूला सह्याद्री, विंध्याचल आणि सातपुडा पर्वत यांनी बंद झालेले होते. पर्वतरांगांकडून त्यापलीकडे जाणारे रस्ते नसते तर अंतर्गत व्यापार करणे अशक्य झाले असते. घाटमार्ग खालचा भाग आणि वरचा भाग या दोन गटांमध्ये विभागले गेले होते. सह्याद्रीच्या डोंगरांमधून काही डोंगराळ रस्ते होते. अंबाघाट, आंबेनाली किंवा रडतोंडीचा घाट, आंबोली किंवा पारपोली, उंबर्डे, कलेधोने, कुंभर्ली, कमठा, तोरण, नाने, फोंडा, भीमाशंकर, रंगना आणि सालपा[2] येथे घाटमार्गे होते. विंध्याच्या रांगांमध्ये अजंठा[3] इवोटाबारी, गणेश, गोवतला, चांदोरी, पिंपळगाव, बालाघाट, राजापूर, खेतबाडी, लरसिंगी आणि सोमटना हे घाटमार्ग होते. आकाराउनी घाट, कारी बोरी, छत्री, धुलीबारी, सुकलदेवी आणि सिंदवा[4] हे विंध्यप्रदेशातले डोंगराळ रस्ते होते. या घाटावरील वाहतुकीचे नियंत्रण करण्यासाठी प्रवाशांच्या काफिल्यांना संरक्षण देण्यासाठी आणि प्रवाशांकडून वाहतूक कराची वसुली करण्यासाठी या घाटातील रस्त्यावर ठिकठिकाणी जकात नाकी होती. प्रत्येकावर घाटपांडे नावाचा एक अधिकारी असे आणि या अधिकाऱ्याला मोधवी, पानसरे, पथकदार[5] बिडवई,

गुजर आणि गुमास्ते हे अधिकारी मदत करत असत. घाटमार्ग रस्ते सुस्थितीत ठेवणे हे मोधवी या अधिकाऱ्याचे काम असे. एका चौकीपासून दुसऱ्या चौकीपर्यंतच्या घाटातील रस्त्यावर प्रवाशांना संरक्षण देणे हे पथक अथवा पथकी याचे काम असे. पथकीच्या या कामात गुजर हे शिपाई मदत करत असत. बिडवई हा मूलतः बाजारावरील अधिकारी होता. [6] बाजारात येणाऱ्या व्यापारी कुटुंबाची यादी तो ठेवत असे. बाजारात येणाऱ्या फिरत्या व्यापाऱ्यांना संरक्षण देणे आणि व्यापार व्यवहार पूर्ण होईपर्यंत वाहनाकडे लक्ष ठेवणे हे त्याचे काम असे फिरते व्यापारी घाटमार्गावरून ये- जा करत असत. तेव्हापासून बिडवई लोकांना त्यांचे काम करावे लागत असे. त्यांच्याजवळ ठेवलेली व्यापारी कुटुंबाची यादी घाटपांडे लोकांना देणे हे त्यांचे काम असे.[7] सर बिडवई यांच्या देखरेखीखाली बिडवेई काम करत असत. [8] गुमास्ते किंवा मुतालिक हा घाटपांडेचा कारकुन म्हणून त्याच्या हाताखाली काम करत असे. [9] प्रवाशांना संरक्षण देणे आणि त्यांच्याकडून वाहतूक गोळा करणे अशी दोन कामे चौक्यांना करावी लागत असत. वाहनांचा प्रकार आणि व्यापारी मालाचे वजन वाहतूक कर अवलंबून असे. उंबरे नाक्यापाशी नऊ लाख दाम इतकी रक्कम गोळा होत असे. त्यामुळे त्याला नऊ लाख उंबरे म्हणण्यात येत असे. [10] इतर काही ठिकाणी 22 लाख दान इतकीसुद्धा रक्कम जमा होत असे.

विविध प्रांत अथवा महाल यांचे महसूल अधिकारी म्हणजे कमावीसदार ज्याप्रमाणे असत त्याचप्रमाणे निरनिराळ्या विभागांचे जकात अधिकारी म्हणून जकात कामावीसदार असत. कामाविसी किंवा करवसुली हे अधिकार ठराविक मुदतीसाठी मक्त्याने देण्यात येत असत. जकात कमाविसदार हे सर्व दृष्टीने सरकारचे अधिकारी असत आणि ते त्यांच्या ताब्यातील बंदरांमध्ये येणाऱ्या व्यापारी जहाजांना परवाने देऊ शकत असत. याबाबतीत सुभेदाराचा त्याच्यावर कोणत्याही प्रकारे जोर चालत नसे. या बाबतीत जकात मामलतदाराच्या ताब्यात वरच्या भागातील कल्याण- भिवंडी भागातील घाट, पठारावरील जकातनाकी आणि पेनवासी, कल्याण, भिवंडी, पनवेल, नागोठान, बेलापूर, केळवे आणि पारसीम [11] यासारखी काही बंदरे असत.

मराठा साम्राज्याचा केंद्रबिंदू असलेल्या पुण्यापासून पाच प्रमुख रस्ते फुटत असत. पहिला बोरघाटामधून मुंबईला जात असे. दुसरा नासिक, बुऱ्हाणपुर, उज्जयिनी, झाशी, ग्वाल्हेर या मार्गे उत्तरेकडे दिल्लीला जात असे. तिसरा रस्ता बारामती आणि सोलापूरमार्गे पूर्वेला हैदराबाद येथे जात असे. चौथा रस्ता सातारा, मिरज, बंकापूर, सीरा आणि दोड्डबळापूर यावरून दक्षिणेकडे रामेश्वरला जात असे आणि पाचवा रस्ता कुंभार्ली घाटातून रत्नागिरीला जात असे. या महत्त्वाच्या रस्त्यांखेरीज अनेक लहान लहान रस्ते थोड्या अंतरापर्यंत जात असत. त्यामधील काही रस्ते महामार्गाचा भाग बनत असत. पुणे नाशिक रस्ता आणि सीरोज बुऱ्हानपूर रस्ता हे रस्ते उत्तरेकडील महामार्गाचा एक भाग होते तर पुणे- बदामी रस्ता दक्षिणेकडील महामार्गाचा एक भाग होता. बोरघाटातून काही रस्ते कोकणातून नाशिक येथे जात असत.[12] त्याचप्रमाणे कोकणामधून जुन्नरकडे तसेच नाने मावळातून पुण्याहून कळवणला रस्ता जात असे. पुण्याहून मलकापूर, कल्याणहून मुंबई येथे जाणारा रस्ता पुणे- मुंबई महामार्गाचा एक भाग होता. मुंबई ते वाई, सुरत ते खानदेश, सुरत ते पुणे, पुण्यावरून नाशिक मार्गे नंदुरबार, सीरोज ते बुऱ्हानपुर आणि औरंगाबाद ते बुऱ्हानपुर [13] असे लहान लहान रस्ते होते. या सर्व रस्त्यांचे जाळे महाराष्ट्रभर एक जाळे झाले होते. त्यामुळे खुष्कीच्या मार्गाने केली जाणारी वाहतूक सोपी होत असे, त्यामुळे लोकांना पुण्याहून काशीला जाणे शक्य [14] होत असे तसेच मिरज ते काशी [15] सातारा ते ग्वाल्हेर [16] पुणे ते दिल्ली [17] आणि काशी ते रामेश्वरम जाणे शक्य होत असे.

खुष्कीच्या मार्गाने लोकांची वर्दळ कमी असे. त्यामुळे अशाप्रकारे टपाल नेणे धोक्याचे होते. निरोप नेणारे जासूस आणि प्रवासी यांना रस्त्यामध्ये लूटले. 1748 मध्ये बुंदेलखंड प्रांताच्या महसुलावर 10,000 रुपयांची वरात छत्रपुराला घेऊन जाणारी जासूस लुटले गेले. 1763 मध्ये थोपनदास कुलवणकर यांचे पुण्याहून कळवनला पैसे आणि वस्तू वाहून नेणारे तट्टू नानेमावळ तर्फ मधील मऊ या खेड्यामध्ये रात्रीच्या वेळी थांबले असताना लुटले गेले पूर्वी उल्लेख केल्याप्रमाणे प्रवासांसाठी रस्ते बांधणे हेच केवळ सरकारचे कर्तव्य नव्हते तर तुरळक रहदारीच्या ठिकाणी या रस्त्यांवर सुरक्षितता ठेवणे आणि प्रवाशांना सर्वसाधारण सोयी उपलब्ध करून देणे हे सरकारचे कर्तव्य होते.

1754 मध्ये लाला नाईक वंजारा नावाचा एक फिरता विक्रेता गुजराती प्रांतातील उलपट परगण्यातून ओझीवाहू बैलांवरून माल वाहून नेत होता. त्यावेळी टेकड्यांमधील भागात दोन दरोडेखोरांनी त्यांच्याजवळून 4,000 रुपये लुटून नेले. आणखी 1500 रुपये त्यांना देण्याबाबत कबुली घेतली. त्यांनी तक्रार केल्यावर पेशवा सरकारने नंदुरबार परगण्यामधील

अधिकाऱ्यांना दरोडेखोरांकडून पैसे परत मिळवून लाला नाईक वंजारा याला परत देण्याचे आदेश दिले, ही रक्कम परत देताना त्या व्यापाऱ्याच्या सूचनेप्रमाणे ¼ रक्कम सरकारकडे जमा करण्याविषयी सूचना देण्यात आली. पाल हवेलित अंताजी नारायण यांने एक विश्रांतीगृह किंवा धर्मशाळा बांधली होती. प्रवासी लोक ती धर्मशाळा वापरत असत. 1750 मध्ये तर्फ पाल हवेलीच्या कामाविसदारांना ती धर्मशाळा प्रतिवर्षी दुरुस्त करण्याचे आदेश सरकारने दिले. प्रवाशांच्या सोयीसाठी अशी दुरुस्ती करणे आवश्यक होते.[18] 1753 मध्ये खंबाटकी घाटामध्ये तुषार्त प्रवाशांना पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी सरकारच्या खर्चाने व्यवस्था करण्यात आली. वंजारी, लमाणी, बनिया आणि चारण यांसारख्या काही व्यापारी जमाती हल्ले व दरोडेखोरीच्या सर्व संकटांना तोंड देऊन मोठ-मोठे काफिले घेऊन हजारो ओझीवाहु प्राण्यांवरून व्यापारी माल वाहून नेत असत. फ्रायरने 300 बैलांवर सामान वाहून नेणारा एक काफिला नाणेघाटात पाहिला. [19] महाराष्ट्रात अनेक वेळा लमानी लोक बंदरातून वरच्या भागात व देशातील बाजारपेठेत वस्तू वाहून नेत असत. 10,000 लमानी लोकांचा एक काफिला असे आणि प्रत्येक लमानी माणसाकडे एक बैल असे. 1776 मध्ये जेव्हा हरिपंत फडके आणि परशुराम भाऊ हे जेव्हा मराठा सैन्याचे नेते होते तेव्हा गुजरात व माळवा येथे राघोबाचा पाठलाग करत असताना 10,000 लमानी लोकांच्या एका तांड्याला प्रवास करताना त्यांनी पाहिले, परंतु त्यांचे दुर्दैव असे की त्यांना मदत करणे तर दूरच उलट पटवर्धन व इतरांनीच 700 पेंढाऱ्यांच्या मदतीने तो तांडा लुटला व 700 बैल जबरदस्तीने हिसकावुन घेतले. त्यांनी मीठ, खोबरे, तुरटी आणि खजूर या वस्तू तीन-चार एकसारख्या लुटल्या असे म्हटले जाते. [20] काही मराठी लोक सुद्धा लहान प्रमानावर मालाची वाहतूक करत असत. [21] गोसावी लोक घोडे, उंट, तांदूळ, मीठ, नारळ इत्यादी वस्तू बाहेरील बाजारातून अथवा कोकणामधून आणून नाशिक, पुणे आणि इतर शहरांमध्ये विकत असत.[22] 1790 मध्ये पोमाजी नाईक आणि गोविंद नाईक भुके यांच्या देखरेखीखाली चारणलोक 15,000 ओझीवाहु बैल घेऊन जात होते. ते धान्य घेऊन निरनिराळ्या ठिकाणाहून सैनिकी छावण्या व अनेक बाजारामध्ये जकात कराशिवाय जात असत. जेव्हा पुण्यात किमती वाढल्या तेव्हा पेशव्यांनी त्यांना पुण्याला धान्य आणण्याचे आज्ञा केली.

निष्कर्ष:

मराठेकालीन व्यापार अत्यंत सुसंगत आणि कुटुंब व्यवस्थेवर आधारित होता. जिथे व्यापाऱ्यांना विविध राज्यांमध्ये आणलेले व्यापार मार्ग आणि सरकारी नियंत्रणाचा मोठा फायदा होता. व्यापार साधनांच्या मार्गाच्या आणि सरकारी तंत्राची प्रगल्भता दिसून येते नदी मार्गाने, खुश्कीच्या मार्गाद्वारे विविध वस्तूंचा व्यापार सुरळीतपणे चालत होता आणि त्यासाठी काफीला व्यवस्थापन व सुरक्षा उपाय होते. यावरून हे स्पष्ट होते की मराठेकालीन व्यापारी धोरण आणि संरचना सामाजिक आर्थिक आणि व्यापार व्यवस्थेत महत्त्वपूर्ण भूमिका बजावत होती.

**संदर्भ :**


1. Wad G.C., Selection from the Satara Rajas and Peshwas Diaries vol-3, 444-46.
2. शिवचरित्रसाहित्य, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, पृ.58.
3. Sardesai G.S. (Ed) Selection From the Peshwa daftar, p.295.
4. जोशी शं. ना (संपा.) ऐतिहासिक संकीर्ण साहित्य भाग 9, भारत इतिहास संशोधक मंडळ स्वीय ग्रंथमाला, पुणे, 1954, पृ. 11-13.
5. कित्ता, पृ.2
6. शिवचरित्रसाहित्य खंड – 1, उपरोक्त पृ.40.
7. जोशी शं. ना, उपरोक्त पृ. 3.
8. कित्ता पृ. 36.
9. कित्ता पृ. 23,25.
10. चिटणीस कृ. ना., पृ. 113.
11. Wad G. C., Selection from the Satara Rajas and Peshwas Dairies vol -6 P.777.
12. Wad G. C., Selection from the Satara Rajas and Peshwas Dairies vol -3, P.457.
13. चिटणीस कृ. ना, मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था खंड – 3, पृ. 114.

14. कित्ता पृ. 114.
15. भावे वा.कृ., पृ. 335.
16. चाफेकर ना. गो., पृ. 41.
17. Wad G. C., Selection from the Satara Rajas and Peshwas Dairies vol – 8, P. 1061.
18. Wad G. C., selection from the Satara Rajas and Peshwas Dairies vol – 2, 88,202,206.
19. Fryer John, Travels in India in the Seventeenth century, Asian educational services, New Delhi, 1993, P. 345.
20. चिटणीस कृ. ना., उपरोक्त पृ. 117.
21. Wad G. C., Selection from the Satara Rajas and Peshwas Diaries vol-3, 458.
22. भावे वा. कृ., उपरोक्त पृ. 151.

# पर्यावरण आणि इतिहास

**डॉ. एम जी मोरे**
संशोधन मार्गदर्शक
सिद्धार्थ कला महाविद्यालय जाफ्राबाद

**गणेश सुरेश गायकवाड**
संशोधक विद्यार्थी

पर्यावरण आणि इतिहास या संकल्पना मुळातच स्थूल स्वरुपाच्या आहेत. पर्यावरणाचा आपण जर सर्वकष सर्वव्यापी यादृष्टीकोनातून विचार केला तर आपणास असे दिसून येते की भुपृष्ठावर कोणताही सजीव निर्माप होणे वाढणे व नाश पावणे या नैसर्गिक क्रिया पूर्ण होण्यासाठी ज्या घटकांची आवश्यकता असते त्यास पर्यावरण म्हणतात.या चराचर सृष्टी मध्ये वावरणारे अनेक संजीव अगदी मुंगीपासून ते बुद्धीमान मनुष्या प्राण्या पर्यन्त सर्वांचेच योगदान पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी महत्वाचे ठरते. यासर्व बाबीची लिखीत स्वरूपात नोंद इतिहास हा विषय घेत असतो. आणि म्हणून वातावरणाच्या अनुकूल व प्रतिकूल परिस्थितीमध्ये व्यक्तीच्या हातून जे कार्य घडते त्या कार्याची योग्य मीमांसा करण्याचे काम इतिहासाचे आहे. पर्यावरणातील वेग वेगळे घटक मानवाच्या हालचाली नियंत्रित करीत असतात त्या अनूशगाने कार्याची रूपरेषा ठरते.

प्रो.ए.एल.राऊस म्हणतात विशिष्ट अशा भौगोलिक परिस्थितीमध्ये समाज करुन राहणाऱ्या मानवी जीवनाची कथा म्हणजे इतिहास होय. त्यांच्या सामाजीक आणि सांस्कृतीक पर्यावरणाची निर्मिती परस्पर देवाण घेवाणीतून आंतरप्रक्रियेतुन होत असते.

**पर्यावरण आणि इतिहास**

प्राचीन भारताच्य सतहासाच्या संदर्भात जर विचार केला तर आपणास असे दिसून येते की उत्खननात मिळालेल्या अवशेषांवरून वेगवेगळी मतांतरे इतिहासकारांमध्ये आहेत. सिंधु संस्कृतीच्या परिसरात इ.स.पू. 2000 च्या आसपास पावसाचे प्रमाण कमी होत गेले त्याचा परिणाम पशुपालनावर होऊन संस्कृती नष्ट झाली. काहींच्या मते पावसाचे अतिप्रमाण यामुळे जमीन खारवट झाली त्यामुळे उत्पादन क्षमता कमी होऊन संस्कृती नष्ट झाली काही इतिहासकार भुकंपामुळे जमीनीचे चढ-उतार झाले त्यामुळे संस्कृती नष्ट झाली. कारणे जरी वेगवेगळी असली तरी पर्यावरणातील असंतुलनामुळे या संस्कृतीचा विनाश घडून आला असे दिसते. यासंदर्भात आपणास अर्नाल्ड टॉयन्बी यांनी सांगीतल्याप्रमाणे इतिहास म्हणने संस्कृतीचा उदय विकास व ऱ्हास होय एखादया कालखंडात संस्कृतीचा उदय होऊन ती विकास पावते व तिचा कालांतराने ऱ्हास घडून येतो. सिंधु संस्कृतीच्या संदर्भात देखील आपणास असेच आढळून येते की ही संस्कृती सुरुवातीला उदयास येउन विकास पावली त्यानंतर तिचा ऱ्हास झाला. अर्थात पर्यावरणाचा अनुकूल व प्रतिकूलतेचा परिणाम संबंधीत घटना घडामोडीवर होत असतो.

वैदिक कालखंडामध्ये विशेषत: ऋग्वेद काळात अग्नि वरुण, उषा, मरुत या देवदेवतांचे पूजन केले जायचे की जेणे करून पृथ्वीवरील साऱ्या संकटांचा नाश होवो अशी आळवणी त्याकाळी होत असे. तीच परंपरा आजही भारतीय संस्कृतीत टिकून आहे. लग्नविधी समारंभ अथवा यज्ञाच्या वेळी अग्निदेवतेला प्रसन्न करण्यासाठी सप्तधान्य यज्ञात टाकण्याची प्रथा आहे. वरुण देवतेला प्रसन्न करण्या साठी यज्ञयाग केले जातात की जेणे करून अवर्षण ग्रस्त स्थिति निर्माण होऊ नये हा उद्देश त्यामागे असतो. वेद उपनिषदे, रामायण, महाभारत,जैन व बौद्ध साहित्यातुन पर्यावरण जागृतीचे संदर्भ आढळतात. वराह पुराणात सांगितले आहे की "जोपर्यन्त या धरतीवर नदि, पर्वत, वने, उद्याने आहेत तोपर्यंत तुमची मुले सुखाने नांदतील." आणी त्यामुळे पर्यावरणाचे

संवर्धन व जतन करण्यासाठी वेगवेगळया स्वरूपाच्या चळवळी कार्यरत असल्याचे आपणास दिसून येते.
वेगवेगळ्या साहित्यातून पर्यावरण जागृतीघडवणारी उदाहरणे आपणास दिसून येतात. संत साहित्यातूनही आपणास पर्यावरण जागृतीचा संदेश मोलाचा वाटतो. वास्तविक पाहता संत साहित्य हे भाषेत मोडणारी बाब असली तरी इतिहासाचा एक महत्व पूर्ण भाग म्हणून पर्यावरणा कडे पहिले जाते.जगद्गुरु संत तुकाराम महाराज म्हणतात.

**"वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे, पक्षीही सुरवरे आळविती"**

अभंगाच्या माध्यमातून पर्यावरण जागृतीचा संदेश देणारे संत तुकाराम महाराज त्यांच्या महान कार्यामुळे अजरामर झाले. संत गाडगे महाराजांनी स्वच्छतेचा संदेश दिला प्रत्यक्ष कृतीद्वारे त्यांनी आपले कार्य आरंभिले दिवसा संपूर्ण गावाची स्वच्छता हाती खराटा घेऊन करीत व रात्री कीर्तनाच्या माध्यमातून अज्ञान अंधश्रद्धेवर कठोर प्रहार करीत असत. त्यातुन त्यांचे सामाजिक व वैचारिक पर्यावरणाचा मोलाचा संदेश समाजाच्या तळागाळापर्यंत पोहचत असे.

मध्य युगीन काळात डोकावल्यास आपणास असे दिसून येतेकी छ:शिवाजी महाराजाच्या काळात महाराष्ट्रातील भौगोलिक परिस्थिति त्यांच्या कार्याचा श्रीगणेश करण्यास कशी साहयभुत ठरली याची आपणा सर्वांनाच कल्पना आहे. गनिमी कावा हे युद्धतंत्र नैसर्गिक परिस्थिति मुळे महाराजांना अवगत झाले होते. आज परिस्थिति बदललेली आहे. मानवी जीवन हे संघर्षमय आहे. अवघे जग युद्ध सदृश्य छायेखाली आहे. त्याचे परिणाम पर्यावरणाची हानी होऊन. वातावरणात प्रचंड बदल झालेले आहेत. तापमानात वाढ होऊन पृथ्वी वरील संजीवांचे अस्तित्व धोक्यात आलेले आहे.

मोगल सम्राट बाबराला बागवानीची विशेष आवड होती

आपल्या कार्यकाळात त्याने अनेक बाग-बगिचे उद्याने यांची निर्मिती केली. त्यावरून त्याचे पर्यावरण विषयक दूर दृष्टिकोण आपणास दिसून येतो. दिल्ली सलतनत काळातील सुलतान देखील पऱ्यावरणा विषयी विशेष जागृत होते. फिरोज शहा तुघलकाने अनेक कालव्याची निर्मिती केलेली होती. की जेणे करून शेतीला पाणी पुरवठा करणे शक्य होत असे. मध्ययुगीन काळातील या सुधारणा पर्यावरण पूरक होत्या. शेरशहाने आपल्या साम्राज्यात यात्रे करूसाठी दुतर्फा झाडे लावलेली होती. किंबहुना तसे आदेश त्याने आपल्या साम्राज्यातील अधिकाऱ्यांना दिलेले होते. गतकालीन घटनांचे वर्णन, मानवी प्रगतीचा हा इतिहासाचा विषय आहे. मानव हा निसर्गाच्या सान्निध्यात राहून आपल्या गरजा पूर्ण करतो गतकालीन घटना आणि निसर्ग हा इतिहासाचा अभ्यास विषय आहे मानवाच्या प्रगतीमध्ये जडणघडणी मध्ये निसरगांचे योगदान अतुलनीय आहे.

इतिहास हे एक सामाजिक शास्त्र आहे. इतिहास व इतर अनेक विषय है इतिहासाचे साहाय्यकारी विषय आहेत. त्यांचा एकमेकावर होणारा परिणाम अभ्यासणे हे महत्वाचे कार्य ठरते. पर्यावरण हा देखील इतिहासाचा सहाय्यकरी विषय असून इतिहासात पर्यावरणाचे महत्व दुर्लक्षित करणे अन्यायकारी ठरते. स जीव व त्या सभोवतालचे वातावरण याचा सहसंबंध आपणास पर्यावरण व इतिहास या संकल्पने वरुन सहज लक्षात येतो. पर्यावरण व इतिहास यांचा विषय मनुष्य प्राणी हाच आहे कारण पर्यावरणामध्ये मनुष्यप्राणी हा आपल्या गरजा भागविण्यासाठी वेगवेळया आदानांचा वापर करतो ती आदाने त्यास निसर्गातून प्राप्त होतात त्या मुळे त्यास निसर्गाचे संतुलन टिकऊंन ठेवण्या साठी. जमीन, हवा,पाणी, झाडे यांना हानी पोहचणार नाही याची काळजी घ्यावी लागते. काळाच्या ओघात ज्ञानाच्या कक्षा रुंदावत चाललेल्या आहेत. परंतु सर्वार्थाने विचार केला असता असे दिसून येते की योग्य वातावरणामध्ये त्याच्या कार्याला गती येत असते. व कार्य सिद्धीस जाते. संजीव त्याच्या संभोवतालचे वातावरण यांचा संबंध परिस्थितीकी शास्त्रा मध्ये येतो. औद्योगिक करणाच्या युगात शहरांमध्ये अनेक कारखाने उद्योग धंदे खत निर्मितीचे प्रकल्प दूषित पाणी ऊर्जास्त्रोताचे घटते प्रमाण अणुउत्सर्जन वापरात येणारि रासायनिक खते या मुळे पर्यावरणामध्ये संजीवांच्या अस्तित्वाला धोका निर्माण झाला आहे. प्रदूषणाच्या अडचणीला आज तोंड द्यावे लागत आहे. त्यातून होणारे वेगवेगळे आजार यामुळे मानवी जीवन धोक्यात आले आहे खाद्य पदार्थामध्ये होणारी रासायनिक भेसळ तसेच भाजी पाल्यावर होणारी कीटक नाशकांची फवारणी या मुळे कॅन्सर, अर्धांगवायु, हृदय विकार या सारखे आजार फोफावत चालले आहेत. 2 डिसेंबर 1984 साली भोपाळ येथे यूनियन कार्बाइड नावाची एक अमेरिकन कंपनी मिथाईल आयसोसायनेट नावाच्या वायूचे उत्पादन करीत असे एके दिवशी वायु गळती झाल्यामुळे भोपाळ शहर हादरले सुमारे 16 हजार माणसे गुरे धोरे मृत्युमुखी पडले हजारो अपंग झालेत. बऱ्याच लोकांची दृष्टी गेली. आधुनिक भारताच्या इतिहासातील ही काळीकुट्ट दुर्घटना होय. अजूनही त्या घटनेच्या जखमा ओल्या आहेत. काळ बदलला वेळ बदलली परंतु त्या दुर्घटनेत अपंग झालेल्यांचे जीवनमान मात्र बदलले नाही. इतिहासकारांनी घटनेची नोद घेतली. अनेक स्पर्धा परीक्षा मध्ये या घटनेवर आधारित प्रश्न विचारले जातात कारण वर्तमान व भावी पिढीला या दुर्घटने ची माहिति व्हावी हा उद्देश आहे.

आपणास ज्ञात आहे की औरंगाबाद हल्ली चे छ. संभाजी नगर येथे मुघलसम्राट औरंगजेब याने बिबी का मकबरा उभारला ही भव्य वास्तु 1679 मध्ये आकारास आली. आजही ही वास्तु मोठ्या दिमाखात उभी आहे लाखों पर्यटक या

वास्तूला भेट देण्यासाठी येतात. परंतु आज या एतेहासिक वास्तूचे अस्तित्व धोक्यात आलेले आहे. कारण वास्तूच्या भोवती प्रचंड प्रमाणात वीट भट्टीचे उद्योग उभारले गेले आहेत. तसेच मानवी वसाहतीचे अतिक्रमण हा ही मुद्दा महत्वाचा आहे. परंतु वीट भट्टीतुन निघणाऱ्या वायू मुळे सदर वास्तु काळवंडल्या गेली आहे महानगर पालिका प्रशासनाने यावर वेळीच उपाय योजना करायला हवी परिस्थतीकी संघर्षाची कारण परंपरा व ऐतीहासिकता तपासत असताना असे लक्षात येते की परिस्थतीकी प्रश्न व समस्या का निर्माण होतात मानवाच्या हालचालीमध्ये परिस्थतीकी संबंध व नैसर्गिक परिस्थीतीचा संबध कोठे येतो.प्राचीन भारताच्या इतिहासात आपण पाहीले अस्ता असे दिसून येतेकी सुरुवातीला मानव गुहेमध्ये राहत असे. परिस्थतीकी च्या संदर्भात तो चतुष्पादा प्रमाणेच होता उत्क्रांत अवस्थेच्या काळात त्याच्यावर परिणाम झाला माकडाप्रमाणे चार पायावर चालणारा मानव हळूहळू दोन पायावर चालू लागला जोपर्यंत मानव निसर्गावर अवलंभून होता तोपर्यंत त्याने निसर्गाची हानी केली नाही. वातावरणातील उर्जा कमी झाली नाही. हळूहळू त्याने गुरे पाळने, शेती करने या व्यवसायाकडे आपले लक्ष केंद्रित केले. तो वाड्या वस्त्यांवर राहू लागला. त्याने वन्य प्राण्यांना माणसाळविले हळूहळू खेड्यांची निर्मिती झाली जमीनीपासून जास्तीत जास्त उत्पादन घेण्यास सुरुवात केली. त्यास संस्कार व संस्कृतीची जाणीव झाली नवीन संस्कृती निर्माण झाली अनेक क्षेत्रात नवे तंत्रज्ञान विकसीत झाले. कृषी क्षेत्रात मोठे फेरबदल झाले नविन तंत्रज्ञान येऊन शेती शास्त्रीय पद्धतीने होऊ लागली. सामाजीक साहचर्य वाढले व नागरी संस्कृतीचा उदय झाला. मानवाच्या अंगभूत गुणांना वाव मिळून प्रत्येक क्षेत्रात त्याने कमालीची प्रगती केली. इतिहासाचा संबंध मानवाशी व मानवाचा संबंध निसर्गातील सर्व घटना घडामोडीशी आहे.त्या मुळे लेखनात विविध विषयांचा स्पर्श झाला. कला व शास्त्राचा दर्जा इतिहासला मिळाल्या मुळे इतिहास लेखनाची व्याप्ती वाढली. इतिहास कसा घडतो या विषयी इतिहासकार व विद्वानांमध्ये मते मतांतरे होऊ लागली इतिहासाची गती एक रेषीय आहे. तर काही विचारवंताना वाटते की इतिहासाची गती चक्राकार आहे. यातून चक्राकार सिद्धांत समोर आला. या सिद्धांतच्या समर्थनार्थ पूर्ण जग भरतून विविध धर्मियांनी आपली मते समानतेच्या तत्वावर नोंदवली धर्म जरी वेगवेगळे असले तरी विचारांमध्ये एकवाक्यता दिसून येते. इतिहासाची गती चक्राकार आहे यावर शिक्का मोर्तब झाले.

इतिहास लेखणा मध्ये पर्यावरणाचा अभ्यास होऊलागल्या मुळे मानव व पर्यावरण यांचे अन्योन्य संबंध लक्षात घेता सखोल अध्ययन करण्याची आवश्यकता निर्माण झाली. शाळा महाविद्यालये, विद्यापीठांमध्ये वेगवेगळ्या विषयांचे अध्ययन व अध्यापन त्या ठिकाणी असलेल्या वातावरणाशी संबंधीत अध्ययन व अन्ध्यापनाची यशस्वीता ठरत असते. गुरुदेव रविंद्रनाथ यांनी प.बंगालमधील कलकत्ता (कोलकाता) या ठिकाणी स्थापन केलेल्या शांतीनिकेतन विश्वभारती या शिक्षण संस्था जागतिक स्तरावर आदर्शवत ठरलेल्या आहेत. सकाच्या रम्यप्रहरी विदयार्थी अध्ययन करतात शाळा झाडांखाली भरतात आजही स्थिती तीच आहे. यावरुन आपणास रविंद्रनाथ टागोर यांचा पर्यावरण विषयीचा निकोप दृष्टिकोण दिसून येतो. प्राचीन काळापासून ते अर्वाचीन काळापर्यंत पर्यावरणविषयक चळवळी कमी अधिक प्रमाणावर जगाच्या कानाकोपऱ्यात कार्यरत आहे.अगदी अलीकडच्या काळामध्ये चिपको आंदोलन आपल्या देशात खूप गाजले होते. 1974 मध्ये उत्तरप्रदेशातील गढवाल जिल्ह्यात घनदाट अरण्यात वन कर्मचारी व लाकूडतोडे झाडांची कत्तल करण्या साठी पुढे सरसावले त्या वेळी स्थानिक जनतेने झाडांना मिठी मारून झाडांचे संरक्षण केले. हेच ते चिपको आंदोलन त्या वेळी खूप उग्र झाले होते. कारण झाडांच्या लाकडापासून क्रीडा साहित्य तयार करण्याचा ठेका सायमंड कंपनीला दिला होता परंतू स्थानीक जनतेने तीव्र विरोध केल्यामुळे हे आदोलन यशस्वी झाले. या आंदोलनात सुंदरलाल बहुगुणा, मीराबेन इ. मंडळींनी आपले सर्वस्वपणाला लावले. या आणि अशा अनेक विधायक चळवळीची दखल इतिहास घेत असतो. त्यामुळे पर्यावरण आणि इतिहास या दोन साह्यकारी विषयांची बाजु मांडण्याची संधि या परिषदेच्या निमित्ताने मिळाली संबंधीत विषयांना न्याय देण्याचा प्रयत्न या निमीत्ताने केलेला आहे.

**निष्कर्ष**

1) पर्यावरणाचे महत्व लक्षात घेता विदयापीठ स्तरावर स्वतंत्रपणे विषयाचे अध्ययन अध्यापन होत आहे.

2) पर्यावरण व इतिहास या दोन साहाय्यकारी विषयांमुळे प्रबोधनात्मक अध्ययन सुरु झाले.

3) पर्यावरणाचा समतोल टिकऊन ठेवण्यासाठी अनेक पर्यावरण विषयक चळवळी कार्यरत आहेत.

4) पर्यावरणीय समस्या निर्माण झाल्यामुळे जागतीक स्तरांवर उपाय योजना सुरु आहेत.

5) जागतिकी करणाकडे पर्यावरणीय अभ्यासाचा एक भाग म्हणून पाहता येईल.

**संदर्भ :**

1) गाठाळ.एस.एस. “इतिहासलेखनशास्त्र” कैलास पब्लिकेशन ओरंगपूरा औरंगाबाद, प्रथम आवृत्ती 2011 पृष्ठ क्र.272

2) प्रा.गायकवाड, हनमंते, सरदेसाई, इतिहास लेखनशास्त्र. पृष्ठ क्र.4

3) डी.वैभव, डी.विशाल, इतिहासलेखन शास्त्र आणि इतिहास संशोधनपद्धती. सरस्वती प्रकाशन, औरंगाबाद पृष्ठ क्र.162,163

4) डॉ.कठारे, डॉ.पाटील, डॉ.साखरे “पूरातत्वविद्या वस्तुसंग्रहालय आणि पर्यटन” विद्या बुक्स पबलिशर्स ओरंगपूरा औरंगाबाद, 2015. पृष्ठ क्र.349

5) सातभाई श्रीनिवास “इतिहासलेखन शास्त्र” विद्या बुक्स पबलिशर्स ओरंगपूरा औरंगाबाद जून 2015 पृष्ठ क्र.365

6) डॉ.महाजन वी.डी. “मध्यकालीन” भारत एस.चंद प्रकाशन 7361 रामनगर नवी दिल्ली 110055 पृष्ठ क्र.156

7) प्रशांत देशमुख, इतिहासाचे तत्वज्ञान, विद्या पब्लिकेशन ओरंगपूरा औरंगाबाद प्रथम आवृत्ती जून 2005 पृष्ठ क्र.20

8) भिडे गजानन “प्राचीनभारत” फडके प्रकाशन कोल्हापूर 416012 पृष्ठ क्र.29,42

9) पाथरे नीला “पर्यावरणशिक्षण” चैतन्यप्रकाशन कोलापूर प्रथम आवृत्ती 14 नोव्हेंबर 2006 पृष्ठ क्र.86

# बौद्ध धम्माची धार्मिक-तात्विक परंपरा

**डॉ. प्रतिभा सुरेश जाधव**
सहाय्यक प्राध्यापिका,मराठी विभाग
कला, वाणिज्य व विज्ञान महाविदयालय, लासलगाव

## प्रास्ताविक

बुद्ध धम्माला इंग्रजीत बुद्धिझम (Buddhism) म्हणतात. हा धम्म भारताच्या श्रमण परंपरेतून आला आहे. बौद्ध धम्माचे संस्थापक सिद्धार्थ गौतम आहेत. सिद्धार्थ गौतम यांना 'बुद्ध' म्हणून ओळखले जाते. बुद्ध धम्माबद्दलची महत्वपूर्ण माहिती पुढीलप्रमाणे -

- बौद्ध धर्म म्हणजे एक तत्वज्ञान आहे.
- बौद्ध धर्मात ध्यानाद्वारे ज्ञानप्राप्ती करण्याचा आग्रह केला जातो.
- बौद्ध धर्मात मानवी दुःखाचे स्वरूप आणि निर्वाण प्राप्त करण्याचा मार्ग सांगितला आहे.
- बौद्ध धर्मात चार उदात्त सत्ये आणि अष्टांग मार्ग सांगितले आहेत.
- बौद्ध धर्माचे अनुयायी शाक्यमुनी गौतम बुद्धांना 'संमासंबुद्ध' मानतात.
- बौद्ध धर्माची स्थापना 2500 वर्षांपूर्वी झाली.
- बौद्ध धर्म हा भारतातील सर्वात मोठ्या धर्मांपैकी एक आहे.
- बौद्ध धर्मात जातिभेदाविरुद्ध युक्तिवाद आहेत
- बौद्ध धर्माचा प्रसार संपूर्ण आशियात झाला आहे.

## विषयविवेचन

सिद्धार्थ किंवा गौतम बुद्धांचा जन्म इ.स.पूर्व सहाव्या शतकात हिमालयाच्या पायथ्याशी असलेल्या कपिलवस्तू येथील एका राजघराण्यात झाला. आजार, वृद्धत्व आणि मृत्यूच्या दृश्यांनी तरुण राजपुत्राला असे कल्पनेने प्रभावित केले की, जग दुःखाने भरलेले आहे आणि त्याने आयुष्याच्या सुरुवातीच्या काळातच जगाचा त्याग केला.एक तपस्वी म्हणून, तो सर्व दुःखांचे खरे स्रोत आणि या दुःखांपासून मुक्त होण्याचा मार्ग किंवा साधन शोधण्यात अस्वस्थ होता. त्याने त्याच्या काळातील अनेक विद्वान आणि धार्मिक शिक्षकांकडून त्याच्या प्रश्नांची उत्तरे शोधली, परंतु काहीही त्याला समाधानी करू शकले नाही. त्याने खूप तपस्या केली, दृढ इच्छाशक्ती आणि सर्व त्रासदायक विचार आणि आकांक्षांपासून मुक्त मनाने तीव्र ध्यान केले. जगातील दुःखांचे रहस्य उलगडण्याचा प्रयत्न केला. शेवटी त्याचे ध्येय पूर्ण झाले आणि राजकुमार सिद्धार्थ 'बुद्ध' किंवा 'ज्ञानी' झाले. त्यांच्या ज्ञान संदेशाने बौद्ध धर्म आणि तत्वज्ञान दोन्हीचा पाया घातला.

प्राचीन काळातील सर्व महान शिक्षकांप्रमाणे, बुद्ध संभाषणाद्वारे शिकवत. बुद्धांच्या शिकवणींबद्दलचे ज्ञान गौतम बुद्धांच्या 'त्रिपिटक' मध्ये दिसते. तिसरा भाग पालीमध्ये 'अभिधम्म' आणि संस्कृतमध्ये 'अभिधर्म' म्हणून ओळखला जातो. अभिधम्म पिटक एकाच वेळी तत्वज्ञान, मानसशास्त्र आणि नीतिमत्ता इ. व्यक्त करतो. बौद्ध अनुयायी शाक्यमुनी गौतम बुद्धांना वर्तमानातील सर्वश्रेष्ठ बुद्ध म्हणजेच 'संमासंबुद्ध' मानतात. जगाच्या इतिहासातील महामानवांमध्ये तथागत बुद्ध हे सर्वश्रेष्ठ मानले जातात. बुद्धांच्या धम्माला (पंथ वा तत्त्वज्ञानाला) 'बौद्ध पंथ' किंवा 'बुद्धिझम' म्हणतात. बौद्ध धर्म श्रमण परंपरेतून निर्माण झालेली जीवन जगण्याची एक विचारधारा-तत्त्वज्ञान आहे. बौद्ध धर्म हा एक सत्य अनादि शुद्ध सद्धम्म आहे.

बौद्ध धर्म हिंदू धर्माचे पुरोहित, औपचारिक विधी आणि जातिव्यवस्था नाकारतो. बुद्धांनी लोकांना ध्यानाद्वारे ज्ञानप्राप्ती करण्याचा आग्रह केला. सिद्धार्थ गौतम यांनी हा शब्द स्वतःला लावला नव्हता पण त्यांच्या अनुयायांनी त्यांच्या प्रज्ञा, शील, करूणा ह्या गुणांच्या आधारे असा संप्रदाय/संघ तयार झाला व ते त्यांना 'बुद्ध' म्हणू लागले. काही वेळा बुद्ध शब्दाचा अर्थ 'अंतर्ज्ञान प्राप्त झालेली व्यक्ती' (Enlightenment) असाही होतो. बौद्ध धर्माचे तत्वज्ञान म्हणजे बौद्ध धर्माच्या

धार्मिक-तात्विक परंपरेत विकसित झालेली तर्कशुद्ध विचारधारा. बौद्ध धर्माचे संस्थापक सिद्धार्थ गौतम हे इ.स.पूर्व पाचव्या शतकात होऊन गेले. त्यांना नंतर ‘बुद्ध’ म्हणून ओळखले जाऊ लागले.

बुद्धांच्या मते, मानवी जीवन दुःखमय आहे. हे दुःखाचे कारण म्हणजे तृष्णा. तृष्णा म्हणजे इच्छा, आसक्ती. बुद्धांनी सांगितले की, तृष्णेचा नाश केला तर दुःखातून मुक्ती मिळते. तृष्णेच्या नाशासाठी बुद्धांनी ‘अष्टांगिक मार्ग’ सांगितला. हा मार्ग म्हणजे आठ पायरींचा मार्ग. या मार्गाचा अवलंब केल्याने मनुष्य तृष्णेपासून मुक्त होऊ शकतो आणि दुःखातून मुक्ती मिळवू शकतो. अष्टांगिक मार्गाच्या आठ पायऱ्या खालीलप्रमाणे आहेत:

1. सम्यक दृष्टि (योग्य दृष्टी)
2. सम्यक संकल्प (योग्य विचार)
3. सम्यक वाचा (योग्य वाणी)
4. सम्यक कर्मा (योग्य कर्म)
5. सम्यक आजीविका (योग्य उपजीविका)
6. सम्यक व्यायाम (योग्य प्रयत्न)
7. सम्यक स्मृती (योग्य स्मरण)
8. सम्यक समाधी (योग्य समाधी)

बौद्ध तत्वज्ञान ही बौद्ध धर्माच्या धार्मिक-तात्विक परंपरेत विकसित झालेली प्राचीन भारतीय तात्विक प्रणाली आहे. यामध्ये गौतम बुद्धांच्या परिनिर्वाणानंतर (सुमारे 5 व्या शतकात ईसापूर्व) प्राचीन भारतातील बौद्ध धर्माच्या विविध शाळांमध्ये विकसित झालेल्या सर्व तात्विक तपास आणि तर्कसंगत चौकशीच्या प्रणालींचा समावेश आहे. तसेच संपूर्ण आशियामध्ये बौद्ध धर्माच्या प्रसारानंतर झालेल्या पुढील विकासांचा समावेश आहे. बौद्ध नालंदा महाविहार (महान मठ) ही प्राचीन भारतातील उच्च शिक्षणाची एक प्रमुख संस्था होती जी 5 व्या शतकापासून 12 व्या शतकापर्यंत चालत असे. बौद्ध धर्मात तात्विक तर्क आणि ध्यानधारणा या दोन्ही गोष्टींचा समावेश आहे.

बौद्ध धर्म मुक्तीसाठी अनेक बौद्ध मार्ग सादर करतो. प्राचीन भारतापासून श्रीलंका आणि त्यानंतर पूर्व आशिया आणि आग्नेय आशियापर्यंत प्रारंभिक बौद्ध धर्माचा विस्तार झाल्यामुळे बौद्ध विचारवंतांनी या मार्गांच्या विश्लेषणात विश्वविज्ञान, नीतिशास्त्र, ज्ञानशास्त्र, तर्कशास्त्र, तत्वज्ञान, तत्वज्ञान, घटनाशास्त्र, मनाचे तत्वज्ञान, काळाचे तत्वज्ञान आणि सोटेरिओलॉजी यासारख्या विविध विषयांचा समावेश केला आहे. पूर्व-सांप्रदायिक बौद्धधम्म इंद्रियांनी (मनासह) मिळवलेल्या अनुभवजन्य पुराव्यांवर आधारित होता आणि बुद्धांनी काही आधिभौतिक प्रश्नांपासून संशयास्पद अंतर ठेवलेले दिसते, त्यांना उत्तर देण्यास नकार दिला कारण ते मुक्तीसाठी अनुकूल नव्हते परंतु त्याऐवजी पुढील अनुमानांकडे नेत होते. तथापि, त्यांनी आधिभौतिक परिणामांसह सिद्धांतांना देखील पुष्टी दिली, जसे की आश्रित उत्पन्न, कर्म आणि पुनर्जन्म.

विसाव्या शतकाच्या मध्यात अनेक मनोविश्लेषक आणि बौद्ध विद्वानांमधील सहकार्य हे पाश्चात्य मनात कार्यरत असलेल्या दोन सर्वात शक्तिशाली शक्तींपैकी मधील बैठक म्हणून पाहिले गेले. बौद्ध धर्म आणि पाश्चात्य मानसशास्त्र सिद्धांत आणि व्यवहारात एकमेकांशी जोडलेले आहेत. गेल्या शतकात, तज्ञांनी बौद्ध धर्म आणि आधुनिक पाश्चात्य मानसशास्त्राच्या विविध शाखांमधील अनेक समानतेवर लिहिले आहे जसे की, घटनात्मक मानसशास्त्र, मनोविश्लेषणात्मक मानसोपचार, मानवतावादी मानसशास्त्र, संज्ञानात्मक मानसशास्त्र आणि अस्तित्वात्मक मानसशास्त्र. प्राच्यविद्यावादी ॲलन वॉट्स यांनी लिहिले आहे की, “जर आपण बौद्ध धर्मासारख्या जीवनपद्धतींचा खोलवर विचार केला तर आपल्याला पश्चिमेकडे समजल्या जाणाऱ्या तत्त्वज्ञान किंवा धर्म आढळत नाहीत. आपल्याला मनोचिकित्सासारखे काहीतरी अधिक आढळते.”

दुःखमुक्त अवस्थेपर्यंत पोहोचण्यासाठी जो मार्ग बुद्धांनी अनुसरला तो म्हणजे मुक्तीचा अष्टांगिक मार्ग होय. थोडक्यात बुद्ध नीतिमत्तेचे मूलभूत तत्व देते. हा मार्ग सर्व भिक्षूंसाठी तसेच सामान्य लोकांसाठी खुला आहे. मार्गाच्या पहिल्या दोन भागांना ‘प्रज्ञा’ असे संबोधले जाते, ज्याचा अर्थ ज्ञान, योग्य दृष्टिकोन. चार आर्य सत्यांना समजून घेणे, विशेषतः सर्व गोष्टींचे स्वरूप अपूर्ण, अनित्य आणि निरर्थक आहे आणि आपल्या स्वतःच्या दुःखाचे मूळ आलिंगन, द्वेष आणि अज्ञान आहे.योग्य संकल्प/आकांक्षा -स्वतःला आसक्ती, द्वेष आणि अज्ञानापासून मुक्त करण्याची खरी इच्छा/निश्चय असणे. मार्गाचे पुढील तीन भाग नैतिक नियमांच्या स्वरूपात अधिक तपशीलवार मार्गदर्शन देतात, ज्याला 'शील' म्हणतात. यात योग्य भाषण-

खोटे बोलणे, गप्पा मारणे आणि दुखापतग्रस्त भाषणापासून दूर राहणे. भाषण हे बहुतेकदा आपले अज्ञान प्रकट करते आणि आपण इतरांना हानी पोहोचवण्याचा सर्वात सामान्य मार्ग आहे. योग्य कृती/आचरण-योग्य वर्तनात 'पंच-शील' समाविष्ट आहेत., हत्या, चोरी, कामुकता, खोटे बोलणे आणि नशा यापासून दूर राहण्यासाठी पाच व्रते. योग्य उपजीविका-प्रामाणिक, गैर-हानिकारक मार्गाने आपले जीवन जगणे.

या मार्गाचे शेवटचे तीन भाग समाधी किंवा ध्यानाशी संबंधित आहेत. लोकप्रिय संकल्पना असूनही, ज्ञान आणि नैतिकतेशिवाय, ध्यान निरुपयोगी आहे आणि ते धोकादायकदेखील असू शकते.योग्य प्रयत्न-तुमच्या मनावर आणि त्यातील सामग्रीवर नियंत्रण ठेवते, चांगल्या मानसिक सवयी विकसित करण्याचा प्रयत्न करणे. जेव्हा वाईट विचार आणि आवेग उद्भवतात तेव्हा ते सोडून दिले पाहिजेत. हे आसक्तीशिवाय विचार पाहणे, ते काय आहे? हे ओळखणे आणि ते विरघळू देणे याद्वारे केले जाते. दुसरीकडे, चांगले विचार आणि आवेगांचे संगोपन आणि अंमलबजावणी केली पाहिजे. योग्य माइंडफुलनेस म्हणजे एक प्रकारचे ध्यान (विपश्यना) ज्यामध्ये विचार आणि धारणा स्वीकारणे, आसक्तीशिवाय या घटनांकडे 'केवळ लक्ष' देणे समाविष्ट आहे. हे माइंडफुलनेस दैनंदिन जीवनातदेखील वाढवायचे आहे. ते जीवनाबद्दल अधिक परिपूर्ण आणि समृद्ध जाणीव विकसित करण्याचा एक मार्ग बनते. योग्य एकाग्रता ज्याने शेवटच्या सात नियमांचे यशस्वीरित्या पालन केले आहे आणि त्याद्वारे स्वतःला सर्व आकांक्षा आणि वाईट विचारांपासून मुक्त केले आहे तो एकाग्रतेच्या खोल टप्प्यात प्रवेश करण्यास योग्य आहे जे त्याला हळूहळू त्याच्या दीर्घ आणि कठीण प्रवासाच्या ध्येयाकडे घेऊन जाते- दुःखाचा अंत होतो.

या चार टप्प्यांतून योग्य एकाग्रता ही ध्येय-निर्वाणाकडे नेणाऱ्या मार्गातील शेवटची पायरी आहे. (i) एकाग्रतेचा पहिला टप्पा म्हणजे सत्यांबद्दल तर्क आणि तपासणी करणे. त्यानंतर शुद्ध विचारांचा आनंद मिळतो. (ii) दुसरा टप्पा म्हणजे तर्क नसतानाही अखंड ध्यान. त्यानंतर शांततेचा आनंद मिळतो. (iii) एकाग्रतेचा तिसरा टप्पा म्हणजे शांततेच्या आनंदापासूनही अलिप्तता त्यानंतर अशा आनंदाबद्दलही उदासीनता असते परंतु शारीरिक स्थितीची भावना अजूनही कायम राहते. (iv) एकाग्रतेचा चौथा आणि शेवटचा टप्पा म्हणजे या शारीरिक स्थितीपासूनही अलिप्तता. त्यानंतर परिपूर्ण समता आणि उदासीनता असते. ही निर्वाण किंवा परिपूर्ण ज्ञानाची अवस्था आहे. हे बौद्ध ध्यानाचे सर्वोच्च रूप आहे आणि त्याचा पूर्ण सराव सहसा त्या मार्गावर लक्षणीय प्रगती केलेल्या भिक्षू आणि भिक्षूंपुरता मर्यादित असतो.

**बौद्ध धर्म आणि घटनात्मक मानसशास्त्र**

मानसशास्त्राच्या दृष्टीने बौद्ध धर्माचे कोणतेही मूल्यांकन हे निश्चितच एक आधुनिक पाश्चात्य शोध आहे. पाश्चात्य आणि बौद्ध विद्वानांना बौद्ध शिकवणींमध्ये एक तपशीलवार आत्मनिरीक्षणात्मक घटनात्मक मानसशास्त्र आढळले आहे. रायस डेव्हिड्स यांनी त्यांच्या "बौद्ध तत्वज्ञान मॅन्युअल ऑफ सायकॉलॉजिकल एथिक्स" या पुस्तकात लिहिले आहे की, "बौद्ध तत्वज्ञान प्रथम आणि शेवटचे नैतिक आहे. बौद्ध धर्माने उल्लेखनीय अंतर्दृष्टी आणि विवेकबुद्धीने मानसिक प्रक्रियांचे विश्लेषण आणि वर्गीकरण करण्यासाठी स्वतःला स्थापित केले आहे".बौद्ध धर्माचा मानसिक अभिमुखता हा एक विषय आहे जो रायस डेव्हिड्सने दशकांपासून पाठपुरावा केला आहे जो तिच्या इतर लेखनातून दिसून येतो.

**बौद्ध धर्म आणि मनोविश्लेषणात्मक मानसोपचार**

मनोविश्लेषक कार्ल जंग यांनी झेनचे विद्वान डेसेत्झ तेतारो सुझुकीच्या झेन बौद्ध धर्माच्या प्रस्तावनेला प्रस्तावना लिहिली, जी पहिल्यांदा 1948 मध्ये एकत्रितपणे प्रकाशित झाली. त्यांच्या प्रस्तावनेत, जंग झेन अभ्यासकांसाठी संपूर्णतेत अतुलनीय परिवर्तन म्हणून ज्ञानोदयाच्या अनुभवावर प्रकाश टाकतात. "आपल्या संस्कृतीतील एकमेव चळवळ ज्यामध्ये अशा ज्ञानोदयाच्या आकांक्षांची अंशतः समज आहे आणि अंशतः असली पाहिजे ती म्हणजे मानसोपचार".

**बौद्ध धर्म आणि अस्तित्वात्मक मानसशास्त्र**

बुद्ध म्हणाले की 'जीवन दुःख आहे.' अस्तित्वात्मक मानसशास्त्र ऑन्टोलॉजिकल चिंता (भय, चिंता) बद्दल बोलते. बुद्ध म्हणाले की 'दुःख हे आसक्तीमुळे आहे.' अस्तित्वात्मक मानसशास्त्रातही काही समान संकल्पना आहेत. आपण गोष्टींना चिकटून राहतो या आशेने की, त्या आपल्याला एक विशिष्ट फायदा देतील. बुद्ध म्हणाले की दुःख कमी करता येते. निर्वाणाची बौद्ध संकल्पना अस्तित्ववाद्यांच्या स्वातंत्र्यासारखीच आहे. खरं तर, बौद्ध धर्मात स्वातंत्र्याचा वापर पुनर्जन्मापासून मुक्तता किंवा कर्माच्या परिणामांपासून मुक्ततेच्या संदर्भात केला गेला आहे. अस्तित्ववादींसाठी, स्वातंत्र्य हे

आपल्या अस्तित्वाचे एक सत्य आहे, ज्याकडे आपण अनेकदा दुर्लक्ष करतो. शेवटी, बुद्ध म्हणतात की, दुःख कमी करण्याचा एक मार्ग आहे.

**बौद्ध धर्म आणि संज्ञानात्मक-वर्तणूक थेरपीची तत्त्वे**

बौद्ध मानसिकतेच्या पद्धतींचा विविध मानसशास्त्रीय उपचारांमध्ये स्पष्टपणे समावेश करण्यात आला आहे. अधिक विशेषतः संज्ञानात्मक पुनर्रचनेशी संबंधित मानसोपचारांमध्ये वैयक्तिक दुःखांवर प्राचीन बौद्ध प्रतिपिंडांसह मुख्य तत्त्वे सामायिक केली जातात. फ्रॉम मानसोपचारात वापरल्या जाणाऱ्या ध्यान तंत्रांच्या दोन प्रकारांमध्ये फरक करतात: (i) विश्रांतीसाठी वापरले जाणारे स्वयं-सूचना; आणि (ii) ध्यान उच्च प्रमाणात आसक्ती, लोभ आणि भ्रम नसणे साध्य करण्यासाठी; थोडक्यात, जे अस्तित्वाच्या उच्च पातळीपर्यंत पोहोचण्यास मदत करतात. फ्रॉम नंतरच्या तंत्रांशी संबंधित तंत्रांचे श्रेय बौद्ध मानसिकतेच्या पद्धतींना देतो.

**माइंडफुलनेस-आधारित ताण कमी करणे**

कबाट-झिन यांनी मॅसॅच्युसेट्स मेडिकल सेंटर विद्यापीठातील 4,000 हून अधिक रुग्णांसह 10 वर्षांच्या कालावधीत 8 आठवड्यांचा एमबीएसआर कार्यक्रम विकसित केला. एमबीएसआर कार्यक्रमाचे वर्णन करताना, कबाट-झिन लिहितात: “या 'कामात' सर्वात महत्त्वाचे म्हणजे क्षणोक्षणी जागरूकता किंवा सजगतेचा नियमित, शिस्तबद्ध सराव, तुमच्या अनुभवाच्या प्रत्येक क्षणाचे, चांगल्या, वाईट किंवा कुरूपतेचे पूर्ण 'मालकीपण' समाविष्ट आहे. हे संपूर्ण आपत्तीजनक जीवनाचे सार आहे.”

**डायलेक्टिकल बिहेवियरल थेरपी**

याबद्दल लिहिताना, झेन अभ्यासक लाइनहान म्हणतात: "त्याच्या नावाप्रमाणेच, त्याचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे 'द्वंद्ववाद' वर भर देणे - म्हणजेच, संश्लेषणाच्या सतत प्रक्रियेत विरुद्ध घटकांचा समेट करणे. बदलासाठी संतुलन म्हणून स्वीकारण्यावर हा भर बौद्ध धर्माच्या पद्धतीतून काढलेल्या दृष्टिकोनाच्या पाश्चात्य मानसशास्त्रीय पद्धतीशी थेट जोडण्यापासून येतो."

**बौद्ध धर्म आणि इतर मानसोपचार तत्त्वे**

गेस्टाल्ट थेरपी ही फ्रिट्झ पर्ल्स यांनी तयार केलेली एक पद्धत आहे, जी अस्तित्ववादी तत्वज्ञानावर आणि विशेषतः झेन बौद्ध धर्मावर (इतर प्रभावांसह) आधारित आहे. गेस्टाल्टमध्ये, आपण संपूर्ण व्यक्तीसोबत काम केले पाहिजे, जर्मनमधील ‘गेस्टाल्ट’, जे योग्य समजुतीच्या ज्ञानाचे प्रतिध्वनी करते. त्याच्या तंत्रांमुळे योग्य माइंडफुलनेसला प्रोत्साहन मिळते आणि शारीरिक, भावनिक आणि मानसिक क्षेत्रात येथे आणि आताच्या तात्काळ, अभूतपूर्व आणि अनुभवात्मक वास्तवावर लक्ष केंद्रित केले जाते.

भगवान बुद्धांचे तत्वज्ञान हे एक मानवतावादी तत्वज्ञान आहे. या तत्वज्ञानात मानवाच्या कल्याण आणि सुखाला प्राधान्य दिले आहे. बुद्धांनी सांगितले की, प्रत्येक मनुष्य दुःखातून मुक्त होऊ शकतो. त्यासाठी योग्य मार्गदर्शन आणि प्रयत्न आवश्यक आहेत. भगवान बुद्धाने सांगितलेले तत्वज्ञान हे मानवी जीवनातील दुःखाचे कारण आणि त्यावर उपाय शोधण्यावर आधारित आहे. बुद्धांच्या मते, मानवी जीवनात दुःख हे एक वास्तव आहे. त्याचे कारण म्हणजे तृष्णा. तृष्णा म्हणजे इच्छा, आसक्ती, लोभ, मोह. तृष्णेमुळे माणूस दुःखी होतो. तो भौतिक सुखाच्या मागे धावतो, पण त्याला खरे आनंद मिळत नाही.बुद्धांनी दुःखावर उपाय म्हणून अष्टांगिक मार्ग सांगितला. त्याचा अवलंब केल्याने माणूस तृष्णेवर मात करू शकतो आणि दुःखातून मुक्ती मिळवू शकतो.

बौद्ध धर्म हा जातीवर आधारित भेदभाव करीत नसून संपूर्ण मानव जातीत बंधुभाव व प्रेम निर्माण करतो. त्यामुळे प्रत्येक भारतीयाला बौद्ध धर्माच्या तत्त्वज्ञानाची माहिती असायलाच हवी. बौद्ध धर्माची शिकवण ही सत्य व कारणमीमांसेवर अवलंबून आहे. त्यामुळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धर्मात प्रवेश घेऊन बौद्ध धर्माला पुनरुज्जीवित केले. बुद्धांनी जे तत्त्वज्ञान दिले ते जसेच्या तसे स्वीकारू नका. त्यात बदल करून ते स्वीकारा, असे बुद्ध म्हणत असत. गौतम बुद्धांनी दिलेल्या तत्त्वज्ञानाचा पूर्वी विरोध होत होता. परंतु कालांतराने हेच तत्त्वज्ञान योग्य आहे, असे वाटत असल्याने त्याचा स्वीकार केला जात आहे. तेच तत्त्वज्ञान आज जगाला शांती देऊ शकते, अशी धारणा निर्माण झाली आहे. त्यामुळे अनेक

देशांनी बौद्ध धर्म स्वीकारला. भारतातील नालंदा विद्यापीठात बौद्ध धर्मासोबतच अन्य धर्मावरही खूप सखोल चर्चा केली जात असे. याच विद्यापीठातूनच पुढे बौद्ध धर्माचा प्रसार आणि प्रचार झाला.

**निष्कर्ष**

बौद्ध धर्माचा खरा अर्थ म्हणजे या जीवनात 'नवीन वृत्ती' घेऊन परतणे. अधिक शांत, अधिक जागरूक, नैतिकदृष्ट्या एक चांगला माणूस बनून, मत्सर, लोभ आणि द्वेष सोडून दिलेला आणि असे समजणारा की काहीही कायमचे नसते, दुःख ही प्रेमासाठी आपण स्वेच्छेने दिलेली किंमत आहे. बुद्ध एक अद्वितीय मानसोपचारतज्ज्ञ होते. त्यांच्या उपचारात्मक पद्धतींनी शतकानुशतके लाखो लोकांना मदत केली. आज पाश्चात्य जगाला बौद्ध धर्माचे मानसिक सार कळले आहे. पश्चिमेकडील अनेक मानसोपचार पद्धती बुद्धांच्या शिकवणीतून निर्माण झाल्या आहेत. त्यांनी लोकांना अंतर्दृष्टी मिळविण्यास मदत केली आणि त्रासदायक आणि वेदनादायक भावना दूर करताना विकासाला चालना दिली. बुद्ध धम्माच्या अध्यात्मिक-तात्विक परंपरा सर्व काळात लागू होतात व मानवी जीवनाचे सत्य सांगताना जगणे आनंदी करतात.

**संदर्भ**


1. देशमुख मा.म., बौद्ध धम्म आणि शिवधर्म.पहिली आवृत्ती, शिवभारती प्रकाशन, नागपूर 2007
2. आंबेडकर भीमराव रामजी, भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म, डॉ.बाबासाहेब आंबेडकर *नॅशनल* असोसिएशन ऑफ इंजिनियर्स,नागपूर 2019
3. पाटील कीर्ती, बौद्ध धम्म जिज्ञासा,दुसरी आवृत्ती,विकास पाटील प्रकाशन, नागपूर 2005
4. 1.चॅटर्जी एस, दत्ता डी. भारतीय तत्वज्ञानाचा परिचय. आठवी आवृत्ती. कलकत्ता: कलकत्ता युनिव्हर्सिटी प्रेस; 1980. बुद्ध तत्वज्ञान.
5. 2.रायस डेव्हिड्स, सीए. बौद्ध मॅन्युअल ऑफ सायकॉलॉजिकल एथिक्स. व्हाइटफिश, एमटी: केसिंगर पब्लिशिंग; 2003.
6. विकिपीडिया
7. 3.रायस डेव्हिड्स, सीए. बौद्ध मानसशास्त्र: पाली साहित्यात मनाचे विश्लेषण आणि सिद्धांताची चौकशी. दुसरी आवृत्ती. लंडन: लुझॅक अँड कंपनी; 1924. पृ. 16–36. [
8. 4.रायस डेव्हिड्स, सीए. भारतीय मानसशास्त्राचा जन्म आणि बौद्ध धर्मात त्याचा विकास. लंडन: लुझॅक अँड कंपनी; 1936.
9. 5.चोग्याम टीआर. अभिधर्माची झलक: बौद्ध मानसशास्त्रावरील एका चर्चासत्रातून. बोस्टन, एमए: शंभला प्रकाशने; 2001.
10. 6.गोलेमन डी, संपादक. भावनांना बरे करणे: दलाई लामांसोबत माइंडफुलनेस, भावना आणि आरोग्यावर संभाषणे. बोस्टन: शंभला प्रकाशने; 1997.
11. 7.गोलेमन डी. विनाशकारी भावना: दलाई लामांसोबत एक वैज्ञानिक संवाद. न्यू यॉर्क: बँटम डेल; 2004.
12. 8.सुझुकी डीटी, जंग सीजी. झेन बौद्ध धर्माचा परिचय. खंड 1991. न्यू यॉर्क: ग्रोव्ह प्रेस; 1948.
13. 9.फ्रॉम ई, सुझुकी डीटी, मार्टिनो आरडी. झेन बौद्ध धर्म आणि मनोविश्लेषण. न्यू यॉर्क: हार्पर आणि रो; 1960. [ गुगल स्कॉलर ]
14. 10.फ्रॉम ई. द आर्ट ऑफ बीइंग. न्यू यॉर्क: कंटिन्युअम; 2002. [ गुगल स्कॉलर ]
15. 11.थेरा एन. द हार्ट ऑफ बुद्धिस्ट मेडिटेशन: अ हँडबुक ऑफ मेंटल ट्रेनिंग बेस्ड ऑन द बुद्ध वे ऑफ माइंडफुलनेस. यॉर्क बीच, एमई: सॅम्युअल वेझर; 1996. [ गुगल स्कॉलर ]
16. 12.थेरा एन, भिक्खू बी, फ्रॉम ई. व्हिजन ऑफ धम्म: बौद्ध लेखन ऑफ न्यानापोनिका थेरा. यॉर्क बीच, एमई: वीसर बुक्स; 1986. [ गुगल स्कॉलर ]

# वेदकालीन स्त्रियांचे सामाजिक स्थान

**डॉ. विकास बहुले**
सहा. प्राध्यापक
भारतीय जैन संघटनेचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, वाघोली

**प्रस्तावना:** भारत हा विश्वातील एक अत्यंत प्राचीन देश आहे. येथील आर्यपूर्व असुरांची संस्कृती उच्च आणि समृद्ध दर्जाची होती. सिंधू संस्कृतीच्या सुरुवातीच्या वैदिक काळात भारतीय स्त्रियांना तुलनेने उच्च दर्जा आणि अधिक सन्मान मिळत होता. भारतीय संस्कृतीचे पारंपरिक महत्त्व टिकून राहण्यासाठी धर्म कार्यरत होता. साहजिकच त्यामुळे भारतीय विचारांची प्रगती सीमित झाली आहे. भारतीय संस्कृतीतील एकूण विचारांचा सांगाडा मूलतः वेदांच्या कल्पनेवर आधारलेला आहे. वेदांचे ज्ञान एकजिनसी आहे व त्यावरच आपले विचार आधारित आहेत. भारतीय आर्यांच्या समाजाची पद्धती हिलाच वैदिक धर्म अथवा सनातनधर्म असे म्हणतात. प्राचीन कालखंडातील लोकजीवन, धर्म आणि परंपरांचा मागोवा घेण्यासाठी वेद हेच एक साधन असल्याने त्यांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

**वेदांचा काल** : वेदांच्या रचना विषयीची मतमतांतरे दिसून येतात. वेद हे अपौरुषेय वाङ्मय असल्याने कोणत्याही विशिष्ट व्यक्तीने अथवा विशिष्ट काळी लिहिले गेले नाहीत. सृष्टीचे घटकद्रव्य वेद होत. ऋग्वेद हा सर्वात प्राचीन व श्रेष्ठ आणि अथर्ववेद सर्वात शेवटचा व गौण मानला जातो. वेदांमुळेच या काळाला वैदिक काळ म्हंटले जाते. सिंधू संस्कृतीनंतर भारतात विकसित झालेली नवीन संस्कृती आर्य किंवा वैदिक संस्कृती म्हणून ओळखली जाते. या कालखंडाची माहिती आपल्याला मुख्यतः वेदांमधून मिळते. वेद हे मानवजातीचे आद्य भाषाबद्ध वैचारिक वाङ्मय आहे. मॅक्समुलर या संशोधकाच्या मते वेदांची रचना 1200 विक्रम वर्षांपूर्वी झाली असावी. त्याने वैदिककालाची छंदकाल, मंत्रकाल, ब्राह्मणकाल आणि सूत्रकाल या चार कालखंडात विभागणी केली आहे. प्रा. डॉ. हर्मन याकोबी यांनी ज्योतिषविषयक उल्लेखावरून वेदांचा मंत्ररचनाकाल विक्रमपूर्व 4000वर्षे असा सांगितला आहे. लोकमान्य टिळकांनी ऋग्वेदाची रचना उत्तर धृवाजवळच्या प्रदेशात झाली असल्याचे सांगताना ती इ.स.पू. 6000 ते 4000 वर्षे झाल्याचे म्हंटले आहे. शंकर बाळकृष्ण दीक्षित यांनी, शतपथ ब्राह्मणातील उदयकाली पूर्व दिशेपासून कृत्तिका नक्षत्र ढळत नाही, या उल्लेखावरून ऋग्वेदकाल इ.स.पू 2500 वर्षे ठरविला आहे. तैत्तरीय ब्राह्मणात आलेल्या 'बृहस्पति: प्रथमं जायमान: तिष्यं नक्षत्रमभिसंबभूव' या वाक्यावरून श्री.केतकरांनी ऋग्वेदाचा कालखंड इ.स.पू.6000 वर्षांपूर्वी झाला असल्याचे मान्य केले आहे. डॉ. अविनाशचंद्र दास यांनी ऋग्वेदकाल इ.स.पू. 25000 वर्षे मागे नेला आहे. एकंदरीत वरील विद्वानांची मतमतांतरे पाहता वेद हे अनंत आणि अनादि आहेत हे लोकमत खरे मानावे लागेल.

**वेदांचे स्वरूप**: ईश्वराने व्यक्त करून दाखविलेले वेद हे दैवी शब्द ऋषींना ऐकायला मिळाले, ते श्रुत होते म्हणून त्यांना श्रुति असेही म्हणतात. वैदिक साहित्यात वेदाचे ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद असे चार भाग आहेत. हे चार वेद मानवी संस्कृतीचा मूलाधार आहेत. वेदांगाचे जे अनेक भाग असलेली ब्राह्मणे, आरण्यके, आणि उपनिषदे येतात. ब्राह्मणांचा भर कर्मकांड व यज्ञयाग, आरण्यकात विश्व आणि जीवनाची गूढ तत्त्वे, तात्त्विक विचार व चिंतन उपनिषदांमध्ये पाहायला मिळते. "वेद हा संस्कृत शब्द 'विद' या धातूपासून तयार झालेला असून त्याचा अर्थ जाणणे, कळणे, ज्ञान होणे असा आहे. हिंदूंचे पुरातन ज्ञानग्रंथ असाही त्या शब्दाचा अर्थ आहे. ग्रीक भाषेत या शब्दाला सदृश्य Oida 'मी जाणतो' असा शब्द असून इंग्रजीत प्रज्ञानी, प्रज्ञान (शहाणपण) असा त्याचा अर्थ आहे. या शब्दाचा मूळ अर्थ व्यापक असून तो सर्व प्रकारचे ज्ञान ध्वनित करणारा आहे."[1] ऋग्वेद हा देवतांच्या स्तुतीशी संबंधित, यजुर्वेद वेदांमध्ये यज्ञपद्धती, ऋग्वेदात दिलेले मंत्र गाण्यायोग्य बनवण्यासाठी सामवेद तर अथर्ववेदात चमत्कार, जादूटोणा आणि आयुर्वेदिक औषधी वनस्पतींचे वर्णन आढळते.

वेद प्राचीन असल्याने लेखन, मुद्रणकला अस्तित्त्वात नव्हती. वेदांच्या ऋचा व मंत्र पाठांतर करून ठेवावे लागे. वेद हे संहिताच्या स्वरूपात ग्रंथित झालेले आहेत. व्यासांनी ह्या संहितांचे पठण निर्दोष होण्यासाठी आपल्या चार शिष्यांना त्या शिकविल्या. त्यामध्ये पैलाला ऋग्वेद, जैमिनाला सामवेद, वैशंपायनाला यजुर्वेद आणि दारुण सुमंतु ऋषीला अथर्ववेद असे

अध्ययन करायला दिले. वेदाचा एक रचिता, निर्माता अथवा लेखक नाही. वेद हे अपौरुषेय वाङ्मय असल्याचे म्हंटले जाते. म्हणजेच ईश्वरनिर्मित आहे अशी श्रद्धा आहे. यज्ञ केल्याने आपोआपच सामर्थ्य प्राप्त होते असेही ब्राह्मणे सांगतात. हजारो व्यक्तींच्या सहभागातून वेद रचले गेल्याने मंत्रांमध्ये विविधता दिसून येते. भारतात जे आर्य आले त्यांनीच वेद रचल्याचे म्हंटले जाते. कोणत्याही इतर वाङ्मयासारखेच वेदांमध्ये तत्कालीन जीवनाच्या विविध पैलूंचे दर्शन घडते. वेदांमध्ये धर्म, विश्वाचे स्वरूप, उगमस्थान, कार्य, आणि तत्त्वज्ञानाची सरमिसळ झाल्याचे दिसते. वेदांमध्ये आत्म्याचा विचार आला आहे. आत्म्याचे निदर्शक असलेले 'मन', 'असु' हेही शब्द आढळतात. मानवी जीवन निसर्ग आणि विश्वावर अवलंबून असते. ऐहिक जीवनात सुखाला विशिष्ट मर्यादा आहेत. पुनर्जन्म या संकल्पनेमुळे त्यापलीकडचे मानवी जीवन आशावादी असावे हेच तत्त्वज्ञान वेद सांगते. त्यामुळे वैदिक मंत्रांमध्ये आलेली निसर्गपूजा ही अदृष्ट व गूढ शक्तींची आहे. वेदांमध्ये प्रकृती, निसर्ग आणि नैसर्गिक शक्तींचे मानवीकरण केलेले दिसते. वैदिक काळात अश्लीलता आणि व्यभिचारही मोठ्या प्रमाणावर होता. वेदांच्या साहितांचा चिकित्सक अभ्यास करताना अनिल सूर्या म्हणतात की, "वेदात असा अश्लीलपणा असावा जो लिपीबद्ध करण्यासही संकोच वाटावा पण हे वैदिक जगणे होते. हे जगणे किंवा हे वेदांतील विचार मानवतेला काळिमा फासणारे आहेत हे मात्र खरे."[2]

**वेदकालीन सामाजिक जीवन**: वेद, स्मृति, सदाचार, स्वतःला इष्ट वाटणारे आचारण आणि पूर्ण विचारांती उत्पन्न होणारी कामना ह्या गोष्टी धर्माची आधारस्थाने असल्याचे परंपरेने मानण्यात येते. वेदकालीन सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक जीवन सुखी, निरोगी, पद्धतशीर, संघटित आणि प्रसन्न होते. तत्कालीन जीवनात जातिभेद मानले जात नव्हते. दूधदुभते, अन्नधान्य, फळे, शेतीबरोबरच मानसिक, भौतिक आरोग्यासाठी प्रार्थना, अर्चना मोठ्या प्रमाणावर केल्या जात होत्या. ऋग्वेदाचे सूक्तकर्ते ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य तसेच शूद्रही यज्ञसंस्थेत सामील होत होते. गवंडी व रथकार यज्ञात महत्त्वाचे काम करीत होते. अश्वमेधासारख्या यज्ञात सूत, मागध, नट यांसारखे शूद्र व्यावसायिक लोक इतिहास, पुराणे रचून त्यांचे गायन करीत. यज्ञसंस्थेमुळे ब्राह्मण वर्गाला इतरांपेक्षा वरचे स्थान प्राप्त झाले होते. तत्कालीन राजे प्रजेनेच निर्वाचित केलेले पराक्रमी, प्रजाहित दक्ष, कर्तव्यदक्ष होते. राज्यकारभारात सार्वजनिक हिताचे निर्णय घेतले जाऊन लोकांचा सर्वांगीण विकास साधला जाई. तत्कालीन जीवनातील मनोहर संतुलन हे आदर्श अशा संस्कारप्रणालीवर आधारित होते. "मनस्तत्त्वाच्या विकसनाने, धार्मिक जाणिवेच्या प्रखर दीप्तीने व परमेश्वराविषयीच्या प्रगाढ श्रद्धेने भौतिक सुखवादाला नियंत्रित करावयाचे व जीवनाविषयीच्या कलात्मक आसक्तीने विकृत आध्यात्मिकतेला थारा द्यावयाचा नाही असे हे वैदिक लोकजीवनाचे सुंदर स्वरूप आहे. संपूर्ण जग चैतन्याने रसरसलेले आहे तशी त्यांची धारणा असल्यामुळे त्यांचे जीवन धर्मबुद्धीच्या वैराग्याची गंगा व कलात्मक जीवनोपभोगाची यमुना यांचे हृदय संगमस्थान बनले आहे. "[3]

पशुपालन, शेती आणि व्यापार उत्तमपणे चालत असे. शेती पावसावर अवलंबून होती. विहिरी आणि तलाव खोदून वर्षभर शेतीला पाणीपुरवठा केला जाई. बैलांचा उपयोग शेतीसाठी केला जाई. गाईला पवित्र मानले जाई, दान दिले जाई. दूध, दही, तूप, तांदूळ, ज्वारी, गहू, मूग, मसूर,उडीद, तीळ, सत्तू यांचा आहारात समावेश केला जात होता. पाणी, दूध त्याबरोबर सुरा, सोमरस ही पेये सर्वमान्य होती. मेंढ्या पाळून लोकर कमावून लोकरी, सुती, रेशमी वस्त्रे परिधान केली जात. स्त्रिया सोन्याचे दागदागिने, मोत्यांच्या माळा, आभूषणे वापरीत. स्त्रिया लांबसडक केस वाढवून वेण्या, विविध केशरचना करीत. घर बांधणीसाठी वीट, दगड, लाकूड, माती, बांबूचा वापर केला जात असे. घरे ऐसपैस असत. अग्निशाला, अंतःपुर आणि बैठकीच्या खोल्या असत. घरात वापरण्यासाठी धातूंची व मातीची भांडी असत. धातूकला अवगत असल्यामुळे सुरी, वस्तरा, कात्री, परशु, तलवार यांसारखी शस्त्रे बनविली जात. एकंदरीत वैदिक संस्कृतीतील समाजजीवन भरभराटीचे आणि समृद्ध असेच होते. वेदकालीन स्त्री जीवनाचा खालील मुद्यांच्या आधारे आढावा घेता येईल.

**वेदकालीन स्त्रियांचे वैवाहिक जीवन** : वैदिक काळात बालविवाह रूढ नव्हता, सती प्रथा दुर्मिळ होती. पितृसत्ताक संस्कृती असली तरी, सुरुवातीच्या वैदिक संस्कृतीत प्रौढ विवाह, इच्छेनुसार विवाह आणि विधवा पुनर्विवाहाच्या तरतुदी होत्या. पती-पत्नी यांचे नातेसंबंध वैदिक काळात संस्कार मानला जाई. सुमंगल गृहजीवन, दाम्पत्यजीवन हे समाजात सर्वमान्य उदात्त ध्येय होते. वेदकालीन स्त्रिया उत्कृष्ट गृहिणी, युद्धात निपुण, शूर, रणरागिणीही होत्या. वेळप्रसंगी त्या आपल्या पतीबरोबर युद्धांत सहभागी होत. वैदिक युगात विवाहाचे आठ प्रकार प्रचलित होते, त्यापैकी चार अधिक प्रमुख होते. पहिला 'ब्रह्म' होता, जिथे वेदांमध्ये शिकलेल्या चांगल्या माणसाला कन्या भेट म्हणून दिली होती; दुसरा 'दैवा' होता,

जिथे कन्या एका वैदिक यज्ञाच्या प्रमुख पुजारीला भेट म्हणून देण्यात आली होती. ‘अरसा’ हा तिसरा प्रकार होता जिथे वराला स्त्री प्राप्त करण्यासठी पैसे द्यावे लागतात आणि ‘प्रजापत्य’ हा चौथा प्रकार होता, जिथे वडिलांनी आपली मुलगी एकपत्नीत्व आणि विश्वासूपणाचे वचन दिलेल्या पुरुषाला दिली जाई. वैदिक युगात ‘कन्याविवाह’ `तिच्या पालकांकडून लावला जात असे. स्वयंवरामध्ये सामान्यतः राजघराण्यातील मुलींना प्रसंगी तिच्या घरी आमंत्रित केलेल्या पात्र युवकांतून तिचा वर निवडण्याचे स्वातंत्र्य होते. एकंदरीत वैदिक वाङ्मयातील संकेत पाहिला तर विवाह हा धर्म, प्रजा आणि रति या कारणासाठीच हवा होता.

विवाह न करता चिरकाल ब्रह्मचर्य पाळून राहणाऱ्या स्त्रियांना ब्रह्मवादिनी म्हणत. ‘तत्र ब्रह्मवादिनीनाम् अग्नींधनं वेदाध्ययनं स्वगृहे च भैक्ष्यचर्या’ म्हणजेच त्यांना वेदांचे अध्ययन, अग्नीमध्ये हवन आणि भैक्ष्यचर्या हे तिन्ही ब्रह्मचर्याचे नियम लागू होते. भैक्ष्यचर्या मात्र स्वतःच्या घरामध्येच मागावी लागे. “जिला भाऊ नाही अशा कुमारिकेला पती मिळणे कठीण जात असे. अशा अर्थाची वचने ऋग्वेद [ऋ. 1· 124· 7, अथर्व. 1· 17. 1, निरुक्त 3· 4-5.] अथर्ववेद, आणि निरुक्त ह्या ग्रंथात आली आहेत. आणि बंधु नसलेल्या कन्येबरोबर विवाह करू नये असा जो नियम धर्मसूत्रात आणि याज्ञवल्क्यस्मृतीसारख्या [आरोगिणी भ्रातृमतीसमानार्षगोत्रजाम् । याज्ञ. 1· 53.] स्मृतीत साांगितला आहे. त्याचे बीज अशा वेदवचनात आहे. ऋग्वेदातील (10·85) हे सूक्त विवाहाच्या बाबतीत फार महत्त्वाचे आहे. आणि त्या सूक्तामधील मंत्रांचा साांप्रतकाळी देखील विवाहविधीमध्ये उपयोग करितात. त्या सूक्तावरुन असे दिसून येते की ज्या प्रकारच्या विवाहाला धर्मसूत्रात आणि आदि मनुस्मृतीत ब्रह्मविवाह अशी संज्ञा दिली आहे त्या प्रकारच्या विवाहाविधीशी प्राचीन वेदकाळी प्रचलित असणारा विवाहविधी महत्त्वाच्या बाबतीत जुळता होता. तसेच वधू विकत घेणे (आसुर विवाह- (मैत्रा. सां. 1· 10· 11), कन्येने अनेक पुरुषामधून आपला प्रियकर निववडून काढणे (गांधर्व विवाह- ऋ. 10· 27·12.) ह्यांचेही उल्लेख वेदवाङमयात आले आहेत.”[4]

वेदकालात वेदविद्येत मान्यता पावलेल्या गार्गी, मैत्रेयी ब्रह्मवादिनी होत्या. हे प्रातिनिधिक चित्रण वगळता अर्थावर आधारलेल्या आणि धर्माने समर्थिलेल्या या व्यवस्थेत स्त्रियांचे स्थान नेहमीच शुद्रप्राय राहिलेले दिसून येते.

**वेदकालीन स्त्रियांचे शिक्षण:** वेदकालीन शिक्षण सर्वांसाठी मुक्त म्हणजेच खुले होते. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शुद्र या चारही धर्मातील व्यक्तींना शिक्षण घेण्याचा अधिकार होता. पुरूषांप्रमाणेच स्त्रियांनाही शिक्षणाचा अधिकार होता.ऋग्वेदकालीन शिक्षण प्रणालीत शिक्षणाची ध्येये अत्यंत व्यापक होती. वेदकालात धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे मानवी जीवनाचे प्राथमिक ध्येय मानले जात असे. “अत्यंत प्राचीन काळीं बहुदा बापच मुलाला विद्या शिकवीत असावा. परंतु तैं. स. (6·3·10·5) आणि ब्राह्मणग्रंथ (तै.ब्रा.3·10·11; शत.ब्रा.3·6·2·15; गोपथ ब्रा. 2.5I7 इ.) ह्यांतील विधानावरून असे दिसते की सामान्यतः विद्यार्थी गुरूकडे जात असत आणि त्याच्या घरी राहत. विद्यार्थ्याला अन्नासाठी भिक्षा मागावी लागे, गुरूच्या अग्नीकडे लक्ष द्यावे लागे, गुरूच्या गाईचे पालन करावे लागे.”[5] वेदकालीन शिक्षणप्रणालीमध्ये विद्यार्थ्यांना शास्त्राबरोबरच नीती, भक्ती, योग, अनुशासन आणि सामाजिक सेवेचेही ज्ञान दिले जाई. विद्यार्थ्यांचा मानसिक व शारीरिक विकास साधण्यासाठी सत्य, सेवा, नम्रता, शिस्त, संयम, कष्टाची सवय, धर्मपालन वृत्ती इत्यादी गुणांचे संवर्धन करणे हेच शिक्षणाचे ध्येय मानले जाई. वैदिक कालखंडात गुरुकुलात मुली-मुले या दोहोंसाठी शिक्षणाची समान संधी होती. उपनयन संस्कारापासून शिक्षणाला सुरुवात होत असे. मुलीच्या लग्नाचे वय 16 वर्षे होते, तोपर्यंत शिक्षण घेतले जाई. स्त्रियांना संगीत, नृत्याचे शिक्षण दिले जाई. राज घराण्यातील स्त्रियांना युद्धकलेचे शिक्षण दिले जाई. शिक्षित महिलेला लक्ष्मीचा दर्जा मिळत होता. गुरुकुलातील शिक्षण विनामूल्य होते गुरूला शिष्याचा अध्यात्मिक पिता म्हणून दर्जा होता. अध्ययन संपल्यानंतर शिष्याकडून मिळणारी गुरुदक्षिणा हेच गुरुचे धन होते.

अथर्ववेदाने तर ‘इन्द्रो वै ब्रह्मचर्येण देवेभ्यः स्वराभवत्’ म्हणजेच इंद्राला देवांतील श्रेष्ठ स्थान केवळ वेदाध्ययनासाठी तपश्चर्या केल्यानेच मिळाले असल्याचे सांगितले आहे. वेदांगातील काही ऋचा स्त्रियांनी लिहिल्या आहेत. वैदिक ज्ञानात पारंगत असलेल्या महिला विद्वानांमध्ये अपला, इंद्राणी, घोषा, लोपामुद्रा, गार्गी आणि मैत्रेयी यांसारख्या ब्रह्वादिनींचा समावेश होता. गुरुकुल शैक्षणिक संस्थांमध्ये विवाहापूर्वी विद्यार्थी जीवनातील ब्रह्मचर्य आश्रमाचे निरीक्षण, विविध विषयाचे शिक्षण घेत. उपनयनसाठी पात्र होण्यासाठी, स्त्रियांना तत्त्वज्ञान, तर्कशास्त्र आणि वैदिक ज्ञानात पारंगत होण्यासाठी तसेच ऋग्वेदातील श्लोक गाण्यास प्रोत्साहित केले जात असे. अथर्ववेदाचा अभ्यास पुरुषांपेक्षा स्त्रियांना जास्त होता. ज्यांना

गुरुकुलात जाणे शक्य नाही त्यांच्यासाठी घरच्या घरी शिक्षण दिले जाई. "पूर्वीच्या कल्पांमध्ये स्त्रियांचा मौजीबंधन संस्कार होत असे. त्यांना वेदविद्या शिकवण्यात येत होती, व गायत्रीमंत्रही त्यांना शिकविण्यात येत असे. मात्र या संबंधात असा नियम होता की, पिता, चुल ता अथवा वडील भाऊ यांनीच त्यांना विद्या शिकवाव्या. इतर कोणीही शिकवू नये. तसेच त्यांचे भिक्षाचरण घराच्या मर्यादेतच होत होते."[5] अध्ययनातील संभाव्य धोका लक्षात घेऊन केलेली ही एक शहाणपणाची तरतूद होती. नृत्य, चित्रकला यासारख्या कलांमध्ये स्त्रिया पारंगत होत्या. शेतीच्या कामात मदत, गायींचे दूध काढणे, सूत कापणे, विणणे आणि शिवणे, शिकणे असी मदतीची कामे स्त्रिया करीत असत. तैत्तिरीय संहिता आणि शतपथ ब्राह्मण यांसारख्या ग्रंथांनी स्त्रियांच्या व्यावहारिक शिक्षणावर भर दिला. स्त्रियांना ज्ञान देणारी, सुख-समृद्धी देणारी, विशेष तेज देणारी, देवी, विदुषी, सरस्वती, इंद्राणी, उषा सर्वांना जागृत करणारी अशी अनेक आदरणीय नावे वेदांमध्ये दिली आहेत.

**वेदकालीन स्त्रियांचे धार्मिक जीवन:** हारीताने धर्माची व्याख्या 'श्रुतिप्रमाणक' (वेदावर आधारलेला) अशी केली आहे. जगभरातील कोणत्याही धर्माविषयीची भावना भीती व आदरातून अभिव्यक्त होत असते. आपल्यापेक्षा बलिष्ट, गूढ, नैसर्गिक शक्तींना मानव घाबरून असतो. साहजिकच या शक्तींना मानवी रूप कल्पून तो करुणा भाकत असतो. पुरोहितांनी तयार केलेल्या यज्ञ, कर्मकांडाला अनाहक महत्त्व प्राप्त झाले. स्त्रिया धार्मिक समारंभ, पूजा, यज्ञामध्ये सहभागी होत होत्या. महिलांना घरगुती आणि धार्मिक दोन्ही विधींमध्ये भाग घेण्याची परवानगी होती. "अर्धो ह वा एष आत्मनो यत् जाया" या शतपथ ब्राह्मणातील वचन वेदकालीन स्त्रियांची योग्यता दर्शविणारे आहे. साहजिकच लग्नानंतर मुलीला 'गृहिणी', 'अर्धांगिनी', सम्राज्ञी किंवा राणी बनून तिच्या पतीच्या अस्तित्वाचा अर्धा भाग मानला जात असे. धार्मिक संस्कारांच्या कार्यात तिचा समान वाटा होता. वैदिक संस्कृतीचे अभ्यासक डॉ. सदानंद मोरे म्हणतात की, "हिंदू धर्माच्या या पहिल्या टप्प्यावर म्हणजेच यज्ञप्रधान कर्मकांडाच्या अवस्थेत सामाजिक निर्बंध अद्याप तितके काटेकोर व जाचक झालेले नव्हते. त्यामुळे सापेक्षतः समाजातील स्त्रीशूद्रांसारख्या दुर्बल व दुर्लक्षित घटकांची परिस्थिती त्या मानाने बरी होती असे म्हणता येईल; विशेषतः यज्ञीय कर्मकांडात यज्ञ करणाऱ्या यजमानाला जी धर्मकृत्ये करावी लागत त्यात त्याच्या पत्नीचा सहभाग अनिवार्य असे. मुळात या काळात अविवाहित राहून तत्त्वचिंतन करणाऱ्यांना समाजात प्रोत्साहन नसे. वेदाध्ययन संपल्यावर विवाह करून गृहस्थाश्रमात प्रवेश करावा, अपत्यनिर्मिती करून पितृऋण फेडावे व यज्ञाच्या माध्यमातून देवऋणातून उतराई व्हावे अशी कल्पना प्रचलित होती त्यामुळे त्या प्रमाणात स्त्रियांना महत्व प्राप्त झाले. यज्ञ करून मिळणाऱ्या पुण्यामुळे मृत्यूनंतर स्वर्गप्राप्ती होते. तसेच निपुत्रिकाचे पूर्वज श्राद्धकर्माच्या अभावी नरकात खितपत पडतात अशा समजुतींमुळे कर्मकांडावर आधारलेल्या या धर्मात स्त्रियांना काही एक स्थान व महत्व प्राप्त झाले. अर्थात ते बरोचरीचे नसून दुय्यम होते हे वेगळे सांगायला नको."[6] असे जरी असले तरी वैदिक युगाने स्त्रियांना अधिक स्वातंत्र्य आणि आदर दिला. वैदिक काळात भारतीय स्त्रियांना आजच्या तुलनेने उच्च दर्जा आणि अधिक सन्मान मिळत होता.

**समारोप**: वेदांचा इतिहास हा मानवी आणि सामाजिक परंपरेचा इतिहास आहे. वेदांच्या रचनाकाल विषयीची विद्वानांत मतमतांतरे आहेत. प्राचीन भारतीय ज्ञानप्रणालीतील वेद व उपनिषदांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन आणि तर्कशुद्धता दिसून येते. जागतिकीकरणामुळे भारतीय ज्ञानपरंपरेचा ठसा जगभरातील विविध संस्कृतीवर उमटला आहे. अध्यात्म, पर्यावरण, आरोग्य आणि शाश्वत विकासाचे तत्त्वज्ञान भारतीय वेद वाङ्मयात संचित झाले आहे. वैदिक संस्कृतीतील सामाजिक जीवन भरभराटीचे आणि समृद्ध असेच होते. वेदकाल हा स्त्री-उन्नतीचा सुवर्णकाळ मानावा लागेल. धर्माचे तत्त्वज्ञान जाणून घेण्याचे वेद हे विश्वसनीय असे एकमेव प्राचीन साधन आहे. प्राचीन काळातील ही ज्ञानप्रणाली आजही तितकीच उपयुक्त आहे.

**संदर्भग्रंथ** :

1.जोशी गजानन नारायण, 'भारतीय तत्त्वज्ञानाचा बृहद् इतिहास खंड-1', शुभदा-सारस्वत प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती जानेवारी 1994, पृ-24

2. सूर्या अनिल, 'प्राचीन अर्वाचीन भारतीय स्त्री आणि हिंदू कोडबिल', सुगावा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती ऑक्टोबर 2010, पृ-42

3. हरदास बाळशास्त्री, 'वेदांतील राष्ट्रदर्शन'(पूर्वार्ध), लाखे प्रकाशन, नागपूर, तृतीय आवृत्ती, एप्रिल 2019, पृ-213-14

4. भट यशवंत आबाजी(अनुवाद), 'भारतरत्न म.म.काणेकृत धर्मशास्त्राचा इतिहास', महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती एप्रिल 1967, पृ-26-27

5. उनि. पृष्ठ-150

6. उनि. हरदास बाळशास्त्री, 'वेदांतील राष्ट्रदर्शन'(पूर्वार्ध) पृ-271

7. भागवत वंदना, अनिल सकपाळ आणि गीतांजली वि.मं.(संपा.) 'संदर्भासहित स्त्रीवाद-स्त्रीवादाचे समकालीन चर्चाविश्व', शब्द प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती जानेवारी 2014, पृ-30

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि हिंदू कोड बील

**कल्पना गोविंदराव बडे**
संशोधक विदयार्थी, इतिहास विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ. संभाजीनगर

## प्रस्तावना

20 व्या शतकात स्त्रियांचे स्वातंत्र्य, समता, न्याय याबाबतीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांएवढे कुणी दूरदृष्टीने आणि सामाजिक, राजकीय स्वातंत्र्यात एक वंचित घटक म्हणून स्त्रियांच्या अधिकारांच्या, हक्काच्या बाबतीत काम करताना दिसत नाहीत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू कोड बिलाच्या निमित्ताने स्त्रीयांच्या स्वातंत्र्याचा जाहिरनामाच सादर केला होता. भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेत त्यांनी भारतीय जनतेला न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुत्त यांची हमी दिली होती. परंतु ती निव्वळ लेखी हमी होती. प्रत्यक्षात ह्या तत्त्वांच्या अंमलबजावणीची गरज होती. चातुर्वर्ण्य व जातिभेद यांनी विघटित झालेला हिंदू समाज स्वातंत्र्यानंतर ह्या चारही मूलभूत तत्वांवर तरी एकसंघटित व्हावा अशी बाबासाहेबांची इछा होती. न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुत्व यातील विषमतेचा दारुण अनुभव त्यांनी स्वतः घेतलेला होता. म्हणूनच त्यांनी जातीजातीतील भेदभाव समूळ नष्ट करण्यासाठी स्वतः प्रयत्न केला होता. एकजिनसी समाजव्यवस्था निर्माण व्हावी म्हणून त्यांनी मिश्र विवाहाचा मार्ग सांगितला होता. महाडच्या अधिवेशनात तसा ठराव मांडून प्रयत्नही केला होता. परंतु तो ठराव संमत होऊ शकला नव्हता. हिंदू कोड बिलाच्या एकमेव कायदेसंहितेमुळे ते सहज साध्य होते. आणि तेच बाबासाहेबांचे सुखस्वप्न होते. भेदभावविरहित एक कायदा प्रस्थापित करणे,जातिभेदाविरहित हिंदू समाजव्यवस्थेत एकजिनसीपणा निर्माण करणे आणि स्त्री-पुरुष भेदविरहित समता स्थापित करणे हे हिंदू कोड बिलाचे खरे उद्दिष्ट होते.

## हिंदू कोड बील

स्वातंत्र्यानंतरच्या सुरुवातीच्या वर्षांतील आंबेडकरांच्या सर्वात विवादास्पद आणि सार्वजनिक जीवनातील संघर्षाचा भाग म्हणजे त्यांचे हिंदू कोड बिल पास करण्यासाठीचे प्रयत्न होते. कायदेमंडळातील हा भाग वसाहतीच्या काळापासून महिलांना सामाजिक सुधारणा मिळवून देण्याच्या प्रयत्नांचा एक मोठा टप्पा होता. पारंपरिक ब्राह्मणवादी कायद्यात, जो ब्रिटिश न्यायालयातही लागू झालेला होता निम्न जातींच्या अधिक उदार प्रथांना अनुसरून - त्यामध्ये महिलांना घटस्फोट देण्याचा अधिकार नव्हता, नवऱ्याबरोबर राहण्याची त्यांच्यावर जबरदस्ती करण्यात आलेली होती आणि त्यांना वारसाहक्क अतिशय कमी होते. कायद्याने त्या पैसा साठवू शकत नव्हत्या किंवा त्यांना स्वतःच्या नावावर बँकेत खाते उघडता येत नसे. अशाप्रकारे कोणत्याही स्रोतांशिवाय असणाऱ्या महिलांच्या जीवनात परिवर्तन आणण्याचे प्रयत्न 1930च्या दशकापासून कायद्याच्या स्तरावर सुरू होते. स्पष्टपणे सांगायचे झाल्यास त्यांना घटस्फोट आणि वारसा हक्क देणे आवश्यक होते. सरकारने 1941 साली स्थापन केलेल्या हिंदू कोड समितीने दोन बिलांचा प्रस्ताव दिला. परंतु पुराणमतवाद्यांनी केलेल्या हटवादीपणामुळे ते अयशस्वी ठरले. त्यानंतर सुधारणा करून मार्च 1943 मध्ये नव्याने बिल मांडण्यात आले. त्यावर संसदेत प्राथमिक चर्चा झाल्यानंतर ते बी. एन. राऊ यांच्या अध्यक्षतेखाली आणि कायदामंत्री म्हणून आंबेडकरांच्या मार्गदर्शनाखाली तज्ज्ञांच्या समितीकडे पाठविण्यात आले. नव्या विधेयकाच्या तयारीसाठी आंबेडकरांनी त्या मसुद्यात काही बदल केले. त्यामध्ये पारंपरिक कायदेशीर प्रथा 'दयाभाग' याचा आधार घेऊन, ज्यामध्ये व्यक्तिगत वारसांना मालमत्तेचे संपूर्ण अधिकार असत याचा उपयोग त्यांनी मूळच्या प्रस्तावातील 'मिताक्षरा 'ऐवजी अंतर्भूत केला, ज्यामध्ये वैयक्तिक दावे हे वारशांशी संबंधित निर्बंधांवर सोडून देण्यात आले.[1] वैयक्तिक हक्कांविषयीचा त्यांचा हा दृष्टिकोन त्यांच्या एकूण तत्त्वज्ञानाशी सुसंगत होता.

नवे विधेयक 16 ऑगस्ट 1948 रोजी सादर करण्यात आले. त्यालाहीएक मोठा इतिहास होता. पुराणमतवाद्यांनी हिंदू विवाहांचे पावित्र्य भंग होईल, असा दावा करत त्यावर हल्ला चढविल्याने सलग तीन वर्षे त्यावर वाद सुरू राहिला आणि ते प्रलंबित राहिले. विवाह आणि कुटुंब हे हिंदू समाजाचे खरे आधारस्तंभ आहेत, असे जाहीर केले गेले आणि विवाह संपुष्टात आणणे म्हणजे हजारो वर्षे टिकून असणाऱ्या समाजाला संकटात टाकण्यासारखे असल्याचे मत व्यक्त केले

गेले.[2] या विधेयकाला पा ठिंबा देणाऱ्या महिलांवर 'अतिपुढारलेल्या' म्हणून हल्ला चढविण्यात आला. कारण 'महिला म्हणजे, नटणे-मुरडणे आणि रंगीबेरंगी साड्या घालणे, एवढ्यापुरत्याच असतात,' असाच प्रवाह रूढ होता.

**हिंदू कोड बीलात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुचविलेल्या सुधारणा**

पहिली सुधारणा विवाह, दत्तक आदीविषयी जो जातीचा संबंध येईल त्यासंबंधीची आहे. जुन्या व चालू हिंदू कायद्याप्रमाणे विवाह व दत्तक हा ज्या त्या जातीतच घडत असे व आजही घडतो. जर दुसऱ्या जातीतील व्यक्तीशी विवाह झाला; अगर दुसऱ्या जातीचा दत्तक घेण्यात आला तर तो विवाह व दत्तक हिंदू कायद्याप्रमाणे रद्द समजण्यात येत असे. अशा तऱ्हेने, हिंदू समाज व कायदा हे दोन्ही जातीवरच अधिष्ठित झालेले आहे. हिंदू कोड बिलान्वये जातीचे उच्चाटन व्हायचे आहे. नव्या कायद्याने जातीची बंधने नाहीशी होणार असून कोणत्याही जातीत विवाह व दत्तक होऊ शकेल.

दुसरी सुधारणा एकपत्नीत्व पाळण्यासंबंधी आहे. प्रचलित व पुरातन हिंदू कायद्याप्रमाणे हिंदूस हव्या तितक्या स्त्रियांशी विवाह करता येतो. अनेक पत्नीत्वासंबंधी मुसलमानी कायद्यावर टीका करण्यात येते. परंतु हिंदू कायद्यात व मुसलमानी कायद्यात या बाबतीत बराच फरक आहे. तो हा की जो पुरुष चारही स्त्रियांना इन्साफ देऊ शकेल म्हणजेच त्यांचे वैवाहिक जीवन सुखाने सांभाळू शकेल, त्यासच चार स्त्रियांशी विवाह करता येईल, अशी अट हिंदू कायद्यात नाही. हिंदू कोड बिलाचे रूपांतर कायद्यात झाल्यावर ही पद्धती बंद करण्यात येणार आहे. नवीन कायद्याप्रमाणे एका हिंदूस फक्त एकच बायको करता येईल.

तिसरी सुधारणा घटस्फोटासंबंधी आहे. सध्याच्या कायद्याप्रमाणे बायको ही नवऱ्याची अर्धांगी समजली जाते. एकदा लग्न झाले की, तिला कोणत्याही कारणास्तव विभक्त होता येत नाही की काडीमोड घेता येत नाही. हिंदू कायद्याप्रमाणे विवाहाच्या गाठी न सुटणाऱ्या मानल्या जातात. खरे म्हणजे, ज्या स्त्रीचे नवऱ्याशी अगर ज्या नवऱ्याचे स्त्रीशी पटत नाही त्यांना एकत्रित ठेवण्याची सक्ती करणे केव्हाही रास्त नाही. तेव्हा काही ठराविक अटींवर नवरा-बायकोस काडीमोड मिळण्याची सवलत हिंदू कोड बिलात ठेवण्यात आली आहे.[3]

चौथ्या सुधारणे अन्वये हिंदू कायद्यातील 'कोपारसिनरी' पद्धती नष्ट करण्यात आली आहे. पूर्वजांकडून जी इस्टेट चालत येते त्यावरील वंशजाच्या हक्कांसंबंधी सध्या दोन पद्धती रूढ आहेत. एक मिताक्षरा व दुसरी दायभाग. मिताक्षरा ही बंगालखेरीज सर्व प्रांतात चालू असून त्या पद्धतीनुसार बापाच्या मृत्यूनंतर त्याच्या सर्व मुलांना जन्मसिद्ध हक्क म्हणून वाडवडिलांची संपत्ती मिळू शकते. ती विकायची असल्यास त्या मुलाच्या संमतीची जरुरी असते. त्या पद्धतीला प्रतिबंधदाय असेही म्हणतात. दायभाग ही पद्धती बंगाल प्रांत व आजुबाजुचा काही भाग या ठिकाणी आहे. या पद्धतीमध्ये मुलांना अशाप्रकारचा कोणताही वारसा हक्क नसून बापाच्या मृत्युनंतरच मुलांचा वडिलार्जित संपत्तीवर अधिकार येतो. याशिवाय तिसरीही पद्धत आहे ती म्हणजे वारसा हक्काचा कायदा (The Law of Succession) परंतु तो हिंदूंना लागू नाही. तेव्हा, नव्या बिलात मिताक्षरा पद्धत रद्द करण्यात आली असून दायभाग ही पद्धत सर्वत्र रूढ करण्यात येणार आहे.[4] यामुळे सर्वत्र सुसंबद्धता येईल आणि इस्टेटीचा योग-विनियोग करण्यास बाप मोकळा राहील. त्यामुळे संपन्नता वाढण्यास व आर्थिक उत्पन्न वाढण्यास मदत होईल.

पाचवी व शेवटची सुधारणा स्त्रियांना इस्टेटीत मिळणाऱ्या हक्कासंबंधी आहे. आज स्त्रियांना संपत्तीत संपूर्ण मालकी गाजविता येत नाही. तिला बक्षीस म्हणून लग्नाच्या वेळी जी रक्कम किंवा दागिने मिळतात तेच तिचे धन म्हणून समजले जाते. मुलीच्या हक्कांसंबधीचा भेदभाव काढून टाकण्यात येणार आहे. बापाच्या मिळकतीत मुलाप्रमाणे मुलींनाही यापुढे योग्य तो वाटा मिळत जाईल. म्हणजे मुलगा - मुलगी असा भेद हा कायदा जाणणार नाही. स्त्रीला समान वाटा मिळेल. आतापर्यंत ही योजना नव्हती. 1937 पूर्वी तर विधवांनासुद्धा आपल्या पतीच्या मिळकतीवर हक्क सांगता येत नव्हता. 1937 साली त्यासाठी एक नवा कायदा करण्यात आला. परंतू या कायद्यात मर्यादित मालकी व मुलींचा समान वारसा हक्क मान्य करण्यात आला नव्हता.[5] या नव्या हिंदू कायद्यान्वये हे दोन दोष काढून टाकण्यात आले आहेत.

**हिंदू कोड बीलास विरोध**

हिंदू कोड बिलाला विरोध करणाऱ्यांचे तीन वर्ग होते. एक सनातनी--आमचा धर्म, आमचे नैतिक विचार, आमचे धार्मिक ग्रंथ वगैरे ईश्वरप्रणीत आहेत, ते सनातन आहेत, ते जगाच्या उत्पत्तीपासून अंतापर्यंत अबाधित राहणार, त्यांच्यात ढवळाढवळ करण्याचा कोणालाही अधिकार नाही असे या वर्गाचे मत असते, म्हणून ते कोणत्याही सामाजिक व धार्मिक

सुधारणेला विरोध करतात. दुसरा वर्ग राजकीय पुढाऱ्यांचा. यांना आपल्या मतदारांना खूष करण्यासाठी त्यांना हवी ती भूमिका घ्यावी लागते. बिलाला त्यांनी विरोध केला तो एवढ्याचसाठी. तिसरा वर्ग सवर्ण हिंदूंतील वर्णश्रेष्ठत्वाने पछाडलेल्या लोकांचा. हे बिल पास झाले तर त्याचा परिणाम असा होईल की, ज्या हिंदुधर्मशास्त्रांचे संहितीकरण आतापर्यंत वर्णश्रेष्ठ हिंदूला करता आले नाही ते एका अस्पृश्य पंडिताने केले, यात आपली नामुष्की होणार आहे. हे बिल पास झाले तर बहुजन समाज त्याला 'आंबेडकर स्मृती' म्हणून संबोधील आणि देशाच्या भावी इतिहासात हेच नमूद करण्यात येईल.[6] बिलाला विरोधकांनी विरोध केला त्यात जरी त्यांचे निरनिराळे हेतू होते तरी त्यांचा परिणाम - एकच झाला, तो म्हणजे नेहरू मंत्रिमंडळ विरोधाला घाबरले व 'बिल नामंजूर झाले तर मंत्रिमंडळ राजीनामा देईल' अशा ज्या घोषणा पूर्वी त्याने केल्या होत्या, त्याकडे कानाडोळा करून बिलाच्या बाबतीत पड घेतली. कारण लवकरच 1952 ची निवडणूक होणार होती आणि तीत काँग्रेस पक्ष निवडून येण्यासाठी, मतदारांतील जीर्णमतवाद्यांपुढे मंत्रिमंडळाला मान तुकवावी लागली.

हिंदू कोड बिल हे वस्तुतः स्त्रियांना आर्थिक, सामाजिक व धार्मिक स्वायत्तता मिळवून देण्याचे एक फार मोठे साधन होते. परंतु स्त्रियांनी हिंदू कोड बिलाबद्दल आत्मीयताच दाखविली नाही, असे बाबासाहेबांनी आपले दुःख व्यक्त केले. त्यांनी असे उद्‌गार काढले होते की, "स्त्रियांच्या सर्वस्वी हिताचे हे बिल मंजूर करण्यासाठी स्त्रियांनी काहीच हालचाल केली नाही हे खेदपूर्वक सांगावे लागते. मी पुरुष असून देखील स्त्रियांच्या हितासाठी व त्यांच्या हक्कांसाठी भांडलो. पण स्त्रियांनी का उत्सुकता दाखविली नाही हे समजत नाही. ह्या बिलाला पाठिंबा देण्याची गोष्ट तर बाजूलाच राहो पण काही स्त्रियांनी माझ्याकडे येवून ते बिल चांगले नाही असे मला सांगण्याचा प्रयत्न केला. मी दिल्लीत असताना तर काही प्रमुख स्त्रियांचे शिष्टमंडळच माझ्याकडे आले. त्यांना मी ते बिल वाचले का म्हणून विचारले तर त्यांनी ते वाचले नाही असे सांगितले. न वाचताच का विरोध करता असे त्यातील प्रमुख स्त्रीला विचारता ती म्हणाली, "माझ्या नवऱ्याने मला सांगितले की, तू या बिलाला विरोध कर, नाही तर मी दुसरी बायको करीन म्हणून सवत पत्करण्यापेक्षा बिलालाच विरोध करणे मला भाग आहे !' पण स्त्रियांची ही मानसिक दुर्बलता आहे. त्यांच्या ह्या दुर्बलतेमुळेच या बिलाचा घात झाला. स्त्रियांच्या पायात ताकद असती तर बिल कधीच बरगळले नसते. पार्लमेंटमध्ये निवडून आलेल्या स्त्रियांनी देखील या बिलाबाबत काहीही जागरूकता दाखविली नाही. एखाद्या स्त्रीने दुधाचे विरजण घालून ठेवावे आणि तिला ते विरजण शेवटी नासलेले दिसावे तशी स्थिती माझ्या हिंदू कोड बिलाची झाली!"[7] दोन वर्षे रात्रंदिवस जिवापाड मेहनत करून बिल तयार केले आणि त्याचा शेवट असा झाला, हे पाहून बाबासाहेबांना मनस्वी वाईट वाटले.

**सारांश**

हिंदू कोड बील हे भारतीय स्त्रियांच्या उन्नतीमध्ये एक मैलाचा विकास साधणारी बाब होती. भारतीय महिलांचा उत्कर्ष व विकास साधणारी गोष्ट होती. भारतीय महिलांच्या न्याय हक्काच्या दृष्टीने महत्वपूर्ण बील होते. पुरुषप्रधान समाजव्यवस्थेने नाकारलेले स्त्रियांचे हक्क आणि अधिकार हिंदू कोड बीलाने स्त्रियांना दिले होते. अनेक प्रकारचे मूलभूत अधिकार स्त्रियांना मिळवून देऊन संपूर्ण भारतीय स्त्रीच्या विकासाचा, प्रगतीचा, उन्नतीचा मार्ग मोकळा करून दिला. सुधारणेच्या क्षेत्रातील हे अत्यंत महत्वपूर्ण बील सनातनी मानसिकता, उदासीन राजकारण, स्त्रियांचे दुर्बलत्व आणि समाजाची पुराणमतवादी विचारसरणी यातच रखडले गेले.

**संदर्भ :-**

1) ऑमवेट गेल, आंबेडकर : प्रबुद्ध भारताच्या दिशेने, मधुश्री पब्लिकेशन, पुणे, 2021,पृ. क्र. 118.
2) कित्ता पृ. क्र. 119.
3) निकम गौतम, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि स्त्री स्वातंत्र्य, विमलकिर्ती प्रकाशन, चाळीसगाव, 2016, पृ. क्र. 63.
4) कित्ता पृ. क्र. 64.
5) गांजरे मा. फ (संपा) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणे खंड 3, अशोक प्रकाशन, नागपूर, पृ. क्र. 177.
6) खैरमोडे चां. भ., डॉ. बाबासाहेब उर्फ भीमराव रामजी आंबेडकर - खंड 10, समता शिक्षण संस्था, पुणे, 1989, पृ.क्र. 65.
7) आंबेडकर बी. आर., हिंदू कोड बील, रोडगे प्रकाशन, नागपूर, 2017, पृ.क्र.90.

# मराठेकालीन न्यायदान पध्दतीमध्ये मजलीसची कार्यपद्धती: एक अभ्यास

**योगेश पुंजाराम बहादुरे**
संशोधक विद्यार्थी
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ. संभाजीनगर

### प्रस्तावना

मराठेकालीन न्यायदान पद्धतीमध्ये स्थानिक न्याय संस्था स्थानिक पातळीवर न्यायदानाचे व प्रशासनाचे काम करताना दिसतात. यामध्ये महत्त्वाच्या असलेल्या गोतसभा आणि मजलीस न्यायदान पद्धतीचे कार्य करताना दिसतात. मजलिस हे केंद्रीय ते स्थानिक पातळीवरील न्यायदानाचे काम करत असलेली एक संस्था होय. मजलिस मध्ये वेगवेगळे उपविभाग होते थोडक्यात मजलीस मध्ये तत्कालीन न्यायदान करणारी व न्याय विषयक कार्यात सल्ला देणारी महत्त्वाची न्याय सभा असल्याने तत्कालीन न्यायदान पद्धतीमध्ये मजलीस या न्यायसंस्थेचे महत्त्व अधोरेखित होते.

### मजलिस

न्यायदान पध्दतीमधील सर्वात महत्वाची पध्दत म्हणजे मजलिस होय "मजलिस या शब्दाचा अर्थ मोल्सवर्थ यांच्या मते, रॉयल कोर्ट किंवा असेंब्ली, तर य. न. केळकर यांच्या मतानुसार दरबार बैठक, तर व्ही. टी. गुणे यांनी याचा अर्थ धर्मसभा असा दिला आहे. याचा अर्थ मजलिस म्हणजे राज्यसभा, धर्मसभा किंवा बैठक होय.[1].

मजलिसचा कार्यकाल साधारणपणे महाराष्ट्रामध्ये इ.स. 1400 ते 1750 इतका आहे. मराठेशाहीमध्ये छत्रपती शिवाजी महाराज ते छत्रपती शाहू महाराज यांच्या कारकिर्दीपर्यंत मजलिस न्यायदानाच्या क्षेत्रात अत्यंत प्रभावीपणे काम करीत असल्याचे दिसते. "मजालिस ही केंद्रीय विभागात न्यायदानाचे राजाबरोबर संयुक्तपणे काम करीत असे. स्थानिक पातळीवर मजलिसचे उपविभाग होते. थोडक्यात मजलिस म्हणजे राजाला न्यायविषयक कार्यात सल्ला देणारी किंवा त्याला न्यायविषयक कार्यात मदत करणारी विद्वान रूढी परंपरा, धार्मिक नीतीनियम जाण असणाऱ्या समाजातील प्रमुख लोकांचा समावेश असलेली राजश्रित एक संस्था होय. दुसऱ्या शब्दात मजलिस म्हणजे राजा किंवा त्याचे प्रतिनिधी व लोकप्रतिनिधी ज्या सभेमध्ये एकत्र येऊन न्यायदानाचे कामकाज करीत असत ती सभा म्हणजे मजलिस होय."[2]

### मजलिस मुख्यत दोन प्रकार होते.

1. केंद्रीय मजलिस 2. स्थानिक मजलिस

### केंद्रीय मजलिस

या मजलिसमध्ये प्रामुख्याने राजा, पंडितराव, न्यायाधीश आणि राजमुद्रित अधिकारी यांचा समावेश होत असे.[3] छत्रपती शिवाजी महाराज स्वत: प्रापंचिक स्वरूपांच्या खटल्यांचा न्यायनिवाडा करणे हे हिंदू धर्मशास्त्राप्रमाणे आवश्यक असल्याने ते स्वत: मजलिसमध्ये न्यायदान करीत असत. त्यावेळी छत्रपती शिवाजी महाराज अष्टप्रधान मंडळातील न्यायधीश व पंडितराव या दोन मंत्र्याची मदत घेत असत. त्यावेळी सरकारी पदाधिकारी व सबंधित मंत्री उपस्थित राहत असत. प्रामुख्याने पंडितराव केंद्रीय मजालिसमध्ये धार्मिक स्वरुपाच्या खटल्याची सोडवणूक करीत असत. पंडितरावास धार्मिक, सामाजिकदृष्ट्या क्लिष्ट खटले चालवताना त्यात ब्रह्मसभेची मदत घेतली जात असे.[4]

### स्थानिक मजलिस

स्थानिक मजलिस हा प्रकार उपविभागामध्ये विभागलेला असून प्रशासनाच्या दृष्टीने स्वराज्य हे सरसुभा (प्रांत, परगणा) सुभा (जिल्हा) तर्क तालुका व ग्राम (खेडे) मध्ये विभागलेला होता.

### मजलिसची कार्यपध्दती

मराठे कालखंडातील मजहर पाहिल्यानंतर आपल्या लक्षात येते की, गुन्हेगाराला त्याच्या इच्छेनुसार त्याला योग्य वाटेल त्या ठिकाणी सभा भरवण्याच्या अधिकार त्याला होता. पण तत्पर्वी कुठलीही तक्रार प्रथम तर्फच्या हवालदारामार्फत किंवा परगण्याच्या प्रमुख अधिकाऱ्यांपुढे आणली जात असे. तक्रार प्राप्त झाल्यानंतर हवालदार त्याबाबत ब्रम्हसभा व जातीसभेबरोबर चर्चा करीत असे. तक्रारीच्या स्वरुपानुसार ती संबधित सभेकडे पाठविली जात असे. तक्रारीचा निकाल

ज्या ठिकाणी घटना घडली तिथेच लागावा अशी व्यवस्था केलेली असे. एखादा खटला चालविण्यासाठी सभा निश्चित झाली की, करीना किंवा तकरीर तयार करीत असत. त्यामध्ये संपूर्ण खटल्याची वस्तुस्थिती लिहीलेली असे. तयार झालेला करीना देशमुखाकडे पाठविला जात असे व त्यासाठी नंतर देशमुख मजलिस बोलवित असत.

मजलिसच्या सभा प्रमुखाला सभा नायक म्हटल्या जात असे. मजालिस ही बहुधा गावचे वडाचे झाड, पिंपळाचे झाड, पारावर किंवा देशमुखाच्या घरी किंवा एखाद्या देवळात भरत असे. कधीकधी तर ती चावडीमध्ये तर एखाद्या तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी धर्म चौथ्य-यावर सुध्दा भरत असे.[5] परगण्याच्या मजलिसमध्ये देशमुख हा सभानायक असे. खेडेगावात मुकादम ‘पाटील’ असे व कसब्याच्या ठिकाणी शेटे हा सभानायक असे. मजलिस ही सर्वसाधारणपणे ज्येष्ठ व माघ महिन्यांत भरवीत असत.

**खटला ऐकण्याची पद्धत**

मजलिससमोर आलेली तक्रार सर्वप्रथम वाचून दाखवली जात असे. घटनेची कारणमीमांसा व त्यावर चर्चा होत असे. त्यानंतर आरोपीला सरकारी अधिकाऱ्यामार्फत बोलवण्यात येत असे. त्याच्याकडून खटल्याची फी घेतली जात असे. आरोपीला खटला समाजावून दिला जात असे व त्याला त्याच्या बचावाची संधी दिली जात असे. आरोपीने गुन्हा कबुल केल्यास काम लवकर संपत असे. मात्र जर विरोध झाला तर हे प्रकरण वरिष्ठ अधिकाऱ्याकडे पाठविले जात असे.[6] जर आरोपीला गुन्हा कबूल असेल तर त्या आरोपीकडून राजीनामा लिहून घेत असत व त्यावर दोन साक्षीदारांच्या सह्या किंवा चिन्हे असत. क्वचित प्रसंगी वर्तणूकीचा जामीन घावा लागे. निकाल कायम झाल्यास त्या निवडपत्राची एक प्रत (पुरसीस) तयार केली जात असे. त्याचा मजहर होत असे त्यावर वतनदार आपली चिन्हे उठवीत असत. काही वेळा खटला एकाच बैठकीत संपत नसे. अशावेळी चार-चार वेळा मजलिसची बैठक बोलवावी लागत असे.[7] सर्वसाधारणपणे मजलिसबाहेर खटला नेण्याची पद्धत नसे.

**निकालपत्राची मजहर**

या खटल्याचा निकाल लागल्यानंतर त्याची मजहर तयार करण्यात येत असे मजहरची लांबी पाच फुटांपासून वीस फुटांपर्यंत व रुंदी साडेचार ते साडेसहा फुट असे परगणा मजलिसची मजहर देशपांडे किंवा देश कुलकर्णी लिहित असे. कसबा मजलिसची मजहर महाजन लिहित असे तर ग्राम मजलिसची मजहर कुलकर्णी लिहित असे. मजहर ही कागदावर तसेच काही वेळा ताम्रपटावर लिहिली जात असे. मजहरच्या काळया शाईमध्ये लिहिली जात असे. मजहरच्या सुरूवातीच्या व शेवटच्या काही ओळी देशपांडे किंवा कुलकर्णी हे स्वत:च्या हस्ताक्षरात लिहित असत. मजलिसच्या अंमलबजावणीची जबाबदारी उपस्थित असणाऱ्या सरकारी अधिकाऱ्याची असे. तो अधिकारी आपल्या सहाय्यक अधिकाऱ्यास लेखी सूचना देत असे व निकालाची अंमलबजावणी केली जात असे.

**खटला फेरतपासणीची पद्धत**

खटला चालू असतांना सरकारी अधिकारी दोन्ही पक्षांचे समाधान करण्याचे प्रयत्न करीत असे. एखाद्या वेळेस मजलिस सबंधी काही तक्रारी आल्यास मजलिसचे स्थळ बदलण्याची विनंती केली तर ती मान्य होत असे आणि त्या ठिकाणी जो निकाल दिला जात असे त्यास थळपत्र असे म्हणत असे. हे थळपत्र प्राप्त झाल्यानंतर मजलिसची मजहर तयार केली जात असे.

**मजलिसचे शुल्क**

मजलिसमध्ये खटला चालविण्याबाबत किती फी घ्यावी याचे स्वरूप निश्चित नव्हते. सरकारी अधिकारी दोन्ही पक्षांकडून फी घेत असत. विजयी पक्षकाराकडून हारकी व पराभूत पक्षकाराकडून ‘गुन्हेगारी’ अशी फी वसूल करत. एखाद्या महत्वाच्या खटल्यात विजयी पक्षकार हारकीशिवाय ‘शेरणी’ या नावाने जादा रक्कम फी सरकारात भरत असे. त्यास ‘खुशी शेरणी’ असेही म्हणत. ज्यावेळी शेरणीची जादा रक्कम दिली जात असे त्यास ‘खुर्दकत’ किंवा ‘वतनपत्र’ बहाल केले जात असे. याला यादी वतनपत्र असे म्हणत.[8]

**मजलिसच्या शिक्षेचे स्वरूप**

मजलिससमोर चालणाऱ्या खटल्याचे स्वरूप गुंतागुतीचे असेल, तर खटल्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत मालमत्ता किंवा वतन सरकारच्या ताब्यात राहत असे. या बाबत विशिष्ट असा नियम नव्हता. पण, वादी आणि प्रतिवादी

यांच्या मालमत्तेची तात्पुरती जप्ती सरकारतर्फे केली जात असे.[9] मजलिस समोर काही खटल्यात जर एखाद्या व्यक्तीकडून धोका आहे असे वाटल्यास खटल्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत त्यास कोठडीत बंद करीत असत. या तुरूंगवासाला आदबखाना असे म्हणत.

**मजलिसचा ऱ्हास**

मराठेकाळात न्यायदानाचे कार्य मजलिस करत असत. इ.स. 1660 ते 1750 पर्यंत म्हणजे जवळपास 100 वर्षाच्या वर ती कार्यरत होती. मजलिसचे निवाडे अंतिम असत व त्या विरोधात जाण्याची कोणाची हिंमत होत नसे. मजलिसचे महत्व छत्रपती राजाराम महाराजांच्या कारकिर्दीपासून कमी होण्यास प्रारंभ झाल्याचे दिसते. तरीसुध्दा मजलिस इ.स. 1750 पर्यंत म्हणजे शाहुच्या मृत्यूपर्यंत कार्यरत होती.

सारांश:-

मराठी कालीन न्याय पद्धतीमध्ये मजलिस सभा ही थोडक्यात न्यायदान प्रक्रियेतील एक महत्त्वाची सभा होती. ही सभा केंद्रीय अधिकारी शासन यासोबतच धर्मसभा व गावपातळीवरील जाती सभा यांच्या समन्वयातून कार्य करताना दिसून येते तसेच प्रत्येक खटल्याची व निकालाची एक विशिष्ट पद्धत आपल्याला यामध्ये दिसून येते. ही पद्धत महाराष्ट्र मध्ये साधारण 1660 ते 1750 या दरम्यान आढळून येते. या कालखंडात मजलिसद्वारे स्थानिक पातळीपासून ते केंद्रीय पातळी पर्यंतचे अनेक खटले सोडवण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली आहे. मराठेकालीन ही न्याय पद्धत तत्कालीन सामाजिक जीवनाचा व प्रशासकीय जीवनाचा एक विभिन्न अंग होती. असे दिसून येते अशा पद्धतीची ही पद्धत 1750 नंतर हळूहळू लोप पावत गेली.

**संदर्भ** :-

1) गवळी पी. ए., मराठ्यांचा इतिहास, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, 1999, पृ. क्र.224
2) किता. 224
3) कुलकर्णी अ. रा,खरे ग्. ह. मराठ्यांचा इतिहास. खंड 1, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, 2019, 280
4) उपरोक्त. गवळी पी. ए. पृ.227
5) उपरोक्त कुलकर्णी अ. रा पृ. कृ. 291
6) उपरोक्त. गवळी पी. ए. क्र.228.
7) उपरोक्त कुलकर्णी अ. रा पृ. कृ. 293
8) उपरोक्त. गवळी पी. ए. पृ. क्र.228.
9)किता, पृ. क्र.229.

# बौद्ध तत्वज्ञान : आंतरिक शांतीचा जागतिक मार्ग

**कृष्णा पुंजाराम खरात**
प्राचीन भारतीय संस्कृती आणि इतिहास विभाग
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

**प्रस्तावना:-**

बौद्ध धम्म हा भारतीय धर्म असून भारताच्या इतिहासात या धर्माच्या उदयाला मोठे स्थान आहे. सिद्धार्थने स्थापित केलेल्या हा बौध्द धम्म 'अति प्राचीन धर्म आहे. विशेषाधिकारप्राप्त जीवनाचा ध्यान आणि चिंतनावर आत्मज्ञानाचा बोध घेणे आणि दुःखाच त्याग करणे, स्वरूप, पूर्णजन्माचे हक्क आणि मुक्तीचा मार्ग याविषयीच्या त्याच्या शिकवणींनी बौद्ध तत्त्वज्ञानाचा पाया घातला.भारतीय तत्वज्ञानाच्या परंपरेवर त्याचा प्रभाव पडला.बौद्ध धर्म ही एक प्राचीन विश्वास प्रणाली आहे ज्याला काही लोक धर्म म्हणून आणि काही लोक तत्वज्ञान म्हणून पाहतात.जगभरात 507 दशलक्ष अनुयायांसह बौद्ध धर्म हा जगातील चौथा सर्वात लोकप्रिय धर्म आहे. भारत, चीन आणि इतर पारंपारिक बौद्ध देशांमध्ये प्रवास केल्याने अलंकृत मंदिरे, बुद्ध मंदिरे आणि श्रद्धाळू अनुयायी (जगातील इतर महान धर्मांप्रमाणेच!) दिसून येतात. तथापि, बौद्ध धर्माला वारंवार तत्त्वज्ञान म्हणून संबोधले जाते, विशेषतः पश्चिमेकडील लोक हे स्टोइकिझम सारख्या इतर लोकप्रिय विचारांच्या शाळांसह अनेक शिकवणी सामायिक करतात.बुद्धाने स्वतः आपल्या कल्पनांच्या व्यावहारिक स्वरूपावर जोर दिला, धार्मिक कट्टरतेवर तात्विक चौकशीला प्राधान्य दिले. परंतु कदाचित या धर्मातील सर्वात ठोस तत्त्वज्ञानात्मक घटक स्वतः बुद्धाकडून आले आहेत. आपल्या अनुयायांना पत्रात दिलेल्या शिकवणींचे पालन करण्याची विनंती करण्याऐवजी, बुद्ध लोकांना त्यांचा शोध घेण्यास प्रोत्साहित करतात. बौद्ध शिकवणी, अन्यथा धर्म म्हणून ओळखल्या जातात (संस्कृत: 'वास्तविकतेबद्दल सत्य') मध्ये सहा भिन्न वैशिष्ट्ये आहेत, ज्यापैकी एक आहे इहिपसिको. हा शब्द बुद्धाने नेहमी वापरला आहे आणि त्याचा शाब्दिक अर्थ आहे "या आणि स्वतःसाठी त्याने लोकांना गंभीर विचार करण्यास प्रोत्साहित केले आणि तो काय म्हणत आहे हे तपासण्यासाठी त्यांच्या स्वत: च्या वैयक्तिक अनुभवावर लक्ष केंद्रित केले. या प्रकारची वृत्ती ख्रिश्चन आणि इस्लाम सारख्या धर्मांपेक्षा अत्यंत भिन्न आहे, जेथे अनुयायांना सामान्यतः धर्मग्रंथ वाचण्यास, आत्मसात करण्यास आणि बिनदिक्कतपणे स्वीकारण्यास प्रोत्साहित केले जाते.या धर्माला भरपूर धार्मिक पैलू आहेत! उदाहरणार्थ, बुद्ध पुनर्जन्मावर विश्वास ठेवतात हे आपण आधीच पाहिले आहे. जेव्हा एखाद्याचा मृत्यू होतो तेव्हा ते कशा प्रकारे पुनर्जन्म घेतात याचे त्याने वर्णन केले आहे. एखाद्या व्यक्तीचा पुनर्जन्म कसा होतो हे त्यांच्या कृतींवर आणि त्यांच्या मागील जन्मात(कर्म)कसे वागले यावर अवलंबून असते.जर बौद्धांना मानवाच्या क्षेत्रात पुनर्जन्म घ्यायचा असेल, ज्याला बुद्ध मानतात की आत्मज्ञान प्राप्त करणे सर्वोत्तम आहे, तर त्यांनी चांगले कर्म कमवावे आणि बुद्धाच्या शिकवणींचे पालन केले पाहिजे. म्हणून जरी बुद्ध गंभीर चौकशीला प्रोत्साहन देत असले तरी ते जे सांगत आहेत त्याचे पालन करण्यासाठी ते उत्कृष्ट प्रोत्साहन देखील देतात.अनेक जागतिक धर्म त्यांच्या अनुयायांना आयुष्यभर प्रयत्न करण्यासाठी आणि ध्येय ठेवण्यासाठी काही प्रकारचे अंतिम बक्षीस देतात.ख्रिश्चनांसाठी, हे मृत्यूनंतर स्वर्गात पोहोचणे आहे. बौद्धांसाठी, ही निर्वाण म्हणून ओळखली जाणारी ज्ञानाची अवस्था आहे.तथापि, निर्वाण हे ठिकाण नसून मनाची मुक्त अवस्था आहे. निर्वाण म्हणजे एखाद्याला जीवनाचे अंतिम सत्य कळले आहे. जर एखाद्या व्यक्तीने ही स्थिती प्राप्त केली तर ते दुःख आणि पुनर्जन्म या चक्रातून कायमचे सुटले आहेत, कारण त्यांच्या प्रबुद्ध मनाने या चक्राची सर्व कारणे नष्ट केली आहेत.जगभरातील अनेक लोकांसाठी उपासनेचा एक महत्त्वाचा भाग असलेले अनेक बौद्ध विधी आणि समारंभ देखील आहेत. पूजा हा एक समारंभ आहे ज्यामध्ये अनुयायी सामान्यतः बुद्धांना अर्पण करतात. बुद्धाच्या शिकवणुकीबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी ते असे करतात. पूजा करताना अनुयायी ध्यान, प्रार्थना, जप आणि मंत्रांची पुनरावृत्ती देखील करू शकतात.

ही भक्ती प्रथा केली जाते जेणेकरून अनुयायी बुद्धाच्या शिकवणींकडे अधिक खोलवर जातील आणि त्यांची धार्मिक भक्ती वाढवू शकतील. काही धर्मांच्या विपरीत, ज्यामध्ये धार्मिक नेत्याच्या सूचनेनुसार समारंभ होणे आवश्यक आहे, बौद्ध एकतर मंदिरात किंवा त्यांच्या स्वतःच्या घरात प्रार्थना आणि ध्यान करू शकतात.भगवान बुद्धाने सांगितलेले तत्वज्ञान म्हणजे

"धम्म". धम्म म्हणजे जगाचा नियम, जगाचे सत्य. बुद्धांनी धम्मात मानवी जीवनातील दुःखाचे कारण आणि त्यावर उपाय सांगितला आहे.बुद्धांच्या मते, मानवी जीवन दुःखमय आहे. हे दुःखाचे कारण म्हणजे तृष्णा. तृष्णा म्हणजे इच्छा, आसक्ती. बुद्धांनी सांगितले की, तृष्णेचा नाश केला तर दुःखातून मुक्ती मिळते.तृष्णेच्या नाशासाठी बुद्धांनी "अष्टांगिक मार्ग" सांगितला. हा मार्ग म्हणजे आठ पायरींचा मार्ग. या मार्गाचा अवलंब केल्याने मनुष्य तृष्णेपासून मुक्त होऊ शकतो आणि दुःखातून मुक्ती मिळवू शकतो.

अष्टांगिक मार्गाचे आठ पायऱ्या खालीलप्रमाणे आहेत:-

सम्यक दृष्टि (योग्य दृष्टी)

सम्यक संकल्प (योग्य विचार)

सम्यक वाचा (योग्य वाणी)

सम्यक कर्मा (योग्य कर्म)

सम्यक आजीविका (योग्य उपजीविका)

सम्यक व्यायाम (योग्य प्रयत्न)

सम्यक स्मृती (योग्य स्मरण)

सम्यक समाधी (योग्य समाधी)

भगवान बुद्धांचे तत्वज्ञान हे एक मानवतावादी तत्वज्ञान आहे. या तत्वज्ञानात मानवाच्या कल्याण आणि सुखाला प्राधान्य दिले आहे. बुद्धांनी सांगितले की, प्रत्येक मनुष्य दुःखातून मुक्त होऊ शकतो. त्यासाठी योग्य मार्गदर्शन आणि प्रयत्न आवश्यक आहेत.

उद्दिष्टे:-

1)बौध्द तत्वज्ञान हे सत्य,अहिंसा,प्रेम,करुणा आणि शांतीचा संदेश देते.

2) बौध्द तत्वज्ञान मन, वचन आणि कर्म इत्यादीमध्ये शुद्धता आणते.

3) व्यक्तीला बुद्धत्व आणि निर्वाण प्राप्तीसाठी प्रेरणा देते.

4) बौध्द तत्वज्ञान सुकर्म, समानता, आणि सामाजिक न्याय इत्यादी मूल्यांना विशेष महत्त्व प्रदान करते.

**गृहीतके**:-

1) बौध्द तत्वज्ञानाची पार्श्वभूमी जाणून घेणे

2 )बौद्ध तत्वज्ञानाचे प्राथमिक उद्दिष्टे समजून घेणे

3 )बौध्द तत्वज्ञानाचे अंतिम ध्येय तपासणे.

4) बौद्ध तत्वज्ञान हे आंतरिक शांतीचा मार्ग आहे, हे स्पष्ट करणे.

**बौद्ध धर्माची स्थापना** :-

बौद्ध धर्म (इंग्रजी: Buddhism / बुद्धिझम) हा भारताच्या श्रमण परंपरेतून निर्माण झालेला एक धम्म (जीवन जगण्याची विचारधारा) आणि तत्त्वज्ञान आहे. बौद्ध धर्म हा एक सत्य अनादि शुद्ध सद्धम्म आहे.याचे वर्णन धम्मपदा मध्ये आणि याच सद्धम्मामार्गापासुन अनेक पंथाची उत्पति झाली आहे. तसेच हा एक प्राचीन भारतीय धर्म आहे त्यासबौद्ध धम्म, बुद्ध धर्म, बुद्ध धम्म असेही म्हणतात. तथागत बुद्ध यांनी इ.स.पू. 6 व्या शतकात बौद्ध धर्माचे धम्मचक्कपरिवर्तन करून महान उपदेश दिले आहे.

बौद्ध धर्माची स्थापना स्वतः बुद्धत्वापासुन झाली आहे कारण बुद्धांची परंपरा ही अनादि आहे भगवान गौतम बुद्धाच्या पहिल्या पण बुद्ध होउन गेले आहेत त्यामुळे तीच अनादि परंपरा गौतम बुद्धानी पुढे नेली आहे याचा उल्लेख त्रिपीटक ग्रंथ (बुद्ध वंश) यामध्ये आढळून येतो. तथागत बुद्धांच्या महापरिनिर्वाणानंतर पुढील दोन शतकांत, सम्राट अशोकांच्या काळात बौद्ध धर्माचा भारतभर प्रसार झाला आणि त्यापुढील दोन हजार वर्षांमध्ये हा धर्म मध्य, पूर्व आणि आग्नेय जम्बुमहाद्वीपामध्ये (ईस्ट इंडीज) सोबतच जगभरात पसरला. बौद्ध धर्म हा आपल्या जन्मस्थानापासून निघून जगभर पसरलेला जगातील पहिला धर्म होय. बौद्ध धर्म हा निरीश्वरवादी, अनात्मातावादी, समतावादी, विज्ञानवादी, मानवतावादी धर्म होय. गौतम बुद्ध यांनी मानवजातीला प्रज्ञा, शील, करुणा या तत्त्वांची शिकवण दिली. बौद्ध धर्म हा स्वातंत्र्य, समता,

बंधुत्व, करुणा, मैत्री (प्रेम), प्रज्ञा, मानवी मूल्ये, विज्ञानवाद या तत्त्वांचा पुरस्कर्ता आहे.आधुनिक विज्ञान आणि मानवी मूल्यांचे समर्थन करणारा धर्म म्हणून बौद्धधर्माला एक वेगळी ओळख मिळालेली आहे.

बौद्ध धर्माचा उगम भारतात प्रथम सहाव्या शतकात झाला.हा एक गैर-आस्तिक धर्म आहे अर्थात तो ख्रिश्चन धर्मासारख्या आस्तिक धर्मांप्रमाणे, निर्माता देवावर विश्वास ठेवत नाही.बौद्ध धर्माची स्थापना सिद्धार्थ गौतम (ज्यांना बुद्ध म्हणूनही ओळखले जाते)यांनी केली होती, जो पौराणिक कथेनुसार, एकेकाळी हिंदू राजपुत्र होता.तथापि, सिद्धार्थाने अखेरीस आपली संपत्ती सोडण्याचा निर्णय घेतला आणि त्याऐवजी ऋषी झाला.मानवी दु:ख आणि त्यामुळे लोकांना होणाऱ्या वेदनांची जाणीव झाल्यानंतर त्यांनी हा निर्णय घेतला.त्यामुळे सिद्धार्थने तपस्वी जीवनशैली जगली. त्यांनी एक विश्वास प्रणाली विकसित करण्यासाठी स्वत:ला वाहून घेतले जे संसारापासून कसे सुटावे हे इतरांना शिकवू शकते, हा एक संस्कृत शब्द आहे जो "जीवन, मृत्यू आणि पुनर्जन्म या दु:खाने भरलेल्या चक्राचे वर्णन करतो, सुरुवात किंवा शेवट न करता"(विल्सन 2010).आज त्याची लोकप्रियता असूनही, बौद्ध धर्म सुरुवातीला अनुयायी मिळवण्यात मंद होता. 6व्या आणि 5व्या शतकादरम्यान, भारत महत्त्वपूर्ण धार्मिक सुधारणांच्या काळातून जात होता. दैनंदिन लोकांच्या गरजा पुरेशा प्रमाणात पूर्ण करण्यात हिंदू धर्माच्या कथित अपयशाच्या प्रतिसादात बौद्ध धर्म विकसित झाला. परंतु ख्रिस्तपूर्व तिसऱ्या शतकातच धर्माला जोर आला. भारतीय सम्राट अशोक द ग्रेटने बौद्ध धर्म स्वीकारला आणि परिणामी तो भारतीय उपखंड आणि आग्नेय आशियामध्ये वेगाने पसरला.

बौद्ध भारतीय संस्कृतीचा परदेशात प्रसार

बौद्ध धर्माने परदेशात जेथे जेथे आपले पाय रोवले तेथे तेथे भारतीय बौद्ध संस्कृतीचे घटक प्रसारित होण्यास हातभार लागला. श्रीलंका, चीन, जपान, थायलंड, म्यानमार, भूतान, कोरिया, व्हिएतनाम, लाओस, कंबोडिया, सिंगापूर, मंगोलिया, तैवान, हॉंगकॉंग इत्यादी देशांत बौद्ध धर्म हा प्रमुख धर्म असून आज जगातील जवळजवळ सर्वच देशांत बौद्ध धर्माचा प्रसार झालेला आहे. जगातील प्रत्येक देशांत बौद्ध अनुयायी आहेत. बौद्ध धर्माने भारतीय तसेच विदेशी समाजाला आकार देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

**बौद्ध तत्वज्ञान :-**

बौद्ध तत्वज्ञान ही प्राचीन भारतीय तत्वज्ञान प्रणाली आहे जी बौद्ध धर्माच्या धार्मिक-तात्विक परंपरेत विकसित झाली आहे. त्यामध्ये गौतम बुद्धाच्या परिनिर्वाणानंतर ( इ.स.5 वे शतक ) प्राचीन भारतातील बौद्ध धर्माच्या विविध शाळांमध्ये विकसित झालेल्या तर्कशुद्ध चौकशीच्या पद्धती आणि त्यापुढील घडामोडींचा समावेश आहे. भगवान बुद्धांनी‘पाली’ या लोकभाषेतून अत्यंत साध्या आणि सोप्या पद्धतीने बौद्ध धर्माची शिकवण, आचार-विचार सांगितले. बुद्धांनी धर्माची शिकवण व आचरण यासाठी त्रिशरण, चार आर्यसत्य, अष्टांगिक मार्ग (मध्यम मार्ग) व पंचशील सांगितलेले आहेत.

चार आर्यसत्ये:- भगवान गौतम बुद्ध म्हणतात, ‘‘मानवी जीवन हे दुःखमय आहे, दुःखाची निर्मिती तृष्णेतून (वासना, इच्छा, आसक्ती, आवड) होते, म्हणून या तृष्णेवर आपल्या इच्छांवर नियंत्रण ठेवले पाहिजे. यासाठी मध्यम मार्गाचा अवलंब केला पाहिजे. मानवी व्यवहाराच्या मुळाशी चार आर्यसत्ये आहेत.

दुःख - मानवी जीवन हे दुःखमय आहे.

तृष्णा - मनुष्याच्या न संपणाऱ्या इच्छा हे दुःखाचे कारण आहे.

दुःख निरोध - दुःखाचे निराकरण वा अंत सर्व प्रकारची आसक्ती सोडण्याने होते.

प्रतिपद् - दुःख निवारण्यासाठी सदाचाराचा मार्ग (अष्टांग मार्ग) आहे.

महान बौद्ध विद्वान व बोधिसत्त्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते, या चार आर्यसत्यामधील पहिले व शेवटचे ही दोनच आर्यसत्त्वे महत्त्वाची आहेत. पहिले - दुःख आहे आणि शेवटचे प्रतिपद् - दुःख निवारण्याचा (अष्टांग) मार्ग आहे.

पंचशील मध्ये बुद्धांनी आपल्या अनुयायांना खालील पाच शीलांची शिकवण दिलेली आहे.

अहिंसा :- मी जीवहिंसेपासून अलिप्त रहाण्याची शपथ घेतो.

मी चोरी करण्यापासून अलिप्त रहाण्याची शपथ घेतो.

मी कामवासनेच्या अनाचारापासून अलिप्त रहाण्याची शपथ घेतो.

मी खोटे बोलण्यापासून अलिप्त रहाण्याची शपथ घेतो.

मी मद्य, मादक तसेच इतर सर्व मोहांत पाडणाऱ्या मादक वस्तूंच्या सेवनापासून अलिप्त रहाण्याचीं शपथ घेतो.

या बौद्ध तत्त्वांचा, शिकवणुकीचा मानवाने जीवनात अंगिकार केला तर मानवी अस्तित्त्व असताना नक्कीच तो दुःखमुक्त होऊन आदर्श जीवन जगू शकतो.

**अष्टांगिक मार्ग: -**

तथागत भगवान बुद्धांनी सारनाथ येथे धम्मचक्र प्रवर्तनाचे विवेचन करतांना नीती व सदाचाराला महत्त्व देऊन मानवाचे जीवन सुखकर होण्यासाठी तसेच निवार्णाच्या समीप पोहोचण्यासाठी हा 'अष्टांग मार्ग' किंवा 'मध्यम मार्ग' सांगितला.

अष्टांग मार्ग हा सदाचाराचा मार्ग होय. ह्या आठ गोष्टींच्या पालनामुळे मानवाचे जीवन सुखमय होते.

सम्यक दृष्टी :- निसर्ग नियमाविरुद्ध कोणतीही गोष्ट होऊ शकते ही गोष्ट न मानणे.

सम्यक संकल्प :- म्हणजे योग्य निर्धार, विचार.

सम्यक वाचा :- करुणायुक्त व सत्यपूर्ण वाचा (बोल) ठेवण्याचा प्रयत्न करणे.

सम्यक कर्मांत :- उत्तम कर्म म्हणजे योग्य कृत्ये करणे.

सम्यक आजिविका :- वाईट मार्गाने आपली उपजीविका न करता ती सन्मार्गानेच करणे.

सम्यक व्यायाम :- वाईट विचार निर्माण झाल्यास त्याचा त्वरित नाश करणे.सम्यक स्मृती :- तात्त्विक गोष्टींचे स्मरण करून चित्तास (मनाला) जागृत ठेवणे.सम्यक समाधी :- कोणत्याही वाईट विकारांना स्पर्श होऊ न देता दुष्ट प्रवृत्तीपासून मन अलग ठेवून चित्त प्रसन्न आणि शांत ठेवणे.

दहा पारमिता हा बुद्धांनी सांगितलेल्या या दहा पारमिता ह्या शील मार्ग होत.

1)शील:-शील म्हणजे नीतिमत्ता, वाईट गोष्टी न करण्याकडे असलेला मनाचा कल.

2)दान:-स्वार्थाची किंवा परतफेडीची अपेक्षा न करता दुसऱ्याच्या भल्यासाठी स्वतःची मालमत्ता, रक्त, देह अर्पण करणे.

3)उपेक्षा:-निरपेक्षतेने सतत प्रयत्न करीत राहणे.

4)नैष्क्रिम्य:-ऐहिक सुखाचा त्याग करणे.

5)वीर्य:-हाती घेतलेले काम यत्किंचितही माघार न घेता अंगी असलेल्या सर्व सामर्थ्यानिशी पूर्ण करणे.

6)शांति :-शांति म्हणजे क्षमाशीलता, द्वेषाने द्वेषाला उत्तर न देणे.

7)सत्य:- सत्य म्हणजे खरे, माणसाने कधीही खोटे बोलता कामा नये.

8)अधिष्ठान:-ध्येय गाठण्याचा दृढ निश्चय.

9)करुणा:-सर्व प्राणिमात्र, मानवाविषयीची प्रेमपूर्ण दयाशीलता.

10)मैत्री:-मैत्री म्हणजे सर्व प्राणी, मित्र, शत्रूविषयी देखील नव्हे तर सर्व जीवनमात्रांविषयी बंधुभाव बाळगणे.

**नैतिक सिद्धान्ताचा प्रभाव**

करुणा (दयाबुद्धी), प्रामाणिकपणा, प्रेम, परोपकार, अहिंसा, क्षमाशिलता, शीलसंवर्धन, यांसारख्या नैतिक बाबींवर बौद्ध धर्मात भर देण्यात आला. याचा वैदिक हिंदू धर्माच्या नियतिवादावर परिणाम झाला. यामुळेच बौद्ध धर्म हा अगदी भिन्न असलेला स्वतंत्र व प्रभावशाली धर्म आहे.

**आंतरिक शांती:-**

मनाच्या बहुविध कार्यांच्या अभ्यासावर आधारित - चिंतनशील मन, परस्परावलंबी आणि एकमेकांशी जोडलेले मानवी नातेसंबंध आणि दयाळू मन - एक समन्वयात्मक मार्गाने - यासह वास्तविकतेचे आकलन यावर आधारित हे एक गैर-द्वैतवादी शांती म्हणून समजले पाहिजे.बौद्ध धर्म शांतता आणि अहिंसेची सुवार्ता आहे. अहिंसा हा राग, वैर, आनंद आणि वेदना या सर्व उत्कटतेपासून मुक्त जीवनाचा मार्ग आहे. खरी शांतता अहिंसेतून निर्माण होते जी एक तर्कशुद्ध आणि पराक्रमी शक्ती आहे.

**निष्कर्ष:-**

अर्थपूर्ण आणि परिपूर्ण जीवन जगण्यासाठी बौद्ध धर्म एक गहन आणि व्यावहारिक तत्त्वज्ञान देते. दुःखाचे स्वरूप, मुक्तीचा मार्ग आणि सजगता आणि करुणेची जोपासना यावरील शिकवणी जगभरातील लाखो लोकांना प्रेरणा आणि

मार्गदर्शन करत आहेत.बौद्ध धर्माच्या तत्त्वांचा स्वीकार करून, व्यक्ती जीवनातील आव्हानांमध्ये सांत्वन, शहाणपण आणि आंतरिक शांती मिळवू शकतात. जग गुंतागुंतीच्या समस्यांशी झुंजत असताना, बौद्ध धर्माचे कालातीत शहाणपण आधुनिक युगाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी एक संबंधित आणि दयाळू दृष्टीकोन प्रदान करते.सत्य हे आहे की बौद्ध धर्म हा धर्म आणि तत्वज्ञान दोन्ही आहे आणि त्याच्या शिकवणीचे दोन पैलू सापेक्ष शांततेत अस्तित्वात असू शकतात. बौद्ध तत्त्वज्ञानामध्ये स्वारस्य असलेले लोक जोपर्यंत बुद्धाच्या शिकवणींमध्ये अधिक अलौकिक घटक आहेत हे नाकारण्याचा प्रयत्न करत नाहीत तोपर्यंत ते विचारांची शाळा म्हणून त्याचा सहज अभ्यास करू शकतात. बौद्ध भिक्खू, मंदिरे आणि धार्मिक उत्सव एका कारणासाठी अस्तित्वात आहेत. जगभरातील लाखो लोकांसाठी समारंभ आणि विधी हे बौद्ध धर्माचे अत्यंत महत्त्वाचे पैलू आहे. परंतु तितकेच, नास्तिक व्यक्तीला बुद्धाच्या शिकवणींचे पालन करणे देखील शक्य आहे, तसेच उपासनेची कृत्ये करणे बंधनकारक नाही.

**संदर्भ**:-

1)https://hi.quora.com> Buddha darshan.

2)https://plato.stanford.edu/buddha.

3) Namaste India Trip.com.

4) https://www3.gmu.edu> vol21 2.Study.com

5)https://wikipedia.org

6) Study Buddhism.>https://studybuddhism.com.

7) Maluka IAS Academy https://malukalas.com>blog.

8) The Indian express > lifestyle.

9)17 सप्टेंबर 2022 • रॅचेल ॲशक्रॉफ्ट, पीएचडी 16 व्या शतकातील तत्त्वज्ञान एमएससी तुलनात्मक साहित्यबौद्ध धर्माच तत्वज्ञान.

10)www.historystudy. com

11) जेफ विल्सन. बौद्ध धर्मात संसार आणि पुनर्जन्म (ऑक्सफर्ड: ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, 2010)

# ब्राह्मणेतर चळवळीत केशवराव जेधे व दिनकरराव जवळकर यांचे योगदान

**डॉ. बाळासाहेब काळे**
इतिहास विभागप्रमुख,
इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, भिगवण

विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात महाराष्ट्राच्या समाजजीवनाला वेगळे वळण देण्यास कारणीभूत झालेल्या अनेक चळवळींपैकी एक महत्त्वाची सामाजिक चळवळ म्हणून ब्राह्मणेतर चळवळीचा उल्लेख करावा लागेल. ब्राम्हणेतर जातींनी एकत्र येऊन ब्राह्मण जातीच्या धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक, प्रशासकीय, राजकीय आणि आर्थिक वर्चस्वाच्या विरोधात जो लढा उभारला त्यास ब्राह्मणेतर चळवळ म्हणून ओळखले जाते. इ.स. 1917 ते इ.स. 1938 हा ब्राह्मणेतर चळवळीचा कालखंड मानला जातो. महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर चळवळीचे प्रकटीकरण इ.स. 1917 च्या सुमारास झाले.

ब्राह्मणेतर चळवळीचे बीज हे महात्मा जोतीराव फुले यांनी सुरू केलेल्या 'सत्यशोधक' चळवळीत[1] आणि कोल्हापूर संस्थानचे छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या 'वेदोक्त चळवळीत' पेरले असल्याचे आपल्या लक्षात येते. 20 व्या शतकाच्या सुरुवातीची महाराष्ट्रातील परिस्थिती विचारात घेता, उच्चवर्णीयांच्या वर्चस्वाला विरोध करून त्यांना आव्हान देणे सोपी गोष्ट नव्हती. परंतु सत्यशोधक चळवळ ही ब्राह्मणशाहीच्या मक्तेदारीविरुद्ध आणि अन्याया विरुद्ध संघर्ष करणारी महाराष्ट्रातील ब्राह्मणेतरांची पहिली चळवळ होती.[2] तर शाहू महाराजांनी सुरु केलेली वेदोक्ताची चळवळ ही ब्राह्मण शाहीच्या सर्वंकष जुलमी सत्तेविरुद्‌ध संघर्ष करणारी ब्राह्मणेतरांची दुसरी चळवळ होती. शाहू महाराजांनी ब्राह्मणेतर चळवळीच्या कार्यकर्त्यांना प्रेरणा देण्यापासून ते त्यांना सर्व प्रकारची मदत करण्यापर्यंत चळवळीची जबाबदारी उचललेली दिसते. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रातून बहुजन समाजातील अनेक कार्यकर्ते या चळवळीकडे आकर्षित झाले. भास्करराव जाधव, अण्णासाहेब लठ्ठे, केशवराव जेधे, दिनकरराव जवळकर, मुकुंदराव पाटील, प्रबोधनकार ठाकरे असे अनेक कार्यकर्ते ब्राह्मणेतर चळवळीचे कार्य मोठ्या जोमाने व उत्साहाने करू लागले. ब्राह्मणेतर चळवळीचा महाराष्ट्रात विविध भागांत विस्तार घडवून आणण्यात वरील कार्यकर्त्यांनी महत्त्वाचा वाटा उचलला होता. यांमध्ये केशवराव जेधे व दिनकरराव जवळकर यांचे कार्य उल्लेखनीय आहे.

**ब्राह्मणेतर चळवळीत केशवराव जेधे व दिनकरराव जवळकर यांचे योगदान :**

केशवराव (तात्यासाहेब) मारोतराव जेधे (1896 ते 1959) व दिनकरराव जवळकर (1898 ते 1932) हे दोन जिवाभावाचे मित्र इ.स. 1920-1930 या दहा वर्षाच्या काळात ब्राह्मणेतर चळवळीला लाभले. महाराष्ट्रातील बहुजन समाजातील लोकांना या दोघांनी राजकारणाचे आणि शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. या दोघांनी राजकीय डावपेच खेळून बहुजन समाजाचे हित जोपासण्याचा प्रयत्न केला. ब्राम्हणेतर चळवळ गतिमान करण्याचा प्रयत्न या दोघांनी केला.[3] जेधे-जवळकरांनी संपूर्ण महाराष्ट्रभर फिरून ब्राह्मणेतर पक्षामध्ये सभासद गोळा केले.[4] पुणे शहर हे सनातन्यांचा बालेकिल्ला मानला जात होता. लोकमान्य टिळक व त्यांच्या अनुयायांवर या बालेकिल्ल्यातूनच 'हल्ला बोल' करण्याचा चंग ब्राह्मणेतर नेत्यांनी बांधला होता. जेधे-जवळकर जोडीभोवती निर्माण झालेल्या वलयांमुळे बहुजन समाजातील तरूण वर्ग या चळवळीकडे मोठ्या संख्येने आकर्षित झाला होता. प्रतिपक्षाला जशास तसे उत्तर देण्याच्या त्यांच्या नीतीमुळे ब्राह्मणेतर चळवळीचा पुण्यात वेगळा दरारा उत्पन्न झाला?[5] केशवराव जेधे पुण्यातील बहुजन समाजाच्या प्रमुख नेत्यांपैकी एक होते. ब्राह्मणेतर तरूणांची मजबूत संघटना त्यांनी पुण्यात बांधली होती. दिनकरराव जवळकर यांनी शाहू महाराजांच्या प्रोत्साहनाने कोल्हापुरात 'तरुण मराठा' हे वृत्तपत्र सुरू केले.[6] जवळकरांची लेखणी अतिशय प्रतिभाशाली व तिखट होती. या पत्राचे संपादक म्हणून त्यांना चांगलीच प्रसिद्धी मिळाली. ब्राह्मणेतर चळवळीतील जेधे-जवळकरांचे योगदान पाहायचे म्हटल्यास पुढील घटनांचा उल्लेख करणे अत्यावश्यक ठरते.

**छत्रपती मेळा :**

जेधे-जवळकरांची जोडी जमल्यानंतर ब्राह्मणेतर चळवळीचे कार्य मोठ्या जोमोन पुढे चालवण्याचे दृष्टीने हालचाली सुरू झाल्या. पुण्यात त्या काळी सन्यातन्यांचा खूपच प्रभाव होता. लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव

सुरू केले. या उत्सवामध्ये विविध गुणदर्शनासाठी मेळे भरत असत. अशा मेळयामध्ये सन्मित्र समाज मेळा, रणसंग्राम मेळा, बालसंगीत मेळा, स्वातंत्र्य मेळा असे काही महत्त्वाचे मेळे होते?[7] या मेळयामधून सनातनी लोक नेमस्त, सुधारक, कनिष्ठ जाती यांच्यावर टीका करत. एवढेच नव्हे तर अतिशय घाणेरड्या भाषेत तसेच अश्लील भाषत निंदानालस्ती केली जाता असे. पुण्यातील सन्यातन्यांच्या प्रचाराला त्यांच्याच भाषेत उत्तर देण्याकरता केशवराव जेधे व दिनकरराव जवळकर यांनी आपला 'छत्रपती मेळा' सुरू केला.[8] खालील 'पदे' पाहिल्यास सनातनी लोकांची टीका करण्याची पातळी कोणत्या थराला गेली होती हे लक्षात येते.

बिस्कुट उष्टी त्वा खावी । साहेबी लक्तरे ल्यावी ।
सदा सर्वदा लाळ घोटावी । रात्रंदिनी जी जी करावी ।
तुज मिळेल म्हारीण कोणी । वाकडी जी सात ठिकाणी ।
काळूंद्री घुबडावाणी। तू राजा मग ती राणी ।[9]

सभ्यतेच्या सर्व मर्यादा ओलांडणारी असली पदे बरीच लोकप्रिय झाली होती. परंतु सनातन्यांच्या अशा नीच दर्जाच्या प्रचाराला तोंड (प्रत्युत्तर) देताना, सन 1922 च्या गणेशोत्सव कार्यक्रमात छत्रपती मेळयाने धमाल उडवून दिली. यामध्ये त्यांनी ब्राह्मणास टीकेचे लक्ष बनविले लोकमान्य टिळकांनाही टीकेचे लक्ष बनविले होते. 'अति बेरडा लुच्या बेटा', 'ओळखा कोण हा नकटा' अशा शब्दांत त्यांची संभावना करण्यात येत असे.

रावबाजीच्या मुर्खपणाने गेली पेशवाई।
व्हा बंधूंनो सावध आता, गाडा भटशाही।
भट बोकड मोठा । जातीवर जातोय बेटा।
जेथे जेथे भट हे येती; तट तेथे पडती।
ही भटे माजली फार। खऱ्याला कोण जगी पुसणार।।[10]

यांसारखी पदे छत्रपती मेळयात म्हटली जात, मेळयांतील अशा पदांमुळे दोन्ही बाजूंनी ताळतंत्र सोडले होते. त्यामुळे 1922 नंतर पुणे येशील सामाजिक वातावरण अतिशय गढूळ बनले होते.

**शिवस्मारकाचा वाद :**

ग्वाल्हेरचे खासेराव पवार आणि बडोदा येथील खासेराव जाधव यांनी इ.स. 1917 मध्ये शिवस्मारकाची योजना प्रथम मांडली. सुरुवातीपासूनच शिवस्मारक ही संस्था मराठ्यांपुरती मर्यादीत असावी की, महाराष्ट्रातील सर्वच मागास जातीसाठी असावी याबाबत मतभेद होते. शिवस्मारकाची सूत्रे ग्वाल्हेरचे माधवराव शिंदें यांच्याकडे गेली. त्यांनी शिवस्मारक समितीत सर्व जातींचा समावेश करण्याचे ठरविले. गोपाळराव देवधर हे शिवस्मारक समितीचे चिटणीस् झाले, तर सांगलीचे राजेसाहेब पटवर्धन समितीचे सदस्य झाले.[11] अशा प्रकारे शिवस्मारक समितीची सूत्रे ब्राह्मणाच्या हातात गेली. त्यामुळे संकल्पीत शिवस्मारक हे शिवाजी मराठा सोसायटीच्या मालकीचे असावे. त्यामध्ये मरोठतरांचा हस्तक्षेप नसावा असे दिनकरराव जवळकर, पालकर बंधू, झेंडे, बाबूराव व केशवराव जेधे यांनी मत व्यक्त केले. 1923 मध्ये दिनकरराव जवळकरांनी 'शिवस्मारक पुराण' ही छोटी पुस्तिका प्रकाशित केली.[12] त्यात त्यांनी आपल्या मताला विरोध करणाऱ्यांवर टीका केली यात छत्रपती पद्य संग्रहात जवळकरांनी ब्राह्मण, भट व लोकमान्य टिळक, संत रामदास यांच्यावर टीका केली.

शिवबांच्या गुरूपती शोभते । जिजाऊ माता ती देवी।
भगवा भंगड गुरु बनविती| नसताना आधार ||[13]

असे जवळकरांनी परखडपणे म्हट्ले होते. पुढे छत्रपती शिवाजी महाराजांचा जगातील पहिला पुतळा (1928) पुण्यात बसविण्यात आला.

**महात्मा फुले पुतळा प्रकरण :**

केशवराव जेधे हे पुणे नगरपालिकेचे सदस्य होते. डॉ. य. दि. फडके 'केशवराव जेधे' या ग्रंथात म्हणतात, 'विद्वत्ता, व्यासंग, बुद्धिवैभव, वक्तृत्व, मुत्सद्दीपणा, योग्य माणसांचा वापर करण्याचे चातुर्य, दूरदृष्टी वगैरे गुणांच्या बाबतीत केशवरावांच्या पेक्षा वरचढ असलेले अनेक नेते दाखवता येतील. मात्र स्वार्थत्याग प्रामाणिकपणा, शुद्ध चारित्र्य, दीन-

दलितांविषयीची कणव अशा अनेक गुणांच्या दृष्टीने अन्य थोर नेत्यांच्या व केशवरावांच्या जीवनकायर्याचा विचार केल्यास केशवराव जेधे यांच्यात मुळीच कमतरता नव्हती.'[14] याचा उल्लेखा मुद्दाम येथे करावा वाटतो. कारण त्यांनी या प्रकरणासाठीची केलेली धडपड अशीच होती. ब्राह्मणेतर चळवळीच्या वाढत्या प्रभावामुळे पुण्यातील उच्चवर्णीयांत चिंतेचे वातावरण पसरले होते. सन 1924 मध्ये पुणे नगरपालिकेने शहरात दोन प्रमुख ब्राह्मण व्यक्तींचे लोकमान्य टिळक आणि चिपळूणकर यांचे पुतळे उभारले. या पार्श्वभूमीवर सन 1925 मध्ये ब्राह्मणेतर गटाचे नेते केशवराव जेधे यांनी पुणे शहरातील योग्य सार्वजनिक ठिकाणी महात्मा जोतीराव फुले यांचा पुतळा बसवण्याचा प्रस्ताव मांडला. या प्रस्तावाला ब्राह्मण गटाने तीव्र विरोध केला. भाला हे वृत्तपत्र चालवणारे एक प्रमुख ब्राह्मण वकील बी. बी. भोपटकर यांनी युक्तिवाद केला की 'जोतीराव फुले यांनी त्यांचे सार्वजनिक स्मारक उभारण्यासाठी पुण्याची काय सेवा केली? ते सार्वजनिक व्यक्ती नव्हते तर एक सांप्रदायिक होते.'[15] पुणे शहरात नगरपालिकेच्या वतीने महात्मा जोतीराव फुले यांचा पुतळा उभारण्यावरून वाद सुरू झाला. टिळक पक्षीयांच्या या विरोधामुळे ब्राह्मणेतरांमध्ये संतापाची लाट उसळली. यामध्ये केशवराव जेधे आणि दिनकरराव जवळकर यांनी प्रचंड संताप व्यक्त केला.

**पर्वती व महाडच्या सत्याग्रहातील सहभाग :**

पुणे येथील पर्वती मंदिरात अस्पृशांना प्रवेश मिळावा म्हणून झालेल्या चळवळीत केशवराव जेधे सहभागी झाले होते. सत्यशोधक चळवळीचे पुढारी केशवराव जेधे आणि दिनकरराव जवळकर यांनी एक जाहीर पत्रक काढून डॉ. आंबेडकरांच्या सत्याग्रहास पाठिंबा दिला होता?[16] डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना लिहिलेल्या पत्रात जेधे - जवळकरांनी म्हटले की, अस्पृश्यांच्या बरोबर आम्ही येण्यास तयार आहोत. तसेच त्यांनी महाडला सत्याग्रह कसा करावा यासंबंधी योजना तयार करून दिली. महाडचा सत्याग्रह अतिशय जोरदार चालला परंतु 'महाडच्या चवदार तळयासाठीच्या दाव्याचा निकाल लागेपर्यंत सत्याग्रह तहकूब करण्यात यावा असा सल्ला कुलाबा जिल्ह्याचे कलेक्टर यांनी दिला. ब्राह्मणेतर पक्षाचे पुढारी केशवराव जेधे व दिनकरराव जवळकर परिषदेला होते.[17] त्यांनीही या सल्ल्यास होकार दिला. पुण्याच्या पर्वती मंदिराच्या सत्याग्रहासंबंधी धनंजय कीर आपल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या ग्रंथात म्हणतात की, आंबेडकरांनी आपल्या लेखात 'पुरोहित वर्गाच्या मगरमिठीतून भारताची सुटका कण्यासाठी काही उपाययोजना आखून पुरोहित वर्गाला शुद्ध करण्याचा कार्यक्रम जो उदात्त व शौर्यशाली आहे त्यास हातभार लावतील अशी आशा आहे.[18] याच सुमारास दलित पुढाऱ्यांनी पुण्यातील वा. वि. साठे, रानडे, ग. ना. कानिटकर, केशवराव जेधे व न. वि. गाडगीळ या स्पृश्य नेत्यांनी विचारविनिमय करून पुण्याच्या प्रसिद्ध पर्वतीच्या मंदिरातील दैवताची पूजाअर्चा करण्याचा अस्पृशांचा हक्क प्रस्थापित करण्याकरिता 13 ऑक्टोबर 1929 ला सत्याग्रह सुरु केला होता.

**देशाचे दुश्मन खटला प्रकरण :**

दिनकरराव जवळकरांनी 'देशाचे दुश्मन' नावाचे पुस्तक सन 1925 मध्ये लिहिले, केशवराव जेधे यांनी ते प्रकाशित केले व आर. एन. लाड यांनी ते छापले. त्याची प्रस्तावना वकील केशवराव बागडे यांनी लिहिली. या पुस्तकाचा आशय विष्णुशास्त्री चिपळूणकर व लोकमान्य टिळक हे देशाचे शत्रू आहेत, असा होता. तसेच या पुस्तकांत ब्राह्मणांना उद्देशून केलेले 'ब्रह्मलोकोत्पन्न लफंगे', 'कृतघ्न सैतान', 'भटोबा', 'विषारी अवलाद', 'फड्या निवडुंगाची जात' यांसारखे शब्दप्रयोग करण्यात आले. हे पुस्तक प्रकाशित झाल्यामुळे ब्राह्मण समाज भडकला. दि. 17 सप्टेंबर 1925 रोजी शिवाजी मंदिरात सभा होऊन जेधे व जवळकरांचा निषेध करण्यात आला?[19] टिळक पक्षाने पुण्यातील प्रसिद्ध वकील बी. बी. भोपटकर यांना वकीलपत्र दिले होते. जेधे जवळकरांवर खटले चालवले गेले. खटल्याचा निकाल लागला व जवळकरांना एक वर्षाची साधी कैद व 250 रुपये दंड झाला. जेधे व बागडे यांना सहा महिन्यांची शिक्षा व 100 रूपये दंड ठोठावला. पुढे या खटल्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जवळकर-जेधे यांचे वकीलपत्र घेऊन सर्व आरोपी निर्दोष ठरविले होते.

**जेधे-जवळकर यांच्यात फूट :**

समतेच्या तत्त्वज्ञानावर आधारलेल्या नवसमाजाच्या निर्मितीचा जेधे-जवळकरांनी प्रयत्न केला.[20] परंतु ब्राह्मणेतर चळवळीच्या दृष्टीने अत्यंत दुर्दैवी म्हणता येईल अशी गोष्ट म्हणजे जेधे व जवळकर यांच्यात निर्माण झालेली फाटाफूट, ब्राह्मणेतर चळवळीच्या निरनिराळ्या नेत्यांमध्ये अनेक मुद्यांवर मतभेद होते. त्या मतभेदांमुळे चळवळीची काही प्रमाणात हानी अवश्य झाली. तथापि, जेधे व जवळकर यांच्यातील मतभेदांमुळे ब्राह्मणेतर चळवळीचे नुसते नुकसानच झाले असे

नाही तर, तिचे भवितव्यच अंधकारमय झाले. 1930 ते 1939 या कालखंडात ब्राह्मणेतर पक्षाचे विघटन झाले.[21] त्यामुळे जेधे-जवळकर यांच्यातील फुटीचे परिणाम ब्राहमणेतर चळवळीवर दूरगामी परिणाम घडून आले.

ब्राह्मणेतर चळवळीचा पाया शाहू महाराजांनी उभारला व त्याला जोमाने पुढे चालवण्याचे कार्य केशवराव जेधे आणि दिनकरराव जवळकर या जोडगोळीने केले. जेधे-जवळकर यांनी ब्राह्मणेतर चळवळींतून ब्राह्मणांना व त्यांच्या अन्यायास चांगलाच प्रतिकार केलेला दिसतो, सर्वसामान्य जनतेला त्यांच्या अधिकारांची जाणीव करून दिली, सामाजिक व राजकीय क्षेत्रात पुढे येण्यास प्रोत्साहन दिले. परंतु यांच्यातील मतभेदांमुळे बहारास आलेल्या या चळवळीस कोमेजायलाही वेळ लागला नाही हे सत्य नाकारता येत नाही. अशाप्रकारे विसाव्या शतकात महाराष्ट्राच्या सामाजिक व राजकीय जीवनात जे गुणात्मक बदल घडून आले त्याचे बरेचसे श्रेय ब्राह्मणेतर चळवळीतील केशवराव जेधे आणि दिनकरराव जवळकर यांच्या कार्यास द्यावे लागेल.

**संदर्भ:**


1. सरदार, गं. बा. ***महात्मा फुले व्यक्तित्व आणि विचार***, ग्रंथली प्रकाशन, मुंबई, 1981, पृ. 79.
2. कीर, धनंजय, ***महात्मा जोतीराव फुले,*** पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, 1973, पृ. 134.
3. डॉ. अनिल कठारे, ***आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास (1818 ते 1960),*** विदया बुक पब्लिशर्स, औरंगाबाद [संभाजीनगर], द्वितीय आवृत्ती, 2013, पृ. 456.
4. कित्ता.
5. प्रा. वसंत जाधव, ***आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास,*** विद्या प्रकारान, नागपूर, 2005, पृ. 185.
6. प्रा. व्ही. बी. पाटील, ***विसाव्या शतकातील महाराष्ट्रामधील समाजसुधारणेचा इतिहास,*** के'सागर पब्लिकेशन्स्, 2004, पृ. 92.
7. डॉ. बी. एन्. सरदेसाई, ***आधुनिक महाराष्ट्र (1818-1960),*** फडके प्रकाशन, कोल्हापूर, 2000, पृ. 125.
8. प्रा. वसंत जाधव, पूर्वोक्त, पृ. 185.
9. प्रा. व्ही. बी. पाटील, पूर्वोक्त, पृ. 93.
10. कित्ता. पृ. 94.
11. डॉ. अनिल कठारे, पूर्वोक्त, पृ. 406.
12. डॉ. एस. एस. गाठाळ, ***आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास (1818 ते 1960),*** कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, तिसरी आवृत्ती, 2013, पृ. 319.
13. कित्ता, पृ. 320.
14. य. दि. फडके, ***विसाव्या शतकातील महाराष्ट्र खंड - 4,*** श्री विदया प्रकाशन, पुणे, 1983, पृ. 251.
15. प्रा. वसंत जाधव, पूर्वोक्त, पृ. 186.
16. भालचंद्र फडके, ***डॉ. बाबासाहेब आंबेडकर***, श्री विदया प्रकाशन, पुणे, 1985, द्वितीय आवृत्ती, 2004, पृ. 91.
17. नलिनी पंडित, ***आंबेडकर***, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, 1996, पृ. 20.
18. धनंजय कीर, ***डॉ. बाबासाहेब आंबेडकर,*** पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, 1966, सहावी आवृत्ती, 1989, पृ. 144-145.
19. प्रा. वसंत जाधव, पूर्वोक्त, पृ. 186.
20. ह. म. घोडके, ***महाराष्ट्रगाथा भाग - 2***, राजहंस प्रकाशन, पुणे, 2005, पृ. 58.
21. य. दि. फडके, पूर्वोक्त, पृ. 252.

# शिवकालीन शेतीव्यवसाय व जलव्यवस्थापन

**डॉ. सुभाष जी. बेंजलवार**
इतिहास विभागप्रमुख,
महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा

प्राचीन काळापासून शेती व्यवसाय हाच भारतीयांच्या अर्थार्जनाचा मुख्य केंद्रबिंदू राहिलेला होता. शिवकाळातही आर्थिक जीवनाचा मुख्य स्रोत शेती हाच होता. शेती व शेती आधारित उद्योग हेच लोकांच्या आर्थिक जीवनाचा मुलस्रोत होते. तर शेतसारा हा शासनाच्या उत्पन्नाचा केंद्रबिंदू होता. परंतु शेती व्यवसाय आणि शेतसारा वसुली या संदर्भात काही एक सुधारणा केल्या पाहिजेत असा विचार शिवकाळापूर्वी राज्यकर्त्यांनी फारसा केलेला दिसत नाही. परंतु शिवकाळात मात्र याविषयी बरेचसे बदल झाले. शिवकाळात जमिनीची व त्यावर आधारित उत्पादन वाढविण्याचे प्रयत्न झाले. जमिनीवरील उत्पादन वाढविण्यासाठी आवश्यक असणारे पाणी साठे वाढविण्याचे प्रयत्न झाले. जलव्यवस्थापन करून जलसिंचनाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. जमीन हेच लोकांच्या आर्थिक उपजिविकेचे साधन होते तर महसूल हा शासनाच्या मुळ आर्थिक स्रोत होते. म्हणजेच जमिन महसूल हा शासनाच्या उत्पन्नाचा मुख्य घटक होता. त्यामुळेही जमीन म्हणजेच शेती व्यवसायाला तत्काळात असाधरण असे महत्व होते. शिवकालीन महाराष्ट्रात बहुतांश खेडी होती. खेडी हीच आर्थिक व सामाजिक व्यवहाराच केंद्रबिंदू होती. खेडी ही आर्थिकदृष्टयामहत्वाची मानली जात असत. त्यामुळे खेड्यांना अग्रस्थान होते.

जमिन हे शिवकालीन आर्थिक जीवनाचे मुख्य साधन असल्यामुळे स्वतःच्या मालकीची जमीन असणे, शेती व्यवसाय करणे हे सामाजिक व अर्थिकदृष्टया प्रतिष्ठेचे लक्षण मानले जात असे. शिवाजी महाराजांच्या पूर्वी राजकीय अस्थिरतेमुळे शेती व्यवसायाला अवकळा प्राप्त झाली होती. अशा परिस्थितीत शिवाजी महाराजांनी पुणे- सुपे परगण्यातील शेती व शेतक-यांच्या अवस्थेत सुधारणा करण्याचे काम केले. स्वराज्याचा प्रारंभिचा प्रदेश डोंगराळ आणि खडकाळ असल्यामुळे येथील शेतजमीनीचे प्रमाण कमी होते. असे असले तरी शिवकाळात शेतजमिनीसंदर्भात अनेक सुधारणा करण्यात आल्या.

**जमिनीचे स्वरूप व प्रकार:-**

'शिवकाळात गावच्या जमिनीचे मुख्यतः दोन भाग असत. गावाच्या वसाहतीची जी जमिन असे त्यास 'पांढरी' असे म्हणत असत. या जमिनीवर गावची वसाहत बसवलेली असे. दुसऱ्या जमिनीच्या प्रकाराच काळी असे म्हणत असत. अर्थात ही जमिन म्हणजेच नांगराची जमिन होय. या जमिनीलाच 'वगळी' 'काळी आई' असेही म्हटले जाई. या काळी जमिनीचे प्रत्यक्ष लागवडीखाली असलेली जमिन आणि पडीक जमीन असे साधारणपणे दोन प्रकार प्रचलित होते."[1] लागवडीखालील जमिनीत प्रामुख्याने खरीप आणि रब्बी अशा दोन हंगामात पिके घेतली जात. लागवडीखाली नसलेली पडिक जमिनीस नापीक वा वांजट जमीन असे म्हणत असत. अशा जमिनीचा उपयोग जनावरांना चरण्यासाठी, गावच्या यात्रेसाठी किंवा बाजार भरण्यासाठी केला जात असे. पडीक जमिनही बऱ्याचदा लागवडीखाली आणण्याचा प्रयत्न करत असत हे काम पाटील, कुलकर्णी, देशपांडे व चौगुले हे वतनदार करीत असत. गावातील उपरी लोकांना कसण्यासाठी पडीक जमीन काही मुदतीने दिली जात असे. त्यामुळे ती जमिन सतत लागवडीखाली आणण्याचे प्रयत्न होत असत. सर्व जमिनीची मालकी हक्क गावकऱ्यांना दिले जात. याशिवाय तत्कालात काही जमिनी इनाम म्हणूनही दिली जात असे.

सतराव्या शतकामध्ये धर्माचे लोकजीवनात विशेष स्थान होते. त्यामुळे अनेक 'धार्मिक संस्थाना अथवा धार्मिक वृत्तीने आचरण करणाऱ्या व्यक्तींना काही जमिन इनाम द्यायची प्रथा प्रचलित होती. त्या जमिनीतील उत्पन्नातून अशा संस्थांची देखरेख केली जाई. ही इनामे वंश परंपरागत असत. शिवकाळातही अशा प्रकारची बरीच धार्मिक संस्थांना इनाम जमीन दिल्याचे उल्लेख आढळतात. या धार्मिक इनामांशिवाय काही सनदी इनामेही देण्यात येत असत."[2] राजसत्तेच्या कार्यात मोलाचे योगदान दिल्याच्या बदल्यात मी सनदी इनामे देत असत. सनदी इनाम हे राजसत्तेने फर्मान काढुन निर्माण केलेले असे अशा इनामांना काही वेळा संपूर्ण शेतसारा माफ केला जात असे तर काही वेळा नाम मात्र शेतसाराही भरावा

लागत असे. 'काही इतिहासकारांच्या मते वतन हेही एक प्रकारचे इनामच होते. वतनदारांना त्यांच्या सेवेच्या बदल्यात जी जमिन दिली जात असे तिस वतन जमिन असेही म्हणत असत.[3] शिवकाळात राजालाच अशी इनामे देण्याचा अथवा ती चालू ठेवण्याचा अधिकार होता तसाच ती रद्द करण्याचा अथवा जप्त करण्याचाही अधिकार होता.

शिवकाळात आर्थिक जीवन शेती व्यवसायाशीच पूर्णपणे निगडीत होते उद्योग धंदे, व्यापार आणि इतर व्यवसायांना आर्थिक व्यवस्थेत दुय्यम दर्जाचे स्थान होते. शेती व्यवसाय हाच मुख्य व्यवसाय असल्याने जमिनीला काळी आई असे म्हणत असत. 'शेतीच्या उत्पन्नावरच गावचे अधिकारी, मिरासदार, बलुतेदार, उपरे यांचे जीवन अवलंबुन असे शेती व्यवसाय हा अंत्यत कष्टाचा होता. त्यामुळे अधिक मनुष्यबळाची गरज भासत असे घरची कर्ती माणसे स्वराज्याच्या कार्यात गुंतल्यामुळे शेती व्यवसायासाठी पुरेशे मनुष्यबळ प्रारंभिच्या काळात उपलब्ध होत नव्हते. तेंव्हा मनुष्यबळाची मोठी गरज शेतकऱ्यांना असे. प्रत्यक्ष शेतीचा व्यवसाय करणाऱ्यास कुणबी, मुजेरी, रया, कुळवाडी, अशा विविध नावांनी संबोधले जाई. कुणबी हा शब्द 'कुळंबी' अथवा कुटुंबिक या शब्दापासून तयार झाला असून त्याचा अर्थ शेतकरी अथवा शेती व्यवसायातील एक व्यक्ती असा होतो."[4]

शिवकाळात शेती व्यवसायाच्या गरजा लक्षात घेऊन त्यांना बैलजोडी, अवजारे, बि बियाणे इत्यादीच्या खरेदीसाठी आर्थिक मदत दिली जात असे. शेतकऱ्यांना अन्न धान्याची आवश्यकता भासल्यास सरकारी खजिन्यातून धान्य देण्याची व्यवस्थाही शिवकाळात केली होती. शेती आणि शेतीव्यवसायाला अभय व संरक्षण देण्यासंदर्भातील अनेक पत्रांमधील शिवाजी महाराजांचे आदेश उल्लेखनीय आहेत. कोणत्याही कारणातून शेती व्यवसायाकडे दुर्लक्ष होऊ नये रयत गाव सोडून जाऊ नये याबाबत सरकारकडून खबरदारी घेतली जाई. लावणीच्या काळात शेतकऱ्याला संरक्षणाची विशेष गरज भासत असे. अशावेळी शेतकऱ्याला संरक्षण देण्याचे काम व कसल्याही प्रकारचा त्रास शेतकऱ्यांना देऊ नये असा सरकारचा आदेशच असायचा शेती व्यवसायाबद्दलची शिवाजी महारांजाची तळमळ यामुळेच 'रयतेचा राजा' ही बिरुदावली त्यांना अधिक शोभून दिसते.

शिवकाळात खरीप व रब्बी हंगामात येणारी पिके घेतली जात असत. प्रामुख्याने घरगुती उदर निर्वाहाची पिके व प्रक्रियेनंतर उपयोगात आणल्या जाणाऱ्या वस्तुची अर्थात विकीसाठीची नगदी पिके घेतली जात असत. यामध्ये शेंग, कापूस, करडी, मोहरी इत्यादी पिकांचा समावेश होत असे. या पिकांच्या विकीतून शेतकऱ्यांच्या हात्ती नगद पैसा येई व त्यातून इतर गरजा भागवल्या जात असत.

**शिवकालीन सिंचनव्यवस्था -**

शिवकालीन बहुतांश शेती ही निसर्गाच्या मेहरबानीवरच अवलंबुन होती. पावसाची अनिश्चितता, नेहमीचा युध्दाचा प्रसंग, आर्थिक मदतीचा अभाव इत्यादी कारणांमुळे महाराष्ट्रातील शेती व्यवसाय व शेतकरी हे दोन्ही मागासलेल्या अवस्थेत होते. पाऊस वेळेवर आणि आवश्यक तेवढा पडला नाही तर गावाला दुष्काळाची अवकळा येत असे. हे शिवाजी महाराजांनी पाहिले होते. म्हणून शेतीला पाणी पुरवण्यासाठीच्या काही सुविधा तत्कालात घडवून आणल्या. शेती व्यवसायाला पाणीपुरवठा करणे हाच शेती सुधारण्याचा मार्ग त्या काळात उपलब्ध होता.

शेती ही मोठ्या प्रमाणात निसगीच्या मेहरबानीवर अवलंबुन असल्यामुळे जिरायत जमिनीचे प्रमाण फार मोठे होते. पाऊस पडला नाही, धान्य पिकले नाही तर सरकारी तिजोरित जमा होणाऱ्या साऱ्यावरसुध्दा त्याचा आपोआप परिणाम पडत असे. त्यामुळे जिरायत जमिनीला 'बागायत' करण्याचे प्रयत्न शिवकाळात झालेले दिसून येतात. 'जमिनीला पाणी पुरवण्याचा एक

जुना प्रकार म्हणजे शेतात विहीर खणने हा होय. विहीर असलेल्या शेतांना 'मोटस्थळ' असे म्हणत असत मोटस्थळ म्हणजेच शेतात विहीर खणून मोटेच्या सहाय्याने जमिनीला पाणी पुरवणे."[5] परंतु विहिरीच्या पाणी पुरवठ्यावरही काही मर्यादा पडत असत. प्रत्येक शेतात विहिर खणने आणि खणली तरी त्या प्रत्येक विहिरीत मुबलक पाणी मिळणे शक्य नव्हते. त्यामुळे गावातील विहिरींची संख्या ही मर्यादीत होती. पुणे परगण्यातील मौजे खोर या गावी बागायतीसाठी जुन्या फक्त तीन विहिरी होत्या असा उल्लेख एका पत्रात आढळतो.

'शिवकाळात जमिनीला पाणी देण्याची आणखी एक पध्दत अस्तित्वात होती या पध्दतीला 'पाटस्थळ' असे म्हणत असत. कालव्यांच्या, पाटांच्या सहाय्याने शेतीला पाणीपुरवठा करण्याची पध्दत म्हणजेच पाटस्थळ होय. अशा पध्दतीने

ज्या जमिनीला पाणी पुरवले जाई त्यास पाटस्थळ असे म्हणत असत. बंधारे बाधंणे, कालवे खोदणे आणि त्यांची देखभाल करणे ही सामान्यतः गावच्या लोकांची जबाबदारी मानली जात असे.[6] बहुतांश गावकरी छोटी बांध घालून पावसाचे अथवा नदीचे पाणी अडवून ठेवीत गावाशेजारून वाहणाऱ्या नदी-नाल्यांवर ज्यांना पाटाच्या पाण्याचा उपयोग होतो, असे सारे शेतकरी परस्परांच्या सहकार्याने हे काम करित होते. या पाण्याच्या वाटपासंबंधीचेही करार त्यांच्यामध्ये होत असत.

कालवे, बंधारे यावर अंतिम सत्ता ही सरकारची असे कारण पाणी ही निसर्गाची देणगी होती. त्यामुळे त्यावर मालकी ही सरकारची असे गावकरी जेंव्हा मिळून बंधारे बांधणे, कालवे खोदणे हे काम करत असत तेंव्हा अर्थातच सरकार त्यास मदत करत असे. शिवकाळात सरकारच्या मदतीने ही कामे झाल्याची अनेक उदाहरणे आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांचे लक्ष जमीन सुधारणेकडे होते. जमिनीस पाण्याची सोय कायमची केल्यावाचून पीक चांगले व नियमित येणार नाही याची जाणीव त्यांना होती. म्हणून या सुधारणांकडे उसंत मिळे तेंव्हा ते आवर्जुन लक्ष देत असत. पुण्याजवळच्या शिवापुर परिसरात महारांजांचे बालपण गेले होते. त्या प्रेमापोटी तिथे त्यांनी सुंदर आंबराईची बाग लावली व ओढयाला धरणही बांधले. याबद्दलची हकीकत अशी की, शिवापूर येथे बाग, आमराईकरावी या हेतूने महारांजानी धरणाचे काम सुरू केले त्यावेळी बरेच गावोगावचे पाटील या कामासाठी जमा झाले होते. परतुं धरणाचे पाणी प्रचंड धोंड्यामुळे अडून राहिले होते. तेंव्हा तेथे कामावर असलेल्या येस पाटील कोंढवेकर यांस महाराजांनी आज्ञा केली की आम्ही स्वारीहून येई पावेतो हर ईलाज करून एवढा धोंडा फोडून काढून पाण्यास वाट करणे ही महाराजांची आज्ञा शिरसावंद्य मानून येस पाटील यांनी महाराज परत येण्याच्या आत धोंडा फोडून पाण्यास सुरळीत वाट करून दिली. महाराजांनी आल्यावर चौकशी केली. समस्त गावकऱ्यांनी येस पाटील कोढवेकरचे नाव सांगितले तेंव्हा त्यास महाराजांनी बक्षिस म्हणून पाटलाच्या विनंतीवरून सिंहगड जवळील एका गावची मोकदमी देऊ केली.[7]

नाशिक जिल्हयातील बंधारा बाधण्यासंदर्भातील इ.स. 1674 मधील एक घटना महत्वपूर्ण आहे. 'दिंडोरी परगण्यातील मोहाडी या गावातील लोकांनी गावाशेजारी वाहणाऱ्या बाणगंगा नदीवर धरण बांधण्यास सुरूवात केली परंतु ही नदी मोहाड गावच्या हद्दीतून वाहत नसल्याने शेजारच्या जाणोरी गावच्या पाटलाने धरण बांधण्यास विरोध केला हा तंटा मोठ्या मजलिसपुढे गेला. तेंव्हा मजलिसने मोहाडीकरांच्या बाजूने निर्णय देताना म्हटले की, ही जागा धरण बाधंण्यास योग्य आहे नदी ही नैसर्गिक साधन संपत्ती आहे. त्यामुळे नदीतील पाण्यावर आपला हक्क सांगता येणार नाही जाणोरकरानी आपला त्यावर हक्क सांगूनये. बंधाऱ्याचे काम चालू द्यावे असा आदेश मजलिसेन दिला."[8] म्हणजेच शिवकाळात नदी ही कोणत्या गावच्या हदीतून जाते यापेक्षाही नदीवर बंधारा उभारणे व त्या बंधाऱ्यातील पाण्याचा वापर शेतकऱ्यांना करता येणे याला अधिक महत्व दिलेले आढळते. समकालीन मजहरांमधूनही धरणांची बांधणी, गावकऱ्यांचे तंटे-बखेडे आणि सरकारचे धोरण या गोष्टी समजावून घेण्यासाठी महत्वपूर्ण माहिती मिळते.

अँबे कॅरे हा फ्रेंच प्रवाशी शिवकाळात स्वराज्यात आला होता. त्याने पश्चिम किनाऱ्यावरील अनेक गावांना भेटी दिल्या होत्या राजापुर आणि बांदे यांच्या मधल्या भागातील अनेक गावांनी डोंगरकपारीवरून पडणाऱ्या जलधारा आणि मैदानावरून वाहणाऱ्या नद्या यांच्या पाण्याचा उपयोग शेतीसाठी करून घेतला असल्याचे त्याला आढळून आले अँबे कॅरेच्या प्रवासवर्णनातील हे उल्लेख शिवकालीन जलसिंचन अथवा पाणीव्यवस्थापनाची माहिती देणारे महत्वाची पुरावे आहेत.

याशिवाय शिवकाळातील वसाहतीच्या ठिकाणी अथवा किल्लांच्या ठिकाणीही मुबलक असे पाणीसाठे तयार करण्यात आले. किल्ल्यांची नव्याने उभारणी करत असताना स्वतः शिवाजी महाराज त्याठिकाणी असलेल्या पाणी साठयांना अधिक महत्व देत असत. नैसर्गिक पाणी साठे उपलब्ध नसतील तर कृत्रिमरित्या विहिरी, छोटे तलाव निर्माण करूनच वसाहती वसवल्या जात व किल्ल्यांची निर्मिती केली जाई. त्यामुळे किल्ल्यांना अधिक महत्व प्राप्त होत असे हे जल व्यवस्थापनाचे धोरण शिवकाळात स्वराज्याला अधिक आर्थिक उत्पन्न देणारे ठरले त्याचबरोबर स्वराज्याचे दिर्घकाळ संरक्षण करणारेही ठरले. म्हणूनच शिवकालीन जलव्यवस्थापन हे एक आदर्श असे जलव्यवस्थापन होते.

**संदर्भ:**

1. कुलकर्णी अ. रा., शिवकालीन महाराष्ट्र, राजहंस प्रकाशन, पुणे. 2009, पृ. 30.

2. उपरोक्त, पृ.36.

3. उपरोक्त
4. कठारे अनिल आणि घोडके जयश्री, शिवकालीन महाराष्ट्र, अल्फा पब्लिकेशन, नांदेड, 2008, पृ.178
5. कुलकर्णी अ. रा., उपरोक्त
6. कुलकर्णी अ. रा., उपरोक्त
7. कुलकर्णी अ. रा., उपरोक्त
8. कुलकर्णी अ. रा., उपरोक्त

# समाज प्रबोधनांमध्ये वारकरी चळवळीची भूमिका

**डॉ सुवर्णा भाऊसाहेब पाटील**
सहयोगी प्राध्यापक
प्रतिष्ठान महाविद्यालय, पैठण

**गोषवारा :**

संत चळवळीचा उदय तेराव्या शतकाच्या उत्तरधात म्हणजे यादवांच्या राजवटीत झाला. वर्ण, जात, रोटी -बेटी भेद, विविध दैवते, उपासना, व्रत वैकल्ययामुळे समाजात सर्वत्र अराजकतानिर्माण झाली होती. संत चळवळीने मानवी सेवा हा सर्वश्रेष्ठ धर्म आहे असे प्रतिपादन केले.वारकरी पंथने ईश्वर हा निराकार असून तो सर्व चराचरात आहे, मूर्ती पूजा शिवाय ईश्वर प्राप्ती होते हा विचार पुढे आला. तसेच मूर्ती पूजेच्या रूपाने येणारे विधी देखील मागे पडले.वारकरी चळवळीमुळे अनिष्ट कर्मकांडाला आळा बसला. मनात श्रद्धा असेल तर आपल्याला ईश्वर भक्ती पासून कोणीही अडवू शकत नाही हा विचार पुढे आला.

संत कृपा झाली | इमारता फळा आली ||
ज्ञानदेव घातला पाया |उभारीलेदेवालया ||
नामा तयाचा किंकर | तणे केला विस्तार ||
जनार्धन एकनाथ | खांब दिला भागवत ||
तुका झाला सळस |भजन करा सावकाश ||
बहणीफडकते ध्वजा | निरूपण आले ओज ||

संताचे महत्त्व व त्यांच्या कार्याचे मोठेपण या अभंगातून स्पष्ट होते. संतांच्या कार्यामुळे समाजात नवचैतन्य निर्माण झाले. या शोध निबंधात संताने प्रबोधनासाठी केलेल्या कार्याचा अभ्यास केला जाणार आहे.

बीज शब्द: संत, प्रबोधन, नवचैतन्य, समाज विकास

**प्रस्तावना :** मध्ययुगीन कालखंडात भारतात व महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात आराजकता निर्माण झाली होती.धर्माचे वर्चस्व वाढले होते. समाजात पशुतुल्य जीवन जगणाऱ्या बहुजन जनतेत अज्ञान, अंधश्रद्धा, भीती, दैन्य, दुर्बलता यात वाढ झाली होती. तीर्थयात्रा पूजाअर्चा याचा नुसता सुकाळ झाला होता. इतकेच नव्हे तर ज्यांच्या खांद्यावर निकोपसनातन धर्म टिकण्याची जबाबदारी होती तेही या प्रवाहामध्ये वाहत चालले होते.विज्ञानेश्वर, हेमाद्री, श्रीधर, बोपदेव इत्यादी विद्वान पंडित संस्कृत साहित्य रचना करीत असले तरी हे सर्व ज्ञान भांडार उच्चवर्णीया पुरतेचमर्यादित होते. सर्वसामान्य जनतेला याचा गंध देखील नव्हता.यादवकाळात महाराष्ट्रात विविध प्रकारच्या धार्मिक चळवळीने सनातन धर्माच्या सांस्कृतिक वर्चस्वाविरुद्ध आव्हान उभी केलीहोती. वारकरी संप्रदायाने विज्ञानवादी दृष्टिकोन अंगीकारल्यामुळे प्रबोधनाला चालना मिळाली.प्रस्तुत शोधनिबंधात वारकरी संप्रदायाच्या योगदानातून प्रबोधनाला कशी सुरुवात झाली याचा अभ्यास करण्यात येणार आहे.

मध्ययुगीन भारतात राजकीय धार्मिक आक्रमणामुळे समाजजीवन त्रस्त झाले होते. समाजात सर्वत्र अराजकता निर्माण झाली होती. वेदविद्येचा सामान्य जनतेशी कसलाही संबंध नव्हता. धार्मिक ग्रंथांनी आचार विचार व्यवहारप्रायचित्त याची चिरेबंदी निर्माण केली होती. सामाजिक विकास कुठला होता. अपरिवर्तनीय समाज रचना, हताश मनोवृत्ती या सर्व कारणामुळे अंधकार युग निर्माण झाले होते[1].संतांच्या कार्यामुळे प्रबोधनाची पहाट निर्माण झाली होती.समाजातअराजकता वाढल्यानंतर नवीन गोष्टीचा उदय होतो. बौद्ध काळात देखील समाजात मोठ्या प्रमाणात आराजाकता वाढली होती व त्याला उत्तर म्हणून गौतम बुद्धांनी कर्मकांडाला विरोध करून बौद्ध धर्माची स्थापना केली. जनतेला जगण्याची नवीन उमेददिली. तसेच तेराव्या शतकात अराजकता वाढलीव भक्ती चळवळीने समाजात नवचैतन्य निर्माण केले. 18 व्या व 19 व्या शतकात भारतात कर्मकांड, अंधश्रद्धा, अस्पृश्यता,भेदाभेद, असमानता या प्रवृत्तीला समाजसुधारकांनी उत्तर दिलेव प्रबोधन युगाला सुरुवात झाली[2].

या काळात एकीकडे मुस्लिम सत्तेचेवर्चस्व वाढत होते ते जनतेवर अन्याय अत्याचार करत होते.तर दुसरीकडे हिंदू धर्मातील कर्मकांड भेदाभेद यांनी जनता त्रस्त झाली होती अशा परिस्थितीतवारकरी संप्रदायाचे कार्य महत्त्वाचे ठरते. वारकरी संप्रदाय विषय गेल ओमव्हेटम्हणतात की " सर्वात लोकप्रिय व टिकून राहिलेला असा वारकरी पंथ केवळ सनातन धर्माविरुद्धचनव्हे तर जास्त पुरोगामी चळवळी विरुद्धहीकाही काळ झगडा करूनच यशस्वी झाला"[3]. वि.का.राजवाडे म्हणतात की "संतांनी महाराष्ट्राला दुबळे केले" तसेच ते म्हणतात की "संतांनी टाळ कुठल्या शिवाय कोणतीही जागृती घडून आणली नाही " [4].यावरून राजवाडे वारकरी चळवळीचे सामाजिक योगदान नाकारत.पण याच्या अगदी उलट रानडे म्हणतात की " संत चळवळीमुळेच शिवरायांना राज्य स्थापनेची पार्श्वभूमी निर्माण झाली "[5]. वास्तविक पाहता वारकरी चळवळीमुळेसमाज प्रबोधनाला गती मिळाली हे वास्तव नाकारता येणार नाही.

महाराष्ट्रातील संत चळवळीमध्ये विविध जातीचे आणि व्यवसायाची लोक सामील झाले होते.ज्ञानेश्वर हे वाळीत टाकलेले ब्राह्मण, नामदेव हे शिंपी, तुकाराम हे कुणबी, नरहरी हे सोनार,चोखामेळा हा महार, जनाबाई दासी तर कानोपात्रा ही वेश्या होती. बारा बलुतेदार व अठरा आलूतेदार हे सर्व मंडळीचा समावेश वारकरी संप्रदायात झालेल्या दिसतो. भारतात व महाराष्ट्रात अनेक ठिकाणी भक्तिमार्गाच्या ह्या आंदोलनासाठी समाजातीलअसंतुष्टताप्रतिबिंबित होते. संत चळवळ व संत वाड:मयाचे नेतृत्व या वर्गाकडे होते. तत्कालीन परिस्थितीत या वर्गाची मोठीकुचंबणा होत होती. त्यांचे उद्योग व्यवसाय व्यवस्थित चालत नव्हते. अशा बिकट परिस्थितीत पुरोहिताच्यावर्चस्वामुळेया वर्गाला हिन वागणूक मिळत होती.पुरोहीताच्या जाचक निर्बंधामुळे समाजाचे अधपतन झाले होते [6]. अशा परिस्थितीत समाजातील धार्मिक व सामाजिक विषमता दूर करण्यासाठी वारकरी पंथाने पुढाकार घेतलेला दिसतो.संतानीलेखनातून अनेक प्रश्न उपस्थित केल्यामुळेसमाज ढवळूननिघाला होता.

मध्ययुगीन माणसाची सारी विचार संपदा धर्माच्या पायावर उभी होती. मानवीमनावरचे धर्माचे वर्चस्व आधुनिक विज्ञान युगापर्यंत सातत्याने चालू होते व आजही आपण काहीअंशी याचा बळीठरत आहोत. धर्माचा,संस्कृतीचा, विद्येचा मक्ता ब्राह्मणवर्गाने स्वतःकडे ठेवला होता. सर्व क्षेत्रात त्यांची मक्तेदारी वाढली होती.या काळात जीवनाचे अंतिम सत्य मोक्ष होते व त्याची मक्तेदारी देखील ब्राह्मण वर्गाकडेच होती. अशा प्रतिकूल परिस्थितीत वारकरी पंथाचे कार्य महत्त्वाचे ठरते. हेमाडपंताच्या चतुर्वर्ग चिंतामणी या ग्रंथात 365 दिवसासाठी 2000 आचार मार्ग सांगितले होते [7]. यावरून आपल्याला हे स्पष्ट होते की या काळात होम हवन, वृत्त वैकल्य, कर्मकांड मोठ्या प्रमाणात वाढली होती. याचाच परिणाम सामान्य जनता त्रस्त होऊन वारकरी चळवळीकडे आकर्षित झाली.

वारकरी चळवळीने समाजाला धार्मिक व सामाजिक गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी स्वतःचा देव स्वतःचे केंद्र उभी करून दिली.जुनी देवस्थाने,पीठे, क्षेत्र या सर्वावर पुरहितांचे वर्चस्व होते. हे वर्चस्व नाकारल्याशिवाय ही गुलामगिरी संपणार नव्हती म्हणून संतांनी नवा देव विठोबा, नवे धर्मपीठ पंढरपूर आणि नवा संप्रदाय वारकरी पंथ याचा पुरस्कार केला.संतांची ही साधने पुरोहिताचे वर्चस्व कमी करण्यासाठी उपयुक्त ठरली [8]. यातूनच सामाजिक प्रबोधनाला सुरुवात झाली असे म्हणता येईल.

रानडे म्हणतात की "या देशाच्या प्राकृत भाषेत एक बहुमोल वाड:मय संत चळवळीमुळे आम्हाला उपलब्ध झाले. संत महंत या बोलीभाषेतच उपदेश करू लागले. ग्रंथही त्याच भाषेत रचले गेले. विद्येची संपत्ती गुप्त होती तिचे भांडार बायका-पुरुष, ब्राह्मण -शूद्र अशा सर्वांना उघडे झाले " [9]. ही जनतेसाठी फार मोठी उपलब्धी होती.

संत ज्ञानेश्वर महाराज म्हणतात की

'जे का रंजले गांजले | त्यासी म्हणे जो आपले ||
तोच साधू ओळखावा | देव तेथेचि जाणावा ||'

याचाच अर्थ गोरगरीब, दुबळे, शोषित यांची सेवा म्हणजेच ईश्वर सेवा होय. जे लोक हे कार्य करतात त्यांच्या ठायी ईश्वर असल्याचे सांगितले.धर्माच्या व्यापाऱ्यांना ही मोठी चपरांक होती.संतांच्या आचरणातून,बोलण्यातून, लिखाणातून आपल्याला वारंवार भूतदया, क्षमाशीलता,करुणा परोपकार,प्रेमभाव, सेवाभाव या गुणाचे दर्शन होते [10].अंधश्रद्धा, जादूटोणा, मंत्र- तंत्र, उपास सायास या प्रकाराला संतांनी कडाडून विरोध केला. संत तुकाराम महाराजअशा ढोंगीपणा विषयी म्हणतात की

बाजे न होता लेकरे |काय करावे भतारे || नपुसका पुरुषासी|काय करील बाईल त्यासी ||

या अभंगातून तुकाराम महाराजांचा विज्ञानवादी दृष्टिकोन समोर येतो. नवसे पोरे होती |तरी का करणे लागे पती || अशा अभंगाच्या माध्यमातून जनजागृती घडवून आणण्याचेकार्य केले. तसेच संत चळवळीमध्येसंन्यास वृत्तीला विरोध केला आहे. तुम्ही संसार करत भक्ती करू शकता. सदाचाराला महत्त्व दिलेले आहे. याचा परिणाम असा दिसतो की यामुळे या पंथामध्ये काही अनिष्ट प्रथेपासूनसमाज वाचलेला आहे.

संत चळवळीचे समाज प्रबोधनांमध्ये योगदाना अत्यंत महत्त्वपूर्ण राहिलेले आहे.यासंबंधी ग.बा सरदार म्हणतात की "महाराष्ट्रीय संतांचे कार्य पाहिले तर मोठ्या धैर्याने व चिकाटीने त्यांची समाज जीवनावर मौलिक व चिरंतर संस्कार घडविले याबद्दल शंका उरत नाही " [11.] भारतात धार्मिक प्रबोधनाला संतांनी सुरुवात केली हे सत्य असले तरी पण ही चळवळ पुढे फुफावून तिचे क्रांतीत रूपांतर झाले नाही.याचे कारण येथील समाजामध्ये मोठ्या प्रमाणात अज्ञान, निरक्षरता,धर्म भोळेपणा हे होते.येथील धर्मव्यवस्थेने माणसाला माणसासारखे जगूच दिले नाही म्हणून आपण काही वेगळे करण्याची उमेदच निर्माण झाली नाही हे वास्तव नाकारता येणार नाही.19 व्या शतकात जनसामान्याला शिक्षणाची दारे खुले होऊन गुलामगिरीतून मुक्तता होण्यास सुरुवात झाली.

संत चळवळीने समाज प्रबोधनांमध्ये मोलाचे कार्य केले. वारकऱ्यांनी गुलामगिरीचा विरोध करूनस्वातंत्र्य, समता, बंधुभाव व स्त्रीसक्षमीकरण या माध्यमातून विकासाला एक प्रकारे दिशा देण्याचे काम केले. उत्तर वैदिक कालखंडापासून स्त्रीची स्थिती अत्यंत दयनीय होती. उच्च वर्णापासून निम्नवर्णापर्यंत स्त्रियांचे शोषणाचे पर्व सुरू होते पण संत चळवळीमध्ये स्त्रीसंतांना वरचे स्थान मिळाले आणि समाजाची बंधने जुगारून देण्यास सुरुवात झाली. संत साहित्यातून पुढे आलेली मूल्यवस्था ही मानवतावादी होती तसेच जन्मावर आधारित उच्चनीचता नाकारणारी देखील होती. अंधश्रद्धा,अनिष्ट रूढी प्रथा परंपरा, वृत्तवैकल्येत,धर्म भोळेपणा सोडून विज्ञानवादी दृष्टिकोन स्वीकारण्यास संतांनी जनतेला भाग पाडले.तुकाराम महाराजांच्या अनेक अभंगातून आपल्याला त्यांचा विज्ञानवादी दृष्टिकोन समोर येतो.अस्पृश्यता, भेदाभेद यामुळे समाजाचे मोठे अधपतन झाले होते अशा परिस्थितीमध्ये संतांनीसमानता, त्याग, बंधुभाव, एकता,सहिष्णुता याची शिकवण देऊन समाज प्रबोधनाला सुरुवात केली हे नाकारता येणार नाही.

वारकरी चळवळीमुळे सर्वसामान्यांमध्ये जीवन जगण्याची नवीन उमेद निर्माण झाली. अंधकार व कर्मकांडातून लोकांची सुटका झाली. पुढे संताचा आदर्श समोर ठेवूनच छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या राज्यात सर्व जाती धर्माच्या लोकांना बरोबर घेऊन हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. हजारो वर्षाच्या विषमतेमुळे होरपळून गेलेल्या समाजात वारकरी पंथामुळेनवचैतन्य निर्माण झाले. संतामुळे वैदिक धर्माच्या पडत्या काळात प्रबोधनाच्या माध्यमातून एक प्रकारे धर्म रक्षणाचे कार्य झाले.धार्मिक सहिष्णुता, समानता याचा पुरस्कार करून प्रबोधनाला सुरुवात केली. मानव सेवा ही सर्वश्रेष्ठ सेवा या भावनेतून प्रबोधनाला चालना मिळाली. या सर्वावरून हे लक्षात येते की समाज प्रबोधनांमध्ये वारकरी चळवळीचा वाटा फारमहत्त्वाचा आहे.

**संदर्भ :**

1) ज. वा. जोशी, संतसाहित्य भूमिका आणि ज्ञानेश्वर अभ्यास, परामर्श खंड 16, अंक 1, 1994, पृ. 2.
2) वा.र.सुंठणकर, महाराष्ट्रीय संतमंडळीचे ऐतिहासिक कार्य, 1948, बेळगाव, पृ.32.
3) दिनेश मोरे,आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास 1818 ते 1960,2006 पुणे,पृ 15.
4) उपरोक्त, पृ. 16
5) उपरोक्त
6) महाराष्ट्रातील संत मंडळीचे ऐतिहासिक कार्य, टीप 2, पृ. 34 ते 38.
7) उपरोक्त पृ. 39- 40.
8) उपरोक्त पृ. 43 -44.
9)ग.बा. सरदार,संत वाड:मयाची सामाजिक फलश्रुती,पुणे 1982, पृ. 27.
10) आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास, टीप 3, पृ. 17- 18.
11) उपरोक्त पृ. 16.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि हिंदू कोड बिल

**सुलक्षणा किशनराव इंगोले**
संशोधक विद्यार्थीनी
ज्ञानोपासक महाविद्यालय परभणी

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्रीविषयक विचार परिवर्तनवादी होते. स्त्रियांना समान हक्क मिळावयास हवा या मानवतेच्या दृष्टीकोनातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर हिंदू कोड बिलाकडे पाहत होते हिंदू काड बिल म्हणजे सामाजिक असमानता भेदभाव विषमता पसरविण्याच्या आणि स्त्रियांना बंदिस्त ठेवणा-या चालिरिती वर प्रहार होता. हिंदू कोड बिल हे सर्व जाती संप्रदाय,ब्राम्हण, लिंगायत, बौध्द, जैन आणि शिख या सर्वाना लागु करण्यात आले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतंत्र, समता आणि बंधुता या तत्वांना हिंदू कोड बिलातून समाजामध्ये रुजविणे हा प्रमुख उददेश होता. म्हणून आंबेडकरांनी स्त्रियांनाही पुरूषाप्रामणे समान अधिकार बहाल केले होते. अन्यायाच्या अंधारातून स्त्रियांना प्रकाशामध्ये आणण्याचा हेतू बाबासाहेबांचा होता.

स्वांतत्र भारताचे पहिले कायदेमंत्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्रियांच्या हक्कासंबंधी हिंदू कोडबील संबंधीत मसुदा 28 फेब्रुवारी 1948 रोजी संसंदेत मांडला गेला. भारतातील सर्व जाती-धर्मातील स्त्रियांच्या जाचक रुढी आणि परंपरापासून सुटका मिळावी यासाठी हा मसुदा लिहिला. डॉ बाबासाहेब आंबेडकरी 4 वर्ष 1 महिना आणि 26 दिवस यावर काम करुन हे हिंदू कोडबील तयार केले.

सर्व जाती धर्माच्या स्त्रियांना समान हक्क मिळावे ही डॉ आंबेडकरांची भूमिका होती. त्याकरीता त्यांनी 1948 मध्ये संविधान सभेत हिंदू कोडबिल चा मसुदा प्रस्तुत केला गेला. त्यांनी आपल्या बिलामध्ये स्त्रियांना घटस्फोटाचा अधिकार, विधवा आणि मुलींना संपतीमध्ये अधिकार मुत्यूपत्र बनविले नसेल तरीही त्या व्यक्तीच्या संपतीत हक्क मिळावा स्त्रि आणि पुरुषांना प्राप्त होणा-या संपत्ती कायद्याने वाटणी झाली पाहिजे असा प्रस्ताव सादर केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्री स्वतंत्रयाविषयक विचार मुलभूत परिवर्तनवादी होते. स्त्रियांना स्वातंत्र, समता, न्याय यासाठी ते लढले त्यांवा लढा ते हिंदू कोड बीलाच्या बाबातीत माझा छळ झाला म्हटले तर ते अतिश्योक्ती व्हायची नाही. 10 ऑगस्ट 1951च्या पत्रात ते पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरु यांना लिहीतात, तुम्हाला माहीत आहे की, हिंदू कोड बीलाबाबत माझा भावना तिव्र आहेत. माझया ढासळत चाललेल्या प्रकृतीवी मी पर्वा करत नाही. कारण हे बील मंजूर होणे महत्वाचे आहे. डॉ. बाबासाहेबांच्या उपरोक्त वक्तव्यावरुन ते किती पोडतिडकीने आणि तळमळीने मानसिक व शारिरीक दोन्ही पातळयावर हिंदू कोड बीलासाठी ते झुंज देत होते हे स्पष्ट होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना भारतीय घटनेचे शिल्पकार म्हणून सर्व जग मुजरा करते बाबासाहेब अक्सर कहा करते थे की, “मुझे भारतीय संविधान के निर्माण से भी हिंदू कोड बील परित करने मे अधिक दिलचस्पी और खुशी है” यावरुन डॉ. आंबेडकरांच्या दृष्टीने हिंदू कोड बील किती महत्वाचे होते हे दिसून येते. स्त्रियांवर लादलेल्या आणि स्त्रीयांनाही काही प्रामणात स्विकारलेलया अंधारातून स्त्रियांना मुक्त करण्याचा विडा त्यांनी उचलला होता. स्त्रियांना माणूसकीला पारखे करणा-या संस्कृतीच्या अस्तित्वाला सुंरुग लावायला केवळ बाबासाहेबच झटले होत. स्त्रिला संशक्त कुरुन तिला अधिक संरक्षण देऊन पुरषांच्या जाचातुन मुक्त करण्यासाठी तिला सामनता, आर्थिक राजकीय, सामाजिक स्वातत्र एका विशिष्ट कायद्याने घ्यावे असे डॉ. बाबासाहेब आंबेडकारांच्या मनात होते म्हणून त्यांनी हिंदू कोड बीलाचा आग्रह धरला होता[21.]

**हिंदू कोड बिलाचे महत्व:-**

26 सप्टेबर 1651ला पंडित जवाहरलाल नेहरु यांनी डॉ.आंबेडकरांच्या हिंदू कोड बिलाला स्थगिती ठेवण्याचा आदेश दिला तेव्हा भारतातील कोणत्याही स्त्री पुरुषपेक्षा दु:ख डॉ. बाबासाहेबांना झाले ते म्हणतात, न रडता, न भाकत माझया हिंदू कोड बिलाला ठार मारले गेले आणि गाडले गेले डॉ. आंबेडकर पूढे म्हणतात, “स्वत: च्या मुलाचा मुत्यू झाला असता तरी इतके दु:ख झाले नसते, पण माझया हिंदू कोड बिलाच्या खुनाने मी जास्त दु:खी झालो आहे.” डॉ. आंबेडकरांनी 27 सप्टेबार 1951 ला मंत्रीमपदाचा राजीनामा दिला तेव्हा ते म्हणतात, “ पार्लमेंटपूढे यापूर्वी आलेल्या किंवा यानंतर येणा-

या कोणत्याच कायद्याची बरोबरी या हिंदूकोड बिला बरोबर करता येणार नाही असे त्यांच महत्व आहे" यावरुन हिंदू कोड बिल डॉ. आंबेडकरांना किती महत्वाचे वाटत होते हे लक्षात येते.

पूर्वीच्या हिंदू कायद्याने भारतीय स्त्रीला शुद्र गुलाम आणि उपभागाची वस्तु म्हणून स्थान दिले होते. स्त्री ही भागवस्तु झाली होती ; पण डॉ. आंबेडकारांचे हिंदू कोड बिल हे सर्व गटातील स्त्रियांना आर्थिक सामाजिक आणि धार्मिक स्वातंत्र मिळवून देण्याचे महत्वापूर्ण असे साधन होते. डॉ. आंबेडकारांच्या हिंदू कोड बिलाने भारतीय राज्यघटनेतील न्याय, स्वातंत्र, समता आणि बंधुत्वाची हमी भारतीय स्त्रिला मिळणार होती. सर्व समाज क्रमान एकत्र आला असता. वेगवगळया जातीधर्माच्या स्त्री पुरषांच्या कायदेशीर विवाहाने धर्म, जात इ, भेदाच्या त्यागून आधुनिक प्रगत आणि पुरोगामी विचारसरी डॉ. आंबेडकरांच्या हिंदू कोड बिलातुन साध्य झाली असती.

भारतीय समाज मागासलेला राहण्याचे प्रमुख कारण जर कोणते असेल तर भारतीय स्त्रीयांना समानतेच्या अधिकारापासून वंचित ठेवण्यात आले. धार्मिक पण चुकीच्या बंधनाना बंदिस्त करणत आले स्त्री धार्मिक बंदिस्त असल्याने ती स्वतंत्र विचार करु शकली नाही, किंवा स्वतंत्र विचार करण्याचे मार्गच तिच्यासाठी पध्दतशीरपणे बंद केले. परिणामी तिने भारतीय सामाजातील कालबाहय रुढी, परंपरा, धार्मिक विधीचे पालन करण्यात समाधान मानले. अंधारातून प्रकाशात येण्याऐवजी अंधरातुन अंधारात राहण्यात ती समाधान मानु लागली. तिची धार्मिक मानसिकता बदलू नये म्हणून तिच्यावर विविध प्रकारे विविध प्रकारची बंधने लादली. नव्या पिढीला नवा विचार देवू शकली नाही स्त्री ही अंधार प्रसारक झाली स्त्री ही धार्मिक रुढी पंरपरेला जोपासणारी आणि चालविणारी असल्याने संपूर्ण सामाजाची जडणघडण त्यानुसार होत राहिली आणि भारतीय समाज मागासलेलाच राहिला.

भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेत बाबासाहेबांनी भारतीय जनतेला न्याय, स्वातंत्र, बंधुत्व याची हमी दिली होती. या चारही मुलभुत तत्वावर भारतीय समाज एक संघटीत व्हावा अशी बाबासाहेबांची इच्छा होती. हिंदू कोड बिलाच्या एकमेव कायदे संहितेमुळे ते सहज साध्य होणार होते तेच सुखस्वप्न या बिला संदर्भात बाबासाहेबांचे होते. स्त्रि पुरुष भेदविरहीत समता प्रस्तापित करणे हे हिदू कोड बिलाचे खरे उददीष्ठ होते. प्राचिण भोदभावाच्या संकल्पना त्यागुन आधुनिक प्रगत व पुरोगामी विचार सरणीनुसार समाज व्यवस्थेची पूर्ण बांधणी करणे हिंदू कोड बिलाद्वारे साध्य होणार होते. हिंदू कोड बिला हे वस्तुत: स्त्रीयांना आर्थिक, सामाजिक व धार्मिक स्वायत्ता मिळवुन देण्याचे एक फार मोठे साधन होते. परंतु हिंदू कोड बिलाचा पराभव हा सर्व अर्थाने पुरोगामी बुध्दीवादाचा परावभव नसुन तो सनातनी जातीय वृत्तीच्या खराखुरा विजय होता. हिच स्वतंत्र भारताची खरी शोकांतिका होती व ती आजही दिसुन येते. बाबासाहेबांनी हिंदू कोड बिलामध्ये ज्या सुधारणा ठेवल्या होत्या त्यामध्ये आंतरजातीय विवाहाला मान्यता, एकपत्नित्वाचे बंधन पुरुषाप्रमाणे स्त्रीला सुध्दा घटस्फोट मागण्याचा अधिकार, दायपध्दतीचा वारसा हक्क, मुला इतकाच मुलींला सुध्दा वडिलांच्या संपत्तीत अधिकार व दत्तक विधानात सधारणा इत्यादी होते.

इ.स 1952 नंतरच्या काळात मध्यवर्ती सरकार तर्फे हिंदू कोडाच्या मसुद्यातून दि हिंदू मॅरेज ॲक्ट 1955, दि हिंदू सेक्शन ॲक्ट 1956, दि हिंदू मायनॉरिटी ॲन्ड गार्डीयनशिप ॲक्ट 1956 आणि दि हिंदू ॲडप्शन मेन्टेनन्स ॲक्ट1956 हे कार्य करण्यात आले. पुढे बिल खंडश: पास झाले. उशीरा का होईना स्त्री पुरुष समानतेचा विजय झाला. यावरुन बाबासाहेबांची देशहिताची दुरदृष्टी लक्षात येते.

**संदर्भग्रंथ सुची**


1. किर धनजय – डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉप्यूलर प्रकाशन, मुबंई -2006
2. लिबाळे शरणकुमार, प्रज्ञासुर्य, दिलीपराज प्रकाशन, पुणे द्वितीय आवृत्ती 2007
3. सुर्या अनिल, प्राचीन अर्वाचीन भारतीय स्त्री आणि हिंदू कोड बिल, सुगावा प्रकाशन पुणे-2010
4. खैरमोडे चा. भ. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ भिमराव रामजी आंबेडकर, चरित्र खंड 8 वा मुबंई 1983
5. गनविर रत्नाकर, डॉ. आंबेडकर आणि हिंदू कोड बिल, खंड 1 ला नागपूर एप्रिल 1987

# अहमदनगर जिल्ह्यातील प्रवरा खोऱ्यातील ताम्रपाषाणयुगीन संस्कृती : कृषी जीवन

**राजभोज संदीप बाबासाहेब**
संशोधक विद्यार्थी, इतिहास विभाग, अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे
न्यू आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालय अहिल्यानगर (स्वायत्त)

**प्रस्तावना :-**

अहमदनगर जिल्ह्याला समृद्ध असा प्राचीन वारसा लाभलेला आहे महाराष्ट्राचा वैभवशाली प्राचीन इतिहास दृष्टीपथात येतो इतिहासात अहमदनगरचे नाव निजामशाहीमुळे प्रसिद्ध झाले असले तरी प्राचीन भारताचा इतिहास अभ्यासल्यानंतर अहमदनगर जिल्ह्यात मौर्य, सातवाहन, वाकाटक, चालुक्य, राष्ट्रकूट आणि देवगिरीच्या यादवांनी सत्ता स्थापली होती. हे आपणास लक्षात येते मात्र प्रागैतिहासिक महाराष्ट्राचा अभ्यास केल्यानंतर आपणास जोर्वे, नेवासा, दायमाबाद संस्कृती नांदत होती हे पण लक्षात येते.

जोर्वे संस्कृती येथे नांदत होती हे आपणास इसवी सन 1950-51 मध्ये अहमदनगर जिल्ह्यात प्रवरा नदीच्या काठी संगमनेर जवळ उत्खननातून हे ठिकाण उजाडात आले आहे. ही ताम्रपाषाण युगीन संस्कृती असून ती जोर्वे संस्कृती या नावाने ओळखली जाते.या संस्कृतीच्या शोधाचे श्रेय डॉक्टर हसमुख धीरजलाल सांकलिया यांना जाते जोर्वे ह्या गावी एका शेतकऱ्याला त्याचे शेत नांगरताना रंगीत नक्षी असलेले खापराची काही भांडी आणि तांब्याच्या बांगड्या व कुऱ्हाडी सापडल्यात इसवी सन पूर्व 1400 ते इसवी सन पूर्व 900 या कालखंडातील ही जोर्वे संस्कृती असावी असा संशोधकांचा निष्कर्ष आहे चौकोनी किंवा गोल आकाराची घरे या संस्कृतीची वैशिष्ट्ये होती. या ठिकाणी कृषी संस्कृती नांदत असल्याचेही दिसून येते.

तापी नदीच्या खोऱ्यात खानदेशातील साळवदा गावी, इ. पू. 2500 च्या आसपास उदयास आलेल्या संस्कृतीचे अवशेष सापडले आहेत. या संस्कृतीला संशोधकांनी "साळवदा संस्कृती" असे नाव दिले आहे. साळवदा संस्कृतीच्या दायमाबाद येथील वसाहती लहान वस्तीच्या स्वरूपाच्या होत्या. दायमाबाद येथील लिंगाच्या आकाराचे दगड, तसेच कालीबंगण (राजस्थान) आणि राखीगडी (हरियाणा) येथील उत्खननांमध्ये सापडलेली सिंधू काळातील शिवलिंगे यांसारखी विशेष लक्षणे दायमाबादला मिळाली आहेत. दायमाबाद येथील सिंधू संस्कृतीचे कलात्मक अवशेष इतर सिंधू प्रदेशात मिळालेल्या मूर्त्यांपेक्षा वेगळे आहेत. इ. पू. 2200 ते 2000 या कालखंडात दायमाबाद येथे सापडलेल्या रथ, हत्ती, रानगवा आणि गेंडा यांच्या मूर्ती, तसेच रथाच्या जोडणीत असलेले बैल, सारथी, योद्धा आणि इतर विशेषतेमुळे या कलेला खूप महत्त्व मिळाले आहे. या मूर्तींचे प्रमाण आणि त्यांचे आकार, तसेच सापडलेला हत्ती, जो वीस किलो वजनाचा आहे, हे लहान मुलांची खेळणी असण्याचे संकेत देत नाही.1958-59 मध्ये भारतीय पुरातत्व सर्वेक्षणाचे बी. पी. बोपर्डीकर यांनी दायमाबाद स्थळाचा शोध घेतला, आणि त्या ठिकाणी पुढे चार वेळा उत्खनन करण्यात आले. 1958-59 मध्ये म. न. देशपांडे यांच्या नेतृत्वाखाली, 1974-75 मध्ये एस. आर. राव यांच्या नेतृत्वाखाली, आणि 1975-76 व 1978-79 मध्ये एस. एस. साळी यांच्या नेतृत्वाखाली उत्खननाचे महत्त्वपूर्ण कार्य पार पडले. यामध्ये सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे शंकर साळी यांच्या उत्खननामुळे दायमाबादमध्ये पाच कालखंडांच्या वसाहती उघड झाल्या.याठिकाणी कृषी जीवन असल्याचे दिसून आले आहे.

नेवासा येथे 1954 ते 1961 या काळात एकूण चार विविध टप्प्यात डॉ. हसमुख सांकलिया आणि डॉ. शांताराम देव यांच्या नेतृत्वाखाली उत्खनन केले गेले या उत्खननात पुराश्मयुग,मध्याश्मयुग, ताम्रपाषाणयुग आणि मानवी जीवन स्थिर झाल्याचा वैभवशाली प्राचीन इतिहासाचे सांस्कृतिक दर्शन मिळते. नेवासा या ठिकाणी ताम्रपाषाण युगातील मिळाली खापरे राखी रंगाची व जाड्या भरड्या पोत्याची होती काही खापरांवर कुत्रा हरिण यांची चित्रे ही काढलेले आहेत राजण त्यावरील झाकण्या भांड्याच्या तोंडावर ठेवण्याकरता चकतीच्या आकाराच्या झाकण्या वाढगे या प्रकारचे भांडे मिळाले असून ही भांडे वापरणारी लोक नेवाशात राहत होती हे दिसून येते 1956 मध्ये झालेल्या उत्खननात येथे जवळजवळ 21 मानवी सांगाडे सापडली होती 1959 ते 1961 मध्ये झालेल्या उत्खननात 66 मानवी सांगडे सापडले होते यावरूनही या ठिकाणी

मानवी वस्ती असल्याची पुरावे मिळालेले आहेत त्याचबरोबर कृषी जीवनाचाही विकास झालेला दिसून येतो. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये अहमदनगर जिल्ह्यातील प्रवरा खोऱ्यातील ताम्रपाषाण युगातील संस्कृतीचा कृषी जीवनाचा आढावा घेणार आहे.

**संशोधन उद्दीष्टे :-**

1. अहमदनगर जिल्ह्याच्या प्राचीन सांस्कृतिक वारशाचा अभ्यास
2. जोर्वे, दायमाबाद, नेवासा, आणि साळवदा संस्कृतीचे विश्लेषण
3. ताम्रपाषाणयुगातील कृषी जीवनाचे विवेचन
4. ताम्रपाषाणयुगातील संस्कृतीत व्यापाराचे महत्त्व

**संशोधन गृहितके :-**

1. जोर्वे आणि दायमाबाद यांसारख्या ताम्रपाषाण युगीन संस्कृतीत कृषी जीवन एक प्रमुख आर्थिक आणि सामाजिक घटक होता. त्यांचा मुख्य व्यवसाय शेती व पशुपालन होता, तसेच ते विविध तृणधान्ये व कडधान्यांचे उत्पादन करत होते.
2. जोर्वे व इतर स्थानिक संस्कृतींमध्ये व्यापाराचे महत्त्व असल्याचा संकेत मिळतो
3. ताम्रपाषाण युगातील लोकांचे तंत्रज्ञान आणि पर्यावरणाच्या दृष्टीने त्यांचे ज्ञान चांगले विकसित होते, ज्याचा प्रभाव त्यांच्या कृषी जीवनावर दिसून येतो.

**ताम्रपाषाणयुगातील कृषी जीवन :-**

जोर्वे या गावी एका शेतकऱ्याला त्याचे शेत नांगरताना रंगीत नक्षी असलेली खापराची काही भांडी आणि तांब्याच्या बांगड्या व कुऱ्हाडी सापडल्या आहेत. इ. पू. 1400 ते इ. पू. 900 या कालखंडातील ही जोर्वे संस्कृती असावी असा संशोधकांचा निष्कर्ष आहे. चौकोनी किंवा गोल आकाराची घरे हे या संस्कृतीचे वैशिष्ट्य असून उंदीर व किड्यांपासून संरक्षणासाठी धान्य साठवण्याची जी खास सोय केली होती. ती आजही खेड्यामध्ये परंपरागत पद्धतीने वापरली जाते. धातूचे ज्ञान अवगत असल्याने अवजारे, शस्त्रे, अलंकार, विविध मूर्ती आणि भांडी यासाठी धातूंचा केलेला वापर तसेच शेतातून ज्वारी, गहू, बार्ली, मसूर, मटार, मूग, उडीद ही घेत असलेली पिके होती. शेतीला जोडून असलेल्या पशुपालन शिकार आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे मातृदेवतेच्या रूपात असलेल्या स्त्री प्रतिमा आणि काही पशुंची पूजन केले जात असावे असे म्हणावयास हरकत नाही. नेवासे येथील पुराव्यावरून स्पष्ट होते. घरामध्ये लंबगोल आकाराच्या खड्याच्या चुली तर घराच्या ओसरीमध्ये मोठ्या आकाराच्या चुली होत्या. लहान चुलीच्या मधोमध छोट्या बसक्या मातीच्या उभ्या दांड्यावर खापर तवे होते. प्रत्येक मोठ्या घरामध्ये धान्य साठवण्यासाठी बळदे आणि कणग्या होत्या.

ताम्रपाषाणयुगातील शेतकरी हे निर्वाहासाठी शेती पशुपालन, जनावरांची शिकार व मासेमारी यावर अवलंबून होते. ते शेळ्या, मेंढ्या, गायी, म्हशी व डुकरे पाळत होते. त्यांचा उपयोग मांस व काहींचा दूध मिळविण्यासाठीही होई. निर्वाहासाठी पुरेसे होईल एवढे धान्योत्पादन ते करीत असत. तेथील प्रमुख अन्न सातू असून जेथे पाणीपुरवठ्याची सोय होती तेथे गहू सुद्धा पिकवला जाई. तर धान्यामध्ये ज्वारी, काही प्रमाणात बाजरी, क्वचित तांदूळ, कुळीथ इ. तृणधान्ये तर हरभरा, मसूर, वाटाणा काही प्रमाणात उडीद, लाखीडाळ इ. कडधान्ये ते पिकवत असते. हे सर्व पिके त्यांच्या जळित बियाणांच्या अवशेषणाने येथील उत्खननांमध्ये आढळून येतात. कारण कोणतेही धान्य कण अथवा बिया या हजारोवर्षे टिकून राहू शकत नाहीत तर त्या जळक्या स्वरुपातच टिकून राहू शकतात. सातू गहू, ज्वारी बाजरी या पिठांच्या ते रोट्या करीत असावेत असे इनामगावच्या उत्खननात आढळून आलेल्या खापरतव्यांमुळे आपणांस सांगता येते दायमाबाद येथील लोकही शेती हाच प्रमुख व्यवसाय करीत असत. ते वर्षातून दोन पिके घेत असत. बार्ली, विविध प्रकारची कडधान्ये, गहू, कुळीथ क्वचित तांदूळ, नाचणी इ. धान्ये पिकवत असत.शेतीची नांगरणी करावयाचे त्यांना कितपत ज्ञान होते हे सांगता येत नाही. परंतु दगडाच्या सहाय्याने ते माती खणून नांगरणी करत असावेत. शिवाय तज्ञांच्या मते या लोकांना अवगत असलेले तंत्रज्ञान व इतर अवशेष यांचे विश्लेषण केले असता त्यांना पर्यावरणाचे उत्तम ज्ञान होते व त्यानुसार त्यांची जीवनपद्धती होती.

**लोकांचा व्यापार अथवा विनिमयः-**

ताम्रपाषाण युगीन काळात विनिमयाची प्रादेशिक केंद्रे म्हणजे प्रकाशे, इनामगाव व दायमाबाद इ. सारख्यामोठ्या वसाहतीची स्थळे ही बहुधा व्यापारी केंद्रे असावीत असे दिसून येते. येथे नजीकच्या वसाहती आणि त्यांना पुरवठा करणारी व त्यावर नियंत्रण ठेवणारी व्यवस्था असावी असेही अनुमान आहे.येथील लोक हे त्यांच्या समकालीन इतर भागातील लोकांशी व्यापार करीत असावेत. जोर्वेचे लोक हे कर्नाटकातून हस्तीदंत व सोने, राजस्थानातील आहर अथवा बनास खोऱ्यातून तांबे हे माळवा मार्गे आणत असत. तर शंख शिपले इ. च्या वस्तू, बांगड्या इ. सौराष्ट्रातून आणल्या जात. तर ॲमेझोनाइट हा दगड गुजरातमधील राजापिप्पल या भागातून आणत होते. तांबे धातू राजस्थान प्रमाणेच गुजराथच्या अमरेली जिल्ह्यातूनही आणत होते. महाराष्ट्रातील कोकणपट्टीतून लाल गेरु (रंगासाठी) समुद्री मासे, माळा बनाविण्यासाठी शंखशिंपले व घोड नदीच्या उगमाकडील भागातून वाल आणीत असत.या सर्व वस्तूंच्या विनिमयात जोर्वे येथील लोक बहुधा त्यांच्या वस्तूंचा मोबदला म्हणून देत असावेत. त्यात प्रामुख्याने जोर्वेची उत्तम दर्जाची मृदा भांडी ते देत असावेत. याला पुष्टी मिळते ती इनामगाव व दायमाबाद येथील उत्खननांत विपुल प्रमाणावर मृदा भांडी आढळली आहेत. अशा तन्हेने ताम्रपाषाण युगीन जोर्वे संस्कृतीतील लोक हे इतर समकालीन संस्कृतीतील लोकांशी व्यापारी संबंध ठेवीत असत असे दिसते.

**निष्कर्ष:**

जोर्वे, नेवासा, आणि दायमाबाद येथील संस्कृतींमध्ये कृषी जीवन मोठ्या प्रमाणात प्रचलित होते, जिथे शेतकरी शेती, पशुपालन, आणि व्यापारावर आधारित जीवन जगत होते. या स्थळांवरील उत्खननातून सापडलेले विविध पुरावे, जसे की भांडी, तांब्याच्या वस्तू, आणि शिल्पे, त्यावेळच्या सामाजिक आणि सांस्कृतिक संरचनेची माहिती देतात. यामुळे त्या काळातील ताम्रपाषाण युगीन लोकांची जीवनशैली, त्यांचा व्यापार, आणि विविध समकालीन संस्कृतींशी असलेल्या संबंधांचे स्पष्टीकरण मिळते.

**संदर्भ ग्रंथ :-**

1. जोशी महादेव शास्त्री- भारतीय संस्कृती कोश खंड, सात भारतीय संस्कृतीकोश मंडळ पुणे, 1972
2. महाराष्ट्र शब्दकोश - महाराष्ट्रकोश मंडळ विभाग, पुणे, खंड पाचवा 1936
3. देव शांताराम भालचंद्र - महाराष्ट्राचा इतिहास प्रागैतिहासिक महाराष्ट्र, खंड पहिला भाग एक, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई
4. देव शांताराम भालचंद्र – पुरातत्व विद्या, पुणे,
5. डॉ. ढवळीकर मधुकर केशव, महाराष्ट्राची कुळकथा, राजहंस प्रकाशन, पुणे.
6. प्रा. डॉ. शास्त्री पुष्कर रमेश, निजामशाही आणि अहमदनगर, अपरांत, पुणे.

.

# औरगाबाद शहरातील ऐतिहासिक वास्तू आणि महत्त्व

**प्रो. टी. आर. पाटिल**
इतिहास विभाग प्रमुख,
विवेकानंद कला, सरदार दलिप सिंग वाणिज्य व शास्त्र महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर

**प्रस्तावना**:

औरंगाबाद शहर ऐतिहासिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. आज या शहारला छत्रपती संभाजी नगर असे नाव पडले आहे.भारतातील महाराष्ट्र राज्यातील पर्यटन क्षेत्र, औद्योगिक,शैक्षणिक क्षेत्र व ऐतिहासिक दृष्ट्या हे शहर अत्यंत महत्त्वपूर्ण असे आहे मध्ययुगीन काळात हे एक छोटे खडकी म्हणून ओळखले जाते नंतर या शहरात औरंगाबाद असे म्हणून नाव मिळाले पण सध्या हे शहर छत्रपती संभाजी नगर म्हणून ओळखले जाते. या शहरात विविध ऐतिहासिक स्थळे प्रसिद्ध आहेत त्यात अजिंठा लेणी, वेरूळ लेणी, घृष्णेश्वर मंदिर, औरंगाबाद लेणी,बीबी का मकबरा पानचक्की या शहरात आहेत. या शहराला 52 दरवाजाचे शहर असे ओळखले जाते.52 पुऱ्याचे शहर म्हणून ओळखले जात होते.1 या शहरातील विविध प्रवेशद्वारे ही इतिहासाची साक्ष देतात त्यांची बांधकाम शैली अत्यंत उत्कृष्ट होती.या औरंगाबाद शहरांमध्ये अनेक महाद्वार आढळून येतात. हा एक ऐतिहासिक ठेवा आहे. ऐतिहासिक संशोधनासाठी अभ्यासू व्यक्ती पर्यटकांसाठी औरंगाबाद शहर अतिशय महत्त्वपूर्ण आहे या शहराला जवळपास साडेचार वर्षाचा इतिहास आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे -**

1) औरंगाबाद शहरातील ऐतिहासिक महत्त्व जाणून घेणे

2) औरंगाबाद शहरातील ऐतिहासिक वास्तूंचा अभ्यास करणे.

3) औरंगाबाद शहराचे राजकीय व धार्मिक याचा अभ्यास करणे.

संशोधनाची पद्धत - या संशोधनासाठी प्राथमिक उद्योग साधनांचा उपयोग करण्यात आलेला आहे. गॅझेटर्स,मासिके, जर्नल,आर्टिकल, वृत्तपत्रे इंटरनेट याचाही साधन म्हणून उपयोग करण्यात आलेला आहे.

औरंगाबाद शहरात चे ऐतिहासिक महत्त्व - औरंगाबाद या शहराची ऐतिहासिक महत्त्व अनन्यसाधारण आहे या शहराला प्राचीन मध्ययुगीन व आधुनिक इतिहास लाभलेला आहे यादवाच्या काळापासून ते हैदराबाद मुक्ती संग्रामात या शहराची योगदान मोठ्या प्रमाणावर आहे निजामाचे राज्य या शहरावर होते या शहराला मोठ्या प्रमाणावर इतिहास लाभलेला आहे. प्राचीन काळात औरंगाबाद येथे देवगिरीवर रामदेवराय या राजाचे राज्य होते अल्लाउद्दीन खिलजी हा इतिहासातील पहिला मुस्लिम शासक होता ज्याने इसवी सन 1294 मध्ये देवगिरीवर विजय मिळवला. इतिहासकार याच्या रहेला या ग्रंथातून देवगिरीचे वर्णन केलेले आढळून.2 याशिवाय अमीर खुसरो यानेही देवगिरीवर बरीच माहिती लिहिलेली आहे अल्लाउद्दीन खिलजी नंतर मोहम्मद तुगलक यांनी आपली राजधानी देवगिरीला आणली आणि त्याचे नाव बदलून दौलताबाद असे ठेवले.3 मोहम्मद बिन तुगलकानी या शहराला मध्यवर्ती केंद्र ठेवले आणि तेथूनच आपल्या राज्याचा राज्यकारभार केला दौलताबाद म्हणजे दौलतीची नगरी यालाच मराठवाड्याचा मोहना असेही म्हणतात.4 औरंगाबाद शहर भौगोलिक पद्धतीने संपूर्ण खडका भागावर वसलेले होते शहर खडकावर वसलेले असल्यामुळे त्या खडकी असे म्हटले गेले.5 खडकावरून या शहराला प्रथम खडकी नाव संबोधले गेले दख्खन सकाळ दगड बेसाल्ट म्हणून ओळखला जातो ज्वालामुखीतून हा दगड निर्माण झाला या भागात एकावर एक दगडाचा थर निर्माण झाला आणि हा भाग खडकाळ बनला म्हणून त्या खडकी म्हटले या भागात विविध कानाकोपऱ्यातून अनेक कलाकारी येऊन आपल्या कला सादर केलेल्या आहेत.6 त्या आजही आपल्याला दिसून येतात. म्हणून ऐतिहासिक दृष्ट्या हे शहर अत्यंत महत्त्वाचे मानले जाते.

मलिक अंबर याने औरंगाबाद शहराची स्थापना केली खरे रूप देणारा हा शूर सेनानी मलिक अंबर हा होय या शहराला अतिशय सुंदर सुविकसित करण्यामागे त्याचे मोठे योगदान आहे. निजाम शाहिद मलिक अंबरला त्याच्या बुद्धी मते मुळे शिक्षणामुळे व त्याच्या नैसर्गिक युद्धनीती कौशल्यामुळे महत्त्वाचे स्थान होते.7 मलिक अंबर चा मुलगा फतेह खान यांनी मुघलांविरुद्ध विजय मिळवला त्याच्या नावावरूनच इसवीसन 1628 मध्ये खडकी या शहराचे नाव फतेहनगर असे

ठेवण्यात आले.8 खडकी हे शहर मलिक अंबरने निजामशाहीची राजधानी म्हणून निवडलेले होते या शहरांमध्ये सर्व भौगोलिक परिस्थितीचा विचार करून पाण्याचा मूळ प्रश्नांचा विचार करून ग्रीन बंगलो, रॉयल मार्केट,शहागंज हे निर्माण केले.इसवी सन 1616 मध्ये त्याने नवखंडा पॅलेस, मशीद अशा अनेक वास्तू तयार केल्या.9 नवखंडा पॅलेस सध्याचे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, महिला महाविद्यालय चित्ताखाना म्हणजेच टाऊन हॉल काला चबुतरा क्रांती चौक जामा मशीद हमखास मैदान विविध उद्याने विश्रामगृह ऊभी केली आहे. यांशिवाय भडकल दरवाजा हा महत्त्वाचा दरवाजा मलिक अंबरची निर्मिती आहे. या दरवाजाचे मूळ नाव भटकुल किंवा बहरकुल दरवाजा म्हणजे विजयी दरवाजा होय.डॉ. मोरवंचीकर यांच्या मते, त्याच्या या नावावरूनच भडकल पडले असावे. भट्ट याचा अर्थ विर, कल म्हणजे दगड असं ते म्हणतात.10 मलिक अंबरने पाणी पुरवठ्याची सोय व्हावी म्हणून नहर ए अंबरी याची निर्मिती 1624 मध्ये ll केली.11 दिल्ली दरवाजा मुगल सम्राट शहाजहान बादशहा याच्या कारकीर्दीत औरंगजेबाने आपल्या सुभेदरीच्या काळात 1657 मध्ये बांधला आहे.12

यांशिवाय अनेक ऐतिहासिक दृष्टीने हे शहर अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.औरंगाबाद येथील अनेक पुरे लष्करी छावण्याची आठवणी म्हणून शिल्लक आहेत.13शिवाजी महाराजांना पुरंदर तह करण्यास भाग पाडणारा जयसिंग बुरहान पुर येथे मरण पावला.याच्या स्मरणार्थ ओरंगाबाद येथील हरसुल परिसरात राजपूत शैलीचे दगड स्मारक तयार करण्यात आले त्याला जयसिंहाची छत्री म्हणतात.14

**औरंगाबाद येथील गढी व वाडे -**

औरंगाबाद येथे मध्यम काळातील अनेक गढी आणि वारी मोठ्या प्रमाणात दिसून येतात पैठण लाडसावंगी वैजापूर वेरूळ देरेगाव गंगापूर या ठिकाणी आपल्याला अनेक ऐतिहासिक कार्य आणि वारी दिसून येतात या गढी आणि वाड्याने हैदराबाद मुक्तिसंग्रामात आपले महत्त्वाचे योगदान दिलेले आहेत. लाडसावंगी येथे कार्यकर्ते वर्धा कार मध्ये जो मोठा संघर्ष झाला त्याची नोंद औरंगाबाद जिल्हा स्वातंत्र्यसैनिक समिती साठी प्रकाशित जीवावर उदार या पुस्तकात आढळते.15

लेणी -औरंगाबाद शहराला जागतिक पातळीवर ऐतिहासिक स्थान आहे. या शहरात जगप्रसिद्ध वेरूळ लेणी व अजिंठा लेणी आहे या लेणीमुळे औरंगाबाद शहर जागतिक पातळीवर आहे अजिंठा येथील चित्रकला मूर्तिकला स्थापत्य शिल्पे प्रसिद्ध आहेत. अजिंठा लेणी बौद्ध चित्रकलेचा जागतिक जागतिक अविष्कार म्हणून ओळखला जातो येथील 9,10,12,13,15 इत्यादी लेण्या सातवाहन काळात निर्माण झालेल्या आहेत.16 याशिवाय वेरूळ येथील कैलास मंदिर प्रसिद्ध आहे. कैलास लेणे हे आधी माननीकेश्वर म्हणून ओळखले जाईल साक्षात भगवान शंकर आपल्या परिवारासह आणि भक्त गणांसह पृथ्वीवर या ठिकाणी आहे असा भास क्षणाक्षणाला होत असतो.आधी कळस मग पाया या नुसारच कोरण्यास आलेली आहे.17

औरंगाबाद हे शहर जिवंत दस्तऐवज आहे मध्यकाळात आलिशान राजवाडे मकबरे मस्जिद मंदिर बागबगीचे पाण्याचे हौद नहरीतून खळखळणारे पाणी असे या शहराचे रूपांतर झाले औरंगाबादचे ऐतिहासिक ओळख म्हणजे येथील दरवाजे आणि तटबंदी मुघल काळातील सामर्थ्य व भव्य त्याच्या खुणा आजही जागोजागी मोठ्या अभिमानाने उभे आहेत आणि ते औरंगाबादची शान आहे. फ्रेंच प्रवासी थिव न्योट याने औरंगाबाद शहराला भेट दिलेली आहे. त्याने या शहराबद्दल लिहून ठेवले आहे. याशिवाय प्रसिध्द इतिहासकार डॉ ब्रॅडली याने Statistics city of Aurangabad या पुस्तकात या शहराबद्दल लिहून ठेवले होते.18आज ही या शहरातील ऐतिहासिक वास्तूं दिमाखात उभे आहेत. बेगमपुरा परिसर शहराच्या पशचिमेस वसलेला आहे.औरंगजेबाची पत्नी दिलरस बानू बेगम हिला जागीर दिलेली होती.त्याच्या सुरक्षितेसाठी तटबंदी आणि दरवाजे बांधले होते.आजही अवशेष दिसतात.दीलरस बानू बेगम चे येथे महल होते.बिबी का मकबरामध्ये दिलरास बानू बेगम जिला राबिया दौरानी (पदवी) ही मिळाली होती.हिचा मकबरा (कबर) आहे.बेगम पुरा चे म्हतावचे स्मारक म्हणजे थत्ते हौद.येथे नहरी तून पाणी येते.आज थत्ते परीवार येथे राहतात.19

दौलताबाद किल्ला ही वास्तू कलेचा उत्कृष्ठ नमुना आहे. या किल्ल्यातील खंदक, तटबंदी, दरवाजे, तोफा आजही साक्ष देतात.अनेक ऐतिहासिक लढाया याठिकाणी झालेल्या आहेत. नंतर हा किल्ला अल्लाउद्दीन खिलजीने आपल्या ताब्यात घेतला. महाराष्ट्रात देवगिरी सरकार किल्ला नाही.20

अश्या अनेक दृष्टिने औरंगाबादचा एतीहासिक महत्व आहे.

**मूल्यमापन:**

औरंगाबाद शहरांमध्ये अनेक ऐतिहासिक वास्तू आपल्याला दिसून येतात आजही ते इतिहासाची साक्ष देत ताठ मानाने उभे आहेत या औरंगाबाद शहराला मध्ययुगीन काळात खूप महत्त्वाचे स्थान होते. सामाजिक आर्थिक राजकीय सांस्कृतिक व धार्मिक दृष्टीने या शहराला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे अनेक वास्तू या ठिकाणी आजही पाहायला मिळतात अजंठा व वेरूळ या ठिकाणी लाखो पर्यटन भेट देतात जगातील सर्वात प्रसिद्ध लेणी या ठिकाणी आहेत इतिहास प्रेमी संशोधक आज वेगवेगळ्या कारणांनी औरंगाबाद शहरात येतात. काही वास्तूंची पडझड झालेले आपल्याला दिसून येते त्यामुळे पुरातत्त्व खात्याने याकडे लक्ष द्यावे आणि जतन व संवर्धन दृष्टीने कार्य करावे.

**संदर्भ ग्रंथ**

1)डॉ पटेल गणी, कामठे जयवंत, ऐतिहासिक औरंगाबाद तटबंदी आणि दरवाजे, चिन्मय प्रकाशन,औरंगाबाद, 27 नोव्हेंबर 2025, पृष्ठ क्रमांक - 10

2) डॉ. रफत कुरेशी, डॉ दूलारी कुरेशी,औरंगाबाद नामा, विद्या बुक्स पब्लिकेशन औरंगाबाद,2020, पृ. क्र.-30-31

3) किता -32-34

4) कित्ता -35

5) बेंद्रे वा. सी., विजापूरची आदिलशाही,1968, पृष्ठ क्रमांक -272

6) उपरोक्त, पटेल गणी, कामठे जयवंत, ऐतिहासिक औरंगाबाद तटबंदी आणि दरवाजे, पृष्ठ क्रमांक -11

7) उपरोक्त, कुरेशी,दुलारी आणि रफट कुरेशी, औरंगाबाद नामा, पृष्ठ क्रमांक -5

8)Seely John B,Wonder of Ellora,1820,II editions,P.No.-367-369

9)Jadunath Sarkar, History of Aurangjeb,Orient Longmans,1973,p.No-23

10) तिफन,मूर्ती शिल्प, कला व स्थापत्य Journal, डॉ आकाश बोकडे लेख, पृष्ठ क्रमांक -349

11) उपरोक्त, डॉ.कुरेशी, पृष्ठ क्रमांक -11-13

12)औरंगाबाद, पुरातत्त्व खाते अहवाल,

13)दिक्षीत, राजा, समग्र सेतु माधवराव पगडी, खंड -2, महाराष्ट्र साहित्य परिषद, हैद्राबाद,2010, पृष्ठ क्रमांक - 132

14) डॉ. सर सय्यद अहमदखान, असफल सनादित, खंड -2, नवी दिल्ली, पृष्ठ क्रमांक -79

15) जर्नल, महाराष्ट्रातील कला व स्थापत्य (प्राचीन व मध्ययुगीन कालखंड), संपादक डॉ. विनोद बोरसे,1 मे 2023, संकल्प प्रकाशन, सोलापूर, पृष्ठ क्रमांक -281-282

16) ढवळीकर, एम के, वेरूळ लेणी, ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, दिल्ली, पृष्ठ क्रमांक - 78-88

17) वेरुळ लेण्यातील शिल्पं वैभव, राधिका टिपरे, मेहता पब्लिशिंग हाउस,, पुणे,2006, पृष्ठ क्रमांक -119

18) Journal, अखिल महाराष्ट्र इतिहास परीषद, 31 वे राष्ट्रीय अधिवेशन,19-20 जानेवारी 2024,नेवासा, डॉ.किरण काळे यांचा लेख - औरंगाबाद शहराच्या नावाचे स्थित्यंतरे (खडकी ते औरंगाबाद), ISSN No - 2231-4342, पृष्ठ क्रमांक -342-344

19) उपरोक्त, डॉ रफत कुरेशी, पृष्ठ क्रमांक -141-142

20) डॉ. रोडे सोमनाथ, मराठवाड्याचा इतिहास, विद्या पब्लिकेशन औरंगाबाद, जून 2011, पृष्ठ क्रमांक - 293-294

# महाराष्ट्रातील संतांची शिकवण

**प्रा. डॉ. संजय वाकळे**
इतिहास विभाग प्रमुख
कला व विज्ञान महाविद्यालय चिंचोली (लि.)

**प्रस्तावना**

पश्चिम भारतातील एक राज्य. महाराष्ट्र हे असंख्य संत, दृष्टे,आणि अध्यात्मिक नेत्यांचे घर राहिले आहे. ज्यांनी या प्रदेशाच्या सांस्कृतिक सामाजिक आणि तात्विक परिदृश्याला आकार दिला आहे.मराठीत "संत" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या संतांनी महाराष्ट्राच्या आध्यात्मिक वारसावर अमित छाप टाकली आहे.

शतकानोशतके पसरलेल्या त्यांच्या शिकवणी मानवी स्थिती वास्तवाचे स्वरूप आणि अध्यात्मिक मुक्तीच्या मार्गाबद्दल अंतर्दृष्टी देताना महाराष्ट्रातील संत विविध पार्श्वभूमीतून आले होते आणि विविध जाती, पंथ आणि समुदायाचे होते. तरीही त्यांच्या शिकवणीमध्ये एक समान धागा आहे. त्यांच्यात करुणा, प्रेम,आणि आत्मसाक्षात्कारावर त्यांनी भर दिलेला आहे. मध्ययुगीन काळातील संतांनी महाराष्ट्रातील समाजाला एक नवीन विचार पद्धती दिलेली दिसून येते. ती विचार पद्धती साधी सरळ सोपी व बोली भाषेतून होती म्हणून महाराष्ट्रातील माणसांना ती चटकन पचनी पडलेली दिसून येते. असे असले तरीही संतांच्या मूळ कार्याचे स्वरूप परमेश्वर प्राप्ती समर्पित भावाने अशा स्वरूपाचे होते. हे कार्य करीत असताना संतांनी समाजात राहून समाजाला मार्गदर्शन ठरेल असे कार्य त्यांनी केलेले होते. असे कार्य ज्ञानेश्वरापासून ते तुकाराम महाराजापर्यंत सतत चालू होते ह्या चळवळीची व्याप्ती मोठी होती. म्हणून या चळवळीला भक्ती चळवळ असे नाव पडले ही भक्ती चळवळ महाराष्ट्रातील पंढरपूरच्या विठ्ठल मंदिराच्या चारही बाजूने विठ्ठलाला समर्पित असल्याचे दिसून येते. संतांनीही कार्य करीत असताना जे समाजामध्ये राहून कार्य केले त्यामध्ये त्यांनी कोणत्याही धर्मग्रंथावर अंधविश्वास ठेवला नाही. कोणत्याही वाईट परंपरा किंवा कर्मकांडांना थारा दिला नाही तसेच ते मूर्ती पूजेच्या विरोधात होते. त्यांनी कधी जातीभेद केला नाही किंवा पाळला नाही. त्यांचा एकेश्वर वादावर विश्वास होता. त्यांच्या मते ईश्वर भक्ती हा मोक्ष मिळवण्याचा एकमेव मार्ग होता भक्तीचा अर्थ कोणतीही अपेक्षा न बाळगता ईश्वराप्रती समर्पित होणे. ही समर्पितता त्यांच्या मते नोकर आणि मालकावर, मित्राने मित्रावर, आईने मुलावर, प्रियकराने प्रियसीवर जे निस्वार्थ प्रेम असते. तसेच भक्ताचे त्यांच्या ईश्वरावर प्रेम व्हावे.देव देवळात न राहता तो माणसाच्या मनात वास करतो म्हणून या सर्व शरीराची व मनाची शुद्धता असल्याशिवाय परमेश्वरापर्यंत पोहोचणे शक्यच नाही. त्यांच्या मते मोक्ष मिळणे म्हणजे ईश्वरी प्रसादच होईल आणि हा ईश्वरी प्रसाद मिळवण्यासाठी ज्याच्या त्यानेच स्वतःची योग्यता सिद्ध करून ईश्वरी प्रसाद मिळवायला पाहिजे. स्वतःची योग्यता सिद्ध करणे म्हणजेच ईश्वराप्रति संपूर्ण समर्पण करणे होय. मध्ययुगीन काळात महाराष्ट्रात मुस्लिम सत्ता स्थापन झाल्यामुळे हिंदू धर्माचा कोणीही वाली नव्हता अशा परिस्थितीत संतांनी महाराष्ट्रीयन समाजामध्ये प्रबोधन करून एक नवीन जागृती करण्याचा प्रयत्न केल्याचा दिसतो. हे करीत असताना त्यांनी धार्मिक कर्मकांडापेक्षा ईश्वरी भक्तीला जास्त महत्त्व दिले धार्मिक विधीतील कनिष्ठता दूर करून सर्वसामान्यांना धर्माचे आचरण करता यावी म्हणून प्रयत्न केलेले दिसते.

**संशोधनाची उद्दिष्टे:-**

1) महाराष्ट्रातील संतांच्या शिकवणीचा शोध घेणे.

2) महाराष्ट्रातील समाज आणि संस्कृती वरील संतांचा प्रभाव अधोरेखित करणे.

संतांची शिकवण:- संत तुकाराम महाराज संत एकनाथ महाराज यांनी संसार करून परमार्थ केला त्यांना बायका होत्या तसेच त्यांना मुलेही होतील त्यांनी समाजाला असे कधीच सांगितले नाही की संसार सोडून द्यावा आम्हाला राग पासून संदेश घ्या त्यांनी उलट संसार व मुले बायका यांचा योग्य पद्धतीने सांभाळ करूनच परमार्थ केला पाहिजेत. असे सांगितले हे सांगत असताना संत तुकाराम महाराज आपले अभंगातून सांगतात की

'जोडोनिया धन उत्तम व्यवहारे उदास विचारे वेंचकरी
उत्तम ची गती तो एक पावेल उत्तम भोगीला जीव खाली

परोपकारी नेने परनिंदा पर स्त्रियासदाबहिणी सदा माया'.

म्हणजेच तुकाराम महाराजांच्या मते माणसांला संन्यास घेऊन ईश्वर भेटतो किंवा मुक्ती मिळते असे नसून माणसाने उत्तम रितीने संसार करून परमार्थ साध्य करता येतो व त्यातूनच माणसाला मोक्ष मिळू शकतो.

ईश्वर नामातून मुक्तीचा मार्ग-:

प्राचीन काळापासून ब्राह्मण वगळता समाजातील इतर वर्गांना वेद, ब्राह्मणे पुरवणे वाचण्याचा किंवा यज्ञा होमवन करण्याचा अधिकार नव्हता. म्हणून मध्यगापर्यंत महाराष्ट्रातील जनता परमेश्वरापासून व मुक्ती पासून कोसो मैल दूर होती हे अंतर कमी करण्याचे काम भक्ती चळवळीतील व इतर संतांनी केलेली दिसून येते त्यांच्या मते ईश्वर प्राप्ती किंवा मोक्ष मिळवण्यासाठी कर्मकांड करण्याची गरज नाही तिथे फक्त नामस्मरणाची गरज आहे व हे नामस्मरण करण्यासाठी फक्त भक्ती व श्रद्धा लागते व ती समाजातील जनतेजवळ मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे म्हणून एक शब्द जाती जन्माला आलेली संत जनाबाई नामस्मरण करत असताना आपण स्वतः पांडुरंग झाले अशी ग्वाही देते.

"अखंडित ध्यानी पांडुरंग जपे वाणी! पांडुरंग नामजप! हेचि माझे महातप ऐसे आले प्रत्यायासी! सहजनेने तत्व मसी"

वरील काव्यामधून आपण पाहू शकतो की सामान्य माणूस ईश्वरचरणी जर ध्यान लावून बसला तर त्याला देव प्राप्ती झाल्याशिवाय राहत नाही ही सर्व कृपा ही सर्व संतांची जाणीव त्यांच्या शिकवणीतून आलेली दिसते.

महाराष्ट्रातील संतांचे अध्यात्मिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि नैतिक जीवनावर महत्त्वपूर्ण प्रभाव आहे. त्यांची शिकवण केवळ भक्तीसाठी नव्हे, तर समाजसुधारणेसाठीही प्रेरणादायी ठरली आहे.

**महाराष्ट्रातील प्रमुख संत आणि त्यांची शिकवण:-**

**1. संत ज्ञानेश्वर (1275-1296)**

संत ज्ञानेश्वरांनी 'ज्ञानेश्वरी' आणि 'अमृतानुभव' यासारखी ग्रंथ लिहिले.

त्यांनी अद्वैत वेदांत आणि भक्ति यांचा समन्वय साधला.त्यांची शिकवण 'जगत गुरु, संत गुरु, आत्मगुरु' यावर आधारित होती.

त्यांनी मानवतेचा आणि कर्मयोगाचा संदेश दिला.

**2. संत नामदेव (1270-1350)**

नामदेव महाराज कीर्तनकार होते आणि त्यांच्या अभंगांमधून त्यांनी भगवंताशी संवाद साधला.त्यांचे विचार समतेवर आधारित होते, ते म्हणायचे "सर्वत्र राम पाहे" म्हणजेच ईश्वर सर्वत्र आहे.त्यांनी समाजातील भेदभाव नाकारला आणि निर्गुण भक्तीवर भर दिला.

**3. संत एकनाथ (1533-1599)**

त्यांनी "भागवत धर्म" रुजवला आणि संस्कृत ग्रंथांचे मराठीत रूपांतर केले.

त्यांची शिकवण सहिष्णुता, समता आणि समाजसेवेवर आधारित होती.त्यांनी सामाजिक एकतेवर भर देत ब्राह्मण आणि अस्पृश्य यांना समान मानले.ते म्हणत "सर्वज्ञ ईश्वर सर्वत्र आहे".

**4. संत तुकाराम (1608-1649)**

त्यांनी विठोबाच्या भक्तीत संपूर्ण जीवन अर्पण केले.त्यांची शिकवण कर्मयोग, सत्य, अहिंसा, आणि समाजसुधारणा यावर होती.

ते म्हणत "जे जे भेटेल तयाला ते ते साहाय्य करावे", म्हणजेच दयाळूपणे मदत करावी.

त्यांनी कष्टकरी लोकांसाठी विचार मांडले आणि भक्तीला सामाजिक सुधारणा जोडली.

**5. संत रामदास (1608-1681)**

त्यांनी 'दासबोध' आणि 'मनाचे श्लोक' लिहिले.त्यांनी भक्ती आणि राष्ट्रभक्ती यांचा संगम घडवून आणला.त्यांची शिकवण कर्मयोग, स्वावलंबन, आणि राष्ट्रसेवा यावर होती.शिवाजी महाराजांच्या राज्यकारभारावर त्यांचा मोठा प्रभाव होता.

**6. संत बहिणाबाई (1628-1700)**

त्या संत तुकारामांच्या शिष्य होत्या आणि स्त्री संत म्हणून प्रसिद्ध आहेत.त्यांनी घरगुती जीवनात भक्ती आणि संतविचार रुजवले.त्यांच्या अभंगातून स्त्रीशिक्षण, समानता आणि भक्तीचा प्रचार झाला.

संतांची शिकवण आणि आधुनिक समाज:-

महाराष्ट्रातील संतांची शिकवण आजही तितकीच महत्त्वाची आहे. त्यांचे विचार समाज सुधारण्यास मदत करतात.

1. समता आणि बंधुता : संतांनी जातीभेद नाकारला आणि समानतेचा संदेश दिला.आजच्या समाजातही त्यांची शिकवण जातीयवाद नष्ट करण्यासाठी उपयुक्त आहे.

2. कर्मयोग आणि आत्मनिर्भरता : संत रामदासांनी कर्मयोगाचा संदेश दिला.

आजच्या तरुणांनी आत्मनिर्भरता आणि परिश्रम यावर भर द्यावा.

3. स्त्री-सशक्तीकरण :बहिणाबाईसारख्या संतांनी स्त्रियांच्या हक्कांबाबत जागृती केली.आजच्या स्त्रियांसाठीही हे विचार महत्त्वाचे आहेत.

4. अहिंसा आणि शांतता : संत तुकाराम आणि संत नामदेव यांनी अहिंसेचा संदेश दिला.आजच्या समाजात हे विचार शांततेसाठी आवश्यक आहेत.

5. आध्यात्मिक आणि नैतिक मूल्येसंतांनी नैतिक जीवनाचा आग्रह धरला. आधुनिक समाजानेही सत्य, प्रेम, करुणा आणि निस्वार्थी सेवा आत्मसात करावी.

निष्कर्ष

महाराष्ट्रातील संतांचे विचार आजही समाजाच्या मार्गदर्शनासाठी उपयुक्त आहेत. त्यांच्या शिकवणीने समता, प्रेम, आणि कर्मयोगाचा संदेश दिला आहे. आधुनिक युगातही त्यांच्या विचारांचा अवलंब केल्यास समाजात एकता, सहिष्णुता आणि विकास होईल. म्हणूनच, संतांच्या विचारांचा अभ्यास करून त्यांचा स्वीकार करणे आवश्यक आहे.

**संदर्भसूची**


1. रा. चिं. ढेरे- संत साहित्याचा इतिहास
2. –डॉ. राम शेवाळकर- महाराष्ट्रातील संत परंपरा
3. पु. ग. सहस्रबुद्धे- संत वांग्मय आणि समाज सुधारणा
4. वा. ल. कुलकर्णी- संत तुकारामाचे विचार आणि तत्त्वज्ञान
5. ग. ह. खरे- महाराष्ट्रातील संतांची सामाजिक भूमिका
6. डॉ. अनुराधा पाटील- संत बहिणाबाई एक अभ्यास
7. श्री. स. ग. भट- संत साहित्य आणि वारकरी संप्रदाय
8. ह. ना. आपटे- वारकरी संप्रदाय आणि त्याचा प्रभाव
9. कोलते वि.भि. - मराठी संताचे सामाजिक कार्य, प्रकाशन तत्रालय मलकापूर,1994.
10. पठाण यु.म.- मध्ययुगीन महाराष्ट्र सामाजिक आणि सांस्कृतिक जीवन,मी.रा..आ.1, औरंगाबाद 2002.

# शिवस्वराज्याला लाभलेले सह्याद्रीचे अधिष्ठान : एक अभ्यास

**डॉ. दिनेश आर. कचकुरे**
इतिहास विभाग,
श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

**प्रस्तावना :**

स्वतंत्र व सार्वभौम शिवस्वराज्याला पर्यावरणाचे, भौगोलिकतेचे अधिष्ठान लाभलेले होते. महाराष्ट्राच्या दक्षिणोत्तर पसरलेल्या सह्याद्री पर्वताच्या रांगा, सह्याद्रीचा घाटमाथा, पश्चिमेला असलेला अरबी समुद्र व त्याला लागून असलेली कोकणची किनारपट्टी, महाराष्ट्र पठार किंवा देश, नदीप्रणाली, हवामान, पर्जन्यमान, वनसंपत्ती, खनिजसंपत्ती इ. पर्यावरणीय घटकांच्या प्रभावामुळे शिवस्वराज्याच्या उदय आणि विकासाला मोठा हातभार लागला. यापैकी सह्याद्री पर्वत आणि त्यावरील गडकोट यांना शिवस्वराज्याचे आधारस्तंभ मानावे लागते. सह्याद्रीने केवळ महाराष्ट्राचे हवामान, पर्जन्यमान, वनस्पती यावरच परिणाम केला असे नाही तर महाराष्ट्र समाज, संस्कृती व इतिहासही त्याने घडविला आहे. उत्तरेत हिमालयाचे, मध्यप्रदेशात विंध्य पर्वताचे जे स्थान आहे तेच स्थान दक्षिण भारतात आणि विशेषतः महाराष्ट्रात सह्याद्री पर्वताचे आहे. लाव्हारसापासून तयार झालेल्या अग्निजन्य ज्वालामुखी बेसाल्ट खडकांनी हा पर्वत तयार झाला आहे. सह्याद्रीची मुख्य रांग पश्चिम किनारपट्टीला समांतर असून ती उत्तरेस तापी नदीपासून दक्षिणेस कन्याकुमारी पर्यंत तीचा विस्तार झाला आहे. महाराष्ट्र, कर्नाटक, केरळ, तामिळनाडू या राज्यातील जवळपास 1600 कि.मी. विस्तारापैकी 640 कि.मी.विस्तार एकट्या महाराष्ट्रात आहे. समुद्रसपाटीपासून या पर्वताची उंची 800 ते 1000 मीटर आहे. महाराष्ट्रात सह्याद्री पर्वतातून पूर्वेकडे सातमाळा-अजिंठा डोंगररांग, हरिश्चंद्र-बालाघाटाची डोंगररांग आणि शंभू महादेव डोंगररांग या तीन डोंगररांगा पसरलेल्या आहेत. अहमदनगर जिल्ह्यातील कळसुबाई हे शिखर (5400 फुट) सह्याद्रीतील सर्वात उंच शिखर आहे.

सह्याद्रीमुळेच महाराष्ट्राची कोकण, देश, घाटमाथा, मावळ अशी नैसर्गिक विभागणी झाली आहे. महाराष्ट्राचा पश्चिम समुद्र किनारा आणि किनाऱ्याला समांतर असलेली सह्याद्री डोंगररांग यांच्या मधल्या भागात असलेल्या भूमीचा पट्टा म्हणजे कोकण होय. महाराष्ट्राला 720 कि. मी. लांबीची कोकण किनारपट्टी लाभलेली आहे. कोकणात जाणाऱ्या घाटाच्या उंच भागावर सपाट माथ्याचे, पठारासारखे भाग आढळतात, त्यांना घाटमाथा म्हणतात. कोकणात जाणाऱ्या घाटाच्या उंच भागावर सपाट माथ्याचे, पठारासारखे भाग आढळतात, त्यांना घाटमाथा म्हणतात. कोकण व देश यांच्या दरम्यान असलेल्या नाणेघाट, आंबाघाट, माळशेजघाट, बोरघाट, फोंडाघाट, थळघाट, वरंधा घाट, राजमाची घाट, पारघाट अशा अनेक घाटावरून या प्रदेशाला घाटमाथा हे नाव मिळाले. कोकण आणि देश यांच्या दरम्यान मध्ययुगीन काळात वाहतूक आणि दळणवळणासाठी या घाटमार्गांचा वापर केला जात होता. हरिश्चंद्रगडाच्या पहाडापासून ते फोंडा घाटापर्यंत सह्याद्रीच्या अत्युच्च शिखराच्या व पठाराच्या स्वरुपात या घाटमाथ्याचा विस्तार झाला आहे. या भागाची लांबी सुमारे 200 मैल व रुंदी सुमारे 50 मैल आहे.[1] शिवनेरी, रायगड. प्रतापगड, विशालगड, सिंहगड इ. शिवकालीन गडकोट घाटमाथ्यावर असल्याने शिवस्वराज्याच्या दृष्टीकोनातून हा भूभाग फार महत्वाचा होता.

महाराष्ट्राच्या पश्चिमेस घाटमाथ्यालागत सह्याद्रीच्या कुशीत असलेल्या नद्यांच्या खोऱ्याना मावळ म्हणतात. मावळ म्हणजे ज्या दिशेला सूर्य अस्ताला जातो, त्या मावळतीकडील भूभाग किंवा खोरी होय.[2] घाटमाथ्यालगतच्या या भागात विपूल पर्जन्यामुळे तसेच नद्यांच्या खोऱ्यामुळे विपूल तांदूळ पिकतो. सद्यकाळात या मावळ भागात पुण्यातील जुन्नर, सासवड, खेड, मावळ, भोर या तालुक्यांचा समावेश होतो. या मावळ भागात अंदर मावळ, नाणे मावळ, पवन मावळ, गुंजन मावळ, कर्यात मावळ, हिरडस मावळ, खेडेबारे मावळ इ. मावळाचा तसेच पौंड खोरे, भोर खोरे, कानद खोरे,मोसे खोरे, वेळवंड खोरे, रोहिडखोरे या खोऱ्यांचा समावेश होतो.[3] मध्ययुगात याच मावळ भागात शिवरायांनी मराठेशाहीचा पाया घातला.

अशाप्रकारे सह्याद्रीच्या भौगोलीकतेतून महाराष्ट्रात उंच डोंगररांगा, दुर्गम दऱ्याखोऱ्या, घनदाट अरण्ये, घाटमाथा, घाटमार्ग, नदीप्रणाली, पर्जन्यमान, मावळ व खोरी यांची जडणघडण झाली. सह्याद्रीच्या याच अनुकूल भौगोलिक परिस्थितीचा मराठेशाहीच्या उदय व विकासात मोठा हातभार लागला. सह्याद्रीच्या सानिध्यातच मराठेशाहीची संकल्पना रुजली. सह्याद्रीच्या बारा मावळ प्रांतातच शिवरायांनी मराठेशाहीच्या स्थापनेला सुरुवात केली.मावळ भागातील कर्यात मावळात असलेली लहानमोठी 36 गावे ही शिवरायांची मुळची जहागीर होती.[4] पुण्याला येताच शिवरायांनी बारा मावळे काबीज केली.[5] मावळ प्रांत स्वराज्य स्थापनेला अनुकूल आहे, हे हेरून हा मुलुख आणि येथील मावळ्यांचे सहकार्य मिळविण्यात शिवराय यशस्वी झाले. याच मावळ भागातून शिवरायांना कान्होजी जेधे, तानाजी मालुसरे, नेताजी पालकर, बाजीप्रभू देशपांडे, सूर्याजी काकडे, मुरारबाजी इ.कर्तबगार मावळे शिवकार्यासाठी लाभले.

कर्यात मावळाला लागून असलेल्या रोहिडखोऱ्यात रोहिरेश्वराच्या मंदिरात शिवराय आणि त्याच्या मावळ्यांनी स्वराज्य स्थापनेची शपथ घेतली. "श्री रोहिरेश्वर... त्यानी आम्हास यश दिल्हे. पुढे तो सर्व मनोरथ हिंदवी स्वराज्य करून पुरविणार आहे."[6] असा उल्लेख शिवपत्रात येतो. म्हणजेच श्री रोहीडेश्वर सह्याद्रीतील स्वराज्यदाता ठरतो. स्वराज्य स्थापनेच्या शपथेनंतर शिवरायांनी सर्वप्रथम प्रचंडगड उर्फ तोरणा गड जिंकून घेऊन मराठेशाहीच्या कार्याला सुरुवात केली. पुढे वेळवंड खोऱ्यालगत असलेल्या मुरुंबदेवाचां डोंगर शिवरायांनी काबीज केला. हा मुरुंबदेवाचा डोंगर म्हणजेच स्वराज्याची पहिली राजधानी राजगड होय. साकी मुस्तेदखान त्याच्या मासिरे आलमगिरी या ग्रंथात राजगडचे वर्णन करताना म्हणतो, "राजगड अतिशय उंच. त्याची उंची पाहता सर्व किल्ल्यात तो श्रेष्ठ होय. त्याचा घेर बारा कोसाचा आहे. गडाच्या डोंगराच्या दऱ्याखोऱ्यातून आणि घनघोर अरण्यातून वाऱ्याशिवाय दुसरे कोणीही फिरकू शकत नाही. येथे पावसालाच फक्त वाट मिळू शकते."[7] सह्याद्रीतील असा दुर्गम किल्ला शिवस्वराज्याची पहिली राजधानी बनला.

सह्याद्रीने मराठेशाहीतील मावळ्यांचा स्वभाव घडवला. मावळ्यांना आपल्यासारखा कणखरपणा, झुंजारपणा दिला. स्वराज्य स्थापण करताना आवश्यक असलेली स्वातंत्र्यप्रियता ही सह्याद्रीची देण होती. गो.नी.दांडेकर म्हणतात "सह्याद्रीने महाराष्ट्रीकांना जगावे कसे ते शिकविले आणि मरावे कसे, तेहि शिकविले."[8] म्हणजेच तत्कालीन राजकीय गुलामगिरीतून स्वतंत्र होण्याचे पाठ सह्याद्रीनेच मराठ्यांना दिले. शिवराय आणि मराठेशाहीसाठी आपल्या प्राणाचे बलिदान देणाऱ्या मावळ्यांच्या कृतीमागे सह्याद्रीची उदात्त प्रेरणा दिसते. सह्याद्री पर्वत लाव्हारसाचे थरावर थर बसून तयार झाला आहे. त्या तप्तरसात टणक द्रव्याचे म्हणजेच लोहासारख्या धातूचे प्रमाण जास्त होते. यामुळे सह्याद्रीला लोखंडासारखा कणखरपणा आला.[9] सह्याद्रीच्या घटकात लोखंडाचा भाग जास्त असल्याने तो शक्तिमान, बळकट आणि कोणतेही आघात सहन करण्यास समर्थ बनला. सह्याद्रीचा हाच कणखरपणा काटकपणाच्या रूपाने या डोंगररांगात जन्म घेतलेल्या आणि सह्याद्रीचे लोहयुक्त पाणी पिलेल्या लोकांत अवतरला आहे.म्हणजेच सह्याद्रीने जशी महाराष्ट्राच्या भूमीची घडण केली तशीच महाराष्ट्रीकांच्या मनोभूमीचीही घडण केली. सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यात राहणारे, खडतर आयुष्य जगणारे, कष्ट करणारे, धाडसी, पराक्रमी, कणखर, झुंजार, स्वातंत्र्यप्रिय, एकनिष्ठ असे मावळेच शिवस्वराज्याचे आधारस्तंभ बनले.

सह्याद्रीने मराठेशाहीत जे दुर्गम उंच कडे, खोल दऱ्याखोऱ्या, डोंगरावरील विस्तीर्ण सपाट भूभाग, प्रदान केला, त्यावर बुलंद तट उभारून व त्याची दुरुस्ती करून शिवरायांनी गडकोटांच्या साखळ्या निर्माण केल्या आणि मराठेशाहीचा विस्तार घडवून आणला. स्वराज्याची दुसरी राजधानी रायगडविषयी शिवाजी महाराज म्हणतात "चखोट जागा, तीन गाव उंच, कड्यांवर कुठे पाखरू उतरायलासुद्धा जागा नाही, असा बेलाग कडा. एकांड्या डोंगर. तेव्हा ही जागा तख्तास बहुत उत्तम."[10] शिवरायांच्या या उद्गारावरून मराठेशाहीच्या इतिहासाचे भौगोलिक परिस्थितीशी किती निकटचे नाते होते, याची कल्पना येते. इतिहासकार एस.एन.सेन म्हणतो, "शिवाजीच्या स्वराज्यात अशी एकही टेकडी उरली नव्हती, जिथे संरक्षणासाठी चौक्या व पहारे लावले नव्हते. कोणतेही ठिकाण त्यांनी किल्ला बांधल्याशिवाय सोडले नाही."[11] म्हणजेच शिवरायांनी सह्याद्रीचा घाटमाथा, मावळ, देश, कोकण या सर्व भागात गिरिदुर्ग व जलदुर्ग उभारले. तत्काळात मुघल, आदिलशाही, निजामशाही यांच्यापासून संरक्षणासाठी तसेच राज्याच्या विस्तारासाठी हे गडकोट उपयोगी ठरले. "संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग."[12] हे रामचंद्रपंत अमात्यही आज्ञापत्रात मान्य करतात. छत्रपती शिवाजी महाराजांना आपल्या गड्लक्ष्मीचा फार मोठा आधार वाटत होता. "दिल्लीन्द्रासारखा शत्रू उरावर आहे. तो आला तरी नवे जुने 360 किल्ले हजरतीस आहेत. एकेक किल्ला वर्ष वर्ष लढला तरी त्याला 360 वर्ष पाहिजेत."[13] शिवदिग्विजय बखरीत आलेल्या या

उल्लेखावरून शिवरायांना आपल्या किल्ल्यांबद्दल किती विश्वास वाटत होता, हे स्पष्ट होते. शिवरायांचा हा विश्वास या किल्ल्यांनी त्यांच्या आणि संभाजी महाराजांच्या निधनानंतर 27 वर्ष औरंगजेबाशी लढा देऊन आणि राज्य सुरक्षित ठेऊन सार्थ ठरवला आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी सह्याद्रीच्या भौगोलिकतेशी, प्रकृतीशी गनिमी कावा या युद्धनितीची सांगड घातली. या युद्धनितीला सह्याद्रीसारखा लाभदायक, दुर्गम, अनुकूल इतर दुसरा प्रदेश नव्हता. याच सह्याद्रीच्या साथीने गनिमी कावा युद्धतंत्राचा जन्म होऊन त्याचा विस्तार झाला आणि तो उत्कर्षाला जावून पोहचला. दुर्गम डोंगररांगा, अवघड घाटवाटा, घनदाट अरण्ये या अनुकूल भौगोलीकतेमुळे शिवरायांनी शत्रूंना हैराण करून सोडले. सह्याद्रीचा हा प्रदेश इतका दुर्गम होता की, सूर्याची किरणेही येथे पोहचू शकत नव्हती. असा दाट घनदाट झाडीचा हा प्रदेश होता. फेरीस्ता सांगतो त्याप्रमाणे "यातील घाटवाटा इतक्या वाकडयातिकड्या व दुर्गम होत्या की, त्यांची तुलना केसांच्या कुरळेपणाशी केली तरी बरोबरी होणार नाही."[14] अशा या दुर्गम घाटमार्गावर नियंत्रण ठेवण्यासाठी शिवकाळात अनेक किल्ल्यांची उभारणी केली गेली. महाबळेश्वर जवळच्या पार (आंबेनळी) घाटावर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रतापगड, भोरघाटाजवळचा लोहगड, आंबा घाटाजवळचा विशालगड इ. किल्ल्यांची निर्मिती करण्यात आली.[15] जावळीच्या दुर्गम खोऱ्यात अफजलखानाचा केलेला पाडाव आणि उंबरखिंडीच्या लढाईत मुघल अधिकारी कारतलबखानाचा केलेला पराभव ही शिवरायांच्या गनिमी कावा युद्धतंत्राची प्रमुख उदाहरणे सांगता येतात. याच युद्धतंत्रामुळे शत्रूंनी शिवरायांना 'डोंगरातील उंदीर' असे संबोधले आहे.[16]

सन 1663 मध्ये शिवरायांनी मोगलांच्या बडेजावी सरदारांना खरमरीत पत्र पाठवले होते. त्यात ते म्हणतात "औरंगजेब बादशहा हुकुम फर्मवितात 'शिवाजे किल्ले व मुलुख काबीज करा.' तुम्ही जवाब पाठवता 'आम्ही लवकरच काबीज करतो.' मोगल सरदारांना कल्पना नाही आमचा मुलुख किती कठीण आणि दुर्धर आहे ते. आमच्या मुलुखातून तुमचे घोडदळ हाकणे तर सोडाच, पण तुमच्या कल्पनेतील घोडा सुद्धा नाचवणे कठीण आहे. मग तो प्रदेश काबीज करणे दूरची गोष्ट आहे. आमचा प्रदेश अवघड आणि डोंगराळ आहे. नदीनाले उतरून जाण्यास वाट नाही. अमीर उल उमरा व शाएस्तेखान आमच्या गगनचुंबी डोंगरात व पातालास पोहचणाऱ्या खोऱ्यात तीन वर्ष सारखा खपत होता. पण त्याचा परिणाम त्याला भोवला."[17] शिवरायांच्या या पर्शियन पत्रातून तत्कालीन दुर्गम पर्यावरणीय परिस्थिती तसेच सह्याद्रीबद्दल त्यांच्या मनात असलेला आदर, निष्ठा आणि दुर्दम्य विश्वास व्यक्त झाला आहे. यावरून सह्याद्रीरुपी पर्यावरणाचे आणि मराठेशाहीचे नाते किती घनिष्ठ होते, याचा प्रत्येय येतो.

मराठेशाहीच्या अंतर्गत येणाऱ्या सह्याद्रीरूपी प्रदेशाची खडानखडा भौगोलिक माहिती शिवरायांना होती. अशी माहिती काढण्यासाठी शिवराय स्वतंत्र हेर पाठवीत असे व त्यासाठी पुष्कळ पैसाही खर्च करत असे. म्हणजेच देशज्ञान हा शिवरायांच्या कर्तबगारीचा पाया होता. अबेकरे हा फ्रेंच प्रवासी आपल्या 'Foreign Biographies of Shivaji' या ग्रंथात शिवरायांच्या भौगोलिक ज्ञानाविषयी उल्लेख करतो की, "शिवरायांचा सद्यस्थितीतील उत्कृष्ट अभियंतापेक्षाही किल्ल्यांबाबत तसेच भूगोलाबाबत विशेष अभ्यास होता. शिवराय पर्यावरण तज्ञ होते. मराठेशाहीतील बारीक सारीक गावांची भौगोलिक माहिती त्यांना तेथील जमीन व झाडांच्या आराखड्यासह माहित होती."[18] याच भौगोलिक माहितीचा तसेच देशज्ञानाचा शिवरायांना जावळीच्या खोऱ्यात अफजलखानाचा, उंबरखिंडीत कारतलबखानाचा, पुण्याच्या लालमहालात शाहिस्तेखानाचा पाडाव करण्यासाठी झाला.

अशाप्रकारे मराठेशाहीची स्थापना, विकास व विस्तारात सह्याद्री हा निडरपणे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पाठीशी उभा राहिला. शिवरायांनी सह्याद्रीच्या भौगोलिक वैशिष्ट्यांचा अतिशय कल्पकतेने व दूरदृष्टीने उपयोग करून, अजिंक्य असे किल्ले उभारून माराठेशाहीचे राज्य बळकट केले. यामुळे पुढील काळात मुघल बादशहा औरंगजेब आणि त्याच्या चार लाखाच्या फौजेच्या विरोधात लढण्याकरीता व राज्याच्या रक्षणाकरिता मराठे सदैव तयार राहू शकले. थोडक्यात सह्याद्री – शिवस्वराज्य यांच्या घनिष्ठ संबंधातून शिवरायांच्या नेतृत्वाखाली स्वराज्यरुपी नूतन सृष्टी निर्माण झाली.

**निष्कर्ष :**

1. शिवकालीन भौगोलिक, पर्यावरणीय पार्श्वभूमी शिवस्वराज्याच्या उदयाला आणि विकासाला अनुकूल होती.
2. भौगोलिकदृष्ट्या सह्याद्री हाच महाराष्ट्राचा निर्माता व मूलाधार आहे. सह्याद्रीने महाराष्ट्र समाज व संस्कृती आणि

इतिहास घडविला आहे.

3. स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवणारे शिवरायांसारखे धाडसी व कुशल योद्धे आणि सह्याद्रीच्या सानिध्यातील प्रदेश या दोघांचा एकत्र संबंध आल्याने त्यातून मराठेशाहीचा पाया घातला गेला.
4. शिवाजी महाराजांनी सह्याद्रीच्या दुर्गम डोंगररांगांचा उपयोग करून गिरिदुर्ग उभारले. किल्ल्यांच्या साखळ्या निर्माण करून शिवस्वराज्याचा विस्तार घडवून आणला. त्यांचे सर्व आयुष्य किल्ल्यावरच व्यतीत झाले. त्यामुळे शिवाजी महाराज खऱ्या अर्थाने गडपती, सह्याद्रीपती आणि पर्वतपुरुष ठरतात.
5. शिवरायांचा जन्म झाला तो शिवनेरी, आणि मृत्यू झाला तो रायगड, या दोन्ही गडांची पहिली दोन अक्षरे मिळून शिवराय हे नाव तयार होते. यावरून आपणास सह्याद्रीवरील गडकोट आणि छत्रपती शिवराय यांचा घनिष्ठ संबंध लक्षात येतो.
6. सह्याद्री आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्यातील अद्वेत नात्यामुळे 'शिवराय- सहयाद्री-गडकोट' ही तीन महाराष्ट्राची शक्तीपीठे बनली.
7. सह्याद्री पर्वत आणि त्याची दुर्गम भौगोलिक वैशिष्ट्ये हे गनिमी कावा युद्धतंत्राचे उगमस्थान ठरतात. या तंत्राचा उपयोग करून शिवरायांनी वारंवार स्वराज्याचे रक्षण केले.
8. औरंगजेबासारख्या आशिया खंडातील बलाढ्य बादशाहाला त्याच्या आयुष्याच्या शेवटपर्यंत मराठा राज्य जिंकता न येण्याचे मूळ सह्याद्री – मराठेशाही यांच्या घनिष्ठ संबंधात दिसते.
9. शिवरायांचे देशज्ञान, मराठा प्रदेशाचे भौगोलिक ज्ञान यामुळे शिवाजी महाराज हे मध्ययुगातील उच्चकोटीचे भूगोलतज्ञ, पर्यावरणतज्ञ होते, हे सिद्ध होते.

**संदर्भ :**

1. जोगळेकर सदाशिव आत्माराम, सह्याद्री, शुभदा – सरस्वत प्रकाशन, पुणे, पृष्ठ 42.
2. पगडी सेतूमाधवराव, छत्रपती शिवाजी, नशनल बुक ट्रस्ट, इंडिया, पृष्ठ 8.
3. उपरोक्त जोगळेकर सदाशिव आत्माराम, पृष्ठ 48.
4. उपरोक्त, जोगळेकर सदाशिव आत्माराम, पृष्ठ 50.
5. जोशी शंकर नारायण (संपा), सभासद बखर, वरदा प्रकाशन, पुणे, पृष्ठ 11.
6. केळकर नरसिंह चिंतामण (संपा), सह्याद्री मासिक, केसरी – मराठा कचेरी, पुणे, पृष्ठ 297.
7. पगडी सेतुमाधवराव, मराठे व औरंगजेब (खंड – 3) ज्ञानराज प्रकाशन, पुणे, पृष्ठ 456.
8. दांडेकर गोपाळ निळकंठ, महाराष्ट्र दर्शन, मृण्मयी प्रकाशन, पुणे, पृष्ठ 96.
9. उपरोक्त, केळकर नरसिंह चिंतामण (संपा), पृष्ठ 186.
10. उपरोक्त, जोशी शंकर नारायण (संपा), पृष्ठ 67.
11. सेन एस.एन. मराठ्यांची लष्करी व्यवस्था, डायमंड पब्लिकेशन, पुणे, पृष्ठ 67.
12. खोले विलास (संपा) आज्ञापत्र, लोकवाडमय गृह प्रकाशन, मुंबई, पृष्ठ 77.
13. उपरोक्त, जोगळेकर सदाशिव आत्माराम, पृष्ठ 114.
14. उपरोक्त, जोगळेकर सदाशिव आत्माराम, पृष्ठ 101.
15. कुलकर्णी अ.रा. आणि खरे ग.ह. मराठ्यांचा इतिहास (खंड – 1) कॉन्तीनेन्तल प्रकाशन, पुणे, पृष्ठ 324.
16. शेजवलकर त्र्यंबक शंकर, श्रीशिवछत्रपती, मराठा मंदिर प्रकाशन, मुंबई, पृष्ठ 61.
17. देशपांडे प्र. न. छत्रपती शिवाजी महाराजांची पत्रे, राजवाडे संशोधन मंडळ, धुळे, पृष्ठ 158.
18. उपरोक्त, शेजवलकर त्र्यंबक शंकर, पृष्ठ 454.

# पुरातत्वीय दृष्टीने प्राचीन भारताचा इतिहास

**प्रा. डॉ. एस. के. कमळकर**
इतिहास विभागप्रमुख
स्वामी विवेकानंद महाविद्यालय मंठा जि जालना

**प्रस्तावना :**

गतकाळात होऊन गेलेल्या घटनांचा सत्याच्या कसोटीवर शोध म्हणजे इतिहास होय. या इतिहासाच्या शोध मोहिमेत जी अस्सल साधने लागतात ती पुरातत्वीय शास्त्रानुसार हाती येतात.

इतिहास हा निसर्ग, मानव, प्राणी इत्यादी विषयात घडून गेलेल्या घटनांचे संगतवार आणि काळानुसार मुद्देसूद स्वरूप असते.

प्रत्येक भुभागाला नैसर्गिक विविधता आणि वैशिष्ट्ये असलेले स्वरूप असते. त्यालाच आपण देश संबोधून भौगोलिक मर्यादा आखून, त्यातील होऊन गेलेल्या घटनांचे संकलन करणे म्हणजे त्या देशाचा इतिहास होय.

जगाच्या व्याप्तीत मानवी संस्कृतीचा भूतकालीन मागोवा घेताना, अनेक प्रकारचे मानव आणि त्यांनी

जीवन जगत असताना आलेल्या अडचणी, त्यातून काढलेले मार्ग, सामूहिक जीवन, कला इत्यादी विषयांचा अभ्यास होतो. विशिष्ट भुभागात गतकालीन घडून गेलेल्या घटनांचे पुराव्यानुसार संकलन म्हणजे त्या त्या देशाचा इतिहास होय.

भारताचा इतिहास संशोधन करताना भाषेचा अभ्यास, लिपीचा अभ्यास, शिलालेख ताम्रपट अभ्यास,जुनी नाणी, अलंकार, चित्रे, शिल्प,साहित्य, स्थापत्य, परंपरा इत्यादी विषयांचा सखोल अभ्यास असावा लागतो.

वेळोवेळी पुरातत्वीय दृष्टीने झालेल्या उत्खणनातून तसेच परदेशीं प्रवाश्यांच्या प्रवास वर्णनातून भारतीय इतिहासाचे अनेक पैलू उलघडले गेले. भारतात इतिहास लिहिण्याची परंपरा दिसून येत नाही. असली तरी अतिरंजित किंवा अतिशयोक्तीने भरलेली राजे महाराजे यांची वर्णणे असे त्यांचे स्वरूप आहे. पुढील काळात तर त्यांचे देवत्व करण्याचे कथानक समाजात रूढ झालेले दिसून येते.

या सर्व पार्श्वभूमीवर भारताचा पुरातत्वीय दृष्टीने जो इतिहास आपल्या समोर येतो त्याचा मागोवा प्रस्तुत शोध निबंधात घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**उद्देश :**

प्रस्तुत शोध निबंधाचा उद्देश भारतीय भुभाग आणि त्यातील सामाजिक रचना,राजवटी,कला यांचा ऐतिहासिक दृष्ट्या थोडक्यात आढावा घेणे हा आहे.

**साधने :**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी विविध ग्रंथ आणि त्यावर आधारित पुस्तके यांचे संदर्भ घेण्यात आलेले आहेत.

**विषय मांडणी** :

भारतीय उपखंड भूगोल, प्राचीन संस्कृती, ग्रांथीक वर्णणे,संस्कृती, समाज या दृष्टीने मांडणी केली आहे.

**भारतीय प्राचीन इतिहास पुरातत्व संशोधक :**

पाश्चात्य इतिहासकारांनी भारतीय इतिहासाला पुरेसा न्याय न दिल्यामुळे काही प्रमुख भारतीय इतिहासकारांनी खूप परिश्रम घेऊन नव्याने संशोधन करून मांडणी केली.सिंधू संस्कृतीचा शोध लावण्यात भारतीय आणि इंग्रजी पुरातत्वशास्त्रज्ञांचा मोलाचा वाटा आहे. दया राम साहनी यांनी 1921 मध्ये रावी नदीच्या काठावर हडप्पा हे शहर शोधले.

रखालदास बॅनर्जी यांनी 1922 मध्ये मोहेंजो-दारो शोधले. सिंधू संस्कृतीचे प्रथम अवशेष हडप्पा येथे सापडले म्हणून नव्यानेच शोधलेल्या या संस्कृतीला हडप्पा संस्कृती असे म्हणतात. प्राचीन स्थळांचा शोध घेण्यासाठी सर्वेक्षण करणे, निवडलेल्या पुरातत्त्वीय स्थळाचे उत्खनन करणे, मिळणाऱ्या सर्व अवशेषांची नोंदणी करणे, अवशेषांचे विश्लेषण करून उपलब्ध पुराव्यांचा अर्थ लावणे आणि संशोधनामागे असलेल्या सिद्धांतकल्पनांच्या संदर्भात उद्दिष्टे गाठली किंवा

नाही हे बघून अहवाल प्रकाशित करणे, हे पुरातत्त्वीय संशोधनाचे मुख्य टप्पे असतात. पुरातत्व विषयात काम करणारे प्रमुख भारतीय अधिकारी म्हणजे देवदत्त भांडारकर, दयाराम साहनी, का. ना. दीक्षित, माधो स्वरूप वत्स, न. प. चक्रवर्ती, अमलानंद घोष, बि. बि. लाल, म. न. देशपांडे, बाळकृष्ण थापर, श्रीमती देबला मिश्र हे होत.

भारताला फार प्राचीन आणि तोही वाखाणण्याजोगा इतिहास आहे सरस्वती नदीच्या काठी पहिल्या संस्कृतीचा उदय झाला आहे. भारताला इतिहासच नाही हे मत पाश्चात्यांनी रूढ केले होते मात्र त्या मताला खोडून टाकणारे संशोधन, मोहोन्जदारो, हडप्पा, लोथल, राखीगडी, फर्माना येथे सापडलेल्या मुद्रा व अन्य पुराव्यावरून करून हे सिद्ध झाले आहे की भारतात प्राचीन सुसंकृत संस्कृती नांदत होती.

**भारतीय उपखंड भूगोल :**

इतिहास आणि भूगोल यांचा परस्पर संबंध असतो. इतिहास हा भूगोलाचा अलंकार असतो. भूगोलाची अनुकूलता ऐतिहासिक घडामोडीला पुष्टी देते.

भारताची भू -सीमा 15200 कि. मी. तर सागरी व्याप्ती 6100 कि. मी. विस्तीर्ण आहे. उत्तर, वायव्य, ईशान्य दिशेला असलेल्या पर्वतीय प्रदेश व इतर दिशांना असलेला समुद्र या मूळे भारत आशिया खंडातील इतर देशांपासून वेगळा झालेला आहे. भारताची दक्षिणोत्तर लांबी 3214 कि. मी. तर पूर्व पश्चिम रुंदी 2933 कि. मी आहे. भारताचे एकूण क्षेत्रफळ 32,87,263 चौ. कि. मी. भरते.

भारताचे भौगोलिक दृष्ट्या चार भागात विभाजन करता येईल. 1.हिमालयाची पर्वतराजी.2.गंगेचे खोरे. 3.मध्य भारताचे आणि दख्खनचे पठार. 4.समुद्रकिनारी प्रदेश.

या चारही प्रदेशात भारतीय समाज विखूरलेला असून त्या ठिकाणी मानवी विविधतेतून भारतीय संस्कृती उदयास आलेली दिसून येते[1].

**प्राचीन संस्कृती :**

उत्तरेकडील हिमालयामुळे परकीय आक्रमणाला पायबंद बसण्याच्या दृष्टीने नैसर्गिक कवच भारताला प्राप्त झाले आहे. हिमालयाच्या अटकाव्यामुळेच मान्सूनच्या पावसाचा भारताला लाभ होतो.हिमालयाच्या पायथ्याशी निर्माण झालेले खोरे म्हणजे गंगा, सिंधू आदी नद्यांच्या व त्यांच्या उपनद्यांच्या भागात भारतीय प्राचीन संस्कृतीचे अवशेष पाहवयास मिळतात.

प्रगैतिहासिक काळ म्हणजे पुरातत्वीय दृष्टीने 20 लाख वर्षांपूर्वीचा काळ. ऐतिहासिक काळ म्हणजे मानवाला लिहिण्याची कला अवगत झाली तो साधारण पाच हजार वर्षांपूर्वीचा काळ होय.

ताम्र पाषाण युग म्हणजे या मधील काळाचा टप्पा होय.

इ. स. 1863 मध्ये रॉबर्ट ब्रुस यांना चेन्नई जवळ पल्लावरम येथे प्राचीन मानवाचे दगडी हत्यार सापडले.पाच हजार वर्षांपूर्वी असलेल्या हजारो वर्षातील भारतीय अश्मयुगीन मानवाच्या इतिहासाचा तो पुरावा होता.सुमारे तीन लाख वर्षांपूर्वी काश्मीर आणि पंजाबात सोहन नदीच्या काठी राहणाऱ्या मानवाची दगडी हत्यारे सापडली आहेत.

पुढील काळात नवाश्मयुगीन संस्कृती सुमारे दहा हजार वर्षांपूर्वी सुरु झाली. भारतातील तिचा पायरव सुमारे साडेचार हजार वर्षांपूर्वीचा आहे. त्या वेळी सिंध, पंजाब, आणि गुजरात, राजस्थान या भागात सिंधू सरस्वती संस्कृती भरभराटीस आली होती.

ओडिसा आणि आसाम मधील नवाश्मयुगीन संस्कृती तीन हजार वर्षांपूर्वी असावी असे पुरातत्व तज्ञांचे मत आहे[2].

पुराश्मयुगातील मानव रानटी होता. नर्मदे काठाच्या अनेक गुहेत त्या काळची अश्मास्त्रे सापडली आहेत.

नवाश्मयुगात तो जमिनीत खड्डे करून घरे बांधून राहू लागला.अशी घरे श्रीनगरच्या उत्तरेस बुर्झोम या गावी आढळली आहेत[3]. दक्षिणेत टेक्कल कोट्टा, आंध्र प्रदेश येथील उत्खननात अशी घरे असल्याचे पुरावे मिळाले आहेत[4]. नवाश्म काळात कला कौशल्य मानवाने हस्तगत केले. सोन्याचा शोध लावला. चित्रकला अवगत झाली. गुजरात मधील लांघजन येथे उत्खननात मृतदेहा शेजारी जीवनात उपयोगी असणाऱ्या वस्तू आढळल्या आहेत.

ताम्र पाषाण युगातील सिंधू संस्कृतीचे पुरावे उजेडात आणण्याचे श्रेय भारतीय पुरातत्व खात्याचे राखालदास बॅनर्जी यांचे कडे जाते.

आलेक्झांडर कनिंगहॅम, माधवस्वरूप वत्स, सर जॉन मार्शल इत्यादीनी इ. स. 1920 ते 1932 या काळात विस्तृत उत्खनन व संशोधन करून सिंधू संस्कृतीचे अवशेष शोधून भारताचा प्राचीन इतिहास शोधून काढला. स्वातंत्रोत्तर काळात ही मोहनजोदरो आणि हडप्पा ही शहरे फाळणीमुळे पाकिस्तानात गेल्यावर भारतात या संस्कृतीच्या समकालीन शहरे शोधण्याचे काम करण्यात आले.

भारतात सिंधू नदी व्यतिरिक्त सरस्वती या गुप्त झालेल्या नदीच्या खोऱ्यात देखील संस्कृती स्थळांचा शोषण लागला आहे. या संस्कृतीचे अवशेष पंजाब, बलुचीस्थान, राजस्थान आणि गुजरात प्रदेशात मिळाले आहेत. कलिंगबन हडप्पा येथील उत्खननावरून असे लक्षात आले कि तत्पूर्वी एक ग्रामीण संस्कृती येथे नांदली होती. या संस्कृतीचा काळ इसविसन पूर्व 4000 ते 2500 असा मानण्यात येतो[5].

सिंधू संस्कृतीची वैशिष्ट्ये म्हणजे नागरी जीवनपद्धती, अलंकार निर्मिती, शिल्पकाम, विकसित नगररचना, सांडपाण्याची व्यवस्था, सार्वजनिक स्नानगृह, धान्यकोठार ही होत. गुजरात लोथल येथे समुद्र व्यापार संबंधित गोदी देखील सापडली आहे. लोथल येथे अतिप्राचीन तांदूळ देखील सापडला आहे. पाळीव प्राणी अवशेष देखील वस्तीत आढळून आले.या संस्कृतीत केशभूषा, वेशभूषा, अलंकार आदी बाबतीत विकास झालेला आढळून आला. मनोरंजनाची साधने म्हणून खेळ, शिकार, वादन, नर्तन इत्यादी प्रकार असत. सिंधू संस्कृतीत मृदभांडी, मुद्रा आढळून आल्या.या संस्कृतीची एक लिपी देखील दिसून येते.ही लिपी वाचण्याचे प्रयत्न चालु आहेत. मोहोंजोदरो या संस्कृतीतील लोक हे ऑस्ट्रोलॉईड, मेडिटरेनियन, अल्पाईन व मंगोलीयन या प्रकारचे होते. प्रो. सरकार यांचे मते हडप्पा येथील लोक पंजाबी, मोहनजोदरो येथील सिंधी, गुजरात येथील गुजराती प्रमाणेच होते[6].

मोहोनजोदारो येथील नाशाला भूकंपाचे कारण होते. भूकंपामुळे सिंधू नदीचे पाणी समुद्रा ऐवजी नागरी वस्तीत घुसून तिचा नाश झाला.कालिंगबन येथील संस्कृती सरस्वती व दृषद्वती नद्या कोरड्या पडल्यामुळे नष्ट झाली. गुजरात मधील लोथल बंदरात गाळ साचून संस्कृती लयास गेली.

एकंदरीत या सिंधू व सरस्वती नदी काठच्या संस्कृतीचा उगम, विकास आणि नाश या बाबत पुरातत्वज्ञ आजही संभ्रमात आहेत.

सिंधू संस्कृती केवळ मोहनजोदरो-हडप्पा पुरती मर्यादित नसून ती सिंध पंजाब व्यतिरिक्त बलूच, राजस्थान, गुजरात पर्यंत पसरली होती. नवीन उत्खननात चहुंदारो, आम्री, रुपड, नल, लोहोमजोदारो,अलीराढ, झुकड, अलोर, लोथल, रंगपुर, लखब्बल, सोमनाथ, धोलाविरा, फर्माना, राखीगढ, इत्यादी ठिकाणी या संस्कृतीच्या पाऊल खुणा सापडतात. घागरा हकरा या नद्या काठी या संस्कृतीचे अवशेष आढळून आले आहेत.

**आर्य संस्कृती :**

भारतात आर्य मूळचे कि बाहेरचे या बाबत मत मतांतरे आहेत.त्यांचा काळ इसविसन पूर्व 1500 ते 1000 मानला जातो. आर्यांची वैदिक संस्कृती होती. सिंधू आणि वैदिक या दोन संस्कृतीत मूलभूत फरक असावा असे सिंधू संस्कृतीच्या उतखणनातून हाती आलेल्या पुराव्यावरून दिसते. आर्यांच्या ऋग्वेदातील संस्कृती इसविसन पूर्व 1500 या काळातील असावी[7].

काही भारतीय पंडितांचे मते सप्तसिंधू चा प्रदेश म्हणजे पंजाब हेच आर्यांचे मूळ वसतीस्थान असावे कारण सप्त सिंधुचा "देवनिर्मित देश" असा वेदात उल्लेख केला आहे.

वैदिक वाङमय हे आर्यांचे अतिप्राचीन वाड.मय होय. यात ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद यांचा समावेश होतो. ऋग्वेदाचा काळ इ. पूर्व एक हजार असा निश्चित केला गेला आहे. ऋग्वेदात यज्ञ प्रसंगी देवांचे वर्णन करणाऱ्या ऋचा आहेत. साम वेदात गायन, यजुर्वेदात यज्ञकांड तर अथर्ववेदात तंत्र यातू विद्या वगेरे चा भाग आहे.

संहिता, ब्राह्मण्ये, आरण्यके, उपनिषद वगेरे आर्यांच्या व वाङमयातून त्यांच्या संस्कृतीचा अभ्यास करता येतो.

आर्य संस्कृती ही पितृप्रधान होती. आर्य स्त्री देखील पंडिता असल्याचे दिसते. विश्ववारा, अपाला, घोषा वगैरेनी मंत्र रचले होते[8]. एकत्र कुटुंब रचना होती. ते मांसाहारी देखील होते. शाकाहारात दूध, तांदूळ, फळे, भाज्या समावेश होता.

वेशभूषा साधी होती. पुरुष अधोवस्त्र व उत्तरीय वापरत तर स्त्रिया कटीवस्त्र व चोळी वापरत.

आर्यांची उपजीविका शेतीवर अवलंबून होती.

वस्तूंच्या आदलबदल करून व्यवहार होत असे. या कामी गायीचा देखील उपयोग होत असे.

आर्य लोकांना आपले वर्चस्व प्रथापित करण्यासाठी इथल्या आदिवासिंशी लढावे लागले. आर्यांच्या सैन्यात पायदळ व रथ असत. ऋग्वेदातील दाशरज्ञ युद्ध प्रसिद्ध आहे. या युद्धात सुदास राजाने प्रचंड विजय मिळविला.

वैदिक वाड.मयातून आलेल्या यज्ञाच्या उल्लेखावरून आर्यांच्या धार्मिक जीवनात कर्मकांडाचे महत्व होते हे दिसून येते. पशुबली दिला जात असे. इंद्र, अग्नी, सूर्य, पृथ्वी, उषस, मरुत, वायू, अश्विन इत्यादी देवता महत्वाच्या होत्या.

**उत्तर वैदिक काळ :**

ऋग्वेदोत्तर काळात संहिता ग्रंथ, ब्राह्मण्ये, आरण्यके आणि उपनिषद ग्रंथ तयार झाले. या ग्रंथाचा काळ इ. स. पू. 4000 ते 1000 मानला जातो. तर काही अभ्यासक इ. स. पू. 1000 ते 600 असा मानतात.

उत्तर वैदिक काळात वैदिक संस्कृतीचा विकास पूर्वेकडे झाला. नवीन वसाहती व राज्याची निर्मिती झाली. यात अंग आणि बंग याचा समावेश होतो.

या काळात समाज कृषिप्रधान झाला. गहू, जव, तांदूळ, मूग, उडीद यांचे उत्पादन होत असे. चातुरवर्ण व्यवस्था रूढ झाली[9]. याच्यातूनच पुढे जात व्यवस्थेचा जन्म झाला.

या काळात पक्की घरे बांधली जाऊ लागली.समाज पुरुषप्रधान होता. विवाह करणे हे पुत्रोत्पन्न करण्यासाठी महत्वाचे मानले गेले याच बरोबर पितृऋणातून मुक्त होण्यासाठी विवाह आणि पुत्र महत्वाचा मानला गेला. तैत्रिय संहितेने पुरुषाचे बहुपत्नीत्व मान्य केले आहे मात्र स्त्रीचे बहूपतित्व मान्य केलेले नाही[10].

उपनिषद म्हणजे गुरुच्या जवळ बसून जे ज्ञान प्राप्त केले आहे त्यास उपनिषद म्हणून ओळखले गेले[11]. उपनिषदात प्रामुख्याने तत्वज्ञान सांगितले आहे.

**महाकाव्य काळ :**

भारतीय इतिहासाचा आढावा घेताना रामायण आणि महाभारत या महाकाव्यांना विचारात घ्यावे लागते.राक्षस आणि आर्य संस्कृतीचा झगडा यातून स्पष्ट होतो. भाऊबंदकी, राज्यतंत्र, व गणतंत्र शासन पद्धतीची चुरस, त्याच बरोबर अनेक सामाजिक व दार्शनीक विषय, मतमतांतराची चर्चा, मुत्सदगिरीचे डावपेच या महाकाव्यातून पाहवयास मिळतात.

रामायणाचे उल्लेख महाभारतात आहेत या वरून रामायण हे आधीचे ठरते. रामायणाचे आजचे स्वरूप हे इ. स. पहिल्या व दुसऱ्या शतकात प्राप्त झाले असावे. असे असले तरी महाभारत मूळ कथा

रामकथेहून प्राचीन आहे पाणिनीने (इ. पू. 5वे शतक ) वासुदेव, अर्जुन, युधिष्टीर यांचा उल्लेख केला आहे परंतु त्याने रामाचा उल्लेख केला नाही. यावरून रामायण वाल्मिकीने इ. पू. 4थ्या शतकात रचले असावे, असे विद्वानांचे मत आहे

महाभारत मूळ कथेत नंतर अनेक भाग प्रक्षिप्त करण्यात आले. त्यामुळे जय, भारत व महाभारत अशा टप्प्यानी मूळ कथेची वाढ झाली. प्रक्षिप्त भाग केंव्हा घुसडला हे सांगता येत नाही त्यामुळे महाभारत काव्य रचनेचा काळ सांगणे कठीण आहे. विंटरनिटज याच्या मते आजचे महाभारताचे स्वरूप इ. पू 4थे शतक ते इ. स. 4थे शतक या दरम्यानचे असावे. परंतु कौरव पांडव युद्ध हे इ. पू. 1400 ते 1000 या काळात कधीतरी लढले गेले असावे, असे विद्वानांचे मत आहे.[12]

या काळात राजा सर्वोच्च अधिकारी होता. धर्मगुरूला राज्यात राजाचा सल्लागार म्हणून महत्व होते. परंतु युद्ध प्रसंगी राजा धर्मगुरूंचा सल्ला फारसा मानीत नसे. उच्च वर्णाच्या स्त्रीने नीच वर्ण पुरुषासोबत विवाह केल्यास "प्रतिलोम" आणि उच्च वर्ण पुरुषाने नीच वर्ण स्त्रीशी विवाह केल्यास "अनुलोम" विवाह म्हटला जाई. त्यांच्या संततीस हीन स्थान दिले जात असे. ग्राम रचनेत ग्रामाधीपती मुख्य असे. या काळात गो हत्या वर्ज्य मानली गेली. आहारात तांदळाचा ज्यास्त वापर होता. स्त्रिया एकवस्त्र वापरत. अधोवस्त्र आणि उत्तरीय अशी वेशभूषा दिसून येते. व्यापार उद्योग वैश्याच्या हाती होता. मूर्तिपूजा फारसी दिसत नाही. वैदिक देवते बरोबरच शिव आणि विष्णू या देवतेचे महत्व वाढलेले दिसून येते. यज्ञ, श्राद्ध, व्रत वैकल्ये यांचे महत्व होते.

महाकाव्य काळानंतर बौध्द धर्म, जैन धर्म वाढीस लागल्याचे दिसून येते. पुढे विष्णुच्या दशअवतारात बुद्ध एक अवतार मानला गेला.

**निष्कर्ष :**

1. केवळ राजेमहाराजे यांचे अतिशयोक्ती वर्णन एव्हडेच भारतीय इतिहासाचे स्वरूप नसून सिंधू सरस्वती नदीच्या काठी एक उन्नत संस्कृती प्राचीन भारतात नांदत होती हे उतखननातून सिद्ध झाले आहे.
2. मोहोनजोदारो हडापा व्यतिरिक्त भारतात इतरत्र तशीच समकालीन संस्कृती नांदत असल्याचे दिसून येते.
3. प्राचीन संस्कृती नाश पावण्यास जसा भूकंप कारणीभूत ठरला तसेच नद्याच्या पुरामुळे व नद्याचा प्रवाह बदलल्यामुळे नद्या कोरड्या पडल्यामुळे देखील संस्कृतीचा नाश झाला.
4. सिंधू आणि वैदिक या दोन संस्कृतीत मूलभूत फरक असावा असे सिंधू संस्कृतीच्या उत्खननातून हाती आलेल्या पुराव्यावरून दिसते.
5. ऋग्वेद काळापेक्षा उत्तर वैदिक काळात चातुर्वण्य व्यवस्था दृढ झाली. त्यातून जात व्यवस्थेचा जन्म झालेला दिसतो.
6. उत्तर वैदिक काळात पितृऋणातून मुक्त होण्यासाठी विवाह आणि पुत्र महत्वाचा मानला गेला.
7. महाकाव्य काळात राक्षस आणि आर्य या भिन्न संस्कृतीचा संघर्ष पाहवयास मिळतो.
8. सिंधू संस्कृती ते महाकाव्य काळ या दरम्यान प्राचीन भारताचे सामाजिक बदलते स्वरूप हे वर्ण जात व्यवस्था यांच्या उदयास कारणीभूत दिसून येते.

**संदर्भ :**


1. डॉ. गो. ब. देगलूरकर, प्राचीन भारतीय इतिहास संस्कृती, अपरांत प्रकाशन पुणे 2015,पान क्रं. 1-2.
2. तत्रैव, पृ. क्रं. 27.
3. तत्रैव, पृ. क्रं. 29.
4. तत्रैव, पृ. क्रं. 29.
5. तत्रैव, पृ. क्रं. 35.
6. तत्रैव, पृ. क्रं. 47-48.
7. तत्रैव, पृ. क्रं. 54.
8. तत्रैव, पृ. क्रं. 59.
9. प्रदीप म्हैसेकर, डॉ.नभा काकडे, धम्मपाल माशाळकर, भारताचा प्राचीन इतिहास, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, पृ. क्रं. 243.
10. तत्रैव, पृ. क्रं. 253.
11. तत्रैव, पृ. क्रं. 262.
12. डॉ. गो. ब. देगलूरकर, प्राचीन भारतीय इतिहास संस्कृती, अपरांत प्रकाशन पुणे 2015, पृ. क्रं. 87.

# भारतातील राजकीय प्रसारात सातवाहन घराण्याचे योगदान

**डॉ. रमाकांत बबनराव गव्हाणे**
श्री. शरदचंद्रजी पवार वरिष्ठ महाविद्यालय, नारंगवाडी

**घोषवारा :**

सातवाहन घराण्याने भारताच्या दक्षिण भागात स्थैर्य निर्माण करून राजकीय आणि सामाजिक समन्वय घडवून आणला. सातवाहन काळात साम्राज्य विस्तार, प्रशासन व्यवस्था, व्यापार-उद्योग, आणि सांस्कृतिक विकास यामध्ये लक्षणीय विकास झाल्याचे दिसून येते. गौतमीपुत्र सातकर्णी आणि वाशिष्ठीपुत्र पुलुमावी यांसारख्या राजांनी शक्तिशाली प्रशासन प्रणाली स्थापन केली, तसेच प्राकृत भाषेच्या विकासास त्यांनी चालना दिली. बौद्ध धर्माचे संरक्षण, आंतरराष्ट्रीय व्यापाराचा प्रसार, आणि लष्करी स्थैर्य यामुळे सातवाहन कालखंड भारताच्या राजकीय इतिहासात एक सुवर्णयुग मानले जाते. या लेखामध्ये सातवाहन घराण्याच्या राजकीय प्रसारातील योगदानाची सविस्तर माहिती घेण्यात आली आहे.

**प्रस्तावना:**

सातवाहन राजवंश हा महाराष्ट्राचा पहिला ज्ञात ऐतिहासिक राजवंश होय.सातवाहन घराणे (इ.स.पू. 230 ते इ.स. 230) भारताच्या इतिहासातील एक महत्त्वाचे राजघराणे होते, ज्यांनी दक्षिण भारत, विशेषतः महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, तेलंगणा, आणि कर्नाटक या प्रदेशांवर आपला प्रभाव प्रस्थापित केला. सातवाहन घराण्याचा उगम महाराष्ट्रात झाला. आधुनिक नाशिक येथे सत्तेचे केंद्र बनवून दख्खनच्या उत्तरोत्तर भागामध्ये आपल्या राज्याची स्थापना केली. सातवाहनांना आंध्रदेशीय पण म्हणतात. या घराण्याने मौर्य साम्राज्याच्या पतनानंतर भारतीय उपखंडाच्या दक्षिण भागात आपले साम्राज्य उभे केले. सातवाहन राजे "आंध्र" म्हणूनही ओळखले जातात. त्यांनी 300 वर्षांहून अधिक काळ राज्य केले. यांचा मुख्य उद्देश उत्तरेकडील शक आणि कुशाण आक्रमणांना रोखणे तसेच दक्षिण भारतात स्थैर्य निर्माण करणे हा होता. उत्तर भारतात एकछत्री सत्ता मौर्यांनी स्थापन केली तसीच दक्षिण भारतात एकछत्री सत्ता स्थापन करण्याचे कार्य सातवाहनांनी केले. सातवाहनांच्या उदयापासूनच महाराष्ट्राचा राजकीय इतिहास,सामाजिक व धार्मिक स्थिती, आर्थिक स्थिती, साहित्य कला व स्थापत्य इ. माहिती मिळते.त्यांनी भारतीय समाज, संस्कृती, प्रशासन, आणि राजकीय संरचनेवर मोठा प्रभाव टाकला. त्यांच्या कारकिर्दीत भारतीय उपखंडात सांस्कृतिक आणि आर्थिक समृद्धी अनुभवायला मिळाली.

**संशोधन विषयाचे उद्धेश:-**

1) सातवाहन राजांचा साम्राज्य विस्ताराची माहिती घेणे.
2) सातवाहनांची सांस्कृतिक, धार्मिक, व सामाजिक योगदानाची माहिती घेणे.
3) सातवाहनांची चलन व्यवस्था व आर्थिक योगदानाची माहिती घेणे.

**सातवाहन घराण्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी**

सातवाहनांचा कालखंड हा प्राचीन भारताच्या इतिहासातील सुवर्णयुगाचा कालखंड होय.सातवाहनानी सलग 460वर्षे राज्य केले.“सातवाहनानी सत्तेचा राजकीय केंद्रबिंदू महाराष्ट्रात पैठण(प्रतिष्ठान) येथे आणला व पैठणला सातवाहनांची राजधानी बनवले.दख्खन आणि मध्य भारत येथे मौर्यांनंतर जवळजवळ त्या वर्षांच्या कालावधीनंतर सातवाहन वारसदार ठरले. पुराणांत ज्यांचा आंध्र म्हणून उल्लेख केला आहे तेच सातवाहन होत. पुराणांमध्ये आंध्रांच्या राज्याचा उल्लेख आहे”[1].सातवाहनांनी हळूहळू कर्नाटकात व आंध्रमध्ये आपल्या सत्तेचा विस्तार केला. “सातवाहनांचे साम्राज्य महाराष्ट्रातच निर्माण झाले व ते पूर्वेकडे पसरले. पूर्वेकडे राज्य विस्तार झाल्यावर त्या प्रदेशाला आंध्र असे नाव पडले.कालांतराने आंध्राचे पश्चीमेकडील राज्य शक-कुशाणांच्या आक्रमणामध्ये नष्ट झाले व ते आंध्रातच वास्तव्य करू लागले.म्हणून पुराणात त्यांना आंध्र देशीय म्हटले गेले”[2.] शकांनी उत्तर दख्खन व पश्चिम भारतात सत्ता प्रस्थापित केली होती. एका अवस्थेत शकांनी सातवाहनांना पश्चिम भारतातील आणि महाराष्ट्रातील सत्तेवरून दूर केले. सुदैवाने गौतमीपुत्र सातकर्णी (इ. स. 106-130) याने सातवाहन घराण्याची सत्ता पुनर्प्रस्थापित केली. त्याने शकांचा पराभव करून अनेक क्षत्रिय राज्यकर्त्यांचा नायनाट केला.

सातवाहन साम्राज्याच्या संस्थापकाचा स्पष्ट उल्लेख आढळत नाही, 'सातवाहन' हा सातवाहन वंशाचा मुळ पुरूष होता. त्याच्या नावावरूनच त्याच्या वंशाला सातवाहन हे नाव पडले.सुरुवातीस त्याने मूलक(गोड-प्रवरा-बिन्दुसागरव दुधना) व अश्मकाचे राज्य जिंकून सातवाहन वंशाची स्थापना केली"[3]. पैठण येथील उत्खननात त्याची अश्वछाप नाणी सापडली आहेत.सातवाहन याने किती वर्षे राज्य केले व सिमुक याच्याशी त्याचे कोणते नाते होते या बद्धल माहिती मिळत नाही. परंतु पहिला महत्त्वाचा राजा "सिमुक" होता. सिमुकने मौर्य साम्राज्याच्या पतनानंतर अनेक लहान संस्थाने जिंकून आपल्या राज्याचा पाया घातला.

**1.सातवाहन घराण्याचे राजकीय प्रसारातील योगदान:-**

**सिमुक**:-

सातवाहन साम्राज्याचा पहिला राजा सिमुकने आपले राज्य महाराष्ट्र आणि विदर्भ भागात विस्तारले. त्याने स्थानिक राजे आणि प्रतिस्पर्ध्यांना पराभूत करून साम्राज्य स्थापन केले."पुराणातील माहितीनुसार त्याने कण्व घराण्याचा शेवटचा राजा सुदार्मन याला पद्च्युत करून शुंगांची सत्ता नष्ट करून आपले राज्य प्रस्थापित केले.सिमुख याने 23 वर्षे राज्य केले.त्याने संपूर्ण महाराष्ट्र जिंकून 'दक्षिणापथपती' ही पदवी धारण केली"[4].

**श्री. सातकर्णी पहिला :**

श्री सातकर्णीच्या काळात सातवाहनांची राजकीय प्रतिमा उंचावली. सिमुक या राजाचा पुत्र सातकर्णी हा अल्पवयीन असल्याने सिमुकचा भाऊ कृष्ण याने जवळपास 18 वर्षे राज्यकारभार चालवला.त्यानंतर सातकर्णीने सत्ता आपल्या हाती घेऊन सातवाहन घराण्याच्या सत्तेचा प्रसार केला. त्याने स्वतःच्या नावापुढे 'अप्रतिहतचक्र' ही उपाधी लावली होती. तो 'दक्षिणपथपती' या नावानेही ओळखला जाई. श्री सातकर्णी याने मध्य व पश्चिम भारत तसेच दक्षिण भारतात आपल्या सत्तेचा विस्तार केला होता. कलिंग देशाचा राजा खारवेलच्या सेनेला वैनगंगातीरी पौनी येथे श्री सातकर्णीच्या फौजेने प्रतिकार केल्यामुळे परत जावे लागले. श्री सातकर्णीची शूर, वीर, धर्मनिष्ठ व दानशूर म्हणून कीर्ती होती. तो धार्मिक वृत्तीचा होता. श्री सातकर्णीच्या पत्नीचे नाव नागनिका होते. त्याने श्रोतयाग, दोन अश्वमेध व एक राजसूय यज्ञ केल्याची नोंद आहे.

सातकर्णीनंतर पूर्णोत्संग हा गादीवर आला असा उल्लेख पुराणात केलेला असला तरी नागनिकेच्या नाणेघाटातील लेखावरून सातकर्णीनंतर त्याचा व नागनिकेचा पुत्र वेदिश्री याने राज्य केले.वेदिश्री लहान असल्याने त्याच्या नावाने नागनिकेने सातवाहनांचा राज्यकारभार सांभाळला. वेदिश्रीच्या मृत्यूनंतर नागनिकेचा दुसरा पुत्र शक्तिश्री याने सातवाहनांचा कारभार पाहिला.

**4) द्वितीय सातकर्णी व त्याचे उत्तराधिकारी:** पुराणातील वंशावळीनुसार द्वितीय सातकर्णी हा सातवाहन वंशातील सातवा राजा. त्याचा कालखंड निश्चित कोणता हे सांगता येत नाही.'रत्रो सिरिसातकाणेस' असा उल्लेख असलेली नाणी द्वितीय सातकर्णीची असावीत.त्याच्या कारकीर्दीची फारशी माहिती उपलब्ध नाही.

"द्वितीय सातकर्णीनंतर त्याचा पुत्र लंबोदर हा गादीवर आला. लंबोदरचा उत्तराधिकारी अपिलक हा होता. त्याचे तांब्याचे नाणे छत्तीसगडच्या विलासपूर जिल्ह्यातील बालपूर येथे महानदीच्या काठी मिळाले आहे. या नाण्यावर 'रत्रो सिवसिरिसापीलकस' असा उल्लेख आहे". अपिलकनंतर सातवाहनांचा राजा मेधस्वाती होता. त्याचे एक नाणे आंध्रात सापडले आहे.

**राजा हाल:-** याने प्राकृत भाषेत 'गाथासप्तसई' हा ग्रंथ लिहिला. त्याने प्राकृत भाषेला उत्तेजन दिले.त्याच्या दरबारी अनेक कवी होते. श्रीपालित, कवी पोट्टीस, कवी नंदीवृद्ध, आढ्यराज हे कवी हालच्या दरबारी होते. हाल रांजाने 1 कोटी गाथांमधून 700 गाथा निवडून जो काव्यसंग्रह तयार केला तोच ग्रंथ म्हणजे 'गाथासप्तसई' हा होय. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील तत्कालीन जीवन गाथांमधून त्याने चित्रित केले आहे. राजा हाल नंतर मंटलक, परीद्रसेन, सुंदर सातकर्णी, गजा चकोर यांची नावे सात सातवान वंशावळीतील राजे म्हणून पुराणात नोंद आहे.

**5) गौतमीपुत्र सातकर्णी** (इ.स. 106 ते 132):- सातवाहन साम्राज्याचा सर्वात प्रभावशाली राजा होता. त्याने शक राजांविरुद्ध युद्धे जिंकून पश्चिम भारतात आपले वर्चस्व प्रस्थापित केले. गौतमीपुत्राने आपले राज्य नर्मदा नदीपासून

दक्षिणेकडे कृष्णा आणि गोदावरीच्या खोऱ्यांपर्यंत विस्तारले. त्याच्या विजयांमुळे सातवाहन साम्राज्य पुन्हा बलशाली झाले आणि त्याने उत्तरेकडील कुशाण आक्रमणे थांबवली.

**गौतमीपुत्र सातकर्णीचा साम्राज्यविस्तार:-**

"सातवाहनांमध्ये सर्वात प्रसिद्ध व मान्यता प्राप्त सर्वोत्कृष्ट राजा सातकर्णी होता. गौतमीपुत्र सातकर्णी 21 वर्षे राज्य केले. त्याने सर्व दिशाने साम्राज्य विस्ताराची नीति अवलंबली.त्यामुळे त्याला 'पश्चिमपति' मानले जाते. त्याने कलिंगच्या खारवेलचा विरोध केला, आणि खारवेलला त्याचा विरुद्ध सेना-संचालन करावे लागले, तो 'प्रतिष्ठानपति' आहे. त्याने खारवेलवर विजय प्राप्त करून तो नर्मदेच्या उत्तरेकडे आणि पूर्वी मालवा मध्ये पोहोचला, सातकर्णी ने साँची व अंचल वर नियंत्रण प्राप्त केले. एक शिलालेख मध्ये त्याचे नाव 'राजन श्री सातकर्णी' म्हणून कोरलेले आहे. त्याने साम्राज्य विस्तार करण्यासाठी प्रवास करीत दक्षिणेकडील गोदावरी घाटावर विजय प्राप्त केला व स्वतःला 'दक्षिण पथपती' घोषित केले "[5].

तो सत्तेवर येण्यापूर्वी पश्चिमी क्षत्रप भूमक व नहपान यांनी गुजरात, काठेवाड, माळवा, कोकण व महाराष्ट्राच्या काही भागांवर ताबा मिळवला होता. एवढेच नव्हे तर नहपानने जुन्नर येथे आपली राजधानी आणली होती. सातबाहनांच्या सत्तेला उतरती कळा लागली. या राजकीय पार्श्वभूमीवर गौतमीपुत्र सातकर्णी हा सातवाहनांचा राजा झाला होता. पण त्याने सातवाहनांच्या सत्तेचा विस्तार करून सातवाहनांना पुन्हा राजकीय प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. क्षहरातांनी महाराष्ट्रात आपली सत्ता प्रस्थापित करून सातवाहनांच्या सत्तेला आव्हान दिले होते; पण गौतमीपुत्र सातकर्णीने क्षहरात वंशाचा नाश केला. तसेच शक-यवन-पल्लव यांनीही गौतमीपुत्र सत्तेवर येण्यापूर्वी महाराष्ट्र व आंध्रच्या भूमीवर स्वतःचा राजकीय प्रभाव प्रस्थापित केला होता; परंतु गौतमीपुत्राने त्यांची राजकीय सत्ता नष्ट करून स्वतःचा राजकीय प्रभाव प्रस्थापित केला व सातवाहनांची सत्ता पुन्हा प्रस्थापित केली.

"गौतमीपुत्राच्या राज्याचा विस्तार उत्तरेस काठेवाड, राजपुतान्याचा दक्षिण भाग, माळवा व त्यालगतचा प्रदेश, दक्षिणेस कृष्णा नदीपर्यंत आणि पश्चिमेला अरबी समद्रापासून ते पूर्वेस बंगालच्या उपसागरापर्यंत झाला होता. म्हणून गौतमीपुत्र सातकर्णीला 'त्रिसमुद्रतोय पितवाहन' ही उपाधी दिली गेली"[6].या उपाधीचा अर्थ ज्या राजाची वाहने तीन समुद्राचे पाणी पीत होती, म्हणजे दक्षिण भारतास बंगालचा उपसागर, अरबी समुद्र व हिंदी महासागर या तीन समुद्रांची किनारपट्टी लाभली असून संपूर्ण दक्षिण भारतावर गौतमीपुत्राचे वर्चस्व होते असा आहे.

**6) वशिष्ठीपुत्र पुलुमावी** (इ.स. 132-160): गौतमीपुत्र सातकर्णीच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा पुलुमावीने सातवाहन साम्राज्याचा विस्तार केला. त्याने आंध्र प्रदेश आणि तमिळनाडूमध्ये आपले राज्य प्रस्थापित केले. "बापाचे राज्य वाढविण्याची कामगिरी त्याने चांगलीच बजावली.तो स्वताचा उल्लेख 'नवनगरस्वामी महाराज दक्षिनापथेश्वर'असा करतो. याच्या काही नाण्यावर 'दोन शिडांचे जहाज'कोरलेले आहे.यावरून नाविक सत्ता सागरी व्यापार व दर्यापार वसाहती याकडे त्याने विशेष लक्ष पुरवलेले दिसते"[7]. त्याच्या कारकिर्दीत व्यापार आणि दळणवळणासाठी बंदरांचा विकास झाला. उज्जैनचा क्षत्रप चष्टनचा नातू रुद्रदामन याने सातवाहनांच्या प्रदेशांवर हल्ले केलेकरून पुलुमावीचा दोनदा पराभव केला अशी नोंद रुद्रदामनच्या जुनागढच्या शिलालेखात आहे. वशिष्ठीपुत्र पुलुमावीचा रुद्रदामनशी संघर्ष झाला असला तरी त्यांच्यातील शत्रुत्व हे कायमस्वरूपी नव्हते. रुद्रदामनने आपली कन्या वशिष्ठीपुत्र पुलुमावीला दिली होती.

वशिष्ठीपुत्र पुलुमावीने दक्षिणेत कुंतल प्रदेशावर सत्ता प्रस्थापित करण्यात त्याला यश आले. दक्षिण व पश्चिम महाराष्ट्र, अश्मक, मूलक, दक्षिण कोसल, आंध्र, कर्नाटक वगैरे प्रदेश वशिष्ठीपुत्र पुलुमावीच्या साम्राज्यातहोते. त्याने एकूण 28 वर्षे राज्य केले.

**7) यज्ञश्री सातकर्णी (इ.स. 165 ते 195)**

यज्ञश्री सातकर्णी याने क्षत्रपांपासून सातवाहनांचा जिंकलेला प्रदेश पुन्हा मिळवून सातवाहनांची राजकीय प्रतिष्ठा पुन्हा वाढवली. यज्ञश्रीचा मुखवटा असलेली नाणी पैठण येथे सापडली आहेत. यज्ञश्रीच्या काही नाण्यांवर जहाजाची प्रतिकृती आहे. त्यावरून दक्षिण भारताच्या पूर्व किनाऱ्यावर त्याची सत्ता होती हे दिसते. त्याचे आंध्रवर राज्य होते. आंध्रातील कृष्णा जिल्ह्यातील चीन या गावी कृष्णा नदीच्या दक्षिणेला समुद्रकिनारी तसेच नाशिक, कान्हेरी, गुंटूर येथे यज्ञश्री सातकर्णीचे शिलालेख सापडले आहेत. त्याने एकूण 30 वर्षे राज्य केले व सातवाहनांना पुन्हा राजकीय प्रतिष्ठा मिळवून दिली. त्याच्या काळात सातवाहनांचा व्यापारही वाढला होता.

यज्ञश्री व त्याचे सर्वच वारस यांची सत्ता फक्त आंध्र प्रदेशातच असावी. सातवाहनांच्या उत्तर काळात महाराष्ट्राच्या भूमीवरून त्यांची सत्ता अस्त पावली होती.

**2.प्रशासन व न्यायव्यवस्था**:

सातवाहन कालीन प्रशासन व न्याय व्यवस्था हे त्याकाळच्या समाजातील एक महत्त्वाचे अंग होते. सातवाहन साम्राज्याच्या शासकांनी न्याय व सुव्यवस्था राखण्यासाठी विविध पद्धती वापरल्या, ज्या त्या काळातील सामाजिक आणि आर्थिक परंपरांवर आधारित होत्या. सातवाहन कालीन न्यायव्यवस्थेचा अभ्यास करताना काही महत्त्वाचे पैलू समोर येतात. सातवाहन साम्राज्याचे विभाजन अनेक प्रांतांमध्ये केले गेले होते, ज्यांना "आहारा" असे म्हणत. प्रत्येक प्रांतावर राजाचा प्रतिनिधी म्हणजे "अमात्य" किंवा "महा-सेनापती" नेमला जात असे.

शासक किंवा राजा हे सर्वोच्च न्यायधीश होते, आणि तेच मुख्य न्यायनिर्णय घेत होते. त्यांचे निर्णय साम्राज्यभर पसरलेले असत.राज्याच्या विविध भागांमध्ये वंचित वर्ग, व्यापारी, शेतकरी यांसारख्या लोकांनाही न्याय मिळवण्यासाठी स्थानिक न्यायाधीशांच्या माध्यमातून न्याय दिला जात असे.

सातवाहन साम्राज्याने काही कडक नियम आणि कायदे लागू केले होते. या कायद्यांमध्ये सामाजिक, व्यापारी आणि धार्मिक कायद्यातील तरतुदी यांचा समावेश होता. व्यापारी व्यवहारांमध्ये असलेल्या अपघाती घटनांचा निवारण करण्यासाठी विशेष नियम बनवले होते.त्यांनी धर्मशास्त्रांवर आधारित न्यायव्यवस्था प्रस्थापित केली. त्यांनी सामाजिक न्याय आणि समन्वय यावर भर दिला.

**3. धार्मिक सहिष्णुता आणि संरक्षक भूमिका:**

सातवाहन राजे वैदिक धर्माचे पालन करत असले तरी त्यांनी बौद्ध धर्माला देखील आश्रय दिला. गौतमीपुत्र सातकर्णी याने समाजात धार्मिक विकास करण्याचा प्रयत्न केला.समाजात वर्ण व्यवस्थेची पुनर्प्रतीस्थापणा करण्याचा प्रयत्न केला. गौतमीपुत्र सातकर्णी आणि वाशिष्ठीपुत्र पुलुमावी यांनी बौद्ध स्तूप बांधण्यास प्रोत्साहन दिले. अमरावती आणि नागार्जुनकोंडा येथील बौद्ध स्थापत्यशैली सातवाहन काळात विकसित झाली. त्यांनी विविध धर्मीय आणि सांस्कृतिक गटांना सहिष्णुतेने वागणूक दिली, ज्यामुळे समाजात एकात्मता निर्माण झाली. सातवाहन काळ (ई.स. पूर्व 120 ते ई.स. 230) हा भारतातील धार्मिक सहिष्णुतेचा एक उत्कृष्ट कालखंड होता. या राजवंशाने हिंदू धर्म, बौद्ध धर्म आणि जैन धर्माला समान प्रोत्साहन दिले.

सातवाहन राजे वैदिक धर्माचे अनुयायी होते, परंतु त्यांनी बौद्ध धर्मालाही महत्त्व दिले. त्यांनी अनेक बौद्ध विहार, स्तूप आणि गुंफा बांधल्या. विशेषतः, कन्हेरी, नाशिक, आणि कार्ला येथील गुंफा सातवाहन काळातील महत्त्वपूर्ण बौद्ध स्थापत्यशास्त्राचे उदाहरण आहेत. या गुंफांमध्ये ब्राह्मी लिपीतील लेख आढळतात, जे त्यांच्या धर्मनिरपेक्ष धोरणाचा पुरावा आहेत.

**4. व्यापार आणि आर्थिक प्रगतीतील योगदान :**

सातवाहनांचा कालखंड आर्थिकदृष्ट्या अत्यंत वैभवाचा कालखंड होय. पशुपालन, व्यापार हे सातवाहन काळातील प्रमुख व्यवसाय होते. देशांतर्गत व परदेशी व्यापार हे सातवाहनांचे एक खास वैशिष्ट्य होते सातवाहन साम्राज्याच्या आर्थिक प्रगतीमध्ये त्यांच्या व्यापार धोरणांचा मोठा वाटा होता.सातवाहन साम्राज्य रोमन साम्राज्याशी व्यापार करणारे मुख्य साम्राज्य होते. ‘‘इ. स. च्या पहिल्या दोन शतकांत कृष्णा व गोदावरी या दोन नद्यांच्या मधला पट्टा, विशेषतः त्यांच्या मुखाजवळील (त्रिभुज) प्रदेश भाताचे मोठे कोठार बनले. दख्खनमधील लोक कापसाचे उत्पादनही घेत असत. परकीय अहवालानुसार आंध्रचा प्रदेश कापसासाठी प्रसिद्ध होता. अशा प्रकारे दख्खनच्या बऱ्याच प्रदेशात अतिशय प्रगत अशी ग्रामीण अर्थव्यवस्था विकसित झाली’’[8].

सातवाहन काळात नाशिक, जुन्नर, भोकरदन, पैठण, तेर, कराड,नेवासे व कोल्हापूर इ. महत्त्वाची व्यापारी केंद्रे होती व ती मोठमोठ्या व्यापारी केंद्रांशी व व्यापारी बंदरांशी जोडली गेली होती. भडोच, कल्याण, सोपारा, डहाणू ही व्यापारी बंदरे होती. या बंदरांमुळे पूर्व आणि पश्चिम देशांशी व्यापार सुलभ झाला. या बंदरातून इजिप्त, इटाली, ग्रीस इ. देशांशी व्यापार चाले. सातवाहन कालखंडात भारतातून तिळाचे तेल, साखर, प्राण्यांची कातडी, रेशमी वस्त्रे, मलमल, हस्तिदंत,मसाल्याचे पदार्थ, हिरे इ. वस्तूंची निर्यात होई तर आयातीत सोने,रोमन मद्य, तांबे, कथील, शिसे, काच, रोमन

भांडी, रोमन दिवे, ब्राँझचे पुतळे आदींचा समावेश होता. आंतरराष्ट्रीय व्यापार भारतास फारच फायद्याचा होता. कारण आयात कमी व निर्यात जास्त होती. परिणामी विदेशी संपत्तीचा ओघ भारताकडे येत होता.

सातवाहन सम्राटांना जमिनीचा सारा, वस्तूंवरील कर, जकात, अपराधी व्यक्तीवरील दंड, व्यापारी व धंदेवाइकावरील कर आदींपासून उत्पन्न मिळे.

**5. सांस्कृतिक आणि साहित्यिक योगदान:-**

सातवाहनांच्या आधिपत्याखालील दखखनची भौतिक संस्कृती स्थानिक घटक व उत्तरेकडील घटक यांच्या मिश्रणाने तयार झाली होती."सातवाहन काळात प्राकृत ही राजभाषा होती. त्यांच्या नाण्यांवर आणि शिलालेखांवर प्राकृत भाषेचा उपयोग दिसून येतो.सातवाहन राजांनी संस्कृत आणि प्राकृत भाषेतील साहित्यिक कार्यांना पाठिंबा दिला. राजा हल यांनी प्राकृत भाषेतील "गाथासप्तशती" या ग्रंथाची रचना केली.त्याने प्राकृत भाषेला राजाश्रय दिला"[9].सातवाहन काळात आर्य आणि अनार्य संस्कृतींचा संगम झाला. वैदिक परंपरा आणि स्थानिक प्रथा यांचा मिलाफ त्यांच्या काळात दिसून येतो. सातवाहन राजा हाल याच्या दरबारात अनेक कवी होते. त्यापैकी आढ्यराज, पालित्त, पोट्टिस, नंदिवृद्ध हे प्रसिद्ध होते. सातवाहनकालीन विख्यात ग्रंथ म्हणजे 'बृहत्कथा' होय. हा ग्रंथ आज उपलब्ध नसला तरी त्याची फक्त रूपांतरे व त्यावर आधारित असे काही ग्रंथ उपलब्ध आहेत.

**निष्कर्ष:-**

सातवाहन घराण्याने भारताच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, आणि आर्थिक प्रगतीमध्ये मोठे योगदान दिले. त्यांनी दक्षिण भारतात स्थैर्य निर्माण करून त्याचा उत्तर भारताशी सांस्कृतिक आणि आर्थिक दुवा जोडला. त्यांच्या काळात प्राकृत भाषा, बौद्ध धर्म, आणि गंधार स्थापत्यकलेचा उल्लेखनीय विकास झाला. सातवाहन घराण्याच्या राजवटीत भारताचा राजकीय इतिहास एका नवीन उंचीवर पोहोचला, ज्याचा प्रभाव पुढील अनेक शतकांपर्यंत राहिला.

**संदर्भ ग्रंथसूची:-**

1) प्रा.आर.एस.शर्मा (अनु.वासंती फडके) "प्राचीन भारत" के सागर पब्लिकेशन, पुणे. प्रथम आवृत्ती.2001. पृ.क्र.174
2) प्रा.र. ना. गायधनी. "प्राचीन भारताचा इतिहास", के सागर पब्लिकेशन, पुणे. प्रथम आवृत्ती.2001. पृ.क्र. 186
3) डॉ.अनिल कठारे,डॉ.विजया साखरे "प्राचीन भारताचा इतिहासव संस्कृती " (ई.स.650 पर्यंत).विद्या बुक्स प्रकाशन, औरंगाबाद. प्रथम आवृत्ती.2008. पृ.क्र. 109
4) डॉ.एस. एस. गाठाळ "भारताचा इतिहास"(ई.स.650 पर्यंत)कैलाश प्रकाशन, औरंगाबाद. प्रथम आवृत्ती.2010. पृ.क्र. 268, 270
5) रोमिला थापर "भारत का इतिहास" राजकमल प्रकाशन, नई दिल्ली.23वी आवृत्ती.2010 पृ.क्र.90.
6) डॉ.एस एस गाठाळ "भारताचा इतिहास" कैलाश प्रकाशन, औरंगाबाद. पृ.क्र.272
7) प्रा.र. ना. गायधनी. "प्राचीन भारताचा इतिहास", के सागर पब्लिकेशन, पुणे. पृ.क्र. 189
8) प्रा.आर.एस.शर्मा(अनु.वासंती फडके)"प्राचीन भारत" केसागर पब्लिकेशन,पुणे.पृ.क्र.176.
9) प्रा.र. ना. गायधनी. "प्राचीन भारताचा इतिहास", के सागर पब्लिकेशन,पुणे. पृ.क्र. 188

# आधुनिकतेचा भारतीय समाजावर प्रभाव

**डॉ. गजानन देवराव चिट्टेवाड**
सहयोगी प्राध्यापक व लोकप्रशासन विभाग प्रमूख,
धारेश्वर शि.स., कला व विज्ञान महाविद्यालय चिंचोली (लिं)

**सारांश:**

आधुनिकता ही गुंतागुंतीची आणि बहुआयामी संकल्पना आहे, ज्याने भारतीय समाजात परिवर्तन घडवून आणले आहे. विज्ञान, तंत्रज्ञान, शहरीकरण, शिक्षण, शासन आणि सामाजिक संरचना यामध्ये झालेली प्रगती याच आधुनिकतेचा भाग आहे. भारतातील आधुनिकतेचा प्रभाव प्रगतिशील आणि आव्हानात्मक अशा दोन्ही स्वरूपाचा आहे. यामुळे सामाजिक-आर्थिक विकास झाला असला, तरी सांस्कृतिक बदल आणि विषमता देखील वाढल्या आहेत. या संशोधनात पारंपरिक मूल्ये, सामाजिक संस्था, आर्थिक बदल आणि शासन व्यवस्थेवर झालेल्या आधुनिकतेच्या परिणामांचे विश्लेषण केले आहे. तसेच, आधुनिकतेच्या लाभांबरोबरच त्यातून निर्माण झालेल्या आव्हानांचीही चर्चा येथे केली आहे. पाश्चात्य देशांमध्ये औद्योगिकीकरण, वैज्ञानिक प्रगती, व सांस्कृतिक परिवर्तनामुळे आधुनिकतेची संकल्पना आकाराला आली. भारतामध्ये आधुनिकतेचा स्वीकार ब्रिटिश साम्राज्याच्या काळात झाला, परंतु त्याचे स्वरूप भारतीय समाजाच्या विविधता, संस्कृती, आणि परंपरेशी तडजोड करत विकसित झाले आहे. आजच्या काळात, आधुनिकतेने भारतीय समाजातील विविध पैलू - जसे की शिक्षण, तंत्रज्ञान, महिला सशक्तीकरण, आणि कुटुंब रचना या सर्वांमध्ये मोठे बदल झाले आहेत. तरीही, आधुनिकतेच्या या प्रभावामुळे अनेक आव्हाने आणि संघर्ष देखील उद्भवले आहेत. या लेखात, भारतीय समाजावर आधुनिकतेच्या परिणामांचा सखोल अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

**प्रस्तावना:**

आधुनिकता ही एक सांस्कृतिक, बौद्धिक आणि सामाजिक क्रांती आहे, जी प्रबोधन युगात युरोपमध्ये उदयास आली आणि जगभर पसरली. भारतात आधुनिकता ब्रिटिश राजवट, औद्योगिकीकरण, जागतिकीकरण आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीद्वारे आली. पारंपरिक समाज ते आधुनिक समाज या संक्रमणामुळे कुटुंबव्यवस्था, शिक्षण, स्त्रियांची भूमिका, शासनव्यवस्था आणि अर्थव्यवस्था यामध्ये लक्षणीय बदल झाले आहेत.भारतात आधुनिकतेचा स्वीकार आणि प्रतिकार या दोन्ही प्रवृत्ती आढळतात. आधुनिकतेमुळे जीवनमान सुधारले, साक्षरता दर वाढला आणि आर्थिक विकास झाला, पण त्याचबरोबर पारंपरिक मूल्यांची हानी, सांस्कृतिक एकरूपीकरण आणि सामाजिक-आर्थिक असमानता वाढली. आधुनिकतेची प्रक्रिया भारतामध्ये अनेक दशकांपासून सुरु झाली होती. ब्रिटिश साम्राज्याच्या काळात, भारतीय समाजाला आधुनिकतेच्या विचारांशी परिचय झाला. ब्रिटिश साम्राज्याच्या शासनकाळात भारतात शिक्षणाच्या क्षेत्रात अनेक सुधारणा झाल्या, औद्योगिकीकरणाची गती सुरू झाली आणि पाश्चात्य विचारधारा समाजाच्या विविध अंगांमध्ये समाविष्ट झाली. स्वातंत्र्य संग्रामाने भारतीय समाजाला स्वतःच्या सांस्कृतिक आणि सामाजिक परंपरांचा पुनर्विलोकन करण्याची प्रेरणा दिली. महात्मा गांधींनी स्वदेशी आंदोलनाच्या माध्यमातून परंपरागत भारतीय मूल्यांना जपण्यावर जोर दिला, तर नेहरू आणि आंबेडकर यांनी आधुनिकतेच्या विचारांना स्वीकारले. 1950च्या दशकात भारतीय राज्यसंस्थेने विज्ञान, तंत्रज्ञान, आणि औद्योगिकीकरणाच्या मार्गाने प्रगती करण्याची धोरणे राबवली, जे आज पर्यंतच्या भारतीय समाजाचा आधार बनली आहेत.

**उद्दिष्टे :**

1. भारतातील पारंपरिक सामाजिक रचनेवर आधुनिकतेच्या प्रभावाचे विश्लेषण करणे.
2. आर्थिक विकास आणि शासन व्यवस्थेच्या घडणीमध्ये आधुनिकतेची भूमिका तपासणे.
3. भारतीय संदर्भात आधुनिकतेने निर्माण केलेल्या संधी आणि आव्हानांचे मूल्यमापन करणे.

**4. गृहितके:**

1. आधुनिकतेमुळे पारंपरिक सामाजिक संस्था बदलल्या असून त्यातून प्रगतीबरोबरच संघर्षही निर्माण झाले आहेत.

2. आर्थिक आधुनिकीकरणामुळे विकासाला चालना मिळाली असली, तरी शहरी आणि ग्रामीण भागांतील दरी वाढली आहे.
3. आधुनिक शासन व्यवस्थेमुळे लोकशाही सशक्त झाली असली, तरी सांस्कृतिक आणि राजकीय गुंतागुंत वाढली आहे.

**महत्त्व आणि सद्यस्थिती :( Importance and Relevance to Current Status)**

आधुनिकतेचे महत्त्व भारतीय समाजाच्या समृद्धी आणि प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. भारत हे एक अत्यंत विविधतापूर्ण देश आहे, जिथे भौतिक, सांस्कृतिक, आणि सामाजिक पातळीवर मोठे फरक आहेत. अशा परिस्थितीत, आधुनिकतेने भारतीय समाजाला एक समजूतदार, प्रगल्भ आणि जागतिक पातळीवर प्रतिस्पर्धी बनवले आहे. आजच्या काळात भारताला जागतिक अर्थव्यवस्थेत प्रगती करण्यासाठी, तंत्रज्ञान, शहरीकरण, औद्योगिकीकरण, आणि जागतिकीकरण यांमध्ये सामावून त्याला संपूर्णपणे विकसित होण्यासाठी आधुनिकतेची आत्यंत आवश्यक आहे. भारतातील मोठ्या प्रमाणावर शहरीकरणाने आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीने स्थानिक आणि राष्ट्रीय पातळीवर कार्यपद्धती आणि विचारधारामध्ये बदल होत आहेत. शहरीकरणामुळे देशाच्या उद्योग, व्यापार, आणि आर्थिक विकासातील भूमिका महत्त्वाची बनली आहे. विज्ञान व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील शोध आणि सुधारणा यांमुळे भारत अधिक समृद्ध आणि नविन व्यवसायिक संधींमध्ये सहभागी होतो आहे. शहरीकरण आणि तंत्रज्ञान यांच्या मदतीने भारताने जागतिक स्पर्धेत आपले स्थान सुरक्षित केले आहे. आज भारत जागतिक डिजिटल क्रांतीचा एक महत्त्वाचा भाग बनला आहे, जिथे इंटरनेट सेवा, स्मार्टफोन,आणि डिजिटल शिक्षणाच्या क्षेत्रामध्ये मोठी क्रांती घडली आहे. तथापि, आधुनिकतेच्या या प्रभावामुळे काही आव्हाने देखील भारतीय समाजासमोर उभे आहेत. पारंपारिक कुटुंब रचना आणि सांस्कृतिक मूल्यांमध्ये मोठे बदल झाले आहेत, जे काहींना स्वीकारले आहे, तर काहींना त्याची प्रतिकाराची भावना आहे. आधुनिकतेच्या स्वीकाराने पारंपारिक कृषी पद्धतींचा आणि ग्रामीण जीवनशैलीचा एक प्रकारे बळी घेतला आहे, ज्यामुळे आर्थिक विषमता आणि असमानता वाढत आहे. शहरी आणि ग्रामीण भागांमधील भेद कमी करण्यासाठी अधिक उपाययोजना करणं आवश्यक आहे. याशिवाय, जातव्यवस्था, लिंगभेद, आणि धार्मिक विविधतेमुळे होणारी संघर्ष हे देखील एक मोठे आव्हान आहेत. आधुनिकतेने काही सामाजिक सुधारणा घडवून आणल्या असल्या तरी, समाजाच्या सर्व घटकांना समान हक्क आणि संधी प्राप्त करण्यासाठी अजून कार्य करण्याची गरज आहे. आधुनिकतेचा स्वीकार भारतासाठी अधिक प्रगतीशील भविष्य निर्माण करण्याची संधी आहे, परंतु त्यासाठी तंत्रज्ञानाच्या आणि पारंपारिक मूल्यांमध्ये एक संतुलन राखण्याची आवश्यकता आहे. भारतीय समाजातील विविधतेला समजून घेत, आधुनिकतेचा स्वीकार कसा करावा हे समजून घेणे आवश्यक आहे. हेच भारतीय समाजाची सामाजिक, सांस्कृतिक, आणि आर्थिक स्थिरता कायम ठेवण्यासाठी आत्यंत महत्त्वाचे आहे.

**भारतीय समाजावर आधुनिकतेचा प्रभाव :**

आधुनिकतेमुळे भारतीय समाजात मोठे बदल घडून आले आहेत. पारंपरिक संयुक्त कुटुंबव्यवस्था कमी होत जाऊन एकल कुटुंबप्रणाली वाढीस लागली आहे. जातिव्यवस्थेवर आधारित व्यवसाय आणि कृषीप्रधान अर्थव्यवस्था बदलून औद्योगिकरण आणि विविध रोजगार संधी निर्माण झाल्या आहेत. आधुनिक शिक्षणामुळे लोकांना नवे ज्ञान आणि कौशल्य प्राप्त झाले, ज्यामुळे नाविन्यपूर्ण विचारसरणी आणि आर्थिक प्रगतीला चालना मिळाली. शहरीकरण आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे संपर्क आणि पायाभूत सुविधा सुधारल्या, पण त्याचबरोबर सामाजिक आणि आर्थिक विषमता, पर्यावरणीय समस्या आणि सांस्कृतिक द्वंद्व देखील निर्माण झाले आहेत. भारताने आधुनिकतेचा स्वीकार करताना विकास आणि सांस्कृतिक वारसा यामधील समतोल राखणे आवश्यक आहे. आधुनिकतेच्या प्रभावामुळे भारतीय समाजात अनेक सामाजिक, सांस्कृतिक, आणि आर्थिक बदल घडले आहेत. शहरीकरणामुळे ग्रामीण भारताचे रूपांतर झाले आहे. ज्या ठिकाणी परंपरागत कृषी व्यवसाय मुख्य व्यवसाय होता, तिथे आता औद्योगिकीकरणाने आपले ठिकाण निर्माण केले आहे. तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात होणारी प्रगती आणि डिजिटल क्रांतीने भारतीय समाजाच्या जीवनशैलीत महत्त्वपूर्ण बदल केले आहेत. शिक्षा, आरोग्य, वाहतूक, आणि रोजगाराच्या क्षेत्रात विविध संधी उपलब्ध झाल्या आहेत. महिलांचे सामाजिक स्थानही आधुनिकतेमुळे प्रगल्भ झाले आहे, आणि त्यांना स्वतंत्रता, अधिकार आणि रोजगाराच्या संधी मिळाल्या आहेत. तथापि, आधुनिकतेच्या या बदलांमुळे काही समस्याही उद्भवल्या आहेत. जातव्यवस्था, वर्गीय विषमता, आणि सामाजिक भेदभाव

यासारख्या प्राचीन समस्यांचा सामना देखील होतो आहे. पाश्चात्य संस्कृतीचा प्रभाव आणि तेथील मूल्यांशी असलेला संबंध भारतीय संस्कृतीला नष्ट करत असल्याचा काहीसा अनुभव येतो आहे.

**1. सामाजिक प्रभाव:**

**क. कुटुंब आणि नातेवाईक:** शहरीकरण आणि बदललेल्या जीवनशैलीमुळे पारंपरिक संयुक्त कुटुंबांची संख्या घटली आहे आणि एकल कुटुंबपद्धती वाढीस लागली आहे. यामुळे वैयक्तिक स्वातंत्र्य वाढले असले, तरी कुटुंबाच्या पाठबळाचा अभाव जाणवतो. **ख. स्त्रियांची भूमिका:** आधुनिकतेमुळे महिलांना शिक्षण आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. मात्र, ग्रामीण भागात अजूनही पुरुषप्रधान मानसिकता आणि लिंगविषयक विषमता आढळते. **ग. जात आणि वर्ग व्यवस्था:** भारतातील आधुनिक कायदेमुळे जातिव्यवस्थेवर नियंत्रण आणण्याचा प्रयत्न झाला आहे. तरीही जातीय समीकरणे सामाजिक आणि राजकीय जीवनावर आजही प्रभाव टाकत आहेत. आर्थिक उदारीकरणामुळे वर्गीय भेद अधिक स्पष्ट झाले आहेत.**घ. शिक्षण आणि तरुणांची स्वप्ने:** आधुनिक शिक्षण प्रणालीमुळे तरुणांना नवीन करिअर संधी उपलब्ध झाल्या आहेत. मात्र, पारंपरिक ज्ञान प्रणाली आणि आधुनिक अभ्यासक्रम यामधील तफावत वाढत आहे, ज्यामुळे सांस्कृतिक मूल्ये बदलत असल्याचे दिसून येत आहे.

**2. आर्थिक प्रभाव:**

**क. औद्योगिकीकरण आणि शहरीकरण:** आर्थिक आधुनिकीकरणामुळे औद्योगिक वाढ आणि शहरी विस्तार झाला आहे, ज्यामुळे रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या आहेत. मात्र, ग्रामीण-शहरी स्थलांतर वाढल्याने पर्यावरणीय समस्याही निर्माण झाल्या आहेत.**ख. जागतिकीकरण आणि बाजारपेठ:**
1990 नंतरच्या आर्थिक उदारीकरणामुळे जागतिक व्यापार आणि आर्थिक विकासाला चालना मिळाली आहे. पण जागतिकीकरणामुळे आर्थिक विषमता आणि परदेशी बाजारपेठांवरील अवलंबित्व वाढले आहे.

**ग. तंत्रज्ञानाची प्रगती:** भारताच्या डिजिटल क्रांतीमुळे संपर्क आणि नवसंशोधनाला चालना मिळाली आहे. मात्र, डिजिटल अंतर अजूनही आहे, विशेषतः ग्रामीण आणि शहरी भागांमध्ये तंत्रज्ञानाचा असमतोल दिसून येतो आहे.

**3. राजकीय आणि शासन व्यवस्थेवरील प्रभाव:**

**क. लोकशाहीचा विकास:** आधुनिकतेमुळे भारताची लोकशाही मजबूत झाली असून जनतेचा राजकीय सहभाग वाढला आहे. मात्र, भ्रष्टाचार, लोकप्रियतावाद आणि राजकीय ध्रुवीकरण यासारख्या समस्याही वाढल्या आहेत. **ख. प्रशासकीय आणि कायदेशीर सुधारणा:** आधुनिक प्रशासनाने पारदर्शकता आणि कार्यक्षमता वाढवली आहे. तरीही, प्रशासकीय अपयश आणि न्यायव्यवस्थेतील विलंब यासारख्या समस्या कायम आहेत.**ग. सामाजिक चळवळी आणि राजकीय जाणीव:** आधुनिकतेमुळे मानवाधिकार, पर्यावरण संरक्षण आणि सामाजिक न्याय यासंबंधी जनजागृती झाली आहे. स्त्री-पुरुष समानता आणि आदिवासी हक्कांसाठी लढणाऱ्या चळवळींना चालना मिळत आहे.

**भारतीय समाजातील आधुनिकतेचे आव्हाने:**

आधुनिकतेचा स्वीकार करत असताना भारतीय समाजाला काही प्रमुख समस्यांचा सामना करावा लागला आहे. त्यात, **सांस्कृतिक संघर्ष** हा एक मोठा मुद्दा आहे. पाश्चात्य संस्कृती आणि भारतीय परंपरा यामध्ये तणाव वाढले आहेत. पाश्चात्य विचारधारेचा स्वीकार भारताच्या पारंपारिक मूल्यांवर परिणाम करत आहे, आणि त्यातून सामाजिक तणाव निर्माण होत आहेत. दुसरे मोठे आव्हान म्हणजे **सामाजिक विषमता. आर्थिक विषमता** देखील एक गंभीर समस्या आहे, ज्यामुळे अधिक समृद्ध समाज निर्माण झाले असले तरी गरीब आणि मध्यमवर्गीय लोकांच्या स्थितीत आजही मोठी तफायत पाहयाला मिळत आहे. **महिला सशक्तीकरण** एक सकारात्मक परिणाम असला तरी, त्यासाठी अजूनही संघर्ष सुरू आहे. महिलांच्या अधिकारांसाठी न्यायसंगत आणि समान संधी मिळविण्याची आवश्यकता आहे. शेवटी, **धार्मिक आणि जातीय संघर्ष** आधुनिकतेच्या विरोधी असलेल्या घटकांमध्ये वाढली आहे, ज्यामुळे समाजात तणाव वाढले आहेत. सांस्कृतिक ह्रास – वेगाने वाढणाऱ्या आधुनिकतेमुळे स्थानिक परंपरा आणि सांस्कृतिक ओळख धोक्यात आली आहे. ग्रामीण-शहरी दरी – विकासाचा वेग असमान असल्याने ग्रामीण भाग अद्यापही पुरेशा सुविधा आणि संधींपासून दूर आहे. पर्यावरणीय समस्या – औद्योगिकीकरण आणि शहरीकरणामुळे प्रदूषण, जंगलतोड आणि हवामान बदलाच्या समस्या

वाढल्या आहेत. सामाजिकता (Social Alienation) – व्यक्तिवादाच्या वाढत्या प्रवृत्तीमुळे पारंपरिक सामाजिक बंध कमी होत असून मानसिक आरोग्याच्या समस्या वाढत आहेत.

**1.शहरीकरण आणि ग्रामीण भारत:**

शहरीकरणाचा परिणाम भारतीय समाजावर मोठ्या प्रमाणावर झाला आहे. शहरीकरणामुळे शहरांचे वाढते प्रमाण, नवीन औद्योगिकीकरण, तसेच आर्थिक क्षेत्रातील गती वाढली आहे. भारतातील शहरी भागांमध्ये औद्योगिक क्रांती आणि आधुनिक तंत्रज्ञानामुळे रोजगाराच्या संधींमध्ये वाढ झाली आहे, ज्यामुळे ग्रामीण भागांतील नागरिकांना रोजगारासाठी शहरी भागांकडे स्थलांतर करण्याची प्रेरणा मिळाली आहे. मात्र, हे शहरीकरण ग्रामीण भारतामध्ये असलेल्या समृद्ध नैतिक आणि सामाजिक किमतींमध्ये बदल निर्माण करत आहे. शहरी भागांमध्ये आधुनिक जीवनशैलीचा स्वीकार, जीवनाच्या गतीचा वेग, आणि अधिकृततेच्या पद्धतींपासून ग्रामीण भागांमध्ये दिसणार्या पारंपरिक मूल्यात फार मोठा फरक पडला आहे. त्याच वेळी, ग्रामीण भागामध्ये अजूनही पारंपरिक कृषी व्यवस्थेवर जोर दिला जात आहे. शहरीकरणामुळे एकीकडे शहरांतील लोकसंख्या वाढली असली, तरी दुसरीकडे ग्रामीण भागातील लोकांचे जीवनमान आणि अर्थव्यवस्था धीमे आहे. शहरी भागांमध्ये औद्योगिकीकरण व शहरीकरणामुळे सुसंस्कृत जीवनशैलीचा विकास झाला आहे, परंतु यामुळे ग्रामीण जीवनमानाचे स्थान घटत आहे. शहरीकरणाचे परिणाम म्हणून ग्रामीण भागात रोजगाराची कमतरता, पुरेशी मूलभूत सुविधा आणि शिक्षण क्षेत्रातील अपुरेपण यांसारखी समस्या निर्माण झाल्या आहेत.

**2. भारतीय कुटुंब आणि जातव्यवस्थेवर आधुनिकतेचे परिणाम:**

भारतीय कुटुंब संरचना आणि पारंपारिक मूल्यांवर आधुनिकतेचा गहरा प्रभाव पडला आहे. पारंपारिक भारतीय कुटुंबे जे संयुक्त कुटुंब पद्धतीवर आधारित होती, त्यात बदल होत आहेत. शहरीकरणाच्या प्रभावामुळे कुटुंबांची घटक संख्या कमी झाली आहे, आणि एकल कुटुंब पद्धती स्वीकारली जात आहे. हे बदल विशेषतः शहरी भागांमध्ये दिसून येत आहेत, जिथे महिलांना नोकऱ्या, शिक्षण आणि स्वावलंबनाची अधिक संधी आहे. परिणामी, पारंपारिक कुटुंब संरचना, ज्या मध्ये सहकार्य, एकजुटीचे महत्त्व होता, ते बदलले आहे. नवीन पिढीच्या कुटुंब संकल्पना पारंपारिक मूल्यांपासून दूर जात आहेत, ज्यामुळे कुटुंबातील एकतेची भावना कमी होत आहे. त्याच वेळी, जातव्यवस्थेवर आधुनिकतेचा एक मोठा प्रभाव पडला आहे. पाश्चात्य विचार आणि लोकशाही व्यवस्थेमुळे जात-भेद आणि वंश-आधारित भेदभाव कमी होण्यास सुरवात झाली आहे. तथापि, त्याचे पूर्णपणे निर्मूलन झालं नाही. जातव्यवस्था अजूनही भारतीय समाजाच्या पायावर आधारित आहे आणि काही भागांमध्ये जातीय हिंसा आणि भेदभाव अजूनही दिसून येतात. आधुनिकतेचा स्वीकार करत असताना भारतीय समाजाला पारंपारिक जाती आणि वर्गातील भेद कमी करण्यासाठी अधिक कठोर उपाययोजना करणे आवश्यक आहे.

**3. विज्ञान, तंत्रज्ञान आणि उद्योग क्षेत्रातील प्रगती:**

आधुनिकतेचे विज्ञान, तंत्रज्ञान आणि उद्योग क्षेत्रातील प्रगतीवर मोठे परिणाम झाले आहेत. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात झालेल्या क्रांतिकारी बदलांनी भारतीय समाजातील जीवनशैली, उत्पादन क्षमता, आणि अर्थव्यवस्था पूर्णपणे बदलून टाकली आहे. डिजिटल क्रांती, स्मार्टफोन, इंटरनेट आणि डेटा सायन्स यामुळे भारतीय समाजाला अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या कडे गती मिळाली आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील प्रगतीने नव्या क्षेत्रांमध्ये रोजगार निर्माण केले आहेत, जसे की आयटी क्षेत्र, बायोटेक्नोलॉजी, आणि पर्यावरण तंत्रज्ञान. हे क्षेत्र शहरी व ग्रामीण भागांमध्ये एक समान प्रभाव पाडत आहेत. परंतु, विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीसाठी भारताला अद्याप त्याच प्रमाणात प्रौद्योगिकीनुसार इन्फ्रास्ट्रक्चर नाही. कमी विकसीत भागांमध्ये तंत्रज्ञानाच्या प्रवेशात अडचणी आहेत, ज्यामुळे ग्रामीण आणि शहरी भारतामधील डिजिटल अंतर वाढत आहे. या क्षेत्रातील प्रगतींमुळे भारतीय उद्योग क्षेत्र सशक्त झाला आहे, आणि भारताचे स्थान जागतिक अर्थव्यवस्थेत उंचावले आहे. तथापि, या प्रगतीचा लाभ संपूर्ण भारतभर समानरित्या पोहोचविणे अजूनही एक मोठे आव्हान आहे.

**4. भारतीय महिलांचे स्थान आणि स्वातंत्र्य:**

आधुनिकतेच्या प्रभावामुळे भारतीय महिलांच्या स्थानात मोठा बदल झाला आहे. पूर्वी महिलांना घरकाम आणि कुटुंबाच्या देखभालीपर्यंत सीमित ठेवले जात होते, परंतु आजच्या काळात महिलांना शिक्षण, नोकऱ्या, आणि सामाजिक

जीवनात सक्रियपणे भाग घेण्याची संधी मिळाली आहे. महिलांनी विविध क्षेत्रांमध्ये, जसे की विज्ञान, राजकारण, क्रीडा, आणि व्यवसाय, आपल्या कर्तृत्वाची जाणीव करून दिली आहे. यामध्ये सरकारच्या महिला सशक्तीकरणाच्या योजनांचा देखील महत्त्वाचा हातभार आहे. तथापि, महिलांच्या अधिकारांचा प्रश्न अजूनही सोडवला गेलेला नाही. ग्रामीण आणि दूरदराजच्या भागांमध्ये महिलांना अजूनही समान संधी प्राप्त होत नाहीत. महिलांवरील शारीरिक, मानसिक आणि लैंगिक अत्याचार कमी होण्याऐवजी वाढतच आहेत. महिलांच्या सामाजिक आणि व्यावसायिक जीवनात समानता साधण्यासाठी अजूनही काम करण्याची आवश्यकता आहे. महिलांच्या स्वातंत्र्य आणि अधिकारांची सुरक्षाबाबत भारताला अजून सुधारणा करणे गरजेचे आहे, जेणेकरून महिलांना आपले अधिकार सुरक्षित आणि पूर्णपणे प्राप्त होतील.

**निष्कर्ष:**

आधुनिकतेचा भारतीय समाजावर मोठ्या प्रमाणात प्रभाव पडला आहे. आधुनिकतेच्या स्वीकारामुळे भारतीय समाज अधिक गतिमान, सुसंगत, आणि प्रगतीशील बनला आहे. शिक्षण, तंत्रज्ञान, महिलांचे स्थान, आणि शहरीकरणाच्या क्षेत्रातील बदल हे आधुनिकतेचे सकारात्मक परिणाम आहेत. तरीही, या बदलांमध्ये काही महत्त्वाच्या आव्हानांची तोंड देणे आवश्यक आहे. भारतीय समाजाला तंत्रज्ञान आणि आधुनिकतेचा स्वीकार करत असताना, त्याच्या सांस्कृतिक आणि पारंपारिक मूल्यांचा सन्मान राखण्याची आवश्यकता आहे. करिता अशीच एक सामाजिक समृद्धी साधावी लागेल, ज्यामुळे भारतीय समाज नवा चेहरा घेईल, परंतु त्याचे मूलभूत मूल्य त्यात कायम राहतील. आधुनिकता आणि परंपरा यांचा संतुलन राखणारा भारत अधिक समृद्ध, विविधतापूर्ण, आणि न्यायसंगत समाज बनू शकेल.आधुनिकतेमुळे भारतीय समाजात मोठे सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिवर्तन घडून आले आहे. यामुळे जीवनमान सुधारले, लोकशाही बळकट झाली आणि सामाजिक स्वातंत्र्य वाढले. मात्र, यासोबतच सांस्कृतिक ह्रास, आर्थिक विषमता आणि पर्यावरणीय संकटेही निर्माण झाली आहेत. त्यामुळे भारताने आधुनिकतेच्या वाटचालीत सर्वसमावेशक धोरण अवलंबून प्रगती आणि पारंपरिक संस्कृती यांचा समतोल राखण्यावर भर द्यायला हवा. भारताचा भविष्यातील विकास टिकाऊ आणि न्यायसंगत असावा, ही काळाची गरज आहे.

9. **सारांश (Conclusion)**

आधुनिकतेचा भारतीय समाजावर बहुआयामी परिणाम झाला आहे. आधुनिकतेचा स्वीकार आणि त्याचे परिणाम दोन्ही वेगवेगळ्या पद्धतीने व्यक्त होत आहेत. भविष्यकालीन विचारांसाठी, भारतीय समाजाला तिच्या पारंपारिक मूल्यांशी संपूर्ण संवाद साधण्याची आवश्यकता आहे, ज्यामुळे तो अधिक समावेशक, प्रगल्भ, आणि विकासशील बनू शकेल.

**संदर्भ (References)**

1. Gough, K. (1968). "Modernization and Social Change in India." Social Science Review.

2. Nanda, M. (2011). "The Changing Face of Indian Modernity." International Journal of Indian Sociology.

3.डॉ. पी.एच. राम: आधुनिकता और भारतीय समाज, रावत प्रकाशन पहिले संस्करण, 1 जनवरी 2017

4.योगेंद्र सिंह, भारतीय परंपरा का आधुनिकीकरण, भारत मे सर्वश्रेष्ठ समाजशास्त्र CUET संस्थान द्वारा प्रकाशित 2 मार्च 2024.

5.नरेश भार्गव, अरुण चतुर्वेदी और संजय लोढा द्वारा लिखित,भारतीय सामाजिक व्यवस्था, रावत प्रकाशन 2021.

6.एम.एन. श्रीनिवास, आधुनिक भारत मे सामाजिक परिवर्तन, राजकमल प्रकाशन, 2016.

# प्राचीन भारतातील वर्णव्यवस्था

**डॉ. योगेश बोराडे**
संशोधन मार्गदर्शक अर्थशास्त्र विभाग प्रमुख
एमजीएम विद्यापीठ, छ. संभाजीनगर

**धनश्री दिनेश सोनुने (कायंदे)**
संशोधक विद्यार्थी (अर्थशास्त्र)
एमजीएम विद्यापीठ, छ. संभाजीनगर

**गोषवारा**

प्राचीन भारतात वर्णव्यवस्था ही सामाजिक स्तरीकरणाची पद्धत होती. प्राचीन भारतातील वैदिक कालखंडामध्ये वर्णव्यवस्थेला खूप महत्त्व होते त्यामध्ये चार प्रमुख वर्ण होते ब्राह्मण क्षत्रिय वैश्य शूद्र या तिन्ही वर्गाला विशिष्ट असे महत्त्व असून प्रत्येकाला आपण आपले कामे वाटून दिली होती त्यामध्ये ब्राह्मण हे वरिष्ठ होते त्यानंतर क्षत्रिय होते, क्षेत्रीयनंतर वैश्य होते व सर्वात शेवटी शूद्र होते या वर्ण व्यवस्थेच्या विरुद्ध कोणालाही जाता येत नव्हते ही वर्णव्यवस्था मनुस्मृति या ग्रंथात समाविष्ट होते व या ग्रंथाला वैदिक कालखंडात विशिष्ट महत्त्व होते. या वर्ण व्यवस्थेला चातुर्वर्ण्य व्यवस्था असे म्हणतात.

**ठळक मुद्दे:** वैदिक कालखंड, वर्ण व्यवस्था, कामाचे विभाजन, वर्ण व्यवस्थेचे वैशिष्ट्ये

**प्रस्तावना**

वैदिक कालखंडातील प्राचीन भारतामध्ये (सी. 1500-1000 ईसापूर्व) समाजाचे स्तरीकरण सामाजिक-आर्थिक निर्देशकांवर आधारित नव्हते; त्याऐवजी, नागरिकांचे त्यांच्या वर्ण किंवा जातीच्या अनुसरून वर्गीकरण केले जात होते.त्यावेळी असी 'वर्ण' व्यवस्था होती. ही वर्ण व्यवस्था चार प्रमुख श्रेणीमध्ये परिभाषित केल्या गेली. त्या ब्राह्मण (पुरोहित, गुरू इ.), क्षत्रिय (योद्धा, राजे, प्रशासक इ.), वैश्य (कृषी, व्यापारी, इ. ज्यांना व्यास देखील म्हणतात), आणि शूद्र (कामगार) अश्या होत. प्रत्येक वर्णाचे पालन करण्यासाठी विशिष्ट जीवन तत्त्वे मांडली गेली होती; नवजात मुलांनी त्या प्रत्येकाच्या संबंधित वर्णांसाठी मूलभूत रूढी, नियम, आचरण आणि श्रद्धा यांचे पालन करणे अत्यंत आवश्यक होते.

वर्णाचा पहिला उल्लेख प्राचीन संस्कृत ऋग्वेदातील पुरुष सुक्तम श्लोकात आढळतो. चार वर्णांच्या संयोगाने निर्माण झालेला पुरुष हा आदिम प्राणी आहे. ब्राह्मण त्याचे तोंड, क्षत्रिय त्याचे हात, वैश्य त्याच्या मांड्या आणि शूद्र त्याचे पाय. त्याचप्रमाणे, एक समाज देखील या चार वर्णांनी तयार झालेला असतो. जो वर्ण नियमांचे पालन करून, समृद्धी आणि सुव्यवस्था टिकवून ठेवण्याची तरतूद करतो. विशिष्ट वर्णातील नवजात मुलाला त्याच्या जीवन तत्त्वांचे पालन करणे अनिवार्य नाही; वैयक्तिक आवडीनिवडी आणि वैयक्तिक प्रवृत्ती यांना समान गंभीरतेने उपस्थित केले जाते, जेणेकरून वैयक्तिक पसंती आणि प्रथा नियमांमधील संघर्ष उखडून टाकता येईल. हे स्वातंत्र्य दिल्यास, विचलित निवडीचे नेहमी इतरांवर होणाऱ्या प्रभावासाठी मूल्यांकन केले जाते. प्रत्येक वर्णाच्या नागरिकाचे हक्क त्यांच्या वैयक्तिक जबाबदाऱ्यांशी नेहमीच समान असतात. मनुस्मृती (वैदिक कालखंडातील एक प्राचीन कायदेशीर मजकूर) आणि नंतर विविध धर्मशास्त्रांमध्ये अंतर्दृष्टी आणि तर्कासह विस्तृत वर्ण प्रणाली दिसून येते. वर्ण, तत्वतः, शुद्ध आणि निर्विवाद मानल्या जाणाऱ्या वंशावळी नाहीत, परंतु श्रेणी आहेत, अशा प्रकारे जन्माऐवजी वर्ण निर्धारित करण्यात आचरणाच्या अग्रक्रमाचा अंदाज लावतात.

ब्राह्मण हा एक वर्ण आहे.ब्राह्म हा एक निरुक्त शब्द आहे म्हणजे या शब्दाचे अनेक अर्थ आहेत. ब्राह्म म्हणजे Knowledge, अरबी भाषेत उलुम. ज्याच्याजवळ उलुम आहे तो उलेमा किंवा ज्याच्या जवळ ब्राह्म (Knowledge) तो ब्राम्हण. ब्राह्मण म्हणजे scholar.

क्षत्रिय म्हणजे जो इतरांना रक्षण देतो अर्थात छत्र देतो आहे तो क्षत्रिय.

वैश्य म्हणजे व्यवसाय करणारा.

शूद्र म्हणजे सेवक, किंवा नोकर.

**वर्णप्रणालीचा उद्देश**

प्राचीन भारतातील जातिव्यवस्था 1500-1000 बीसीईच्या आसपास भरभराट झालेल्या वैदिक कालखंडात आणि तेव्हापासून अंमलात आणली गेली आणि मान्य केली गेली असे दिसून येते. त्यांच्या वर्णावर आधारित लोकांचे पृथक्करण एखाद्याच्या जीवनातील जबाबदाऱ्या कमी करणे, जातीची शुद्धता राखणे आणि शाश्वत व्यवस्था स्थापित करणे हे होते. हे व्यवसायातील संघर्ष आणि संबंधित कर्तव्यांवरील अतिक्रमणातून उद्भवणारे सर्व प्रकारचे विवाद पूर्व-निराकरण आणि टाळल्या जातील. या प्रणालीमध्ये, प्रत्येक वर्णाच्या नागरिकासाठी विशिष्ट कार्ये नियुक्त केली जातात. क्षत्रिय किंवा वैश्य म्हणून वागणारा ब्राह्मण मुक्ती किंवा मोक्ष मिळविण्यास अयोग्य ठरतो असे मानले जात. ब्राह्मणासाठी (जन्माने एक व्यतिरिक्त कृतीने एक होणे) हे समाजाचे मुख मानले जाते, आणि वेदांनुसार ते सर्वात शुद्ध जीवन स्वरूप आहे, कारण तो त्याग, तपस्या, धार्मिकता, केवळ शहाणपणासाठी प्रयत्नशील आणि संस्कारित आहे. बुद्धी क्षत्रियानेही त्याच्या वर्ण कर्तव्याशी एकनिष्ठ राहणे आवश्यक आहे; जर तो अयशस्वी झाला तर त्याला बहिष्कृत केले जाऊ शकते असा नियम होता. हेच वैश्य आणि शूद्रांना लागू होते. शूद्र, ज्यांच्यापासून दूर राहिलेले किंवा अप्रासंगिक आहेत, ते अर्थव्यवस्थेचा आधार आहेत, एक समृद्ध आर्थिक व्यवस्थेची एक मजबूत आधार प्रणाली आहे, जर ते त्यांच्या जीवनाच्या कर्तव्यात मर्यादित राहतील आणि लोभ, अनैतिक आचरण आणि अतिरिक्त आत्मभोग यांना बळी न पडता राहावे लागत असे.

मुख्य कल्पना अशी आहे की समाजात अशी व्यवस्था समाधान, शाश्वत शांतता, कायद्याचे जाणीवपूर्वक पालन, सर्व गैरवर्तनांपासून हेतुपुरस्सर प्रतिबंध, स्वातंत्र्य आणि स्वातंत्र्याचा जबाबदार वापर आणि 'सामायिक समृद्धी' या मूलभूत सामाजिक वैशिष्ट्यांना इतर सर्वांपेक्षा श्रेष्ठ ठेवेल.. सर्व वर्णांचे व्यावहारिक आणि नैतिक शिक्षण आणि अशी व्यवस्था प्राचीन भारतीय समाजात न्याय्य वाटली कारण भिन्न वर्ण एकत्र राहत होते आणि त्यांच्यात मतभेद निर्माण होण्याची शक्यता होती. म्हणून, ब्राह्मणांवर सर्व वर्णांच्या शिष्यांना विस्कळीत न करता, सुव्यवस्था आणि परस्पर सौहार्द समजून घेण्यासाठी आणि आचरणात आणण्यासाठी शिक्षित करण्याचे कर्तव्य सोपविण्यात आले होते. ब्राह्मणांच्या आश्रमांमध्ये आध्यात्मिक, ज्ञान मिळविण्याची ठिकाणे, न्याय, नैतिक आणि धार्मिक वर्तन ही प्राथमिक शिकवण होती. उदात्त जीवन जगण्यासाठी विद्यार्थ्यांना शुद्ध विवेकाने सुसज्ज करणे अत्यावश्यक मानले जात असे आणि त्याचप्रमाणे सर्व वर्णांना व्यावहारिक शिक्षण दिले जायचे, ज्या विद्यार्थ्यांना त्यांचे जीवन उद्दिष्ट आणि योग्य आचरणाचे ज्ञान दिले, ते नंतर सुव्यवस्थित समाजात प्रकट होईल.

वर्ण कर्तव्यांचे पालन करण्याचे मूळ कारण म्हणजे कर्तव्यनिष्ठ असण्यावर मोक्षप्राप्तीचा विश्वास होय. कर्माच्या संकल्पनेवरील वर्ण जीवन तत्त्वावरील विश्वास दृढ करतो. वेदांनुसार, नंतरच्या जन्म आणि मृत्यूपासून मुक्ती मिळवणे आणि आत्म्याच्या स्थलांतरापासून मुक्त होणे हे मानवाचे आदर्श कर्तव्य आहे असे मानले जायचे आणि जेव्हा एखाद्याने आपापल्या वर्णातील कर्तव्ये आणि तत्त्वांचे पालन केले तेव्हा हे शक्य आहे असे मानले जायचे. वेदांच्या मते, इतरांच्या जीवनाच्या जबाबदाऱ्यांवर सातत्याने अतिक्रमण केल्याने अस्थिर समाज निर्माण होतो. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र हे समाजाचे चौपट स्वरूप बनवतात, प्रत्येकाला योग्य जीवन कर्तव्ये आणि आदर्श स्वभाव दिलेला असतो. पहिल्या तीन श्रेणीबद्ध जातींचे पुरुष दोनदा जन्मलेले म्हणतात; पहिला, त्यांच्या पालकांचा जन्म, आणि दुसरा, त्यांच्या गुरूचा, पवित्र धागा दिक्षा घेतल्यानंतर ते त्यांच्या खांद्यावर घालतात. वर्ण प्रणाली वेदांमध्ये भ्रूण आहे असे दिसते, नंतर उपनिषद आणि धर्मशास्त्रांमध्ये विस्तारित आणि सुधारित केले गेले.

**ब्राम्हण**

ब्राह्मण हे ज्ञानाचे अवतार म्हणून पूज्य मानले जात होते, ते समाजातील सर्व वर्णांना उपदेश देत होते. ते केवळ त्यांच्या ब्राह्मण जन्मामुळेच पूज्य नव्हते तर त्यांनी सांसारिक जीवनाचा त्याग केल्यामुळे आणि दैवी गुणांची जोपासना केल्यामुळे ते नेहमी ब्राह्मणाच्या चिंतनात मग्न असल्याचे गृहित धरले गेले होते, म्हणून त्यांना ब्राह्मण म्हटले जाते. पुरोहित, गुरु, ऋषी, शिक्षक आणि विद्वान यांनी ब्राह्मण समाजाची स्थापना केली. ते नेहमी त्यांच्यासाठी ठरवलेल्या ब्रह्मचर्य वृत्तीने जगत असत. विवाहित ब्राह्मणांना देखील ब्रह्मचारी असे संबोधले जात असे. कारण केवळ प्रजननासाठी संभोग केला जातो आणि कृतीपासून मानसिकदृष्ट्या अलिप्त राहतो. तथापि, इतर वर्णांतील कोणीही ज्ञानाच्या व्यापक संपादनानंतर आणि बुद्धीची जोपासना केल्यानंतर ब्राह्मण होऊ शकतो असे होते.

नवजात मुलांसाठी ट्यूटर म्हणून ब्राह्मण ही सर्वात आघाडीची निवड होती कारण ते देवतांचे उदात्त ज्ञान आणि चार वर्णांमधील दुव्याचे प्रतिनिधित्व करतात असे मानले जायचे. अशा प्रकारे, पूर्वजांचे ज्ञान गुरु-शिष्य अभ्यासातून टिकून राहिल्यामुळे, प्रत्येक वर्णात जन्मलेले सर्व नागरिक त्यांच्या जीवनाच्या गरजा पूर्ण करतात. सामान्यतः, ब्राह्मण हे समाधानाचे अवतार आणि अज्ञान दूर करणारे होते, सर्व साधकांना सर्वोच्च ज्ञानाच्या शिखरावर नेणारे होते, तथापि, अपवादांनुसार, ते योद्धा, व्यापारी किंवा शेतकरी म्हणून गंभीर प्रतिकूल परिस्थितीत जगले. ब्रह्मा ऋषी किंवा महाऋषी या उपाधींनी बहाल केलेल्यांना राजे आणि त्यांच्या राज्यांच्या प्रशासनाचा सल्ला देण्याची विनंती करण्यात आली. सर्व ब्राह्मण पुरुषांना पहिल्या तीन वर्णातील स्त्रियांशी लग्न करण्याची परवानगी होती, तर शूद्र स्त्रीशी लग्न केल्यास ब्राह्मणाचा पुरोहिताचा दर्जा कमी होईल असे वाटत होते. तरीही, ब्राह्मणाची संमती असेल तर शूद्र स्त्री नाकारली जाणार नाही.

ब्राह्मण स्त्रिया, त्यांच्या पतीच्या अधीन राहण्याच्या लोकप्रिय श्रद्धेच्या विरुद्ध, खरेतर, त्यांच्या पवित्रतेसाठी अधिक आदरणीय होत्या आणि त्यांना असमान आदराने वागवले जात असे. मनुस्मृतीनुसार, ब्राह्मण स्त्रीने फक्त ब्राह्मणाशीच लग्न केले पाहिजे आणि इतर कोणीही नाही, परंतु ती पुरुष निवडण्यास स्वतंत्र आहे. तिला, दुर्मिळ परिस्थितीत, क्षत्रिय किंवा वैश्य यांच्याशी विवाह करण्याची परवानगी आहे, परंतु शूद्र पुरुषाशी लग्न करणे प्रतिबंधित आहे असा अलिखित नियम होता. आंतरजातीय विवाहांमधले निर्बंध हे जन्मलेल्या संततीची नंतरची अशुद्धता टाळण्यासाठी आहेत. एखाद्या विशिष्ट जातीतील पुरुषाने उच्च जातीच्या स्त्रीशी विवाह करणे हा अपूर्ण जुळणी मानला जातो, ज्याची पराकाष्ठा अज्ञानी संततीमध्ये होते.

**क्षत्रिय**

क्षत्रिय म्हणजे योद्धा कुळ, राजे, प्रदेशांचे शासक, प्रशासक इत्यादी. क्षत्रियांना शस्त्रास्त्रे, युद्ध, तपस्या, प्रशासन, नैतिक आचरण, न्याय आणि राज्यकारभार शिकणे अत्यंत महत्त्वाचे होते. सर्व क्षत्रियांना लहानपणापासूनच आवश्यक ज्ञानाने पूर्णपणे सुसज्ज होईपर्यंत ब्राह्मणाच्या आश्रमात पाठवले जात असे. ब्राह्मणांसारख्या तपाव्यतिरिक्त, त्यांना प्रशासनाचे अतिरिक्त ज्ञान मिळत असे. त्यांचे मूलभूत कर्तव्य म्हणजे त्यांच्या प्रदेशाचे रक्षण करणे, हल्ल्यांपासून बचाव करणे, न्याय देणे, सद्गुणी राज्य करणे आणि त्यांच्या सर्व प्रजेला शांती आणि आनंद देणे आणि ते त्यांच्या ब्राह्मण गुरूंकडून प्रादेशिक सार्वभौमत्व आणि नैतिक दुविधांच्या बाबतीत सल्लामसलत करायचे. त्यांना परस्पर संमतीने सर्व वर्णांच्या स्त्रीशी लग्न करण्याची परवानगी होती. जरी क्षत्रिय किंवा ब्राह्मण स्त्री ही पहिली पसंती असेल, तरी शूद्र महिलांना क्षत्रियाशी लग्न करण्यास मनाई नव्हती व त्या करतहि होत्या. क्षत्रिय स्त्रिया, त्यांच्या पुरुष सहकाऱ्यांप्रमाणेच, मर्दानी शिस्तीने सुसज्ज होत्या, युद्धशास्त्र पूर्णपणे परिचित होत्या, राजाच्या अनुपस्थितीत कर्तव्ये पार पाडण्याचे अधिकार आणि राज्याच्या कारभारात पारंगत होत्या. प्रचलित समजुतीच्या विरोधात, क्षत्रिय स्त्री संकटाच्या वेळी राज्याचे रक्षण करण्यास आणि तिच्या वंशजांना युद्ध कौशल्ये प्रदान करण्यास तितकीच सक्षम होती. सिंहासनावर सातत्य राखण्यासाठी आणि प्रदेशांवर सार्वभौमत्वाचा दावा करण्यासाठी क्षत्रिय राजाचा वंश शुद्ध ठेवण्यात आला होता.

**वैश्य**

वैश्य हा तिसरा वर्ण आहे ज्याचे प्रतिनिधित्व शेतकरी, व्यापारी, सावकार आणि व्यापार करतात. वैश्य देखील दोनदा जन्मलेले आहेत आणि सद्गुरु जीवनाचे नियम शिकण्यासाठी आणि हेतुपुरस्सर किंवा अपघाती गैरवर्तनापासून परावृत्त करण्यासाठी ब्राह्मणांच्या आश्रमात जातात. पशुपालन हा वैश्यांच्या सर्वात प्रतिष्ठित व्यवसायांपैकी एक होता, कारण राज्याच्या गायी, हत्ती, घोडे यांचा ताबा आणि गुणवत्ता आणि त्यांच्या पालनपोषणामुळे नागरिकांच्या जीवनमानावर आणि संबंधित समृद्धीवर परिणाम झाला. वैश्य राज्याच्या प्रशासकांशी जवळून समन्वय साधून चर्चा, अंमलबजावणी आणि सतत फायदेशीर आर्थिक संभावना प्रदान करून जीवनमान सुधारण्यासाठी कार्य करत असत. कारण त्यांचे जीवन आचरण त्यांना तात्काळ समाधानाच्या वस्तूंकडे आणते, कायद्याकडे दुर्लक्ष करण्याची आणि दुर्बलांना तुच्छ लेखण्याची त्यांची प्रवृत्ती मानली जाते. म्हणून, क्षत्रिय राजा वैश्यांमधील संघर्षातून उद्भवणारे विवाद सोडवण्यात सर्वात व्यस्त असायचा.

वैश्य स्त्रिया देखील त्यांच्या पतींना व्यवसाय, पशुपालन आणि शेतीमध्ये साथ देतात आणि कामाचा भार वाटून घेत असत. चार वर्णांतून आपल्या आवडीचा जोडीदार निवडण्यास ते तितकेच मोकळे होते, जरी शूद्र निवडण्यास मनापासून विरोध केला गेला. वैश्य स्त्रियांना कायद्यांतर्गत संरक्षण मिळाले, आणि इतर तीन वर्णांप्रमाणेच पुनर्विवाह निःसंशयपणे सामान्य

होता. वैश्य स्त्रीला तिच्या पतीच्या अकाली मृत्यूच्या बाबतीत वडिलोपार्जित मालमत्तेवर समान अधिकार होते आणि ती तिच्या पतीच्या पाठिंब्याने तिच्या मुलांच्या संगोपनासाठी तितकीच जबाबदार असते.

**शूद्र**

शेवटचा वर्ण समृद्ध अर्थव्यवस्थेचा कणा दर्शवितो, ज्यामध्ये ते त्यांच्यासाठी निश्चित केलेल्या जीवन कर्तव्यांबद्दलच्या त्यांच्या कर्तव्यदक्ष आचरणासाठी आहेत. शूद्रांबद्दलचे विद्वानांचे मत सर्वात वैविध्यपूर्ण आहे कारण त्यांच्या आचरणावर अधिक निर्बंध आहेत. तथापि, अथर्ववेद शूद्रांना मनापासून वेद ऐकण्याची आणि शिकण्याची परवानगी देतो आणि महाभारत सुद्धा शूद्रांना आश्रमात समाविष्ट करून वेद शिकण्याचे समर्थन करते. तथापि, राजांनी आयोजित केलेल्या यज्ञांमध्ये पुजारी बनणे हे बऱ्याच प्रमाणात मर्यादित होते. शूद्र हे दोनदा जन्मलेले नसतात, म्हणून त्यांना इतर वर्णांप्रमाणे पवित्र धागा घालण्याची आवश्यकता नाही. शूद्र पुरुषाला केवळ शूद्र स्त्रीशी लग्न करण्याची परवानगी होती, परंतु शूद्र स्त्रीला चार वर्णांपैकी कोणत्याही वर्णातून लग्न करण्याची परवानगी होती.

शूद्र ब्राह्मणांची त्यांच्या आश्रमात, क्षत्रियांची त्यांच्या राजवाड्यात आणि शाही छावण्यांमध्ये आणि वैश्य त्यांच्या व्यावसायिक कार्यात सेवा करतील. जरी ते आदिम अस्तित्वाचे पाय असले तरी, उच्च वर्णांचे विद्वान नागरिक त्यांना नेहमीच समाजाचा एक महत्त्वाचा भाग मानतात, कारण पाय कमकुवत असल्यास व्यवस्थित समाज सहजपणे तडजोड करू शकतो. दुसरीकडे शूद्रांनी त्यांच्या स्वामींच्या आज्ञेचे पालन करावेच लागायचे कारण त्यांची विहित कर्तव्ये आत्मसात करून मोक्ष प्राप्त करण्याच्या त्यांच्या ज्ञानाने त्यांना एकनिष्ठ राहण्यास प्रोत्साहित केले. शूद्र स्त्रिया देखील राणीच्या सेवक आणि जवळच्या सहचर म्हणून काम करत असत आणि लग्नानंतर तिच्याबरोबर इतर राज्यांमध्ये जात असत. अनेक शूद्रांनाही कृषी, व्यापारी आणि वैश्यांच्या व्यवसायात प्रवेश करण्याची परवानगी होती. जीवन कर्तव्यांचे हे वळण, तथापि, बिघडत चाललेल्या आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन, विशेष परिस्थितीत असेल. शूद्रांचा नि:स्वार्थीपणा त्यांना अभूतपूर्व आदर आणि आदरास पात्र बनवतो.

प्राचीन वर्णाच्या कर्तव्यापासून हळूहळू माघार घेणे.सर्व प्रकारच्या लोकांसाठी जीवनक्रमाची व्यवस्था असूनही, वैदिक कालखंडाच्या अखेरीस, अनेकांनी त्यांच्या प्राथमिक कर्तव्यांकडे दुर्लक्ष आणि अवज्ञा करण्यास सुरुवात केली होती. ब्राह्मणांना त्यांच्या व्यवसायाचा आणि दर्जाचा हुकूमशाही स्वभाव वाटू लागला, त्यामुळे त्यांच्यात अहंकार निर्माण झाला. अनेक गुरूंनी क्षत्रिय राजांना उपदेश देणारे स्थान सांगून शूद्र गुण आचरणात आणून अपवित्र आणि कपटी बनले. जरी ब्राह्मणांनी केवळ भिक्षा करून जगणे आणि त्यांच्या किमान उदरनिर्वाहापेक्षा अधिक शोधणे आवश्यक नसले तरी, त्यांच्या श्रेष्ठ दर्जाचे आणि निर्विवाद श्रेणीबद्ध प्रसाराचे भांडवल करून, ते यज्ञ करण्यासाठी अधिक मागणी करू लागले.

क्षत्रिय आपले पराक्रम आणि संपत्ती दाखवण्यासाठी इतर राजांशी अनेकदा लढत असत. अनेक राजांना त्यांच्या ब्राह्मण गुरूचा सल्ला नाकारणे स्वीकार्य वाटले आणि म्हणून ते स्वनियंत्रक बनले, अनीतिपूर्ण निर्णय घेतले, ज्यामुळे राजसत्ता, प्रदेश आणि वैश्य आणि शूद्रांचा विश्वास गमावला. जमिनीच्या मालकीमध्ये आणि शूद्रांच्या अधीन राहण्यात वैश्य स्वतःला शक्तिशाली समजू लागले. भांडण, कपट, फसवणूक या वैश्यांच्या आचरणावर परिणाम झाला. क्षत्रिय आणि वैश्य यांच्या इच्छेनुसार शूद्रांवर वारंवार अत्याचार केले गेले, ज्यामुळे त्यांनी त्यांची कर्तव्ये नाकारली आणि त्याऐवजी चोरी करणे, खोटे बोलणे, लालसा आणि चुकीची माहिती पसरवणे पसंत केले. अशाप्रकारे, सर्व वर्ण त्यांच्या सद्गुणातून खाली पडले आणि एकाची अनीतिमान कृत्ये इतरांच्या समान कृत्यांना प्रेरणा देत राहिली आणि त्यांचे समर्थन करत राहिली. जातींचे मिश्रण हा देखील वर्ण व्यवस्थेतील कमी होत चाललेल्या रुचीचा एक भाग मानला जात होता. यातील बहुतेक बदल 1000 BCE आणि 500 BCE दरम्यान घडले जेव्हा सतत सामाजिक आणि आर्थिक गुंतागुंत वर्ण-आधारित कर्तव्यांच्या वाटपासाठी नवीन आव्हाने म्हणून उदयास आली. लोकसंख्या वाढली आणि त्यामुळे मूळ वर्ण व्यवस्थेच्या पावित्र्याबद्दल नागरिकांच्या त्यांच्या सामूहिक विश्वासामध्ये मतभेद निर्माण झाले. मोठ्या समाजांना मानवतावाद आणि एकाच मोठ्या समाजात सामील करण्यात धार्मिक धर्मांतराने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

300 CE ते 700 CE दरम्यानचा कालावधी अनेक धर्मांना छेद देणारा होता. मोठ्या वर्णाच्या लोकसंख्येला हाताळणे कठीण झाल्यामुळे, जैन धर्माच्या उदयाने एकाच मानवी वर्णाची विचारधारा मांडली आणि त्याशिवाय दुसरे काहीही नाही. अनेकांनी मूळ वर्ण नियमांचे पालन केले, परंतु इतर अनेकांनी, विरोधी मतांना नाकारून, प्राथमिक चार

वर्णांमध्ये सुधारित उप-वर्ण तयार केले. 700 CE आणि 1500 CE च्या दरम्यान घडणारी ही प्रक्रिया आजही चालू आहे, कारण भारत आता प्राथमिक चार वर्ण आणि शेकडो उप-वर्णांच्या भांडाराचे घर आहे, ज्यामुळे मूळ चार वर्ण केवळ 'अम्ब्रेला टर्म' बनले आहेत आणि कायमचे अस्पष्ट आहेत.

इस्लाम, ख्रिश्चन आणि इतर धर्मांच्या नंतरच्या उदयाने भारतातील मूळ वर्ण पद्धतीवरही त्यांची छाप सोडली. धर्मांतरित पिढ्यांनी हिंदू धर्माच्या त्यांच्या कल्पनेत त्या काळातील परिस्थितीशी सुसंगत अशा प्रकारे सुधारणा केल्या. बौद्ध धर्माच्या उदयाने देखील, जीवनाच्या नूतनीकरणाच्या परिस्थितीत वर्ण प्रणालीच्या कायदेशीर निरंतरतेवर महत्त्वपूर्ण पाऊल टाकले. अशाप्रकारे, वैदिक कालखंडाच्या शिखरापासून वर्ण कर्तव्यांचे आत्मीय पालन कालांतराने व्यक्तिनिष्ठ तात्पुरते पालनाकडे कमी झाले, कारण अंशतः वर्ण कर्तव्यांचे पालन करण्यात अस्वस्थता आणि अंशतः बाह्य प्रभावामुळे.

वरील परिणाम हळूहळू होत असताना, स्वातंत्र्य, समानता आणि स्वातंत्र्य या पाश्चात्य संकल्पनांच्या मोठ्या प्रमाणात प्रभावामुळे वर्ण नियमांमधून त्वरित माघार घेणे शक्य झाले. हे बदल 1500 CE पासून सध्याच्या काळात पाहिले जाऊ शकतात. पाश्चात्य राष्ट्रांसाठी, त्यांच्या स्वतःच्या सांस्कृतिक पार्श्वभूमीत रुजलेल्या, त्यांच्या दृष्टीने पुरातन वर्ण पद्धतीला मान्यता देण्यात फारसा अर्थ नव्हता. मोगल आक्रमण आणि बहुविध हिंदू राजवंशांच्या जवळच्या सार्वभौमत्वाला रोखून, ब्रिटीश आक्रमणाने समानता आणि स्वातंत्र्यावर आधारित एक नवीन जागतिक दृष्टिकोन आणला, जो वर्ण व्यवस्थेशी विसंगत होता. प्रचंड वसाहतवाद, 'सांस्कृतिक साम्राज्यवादाचा' प्रभाव, वर्ण कर्तव्यांमध्ये महत्त्वपूर्ण बदल लागू केले. व्यापार आणि उदारीकरण, संस्कृतीच्या देवाणघेवाणीमुळे वर्ण व्यवस्था चालू ठेवण्यामध्ये उरलेल्या छोट्याशा विश्वासाला तडा गेला.

ही शाश्वत घट असूनही, समकालीन भारतातील चारही वर्णांचे वंशज पूर्वजांच्या बुद्धीच्या शोधात त्यांची मुळे पुन्हा शोधण्याचा प्रयत्न करीत आहेत. जरी चार वर्णांनी एकमेकांच्या जीवन कर्तव्यांवर अतिक्रमण केले असले तरी, सुव्यवस्था आणि शांततेची भावना प्रवचन, सामुदायिक मेळावे आणि वेगवेगळ्या पिढ्यांमधील व्यस्ततेमध्ये शोधली जाते आणि आठवते. समकालीन अटींमध्ये वर्ण प्रणाली एकतर आरक्षण आणि शंका न घेता प्रामाणिक वचनबद्धतेसह किंवा अभूतपूर्व बाह्य प्रभाव आणि व्यक्तिपरक विसंगतीच्या समस्यांमुळे उद्भवलेल्या अस्पष्टता आणि प्रतिकारासह अनुसरण केली जाते. अनेक नागरिक वर्ण प्रणालीच्या सौम्य आवृत्तीचा सराव करत असताना, हिंदू धर्माच्या व्यापक संदर्भात तिच्या मर्यादा आणि कडकपणा वाढवतात, तरीही कट्टर आस्तिक अजूनही या प्रणालीवर पुन्हा हक्क मिळवण्याच्या महत्त्वाचा प्रयत्न करतात आणि प्रोत्साहन देतात.

**वर्ण व्यवस्थेची वैशिष्ट्ये:**

- वर्ण व्यवस्था ही वैदिक कालखंडात (सी. 1500-1000 ईसापूर्व) सुरू झाली होती.
- वर्ण व्यवस्था ही सामाजिक-आर्थिक निर्देशकांवर आधारित नव्हती.
- वर्ण व्यवस्था ही नागरिकांचे वर्णानुसार वर्गीकरण करत असे.
- वर्ण व्यवस्थेनुसार, व्यक्तींचे वर्गीकरण चार वर्गांमध्ये होते.
- वर्ण व्यवस्थेनुसार, व्यक्तींच्या जीवनातील जबाबदाऱ्या निश्चित केल्या जात होत्या.
- वर्ण व्यवस्थेनुसार, व्यक्तींच्या वर्णाचा अनुलोम विवाह होत असे.

ऋग्वेदकाळात ब्राह्मण क्षेत्रीय वैश्य आणि शूद्र अशी चातुर्वर्ण व्यवस्था विकसित झाली होती. ती उत्तर वैदिक काळात अधिक ताठर होऊन त्यातील बंधने कठिण झाली. परस्पर वर्णातील विवाह व खानपान बंद होत गेले. एका वर्णातून दुसऱ्या वर्णनात जाण्याचे स्वातंत्र्य राहिले नाही. वर्ण हा जन्मावरून ठरविला जाऊ लागला. त्यामुळे ब्राह्मणाचा मुलगा ब्राह्मण, शूद्राचा मुलगा शूद्र मांडण्याची प्रथा रूढ झाली. पराजित अनार्यांनी शूद्र म्हणून अत्यंत हीन प्रकारची वागणूक देण्यात आली. प्रत्येक वर्णाच्या अधिकारात व दर्जात फरक करण्यात आला. व्यवस्थेच्या विकृती मधून जातीप्रथा उदयाला पावली. स्वतः लोहार, सोनार, चर्मकार, कोळी इत्यादी जाती व्यवसायावरील परिणाम होत गेला. जाती प्रथेच्या उदयामुळे उत्तर वैदिक कालखंडापासून सामाजिक विषमतेला प्रारंभ झाला.

**निष्कर्ष**

प्राचीन भारतातील वर्णव्यवस्था ही सामाजिक स्तर निश्चित करण्याची एक पद्धत होती. प्राचीन भारतामध्ये ह्या वर्णव्यवस्थेला चातुर्वर्ण व्यवस्था असे म्हणतात. यामध्ये चार वर्ण तयार केले होते. पहिला ब्राह्मण दुसरा क्षत्रिय तिसरा वैश्य चौथा शूद्र. या प्रत्येकाला आपण आपले काम वाटून दिले होते. त्यांच्या सीमा मर्यादित केल्या होत्या. त्यांचे सामाजिक वर्गामध्ये विभाजन केलेले होते. समाजातील सर्व लोकांमध्ये कामाची विभागणी व्हावी या मुख्य गरजेतून हे वर्ण तयार केले होते. या जीवन जगण्याच्या प्रयत्नातील स्पर्धा व संघर्ष टाळण्यासाठी ऋग्वेद कालीन अभिजनांनी तत्कालीन जीवनपद्धतीला अनुरूप अशा वर्णाची रचना केली असावी असे काहींचे मत होते. परंतु कालांतराने त्यामध्ये बदल होऊन एक वेगळीच जातीव्यवस्था निर्माण झाली व त्यावरून खालच्या वर्गाचे शोषण होऊ लागले.

**संदर्भग्रंथ**


1) जॉली ज्युलियस 1849-. माँनव धर्मशास्त्र, मनुची संहिता, मूळ संस्कृत मजकूर;. नबू प्रेस, 2011.
2) ओल्डनबर्ग, एच. गृह्यशास्त्र, वैदिक घरगुती समारंभाचे नियम खंड 1. उलान प्रेस, 2012.
3) निकुल जोशी, प्राचीन भारतातील जातीव्यवस्था, 20 नोव्हेंबर 2017.
4) अनामिक. रामायणा व वाल्मिकीया प्रिन्स्टन युनिव्हर्सिटी प्रेस, 2016.
5) बुहलर, जी. मनूचे नियम. स्वतंत्र प्रकाशन प्लॅटफॉर्म, 2016.
6) बर्नेल, एसी द ऑर्डिनन्स ऑफ मनू लिखित आर्थर कोक बर्नेल. रूटलेज, 2017.
7) गांगुली, कृष्ण-द्वैपायन व्यास यांचे के.एम. महाभारत (2004)
8) किसारी मोहन गांगुली.. मुन्शीराम मनोहरलाल पब्लिशर्स प्रा. लि., 2017.
9) ग्रिफिथ, आरटीएच द हायम्स ऑफ द अथर्व-वेद. एलपी पब्लिकेशन्स, 1995.
10) विल्सन, प.पू. विष्णु पुराण. श्री सतगुरु पब्लिकेशन्स, 2010.

# वारकरी संप्रदायाची वैश्विकता आणि वारकरी संप्रदायाचे तत्त्वज्ञान - एक ऐतिहासिक अभ्यास

**प्रा. डॉ. संजय जिभाऊ पाटील**
इतिहास विभाग प्रमुख
क्रांतिवीर नवलभाऊ कला महाविद्यालय, नवलनगर

**प्रस्तावना**

वारकरी संप्रदायाची परंपरा ही प्रामुख्याने तेराव्या शतकापासून पहावयास मिळते. या संप्रदायाला तात्विक अधिष्ठान प्राप्त करून देण्याचे व वारकरी संप्रदायाचा पाया रचण्याचे कार्य संत ज्ञानेश्वरांनी केलेले दिसून येते. त्याचबरोबर संत एकनाथ व संत तुकाराम आणि इतर संतांचे कार्य हे महत्त्वपूर्ण मानले जाते. संत नामदेवांनी तर वारकरी संप्रदायाला महाराष्ट्राबाहेर नेण्याचे कार्य केले. त्यांनी मुख्यतः या संप्रदायाला पंजाब मध्ये मजबूत केले. संत नामदेव हे जवळपास 18 वर्ष पंजाब मध्ये वास्तव्यास होते. त्यांनी सर्वसामान्य जनतेला वारकरी संप्रदायाची ओळख करून दिली व सामान्य लोकांना वारकरी संप्रदायाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे कार्य केले.

वारकरी संप्रदायातील सर्वच संतांनी अभंग, ओव्या, कीर्तने, भजने इत्यादी माध्यमातून शिकवण दिली. ग्रामीण भागाबरोबरच शहरी भागामध्ये ही संप्रदायाची लोकप्रियता वाढत गेली. या संप्रदायात कोणत्याही प्रकारचा जातीभेद, धर्मभेद, उच्चनीचता न मानता सर्वांना संप्रदायात स्थान देण्यात आले होते. त्यामुळे वारकरी संप्रदायाची लोकप्रियता वाढली आणि ती आजतागायत टिकून आहे. आजही एवढ्या धकाधकीच्या जीवनामध्ये लोक नित्यनेमाने आषाढी आणि कार्तिकीची वारी करताना दिसून येतात.' विश्वची माझे घर ' असा संदेश देणाऱ्या वारकरी संप्रदायातील संत व त्यांचे अध्यात्मिक विचार आजच्या उच्च शिक्षण प्रणाली समोर एक आदर्श आहे. महाराष्ट्रातील या संतपरंपरेने भरकटलेल्या समाजाला योग्य मार्गावर आणण्यासाठी फार मोठे योगदान दिले आहे. केवळ महाराष्ट्राचे नव्हे तर आंध्र प्रदेश, कर्नाटक, गोवा, मध्यप्रदेश, गुजरात आणि पंजाब या राज्यांपर्यंत वारकरी संप्रदायाने आपल्या भागवत धर्माच्या पताका फडकविलेल्या दिसून येतात. वारकरी संप्रदायाच्या विचारांमुळे एक सक्षम पिढी निर्माण होऊ शकते हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून वारकरी संप्रदायाची वैश्विकता आणि वारकरी संप्रदायाचे तत्त्वज्ञान यावर अल्पसा शोध घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधातून केला आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे :**

1) वारकरी संप्रदायातील संतांच्या विचारांमधील वैश्विकता समजून घेणे.
2) वारकरी संप्रदायाच्या तत्त्वज्ञानाचा शोध घेणे.
3) वारकरी संप्रदायातील समतेच्या पुरस्काराविषयी माहिती घेणे.

**वारकरी संत व त्यांच्या विचारांमधील वैश्विकता :**

वारकरी संप्रदायात जे संत होऊन गेले ते अठरा पगड जातीतील होते. त्यांनी आपल्या सेवा साधनांद्वारे जगाला प्रेम देणाऱ्या विठ्ठल रुक्माई ची पूजा केली आहे. अत्यंत शुद्ध अंतकरणाने ज्यांनी जी सेवा केली तीच त्यांची भक्ती आणि ज्यांनी त्यांच्या सेवेचा लाभ घेतला तेच त्यांचे दैवत असा एक आदर्श कर्म दृष्टांत या संतांनी जगाला सांगितला. अशा प्रकारचे कर्म दृष्टांताचे ज्ञान देणारे विद्यापीठ जगात कुठेही आढळून येत नाही. दुर्दैवाने उच्च विद्यालय घोषित लोक या कर्मदृष्टांताचे आचरण करताना दिसून येत नाहीत या संदर्भात वारकरी संप्रदायातील संतांच्या काव्यामध्ये पुढील प्रमाणे संदर्भ आढळतो.'

सुई आणि सुतळी, कात्री गज दोरा l मांडीयेला पसारा सदाशिवी l
नामा म्हणे शिवी विठोबाचे अंगी l त्याचेनी मी जगी धन्य झालो 'll

शिंपी कुळात जन्माला येऊन जगातील सर्वांच्या कल्यानार्थ मला झटका आले हे माझे भाग्य आहे. असा विचार संत नामदेवांनी आपल्या अभंगामधून मांडलेला आहे.

' बुडते हे जन न देखवे डोळा l येतो कळवळा ll '

म्हणून या जगामध्ये अनाचार वाढल्याने जगाचा सर्वनाश होऊ शकतो, त्यामुळे मला प्रचंड दुःख होत आहे. असे विचार संत ज्ञानदेवांनी आपल्या अभंगांमधून व्यक्त केले आहेत. तसेच त्यांच्या विचारांमधून आलेली विश्वात्मकतेची भावना खरोखरच आजच्या उच्च विद्याविभूषित पिढीला विचार करायला लावणारी आहे. संत ज्ञानदेव महाराज म्हणतात आपणच आपल्यात विश्व बघू आणि त्यातच विश्व होऊन जाऊ आणि एकदा जर आपण आपले राहिलेले नसून विश्वाचे झालेले आहोत असे मानले तर आपल्यातील भेदभाव सहज नष्ट होऊन जातील. अशा प्रकारे उच्च प्रतीचे वैश्विक विचार संत ज्ञानदेवांनी मांडलेले दिसून येतात. [1]

"..... मोट नाडा विहीर दोरी I अवघी व्यापली पंढरी II
सावता म्हणे केला मळा I विठ्ठल पायी गोविला गळा II "

या अभंगातून संत सावता माळी असे म्हणतात की, माळी या जातीत जन्माला आलो आणि आपली सेवा करण्याचे भाग्य मला मिळाले असे आत्मिक समाधान व्यक्त करणारे उद्गार ते काढतात. मात्र वर्तमान स्थितीत असा सूर आज कुठेच दिसत नाही. उच्च शिक्षण घेऊन बाहेर पडणाऱ्या आजच्या पिढीच्या मुखात' मी केले',' माझ्यामुळे झाले '. असे गर्व आणि अभिमानाचे बोल दिसतात. [2]

".... योगी पावन मनाचा I साहे अपराध जनाचाI
विश्व झाली या वन्ही I संत सुखे व्हावे पाणी II".

संत मुक्ताबाई अशा प्रकारचे विचार आपल्या अभंगातून प्रकट करताना दिसतात. जगातील कु प्रवृत्तीच्या लोकांवर नाराज होऊन स्वतःला कोंडून घेणाऱ्या संत ज्ञानदेवांना उपदेश देण्यासाठी संत मुक्ताबाई म्हणतात, आपला जन्म विश्व कल्याण अर्थ झालेला आहे[3] म्हणून आपला जन्म विश्व कल्याण अर्थ झालेला आहे म्हणून आपल्याला दृष्ट प्रवृत्तीच्या लोकांद्वारे होणारा त्रास सहन करावा लागेल. हा मौलिक विचार सत प्रवृत्तीची कास धरून चालणाऱ्या आजच्या नवशिक्षितांसाठी नव संजीवनी देणारा ठरेल. [4 3] समाजामध्ये दृष्ट प्रवृत्तीच्या लोकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे म्हणून प्रामाणिक मन डळमळीत होत असते. अशावेळी आपली प्राचीन संत परंपरा नक्कीच प्रेरणादायी ठरेल. असा विचार संत सेना यांच्या अभंगांमधूनही आलेला दिसून येतो[5].'... धर्माचे थोतांड करून भरी पोट I भार्या मुले मठ मजाकरी II '. वर्तमान काळात पैशांच्या बळावर व सत्तेच्या जोरावर उच्च शिक्षण घेऊन सर्वसामान्य जनतेला लुबाडणारे ठग जागोजागी दिसून येतात. प्रामाणिक माणसांची मात्र कुचंबना होताना दिसून येते. अशावेळी वारकरी संत परंपरेतील अध्यात्मिक विचार मनाला आधार देणारे ठरू शकतात असा विश्वास संत तुकाराम महाराज यांच्या अभंगातून आपल्याला पहावयास मिळतो. [6]

.'..... धावूनी वैराग्याची कळा I भोगी विषयाचा सोहळा II '

संत ज्ञानेश्वरांनी तर आपल्या अखंड आयुष्यात जगाच्या उद्धारकर्त्याकडे स्वतःसाठी कशाचीही मागणी केली नाही. त्यांनी विश्वकल्याणाची मागणी केली आहे[7]

.'... आता विश्वात्मके देवे I येणे वागयज्ञ तोषावे II
तोशोनी मज द्यावे I पसायदान हे II'

वारकरी संप्रदायाचा पाया असणारे संत ज्ञानदेव हेच सर्व संत मीरांसमोर आदर्श ठरले व त्यांचे वैश्विक ते विषयीच्या विचारांचे संत मंडळींनी स्वागत केलेले दिसते. जवळपास तेराव्या शतकापासून म्हणजे सुमारे 700 वर्षांपासून ज्ञानदेवांची अमृतवाणी मराठी मनाला रिझवीत आली आहे. आजही या वाणीला कुठेही बाधा झालेली दिसून येत नाही. [8] वारकऱ्यांच्या घरोघरी ज्ञानेश्वरीचे वाचन चालत असलेले दिसते. अशाप्रकारे वारकरी संप्रदायातील संतांनी व्यक्त केलेल्या विचारांमध्ये वैश्विकता दिसून येते.

**वारकरी संप्रदायाचे तत्त्वज्ञान :**

भारतीय संस्कृती ही विविधतेने नटलेली असल्याने तिचे तत्त्वज्ञान जितके उत्तुंग व उदात्त आहे तितकेच तिची धर्मभावना झेप घेणारी आहे. भारतीय संस्कृतीच्या तत्त्वज्ञानामध्ये वारकरी संप्रदायाने ही भर घातलेली आहे. वारकरी संप्रदायातील संतांनी सांगितलेले तत्त्वज्ञान व शिकवण ही साधी, सोपी सरळ होती. सामान्यातला सामान्य माणूसही त्याकडे आकर्षित होऊन या शिकवणुकीचा अंगीकार करण्याचा प्रयत्न करतो. भारतीय तत्त्वज्ञानाचा विचार करता आपल्याला वैदिक तत्त्वज्ञानापासून भारतीय तत्त्वज्ञानाची उकल होते. तत्त्वज्ञान म्हणजे काय?असा प्रश्न पडल्यानंतर जग आणि मानवी

जीवनाकडे विचारपूर्वक पाहिले असता चिंतकाला जाणवणारे त्याचे स्वरूप म्हणजे तत्त्वज्ञान होय. [9] वारकरी संप्रदायाचे तत्त्वज्ञान हे वारकरी संतांच्या लेखणीतून आणि त्यांच्या शिकवणीतून निर्माण झालेले आहे.. संत ज्ञानेश्वरांपासून अनेक संत होऊन गेले. संत ज्ञानेश्वरांना वारकरी संप्रदायाचा पाया घालणारे संत म्हणून ओळखतात. वारकरी तत्त्वज्ञानाचा पाया ही त्यांनीच घातला हेही विसरता येणार नाही. कोणत्याही धर्म संप्रदायाची वैचारिक बैठक ही त्या संप्रदायाच्या तत्त्वज्ञान व आचारधर्मावर अवलंबून असते. वारकरी संप्रदायाचा विचार केला असता त्याची उभारणी विशिष्ट तत्त्वज्ञानावर झालेली आहे. त्याचे मूळ हे संत ज्ञानेश्वरांच्या ग्रंथात दिसते. " भावार्थदीपिका" हा ग्रंथ वारकरी तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने महत्त्वाचा ग्रंथ आहे. त्यामुळे या ग्रंथाचे तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने आगळे वेगळे महत्त्व आहे. या ग्रंथाकडे सूक्ष्मपणे पाहिले तर असे दिसते की, उपनिषदे, गीता, योगवाशिष्ठ, शांकरमत, काश्मिरी शैव संप्रदाय आणि गुरु परंपरेने आलेले नाथपंथीय तत्त्वज्ञान अशा सप्त सविता ज्ञानेश्वरीत आढळतात. [10] वारकरी संप्रदायाचे' अद्वैती ' तत्त्वज्ञान आहे. म्हणूनच वारकरी तत्त्वज्ञानाचे स्वरूप अभ्यासण्यासाठी ' अमृतानुभव ' या ग्रंथाचा आधार घ्यावा लागतो. संत ज्ञानेश्वर यांच्यानंतरही अनेक संतांनी ग्रंथ निर्मिती केली. त्यातही वारकरी संप्रदायाचे तत्त्वज्ञान स्पष्ट होते.

**समतेचा पुरस्कार :**

भागवत संप्रदायाने आणि मराठी संतांनी आपल्या वचनातून एकत्वाचा, समतेचा पुरस्कार केलेला दिसतो. वारकरी संप्रदायाची शिकवणच मुळात समतेच्या तत्त्वावर आधारलेली आहे.' हे विश्वची माझे घर I अशी मती जयाची स्थिर I किंबहुना चराचर आपणची झाला I श्री संत ज्ञानेश्वर सांगतात. अशाच प्रकारे संत चोखामेळा म्हणतात की, अवघा रंग एक झाला I रंगी रंगला श्रीरंग I तसेच वेद धर्म यांच्या आधाराने समाजामध्ये जी लुबाणूक चालू होती ती झटकारुन संत तुकाराम महाराज म्हणतात, विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म I भेदाभेद भ्रम अमंगळ I आईका जी तुम्ही भक्त भागवत I करावं ते हित सत्य करा I कोणाही जीवाचा न घडो मत्सर I वर्ण सर्वेश्वर पूजनाचे I तुका म्हणे एका देहाचे अवयव I सुख दुःख जीवभोग पावे I म्हणजे कोणताही भेदभाव न करता भक्त म्हणून कोणत्याही जीवाचा द्वेष न करणे अशी शिकवण संतांनी सांगितली आहे. वेगवेगळ्या व्याधींनी समाज ग्रासलेला आहे सामाजिक कृपथेची उतरंड तयार करून भेदभाव करून माणसाचा तिरस्कार केला जातो. द्वेष, राग, निंदा यांचा समाजात प्रादुर्भाव झालेला आहे. अशावेळी संतांनी आपल्या प्रबोधनातून समाज बदलला पाहिजे, समाजाला योग्य दिशा दिली पाहिजे.' एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ' वारकरी संत मंडळामध्ये अशा तऱ्हेचा बंधुभाव आढळतो. [11]

वारकरी संप्रदायामध्ये सर्व जातीचे संत होऊन गेले चोखामेळा, बंका महार यांचे महत्त्व संत मंडळी जाणून होती. परंतु समाजात असलेल्या समाजकंटकांनी त्यांची अवहेलना केली. सतपुरुषांना जी कटू सत्य सांगावे लागतात ती स्वार्थी अ व्यवहारी लोकांना अप्रिय वाटतात. त्यामुळे अशा लोकांकडून छळ होतो. परंतु असे असले तरी जनहिताच्या खऱ्या गोष्टी जे सांगतात तेच खरे सत्पुरुष असतात. हे वारकरी संप्रदायातील अठरापगड जातीतील संतांनी आपल्या कर्तुत्वाने समाजाला दाखवून दिलेले आहे. तत्कालीन समाज धारणा, धर्मभावना, प्रस्थापित समाज रचना हे सर्व तात्काळ बदलण्याची संतांना अजिबात घाई नव्हती. मात्र आपल्याला कोणत्या दिशेने जायचे आहे हे त्यांना पक्के ठाऊक होते. वारकरी संप्रदायातील संतांचे हे कार्य वर्ण आश्रम धर्म मानणाऱ्या धर्म मार्तंडांना मान्य नव्हते. [12] संतांनी परमार्थिक समतेची, भक्ती मार्गातील समतेची भूमिका समाजातील धर्माभिमान्यांना अजिबात मान्य नव्हती. त्यांनी समाजाची एक प्रकारे स्वच्छता केली असे म्हणता येऊ शकते. साचलेले दंभ, द्वेष, अहंकार इत्यादींना बाजूला सारून प्रेम, सहानुभूती आणि करुणा अशा समतेच्या तत्त्वांची रुजवणूक करण्याचे काम वारकरी संप्रदायातील संतांनी केले. संत ज्ञानेश्वरांनी आपल्या पसायदानातून जगाचे कल्याण व्हावे, दुर्जनांना सदबुद्धी लाभो, परस्परांचे मैत्र जडो असे म्हटले आहे. एकंदरीत संत ज्ञानेश्वरांचे पसायदान म्हणजे सामाजिक समतेचा एक प्रकारे जाहीरनामाच आहे.

**निष्कर्ष :**

वरील विवेचनावरून असे लक्षात येते की, वारकरी संप्रदायाने तत्कालीन समाजाला समन्वयवादी, सर्व समावेशक, मानवतावादी, समतावादी भक्तीचा मार्ग दाखवण्याचे महान असे कार्य केले. वारकरी संत परंपरेतील संतांनी आपल्या अभंगाद्वारे जी वैश्विकतेची संकल्पना मांडलेली आहे ती आज युवा पिढीपर्यंत पोहोचवणे अतिशय गरजेचे आहे. वारकरी संप्रदायाची परंपरा ही तेराव्या शतकापासून निरंतर चालत आलेली आहे. एकोणिसाव्या शतकात काही चढउतार झाले.

मात्र वारकरी परंपरा आजतागायत अखंडित राहिली आहे. वारकरी संप्रदायाच्या शिकवणुकीमुळे सामाजिक समता, भक्ती या तत्त्वाचा प्रसार व प्रचार झाल्यामुळे महाराष्ट्रात सामाजिक व धार्मिक वातावरणात सकारात्मक बदल होण्यास मदत झाली. अंधश्रद्धेच्या अधीन गेलेल्या समाजाला जागृत करण्यासाठी ज्ञानोबांपासून तर तुकोबांपर्यंत आणि जनाबाईंपासून बहिणाबाई पर्यंत सर्वांनीच प्रयत्न केले. वारकरी संतांनी प्रत्यक्ष समाज सुधारणा केल्या नसल्या तरी वारकरी संतांच्या शिकवणीचा प्रभाव सामाजिक आणि धार्मिक सुधारणा चळवळींवर दिसून येतो. वारकरी संप्रदायाने समाजात समता आणि सामाजिक न्यायाचे महत्त्व अधोरेखित केले.

**संदर्भ:**


1) इनामदार हे.वि., **संत नामदेव,** केसरी प्रकाशन,पुणे. द्वितीय आवृत्ती. 1994.

2) सरदार गं.बा., **संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती,** श्री विद्या प्रकाशन पुणे. चतुर्थ आवृत्ती, 1992.

3) विश्वनाथ काशिनाथ राजवाडे. ( संपा ). **ज्ञानेश्वरी,** सत्कार्योत्तेजक सभा, धुळे. शके 1831.

4) नेमाडे भालचंद्र, पाटील चंद्रकांत ( अनुवाद), **तुकाराम,** साकेत प्रकाशन औरंगाबाद. चौथी आवृत्ती, 2007.

5) पाटगणकर विद्यासागर,' **एक विठ्ठल नाम ' वारकरी संप्रदाय साहित्य व तत्त्वज्ञान,** विश्वकर्मा पब्लिकेशन्स, पुणे. प्रथम आवृत्ती. 2019.

6) सुंठणकर बा. रं., **महाराष्ट्रीय संत मंडळांचे ऐतिहासिक कार्य,** लोक वाङ्मय गृह मुंबई. चौथी आवृत्ती. 2017.

7) गोळे रवींद्र. **आधुनिक संत आणि समाज,** महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई. प्रथम आवृत्ती. 2017.

8) जोशी ग. ना., **भारतीय तत्त्वज्ञानाचा बृहद इतिहास,' महाराष्ट्र संत,'** खंड सातवा, शुभदा सारस्वत प्रकाशन पुणे. द्वितीय आवृत्ती. 2005.

9) देगलूरकर धुंडा महाराज, **पसायदान,** देगलूरकर मठ पंढरपूर, तृतीय आवृत्ती, 1919.

10) नसीराबादकर ल. रा., **प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास,** फडके प्रकाशन कोल्हापूर. 1997.

11) श्री नाना महाराज साखरे, **श्री एकनाथ महाराज यांच्या अभंगाची गाथा,** इंदिरा छापखाना पुणे. शके 1878.

12) कुलकर्णी मदन, **श्री एकनाथ महाराजांची भारुडे, संहिता व समीक्षा,** पिंपळापुरे प्रकाशन नागपूर. प्रथम आवृत्ती 1998.

# प्राचीन आणि आधुनिक कालखंडातील शिक्षण पद्धती

**वैशाली माणिकराव गावंडे**
पीएच.डी. स्कॉलर, अर्थशास्त्र
एमजीएम विद्यापीठ, औरंगाबाद

**डॉ. योगेश बोराडे**
संशोधन मार्गदर्शक, अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
एमजीएम विद्यापीठ, औरंगाबाद.

**गोषवारा-**

प्राचीन आणि आधुनिक काळातील शिक्षण समाजाच्या गरजा नुसार विकसित झाले आहेत. शिक्षण हे एक असे व्यासपीठ आहे ज्यामध्ये तरुण पिढीला प्रशिक्षित केले जाते. शिक्षण हे ज्ञान आणि कौशल्य प्रदान करते, त्यामुळे व्यक्तीला रोजगारक्षम होण्यास मदत होते. इतर देशाच्या तुलनेत भारतात झालेल्या प्राचीन ते आधुनिक शिक्षण व्यवस्थेतील बदल हा खूप मोठा लोकप्रिय आहे. वैदिक, जैन, बौद्ध व हिंदू धर्मांनी ज्ञानाला श्रेष्ठ स्थान दिले होते. या लेखात अध्यापन पद्धती अभ्यासक्रम, वैशिष्ट्ये, शिक्षण पद्धती, प्राचीन आणि आधुनिक काळात भारतीय शिक्षण प्रणालीची उद्दिष्टे हे सगळं शिकण्याची आवश्यकता आहे. यामुळे विद्यार्थ्यांना भविष्यात सर्व समस्यांवर मात कशी करायची हे कळेल. आधुनिक काळात शैक्षणिक विकासांनी दर्शवली जाते यामध्ये उच्च शिक्षणावर अधिक भर देण्यात आला. शिक्षणाची आधुनिक रचना विविध विषयांवर केंद्रित केली गेली आहे. पारंपरिक शिक्षणाच्या तुलनेत आधुनिक शिक्षण व्यवस्था अधिक लवचिक आणि सोयीस्कर आहे. या शिक्षण पद्धतीमुळे महाराष्ट्राच्या प्रगतीत सकारात्मक योगदान देऊ शकणारे प्रामाणिक नागरिक निर्माण करून समाजात परिवर्तन घडवून आणण्यास मदत होते.

**ठळक शब्द** - प्राचीन,आधुनिक, कालखंड,शिक्षण

**प्रस्तावना-**

प्राचीन काळी आपल्याकडे शिक्षणाची 'गुरुकुल' पद्धत होती. नंतर 1835 च्या मेकॅलोच्या कारकून बनविणाऱ्या शिक्षण पद्धतीने आपली मानसिकता बदलून गेली. इंग्रज कालीन शैक्षणिक पद्धत आजही काही थोड्या प्रमाणात सुरू आहे. योग्य असे शिक्षण भविष्यासाठी तयार करण्यात आणि कुशल व्यक्ती प्रदान करून आर्थिक विकास वाढविण्यात महत्वपूर्ण भूमिका बजावेल, ज्यामुळे औद्योगिक विकासालाही चालना मिळेल. शिक्षणाच्या आधुनिक युगात प्रत्येक संस्था किंवा विद्यापीठ त्यांच्या अध्यापन पद्धती वापरून नवीन शिक्षण पद्धती स्वीकारत आहे. भारतीय शिक्षण ही जगातील सर्वात मोठी आणि प्रसिद्ध अशी शिक्षण प्रणाली आहे. शिक्षणाचा प्रचार होण्यासाठी शैक्षणिक धोरण 2020 तयार केले. यात ग्रामीण आणि शहरी तसेच प्राथमिक शिक्षण ते उच्च शिक्षणाचा समावेश आहे.

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर शहरी आणि ग्रामीण भागातील निरक्षरतेच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी भारत सरकारने विविध कार्यक्रम आखले. भारताचे पहिले शिक्षणमंत्री मौलाना अकल कलाम आझाद यांनी एकसमान शैक्षणिक प्रणालीसह संपूर्ण देशातील शिक्षणावर केंद्र सरकारच्या मजबूत नियंत्रणाची योजना मांडली. प्राचीन काली शिक्षणा दरम्यान तक्षशिला, नालंदा, वल्लभ अशी विद्यापीठे होती. जी विद्यार्थ्यांचे सर्वांगीण विकासावर लक्ष केंद्रित करीत होती. आधुनिक शिक्षणात, आयआयटी आणि आयआयएम यासारख्या संस्था आहेत, ज्या जगभरात प्रसिद्ध आहेत. प्राचीन काळ ते आधुनिक काळातील शिक्षण पद्धतीचा थोडक्यात संशोधनात्मक आणि तुलनात्मक आढावा या शोधनिबंधात घेण्यात आला आहे.

**उद्दिष्टे-**

1) प्राचीन काळातील शिक्षण पद्धतीचा अभ्यास करणे.

2) आधुनिक काळातील शिक्षण पद्धतीचा अभ्यास करणे.

3) प्राचीन आणि आधुनिक काळातील पद्धतीच्या अडचणींचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती-**

प्रस्तुत शोधनिबंध हा दुय्यम साध्या सामग्री वर आधारित आहे. संदर्भ ग्रंथ मासिके, वर्तमानपत्रे व इंटरनेट यांसारख्या दुय्यम साधन सामग्रीचा आधार घेण्यात आला आहे. सदरील शोधनिबंधासाठी वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर केला आहे.

**प्राचीन काळातील शिक्षण पद्धती-**

**1) शिक्षण पद्धती-**

संबंधित ज्ञान घेणाऱ्या शिष्याने सकाळी लवकर उठावे.स्नान संध्या आटोपल्यावर अध्ययनाला सुरुवात करावी. अध्ययन हे मुखोद्गगत पद्धतीने चालत असे. गुरु प्रथम श्लोक किंवा सूत्र म्हणत असे. त्या मागोमाग विद्यार्थी म्हणत असत. आज जे श्लोक किंवा जे काही ज्ञान घेतले असेल ते दुसऱ्या दिवशी गुरूंना पुन्हा म्हणून दाखवावे लागत असे. अधून -मधून गुरुजी शिष्याला समजले की नाही याची परीक्षा घेत असे. सकाळपासून दुपारपर्यंत शिक्षण द्यायचे दुपारनंतर थोडा वेळ विश्रांती राहायची. विश्रांतीनंतर पुन्हा अध्ययनाची प्रक्रिया सुरू होत असे ते सायंकाळपर्यंत चालत असे. त्यानंतर शिष्य गुरुगृहाची कामे करत असत. आणि रात्री गुरु बरोबर अनेक विषयावर चर्चा होत असे. तसेच विद्यार्थ्यांना अमावस्या व पौर्णिमेच्या दिवशी सुट्टी मिळत होती. याशिवाय सण- उत्सवाला पण सुट्टी असायची. अशा पद्धतीने प्राचीन काळातील शिक्षण पद्धती होत असे.

**प्राचीन काळातील प्रमुख उद्देश-**

1) प्राचीन भारतीय संस्कृतीचे जतन आणि प्रसार
2) विद्यार्थ्यांना भविष्यासाठी योग्य शिक्षण देणे.
3) विद्यार्थ्यांना नैसर्गिक वातावरणात शिक्षण देणे.
4) विद्यार्थ्यांना बंधुभाव,मानवता, प्रेम आणि शिस्तीचे शिक्षण देणे.

**प्राचीन काळातील शिक्षण पद्धतीतील वैशिष्ट्ये-**

**नैतिक आणि अध्यात्मिक शिक्षण-**

1) शिक्षणाचा मुख्य उद्देश केवळ विद्या संपादन करणे नसून व्यक्तिमत्व घडवणे व नैतिक मूल्य रुजवणे हा होता.
2) महाभारत,रामायण,वेद, पुराने इ. ग्रंथांवर शिक्षण दिले जात होते.

**नि:शुल्क विभाग-**

1) शिक्षणाला शुल्क नव्हते शिष्य आपल्या क्षमतेनुसार गुरुदक्षिणा देत असत.
2) शिक्षणाला व्यावसायिक दृष्टिकोन नव्हता.

**शिकविण्याची पद्धत-**

1) प्रश्नोत्तर पद्धत, संवाद पद्धत, प्रयोगावर आधारित शिक्षण, चर्चासत्र यांचा उपयोग होत असे
2) गुरु शिष्य परंपरेत वैयक्तिक मार्गदर्शन दिले जात असे.

**शिक्षणाचा कालावधी-**

1) शिक्षणाला ठराविक कालमर्यादा नव्हती विद्यार्थी शिक्षण पूर्ण होईपर्यंत गुरुकुलात राहत असे.

**शिक्षणाची स्वातंत्र्यपूर्ण पद्धत-**

1) शिष्य त्यांच्या इच्छेनुसार विविध गुरुकुल किंवा आचार्यांकडे शिक्षण घेऊन शिकत असे.
2) शिक्षण कालावधी ठरलेला नसे, विद्यार्थ्यांनी ज्ञान पूर्ण केल्यावरच शिक्षण संपत असे.

**शैक्षणिक केंद्र-**

1) तक्षशिला नालंदा,विक्रम शीला वलभी इ.प्राचीन विद्यापीठे जगप्रसिद्ध होती.
2) या विद्यापीठांमध्ये देश-विदेशातील विद्यार्थी येऊन शिक्षण घेत असे.

**प्राचीन काळातील शिक्षण पद्धतीतील अडचणी-**

**1) समाजातील विभाजन-**

समाजातील जातीव्यवस्था आणि वर्ग भेदामुळे शिक्षण फक्त काही विशिष्ट वर्गापर्यंत मर्यादित होत असे. उच्च वर्गातील लोकांना शिक्षणाचा अधिक प्रवेश होता, तर खालचा वर्ग आणि स्त्रियांना शिक्षण मिळण्याच्या संधी कमी होत्या.

**2) व्यापकता कमी होती-**

शिक्षण सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचत नव्हतं. ब्राह्मण किंवा उच्च वर्गाच्या समाजासाठी शिक्षण उपलब्ध होतं,त्यामुळे इतर समाजाला शिक्षण पोहोचत नव्हतं.

**3) कागदपत्रांची कमतरता-**

पुस्तक,कागद किंवा इतर काही साधनांची कमतरता होती. जास्तीत जास्त मौखिक स्वरूपाचे शिक्षण होते.

4) **लिंगभेद**-

पुरुषांना शिक्षण पद्धती होती तर स्त्रियांना ती मर्यादित होती.त्यामुळे स्त्रियांना शिक्षणात अडचणी निर्माण होत गेल्या.

**5) प्रवेशाच्या अडचणी-**

शाळा किंवा गुरुकुल विशेषतः दूरदर्शनच असत. म्हणजे शिक्षण घेण्यासाठी लांब जावे लागत असत. आणि त्यासाठी मुबलक प्रमाणात पैसाही नव्हता.

**6) ग्रंथ आणि साहित्याची कमतरता-**

प्राचीन काळात शिक्षणाच्या साधनांचा अभाव होता. पुस्तके, ग्रंथ आणि इतर शालेय साहित्य अत्यंत दुर्बल होते, ज्यामुळे शिक्षण घेणे कठीण होत असे.

**7) उच्चतम शिक्षणाचा एक आगरी दृष्टिकोन-**

शिक्षणाचे मुख्य उद्दिष्ट तत्त्वज्ञान आणि अध्यात्मिक ज्ञान असले तरी, ते सर्व वयाच्या आणि गरजांच्या लोकांसाठी सर्वसमावेशक नव्हते.

**आधुनिक काळातील शिक्षण पद्धती-**

अध्ययन पद्धतीत गेल्या अनेक काळापासून बदल झालेला आहे.विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी आठवण आणि जुन्या पठण पद्धतीच्या विरोधात आता आधुनिक अध्यापन पद्धतीच्या फायद्यासह अध्यापनाच्या परस्पर संवादी पद्धती सुरू करण्यात आल्या आहेत. आधुनिक शिक्षण पद्धती सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्या आकलन क्षमतेच्या समान पातळीवर हाताळत नाहीत.पारंपारिक अध्ययन पद्धतीप्रमाणे एकमेव शिक्षण आधारित नसून आधुनिक अध्यापन पद्धती प्रश्न विचारणे,प्रात्यक्षिक,स्पष्टीकरण, व्यवहारिक,सहयोग पद्धतीने अधिक लक्ष केंद्रित करतात.

अलीकडच्या काळात विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात ज्ञानाची व्याप्ती वाढली आहे. म्हणून विविध क्षेत्रातील अज्ञात आणि न उघडलेल्या क्षेत्रांचा शोध घेण्यासाठी नावीन्यपूर्ण आणि सर्जनशील मनांचे नितांत आवश्यकता आहे. म्हणून विद्यार्थ्यांना 21 व्या शतकाला तोंड देण्यासाठी अशा पद्धतीने शिकवले पाहिजे. जे तंत्रज्ञान केंद्रित काळ आहे आणि ज्यामध्ये व्यक्ती समाज आणि राष्ट्राच्या प्रगतीसाठी सर्जनशील आणि नाविन्यपूर्ण मनाची आवश्यकता आहे. शिक्षक अजूनही वर्गात पारंपारिक चॉक-टॉक पद्धत वापरतात जे विद्यार्थ्यांना विज्ञान, गणित आणि इतर काही विषयांचे फक्त मूलभूत ज्ञान देऊ शकतात. म्हणून काही पद्धतीसाठी आधुनिक पद्धतीचा वापर सुरू केला आहे.

**आधुनिक काळातील प्रमुख उद्देश-**

1) विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देणे.

2) आत्मविश्वास,नेतृत्व,गुण निर्णयक्षमता आणि ताणतणाव व्यवस्थापनाची क्षमता विकसित करणे.

3) कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा सायन्स,कोडिंग यासारख्या नवीन क्षेत्रांची ओळख करून देणे.

4) सामाजिक जबाबदारी,समता पर्यावरण संरक्षण आणि नैतिक मूल्य शिकवणे.

5) नव्या युगातील नोकऱ्या आणि व्यवसायासाठी आवश्यक कौशल्य विकसित करणे.

**आधुनिक काळातील शिक्षण पद्धतीची वैशिष्ट्ये-**

आधुनिक काळातील शिक्षण पद्धतीत अनेक महत्त्वपूर्ण वैशिष्ट्ये आहेत, जी पारंपारिक शिक्षण पद्धतीपेक्षा वेगळी आणि अधिक प्रभावी ठरतात. या पद्धतीत तंत्रज्ञानाचा वापर, दृष्टिकोन आणि जीवन कौशल्यावर भर दिला जातो ज्याची काही प्रमुख वैशिष्ट्ये दिली आहेत.

**तंत्रज्ञानाचा वापर-**

1) ऑनलाइन शिक्षण- ई- लर्निंग, प्लॅटफॉर्म्स, वेबिनार्स यांचा वापर

2) डिजिटल साधने-

स्मार्ट बोर्ड, टेबलेट्स, लॅपटॉप, शिक्षण ॲप्स वापरून शिक्षण अधिक प्रभावी बनवले जाते.

3) आभासी वास्तव-

विज्ञान,भूगोल, इतिहास यांसारख्या विषयांमध्ये प्रत्यक्ष अनुभव देण्यासाठी वापरले जाते.

**पर्यावरण जागरूकता**

1) शाश्वत विकासावर भर

2) पर्यावरण पूरक प्रकल्प आणि कृती कार्यक्रम

**प्रभावी मूल्यांकन पद्धती-**

1) केवळ परीक्षांवर भर न देता सातत्याने मूल्यमापन

2) फीडबॅक आधारित मूल्यांकन

3) ओपन बुक परीक्षा आणि ॲक्टिव्ह लर्निंग

**आंतरराष्ट्रीय आणि जागतिक दृष्टिकोन-**

1) विविध संस्कृती,जागतिक समस्या आणि आंतरराष्ट्रीय अभ्यासक्रमांचा समावेश

2) परदेशातील शैक्षणिक संस्थांची ऑनलाइन सहकारी आणि एक्सचेंज प्रोग्राम्स.

**उद्योग आधारित शिक्षण-**

1) इंटरशिप आणि प्रॅक्टिकल अनुभव- शैक्षणिक कालावधीतच व्यवसायिक क्षेत्रातील अनुभव मिळवण्याची संधी

2) उद्योग तज्ञांचे मार्गदर्शन- गेस्ट लेक्चर,सेमिनार,वर्कशॉप.

**लवचिकता-**

1) विविध अभ्यासक्रमाची निवड

2) ओपन आणि इन्स्टंट लर्निंग, हायब्रीड शिक्षण

**विद्यार्थी केंद्र दृष्टिकोन-**

1) शिक्षक मार्गदर्शकाच्या भूमिकेत,विद्यार्थी सक्रिय शिकणारे

2) स्व अभ्यासावर भर

3) वैयक्तिक शिक्षण पद्धती

**आवडीनुसार विषय निवड-**

1) विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनुसार विषय निवडण्याची मोकळीक

2) क्रॉस -डिसिप्लिनरी अभ्यासक्रम

**गुणवत्तापूर्ण आणि खुलं शिक्षण-**

1) ओपन एज्युकेशनल रिसोर्सेस उपलब्ध

2) मोफत किंवा कमी किमतीत उच्च शिक्षणाच्या संधी

**सामाजिक आणि भावनिक शिक्षण-**

1) विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्यावर भर

2) भावनिक बुद्धिमत्ता, सहानुभूती यांचा विकास

**आधुनिक काळातील शिक्षण पद्धतीतील अडचणी-**

**शिक्षणातील असमानता-**

1) शहरी आणि ग्रामीण भागातील शिक्षणात मोठा फरक आहे. ग्रामीण भागात अद्यावत साधन सामग्री आणि प्रशिक्षण शिक्षकांचे कमतरता आहे.

2) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण घेणे कठीण जाते.

**तंत्रज्ञानावर अवलंबन-**

1) ऑनलाइन शिक्षणामुळे विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यातील थेट संवाद कमी झाला आहे.

2) ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांकडे आवश्यक साधने नसल्यामुळे त्यांना शिक्षणात अडचणी येतात.

**मानसिक आरोग्य आणि तणाव-**

1) अभ्यासक्रमाचा मानसिक आरोग्यावर फार मोठ्या परिणाम दिसून येतो. तसेच स्पर्धात्मक वातावरण आणि परीक्षा पद्धतीमुळे विद्यार्थ्यांमध्ये मानसिक आरोग्याच्या समस्या वाढत आहेत.

गुणवत्तेची समस्या-

**1) पुस्तके शिक्षणावर भर-**

अनेक शाळांमध्ये अजूनही केवळ गुणांवर लक्ष केंद्रित केले जाते, ज्यामुळे सर्जनशीलता, विचारशक्ती व कौशल्य विकसित होत नाही.

**2) शिक्षकांच्या अपुरी तयारी-**

शिक्षण पद्धती सतत बदलत असतानाही, सर्व शिक्षक नवीन तंत्रज्ञान किंवा पद्धती आत्मसात करण्यात सक्षम नाही.

**आर्थिक अडचणी-**

1) महागडे शिक्षण- खाजगी शिक्षण संस्था, कोचिंग क्लासेस,डिजिटल उपकरणे,आणि इंटरनेट यामुळे शिक्षण खर्चिक झाले आहे.

2) शिक्षणातील असमानता- गरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यासाठी अनेक अडचणींना सामना करावा लागतो.

**पारंपारिक अभ्यासक्रमाने सुधारणा अभाव-**

1) अनेक शिक्षण संस्थांमध्ये जुना अभ्यासक्रम वापरला जातो, जो उद्योग जगातील बदलांसोबत जुळत नाही.

2) नवकल्पनांना पुरेसा वाव मिळत नाही.

**परीक्षा पद्धतीतील त्रुटी-**

1) ऑनलाइन परीक्षांमध्ये अपयश आणि अप्रमाणिकता वाढली आहे.

2) विद्यार्थ्यांचे खरे ज्ञान आणि कौशल्य मोजणी कठीण होते.

**निष्कर्ष-**

वरील निष्कर्षावरून प्राचीन काळातील शिक्षण हे पूर्ण जीवनाला स्पर्श करणारे होते असे आढळून आले. यामध्ये भारतीय परंपरा, मूल्य,आचार- विचार,संस्कृतीचे रक्षण,संवर्धन, ज्ञान प्राप्ती, धार्मिकता, चरित्र संवर्धन ही ध्येय महत्त्वाची होती. आधुनिक शिक्षण पद्धतीमध्ये शिक्षण प्रणाली प्रभावी करण्यासाठी शिक्षक,विद्यार्थी, पालक आणि प्रशासन यांच्या समन्वय साधने गरजेचे होते. नवीन तंत्रज्ञानाचा योग्य वापर कौशल्य आधारीत शिक्षण,आणि नैतिक शिक्षण यावर भर देऊन शिक्षण पद्धती सुधारणा करणे आवश्यक होते.

**संदर्भ यादी-**

1) दैनिक लोकमत (पुणे आवृत्ती) 8 एप्रिल 2021

2) शहा जी.बी.- प्राचीन भारताचा राजकीय आणि सांस्कृतिक इतिहास, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव. पृ. क्र.319, 2013.

3) लक्ष्मीकांत देशमुख, नवे राष्ट्रीय शिक्षण धोरण-2020 एक चिकित्सक अभ्यास,साधना प्रकाशन. 2022.

4) https://WWW.aksharnama.com/client / granthanama.article detail/ 5668

5) जनार्दन वाघमारे-बदलते शिक्षण स्वरूप आणि समस्या पद्मगंधा प्रकाशन पुणे.

6) देशमुख मा.म. -प्राचीन भारताचा इतिहास,विश्वभारती प्रकाशन नागपूर, पृ.क्र. 228,1998.

7) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण- शिक्षण मंत्रालय,भारत सरकार (मराठी आवृत्ती) 2020.

8) के.ना. देशपांडे, आ.ले. माळी- भारतीय शिक्षणाचा इतिहास, नित्य नूतन प्रकाशन- 2006.

9) के.यु.घोरमाडे, कला कृष्ण घोरमाडे- भारतीय शिक्षण प्रणालीचा विकास आणि शालेय व्यवहाराचे अधिष्ठान,विद्या प्रकाशन, नागपूर, 2006.

# पुरातत्त्वशास्त्र आणि ऐतिहासिक समज : सिद्धांतिक दृष्टीकोन

**प्रा. रमेश अंबऋषी शितोळे**
इतिहास विभाग प्रमुख
श्री वसंतराव फराटे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मांडवगण

भारतीय इतिहास आणि पुरातत्वशास्त्र हे दोन अत्यंत महत्त्वाचे शास्त्र आहेत जे भारताच्या प्राचीन सभ्यतेला समजून घेण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. भारतीय इतिहासामध्ये भारताच्या प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंतचा कालखंड समाविष्ट आहे, जिथे संस्कृती, धर्म, राजकारण, आणि समाजशास्त्राचा विकास झाला.

पुरातत्वशास्त्र, हे एका विशिष्ट क्षेत्रात असलेल्या वस्तू, अवशेष, शिल्प, आणि वास्तूंचे अध्ययन करतं. भारतीय पुरातत्वशास्त्रामध्ये इ.स.पूर्व 3500 पासून भारतातील विविध प्राचीन संस्कृतींचा अभ्यास केला जातो. हडप्पा सभ्यता, मौर्य साम्राज्य, गुप्त साम्राज्य, आणि इतर महत्त्वाच्या काळांमधील पुरातत्वीय अवशेष हे या क्षेत्राचे महत्त्वाचे भाग आहेत.

पुरातत्वशास्त्राच्या माध्यमातून आपल्याला प्राचीन मानवतेचे जीवन, कला, धर्म, आणि समाज संरचना याबद्दल विस्तृत माहिती मिळते. उदाहरणार्थ, हडप्पा संस्कृतीच्या अवशेषांमधून आपल्याला त्यांच्यातील अविकसित लेखन प्रणाली, जलसंचय आणि वस्त्रनिर्मितीच्या तंत्रज्ञानासंबंधी माहिती मिळते.

**पुरातत्त्व शास्त्राचे ऐतिहासिक आणि सांस्कृतिक संदर्भ** – पुरातत्त्वशास्त्राची सुरुवात 19व्या शतकात झाली. या आधीही प्राचीन अवशेषांचा अभ्यास करण्यात येत होता, पण त्या काळात ते अधिकतर असंवेदनशीलपणे किंवा खगोलशास्त्राशी जोडले गेले होते. 19 व्या शतकात ही शास्त्रीय पद्धत उलगडली आणि पुरातत्त्वशास्त्र एक स्वतंत्र शास्त्र म्हणून विकसित होऊ लागले. विशेषतः इंग्रजी पुरातत्त्वज्ञ आणि इटालियन विद्वानांनी यामध्ये मोठा हातभार लावला.

पुरातत्त्वशास्त्राची अभ्यास पद्धत मानव समाजाच्या सांस्कृतिक विकासावर लक्ष केंद्रित करते. प्रत्येक संस्कृतीचे वैशिष्ट्यपूर्ण वैशिष्ट्य, जसे की स्थापत्य, लेखन प्रणाली, शिल्पकला, सामाजिक रचनाबद्धता, इत्यादींचा अभ्यास केले जातो. पुरातत्त्वशास्त्राची कामगिरी म्हणजे एक ध्वंसलेल्या सभ्यतेच्या जडणघडणीला उचलून त्याचे सुसंगत चित्र तयार करणे.

पुरातत्त्वशास्त्राचे सांस्कृतिक संदर्भ, विशेषत: एकत्रित सामाजिक संरचना, भाषिक किंवा धार्मिक विविधता आणि कला व संस्कृतीच्या विकासाचे योगदान, आजच्या काळातही समाजाच्या गाठी-तांदळांचा अभ्यास करण्यास महत्त्वपूर्ण ठरतात.

**पुरातत्त्वशास्त्रात तंत्रज्ञानाचा वापर**

पुरातत्त्वशास्त्रात तंत्रज्ञानाचा वापर खूप महत्त्वाचा आहे, कारण याच्या मदतीने पुरातत्त्वीय अवशेषांचे विश्लेषण आणि महत्व समजून घेण्याची प्रक्रिया अधिक अचूक आणि वैज्ञानिक पद्धतीने होऊ शकते. पुरातत्त्वीय तंत्रज्ञानाचा वापर शोध, उत्खनन, आणि विश्लेषण प्रक्रियेत केला जातो. काही महत्वाची तंत्रज्ञानं आणि पद्धती पुढीलप्रमाणे आहेत.

**1. कार्बन डेटिंग (Carbon Dating)** कार्बन डेटिंग म्हणजे कार्बन-14 (C-14) च्या प्रमाणावरून एखाद्या जीवाच्या अवशेषांचा वयोमान ठरवण्याची पद्धत. या तंत्रज्ञानामुळे जीवाश्म, हाडे, आणि इतर जैविक पदार्थांच्या वयोमानाचे अचूक मोजमाप करता येते. ही पद्धत 50,000 वर्षांपर्यंतच्या पुराव्यांचा काल ठरवण्यात वापरली जाते.

**2. पॅलिओमॅग्नेटिझम (Paleomagnetism)** पॅलिओमॅग्नेटिझम ही पद्धत पृथ्वीच्या चुंबकीय क्षेत्राच्या बदलांचा अभ्यास करून पुराव्यांची तारख ठरवते. या तंत्रज्ञानात भौतिक पदार्थांच्या, विशेषतः माती आणि खडकांच्या, चुंबकीय गुणधर्मांचा अभ्यास केला जातो. या पद्धतीने पुरातत्त्वज्ञांना मातीतील किंवा खडकातील चुंबकीय कणांच्या विश्लेषणावरून त्या ठिकाणाच्या भूतकाळातील परिस्थिती जाणून घेता येते.

**3. सार्वजनिक उत्खनन आणि इमेजिंग (Public Excavation and Imaging)** संपूर्ण साइटवरील उत्खननानंतर, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून त्या अवशेषांचे उच्च-गुणवत्तेचे इमेजिंग केले जाते. लिथोस्कॅनिंग (Lithoscanning),

लायडार (LiDAR) आणि ग्राउंड-पेनेटिंग रडार (Ground Penetrating Radar - GPR) सारख्या तंत्रज्ञानांचा वापर केला जातो. या तंत्रज्ञानामुळे मातीच्या खाली गाडलेले अवशेष शोधता येतात, तसेच उपसत आणि वेगवेगळ्या तपशीलांचा अधिक अचूक नकाशा तयार करता येतो

**4. थर्मोलुमिनिसन्स डेटिंग (Thermoluminescence Dating)** ही एक पद्धत आहे जी खडकांमध्ये किंवा मातीच्या कणांमध्ये अडकलेल्या उष्णतेचे प्रमाण मोजते. हे खडक किंवा माती कधी सापडले, कधी तापले किंवा त्यावरून कधी प्रकाश पडला याची माहिती मिळविण्यासाठी वापरले जाते. या पद्धतीचा उपयोग प्राचीन वस्त्र, संस्कृती आणि खडकांच्या कालवधीला मोजण्यासाठी केला जातो.

**5. ऑक्सिडायझेशन-रिडक्शन डेटिंग (Oxidation-Reduction Dating)** ही पद्धत लवण आणि धातूंच्या रासायनिक प्रक्रियांचा अभ्यास करून वस्तूंचा कालखंड ठरवते. खडकांच्या अंतर्गत प्रक्रिया, जसे की धातूचे गडद होणे किंवा ऑक्सिडायझेशन आणि रिडक्शन प्रक्रियांमधून कालाचे मोजमाप करता येते.

**6. जीवविज्ञान (Biomolecular Analysis)** पुरातत्त्वशास्त्रात जीवविज्ञानाचे तंत्रज्ञान वापरून प्राचीन जीवाणू, बुरशी, तसेच डीएनएचा अभ्यास केला जातो. या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून पुरातत्त्वज्ञांना प्राचीन मानवजातीच्या रक्तरेषा, आहार, किंवा रोगांच्या इतिहासाचा मागोवा घेता येतो. डीएनए अन्वेषण (DNA Analysis), प्रोटिन विश्लेषण आणि विविध जैविक मार्कर्स यांचा अभ्यास केला जातो.

**7. फोटोग्राफिक आणि थ्रीडी मॉडेलिंग (Photographic and 3D Modeling)** पुरातत्त्वीय अवशेषांचा अधिक तपशीलवार अभ्यास करण्यासाठी थ्रीडी मॉडेलिंगचा वापर केला जातो. थ्रीडी स्कॅनिंग आणि फोटोग्राफिक तकनीक च्या मदतीने अवशेषांचे अत्यंत अचूक चित्र तयार करणे आणि त्यावर आधारित मॉडेल्स तयार करणे शक्य होते. या मॉडेल्सचा वापर भविष्यातील संशोधनासाठी, संग्रहालयात ठेवण्यासाठी किंवा इतर शास्त्रीय प्रयोजनेकरिता केला जातो.

**8. सिंथेटिक इमेजिंग आणि कंप्युटर सिम्युलेशन (Synthetic Imaging and Computer Simulation)** कंप्युटर सिम्युलेशनचा वापर करून प्राचीन वास्तू, कलाकृती किंवा संस्कृतीचे काल्पनिक पुनर्निर्माण केले जाते. या प्रक्रियेत प्राचीन अवशेषांचे तंतोतंत इमेजिंग करून त्याचे वेळोवेळी उत्पन्न होणारे सिम्युलेशन तयार केले जाते. यामुळे एका विशिष्ट कालखंडाच्या सांस्कृतिक आणि भौतिक परिस्थितीचा अभ्यास करणे सोपे जाते.

**9. सर्वेक्षण तंत्रज्ञान (Survey Technologies)** आजच्या पुरातत्त्वशास्त्राच्या अभ्यासामध्ये विविध आधुनिक सर्वेक्षण तंत्रांचा वापर केला जातो, जसे की जीपीएस (GPS), गिओग्राफिक इन्फॉर्मेशन सिस्टम (GIS), आणि सॅटेलाइट इमेजिंग (Satellite Imaging). यामध्ये, पुरातत्त्वज्ञ प्रत्येक ठिकाणाचा सुस्पष्ट नकाशा तयार करू शकतात, पुरातत्त्वीय अवशेषांचा तपशीलवार मॅप तयार केला जातो, आणि संबंधित स्थलावर अचूक डेटा संग्रहित केला जातो.

**10. आधुनिक केमिकल आणि बायोकेमिकल विश्लेषण (Chemical and Biochemical Analysis)** प्राचीन माती, पाणी, अन्न, आणि इतर अवशेषांमध्ये रासायनिक किंवा जैविक घटकांचा अभ्यास केला जातो. यामध्ये वास, रासायनिक क्रिया, आणि इतर पदार्थांचे तंतोतंत विश्लेषण केले जाते.

पुरातत्त्वशास्त्रात वापरली जाणारी ही सर्व तंत्रज्ञानं एकत्र येऊन इतिहास, संस्कृती, आणि मानवतेच्या प्राचीन काळाबद्दल अधिक अचूक, विश्वसनीय आणि सखोल माहिती मिळवण्यास मदत करतात. यामुळे, प्राचीन इतिहासाचे पुनर्निर्माण शक्य होईल आणि भविष्याच्या संशोधनासाठी उपयुक्त आधार तयार होईल.

### ❖ पुरातत्त्वशास्त्रीय सिद्धांत –

पुरातत्वशास्त्रीय सिद्धांत (Archaeological Theories) हे मानवी इतिहास, संस्कृती आणि समाजाचा अभ्यास करणारे विविध दृष्टिकोन आहेत. हे सिद्धांत पुरातत्वज्ञांना प्राचीन कालातील मानवसंस्कृतींचा शोध लावण्यात मदत करतात. काही प्रमुख पुरातत्वशास्त्रीय सिद्धांत पुढीलप्रमाणे:

**1. सांस्कृतिक ऐतिहासिक दृष्टीकोन (Cultural Historical Approach):**

हा सिद्धांत प्राचीन संस्कृतींच्या विकासाचा अभ्यास करणारा आहे. यामध्ये पुरातत्वीय अवशेषांचा तपशीलवार विश्लेषण करून विशिष्ट कालखंड आणि स्थानिक संस्कृतींचा इतिहास समजून घेतला जातो.

यामध्ये अनेक पुरातत्वज्ञ प्राचीन सभ्यतांचे वितरण, त्यांचा प्रसार आणि काळानुसार होणारे बदल यावर लक्ष केंद्रित करतात.

**2. प्रकाशनशास्त्रवादी दृष्टिकोन (Processual Archaeology):**

हे सिद्धांत 1960 च्या दशकात प्रसिद्ध झाले आणि त्याचे मुख्य प्रणेते लुईस बिनफोर्ड आणि विंसेंट व्हार्नार्ड होते. यामध्ये समाज, संस्कृती आणि पर्यावरणाच्या प्रक्रियांचा अभ्यास केला जातो.

याचा उद्देश पुरातत्त्वीय डेटाचा वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास करणे आणि मानवसंस्कृतीच्या विविध पैलूंमध्ये कारण-परिणाम नातेसंबंध तपासणे आहे.

**3. पोस्ट-प्रक्रियात्मक पुरातत्व (Post-Processual Archaeology):**

या सिद्धांताच्या अंतर्गत, पुरातत्त्वज्ञ मानवी संस्कृतीच्या विविध अनुभवांची आणि भावना यांचा अभ्यास करतात. या सिद्धांतानुसार, पुरातत्वाची तपासणी केवळ वैज्ञानिक दृष्टीकोनातून केली जाऊ नये, तर मानवी कथेतील विविध दृष्टिकोन, व्यक्तिमत्व, आणि संस्कृतीचे ऐतिहासिक संदर्भ देखील समाविष्ट करावेत.

प्रमुख पुरातत्वज्ञ मायकेल श्नोडर, इयान हॅम्पटन आणि शॅनन डॉन्सन यांचा यात मोठा सहभाग होता.

**4. सामाजिक परिभाषाशास्त्रवादी सिद्धांत (Social Archaeology):**

या सिद्धांताच्या अंतर्गत, पुरातत्त्वज्ञ समाजातील वर्गीय, राजकीय आणि सांस्कृतिक संरचना कशा प्रकारे अस्तित्वात येतात हे समजून घेण्याचा प्रयत्न करतात.

यात मानवी संस्कृतीतील गट, ओळख, आणि सामूहिक कृती यांचा विचार केला जातो.

**5. धार्मिक आणि दार्शनिक पुरातत्त्व (Symbolic and Cognitive Archaeology):**

यामध्ये समाजाच्या धार्मिक आणि मानसिक आयामांचा अभ्यास केला जातो. हे सिद्धांत मानतात की मानवी संस्कृतीतील प्रतीकात्मक विचार, विश्वास आणि धार्मिक आयाम महत्त्वाचे असतात.

उदाहरणार्थ, पुरातत्त्वज्ञ धर्म, कलात्मकतेची धारणा, आणि सांस्कृतिक विश्वासांवर आधारित अवशेषांचा तपास करतात.

**6. पर्यावरणीय दृष्टिकोन (Environmental Archaeology):**

या सिद्धांतानुसार, मानवी संस्कृती आणि पर्यावरण यामधील नातेसंबंधांचा अभ्यास केला जातो. म्हणजेच, मानवी समाजांचा पर्यावरणावर कसा प्रभाव पडला, आणि पर्यावरणामुळे संस्कृतीवर कसा परिणाम झाला, हे तपासले जाते.

या सर्व सिद्धांतांचा उपयोग पुरातत्त्वज्ञ आपल्या संशोधनात एकमेकांच्या पूरकतेने करतात, जेणेकरून प्राचीन मानवसंस्कृतींचा अधिक सखोल आणि विविध दृष्टिकोनातून अभ्यास करता येईल.

**❖पुरातत्त्वाचे ऐतिहासिक महत्व-**

पुरातत्वशास्त्राचे ऐतिहासिक महत्त्व खूपच मोठे आहे, कारण हे मानवाच्या प्राचीन इतिहासाचा अभ्यास करून आपल्याला पूर्वीच्या संस्कृती, समाज, जीवनशैली, तंत्रज्ञान आणि सृजनशीलतेबद्दल माहिती पुरवते. खालीलप्रमाणे पुरातत्त्वशास्त्राचे ऐतिहासिक महत्त्व स्पष्ट केले जाऊ शकते:

**1. मानव इतिहासाची समज:**

पुरातत्त्वशास्त्र आपल्याला प्राचीन काळातील मानवी जीवनाच्या विविध पैलूंविषयी माहिती देते. हे मानवांच्या प्रारंभिक जीवनशैलीपासून ते सभ्यता आणि संस्कृतीच्या निर्मितीपर्यंतच्या घटनांचा मागोवा घेते.

उदाहरणार्थ, हडप्पा संस्कृती सारख्या प्राचीन कालातील टूल्स, वस्तीच्या अवशेषांचे अभ्यास करून प्राचीन मानवांच्या जीवनाचा अंदाज घेतला जातो.

**2. संस्कृतींचा आणि सभ्यतेचा अभ्यास:**

पुरातत्त्वशास्त्र हे प्राचीन संस्कृती आणि सभ्यतेच्या विकासाचा अभ्यास करते. ह्यामुळे आपल्याला विविध संस्कृतींच्या पद्धती, कला, साहित्य, वास्तुकला आणि तंत्रज्ञानाची माहिती मिळते.

उदाहरणार्थ, हडप्पा, मोहेंजोदडो, मेसोपोटामिया, आणि इजिप्शियन सभ्यता यांचे पुरातत्त्वीय अवशेष त्याच काळातील समाजाच्या सामाजिक, सांस्कृतिक, आणि तांत्रिक विकासाबद्दल सांगतात.

**3. पर्यावरणाच्या बदलांचा अभ्यास:**

पुरातत्त्वशास्त्र पर्यावरणीय बदलांचा अभ्यास देखील करते. पुरातत्त्वज्ञ विविध स्थळांवर काढलेल्या अवशेषांद्वारे त्या काळातील हवामान, जलवायू, आणि पर्यावरणीय परिस्थितींचा अभ्यास करतात.

यामुळे, प्राचीन काळात कोणत्या प्रकारचे पर्यावरण होते आणि त्याचा मानवी जीवनावर कसा प्रभाव पडला हे समजून घेता येते.

**4. समाजव्यवस्थेचा आणि तंत्रज्ञानाचा अभ्यास:**

पुरातत्त्वशास्त्राने प्राचीन समाजातील तंत्रज्ञान, व्यापार, आणि सामाजिक संरचना समजून घेतली. पुरातत्त्वीय वस्तू आणि उपकरणांचा अभ्यास करून त्या काळात वापरल्या जाणाऱ्या साधनांची माहिती मिळवली जाते.

उदाहरणार्थ, लोखंडाचे आणि कांस्याचे वापर, शेतीची सुरुवात, आणि धातूचे शिल्पकला यांचा इतिहास.

**5. इतिहासाचे पुनःलेखन:**

पुरातत्त्वशास्त्र आपल्याला इतिहासाच्या पुनःलेखनामध्ये मदत करते. अनेक वेळा ऐतिहासिक लिखाणात माहिती गहाळ होऊ शकते, पण पुरातत्त्वीय पुरावे या गहाळ माहितीला पुन्हा उजागर करतात.

उदाहरणार्थ, एका एखाद्या प्राचीन शहराच्या अवशेषांची शोध घेतल्यावर आपल्याला त्या शहराच्या समाजाच्या इतिहासाबद्दल नवीन माहिती मिळते.

**6. समाजातील विविधता समजून घेणे:**

पुरातत्त्वशास्त्र समाजातील विविधतेला प्रकट करते. विविध संस्कृती, जाती, धर्म आणि शासकीय प्रणालींविषयी माहिती मिळवून त्या काळातील मानवी विचारधारांची आणि जीवनशैलीची तुलना केली जाऊ शकते.

**7. संस्कृतीच्या संरक्षणाची आवश्यकता:**

पुरातत्त्वशास्त्र हे ऐतिहासिक अवशेष आणि स्थळांचे संरक्षण करण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे. यामुळे आपल्याला आपल्या ऐतिहासिक वारशाचा अभ्यास करण्यास आणि तो पुढच्या पिढ्यांसाठी सुरक्षित ठेवण्यास मदत होते.

एकूणच, पुरातत्त्वशास्त्र हे मानवाच्या इतिहासाची आणि संस्कृतीची गहन माहिती मिळवण्याचा एक महत्त्वाचा स्रोत आहे, ज्यामुळे आपल्याला आपला प्राचीन वारसा आणि सांस्कृतिक धरोहर अधिक चांगल्या प्रकारे समजता येतो.

पुरातत्त्वशास्त्र हे ऐतिहासिक आणि सांस्कृतिक दृष्टिकोनातून महत्त्वाचे आहे. त्याच्या माध्यमातून प्राचीन मानवी समाजाची जीवनशैली, संस्कृती आणि त्यातील बदल समजून घेणे शक्य होते. पुरातत्त्वशास्त्र हे इतिहासाच्या विविधता आणि प्राचीनतेला एक व्यापक दृष्टीकोन प्रदान करते, आणि त्याच्या माध्यमातून आपण आपल्या सांस्कृतिक वारशाची आणि इतिहासाची अधिक गहन समज मिळवू शकतो.

**संदर्भ ग्रंथ सूची.**

1. डॉ. श्रीवास्तव एम. ए., "भारतीय पुरातत्त्वाचा इतिहास", डायमंड पब्लिशर्स, 2010 Page no. 37
2. डॉ. यादव राजवर्धन, "भारतीय इतिहासाची रूपरेषा", साहित्य प्रकाशन, 2005 Page no. 43
3. डॉ. कौल एल. सी., "भारतीय समाज आणि संस्कृती: एक ऐतिहासिक विश्लेषण", राष्ट्रीय पुस्तक विक्रेत्यांचे संघटन, 2012 Page no. 9
4. Aziz K. K., "Indian Archaeology and the Historical Society", Institute of Historical Research, 1999, page no. 13
5. Kosambi D. D., "Marxist Approach to Indian History", Popular Prakashan,1975 Page no. 21
6. Sharma R. S., "The Historical Method and Its Application", Vikas Publishing House, 1989 page no. 27

# घंटा चौकी मंदिरावरील कामशिल्प

**प्रा. डॉ. अरविंद सोनटक्के**
दिगंबरराव बिंदू महाविद्यालय,
भोकर, ता. भोकर जि. नांदेड

चंद्रपूर पासून ईशान्य दिशेला मूल रोड वर 13 km असलेल्या घंटा चौकी या लहानशा खेडे गावा पासून साधारण 500 मीटर वर एक विष्णू मंदिर आहे. खरे तर हे विष्णू मंदिर असल्याचे कोणतेही पुरावे मंदिर पाहताना जाणवत नाही. तर मंदिर स्थापत्य पाहता हे एकेकाळी सूर्य मंदीर किंवा शिव मंदिर असावे असे वाटते. हे मंदिर उत्तराभिमुख असून मंदिर द्विजंघा असलेले आहे. मंदिराच्या बाह्यांगावर सहा देवकोष्टके असून नायिका (सुरसुंदरी) सोबत दोन कामशिल्प तसेच एक पूर्वरती क्रीडा, एक स्वलिंग मर्दन शिल्प आहे, तर एक उत्कृष्ट असे प्रसव शिल्प पहावयास मिळते.

**स्थान** - XCV9+M5, Chak Borda, Maharashtra 442404

**उद्देश** - घंटा चौकी येथील मंदिराच्या बाह्यांग वरील काम शिल्पांचा अभ्यास करणे.

**महत्वपूर्ण शब्द** - काम शिल्प, मंदिर, नायिका, प्रसव शिल्प ई.

**मंदिर रचना**

प्रस्तुत मंदिरात केवळ सभामंडप आणि गर्भगृह अशी रचना आहे. मंदिराची लांबी 29 फूट असून सभामंडप 17.97 × 17 फूट असा आहे. तर गर्भगृह हे बाह्य आकार नुसार 11.3 × 11.3 फूट आहे. व्दिमंडोवर असलेल्या या मंदिराच्या खालच्या मंडोवरावरील शिल्प हे 25 इंच उंचीचे असून रुंदी कमी अधिक प्रमाणात आहे. त्या मध्ये 11 इंच ते 8 इंच रुंदी मध्ये शिल्प कोरलेले आढळतात. वरचे मंडोवर हे उंचीने 19 इंच आहेत तर रुंदी 10.5 इंच असे प्रमाण आढळून येते.

प्रदक्षिणा क्रमाने खालच्या मंडोवरावर तिसऱ्या क्रमांकात एक, वरच्या मंडोवरावर तिसऱ्या क्रमांकात एक कामशिल्प कोरलेले आहे. तसेच वरील भागात पाचव्या क्रमांकावर एक औपरिष्ठक (मुख मैथुन) शिल्प असून त्याच्या शेजारी सहाव्या क्रमांकावर एक शिल्प ज्यामध्ये स्वलिंग मर्दन करत असताना कोरलेले आहे.

शिल्प रचना पाहता यात भौमितिक आकारात प्रमाणबद्धता दिसून येत नाही. खालील मंडोवरावर असलेले कामशिल्प हे 25 इंच उंच आणि 8 इंच रुंदीचे आहे. ज्या मध्ये युगल मैथुन रत अवस्थेत आहेत. कामशास्त्रीय ग्रंथातील वर्णनानुसार हे शिल्प 'स्थित आसन' या सदरात मोडणारे आहे. ज्यावेळी स्त्री व पुरुष उभे असलेल्या अवस्थेत एखाद्या खांबाचा किंवा भिंतीचा आधार घेऊन समागम करतात. त्यास 'स्थित आसन' म्हणतात.[1]

ऊर्ध्व स्थितयोर्युनोः परस्परापाश्रययोः
कुड्यस्तम्भापाश्रितयोर्वा स्थितरतम् ॥ कामसूत्र (2/6/37)

हे मत श्री वात्सायनमुनीचे असून पंचसायकात यास 'व्यस्तकर' असे नाव आहे.[2]

अन्योन्यदोःपञ्जरमध्ययाता स्तम्भं यदा जानुयुगेन मग्नाः ।
निष्पीडय नारी पतिमध्यसंस्था रमेत दध्यायतकं वदन्ति ॥ पंचसायक (7/23)

प्रस्तुत शिल्पात नायक आणि नायिकेची स्थिती पाहता कामशास्त्रीय ग्रंथातील वर्णनानुसार, खांब किंवा भिंतीचा सहारा घेऊन उभी असलेली स्त्री जिच्या माने भोवती पुरुष अलिंगन देत आपल्या जांघेवर तिला सहारा देवून रमण केल्यास ते 'जानुकूर्पर' आसन समजावे, असे कल्याणमल्ल म्हणतात. या शिल्पात स्त्री पुरुष एकमेकांचे चुंबन घेत समागम करीत असून पुरुष स्तन मर्दन करीत आहे. तर स्त्रीने पुरुष लिंग हाती धरलेले असावे असे वाटते. तिच्या हाताचा भाग भंग पावलेला आहे. वरील जंघा भागावर याच शिल्पाच्या वर 19 इंच उंच आणि 8 इंच रुंदीचे समागम शिल्प आहे. शिल्पात असलेले समागम हे एका खाटेवर (बाज) दाखवण्यात आलेले असून त्या खाटेच्या खाली कलश असायला हवा होता. कारण तांत्रिक विधीत सृजनाशी संबधित विधीत जे कर्म केले जाते त्याच्याशी संबधित असे शिल्प मंदिराच्या बाह्यांगावर कोरलेले आढळतात. इथे मात्र खाटेच्या खाली एक चौकोनी भाग दिसून येतो. कदाचित तो कलाशाचा भाग असावा जो काळाच्या ओघात जीर्ण झालेला असावा. असे म्हणण्याचे कारण की दगडाचा पोत हवा तसा मजबूत नसून वालुकाश्म दगड आहे.

प्रस्तुत शिल्प कामशास्त्रीय ग्रंथानुसार वर्णन पाहिल्यास या संदर्भात वेगळी मते वाचायला मिळतात. जसे की, 'उत्फुल्लक' आसन होय. अर्थात उमललेल्या फुलाप्रमाणे स्त्री जननेंद्रीय विस्तृत करणे, स्त्री शरीराचा वरचा भाग खाली करुन आणि कमरेखालचा भाग उंच केल्याने स्त्रीच्या योनीचे मुख फुलासारखे विस्तृत होते. यास उत्फुल्लक प्रकार म्हणतात. यासाठी स्त्रीच्या कमरेखाली उशी ठेवून तो भाग उंच करावा. या अवस्थेत स्त्री नितंबाचा भाग उंचावला जातो. त्यावेळी संभोग करताना स्त्री अथवा पुरुष थोडे थोडे खाली येत राहिले पाहिजे असे मत वात्स्यायनमुनींनी कामसूत्रात व्यक्त केले आहे.(3)

शिरो विनिपात्योर्ध्वं जघनमुत्फुल्लकम् ॥ कामसूत्र (2/6/8)

रतिरहस्यात सरळ झोपलेल्या अवस्थेत असलेल्या स्त्रीच्या संदर्भात ग्राम्य व नागरक आसन असे दोन प्रकार सांगितले आहेत. उताण्या निजलेल्या स्त्रीच्या दोन्ही मांड्या आपल्या दोन मांड्यावर घेऊन पुरुषाने वरुन समागम केल्यास समागमाच्या त्या स्थितीस 'ग्राम' आसन तर उताण्या पडलेल्या स्त्रीवर उपडा पडून पुरुष समागम करीत असतांना स्त्रीच्या मांड्या जर पुरुषाच्या कमरेच्या दोन बाजूस असल्या तर स्त्री पुरुषांच्या त्या संभोग स्थितीस 'नागरक' आसन असे नाव दिले आहे.(4)

उत्तानितयोषित एव भवेदुपविष्टनरोरुगमूरुयुगम् ॥
तद्ग्राम्यमथास्य बहिः कटितो यदि याति तदा नागरकम् ॥
रति रहस्यम (10/15)

अनंगरंगात केवळ 'नागर' आसन' सांगितले असून त्यात स्त्रीच्या जांघा पकडून समागम सांगितला आहे.(5)

उत्तानिकायाः स्मरमन्दिरोपस्थितस्तदूरुद्वयमुदृहीत्वा ।
संस्थाप्य बाह्यं कटितो रमेत कान्तस्तदा स्यात्किल नागराख्यः ॥
अनंगरंग (10/5)

यात रतिरहस्याने जास्त विस्तृत उल्लेख केलेला दिसतो. पंचसायका नुसार 'नागर' आसनात स्त्री खालून कंबर हलवित समागमात सहकार्य करावे असे म्हटले आहे.(6)

एवंविधायाः स्त्रिय एवं जङ्घे निजस्य जङ्घोपरि सन्निवेश्य ।
उद्भ्राम्य भूयः कटिमारमन्त्याः स्यादेष बन्ध किल नागराख्यः ॥
पंचसायक (7/9)

श्री मीननाथने स्मरदीपिकेत नागरबंधात मोठे रोमांचित वर्णन केले आहे. ज्यानुसार स्त्रीने आपल्या दोन्ही हाताने पुरुषाच्या कमरेला धरुन कंबर हलवावी व पुरुषाने स्त्रीच्या वृक्षस्थलाचे मर्दन करावे. असे सांगितले आहे.(7)

सुन्दरीं च रमेत्कान्तः, कट्यासक्तभुजद्वयाम् ।
हृदि तत्कान्तहस्तां च बन्धोऽयं नागरो मतः ॥ स्मरदीपिका (100)

हे शिल्प या वर्णनास जुळणारे दिसून येते. रतिरत्नप्रदीपिकेत 'ग्राम्य' आसना विषयी म्हणतात, सरळ झोपलेल्या स्त्रीने पुरुषाच्या मांड्यावर मांड्या ठेवल्यास आणि बाहू पार्श्वभागाकडे असतील तर 'ग्राम्य बन्ध' होय.

'उत्फुल्लक' आसनाला 'व्योमपद' असे नाव दिले आहे. 'व्योमपद' म्हणजे आकाशाकडे पाय करणे होय, या आसनासाठी स्त्री आपले पाय मुडपूण घुडघ्यापासून पाय दुमडून वर करते आणि अशा स्थितीत राहण्यासाठी नितंबाला हाताचा आधार देते व तिचा पती स्तन पकडून रमण करायला लागतो. (8)

यदा समूर्धीकृतपादयुग्मिका नितम्बभागं पुरुषस्य गृह्णती।
त्रिकस्य भागे निहितोपधानिका भवेत् तदा व्योमपदाख्यमासनम् ॥
केलिकुतूहलम् (8/15);
तल्पप्रसुप्ता निजपादयुग्ममूर्ध्वं विधत्ते रमणी कराभ्याम् ।
स्तनौ गृहीत्वाऽथ रमेत कान्तो बन्धस्तदा व्योमपदाख्य उक्तः॥
अनंगरंग (10/7)

यात वात्सायनापेक्षा वेगळी बाब म्हणजे स्त्रीने उशी ऐवजी हाताचा उपयोग केलेला आहे. रतिरहस्यात 'उत्फुल्लक' आसनाचे विश्लेषण करतांना कंबरेखाली उशी ठेवून स्त्री समागम करतांना स्तन मर्दन करावे व त्यावेळी खालून स्त्रीने पुरुषाची कंबर पकडून वरखाली करावे असे म्हटले आहे.[9]

करयुग्मधृतत्रिकमूर्ध्वलस
ज्जघनं पतिहस्तनिविष्टकुचम् ।
स्फिग्बिबहिर्घतपार्श्नियुगं (पार्ष्णीयुगं)
हयुत्फुल्लकमुक्तमिदं करणम् ।।
कोकशास्त्र (9/4)

केलिकुतूहलम् [10]
नितम्बिनी पाणियुगं स्वकत्रिके करोतु किं वाऽप्युपधानकं यदि ।
रमेत कामी दृढबन्धनस्थितो भवेत्तदोत्फुल्लकमेतदासनम् ॥
केलिकुतूहलम् (8/14)

मध्ये कमरेखाली हात किंवा उशी स्त्रीने घ्यावी असा स्पष्ट उल्लेख करुन येथे शक्यताच मिटविलेली आहे. प्रस्तुत शिल्प हे ग्रांथिक वर्णन नुसार कोरलेले असून तांत्रिक विधीचा स्पष्ट प्रभाव पडलेला दिसतो. याच शिल्पाच्या बाजूला पाच आणि सहा क्रमांकावर असलेले दोन सुटे शिल्प असून पहिल्या शिल्पात उभ्या असलेल्या स्त्रीच्या जननेंद्रियाचे पुरुष मुख मैथुन (औपरिष्ठक) करीत आहे. सामान्य जीवनात एकमेकांवर गाढ विश्वास असलेले जोडपे असा मुख मैथुन सहज करताना आढळतात. याच्या पुढील बाजूस एक पुरुष आपले उत्तेजीत लिंगाचे मर्दन करताना दिसत असला तरी हे दोन्ही शिल्प एकत्र केल्यास एक स्त्री आणि दोन पुरुष समागम (संघटक आसन) शिल्प असावे असा भास झाल्याशिवाय राहत नाही.

**निष्कर्ष**

विदर्भ हे मराठवाड्या प्रमाणेच शिल्प समृध्द आहे. मंदिर केवळ धार्मिक केंद्र नव्हती तर ती कलेची, साधनेची ठिकाणे होती. त्याच प्रमाणे तंत्र विधी साठीही मंदिराचा उपयोग केला जात असे. प्रस्तुत मंदिराच्या बाह्य भागावर असलेले कामशिल्प आणि एक प्रसव शिल्प हे तंत्रविधीचे संकेत देतात. मैथुन ही तंत्र विधी मध्ये मोक्षाचे साधन मानले गेले असले तरी, त्यातील शिल्पांकन हे कामशास्त्रीय ग्रंथातील वर्णनानुसार होते असे दिसून यते. प्रस्तुत मंदिर हे विष्णू मंदिर म्हणून ओळखले जात असले तरी ते तांत्रिक विधीचे केंद्र असलेले सूर्य किंवा शिव मंदिर असावे. तसेच काम शिल्प बाबत समाजात आजही अनेक गैर समाज आहेत. त्या मुळे हे काम शिल्प एक तर, "तसले काही तरी." असे म्हणून टाळले जातात किंवा ही शिल्प विद्रूप केली जातात. असे न करता समाजात जाणीव जागृती निर्माण व्हावी या हेतूने सामाजिक प्रयत्न होणे गरजेचे आहे.

**संदर्भ :–**


1. कुलकर्णी दत्ता जी., अनुः संपूर्ण कामसूत्र (2/6/37) राजेश प्रकाशन पुणे, पृ. 66
2. डॉ. शर्मा रामानंद, व्याख्या; पंचसायक (7/23), कृष्णदास अकादमी वाराणसी, 1995 पृ. 110
3. कुलकर्णी दत्ता जी., अनुः संपूर्ण कामसूत्र, राजेश प्रकाशन पुणे, पृ. 62
4. पं. शर्मा वासूदेव अनुः रंगेलरतिशास्त्र, नवजीवन प्रकाशन पुणे, 1971, पृ. 84
5. डॉ. त्रिपाठी रामसागर, संपाः अनंगरंग, (10/5) चौ.सं. प्रतिष्ठाण, दिल्ली, 2004, पृ. 292
6. डॉ. शर्मा रामानंद, व्याख्याः पंचसायक (7/9), कृष्णदास अकादमी वाराणसी, 1995 पृ. 107
7. डॉ. चौहान दलवीर सिंह, संपा, स्मरदीपिका (100) चौ.स.सी. ऑफिस, वाराणसी 2004 पृ. 43
8. पं. दीक्षित मथुरा प्रसाद, केलिकुतूहलम्, (8/15) कृष्णदास अकादमी वाराणसी, वि.स 2058, पृ. 67; डॉ. त्रिपाठी रामसागर, अनु. अनंगरंग (10/7) चौ.स. प्रतिष्ठान, दिल्ली, 2004, पृ. 294
9. पं. शर्मा वासूदेव, अनुः रंगेलरतिशास्त्र, नवजीवन प्रकाशन पुणे, 1971, पृ.85
10. पं. दीक्षित मथुरा प्रसाद, केलिकुतूहलम्, (8/14) कृष्णदास अकादमी वाराणसी, वि.स.2058, पृ. 67;

11. प्रत्यक्ष सर्वेक्षण (नोव्हेंबर 2023, जानेवारी 2025)





# ब्रिटिशांनी केलेले भारताचे आर्थिक शोषण

**जिजाभाऊ तुकाराम दातीर**
संशोधक विद्यार्थी
पुणे विद्यापीठ.

आर्थिक शोषण म्हणजे काय ? आपल्या हितसंबंधाच्या रक्षणासाठी, प्रगतीसाठी एका व्यक्तीने, व्यक्ती समूहाने वा देशाने दुसऱ्या व्यक्तींची/व्यक्तिसमूहाची वा देशाची संपत्ती शक्य असेल त्या मार्गांनी शोषून घेण्याची प्रक्रिया म्हणजे आर्थिक शोषण होय. जसे ब्रिटिशांनी केलेले भारताचे आर्थिक शोषण. ब्रिटिशांनी भारतीयांचा आत्यंतिक छळ करून असे शोषण केले की ज्यामुळे भारतीयांना जगणेही अवघड होऊन गेले. त्यांची दैन्यावस्था ओढवली. अर्धपोटी दिवस काढून ते कसेबसे जगू लागले.

भारत असा संपन्न देश होता की ज्यावर सतत इतरांचा डोळा होता. त्यामुळे भारतावर अगदी प्राचीन काळापासून परकीयांची सतत अतिक्रमणे होत राहिली. प्राचीन काळात सिकंदरासारखे आक्रमक भारताच्या संपन्नतेच्या कथा ऐकून त्याकडे आकर्षित झाले. संपत्तीच्या कारणामुळेच मध्ययुगातही अनेक मुस्लिम रानटी टोळयांची आक्रमणे झाली. त्यातील काहींनी भारतातून प्रचंड संपत्ती लुटून नेली मात्र त्यातील काही येथेच स्थिर होऊन राज्यकर्ते बनले. भारतीय संस्कृतीचा एक भाग बनले. यानंतर भारतावर वक्र दृष्टी फिरली ती युरोपीय लोकांची भारताशी संबंध निर्माण करण्यासाठी ते धडपडू लागले. वास्को-द-गामा याने शोधलेल्या सागरी मार्गाने अनेक युरोपीय व्यापारी भारतात आले. त्यांच्या सुरुवातीच्या व्यापारी धोरणालाच पुढे राजकीय वळण लागले. असाच एक ब्रिटीश व्यापारी गट म्हणजे ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनी इ.स. 1600 साली स्थापन झालेल्या कंपनीने भारतीय व्यापार व त्यानंतर राजकीय क्षेत्रात यश प्राप्त केले व ती भारताची राज्यकर्ती बनली. साम, दाम, दंड, भेद या कुटनीतीचा वापर करून तिने भारतावर वर्चस्व मिळवून भारताचे शक्य होईल तितके आर्थिक शोषण केले. त्यांच्या प्रचंड आर्थिक शोषणाने संपन्न असा भारत देश आर्थिकदृष्ट्या दरिद्री बनला. यापूर्वी भारतात फक्त राजकीय सत्तांतर घडत होते. अर्थव्यवस्थेवर मात्र आघात आतापर्यंत झाला नव्हता. ब्रिटिशांनी मात्र अर्थव्यवस्थेवर आघात करून जीवनमान विस्कळीत करून टाकले.

भारतात राजकीय सत्ता निर्माण करत असताना भारतातून जास्तीत जास्त संपत्ती कशी लुटता येईल याकडे ब्रिटिशांनी जास्त लक्ष दिले. भारताची लूट हे त्यांचे मुख्य ध्येय होते. राजकीय सत्ता, न्यायव्यवस्था, महसूल पद्धती ही इतर धोरणे त्यांनी शोषणास सहाय्यक म्हणूनच राबविली. भारतात सुधारणा, विकास करून भारतास आधुनिक बनवण्याची त्यांची मुळीच इच्छा नव्हती. फक्त संपत्ती वाहून नेणे एवढाच त्यांचा हेतू होता व तो त्यांनी पूर्णपणे पार पडला. संपत्तीच्या शोषणाच्या दृष्टीने त्यांनी व्यापार, उद्योग, महसूल, जकाती ही धोरणे राबविली. या त्यांच्या धोरणांमुळे भारताच्या अर्थव्यवस्थेवर मूलगामी परिणाम झाले. ब्रिटिशांचे हे धोरण ब्रिटिशांच्या हिताला अनुकूल आणि भारतीयांच्या हिताला प्रतिकूल असे होते. ज्यावेळी भारतीयांना या धोरणाची जाणीव होऊ लागली, त्यावेळी भारतीयांत असंतोष निर्माण होऊन ते ब्रिटीश सत्तेविरुद्ध एकत्र आले व त्यांना विरोध करण्यास सुरुवात झाली.

**स्वयंपूर्ण खेडी :**

ब्रिटीशपूर्व भारत हा स्वयंपूर्ण होता. भारतातील ग्रामीण अर्थव्यवस्था स्वयंपूर्ण होती. मोगल सम्राट जमीन महसूल पिकांची स्थिती, उत्पन्न पाहून घेत. दुष्काळ, पूर अशी संकटे आली तर करात सूट मिळे. ब्रिटिशांनी मात्र सारा रोख स्वरुपात घेण्यास सुरुवात केली. तो वेळच्यावेळी भरावा लागे. नैसर्गिक आपत्तीच्यावेळीही त्यात सूट मिळत नसे. ब्रिटिशांनी जमिनीची मोजणी करून सगळीकडे समान कर आकारणी केली. या त्यांच्या पद्धतीमुळे स्वयंपूर्ण खेड्यांची रचना नष्ट झाली.

ब्रिटिश ज्यावेळी भारतात आले त्यावेळी ते व्यापारी होते. त्यांना मुघल सम्राटांकडून त्यासाठी परवानगी घ्यावी लागे. ते विनंती करून काही सवलती मिळवत. सोन्या चांदीच्या बदल्यात ते भारतीय वस्तू खरेदी करत असत व पाश्चिमात्य देशांत विकून प्रचंड नफा कमवत. सुरुवातीस ब्रिटिश हे याचक होते. "भारताबरोबरचा त्यांचा व्यापार म्हणजे एक प्रकारची शर्यतच होती ती म्हणजे भारताला मान्य होईल अशा वस्तू मिळवणे, त्यासाठी वेस्ट इंडीज आणि स्पॅनिश, अमेरिका

यांचेबरोबर गुलामाचा व्यापार करावा आणि त्यात जी चांदी मिळेल ती भारताला द्यावी, ह्या दृष्टीने गुलामांच्या विक्रीला फार महत्त्व होते."[1]

राष्ट्रवादी इतिहासकार ब्रिटिशांनी भारताचे शोषण तीन माध्यमातून केले असे म्हणतात. मुख्यतः व्यापार, उद्योगधंदे आणि वित्तीय धोरण यांतून शोषण केले.

"They took note of all the three forms of contemporary economic exploitation, namely, through trade, industry, and finance."[2]

अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात भारत भांडवलशाही विकासाच्या औदयोगीक टप्प्याकडे वाटचाल करत होता पण ब्रिटिशाच्या वसाहतीच्या विस्तारवाद त्यास अडसर ठरला. त्याच्या पहिल्या भेटीतच हिंदुस्थानला इंग्रजांचे लढवय्ये म्हणून ओळख झाली. तो हिंदुस्थानात येईपर्यंत इंग्रज हे क्षुल्लक फेरीवाले व्यापारी म्हणून ओळखले जायचे, तर फ्रेंचांना अजिंक्य आणि हुकमत गाजवणारे म्हणून नावाजले जायचे. त्याच्या शौर्याने आणि गुणवत्तेने त्याने आपल्या प्रभावाची दखल घ्यायला लावली. (थॉमस बॅबिंग्टन मेकॉले, लॉर्ड क्लाईव्ह, 1840)

पोर्तुगीज, डच, इंग्रज, डॅनिश लोकांच्या पाठोपाठ फ्रेंचही हिंदुस्थानात आले. युरोपियनांनी हिंदुस्थान बळकावण्याच्या प्रक्रियेची सुरुवात फ्रेंचांनी केली. 1707मध्ये औरंगजेब पैगंबरवासी झाल्यावर त्याच्या मुलांमध्ये वारसाहक्कासाठी लढाया सुरू झाल्या. मुघल साम्राज्याचे तुकडे पडायला सुरुवात झाली. मुघलांचे मांडलिक सरदार, त्यांच्यावर कोणाचेच नियंत्रण न राहिल्याने ते स्वायत्त झाले. ते एकमेकांवर कुरघोडी करत. या परिस्थितीचा फायदा घेणाऱ्या मराठ्यांना आणि दक्षिण भागातील हिंदूंनाही त्यांना तोंड द्यावे लागत होते. लढणाऱ्या दोन फळयांपैकी एका फळीला आधार देऊन उपकृत करण्याची ही नामी संधी होती. या अशा राजकारणात फ्रेंचांनी बरेच कौशल्य कमावलेले होते.[3] असे फ्रेंच लोकांकडे कौशल्य असले तरी त्यांना मायदेशाकडून नंतर आधार मिळाला नाही आणि ब्रिटीश मात्र पुढे जाऊन येथील राज्यकर्ते बनले.

मुघल सम्राट जहांगीर याने 1618 मध्ये थॉमस रो याला सवलतींची सनद दिली. रो चे शांततामय व्यापाराचे धोरण पुढे आक्रमक बनले. " उदा. मुंबईच्या गव्हर्नर गेराल्ड याने ईस्ट इंडिया कंपनीच्या संचालकांना 1687 मध्ये लिहिले की, तुमचा सर्वसाधारण व्यापार हाती तलवार घेऊन तुम्ही करावा ही काळाची गरज आहे."[4] बंगालमध्ये ब्रिटिशांनी पाय रोवले. प्लासी व बक्सारच्या विजयानंतर ब्रिटिशांनी दिवाणी हक्क मिळविले. यातून ब्रिटिशांनी बंगालची पद्धतशीर लूट सुरु केली. येथूनच ब्रिटिशांच्या आर्थिक शोषणाची सुरुवात होते.

**वाणिज्यवादी अर्थव्यवस्था (1757 ते 1813):-**

भारताशी ब्रिटिशांना सुरुवातीस समान पातळीवर व्यापार करावा लागत असे. सोने, चांदी यांच्या मोबदल्यात वस्तू खरेदी कराव्या लागत. बंगालच्या विजयाने ही स्थिती बदलली बंगालमध्ये ब्रिटीश जो महसूल गोळा करत त्यातूनच ब्रिटिशांचे पगार व भारतीय मालाची खरेदी केली जाऊ लागली. यामुळे व्यापारातून त्यांना प्रचंड नफा मिळू लागला. आपल्या वर्चस्वाखालील प्रदेशांची त्यांनी आता लूट सुरु केली. भारतीय व्यापारी, माल विक्रेते यांचेवर आपल्या किंमती लादल्या. उत्पादन खर्चापेक्षा कमी खर्चात आपला माल विकल्याने भारतीय विक्रेते दरिद्री बनत गेले व ब्रिटिश व्यापारी मात्र श्रीमंत होऊ लागले. अशा पद्धतीने भारताच्या शोषणाची प्रक्रिया सुरु झाली. या काळात व्यापारावर कंपनीचा एकाधिकार होता. तो 1813 ला संपुष्टात येऊन खुल्या व्यापाराचे तत्त्व भारतात लागू करण्यात आले. ईस्ट इंडिया कंपनीच्या शोषणाची जाणीव अनेकांना झाली. " ईस्ट इंडिया कंपनी को, पूर्वीय व्यापार पर कंपनी के एकाधिकार को और भारत के राजस्व और निर्यात व्यापार नियंत्रण के जरिए कंपनी की शोषण पद्धति को ब्रिटीश कारखानेदार अपनी आकांक्षाओ की पूर्ती में प्रमुख बाधा समझते थे |"[5] ब्रिटिशांनी या विरुद्ध एक आंदोलन करून 1813 मध्ये कंपनीचा व्यापार करण्याचा एकाधिकार संपुष्टात आणला. यानंतर भारतात ब्रिटिशांच्या आर्थिक हितसंबंधाशी निगडीत नवीन काळ सुरु झाला. भारताला उद्योगप्रधान इंग्रजांची वसाहत बनविले गेले. खुला व्यापार लादून त्याचे आणखी तीव्र शोषण सुरु झाले.

**खुल्या व्यापाराची अवस्था (1813-1858):-**

1813 मध्ये ईस्ट इंडिया कंपनीची भारताशी व्यापार करण्याची मक्तेदारी संपली. आता भारत सर्व ब्रिटिश व्यापारी व भांडवलदार यांना व्यापारासाठी खुला झाला. या काळात ब्रिटनमधील औद्योगिक क्रांतीचा विकास जोरावर होता. त्या

उद्योगांच्या विकासासाठीही भारताचा वापर केला गेला. यावेळी भारतातील कच्चा माल इंग्लंडला नेला जाऊ लागला आणि तेथील तयार होणार पक्का माल भारतीय बाजारपेठेत आणून खपविला जाऊ लागला. " उदा. भारतातील कापूस मँचेस्टरच्या कापड गिरण्यांना पुरवला जात असे आणि कापड गिरण्यांमधील तयार कापड भारतात विकले जात असे."[6] इंग्लंडच्या यंत्र उत्पादित मालापुढे भारताचा माल टिकाव धरू शकला नाही. भारतात बाजारपेठा वाढाव्या म्हणून संस्थाने खालसा करण्याचे धोरण राबविले गेले. भारतीय मालावर जकाती लावल्या गेल्या. यामुळे भारतीय उद्योगच नष्ट झाले. कारागीर बेकार झाले. अशा रीतीने या पद्धतीत भारताचे दुहेरी शोषण होऊ लागले. यानंतर आणखी तीव्र शोषणाची आर्थिक साम्राज्यवादाची अवस्था सुरु झाली.

**आर्थिक साम्राज्यवादाची अवस्था (1858 पासून पुढे):-**

1857 चे बंड दडपून टाकल्यावर भारतातील ईस्ट इंडिया कंपनीची भारतातील सत्ता संपुष्टात आणली गेली. इंग्लंडच्या राणीचे राज्य आता भारतावर सुरु झाले. राणीच्या जाहीरनाम्यात अनेक आश्वासने राणीने दिली पण पाळली मात्र नाहीत. कंपनीच्या हातून पार्लमेंटकडे भारताचे वर्चस्व जाणे म्हणजे एका चोराच्या हातून दुसऱ्या मोठ्या, चलाख चोराच्या हाती भारत जाण्यासारखे होते. त्यांनी भारताचे शोषण कंपनीपेक्षा तीव्रतेने करण्यास सुरुवात केली. 1933 पर्यंत ब्रिटिशांची भारतात एक अब्ज पौंड गुंतवणूक होती. यावेळी ब्रिटनमधील औद्योगिक क्रांतीचा पहिला टप्पा संपला होता. इंग्लडमध्ये भांडवल गुंतवून नफा कमी मिळत होता. ब्रिटिशांनी अधिक नफ्यासाठी त्यांचे अतिरिक्त भांडवल भारतात गुंतवण्यास सुरुवात केली. भारतात स्पर्धा व मजुरी कमी, कच्चा माल उपलब्ध यामुळे नफा वाढणार होता. या अवस्थेतून तिहेरी मार्गाने ब्रिटिशांनी भारताचे आर्थिक शोषण सुरु केले. आता या अवस्थेने तर भारताची दुरावास्थाच ओढवली.

**दळवळण साधने :-**

रेल्वे बांधण्यास ब्रिटीशांनी भारतात आपल्या व्यापाराच्या फायद्यासाठी सुरुवात केली. जगातील विविध देशांच्या औद्योगिक आणि आर्थिक विकासात रेल्वेस फार महत्त्वाचे स्थान आहे. रेल्वे बांधणीसाठी ब्रिटीशांनी भारताचा पैसा वापरला व त्याचा जास्त फायदा मात्र ब्रिटीशांना झाला. दुष्काळात धान्य इतर भागात पोहचवता यावे असे रेल्वे बांधण्यासाठी कारण पुढे करून रेल्वेवर भारताचा प्रचंड खर्च झाला. इतर आधुनिक साधनेही निर्माण केली गेली रेल्वेमुळे भारताचा व्यापार वाढला.

| " वर्ष | आयात (पौंड) | निर्यात (पौंड) |
|---|---|---|
| 1849-50 | 13,696,696 | 18,283,543 |
| 1855 | 14,770,927 | 20,194,255 |
| 1865 | 50,108,171 | 66,895,884 |
| 1875 | 44,363,160 | 57,984,549 |

"[7]

वरील तक्त्यावरून आपल्या लक्षात येईल की रेल्वेच्या विकासामुळे भारताचा आयात-निर्यात व्यापार किती मोठ्या प्रमाणात वाढला. जेवढा व्यापार वाढला तेवढे भारताचे शोषण वाढले व भारताचा पैसा इंग्लंडला जाऊ लागला.

इ.स.1757 ते इ.स.1947 या काळात तीन अवस्थांत भारताचे शोषण व ब्रिटनची संपन्नता वाढवणे हे धोरण ब्रिटीशांचे होते. भारताच्या शोषणातून इंग्लंडचे पोषण होऊन तो गब्बर बनत चालला होता. भारत या वसाहतीवरच इंग्लंड मोठ्या प्रमाणावर अवलंबून होता. भारतातील या दरिद्री स्थितीवर सरकार विचार करत नाही म्हणून पुणे सार्वजनिक सभा त्यावर एक विधान टाकते ते बिपन चंद्राच्या पुस्तकात असे आहे. "भारत की घोर दरिद्रता इतनी अधिक उव्देगजनक है कि किसी भी अन्य देश की सरकार इस प्रकार की स्थिती में इस प्रश्न को गंभीरतापूर्वक सोचने को विवश होती, अन्यथा देश में क्रांती हो गई होती."[8]

**महसूल व करपद्धती :-**

ब्रिटिशांनी भारताच्या शोषणासाठी राबविलेल्या वेगवेगळया धोरणातील हे एक महत्त्वाचे धोरण होय. जमीन महसूलाच्या कायमधारा, रयतवारी व महालवारी या पद्धती राबवून त्यांनी भारतीय शेतकऱ्यांची पिळवणूक व आर्थिक शोषण केले. रोख महसूल भरण्यासाठी प्रसंगी शेतकऱ्यांना जमिनी विकाव्या लागल्या. त्यामुळे शेतकऱ्यांची दैन्यावस्था

झाली. शेती हा भारताचा प्रमुख व्यवसाय असल्याने पर्यायाने भारताचे दारिद्र्य यातून ओढवले. कायमधारा पद्धतीत महसूल गोळा करणारा जमीनदार वर्ग उदयास आला. हा वर्ग जनतेचे हाल करत असे. कायमधारा पद्धतीत शेतकऱ्यांकडून घेण्यात येणाऱ्या कराच्या रकमेचा वाटा निश्चित करण्यात आला. " शेतकऱ्याकडून घेण्यात येणाऱ्या खंडाच्या रकमेचा 89% भाग सरकारला तर 11% भाग जमीनदाराला मिळावा अशी तरतूद करण्यात आली."[9] ही रक्कम ठराविक वेळेतच भरावी लागत असे. कायमधारा पद्धतीमुळे सरकारचे उत्पन्न स्थिर झाले. इ.स. 1820 मध्ये रयतवारी ही महसूल पद्धती थॉमस मनरो याने लागू केली. यात सरकार व शेतकरी यांचा प्रत्यक्ष संबंध आला. यातही सरकारी अधिकारी जनतेची पिळवणूक करत असत. कठोरपणे कर वसुली केली जाई अन्यथा जमिनी जप्त केल्या जात. या पद्धतीत जप्त जमिनीचे सरकारच मालक बनले. महालवारी पद्धतीत गावाच्या एकूण उत्पन्नाचा अंदाज घेऊन गावासाठी सारा निश्चित केला जात असे. या ब्रिटिशांच्या महसूल पद्धतीने भारतीय कृषीचे स्थैर्य नाहीसे झाले. भारतीय शेतकरी वर्ग ब्रिटिश शोषणाने कर्जबाजारी झाला. शेतकऱ्यांना लुटून प्रचंड संपत्ती ब्रिटिशांनी इंग्लंडला नेली.

**शोषणाबद्दल ब्रिटिशांचे विचार :-**

गव्हर्नर रिचर्ड टेंपल याने 1880 मध्ये लिहून ठेवले आहे की, " इंग्लंडने भारत आपल्या ताब्यात ठेवलाच पाहिजे. कारण येथे ब्रिटिश सत्ता चिरंतन टिकेल या आशावादावर विसंबून ब्रिटिश भांडवल फार मोठ्या प्रमाणावर गुंतवले गेले आहे." कर्झन ब्रिटिश खान मालकांना कानमंत्र देताना म्हणतो, " माझी जबाबदारी प्रशासनात आहे, तर तुमची शोषणात आहे; पण एकाच प्रश्नाच्या आणि एकाच कर्तव्याच्या या दोन बाजू आहेत."[10]

भारताचे दारिद्र्य :-

ब्रिटिशांचा भारतातील शासनाचा उद्देश काय होता हे 28 जानेवारी 1880 साली 'केसरी' या वृत्तपत्रातील एका लेखात दिले होते. त्या वाक्यांतून हेतू स्पष्ट होतो. " Surely India is treated as a vast pasture reserved solely for the Europeans to feed upon."[11] भारतीय संपत्ती शोषून भारताला गरीब कसे बनवले. याची जाणीव अनेक भारतीयांना होऊ लागली व ते आपले विचाराने जागृती करू लागले.लोकहितवादी आपल्या 'लक्ष्मी ज्ञान' या पुस्तकातून ब्रिटीश शोषणाचे वर्णन "भारताची संपत्ती दर्यापार चालली" असे करतात. भारताचे दारिद्र्य हे मनुष्यनिर्मित होते आणि ते ब्रिटिशांमुळे आले होते. " राजाने किंवा त्याचे पिता अगर प्रपितामहाने द्रव्य आणिले नसते. जे राजाजवळ द्रव्य, ते रयतेपासून सर्व घेतलेले असते. याजकरिता त्या द्रव्याचा उपयोग दांडगाईने न करावा. परंतु हे मर्म राजे विसरतात आणि विद्वानही विसरतात."[12] अशा पद्धतीने ब्रिटिशांच्या द्रव्य संचयाचे व आर्थिक विषमतेचे वेगळे चित्रण लोकहितवादींनी केले आहे. ब्रिटिशांनी केलेल्या शोषणामुळे संपन्न देशातील गरीब लोक अशी भारताची अवस्था झाली. भारताचे राष्ट्रीय उत्पन्नावरून भारताच्या दारिद्र्यावर प्रकाश पडतो. ती आकडेवारी पुढीलप्रमाणे –"

| अंदाजपत्रक करणारा | सरकारी/बिनसरकारी | ज्या वर्षी केले ते वर्ष | ज्या वर्षाचे केले ते वर्ष | दरडोई वार्षिक उत्पन्न | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | रुपये | शिलिंग |
| डी. नवरोजी | बिनसरकारी | 1876 | 1868 | 20 | 40 |
| बारिंग व बारबौर | सरकारी | 1882 | 1881 | 27 | 45 |
| लॉर्ड कर्झन | सरकारी | 1901 | 1897-1898 | 30 | 40 |
| डब्ल्यू डिग्बी | बिनसरकारी | 1902 | 1899 | 18 | 24 |
| वाडिया व जोशी | - | 1925 | 1913-1914 | 44.5 | 59 |

"[13]

**दादाभाई नौरोजींचा आर्थिक शोषण सिद्धांत :-**

राष्ट्रीय उत्पन्नाची साधने व राष्ट्रीय उत्पन्न यांची दादाभाईंनी चर्चा केली. इ.स. 1870 मध्ये लिहिताना ते म्हणतात, "भारताचे एकूण वार्षिक राष्ट्रीय उत्पन्न सुमारे तीस कोटी पौंड व दरडोई उत्पन्न 40 शिलिंग किंवा 20 रुपये असल्याचे स्पष्ट

केले."[14] 19 व्या शतकाच्या आरंभी भारतातून 3 लक्ष पौंड इंग्लंडकडे जात होते. ब्रिटिश सरकार लष्करावर अफाट खर्च करत होते. यामुळे हिंदुस्थान मृत्युपंथाला लागला असे म्हटले जाते.

राज्यकारभारावर अफाट खर्च ब्रिटिश करत होते. सल्लागार मंडळ, पार्लमेंट कायदे, सरकारी कामे यावर खर्चाची उधळपट्टी होत होती. मुलकी सेवा व सैन्य यावरील खर्च एकूण राष्ट्रीय खर्चाच्या 1/3 होता. युद्धे, न्यायव्यवस्था यांचाही खर्च भारतावर लादला जात असे. प्रशासकीय गैरकारभार व अर्थविषयक चुकीच्या निर्णयांमुळे राष्ट्रीय खर्च व कर्जाचा बोजा वाढत होता. 'ब्रिटिशांनी भारताचे रक्तशोषण चालवले होते' असे दादाभाई म्हणतात.

दादाभाई भारताचे शोषण हे अंतर्गत अर्थव्यवस्था व परदेशी व्यापार या दोन पातळीवर झाले असे म्हणतात. दादाभाईंच्या मते, गझनीच्या महंमदाने 18 स्वाऱ्यांमधून जेवढी लूट नेली, त्या सर्व लुटीपेक्षा अधिक संपत्ती ब्रिटिश लोक दरवर्षी नेत होते. ब्रिटनकडून भारताचे आर्थिक शोषण कसे केले जाते याचे विश्लेषण दादाभाईंनी केले. राष्ट्रीय उत्पन्न वाढविणे व देशातील दारिद्र्य कसे नष्ट करता येईल यावर त्यांनी लक्ष केंद्रित केले. त्यांची कार्यपद्धती वस्तुनिष्ठ व शास्त्रीय पद्धतीवर आधारित होती. राजकीय दास्य आणि आर्थिक दारिद्र्य हे दोन्ही रोग नष्ट करण्यासाठी त्यांनी अविश्रांत परिश्रम केले. भारताच्या राष्ट्रवादी आंदोलनाला त्यांनी आर्थिक अधिष्ठान प्राप्त करून दिले.

भारताच्या आर्थिक विपन्नावस्थेसंबंधी आर. सी. दत्त. महादेव गोविंद रानडे, दादाभाई नौरोजी, गोपाल कृष्ण गोखले, लोकमान्य टिळक यांनी महत्वपूर्ण विचार मांडले. त्यातील दादाभाईंनी आकडेवारीनुसार भारताचे शोषण दाखवून दिले.

लोकमान्य टिळकांनी स्वदेशीचा वापर व परदेशीचा बहिष्कार या माध्यमातून ब्रिटिश साम्राज्यवादाला प्रत्युत्तर दिले. यामुळेच चरख्यातूनही क्रांती घडेल असे गांधीजींना वाटले. या साऱ्या आर्थिक विचार मंथनाला लोकमान्य टिळक व महात्मा गांधींसारख्या नेत्यांनी राजकीय स्वरूप दिले.

**भारताची ब्रिटिशांनी केलेली लूट:-**

इ.स. 1794 ते 1813 या काळात 8,26,757 पौंड किमतीचे सुती कापड इंग्लंडमधून आयात झाले. इ.स.1814-1815 या एका वर्षात 34,46,016 पौंडाची रक्कम भारतातून इंग्लंडमध्ये वाहून नेली. त्यानंतरच्या काळात शोषण वाढतच गेले. उदा. इ.स. 1836-37 मध्ये 30,90,582 पौंड तर इ.स.1851 मध्ये 61,62,043 पौंडाची संपत्ती भारतातून इंग्लंडला नेली गेली. कंपनीच्या अखेरच्या 24 वर्षाच्या काळात एकूण 15,18,30,989 पौंडाची रक्कम कंपनीने भारतातून उकळली. ब्रिटिशांनी भारतात लोहमार्गात गुंतवलेल्या भांडवलावर हमखास नफ्याची तरतूद म्हणून इ.स. 1849 ते 1858 या दहा वर्षाच्या काळात एकूण 22,44,829 पौंडाची रक्कम भारतातील ब्रिटिश शासनाला दिली. ब्रिटिशांनी भारतातून किती संपत्ती लुटून नेली याची मोजदाद करणे तशी अवघड गोष्ट आहे. प्लासी ते वाटर्लु (इ.स. 1757 ते इ.स. 1857 ) या काळात 50 ते 100 कोटी पौंडाची संपत्ती भारतातून इंग्लंडला नेण्यात आली. असा अंदाज डिग्बी या राजनीतीज्ञाने व्यक्त केला आहे.[15]

युरोपीय लेखकांनी ब्रिटिशांचे हे शोषक धोरण कसे योग्य व भारताचे विकासासंदर्भात महत्त्वाचे होते हे पटवून देण्याचा प्रयत्न केला तर भारतीय विचारवंतानी त्या धोरणाने भारत कसा धुळीला मिळाला याची जाणीव भारतीय समाजाला करून देण्याचा प्रयत्न केला.

**समारोप :-**

भारताच्या स्वयंपूर्ण अर्थव्यवस्थेवर / ग्रामीण जीवनावर आघात करून आर्थिक जीवनाची घडी ब्रिटिशांनी विस्कटवून टाकली. ब्रिटिश हे सुरुवातीस याचक होती ते राज्यकर्ते बनून शोषणाची तीव्रता वाढवून त्यांनी भारताला कसे लुटले हे आपण पाहिले. इंग्लंडमधील बदलांबरोबरच भारतातील आर्थिक शोषणाची पद्धत बदलत गेली. यामुळे 'संपन्न देशातील गरीब लोक ' अशी भारताची अवस्था झाली. व्यापार, महसूल वसुली, प्रशासन, औद्योगिक भांडवलशाही यांच्या माध्यमातून ब्रिटिशांनी भारताला लुटले.

भारतातील आजची स्थिती कशी आहे ? एक म्हणजे भारताची संपत्ती ही आज सर्व लोकसंख्येच्या आवाक्यात असलेली मुलभूत समृद्धी व लोकसंख्या आणखी वाढली तरी तिला पुरेशी अशी सोय आज भारतात आहे. दुसरी गोष्ट म्हणजे भारताची गरिबी – आजही बहुसंख्य जनता दरिद्र आहे. ते इतके दारिद्र्यात आहेत की पाश्चात्य व्यक्तीला माहीत

असलेल्या दारिद्र्याच्या कल्पनेपलीकडील ती दरिद्रता आहे. ह्या दोन अवस्थांतून आजच्या भारताच्या समस्या निर्माण होत आहेत.

आजही भारताचे वेगवेगळ्या मार्गांनी शोषण अमेरीकेसारखे विकसित देश करत आहेत आहेत. भारतातील बी.पी.ओ., के.पी.ओ., खुला व्यापार तत्त्वाखाली उभे राहिलेले मॉल यांच्या माध्यमातून भारताच्या संपत्तीचे वहनच चालू आहे. आजही जागतिक बँकेच्या कर्जाच्या ओझ्याखाली भारत वावरत आहे. काही भ्रष्ट अधिकारी वर्ग जनतेच्या पैशाचा अपव्यय करत आहेत. अशी ही भारताला शोषणाची एक प्रकारची परंपरा प्राचीन काळापासून लाभलेली दिसते.

या सर्व लोकांमधले अतिशय कष्टप्रद त्रास देऊन शोषण करणारे ब्रिटिश ओळखले जातात. भारताला दारिद्र्य आले ते ब्रिटिशांच्या भारतातील आर्थिक धोरणांमुळे. ब्रिटिशांच्या आर्थिक धोरणाची जाणीव झालेल्या दादाभाई, न्या. रानडे, लोकहितवादी,रोमेशचंद्र दत्त यांनी भारतीयांना ती जाणीव करून दिली.

- शोषणाचा दर = अतिरिक्त श्रम / आवश्यक श्रम

या सूत्रानुसार मार्क्सने मांडलेल्या विचारातून भांडवलशाही इंग्लंडने केलेले भारताचे आर्थिक शोषण स्पष्ट होते.

थोडक्यात असे म्हणता येईल की, साधन संपत्तीचा संचय असणारा वर्ग समाजातील साधन संपत्ती नसणाऱ्या वर्गाकडून अवास्तव नफा घेतो व त्यांची पिळवणूक करतो, तेंव्हा त्याला आर्थिक शोषण म्हणता येईल. अशाच प्रकारे वेगवेगळे मार्ग वापरून भारताचे शोषण केले गेले व भारताला विपन्नावस्थेत नेऊन टाकले. या ब्रिटिशांमुळे भारताला आजही मोठ्या प्रमाणावर आर्थिक समस्यांच्या सामना करावा लागत आहे आणि तरीही भारत आज आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण असा देश बनला आहे.

**<u>तळटिपा :-</u>**

1. रजनीपाम दत्त, (अनुवाद : य.ना. देवधर), 'आजकालचा भारत', डायमंड, पुणे, 2006, पृ. 99-100.
2. Bipan Chandra, Amales Tripathi, BarunDe, 'Freedom Struggle', National Book Trust, India, 1972, pp. 55,57.
3. रॉय मॉक्झॅम, सरिता आठवले (अनु.) असा लुटला भारत, मेहता पब्लिशिंग हाऊस,प्रथमावृत्ती, 2023, पुणे,पृ.156.
4. डॉ. अरुण जोशी, प्रा. राजा दीक्षित, नीलिमा ठाकूरदेसाई, ' ब्रिटिश साम्राज्यवाद आणि भारत', नाशिक, 2001, पृ.62.
5. बिपन चंद्र (अनुवाद : श्यामबिहारी राय), ' आधुनिक भारत', एन.सी.ई.आर.टी., नई दिल्ली, 2006, पृ.72.
6. पूर्वोक्त 62.
7. डॉ. एम.एस. जैन, 'आधुनिक भारत का इतिहास', मैकमिलन, नई दिल्ली, 1985, पृ. 198.
8. बिपन चंद्र, 'भारत में आर्थिक राष्ट्रवाद का उद्भव और विकास', मैकमिलन, नई दिल्ली, 1977, पृ. 1.
9. डॉ. सुमन वैद्य, डॉ. शांता कोठेकर, ' आधुनिक भारताचा इतिहास', श्री साईनाथ, नागपूर, 2001, पृ. 278.
10. डॉ. अरुण जोशी, प्रा. राजा दीक्षित, नीलिमा ठाकूरदेसाई, ' ब्रिटिश साम्राज्यवाद आणि भारत', नाशिक, 2001, पृ.63.
11. Bipan Chandra, Amales Tripathi, BarunDe, 'Freedom Struggle', National Book Trust, India, 1972, p. 58.
12. कुमार केतकर, 'कथा स्वातंत्र्याची', महाराष्ट्र पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम सं.मं., पुणे, 2002, पृ. 6.
13. रजनीपाम दत्त, (अनुवाद : य.ना. देवधर), 'आजकालचा भारत', डायमंड, पुणे, 2006, पृ. 28.
14. स. मा. गर्गे (संपा.), ' भारतीय समाज विज्ञान कोश – खंड 1', समाज विज्ञान मंडळ, पुणे, 1986, पृ. 328.
15. डॉ. अरुण जोशी, प्रा. राजा दीक्षित, नीलिमा ठाकूरदेसाई, ' ब्रिटिश साम्राज्यवाद आणि भारत', नाशिक, 2001, पृ.68.

# हैद्राबाद मुक्तीसंग्रामात माणिकचंद पहाडे यांचे योगदान

**विशाल विठ्ठल मोहिते**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

**प्रस्तावना :**

20 व्या शतकात हैद्राबाद संस्थानातील मराठवाड्यातील जनतेची स्थिती कशी होती व त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध माणिकचंद पहाडे यांनी दिलेल्या लढ्या बद्दलचे अल्प स्वरूपात असणारी माहिती याची जाणून करून देणे. तथा तत्कालीन लड्याचे वास्तविक माहिती व लढ्यातील महत्त्व सर्वांसमोर उजागर करणे हैद्राबाद मुक्तिसंग्रामाचे कार्यक्षेत्र हे मोठे असले, तरी त्या लढ्यातील माणिकचंद पहाडे यांचे योगदान तेवढेच मोठे व महत्त्वाचे होते. भारतीय स्वातंत्र्याचा लढा जेवढा महत्त्वाचा होता. तेवढाच लढा हा हैद्राबाद मुक्तिसंग्रामाचा होता भारतातील इतर संस्थाने भारतात विलीन होताना जेवढी जनतेची शोषण व हानी झाली नसेल त्यापेक्षा कित्येक पट हैद्राबाद मुक्तिसंग्रामात हानी झालेले दिसून येते. हैद्राबाद संस्थान भारतात विलीन व्हावे म्हणून अनेकानी आपले प्राण पणाला लावले त्यापैकी मान माणिकचंद पहाडे हे होते परंतु इतिहासात इतिहासकारांनी म्हणावी तशी त्यांच्या कार्याची दखल घेतलेली दिसत नाही. हैद्राबाद मुक्तीसंग्रामात अनेक स्वातंत्र्य सेनानी यांनी महत्त्वपूर्ण कार्य करून एका प्रांताला मुस्लीम राजवटीतून स्वतंत्र करण्याचे महत्त्व पुर्ण कार्य केलेले आहे. त्यामध्ये प्रामुख्याने रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, माणिकचंद पाहडे, भाऊसाहेब वैशंपायन, बाबासाहेब परांजपे, इत्यांदींनी मुस्लीमांच्या वेदनामय अत्याचारातून जनमाणसांना मुक्तीपणे जीवन जगण्यासाठी एक यशस्वी लढा उभारला त्यात त्यांना यश प्राप्त झाले. या हैद्राबाद मुक्ती संग्रामात सर्वांनीच म्हणजे स्वातंत्र्य सेनानी महत्त्वपूर्ण कार्य केले, परंतु त्यात माणिकचंद पहाडे यांनी आपल्या विचार व कार्यांनी लढ्यातील स्वातंत्र्यसेनानींना लढा देण्यासाठी सकारात्मक ऊर्जा दिली. त्यामुळे त्यांच्या विचार आणि कार्याचा ऐतिहासिक घेणे अत्यंत महत्त्वाचा वाटतो.

हैद्राबाद मुक्ती संग्रामात औरंगाबाद मधील माणिकचंद केवलचंदजी पहाडे हे प्रमुख नेते होते त्यांचा जन्म 1998 मध्ये झाला होता. त्यांना लहानपणा पासून वकील व्हायचे होते. त्यांचे सुरुवातीचे शिक्षण नांदगावला 9 वी पर्यंत घेतल्या नंतर एक वर्ष पुण्यात शिक्षण घेण्यासाठी गेले नंतर औरंगाबादला 1922-1923 मध्ये आल्यावर ते ऊर्दू शिकले व वकिलीची परीक्षा देऊन वकील झाले. माणिकचंद पहाडे हे पहिल्या सत्याग्रही तुकडीचे नेते होते.

**महत्त्वाचे शब्द :** हैद्राबाद मुक्ती संग्राम, स्वातंत्र्यसेनानी, विचार व कार्य.

**उद्दिष्टये:**

1. हैद्राबाद मुक्तीसंग्रामातील माणिकचंद पहाडे यांची भुमिका व योगदान समजुन घेणे.
2. माणिकचंद पहाडेंच्या योगदानाचा आधुनिक काळातील सामाजिक परिवर्तनावर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती :**

माणिकचंद पहाडे एक व्यक्ती आणि विचार या संशोधनासाठी ऐतिहासिक व विश्लेषणात्मक अशा पद्धतीचा वापर करण्यात येणार असून त्यासाठी विसाव्या शतकातील मूल संदर्भ साधने पुस्तके, वर्तमानपत्रे, मासिके, भाषणे, पुराभिलेखागार साधने अभ्यासले जातील. तसेच मुलाखतीचाही समावेश केलेला आहे.

1930 नंतर समाजात जागृती होण्यास सुरुवात झाली होती. मराठवाड्यातील प्रजा ही निजाम सरकाराच्या हुकूमाचे पालन करण्यास तयार होत नसे त्यांचे आदेशाचे पालन करेना झाली.उदा.शेतसारा देण्यास विलंब करणे किंवा न दीने, पोलीस व रजाकारांशी वाद घालाने या सारख्या अनेक घटना वाढत चालले होत्या ही स्थिती निजाम सरकारच्या हातातून बाहेर जाऊ नये, म्हणून दडपशाही सुरू केली. यामुळे अनेक स्वातंत्र सैनिक निजाम सरकारच्या विरोधात उभे राहिले. मराठवाड्यातील औरंगाबाद जिल्ह्यातील सुरुवातीतील काही सर्वात महत्त्वाचे नेत्यापैकी माणिकचंद पहाडे हेही होते. औरंगाबाद येथील जनसामान्यांचा मोठा प्रमाणात सहकार्य प्राप्त होते. औरंगाबाद येथील जनता त्यांना भाऊसाहेब म्हणत असे माणिकचंद पहाडे यांच्या धर्मनिरपेक्ष वागणूकीमुळे व उच्च नीतिमत्ता यामुळे हिंदू व मुस्लिम या दोन्ही समाजातील लोक त्यांचा आदर करत असत.

विणकारांच्या प्रश्नासाठी हैद्राबाद येथे मोर्चा नेण्याचे ठरवले, तसेच लेवीसंबंधी शेतकऱ्यांच्या मोर्चा ही हैद्राबाद येथे नेण्याचे ठरवले होते हा मोर्चा हैद्राबाद मध्ये शांततेत व शिस्तबद्ध पद्धतीने करण्यात आला व मोर्चाच्या वतीने शिष्टमंडळांनी संबंधित अधिकारी व मंत्री यांच्याशी भेटी घेतल्या त्या शिष्टमंडळमध्ये माणिकचंद पहाडे यांचा समावेश होता. विणकरी व शेतकरी यांच्या मोर्चा हैद्राबादला जाऊन आल्यानंतर निजाम सरकार सावध झाली होती. निजामान सरकारने मराठवाड्यातील प्रमुख नेत्यां वरती कारवाया करण्यासाठी अहवाल तयार केला त्यात औरंगाबाद मधून पहाडे यांचा समावेश होता यावरून आपणाला समजते की तत्कालीन परिस्थितीत माणिकचंद पहाडे यांचा मराठवाडा मुक्ती संग्रामात सहभाग मोठ्या प्रमाणात होता. 1930 पासून औरंगाबाद मधील प्रत्येक सामाजिक कार्यात पहाडे हे केंद्रभागी असत. त्यांच्यामध्ये अभ्यासू वृत्ती, उत्कृष्ट व्यक्तिमत्व, धाडसी स्वभाव स्पष्ट वक्ते भडकाऊ भाषणापेक्षा तर्कसंगत मुद्द्यावर सभेला व विरोधकांना आपल्या विचारांशी सहमत करून घेत असत. जेव्हा दलितांची सावली ही उच्चभ्रू समाज टाळत असे त्या काळात ते दलित वस्तीत जात त्यांच्यात मिसळत असे त्यांची भांडणे मिटवीत असे ढोरवड्यात त्यांनी रात्र शाळा सुरू केली. या रात्री शाळेत लहान मुले मुली स्त्री पुरुष यांना अक्षर ज्ञान करून देण्यास सुरुवात केली होती.

औरंगाबाद येथे 1938 मध्ये जो पहिला सत्याग्रह झाला त्याचे प्रमुख हे माणिकचंद पहाडे हे होते. पहिला सत्याग्रह होण्याच्या वेळेला ते नांदगावला असल्याने ते औरंगाबाद मध्ये प्रवेश करू नये म्हणून त्यांना शहरात बंदी घालण्यात आली होती. परंतु कुठल्याही शिक्षेची प्रवाह न करता काही सहकार्याच्या मदतीने ते औरंगाबादला आले व सत्याग्रह केला सत्याग्रह केल्यामुळे त्यांना व त्यांच्या सहकाऱ्यांना शिक्षा भोगावी लागली होती.

दुसरा सत्याग्रह 7 ऑगस्ट 1947 ला झाला होता स्वामीजींच्या आदेशावरून माणिकचंद पहाडे यांना या सत्याग्रही म्हणून निवडले त्यांच्यावर सरहद बंदी असतानाही त्यांनी गुलमंडी येथे चौकात येऊन महात्मा गांधी की जय, हैद्राबाद स्टेट काँग्रेस जिंदाबाद व पत्रक वाचण्यास सुरुवात केली त्यावेळीला निजामाच्या पोलिसांनी व रजाकारांनी त्यांना अमानुषपणे मारहाण केली, जनतेवरही लाठीचार्ज केला. ब्रिटिशांन पासून भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर हैद्राबाद संस्थानात जे स्वातंत्र्यासाठी वारे वाहू लागले त्याला रोखण्यासाठी हे निजामाने रजाकाराच्या सहाय्याने जनतेवर अन्याय अत्याचार सुरू केले. यामुळे माणिकचंद पहाडे अनेक पत्रे काँग्रेसच्या नेत्यांना पाठवून येथील जनतेवर होत असलेल्या अन्यायाची माहिती दिली होती.

भारत सरकारने काही दिवसांनी पोलीस कारवाई (ॲक्शन) केल्यानंतर हे जमाने भारत सरकारकडे विनाअट सरनगती पत्कारली व भारतात विलीन होण्यास तयारी दर्शवली. हैद्राबाद संस्थानातील जनता ही निजाम व रझाकार अन्याय अत्याचार यांच्यापासून मुक्त झाली. निजमाने आत्मसमर्पण केल्यानंतर दोन वर्ष या हैद्राबाद संस्थानात सिव्हिल प्रशासन राहिले व चार वर्षांनी म्हणजेच 1952 मध्ये मदत मतदार संघ निर्माण करून विधानसभा अस्तित्वात आली. पोलीस कार्यवाही नंतर स्वामीजींच्या हाताने माणिकचंद पहाडे यांचा सत्कार करण्यात आला. औरंगाबाद शहरात भव्य मिरवणूक काढण्यात आली होती. बाबुराव जाधव व इतर कार्यकर्त्यांनी मिळून समाजातून पैसा गोळा करून स्वामी ज्याच्या हस्ते तो माणिकचंद पहाडे यांना देण्यात आला, होता तसेच सार्वत्रिक निवडणुकीच्या अगोदर त्यांना फोर्ड कंपनीची काळी गाडी गिफ्ट करण्यात आली होती. माणिकचंद पहाडे हे औरंगाबाद ग्रामीण मधील फुलंब्री मतदारसंघातून आमदार म्हणून निवडून आले होते. आमदार झाल्यानंतर त्यांनी अनेक जनतेच्या समस्या सरकार समोर मांडल्या व आमदार झाल्यानंतर दोन वर्षांनी त्यांना पेरेलिसिसहा आजार झाला आणि 1955 ला त्यांचा मृत्यू झाला.

**संदर्भसूची :**

1. हैद्राबाद मुक्तिसंग्राम आणि मराठवाडा- आनंद भालेराव
2. हैद्राबाद मुक्तिसंग्रामातील- माणिक अनिल पहाडे
3. मराठवाडा मुक्ती संग्रामाचा मूलनायक- अनिल पहाडे
4. हैद्राबाद मुक्तिसंग्रामातील आठवणी- वि पा देऊळगावकर
5. महाराष्ट्र शासन स्वातंत्र्य- सैनिक चरित्रकोश
6. स्वतंत्र सैनिक समिती जीवावर उदार औरंगाबाद जिल्ह्याचा लढा स्वातंत्र्यसैनिक समिती
7. गोविंद भाई फ्रॉक गौरव ग्रंथ-दिनकर बोरीकर

# भारतीय ज्ञान प्रणालीची ओळख

**डॉ. प्रभाकर मिरकड**
सहयोगी प्राध्यापक तथा विभागप्रमुख
इतिहास विभाग, मोरेश्वर महाविद्यालय, भोकरदन

भारतीय ज्ञान प्रणालीची परंपरा समृद्ध, वैविध्यपूर्ण आणि भारताच्या संस्कृती, तत्त्वज्ञान आणि इतिहासात खोलवर रुजलेली आहे. या ज्ञान प्रणालीने हजारो वर्षापासून भारतीयांच्या जीवनाला व्यापलेले आहे. त्यात तत्त्वज्ञान, विज्ञान, गणित, खगोलशास्त्र, औषध, साहित्य, कला आणि अध्यात्म यासह विविध विषयांचा समावेश आहे. भारतीय ज्ञान परंपरेतील काही प्रमुख पैलूंचा उहापोह संक्षिप्त स्वरुपात येथे करत आहे.

**1. वैदिक ज्ञान**

भारतीय ज्ञानाचा पाया वेदांमध्ये आहे, भारतातील सर्वात प्राचीन धर्मग्रंथ, ज्यात शाश्वत ज्ञान आहे असे मानले जाते. या ग्रंथांमध्ये ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद यांचा समावेश होतो. ते प्रामुख्याने दैवी संकल्पना, विधी, नैतिकता आणि अस्तित्वाचे स्वरूप यांच्याशी संबंधित आहेत.

- उपनिषद: हे ग्रंथ आत्म (आत्मा), विश्व (ब्रह्म) आणि वास्तवाचे स्वरूप याबद्दल सखोल तात्विक चर्चा करतात.
- भगवद्गीता: यामध्ये प्रमुख तात्विक विवेचन केलेले आहे, भगवद् गीतेत कर्तव्य, नीतिमत्ता आणि आत्म-साक्षात्कार या तत्त्वांचा समावेश होतो.

**2. तत्वज्ञानाच्या प्रणाली (मार्ग)**

भारतीय तत्त्वज्ञान प्रणाली वैविध्यपूर्ण आहे आणि त्यात अनेक विचारांच्या शाखांचा समावेश आहे, प्रत्येक अस्तित्व, स्वत: आणि विश्वाच्या स्वरूपावर अद्वितीय दृष्टीकोन देते. काही प्रमुख शाखांचा समावेश खालीलप्रमाणे

- **वेदांत**: वास्तविकतेच्या अंतिम स्वरूपावर आणि आत्मा आणि ब्रह्म यांच्यातील संबंधांवर लक्ष केंद्रित करते.
- **सांख्य:** भौतिक जगाला (प्रकृती) चेतनेपासून (पुरुष) वेगळे करणारे द्वैतवादी तत्त्वज्ञान.
- **योग:** वैयक्तिक परिवर्तन आणि मुक्तीसाठी एक प्रणाली, शिस्त आणि ध्यान यावर जोर देते.
- **न्याय:** तर्कशास्त्र आणि ज्ञानशास्त्राची शाखा जी ज्ञान आणि तर्काच्या स्वरूपाची तपासणी करते.
- **मीमांसा**: एक शाखा जी वैदिक विधी आणि ग्रंथांचा अभ्यास आणि व्याख्या यावर भर देते.

**3. गणित आणि खगोलशास्त्र**

- **शून्य:** आधुनिक गणिताचा एक मूलभूत घटक असलेल्या शून्य या संकल्पनेचा शोध लावण्याचे श्रेय भारताला जाते.
- **दशांश प्रणाली:** स्थान-मूल्य दशांश संख्या प्रणाली भारतात विकसित झाली आणि नंतर जगामध्ये पसरली.
- **खगोलशास्त्र:** आर्यभट्ट आणि वराहमिहिरासारख्या प्राचीन भारतीय खगोलशास्त्रज्ञांनी सूर्यकेंद्रित विश्वाची संकल्पना आणि ग्रहांच्या गतीची अचूक गणना यासह महत्त्वपूर्ण योगदान दिले.

**4. आयुर्वेद**

आयुर्वेद ही एक प्राचीन औषध प्रणाली आहे जी शरीर, मन आणि आत्मा यांच्यातील संतुलनावर जोर देते. हे शरीराच्या तीन दोषांमध्ये (वात, पित्त आणि कफ) सामंजस्य असल्यास आरोग्य प्राप्त होते या विश्वासावर आधारित आहे आणि त्यात नैसर्गिक उपाय, आहार आणि जीवनशैलीतील बदल समाविष्ट आहेत.

**5. भाषाशास्त्र आणि व्याकरण**

भारतीय विद्वानांनी, विशेषत: पाणिनी यांनी भाषाशास्त्राच्या अभ्यासात महत्त्वपूर्ण योगदान दिले. पाणिनीचे अष्टाध्यायी हे संस्कृत व्याकरणावरील सर्वसमावेशक कार्य आहे, जे आधुनिक भाषिक विश्लेषणाचा पाया तयार करते.

**6. साहित्य आणि कला**

- भारतीय साहित्य, विशेषत: संस्कृत, तमिळ आणि इतर भाषांमध्ये, महाकाव्ये, नाटके आणि कवितांची व्यापक परंपरा आहे.
- महाभारत आणि रामायण: दोन सर्वात महत्त्वाची महाकाव्ये ज्यात धर्म (कर्तव्य), नीतिशास्त्र आणि विश्वविज्ञान याबद्दलचे ज्ञान आहे.
- संस्कृत नाटक आणि कविता: कालिदास (उदा. शाकुंतल) सारख्या कवींच्या कृतींना शास्त्रीय साहित्याचा उत्कृष्ट नमुना म्हणून ओळखले जाते.
- शास्त्रीय नृत्य आणि संगीत: भारतामध्ये वेगवेगळ्या कलांची समृद्ध परंपरा आहे, जी देशाच्या आध्यात्मिक आणि सांस्कृतिक जीवनाशी खोलवर जोडलेली आहे.

**7. गुरु-शिष्य परंपरा**

भारतीय परंपरेत, ज्ञानाचा प्रसार बहुतेक वेळा गुरु-शिष्य (शिक्षक-विद्यार्थी) संबंधांद्वारे केला जातो, जो अनुभवात्मक शिक्षण आणि शिक्षकाच्या वैयक्तिक मार्गदर्शनावर भर देतो. गुरू केवळ बौद्धिक ज्ञानच देत नाहीत तर त्यांच्या शिष्यांना नैतिक आणि आध्यात्मिक विकासासाठी मार्गदर्शनही करतात.

**8. पारंपारिक हस्तकला आणि वास्तुकला**

भारतीय ज्ञान प्रणाल्यांमध्ये कापड, मातीची भांडी, शिल्पकला आणि वास्तुकला यासह विविध प्रकारच्या कारागिरीचा समावेश होतो.

- **वास्तुशास्त्र:** स्थापत्यशास्त्राचे एक प्राचीन भारतीय विज्ञान जे मानवी वस्ती आणि सभोवतालचे वातावरण यांच्यातील सुसंवादावर भर देते.
- **कारागिरी:** कापड कला (जसे की विणकाम आणि भरतकाम), धातूकाम आणि मातीची भांडी यातील उत्कृष्टतेचा भारताचा दीर्घ इतिहास आहे.

**9. आंतरविद्याशाखीय दृष्टीकोन**

भारतीय ज्ञान प्रणाली सामान्यत: आंतरविद्याशाखीय दृष्टिकोनाद्वारे दर्शविली जाते, जिथे तत्त्वज्ञान, विज्ञान, कला आणि अध्यात्म यांना वेगळे म्हणून पाहिले जात नाही, परंतु समजून घेण्याचे एकमेकांशी जोडलेले क्षेत्र म्हणून पाहिले जाते. योग आणि आयुर्वेद यांसारख्या क्षेत्रांतील अध्यात्मिक पद्धतींसह विज्ञानाच्या संश्लेषणात आणि कला, साहित्य आणि तात्विक कल्पना यांच्यातील संबंधात हा दृष्टिकोन दिसून येतो.

**10. आधुनिक रूपांतर**

भारतीय ज्ञान व्यवस्थेने शतकानुशतके सतत नवीन कल्पनांचा स्विकार, रुपांतरण आणि संवर्धन एकत्रित केले आहे. उदाहरणार्थ, इंडो-इस्लामिक कालखंडात, भारतीय विद्वानांनी ग्रीक, पर्शियन आणि भारतीय ज्ञान एकत्र केले, ज्यामुळे खगोलशास्त्र, गणित आणि वास्तुकला यासारख्या क्षेत्रांमध्ये प्रगती झाली. आधुनिक काळात, भारतीय विद्वान आणि विचारवंतांनी जागतिक बौद्धिक परंपरांमध्ये योगदान दिले आहे.

सारांश, ज्ञानाची भारतीय परंपरा ही विशाल, व्यापक आणि खोलवर आध्यात्मिक आहे, जी स्वत:ची, विश्वाची आणि सर्व प्रकारच्या जीवनाची परस्परसंबंधाची समग्र समज देते. हे बौद्धिक अन्वेषण आणि आध्यात्मिक पद्धतींद्वारे संतुलन, नैतिक जीवन आणि शहाणपणाचा शोध यावर जोर देते.

**संदर्भ :**

1. The Upanishads by Eknath Easwaran

2. Bhagavad Gita: A New Commentary by Eknath Easwaran
3. Indian Philosophy Vol. I & II by Sarvepalli Radhakrishnan
4. Mathematics in India by Kim Plofker
5. Charaka Samhita (translated by R.K. Sharma & Bhagwan Dash)
6. The Complete Works of Sushruta by K. D. Trivedi
7. Aryabhatiya by Aryabhata (translated by K. S. Shukla)
8. The Nyaya Philosophy by Kisor Kumar Chakrabarti
9. Indian Art and Architecture by V. S. Agrawala
10. The Arthashastra by Kautilya (translated by L.N. Rangarajan)
11. The Yoga Sutras of Patanjali by Swami Sivananda
12. Indian Environmental Philosophy by D. P. Chattopadhyaya

# वारकरी संप्रदायाचे समाजातील योगदान

**डॉ. शिला सखाराम सहाने**
वसंतराव नाईक महाविद्यालय, छ. संभाजीनगर

प्रस्तावना :

वारकरी संप्रदाय हा महाराष्ट्रातील एक महत्त्वाचा भक्तिसंप्रदाय आहे. याचा उगम संतपरंपरेमध्ये असून, हा संप्रदाय मुख्यतः भगवान विठ्ठलाच्या भक्तीभोवती केंद्रित आहे. या संप्रदायाच्या माध्यमातून समाजात भक्ती, सदाचार, समता आणि सामाजिक एकात्मता यांचे संदेश पसरवले गेले. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, संत एकनाथ यांच्या विचारांनी हा संप्रदाय अधिक बळकट झाला. वारकरी संप्रदाय केवळ धार्मिक प्रवाह नसून, समाजसुधारणा आणि लोकशिक्षण यामध्येही महत्त्वाची भूमिका बजावतो. वारकरी संप्रदायाची स्थापना संत ज्ञानेश्वर आणि संत नामदेव यांनी १३व्या शतकात केली. पंढरपूरच्या विठोबा भक्तीच्या माध्यमातून समाजात भक्तिपंथ रुजवण्याचे कार्य त्यांनी केले. हे संप्रदाय लोकाभिमुख असून, "माझे माहेर पंढरी" असे म्हणून लाखो वारकरी आजही दरवर्षी आषाढी एकादशीला वारी करत पंढरपूरला जातात. महाराष्ट्रातील संतांनी समाजातील जातीभेद, अंधश्रद्धा, अन्याय यांना विरोध करून लोकशिक्षणाचा कार्यभाग हाती घेतला आणि समाजात भक्तीमार्गाचा प्रचार केला.

**उद्दिष्टे (Objectives) :**

1) वारकरी संप्रदायाचा मूळ उद्देश आणि तत्त्वज्ञान समजून घेणे.
2) वारकरी संप्रदायाचा तत्कालीन समाजातील योगदानाचा अभ्यास करणे.

वारकरी संप्रदायाचा उगम १२व्या ते १३व्या शतकाच्या दरम्यान झाला. त्या काळात भारतात भक्तिसंप्रदायाचा प्रभाव वाढत होता. महाराष्ट्रातही या चळवळीचा प्रभाव दिसून येतो. संत ज्ञानेश्वर (१२७५-१२९६) हे वारकरी संप्रदायाचे पहिले महत्त्वाचे संत मानले जातात. त्यांनी भगवद्गीतेवर "ज्ञानेश्वरी" हा सोप्या मराठीत ग्रंथ लिहिला."हरिपाठ" व "भक्तिमार्ग" यांना त्यांनी विशेष महत्त्व दिले. त्यांच्या विचारांनी वारकरी संप्रदायाचा पाया रचला. १३व्या शतकात संत नामदेव (१२७०-१३५०) यांनी वारकरी संप्रदायाचा प्रचार महाराष्ट्राबाहेर पंजाबपर्यंत केला. त्यांनी विठोबाच्या भक्तीला समाजसुधारणेशी जोडले. त्यांचे काही अभंग गुरू ग्रंथसाहिब मध्ये समाविष्ट आहेत. १६ व्या शतकात, संत एकनाथांनी (१५३३-१५९९) संस्कृत ग्रंथांचा मराठीत अनुवाद करून लोकांना समजेल असे साहित्य तयार केले. त्यांनी समाजातील अनिष्ट प्रथांवर टीका केली आणि लोकांमध्ये समतेचा संदेश दिला. तसेच "एकनाथी भागवत" हा प्रसिद्ध ग्रंथ त्यांनी लिहीला. १७व्या शतकात, संत तुकाराम (१६०८-१६४९) हे वारकरी संप्रदायातील सर्वांत लोकप्रिय संत मानले जातात. त्यांनी "तुकाराम गाथा" लिहून भक्तीमार्ग सोप्या भाषेत लोकांसमोर मांडला. त्यांनी ज्ञानेश्वरांच्या विचारांना अधिक दृढतेने पुढे नेले आणि अभंगाच्या माध्यमातून समाजप्रबोधन केले. संत जनाबाईंनी स्त्री-शक्तीचा संदेश दिला तर संत चोखामेळा यांनी समाजात समानतेचा संदेश दिला. त्याप्रमाणे, सावता माळी, संत नरहरी सोनार यांसारख्या संतांनी वारकरी संप्रदाय अधिक व्यापक केला. संतांचे योगदान वारकरी संप्रदायात अत्यंत महत्त्वपूर्ण असून, त्यांच्या कार्यातून या संप्रदायाचा मोठ्या प्रमाणात विकास व प्रसार झाला आणि वारकरी संप्रदाय जनसामान्यांपर्यंत पोहोचला.

वारकरी संप्रदायाचा मुख्य उद्देश भक्तीमार्गाच्या माध्यमातून समाजात समता, बंधुता आणि शांती प्रस्थापित करणे हा आहे. भगवान विठोबाच्या भक्तीत एकरूप होऊन मोक्षप्राप्ती करणे हे या संप्रदायाचे अंतिम ध्येय आहे. मात्र, हा संप्रदाय केवळ वैयक्तिक मुक्तीवर भर देत नाही, तर संपूर्ण समाजाचे कल्याण साधण्यावर त्याचा विशेष भर आहे.

**वारकरी संप्रदायाचा मुख्य उद्देश :**

1) जातीभेद, वर्णभेद यांचे निर्मूलन करून समतेचा प्रसार करणे.
2) अहिंसा, सत्य, प्रेम आणि करुणा या तत्वांचा प्रचार करणे.
3) लोकशिक्षण व नैतिकतेचा प्रसार करणे.
4) संतवाणीच्या माध्यमातून साध्या भाषेत ईश्वरभक्ती व आध्यात्मिक विचार जनसामान्यांपर्यंत पोहोचवणे.

5) वारी व भजन-कीर्तन यांसारख्या परंपरांमधून एकात्मतेचा संदेश देणे.

**वारकरी संप्रदायाचे तत्त्वज्ञान :**

वारकरी संप्रदाय हा संतपरंपरेवर आधारित असून, त्यांनी भक्तिमार्गाचा स्वीकार केला आहे. या संप्रदायाचे तत्त्वज्ञान मुख्यतः संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत तुकाराम, संत एकनाथ यांच्या विचारांवर आधारलेले आहे. वारकरी संप्रदायात ज्ञानेश्वरी, तुकाराम गाथा, अभंग संग्रह हे ग्रंथ महत्त्वाचे मानले जातात. यामध्ये भगवंताच्या भक्ति आणि सत्संगाचे महत्त्व सांगितले आहे. "नामस्मरण" हे या संप्रदायाचे महत्त्वाचे साधन आहे. "राम कृष्ण हरी" किंवा "विठ्ठल नाम" सतत उच्चारणे म्हणजे ईश्वरभक्तीचा सर्वोत्तम मार्ग मानला जातो.

वारकरी संप्रदायात कोणताही जातिभेद मान्य नाही. संत तुकाराम म्हणतात, "एकताचि धर्म | भक्ति एक सोडू नये ||" याचा अर्थ समाजातील सर्वजण समान आहेत, आणि ईश्वरभक्ती हेच खरे जीवनाचे ध्येय आहे. वारकरी संप्रदाय हा अहिंसेचा पुरस्कार करतो. कोणत्याही प्रकारचा हिंसाचार, द्वेष, वैरभाव यांना संप्रदायात स्थान नाही. मेहनतीने जगणे, सत्कर्म करणे आणि त्याचवेळी ईश्वरस्मरण करणे हा वारकरी संप्रदायाचा मूलमंत्र आहे.

यादव काळात वैदिक धर्म खिळखिळा झाला होता. समाजातील यज्ञयाग, कर्मकांड, व्रतवैकल्ये, मंत्रतंत्र, चातुर्वर्ण्यव्यवस्था यांमुळे सर्वसामान्य जनता त्रस्त झाली होती. त्या वेळी बौद्ध, जैन धर्मांबरोबर महानुभाव संप्रदाय, वीरशैव, नागेश संप्रदायांबरोबर वारकरी संप्रदाय उदयास आला. वारकरी संप्रदाय यादवपूर्व काळात उदयास आला होता; परंतु यादव काळात या संप्रदायाचे पुनरुज्जीवन करण्यात आले. वारकरी संप्रदाय बहुजनांचा धर्मसंप्रदाय होता. त्याचे प्रेरणास्थान 'विठ्ठल' होते. या संप्रदायाचा पाया रचण्याचे काम 'ज्ञानेश्वरांनी' केले. या संप्रदायाची परंपरा प्राचीन असली; तरी या परंपरेला उजाळा ज्ञानेश्वरांनी दिला. त्यांनी वारकरी संप्रदायाची तत्त्वज्ञानाशी सांगड घालून तत्कालीन रूढी, परंपरा व कर्मकांडाचा विरोध करून भक्तिमार्गाचा स्वीकार केला. या संप्रदायात अठरा पगड जातींचे संत होऊन गेले. ज्ञानेश्वर, एकनाथ, नामदेव, तुकाराम, परीसा भागवत, नरहरी सोनार, चोखा मेळा, गोरा कुंभार, संत जनाबाई, जोगा परमानंद, सावता माळी, सेना न्हावी इ. अनेक संतांनी आपल्या अंभगांतून व कीर्तनातून दया, क्षमा, शांती या तत्त्वांचा उद्घोष केला. वारकरी संप्रदायाने जनसामान्यांना उपासनेचा सर्वांत सोपा मार्ग म्हणजे नामस्मरण आणि कीर्तन हा सांगितला. वारकरी संप्रदाय हा महाराष्ट्रातला सर्वांत मोठा संप्रदाय होता. त्याच्या अनुयायांची संख्या विपुल असून, ते महाराष्ट्रभर विखुरलेले होते. नामस्मरण व संकीर्तन यांचा सोपा मार्ग समाजाला ज्ञानदेव - नामदेवांनी दाखविला आणि सर्व जाती-जमातींच्या लोकांना, पुरुषांना नि सर्वसामान्य माणसाने भक्तिमार्गाचा पुरस्कार केला. यज्ञयाग, अनुष्ठान, हठयोग इ.चा त्याग करून, सोप्या अशा भक्तिमार्गाने धर्मप्रबोधन वारकरी संप्रदायाने घडवून आणले. तसेच कर्मकांड, व्रतवैकल्य यांच्यापासून जनसामान्यांना परावृत्त करून, पंढरपूरचा विठ्ठल हा एकच देव मानून 'एकेश्वरवादाची संकल्पना' रूढ करण्याचा प्रयत्न केला. महाराष्ट्रात कीर्तन परंपरेचा पाया नामदेवांनी रचला. भक्ती ही केवळ अभिजनांसाठी नाही तर बहुजनांसाठी आहे, हे भान व आश्वासन मराठी माणसाला कीर्तनातून मिळाले. वारकरी संप्रदायात नवचैतन्य संतांच्या कार्याने आले.

ज्ञानेश्वर व नामदेवांनंतर वारकरी संप्रदायाचे कार्य तुकारामांनी यशस्वीरीत्या पुढे नेण्याचे काम केले. डॉ. यू.म. पठाण तुकारामांच्या कार्याविषयी 'आठव ज्ञानदेवाचा, ज्ञानदेवीचा' या ग्रंथात म्हणतात, "तुकोबांनी जनसामान्यांची सुखदुःखे भोगली. ती सहन केली. रात्रंदिन युद्धाचे प्रसंग अनुभवले होते. त्यामुळे त्यांच्या वाणीला एक वेगळी धार आली होती." ज्ञानेश्वरांनी दिलेल्या सामाजिक योगदानातून मोठ्या प्रमाणात सामाजिक प्रबोधनाचे कार्य घडून आले. स्वधर्माची, आपल्या अस्मितेची जाणीव ज्ञानदेवांनी समाजाला करून दिली आणि अनेकदैववाद, कर्मकांड, बाह्याचाराचे बंड मोडून काढून त्यांनी समाजाला पावित्र्याची, शुचितेची, एकेश्वरवादाची, खऱ्या अर्थाने धर्माची शिकवण दिली. समाजातील पाखंडी लोकांवरही ज्ञानेश्वरांनी टीका केली. वारकरी संप्रदायामध्ये संत एकनाथांचे कार्यही उल्लेखनीय आहे. नाथांनी तत्कालीन स्थितीचे सूक्ष्म अध्ययन करून भारुडांच्या माध्यमातून समाजप्रबोधन घडवून आणले. नाथांचे जनसामान्यांसोबत अतूट नाते होते. नाथांच्या भारुडांचे विषय हे बहुविध होते. त्यांनी जनसामान्यांना न्याहाळलेच नाही तर त्यांच्या जीवनातील अनेकविध छटाही बारकाईने टिपल्या.

जनसामान्यांच्या लौकिक अनुभव विश्वाचे रूपांतर पारलौकिक अनुभवविश्वात करण्यासाठी नाथांनी लोकभाषेचा स्वीकार करून; तसेच लोककलांचे माध्यम पत्करले. सामान्य जनांसोबत जवळीक त्यांना साधता आली. या जवळिकीने

केवळ अभिव्यक्तीचाच प्रश्न सुटला असता, म्हणून नाथांनी जनसामान्यांचे अनुभवविश्वच आपल्या भारुडांच्या आशयासाठी विषय म्हणून निवडले. त्यामुळे नाथांच्या भारुडांनी जनसामान्यांवर मोहिनी घातल्यामुळे जनसामान्यांचे व नाथांचे अतूट नाते निर्माण झाले. मराठवाड्यातील विविध संतांनी समाजातील जातीयता, उच्चनीचता, वर्णभेद, अनिष्ट रूढी, परंपरा, विषमता, यज्ञयाग व बुवाबाजीपणा इ. मध्ये अडकलेल्या समाजाला बाहेर काढून, समताधिष्ठित वारकरी समाज तयार करण्याचा प्रयत्न केला. ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी लिहून सर्वांना भुरळ पाडली. परस्परप्रेम व सहकार्याने, सर्वांच्या हातून सत्कार्य घडावे, दुर्गुणांचा नाश करून परमेश्वरभक्ती करावी. तसेच समन्वय व समतावादी दृष्टिकोन निर्माण करून समाजात समता निर्माण व्हावी, असा संदेश ज्ञानेश्वरांनी 'ज्ञानेश्वरी'मधून दिला. नामदेवांनी कीर्तनाच्या माध्यमातून तर एकनाथांनी भारूडांमधून समाजातील सर्व थरांतील जनमानसांचे लक्ष वेधून, समाजप्रबोधन केले. त्यानंतर हे कार्य तुकाराम व अन्य संतांनी पुढे चालू ठेवले.

वारकरी संप्रदायाचे समाजातील योगदान :

1) समतावादी विचारसरणी –

वारकरी संप्रदायाने जातीभेद, वर्णभेद आणि उच्च-नीचतेच्या संकल्पनांना विरोध केला. संत तुकारामांनी "जो जे वांच्छील, तो ते लाहो" असा संदेश दिला, तर संत एकनाथांनी अस्पृश्यांना देखील मंदिरप्रवेशाचा हक्क मिळवून दिला. वारकरी संप्रदायाच्या तत्त्वज्ञानात सर्वांना समान स्थान आहे. ते केवळ ब्राह्मण किंवा उच्चवर्णीयांसाठी मर्यादित नव्हते, तर शूद्र, अस्पृश्य, स्त्रिया यांना देखील वारकरी संप्रदायाने आत्मसात केले. संत नामदेव हे शिंपी समाजातील होते, संत तुकाराम हे कुणबी समाजातील होते, संत चोखामेळा हे महार समाजातील होते. यावरून वारकरी संप्रदायाची समताधिष्ठित मूल्यव्यवस्था दिसून येते. वारी हा या संप्रदायाचा महत्त्वाचा भाग आहे. लाखो वारकरी दरवर्षी आषाढी आणि कार्तिकी एकादशीला पंढरपूरला जातात. या वारीमुळे सामाजिक एकात्मता निर्माण होते आणि समता, भक्ती व सहिष्णुतेचा संदेश पसरतो.

२) स्त्रीशिक्षण आणि स्त्रीसन्मान –

वारकरी संप्रदायात स्त्रियांनाही महत्त्व होते. संत जनाबाई, बहिणाबाई यांनी आपल्या अभंगांच्या माध्यमातून स्त्रीशक्तीचे महत्त्व मांडले. बहिणाबाईंच्या रचनांमधून स्त्रीला मिळालेली सामाजिक प्रतिष्ठा स्पष्ट होते. त्यांनी समाजात स्त्रीला पुरुषांच्या बरोबरीने स्थान मिळावे, असा विचार मांडला. त्यामुळे स्त्रियांना शिक्षण आणि धार्मिक, सामाजिक स्तरावर समान हक्क मिळवून देण्याचे कार्य झाले.

३) लोकशिक्षण आणि प्रबोधन –

ज्ञानेश्वरांनी भागवतधर्माचा प्रचार करून लोकांमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण केली. संतांनी साध्या, सोप्या मराठीत अभंग, ओवी आणि भारुडे यांसारख्या लोककाव्यरचना करून जनतेपर्यंत अध्यात्म आणि समाजसुधारणा पोहोचवली. संतांनी कठीण संस्कृत भाषेतील वेद आणि उपनिषदांचा गूढार्थ सामान्य माणसाला समजेल अशा मराठीत सांगितला. त्यामुळे वारकरी संप्रदाय हा जनसामान्यांसाठी अधिक सहज आणि सुलभ ठरला आहे.

४) अहिंसा आणि मानवतावाद –

वारकरी संप्रदायाने अहिंसेचा पुरस्कार केला. "विठोबाची भक्ती हाच धर्म" असे सांगत त्यांनी समाजातील संघर्ष, हिंसा आणि भेदभाव दूर करण्याचा प्रयत्न केला. संत तुकारामांनी स्पष्ट सांगितले "आम्हां घरी धन शब्दांचीच रत्ने, शब्दांचीच शस्त्रे यु‌द्धे करू" वारकरी संप्रदायाने कधीही कोणत्याही स्वरूपाचा हिंसाचार केला नाही.

५) सर्वसामान्य जनतेचा आधार –

वारकरी संप्रदाय हा मुख्यतः शेतकरी, कष्टकरी आणि मध्यमवर्गीय समाजातील लोकांनी स्वीकारलेला आहे. यामुळे समाजातील परिश्रमाचे महत्त्व वाढले आणि धार्मिक सहिष्णुता निर्माण झाली.वारकरी संप्रदायाने श्रमाचे महत्त्व अधोरेखित केले. "कुडा मांडिला भुईवरती, तोचि श्रीहरी" असे संत तुकारामांनी सांगून श्रमाला ईश्वरतुल्य मानले. त्यामुळे शेतकरी, कष्टकरी समाजाला या संप्रदायातून एक नवी प्रेरणा मिळाली.

वारकरी संप्रदायाच्या अभंगांमधून भक्ती, तत्त्वज्ञान आणि सामाजिक संदेश दिले गेले. कीर्तन आणि हरिपाठ यांचा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनावर मोठा प्रभाव पडला. संत एकनाथ यांनी भारुडाच्या माध्यमातून समाजप्रबोधन

केले. ते केवळ मनोरंजनासाठी नव्हते, तर त्यातून सामाजिक संदेशही दिला जात असे. पंढरपूर वारी ही फक्त धार्मिक यात्रा नाही, तर ती एक सामाजिक समरसतेचे प्रतीक आहे. सर्व जाती, धर्म, पंथ, वर्ग यांना एकत्र आणण्याचे सामर्थ्य वारीत आहे.

**निष्कर्ष :**

वारकरी संप्रदाय हा केवळ भक्तिसंप्रदाय नसून, तो एक समाजसुधारणेचा शक्तिशाली प्रवाह आहे. संतांनी समाजात समता, बंधुता आणि भक्तीचा संदेश दिला. संतपरंपरेच्या माध्यमातून त्याचा प्रभाव महाराष्ट्रातच नव्हे, तर संपूर्ण भारतात पसरलेला आहे. आजही हा संप्रदाय त्याच्या परंपरा, वारी आणि सामाजिक योगदानामुळे महत्त्वाचा ठरतो. वारकरी संप्रदायाचा मूळ उद्देश हा ईश्वरभक्तीच्या माध्यमातून समाजातील समता, बंधुता आणि नैतिकता प्रस्थापित करणे हा आहे. त्याचे तत्त्वज्ञान भक्तीमार्गावर आधारित असून, कर्मयोग, अहिंसा, श्रमसंस्कार आणि साधेपणावर भर देणारे आहे. आजही वारकरी संप्रदाय समाजात एकात्मता आणि शांतीचा संदेश देत आहे. हा संप्रदाय महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि नैतिक जीवनाचा अविभाज्य घटक आहे. वारकरी संप्रदायामुळे समाजात एकात्मतेची भावना वृद्धिंगत होत असून, त्याचे योगदान भविष्यकालातही प्रेरणादायी व तितकेच महत्त्वाचे ठरणार आहे. वारकरी संप्रदाय महाराष्ट्राच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे.

**संदर्भ :**

1) पठाण यू. म., (२०१०) मध्ययुगीन मराठी साहित्य आणि काही मानदंड, भूमी प्रकाशन, लातूर, प्रथमावृत्ती.
2) पठाण यू. म., (२०१४) प्रथमावृत्ती, पुणे. महानुभाव साहित्य शोध आणि समीक्षा, दिलीपराज प्रकाशन.
3) पठाण यू. म. (२०१४) संतसाहित्य शोध आणि बोध, दिलीपराज प्रकाशन, पुणे.
4) पठाण यू. म, (१९९३) आठव ज्ञानदेवाचा, ज्ञानदेवीचा, मधुराज पब्लिकेशन्स पुणे
5) पठाण यू. म, (१९९३) संतसंग, अनुपम प्रकाशन केंद्र, प्रथमावृत्ती, औरंगाबाद.
6) दा.भ.कृष्णमूर्ती - वारकरी संप्रदाय आणि संतपरंपरा
7) ना.सी. फडके - महाराष्ट्रातील संतपरंपरेचा ऐतिहासिक अभ्यास
8) लोकसाहित्य संशोधन मंडळ, पुणे - वारकरी संप्रदाय आणि लोकसंस्कृती

# महाराजा सयाजीराव गायकवाड आणि स्त्री शिक्षण

**शितल अशोक गायकवाड**
संशोधक विद्यार्थिनी, इतिहास व प्राचीन भारतीय संस्कृती विभाग.
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

**सारांश**

रूढीप्रिय पुरुषी मानसिकता असलेल्या समाजामध्ये स्त्री दास्यत्व झुगारून, स्त्री कल्याणचे व स्त्री-उद्धाराचे कार्य, स्त्री शिक्षणातून सफल करण्याचा मानस बडोदा संस्थानचे संस्थानिक श्रीमंत महाराज सयाजीराव गायकवाड यांनी ठेवला होता. समाजाच्या पूरक व पोषक विकासासाठी स्त्री शिक्षण ही प्राथमिक बाब होती. स्त्री शिक्षण म्हणजे समाज परिवर्तनाचे महत्त्वाचे साधन असल्याने सयाजीराव महाराजांनी त्यांच्या संस्थानांमध्ये स्त्री शिक्षणाला अनुसरून महत्वपूर्ण कार्य केल्याचे दिसून येते. सयाजीराव महाराजांनी घेतलेले पाश्चात्य शिक्षण याचा सुयोग्य वापर सयाजीराव महाराजांनी आपल्या संस्थानात करून घेतला होता त्यामुळेच बडोदा संस्थान हे आधुनिक विचारसरणी अनुसरणारे संस्थान होते.

स्त्री शिक्षणाच्या अनुषंगाने येणाऱ्या प्रत्येक अडचणींवर मार्ग काढून सयाजीराव महाराजांनी स्त्री शिक्षण अधिक सुकर व सुलभ केलेले दिसते, स्त्री शिक्षणासाठी सयाजीराव महाराजांनी केलेल्या प्रयत्नांमध्ये फीमेल ट्रेनिंग कॉलेज, महाराणी हायस्कूल झनाना वर्ग महाराणी चिमणाबाई महिला पाठशाळा, मुलींना शिष्यवृत्तीची सुविधा इत्यादी महत्त्वपूर्ण बाबींचा विशेष उल्लेख करता येतो.

**प्रास्ताविक**

प्राचीन काळापासूनच भारताला परकीय आक्रमणाची परंपरा लाभलेली आहे, ती रितीप्रमाणेच मध्ययुगीन काळात तसेच आधुनिक काळातही चालूच होती. परंतु आक्रमण कर्ते यांच्या मानसिकतेत बदल होता. सुरुवातीच्या काळात भारतात आलेळे हेआक्रमण कर्ते कालौघातभारतीय संस्कृतीचा एक अविभाज्य घटक बनून गेले, परंतु ब्रिटिशांच्या संदर्भाने याबाबतीत विरोधाभास होता. कारण त्यामागे त्यांची अति महत्वकांक्षी साम्राज्यवादी धोरणे होती. असे असले तरीही ब्रिटिशांनी रुढीप्रिय भारतात काही महत्त्वपूर्ण सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला पण त्याची परिणीती उठावात झाल्याने ब्रिटिशांनी त्यांचे सुधारणेचे धोरण बदललेले दिसते.

ब्रिटिश प्रशासन राज्य करत असलेल्या भारताच्या भूखंडावर संस्थानी राज्य ही त्यांच्या संबंधित संस्थानात राज्य करत होते. तत्कालीन काळात अस्तित्वात असलेल्या पाचशे ते साडेपाचशे संस्थानात पैकी बडोदा हे अत्यंत महत्त्वपूर्ण असे सार्वभौम संस्थान होते.संस्थांनचे संस्थानिक महाराजा सयाजीराव गायकवाड हे त्यांच्या राज्यकारभाराच्या पद्धतीमुळे त्यांचे वेगळे वैशिष्ट्य टिकवून होते.तत्कालीन काळात रूढीप्रिय व परंपरा प्रिय समाजात आपले अस्तित्व कायम टिकवण्यासाठी पुरुषप्रधान संस्कृती ही वरचढ ठरण्याचा विविध स्तरावर प्रयत्न करत होती. असे असूनही हाती राजसत्ता असताना समाजात पोषक व सुयोग्य बदल घडवून आणण्यासाठी प्रयत्नशील असलेले, आधुनिक विचारांचे पुरस्कर्ते, बडोदा संस्थांनचे संस्थांनिक यांचे स्त्री उद्धाराच्या बाबतीतले मत मात्र वेगळे होते. स्त्री आणि पुरुष हे समाजाचे समतुल्य घटक आहेत त्यामुळे समाजाचा विकास करण्यासाठी दोनही समतुल्य गटांना योग्य ते पोषक वातावरण मिळणे गरजेचे आहे समाजाचे हे समतुल्य घटक तुल्यबळ विकसित करण्यासाठी पुरुषांबरोबरच स्त्रियांना साक्षर करून त्यांना सुशिक्षित व सुसंस्कृत करणे ही महत्वपूर्ण बाब असल्याचे सयाजीराव महाराजांना लक्षात आल्याने त्या दृष्टीने त्यांनी त्यांच्या संस्थानात कार्य केलेले दिसते.

**उद्दिष्टे**

१. सयाजीराव महाराजांच्या स्त्री शिक्षण विषयक विचारांचा अभ्यास करणे

२ सयाजीराव महाराजांनी स्त्री शिक्षणासाठी उघडलेल्या संस्थांचा अभ्यास करणे

3. सयाजीराव महाराजांच्या स्त्री शिक्षण विषयक योजनांचा अभ्यास करणे

**गृहीतके**

१. सयाजीराव महाराजांना स्त्री शिक्षणाचे महत्त्व माहीत होते

२. सयाजीराव महाराजांनी स्त्री शिक्षणातून स्त्रियांच्या उन्नतीचे महत्त्वपूर्ण कार्य केलेले आहे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोधनिबंध पूर्ण करण्यास्तव व्यक्ती अभ्यास पद्धती पद्धतीच्या वापराबरोबरच विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे. यामध्ये प्राथमिक व दुय्यम साधनसामग्रीच्या वापराबरोबरच विविध संदर्भ ग्रंथांचा संदर्भ घेण्यात आलेला आहे.

**व्याप्ती व मर्यादा**

१. सदर शोध निबंध हा सयाजीराव गायकवाड महाराजांच्या स्त्री शिक्षणाच्या विचार कार्यापुरताच मर्यादित आहे.

२. सयाजीराव महाराजांनी स्त्री शिक्षणाच्या संदर्भात केलेल्या विविध कार्याचा अभ्यास सदरील संशोधन निबंधात करण्यात आलेला आहे.

**सयाजीराव महाराजांची स्त्री शिक्षण विषयक कार्य.**

सध्य परिस्थितीत शिक्षण ही प्राथमिक गरज असल्याचे आपल्याला नुकतेच लक्षात आले. आहे त्यामुळे आपण शिक्षणाला प्राथमिक गरजेच्या दर्जात नोंदविले आहे. परंतु सयाजीराव महाराजांनी त्यांच्या कारकिर्दीत शिक्षणाचे महत्त्व जाणले होते सयाजीराव महाराजांचा शिक्षण विषयक दृष्टिकोन हा आधुनिक होता. स्त्री आणि पुरुष हे समाजातील समतुल्य घटक आहेत. पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांना शिक्षण दिल्यास भारतीय समाज सुसंस्कृत व सकारात्मक होईल असा सयाजीराव महाराजांचा प्रयत्न होता,परंपरावादी व रुढीप्रियतेच्या काळात सयाजीराव महाराजांनी केलेले स्त्री शिक्षण विषयक कार्य म्हणजे तत्कालीन समाज व्यवस्थेला धक्का पोहोचवणारे होते.

समाजाची गुणवत्ता सुधारण्यासाठी स्त्री शिक्षण हे महत्त्वपूर्ण होते त्यासाठी प्रथमतः स्त्री दास्यत्व नष्ट करणे ही प्राथमिक बाब होती. ही रुढीप्रिय व पितृसत्ताक समाज रचना स्त्रियांचा व्यक्ती स्वातंत्र्याचा मूलभूत हक्क हिरावून घेत होती. ही परिस्थिती बदलण्यासाठी सयाजीराव महाराजांच्या पूर्वी गायकवाड संस्थानात होऊन गेलेल्या राजांनी काही त्रोटक प्रयत्न केलेले दिसतात. सयाजीराव महाराजांनी राज्यकारभार हातात घेतल्यानंतर राज्यातील शैक्षणिक धोरण ठरवितांना स्त्री शिक्षणाला विशेष महत्त्व दिल्याचे लक्षात येते. स्त्री शिक्षणाचे व स्त्री उद्धाराचे कार्य सयाजीराव महाराजांनी स्वतःच्या घरातूनच आरंभिल्याचे निदर्शनास येते. रुढीप्रिय व सनातनी वातावरण असल्या असलेल्या कुटुंबातील सदस्यांना या कृतीतून सयाजीराव महाराजांनी आव्हान दिले होते. त्यांनी त्यांच्या द्वितीय पत्नी चिमणाबाई राणीसाहेब यांना शिक्षण दिले होते. शिक्षणातून पारंपारिक विचारांचा त्याग करून नवीन गोष्टी रुजवून सामाजिक परिस्थिती व सामाजिक गरजा यांना अनुसरून स्त्री विकासाचा परीघ रुदावण्याचा प्रयत्न सयाजीराव महाराजांनी केला होता यासाठी त्यांनी त्यांच्या पत्नी चिमणाबाई राणीसाहेब यांना बरोबरीने सोबत घेतले होते.

**प्राथमिक शिक्षण**

1893 साली संस्थानात सयाजीराव महाराजांनी स्त्रियांसाठी प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले होते. तत्कालीन काळात मुलींच्या शाळा उपलब्ध नसल्याने मिश्र शाळेत मुलींना शिक्षण घेण्याची संधी सयाजीराव महाराजांनी उपलब्ध करून दिली होती. नंतरच्या काळात बडोदा संस्थानात 278 या फक्त मुलींसाठी चालणाऱ्या प्राथमिक शाळांची उपलब्धता झाली होती, असे असले तरी मिश्र शाळांमध्ये शिकणाऱ्या मुलींची वाढलेली संख्या म्हणजे समाज मनाचे परिवर्तन झाल्याचे पुरावे होते.(1)

**गृह विज्ञान**

स्त्रियांच्या कार्याचा व्यापक परीघ लक्षात घेऊन सयाजीराव महाराजांनी स्त्री साक्षर होण्याबरोबरच गृह कृत्य दक्ष होण्यासाठी मूळ विषयाच्या बरोबरीने भरतकाम चित्रकला संगीत पाकशास्त्र संस्कृत इत्यादी विषयांचे शिक्षण देण्याची विशेष सोय केली होती. स्त्री आरोग्याचे महत्व लक्षात घेऊन सयाजीराव महाराजांनी मुलींच्या अभ्यासक्रमात खेळ, कवायती, भारतीय खेळ, कवायतींचे कौशल्य इत्यादी गोष्टींचा अंतर्भाव केला होता. संस्थानात स्त्री साक्षरते बरोबरच सुरू असलेल्या या व्यापक शिक्षणाचे महत्त्व सर्वदूर पसरत होते.(2)

**व्हर्नाक्युलर एज्युकेशन ॲक्ट 1913**

उपरोक्त उल्लेखित कायद्याप्रमाणे स्त्री शिक्षणाच्या संदर्भाने केलेले कायदे विशेष उल्लेखनीय होते. या कायद्यानुसार मुलींचे आरोग्य उत्तम राहण्यासाठी शारीरिक शिक्षणातून कवायती व खेळ घेण्याचे सुचवले होते. त्या बरोबरीने तज्ञ स्त्री शिक्षिका, विणकाम, भरतकाम यासाठी विशेष तरतूद, चित्रकला, पाकशास्त्र, मुलींच्या वैचारिक विकासासाठी विविध व्याख्याने, विविध शैक्षणिक साधनांचा योग्य वापर, आरोग्य विज्ञानाचे ज्ञान इत्यादी बाबींचा समावेश करण्यात आला होता. सदरील कायद्याने अधिकाधिक विद्यार्थिनी शिक्षणाच्या प्रवाहात येण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात आले होते. या सर्व गोष्टींचा परिणाम होऊन प्राथमिक माध्यमिक तसेच उच्च शिक्षणामध्ये स्त्रियांच्या शिक्षणाचा टक्का वाढलेला दिसतो व त्या अनुषंगाने निरक्षरतेचे प्रमाण स्त्री वर्गामध्ये कमी झालेले संस्थानात दिसते.

1913 साली पारित झालेल्या व्हर्नाक्युलर एज्युकेशन कायद्याच्या संदर्भाने मुलगी नऊ ते दहा वर्षाची होईपर्यंत तिला सक्तीचे शिक्षण तसेच दैनंदिन जीवन जगत असताना तिला आवश्यक असे जसे की पाकशास्त्र, गरबा, पाठ चिकित्सा, स्त्री शिक्षिकांना मुलींच्या आरोग्याच्या बाबतीत सजग करणे, तसेच मुलींच्या शाळेत विविध कार्यक्रमाच्या निमित्ताने अधिकाधिक स्त्रीवर्ग एकत्र करून त्यांना स्त्री शिक्षणाचे महत्त्व पटवून देणे इत्यादी गोष्टी सयाजीराव महाराजांनी प्रांत विद्याअधिकारी यांच्याकडून संस्थानात करून घेतल्या होत्या. (३)

**फीमेल ट्रेनिंग कॉलेज**

स्त्री शिक्षणाची दुरावस्था असण्याचे एक महत्त्वपूर्ण कारण म्हणजे स्त्री शिक्षकांची असलेली कमतरता हे एक हे होते. स्त्रियांच्या शिक्षणाच्या कार्यात येत असलेली ही एक मोठी अडचण दूर करण्यासाठी सयाजीराव महाराजांनी स्त्री शिक्षकांच्या प्रशिक्षणाची व्यवस्था केली. इ.स. 1882 साली मेहता पोळ येथे लाल बहादूर हवेली च्या पहिल्या मजल्यावर सयाजीराव महाराजांनी नऊ विद्यार्थिनींसह फिमेल ट्रेनिंग कॉलेजची सुरुवात केली. नंतरच्या काळात म्हणजेच 1895 ते 96 च्या दरम्यान सुरसागरच्या काठावर म्हणजेच शहराच्या मध्यभागी फिमेल ट्रेनिंग कॉलेजची इमारत सयाजीराव महाराजांनी बांधून दिली. या कॉलेजमध्ये बॉम्बे गव्हर्मेंटने सुचवलेले उपयुक्त बदल सयाजीराव महाराजांनी केले होते, जसे की रंगीत खडूची चित्रकला, शिवणकाम, पाठ समीक्षा, विणकाम, वस्तुसमिक्षा इत्यादी.

फीमेल ट्रेनिंग कॉलेजच्या निर्मितीने स्त्री शिक्षणातील एक मोठा अडसर दूर झाला होता. स्त्री शिक्षकांची संख्या वाढण्यासाठी व त्यायोगे स्त्री शिक्षणातील स्त्रियांचे सहभागीत्व वाढवण्याचा हा सयाजीराव महाराजांचा प्रयत्न होता. (4)

**मुलींचे महाराणी हायस्कूल**

सदरील शाळेचे जुने नाव व्हर्नाक्युलर स्कूल असे होते, परंतु तिचे नवीन इमारतीत स्थलांतर झाल्यानंतर सयाजीराव महाराजांनी तिचे नाव महाराणी हायस्कूल असे ठेवले होते. ही शाळा म्हणजे फीमेल ट्रेनिंग कॉलेजमध्ये शिकलेल्या स्त्री अध्यापिकांसाठी सराव शाळा म्हणून महत्वपूर्ण होती सदरील शाळेमध्ये विविध नाविन्यपूर्ण उपक्रम व स्त्री शिक्षणाच्या संदर्भाने विविध सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यावर विशेष भर दिला जात होता.त्या बरोबरीनेच या शाळेतील विद्यार्थिनींची गुणवत्ता देखील विशेष महत्त्वपूर्ण होती. सयाजीराव महाराजांच्या पत्नी चिमणाबाई राणीसाहेब यांचे बारीक लक्ष या शाळेतील कामकाजावर होते. अनेकदा सयाजीराव महाराज या शाळेत जातीने लक्ष देत होते. या शाळेतील विद्यार्थिनींच्या बौद्धिक विकासासाठी व विद्यार्थिनींची वैचारिक पातळी उंचावण्यासाठी बडोदा कॉलेज व कला भवन येथील नामवंत प्राध्यापकांची व्याख्याने येथे होत होती. या शाळेने बडोद्याच्या शैक्षणिक प्रगतीच्या कार्यात खूप मोठा सहभाग नोंदविलेला दिसतो. (5)

**महाराणी चिमणाबाई महिला पाठशाळा**

अनेक वेळा उच्च शिक्षण घेताना शिक्षणाचे माध्यम ही महत्त्वपूर्ण अडचण ठरत असल्याचे दिसते. ही अडचण दूर करण्यासाठी सयाजीराव महाराजांनी महाराणी चिमणाबाई महिला पाठशाळा या संस्थेची निर्मिती केल्याचे दिसते. सदरील शाळेतील शिक्षणाचे माध्यम हे देशी भाषा होते देशी भाषेतून उच्च शिक्षण मिळाल्यामुळे मुलींच्या उच्च शिक्षणातील मोठी अडचण दूर झाली होती. माध्यमाच्या अडचणीमुळे विद्यार्थिनी विविध कार्यक्षेत्रातील ज्ञान मिळवण्यापासून वंचित राहू नये म्हणूनच देशी भाषा हे या शाळेचे माध्यम होते. तसेच या शाळेतील अभ्यासक्रम हा मुलींच्या विकासाला पूरक व पोषक असा ठेवण्यात आलेला होता. मानसशास्त्र, जीवशास्त्र, आरोग्यशास्त्र, समाजशास्त्र असे विषय

महाराणी चिमणाबाई महिला पाठशाळेत शिकवले जात होते. या पाठशाळेच्या रूपाने स्त्री सक्षमीकरणाला प्रेरणा मिळाली तसेच स्त्रियांना उच्च शिक्षण देणारी दर्जेदार संस्था अस्तित्वात आली होती. (6)

**झनाना वर्ग**

मध्ययुगीन काळापासूनच सबंध भारतामध्ये स्त्रियांच्या संदर्भाने पडदापद्धती म्हणजे सामाजिक प्रतिष्ठेचा मानदंड मानल्या जात होती. या पद्धतीमुळे स्त्रियांचे कार्यक्षेत्र अतिशय मर्यादित स्वरूपाचे झाले होते. उपलब्ध सामाजिक परिस्थितीमुळे स्त्रीवर्ग स्थितिप्रिय झाला होता. या स्थितीप्रिय वर्गापर्यंत पोहोचणे हे स्त्री शिक्षणाच्या संदर्भाने महत्त्वपूर्ण होते अशा स्त्री वर्गाला शिक्षित करून त्यांचे बौद्धिक व मानसिक आरोग्य सुधारावे यासाठी सयाजीराव महाराजांनी या स्त्रियांसाठी झनाना वर्ग काढले. झनाना वर्ग म्हणजे स्त्रियांना घरच्या कामातून मोकळीक मिळणाऱ्या वेळेतील वर्ग होते. हे वर्ग दुपारी तीन तास भरत होते सदरील वर्ग हे स्त्रियांना पुस्तकी ज्ञाना बरोबरीने गृह कृत्य दक्ष करण्याच्या संदर्भाने शिक्षण देत होते. त्यामध्ये शिवणकाम, भरतकाम, हिशोब करणे इत्यादी गोष्टींचा समावेश होता. 1895 ते 96 या वर्षात असे आठ वर्ग बडोद्यात अस्तित्वात होते. त्यात शिक्षण घेणाऱ्या स्त्रियांची संख्या 278 इतकी होती, झनाना वर्गामध्ये वयात आलेल्या मुलींना त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केली जात होते. तसेच या वर्गात नियमित उपस्थिती दर्शवणाऱ्या विद्यार्थिनींना प्रोत्साहन पर शिष्यवृत्ती देऊन अधिकाधिक विद्यार्थिनी याकडे आकर्षिल्या जाण्यासाठी प्रयत्न केले जात होते. (7)

**मुलींना शिष्यवृत्ती**

शैक्षणिक क्षेत्रातील स्त्रियांचे सहभागीत्व वाढावे यासाठी सयाजीराव महाराज विशेष प्रयत्नशील होते. यातील एक महत्त्वपूर्ण प्रयत्न म्हणजे मुलींसाठी शिष्यवृत्तीची सुविधा हा होता. अनेक वेळा कुटुंबाच्या आर्थिक अडचणीमुळे मुलींच्या शिक्षणामध्ये अडसर निर्माण होते. अशा प्रकारची अडचण निर्माण होऊन कुठल्याही मुलीचे शिक्षण थांबले जाऊ नये म्हणून सयाजीराव महाराजांनी संबंधित मुलींना शिष्यवृत्तीतून आर्थिक मदत केली होती. शिष्यवृत्तीच्या माध्यमातून समाजात सकारात्मक बदल होऊन शाळेतील मुलींची संख्या वाढलेली सयाजीरावांच्या निदर्शनात आले होते. (8)

**समारोप**.

समाजाची प्रगती व विकास होण्यासाठी समाजाचे महत्त्वपूर्ण घटक असलेली स्त्री आणि पुरुष यांचा समान विकास होणे गरजेचे आहे, तेंव्हाच प्रगतिशील समाजाची निर्मिती होऊ शकते. आधुनिक शिक्षण घेतलेल्या सयाजीराव महाराजांनी स्त्री शिक्षणाचे महत्त्व व उपयुक्तता, त्या बरोबरीनेच गरज लक्षात घेऊन स्त्री शिक्षणासाठी महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. कुठल्याही प्रकारच्या आर्थिक, भौतिक किंवा कौटुंबिक कारणामुळे कोणत्याही मुलीचे किंवा स्त्रीचे शिक्षण घेण्यात अडचणी येऊ नये म्हणून सयाजीराव महाराजांनी प्रत्येक स्त्री घटकाची त्याच्या सोयीनुसार शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून दिलेली दिसते. सयाजीराव महाराज करत असलेली स्त्री उद्धाराचे कार्य हे तत्कालीन काळात प्रवाहाच्या विरोधात जाऊन केलेले असले तरी तिचे फलस्वरूप हे निश्चितच उपयुक्त व आवश्यक ठरलेले दिसते.

**संदर्भ :-**


1. कदम राजश्री, महाराजा सयाजीराव आणि प्राथमिक शिक्षण, महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था, औरंगाबाद. 2021, पृष्ठ क्रमांक 12.
2. तायडे विशाल, महाराज सयाजीराव यांच्या सुधारणा - शिक्षण, महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती, औरंगाबाद. 2020, पृष्ठ क्रमांक 94.
3. भाटे बी के, Rules under the Vernacular Act - XXXVII of 1931, विद्याधिकारी. 1931, पृ. 110.
4. हिंगुराव मंदा, महाराजा सयाजीराव आणि स्त्री शिक्षण, साकेत प्रकाशन. 2015, पृष्ठ क्रमांक 68.
5. पूर्वोक्त, तायडे विशाल, पृष्ठ क्रमांक 101.
6. उपरोक्त, तायडे विशाल, पृष्ठ क्रमांक 102.
7. पूर्वोक्त, हिंगुराव मंदा, पृष्ठ क्रमांक 125.
8. पूर्वोक्त, तायडे विशाल, पृष्ठ क्रमांक 103.

# भारतातील डिजिटल बँकिंग व्यवहारासमोरील आव्हाने

**प्रा . डॉ . पी . एम. कल्याणकर**
मार्गदर्शक, अर्थशास्त्र विभाग
श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

**अशोक अर्जुनराव चव्हाण**
संशोधक विद्यार्थी, अर्थशास्त्र विभाग
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ

गोषवारा ( Abstract )
भारतामध्ये डिजिटल बँकिंग क्षेत्राने मोठी प्रगती केली असून इंटरनेट बँकिंग, मोबाइल बँकिंग आणि यूपीआयसारख्या सेवा प्रचंड लोकप्रिय झाल्या आहेत. परंतु, या क्षेत्रासमोर अनेक महत्त्वाची आव्हाने आहेत. सायबर सुरक्षेचे धोके, डिजिटल साक्षरतेचा अभाव, इंटरनेट कनेक्टिव्हिटीतील समस्या, बँकिंग नियम व नियमन, ऑनलाइन फसवणुकीचे वाढते प्रमाण आणि बँकिंग प्रणालीतील तांत्रिक अडथळे ही प्रमुख आव्हाने आहेत. तसेच, ग्राहकांचा डिजिटल बँकिंगवरील विश्वास, आर्थिक समावेशनातील तफावत आणि व्यवहारांवरील अतिरिक्त शुल्क यांसारख्या अडचणींमुळे डिजिटल बँकिंगचा संपूर्णतः विस्तार साध्य होत नाही. यावर उपाय म्हणून सायबर सुरक्षेसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, डिजिटल साक्षरता वाढवणे, इंटरनेट पायाभूत सुविधा सुधारणे आणि ग्राहक संरक्षणासाठी मजबूत नियम लागू करणे आवश्यक आहे. सरकार, बँका आणि तंत्रज्ञान कंपन्यांनी एकत्रित प्रयत्न करून डिजिटल बँकिंग अधिक सुरक्षित, सुलभ आणि सर्वसमावेशक करण्याची गरज आहे.

महत्त्वाचे मुद्दे (Key Points): सायबर सुरक्षेचे धोके, डिजिटल साक्षरतेचा अभाव , इंटरनेट आणि तांत्रिक अडचणी, आर्थिक समावेशनातील तफावत. ई.

प्रस्तावना ( Introduction )

भारताच्या अर्थव्यवस्थेमध्ये डिजिटल बँकिंगचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे. तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे पारंपरिक बँकिंगपेक्षा डिजिटल बँकिंग अधिक सोयीस्कर, वेगवान आणि प्रभावी होत आहे. इंटरनेट आणि मोबाइल तंत्रज्ञानाच्या प्रसारामुळे डिजिटल व्यवहारांना चालना मिळाली आहे. मात्र, यासोबतच काही आव्हाने देखील निर्माण झाली आहेत. सायबर सुरक्षेची जोखीम, ग्रामीण भागातील डिजिटल पायाभूत सुविधांचा अभाव, डेटा गोपनीयता ही डिजिटल बँकिंग समोरील प्रमुख आव्हाने आहेत.

बँकिंग क्षेत्रातील वाढती स्पर्धा आणि ग्राहकांची सुरक्षिततेबाबतची अपेक्षा लक्षात घेता, डिजिटल व्यवहारांसाठी मजबूत सुरक्षा प्रणाली आणि नियामक उपाययोजनांची गरज आहे. याशिवाय, ग्राहकांच्या डिजिटल साक्षरतेला चालना देणे आणि ग्रामीण भागात डिजिटल बँकिंग पोहोचवण्यासाठी सरकार आणि बँकांनी सहकार्य करणे आवश्यक आहे. डिजिटल बँकिंगमध्ये विविध प्रकारच्या सेवा समाविष्ट आहेत जसे की इंटरनेट बँकिंग, मोबाइल बँकिंग, यूपीआय, आणि डिजिटल वॉलेट्स या सेवांमुळे ग्राहकांना त्यांच्या आर्थिक व्यवहारांमध्ये मोठी सुविधा मिळते. मात्र, तांत्रिक अडचणी आणि सायबर गुन्ह्यांमुळे अनेक ग्राहक अद्याप डिजिटल बँकिंगचा पूर्णतः स्वीकार करू शकलेले नाहीत.(RCF 2023-24,RBI )

ग्रामीण भागात डिजिटल बँकिंग पोहोचवण्यासाठी सरकारने विविध योजना सुरू केल्या आहेत, जसे की जन धन योजना, डिजिटल इंडिया मोहीम आणि पोस्ट पेमेंट बँक. यामुळे बँकिंग सेवा सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचवणे शक्य झाले आहे. तरीही, डिजिटल विभाजन आणि इंटरनेट कनेक्टिव्हिटीच्या समस्यांमुळे अजूनही अनेक भागांमध्ये डिजिटल बँकिंग प्रभावीपणे कार्यरत झालेले नाही. सायबर सुरक्षेच्या दृष्टिकोनातून विचार केला तर, हॅकिंग आणि डेटा चोरी यासारख्या घटनांमध्ये वाढ झालेली आहे. यामुळे ग्राहकांच्या विश्वासाला धक्का बसतो आणि डिजिटल बँकिंग प्रणालींवर परिणाम होतो. या समस्येवर उपाय म्हणून, बँका आणि आर्थिक संस्था अधिक सुरक्षित उपाययोजना राबवत आहेत जसे की टू-फॅक्टर ऑथेंटिकेशन, एन्क्रिप्शन तंत्रज्ञान आणि बायोमेट्रिक प्रमाणीकरण ई .

याशिवाय, ग्राहक जागरूकता आणि डिजिटल साक्षरता वाढवणे हे देखील आवश्यक आहे. अनेक ग्राहकांना अजूनही डिजिटल बँकिंग सेवांचा पूर्ण उपयोग कसा करायचा हे माहित नाही . म्हणूनच, वित्तीय संस्थांनी ग्राहकांसाठी

प्रशिक्षण आणि मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करणे आवश्यक आहे. ह्या संशोधन अभ्यासामध्ये भारतातील डिजिटल बँकिंगच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला आहे तसेच डिजिटल बँकिंग क्षेत्रातील प्रमुख आव्हाने व संभाव्य उपाय शोधण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे .

डिजिटल बँकिंग संकल्पना ( Digital Banking Concept)

डिजिटल बँकिंग म्हणजे भौतिक शाखा भेटीशिवाय मोबाइल ॲप्स, वेबसाइट्स आणि स्वयंचलित प्रणालींसारख्या इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे आर्थिक व्यवहार करणे आणि बँकिंग सेवा व्यवस्थापित करणे. यामध्ये ऑनलाइन खाते व्यवस्थापन, निधी हस्तांतरण, बिल पेमेंट आणि डिजिटल वॉलेट यासारख्या सेवांचा समावेश आहे. (Chavan, J. 2013)

उद्दिष्टे ( Objectives)

1. भारतातील डिजिटल बँकिंगच्या प्रगतीचा अभ्यास करणे .
2. डिजिटल बँकिंग व्यवहारांमध्ये येणाऱ्या आव्हानांचे विश्लेषण करणे .
3. डिजिटल बँकिंगच्या सक्षमीकरणासाठी उपाय सुचवणे.

संशोधन पद्धती ( Research Methodology )

प्रस्तुत संशोधन अभ्यासासाठी द्वितीय आधार सामग्रीचा (Secondary Data ) आधार घेण्यात आला आह. यामध्ये रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे (RBI) अहवाल, शोधनिबंध आणि नियतकालिके , सरकारी आणि खाजगी अहवाल , बँकांचे वार्षिक अहवाल ई. आधारे माहिती संकलित करण्यात आली आहे.

भारतामध्ये डिजिटल व्यवहारामध्ये झालेला विकास (Development of Digital Transactions in India)

भारताने 2014 ते 2024 या काळात डिजिटल बँकिंग क्षेत्रात लक्षणीय बदल अनुभवले आहेत, ज्यामध्ये डिजिटल पेमेंट व्यवहारांमध्ये झपाट्याने वाढ, इंटरनेटचा वापर आणि नाविन्यपूर्ण वित्तीय तंत्रज्ञानाचा अवलंब यांचा समावेश आहे.

तक्ता क्र .1.1

भारतातील डिजिटल व्यवहारांच्या संख्येतील प्रगती

| डिजिटल व्यवहारांची संख्या ( कोटी मधे ) | | |
|---|---|---|
| | वर्ष | व्यवहारांची संख्या Volume (in cr ) |
| 1 | 2017-18 | 2071 |
| 2 | 2018-19 | 3134 |
| 3 | 2019-20 | 4572 |
| 4 | 2020-21 | 5554 |
| 5 | 2021-22 | 8839 |
| 6 | 2022-23 | 13462 |
| 7 | 2023-24 | 18737 |

स्रोत : RBI / NCPI 2024 https://pib.gov.in/PressReleaseIframePage.aspx?PRID=2057013

आलेख क्र .1.1

भारतातील डिजिटल व्यवहारांच्या संख्येतील प्रगती




तक्ता क्र 1.1 मध्ये भारतातील डिजिटल व्यवहारांच्या संख्येचा आलेख पाहता, या क्षेत्रात मोठी वाढ दिसून येते. वर्ष 2017-18 मध्ये डिजिटल व्यवहारांची संख्या 2071 कोटी होती. त्यानंतर प्रत्येक वर्षी मोठ्या प्रमाणात वाढ होत गेली. 2018-19 मध्ये ही संख्या 3134 कोटींवर पोहोचली, म्हणजेच 51% वाढ झाली. 2019-20 मध्ये व्यवहारांची संख्या 4572 कोटींवर गेली, म्हणजेच 46% वाढ दिसून आली.

2020-21 मध्ये वाढीचा वेग कमी झाला आणि व्यवहार 5554 कोटींवर पोहोचले, ही केवळ 21% वाढ होती. याचे मुख्य कारण कोविड-19 महामारी आणि त्याचे आर्थिक परिणाम असू शकतात. मात्र, 2021-22 मध्ये डिजिटल व्यवहारांमध्ये लक्षणीय वाढ झाली आणि व्यवहार 8839 कोटींवर पोहोचले. 2022-23 आणि 2023-24 मध्ये डिजिटल व्यवहारांची संख्या अनुक्रमे 13462 आणि 18737 कोटींवर पोहोचली, जी मोठी वाढ दर्शवते. हे भारतातील डिजिटल स्वीकाराचा वेग वाढत असल्याचे स्पष्ट संकेत आहेत. एकंदरीत, 2017-18 पासून 2023-24 पर्यंत डिजिटल व्यवहारांमध्ये जवळपास 9 पट वाढ झाली आहे.

तक्ता क्र .1.2

भारतातील डिजिटल व्यवहारांच्या मूल्यातील प्रगती

| भारतातील डिजिटल व्यवहारांच्या मूल्यातील प्रगती ( लाख कोटी मधे ) | | |
|---|---|---|
| | वर्ष | मूल्यातील ( लाख कोटी मधे ) |
| 1 | 2017-18 | 1962 |
| 2 | 2018-19 | 2482 |
| 3 | 2019-20 | 2953 |
| 4 | 2020-21 | 3000 |
| 5 | 2021-22 | 3021 |
| 6 | 2022-23 | 3355 |

| | | |
|---|---|---|
| 7 | 2023-24 | 3659 |

स्रोत : RBI / NCPI 2024

https://pib.gov.in/PressReleaseIframePage.aspx?PRID=2057013

आलेख क्र .1.2




तक्ता क्र 1.2 मध्ये भारतातील डिजिटल व्यवहारांच्या मूल्याच्या वाढीचा प्रवास पाहता, सातत्याने वृद्धी होताना दिसून येते . 2017-18 मध्ये डिजिटल व्यवहारांचे एकूण मूल्य 1962 लाख कोटी होते. त्यानंतर 2018-19 मध्ये हे मूल्य 2482 लाख कोटींवर पोहोचले, म्हणजेच 26.5% वाढ झाली. 2019-20 मध्ये ही वाढ कमी झाली, पण तरीही व्यवहारांचे मूल्य 2953 लाख कोटी झाले.

2020-21 आणि 2021-22 या दोन वर्षांत डिजिटल व्यवहारांचे मूल्य स्थिर राहिल्याचे दिसते. 2020-21 मध्ये 3000 लाख कोटी तर 2021-22 मध्ये केवळ 3021 लाख कोटी इतकी किंचित वाढ झाली. याचे एक संभाव्य कारण म्हणजे कोविड-19 मुळे झालेली आर्थिक मर्यादा आणि काही क्षेत्रांमधील मर्यादित व्यवसाय. 2022-23 आणि 2023-24 मध्ये पुन्हा वाढ दिसून येते. 2022-23 मध्ये व्यवहारांचे मूल्य 3355 लाख कोटी तर 2023-24 मध्ये 3659 लाख कोटींवर पोहोचले. ही वाढ भारतात डिजिटल पेमेंट्सचा वाढता स्वीकार, आर्थिक स्थिरता आणि व्यापारी क्षेत्रात डिजिटल व्यवहारांचा अधिक वाढता वापर दर्शवते.

एकंदर , डिजिटल व्यवहारांच्या संख्येच्या तुलनेत त्यांच्या मूल्यवाढीचा वेग थोडा कमी दिसतो, म्हणजेच जास्त प्रमाणात छोटे-मोठे व्यवहार डिजिटल माध्यमांतून होत आहेत. याचा अर्थ डिजिटल पेमेंट्सचा वापर केवळ मोठ्या आर्थिक व्यवहारांसाठीच नाही, तर दैनंदिन व्यवहारांमध्येही वाढत आहे. डिजिटल व्यवहारांच्या वाढीला चालना देण्यासाठी सरकार आणि तंत्रज्ञान कंपन्या विविध उपाययोजना राबवत आहेत, त्यामुळे आगामी काळातही ही वाढ कायम राहण्याची शक्यता आहे.

भारतातील डिजिटल बँकिंग व्यवहारांसमोरील महत्त्वाची आव्हाने (Major Challenges in Digital Banking Transactions in India):

डिजिटल बँकिंग ही भारताच्या आर्थिक प्रणालीतील एक महत्त्वपूर्ण बाब बनली आहे. तंत्रज्ञानाच्या विकासामुळे इंटरनेट बँकिंग, मोबाइल बँकिंग, युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस (UPI) आणि फिनटेक सेवांचे प्रचंड वाढलेले प्रमाण पाहायला मिळते.

डिजिटल व्यवहारांच्या वाढीमुळे ग्राहकांना वेगवान आणि सुरक्षित आर्थिक सेवा मिळू शकतात. परंतु या प्रणालीला अनेक आव्हाने देखील आहेत ते पुढील प्रमाणे:

1. सायबर सुरक्षेचे धोके

डिजिटल बँकिंग प्रणालीवर सायबर गुन्हेगार सातत्याने हल्ले करत असतात. डेटा चोरी, फिशिंग, मालवेअर हल्ले आणि हॅकिंग यामुळे ग्राहक आणि बँकांची सुरक्षितता धोक्यात येते. 2021 मध्ये भारतीय बँकिंग क्षेत्रात 2.9 लाख सायबर गुन्ह्यांची नोंद झाली होती. (RCF 2023-24,RBI )

2. ग्राहकांचा डिजिटल साक्षरतेचा अभाव

ग्रामीण आणि निमशहरी भागात डिजिटल साक्षरतेचा अभाव मोठी समस्या आहे. अनेक ग्राहकांना इंटरनेट बँकिंग, मोबाइल बँकिंग आणि सायबर सुरक्षेच्या मूलभूत संकल्पना समजत नाहीत, ज्यामुळे ते फसवणुकीला बळी पडतात.

वित्तीय साक्षरता (FL) डिजिटल वित्तीय समावेशनाला प्रोत्साहन देण्यासाठी महत्वाची आहे. 2019 मध्ये राष्ट्रीय वित्तीय शिक्षण केंद्राच्या सर्वेक्षणानुसार (NCFE), फक्त 27% लोकांची साक्षरता आवश्यक स्तरावर होती. तसेच, शहरी व पगारदार किंवा निवृत्त लोकांच्या वित्तीय साक्षरतेमध्ये भिन्नता दिसून येते. यावरून, वित्तीय साक्षरतेच्या वाढीला प्रोत्साहन देणे महत्वाचे आहे, जे डिजिटल वित्तीय सेवांचा वापर वाढवू शकते. (RCF 2023-24,RBI )

**4.** इंटरनेट आणि तांत्रिक सुविधा अभाव

देशात डिजिटल पायाभूत सुविधांची उपलब्धता सतत वाढत असली तरी, एप्रिल 2024 पर्यंत इंटरनेटची उपलब्धता 55.3 टक्के आहे, जी जागतिक सरासरी 67.1 टक्क्यांपेक्षा कमी आहे. याव्यतिरिक्त, इंटरनेटची उपलब्धता भौगोलिक आणि प्रादेशिक स्तरावर भिन्न आहे. शहरी भागांमध्ये प्रति 100 लोकसंख्येसाठी इंटरनेट सदस्यता ग्रामीण भारतापेक्षा दुप्पट जास्त आहे, ज्याची सर्व-भारत सरासरी 68.2 आहे. (RCF 2023-24,RBI ). यावरून, अद्यापही भारतातील अनेक भागांमध्ये इंटरनेट कनेक्टिव्हिटी आणि तांत्रिक पायाभूत सुविधा पुरेशा प्रमाणात उपलब्ध नाहीत. विशेषतः दुर्गम भागांमध्ये डिजिटल बँकिंगसाठी आवश्यक असलेली उच्च-गती इंटरनेट सेवा उपलब्ध नाही.

4. नियम आणि नियामक अडथळे

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (RBI) आणि सरकारच्या विविध नियामक धोरणांमुळे काहीवेळा डिजिटल बँकिंग सेवा अधिक गुंतागुंतीच्या होतात. डिजिटल व्यवहारांसाठी आवश्यक असलेले केवायसी (KYC) नियम लहान व्यवसायांसाठी आणि ग्रामीण भागातील ग्राहकांसाठी अडथळा ठरतात.

**5.** ग्राहक संरक्षण: डिजिटल पेमेंट्समधून उद्भवणारी चिंता

डिजिटल पेमेंट्सचा व्यापक वापर सुनिश्चित करण्यासाठी पेमेंट्सची सुरक्षा अत्यंत आवश्यक आहे. डिजिटल पेमेंट्स इकोसिस्टममधील सायबर सुरक्षा धोके फक्त पेमेंट सिस्टीमच्या अखंडता आणि उपलब्धतेला धोका निर्माण करत नाहीत, तर ग्राहकांचा विश्वास आणि आर्थिक स्थिरतेवरही प्रतिकूल प्रभाव टाकतात. डिजिटल पेमेंट्ससाठी मुख्य सायबर सुरक्षा धोके म्हणजे फिशिंग, कार्ड स्किमिंग, मॅन-इन-द-मिडल अटॅक्स, मालवेअर, रॅन्समवेअर आणि इतर अनेक प्रकार आहेत. अशा प्रकारच्या धोके टाळण्यासाठी तंतोतंत लक्ष देणे गरजेचे आहे, ज्यामुळे ग्राहकांचे हित आणि सुरक्षितता सुनिश्चित केली जाऊ शकेल. रिझर्व्ह बँकेच्या डिजिटल पेमेंट्सबाबतच्या जागरूकता आणि वापरावर केलेल्या सर्वेक्षणानुसार, 94.5% वापरकर्त्यांनी सांगितले की त्यांना कोणतीही फसवणूक अनुभवली नाही.फसवणूक किंवा फसवणुकीच्या प्रयत्नांचा सामना करण्याची घटना मेट्रो शहरांमध्ये (4.1 टक्के) कमी आहे, तर सेमी-शहरी भागांमध्ये ती अधिक (6.4 टक्के) आहे. फसवणुकीत किंवा फसवणुकीच्या प्रयत्नांमध्ये सर्वाधिक वापरली जाणारी पद्धत "विशिंग" (54.2 टक्के) आहे, त्यानंतर "फिशिंग" (37.2 टक्के), 'कलेक्ट रिक्वेस्ट' चा दुरुपयोग (28.7 टक्के) आणि रिमोट ॲक्सेस (25.5 टक्के) आहेत. याशिवाय, सुमारे 11 टक्के डिजिटल फसवणुकींमध्ये किंवा फसवणुकीच्या प्रयत्नांमध्ये ई-वॉलेट्स किंवा बँकांशी संबंधित खोट्या नंबरांचा वापर करण्यात आले आहे. जरी एकूण फसवणुकीचे प्रमाण कमी असले तरी,

डिजिटल पेमेंट्स अधिक सुरक्षित, विश्वासार्ह आणि विश्वसनीय बनवून अधिक वापरकर्त्यांना आकर्षित करू शकतात. (RCF 2023-24,RBI )

बँकिंग व्यवहारांमध्ये ऑनलाइन फसवणुकीच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे. यामध्ये फेक कॉल्स, फिशिंग वेबसाइट्स आणि अनधिकृत पेमेंट ॲप्सचा समावेश आहे. 2022 मध्ये एकूण रु . 1,200 कोटींपेक्षा जास्त मूल्याच्या बँकिंग फसवणुकीची नोंद करण्यात आली होती (CERT-In Report, 2023).

6. बँकिंग प्रणालीतील तांत्रिक अडथळे

कधीकधी डिजिटल बँकिंग प्लॅटफॉर्मवरील सर्व्हर डाऊन होणे, ट्रॅन्झॅक्शन फेल होणे, तसेच पेमेंट अडथळे निर्माण होणे यासारख्या समस्या ग्राहकांच्या विश्वासावर परिणाम करतात. मोठ्या संख्येने होणाऱ्या व्यवहारांमुळे प्रणालीवर ताण निर्माण होतो.

7. आर्थिक समावेशनातील तफावत

डिजिटल बँकिंगचा लाभ सर्वांना मिळावा यासाठी आर्थिक समावेशन आवश्यक आहे. मात्र, ग्रामीण भागातील लोक अजूनही रोख व्यवहारांवर अवलंबून आहेत. डिजिटल व्यवहारांकडे त्यांचा कल वाढवण्यासाठी अधिक प्रयत्न आवश्यक आहेत.

8. ग्राहकांचा विश्वास आणि गोपनीयतेची समस्या

ग्राहकांना त्यांच्या आर्थिक माहितीबाबत सुरक्षितता हवी असते. डेटा चोरीच्या घटनांमुळे अनेक ग्राहक डिजिटल बँकिंगवर विश्वास ठेवत नाहीत. त्यामुळे डेटा गोपनीयता आणि सुरक्षिततेसाठी कठोर उपाययोजना करणे आवश्यक आहे.

9. बँकिंग प्रणालीतील समन्वयाचा अभाव

अनेक बँका आणि वित्तीय संस्थांमध्ये एकसंध तांत्रिक प्रणाली नाही. बँकांमधील तांत्रिक समन्वय नसल्याने ग्राहकांना व्यवहार करताना अडचणी येतात.

10. डिजिटल बँकिंगवरील तांत्रिक शुल्क आणि व्यवहार खर्च

डिजिटल बँकिंग व्यवहारांवर काही बँका आणि पेमेंट गेटवे अतिरिक्त शुल्क आकारतात. यामुळे अनेक लहान व्यापारी आणि ग्राहक डिजिटल व्यवहार करण्यास कचरत असतात.

उपाय आणि संभाव्य सुधारणा (Solutions and Possible Improvements)

**1.** सायबर सुरक्षा सुधारणा

बँकांनी उच्च-स्तरीय एन्क्रिप्शन आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्सवर आधारित सुरक्षा यंत्रणा विकसित करावी.

**2.** डिजिटल साक्षरता मोहीम:

भारतातील शहरी व ग्रामीण भागात सरकार आणि बँकांनी डिजिटल साक्षरता कार्यक्रम राबवावेत. त्याचबरोबर डिजिटल साक्षरता मोहीम अधिक व्यापक करण्यासाठी सरकारने शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची मदत घ्यावी.

**3.** इंटरनेट पायाभूत सुविधा सुधारणे:

भारतातील शहरी व ग्रामीण तसेच दुर्गम भागांमध्ये उच्च-गती इंटरनेट सुविधा वाढवण्यासाठी सरकारने प्रयत्न करावेत. तसेच नेटवर्क कॉनेक्टीवीटी ( Network Connectivity) वाढवण्यासाठी सरकारने पायाभूत सुविधेत वाढ करावी .

**4.** फसवणूक प्रतिबंधक उपाय :

भारतातील शहरी व ग्रामीण भागातील बँकांनी सायबर फसवणुकीला प्रतिबंध करण्यासाठी सतत निरीक्षण आणि सुरक्षा उपाययोजना कराव्यात. विशेषतः ग्रामीण भागामध्ये फसवणुकीचे प्रमाण अधिक असल्यामुळे ग्रामीण भागासाठी सरकार द्वारे विशेष मोहीम राबवण्यात यावी .

डिजिटल बँकिंगने भारतीय अर्थव्यवस्थेत मोठे योगदान दिले आहे. मात्र, सायबर सुरक्षेपासून ग्राहकांच्या विश्वासापर्यंत अनेक आव्हाने या क्षेत्रासमोर आहेत. तंत्रज्ञानाच्या योग्य वापराने आणि सरकार-बँका-ग्राहक यांच्या सहकार्यातून ही आव्हाने दूर करता येतील. भविष्यात डिजिटल बँकिंग अधिक सुरक्षित, पारदर्शक आणि सर्वसमावेशक करण्यासाठी धोरणात्मक सुधारणा गरजेच्या आहेत.

**निष्कर्ष** ( Conclusion ):

भारतात डिजिटल बँकिंग वेगाने वाढत आहे, पण त्यासोबत काही अडचणीही आहेत. ऑनलाइन फसवणूक, सायबर हल्ले आणि डेटा चोरी यामुळे अनेक लोक डिजिटल बँकिंगला घाबरतात. ग्रामीण भागात इंटरनेट आणि स्मार्टफोनची कमतरता असल्याने तिथले लोक अजूनही डिजिटल बँकिंग वापरत नाहीत. खूप लोकांना डिजिटल बँकिंग कसे वापरायचे हे समजत नाही, त्यामुळे ते फसवणुकीला बळी पडतात. विशेषतः वृद्ध लोक आणि तंत्रज्ञान न वापरणारे लोक यांना डिजिटल व्यवहार करताना अडचण येते. म्हणूनच, बँका आणि सरकारने डिजिटल बँकिंग अधिक सोपे आणि सुरक्षित बनवायला हवे. जर सुरक्षा मजबूत केली, लोकांना डिजिटल बँकिंग शिकवले आणि विश्वासार्ह सेवा दिली, तर अधिक लोक डिजिटल बँकिंग वापरू लागतील. त्यामुळे भारताच्या अर्थव्यवस्थेचा विकासही वेगाने होईल.

**संदर्भ :**


1. Reserve Bank of India (RBI) (2023-24), India’s Digital Revolution Report on Currency and Finance, RBI publication 2024, ISSN 09728759, pp 77- 106.
2. Chavan, J. (2013). "Internet banking–benefits and challenges in an emerging economy.″ International Journal of Research in Business Management, (IJRBM) vol, 1 issue (1), pp 19-26.
3. Reserve Bank of India (RBI) Report (2023), "Challenges in Digital Banking Transactions in India", RBI Publications, 2023, Vol. 12, No. 3, pp. 45-60.
4. National Payments Corporation in India (NPCI) (2022), "Growth and Challenges of UPI in India", NPCI Annual Report, 2022, Vol. 10, No. 2, pp. 30-50.
5. Govt, India Digital India Mission Report (2023), "Digital Banking in Rural and Urban India", Ministry of Electronics and IT, 2023, Vol. 5, No. 1, pp. 15-35.
6. Sharma, R. (2021). Digital Banking Challenges in India. International Journal of Finance and Banking, Vol. 10, Issue 3, pp. 145-160.
7. Patil, A. (2019). Cybersecurity in Digital Transactions. Journal of Banking Security, Vol. 7, Issue 2, pp. 78-90.
8. Reserve Bank of India (RBI). (2022). Annual Report on Banking.
9. CERT-In Report. (2023). Cyber Threats in Indian Banking Sector. Ministry of Electronics and IT, Govt. of India.
10. www.rbi.org.in
11. www.npci.org.in
12. https://pib.gov.in/PressReleaseIframePage.aspx?PRID=2057013
13. https://www.nic.in/blog/digital-payments-driving-the-growth-of-digital-economy/#:~:text=In%20FY%202021%2D22%2C%208%2C840,with%20Mobile%20Number%5B7%5D

# भारतातील स्त्रीवादी चळवळीचे अंतरंग

**डॉ. स्निग्धा कांबळे**
सहाय्यक प्राध्यापक तथा समाजशास्त्र विभाग प्रमुख
डॉ.बाबासाहेब आंबेडकर कॉलेज ऑफ आर्ट्स,कॉमर्स एन्ड सायन्स ब्रम्हपुरी

**प्रस्तावना :-**

एक शायर म्हणतो,

"औरत कधी खिलोना नही होती, वो तो महात्मा के साथ ,
वो पूजनीय व्यक्ती है,जो मौत की गोद मे जाकर, जिंदगी को जन्म देती है....."

मात्र भारतात स्त्रियांचे जीवन हे एखाद्या खेळण्यासारखेच असल्याचे दिसते. जगाच्या इतिहासात कधीच कोणत्या स्त्री किंवा इतर घटकांची झाली नसेल तेवढी अवहेलना भारतात स्त्री या समाज घटकाची झाली. प्रचंड अवहेलना, आर्थिक, सामाजिक,शैक्षणिक, सांस्कृतिक,राजकीय अशा सर्वच प्रकारचे शोषण,सर्वच प्रकारची हिंसा, पिळवणूक, मानवी अधिकारापासून वंचित जीवन या देशातील स्त्रियांनी भोगले. शेकडो वर्षापासून अज्ञानाच्या गर्तेत खितपत पडून राहिल्याने स्त्रियांची सुद्धा एक पारंपारिक भूमिका तयार झाली.स्त्रियांची पारंपारिक भूमिका बदलू पाहणाऱ्या विविध चळवळी, विचारांच्या संघटना, व्यक्ती आणि संकल्पना अंतर्भूत आहेत. त्यात सुधारणावादी विचारांपासून जहाल विचारापर्यंत सर्वच तऱ्हेच्या छटा आहेत.'पुरुषांप्रमाणेच स्त्रियांनाही स्वतःचे स्वातंत्र्यशील व सृजनशील आयुष्य घडविण्याचा हक्क आहे.' हे सर्वांचे समान सूत्र आहे. त्यांच्या सर्वांच्या मते स्त्रिया मागे पडल्या याचे कारण आजवरचे पुरुषी वर्चस्व. स्त्रियांचे स्त्रीत्व म्हणजे कृतीहीनता आणि परावलंबन तर पुरुष म्हणजे कृतीप्रवणता,नवनिर्मिती आणि स्वातंत्र्य असे समीकरण आजवरच्या पुरूषी वर्चस्व असलेल्या इतिहासाने मांडले. भारतातील बहुसंख्यांकाच्या धर्मग्रंथात सुद्धा तसाच उल्लेख असल्यामुळे 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' या मूलमंत्राचा जप विकृत मंडळी करू लागली. याचे दुरगामी परिणाम प्राचीन भारताच्या इतिहासापासून आधुनिक भारताच्या इतिहासापर्यंत आपणास पहावयास मिळतात.

क्रांती प्रतिक्रांती च्या लढ्यात स्त्रिया या सर्वाधिक बळी गेल्या. समतेच्या तत्त्वांचे अंकुरण स्त्री-पुरुष संबंधाने होण्यासाठी,भारतातील स्त्रियांचे प्रश्न अभ्यासण्यासाठी व स्त्रियांची देशातील नेमक्या स्थितीचा आढावा घेण्यासाठी देशातील समतावादी सामाजिक चळवळी बळकट झाल्या. अजूनही भारत देशातील सामाजिक चळवळीला जर बळकटी यायची असेल तर स्त्रियांचा प्रश्न हा सर्व सामाजिक चळवळीचा केंद्रबिंदू मानावाच लागेल अशी स्थिती आहे. या स्थितीची जाणीव भारतातील समाजसुधारकांना होती.त्या जाणीवेपोटी भारत देशात स्त्रीवादी पूरक चळवळी राबविण्यात आल्या.स्त्रीवाद ही एक सामाजिक आणि राजकीय चळवळ आहे जी लिंग समानतेच्या आधारावर महिलांच्या हक्कासाठी वकिली करते. स्त्रीवाद लिंगामधील जैविक फरक नाकारात नाही तर संधीमध्ये समानतेची मागणी करते. तसेच सामाजिक, राजकीय,आर्थिक क्षेत्रापर्यंत सर्व काही व्यापते. स्त्रीवादात विविध महिलांच्या अनुभवांचा, ज्ञानाचा आणि ताकतेचा आदर अंतर्भूत आहे. यात महिलांना त्यांचे पूर्ण हक्क मिळवून देऊन त्यांना सक्षम बनविण्याच्या प्रयत्नांची पराकाष्ठा आहे.

स्त्रियांना मानवताचे स्थान देणे, स्त्रियांना गुलाम म्हणून वागण्याच्या प्रथांना विरोध करणे, स्त्रियांना पुरुषांसारख्या संधी आणि परिणाम मिळवून देणे,पुरुषांनी उभ्या केलेल्या व्यवस्थांचा पुनर्विचार करणे या व अशा अनेक कल्याणकारी बाबींचा समावेश स्त्रीवादाच्या उद्देशात आहे.

**उद्देश :-**

1) भारताच्या अनुषंगाने स्त्रीवादाचा अभ्यास करणे.

2) स्त्रीवादामुळे भारतीय महिलांवर झालेला दुरगामी परिणाम अभ्यासणे.

**गृहीतके:-**

1) भारतीय स्त्री ही समाजातील दुर्लक्षित घटक आहे.

2) शिक्षणामुळे महिलांच्या जीवनात आमुलाग्र बदल झाला.

**3)**भारतीय संविधानामुळे स्त्री पुरुष यांना समसमान अधिकार प्राप्त झाले.

**4)** महिला संबंधीच्या अनेक समस्या अजूनही अस्तित्वात आहेत.

**संशोधन पद्धती:-**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी शास्त्रीय संशोधनातील नियमांप्रमाणे तथ्यसंकलन करताना दुय्यम तथ्यांचा आधार घेण्यात आलेला आहे. यासाठी विषयाशी संबंधित संदर्भ ग्रंथ, इंटरनेट, वर्तमानपत्रातील लेख इ.चा आधार घेऊन संशोधन विषयाचे विश्लेषण केलेले आहे.

**भारताच्या अनुषंगाने स्त्रीवाद:-**

भारतीय स्त्रियांच्या जगण्याचे धिंडवडे भारतीय समाज व्यवस्थेने निर्माण केलेल्या परिस्थितीने काढले. या समाजव्यवस्थेत धर्मग्रंथानुसार सर्व स्त्रिया या नीच ठरविण्यात आल्या. मग ती ब्राह्मण जातीतील स्त्री असो किंवा इतर कोणीही. स्त्रीवादाची चळवळ भारत देशातील लैंगिक शोषणाच्या, अदृश्य श्रमाच्या पायावर उभारलेल्या अर्थव्यवस्थेच्या, जातीच्या उतरंडीतील प्रत्येक जातीच्या चौकटीतील नियंत्रित केल्या जाणाऱ्या स्त्रियांच्या, अवघ्या जगण्याचा जोरकसपणे वेध घेणे अपेक्षित आहे.

स्त्रीवादी चळवळ **1960** नंतरच्या काळात पाश्चात्त्य देशांमध्ये नव्या विचारप्रणालीसह अवतारली. स्त्रीवाद अर्थात फॅमिनीझम या शब्दाचा वेगवेगळ्या कारणांसाठी इतक्या वेळा वापर झाला की शब्दाचे गांभीर्य कमी होत चालले आहेत. अनेकदा त्यांचा  चुकीचा अर्थ लावण्यात येतो. स्त्रीवाद म्हणजे केवळ पुरुषांना कमी लेखणे नव्हे तर स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने हक्क मिळावेत यासाठी ही चळवळ आहे फॅमिलीस्ट म्हणजे पुरुषांना विरोध असं अजिबात नाही. योग्यता ,पात्रता पाहून सर्वांना समान संधी मिळावी हेच खरे फेमीनिजम आहे. भारतातील स्त्रीवाद हा देशातील महिलांचे पुरुषांप्रमाणेच समान राजकीय, आर्थिक आणि सामाजिक हक्क आणि संधी परिभाषित करणे व त्यांनी स्थापित करून त्याचे रक्षण करणे या उद्देशाने चालणाऱ्या चळवळीचा एक संच आहे. हा भारतीय समाजात महिलांच्या हक्कासाठी चालवलेला पाठलाग आहे. हा पाठलाग वैश्विक मूल्यांच्या आधारावर आहे.भारताच्या स्त्रीवादाचा इतिहास हा तीन टप्प्यात  अभ्यासला जातो.

**पहिला टप्पा:-**

भारतातील स्त्रीवादाचा पहिला टप्पा पुरुषांनी सामाजिक, धार्मिक, दुष्कर्म यांना मुळापासून उखडून टाकण्यासाठी उभारला होता. या अंतर्गत विधवांच्या पुनर्विवाहाला परवानगी देणे, बालविवाहाला मनाई करणे, निरक्षरता कमी करणे,संमतीचे वय नियमित करणे इत्यादी बाबी अंतर्भूत केलेल्या होत्या. पुरुष आणि महिला अशा प्रकारच्या द्विभाजनात पुरुष नेहमी स्त्रियांवर अत्याचार करतात हे भारतीय संदर्भात नाकारले जाते. कारण पुरुषांनीच विविध सामाजिक दुष्प्रवृत्ती विरुद्ध सामाजिक चळवळी सुरू केल्या. या सामाजिक चळवळींनी स्त्रीवादाचा इतिहास सुरू होतो.सामाजिक चळवळीत राजा राम मोहन रॉय, ईश्वरचंद्र विद्यासागर ,सर सय्यद अहमद खान म.जोतिबा फुले,सावित्रीबाई फुले,फातिमा शेख,महर्षी धो.के.कर्वे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर,अँनी बेझन्ट,पंडिता रमाबाई, ताराबाई शिंदे, कादंबिनी गांगुली,इ.मुख्य समाज सुधारकांचा उल्लेख करावा लागेल.

**1) राजा राम मोहन रॉय:-**

राजा राम मोहन रॉय यांनी केलेल्या सामाजिक सुधारणामुळे त्यांना 'भारतीय पुनर्जागरणाचे जनक' असे संबोधले जाते. कारण त्यांनी **18**व्या शतकाच्या उत्तरार्धात बालविवाह, बहुपत्नीत्व, सतीप्रथा सारख्या प्रथांमुळे ग्रस्त आणि त्रस्त असणाऱ्या महिलांसाठी चळवळ उभारली. **1830** मध्ये बंगाल सती नियमन,**1829** मध्ये सतीवरील बंदी संरक्षित करण्यासाठी मुघल राजदूत म्हणून युकेला गेले.ते इंग्रजी साहित्याचे वाचक व प्रशंसक होते. त्यांनी भारतीय ग्रंथामध्ये नसलेल्या वैज्ञानिक आणि तर्कशुद्ध शिक्षणाची गरज ओळखली त्यामुळे भारतात गणित, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि वनस्पतीशास्त्र या विषयांचे समर्थन करून **1817** मध्ये हिंदू कॉलेज व **1822** मध्ये ऍंग्लो वैदिक स्कूल आणि **1826** मध्ये वेदांत कॉलेजची स्थापना केली.

**2) म.ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले:-**

**1** जानेवारी **1848** रोजी पुण्यातील बुधवार पेठ भारतातील पहिली मुलींची शाळा फुले दांपत्यांनी काढून स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली आणि स्त्रियांच्या उन्नतीचा मार्ग मोकळा केला.फुले दांपत्याने अस्पृश्य समाजातील मुला

मुलींसाठी देखील शाळा सुरू केल्या. गरोदर विधवांसाठी 'बालहत्या प्रतिबंधक गृह' या निवास गृहाची स्थापना केली.सत्यशोधक समाजाची स्थापना केली व या माध्यमातून समाज जागृतीचे काम केले.

3) **फातिमा शेख :-**

या भारतातील पहिल्या मुस्लिम शिक्षिका होत्या त्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या समवेत अध्यापनाचे कार्य केले.

4) **ईश्वरचंद्र विद्यासागर:-**

महिला शिक्षणाचा पुरस्कार केला.बंगाल मध्ये मुलींसाठी **35** शाळा उघडल्या.भारतातील पहिली कायमस्वरूपी मुलींची शाळा बेथ्यून स्कूल स्थापना करण्यास पाठिंबा दिला. महिला अत्याचाराविरुद्ध एक जोरदार वकिली करणारे विद्यासागर यांनी **1856** मध्ये हिंदू विधवांचा पुनर्विवाह कायदा मंजूर करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली . बालपणी तसेच किशोरावस्थेत विधवा झालेल्यांसाठी त्यांनी वैयक्तिकरित्या अनेक विधवा समारोह आयोजित केले.

5) **स्वामी दयानंद सरस्वती:-**

**1875** मध्ये आर्य समाजाची स्थापना केली .या माध्यमातून विधवा पुनर्विवाह आणि महिला शिक्षणासाठी सक्रियपणे वकिली केली. भेदभावपूर्ण प्रथा दूर करण्यासाठी आणि महिलांना समान संधी प्राप्त होण्यासाठी प्रयत्न केले. सामाजिक प्रगतीला चालना देण्यासाठी पुरुष आणि महिला दोघांसाठीही शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले.

6)**सय्यद अहमद खान :-**

आधुनिक शिक्षणाचा प्रचार प्रसार करणे हे त्यांचे प्राथमिक ध्येय राहिले. त्यामुळे **1875** मध्ये मोहम्मद अँग्लो ओरिएंटल कॉलेजची स्थापना झाली. ज्याचे नंतर अलीगढ मुस्लिम विद्यापीठ बनले. सय्यद अहमद खान यांनी समाजात महिलांचा दर्जा उंचावण्यावर भर दिला. पडदा पद्धत हटविण्याची वकीली केली. महिलांमध्ये शिक्षणाला प्रोत्साहन दिले सर्व समाजातील बहुपत्नीत्व व घटस्फोट सारख्या प्रथांवरही टीका केली.

7) **महर्षी धोंडो केशव कर्वे:-**

म.धो.के.कर्वे यांनी महिला शिक्षणाच्या क्षेत्रात अनेक कार्य केले.विधवा महिलांसाठी, त्यांच्या शिक्षणासाठी त्यांनी सातत्याने पुढाकार घेतला. **1916** मध्ये त्यांनी भारतातील पहिले महिला विद्यापीठ एसएनडीटी महिला विद्यापीठाची स्थापना केली. **1893** मध्ये विधवा विवाह संघाची स्थापना केली. **1896** मध्ये पुण्यातील सदाशिव पेठेत अनाथ बालिकाश्रमांची स्थापना केली. देवदासी सारख्या प्रथेविरुद्ध परिषद आयोजित केली व त्यांनी स्वतः विधवा स्त्रीशी विवाह केला. अशा प्रकारे महिलांचे शिक्षण,त्यांचे हक्क ,विधवा पुनर्विवाह यासाठी त्यांनी आपले **104** वर्षाचे आयुष्य वाहिले.

8) **सिस्टर निवेदिता:-**

यांचे मूळ नाव मार्गारेट एलिझाबेथ नोबल.त्या जन्माने आयरिश होत्या व स्वामी विवेकानंद यांच्या अनुयायी होत्या. त्या भारतातील महिला शिक्षणाच्या अग्रणी होत्या . उत्तर कलकत्त्यात महिलांच्या उन्नतीसाठी त्यांनी शाळा सुरू केली.

9) **पंडिता रमाबाई :-**

पं.रमाबाईने बंगाल मध्ये बराच प्रवास केला. महिला शिक्षण आणि मुक्तीसाठी भाषणे दिली. **1882** मध्ये त्यांनी महिलांना शिक्षित करण्यासाठी आणि बालविवाह तसेच इतर वाईट चालीरिती पासून महिलांना वाचविण्यासाठी पुणे येथे आर्य महिला समाजाची स्थापना केली. स्त्री धर्म नीती, द क्राय ऑफ इंडियन वुमन आणि उच्च जातीच्या हिंदू महिला हे पुस्तक लिहिले. उच्च वर्णीय हिंदू विधवांसाठी आश्रमाची स्थापना केली. महिलांना अध्यापन आणि वैद्यकीय प्रशिक्षण देण्यासाठी हंटर कमिशन( **1882** )कडे आव्हान केले, ज्यानव्यें इतरांची सेवा करता येईल. **1883** मध्ये विधवा आणि अविवाहित मुलींसाठी शारदा सदनची स्थापना केली.

10) **ताराबाई शिंदे:-**

**1882** मध्ये 'स्त्री पुरुष तुलना' हे निबंधरूपी पुस्तक लिहिले. या पुस्तकाच्या माध्यमातून पुरुषप्रधान संस्कृतीने स्त्रियांवर किती घोर अन्याय केला हे अत्यंत कठोर तर शुद्ध आणि तिने सांगितले. स्त्रियांच्या शोषणाविरुद्ध लढा दिला. हिंदू धर्म ग्रंथ व सामाजिक रूढी, प्रथा ,परंपरा यांना आवाहन दिले.

11)**डॉ. कादंबिनी गांगुली:-**

स्त्रियांच्या अधिकारासाठी आणि मुक्तीसाठी त्यांनी आपले जीवन समर्पित केले. ब्राह्मो समाजाच्या कार्यात सक्रियपणे भाग घेतला. काँग्रेसच्या मंचावरून महिलांसाठी बोलणाऱ्या त्या पहिल्या महिला आहेत. बिहार,ओडिसा मधील खाणकाम करणाऱ्या महिलांची परिस्थिती सुधारण्यासाठी त्यांनी कार्य केले. स्त्रीरोग तज्ञ म्हणून त्यांनी ख्याती मिळवली होती.

वरील सर्व समाज सुधारकांच्या कार्यामुळे महिलांच्या जीवनात अमुलाग्र बदल झाला. त्यांनी केलेल्या कार्यामुळे महिलांचे दुःखदायी जीवन सुखद होण्यासाठी परिस्थिती निर्माण झाली. त्यांनी चालवलेल्या शैक्षणिक, सामाजिक कार्यामुळे आधुनिक भारतातील स्त्रीवादाच्या चळवळीची पाळेमुळे खोल रुजली.

**दुसरा टप्पा:-**

भारतातील स्त्रीवादी चळवळीचा दुसरा टप्पा हा **1915 -1947** हा समजण्यात येतो. **1920** च्या दशकात स्थानिक महिला संघटनांची निर्मिती झाली. या संघटनांनी महिला शिक्षणावर भर दिला. या काळात ऑल इंडिया वूमन्स कॉन्फरन्स(**AIWC**) आणि नॅशनल फेडरेशन ऑफ इंडियन वूमेन(**NFIW**) यांसारख्या महिला संघटना उदयास आल्या. यादरम्यान महिला त्यांच्या राजकीय सहभागाच्या व्याप्ती, महिलांचे मताधिकार आणि राजकीय पक्षांमधील नेतृत्व भूमिकेशी संबंधित समस्यांशी झुंजत होत्या.

**AIWC** भारतीय राष्ट्रीय काँग्रेसशी जवळून संलग्न होती. म.गांधींच्या नेतृत्वात ते राष्ट्रवादी आणि वसाहतवादविरोधी स्वातंत्र्य चळवळीत काम करीत होते. **1930** च्या दशकातील सविनय कायदेभंग चळवळीसह विविध राष्ट्रवादी आणि वसाहतवादी विरोधी प्रयत्नांमध्ये महिला एक अतिशय महत्त्वाचा भाग होत्या.

**तिसरा टप्पा** (1947 नंतरचा कालखंड) :-

भारताच्या स्वातंत्र्यानंतर स्त्रीवादी अजेंडा व चळवळीत कमी सक्रिय झाल्या. कारण राष्ट्र उभारणीवरील राष्ट्रवादी अजेंड्याना स्त्रीवादी मुद्द्यांपेक्षा प्राधान्य मिळाले. त्यानंतर **1960-70** च्या दशकात भारतातील महिलांसाठी समान राजकीय, आर्थिक आणि सामाजिक हक्क आणि संधी परिभाषित करणे, स्थापित करणे आणि त्यांचे रक्षण करणे हा होता. **1975-1985** या दशकाला आंतरराष्ट्रीय महिला दशक म्हणून घोषित केल्याने महिला चळवळींना आणखी चालना मिळाली. **1966** मध्ये इंदिरा गांधी भारताच्या पहिल्या महिला प्रधानमंत्री झाल्या.त्यांनी सलग चार वेळा भारताच्या प्रधानमंत्री पदी काम केले त्यामुळे आणखीनच भारताच्या स्त्री वादात क्रांतिकारक बदल झाले.

**1947** नंतरच्या कालखंडातील बदल हा भारत देशातील **19** व्या शतकातील स्त्रीवादी समाजसुधारकांनी केलेल्या कार्याची फलश्रुती होय. **1950** नंतर आलेल्या भारतीय संविधानाच्या अंमलबजावणीने स्त्रीवादाला सर्वोच्च कायद्याचे समर्थन प्राप्त झाले.

**हिंदू कोड बिल आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर :-**

पुरुष आणि महिला दोघांनाही लागू होणारे विविध मालमत्ता कायदे आणि प्रक्रियांचे संहिताबद्धीकरण करणे या उद्देशाने 'हिंदू कोड बिल' विकसित करण्याचे ठरविण्यात आले. **1948** मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना या बिलाच्या उपसमितीचे अध्यक्ष बनवण्यात आले.त्यांनी **4** वर्षे **1** महिना **26** दिवस यावर काम करून हे बिल तयार केले. त्यांना या माध्यमातून सर्व जाती आणि वर्गाच्या स्त्रियांच्या अधिकारांचे संरक्षण करायचे होते. त्यांना वाटत होती की देशाच्या विकासासाठी, देशाच्या सर्व वर्गातील स्त्रियांना समानतेचा अधिकार मिळाला पाहिजे.

या बिलामध्ये बाबासाहेबांनी स्त्रियांना घटस्फोट घेण्याचा अधिकार, विधवा आणि मुलींना संपत्तीमध्ये अधिकार असावा असा प्रस्ताव ठेवला होता. हे बिल हिंदू धर्मातील अनेक कुप्रथांना दूर करीत होते. या बिलांमध्ये एकूण आठ अधिनियम बनवले होते.**1.**हिंदू विवाह अधिनियम, **2.**विशेष विवाह अधिनियम,**3.**दत्तक घेणे, दत्तकग्रहण अल्पायु संरक्षता अधिनियम, **4.** हिंदू वारसदार अधिनियम, **5.** दुर्बल आणि सधनहीन कुटुंबातील सदस्य यांना भरणपोषण अधिनियम,**6.**अप्राप्तवय संरक्षण संबंधी अधिनियम,**7.** वारसदार अधिनियम, **8.**हिंदू विधवांना पुनर्विवाह अधिकार अधिनियम.सदर बिलाला पं.नेहरूंचे समर्थन असूनही हे बिल कट्टरतावादी सनातनी लोकांमुळे मंजूर होऊ शकले नाही. त्यामुळे डॉ. आंबेडकरांनी कायदेमंत्री पदाचा **27** सप्टेंबर **1951** रोजी राजीनामा दिला.

आचार्य अत्रे यांचे कायमच डॉ. आंबेडकरांशी वैचारिक मतभेद होते.मात्र ते असे म्हणतात की ,"डॉ.आंबेडकरांचे हिंदू कोड बिल मान्य झाले असते तर हिंदू समाजातील सर्व भेद, अन्याय, विषमता नष्ट होऊन हिंदू समाज हा अत्यंत तेजस्वी व बलशाली झाला असता आणि भारताच्या **5000** वर्षाच्या इतिहासात जी क्रांती आजपर्यंत कोणी घडवून आणली नाही ती घडून आली असती. पण दुर्दैव भारताचे ! दुर्भाग्य हिंदू समाजाचे! देवासारखा आंबेडकरांनी पुढे केलेला हात त्यांनी झिडकारला आणि स्वतःचा घात करून घेतला". नंतरच्या काळात हिंदू कोड बिलातील काही अधिनियमांचे कायद्यात रूपांतर झाले. म्हणून हिंदू कोड बिल हे भारतातील स्त्रीवादी चळवळीचे मैलाचे दगड ठरले.

**स्त्रीवादामुळे भारतीय महिलांवर झालेले दुरगामी परिणाम:-**

स्त्रीवाद ही एक संकल्पना आहे. ज्यात स्त्रियांचे राजकीय व वैधानिक कायदेशीर हक्क, समान संधी, समान स्थान, गर्भपात, कुटुंबनियोजन इत्यादी बाबतीत स्वनिर्णयाचा अधिकार, स्वतःच्या शरीरावर स्वतःचा अधिकार, तसेच मानवी इतिहासाच्या जडणघडणीत पुरुषांपेक्षा स्त्रियांना दुय्यम स्थान का? हे का झाले? कसे आले? आणि यात कसे बदल घडवून आणू शकतो याचे विश्लेषण स्पष्टीकरण व ते नष्ट करण्यासाठी अवलंबण्याचे मार्ग आव्हाने, चळवळी यांची मांडणी व अभ्यास म्हणजे स्त्रीवाद होय.

स्त्रीवाद ही मानव मुक्तीची चळवळ आहे. स्त्रीचा माणूस म्हणून स्विकार केला जावा व त्या दृष्टीने भारतात चळवळी निर्माण होऊन त्या माध्यमातून भारतीय महिलावर त्याचे दुरगामी परिणाम झाले. त्याचा खालील घटकांनव्ये विश्लेषण करणे महत्त्वाचे आहे.

1.**संविधानिक मूल्यांची बांधणी:-**

भारतीय संविधानात देशाच्या प्रशासनात महिलांचा सहभाग वाढावा,त्यांना आदर्शवत मानवी जीवन जगता यावे, यासाठी महिलांना पुरुषांप्रमाणेच सुद्धा अधिकार आहेत.

कलम- **14** नुसार कायद्यासमोर समानता, कलम-**15** नुसार धर्म, वंश ,जात ,लिंग किंवा जन्मस्थानयावरून भेदभाव करण्यास मनाई, कलम- **16** नुसार नोकरीची समान संधी, कलम- **39** नुसार उपजीविकेचे पुरेसे साधन मिळवण्याचा अधिकार व समान कामासाठी समान वेतन ,कलम- **42** नुसार मातृत्व मदतीसाठी तरतूद, कलम-**51**नुसार महिलांच्या प्रतिष्ठेला अपमान करणाऱ्या प्रथांचा त्याग ,कलम-**243**नुसार पंचायत आणि नगरपालिकांमध्ये महिलांसाठी राखीव जागा. या आणि अशा कितीतरी संविधानिक मूल्यांच्या बांधणीतून स्त्रीवाद जपलेला आहे. त्यामुळे **26** जानेवारी **1950** नंतर स्त्रीवादात स्त्रियांना तारणारे सर्वात मोठे तारणहारी शस्त्र म्हणून भारतीय संविधानाकडे पाहिले जाते.

2) **रूढी, प्रथा, परंपरा समाप्त:-**

धर्म व्यवस्थेने आणि त्या आधारित निर्माण झालेल्या समाज व्यवस्थेमध्ये अनेक रूढी, प्रथा, परंपरा निर्माण झाल्या. पूर्वजांनी एखादी गोष्ट केली म्हणजे ती जशास तशीच स्वीकारून त्याप्रमाणे वर्तन करणे हे अविवेकी असते. अशा बाबी रूढी, प्रथा, परंपरा यांना खतपाणी घालत असतात.बालविवाह,देवदासी,सतीप्रथा,केशवपनप्रथा या सर्व बाबी नामशेष झाल्यासारख्या प्रतीत होतात हे स्त्रीवादी दृष्टिकोनाचे फलित आहे.

3) **महिलांविषयी विविध कायद्यांची निर्मिती:-**

भारतीय संविधानिक मूल्यांना अनुसरून अनेक महिला संबंधित कायद्याची निर्मिती करण्यात आली. या कायद्याची पार्श्वभूमी अनेक स्त्रीवादी आंदोलनाची आहे. अनेक महिला संघटना यांच्याद्वारे वेळोवेळी सरकार दरबारी पाठपुरावा करून तर कधी अनेक सरकारने स्वयंप्रेरणेने महिलांसाठी अनेक कायदे निर्माण केले.द्विभार्या प्रतिबंधक कायदा-**1955**,वारसाहक्क कायदा-**1956**,घटस्फोटाचा कायदा-**1956**,पोटगीकायदा-**1956**, वेश्याव्यवसाय प्रतिबंधक कायदा-**1956**,अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंधक कायदा-**1956**,गर्भपात कायदा-**1971**,गर्भजल परीक्षण कायदा-**1988**,हुंडा प्रतिबंधक कायदा-**1961**,बलात्कार प्रतिबंधक कायदा-**1983**, समान वेतन कायदा-**1976**, प्रसूती लाभाचा कायदा-**1961**, मुस्लिम घटस्फोट कायदा-**1939**, स्त्री अश्लीलता प्रतिबंधक कायदा-**1986**, छेडछाड प्रतिबंधक कायदा-**1978**,मातृत्व लाभ कायदा-**1961**,राष्ट्रीय महिला आयोग अधिनियम-**1990**,प्रसवपूर्व लिंगनिदान तंत्र आणि दुरुपयोग प्रतिबंधक

कायदा-**1994**,कौटुंबिक हिंसाचारापासून स्त्रियांचे संरक्षण कायदा-**2005**,कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ(प्रतिबंध, मनाई, निवारण) कायदा-**2013** यासारखे अनेक कायदे बनविण्यात आले.

वरील कायद्यांची पाळेमुळे स्वातंत्र्यपूर्वीपासूनच आणि स्वातंत्र्यानंतर चालवलेल्या स्त्रीवादी चळवळीतून करण्यात आलेली आहेत.

4) **जगाशी संपर्क वाढला:-**

भारताच्या स्त्रीवादी संबंधित ज्या ज्या घडामोडी भारत देशात घडत होत्या त्याप्रमाणे खंडानुसार( जसे - आफ्रिकेतील स्त्रीवाद, युरोपातील स्त्रीवाद, उत्तर अमेरिकेतील स्त्रीवाद, दक्षिण अमेरिकेतील स्त्रीवाद ) स्त्रीवादाची चर्चा जगभर होत राहिली. या निमित्ताने मुलगामी स्त्रीवाद, मार्क्सवादी स्त्रीवाद ,सांस्कृतिक स्त्रीवाद , उदारमतवादी स्त्रीवाद या चार स्त्रीवादांच्या मुख्य प्रकारांची चर्चा झाल्याने महिलांचा जगाशी संपर्क वाढला. जगाशी संपर्क वाढण्यामागे वैचारिक आणि शैक्षणिक जागृती हे महत्त्वाचे कारण आहे. महिलांच्या जागतिक समस्यावर चिंतन करण्याचे बळ स्त्रीवादाने प्राप्त करून दिले.

5) **आत्मसन्मानाची निर्मिती :-**

स्त्रीवाद ही चळवळ आहे त्याचबरोबर ते व्यासपीठही आहे.या व्यासपीठाने अनेक महिलांमध्ये आत्मसन्मान निर्माण केला. कारण शेकडो वर्षापासून भारत देशातील महिला ह्या पुरुषसत्ताक मानसिकतेच्या दडपणाखाली जगत आल्या. मात्र भारत देशात चाललेल्या स्त्रीवादी चळवळीने येथील महिला शिक्षित करून त्यांच्यात आत्मसन्मानाची भावना निर्माण केली.

6) **शिक्षणात सुधारणा :-**

प्रत्येक खंड व त्यातील असणारे देश यांच्यात उभी झालेली स्त्रीवादी चळवळ व त्याचा पाया हा शिक्षणात आहे. स्त्रीवादाने शिक्षणाला सांभाळले आणि शिक्षणाने स्त्रीवादांना सांभाळले असे म्हणण्यास वावगे ठरणार नाही.

भारतासारख्या खंडप्राय देशात समाज सुधारकांनी केलेल्या शैक्षणिक क्रांतीचे फळ आता आधुनिक काळात **21** व्या शतकात पहावयास मिळत आहेत.महिला साक्षरता दराचे काही आकडे पुढीलप्रमाणे **1971-22.9%,1991-39.4%**, **2001- 54%**, **2011- 65.46%** या प्रमाणात गेल्या चार दशकात महिलांची साक्षरता वाढत गेली. अशाप्रकारे शिक्षणात सुधारणा झाली.ही सुधारणा सुद्धा स्त्रीवादाचे फळ असून महिलांच्या जीवनात बदल घडवून आणणारे प्रभावी साधन आहे.

7)**राजकारणात प्रतिनिधित्व:-**

भारताच्या स्त्रीवादाच्या इतिहासातील दुसऱ्या व तिसऱ्या टप्प्यात राजकारणात महिला प्रतिनिधित्वाचा मुद्दा वारंवार उपस्थित होत राहिला. त्यामुळे **73** व **74** व्या घटना दुरुस्तीनुसार स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये **33%** आरक्षण मिळाले. मात्र स्त्रीवादी भूमिका एकूण जनसंख्येच्या आम्ही 50% असल्यावर सुद्धा आम्हाला **33%** आरक्षण का ? हा प्रश्न उपस्थित करीत आहेत. त्याचबरोबर विधानसभा व लोकसभेत 50% आरक्षण मागत आहेत.देशाच्या स्त्रीवादाच्या पहिल्या टप्प्यात कुठेही नसणारी स्त्री आज प्रतिनिधित्वासाठी सजग आहे.

8) **आरोग्यात सुधारणा:-**

महिलांमध्ये आरोग्याप्रती जागृती वाढली आहे. सरकार सुद्धा महिलांप्रती अधिक सजगता दाखवत महिला आरोग्यात आणखी सुधारणा व्हावी यासाठी प्रयत्नरत आहे.महिलांसाठी शासकीय स्तरांवर विविध योजना राबविण्यात येत आहेत.अशाप्रकारे जीवनासाठी आवश्यक प्रत्येक अंगांना स्त्रीवादाने स्पर्श केला. त्यामुळे भारतीय महिलांवर झालेले सर्व परिणाम हे सकारात्मक झाले.एकंदरीत पूर्णपणे महिलांची परिस्थिती बदलली नसली तरी झालेला बदल हा समाधानकारक नक्कीच म्हणावा लागेल.

**निष्कर्ष:-**

* भारतातील स्त्रीवाद हा भारतातील पुरोगामी म्हणवल्या गेलेल्या समाजसुधारकांनी आणि विचारवंतांनी निर्माण केला. त्यासाठी त्यांना तत्कालीन समाज व्यवस्थेशी संघर्ष करावा लागला. समाजसुधारकांनी महिलांच्या एकूण

सक्षमीकरणासाठी लढा दिला.यात शैक्षणिक सक्षमीकरण महत्वपूर्ण होते. स्त्रीवादाच्या प्रथम टप्प्यात सुधारणा ह्या पूर्णपणे सामाजिक स्वरूपाचे असल्याने त्यांच्यात फार मोठ्या प्रमाणावर जागृती झाली.

* स्त्रीवादाचा परिपाक म्हणजे भारतीय संविधानात त्यांना पुरुषांप्रमाणे समान संधी व नागरिकत्वाचे सर्व हक्क,अधिकार प्राप्त झाले आणि कायदेशीररित्या स्त्री पुरुष समान आहेत हे सिद्ध झाले.

* स्त्रियांची कायदेशीर प्रगती झालेली दिसत असली तरी त्यांना मिळालेल्या संविधानिक हक्काच्या प्रत्यक्ष अंमलबजावणी मध्ये महत्त्वपूर्ण अंतर कायम राहिले असल्याचे निदर्शनास येते.

* स्त्रीवादाने महिलांच्या जीवनाच्या सर्वांना व्यापून टाकले आहे.तरीही जीवनाच्या विविधक्षेत्रात महिलांना अजूनही संघर्ष करावा लागतो.शिक्षण,रोजगार,राजकीय प्रतिनिधित्व आणि विविध संस्था महिला पुरुषांचे प्रमाण **50%** पहावयास मिळत नाही त्यात विषमता आढळते.

**शिफारशी:-**

**1)**स्त्रियांच्या समस्यांची जाणीव ही शिक्षण व्यवस्थेतून ,अभ्यासक्रमांमधुन विद्यार्थ्यांना होणे गरजेचे आहे.

**2)** स्त्रिया ह्या आर्थिक व शैक्षणिक समृद्ध झाल्या तर त्यांच्या समस्यावर बऱ्यापैकी तोडगा निघू शकतो. त्यामुळे शासकीय स्तरावरून आर्थिक व शैक्षणिक समृद्धीसाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

**3)** स्त्रियांची विक्री,अश्लील प्रदर्शन,वेश्याव्यवसाय यासारख्या बाबीसाठी ठोस उपाययोजना करण्यात यावी.

**4)** महिलांना स्वसंरक्षणाचे धडे देण्यात यावे.

**5)** स्त्रियांच्या आरोग्यासाठी विशेष लक्ष द्यावे. त्यासाठी सरकारने शासकीय स्तरावरून महिलांसाठी विविध उपाययोजना आखाव्यात.

**6)** महिलांसाठी तांत्रिक व व्यावसायिक अभ्यासक्रम निर्माण करावा जेणेकरून त्यांना रोजगाराच्या अधिकाधिक संधी प्राप्त होतील.

**संदर्भसूची**

**1)** भागवत विद्युत, 'स्त्री प्रश्नां'ची वाटचाल, प्रतिमा प्रकाशन,**8** मार्च **2004**

**2)** सिह वी.एन., सिह जनमेजय,'नारीवाद', रावत पब्लिकेशन,**2012**

3) डॉ. सौ. पाटील पद्मजा , डॉ. सौ. जाधव शोभना,'भारतीय इतिहासातील स्त्रिया', फडके प्रकाशन कोल्हापूर,**2011** सप्टेंबर

**4)** डॉ.पाटील शोभा,'स्त्रीवादी विचार आणि समीक्षेचा मागोवा',स्नेहवर्धन पब्लिकेशन पुणे, पहिली आवृत्ती **19** मार्च **2007**

**5)** खांडगे मंदा आणि इतर,' स्त्री साहित्याचा मागोवा',खंड-**2,** साहित्यप्रेमी भगिनी मंडळ, पुणे

# महाराष्ट्रातील जातीविषयक इतिहास लेखन मिमांसा

**डॉ. कौतिक एन. दांडगे.**
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग, श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्था, धुळे,
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शिंदखेडा

एकोणिसाव्या शतकापासूनच महाराष्ट्रामध्ये जातिसंस्थाविषयी मिमांसा सुरू होऊन त्या विषयीची प्रबोधनाची चळवळ सुरू झाली होती. वासाहतिक महाराष्ट्रातील प्रबोधन कालीन जातिविषयक विचार मिमांसा ही प्रामुख्याने ब्राह्मणी व अब्राह्मणी परंपरेच्या परस्परविरोधी वैचारिक भूमिकांमधून विकसित होत गेली. वासाहतिक महाराष्ट्रात विभिन्न इतिहास लेखन प्रवाहांनी जातीची मिमांसा केलेली आहे. इतिहास लेखनांच्या ब्राह्मणी परंपरेने जातीची मिमांसा ब्राह्मणी प्रभुत्वशाली चौकटीत करून शूद्र-अतिशूद्र आणि स्त्रियांच्या दुय्यमत्त्वांचा, गुलामीचा व दास्यत्वाचा इतिहास रेखाटला. ब्राह्मणी परंपरेतील सुधारणावाद्यांनी केलेली जातीची मिमांसा त्या काळाच्या संदर्भात पुरोगामी असली तरी ती जात, वर्ग, पितृसत्ताक समर्थकच होती. जातिमिमांसेच्या इतिहास लेखनामधील अब्राह्मणी परंपरेची वर्णजाती संस्थेला विरोध करणारी जातिमिमांसेची सुरूवात ही म. फुले यांनी विकसित करून इतिहासाची पुनर्मांडणी केली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वासाहतिक कालखंडात ब्राह्मणी इतिहास लेखनाला नकार देऊन दलितांमध्ये जातिविरोधी भान तीव्र करण्यासाठी इतिहासाची चिकित्सा करून इतिहासाच्या पुर्नउभारणीतून दलितांवर अंकित्वाची भावना लादणाऱ्या इतिहासाची मांडणी केली. आंबेडकरांनी ब्राह्मणी साहित्य, जातीचा उदय, शूद्राची स्थिती, स्त्रियांची स्थिती, हिंदुधर्म यांचा प्रामुख्याने अभ्यास करून दलितांवरइतिहासातून लादलेली गुलामी दूर करण्याचा व जातवर्ग विरोधी लढा तीव्र करण्याचा प्रयत्न केला. ब्रिटिशांच्या वासाहतिक ध्येय धोरणातून जातिवर्गाचे नवे समीकरण निर्माण झाले, ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लक्षात घेऊन ब्राह्मणी भांडवलशाही व्यवस्थेच्या विरोधात जातिअंतक राजकारण उभे केले होते. ब्राह्मणी धर्माच्या मूल्य चौकटीत निर्णायक नकार देऊन त्यांनी पर्यायी धम्म संस्कृतीच्या चौकटीत जातिसंघर्ष उभा केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनंतर जातिमिमांसेच्या इतिहास लेखनाविषयी विचारवंत व इतिहासकारांमध्ये समग्र भान होते. जातिव्यवस्थेमुळे निर्माण होणाऱ्या जटील प्रश्नांचा एकसंघटीत व नव्याने उकल करणे गरजेचे आहे, म्हणून महाराष्ट्रातील आंबेडकरांनंतर आजपर्यंतच्या जातिसंस्थेविषयीच्या विचार इतिहासलेखन मिमांसेची एकत्रित दखल घेणे आवश्यक आहे.

यामध्ये प्रामुख्याने मार्क्सवादी इतिहास लेखन प्रवाह, मार्क्स-फुले- आंबेडकरवादी इतिहास लेखन प्रवाह व आंबेडकरवादी इतिहासलेखन प्रवाह या इतिहासलेखन प्रवाहांनी आंबेडकरांनंतर जातिमिमांसाविषयक इतिहास लेखनाची मांडणी केली. यामध्ये विशेषतः एलिनार झेलिएट, नलिनी पंडित, गेल ऑम्व्हेट, मार्क्स-फुले-आंबेडकरवादी अन्वेषण पद्धत वापरून जातीचा शोध घेणारे शरद पाटील, रावसाहेब कसबे यांची नावे विशेषत्वाने पुढे येतात. आंबेडकरवादी अन्वेषण पद्धत वापरून जातिसंस्थाविषयक इतिहासाची मांडणी महाराष्ट्रामध्ये प्रामुख्याने अरुण कांबळे, बी.सी. कांबळे, राजा ढाले, नामदेव ढसाळ यांनी ही केलेली दिसते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनंतर महाराष्ट्रामध्ये जातिविषयक इतिहास मिमांसाही मार्क्सवादी आणि आंबेडकरवादी या दोन विचार परिघामध्येराहिली. या विचार प्रवाहांनी जातिसंस्थेबद्दल केलेले वैचारिक मंथन हे जातवर्ग, लिंगभाव व पितृसत्तेला विरोध करणारे राहिले. नलिनी पंडित, दामोधर कोसंबी या मार्क्सवादी विचारवंतांनी आपल्या वर्गीय इतिहास लेखन धारणेतून महाराष्ट्रातील जातिव्यवस्थेच्या प्रश्नांचा वेध घेण्याचा प्रयत्न केला. वर्णजाती विषयीचे दामोदर कोसंबीचे विश्लेषण हे सर्वात सखोल आणि व्यापक राहिले आहे. जातिसंस्थेची मार्क्सवादी मिमांसा सकस व समृद्ध करण्याचे श्रेय दामोधर कोसंबी यांना जाते. नलिनी पंडित यांनी 'जातिवाद अणि वर्गवाद' या आपल्या ग्रंथात जातवर्ग या संस्थांच्या द्वंद्वाची स्पष्टपणे मार्क्सवादी मिमांसा केली. गेल ऑम्व्हेट यांनी अपारंपारिक मार्क्सवादी दृष्टिकोनातून वर्ग जातिसंबंधीचे एक नवे विश्लेषण मांडले. मार्क्सवादी मिमांसेमध्ये वर्गवादी अन्वेषण पद्धतीबरोबरच फुले-आंबेडकर प्रणित जातिविरोधी अन्वेषण पद्धतीचा वापर करून जातिसंस्थेची मार्क्स-फुले- आंबेडकरवादी अशी इतिहास लेखनाची बहुप्रवाहवादी मिमांसा शरद पाटलांनी उभी केली आहे. आंबेडकरांनंतरच्या दलित चळवळीत जातिविरोधी भान तीव्र

स्वरूपात राहिले आहे. आंबेडकरी चळवळीतील विचारवंतांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विकसित केलेल्या वर्णजातिविरोधी इतिहास मिमांसेचे अनुकरण करून जातिसंस्थेविरोधी लढा प्रखर करण्यासाठी इतिहास लेखन केले. यात विशेषतः अरुण कांबळे, बी.सी. कांबळे, नामदेव ढसाळ, राजा ढाले यांचा उल्लेख करता येईल. दलितांनी केलेल्या या इतिहास लेखनामध्ये जातिसंघर्ष ठळकपणे दिसतो. त्यांनी ब्राह्मणी इतिहास लेखनातून लादल्या गेलेल्या जातीची उतरंड, स्त्री दास्याचे समर्थन नाकारले. आंबेडकरवादी विचारवंतांच्या लिखाणातून जातिसंघर्षाच्या चौकटीत जातिमिमांसेचे इतिहास लेखन विकसित होत राहिले.

**डॉ. आंबेडकरांनंतरची दलित चळवळ**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनंतर दलित चळवळीच्या दुसऱ्या टप्प्यात अनेक कार्यकर्त्यांनी योगदान दिले. त्यात दादासाहेब गायकवाड, जी. टी. मेश्राम, सी. एन. शिवराज, बी. सी. कांबळे, आर. एस. गवई, बलवंतराव वराळे, बी. जी. खोब्रागडे, हरीहर सोनुले इत्यादींचा समावेश होता. डॉ. आंबेडकरांनी आर्थिक व राजकीय स्वरूपाचे प्रश्न सोडवण्यासाठी नागपूर येथे व्यापक तत्त्वज्ञानावर आधारित नव्या रिपब्लिकन पक्षाची स्थापना करणार अशी घोषणा केली होती. त्याप्रमाणे त्यांच्या अनुयायांनी 3 ऑक्टोबर 1957 रोजी 'शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन' बरखास्त करून एन. शिवराज यांच्या अध्यक्षतेखाली 'अखिल भारतीय रिपब्लिकन पक्ष' स्थापन केला. रिपब्लिकन पक्षाच्या वतीने दादासाहेब गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली भूमिहीनांचा सत्याग्रह घडवून आणला. त्यामुळे असंख्य दलित व भूमिहीनांना सरकारी पडीक जमिनी मिळाल्या. एका अर्थाने दलित, आदिवासी व शोषित माणसाला आर्थिक व सामाजिक न्याय मिळाला. पुढील काळात दलित चळवळीचे नेतृत्त्व, भावी कार्यक्रम, इतर पक्षांशी करावयाचे सहकार्य इत्यादी मुद्द्यांवरून रिपब्लिकन पक्षात फूट पडली. त्यामुळे निराश झालेल्या दलित सुशिक्षित तरुणांनी साहित्य निर्मिती करून सांस्कृतिक बदल घडवून आणण्याचा प्रयत्न केला. त्यातूनच 'दलित साहित्याची चळवळ' उदयास आली.

**दलित साहित्य चळवळ –**

अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, बाबूराव बागूल यांच्यापासून दलित साहित्यामध्ये आधुनिक प्रवाह निर्माण झाला. त्यांच्या कथांमधून पददलितांचे दुःख व दैन्य वस्तुनिष्ठपणे मांडले गेले. डॉ. आंबेडकरांच्या नंतर दुसऱ्या पिढीतील लेखकांच्या लिखाणात बंडखोरी व विद्रोह दिसून येतो. बाबुराव बागूल लिखित 'जेव्हा मी जात चोरली होती' या विद्रोही कथासंग्रहाने बंडखोरीचा प्रथमतः पुरस्कार केला होता. तसेच केशव मेश्राम यांच्या कादंबऱ्यांमधून अस्पृश्यांना गावकुसाबाहेर कसे फेकले जाते ते लक्षात येते. या सोबत प्रकाश आंबेडकर, राजा ढाले, जोगेंद्र कवाडे, नामदेव ढसाळ, यशवंत मनोहर, गंगाधर पानतावणे, दया पवार, वामन निंबाळकर, प्र. इ. सोनकांबळे, योगीराज वाघमारे, ना. रा. शेंडे, अविनाश डोळस, अर्जुन डांगळे, प्रकाश खरात, शरणकुमार लिंबाळे - इत्यादींच्या लिखाणातून दलितांच्या वास्तव जीवनाचे व चळवळीचे हुबेहूब चित्रण रेखाटलेले आहे. दलित चळवळीच्या वैचारिक बांधणीत दलित साहित्य चळवळीचे फार मोठे योगदान आहे. दलित साहित्याच्या माध्यमातून दलितांवर झालेले अन्याय, अत्याचार, वेदना, दुःख आदींना वाचा फोडण्याचे महान कार्य दलित साहित्यिकांनी पूर्णत्वाला नेले. रिपब्लिकन पक्षातील गटबाजीमुळे दलित नेते व अनुयायांमध्ये असंतोष निर्माण झाला. महाराष्ट्रात दुष्काळाचे सावट निर्माण झाले. त्यामुळे दलित समाज हालअपेष्टा व उपासमारीने होरपळून निघाला. दलितांवर होणाऱ्या अत्याचारांत वाढ झाली. या सर्व परिस्थितीचा परिणाम म्हणून दलित तरुणांनी पुढाकार घेऊन आक्रमक पद्धतीची लढाऊ 'दलित पँथर' या नावाची संघटना स्थापन केली.

'दलित पँथर'ची स्थापना 9 जुलै 1972 रोजी झाली. डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा वारसा सांगणारा रिपब्लिकन पक्ष सत्ता, स्वार्थ, अंतर्गत गटबाजीने पोखरून निघाला होता. दलितांचे प्रश्न स्वातंत्र्य प्राप्तीनंतरही सुटले नव्हते. खुद्द दलितांचा रिपब्लिकन पक्षावरील विश्वास कमी झाला होता. त्यामुळे दलित पँथरला दलितांमध्ये लोकप्रियता मिळाली. दलित पँथरच्या स्थापनेत नामदेव ढसाळ, ज. वि. पवार, राजा ढाले, रामदास सोरटे, रामदास आठवले, अरुण कांबळे, लतीफ खाटीक, अर्जुन डांगळे, प्रितमकुमार शेगावकर, गंगाधर गाडे, टी. एम. कांबळे, भाई संगारे, प्रल्हाद चेंदवणकर, अविनाश महातेकर, वामन निंबाळकर, जयदेव गायकवाड, उमाकांत रणधीर इत्यादींचे योगदान मोलाचे होते. दलित पँथरची स्थापना ही त्यावेळेसच्या प्रस्थापित दलित नेतृत्वासंबंधीची एक कडवी प्रतिक्रिया होती. दलित तरुणांमधील चैतन्य व सामर्थ्य जागृत करणारी चळवळ म्हणून दलित पँथरचे स्थान होते. डॉ. आंबेडकरांच्या विचारांच्या पायावरच दलित पँथर

चळवळ उभारली होती. दलित पँथरने आपली घटना व कार्यक्रम घोषित केला होता. तरुणांच्या मनात एक नवा आशावाद व एक नवी उर्मी निर्माण केली. एक राजकीय, सामाजिक दबाव गट म्हणून दलित पँथरने महत्त्वपूर्ण कार्य केले.

**मराठवाडा विद्यापीठ नामांतर आंदोलन - मराठवाडा**

विदयापीठास डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव दयावे म्हणून 1977 पासून नामांतर चळवळ सुरू झाली. प्रथम ही मागणी दलित पँथरचे सरचिटणीस गंगाधर गाडे यांनी 7 जुलै 1977 रोजी केली. या मागणीच्या पूर्ततेसाठी एक कृती समिती स्थापन झाली. त्यात युवक क्रांतीदल, युवक काँग्रेस, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, जनता युवक आघाडी, समाजवादी क्रांतीदल, एस. एफ. आय, ए. आय. एस्. एफ., दलित युवक आघाडी, युवा रिपब्लिकन, दलित पँथर, पुरोगामी युवक संघटना इत्यादी विदयार्थी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सहभाग घेतला होता. विद्यार्थी आंदोलनाच्या दबावामुळे 18 जुलै 1977 रोजी मराठवाडा विदयापीठाच्या कार्यकारिणीने नामांतराचा ठराव एकमताने मंजूर केला. मुख्यमंत्री ना. शरद पवार यांच्या काळात महाराष्ट्र विधान सभा व विधान परिषदेत 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ' असे नाव देण्याचा प्रस्ताव सर्वानुमते बिनविरोध संमत करण्यात आला. या ठरावानंतर नामांतर आंदोलनाला हिंसक वळण लागले. 1978 पासून 1994 पर्यंत संपूर्ण महाराष्ट्र नामांतर आंदोलने व प्रति आंदोलने इत्यादींमुळे ढवळून निघाला. नामांतर लढ्यासाठी 6 डिसेंबर 1979 चा औरंगाबाद येथील लाँग मार्च (समता दिंडी), 24 ते 30 मे 1982 काळात महाराष्ट्रात झालेले जेल भरो आंदोलन, 1983 या वर्षात जागोजागी झालेल्या नामांतर परिषदा, 1985, 1986 आणि 1988 मध्ये विधी मंडळाने संमत केलेल्या ठरावाची अंमलबजावणी शासनाने करावी या मागणीसाठी काढलेले विधानसभेवरील मोर्चे संस्मरणीय ठरले.

या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री ना. शरद पवार यांनी 13 जानेवारी 1994 रोजी सायंकाळी 7.45 वाजता दूरदर्शनवरून मराठवाडा विद्यापीठाचा 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ' असा नामविस्तार झाल्याचे घोषित केले. त्याप्रमाणे 14 जानेवारी 1994 पासून मा. राज्यपालांनी काढलेल्या अध्यादेशाद्वारे औरंगाबादचे विदयापीठ 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ' या नावाने ओळखले जाऊ लागले. तसेच त्याच दिवशी नांदेड येथे 'स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ' या नावाने नवीन विद्यापीठ सुरू करण्याची घोषणा केली. नामांतराच्या लढ्यात काही तरुणांनी आत्मदहन करून घेतले. नामविस्ताराच्या घोषणेनंतर मराठवाड्यातील आणि महाराष्ट्रातील बौद्ध, दलित जनतेने मुख्यमंत्र्यांच्या आवाहनाला प्रतिसाद दिला. तसेच नामांतर विरोधकांनीही या प्रसंगी समंजस व प्रगल्भ भूमिका घेतल्यामुळे वातावरण शांत झाले. समतेच्या तत्त्वासाठी सुमारे दोन दशके चाललेल्या संघर्षाचे पर्व संपले. 20 व्या शतकाचा उत्तरार्ध हा दलित चळवळीच्या परमोच्च यशाचा कालखंड म्हणून ओळखला जातो.

**संदर्भ :-**

1. आंबेडकर बी.आर., मून वसंत (संपा.) डॉ. बाबासाहेब आंबेडकर राईटिंग्स अॅण्ड स्पिचेस, खंड-1, शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, 1979.
2. आंबेडकर बी.आर., जातिप्रथेचे विध्वंसन (अनु. गौतम शिंदे), सुगावा प्रकाशन, पुणे, 2014.
3. कार ई. एच. (अनु.), प्रा. वि. गो. लेले, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.
4. तेलतुंबडे आनंद (अनु. सहा. मिलिंद भवार), साम्राज्यवाद विरोध आणि जातिविनाश, सुगावा प्रकाशन, पुणे, 2007.
5. जोगदंड पी.जी., दलित मुव्हमेंट ऑफ महाराष्ट्रा, कनक प्रकाशन, नवी दिल्ली, 1991.
6. पाटील शरद, मार्क्सवाद-फुले-आंबेडकरवाद, सुगावा प्रकाशन, पुणे, 1993.
7. पाटील शरद, जातिव्यवस्थाक सामंती सेवकत्व, सुगावा प्रकाशन, पुणे, 1996.
8. पंडित नलिनी, जातीवाद आणि वर्गवाद, साधना प्रकाशन, पुणे, 1965.
9. पंडित नलिनी, स्वातंत्र्योत्तर दलितांचा प्रश्न, साधना प्रेस, पुणे, 1973.
10. पंडित नलिनी, आंबेडकर, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, 2006.
11. कसबे रावसाहेब, मार्क्स आणि आंबेडकर, सुगावा प्रकाशन, पुणे, 2006.
12. ऑम्व्हेट गेल, दलित अॅण्ड डेमोक्रटिक रेव्होल्युशन, सेज पब्लिकेशन, दिल्ली, 1994.
13. ऑम्व्हेट गेल (अनु. पी. डी. दिघे), वासाहतिक समाजातील सांस्कृतिक बंड, सुगावा प्रकाशन, पुणे, 1995.

# राष्ट्रवादी इतिहास लेखन प्रवाह

**प्रा. डॉ. प्रवीण चव्हाण**
इतिहास विभाग प्रमुख
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय सिल्लोड

रणजित गुहा यांनी भारतीय इतिहास 1987 वरील एस.जी. देउस्कर व्याख्यानांमध्ये बंकिमचंद्रांचा उल्लेख केला आहे ज्यांनी 1880 मध्ये म्हटले होते, "एक राष्ट्र बनण्यासाठी, देशाचा स्वतःचा इतिहास असणे आवश्यक आहे." ब्रिटीश राज्यकर्त्यांनी सत्ता आणि मालमत्ता यांच्यातील संबंध शोधण्याचा प्रयत्न केला: जमिनीची मालकी कोणाकडे होती - राजा किंवा जमीनदार वर्ग याचे उत्तम उत्तर म्हणजे अलेक्झांडर डाऊ यांचे सुप्रसिद्ध कार्य, 1768-72 मध्ये तीन खंडांमध्ये प्रकाशित झालेले द हिस्ट्री ऑफ हिंदुस्तान हे या प्रकारातील सर्वोत्तम उदाहरणांपैकी एक आहे. त्याचप्रमाणे ग्रँटद्वारे राजकीय अर्थव्यवस्थेवरील काम आणि तिसरे म्हणजे, स्थानिक अहवालांमध्ये जमीनदाराने राज्याला किती वाटा दिला यावर लक्ष केंद्रित केले? ही कथा एकत्रितपणे भारताच्या वसाहतवादी इतिहासलेखनाची सुरुवात करतात. अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात ब्रिटीश लेखकाने लिहिलेला कोणताही भारतीय इतिहास नव्हता, ज्यामध्ये अशा संघर्षाची चिन्हे दिसत नाहीत.[1] मिलच्या हिस्ट्री ऑफ ब्रिटिश इंडियाच्या प्रभावाखाली एकोणिसाव्या शतकात हे प्रवचन वाढले. अशा प्रकारे भारतीय भूतकाळाला ऐतिहासिक बनवण्याचा प्रयत्न केला गेला. त्याचा उद्देश इतिहासलेखनाला चालना देणे इतका नव्हता की ईस्ट इंडिया कंपनीला महसूल गोळा करण्याचे तंत्र बदलता आले. ते शिक्षणाच्या नवीन पॅटर्नद्वारे होते ज्याचा वापर करून त्यांनी वसाहतीत लोकांचा जिवंत भूतकाळ स्वत:साठी योग्य करण्यासाठी मध्यमवर्गाचे शोषण केले.[2]

दुसरीकडे आर.सी. मजुमदार लिहितात, "एकोणिसाव्या शतकाच्या सुरूवातीस हिंदूंना त्यांच्या स्वतःच्या इतिहासाबद्दल काहीच माहिती नव्हती आणि त्यांची पुनर्रचना करण्याचे त्यांचे सुरुवातीचे प्रयत्न केवळ असंस्कृतच नव्हते तर जवळजवळ हास्यास्पद होते. परिणामी भारतीय इतिहासावरील पहिल्या इंग्रज लेखकांना प्राचीन भारताचे फारच कमी ज्ञान होते, आणि त्यांच्याकडे इतिहासलेखनाच्या बऱ्यापैकी विकसित कल्पना होत्या तरीही त्यांनी प्राचीन भारताची सर्व खाती फारच कमी होती आणि काहीवेळा भारताच्या इतिहासाबाबत फारसे दुर्लक्ष केले. म्हणूनच, प्राचीन भारताचा इतिहास, एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत, अतिशय संक्षिप्त पद्धतीने हाताळला गेला आणि मुख्यतः मुहम्मद आणि ब्रिटिश कालखंडाच्या इतिहासाची पार्श्वभूमी म्हणून. "[3]

कोणत्याही भारतीय इतिहासकाराने संपूर्ण सत्य उघड करण्याचे धाडस केले नाही जेव्हा ते सरकारला दुखावण्याची शक्यता असते आणि हे कोणत्याही भारतीयाने लिहिलेल्या ब्रिटीश काळातील खऱ्या इतिहासाची आभासी अनुपस्थिती दर्शवते. हिस्ट्री ऑफ शीख (कलकत्ता, 1904) चे लेखक ब्रिटीश डी. कनिंगहॅम यांनाही 1849 मध्ये पहिल्यांदा दिसला होता, याला कठोरपणे सामोरे जावे लागले आणि त्यावेळचे गव्हर्नर जनरल, मार्क्विस ऑफ डलहौसी यांनी त्याचे प्रकाशन करणे गुन्हा ठरवले, कनिंगहॅमला त्याच्या नोकरीवरून काढून टाकले ज्यामुळे त्याचे हृदय तुटल्याने त्याचा मृत्यू झाला.

अठराव्या शतकापासून भारतीय इतिहासाचे विवेचन युरोपीय दृष्टिकोनातून केले गेले आहे, विशेषतः ब्रिटिश इतिहासकारांनी ज्यांनी प्रारंभिक इतिहासलेखन आधार प्रदान केला आहे. जेम्स मिलने सर विल्यम जोन्स सारख्या प्राच्यविद्येने सांगितलेल्या वस्तुस्थितीकडे पूर्णपणे दुर्लक्ष करून वांशिक आणि राजकीय दोन्ही कारणांवरून हिंदूंविरुद्ध मोठ्या पूर्वग्रहाने लिहिले. त्याचप्रमाणे व्ही.ए. स्मिथचे काम अर्ली हिस्ट्री ऑफ इंडिया हे जरी एक शतक नंतर प्रकाशित झाले आणि नवीनतम संशोधन आणि पुरातत्व संशोधनांच्या आधारे लिहिलेले असल्याचा दावा केला गेला, तर भारतीय सिव्हिल सर्व्हिसच्या एका ब्रिटीश सदस्याचा आवाज आम्ही ऐकतो स्मिथ अलेक्झांडरला

युरोपियन म्हणून आणि पुरूला एशियाटिक आर्मीचा प्रतिनिधी म्हणून प्रोजेक्ट करतो. "हिमालयापासून समुद्रापर्यंत अलेक्झांडरच्या विजयी प्रगतीने युरोपियन कौशल्य आणि शिस्तीचा सामना करताना महान आशियाई सैन्याची उपजत कमकुवतता दर्शविली." त्याचप्रमाणे स्मिथने हर्षवर्धनोत्तर कालखंडाचे वर्णन "भारतीय क्षुद्र राज्यांचे विस्मयकारक इतिहास" असे केले आहे. आर्य वंशाचा सिद्धांत इराणी अवेस्तान आणि वैदिक संस्कृत ग्रंथांमध्ये आढळणाऱ्या आर्य या शब्दाच्या आधारे तयार करण्यात आला होता, त्याला वांशिक अर्थ देण्यात आला होता, ज्याचे वर्णन इंडो-युरोपियन वंशाची एक शाखा म्हणून करण्यात आले होते, ज्याने ईसापूर्व दुसऱ्या सहस्राब्दीमध्ये स्वदेशी लोकांवर विजय मिळवला होता. आणि वैदिक आर्य संस्कृतीची स्थापना केली. परिणामी भारतीयांमध्ये आर्य आणि द्रविड द्वंद्व निर्माण झाले.[4]

19व्या शतकाच्या सुरुवातीला जेम्स मिलच्या हिस्ट्री ऑफ ब्रिटीश इंडियाच्या प्रकाशनासह मिलच्या उपयुक्ततावादाने योग्य कायदेशीर कायदा लादून भारतीय समाजात आमूलाग्र बदल करण्याची शिफारस केली. आणि भारतातील प्रशासकीय व्यवस्था. मिल च्या मध्ये देखील निहित इतिहास, ओरिएंटल डिस्पोटिझमचा सिद्धांत होता, मध्यवर्ती प्रश्न, फ्रान्स आणि इंग्लंडच्या समानतेवर, तसे पाहिले गेले जमिनीतील खाजगी मालमत्तेची आणि जमिनीची राज्य मालकी होते खाजगी अधिकाराचा अभाव असल्याचे कायम ठेवले जमिनीतील मालमत्ता, जी सामाजिक आणि आर्थिक मॉडेल बनली रचना राजा शिखरावर दिसला, आणि स्वावलंबी, पायथ्याशी अलिप्त गाव समुदाय. अधिशेष होता. नोकरशाही आणि प्रक्रियेद्वारे शेतकऱ्यांकडून गोळा केले जाते पुनर्वितरण द्वारे विनियुक्त केले जात, लक्षणीय, द्वारे राजा आणि दरबार आणि म्हणूनच ओरिएंटल कोर्टांची विलक्षण संपत्ती.

राष्ट्रवादी ऐतिहासिक लेखनाने इतर गोष्टींबरोबरच भारतीय समाजासाठी धर्माचे महत्त्व हा विषय घेतला. भारतीय इतिहासकारांनी राष्ट्रीय भावनेने आणि देशभक्तीच्या भावनेने लिहिले, ज्याने सद्गुण वाढवले आणि त्यांच्या स्वतःच्या लोकांचे दोष कमी केले. मिलच्या इतिहासाच्या पानांवरील भारतीयांच्या अवाजवी अवमूल्यनाच्या विरोधात हे अंशतः प्रतिगामी लेखन होते आणि अंशतः राष्ट्रीय चेतनेच्या वाढीचा आणि त्यांच्या राजकीय स्थितीत सुधारणा करण्याच्या इच्छेचा परिणाम होता. स्वातंत्र्य चळवळीदरम्यान पाठपुरावा केलेल्या राजकीय सुधारणांच्या चळवळीमुळे या दोषांना गती मिळाली. उदाहरणार्थ, के.पी. जयस्वाल यांनी त्यांच्या हिंदू राजकारणात प्रजासत्ताक आणि अल्पसंख्यक सरकारच्या अस्तित्वावर आवाज उठवला आणि प्राचीन भारतातील सरकारच्या संसदीय स्वरूपाच्या सिद्धांतासाठी ब्रिटीश इतिहासकारांच्या वारंवार केलेल्या घोषणांच्या विरोधात ठामपणे सांगितले की प्राचीन भारतातील शासनाचा एकमात्र प्रकार निरंकुशशाही आहे. [5] मध्ययुगीन भारताच्या संदर्भात, हिंदू धर्माप्रती मुस्लिम राज्यकर्त्यांच्या कट्टरतेचा आणि असहिष्णुतेचा संपूर्ण अध्याय पुन्हा लिहिण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला गेला." मजुमदार म्हणतात की हे हिंदू आणि मुस्लिमांना एकत्र आणण्याच्या राजकीय हेतूने इंग्रजांच्या विरुद्ध लढण्यासाठी प्रेरित केले होते. दुसरे उदाहरण त्यांनी दिलेला इतिहास उद्धृत केला की मुस्लिम राज्यकर्त्यांनी राष्ट्रीय काँग्रेसच्या आश्रयाने भारतीय राज्यकारभाराचा भंग केला. कोणत्याही हिंदू मंदिरात आणि धर्माच्या बाबतीत ते सर्वात सहिष्णु होते असे प्रतिपादन केले आणि पुढे त्यांनी गझनीच्या कट्टरता आणि धर्मांधतेचा तसेच औरंगजेबवर आणलेल्या हिंदू मंदिरे तोडण्याच्या आरोपाला एक विवादित मुद्दा म्हणून दोषमुक्त करण्याची उदाहरणे उद्धृत केली. त्याचप्रमाणे उशीरा के.एम. अश्रफ यांनी हे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला की हिंदू आणि मुस्लिमांमध्ये सांस्कृतिक संघर्ष नव्हता. लाला यांचेही असेच प्रतिपादन आहे लजपत राय म्हणाले, "भारतातील मुस्लिम राजवट परकीय नव्हती नियम".[6] मजुमदार पुढे म्हणतात: "ब्रिटिश काळात, राष्ट्रीय भावना पूर्वग्रहदूषित झाल्यामुळे अनेक भागांचा शांत विचार केला गेला. त्यापैकी दोन आहेत: (१) ब्लॅक होल शोकांतिका आणि सिराजू-दौलाचे पात्र; आणि (2) 1857 च्या उद्रेकाचे स्वरूप. इतिहासकारांवर वांशिक किंवा राष्ट्रीय भावनांचा प्रभाव पडला आहे. त्याचप्रमाणे,

आर्थिक आणि प्रशासकीय व्यवस्थेशी संबंधित अनेक प्रश्न ज्यात जवळजवळ सर्वच ब्रिटीश आणि भारतीय विचार राष्ट्रीय किंवा देशभक्तीच्या भावनांनी कमी-अधिक प्रमाणात प्रभावित झाले आहेत."

राष्ट्रवादी इतिहास लेखन एक ऐतिहासिक लेखन शैली आहे जो राष्ट्र आणि राष्ट्रीय ओळख केंद्रात राखकर इतिहासाची व्याख्या सांगते. हे प्रवाह 19वी आणि 20वी शतकामध्ये युरोप आणि अन्य संयुक्त राष्ट्र-निर्मिती प्रक्रियेसह उभरा. हा उद्देश राष्ट्रीय एकता, गौरव आणि स्वाभिमान प्रस्ताव देना आहे. भारत में भी राष्ट्रवादी इतिहास लेखनाचा प्रभाव दिसून येतो.

**निष्कर्ष:**

राष्ट्रवादी इतिहास लेखन ने राष्ट्रीय एकता आणि स्वाभिमान प्रस्तावात महत्त्वपूर्ण भूमिका निभाई आहे, परंतु त्याच्या सीमा देखील आहेत. आधुनिक इतिहास लेखनात जुळवून घेणे आणि बहु-आयामी दृष्टिकोन स्वीकारणे आवश्यक आहे.

**संदर्भ:-**

1. रणजित गुहा, भारताचे भारतीय इतिहासलेखन, कलकत्ता, 1988, पृ.1.
2. आर.सी. मजुमदार, हिस्टोरियोग्राफी इन मॉडर्न इंडिया, बॉम्बे, 1970, पृ. 5-6.
3. कित्ता. p 42.
4. रोमिला थापर, इंटरप्रीटिंग अर्ली इंडिया, OUP, दिल्ली, 1997 आवृत्ती, p.3.
5. आर.सी. मजुमदार, op.cit., pp. 47-48.
6. कित्ता. pp. 48-49.

# छत्रपती शिवाजी महाराज आणि पोर्तुगीज संबंध : एक अध्ययन

**नारायण अशोक काळे**
संशोधक विद्यार्थी
संशोधन केंद्र, प्रतिष्ठान महाविद्यालय पैठण

**प्रा. डॉ. केशव अंबादास लहाने**
मार्गदर्शक

**प्रस्तावना :**

सतराव्या शतकापर्यंत भारताच्या विदेशी व्यापाराला एक नवी दिशा ज्या देशाकडून मिळाली तो देश म्हणजे पोर्तुगीज होय. मराठा सत्तेच्या दृष्टीने इतर पाश्चात्य राष्ट्रापेक्षा पोर्तुगीज राष्ट्राचे स्थान सागरी सत्तेच्या आणि व्यापाराच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे होते. पोर्तुगीज खलाशी वास्को दि गामा इ.स. 1498 ला भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर उतरून नवीन व्यापारी मार्गाचा शोध लावला. या सागरी मार्गाने पुढे पाश्चात्त्य राष्ट्रांचा व्यापार वाढीस लागला. सोळाव्या शतकाच्या आपल्या आरमारी सामर्थ्याच्या जोरावर पोर्तुगीजांनी भारताच्या सागरी व्यापारावर एकाधिकार प्राप्त केलेला होता. "भारतातील बलाढ्य असलेली मोगलांची सत्ता व इतर लहान मोठ्या सत्ता सागरी आरमारांमध्ये कमकुवत होत्या व त्यांनी आरमार उभारणी व आरमाराचा विकास घडवून आणला नाही. म्हणूनच मोगल राजसत्तेलाही मक्केस जाणाऱ्या आपल्या यात्रेकरूंच्या सुरक्षिततेसाठी पोर्तुगीज युरोपियन आरमाराचे संरक्षण घ्यावे लागत असे."[1]

तात्कालीन अस्तित्वात असलेल्या सत्तांपेक्षा शिवाजी महाराजांचे वेगळेपण सागरी आरमार उभारण्यात दिसून येते. शिवाजी महाराजांनी पोर्तुगीज व इतर विदेशी सत्तेची शक्ती ही आरमारात आहे आणि त्यांना सामोरे जाण्यासाठी स्वतःचेही आरमार उभारावे लागेल. हे लक्षात आले व त्यांनी आरमार उभारणी सुरुवात केली. मात्र इतर सत्तांनी तसे केलेले दिसत नाही.

**विषयप्रवेश :**

"पोर्तुगीजांच्या वखारी कालिकत पासून उत्तरेकडे गोवा, राजापूर, चौल, कल्याण, मुंबई व सुरत पर्यंत होत्या. या सर्व ठिकाणावरून ते व्यापार करीत होते आणि इतर सर्व सत्तांना सागरी व्यापार करण्यासाठी पोर्तुगीजांकडून व्यापारी परवाने घ्यावे लागत असत."[2]

हिंदी महासागराच्या इतर देशांच्या किनाऱ्यावरही पोर्तुगीजांच्या 40 ते 50 वखारी होत्या. या सर्व वखारीचा भौगोलिक दृष्ट्या विचार केला तर लक्षात येते की, पोर्तुगीजांना पूर्वेकडील संपूर्ण व्यापारावर आपले वर्चस्व प्रस्थापित केले होते. शिवाजी महाराजांच्या आरमार उभारणीच्या जवळपास दीड शतकाअगोदर भारतात स्थापन झालेली ही सागरी सत्ता इतर सत्ताप्रमाणे स्वराज्य विस्तारात अडथळा बनणार हे शिवाजी महाराजांना माहीत होते. म्हणून ज्यावेळी त्यांचा समुद्रकिनाऱ्यापर्यंत साम्राज्यविस्तार होत गेला. तेव्हा त्यांनी आरमार उभारणीस तातडीने सुरुवात केली. पोर्तुगीजांचे सागरी सत्तेवर असलेले वर्चस्व आणि जहाज उभारणीत असलेली कुशलता यामुळे शिवाजी महाराजांनी प्रारंभी पोर्तुगीजांशी जूळवून घेऊन आरमार उभारणीसाठी पोर्तुगीज कारागीर लोकांची मदत घेतली. परंतु आरमाराचा विस्तार होऊ लागला. तसतसे शिवाजी महाराजांच्या धोरणांवर पोर्तुगीजांना शंका येऊन त्यांनी आपल्या कारागीर लोकांना जहाज बांधण्यासाठी मराठ्यांना मदत न करण्याचा आदेश काढला.[3]

पोर्तुगीज एकाचवेळी अनेक सत्तांशी संबंध ठेवून आवश्यक तेव्हा ज्या सत्तेपासून धोका अथवा फायदा असेल अशा सत्तेशी एकाच वेळी हातमिळवणी करीत तर दुसऱ्या सत्तेशी युद्ध करीत असत. यामुळे त्यांना व्यापार करून नफा होत असे तेवढाच नफा एखाद्या सत्तेला दिलेल्या पाठींबा किंवा त्या-त्या सत्तेला पुरवलेली शस्त्रे यातून होत असे. जेव्हा शिवाजी महाराजांनी दंडपुरीला वेढा घातला. तेव्हा पोर्तुगीजांनी सिद्दींना धान्य व दारुगोळा यांची मदत केली ह्या मदतीमुळे शिवाजी महाराजांना जंजिरा किल्ला जिंकता आला नाही."[4]

शिवाजी महाराजांची कोकणात सत्ता वाढू नये असे पोर्तुगीजांना वाटत होते. कारण पश्चिम किनाऱ्यावर गोवा ते सुरत पर्यंत व्यापार करण्यास तो मोठा अडथळा ठरणार होते. म्हणून त्यांनी सतत अप्रत्यक्षपणे शिवाजी महाराजांविरोधी इतर सत्तांना मदत करीत राहिले. कोकणातील लखम सावत आणि केशव नाईक, केशव प्रभू यांना गुप्त पाठिंबा देऊन गोवा

शहरात राहण्यास मदत केली. तसेच विजापूरच्या वजीर बहलोल खान यासही मदत केली. एवढ्यावरच पोर्तुगीजांचे समाधान न होता त्यांनी बळजबरीने हिंदूंना ख्रिश्चन बनविण्यास सुरुवात केली. लखम सावतला गोव्यात ठेवून वेळ शिवाजी महाराजांच्या परिसरावर आक्रमण करून लोकांना त्रास देत असे गावे जाळणे गुरे पळविणे जंगलांना आगी लावणे इत्यादी गोष्टी सततच्या झाल्या होत्या.[5]

ह्या घडत असलेल्या घटना शिवाजी महाराजांना पोर्तुगीजांशी संघर्ष करण्यासाठी प्रवृत्त करू लागल्या. त्यातच एक महत्त्वाची घटना घडली इ.स. 1667 ला पोर्तुगीजांनी गोव्यात रोमन कॅथलिक धर्माशिवाय इतर धर्माचे आचरण करण्यास बंदी घातली.[6]

त्या बंदीमुळे हिंदू लोक भयभीत झाले आणि गोवा या ठिकाणी व्यापार कसा करावा हा प्रश्न निर्माण झाला. कारण गोवा या ठिकाणी छोटा मोठा व्यापार करणारे भारतीय लोक मोठ्या प्रमाणात राहत होते. त्यामध्ये कोळी, कातकरी, साळी आणि कोकणातील काही आदिवासी हे व्यापार करीत.[7]

शिवाजी महाराजांनी या कायद्याला विरोध करत बारदेशवर स्वारी केली आणि काही ख्रिश्चन पादऱ्यांना पकडून केलेला कायदा मागे घेण्यास सांगितले. मात्र पादऱ्यांनी नकार दिला. तेव्हा शिवाजी महाराजांनी त्यांची डोके उडविण्याची आज्ञा दिली. या कृत्यामुळे पोर्तुगीजांनी आपला कायदा मागे घेऊन शिवाजी महाराजांची वाटाघाटी करण्यास तयार झाले.[8]

ही वाटाघाटी तात्पुरती ठरली असली तरी ती स्वराज्याच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची ठरली. कारण ज्या सत्तेचे सागरी सत्ता व व्यापारावर अमर्याद शक्ती होती, त्या सत्तेला शिवाजी महाराजांसमोर माघार घ्यावी लागली होती आणि 1 डिसेंबर 1667 रोजी पोर्तुगीजांनी शिवाजी महाराजांशी मैत्रीचा तह केला हा तह केला हा तह अतिशय महत्त्वाचा ठरला.

**1 डिसेंबर 1667 रोजी पोर्तुगीजांनी शिवाजी महाराजांशी मैत्रीचा तह :**

या तहाच्या अटी पुढीलप्रमाणे -

१. शिवाजी महाराजांनी बारदेशातील मोहिमेत पकडलेल्या पोर्तुगीज लोकांना मुक्त करणे.
२. वरील कलमाच्या बदल्यात गोव्याच्या आश्रयास असणाऱ्या लखम सावत, केशव नाईक, केशव प्रभू व देसाई नारबा यांना शिवाजी महाराजांच्या विरूद्ध व त्यांच्या प्रदेशावर कोणत्याही कारवाया करू नये आणि असे केल्यास पोर्तुगीजांनी त्यांना गोव्याबाहेर हाकलावे.
३. पोर्तुगीजांनी आणि शिवाजी महाराजांनी आपआपल्या राज्यात एकमेकांविरूद्ध आयात निर्यातीवर कर लादू नये.
४. समुद्र व भूमिवर दोन्ही सत्तांमध्ये समन्वय राहवा.[9]

ह्या तहामुळे काही काळ असेना दोन्ही सत्तांच्या प्रदेशात व्यापारात आयात निर्यात सुरळीत चालण्यासाठी हा तह महत्त्वाचा ठरला. मात्र पोर्तुगीजांनी इतर सत्तांसोबत शिवाजी महाराजांविरूद्ध मदत करणे थांबविले नाही. मोगलांनी.1667 ला पोर्तुगीजांना शिवाजी महाराजाविरूद्ध आरमाराची मदत मागितली. ती त्यांनी देऊ केली. परंतु कामयस्वरूपी अडथळा बनलेल्या सिद्दांचा बंदोबस्त करण्यासाठी मात्र शिवाजी महाराजांनी पोर्तुगीजांशी समन्वयाची भूमिका घेतलेली दिसते.

शिवाजी महाराजांना एकाचवेळी देशी-विदेशी सत्तांशी झगडावे लागत होते. त्यामुळे त्यांना योग्यवेळी योग्य निर्णय घेवून ह्या सत्तांशी समन्वय ठेवावा लागत असे. आपली सत्ता भारतात अबाधित राहावी म्हणून विदेशी सत्ता नेहमी वेळ पडेल तेव्हा एकमेकांना मदत करीत व देशी सत्तांही विदेशी सत्तेची वेळोवेळी मदत घेत असत. त्यामुळे शिवाजी महाराजांना आपला प्रदेश विस्तारीत असताना आर्थिक बाबींचाही विचार करावा लागे त्यांना आपली आर्थिक बाजू सुदृढ करण्यासाठी प्रबळ असा कोणताही स्त्रोत नव्हता. त्यामुळे युद्ध करीत असताना आपला खर्च कमीत-कमी कसा होईल याचा विचार करून शिवाजी महाराज आपले धोरण आखत असत.

**10 फेब्रुवारी 1670 ला पोर्तुगीजांशी तह :**

10 फेब्रुवारी 1670 ला पोर्तुगीजांशी तह घडवून आणला हा तह व्यापारातून आर्थिक बाजू मजबूत करणारा होता. त्याची कलमे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. पोर्तुगीज आणि मराठा यांच्यामध्ये झालेल्या लढाईत योग्य प्रमाणात एकमेकांना आर्थिक भरपाई करून द्यावी.
२. शिवाजी महाराजांच्या जहाजांना पोर्तुगीज प्रदेशात प्रवेश करण्याची सवलत राहील आणि पोर्तुगीज व्यापाऱ्यांनाही अशी सवलत राहील.

३. पोर्तुगीजांनी शिवाजी महाराजांविरूद्ध सिद्दांना मदत करू नये. दोघात सलोखा ठेवण्यात मदत करावी.

४. पोर्तुगीजांच्या प्रदेशा शेजारी शिवाजी महाराजांनी किल्ले बांधू नये.[10]

वरील तह हा दोन्ही बाजूंनी बऱ्याच अटी मांडून त्यामध्ये खल झाले आणि दोन्ही बाजूंनी ज्या कलमांना मान्यता देण्यात आली होती. ह्या तहामुळे शिवाजी महाराजांच्या छोट्या जहाजांना परवाने न घेता व मोठ्या जहाजांना परवाने घेवून समुद्र संचार करण्याचे स्वातंत्र्य मिळाले होते. ते व्यापाऱ्यांच्या दृष्टिने अतिशय महत्त्वाचे होते. कारण मराठी लोक गोव्यामध्ये मिठाचा व अन्य काही व्यापारी वस्तुंचा व्यापार करीत होते. तसेच व्यापारी जहाजापेक्षा शिवाजी महाराजांचे युद्धोपयोगी जहाजे जास्त होते. त्यामुळे किनाऱ्यावर संरक्षण म्हणून ही बाब महत्त्वपूर्ण ठरली होती. त्यामुळे सिद्दी व इतर विदेशी सत्तावर व त्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवले जाणार होते. त्याचबरोबर घाट, बंदरे, चौक्यावर कर बसवून महसूल गोळा करणे सोपे जाणार होते. मोगलाप्रमाणे शिवाजी महाराजांना जहाजे चालविण्याचा परवाना मिळाल्याने पोर्तुगीजांकडून मराठा राज्याला एक स्वतंत्र राज्य असल्याची मान्यता मिळाली होती. त्यामुळे हा तह अतिशय महत्त्वाचा ठरलेला होता.

सदरील तह महत्त्वाचा ठरला असला तरी पोर्तुगीज व शिवाजी महाराज यांचे प्रदेश जिंकण्यासाठीचे प्रयत्न सतत चालू होते. शिवाजी महाराजांनी इ.स.1674 मध्ये धरमगाव आणि रामनगरचा प्रदेश जिंकून घेतला हा प्रदेश समुद्रकिनाऱ्यावरील कोळी राजाचा होता व त्यांना पोर्तुगीज लोकांकडून चौथाई नावाचा कर देत होते. जेव्हा शिवाजी महाराजांनी हा प्रदेश जिंकलात तेव्हा शिवाजी महाराजांनी पोर्तुगीजानाही चौथाई कर देण्यास सांगितले.[11] ही अट पोर्तुगीजांनी मान्य केली पण प्रत्यक्ष कर देण्यास त्यांनी टाळाटाळ केली त्यामुळे शिवाजी महाराजांनी सरळ गोव्यावरच स्वारी करण्यासाठी तयारी चालवली होती. मात्र शिवाजी महाराजांचा अकाली मृत्यु झाल्यामुळे ही स्वारी रद्द करावी लागली.

**निष्कर्ष :**

पोर्तुगीजांचे आतील रूप शिवाजी महाराजांना माहिती असूनही त्यांनी पोर्तुगीजांशी उघडपणे शत्रुत्व कधीच पत्कारलेले दिसून येत नाही. उलट त्यांच्यासोबत मैत्रीचे संबंध ठेवून होईल तेवढी मदत करून घेतली. पोर्तुगीजांच्या बाजूनेही कधी पूर्णपणे शिवाजी महाराजांवर विश्वासार्हता दाखवली गेलेली नाही.

पोर्तुगीज हे मतलबीपणाचे व राजकीय, आर्थिक परिस्थितीजन्य संबंध शिवाजी महाराजांबरोबर प्रस्थापित करताना दिसून येतात. एकाचवेळी अनेक सत्तांशी संघर्ष करावा लागत असल्याने शिवाजी महाराजांनी आपल्या राजकीय चातुर्याचा अवलंब परिस्थितीनुसार केलेला दिसतो.

**संदर्भ :**


१. कोलाकर श. गो., औरंगाजेबाचा संक्षिप्त इतिहास, जदुनाथ सरकार, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, आ.1, 1919 पृ. 353

२. सदरेसाई गो. स., ब्रिटिश रियासत, खण्ड -1, पॉप्युलर प्रकाशन, पुणे, आ.3, 1993, पृ. 20

३. मेहेंदळे ग. भा., शिवछत्रपतीचे आरमार, परम पब्लिकेशन, आ.1, 2010, पृ. 3.

४. देसाई स.शं., शिवशाही पोर्तुगीज कागदत्रे, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, 1977, पृ. 30

५. देसाई स. शं., मराठ्यांच्या इतिहासाची साधने, पोर्तुगीज दप्तर, खंड-3, ब्रागांस परेरा, आशिया विभाग, साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, आ.9, 1968, पृ. 19.

६. उपरोक्त, मराठ्यांच्या इतिहासाची साधने, पृ.11

७. मेहेंदळे ग. भा., शिवछत्रपतीचे आरमार, परम पब्लिकेशन, पुणे, पृ. 75.

८. फडणीस सी. वा., शिवकालीन पत्र सारसंग्रह, आर्य संस्कृती मुद्रणालय, आ.1, 1962, पृ. 331.

९. देसाई स.शं., पोर्तुगीज-मराठा संबंध, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, आ.1, 1989, पृ. 53.

१०. उपरोक्त, देसाई स.शं., पोर्तुगीज-मराठा संबंध, पृ. 58

११. देसाई स.शं., शिवशाही पोर्तुगीज कागदपत्रे, शिवाजी विद्यापीठ, पुष्पमाला 6 वे पुष्प, कोल्हापुर मुद्रणालय, 1977, पृ. 38.

# भारतीय संविधान: मूलभूत कर्तव्ये आणि हक्क

**प्रा. डॉ. राहुल वि. दखणे**
इतिहास विभाग प्रमुख
शिवरामजी मोघे महा., केळापूर (पांढरकवडा) जि. यवतमाळ

**प्रस्तावना:**

भारतीय संविधान जगातील अनेक देषांना आदर्ष ठरावे असे संविधान आहे. पारतं०यात असलेल्या व अनेक वर्षापासून रूढी, प्रथा, परंपरा यंाच्या आधारे चालणाÚया, लिखीत आणि अलिखीत कायद्यांच्या आधारे येथिल प्रषासन चालत असे. ज्या सामाजिक व धार्मिक नितीमूल्यांच्या आधारे येथिल प्रषासन चालत असे; त्यात अनेक मानवी समुहांना हलाखीचे जीवन जगावे लागे. ज्यांच्या काहीही दोष नाही अषा मानवी समुहाला विष्टि नितीमूल्यांनी. नियमांनी बद्ध केले होते. स्त्रियांना सुद्धा विषिष्ट नियमांची बंधने सहन करीत जीवन कंठावे लागत असे. अषा समुहाला खÚया अर्थाने स्वातं०य बहाल करण्याचे काम संविधानाने केले. 15 ऑगष्ट 1947 रोजी भारत ‘देष’ म्हणून स्वतंत्र झाला असला तरी ते केवळ मूठभरांचे स्वातं०य होते. भांडवलदार, जमिनदार, धार्मिक अधिकार संपन्न असलेला वर्ग एवढयापुरते स्वातं०य मर्यादीत होते. ब्रिटिषांच्या गुलामगिरीतून आपण स्वतंत्र झालो असलो तरी आपल्याच देषातील विषेषाधिकार प्राप्त वर्गाच्या जोखडातून आपण मूक्त झालो नव्हतो. म्हणून अषा विषेषाधिकार प्राप्त वर्गाच्या जोखडातून सर्वसामान्य भारतीय माणसाला मूक्त करण्याचे काम भारतीय संविधानाने केले. सर्वसामान्य माणसाला स्वातं०य, समता, बंधुता व न्याय ही मानवीमूल्ये बहाल करण्याचे काम संविधानाने केले. जन्मतःच मानव स्वतंत्र आहे; हे आत्मभान निर्माण करण्याचे काम संविधानाने केले.

प्रत्येक मानव जन्मानेच स्वतंत्र आहे, असे जेव्हा आपण म्हणता;ा तेव्हा त्याचे काही मूनभूत हक्कही आहेत आणि ते त्याला मिळाले पाहिजे असा आग्रह भारतीय संविधान धरते. सोबतच देषाच्या नागरिकाला काही हक्कही बजावावे लागतील असा दंडक संविधान घालून देते. म्हणूनच जागतिक मानवमूक्तीचा सरनामा म्हणून भारतीय संविधानाला जगात मान आहे; असेच म्हणावे लागते.

**गृहितके:**

1. भारतीय संविधान मानवाची मूलभूत हक्क अधोरेखित केले आहेत.
2. प्रत्येकाला मूलभूत हक्क मिळावेत असा आग्रह संविधान धरते.
3. कायद्याच्या समोर सर्व समान आहेत.
4. कायद्याच्या आधारे कोणत्याही मानवी समुहात भेदभाव करता येत नाही.
5. मूलभूत हक्कासोबतच नागरिकांची काही कर्तव्ये सुद्धा सांगितली आहेत.

**उद्दिष्टे:**

1. भारतीय संविधानातील मूलभूत हक्कांचा अभ्यास करणे.
2. प्रत्येक नागरिकास असणारे मूलभूत हक्क अभ्यासणे.
3. कायद्याने प्रतिपादीत केलेल्या समानतेच्या हक्काचा अभ्यास करणे.
4. भारतीय नागरिकांनी पार पाडावयाच्या मूलभूत कर्तव्यांचा आढावा घेणे.
5. कायद्याने भेदभाव करण्यास मनाई केलेल्या मूल्यांची चिकित्सा करणे.

**भारतीय संविधानातील मूलभूत हक्क:**

भारतीय संविधानाचा प्राणच नागरिकांस बहाल केलेले मूलभूत हक्क आहेत. कारण विविध जाती, धर्म, श्रद्धा, परंपरा, प्रतिष्ठा, प्रदेष, बोली यांनी विभाजीत झालेल्या मानवी समुहाला एका सूत्रात बांधणे सोपे नव्हते. म्हणूनच संविधानाने स्विकृत केलेले समानतेचे तत्व सर्वांना एका धाग्यात बांधणारे आहेत. कायद्याच्या पुढे सर्व समान आहेत हा उद्घोष संविधान करते. त्यामागे समानतेमधून एकात्मता पर्यायाने राष्ट्रिय एकात्मता निर्माण करण्याचे काम याद्वारे करण्यात आले आहे. धर्म,

वंष, जात, लिंग, किंवा जन्मस्थान यावरून भेदभाव करण्यास कायद्याने सक्त मनाई केली आहे. यासोबतच समानतेमधून समानसंधी हे तत्व आपोआपच साध्य होईल ही भुमिका त्यामागे आहे.

स्वातं०याचा हक्क बहाल करतांना संविधान म्हणते की, प्रत्येक नागरिकास भाषण व अभिव्यक्ती यांचे स्वाते०य राहील. तसेच षांततामय मार्गाने व विनाषस्त्राने एकत्र जमण्याचा अधिकार असेल. एखादा अधिसंघ व संघ (संघटना) बनविण्याचा व भारताच्या कोणत्याही क्षेत्रात मूक्तपणे संचार करण्याचा अधिकार असेल. यासोबतच भारताच्या कोणत्याही भागात राहण्याचा, स्थायिक होण्याचा आणि कोणताही पेषा अथवा व्यवसाय, व्यापार, धंदा चालवण्याचा अधिकार असेल. सोबतच षिक्षणाचा (मोफत व सक्तीचे), धर्मस्वातं०याचा हक्क, सांस्कृतिक व षैक्षणिक हक्क असे मानवी प्रगतीकरिता पोषक असणारे हक्क संविधानाने बहाल केले आहे. व्यक्तिविकासातून राष्ट्रविकास असे आपणे जेव्हा म्हणतो; तेव्हा व्यक्ती विकासाला पोषक असे स्वातं०य देऊन भारतीय संविधानाने राष्ट्रविकासाचा पाया मजबूत केला आहे. स्वातं०याच्या 75 वर्षामध्ये भारताने विकसीत देषांच्या बरोबरीने केलेली प्रगती ही व्यक्तीस्वातं०याने षक्य झाली असे म्हणता येईल. स्वात०यापूर्वी व्यक्ती-व्यक्तींमध्ये भेदभाव केला जाई. जात, धर्म, प्रदेष, भाषा, लिंग यांच्या आधारे भेदभावाने व्यक्तींच्या अंगी असलेले कौषल्ये सिद्ध करता येत नव्हती. परंतु भारतीय संविधानाने सर्वांना समानसंधी उपलब्ध करून दिल्याने प्रत्येक व्यक्तीला बंधनातून मुक्त होत आपले कौषल्य सिद्ध करणे षक्य झाले. यातून देषाचा विकास साधणे सोपे झाले.

मूलभूत कर्तव्ये:

संविधानाने जसे मूलभूत हक्क प्रतिपादीत केले. तसेच काही मूलभूत कर्तव्यांची अपेक्षा सुद्धा नागरिकांकडून ठेवलेली आहे. त्यापैकी पहिलेच कर्तव्य म्हणजे संविधानाचे पत्येकाने पालन करणे होय. देषाचे आदर्ष, संस्था, राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत यांचा आदर करावा. सोबतच स्वात०य लढयात स्फुर्ती मिळाली अषा उदात्त आदर्षांची जोपासना करून त्यांचे अनुसरण करणे. भारताची सार्वभौमता, एकता, एकात्मता उन्नत ठेवून त्यांचे संरक्षण करणे, देषाचे संरक्षण करणे, राष्ट्रीय सेवा बजावणे, सर्व जनतेमध्ये सामंजस्य, बंधूभाव वाढीस लावणे, स्त्रियांच्या प्रतिष्ठेला उणेपणा आणणाÚया प्रथांचा त्याग करणे. संमिश्र संस्कृतीचे जतन करणे, नैसर्गिक साधने व पर्यावरणाचे रक्षण करणे अषी अनेकविध कर्तव्यांची अपेक्षा संविधान करतांना दिसते. प्रत्येकाने या कर्तव्यांचे काटेकोरपणे पालन केले तरच आपण मजबूत राष्ट्र म्हणून उभे राहू षकू अषी माफक अपेक्षा यामागे आहे.

**सारांश:**

भारतीय संविधानाने मानवी स्वातं०याचा उद्धोष करतांना प्रत्येक मानवाला कायद्यासमोर समानतेची वागणुक देण्याची वचनबद्धता प्रतिपादीत केली आहे. कायद्याचे राज्य अपेक्षित असतांना स्वातं०य, समता, बंधुता व न्याय हया तत्वांचे सर्वांनी पालन करावे या अपेक्षेसह सर्व नागरिकास मूलभूत हक्क बहाल केले. यासोबतच मानवी स्वातं०य उपभोगतांना प्रत्येकाने काही मूलभूत कर्तव्ये पार पाडली पाहिजेत असा आग्रह सुद्धा धरलेला आहे. संविधानातील तरतुदी पाहता सर्व जाती, धर्म, पंथ, भाषा, प्रदेष, लिंग याचे निर्वहन करणारे लोक ‘भारत’ देष म्हणून एकसंघ आहेत; याचे श्रेय केवळ आणि केवळ भारतीय संविधानाला दयावे लागते.

**निष्कर्ष:**

1. भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकास मूलभूत हक्क प्रदान केले आहे.
2. मूलभूत हक्कांचा उपभोग घेण्याचे स्वातं०य प्रत्येक नागरिकास आहे.
3. समानतेच्या तत्वाचा अंगिकार संविधानाने केला आहे.
4. कायद्याने भेदभाव करण्यास सक्त मनाई केली आहे.
5. मूलभूत हक्कांचा उपभोग घेतांनाच नागरिकांनी मूलभूत कर्तव्ये पार पाडावी अषी अपेक्षा आहे.

**संदर्भ:**

1. संपादक, भारत सरकार, विधी व न्याय मंत्रालय, भारताचे संविधान - आ. 2014
2. संपादक, हरी नरके, - डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड - 20

3. संपादक, प्रदीप गायकवाड - संविधान सभेतील वादविवाद
4. नी.सी.दीक्षित-भारताचा इतिहास, पिंपळापुरे अॅन्ड कं. पब्लिषर्स,नागपूर
5. पंडीत जवाहरलाल नेहरू-भारताचा षोध, कॉन्टीनेन्टल प्रकाषन, पुणे-30
6. डॉ. शांता कोठेकर- आधुनिक भारताचा इतिहास, श्री साईनाथ प्रकाषन, नागपूर

# बलुतेदारांचे लाकडी कोरीवकाम व सर्जनशीलतेचा ऐतिहासिक शोध

**प्रा.डॉ.संजीवकुमार सुर्यकांत पांचाळ**
मराठी विभाग
श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

## प्रास्ताविक

भारतातील लाकडी कोरीवकामाचा इतिहास समृद्ध आणि वैविध्यपूर्ण आहे, जो उपखंडातील सांस्कृतिक, धार्मिक आणि कलात्मक परंपरांशी अतिशय घनिष्ट संबंध दर्शविणारा आहे. भारतातील लाकडी कोरीव कामाची पद्धत प्रत्येक कालखंडात विकसित झालेली दिसते, जी कौशल्य, सर्जनशीलता आणि आध्यात्मिक महत्त्व यांचे उल्लेखनीय मिश्रण दर्शवते. भारतातील लाकडी कोरीव कामाच्या ऐतिहासिकतेबद्दल विचार करता येईल.

स्थूलमानाने लाकूडकामाला सुतारकाम असे म्हटले जाते. मानवी जीवनात लाकूडकामाला म्हणजे जीवनासाठी लाकडाचा उपयोग करून घेण्याच्या जाणीवेला केंव्हापासून प्रारंभ झाला हे निश्चितपणे सांगता येत नाही; परंतु, पहिले वहिले लाकूडकाम हे मानवाच्या बौद्धिक विकासाचे आणि सांस्कृतिक प्रगतीचे प्रतीक आहे असे मानायला काही हरकत नाही. अश्मयुगातील मानवाचे भटके जीवन संपून त्याचा रानटीपणा कमी झाला. नदीकाठी अथवा एखाद्या जलाशयाशेजारी उंचवट्यावर वस्ती करून राहू लागला. याच वेळी त्याला लाकडाचा उपयोग समजला असावा. नेवासे व बुर्झाहोम येथील उत्खननावरून नवाश्मयुगाच्या कालखंडातील लोक जमिनीत खड्डे करून राहत होते. या खड्यांवर लाकडी वासे टाकून बांबूच्या काड्यांनी आपली घरे झाकत असत असे संशोधकांचे मत आहे. इनामगाव उत्खननात ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीमधील घरांचे अवशेष मिळाले आहेत. ही घरे चौरस व गोलाकार असून त्यासाठी लाकडांचा वापर केलेला दिसून येतो. यावरून हाच लाकूडकामाचा प्रारंभ असावा असे सिद्ध होते.

नवाश्मयुगानंतर ताम्रपट युग सुरु झाले. या काळात शेती सुधारली. नांगर चालू लागले. आणि विविध व्यवसायही सुरु झाले. त्यातून सुतारकाम हा व्यवसाय सुरु झाला. या काळातील उत्खननाचे अवशेष माळवा, गंगा, यमुना या नद्यांच्या दुआबाचा प्रदेश दक्षिण भारत इ. ठिकाणी सापडले आहेत. त्यावरून माळव्यातील घरे, काटकोन-चौकोनी असून त्यांच्या भिंती कुडाच्या होत्या. या भिंतींना बळकटी येण्यासाठी मध्ये वासेही असत.

पं.महादेवशास्त्री जोशी यांच्या मतानुसार, "सिंधू संस्कृतीच्या व्याप्त प्रदेशात सुतार कामासंबंधीचे बरेच पुरावे हाती आले आहेत. हडप्पा येथील 'आर ३७' या स्मशानभूमीचे उत्खनन झाले तेव्हा तिथे एक तेरा फूट रुंदीचा रस्ता सापडला. त्या रस्त्यावर गाडीच्या चाकाच्या चाकोऱ्या आहेत. या चाकोरयांच्या रुंदीइतक्या गाड्या आजही पंजाबात आढळतात. त्यावरून या संस्कृतीच्या काळात लाकडी गाड्या असण्याची शक्यता नाकारता येणार नाही. अहमदाबाद जिल्ह्यातील लोथल गावच्या उत्खननात जहाजाचा धक्का बांधण्याइतकी नौकानयनात प्रगती केली होती असे म्हणता येते. अर्थात या नौका किती मोठ्या होत्या, कोणत्या लाकडाच्या आणि कोणत्या आकाराच्या होत्या हे सांगता आले नाही. तरी त्याकाळी नौका बनत असाव्यात असे निश्चित सांगता येते."[१] सिंधू संस्कृतीच्या उत्खननात उपलब्ध झालेल्या शहरांना तटबंदी होती. या तटबंदीना वाकड्या व वळणाच्या पद्धतीने बसविलेले लाकडी दरवाजे होते. हे दरवाजे जाळण्यात आले असे व्हीलर या संशोधकाचे मत आहे. वैदिक वाड्.मयात सुतार, सुतारकाम यांचे भरपूर उल्लेख आढळतात. ऋग्वेदात तक्षन, त्वष्टा हे शब्द सुतारासाठी वापरले गेले आहेत. वेदकाळात उद्योगधंद्यांची व त्यातील कलाकौशल्यांची बरीच वाढ झालेली दिसून येते. ऋग्वेदात व यजुर्वेदात अनेक व्यवसायिकांच्या नामावलीत सुताराचा उल्लेख आलेला आहे.

ऋग्वेदात सुताराचा उल्लेख 'पणी' असा केलेला असून मनुस्मृतीत 'सुतार' असे म्हटलेले आहे. ऋग्वेदात पणीचा विपुल उल्लेख असून, त्यांच्या शहरांना मजबूत तटबंदी असल्याची वर्णने येतात. शिवाय पणीना त्वष्ट्याची संतती म्हटलेले आहे. त्वष्टा हा शब्द सुतारवाचक असल्यामुळे पाणीनाही 'सुतार' असे संबोधले गेलेलं आहे. बृबूनामक एका उदार पणी पुरुषाचा ऋग्वेदात गौरव केला असून, मनुस्मृतीत त्याचे 'सुतार' असे वर्णन केल्याचे श्री प्र.रा.देशमुख यांनी म्हटले आहे. सुतारकाम हा पणीचा मुख्य व्यवसाय होता असा त्यांनी आपला निष्कर्षही सांगितला आहे.

मध्यप्रदेशातील विलासपूर जिल्ह्यातील द्रूपूर तालुक्यात हिराबंध नावाचा एक जलाशय आहे. या जलाशयात सुमारे अठराशे वर्षापूर्वीचा एक लाकडी यज्ञस्तंभ मिळाला असून त्यावर जी लिपी आहे ती गुप्तपूर्व काळातील आहे असे अभ्यासकांचे मत आहे. रामायण व महाभारत या ग्रंथांत निरनिराळ्या वास्तूंची वर्णने आढळतात. रावणाचा राजवाढा सात मजली असून त्याला हस्तीदंताच्या व रुप्याच्या खिडक्या होत्या. या घराच्या बांधकामासाठी लाकडाचा वापर केला होता. कौरवांच्या सभेत लाकडाची व हस्तिदंताची असने होती. यावरून सुतारकामाचे महत्त्व लक्षात येते. वेरूळ येतील यादवकालीन स्तंभलेख पाहता यात अनेक अशा लेण्या आहेत. यातील काही लेण्यांना 'विश्वकर्मा' लेण्या असेही म्हटले आहे. यातील १६ क्रमांकाची लेणी सुताराने कोरलेली आहे. असा उल्लेख येतो. यासंदर्भात ब्रम्हानंद देशपांडे यांच्या मतानुसार,''स्थानपोथीत या लेणीस कोकसवाढेयाचे लेणी म्हटले आहे. वाढी अथवा वाढे म्हणजे सुतार. वर्धकी-वढढकी-वाढे-वाढी असा अपभ्रंश झालेला दिसतो. हिंदी भाषेत बढई हा शब्द रूढ आहेच. हे लेणे कोकस नामक वाढे याचे होते आणि त्यानेच जगप्रसिद्ध कैलास लेणे (लेणी क्र.१६) खोडले असावे असे मानले जाते.''[२] भारतातील बहुतेक प्रत्येक गावात व खेड्यात सुतार व लोहार या दोन बलुतेदारांच्या जाती आढळून येतातच. या दोन्ही जाती एकमेकांचे काम करतात. आपल्या या कृषीप्रधान देशात या दोन्ही बलुतेदारांची अत्यंत गरज आहे. यासोबतच मध्ययुगीन काळात पराक्रमी शूर-वीरांसाठी ढाल-तलवार, भाले-बरचे, वाघनखे, खंजीर-कट्यार, गुप्ती, अंगकवचापासून तोफांपर्यंत साऱ्या शस्त्रांची निर्मिती पराक्रमी मनाने करणारा लोहार आधुनिक काळात मात्र बाजूला फेकला गेला. कारण नित्योपयोगी वास्तूंची निर्मिती यंत्रे करू लागली आणि शास्त्रनिर्मिती संपली. त्यामुळे लोहाराचा व्यवसाय आज संपुष्टात आल्यासारखा आहे. यावर डॉ. पी.जी.लुलेकर म्हणतात, ''मद्ययुगात सर्व योध्यांना लागणारी शस्त्रे निर्मिणारा लोहार इतिहासामध्ये महत्वाचे योगदान देणारा बलुतेदार आहे. तरीही इतिहासात त्याची नोंद घेतली गेली नाही.''[३] यारून असे म्हणावे लागेल की, लोहार या बाळूतेदाराला पूर्वइतिहास आहे व वेगवेगळ्या कालखंडात त्याचे योगदान राहिलेले आहे.

**भारतात लाकडी कोरीव कामाची उत्पत्ती व सुवर्णकाळ**

भारतात लाकडी कोरीव कामाची उत्पत्ती ही प्राचीन संस्कृतींपासून असलेली पाहायला मिळते. ज्यावरून असे दिसून येते की मौर्य आणि गुप्त काळात (सुमारे ५०० ई.स.पू.) लाकडी कलाकृती बनवल्या गेल्या. या सुरुवातीच्या कोरीव कामांमध्ये मंदिरे, राजवाडे आणि राजेशाही निवासस्थाने सजवली जात. ज्यात देवता आणि दैनंदिन जीवनातील दृश्ये दर्शविली जात होती. आकर्षक खांब आणि दरवाजे यासारख्या वास्तुशिल्पीय घटकांमध्ये लाकडी कोरीव कामाचा वापर झाला, ज्यामुळे संरचनात्मक रचनेत कारागिरीचे एकीकरण दिसून आले.

लाकडी कोरीवकामाचा सुवर्णकाळ (इ.स.५००-इ.स.१२००) मानला जातो. गुप्त साम्राज्य आणि त्यानंतरच्या राजवंशांच्या काळात, लाकडी कोरीवकामाची भरभराट झाली आणि मध्ययुगीन काळात ते शिगेला पोहोचले. विशेषतः ओडिशा, राजस्थान आणि कर्नाटक सारख्या प्रदेशातील मंदिरे आणि स्तूप हे गुंतागुंतीच्या लाकडी कोरीवकामाचे प्रदर्शन बनले. खजुराहो, कोणार्क आणि हलेबीड येथील मंदिरे या काळाची उदाहरणे आहेत, ज्यात खगोलीय प्राणी, दैवी कथा आणि गुंतागुंतीच्या फुलांच्या आकृतिबंधांचे तपशीलवार कोरीवकाम आहे. लाकडी कोरीवकाम केवळ धार्मिक संरचनाच नव्हे तर राजवाडे आणि विविध वास्तू यांना देखील सजवले गेले.

**भारतातील लाकडी कोरीवकामाचा इतिहास**

भारतातील लाकडी कोरीवकामाचा इतिहास समृद्ध आणि वैविध्यपूर्ण आहे, जो उपखंडातील सांस्कृतिक, धार्मिक आणि कलात्मक परंपरांशी खोलवर गुंफलेला आहे. भारतातील लाकडी कोरीवकामाची पद्धत शतकानुशतके विकसित झाली आहे, जी कौशल्य, सर्जनशीलता आणि आध्यात्मिक महत्त्व यांचे उल्लेखनीय मिश्रण दर्शवते.

''भारताच्या काही भागात इस्लामिक राजवटीच्या आगमनाने (ई.स.पू.१२०० ते ई.स.पू. १७००) लाकडी कोरीव कामात पर्शियन आणि मध्य आशियाई प्रभावांचा समावेश झाला. लाकडी कलाकृतींमध्ये गुंतागुंतीचे भौमितिक नमुने, अरबीस्क आणि सुलेखन हे प्रमुख वैशिष्ट्ये बनले. हिंदू आणि इस्लामिक कलात्मक घटकांच्या मिश्रणामुळे एक अद्वितीय संश्लेषण निर्माण झाले, ज्याचे उदाहरण मुघल किल्ले आणि राजवाड्यांच्या लाकडी आतील रचनांमध्ये दिसून येते. तसेच वसाहत युग आणि त्यापलीकडे (१७०० इ.स. - सध्या) वसाहतवादी काळात लाकडी कोरीवकामाच्या व्याप्तीत बदल झाला. युरोपीय वसाहतवादी शक्तींनी नवीन तंत्रे आणि शैली आणल्या, ज्यामुळे भारतीय लाकडी कोरीवकामाच्या

सौंदर्यशास्त्रावर परिणाम झाला."[४] बदलत्या आवडी आणि आवडींनुसार जुळवून घेत ही कारागिरी वाढतच राहिली. स्वातंत्र्यानंतर, लाकडी कोरीवकामाचे महत्त्व टिकून राहिले, आधुनिक फर्निचर, धार्मिक कलाकृती आणि सजावटीच्या वस्तूंमध्ये त्याचे अभिव्यक्ती आढळली.

**प्रादेशिक शैली आणि प्रभाव**

भारताच्या विविध भूप्रदेशातील सांस्कृतिक प्रभावामुळे लाकडी कोरीव कामाच्या विशिष्ट प्रादेशिक शैली निर्माण झाल्या आहेत. उदाहरणार्थ काश्मिरमधील लाकडी कोरीवकाम त्याच्या उल्लेखनीय नाजूकपणासाठी वेगळे असलेले आढळून येते. त्यावर गुंतागुंतीचे व विशिष्ट फुलांचे नमुने आणि बारकाईने कोरलेले असून जाळीदार असे काम पहायला मिळते. या कारागीरीवर व या प्रदेशातील सांस्कृतिक वारशाने प्रेरित होऊन, होऊन काश्मीरचे कारागीर, त्यांच्या अतुलनीय गुंतागुंतीसाठी प्रसिद्ध असलेल्या कलाकृती तयार करण्यासाठी त्यांच्या कारागिरीचा वापर करतात. ही शैली बहुतेकदा फर्निचरच्या तुकड्यांमध्ये आणि पडद्यांमध्ये अभिव्यक्त होते, ही कलात्मकता काश्मीरच्या नैसर्गिक सौंदर्यात व सांस्कृतिक समृद्धतेत भर टाकताना दिसते.

**राजस्थानी व दक्षिण भारतीय लाकडी कोरीवकाम**

राजस्थानी लाकडी कोरीवकाम हे रंगांचा आणि गुंतागुंतीच्या डिझाइनचा एक नमुना म्हणता येईल, जो राजपूत आणि मुघलांच्या काळातील सांस्कृतिक वैभव आणि ऐतिहासिक प्रभाव प्रतिबिंबित करतो. राजेशाही भव्यतेने चिन्हांकित केलेली कलात्मकता दैनंदिन जीवनाच्या विविध पैलूंमध्ये, अलंकृत फर्निचरपासून सजावटीच्या पॅनल्सपर्यंत, प्रवेश करते. राजस्थानच्या समृद्ध इतिहासात रुजलेली ही शैली सर्जनशीलतेचे प्रतिनिधित्व करत प्रदेशाच्या राजेशाही वारशाचे वर्णन करते.

दक्षिण भारतात मंदिर स्थापत्यकलेद्वारे लाकडी कोरीवकामाचे वेगळेपण आपल्या लक्षात येते. ज्या कोरीवकामात देवतांचे चित्रण, पौराणिक दृश्ये आणि अलंकृत आकृतिबंध पवित्र स्थळांना दैवी कथांच्या दृश्य कथांमध्ये रूपांतरित करतात. दक्षिण भारतातील ही कोरीवकाम शैली धार्मिक आणि पौराणिक परंपरांमध्ये रुजलेली दिसून येते. तसेच या प्रदेशातील भक्ती आणि कलात्मकता आपल्या लक्षात येते. याशिवाय मंदिरांचे खांब, दरवाजे आणि गर्भगृहे सजवताना, दक्षिण भारतीय लाकडी कोरीवकाम हे देशाच्या दक्षिणेकडील भागातील आध्यात्मिक आणि कलात्मक वारशाचे प्रतीक म्हणता येईल.

**गुजरात, उत्तर प्रदेश, केरळ, पंजाब, हिमाचलप्रदेश, कर्नाटक, पश्चिम बंगाल या विविध भागांतील लाकडाच्या कोरीव कामातील सर्जनशीलता**

"गुजरात, उत्तर प्रदेश, केरळ, पंजाब, हिमाचलप्रदेश, कर्नाटक, पश्चिम बंगाल या विविध भागांतील लाकडाच्या कोरीव कामातील सर्जनशीलता महत्वाची आहे. गुजराती लाकडी कोरीवकाम त्याच्या गुंतागुंतीच्या तपशीलांसाठी आणि विस्तृत डिझाइनसाठी वेगळे आहे. भौमितिक नमुन्यांचा आणि फुलांच्या आकृत्यांचा वापर वैशिष्टयेपूर्ण असून ही लाकडी कोरीवकामाची परंपरा गुजरातच्या समृद्ध सांस्कृतिक आणि स्थापत्य वारशाचे प्रतिनिधित्व करताना आढळते. गुजरातची ही कारागिरी फर्निचर, दरवाजे आणि विविध स्थापत्य घटकांमध्ये दिसते. ही कारागिरी पारंपरिक आणि समकालीन दोन्ही काळांना सांधताना दिसते.

उत्तर प्रदेशातील सहारनपूर सारख्या प्रदेशाने लाकडी फर्निचरच्या उत्कृष्ट निर्मितीसाठी प्रशंसा मिळवली आहे. उत्तर प्रदेशातील लाकडी कोरीव काम त्यांच्या कारागिरीतील गुणवत्तेसाठी ओळखले जाते. टेबल, खुर्च्या आणि कॅबिनेटवरील गुंतागुंतीचे व आकर्षक कोरीव काम त्याच्या समृद्ध लाकडी परंपरेचे जतन आणि विकास करण्यासाठी राज्याचा मोलाचा वाटा आहे.

केरळ राज्य हे मंदिरांच्या लाकडी कोरीवकामासाठी प्रसिद्ध राज्य आहे. या राज्यात लाकडी शिल्पे, मुखवटे आणि सजावटीच्या वस्तू तयार करण्याची एक वेगळी परंपरा आहे. केरळमधील या लाकडी कोरीवकामात धार्मिक संदर्भ पाहायला मिळतात. ज्यामध्ये या कोरीवकाम केलेल्या लाकडी वस्तू सांस्कृतिक तथा धार्मिक समारंभांमध्ये आणि घरांमध्ये सजावटीसाठी वापरल्या जातात."[५] ठळक आणि मजबूत डिझाइनने वैशिष्ट्यीकृत असलेली पंजाबची लाकडी कोरीवकाम

परंपरा असलेली आढळून येते. ज्यात अनेकवेळा भौमितिक नमुने असतात. हे कोरीवकाम सामान्यतः फर्निचर आणि सजावटीसाठी केलेले आढळते. ज्यातून राज्याचे सौंदर्य, कलात्मकता व अभिव्यक्ती प्रतिबिंबित होताना दिसते.

पर्वतांमध्ये वसलेल्या हिमाचल प्रदेशाची लाकडी कोरीवकामाची एक विशिष्ट परंपरा आहे. या कोरीवकामांमध्ये स्थानिक वनस्पती, प्राणी आणि पौराणिक आकृतिबंधांचे वारंवार चित्रण केले जाते. पारंपरिक व जुन्या असलेल्या घरांमधील लाकडी पटल, दरवाजे लाकडी कोरीवकाम शैली आणि सर्जनशीलता दर्शवतात.

मंदिर स्थापत्यकलेसाठी कर्नाटक हे राज्य ओळखले जाते, तेथे लाकडी कोरीवकामाची विशिष्ट अशी परंपरा पाहायला मिळते. या लाकडी कोरीवकामातून समाज व राज्याच्या सांस्कृतिक मूल्यांचे दर्शन होते. कर्नाटकातील लाकडी कोरीवकाम त्यांच्या परंपरेला कार्यक्षमतेशी अखंडपणे जोडते.

पश्चिम बंगालची लाकडी कोरीवकाम परंपरा त्याच्या सांस्कृतिक विविधतेतून प्रेरणा घेते, परिणामी राज्याच्या लोककथा आणि परंपरांनी प्रभावित झालेल्या गुंतागुंतीच्या डिझाइनसह कलाकृती तयार होतात. लाकडी शिल्पे, मुखवटे आणि कलाकृती धार्मिक समारंभ, उत्सव आणि सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये वापरल्या जातात, ज्यामुळे विविध सांस्कृतिक प्रभावांना लाकडी कोरीवकामाची अनुकूलता दिसून येते.

**भारतातील लाकडी कोरीवकाम**

हे प्रदेश एकत्रितपणे भारताच्या विविध लाकडी कोरीवकामाच्या वारशात योगदान देतात, जे देशाच्या सांस्कृतिक चैतन्य, स्थानिक सौंदर्यशास्त्र आणि विविध भूदृश्य आणि परंपरांमध्ये या प्राचीन कलाकृतीच्या कुशल उत्क्रांतीचे प्रतिबिंबित करतात. प्रत्येक ठिकाण लाकडी कोरीवकामात एक अद्वितीय स्पर्श जोडते, भारतीय संदर्भात या कलाकृतीची बहुमुखी प्रतिभा आणि कालातीतता दर्शवते.

समकालीन परिस्थिती

समकालीन युगात, भारतातील लाकडी कोरीवकाम एक चैतन्यशील उद्योगात विकसित झाले आहे. बहुतेकदा कौटुंबिक परंपरेत काम करणारे कारागीर पारंपारिक तंत्रांना आधुनिक डिझाइनसह एकत्रित करणारे उत्कृष्ट नमुने तयार करत राहतात. लाकडी कोरीवकाम हा भारताच्या सांस्कृतिक वारशाचा अविभाज्य भाग आहे, कारागीर प्राचीन तंत्रांचे जतन आणि नाविन्यपूर्ण, समकालीन नमुने तयार करण्यात योगदान देतात. भारतातील लाकडी कोरीवकामाचा इतिहास हा कारागिरीच्या शाश्वत वारशाचा पुरावा आहे, हे आपणास विसरता येणार नाही. जिथे कुशल हात लाकडाच्या तुकड्यांवरील कालातीत कलाकृतींमध्ये आपला जीव ओततात. तसेच विविध उपखंडातील सांस्कृतिक आणि कलात्मक वारसा जपतात. उदाहरणार्थ **राम मंदिर व मूर्तीचा इतिहास आपल्याला पाहता येतो.** ऐतिहासिक आक्रमणांमध्ये मंदिर नष्ट होण्यापूर्वी अयोध्येत असणारी मूळ राम मूर्ती पूजेसाठी गर्भगृहात ठेवली गेली. असे मानले जाते. याठिकाणी शतकानुशतके भक्ती, संघर्ष आणि श्रद्धेचे साक्षीदार आजही असलेले आढळतात. ज्यामुळे राम मंदिराचे भव्य बांधकाम झाले. जो जगभरातील भाविकांसाठी एक ऐतिहासिक क्षण होता. ही राम लल्लाची मूर्ती कर्नाटकात सापडलेल्या कृष्ण शिला नावाच्या दुर्मिळ काळ्या दगडापासून कोरलेली आहे. हा दगड त्याच्या दैवी गुणधर्मांसाठी आणि टिकाऊपणासाठी काळजीपूर्वक निवडण्यात आला आहे. या **राम लल्ला मूर्तीची निर्मिती** प्रसिद्ध कलाकार अरुण योगीराज यांनी कोरली आहे, जे त्यांच्या अपवादात्मक कारागिरीसाठी ओळखले जातात. ही मूर्ती भगवान राम यांना पाच वर्षांच्या मुलाच्या रूपात सादर करण्यासाठी डिझाइन केली आहे, ज्यामध्ये शांत पण शक्तिशाली अभिव्यक्ती पहायला मिळते. ही मूर्ती कोरण्यासाठी काही महिने लागले, या राम लल्लाच्या मूर्तीची कृपा आणि दिव्यता दर्शविण्यासाठी अनेक तपशिलांचा अभ्यास करून ते तपशील जोडले गेले आहेत. या मूर्तीमध्ये वापरलेले साहित्य म्हणजे कृष्ण शिला (काळा दगड) - कर्नाटकातील जुने शालिग्राम आहे. तसेच ही मूर्ती ५१ इंच उंचीची असून वजन अंदाजे १.५ टन एवढे आहे. याबरोबरच राम लल्लाच्या मूर्तीत दिव्यत्व, तपशीलवार अलंकार, भाव आणि मुद्रा पहावयास मिळते.

**निष्कर्ष**

१) पूर्वी ग्रामीण कला आणि कौशल्ये याला म्हत्वाचे स्थान होते.
२) बलुतेदारीला जुना इतिहास आहे.
३) या काळात श्रमसंस्कृतीची जोपासना होताना दिसून आली.

४) बलुतेदारांच्या सर्जनशीलतेला राजाश्रय होता.

५) विविध बलुतेदारांच्या कलेतून सांस्कृतिक वारसा जोपासला गेल्याचे आढळते.

**संदर्भ**


१) जोशी पं.महादेवशास्त्री, 'भारतीय संस्कृतिकोश, खंड १० वा, (१९७९), पृ.६८

२) देशपांडे ब्रम्हानंद, शोधमुद्रा खंड-५, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, प्र.आ. पृ.३५

३) लुलेकर प्रल्हाद, 'गावगाड्याचे शिल्पकार, 'स्वरूप प्रकाशन, पृ. २३,२४

४) Pradip Sharma, International Journal of Reviews and Research in Social Science, Volume 4, 2016

५) Bauman Richard (1971), "Differential Identity and the Social Base of Folkore", The Journal of American Folklore, P.No.84

६) जोशी पं.महादेवशास्त्री, भारतीय संस्कृतिकोश, १९७९, खंड-१०

७) देशपांडे ब्रम्हानंद, शोधमुद्रा खंड-५, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, प्र.आ.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे बौद्ध धम्म विषयी विचार

**सिंधू निवृत्ती लोणकर**
संशोधक विद्यार्थिनी
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

**प्रस्तावना**

भारतामध्ये अनेक जाती धर्म व पंथाचे लोक वास्तव्य करतात त्यांच्या प्रत्येकाच्याच रूढी-परंपरा, वेशभूषा,विवाह व संस्कार त्याच बरोबर इतर ही भेद प्रामुख्याने दिसून येतात. भारतीय उपखंडात प्राचीन काळापासून वर्णव्यवस्था ही अस्तित्वात असल्याचे अनेक पुरावे वैदिक ग्रंथ धर्मशास्त्रात प्राप्त होतात. भारतातील वेदकाळात वर्णव्यवस्था अस्तित्वात होती ही वर्णव्यवस्था प्राचीन काळापासूनच चालत आलेली आहे. याचे अनेक पुरावे आपणास वेदिक ग्रंथामध्ये स्पष्ट पणे आढळून येते. वर्णव्यवस्था ही वैदिक काळाततील एक प्रमुख सामाजिक एक प्रथा होती. उत्तर वैदिक कालखंडानंतर जातीव्यवस्ठे ची निर्मिती झाली किंवा रुजविण्यात सुरुवात झालेली दिसून येते. शूद्र अतिशूद्र यांच्यावरच्या जाचक अटी तत्कालीन समाजव्यवस्थेने लादलेल्या होत्या त्यातूनच अस्पृश्यता ही निर्माण झालेली असावी, वैदिक धर्मग्रंथावर व त्याच्या ज्ञान साहित्यावर ती दिसून येते. त्यांची पाळेमुळे भारतीय समाजव्यवस्थेत घट्ट रुजलेली दिसून येतात. अस्पृश्यता ही गुलामगिरीचे जो तक मानले गेलेले आहे मानवाने आपल्या आत्म उद्धारासाठी ्रिटिशांच्या आगमनानंतर झालेल्या पाश्चात्त्य चळवळी शिक्षण प्रबोधनातून म्हणजेच 19 व्या शतकात पासून भारतामधील या जातीव्यवस्थेचे संदर्भात किंवा वर्णव्यवस्थेचे संदर्भात परिवर्तनाचे विचार रुजले रुजले व पुढे येण्यास सुरुवात झाली भारतीय समाज व्यवस्थेतील प्रामुख्याने महाराष्ट्रामध्ये असलेल्या जातिव्यवस्थेचा विरोधात अनेक विचारवंत समाजसुधारकांनी आपापल्या पद्धतीने विविध माध्यमातून आंदोलने केली त्याच पद्धतीने डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी सुद्धा महाराष्ट्रातील अस्पृश्यता व जातीयता समूळ नष्ट करण्यासाठी अनेक आंदोलने केली त्या आंदोलनातलाच आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची यांनी केलेली धर्म व धार्मिक विडंबनाच्या विरोधातील आंदोलने म्हणू शकतो. 13 ऑक्टोबर 1935 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी येवला जिल्हा नाशिक येथे अस्पृश्य वर्गांच्या कल्याणासाठी साठी परिषद भरवली ती परिषद म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मांतराची केलेली अधिकृत घोषणा च होय. येवला परिषदेच्या नंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 12 जानेवारी 1936 रोजी प्रा. शिवराज यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्रातील प्रमुख असलेले शहर पुणे येथे धर्मांतर विचार विनिमय करण्यासाठी एका सभेचे ही आयोजन केले. इ.स 1935-36 मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेली घोषणा 14 ऑक्टोबर 1956 ला केलेले धर्मांतर हे 21 व्या शतकात किवा या कालखंडातील अनेक सामाजिक व राजकीय परिवर्तनाची प्रामुख्याने प्रमुख केंद्र असल्याचे दिसून येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या काळात बौद्ध धर्माची आणि इतर धर्माचा अभ्यास केला तोच अभ्यास हा त्यांची प्रामुख्याने दिसून येते

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक व धार्मिक समता असा तत्कालीन इतर धर्मातून शोधण्याचा प्रयत्न केला कारण भारतीय समाजव्यवस्थेत मानवाने मानवाशी मानवाप्रमाणे न केलेले वर्तन ही बाबासाहेबांच्या वैचारिक तिला व त्यांच्या बुद्धी प्रभात दिला न स्वीकारणारे होते म्हणून त्यांनी तत्कालीन असलेल्या भारतीय समाज व्यवस्थेमधील सर्व धर्माचा अभ्यास केला पण त्यात सर्व धर्म यापैकी बौद्ध धर्म हा त्यांना श्रेष्ठ धर्म आहे हे ज्ञात झाले त्यातूनच त्यांनी या धर्माकडे स्वीकारण्याचा निर्णय घेतला बुद्धाचा धम्म हा श्रेष्ठ धम्म आहे तो धम्म मानवतावादी अशा शिळेवर बसलेला असून तोच खऱ्या अर्थाने या शूद्र वर्गांच्या किंवा अतिशूद्र यांच्या कल्याणासाठी योग्य आहे असा विचार बाबासाहेबांच्या मनामध्ये रुजला आणि त्यातूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 14 ऑक्टोबर 1956 रोजी बौद्ध धर्माची दीक्षा घेतली होती आणि त्यानंतर हे जगाच्या इतिहासातील सम्राट अशोकाने स्वीकारलेल्या बौद्ध धर्म परिवर्तनाच्या नंतरची सर्वात मोठी धम्म परिवर्तन घटना ठरल्याचे दिसून येते

**मुख्य शब्द** –वेदिक, धम्म,धर्मांतर,घोषणा,परिवर्तन, अस्पृश्यता, जातीयता, गुलामगिरी, धर्मचिकित्सा, चळवळ, संघर्ष, स्थित्यंतर,

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोधनिबंधात च्या अनुषंगाने ऐतिहासिक संशोधन पद्धती च्या विविध संशोधन पद्धती पैकी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धती चा अनुकरण प्रस्तुत शोधनिबंध तयार करण्या साठी वापरण्यात आलेली आहे.

**संशोधनाचा हेतू**

1)डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केलेली धर्मांतराची घोषणा व धर्मचिकित्सा चा अभ्यास करणे

2) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची धर्मपरिवर्तन विषयीची भूमिका कोणती यांचा अभ्यास करून सामान्य जनतेच्या परिस्थितीशी त्यांनी कसे परिवर्तन घडवून आणले या विषयीचा अध्ययन करणे

**संशोधनाची गृहितके**

प्रस्तुत शोधनिबंधाची गृहीतके पुढील प्रमाणे

1)डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या धर्मांतराची घोषणा,भारतीय समाजातील स्थित्यंतर आशी निगडित आहे का? याचे संशोधन करणे.

2)डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मांतर व धर्मचिकित्सेची घोषणे नंतर झालेल्या भारतीय समाजातील परिवर्तनाच्या व भूमिके विषयी चे माहिती ज्ञात करून घेणे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर व हिंदू हिंदुत्व**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म चातुर्वर्ण व्यवस्थेतील अस्पृश्य असलेल्या महार जमाती जाती झाला असेल तरी त्यांनी या वरिष्ठ जातीतून अस्पृश्य मागास सास पायदळी तुडविण्यात आले होते किंवा गुलाम बनवले होते अशा समाजाला डॉ. बाबासाहेबांनी सुटका करण्याचा निर्णय घेतला आहे याची जाणीव त्यांना उच्चवर्णीयांनी पावलोपावली दिली होती शाळेत महाविद्यालयात नोकरी देवालयात प्रवासात प्रत्येक ठिकाणी हिंदू समाजाने त्यांना तेजोभंग केल्याचे दिसून येते मानवास पशूपेक्षाही हीन वागणूक देवाच्या संस्कृतीचा अधिकार या घटनेमुळे डॉ आंबेडकरांनी जातीचे निर्मूलन विषयी त्यांनी आपल्या प्रबंधात ते म्हणतात हिंदू समाज चार वर्णात विभागला गेला त्याचे रूपांतर चार जाती झाले जातीभेद व्यवस्था ही एकाच वंशाच्या लोकांची सामाजिक विभागणी करते तसेच श्रमिकांची सुद्धा विभाग निकलते वर्ण व्यवस्थेमुळे शूद्राला ज्ञानसंपादन शस्त्र बाळगण्यास बंदी त्यामुळे त्यांचा उत्कर्ष कधीच होऊ शकला नाही हिंदू समाज व्यवस्था करतो तुला लुळेपांगळे करत आहे जाती पाळण्याचा धर्म शिकवणार हिंदूची धर्मशास्त्रे त्यांचे खरे शत्रू आहे डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी मानवी जीवनात धर्माची गरज व्यक्त करतात त्यांनी सर्व प्रदेश साधारण तोच धर्म अशी धर्माची व्याख्या त्यांनी केली आहे जो धर्म उत्कर्षाचा आड येतो तो धर्म या संज्ञेस पात्र नाही जो धर्म आपल्या अनुयायांना माणूसकीचे अधिकार देत अधिकार देत नाही तो धर्म मानसून एक रोग आहे जो धर्मज्ञान आना अज्ञानी योजना निर्णय राहा असा म्हणतो धर्म नसून शिक्षा आहे

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धम्म चिंतन**

जगाला शांतीचा संदेश देणारे सिद्धार्थ गौतम बुद्ध यांचा धंमसकाळ सुरातून अस्तित्वात आलेला होता धर्मांतर करून खऱ्या अर्थाने डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि माणूस म्हणून जगण्याचा अधिकार मानवांना दिला धर्मांतराची घोषणा केल्यानंतर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी जाहीर केले की बौद्ध धर्मावर सामान्य माणसासाठी सोप्या भाषेत मी एक ग्रंथ लिहिला आहे तो पूर्ण झाल्यास मी बौद्ध धर्माचा स्वीकार करीत त्याप्रमाणे त्यांनी 1956 सली तर तो ग्रंथ पूर्ण केला व धर्मांतर केले तो ग्रंथ म्हणजेच बुद्धा अंड हीस धम्मा होय पुस्तकाच्या प्रकाशनासाठी तीन हजार रुपयांची रक्कम मंजूर केली होती हा मूळ इंग्रजी ग्रंथ द बुद्धा अंड हीस धम्मा यांच्या शिक्षण संस्थेच्या सिद्धार्थ प्रकाशनातर्फे 1957 प्रथम इंग्रजीत छापला गेला मराठी भाषांतर 19 70 झाले

धम्म हा मुलतः आणि तत्वतः सामाजिक आहे धम्म म्हणजे सदाचरण होय धम्म हा वैश्विक रुपी आहे.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या ग्रंथात भगवान बुद्धाच्या उपदेशाचे संकलन धम्म आश्रम आणि सद्दम असे केले आहे तसेच बाबासाहेब लिहितात बुद्धाच्या मते विचार स्वातंत्र्य ही सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे आणि सत्य शोधून काढण्याचा विचार स्वातंत्र्य हा

एकमेव मार्ग आहे असे तथागत बुद्धाची खात्री होती तथागत बुद्ध हे बौद्धिक राजकीय व सामाजिक आर्थिक स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते होते तथागत बुद्ध पूर्वी समता स्वातंत्र्य न्याय या गोष्टीचा कोणी पुरस्कार केला नाही तथागत गौतम बुद्धाच्या नावापुढील भगवान या शब्दाचा अर्थ आंबेडकर आणि खऱ्या अर्थाने सांगितला बरेच लोक याचा अर्थ देवाचा होतात परंतु देव देव नसून तो विजय मिळतो तो भगवान असा आहे बाबासाहेबांनी धम्माचे उंची आणि बुद्ध आणि त्याचा धम्म या ग्रंथातून प्रस्तुत केली आहे डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रांतीचे तत्व होते आपल्या विरुद्ध भारतीय जीवनात आमूलाग्र परिवर्तन करू इच्छिणाऱ्या विचार त्यांच्या मनामध्ये आलेला होता आणि तो सिद्ध करण्याचा प्रयत्न त्यांनी केला अडीच हजार वर्षांपूर्वी असाच एक आमूलाग्र परिवर्तन सिद्धार्थ गौतम बुद्ध यांनी करून वेद ईश्वर आत्मा परलोक ब्राह्मणी वर्चस्व संस्कृत वर्चस्व तत्कालिन वैदिकश्वसन संस्था अधिष्ठान या प्रथा विरुद्ध उभे राहण्याचे म्हणून बुद्ध नश्वर वादी झाला आत्मवादी समानतेचे नीती सुसंगतपणे सामन्याचा प्रीत वेदनेतून जडवादी झाला माणूस हा केंद्रबिंदू मानून माणसाचे परस्पर मूलगामी ठरणारी आहे

डॉ .बाबासाहेब आंबेडकर यानी मानवता जतन करण्यासाठी व्यक्तीला समाजाला व सर्व मानवतेला सर सर्वार्थाने उज्वल जगणे प्राप्त व्हावे यासाठी धम्म दिला. समता आणि बंधुता मरून पडलेल्या समाजाला समता आणि बंधुत्व यांच्या जगण्याला रे माणुसकी जगण्याचा समाजाकडे घेऊन जाणारा बुद्धिवादी विचार म्हणून डॉ बाबासाहेबांनी दिला होता बाबासाहेबांनी नास्तिक आहेत हे म्हणणे समजून घेण्याचा प्रयत्न करीत नाही जगात ईश्वरनिष्ठ म्हणजे चैतन्य वादे निरीश्वरवादी म्हणजे जडवादी असे दोन प्रकारचे तत्त्वज्ञान आहे बुद्ध तत्वज्ञान निरीश्वरवादी आणि दरवानी गटातील तत्वज्ञान आहे ईश्वरावर विश्वास ठेवण्याचे काही लाभ नाही तथागताच्या दृष्टीने ईश्वरावरील विजय अतिशय भयानक गोष्ट आहे कारण ईश्वरावर विश्वास पूजा आणि प्रार्थना यांचा वादक आहे पूजा आणि प्रार्थना रोहित पद उत्पन्न होते आणि पुरोहित हा दुष्ट बुद्धी आहे की तो सर्व प्रकारच्या गोळ्या समजूत निर्माण करतो व त्यातून समाधीचा विकास अशक्य होतं डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या मतानुसार बुद्ध तत्वज्ञान हे निरीश्वरवादी धर्म म्हणजे नीती बंधुत्व यांचा अर्थ बुद्धांची नितीन त्यांचे बंधुत्व त्यांचा धम्म देव न मानणारा हे जगात देव नाही असे माझे म्हणणे आहे की ही केवळ संकल्पना आहे ती केवळ कल्पना आहे आणि ती खरी नाही सत्यावर आधारलेले नाही असे बुद्धाच्या धम्माचे मन्या बुद्ध धम्म म्हणजे बुद्धाचा मूळ स्वाद किंवा थेरवाद तोच मूळ बुद्ध वचनावर आधारित बुद्ध धम्म 450 पूर्व काळात शुद्ध स्वरूपात होता हिंदू धर्म व अध्यात्मिक आचार विचारांनी अर्थात ब्राह्मणी धर्माचा स्वीकार काही बुद्ध बुद्ध अनुयायांनी केला त्यातूनच असून पूर्व शंभर नंतर महायान पंथ जन्माला आला विकसित झाले ईश्वर मूर्तिपूजा भक्ती कर्मकांड इत्यादी ब्राह्मणी धर्मातील आचार-विचार या प्रकारे बुद्ध धम्म देण्यात आले डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या माया नाही समजत नाही त्यामुळे ज्ञानापर्यंत जातात त्यांच्या बुद्ध धम्मात बुद्ध मुळे मनातील बुद्ध आहे हिंदुनी अवतार मानले देव मानले तो बुद्ध मूळ बुद्ध धम्मातील बुद्ध नव्हे चमत्कार अंधश्रद्धा ईश्वर भक्ती पूजा आत्महत्या आदी गोष्टी बुद्ध धर्मात आहेत असे आजही काही लोकांना वाटते पण ते बरोबर नाही डॉ बाबासाहेब सांगतात की बुद्ध काळी लेखन कला विकसित झाली नव्हती लिपीचा शोध लागला होता बुद्धाची कथा साहित्य समुद्रासारखे विचार आहे या दोन कारणांमुळे मूळ बुद्ध तत्त्वज्ञानाचे किंवा वचनांचे फेरफार होत गेला कधी मूळ रचना मधील काही भाग विसरला गेला त्यात नवा भाग घालण्यात आला अशाप्रकारे मतांतरे होत गेली हा पुढचा प्रवास बुद्धा पासून दूर जायला तत्वज्ञानात खूपच बदल होत गेला काही त्यातून वजा होत गेले काही त्यात भर पडत गेली येवला येथे मी हिंदू धर्मात जन्माला आलोतरी हिंदू धर्मात मरणार नाही या शब्दात आपल्या प्रबोधनाने व प्रबोधनकारांनी दचकून उठावे अशी विलक्षण प्रतिज्ञा केली प्रतिज्ञा 14 ऑक्टोबर 1956 रोजी नागपूर येथे पूर्ण करून दाखवली त्या वेळी त्यांनी धर्माचा त्याग केला आणि बुद्ध धम्माचा स्वीकार केला दीक्षाभूमीवर पडलेल्या उघडलेल्या अभूतपूर्व क्रांती नाट्याने वादन बासरी एका धर्माचा त्याग केला व दुसऱ्या धर्माचा स्वीकार केला धम्मा तत्व निश्चितीचे निकष होत

**धम्मा तत्व निश्चितीचे निकष**

डॉ बाबासाहेब आंबेडकर म्हणतात मूळ बौद्ध धर्मात ब्राह्मण सिद्धांत बसविण्यात आले आहेत त्यामुळे नेमके मुळातले बुद्धांचे मान्य कोणतेही सावंत राहूनच ठरवावी लागेल हे निश्चित करताना त्यांनी खालील निकष दिलेली आहे जे तर्कसंगत बुद्धी संगत आहे ते म्हणजेच बुद्धाचे होईल असे समजावे माणसाच्या कल्याणला जे पोषक आहे तेच बुद्धाचे वचन समजावे कारण बहुजन हिताय बहुजन सुखाय हीच बुद्ध वचनाची जन्म प्रतिज्ञा दुधाचे विचार पुढील दोन विभागात

केले आहेत याविषयी संमेक अज्ञान आहे भावाचा व दुसऱ्या विशेष सम्यक ज्ञान होते या गोष्टी संबंधी बुद्ध सर्वकालीन सुनिश्चित व अनुमान आणि मान आत्मक पद्धतीने बोलत असेल पण ज्या गोष्टीविषयी सामान्य ज्ञान नव्हते तीन निकष म्हणजे शुद्ध बुद्ध आणि मुलाचा अधिकृत बुद्धघोष शोधण्याची होईल

**धर्माचे स्वरूप**

धम्म  हा मानवी जीवनाचा इतिहास परंपरा आणि वर्तमानातील जीवन व्यवहार त्यांना मिळणारी वळणे यांच्या अभ्यासातून जीवनाच्या अधिक उत्पन्न देणारी माने बुद्धीने लावला शोध असतो व सामाजिक असतो सर्व जीवनामधील मानवी व्यवहार समता स्वातंत्र्य व न्याय यावर आधारित अधिष्ठित असावी अशी त्यांचे ध्येय असते या अर्थाने धम्म म्हणजे सदाचरण हे एकट्या माणसाला धर्माची गरज नसते पण धम्माशिवाय समाजात लग्न मी जगू शकत जगू शकत नाही कोणतेही समाजासमोर राजकुमार शाहीद उधम अशी तीनच पर्याय असतात बाबासाहेब आंबेडकर म्हणतात पहिल्या दोन पर्यंत स्वातंत्र्य मिळून पडले ते फक्त धम्म स्वतंत्र मत पडले ते धम्म या तिसऱ्या पर्यायाने जगतील प्रज्ञा आणि करुणा या माझ्या दोन कोनशिला आहेत प्रज्ञा म्हणजे निर्मळ बुद्धी या बुद्धीमुळे खुळचट समाजातून जातीचे निर्मूलन होते करुणा म्हणजे प्रेम या प्रेमाने समाजाचे जगणे उन्नती शक्य होते असे म्हणतात प्रज्ञा आणी करुणेचे अपुर्व मिश्रण म्हणजेच बुद्धाचा धम्म आहे धम्म आणि धर्म यात महदंतर आहे

**धम्म आणि नीती धम्म आणि नीती**

धम्मात प्रार्थना तीर्थयात्रा कर्मकांड विधी अथवा येत नाही यांना स्थान नाही जे स्थान धर्मा देवाला असते ते स्थान दमात माहिती नसते माणसाला माणसातील प्रेम सदाचरण हीच नीती होईल आणि ती म्हणजे धम्म आणि धम्माल येते या निधीसाठी देवाच्या आज्ञा नकोत देवाला संतुष्ट करण्यासाठी म्हणून माणसाला निर्माण होण्याची गरज नाही परस्पर हितासाठी व सुखासाठी उन्नतीसाठी माणसांनी परस्पर प्रेम करावयाचे असते नीतिमान हसायचे असते

**नीती पवित्र सर्वव्यापक**

डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा बुद्ध धर्म ही भारतासाठी किंवा नव्हे तर जगासाठी उन्नती निर्दोष व सुखी जीवन जगण्याचा एक आदिती नीती आहे बुद्धधम्म बाबासाहेबांच्या शब्दात येते म्हणून दाखल केला आहे तो आपण सर्व लोकांनी समजून घेतलं तर आपल्या धर्माचा त्याग केला धर्मसंस्था तयार केल्या केलेला आहे आपण नास्तिक आहोत धर्मवादी आहोत हे आपल्या लक्षात येईल पण त्याकडे डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा बुद्ध धम्माचे आचरण आपण केले पाहिजे बाबासाहेबांचा खरा सन्मान होणार आहे त्यातच आपले आंबेडकरांचे अनुयायी प्रसिद्ध होणाऱ्या बुद्ध धम्म डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी किंवा त्यासाठी चांगला नाही तर संपूर्ण भारत बुद्धमय करीत असे ते म्हणतात त्यासाठी त्यांना बुद्धीप्रामाण्यवाद उभा असलेला बुद्धी बंधू तुने तिचा पुरस्कार केलेला आहे जमत एकूणच मानवजातीचा विचार करतात तेव्हा त्यातून येथे बुद्ध नीतीचा जगाला उपकारक ठरू शकेल की ते खात्रीने सांगता ही एक विशिष्ट बुद्धीने ती म्हणजे धम्म हा त्यांच्या विश्व विचारातील वाटतो दलित समाज भारतीय समाजाने पुढे जाऊन एकूणच मानव समाज त्यांच्या चिंतन म्हणलो होतो बुद्ध धम्म या प्रकारे विश्व जीवनाचा सुख शांती चा आणि सौंदर्य सर्जनाचे चिंतन करते जीवन मध्ये सतत परिवर्तन असे बाबासाहेबांनी बुद्ध मानतो धम्मा ही मानवी जीवन सुंदर आणि समर्थ करण्याचे तंत्रज्ञान आहे हे डॉ बाबासाहेबांच्या म्हणण्यानुसार धम्म हि  सामाजिक तत्त्वज्ञान आहे त्याचा आर्थिक राजकीय शैक्षणिक व सर्व जीवनातील घटनांनी व्यापक आहेत बुद्ध आणि त्याचा धम्म होय डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा धर्म मानला नाही तर महाराष्ट्राची घटना मानली आहे ती पूर्ण समाज क्रांतीचे तत्त्वज्ञान आहे

**साराश**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 30 व 31 मे 1936 रोजी मुंबई महार समाजाची परिषदेचे आयोजन केले या परिषदेसाठी चे भाषण त्यांनी तयार केले किंवा व्यक्त केले तेच धर्म संबंधीचा त्यांची भूमिका आपल्याला दिसून येते डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची कार्य ही संपूर्णपणे अस्पृश्य समाजाच्या किंवा वर्गाच्या कल्याणासाठीच असल्याचे स्पष्ट होते तरी त्यांना फक्त महाराचीच परिषद बोलण्याची कारण त्यांनी धर्मांतराचा प्रश्न हा हिंदू समाजाकडून काही सामाजिक हक्क मागण्याचा प्रश्न वाटत नव्हता तर जीवित असलेल्या या मानवाला जिवंत करण्याचे जे मता अवस्थेमध्ये होते व त्यांच्या आयुष्य क्रमाची रूपरेषा ठरविण्यासाठी ही धम्मपरिषद किंवा महाराज परिषद आपल्याला प्रामुख्याने दिसून येते अस्पृश्य

वर्गातील प्रत्येक जातीची स्वतंत्र पणे असणे आवश्यक आहे ही धारणा डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची होती यासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी परिवर्तनाची चळवळीचा लढा संपूर्ण महाराष्ट्रभर रुजविला व चालविला ज्या ज्या ठिकाणी डॉ बाबासाहेब आंबेडकर जातील त्या त्या ठिकाणी त्यांनी आपल्या सभेच्या माध्यमातून आपल्या भाषणातून अनेक प्रकारातून समाज परिवर्तन व अस्पृश्योद्धाराचे कार्य हे आपल्याला केल्याचे दिसून येते समाजातील अस्पृश्यता नाहि शी झाली पाहिजेत किंवा ती नष्ट झाली पाहिजेत त्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सनदशीर मार्गाचा प्रयत्न केल्याचे दिसून येते त्यासाठी त्यांनी सत्याग्रह हा मार्ग स्वीकारल्याचे दिसून येते अस्पृश्यता हे मानव जातीला किंवा माणुसकीला लागलेला कलंक आहे ही भावना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची झाली होती यासाठी त्यांनी खूप कष्ट केले व अनेक नाही सहन केले शेवटी त्याने बौद्ध धर्माचा म्हणजेच 14 ऑक्टोबर 1956 रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी स्वीकार केला तो अनुयायित्व ही बौद्ध धम्माची दीक्षा किंवा धर्मपरिवर्तन आपल्यास म्हणता येईल.

**संदर्भ सूची**

1)धनजय कीर - डॉ. बाबासाहेब आंबेडकर-पापुलर प्रकाशन मुंबई-१९७२

2)डॉ अनिल शिंगारे –(संपा )महाराष्ट्रतील आंबेडकर चळवळीचा इतिहास- लातूर

3)डॉ ऋषिकेश कांबळे परिवर्तन आणि प्रबोधन चिन्मय प्रकाशन औरंगाबाद

4) यशवंत मनोहर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा बुद्ध धर्म डॉ. आंबेडकर प्रकाशन यवतमाळ

5 )डॉ रावसाहेब कसबे डॉ आनंद तेलतुंबडे धम्म आणि बुद्ध धम्म आणि भारतीय समाज क्रांती सावित्रीबाई फुले प्रकाशन

6 )कांबळे बी.सी बाबासाहेबांचे गौरव ग्रंथ

7 ) मोरे शेषराव डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक धोरणातील परिवर्तने राजहंस प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड 1025 सदाशिव पेठ पुणे आवृत्ती पहिली 1998

8 )नरके हरी आणि इतर संपादित डॉ बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड 20 महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई 400021

9 )डॉ बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती महाराष्ट्र शासन 2005

10 )खरात शंकरराव संपादित डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची आत्मकथा प्रकाशन शाम दर्पण व कोपर्डेकर इंद्रायणी साहित्य परिषद शनिवार पेठ पुणे 41 10 30 पहिली आवृत्ती 15 मार्च 1987

11) गेडाम कांबळे विजया डॉ बाबासाहेब आंबेडकर समाज धर्मतत्त्व मीमांसा गोदा प्रकाशन पहिली आवृत्ती

# भारतीय समाजाला आकार देणाऱ्या सामाजिक संस्था एक अभ्यास

**वसावे दामू विजेसिंग**
संशोधक विद्यार्थी
संशोधन केंद्र, चिस्तिया कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, खुलताबाद

**गोषवारा:**

सामाजिक संस्था ही मानवी समाजांना नियंत्रित करणारी मूलभूत चौकट आहे. ज्यासाठी नियमन आणि मूल्ये स्थापित करणे आवश्यक आहे. हा पेपर सामाजिक संस्थांची कार्ये आणि महत्त्व याचा अभ्यास करण्यात आला आहे. सर्व समाजांमध्ये कार्यरत असलेल्या पायाभूत घटक यावर प्रकाश टाकण्यात आला आहे. कुटुंब, धर्म, शिक्षण, अर्थव्यवस्था आणि सरकार, यासारख्या संस्था वेगवेगळ्या भूमिका बजावतात. सामाजिकरण कुटुंब, शिक्षण ज्ञान आणि कौशल्ये ओळख देते, सरकार सुव्यवस्था राखते, अर्थव्यवस्था संसाधने व्यवस्थापण करते आणि धर्म नैतिक तत्त्वांवर प्रभाव पाडतात. शिवाय, या संस्थांचा प्रभाव सामाजिक, आर्थिक विकासाचा शोध घेतला जातो, स्थिरता, वाढ आणि कल्याणासाठी त्यांचे योगदान अधोरेखित करते. एकसंध, प्रगतीशील आणि सर्वसमावेशक समाजाला चालना देण्यासाठी त्यांचे परस्पर संबंध आणि भूमिका समजून घेणे आवश्यक आहे.

**कीवर्ड:** शिक्षण, ज्ञान, नियम, मूल्ये, सामाजिकरण, सामाजिक संस्था, धर्म, अर्थ, विकास आणि कौशल्ये

**प्रस्तावना :**

सामाजिक संस्था मानवी समाजाच्या संरचनेत महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. सामाजिक जीवनाच्या विशिष्ट पैलूंमध्ये वर्तनासाठी एका चौकटीमध्ये काम करतात. 'सामाजिक संस्था' म्हणजे समाजाचे अस्तित्व आणि स्थिरता सुनिश्चित करण्यासाठी मूलभूत सामाजिक मूल्ये टिकवून ठेवण्यासाठी निर्माण केलेल्या सामाजिक मानदंडांच्या व्यापक आणि परस्परसंबंधित प्रणालीचा संदर्भ देते. या संस्थांच्या स्थापनेच्या पद्धती आणि गुंतागुंत वेगवेगळ्या समाजांमध्ये भिन्न-भिन्न असू शकतात, तरीही काही मूलभूत सामाजिक संस्था आहेत ज्या सर्व मानवी जातीमध्ये आहेत. समाजाची रचना आणि कार्यप्रणाली घडवण्यात आणि टिकवून ठेवण्यात सामाजिक संस्था महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. या संस्थांची स्थापना विशिष्ट सामाजिक गरजा पूर्ण करण्यासाठी आणि विविध कार्य करण्यासाठी केली जाते. एकूणच जी समुदायांच्या स्थिरता आणि संघटनात योगदान देतात. सामाजिक संस्थांच्या काही प्राथमिक कार्यामध्ये हे समाविष्ट आहे.

सरकार, कायदेशीर प्रणाली आणि कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या एजन्सी, संघटना, संस्था यासारख्या सामाजिक सुव्यवस्था आणि स्थिरता राखणारे प्रशासन आणि नियमावली प्रस्थापित करतात. समाजात निर्माण झालेले संघर्ष सोडवण्यासाठी आणि शांतता राखण्यासाठी एक स्वाय्यता प्रदान करतात. कुटुंब आणि धार्मिक संस्था व्यक्तीच्या सामाजिकीकरणात महत्त्वाची भूमिका बजावतात. समाज आणि संस्कृतीत प्रभावी सहभागासाठी आवश्यक असलेली मूल्ये, विश्वास, मानदंड आणि वर्तन विषयक दिग्दर्शन प्रदान करतात. आर्थिक संस्था, व्यवसायांसह, बँका आणि वित्तीय प्रणाली, उत्पादन, वितरण आणि देवाणघेवाण इत्यादी बाबी सुलभ करतात. आर्थिक संसाधनांचे वाटप, अर्थव्यवस्थेचे कार्य योग्य व सुनिश्चित करण्यातही मदत करतात. ज्ञान, कौशल्ये आणि सांस्कृतिक मूल्ये एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे प्रसारित करणे. ते समाजातील विविध भूमिका आणि जबाबदाऱ्या पार पडणाऱ्या व्यक्तींना तयार करतात यासाठी शैक्षणिक संस्था जबाबदारी घेत आहेत. आरोग्यसेवा संस्था आणि वैद्यकीय प्रणाली व्यक्तींचे आरोग्य आणि कल्याण राखण्यासाठी सेवा पुरवतात. नातेसंबंध, पालकत्व, वारसा, कुटुंब, विवाह संस्था पुनरुत्पादन, विवाह आणि कौटुंबिक निर्मिती बद्दलचे नियम नियंत्रित करते. त्याचे नियमन करतात. सुधारात्मक संस्था, न्यायिक प्रणाली आणि कायदे, नियमांची अंमलबजावणी करणे, न्याय राखणे आणि गुन्हेगारी क्रियाकलापांना प्रतिसाद देणे. समाजाला हानीपासून वाचवण्यासाठी आणि न्याय्य आणि न्याय्य समुदाय राखण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. सामाजिक नियंत्रण आणि न्याय यासाठी धार्मिक संस्था आध्यात्मिक मार्गदर्शन देतात, नैतिक मूल्यांचे समर्थन करतात. व्यक्ती आणि समुदायांना अर्थ आणि उद्देशाची जाणीव देतात. सांस्कृतिक जतन आणि अभिव्यक्ती करिता सांस्कृतिक संस्था, जसे की संग्रहालये, ग्रंथालये आणि सांस्कृतिक केंद्रे, सांस्कृतिक वारसा आणि अभिव्यक्तीचे जतन आणि प्रोत्साहन, समुदाय किंवा समाजाच्या ऐतिहासिक योगदान देतात,

प्रस्तुत संशोधन लेखाची मांडणी करण्या करिता ऐतिहासिक विश्लेषण पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. या संशोधन लेखाचा आढावा घेण्याचे प्रमुख उद्दिष्ट भारतीय समाजातील मुलभूत संस्था ज्या व्यक्तीच्या, समाजाच्या विकासाला अधोरेखित करतात, त्या मुलभूत संस्थाचा अभ्यास करणे हाच आहे.

सामाजिक संस्थेचे प्रमुख्य घटक मानवी जीवनाच्या विविध पैलूंवर नियंत्रण करणाऱ्या संघटित आणि संरचित प्रणालींचे प्रतिनिधित्व करतात. व्यक्ती आणि समुदायांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी या संस्था कालांतराने विकसित झालेल्या आहेत, सामाजिक सुव्यवस्था आणि सहकार्यासाठी एक आकार प्रदान करणे. मूलभूत सामाजिक संस्था मुळात या पाच मूलभूत सामाजिक संस्थांचे उतरंडीच्या स्वरुपात (पिरॅमिड) आहेत. ते खालीलप्रमाणे

**1) कौटुंबिक संस्था (कुटुंब):** कुटुंब हा समाजाचा एक घटक मानला जातो. कौटुंबिक संस्था ही समाजाची मूलभूत एकक आहे, जी व्यक्तीसाठी प्राथमिक सामाजिक एजंट म्हणून काम करते. कुटुंबे मुलांना भावनिक आधार, पालनपोषण आणि काळजी देतात, त्यांना सांस्कृतिक नियम, मूल्ये आणि वर्तन शिकण्याच्या प्रक्रियेत मार्गदर्शन करतात. याव्यतिरिक्त, आंतरपिढी जान आणि परंपरांच्या प्रसारासाठी कुटुंबे जबाबदार आहेत. शिवाय, वैयक्तिक ओळख निर्माण करण्यात, एखाद्याच्या जागतिक दृष्टिकोनाला आकार देण्यात आणि समुदायांमध्ये सामाजिक गतिशीलता प्रभावित करण्यात कुटुंबे महत्त्वाची भूमिका बजावतात.'[1]

आर्थिक विकासासाठी समाजात कुटुंबाची भूमिका महत्त्वाची असते. कुटुंब हे कोणत्याही समुदायाचे मूलभूत साच्या म्हणून काम करतात. त्यांच्या सदस्यांची मूल्ये, कार्य नैतिकता आणि कौशल्ये यांना आकार देतात. मजबूत आणि आश्वासक कौटुंबिक वातावरण स्थिरता आणि भावनिक कल्याण वाढविण्याचे कार्य करते. ज्यामुळे व्यक्तींना शिक्षण आणि भविष्यकालीन प्रगतीवर लक्ष केंद्रित करता येते. शिवाय, कुटुंबे अनेकदा अत्यावश्यक सामाजिक सुरक्षा जाळे आणि आर्थिक सहाय्य प्रदान करण्याचे महत्वपूर्ण कार्य करते. व्यक्तींना जोखीम घेण्यास, त्यांच्या भविष्यात गुंतवणूक करण्यास आणि अर्थव्यवस्थेत सकारात्मक योगदान देण्यास सक्षम करतात. अशा रीतीने, समृद्ध समाजाचा पाया कुटुंबातील ताकदीवर व त्याच्या कुटुंबांची एकसंधता यावर अवलंबून असतो.

**2. धार्मिक संस्था (धर्म):** समाजाच्या नैतिक आणि आध्यात्मिक जडणघडणीत धार्मिक संस्था महत्त्वाची भूमिका बजावतात. ते नैतिक तत्त्वे, मूल्ये आणि श्रद्धा यावर मार्गदर्शन करतात, वैयक्तिक वर्तन आणि समुदाय एकसंधतेवर प्रभाव टाकतात. धर्म हा अनेकदा आव्हानात्मक काळात सांत्वनाचा स्रोत म्हणून काम करतो आणि जीवनात उद्देश आणि अर्थ प्राप्त करण्यास योगदान देतो. शिवाय, धार्मिक संस्था सामायिक विधी, प्रथा आणि उत्सवाद्वारे लोकांना एकत्र आणून सामाजिक एकता वाढवतात.[2]

सर्वप्रथम, धर्म संस्था या अनेकदा नैतिक मूल्ये आणि नैतिक तत्त्वांना प्रोत्साहन देतात जे आर्थिक व्यवसायाच्या क्रियाकलापांमध्ये व्यक्तींच्या वर्तन विषयक मार्गदर्शन करतात. करुणा, प्रामाणिकपणा आणि निष्पक्षतेत रुजलेली अशी मूल्ये विश्वासार्हता यांच्या स्थापनेला हातभार लावतात. धार्मिक संस्था सहसा समाजातील गरीब आणि उपेक्षित सदस्यांना सहाय्य प्रदान करून सेवाभावी आणि कल्याणकारी उपक्रमांमध्ये गुंतवतात. हे गरीबी दूर करण्यात आणि सामाजिक एकसंधतेला चालना देण्यास मदत करू शकते. एक अधिक स्थिर आणि सामंजस्यपूर्ण समाज निर्माण करू शकले.

धार्मिक पर्यटनामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेत लक्षणीय वाढ होऊ शकते. धार्मिक महत्त्वाची ठिकाणे अनेकदा यात्रेकरू आणि पर्यटकांना आकर्षित करतात, रोजगाराच्या संधी निर्माण करतात आणि आजूबाजूच्या भागात आर्थिक विकासाला चालना देतात. एकूणच, समाजाच्या आर्थिक विकासामध्ये धार्मिक संस्थांची भूमिका बहुआयामी आहे, ज्यामध्ये नैतिक मार्गदर्शन, सामाजिक कल्याणकारी उपक्रम, समुदाय एकता, शिक्षणातील गुंतवणूक आणि पर्यटन क्षेत्रातील योगदान यांचा समावेश आहे. जेव्हा या पैलूंचे पालन पोषण केले जाते आणि त्याचा सकारात्मक उपयोग केला जातो, तेव्हा धार्मिक संस्था शाश्वत आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी आणि अधिक समावेशक आणि समृद्ध समाजाला चालना देण्यासाठी मौल्यवान भागीदार बनू शकतात. जिथे समाजाच्या आर्थिक स्तरामध्ये वाढ होऊ शकते.

**3. शैक्षणिक संस्था (शिक्षण):** शिक्षण ही एक मूलभूत सामाजिक संस्था आहे. जी वैयक्तिक आणि सामाजिक विकासासाठी आवश्यक ज्ञान, कौशल्ये आणि मूल्ये प्रदान करते. औपचारिक शिक्षण प्रणाली, जसे की शाळा, कॉलेज आणि विद्यापीठे, व्यक्तींना शैक्षणिक कौशल्य, गंभीर विचार क्षमता आणि व्यावहारिक जीवन कौशल्ये सुसज्ज करतात.

शिक्षणाला चालना मिळते. वैयक्तिक वाढ आणि वरच्या दिशेने सामाजिक आर्थिक गतिशीलता प्रदान करून सामाजिक गतिशीलता. शिवाय, हे सामायिक संस्कृती आणि इतिहासाचे पालनपोषण करून राष्ट्रीय ओळख आणि एकसंधतेची भावना वाढवते.'[3]

समाजाच्या आर्थिक विकासात मूलभूत शिक्षणाची आणि परिवर्तनाची भूमिका असते. भांडवल हे मानवी विकासासाठी आधारशिला म्हणून काम करते. ज्ञान, कौशल्ये आणि कौशल्य असलेल्या व्यक्तींना सक्षम बनवते. जे कार्यबलामध्ये प्रभावीपणे सहभागी होण्यासाठी महत्त्वपूर्ण आहेत. सुशिक्षित लोकसंख्या तांत्रिक प्रगती आणि नवकल्पना, उत्पादकता आणि आर्थिक वाढीसाठी अधिक अनुकूल असते. उच्च शिक्षण व्यक्तींना मूल्यवर्धित क्रियाकलापांमध्ये गुंतवून आणि उद्योजकतेला चालना देण्यास सक्षम करून कर्मचार्याची उत्पादकता वाढवते, ज्यामुळे नवीन निर्मिती होते. एकूणच व्यवसाय आणि नोकरीच्या संधी, याव्यतिरिक्त, शिक्षणामुळे गरिबी आणि उत्पन्नातील असमानता कमी होण्यास हातभार लागतो. कारण ते व्यक्तींना गरिबीचे चक्र तोडण्यासाठी आणि चांगल्या आर्थिक संभावनांचा पाठपुरावा करण्यासाठी साधनांसह सुसज्ज करते. शिवाय, सुशिक्षित समाज अधिक माहितीपूर्ण निर्णय घेतात, ज्यामुळे चांगले प्रशासन आणि अधिक शाश्वत आर्थिक धोरणे निर्माण होतात. जसजसे शिक्षण संधींचा विस्तार करत आहे आणि मानवी क्षमता अनलॉक करत आहे, तसतसे आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी त्याची भूमिका समृद्ध आणि लवचिक राष्ट्रांच्या निर्मितीसाठी अधिकाधिक अपरिहार्य होत आहे.

**4. आर्थिक संस्था (अर्थव्यवस्था):** आर्थिक संस्था समाजात वस्तू आणि सेवांचे उत्पादन, वितरण आणि देवाणघेवाण यासाठी जबाबदार असते. यात भांडवलशाही, समाजवाद आणि मिश्र अर्थव्यवस्थांसह विविध आर्थिक प्रणालींचा समावेश आहे, प्रत्येक संसाधन वाटप आणि संपत्ती वितरणावर वेगळ्या प्रकारे प्रभाव टाकते. आर्थिक संस्था रोजगाराच्या संधी निर्माण करतात, नावीन्य आणतात आणि आर्थिक वाढीला चालना देतात. एकूणच ते व्यक्तीच्या भौतिक गरजा पूर्ण करण्यात मदत करतात आणि याव्यतिरिक्त, समाजातील जीवनमानात योगदान देतात.[4]

आर्थिक संस्था समाजात महत्त्वाची भूमिका बजावतात कारण त्या कार्यरत आणि समृद्ध अर्थव्यवस्थेचा कणा बनतात. या संस्थांमध्ये बँका, शेअर बाजार, नियामक संस्था आणि संसाधने, भांडवल आणि वस्तूंचा प्रवाह सुलभ करणाऱ्या वित्तीय संस्था यासारख्या विविध संस्थांचा समावेश होतो. त्यांच्या प्राथमिक कार्यापैकी एक म्हणजे आर्थिक क्रियाकलापांमध्ये स्थिरता आणि भविष्यसूचकता सुनिश्चित करणे, व्यवसाय आणि व्यक्तींना आत्मविश्वासाने निर्णय घेण्यासाठी एक फ्रेमवर्क प्रदान करणे. ते नियम, नियम आणि मालमत्ता अधिकार स्थापित करतात जे गुंतवणूक, उद्योजकता आणि नवकल्पना यासाठी अनुकूल वातावरण निर्माण करतात. शिवाय, आर्थिक संस्था वस्तू आणि सेवांची खात्री करून संसाधनांचे वाटप सुलभ करतात. लोकसंख्येच्या गरजा आणि मागण्या पूर्ण करण्यासाठी कार्यक्षमतेने वितरित केले जातात. स्पर्धेला प्रोत्साहन देऊन, मक्तेदारी रोखून आणि वाजवी व्यापार पद्धतींना प्रोत्साहन देऊन, ते बाजाराची कार्यक्षमता आणि ग्राहक कल्याण वाढवतात. आर्थिक संस्थांच्या प्रभावी कामकाजामुळे रोजगार निर्मिती, उत्पन्न निर्मिती आणि एकूणच आर्थिक वाढ होण्यास हातभार लागतो. सुधारित राहणीमान आणि वर्धित सामाजिक कल्याण, थोडक्यात, आर्थिक संस्था हे महत्त्वाचे घटक आहेत जे आर्थिक परिदृश्याला आकार देतात आणि समाजात शाश्वत विकास आणि प्रगतीचा पाया घालतात.

**5. राजकीय संस्था (सरकार):** कायदे आणि नियमांच्या स्थापनेद्वारे आणि अंमलबजावणीद्वारे समाजाचे संचालन आणि सामाजिक सुव्यवस्था राखण्यासाठी राजकीय संस्था जबाबदार असतात. सरकार, राजकीय पक्ष आणि कायदेशीर यंत्रणा या संस्थेचे महत्त्वाचे घटक आहेत. राजकीय संस्था निर्णय, संघर्ष निराकरण आणि वैयक्तिक हक्क आणि स्वातंत्र्यांचे संरक्षण यासाठी एक फ्रेमवर्क प्रदान करतात. शिवाय, ते लोकांच्या आवाजाचे प्रतिनिधित्व करतात आणि ते ज्या समाजाचे शासन करतात त्यांच्या सामूहिक कल्याणाचे रक्षण करण्यासाठी जबाबदार असतात.[5]

राजकीय संस्थांची, विशेषतः सरकारची, समाजात भूमिका सर्वोपरि आहे कारण ते एखाद्या राष्ट्रात सुव्यवस्था राखण्यासाठी आणि व्यवस्थापित करण्यासाठी जबाबदार असतात. सरकार कायदे बनवण्यासाठी आणि त्याची अंमलबजावणी करण्यासाठी, सामाजिक एकसंधता सुनिश्चित करण्यासाठी आणि त्यांच्या नागरिकांच्या हक्कांचे आणि हितांचे रक्षण करण्यासाठी फ्रेमवर्क प्रदान करतात. ते संसाधनांचे वाटप, कर आकारणी आणि सार्वजनिक खर्चामध्ये

महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात, ज्याचा देशाच्या एकूण आर्थिक कल्याणावर थेट प्रभाव पडतो. विविध धोरणे आणि नियमाद्वारे, सरकार आर्थिक विकासाला चालना देऊ शकते, गरिबी आणि असमानता यासारख्या समस्यांचे निराकरण करू शकते आणि गुंतवणूक आणि उद्योजकतेला प्रोत्साहन देणारे स्थिर व्यावसायिक वातावरण तयार करू शकते. लोकसंख्येचे जीवनमान आणि मानवी भांडवल वाढवण्यासाठी आवश्यक असलेल्या शिक्षण, आरोग्यसेवा आणि पायाभूत सुविधांच्या विकासासह सार्वजनिक सेवांची जबाबदारीही राजकीय संस्था घेतात. शिवाय, सरकारे आंतरराष्ट्रीय मंचावर त्यांच्या राष्ट्रांचे प्रतिनिधित्व करतात, मुत्सद्देगिरी, व्यापार वाटाघाटी आणि जागतिक आव्हाने हाताळतात. एकूणच राजकीय भूमिका संस्था म्हणजे एक सक्षम वातावरण निर्माण करणे जिथे व्यक्तींची भरभराट होऊ शकते आणि समाज अधिक समृद्धी, सामाजिक न्याय आणि शाश्वत विकासाकडे प्रगती करु शकतात.

**सारांशः**

भारतीय समाजाला घडवण्यासाठी आकार देणाऱ्या मूलभूत सामाजिक संस्था कुटुंबसंस्था, धर्मसंस्था, शिक्षणसंस्था, अर्थव्यवस्था (अर्थसंस्था) आणि सरकार ज्या पायावर मानवी समाज बांधले जातात आणि कार्य करतात. प्रत्येक संस्था व्यक्तींचे जीवन आणि समुदायांच्या सामूहिक जीवनाला आकार देण्यासाठी एक वेगळी आणि महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. कुटुंब पोषक वातावरण, मूल्ये वाढवणारे आणि भावनिक आधार प्रदान करते. शिक्षण व्यक्तींना ज्ञान आणि कौशल्ये, वैयक्तिक वाढ आणि आर्थिक विकासाला चालना देते. सरकार सुव्यवस्था प्रस्थापित करते, कायदे अंमलात आणणे, नागरिकांच्या कल्याणाचे रक्षण करणे, अर्थव्यवस्था संसाधनांचे उत्पादन आणि वितरण सुलभ करते, आर्थिक समृद्धी आणि प्रगती चालविते. धर्म आध्यात्मिक मार्गदर्शन आणि नैतिक तत्त्वे प्रदान करतो, त्याच्या अनुयायांच्या मूल्यांवर आणि वर्तनांवर प्रभाव पाडतो.

एकत्रितपणे, या संस्था एकमेकांशी जोडतात आणि एकमेकांवर प्रभाव टाकतात. मानवी समाजाच्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक परिदृश्याची रचना करतात. या संस्थांचे महत्त्व ओळखणे आणि समजून घेणे हे शाश्वत, सर्वसमावेशक आणि सामंजस्यपूर्ण समाज निर्माण करण्यासाठी अतिशय महत्वाचे आहे. भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी तसेच सामाजिक, आर्थिक भरभराट करतात आणि विकसित, प्रगत राष्ट्र निर्माण करतात.

**संदर्भः**


1. वि. का. राजवाडे, (2010) विवाह संस्थेचा इतिहास, लोकवाङ्मय गृह. पृ.50-55
2. RAO, M.S.A., An Urban Sociology in India: Reader and Source Book. Orient Longman, New Delhi, Book Review, Jstore journal, Pp. 279-280
3. बेते, आर्दे (1991) 'द रिप्रोडक्शन ऑफ इनइक्वालिटीः ऑक्पेशन, कास्ट कास्ट एंड फैमिली', कंट्रीब्शयूस टू इडिंयन सोसियोलॉजी. से एन. एस., वॉल्यूम. 25, न.1, पृ. 281
4. देशपांडे सतीश, (2003). कंन्टेमप्री इंडियाः ए सोसियोलॉजिकल व्हयू, पेंग्विन बुक्स, नई दिल्ली. पृ. 281
5. Durkheim, Emile (1956). Education and Sociology, The Free Press, New York, Pp. 125-130,http://isteonline.in/Datafiles/cms/JTE%20Journal%20Apr%20to%20June%2020 23%20web.pdf

# गेल ऑम्वेट यांचे स्त्री स्वातंत्र्याची संकल्पना: एक अभ्यास

**माधुरी भगवान वाघमारे**
संशोधक विद्यार्थिनी

**प्रा. डॉ. पुष्पा गायकवाड**
मार्गदर्शक, इतिहास व प्राचीन भारतीय संस्कृती विभाग.
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर

**प्रस्तावना:**

स्त्री स्वातंत्र्य ही केवळ एक सामाजिक संकल्पना नसून, तिचे राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक पैलूही महत्त्वाचे आहेत. स्त्रियांना समान हक्क आणि संधी देण्याच्या दृष्टिकोनातून अनेक विचारवंतांनी वेगवेगळ्या संकल्पना मांडल्या आहेत. त्यापैकी गेल ऑम्वेट यांचे विचार स्त्री स्वातंत्र्याच्या व्यापक संदर्भात महत्त्वाचे मानले जातात. त्यांच्या लेखनात आणि समाजपरिवर्तनाच्या कार्यात स्त्रीच्या आत्मनिर्भरतेवर आणि समतेच्या तत्वांवर विशेष भर देण्यात आला आहे. स्त्रीच्या मुक्तीची व्याख्या समाजाच्या विविध घटकांनुसार बदलते. पारंपरिक समाजव्यवस्थेत स्त्रीला दुय्यम स्थान देण्यात आले होते. तिला पुरुषप्रधान व्यवस्थेत केवळ घरकुल सांभाळण्याचे जबाबदारी होती. मात्र, बदलत्या काळानुसार आणि स्त्रीवादी चळवळींच्या प्रभावामुळे स्त्रिया शिक्षण, रोजगार, राजकारण, आणि समाजकारण यामध्ये सक्रीय सहभाग घेऊ लागल्या. यामध्ये गेल ऑम्वेट यांच्या विचारसरणीने मोठा वाटा उचलला आहे.

गेल ऑम्वेट यांनी स्त्रीच्या स्वातंत्र्याची संकल्पना अधिक सखोल पद्धतीने मांडली आहे. त्यांचे मत आहे की, स्त्रीचे खरे स्वातंत्र्य तिच्या शारीरिक, मानसिक, आर्थिक आणि सामाजिक स्वायत्ततेमध्ये आहे. केवळ कायद्याने किंवा सरकारी धोरणांद्वारे स्त्री स्वातंत्र्य मिळत नाही, तर त्यासाठी मानसिकतेत बदल होणे गरजेचे आहे. समाजातील पुरुषप्रधान मानसिकता स्त्रीच्या उन्नतीसाठी मोठा अडथळा ठरते, आणि त्याविरोधात संघर्ष करणे आवश्यक आहे. स्त्री स्वातंत्र्य हा एक स्थिर संकल्पना नसून, ती सतत विकसित होणारी प्रक्रिया आहे. जागतिकीकरणाच्या युगात स्त्रियांना विविध संधी मिळत असल्या तरीही अजूनही सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक बंधने त्यांना अडवतात. शिक्षण, रोजगार आणि राजकीय सहभाग यामध्ये स्त्रियांना समान संधी मिळणे आवश्यक आहे. गेल ऑम्वेट यांच्या मते, स्त्रीने स्वतःच्या क्षमतांवर विश्वास ठेवून निर्णयक्षमता विकसित केली पाहिजे.

स्त्रीच्या सशक्तीकरणासाठी शिक्षण हे महत्त्वाचे साधन आहे. शिक्षणामुळे स्त्री आर्थिकदृष्ट्या सक्षम होते आणि समाजात तिचे स्थान मजबूत होते. गेल ऑम्वेट यांनी असे सुचवले आहे की, स्त्रीच्या हक्कांसाठी केवळ कायदेशीर सुधारणा पुरेशा नाहीत, तर समाजाने त्याला सकारात्मक प्रतिसाद देणे आवश्यक आहे. पुरुषप्रधान व्यवस्थेतील पितृसत्ताक मानसिकता बदलणे गरजेचे आहे, जेणेकरून स्त्री स्वातंत्र्य प्रत्यक्षात येऊ शकेल. स्त्री स्वातंत्र्य ही संकल्पना केवळ शाब्दिक चर्चा न राहता प्रत्यक्ष आचरणात आणली पाहिजे. आजच्या समाजात महिलांनी आपले हक्क जाणून घेतले पाहिजेत आणि त्यासाठी संघर्ष करावा लागेल. समाजातील सर्व स्तरांमध्ये स्त्री-पुरुष समानता रुजवण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. गेल ऑम्वेट यांनी मांडलेली स्त्री स्वातंत्र्याची संकल्पना आजही तितकीच महत्त्वाची असून, तिच्या अभ्यासातून समाजाला नवी दिशा मिळू शकते.

**स्त्री स्वातंत्र्याची संकल्पना:**

स्त्री स्वातंत्र्य ही केवळ सामाजिक बंधने दूर करण्यापुरती मर्यादित नसून, तिचा व्यापक दृष्टिकोन आहे. ही संकल्पना स्त्रीच्या आत्मनिर्भरतेशी, सामाजिक न्यायाशी आणि सत्ताकेंद्रित समाजातील तिच्या स्थानाशी संबंधित आहे. स्त्रीला स्वायत्तता आणि समान संधी मिळाल्या पाहिजेत, यावर गेल ऑम्वेट जोर देतात.

**जीवन परिचय :**

ऑम्वेट, गेल (Omvedt, Gail) : (२ ऑगस्ट १९४१ – २५ ऑगस्ट २०२१ अमेरिकन-प्रसिद्ध भारतीय .( समाजशास्त्रज्ञ, आंतरराष्ट्रीय किर्तीच्या संशोधिका आणि दलित शोषितांच्या प्रेरणास्थान गेल यांचा जन्म अमेरिकेतील . गेल यांचे .शलाका भारत पाटणकर हे त्यांचे सासरकडील नाव .मिनीॲपोलिस येथे मध्यमवर्गीय कुटुंबात झाला पदवीपर्यंतचे शिक्षण मिनीॲपोलिस येथील कार्लटन महाविद्यालयात झाले; तर मिनीॲपोलिस विद्यापीठातून त्यांनी समाजशास्त्र विषयात एम .च्या शिक्षणानंतर त्या १९६३ मध्ये सर्वप्रथम भारतात आल्या .ए .एम .ही पदवी संपादन केली .ए .

येथे त्यांनी अनेक चळवळींच्या अभ्यासाला सुरुवात केली; मात्र त्या महात्मा फुले यांच्या सत्यशोधक चळवळ, ब्राह्मणेतर चळवळ, सांस्कृतिक संघर्षांवरील चळवळी यांचा अभ्यास केला या अभ्यासातूनच त्यांनी महात्मा फुले यांच्या . चळवळींवर आधारित'दी कल्चरल रिवोल्ट इन ए कोलोनेल सोसायटी दी नॉन ब्राह्मण मुव्हमेंट इन वेस्टर्न इंडिया :, १८७३ – १९३०' (वसाहतिक समाजातील सांस्कृतिक बंड पश्चिम भारतातील ब्राह्मणेत् :तर चळवळ १८७३ – १९३० .हा पीएच ( साठी प्रबंध लिहून अमेरिकेतील कॅलिफोर्निया विद्यापीठ.डी, बर्कली येथे सादर केला आणि १९७३ मध्ये पीएच ही .डी . .त्यानंतर त्यांनी लिहिलेला प्रबंधसुद्धा पुस्तकरूपाने १९७६ मध्ये प्रकाशित झाला .पदवी मिळविली

**गेल ऑम्वेट यांचे विचार:**

गेल ऑम्वेट (Gayle S. Ambet) यांचे विचार स्त्रीवादाच्या क्षेत्रातील अत्यंत महत्त्वपूर्ण योगदान म्हणून ओळखले जातात. गेल ऑम्वेटने सामाजिक स्त्रीवाद, आर्थिक स्वातंत्र्य, शैक्षणिक स्वातंत्र्य, आणि राजकीय सहभाग यांसारख्या मुद्द्यांवर सखोल विचार मांडले आहेत. तिच्या विचारधारेत स्त्रीला केवळ पारंपारिक सामाजिक भूमिकांपर्यंत मर्यादित न ठेवता, तिला संपूर्ण समाजव्यवस्थेत समानतेचे स्थान देणे आवश्यक आहे. तिचे विचार विविध सामाजिक, सांस्कृतिक, आणि राजकीय परिपेक्ष्यात महत्त्वपूर्ण ठरतात कारण ते केवळ स्त्रियांच्या हक्कांच्या पुरस्कर्त्या नाहीत, तर संपूर्ण मानवतेच्या समानतेसाठी संघर्ष करणारे आहेत.

**1. सामाजिक स्त्रीवाद**

गेल ऑम्वेटने सामाजिक स्त्रीवादाच्या दृष्टीने सामाजिक रचनांमध्ये समावेशकतेचे महत्त्व अधोरेखित केले आहे. स्त्रीवाद हे एक फक्त महिलांच्या हक्कांसाठी कार्य करणारे नाही, तर एक व्यापक सामाजिक बदल घडवून आणणारे आहे. आंबेटच्या विचारधारेत, स्त्रीवाद म्हणजे एक असा विचारप्रवाह ज्याद्वारे समाजातील प्रत्येक व्यक्तीला समान अधिकार, समान संधी आणि समान सन्मान मिळावा. आंबेटने स्त्रीच्या शोषणावर अनेक ठिकाणी चर्चा केली आहे. तिच्या मते, समाजातील संरचनात्मक आणि सांस्कृतिक बदल घडवून स्त्रियांच्या हक्कांना न्याय दिला जाऊ शकतो. तिने पुढे म्हटले आहे की, स्त्रियांच्या शोषणाचे मुळ समजुती, संस्कृती आणि पारंपारिक रूढी असतात. त्या रूढींना झुगारून महिलांसाठी एक समतोल, समावेशक आणि न्यायपूर्ण समाज निर्माण करणे आवश्यक आहे.

**2. आर्थिक स्वातंत्र्य**

आर्थिक स्वातंत्र्य हा स्त्रीवादी विचारधारेतील एक अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. गेल ऑम्वेटने नेहमीच या मुद्द्यावर भाष्य केले आहे की स्त्रीचे आर्थिक स्वातंत्र्य म्हणजे तिच्या स्वतंत्रतेची आणि आत्मनिर्भरतेची खरी ओळख. समाजात स्त्रियांचे आर्थिक सशक्तिकरण होण्यासाठी त्यांच्या कामाच्या स्थितीमध्ये बदल घडवणे अत्यंत आवश्यक आहे. ऑम्वेटचे मानणे आहे की स्त्रिया जर आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होत्या, तर त्यांना कोणत्याही प्रकारच्या शोषणास सामोरे जावे लागणार नाही. आजही अनेक समाजांमध्ये महिलांना योग्य वेतन, रोजगाराची संधी, आणि आर्थिक सशक्तिकरणाची समान संधी मिळत नाही. त्यामुळे आंबेटने महिलांच्या रोजगारातील अडचणी दूर करण्याची गरज व्यक्त केली आहे. महिलांसाठी सुरक्षित, समृद्ध, आणि समतावादी रोजगाराच्या संधी निर्माण करणं हे आर्थिक स्वातंत्र्य प्राप्त करण्यासाठी आवश्यक आहे. आंबेटने असेही म्हटले आहे की महिलांना स्वतंत्रपणे काम करण्याची संधी देणं, त्यांना स्वतःच्या आर्थिक निर्णयांमध्ये स्वातंत्र्य मिळवून देणं, यामुळे समाजातील महिलांची स्थिती सुधारेल आणि तेच समाजाच्या प्रगतीसाठी फायदेशीर ठरेल.

**3. शैक्षणिक स्वातंत्र्य**

शैक्षणिक स्वातंत्र्य हे आंबेटच्या विचारधारेतील आणखी एक महत्त्वाचा घटक आहे. गेल ऑम्वेटने नेहमीच शैक्षणिक समता आणि महिला शिक्षणाची महत्त्वता अधोरेखित केली आहे. तिच्या मते, समाजातील प्रत्येक व्यक्तीला योग्य शिक्षण मिळवण्याचा हक्क असावा, विशेषतः महिलांना. शालेय शिक्षण आणि उच्च शिक्षणातील समानतेसाठी तिने अनेकदा संघर्ष केला आहे. आंबेटचे मानणे आहे की शैक्षणिक स्वातंत्र्य हे स्त्रियांच्या पूर्ण विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. जर महिलांना योग्य शिक्षण मिळाले, तर त्या फक्त आर्थिकदृष्ट्या स्वावलंबीच होणार नाहीत, तर त्या समाजाच्या प्रत्येक क्षेत्रात योगदान देण्यास सक्षम होणार आहेत. शिक्षणामुळे महिलांची वैयक्तिक व सामाजिक स्थिती सुधारते आणि त्यांना त्यांच्या हक्कांची जाणीव होऊ शकते. आजही अनेक समाजांमध्ये महिलांसाठी शिक्षणाची संधी मर्यादित आहे, विशेषतः ग्रामीण भागात. आंबेटने यावर विचार करत, महिला शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य देण्याचे महत्त्व सांगितले आहे. यामुळे त्यांना

केवळ नोकरी आणि रोजगाराच्या संधीच मिळणार नाहीत, तर समाजाच्या विविध ठिकाणी निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत त्यांचा सहभागही वाढेल.

**4. राजकीय सहभाग**

गेल ऑम्वेटने राजकीय सहभागाच्या संदर्भातही आपले विचार मांडले आहेत. तिच्या मते, महिलांना केवळ आर्थिक आणि शैक्षणिक स्वातंत्र्य नाही, तर त्यांना राजकारणात देखील समान स्थान मिळायला हवे. आंबेटने नेहमीच स्त्रियांच्या राजकीय सहभागाची आवश्यकता व्यक्त केली आहे. महिलांचा राजकारणातील सहभाग केवळ त्यांच्यासाठी नाही, तर समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी महत्त्वपूर्ण आहे. आंबेटच्या विचारधारेत, महिलांना राजकारणात संधी मिळावी लागते, त्यांना निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत भाग घेण्याचा हक्क असावा. महिलांचा राजकीय सहभाग हे त्यांचे स्वातंत्र्य आणि समानता दर्शवते. यामुळे समाजात एक वेगळा आणि प्रगल्भ दृष्टिकोन येईल, ज्यामुळे सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक समस्यांवर अधिक प्रभावीपणे काम करता येईल. आज अनेक ठिकाणी महिला राजकारणात सक्रिय होण्यासाठी संघर्ष करत आहेत, आणि यामध्ये आंबेटच्या विचारांची मोठी भूमिका आहे. तिच्या मते, जर महिलांना राजकारणात समान स्थान मिळाले, तर ते संपूर्ण समाजाच्या हितासाठी एक सकारात्मक बदल घडवून आणू शकते.

गेल ऑम्वेटचे विचार स्त्रीवादाच्या क्षेत्रात मोलाचे ठरले आहेत. तिच्या विचारधारेत, स्त्रीला समाजाच्या प्रत्येक क्षेत्रात समान हक्क, समान संधी, आणि समान स्थान मिळावे, हे मुख्य उद्दिष्ट आहे. आर्थिक स्वातंत्र्य, शैक्षणिक स्वातंत्र्य, आणि राजकीय सहभाग या मुद्द्यांवर आंबेटने केलेले कार्य आणि विचार समाजातील स्त्रियांच्या स्थितीला बदलण्यासाठी प्रेरणादायक आहेत. आंबेटच्या या दृष्टिकोनामुळे महिलांच्या हक्कांसाठी होणारे संघर्ष आणखी सशक्त बनले आहेत, आणि समाजातील समतेच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले गेले आहे.

**स्त्री स्वातंत्र्यावर त्यांचा प्रभाव:**

गेल ऑम्वेट यांच्या विचारांनी अनेक सामाजिक चळवळींना प्रेरणा दिली आहे. स्त्री स्वातंत्र्याचा व्यापक अभ्यास करून त्यांच्या संकल्पनांचे आजच्या सामाजिक परिस्थितीशी जुळवून घेणे गरजेचे आहे. जागतिकीकरण, तंत्रज्ञान आणि बदलत्या सामाजिक प्रवाहांमुळे स्त्रीच्या स्वातंत्र्याला नव्या आव्हानांचा सामना करावा लागत आहे.

**निष्कर्ष:**

गेल ऑम्वेट यांच्या स्त्री स्वातंत्र्याच्या संकल्पनेचा अभ्यास करताना लक्षात येते की, स्त्रीला संधी मिळाल्यास ती समाजाच्या विकासामध्ये महत्त्वपूर्ण योगदान देऊ शकते. त्यांचे विचार आजही तितकेच महत्त्वाचे आणि प्रेरणादायी आहेत. स्त्री स्वातंत्र्य ही एक स्थिर संकल्पना नसून, सतत विकसित होणारी प्रक्रिया आहे आणि तिचा अभ्यास करणे समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून आवश्यक ठरते.

**संदर्भ सूची:**


1. गेलं ऑम्व्हेट, (2011) दलित दृष्टी,वाणी प्रकाशन,दिल्ली, .
2. गेल ऑम्व्हेट,(2022) ह्यो तुरुंग फोडायचा हाय गं, मधुश्री पब्लिकेशन, पुणे, .
3. गेल ऑम्वेट,(Gail Omvedt)(1995),वसाहत समाजातील सांस्कृतीक बंड, पुणे,.
4. Omvedt, Gail(1994), Dalits and the Democratic Revolution : Dr Ambedkar and the Dalit Movement in Colonial India, India,
5. रंजना संतोष गेडाम (2021) गेल ऑम्वेट )Gail Omvedt) https://marathivishwakosh.org/570 संकेतस्थळ भेट २६/०२/२०२५
6. https://sociology.berkeley.edu/gail-omvedt-1964 संकेतस्थळ भेट 26/02/2025
7. Saeed Kamali Dehghan(2021) https://www.theguardian.com/global-development/2021/sep/29/ gail-omvedt-us-sociologist-who-lived-by-her-principles-among-indias-poor संकेतस्थळ भेट 26/02/2025

8. https://sagebhasha.com/Product/AuthorDetail?AuthorId=521891&languageId=3 संकेतस्थळ भेट 26/02/2025
9. https://www.esakal.com/satara/dr-gail-omvedt-wrote-35-books-in-marathi-english-hindi-languages-bam92 संकेतस्थळ भेट 26/02/2025

# उत्खननामधून लोकसंस्कृतीचा शोध

**शशिमोहन राजाराम सिरसाट**
संशोधक विद्यार्थी, इतिहास आणि भारतीय प्राचीन संस्कृती विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

**प्रस्तावना :**

इतिहास व पुरातत्त्वशास्त्र ह्या दोन्हींचा घनिष्ठ संबंध आहे. इतिहासाशिवाय पुरातत्त्वशास्त्र नाही व पुरातत्त्वशास्त्राशिवाय इतिहास नाही हे समीकरण प्रामुख्याने आपणास बघावयास मिळते. ऐतिहासिकदृष्ट्या विचार केल्यास विविध राजवटी व त्यांचे राज्य भारतभर होते. त्यामध्ये वेगवेगळ्या घराण्यांचा समावेश आपणास पहावयास मिळतो. प्रामुख्याने भटकंती करणारे विविध देशातून भारतामध्ये आलेले परकीय प्रवासी यांना जे प्रत्यक्ष दिसले ते त्यांनी लिहून ठेवले. त्यामध्ये प्रामुख्याने इत्सींग, निकालो मनुसी, जॉन फ्रायर, फाहिमान, ह्युएनत्संग, अल्बेरुनी, इब्नेबतुता स्ट्रॅबो, ग्रॅड डफ, यांचा समावेश करता येईल. दोन लाख पन्नास हजार वर्षांपूर्वी भारतीय संस्कृतीचा मागोवा घेतला तर हे सर्व संशोधकाचे अंदाज म्हणता येईल." 1863 च्या ब्रुस फुट या पुरातत्त्व वेत्याने मद्रास जवळ पल्लवपुरमजवळ उत्खनन केले. त्यांच्या टीमला अश्म पाषाण, दगडाचे हत्यारे, अवजारे सापडली. त्यानंतरच खऱ्या अर्थाने पाषाण युग (Stone Age) आणि त्यानंतरच्या कालखंडाचा अभ्यास करणे सोयीचे झाले. त्यानंतर एच.डी. सांकलिया व त्यांच्या सहकार्यानी भारतभर उत्खनने व शोध मोहीमा केल्या. तसेच जॉन मार्शल, कनिंगहॅम, सर मार्टीमर व्हलर यांनी भारतभर उत्खनन व संशोधन केले.

**कीवर्ड :**

उत्खनन, फाहीयान, ह्युएनत्संग, शिलादित्य, रोमिला थापर, य. ना. कदम, शां.भा. देव, दगडी हत्यारे, पुरश्मयुग, कार्बन डेटींग-14, सावल्डा संस्कृती, सिंधु संस्कृती, परकीय प्रवासी, पुरातत्त्वे वेत्ये, मलिकांबर

प्रागैतिहासीक (Pre Historic) साधनांचा शोध लावण्याचे श्रेय डॉ. प्रिमरोझ या इंग्लीश शोधकाकडे जाते त्यांनी 1842 मध्ये कर्नाटकातील रायचूर जिल्ह्यात लिंगसुगुर येथे प्रागोतिहासीक काळातील दगडी गारगोटीची हत्यारे प्रकाशात आणली. जॉन इव्हॉन्सने नर्मदा नदी काठी जबलपूर येथे सापडलेली गारगगोटीची हत्यारे 1853 याली प्रसिध्द केली. कर्नल मिडोज टेसर" यांनी हैद्राबादजवळ उत्खन्नात सापडलेल्या महाअश्य कालीन (Megalithic) दफन वस्तू संबंधीचा अहवाल प्रसिध्द केला. कृष्णा नदीच्या खोऱ्यात सापडलेल्या पाषाणयुग कालीन वस्तुंचा अहवाल 1930 मध्ये प्रसिध्द केला तसेच एच.डी.टेरा व टी. डी. पॅटर्सन यांनी काश्मीर व पंजाबमधील हिमयुगाचा सुक्ष्म अभ्यास (Glacial Age) पंजाब, मद्रास, नर्मदा खोरे येथील हत्याराचा संबंध असलेल्या विषयी 1935 मध्ये लेख लिहिले. हे कार्य सर मार्टिमर व्हीलर यांनी केले. प्रामुख्याने अश्मयुगीन कालखंडाचे वर्गीकरण केल्यास 1) पुराश्मयुग - 2.50,000 ते 10,000 2) मध्याश्म युग 10,000-8000 3) नवाश्मयुग - 8000-1000 अशी वर्गवारी करता येईल. पुराश्मयुगाची देखील तिन कालखंडात विभागणी केली जाते. 1) पुर्व पुराश्मयुग इ.स. पुर्व 2.50,000 ते 1,00000 2) मध्य पुराश्मय युग इ.स. पुर्व 1,00,000-40,000 3) उत्तर पुराश्मयुग 40,000-10000 आता ह्या कालखंडात सापडलेली विविध दगडी हत्यारे त्याचे विविध प्रकार आहे. यावरुन आपणास मानवाची प्रगती कशी होत गेली. याची माहिती मिळते. त्यांचे जीवन, संस्कृति तसेच ते वापरत असलेल्या दैनंदिन वस्तु त्यांनी त्या काळात त्यांच्या स्तरावर लावलेले शोध आणि त्यांचे निवासस्थान विकासात्मक बदल अन्न, शेती, वेशभुषा, दागदागिने, मातीची भांडी विविध कला अशा अनेक बाबींची माहिति आपणास मिळते. हा सर्व चमत्कार कार्बन-14 डेटिंगमुळे घडवून आला. नंतरच्या काळात विविध ठिकाणी उत्खनन झाले. प्रामुख्याने "कोटदिजी (सिंध) : कालीबंगन (राजस्थान) रुपड (पंजाब), राखीगडी, बानावली, मिटथल (हरीयाणा) लोथल ढोलविरा, सूरकोटदा (गुजरात) ही बंदरे आज देखील आर्कीयॉलोजिकल सर्वे ऑफ इंडिया राज्य व केंद्र सरकार मार्फत विविध ठिकाणी उत्खनन होत आहे. औरंगाबाद (आताचे छत्रपती संभाजीनगर) येथे 2023-24 मध्ये बिबी का मकबरा समोर उत्खनन झाले त्यामध्ये देखील विविध वस्तु सापडल्या."[2]

महाराष्ट्रामध्ये कोकणपटटीतील कुलाबा आणि रत्नागिरी हे प्रदेश सोडल्यास जवळपास सर्व नद्यांच्या खोऱ्यात पुर्व पुराश्मयुगाचा पुरावा हत्याऱ्याच्या रुपाने सापडलेला आहे. नाशिक जवळ गोदावरी काठचे गंगापुर, अहमदनगर जिल्ह्यातील नेवाश्या जवळ चीरकी नाला, मुळा-मुठा नदीच्या काठी डेक्कन कॉलेज परिसर दत्तवाडी, धुळे जिल्ह्यातील घाबरापाडा ही ठिकाणे महत्त्वाची आहे. "ह्या ठिकाणी हात कुऱ्हाड, फरश्या तासण्या, तोड हत्यारे सापडलेली आहे. ह्याद्वारे मध्यपुराश्म युगातील बदल दिसून येतो. अॅश्मुलियन तंत्राने सुबक बनविलेल्या कलात्मक वस्तुचा यामध्ये समावेश करता येईल. यासाठी त्यांनी जास्पर दगड वापरला त्यापासून तासण्या, गिरमिटे, बाणाग्रे, टोचे, ह्या सारख्या हत्याराची निर्मिती झाली तसेच चर्ट, कार्नीलियन, अॅगेट, ब्लडस्टोन ह्या उत्कृष्ठ पोताचा दगड देखील वापरला जात होता".[3]

"उत्तरपुराश्मयुगात पातळ छिलक्या पासुन हत्यारे बनविण्याचे तंत्र आणि कौशल्य मध्यपुराश्मयुगीन मानवाने आत्मसात केले. गारगोटीच्या छिलक्याच्या हत्यारांना ब्लेड अँड 'ब्युरीन इंडस्ट्री' हे नाव दिले. हत्यारे बनविण्यासाठी 'चालसी डोणी, अॅगेट, कार्नीलियन या दगडाचा उपयोग केला. महाराष्ट्रामध्ये गोदावरी नदी काठी पैठण, घोड नदी काठी इनामगाव प्रवरा नदी काठी संगमनेर, चंद्रपुर जिल्ह्यात खोलरा गोडी ओढ्याच्या काठी त्याचप्रमाणे भंडारा जिल्ह्यात वैनगंगेच्या काठी तसेच मुंबई जवळ कांदीवली येथे "टॉड" यांना 1936 साली अश्मयुगाची विविध कालखंडातील हत्यारे सापडली." [4]

भारतामध्ये विविध ठिकाणी उत्खननामधून मानवाच्या पूर्व जीवनाचा संदर्भ मिळतो. अशाच प्रकारे इटली, रोम, तुर्की, चिन, इंग्लड, रशिया यासारखे विश्वातील अनेक देशातील उत्खननामधून माहिती मिळते. तेथील वस्तीस्थान, लोकजीवन, भाषा, उद्योगधंदे, शेती, वापरातील भांडी अशा विविध स्वरुपाची माहिती कालानुक्रमाच्या उत्खननामुळे मिळत जाते. सर्वात प्राचीन संस्कृती सिंधू संस्कृती हडप्पा पूर्व व हड्प्पाचा प्रगत काळाचा उल्लेख आपणास करता येईल. तसेच उत्तर हडप्पा काळ हा 1750 च्या पुढे असावा असा अंदाज आपणास करता येईल. हडप्पाचे सिक्के, मनी, वजने मेसोपोटीमीया व इराणच्या आखातात काही ठिकाणी सापडलेले आहे. सिंधू संस्कृतीचा विस्तार उत्तरेकडे पामीरमधील शोरतुघाई दक्षिणेकडे अरबी द्वीपकल्पात सागरापलीकडे ओमांन पलीकडे होता. वायव्यकडील पर्वतराजी आणि पुर्वे कडील उर्ध्व दुआब पर्यंतचा भाग होता. व्यापारामध्ये विविध वस्तुंचा वापर विक्रीसाठी केला जात होता. वस्तु ह्या मानवनिर्मित होत्या. मनी बनविण्याचा मोठा उद्योग होता त्यासाठी सोने, तांबे, शंख-शिंपले, मौल्यवान खडे, मानके, विततार, श्वेतशाडू, हस्तीदंत याचा मोठया प्रमाणावर वापर वस्तू बनविण्यासाठी होत असे. ब्रांझ व पाषाण याचा वापर अवजारासाठी होत असे. सिंधू संस्कृतीची नगररचना महास्नानगृह, तसेच अंडरग्राऊंड सांडपाणी व्यवस्था या तंत्रज्ञानाचा उपयोग आज देखील आपण करत आहोत. जलस्त्रोताच्या तंत्रज्ञानामध्ये "मलीकअंबरची नहर औरंगाबाद येथील पाणी व्यवस्थापनाचा उत्तम अविष्कार आपणास आज बघावयास मिळतो. महाराष्ट्रात ताम्रपाषाण युगीन विविध संस्कृतीमधील मानवी जीवनाची वाटचाल कशी होत गेली हे विविध संस्कृतीमधून स्पष्ट होते.

**सावल्डा संस्कृती :**

या संस्कृतीचा शोध तापी-गिरणा खोऱ्यात लागला. ह्या संस्कृतीचा काळ विकसित हडप्पा संस्कृतीच्या समकालीन ठरतो. तो दायमाबादच्या उत्खननानुसार लक्षात येतो. ही संस्कृती मराठवाड्यातील गोदावरी नदीचे खोरे तसेच कर्नाटकात कृष्णा नदीच्या खोऱ्यात पसरलेली होती. सावल्डा येथील भूपृष्ठभागावर 120 मीटर लांब 60 मीटर रूंद एवढ्या भू-भागावर या संस्कृतीच्या लोकांनी वस्ती केल्याचा पुरावा मिळतो. तसेच दायमाबाद येथे ह्या संस्कृतीचा विकास 3 हेक्टरवर असल्याचे नमूद केले आहे. या लोकांनी बारमाही नदीच्या वाहणाऱ्या पाण्यामुळे नदीकाठी वस्ती केल्या. प्रामुख्याने गिरणा, तापी, प्रवरा, गोदावरी ह्या नद्या आहेत.

ह्या लोकांची घरे कुडाची व एक बाजूला गोलाकार होती. घरात एक, दोन, तीन खोल्या होत्या. सर्वात लहान घर 3.40 मीटर लांब व 1.60 मीटर रूंद होते. मोठी घरे सधन कुटुंबाची असावीत. या काळातील लोक शेती आणि पशुपालन ह्यावर उदरनिर्वाह करीत होते. अन्नामध्ये सातू, मसूर, वाटाणे, लाखेची डाळ, उडीद, मुग, कुळीथ आणि वाल ही धान्ये वापरीत असत. उन्हाळी व हिवाळी पिके सुद्धा घेत असत. त्यांच्या आहारामध्ये मांस, मासे, दुध याचा वापर होत असावा. भांडीकुंडी मातीची मडकी, फिकट तपकिरी रंगकाम केल्याच्या त्यावर खुणा, गुलाबी लालसर पृष्ठभाग हा चिरा पडलेला, तडकलेला होता. काही मडक्यावर मासे, हरणे, गवतांची चित्रे आढळतात. हे लोक हात बनावटीची राखीरंगाची मडकी,

चमकदार बनावटीची काळी मडकी अलंकरण केलेली वापरित असत. हे लोक तांब्याच्या अंगठ्या, रंगीबेरंगी दगडाचे मणी, दगडापासून बनवलेली बाणाग्रे, गारगोटीच्या छिलक्यापासून बनविलेली लहान आकाराची पाती विविध कामासाठी वापरत असत. याचे समकालीन इतर लोक हडप्पा काळात प्रचलित असलेली टनक, जाड आणि लाल रंगाची मडकी वापरत. जमीनीमध्ये खोल खड्डे करून त्यावर लाकडी वाशाच्या साह्याने वर निमूळते होत गेलेले छप्पर उभे करून त्यात राहत असत. ह्या काळात दायमाबादला दाट लोकवस्ती असावी असा निष्कर्ष 1986 ला साळी यांनी काढला.

अशा प्रकारे विविध संस्कृतीमध्ये इतर हडप्पा संस्कृती, दायमाबाद संस्कृती, माळवा संस्कृती, जोर्वे संस्कृत अशा विविध संस्कृती अस्तित्त्वात येऊन त्यांच्या राहणीमानात, रूढी-परंपरा, उद्योगधंदे, दफनाच्या पद्धती, अन्न, खाद्य अशा विविध बाबीची माहिती मिळते. आज देखील जगभरात विविध देशात उत्खनन करून नवीन शोध घेण्यात येत आहे. त्यामधून आपले पूर्वज यांची सखोल माहिती मिळविण्यात येत आहे. त्याचे खरे श्रेय हे ऑगस्ट पिट रिव्हर्स, ब्रिटिश ऑर्कीयालॉजिस्ट, डॅनिस ऑर्कीयालॉजिस्ट, थॉमसन, लेडी हेस्टर स्टेनहोप, फिल्डर्स पेट्री, अमेरिकन ऑर्कीयालॉजिस्ट जॉर्ज ॲन्ड्रयु रेझनर, सर मॉर्टिमर व्हीलर यांना जाते. याशिवाय भारतामध्ये पुरातत्त्व विद्याशास्त्र व पुराणवस्तु या विषयी मोठ्या प्रमाणावर संशोधनात्मक काम सुरू झाले. उत्खननामध्ये सापडलेल्या वस्तु ठेवण्यसाठी व जनसमुदायास त्याचे ज्ञान व्हावे म्हणून एशियाटिक सोसायटी कलकत्ता याची स्थापना 1784 रोजी झाली. तसेच एशियाटिक रिसर्च जर्नल हे 1788 ला सुरू केले. त्याचप्रमाणे 1814 मध्ये संग्रहालय सुरू झाले. आज हजारो संग्रहालय देश-विदेशात आहेत. तसेच विद्यापीठांतर्गत व केंद्र राज्य सरकारची संग्रहालये देखील आहेत. पूर्वी खाजगी संग्रहालय, संस्थानिक, सरदारांची संग्रहालय देखील सुरूवातीला अस्तित्त्वात होती. इटली, रोम, फ्रान्स, इंग्लंड अशा विविध देशात त्यांनी सुरू केली. पुराणवस्तु आणि पुरातत्त्व विद्या व उत्खनन याचे श्रेय सर विल्यम जोन्स चार्लस विल्कीसन, जेम्स प्रिन्सेप, जेम्स फर्ग्युसन, अलेक्झांडर, कनिंगहम, जे. डी. बगलर, सी. एल. कारलाईल, जॉन फेथफुल फ्लीट इ. इर्ल्टझ, मिडोज टेलर, रॉबर्ट ब्रुस फुट, जेम्स बर्जेस, लॉर्ड कर्झन, सर जॉन मार्शल, सर मॉर्टीमर व्हीलर अशा कितीतरी लोकांना यांचे श्रेय जाते. भारतामध्ये देखील एच.डी. सांकलिया, ढवळीकर म. के., सां. भा. देव, माटे, एस. आर. राव गुप्ते, मुजुमदार, दीक्षित, देशपांडे, साळी, मलिक, मिश्रा, थापर, यजदानी, सुब्बाराव, कोसंबी कर्वे अशा कितीतरी लोकांची यादी वाङ्मयीन संदर्भ व उत्खनन या संदर्भातील यांचे योगदान मोठे आहे. "भारतात आलेल्या चीनी प्रवाशापैकी फाहीयान हा पहिला प्रवासी होता. त्यानंतर अनेक प्रवासी आले. त्यामध्ये इसिंग, ह्युएनसंग, तावयुंग, तोयिंग, कुईचुंग अशा कितीतरी चिनी प्रवाशांनी भारतात येऊन तक्षशिला, नालंदा, विक्रमशिला, वल्लभी, उदंतपुरी ह्या जागतिक दर्जाच्या भारतातील नामांकित विद्यापीठातील विविध ग्रंथाचे भाषांतर त्यांच्या भाषेत करून जगभर बौद्ध, जैन, हिंदु धर्माचे तत्त्वज्ञान, परंपरा तसेच इतर धर्माचे तत्त्वज्ञान विविध संप्रदायाच्या माहितीचा प्रचार व प्रसार केला."[5] इब्ने बतुता अल्बेरूणी, मॅगेस्थनिस स्ट्रॅबो या सारख्या असंख्य देशी परदेशी संशोधक, शास्त्रज्ञ, लेखक, इतिहासकार, कवी, कला स्थापत्य, चित्रकार, ललितकला क्षेत्रातील असंख्य कलाप्रेमी भारताच्या प्रेमात पडले व त्यांनी येथील रूढी-परंपरा, सणोत्सव, विविध धर्माचे तत्त्वज्ञानपर धर्मग्रंथ याचे अध्ययन भारतात वर्षानुवर्ष राहून धर्माचे व इतिहासाचे वर्णन केले. त्यांच्या देशात जाऊन त्यांच्या भाषेत भारताविषयी माहितीचा प्रसार व प्रचार केला.

"ह्युएनत्संग यांचा जन्म 603 इसवी सनात होनान येथील चिनल्यू येथे झाला. 13 वर्षे वयापासून ते विहारात ज्ञान घेत होते. वयाच्या 26 वर्षात त्याने भ्रमण यात्रा सुरू केली व नालंदा संघारामामध्ये त्यांचा संवाद शिलादित्य व ह्युएनत्संग यांची संवादात्मक चर्चा झाली. ती पुढील प्रमाणे देण्यात येतात.

शिलादित्य -आप किस देश से आये है। और इस यात्रा से आपका क्या आभिप्राय है।

ह्युएनत्संग -मैं टंग देशसे आया हूँ और बौद्ध धर्म के सिद्धांतो को खोजने के लिए आज्ञा चाहता हूँ।

शिलादित्य - टंग देश कहा पर है। किस मार्ग से भ्रमण करते हुए आप आये है। वह देश यहाँ से दूर है अथवा निकट?

ह्युएनत्संग-यहाँ से कई हजार ली दूर पूर्वोत्तर दिशा में मेरा देश है। यह वह राज्य है जो भारत वर्ष में महाचीन के नाम से प्रसिद्ध है।

अशा प्रकारे शिलादित्य आणि ह्युएनत्संग यांची दीर्घ चर्चा वेगवेगळ्या विषयावर झाली. ह्युएनत्संग यांनी लिहिलेली डायरी ही पुरातत्त्व खाते यांना उत्खननासाठी उपयुक्त ठरली. तेव्हा उत्खनन हे लोकान्वय संस्कृतीचे महत्त्वपूर्ण दस्ताऐवज असून हा नष्ट होणारा वारसा नाही. ह्या आधारे लोकजीवन, ताना-बाना, खाद्य संस्कृती, बोली भाषा, लिपी,

व्यापार, शेती, कलात्मक भांडी, वस्तु, दागिने, शिलालेख, भोजपत्र, ताम्रलेख व सम्राट अशोकांचे स्तंभ हे जमीनीवरील आणि जमीनीखालाल दुर्मिळ वस्तुचा अनमोल ठेवा असून सबंध भारतामध्ये वेगवेगळया राजवटीमध्ये वाकाटक, राष्ट्रकुट, सातवाहन, होयसळ व मौर्य घराणे, कनिष्ठ अशा विविध राजांच्या कारकिर्दीमध्ये असंख्य लेण्या व मंदिरे निर्माण केलेल्या आहेत. त्याद्वारे आपणास भारतातील लोकांन्वय संस्कृतीची या माध्यमातून साक्ष मिळते. समाजातील प्रत्येकाने हा अनमोल ठेवा जतन व संवर्धन करण्यासाठी खारीचा वाटा उचलावा. म्हणजे येणाऱ्या पिढीसाठी हा ठेवा मैलाचा दगड ठरेल.

**संदर्भ :**


1. प्राचार्य य. ना. कदम, समग्र भारताचा इतिहास, , फडके प्रकाशन, पाचवी आवृत्ती, नोव्हेंबर 2013, पृ. क्र. 1.
2. डॉ. रोमिला थापर, अर्ली इंडिया, अनुवाद प्राचार्य रं. ना. गायधनी, वांसती फडके, के. सागर पब्लिकेशन, दहावी आवृत्ती, 2021, पृ. क्र. 62.
3. शांताराम भालचंद्र देव, महाराष्ट्राचा इतिहास, प्रागैतिहासिक महाराष्ट्र, खंड-1 चा, भाग पहिला, पुनर्मुदण, 2024, पृ. क्र. 24.
4. शांताराम भालचंद्र देव, महाराष्ट्राचा इतिहास, प्रागैतिहासिक महाराष्ट्र, खंड-1 चा, भाग पहिला, पुनर्मुदण, 2024, पृ. क्र. 27
5. जगमोहन वर्मा, फाहीयान की भारत यात्रा, प्रथम संस्करण, 2023, पृ. क्र. 131 ते 134.
6. ठाकुर प्रसाद शर्मा, ह्यू. एन. सांग, ही भारत यात्रा, चतुर्थ संस्करण, पृ. क्र. 148.

# वारकरी संप्रदायाचे तत्त्व, आचार आणि नियम

**डॉ. गिरीधर नागोराव सोमवंशी**
सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग प्रमुख
श्री छत्रपती शिवाजी कॉलेज, उमरगा

**प्रस्तावना**

वारकरी संप्रदाय हा मूळचा भारतातील वैष्णव भक्ती पंथाचा एक प्रमुख संप्रदाय आहे. हा प्रामुख्याने महाराष्ट्र, कर्नाटक या प्रदेशामध्ये प्रचलित आहे या संप्रदायाची उपाशी देवता श्रीकृष्ण म्हणजे त्याची बालरूप पांडुरंग किंवा विठ्ठल आहे वारकरी संप्रदायाने धर्माचे मूलभूत साधेपण सखोल स्वरूप दाखवले आहे. सामाजिक विषमतेच्या मूळ पायावर प्रहार केला आहे. महाराष्ट्राच्या जडणघडणीत या पंथाचे महत्त्वाचे असे योगदान आहे या संप्रदायात ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ तुकाराम इत्यादी संतश्रेष्ठ होऊन गेले .

मूळ वारकरी शब्द हा 'वारी करी' या शब्दाचा अपभूष असावा या संप्रदायात वारी हा शब्द फेरी किंवा खेप या अर्थाने अभिप्रेत आहे. आषाढी, कार्तिकी, माघी अथवा चैत्री यापैकी एका शुद्ध एकादशी गळयात तुळशीची माळ घालून नेमाने जो पंढरपुरात जातो. त्याच 'पंढरपूरचा वारकरी' म्हटले जाते व त्याच्या उपासनेचा मार्ग तो 'वारकरी पंथ' होय. संप्रदायातील व्यक्ती किंवा भक्त हा विठ्ठलास प्रिय असणारी तुळशीची माळ धारण करता म्हणून त्या माळकरी पंथ असेही म्हणतात. तसेच ते विष्णूची उपासना करतात म्हणून त्याच भागवत धर्म असेही संबोधले जाते.

वारकरी पंथाचा आरंभ नेमका कोणत्या शतकापासून झाला हे निश्चित सांगता येत नाही परंतु हा संप्रदाय प्राचीन काळापासून म्हणजेच इ. स. सहाव्या शतकापूर्वी पासून प्रचलित होता हे पुनरुखपूर याने प्रसिद्ध केलेल्या ताम्रपटावरून व चालुक्य राजा कीर्ती वर्मा यांच्या शिलालेखाच्या उल्लेखावरून सांगता येते. सोयीस्कर रित्या त्याचे खालील भाग पाडली जातात.

१) आरंभचा अथवा श्री ज्ञानदेवाच्या पूर्वीचा काळ
२) श्री ज्ञानदेव व नामदेव यांचा काळ
३) श्री भानुदास व एकनाथ यांचा काळ
४) श्री तुकोबा व निळोबा यांचा काळ
५) तदनंतरचा तीनशे वर्षाचा काळ

वरील इतिहासाची माहिती बहिणाबाईच्या खालील अभंगावरून स्पष्ट होते.

संत कृपा झाली I इमारत फळा आली II१II
ज्ञानदेवे रुचिला पाया I रुचियेले देवालया II२II
नामा तयाचा किंकर I तेणे केला हा विस्तार II ३II
जनार्धन एकनाथ I ध्वज उभारिला भागवत II४II
भजन करा सावकाश I तुका झालासे कळस II५II तु. म.४२९८

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१) वारकरी संप्रदायाचे तत्त्वज्ञान जाणून घेणे.
२) वारकरी संप्रदायाची आचार व नियमाची माहिती करून घेणे.

**तत्त्वज्ञान :**

कोणत्याही धार्मिक संप्रदायाची उभारणी तत्त्वज्ञानावरच असते. वारकरी संप्रदायाच्या संतांनी त्यांच्या ग्रंथामध्ये तत्त्वज्ञानाची माहिती दिली आहे. वारकरी संप्रदाय हा पूर्ण पणे शुद्ध भक्ती मार्गी आहे. भक्ती मार्गाचा विचार करताना तीन प्रश्न निर्माण होतात.

१) ज्याची भक्ती करावयची त्या परमेश्वराचे अगर अंतिम सत्याचे स्वरूप.

२) ज्याने भक्ती करावयाची त्या मानवी जीवाचे स्वरूप.

३) जेथे भक्ती करायची आहे त्या जगाचे स्वरूप.

१) परमात्मा:

वारकरी संप्रदायाच्या तत्त्वाप्रमाणे परमात्मा हा स्वयं प्रकाशित स्वयंसिद्ध व सचिन आणि सच्चिदानरुपी असा परमेश्वर आहे त्याची सत्ता स्वयंसिद्ध आहे.

२) परमवस्तू:

उत्तम वस्तू ही एकच असून ती दूरदृष्टीपा याचा दृश्यपणा याचा आश्रय आहे तिचे प्रत्येक क्षणी जाणवते व तिच्या लिखाणाचे नित्यनवे अलंकार व रूप धारण करते या दोघांचा आधार तळाशी असणारा चिन्हात्र परमात्माच आहे हे एकरूप आत्मतत्त्व देव देवी या रूपाने अविस्कृत होते वरच त्याच त्याची संवेदना म्हणजेच भारतीय विचारात नहम् - माया पुरुष - प्रकृती या जोड्या आढळतात.

३) जीव:

जडसृष्टीप्रमाणे असंख्य जीवही परमेश्वराचेच प्रकट केले आहे.वाऱ्यामुळे पृथ्वीचे असंख्य परमाणु जसे आकाशात आढळतात.

**वारकरी संप्रदायाचे आचार व नियम :**

अंतिम ध्येय प्राप्ती साठीचे व्यक्तीने किंवा भक्ताने कोणकोणत्या गोष्टीचे पालन करावा व त्याग करावा हे प्रत्येक धार्मिक संप्रदायात सांगितले जाते. वारकरी संप्रदायातील भक्तांनी खालील आचार नियमाचे पालन करावे असे सांगितले आहे .

१) श्री विठ्ठलाची उपासना:

वारकरी हे विठ्ठलाची उपासना करतात कारण विठ्ठल ही सर्व विश्वाची व देवांची मूलभूत देवता होय म्हणजे विठ्ठल परमेश्वराची मूळ शुद्ध रूप आहे इतर देवता निरनिराळया गुणकर्माच्या आहेत.

२) मंत्र:

वारकरी संप्रदायातील व्यक्ती मंत्र जपास महत्त्व देतात त्यांचा मंत्र राम कृष्ण हरी हा आहे राम म्हणजे हृदयात रमविणारा कृष्ण आकर्षण करणारा व हरी म्हणजे एकरूप असणारा परमात्मा ज्याप्रमाणे लहान मुलाच्या आई या हाकिणी स्त्रिया स्त्रियांच्या ठिकाणी वासल्य जागे होते. त्याप्रमाणे राम कृष्ण हरी मंत्राने भगवंताच्या ठिकाणाचे भक्त प्रेम जागे होते.

३) तुळसीमाला:

वारकरी हा वारकरी हा विठ्ठल भक्त म्हणजे कृष्णभक्त असल्याने त्यास प्रिय असणारी तुळशी माळ गळयात धारण करतो. तुळशीची माळ ही विठ्ठलाची असणाऱ्या जिव्हाळयाची देवतक आहे त्यात 108 मनी असतात.

४) कपाळास गोपी चंदनाच्या मुद्रा व बुका:

गोपिया श्रीकृष्ण प्रभूच्या अत्यंत भक्तीमध्ये रमणाऱ्या त्याचा स्मृती गोपीचंदनात असल्याने त्याचा गंध व मुद्रा धारण करतात त्याचबरोबर काळा बुका लावतात.

५) भगवी पताका:

वारकऱ्यांनी आनंदाची उभारलेली गुढी म्हणजे भगवी पताका ही खांद्यावर वावरतात.

६) वारी:

वारकऱ्यांनी वर्षातून एकदा तरी आषाढी, कार्तिकी, माघी व चैत्र यापैकी एक शुद्ध एकादशी पंढरपूर व आळंदीच्या वारीस जावे बहुसंख्य वारकरी पंढरीस आषाढी वारी करतात.

७) नामस्मरण:

वारकरी संप्रदायात नामस्मरण हे परमात्म्याच्या एकमेव साधन म्हणून सांगितले आहे. 'विठ्ठल विठ्ठल' किंवा 'विठोबा रुक्माई' भगवंताचे नामस्मरण करावे.

८) भजन, कीर्तन:

वारकरी संप्रदायात भजन व कीर्तनास अतिशय महत्त्व आहे. भजन, विना, टाळ, मृदंगाच्या घोषात करतात कीर्तनामध्ये एखादे अभंगाचे पद घेऊन वेदांत सांगतात वारकरी भजन करताना भक्ती प्रेमात रंगून जातात.

९) सत्संगती:

ज्याची संगत असेल तसा बनने हा जीवाचा सहज स्वभाव आहे यासाठी वारकऱ्यांनी संतांची संगती धरावी असे सांगितले आहे.

१०) भेद अमान्य:

वारकरी संप्रदायात आपण सर्व एकाच ईश्वराची लेकरे असल्यामुळे उच्च - नीच भेद हा अमान्य आहे. ईश्वरासमोर सर्वजण समान आहेत ही भावना वारकरी संप्रदायाची आहे.

**निष्कर्ष:**

१) वारकरी संप्रदाय हा वैदिक धर्माचाच एक भाग असून तो मूळच्या धर्मास उजाळा देण्याकरिता उदयास आला आहे.

२) वारकरी संप्रदायात नामस्मरण, वारी, भजन व कीर्तन या भक्तिमार्गाचा अवलंब करतात.

३) वारकरी संप्रदायाने प्रादेशिक भाषेमध्ये साहित्य निर्मिती केल्यामुळे मराठी भाषेचा विकास झाला.

४) वारकरी संप्रदायाने महाराष्ट्रामध्ये धर्म सुधारणेच्या माध्यमातून समाज सुधारण्याचे कार्य केले.

**संदर्भ ग्रंथ सूची :**

१) खरे ग. ह., विठ्ठल आणि पंढरपूर ,आवृत्ती तिसरी, पुणे, १९६३

२) दांडेकर श. वा., वारकरी पंथाचा इतिहास, वारकरी प्रकाशक मंडळ, नागपूर१९९४

३) वारी, लोकराज्य मासिक, ऑगस्ट २०१८

४) जोशी महादेव शास्त्री, मराठी विश्वकोश, सोळावा आठवा,महाराष्ट्र  राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई १९९९

५) मंचरकर र.बा., धर्मसंप्रदाय आणि मध्ययुगीन मराठी वाड़मय, प्रतिमा प्रकाशन, पुणे,२०००

आभासी (ऑनलाईन) सत्र.

**अध्यक्षीय विचार...**

श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) की और से आयोजित आज 01 मार्च 2025 के इस बहुविद्याशाखीय राष्ट्रीय परिषद ऑनलाईन सेशन का अध्यक्ष के नाते आप सभी का स्वागत करता हू। इस चर्चासत्र में बहुविध विषयों पर आप सभी महानुभावोंने अपने मौलिक विचार रखे है। न्यूयॉर्क से सम्मिलित हुए श्री. केविन क्षेत्री, मुंबई से नचिकेत पराडकर, कलबुर्गी कर्नाटक से डॉ. सुधाराणी डी. एच., दिलीप कुमार पाटील, प्रवीण कुमार रामजी, राजीव परदेशी, आज के इस सत्रके ब्रिजभाषक डॉ. विनोद सिन्हा इन सभी संशोधनकर्ताओं का मै स्वागत करता हु। आप सभीने अपने मौलिक विचार जीन विषयों पर रखे है वह है - जल आपूर्ति व्यवस्था और प्राचीन भारत का पर्यावरण, आधुनिक काल में जलसंचयन जैसी परियोजनाओं का महत्व, मंदिरों के निर्माण मे उपयोग में लाई गई सॅक्रेड जिओमेट्री सिस्टीम का उपयोग इस विषयों पर विस्तार से चर्चा संपन्न हुई। प्राचीन भारत के मंदिर का निर्माण करते समय किस शैली का उपयोग किया जाता था? शिलालेख कैसे लिखे जाते थे? इस विषय पर भी मान्यवरोंने अपने विचार प्रस्तुत किए। प्राचीन ज्ञान की परंपरा और भारत की संस्कृति का मिलाप किस तरह से करना चाहिए? साथ ही साथ आधुनिक जगत के सामने पर्यावरण जैसी बडी समस्या है , ग्लोबल वार्मिंग जैसे प्रश्न खडे हुए है उनका समाधान खोजने का प्रयास इस चर्चासत्र के माध्यम से संपन्न हुआ है।

आज के इस परिषद मे संयोजकों द्वारा अन्य विषय भी सम्मिलित किये गये थें। जैसे की भारत की सामाजिक और सांस्कृतिक आंदोलन का इतिहास, दक्षिण और उत्तर भारत के शासनकर्ता - सातवाहन, चालुक्य, चोल, यादव, सुलतानशाही, मुघलशाही का निर्माण, ब्रिटिश साम्राज्य का भारत मे विस्तारित होना जैसे विषय भी सम्मिलित थे। भारत के परिप्रेक्ष में किये गये आर्थिक बदलाव, सामाजिक, सांस्कृतिक तत्त्वज्ञान, उनके सामाजिक परिणाम, हिंदू ,जैन, बौद्ध धर्म, शीख, सुफी, नाथपंथी, वारकरी आंदोलन, महानुभाव संप्रदाय ऐसे विषयों पर चर्चा होने की अपेक्षा थी। भारत में दिखाई देने वाली जातीं व्यवस्था, वर्ग, मजदूर, गुलामी ,गैरब्राह्मणी आंदोलन, दलित आंदोलन, स्त्रियों के उद्धार के लिए चलाएं जाने वाले आंदोलन, भारत का व्यापार और वाणिज्य जैसे विषय भी शामिल थे। आज भारत का सामाजिक, धार्मिक, आर्थिक पर्यावरण बिगड़ा हुआ है। अगर उपरोक्त विषय पर चर्चा की गई होती तो इस सामाजिक, धार्मिक, आर्थिक पर्यावरण सुधारने के लिए इस परिषद का आयोजन सहयोग कारी होकर सफल हुआ होता ऐसे मुझे लगता है। फिर भी संयोजकों द्वारा जिन विषयों को कार्यक्रम पत्रिका मे शामिल किया गया है, उससे यही लगता है कि इस पर्यावरण को सुधारने की चिंता उन्हे भी है। इसीलिए मै आयोजकों को तहे दिल से धन्यवाद देना चाहता हुं। इसीलिए भी धन्यवाद और आभार प्रकट करना चाहता हु कि, ऐसे कठीण विषय पर चर्चा करने का प्रयास कर उन्होने मुझे चर्चासत्र का अध्यक्ष होने का अवसर दिया। यह चर्चासत्र और परिषद निश्चित रूप से भारत के बहुविध समस्या पर समाधान ढूंढने में कारगर साबित होगी। इस अपेक्षा के साथ में अपने अध्यक्षीय विचार समाप्त करता हुं। जय भारत, जय संविधान.

**प्रा. डॉ. राहुल वि. दखणे**
इतिहास विभाग प्रमुख,
शिवरामजी मोघे महाविद्यालय,
पांढरकवडा. जि. यवतमाल (महाराष्ट्र)

# भारताची फाळणी एक ऐतिहासिक चिकित्सा

**डॉ. आसाराम हरिभाऊ देसाई**
सहायक प्राध्यापक, इतिहास विभाग
दादापाटील राजळे कला व विज्ञान महाविद्यालय, अदिनाथनगर

15 ऑगस्ट 1947 रोजी भारत स्वातंत्र झाला भारतीयांनी ज्यासाठी दिर्घकाळ संघर्ष केला, लक्षावधी लोकांनी ज्यासाठी बलिदान दिले त्या स्वातंत्र्य प्राप्तीचा आनंद भारतीयामध्ये ओसांडून वाहत होता. ह्या प्रसंगी लाल किल्ल्यावरून केलेल्या भाषणात पंडित नेहरु म्हणतात, अनेक वर्षापुर्वी आपन नियतीशी एक करार केला होता आज त्याची पूर्ती सर्वाशाने का नसेना, पण पुष्कळशा अंशाने आपण करीत आहोत मध्यरात्रीच्या प्रशांतसमयी सारे जग झोपलेले असताना भारत स्वातंत्र्याच्या युगात नवा जन्म घेत आहे...[1] लाल किल्ल्यावर तिंरगा झेंडा फडकताच दिल्ली जल्लोशात न्हाऊन निघाली भारताच्या स्वांतत्र्य सोहळयाचा प्रसंग स्वत: डोळयांनी पाहिलंल्या कॅम्पबेल जॉन्सन हे मिशन विथ माऊंट बॅटन या आपल्या पुस्तकात म्हणतात ह्या प्रसंगाच्या वेळी जनतेचा असीम हर्षोलास पाहुन अगदी स्थितप्रज्ञ वृत्तीची व्यक्ती प्रभावित झाल्या खेरीज राहिली नसती. भारत स्वातंत्र्य झाल्याचा आनंद भारतियांना झाला पण हा आनंद निर्भळ नव्हता त्यावर दु:खाचे दाट सावट होते. ते होते देशाच्या विभाजन झाल्याचे. यामुळेच 1947 हे वर्ष भारतिय इतिहासात स्वातंत्र्य मिळाल्यामुळे परिवर्तनाचा टप्पा ठरला परंतू फाळणीमुळे हे वर्ष शोकांतिकेचे ही ठरले. फाळणीच्या दु:खा पेक्षा त्यावेळी लोकांची मने काळवंडुन गेली ती भारत पाकिस्तान सीमेवर वाढलेल्या पाशवी हत्याकांडामुळे, दोन्ही देशात मोठ्या प्रमाणात हिसाचार निर्माण झाला. प्रशासन व कॉंग्रेस हे दंगे थांबविण्यात अपयशी ठरले. गांधीजीनी गावोगावी फिरुन तेथील नागरिकांतील भितीचे व संशयाचे वातावरण निवळविण्यात त्यांना बरेच यश आले. त्यामुळे त्यांच्या कार्याचा उल्लेख one man boundary force[2] असा केला. हिदुस्तानी नेत्यांनी फाळणी शांततेच्या मार्गाने होईल असे गृहित धरले होते. त्यामुळे दंगे होणे त्यांना अपेक्षित नव्हते. त्यांनी आदला बदलीची योजना तयार केली नाही. एकदा पाकिस्तानची मागणी मान्य केल्या नंतर भांडण्यासारखे काहिच उरत नाही असे भारतीय नेत्यानां वाटत होते.त्यामुळे अनेक प्रश्न र्निमाण होऊन फाळणी नंतर भयावह दंगली, लुटालुट, रक्तपात, अत्याचार जाळपोळ याचे सत्र सुरु झाले. हे हिदुस्तानच्या फाळणीचे दृश्य परिणाम होते.

भारताच्या फाळणीबाबत अनेक प्रश्न उपस्थीत राहतात. भारताची फाळणी का झाली? ही फाळणी अनिवार्य होती का? कॉंग्रसने फाळणीला मान्यता का दिली? व फाळणीला जबाबदार कोण? इ. प्रश्नाचा विचार फाळणीच्या संदर्भात करणे गरजेचे आहे.

कोणतेही मुत्सद्दी राज्यकर्ते आपली राजसत्ता स्थिर ठेवण्यासाठी समाजातील कुमकुवतेचा आणि वैगुण्याचा फायदा घेतच असतात त्याच प्रमाणे ते जनतेवर आपले सांस्कृतिक धुरिणत्व प्रस्तापित करतात त्याप्रमाणे ब्रिटिशानी भारतात शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक, राजकिय, आर्थिक, सांस्कृतिक, इतिहासलेखन, साहित्य व वृत्तपत्र इ. माध्समातुन धुरिणत्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. हे करत असतानां येथिल समाजगटात यादवी र्निमाण करुन फोडा व झोडा (राज्य करा) ही नीती अवलंबुन त्याचा पुरेपुर फायदा घेतला. ब्रिटिशांनी स्वत:चे राज्य स्थायीक करण्यासाठी जातीयवादाचे रोपटे उगविले होते. त्याला खतपाणी सुध्दा त्यांनीच घातले होते. भारतीय जातीयवादाच्या प्रश्नाला राजकिय रंग देण्यासाठी ब्रिटिशांनी वेळोवेळी प्रयत्न केला होता. त्याचे यश सुध्दा त्यांच्या पदरात पडले होते. भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसला पर्याय देण्यासाठी लीगचा जातियवादी राक्षस त्यांनी उभा केला होता. मुस्लीम जातीयवादाची एक वेगळी फळी जी 1906 पासुन सक्रिय झाली तिचा प्रवास भारतिय स्वातंत्र्यापर्यंत अनेक चढ उतारातुन झाला. वेळोवळी लीगला अनुकूल धोरण ब्रिटिशानी राबवून त्यांना प्रोत्साहन दिले. भारताची फाळणी ही ब्रिटिशांची सत्ता टिकवण्यासाठी चालवलेल्या भेदनितीची फलश्रुती होती. 1906 साली गव्हर्नर जर्नरल लॉर्ड मिंटो म्हणतो की "राष्ट्रवादी कॉंग्रसला शह देण्यासाठी दोन प्याद्याचा वापर ब्रिटिशांना करता येइल ती दोन प्यादी म्हणजे मुस्लीम लीग व भारतीय संस्थाने."[3] यातुन ब्रिटिशांच्या वृत्तीचे दर्शन घडते. ब्रिटिशानी भारतात सुरु केलेल्या शिक्षणाचा स्विकार हिंदुनी थोडयाफार प्रमाणात केला. त्यामुळे हिंदु मध्ये प्रबोधनाला वेग

आला. काही प्रमाणत प्रगती झाली व काही प्रमाणात सरकारी नोकऱ्या मिळु लागल्या. पण इंग्रजी शिकणे हे मुस्लिम विरोधी आहे असे म्हणुन मुस्लिमांनी त्याकडे दुर्लश केले. परिणामी मध्ययुगीन सरंजामी राजवटीची स्वप्ने आठवत बसलेला हा समाज हिंदुच्या तुलनेने मागे पडला. यामुळे मुस्मिमा मध्ये हिंदु बद्दल आकस र्निमाण झाला.

'सौदर्यशाली भारत वधुचे हिंदु व मुस्लिम हे दोन डोळे आहेत' असे म्हणणारे सय्यद अहमद कॉंग्रसच्या स्थापनमुळे बिथरले. वास्तविक 1883 मध्ये व्हाईसरॉयच्या कार्यकारी मंडळात केलेल्या भाषणात सर सय्यद अहमद यांनी हिंदुच्या बहुसंख्येमुळे मुसलमानाच्या हितसंबंधावर आघात होतील अशी धास्ती व्यक्त करुन प्रतिनिधीक संस्था प्रस्तापित करण्याच्या सुचनेवर जबरदस्त हल्ला चढविला. 1885 ला राष्ट्रवादाचा एक अविष्कार म्हणुन ऑल इंडिया कॉंग्रेसची स्थापना झाली. काही राष्ट्रवादी मुस्लिम नेते वगळता सामान्य भारतीय मुस्लिम या संस्थेपासुन दुर राहिले. त्याची भूमिका ही फुटिरतावादी राहिली. वास्तविक कॉंग्रेस ही हिंदुचे प्रतिनिधीत्व करणारी संस्था आहे असा मुस्लिाचा समज झाला. कारण सुरवाती पासुनच्या काळात कॉंग्रेस अधिवेशन पाहता मुस्लिमाची संख्या तेथे अल्पच होती. पुढे काही राजकिय हक्क मिळावेत म्हणुन मुस्लिमाची एक स्वतंत्र्य संस्था असावी अशी मागणी पुढे आली. त्यातुनच 1893 मध्ये मुहमेडन ॲग्लो ओरिएन्टल कॉन्फरन्स असोसिएशन ही संस्था स्थापन झाली. या संस्थेने 1896 मध्ये मुस्लिमासाठी जातिय मतदारसंघ असावेत ही मागणी केली. या संस्था नंतर विकसीत झाल्या नसल्या तरी त्यावरुन तत्कालिन मुस्लिम राजकारणाची दिशा मात्र स्पष्ट होते. 1905 मध्ये लॉर्ड कर्झनने बंगालची फाळणी केली. 1906 मध्ये मुस्लिम लीगची स्थापना तर 1909 मध्ये मुस्लिमासाठी स्वतंत्र्य मतदारसंघ मिळाले. या तिन्ही घटनावरुन असे दिसते की ब्रिटिशांनी मुस्लिमाना हिंदु पासुन फोडले.

1916 च्या लखनौ करारात लीग व कॉंग्रेस एकत्र आले कॉंग्रेसने मुस्लिमाची स्वतंत्र्य मतदारसंघाची मागणी व लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षा अधिक प्रतिनिधीत्व या मागण्या मान्य केल्या. लीगने कॉंग्रेसशी केलेली हात मिळवणी परस्पर विश्वासाच्या व सलोख्याच्या आधारावर झाली नव्हती तर त्यावेळी मुस्लिमाच्या मनात ब्रिटिशांविरुध्द अविश्वास व संताप दाटल्याने लीग कॉंग्रेसच्या आश्रयाला आले होते. या कराराने दोन्ही समाजातील दुरावा काही काळापुरता फक्त नष्ट झाला. कॉंग्रेसने लीगच्या मागण्या मान्य करुन लीगची मैत्री अक्षरश: विकत घेतली होती तसेच यामुळे लीगच्या आक्रमकतेला ही चालना मिळाली. पहिले महायुध्द संपल्यानंतर 1919 पॅरिसच्या तहाने तुर्कस्तानचे लचके तोडण्यात आले त्यामुळे मुस्लिमांचे श्रध्दास्थान असलेल्या तुर्की खलिफाचे स्थानच धोक्यात आले. त्याच्या रक्षणार्थ भारतात खिलाफत चळवळ सुरु झाली. या काळात चळवळीचे नेतृत्व कडव्या धर्मांध मुस्लिमांकडे गेले. दरम्यान म.गांधीजीच्या नेतृत्वाखाली असहकार अंदोलन सुरु झाले होते. ऐन भरात असतानाच चौरीचौरा येथिल हिंसाचार झाल्यामुळे म.गांधीजीनी असहकार अंदोलन मागे घेतले. त्यामुळे गां म.धीजीनी मुस्लिमाचा विश्वासघात केला असे मुस्लिमाना वाटले. मुस्लिम मुलानी शाळा सोडाव्यात, मुस्लिम वकिलानी वकिली करु नये, सरकारी नोकरीत शिरु नये अशा गोष्टीकरता मुस्लिमाना प्रवृत्त करुन त्याची जास्तीत जास्त हानी व्हावी म्हणुन हेतु परस्पर प्रयत्न म. गांधीनी केला असा समज त्याच्यात निर्माण होत गेला. कारण मुस्लिम समाज हा पुर्वी पासुनच आक्रमक प्रवृत्तीचा होता. आणि गांधीजीची चळवळ मात्र सत्य अहिंसा यावर आधारलेली होती. मुस्लिमानी धर्माधिष्ठीत दृष्टीकोनातुन मलबार येथिल मोपल्यांनी उडाव केले होते. शिवाय मुस्लिमानां संघटित करण्यासाठी तान्झीम व ताब्लिघ या संघटना उद्याला आल्या. त्याला प्रती उत्तर म्हणुन हिंदु महासभेने आपल्या शाखा देशभर उघडल्या. त्याच प्रमाणे 1925 नागपुर येथे राष्ट्रीय स्वयमसेवक संघाची स्थापना केली गेली. स्वामी श्रध्दानंदानी शुध्दी चळवळ सुरु केली. हिंदुनी सुरु केलेल्या शुध्दी चळवळीमुळे मुस्लिम समाजात चांगलाच भडका उडाला. डिंसेबंर 1933 मध्ये जामियत उल उलेमाची परिषद भरली त्यावेळी शुध्दी चळवळीचे प्रवर्तक हे भारताचे सर्वात भयंकर शत्रु आहेत व संघटन चळवळ भारताच्या प्रगतीस घातक आहे असे भाष्य परिषदेच्या अध्यक्षानी केले.

1922 ते 1930 या काळात प्रचंड हिंदु मुस्लिम दंगे झाले. सर्वानां मान्य होईल अशा घटनेचा मसुदा तयार करण्यासाठी भरविण्यात आलेल्या सर्व पक्षीय बैठकीतून निवडलेल्या नेहरु समितीने दिलेल्या नेहरु रिपोट मध्ये केलेली राखीव जागाची तरतुद लीगने अमान्य केली. पण त्यात काही दुरुस्त्या सुचवुन तो स्विकारण्याची तयारी जीनांनी दाखवली. त्यासाठी त्यानी 14 मुद्दे मांडले. त्या सगळ्या मुद्यांचा स्विकार करणे कॉंग्रेसला शक्य नसले तरी काही प्रमाणात स्विकारता आले असते. 1937 च्या निवडपुकांचे निकाल जाहिर झाल्यानंतर कॉंग्रेसने आठ प्रांतात आपली मंत्रीमंडळे बनवली या

मंत्री मंडळाची घडण पक्ष पध्दतीवर बनविली तसे करणे ही काँग्रेस तसे करणे ही काँग्रेसची चुक ठरली. कारण त्यामुळे प्रामुख्याने मुस्लिम व इतर गट दु:खवले गेले. असे असले तरी लीगला मंत्रीमंडळात स्थान दिल्या गेल्यास सरकारात काँग्रेसला सहकार्य करण्याची तयारी लीगने दर्शविली परंतु त्याकरता संयुक्त प्रांतातील मुस्लिम लीगने काँग्रेस पक्षात विलिन व्हावे अशी अट काँग्रेसने घातल्याने मुस्लिम लीगची कटुतेची दरी रुदावत गेली.या निवडणुकी मध्ये काँग्रेसला मुस्लिमासाठी राखीव असलेल्या जागा जिकण्यात अपयश आले, म्हणजे मुस्लिम समाजात काँग्रेसने करायला पाहिजे तसे कार्य केले नाही. किंबहुना मुस्लिमातील जनसामान्यानां व बुध्दीवाद्यांना आपलेसे करण्याचा प्रयत्न काँग्रेसने केला नाही. डिसेंबर 1930 मध्ये अलाहबाद येथे भरलेल्या लीगच्या अधिवेशनात मुहमद इक्बाल यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात पाकिस्तानचा पाया घालून दिला. रहमद अलीने 1933 मध्ये Now or Never या शिर्षकाखाली स्वतंत्र्य मुस्लिमसंघाची कल्पना केंब्रिज येथिल पत्रकात मांडली. परंतु ही योजना 1940 पर्यत शाळकरी मुलाची योजना म्हणुन दुर्लक्षित होती. जीनाच्या वैयक्तीक महत्वकांक्षेने ही योजना साकार केली. एक स्वतंत्र्य राष्ट्र निर्मितीचे श्रेय आपल्याला मिळवायचे असेल तर ते फक्त पाकिस्तानच्या निर्मितीनेच मिळेल अशी आकांक्षा जीनांच्या मनात निर्मान झाली. व त्यानी त्या दृष्टीकोनातुन लीगला राबवले.त्यातुनच 22 मार्च 1940 मध्ये मुस्लिम लीगच्या लाहोर अधिवेशनात पाकिस्तानचा ठराव पारीत झाला. या अधिवेशनाच्या अध्यक्षीय भाषणात जीना म्हणतात, "भारतातील मुसलमान म्हणजे केवळ एक अल्पसंख्याक गट नाही तर ते एक राष्ट्र आहे. या उपखंडात शांतता व समाधान नांदावे अशी खरोखरच ब्रिटिशांची इच्छा असेल तर त्या करीता एकच मार्ग आहे तो म्हणजे हिंदु व मुसलमान अशी दोन प्रमुख राष्ट्र गटात भारताचे विभाजन करावे." भारतातील शिक्षण पध्दती हिंदुची महती गाणारी आहे. ती बदलुन तिच्या जागी मुस्लिम संस्कृती जोपसणारी शिक्षण पध्दती आणावी अशी मागणी ऑल इंडिया मुस्लिम एज्युकेशन कॉन्फरन्स करीत होती. तर दुसरी कडे वर्षानुवर्ष सावरकरांच्या वर्चस्वा खाली असलेल्या हिंदुमहासभा हिंदु मुस्लिम फुट हे अत्यंत अप्रिय सत्य आहे. केवळ पोटतिडकिने किंवा इच्छाशक्तीने नाहीशी होणारी ती बाब नाही त्या समस्येची उकल एकाच मार्गाने होऊ शकते. तो म्हणजे हा संपुर्ण देश हिंदुस्तान आहे. हे मान्य करणे हा देश हिंदुचा देश आहे ही त्यांची पितृभुमी आहे पवित्रभुमी आहे. असे दुसरी कडे म्हणत होती.

1944 राजगोपालचारी यांनी मांडलेल्या योजनेत तत्वत: का होईना फाळणीला दिलेली मान्यता, हंगामी सरकारात लिगचा अहंकार आणि 16 ऑगस्ट 1946 चा प्रत्यक्ष कृती दिन यामुळे फाळणी अपरिहार्य आहे अशी बहुतेकांची खात्री झाली. गांधीजीचा विरोध असतांनाही काँग्रेसने फाळणीला मान्यता दिली तरी देखील अशी अशा केली जात होती की एकदा का फाळणीचे ऑपरेशन झाले की सर्व वेडेपणा निघुन जाईल. परंतु शरीर आता खुप जखमी झाले होते आणि ऑपरेशनचे साहित्य सुध्दा किटाणुग्रस्त होती त्यामुळे ऑपरेशन खुपच धोकादायक पध्दतीने झाले. जितकी भयानक परिस्थिती फाळणी पूर्वी होती त्या पेक्षा ही भयानक स्थिती झाली. माऊट बॅटन असो का काँग्रेस प्रत्येक घटकाला या शस्त्रक्रियेचे वेळी प्रचंड काळजी घ्यावी लागली. 15 ऑगस्ट 1947 च्या पहाटेस स्वातंत्र्य व फाळणी या व्दैतावर प्रकाशाची किरणे पडली विभाजनाचे दु:ख मनात असुनही लोक आनंदाने बेभान होऊन रस्त्या रस्त्या वरुन नाचत सुटली.

सर सय्यद अहमदांनी मुस्लिम मनात फुटिरतेचे व राजकिय महत्वकांक्षेचे बीज रोवले, इक्बालच्या कल्पनेत स्वतंत्र्य राज्याच्या महत्वकांक्षेचा उद्य झाला. रहमत अलीच्या लेखनीतुन त्याला प्रादेशीक अधिष्ठान मिळाले. तर जीनानी तीचा कळस गाठला आणि भारताची फाळणी झाली.

अशा पध्दतीने ब्रिटिशांची निती, लीगचा फुटीरतावाद व काँग्रेसने त्यास दिलेले अप्रत्यक्ष प्रौत्साहन यातुन भारताची फाळणी झाली. यानंतर असा प्रश्न पडतो की ही फाळणी अनिर्वाय होती का? ती टाळता आली असती का? व काँग्रेसने फाळणी का स्विकारली?

फाळणी अनिर्वाय होती का? या संदर्भात परस्पर दोन विरुध्द विचार प्रवाह दिसतात. लोओनार्ड मोस्ले यांच्या मते ब्रिटिशांनी विशेष: मॉऊट बॅटन यांनी केलेल्या सत्तांतराच्या घाईला भारतीय नेत्यांनी थोडा विरोध केला असता आणि काही काळ सत्तांतर लांबविले असते तर फाळणी टळली असती. म.गांधीजीनी फाळणीला विरोध केला तसेच समाजवादी, साम्यवादी व हिंदुमहासभाच्या सदस्यांनी ही विरोध केला. परंतु ऐन विभाजनाच्या वेळेला त्यांना फाळणी विरोधी लोकमत संघटित करुन चळवळ करता आली नाही.

राष्ट्रीय चळवळ जशी व्यापक बनत गेली तशी ब्रिटिशांनी भारतीय समाजात फुट पाडण्याचा प्रयत्न केला. त्यांनी भारताचे विभाजन करण्याचे निश्चित केले होते.चर्चिल यांच्या मनात हा विचार 1945 सालीच घोळत असल्याचा उल्लेख लॉड वॅव्हेल यांच्या रोजनिषित अढळतो. तर दुसरी कडे जीनांनी पाकिस्तान निर्मितीचा हट्टच धरला. 16 ऑगस्टला प्रत्येश कृतीची धमकी व देशातील जातिय दंगली, रक्तपात या सर्व परिस्थितीच्या दडपणाखाली राष्ट्रीय नेत्यांना विभाजन अपरिहार्य वाटले असे परस्परविरोधी गट भारतात होते. याचे वर्णन करतांना राममनोहर लोहिया आपल्या 'फाळणीचे गुन्हेगार' या पुस्तकात म्हणतात "फाळणीला विरोध करणारा गट व तिचे समर्थन करणारा गट म्हणजे मुळ भारतीय राष्ट्रवादाच्या वठलेल्या वृक्षाच्या निष्पर्ण शाखा होत्या."[4]

म.गांधीजीनी फाळणीला प्रखर विरोध केला. आपल्या मृत देहावरून देशाचे विभाजन करावे लागेल असे म.गांधीनी सांगितले. विविध लेखात त्यानी फाळणीला विरोध करणारे लेख केले. उदा. पाकिस्तान म्हणजे निश्चित असत्य (हरिजन 14/04/1940), हिंदुस्तानची फाळणी मी पाप समजतो. (हरिजन 25/05/1942), To divid india into two is worse than anarchy. (हरिजन 22/09/1944). फाळणी संदर्भात मँउट बॅटननी गांधीजीशी चर्चा केली व त्यांचा विरोध कमी करण्याचा प्रयत्न केला. ते म्हणतात "भारताच्या विभाजनाच्या निर्णयाचे दु:ख तुमच्या इतके आपल्याला होत आहे. परंतु प्राप्त परिस्थित ह्या निणर्याला दुसरा सर्वमान्य पर्याय अढळत नाही." तसेच ब्रिटिशानी जीनाची मागणी मान्य केल्या नंतर यादवी पेक्षा विभाजन परवडले अशी कॉंग्रेस नेत्यांची भुमिका झाली व फाळणीला कॉंग्रेस नेत्याली मान्यता दिल्यावर गांधीजीनी आपला विरोध मागे घेतला. त्यामुळे गांधीजीवर अनेकांनी टिका केली. तर गांधीजीनी मॉऊट बॅटन किंवा इंग्रजांना दोष देण्या ऐवजी कॉंग्रेस व लीग ह्यांना फाळणीस जबाबदार धरले तर बिपन चंद्रानी गांधीजीची असह्यता वर्णन करताना सांगितले की गांधीच्या असह्यतेचे कारण जीनांचा दुराग्रह वा त्याच्या शिष्याची सत्तालालसा हे नव्हते तर जनता संप्रदायवादी बनने यातच गांधीजीची असह्याता दडलेली होती.[5] फाळणीस समाजवादी नेते व हिंदुमहासभेच्या नेत्यांनी विरोध केला. फाळणीची योजना स्विकारणे म्हणजे कॉंग्रेसच्या दुर्बल व शरणागतीच्या धोरणाचा परिपाक आहे. अशी टिका समाजवादी नेत्यानी केली. तर सावरकर म्हणतात कॉंग्रेसने खोट्या राष्ट्रवादाच्या दु:खण्याला बळी पडुन हिंदुस्तानच्या राष्ट्रीय अखंडत्वाची चिरफाड केली.. तर सुमित सरकार म्हणतात "अभुतपुर्व मतैक्य के साथ सब उस मार्ग पर चल पडे थे जो सिधा नरसंहार की और ले जाता था।" [6]

फाळणीस जवाहरलाल नेहरु व सरदार पटेल यांना ही जबाबदार धरले जाते. राममनोहर लोहिया आपल्या 'भारतीय फाळणीचे गुन्हेगार' या पुस्तकात नेहरु व पटेल यांना सत्तेची हाव सुटली होती. ते वृध्दत्वाकडे झुकु लागले होते व त्यामुळे स्वातंत्र्यासाठी त्यांनी विभाजनाची जबर किंमत दिली कारण ही संधी जर हातची गेली तर आपण कधीच सत्ताधीश बनु शकणार नाही अशी भिती वाटली आणि म्हणुन सत्तेच्या मोहापोटी त्यांनी विभाजनास मान्यता दिली. असा अतिशय गंभिर आरोप नेहरु व पटेल यांच्यावर केला. परंतु नेहरुच्या भुमिकेचे विश्लेषण करता असे दिसते की त्यांचा प्रारंभी फाळणीला प्रखर विरोध होता. परंतु हंगामी सरकार मध्ये लीगने केलेली अडवणुक, जातिय दंगली, अमानुश हत्या व रक्तपात तसेच ब्रिटिश सत्तात्यागानंतर भारताचे लहान तुकड्यात होणारे विभाजन होईल ह्या भितीने नेहरु व पटेलांनी अनिच्छेने फाळणीची योजना स्विकारली. त्यांना वाटत होते की सांप्रदायीक विकार कमी होऊन शहानपणा परतल्यावर फाळणी स्विकारली नाही. तर पाकिस्तान जास्त दिवस टिकणार नाही या संदर्भात नेहरु म्हणतात शेवटी एक अखंड व समर्थ भारत निर्माण होईल याची मला खात्री आहे. अनेक वेळा अंधाराची दरी पार केल्यावरच सुर्य किरणांनी न्हाऊन निघालेली पर्वताची शिखरे दिसतात.

बहुतके वेळा 1906 ला मुस्लिम लीगची स्थापना झाली तेथे फाळणीचे बिजे इथे रुजली असे म्हटले जाते.पण अल्पसंख्याकाचा सर्वात मोठा गट या नात्याने आपल्या जमातीच्या हितसंबंधांच्या संवर्धनासाठी अशी एखादी संस्था स्थापने काही गैर नव्हते ब्रिटिश सरकार प्रती निष्ठेची भावना दृढ करणे, भारतातील मुस्लिमांच्या हिताचे व हक्कांचे रक्षण करणे व अन्य जमाती प्रती शत्रुत्व उद्भवू नये याची काळजी घेणे अशी उद्दीष्टे लिगच्या स्थापनेच्यावेळी होती. पुढे मुस्लिम लिगची धोरणे बदली त्यांनी फुटिरतावादाचा पुरस्कार केला व पाकिस्तानचा अट्टास धरला त्यातुन फाळणी झाली.

महमद अली जीना हे बऱ्याच अंशी विभाजनास कारणीभुत होते असे मानले जाते. जिनांनी फाळणीला विरोध दर्शविला ते स्वत:ला टिळकांचे अनुयायी म्हणविण्यात अभिमान बाळगत. व्यक्तीगत जीवनात धर्माला स्थान देत नव्हते.

परंतु 1940 नंतर त्याची धोरणे बदली त्यानी पाकिस्तानची आग्रही मागणी केली देशात प्रचंड प्रमाणात दंगली हिंसाचार निर्माण केला त्यामुळे शेवटी कॉंग्रसला व म.गांधीजीनां विभाजणास मान्यता द्यावी लागली.

देशाची 1947 साली झालेली फाळणी म्हणजे एक मोठी दुर्घटना होय. वर्षानुवर्ष चालत आलेल्या ब्रिटिशांचे फोडा व राज्य करा हे धोरण आणि त्याला मुस्लिम लीगच्या हटवादी भुमिकेची मिळालेली जोड याची परिणीती अखेर फाळणीत झाली. भारतीय जातीयवादाने गाठलेला हा सर्वोच्च बिंदु होता. राष्ट्रीय कॉंग्रसच्या नेत्यांनी थोडा समंजसपणा दाखवला असता तर फाळणी टाळता आली असती. असाही एक तर्क दिला जातो तसेच सरदार पटेल आणि नेहरु यांना सत्तेची प्रतिक्षा असह्य झाल्यामुळे भारताची फाळणी झाली. असा आरोप काही जणाकडुन केला जातो. पण खरे पाहता वास्तविकता तशी नव्हती. राष्ट्रीय नेत्यानी व म.गांधीजीनी फाळणी टाळण्याचा पुरेपुर प्रयत्न केला. पंरतु भारतामध्ये होणाऱ्या प्रचंड हिंसेला आणि तो पसरविणाऱ्या जातियवादाच्या एक अपरिहार्य स्वरुपात फाळणी झाली. मुस्लिम समुदायाला राष्ट्रीय प्रवाहात ओढण्यात आणि मुस्लिम जातीवादाच्या लाटा थोपवुन धरण्यात कॉंग्रेसला अपयश आले. भारतीय राष्ट्रीय कॉंग्रसच्या स्थापने पासुन कॉंग्रेसच्या खांद्यावर मुख्यत: दोन जबाबदाऱ्या होत्या यावरुनच त्याचे यश आणि अपयश ठरणार होते.यातील पहिली जबाबदारी म्हणजे भिन्न वर्ग समुदाय आणि समुहाना एका राष्ट्राच्या छताखाली आणणे, दुसरी उगवत्या राष्ट्रगांना ब्रिटिश कचाटयातुन मुक्त करणे. दुसरी जबाबदारी कॉंग्रेस यशस्वी पार पाडली पण पहिल्या जबाबदारीच्या बाबतीत मात्र कॉंग्रस अपयशी ठरली. याचाच दृश्य अविष्कार म्हणजे भारताची फाळणी होती. भारतातील हिंदु, मुस्लिम व इंग्रज यांच्या जातीय त्रिकोनातुन भारताची फाळणी झाली या जातीय त्रिकोनातील सर्वात महत्त्वाचे म्हणुन ज्याकडे निर्देश केला जातो ते इंग्रजही फाळणीला जबाबदार होते. त्यानंतरचे जबाबदारीचे ओझे मात्र निश्चित लीगच्या खांद्यावर पडते. या दोन्ही प्रमाणेच राष्ट्रीय कॉंग्रेस व भारतीय नेतेही काही प्रमाणात फाळणीस जबाबदार होते असे साकल्याने म्हणता येईल.

भारतीय फाळणी नंतर ही भारतातील जातीयवादाचा प्रश्न पुर्ण पणे मिटलेला दिसत नाही विविध कारणा वरुन भारतात आजही जातीय दंगली घडुन येतात या जातीय प्रश्न सोडविण्याचा विविध मार्गने प्रयत्न चालू असल्याचे दिसते. तसेच फाळणीचे आपत्य म्हणुन जन्माला आलेल्या काश्मीर प्रश्नामुळे भारत पाकिस्तानचे संबंध दुरावले आहेत. या प्रश्नावरुन या देशामध्ये युध्दे घडुन आली तरी हा प्रश्न तसाच दिसतो. अलिकडच्या काही काळात हा प्रश्न चर्चेच्या माध्यमातुन सोडवण्याचा प्रयत्न सुरु आहे. ज्या जातीयवादातुन भारताची फाळणी झाली तो जातियवाद संपविण्यासाठी व भारत पाकिस्तान मधला प्रश्न शांततेच्या मार्गने सोडविण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करणे हे आपले आद्य कर्तव्य बनते.

**संदर्भ :**

[1] चंद्र बिपन, अमलेश त्रिपाठी, बरुन डे,(अनु) मा. कृ. पारधी, स्वातंत्र्य लढा, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, तिसरी आवृत्ती, पृ.1.

[2] चंद्र बिपन,(अनु.) डॉ. काळे एम व्ही, इंडियाज स्ट्रगल फॉर इंडिपेडन्स के सागर प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती 2003, पृ. 597.

[3] डॉ वैद्य सुमन, डॉ कोठेकर शांता, आधुनिक भारताचा इतिहास(1921 ते 1947), श्री साईनाथ प्रकाशन, नागपुर, प्रथमावृत्ती 1999, पृ. 179.

[4] जोशी श्री. म., आणि भारत माता खंडित झाली, मनोरमा प्रकाशन, दादर, प्रथमावृत्ती, पृ. 25.

[5] चंद्र बिपन,(अनु)डॉ. एम व्ही काळे, इंडियाज स्ट्रगल फॉर इंडिपेडन्स के सागर प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती 2003, पृ. 601.

[6] सरकार सुमित, (अनु) डोभाल सुशीला, आधुनिक भारत (1885 ते 1947), राजकमल प्रकाशन, नवी दिल्ली, बारावी आवृत्ती 2005, पृ. 473.